# पवित्र कुरआनचा
## सुलभ मराठी अनुवाद

सय्यद इफ्तिखार अहमद

SALAAM Centre
सलाम सेंटर
शांतता आणि बंधुभावाचा पुरस्कार करते

www.quranforall.in

PAVITRA QURAN (Marathi)
Translation by SYED IFTIKHAR AHMED

Copyright © 2015

ISBN:

All rights reserved. No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, including photocopy, recording, or any information storage and retrieval system, without permission in writing from the author, except for the situation below which is permitted.

**For Reprinting**

Reprinting or reproducing this book on the condition that absolutely no change, addition, or omission is introduced is permitted free of charge. To make high quality reprints, you may contact the author / Salaam Centre to obtain free copies of the soft copy or printing files of this book.

The Web Site of This Book:

This e-book is available on the Web World Wide at:

www.quranforall.in

Price:

Printed and Published by:

SALAAM CENTRE
# 65, Ist main, S.R.K. Garden, Jayanagar East, Bangalore - 560 041
Branch #5, Rich homes, Rochmond road, Bangalore - 560 025

Contact: +91 99011 29956 / +91 99451 77477 / 080 - 2663 9007
Email: salaamcentrebangalore@gmail.com

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

# प्रस्तावना - पहिली आवृत्ती

मागील काही वर्षांत पवित्र कुरआनचे मराठी भाषेत अनेक भाषांतरे प्रकाशित झाली आहेत. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी फक्त एकच भाषांतर उपलब्ध होते ते इ. सन १९१६ मध्ये डॉ. मौलवी हकीम सूफी मीर मोहम्मद याकूब यांनी केले होते. पवित्र कुरआनच्या अनेक भाषांतरामागचे उद्दिष्ठ भाषेतील त्रुटी दूर करण्याचे असते. कोणत्याही भाषेत, तिच्या शैलीत आणि काही वेळा अर्थ लावण्याच्या पद्धतीत काळानुरूप बदल होत असतात. साधारणत: २५-३० वर्षांनी नवीन पिढी जन्मास आल्याने कोणत्याही भाषेत असे बदल होत असतात, कारण भाषासुद्धा मानवांमधील परस्पर संपर्क साधण्याचे जीवित साधन आहे. पवित्र कुरआन सर्व मानवजातीसाठी असून त्याच्या शिकवणी केवळ धर्मपंडित किंवा बुद्धिमंतांसाठी नसून सामान्यांतील सामान्य माणसासाठीदेखील आहेत. प्रत्येक माणसाच्या व्यावहारिक जीवनाशी पवित्र कुरआनच्या शिकवणींचा संबंध असल्याने त्या आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणणे अनिवार्य आहे. याच दृष्टिकोनातून वेळोवेळी नवनवीन भाषांतर प्रकाशित होत आहेत. कारण कुरआनच्या शिकवणी अटळ आणि शाश्वत आहेत, सदासर्वकाळासाठी आहेत. त्यांच्या अर्थामध्ये बदल होणार नाही. म्हणूनच कुरआनचा काळानुरूप भाषेत अनुवाद होणे ही गोष्टदेखील अनिवार्य ठरते. नवनवीन पिढ्यांच्या साहित्यांत, संभाषणाच्या साधनांत बदल होत असतो. त्या अनुषंगाने पवित्र कुरआनच्या शिकवणींचा अनुवाददेखील बदलत्या भाषाशैलीत करणे गरजेचे आहे.

याच दृष्टिकोनातून आमचे स्नेही सय्यद इफ्तिखार अहमद यांनी पवित्र कुरआनचे हे प्रस्तुत भाषांतर केले आहे. गेली अनेक वर्षे आम्ही 'साप्ताहिक शोधन', मुंबईचे प्रकाशक आणि संपादक या नात्याने एकत्रित काम केले आहे. इफ्तिखार अहमद 'साप्ताहिक शोधन'चे संपादक होते आणि मी प्रकाशक व मुद्रक होतो. इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबईच्या संपादकीय मंडळातही सय्यद इफ्तिखार अहमद आपली सेवा देत आहेत.

पवित्र कुरआनच्या मराठी भाषांतराच्या शृंखलेत त्यांच्या या अनुवादाची महत्त्वाची भर पडेल. साध्या, सोप्या आणि सरळ भाषेत केलेला त्यांचा हा अनुवाद वाचकांना नक्कीच आवडेल अशी मला खात्री आहे.

**शहाब बाणकोटी**

दि. १, जानेवारी, २०१२ — चेअरमन, इदारा दावतुल कुरआन, मुंबई.

# प्रस्तावना - दुसरी आवृत्ती

पवित्र कुरआन सुलभ मराठी अनुवादाची प्रथम आवृत्ती इ. सन २०१२ मध्ये प्रकाशित करण्यात आली. अनेक विचारवंत, मान्यवर आणि सामान्य वाचकांनी या अनुवादाचे कौतुक केले, याबद्दल अल्लाहचे आभार.

आता ही दुसरी आवृत्ती प्रकाशित केली जात आहे. या आवृत्तीचे एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रंथाच्या शेवटी एक भलीमोठी विषय सूची जोडण्यात आली आहे. वाचकांना आयतींच्या संदर्भात विविध विषयांवर याद्वारे माहीती मिळवायला सहज मदत होईल. शिवाय पवित्र कुरआनचा सविस्तर परिचयही या आवृत्तीमध्ये देण्यात आलेला आहे. मूळ अरबी मजकुर मात्र या आवृत्तीमधून वगळण्यात आला आहे.

मराठी भाषेत याआधी अनेक भाषांतरे उपलब्ध असताना आणखीन एका नव्या अनुवादाची गरज काय, असा प्रश्न अनेकजण विचारतात आणि ते स्वाभाविकही आहे. याचे उत्तर पहिल्या आवृत्तीमध्ये शहाब बाणकोटी यांच्या प्रस्तावनेत काही अंशी देण्यात आले आहे. वाचकांनी पूर्वीचे अनुवाद वाचलेले आहेत त्यांनी हे अनुवादसुद्धा वाचले असावेत त्यांना जर काही प्रमाणातदेखील पूर्वीच्या आणि आताच्या अनुवादामध्ये बदल वाटला असेल, कुरआनचा अर्थ लावण्यात पूर्वीपेक्षा या अनुवादाद्वारे क्षुल्लक प्रमाणात का असेना त्यांना सहाय्य झाले असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर हेच, असे त्यांनी समजून घ्यावे. पवित्र कुरआनची भाषा, तिची शैली आणि मांडणी कोणत्याही भाषेत जशीच्या तशी प्रस्तुत करणे मुळीच शक्य नाही. पण काळानुरूप ज्या नवीन कल्पना समोर येतात किंवा भाषेचा विकास होतो त्या अनुषंगाने प्रत्येक काळात अशा अनुवादांची गरज भासणारच. कारण हा ग्रंथ माणसांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहे. त्यातील शिकवणी आचरणात आणणे प्रत्येक माणसावर अनिवार्य आहे. मुस्लिम पुरुष असो की स्त्री त्यांना तर कुरआनच्या शिकवणीनुसार जगात वावरायचे आहे. कुरआनच्या शिकवणीनुसार जीवन जगण्यावरच पारलौकिक जीवनात यशप्राप्ती आहे.

पवित्र कुरआनचे एकूण ११४ सूरह (अध्याय) तीस भागांमध्ये विभागले आहेत. प्रत्येक सूरहला नाव दिलेले आहे. काही अध्याय भलेमोठे आहेत. जसे- सूरह क्रमांक २ मध्ये २८६ श्लोक (आयती) आहेत तर एका अध्यायात फक्त तीनच श्लोक आहेत. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर पवित्र कुरआनचे २३ वर्षे वेळोवेळी अवतरण होत राहिले. संपूर्ण ग्रंथ एकाच वेळी पाठवला गेला

नाही. पवित्र कुरआनचे संपादन अल्लाहच्या मार्गदर्शनाखाली प्रेषित मुहम्मद (स.) यांनी स्वत: केलेले आहे. जसजसे कुरआनच्या अध्यायांचे अवतरण होत असे प्रेषित मुहम्मद (स.) आपल्या अनुयायींकरवी ते लिहून घेत असत आणि कोणता मजकुर कोणत्या अध्यायात समाविष्ट करावा किंवा कुठल्या आयती (श्लोक) कोणत्या आयतींसमवेत खाली-वर ठेवायच्या हे प्रेषित मुहम्मद (स.) सांगत असत. त्याच क्रमानुसार त्यांचे अनुयायी तोंडपाठ करीत असत. प्रेषितांनंतर पहिले खलीफा माननीय अबू बकर यांनी कुरआनला प्रथमत: लिखित स्वरूपात सुरक्षित केले आणि शेवटचे खलीफा माननीय उस्मान यांनी लिखित स्वरूपातील या पवित्र ग्रंथाचे एकच प्रमाण ठरवून दिले. आज जगात कुरआनच्या जेवढ्या प्रती आहेत त्या एकसारख्या प्रमाणबद्ध आहेत.

**नोव्हेंबर २०१२**

# अनुवादकाचे मनोगत

अल्लाहच्या कृपेने पवित्र कुरआनचे प्रस्तुत मराठी भाषांतर मराठी भाषिक बांधवांच्या सेवेत अर्पण करताना मला फार आनंद होत आहे. या कामी 'साप्ताहिक शोधन'चे सहसंपादक शाहजहान मगदुम आणि पत्रकार सुनिल कांबळी यांनी मराठी भाषेतील तांत्रिक अडचणी दूर करण्यास मोलाचे सहकार्य दिल्याबद्दल, तसेच मला हरप्रकारे सहाय्य करणाऱ्या माझ्या मित्रांचा मी ऋणी आहे. त्यांच्या बहुमोल सहकार्याविना मी हे काम करूच शकलो नसतो. अल्लाह त्यांना उत्तम मोबदला देवो. माझे स्नेही ज. शहाब बाणकोटी यांनी या अनुवादास आपली प्रस्तावना देऊन मला उपकृत केले त्याबद्दल त्यांचे अनेकानेक धन्यवाद!

मूळ अरबी भाषेतून साध्या सरळ मराठी भाषेत पवित्र कुरआनचा अनुवाद करताना पवित्र कुरआनच्या खालील भाषांतरांचे सहाय्य घेतले गेले आहे.

१. पवित्र कुरआनचे सुरस व सटिक मराठी भाषांतर, डॉ. मौलवी हकीम सूफी मीर मोहम्मद याकूब खान, प्रकाशक- डॉ. एम. यू. शेख, मुंबई-१. (इ.स.१९७३)

२. ग्लोरियस कुरआन, मार्माड्यूक पिकथाल, प्रकाशक- इदारा इशाअत-ए-दीनियात, दिल्ली-१३. (इ.स. १९९२)

३. द होली कुरआन इंग्लिश ट्रान्सलेशन, अब्दुल्लाह यूसुफ अली, प्रकाशक- मुमलिकत अरबियतस्सऊदिया, सऊदीअरब.

४. तर्जुमानुल कुरआन, मौलाना अबुल कलाम आझाद (उर्दू भाषांतर), मौ. आझाद रिसर्च इन्स्टिट्यूट, दिल्ली-२५. (इ.स. २००६)

५. दिव्य कुरआन, सटीप मराठी भाषांतर, मौलाना अबुल आला मौदूदी यांच्या उर्दूतील भाषांतराचा मराठी अनुवाद, अब्दुल जब्बार कुरेशी, कुत्बुद्दीन मनियार, मुबारक हुसैन मनियार, प्रकाशक- इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबई. (इ.स. २००८)

६. कन्जुल ईमान, अज आला हजरत अल्लामा अहमद रजा खान साहब, प्रकाशक- ताज कम्पनीनुरुप, एम. आशिकैन अँड कम्पनी, दिल्ली-६.

७. आसान उर्दू तर्जुमा कुरआन मजीद, हाफिज नजर अहमद, फरीद बुक डेपो, दिल्ली-६ (इ.स. १९८७)

८. अल कुरआनुल हकीम, उर्दू भाषांतर, ह.मौलाना महमूदुल हसन, प्रकाशक- मुमलकतुल अरबीयतस्सऊदिया, मदीना शरीफ, सऊदीअरब. (इ.स. १९९३)
९. अल-कुरआनुल हकीम, इंग्रजी भाषांतर, अबुल कसीम पब्लिसिंग हाऊस, सहीह इन्टरनेशनल, रियाज, सऊदीअरब.
१०. अहसनुल कलाम, मौ. मुहम्मद जूनागढी, इस्लामिक बुक हाऊस, नई दिल्ली. (इ.स. १९९७)
११. मुफर्रदातुल कुरआन, इमाम रागिब असफहानी, प्रकाशक- शेख शम्सुल हक, लाहोर. (इ.स. १९८७)
१२. A Dictionary and Glossary of Quran, John Penrice, D. K. Publishers, New Delhi-2.
१३. कुरआन मजीद, हिन्दी अनुवाद, फारुक खान, मक्तबा अल-हसनात, दिल्ली. (इ.स. २००८)
१४. दावतुल कुरआन, शम्स पीरजादा, इदारा दावतुल कुरआन, मुंबई.

**सय्यद इफ्तिखार अहमद**

# परिचय

अल्लाहकडून प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याद्वारे मानवजातीसाठी पाठवलेले मार्गदर्शन म्हणजेच कुरआन हे महान असे वरदान आहे. कुरआनच्या अवतरणकाळापासून मानवांना विविध पद्धतीने त्याचा परिचय करून दिला जातो. सर्वांत महत्त्वाचा परिचय म्हणजे या ईशग्रंथाद्वारे कुणा एका राष्ट्रासाठी, विशिष्ट मानवी समुदायासाठी, एका विशिष्ट धर्मियांसाठी, एका वर्गासाठी नव्हे तर अखिल मानवजातीसाठी, तमाम लोकांना रास्त मार्गदर्शन केले गेले आहे.

*रमजान महिन्यात तमाम मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी कुरआनचे अवतरण झाले. सत्य आणि असत्य याचे स्पपष्टीकरण याद्वारे केले गेले आहे.* (२:१८५)

प्रा. जफरुल इस्लाम इस्लाही यांच्या मते पवित्र कुरआन जसे तमाम मानवांसाठीचा ग्रंथ आहे, कोणा विशिष्ट लोकसमुदायासाठी नाही. तसेच यातील शिकवण केवळ उपासना, नमाज, रोजा अशा धार्मिक विधींपर्यंतच सीमित नसून त्या मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्र, बाबीविषयी, आचारविचार, वागणूक, आपसातील व्यवहार, युद्ध, शांतता, शासन-प्रशासन, राज्यव्यवस्था, आर्थिक जीवन, समाजजीवन, वगैरे सर्व बाबींविषयी शिकवण देते. एकमेकांशी चांगुलपणाने कसे वागावे, सामाजिक नाते-संबंध कसे सांभाळावे, रक्ताची नाती कशी जोपासावीत, आपापसातील देवाण-घेवाण कशा रितीने करायची याचेही मार्गदर्शन कुरआनात केले गेले आहे. मानवामानवांमधील अल्लाहने घालून दिलेले नातेसंबंध मोडणे म्हणजे अल्लाहला दिलेले वचन भंग करणे आणि पृथ्वीवर अनाचार माजवणे असे कुरआनात सांगण्यात आले आहे. (२:२७)

कुरआनात म्हटले आहे,

*''मानवांनो, तुमच्या विधात्याकडून तुम्हास शिकवण दिली गेली, ती मनांमधील विकृतीवर उपायकारक असून (यावर) श्रद्धा ठेवणाऱ्यासाठी मार्गदर्शन आणि (अल्लाहची) ती कृपा आहे.''* (१०:५७)

शिकवण म्हणजे समाजजीवनासाठी मूलभूत भल्या गोष्टी, त्या ऐकणे त्याकडे लक्ष देणे, सदैव आठवणीत ठेवणे आणि त्यानुसार आचरण करणे अशा

गोष्टी होय. या सर्वांमध्ये माणसाचे हित दडलेले असते. स्वयं आपल्या निर्माता आणि विधात्याकडून लाभणाऱ्या शिकवणीपेक्षा दुसरी कोणती शिकवण असू शकते! कारण तो माणवांचा निर्माता असल्याने त्यांच्या गरजा, अडीअडचणी, चांगले-वाईट प्रत्येक गोष्टीची त्यास जाणीव आहे. तो मानवांशी प्रेम करणारा दयावंत आहे. कुरआनरूपी अल्लाहने पाठवलेली शिकवण मानवी जीवनातील हरेक प्रसंगी मार्गदर्शन करणारी सर्वसमावेशक अशी आहे, तिच्यात कसली विकृती, विरोधाभास, बुद्धिमत्तेला पटणारी, अंत:करणात घर करून राहणारी आहे. या शिकवणी समस्त ग्रथांमध्ये प्रत्येक पानावर आढळतात. कुठूनही काहीही वाचले तरी कोणती न् कोणती शिकवण नजरेस पडते. मोजक्या, मोहक आणि लयबद्ध शब्दांमध्ये सुंदर भाषाशैलीत.

कुरआनात म्हटले आहे,

*''आम्ही तुम्हास असा ग्रंथ दिला आहे ज्यामध्ये तुमच्या स्वत:विषयीचे वर्णन आहे.''* (२:११०)

याचा अर्थ या ग्रंथाचे वाचन करताना प्रत्येकास स्वत:चे भान होते. आपल्यामधील चांगल्या आणि वाईट गोष्टी कोणत्या याची त्यास माहिती होते. आपली नैतिकता आणि आचारविचार याचे प्रतिबिंब त्यास या ग्रंथात आढळते. अल्लाहच्या पसंती आणि त्यास न आढळणाऱ्या गोष्टींचा उल्लेख या ग्रंथात दिला गेला असल्याने प्रत्येक मनुष्य आपल्या चारित्र्याचे, नैतिकतेचे स्वत: मोजमाप करू शकतो. अल्लाहचे अधिकार तसेच आपल्या अवतीभवतीच्या समाजाचे जे हक्काधिकार आहेत ते आपण कशा रितीने पूर्ण करतो, हे आपल्या सहज लक्षात येते.

एका सामान्य व्यक्तीपासून एक समाज, समुदाय किंबहुना सबंध राष्ट्र या ग्रंथाद्वारे स्वत:चे आकलन करू शकते. यामध्ये राजकारण, समाजकारण, शासनव्यवस्था इत्यादी बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन आढळते आणि त्याविषयी मार्गदर्शक तत्त्वेही सांगितली गेली आहेत. पवित्र कुरआनच्या अध्याय क्रमांक ३३, 'अहजाब'मध्ये इस्लामच्या अनुयायींची वैशिष्ट्ये सांगितली गेली आहेत. म्हणजे ते अल्लाहचे आज्ञाधारक असतात, सत्यवादी, संयमी असतात. त्यांचे जगणे सरळ साधे असते, ते दानधर्म करणारे असतात, व्यभिचारापासून

अलिप्त असतात. सदासर्वकाळ अल्लाहच्या शिकवणी त्यांच्या आठवणीत असतात.

'अन्‌निसा' नामक अध्यायात (४:३६) अल्लाहची उपासना करा, माता-पित्याशी सभ्यतेने दयेने वागा, नातलगांचे हक्काधिकारांची जाणीव ठेवा, त्यांच्याशी आपुलकी निर्माण करा, अनाथांची काळजी घ्या, त्यांना आधार द्या, जवळ करा, निराधारांच्या गरजेकडे लक्ष द्या, आपल्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांशी चांगले संबंध ठेवा, अडीअडचणींत त्यांची साथ द्या, त्यांना त्रास देऊ नका. तसेच आपल्या जवळील लोकांशी परोपकाराचा व्यवहार करा.

सामाजिक विकृती कोणत्याही समाजात तेढ निर्माण करते. एकमेकांची अवहेलना करणे, थट्टामस्करी करणे यामुळे आपसातील संबंधांना तडा जातो. समाजाचे विघटन व्हायला यापासूनच सुरुवात होते. म्हणून पवित्र कुरआनने याची अधिक दखल घेतली. अशा सर्व अवगुणांपासून तो प्रत्येक माणसास दूर राहण्याची शिकवण देतो. 'हुजुरात' क्र. ९ या अध्यायात अशा विकृतींपासून अलिप्त राहण्यास सांगितले आहे.

*''कुणाची चेष्टा करू नका, दोषारोप करू नका, एकमेकांस अपशब्दाने संबोधू नका, भलतेच अंदाज लावित बसू नका, इतरांच्या खाजगी जीवनात डोकावू नका, एकमेकांच्या पाठीमागे चहाडी करू नका.''*

आणखी दुसऱ्या ठिकाणी वाममार्गाने मिळकत गोळा करण्यास, आपल्या श्रीमंतीवर गर्व करण्यास मनाई करत वैध मालमत्तेतून गोरगरीब दीनदुबळे, नातलग, प्रवासी, वंचित अशा लोकांची तरतूद करण्यास सांगितले आहे. कुणी तुमचे कर्ज देणे असल्यास त्यास मोकळीक मिळेपर्यंत सवड द्या, दारावर कुणी मागायला आल्यास त्याला झिडकारू नका, त्याच्या भावना दुखवू नका, पुण्यकार्यात हिरीरीने खर्च करा, न्याय्य मोजमाप करा, दिलेले वचन पाळा. या गोष्टी वरकरणी लहान स्वरूपाच्या जरी वाटत असल्या तरी खऱ्या अर्थाने आपल्या समाजजीवनासाठी सुखसोयीच्या संबंधासाठी पायाभूत नैतिक शिकवणी आहेत. समाजमन घडवण्यात, एकमेकांचा विश्वास जिंकण्यात त्यांचा मोलाचा वाटा असतो. किंबहुना यांच्याच पायावर एका कल्याणकारी, शांततामय समाजाचा व राष्ट्राचा इमला उभा राहतो. भात शिजवत असताना तो

शिजला की नाही याचे एक शित जसे तपासून पाहिले जाते तसेच कोणत्याही राष्ट्राच्या जनसमूहाच्या एका व्यक्तीची नैतिक अवस्था काय आहे यावरूनच ते राष्ट्र वा जनसमुदाय कसा असेल याचा अंदाज येतो.

रहमान (अल्लाह) चे भक्त कसे असतात याचे विवरण अन्य एका अध्यायात सुंदरपणे सांगितले आहे. ते धरतीवर नम्रतेने वागतात, अभद्र लोकांच्या तोंडी लागत नाहीत, उपासना- प्रार्थना करत असतात, याचना करतात की आम्हास नरकापासून वाचव ते खरंच वाईट ठिकाण आहे. वायफळ खर्च करत नाहीत, चंगळवादाला बळी पडत नाहीत, अल्लाहशिवाय इतरांची भक्ती करत नाहीत, व्यभिचार करत नाहीत, कोणास नाहक इजा पोहचवत नाहीत, कुणाची हत्या करत नाहीत, त्यांना त्यांच्या विधात्याच्या शिकवणींची आठवण करून दिल्यास त्याकडे दुर्लक्ष करत नाहीत. याबहुमोल शिकवणींविषयी कुरआन म्हणते ते खरेच आहे,

*''ग्रंथ काय असतो आणि श्रद्धा म्हणजे काय हे तुम्हास माहीत नव्हते, ते आम्ही उजेडात आणले. त्याद्वारे तुम्हास मार्ग दाखवितो. या ग्रंथाद्वारे तुम्ही (प्रेषित) सरळमार्गाकडे दिशानिर्देश करीत आहात. त्या विधात्याकडे जो धरती आणि आकाशांचा स्वामी आहे. सर्वकाही अल्लाहकडेच रुजू होणार आहे, हे लक्षात ठेवा.''* (२६:५२-५३)

वर दिलेला पवित्र कुरआनचा फार थोडक्यात परिचय आहे. वास्तविक पाहता हा एक सर्वोत्तम ग्रंथ आहे. यामध्ये काल्पनिक, चमत्कारिक किंवा भलेमोठे वाङमय आणि नुसतेच तत्त्वज्ञान नाही. सामान्यातील सामान्य माणसापासून उच्चशिक्षित मंडळी असो की वैज्ञानिक, साहित्यिक, निरनिराळे विद्वान असोत मानवाचे ऐहिक जीवन असो की आध्यात्मिक बाबी असोत, मानवाच्या दैनंदिन जीवनातील वैयक्तिक आणि वास्तविक गोष्टी असोत; कुणा एका लेखात पवित्र कुरआनातील भाष्याचा सखोल आढावा घेता येणे शक्य नाही. हा ग्रंथ एका आरशाप्रमाणे आहे यात जो तो आपल्या आचरणानुसार आपले प्रतिबिंब पाहू शकतो. यातील शिकवण सत्यतेवर आधारित आहे. याचबरोबर हा ग्रंथ कुणा एका जाती-धर्माच्या, राष्ट्राच्या लोकांसाठी नसून अखिल मानवजातीसाठी आहे. या शिकवणीनुसार आचरण केल्याने या जगात

आणि परलोकात माणसाचा उत्कर्ष घडणार हे निश्चित! कारण हा ग्रंथ म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याद्वारे साऱ्या मानवसमूहास दस्तुरखुद्द अल्लाहने पाठवलेली देणगी होय. यातील शिकवणीनुसार या जगात आचारण केल्यानेच या ग्रंथाचा यथोचित आदर-सन्मान केला जाऊ शकतो.

आता काही गोष्टी या ग्रंथाचे अरतरण आणि याची रचना, भाषाशैली इत्यादी गोष्टींबाबत. मौलाना सय्यद अबुल आला मौदूदी म्हणतात, एक सामान्य माणूस जेव्हा पहिल्यांदा पवित्र कुरआनचा अभ्यास करू पाहतो तेव्हा त्याला असे वाटते आणि ते स्वाभाविकही आहे की इतर साहित्याप्रमाणेच कुरआनही एक पुस्तक असेल, हा एक सविस्तर निबंध असेल. एका विषयावर लिहिलेला, निरनिराळ्या भागांमध्ये त्याची विभागणी केलेली असेल. काही प्रकरणे असतील. धर्मग्रंथ असल्याने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राबाबत स्वतंत्र प्रकरणात विश्लेषण व त्यावर भाष्य केलेले असेल. पण जेव्हा तो याचा अभ्यास करायला सुरुवात करतो त्याला असे काही आढळत नाही. पुस्तकरूपी प्रचलित पद्धतीच्या उलट एक विचित्र शैलीशी त्याचा सामना होतो. यामध्ये सर्वकाही आहे, श्रद्धेविषयी, दैनंदिन जीवनातील समस्यांच्या बाबतीत, नैतिकतेच्या गोष्टी, कायद्यात्मक आदेश, बोधप्रद बाबी, टीका-टिप्पणी, ऐतिहासिक घटनांचा उल्लेख, पूर्वकालीन, तात्कालीन आणि तात्कालिक विषय, सृष्टी, त्याची रचना इत्यादी. पण पवित्र कुरआनात हे साहित्य ठराविक साचेबद्ध पद्धतीने मांडलेले दिसत नाही. एका विषयाचा उल्लेख संपत नाही तोच दुसऱ्या विषयाची मधूनच सुरुवात होते.

याचे कारण अल्लाहने हा ग्रंथ लिहून संपूर्ण कुरआन एकाच वेळी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याद्वारे पाठविलेला नाही. त्याने प्रेषितांना साऱ्या मानवजातीला इस्लाम धर्माचे आमंत्रण देण्यासाठी निवडले. त्यानुसार मक्का शहरापासून त्यांनी या कार्याची सुरुवात केली. त्यांचा संपूर्ण कार्यकाळ २३ वर्षांचा होता. म्हणजे कुरआनचे अवतरण या २३ वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने होत राहिले. प्रेषितांकरवी समोरच्या लोकांना जीवनाच्या विविध प्रसंगी जी जी शिकवण आवश्यक होती त्या प्रसंगानुरूप हे अवतरण होत राहिले. कधी माणसांच्या श्रद्धेबाबत तर कधी त्यांच्या कौटुंबिक जीवनाविषयी, युद्धास सामोरे जावे लागले तर युद्धाचे कायदे-नियम, समस्यांमध्ये गुरफटत

असलेल्या लोकांचे समाधान कसे करावे त्या अनुषंगाने पवित्र कुरआनातील शिकवणी अवतरित होत असत. जसजसा इस्लामचा प्रसार-प्रचार होत गेला, इस्लामच्या अनुयायींचा विस्तार होत गेला, सभ्यता वृद्धिंगत होत गेली, तिचा विकास होत गेला, तसतसे इस्लामच्या अनुयायींनी कसे वागावे, राज्य कसे चालवावे, इतर राष्ट्रांशी कसा व्यवहार करावा या साऱ्या बाबींविषयी त्यांचे मार्गदर्शन होत राहिले. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यापूर्वी जे प्रेषित अल्लाहने पाठवले त्यांच्या अनुयायींनी त्यांच्याशी कसा व्यवहार केला, नाकारणाऱ्या जनसमूहांना अल्लाहने कशी शिक्षा दिली, अशा ऐतिहासिक गोष्टींचासुद्धा प्रसंगानुरूप वृत्तान्त या पवित्र ग्रंथामध्ये दिलेला आहे. म्हणजे प्रेषितांच्या २३ वर्षांच्या वाटचालीत या ग्रंथामध्ये आणि यातील मार्गदर्शनामध्ये आढावा घेण्यात आला आहे. म्हणून जसे इतर प्रचलित साहित्य असते तशा प्रकारचा हा ग्रंथ नाही. एकाच टप्प्यात सबंध मजकूर लिहिला गेलेला नसून तत्कालीन इस्लामच्या विस्तारानुसार या ग्रंथात मानवांशी त्यांच्या बोलीभाषेत अल्लाहने प्रेषितांकरवी साधलेला हा एक प्रकारचा संवाद आहे. हे लक्षात ठेवूनच या ग्रंथाचा अभ्यास केला तर उद्‌भवणाऱ्या समस्यांचे समाधान होऊ शकते.

मौलाना अबुल कलाम आझाद म्हणतात, पवित्र कुरआनची रचना, शैली, मांडणी, संबोधन आणि स्वरूप आपण ठरवलेल्या मापदंडांशी सुसंगत नाही आणि तो तसा असता कामाही नये. त्याची आपली स्वत:ची शैली असून ती निसर्गानुरूप आहे. कुरआनचे अवतरण होत होते त्या वेळचे लोकही सभ्यतेने आखलेल्या चौकटीत नव्हते, ते साधेसुधे लोक होते. पवित्र कुरआनची शैली आणि त्याचा अर्थ त्यांच्या हृदयामध्ये घर करत असे आणि म्हणूनच त्यांना पवित्र कुरआन समजण्यात कसलीही अडचण येत नसे. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे अनुयायी जेव्हा कुरआनच्या आयती (श्लोक) ऐकत असत ते ऐकल्याबरोबर त्यामागचे वास्तव त्यांच्या लक्षात यायचे. जसजसे कुरआनचे अवतरण होत असे तसतसे प्रेषित त्यांना ते ऐकवत असत. त्या अवतरणाविषयी त्यांच्या मनातील शंका प्रेषितांना ते विचारत असत आणि प्रेषित त्यांचे समाधान करीत. प्रेषितांच्या अनुयायींची मात्र भाषा अरबी असल्याने सुद्धा त्याच्यासमोर इतर भाषींसारखी अडचण नव्हती. इस्लाम धर्म आणि पवित्र कुरआन फक्त अरब लोकांसाठीच अल्लाहने विहित केलेले नाही.

जगातील सर्व लोकांसाठी अल्लाहने हा ग्रंथ पाठवलेला असल्याने पवित्र कुरआनचे जगातील जवळजवळ सर्वच भाषांमध्ये अनुवाद करणे आवश्यक होते. कोणत्याही भाषेचा दुसऱ्या भाषेमध्ये अनुवाद करताना त्या त्या भाषांची बंधने असतातच. मुस्लिम विद्वानांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून हे कर्तव्य पूर्ण केलेले आहे. प्रेषितांच्या तत्कालीन अनुयायींच्या पवित्र कुरआनमधील ज्या गोष्टी सहज लक्षात येत असत, तशी स्थिती बिगरअरबी भाषितकांची नाही, तरी कुरआनातील शिकवणी आणि मार्गदर्शनाबाबत ठळक गोष्टी वाचकांच्या लक्षात येतील याकडे सर्व भाष्यकारांनी लक्ष्य दिलेले आहे, यात मुळीच शंका नाही.

अल्लाहने मानवाच्या ऐहिक आणि पारलौकिक जीवनात मार्गदर्शन करण्यासाठी पवित्र कुरआनची देणगी मानवजातीला दिलेली आहे. या देणगीचा सर्वत्र प्रसार व्हावा याकरिताच या ग्रंथाचे जगभर सर्वच भाषांमध्ये अनुवाद केले जातात.

\- - - - - - - - - - - - - -

# अनुक्रमणिका


| सूरह क्र. | सूरहचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | अल फातिहा | १ |
| २ | अल बकरह | २ |
| ३ | आले-इमरान | ४७ |
| ४ | अन-निसा | ७४ |
| ५ | अल-माईदा | १०२ |
| ६ | अल-अनआम | १२३ |
| ७ | अल-आराफ | १४७ |
| ८ | अल-अनफाल | १७४ |
| ९ | अत-तौबा | १८४ |
| १० | यूनुस | २०४ |
| ११ | हूद | २१८ |
| १२ | यूसुफ | २३३ |
| १३ | अर्रअद | २४७ |
| १४ | इब्राहीम | २५४ |
| १५ | हिज्र | २६१ |
| १६ | अन्नहल | २६८ |
| १७ | बनी इस्राईल | २८३ |
| १८ | कहफ | २९६ |
| १९ | मरयम | ३०९ |
| २० | ताहा | ३१८ |
| २१ | अल अंबिया | ३३० |
| २२ | अल हज्ज | ३४१ |
| २३ | अल मूमीनून | ३५१ |
| २४ | अन्नूर | ३६१ |
| २५ | अल फुरकान | ३७१ |
| २६ | अश्शुअरा | ३७९ |
| २७ | अन्नम्ल | ३९४ |
| २८ | अल कसस | ४०४ |

| सूरह क्र. | सूरहचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| २९ | अल अनकबूत | ४१५ |
| ३० | अर्रुम | ४२३ |
| ३१ | लुकमान | ४३० |
| ३२ | अस्सजदा | ४३४ |
| ३३ | अल अहजाब | ४३७ |
| ३४ | सबा | ४४७ |
| ३५ | फातिर | ४५४ |
| ३६ | यासीन | ४६० |
| ३७ | अस्साफ्फात | ४६७ |
| ३८ | सॉद | ४७७ |
| ३९ | अजज़ुमर | ४८४ |
| ४० | अल-मुअमिन | ४९३ |
| ४१ | हामीम-अस्सजदा | ५०३ |
| ४२ | अश्शूरा | ५१० |
| ४३ | अज़-जुखरुफ | ५१७ |
| ४४ | अद-दुखान | ५२५ |
| ४५ | अल-जासिया | ५२९ |
| ४६ | अल-अहकाफ | ५३३ |
| ४७ | मुहम्मद | ५३८ |
| ४८ | अल-फतह | ५४३ |
| ४९ | अल-हुजुरात | ५४८ |
| ५० | क़ाफ | ५५१ |
| ५१ | अज़-ज़ारियात | ५५५ |
| ५२ | अत-तूर | ५५९ |
| ५३ | अन-नज्म | ५६३ |
| ५४ | अल-कमर | ५६७ |
| ५५ | अर-रहमान | ५७१ |
| ५६ | अल-वाकिआ | ५७६ |
| ५७ | अल-हदीद | ५८१ |

| सूरह क्र. | सूरहचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| ५८ | अल-मुजादिला | ५८६ |
| ५९ | अल-हश्र | ५९० |
| ६० | अल-मुमतहिना | ५९४ |
| ६१ | अस्सफ | ५९७ |
| ६२ | अल-जुमुआ | ५९९ |
| ६३ | अल-मुनाफिकुन | ६०१ |
| ६४ | अत-तगाबुन | ६०३ |
| ६५ | अत-तलाक | ६०५ |
| ६६ | अत-तहरीम | ६०८ |
| ६७ | अल-मुल्क | ६१० |
| ६८ | अल-कलम | ६१३ |
| ६९ | अल-हाक्का | ६१७ |
| ७० | अल-मआरिज | ६२० |
| ७१ | नूह | ६२३ |
| ७२ | अल-जिन्न | ६२५ |
| ७३ | अल-मुज्जम्मिल | ६२८ |
| ७४ | अल-मुद्दस्सिर | ६३० |
| ७५ | अल-क़यामा | ६३३ |
| ७६ | अद-दहर | ६३६ |
| ७७ | अल-मुरसलात | ६३९ |
| ७८ | अन्नबा | ६४२ |
| ७९ | अन-नाजिआत | ६४५ |
| ८० | अबस | ६४८ |
| ८१ | तकवीर | ६५० |
| ८२ | अल-इन्फितार | ६५२ |
| ८३ | मुतफ्फिफीन | ६५४ |
| ८४ | अल-इन्शिकाक | ६५६ |
| ८५ | अल-बुरुज | ६५८ |
| ८६ | अत्तारिक | ६६० |

| सूरह क्र. | सूरहचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| ८७ | अल-आला | ६६१ |
| ८८ | अलगाशिया | ६६२ |
| ८९ | अल-फज्र | ६६४ |
| ९० | अल-बलद | ६६६ |
| ९१ | अश्शम्स | ६६८ |
| ९२ | अल-लैल | ६६९ |
| ९३ | अज-जुहा | ६७१ |
| ९४ | अल-इन्शिराह | ६७२ |
| ९५ | अत-तीन | ६७३ |
| ९६ | अल-अलक | ६७४ |
| ९७ | अल-कद्र | ६७५ |
| ९८ | अल-बय्यनह | ६७६ |
| ९९ | अज्ज्जिलजाल | ६७७ |
| १०० | अल-आदियात | ६७८ |
| १०१ | अल-कारिआ | ६७९ |
| १०२ | अत-तकासुर | ६८० |
| १०३ | अल-अस्त्र | ६८१ |
| १०४ | अल-हुमजा | ६८२ |
| १०५ | अल-फील | ६८३ |
| १०६ | अल-कुरैश | ६८४ |
| १०७ | अल-माऊन | ६८५ |
| १०८ | अल-कौसर | ६८६ |
| १०९ | अल-काफिरून | ६८७ |
| ११० | अन-नस्त्र | ६८८ |
| १११ | अल-लहब | ६८९ |
| ११२ | अल-इखलास | ६९० |
| ११३ | अल-फलक | ६९१ |
| ११४ | अन-नास | ६९२ |
| | विषय सूची | ६९३ |

# १. सूरह अल फातिहा

**मक्काकालीन, आयती ७**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सर्व स्तुती अखिल विश्वाचा स्वामी अल्लाहसाठीच.

२) नितांत कृपावंत व नितांत दयावंत

३) निर्णयाच्या दिनाचा स्वामी

४) आम्ही तुझीच भक्ती करतो नि तुझीच मदत मागतो.

५) आम्हाला सरळमार्ग दाखव.

६) ज्यांच्यावर तू कृपा केलीस अशांचा,

७) जे कोपग्रस्त झाले नाहीत की मार्गभ्रष्ट झाले नाहीत.

-------

# २. सूरह अल बकरह

**मदीनाकालीन, आयती २८६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ. लाम. मीम.

२) हा अल्लाहचा ग्रंथ आहे यात काही संदेह नाही. अल्लाहला भिऊन असणाऱ्यांसाठी मार्गदर्शन.

३) जे परोक्षावर श्रद्धा ठेवतात, नियमित नमाज (प्रार्थना) पढतात आणि जी काही साधनं त्यांना बहाल केली गेली आहेत त्यातून ते खर्च करतात

४) तसेच जे लोक, तुझ्यावर जे काही अवतरित केलंय आणि तुमच्या पूर्वींच्यांवर जे अवतरण केलं गेलंय त्यावर श्रद्धा ठेवतात. आणि परलोकावर (मरणोत्तर जीवन) ज्यांचा विश्वास आहे.

५) हेच लोक आपल्या विधात्यानं (घालून दिलेल्या) मार्गदर्शनावर आहेत अशाच लोकांचा उत्कर्ष होईल.

६) ज्या लोकांनी नाकारलं त्यांना तुम्ही सावध करा अथवा करू नका, सारखंच आहे. ते (कधीही) श्रद्धा बाळगणार नाहीत.

७) (कारण) अल्लाहनं त्यांच्या मनांवर, त्यांच्या कानांवर मोहर लावली आहे आणि त्यांच्या डोळ्यांवर पडदा घातलाय. त्यांच्यासाठी भयंकर शिक्षा आहे.

८) काही लोक असं म्हणतात आम्ही अल्लाह आणि अंतिम दिनावर विश्वास ठेवतो, वास्तविक पाहता ते विश्वासूंपैकी नाहीत.

९) ते अल्लाह आणि श्रद्धावंतांना फसवू पाहतात, पण त्यांना याचं भान नाही की ते स्वत:चीच फसवणूक करून घेतात.

१०) त्यांना विघ्न लागलंय आणि अल्लाह त्यात आणखी भर घालत

असतो. ते खोटं बोलत असतात म्हणून अशा लोकांना कठोर शिक्षा आहे.

११) त्यांना जेव्हा सांगण्यात येतं धरतीवर उपद्रव माजवू नका, तर (उलटपक्षी) ते म्हणतात, आम्ही तर सुधारणा करत आहोत.

१२) ऐकून घ्या ते खऱ्या अर्थानं अनाचारी आहेत, परंतु त्यांना त्याचं भान नाही.

१३) त्यांना जेव्हा सांगण्यात येतं, इतर लोकांप्रमाणं तुम्हीही श्रद्धा धारण करा, ऐका ते म्हणतात, आम्ही मूर्खासारखं श्रद्धा ठेवायची. ते स्वतःच मूर्ख आहेत, त्यांना त्याची जाण नाही.

१४) श्रद्धावंतांशी त्यांची भेट झाल्यास ते म्हणतात, आम्हीदेखील विश्वासू आहोत. पण जेव्हा ते आपल्या सैतानाच्या सान्निध्यात असतात ते म्हणतात, आम्ही तर तुमच्या बाजूनं आहोत. आम्ही तर त्यांची थट्टा करत आहोत.

१५) अल्लाहच (खरं तर) त्यांची थट्टा करतो आणि ते (ज्या मर्यादांचं) उल्लंघन करत आहेत त्यात त्यांना भरकटत सोडून देतो.

१६) हेच ते लोक आहेत ज्यांनी मार्गदर्शनाचा सौदा मार्गभ्रष्टतेनं केला. त्यांच्या या व्यवहाराचा त्यांना काहीएक लाभ होणार नसून ते रास्त मार्गाला मुकले आहेत.

१७) त्यांचे उदाहरण एखाद्या अशा माणसासारखं आहे ज्यानं (उजेडासाठी) आग पेटवली आणि सर्व परिसर प्रकाशमान झाला. (पण) अल्लाहनं त्यांच्यापासून तो प्रकाश काढून घेतला. त्यांना अंधारात सोडून दिलं (त्यामुळं) त्यांना काहीच दिसत नाही.

१८) ते मुके, बहिरे आणि आंधळे आहेत, ते परतणार नाहीत.

१९) अथवा (त्यांची स्थिती अशी आहे की) आकाशातून पाऊस पडतो (सर्वत्र) अंधार (पसरलाय), ढगांच्या कडकडाटात वीज कोसळतेय. (विजेचा) कडकडाट ऐकून मरणाच्या भीतीपायी ते आपल्या कानांत

बोटं घालतात, पण अल्लाहनं या बंडखोरांना सर्व बाजूंनी वेढलंय.

२०) विजेच्या लखलखाटीमुळं त्यांची दृष्टी हिरावली जाते. प्रत्येक वेळी वीज चमकते तेव्हा ते पुढं जातात, जेव्हा अंधार पसरतो ते उभे राहतात. अल्लाहने तसे इच्छिले तर त्यांचं ऐकणं आणि त्यांचं पाहणं हिरावून घेईल, कारण अल्लाहचं सर्व बाबींवर प्रभुत्व आहे.

२१) लोकहो, आपल्या विधात्याची भक्ती करा ज्यानं तुम्हाला आणि तुमच्या पूर्वीच्यांना तुम्ही सदाचारी व्हाल म्हणून जन्म दिला.

२२) ज्यानं धरतीला तुमच्यासाठी आश्रयस्थान बनवलं आणि आकाशाचं छत उभारलं आणि त्यातून पाणी वर्षविलं ज्यातून तुमच्या उपजीविकेसाठी फळे काढली, तुम्ही हे सर्व जाणता तेव्हा अल्लाहचा कोणी भागीदार बनवू नका.

२३) आम्ही आमच्या भक्तावर जे काही अवतरलंय त्यात तुम्हाला कसली शंका असेल, आणि तुम्ही प्रामाणिक असाल तर यासारखा एखादा अध्याय रचून आणा, आपल्या मदतीसाठी अल्लाहला सोडून तुम्ही हवे त्यांना बोलवा.

२४) पण जर तुम्हाला हे जमलं नाही आणि ते कदापि जमणार नाही, तेव्हा नाकारणाऱ्यांसाठी तयार ठेवलेल्या नरकाग्नीचं भय बाळगा, ज्यात इंधनासाठी मानव आणि दगड उपयोगी आणलेले आहेत.

२५) आणि श्रद्धावंत सदाचारी लोकांना खूशखबर द्या, त्यांच्यासाठी अशा स्वर्गाच्या बागा आहेत ज्यांच्या खालून नद्या वाहत आहेत. (तिथं) त्यांना उपजीविकेसाठी जी फळं दिली जातील, ते म्हणतील, पूर्वीदेखील आम्हाला अशाच प्रकारची उपजीविका दिली गेली. वास्तवात त्यांना तशाच प्रकारचं (खाद्य) दिलं होतं त्या (बागेत) त्यांच्यासाठी. पावन सहचर (सोबती) आहेत. ते तिथं सदैव वास्तव्य करतील.

२६) अल्लाहला डासासारखं अथवा त्याहूनही क्षुल्लक गोष्टीचं उदाहरण देण्यात काहीच गैर वाटत नाही. जे श्रद्धावंत लोक आहेत त्यांना माहीत असते की हे त्यांच्या विधात्याकडचं सत्य आहे. पण विद्रोही म्हणतात

अशा उदाहरणांमागं अल्लाहचं काय उद्दिष्ट असावं? अशा प्रकारे तो अनेकांना मार्गभ्रष्ट करतो तर अनेकांना मार्गदर्शन घडवतो आणि जे अवज्ञाकारी आहेत त्यांनाच फक्त तो मार्गभ्रष्ट करतो.

२७) जे लोक अल्लाहशी करार संमत केल्यावर त्याचा भंग करतात आणि अल्लाहनं जे संबंध जोडण्यास सांगितलं होतं, ते तोडून टाकतात. हे लोक धरतीवर अनाचार माजवणारे आहेत. हेच लोक स्वत:चा घात करून घेणारे असतात.

२८) तुम्ही अल्लाहचं (अस्तित्व) नाकारता (तरी कसं)? तुम्ही निर्जीव असताना त्यानं तुम्हाला जीवन दिलं. परत तुम्हाला मरण देईल, पुन्हा जीवित करील. आणि त्याच्याचकडं तुम्ही परत जाणार आहात.

२९) तोच ज्यानं तुमच्यासाठी या धरतीवरील सर्वकाही निर्माण केलं, नंतर अवकाशाचा संकल्प केला. मग त्यानं सात आकाश साकारले. तो सर्व बाबी जाणणारा आहे.

३०) जेव्हा तुमच्या विधात्यानं आपल्या दूतांना कल्पना दिली, ''मी धरतीवर माझा प्रतिनिधी नेमणार'' म्हणून. ते म्हणू लागले, तू अशास धरतीत निर्माण करणार जो त्यामध्ये अनाचार माजवील आणि रक्तपात घडवील? आम्ही तर तुझा गौरव आणि पावित्र्याचं गुणगान करतो. तो (अल्लाह) म्हणाला, मला जे ठाऊक आहे ते तुम्हाला माहीत नाही.

३१) त्यानं आदम यांना सर्व वस्तूंची नावं (त्यांच्याविषयीची सर्व माहिती) शिकवली. मग देवदूतांसमोर उभं करून (दूतांना) म्हणाला, जर तुम्ही खरं असाल (तर) या सर्वांची नावे सांगा (माहिती द्या).

३२) ते म्हणू लागले, तुझा गौरव असो. आम्हाला तू ज्ञान दिलं त्यापलीकडं काहीच माहीत नाही. तुलाच तर सकल माहिती आहे आणि (तूच) प्रतिभासंपन्न आहेस.

३३) नंतर त्यानं आदमला त्या सर्वांची नावे शिकविली. त्यानं ती सर्व नावं उच्चारली. म्हणालो नव्हतो तुम्हाला की मला आकाश आणि पृथ्वीतील सर्व अदृश्य बाबींची माहिती आहे, तसेच तुम्ही जे काही जाहीर करता

आणि लपवता त्याची देखील.

३४) मग त्यानं देवदूतांना सांगितलं, नतमस्तक व्हा आदमसमोर, इब्लीसला वगळता ते नतमस्तक झाले. त्यानं अहंकार करीत नाकारलं आणि बंडखोरी करणारांपैकी झाला.

३५) आम्ही आदमला म्हटलं, तू आणि तुझी सहचरणी स्वर्गात निवास करा आणि यातील आवडेल त्या (वस्तू) निवांतपणे खा. परंतु (पाहा) त्या वृक्षाच्या निकट जाऊ नका. तसे केल्यास तुम्ही (स्वत:वरच) अन्याय करून घ्याल.

३६) पण सैतान त्यांना फूस लावून ते ज्या (परम) अवस्थेत होते तेथून बाहेर काढण्यास (कारणीभूत) ठरला. आम्ही त्यांना सांगितलं (आता) तुम्ही जा इथून. तुम्ही एकमेकांचे शत्रू आहात. आता एका ठराविक अवधीसाठी धरतीच तुमचं निवास आणि जीवनोपयोगी साधनांचं ठिकाण आहे.

३७) आदम (अ.) यांनी आपल्या विधात्याकडून काही शिकवण घेऊन पश्चात्ताप व्यक्त केला. त्याने तो स्वीकारला. तो पश्चात्ताप स्वीकारणारा आणि अत्यंत कृपावंत आहे.

३८) आम्ही आदेश दिला, तुम्ही सर्वजण इथून जा. माझ्याकडून जेव्हा तुम्हाला मार्गदर्शन लाभेल, ज्यांनी त्या मार्गदर्शनाचं अनुसरण केलं त्यांना कसलंही भय नाही की ते दु:खी होणार नाहीत.

३९) पण द्रोह करून माझ्या वचनांना धुडकावून लावतील ते लोक नरकवासी आहेत. ते सर्वकाळ तिथंच राहतील.

४०) इस्राईलच्या लोकांनो जरा आठवा, आम्ही आमच्या कृपेनं तुम्हाला अनुग्रहित केलं, मला दिलेल्या वचनांची पूर्ती करा, मीही ते वचन पूर्ण करीन. आणि माझ्याशी भीत राहा.

४१) मी जे अवतरलंय त्यावर श्रद्धा ठेवा. कारण ते तुमच्याकडं असलेल्या (ग्रंथाची) पुष्टी करतो. सर्वप्रथम नाकारणारे होऊ नका. माझी भीती

बाळगा. माझ्या वचनांना (आयतींना) मातीमोल करू नका.

४२) जाणूनबुजून सत्यावर असत्याचं आवरण चढवू नका. सत्य आहे ते लपवून ठेवू नका.

४३) नमाज कायम करा. जकात अदा करा. जे नमन करतात त्यांच्याबरोबर तुम्हीही नमन करा.

४४) तुम्ही इतरांना तर सद्वर्तनाचा आग्रह धरता, पण स्वत:लाच विसरून जाता. तुम्ही धर्मग्रंथाचं अध्ययन करत असता तरीदेखील तुम्हाला (हे) कळत नाही.

४५) अल्लाहची मदत मागा संयमानं आणि प्रार्थनेनं (नमाज), हे तसं कठीण (काम) आहे, पण नम्रतेनं जे वागतात त्यांच्यासाठी नव्हे.

४६) (तसेच) ज्या लोकांना आपल्या विधात्याशी गाठ पडण्याची खात्री आहे आणि ज्याच्याकडं त्यांना परतायचंय (त्यांच्यासाठी).

४७) हे इस्राईलची संतती, आम्ही तुमच्यावर केलेल्या वरदानाची आठवण करा, तुम्हाला जगातल्या सर्व लोकांवर वरदान दिलं होतं.

४८) ज्या दिवशी कोणत्याही बाबतीत कुणी कुणाला उपयोगी पडणार नाही. कुणाची मध्यस्थी स्वीकारली जाणार नाही, कोणाची भरपाई घेतली जाणार नाही, ना कुणाला कुणाची मदत मिळेल, त्या दिवसाचं भय बाळगा.

४९) फिरऔनच्या लोकांपासून तुमची सुटका केली ते आठवा, तो तुम्हाला कशा कठोर यातना देत असत, तुमच्या मुलांचा वध करीत, तुमच्या स्त्रियांना जगू देत. यात तुमच्या विधात्याकडून तुमची प्रचंड परीक्षा होती.

५०) जरा आठवा, तुमच्यासाठी समुद्र कसा दुभंगला आणि तुम्हाला वाचवलं आणि तुमच्यादेखत फिरऔनच्या लोकांना बुडवून टाकलं.

५१) आम्ही मूसा (अ.) यांच्याकडून चाळीस रात्रींचं वचन घेतलं होतं ते आठवा, त्यांच्या पश्चात तुम्ही वासराला धरून बसलात. तुम्ही तर

अपराधीच आहात.

५२) नंतर तुम्ही कृतज्ञ व्हाल म्हणून हे सारं काही माफ करून टाकलं.

५३) आम्ही मूसाला ग्रंथ व कसोटी दिली तुमचं मार्गदर्शन घडवण्यासाठी.

५४) जेव्हा मूसाने आपल्या लोकांना सांगितलं, लोकहो, तुम्ही खरोखरच स्वत:शी अन्याय केला वासराला उपास्य केलं, तेव्हा आपल्या पालनकर्त्याकडे पश्चात्ताप व्यक्त करा. तुमच्यातील (अपराधी) लोकांची हत्या करा, तुमच्या विधात्याच्या नजरेत हे तुमच्याच भल्याचं ठरेल. त्याच्याकडं वळा (तौबा करा), तोच पश्चात्ताप स्वीकारणारा आणि दयावंत आहे.

५५) आठवा, जेव्हा तुम्ही मूसाला म्हणालात, आम्ही प्रत्यक्ष अल्लाहला पाहत नाही तोवर तुझा विश्वास करणार नाही. तोच तुमच्यादेखत विजांच्या कडकडाटांनी त्यांना गाठलं.

५६) आभार मानाल म्हणून तुमच्या मृत्यूनंतरही आम्ही तुम्हाला (जीवंत) उठवलं.

५७) तुमच्यावर ढगांची सावली पसरवली. तुमच्यासाठी 'मन्न' आणि 'सलवा' अवतरले. आम्ही ज्या पवित्र उपजीविका दिल्या त्यांचा उपभोग घ्या. आम्ही त्यांच्यावर अन्याय केला नव्हता, त्यानी स्वत:च तो ओढवून घेतला होता.

५८) आणि आठवा, आम्ही त्यांना या शहरात दाखल होण्यास सांगितलं ते. तेथील आवडेल त्या वस्तू खा, पण त्या दारातून नतमस्तक होत, क्षमा-याचना करीत प्रवेश करा. आम्ही तुमच्या चुका माफ करून टाकू आणि सदवतर्नींचा उद्धार करू.

५९) परंतु या अत्याचारींनी आम्ही सांगितलं होतं त्यात बदल केला म्हणून आम्ही या अपराध्यांवर आकाशातून प्रकोप कोसळवला. कारण ते आमची अवज्ञा करीत होते.

६०) आणि हे आठवा, मूसा (अ.) यांनी आपल्या समूहासाठी पाण्याची

मागणी केली. आम्ही सांगितलं, या पाषाणावर आपल्या काठी आपट. तोच तिथून बारा झरे वाहू लागले. सर्व लोकांनी आपापला पाणवठा ओळखून घेतला. अल्लाहनं दिलेल्या संसाधनांचा उपभोग घ्या. खा-प्या पण धरतीवर अनाचार माजवत हिंडू नका.

६१) आठवण करा, तुम्ही मूसा (अ.) यांना म्हटलं, त्याच्या एकच एक खाण्याच्या पदार्थांवर आम्ही संतुष्ट नाही. तुमच्या पालनकर्त्याला सांगा, आमच्यासाठी जमिनीतून जे इतर भाजीपाला, काकडी, गहू, मसूर डाळ आणि कांदे निघतात ते देण्यासाठी. त्याने (मूसाने) म्हटलं, ''तुम्ही चांगल्या गोष्टींऐवजी क्षुल्लक गोष्टी निवडता? मग जा तुम्ही शहराकडं. तिथं तुम्हाला हवं ते मिळेल.'' (अशाप्रकारे) त्यांनी (स्वत:) अपमान आणि लाचारी पत्करली आणि अल्लाहच्या कोपानं त्यांना वेढून घेतलं. या सर्व (घडामोडींचं) कारण असं की सर्व सीमांचं उल्लंघन करीत त्यांनी अल्लाहची अवज्ञा केली, अल्लाहच्या वचनांशी बंड केलं, प्रेषितांची नाहक कत्तल केली.

६२) निश्चितच जे लोक श्रद्धा धारण करतात मग ते ज्यू असतो की ख्रिस्ती अथवा साबी, जे कोणी अल्लाह व परलोकास मान्य करतात आणि सत्कर्म करतात त्यांना त्यांच्या विधात्याकडं नक्कीच (त्यांच्या सत्कर्मांचं) प्रतिफळ मिळणार आहे. त्यांनी कसली भीती नसेल की ते दु:खी होतील.

६३) आणि आठवण करा, जेव्हा आम्ही तुमच्याकडून वचन घेतलं, तूर पर्वताच्या उंचीच्या (साक्षीत); आम्ही तुम्हास जे दिलं ते घट्ट धरून ठेवा. त्यात जे काही दिलं ते आठवणीत राहू द्या म्हणजे तुम्ही ईशपरायण व्हाल.

६४) तरीदेखील तुम्ही त्यानंतर (वचनाकडं) पाठ फिरवली जर तुमच्यावर अल्लाहचा अनुग्रह आणि त्याची दया झाली नसती तर तुम्ही नक्कीच नष्ट झाला असता.

६५) आणि सब्त पाळण्याबाबत ज्यांनी मर्यादांचं उल्लंघन केलं त्यांच्याविषयी तुम्हाला चांगलं ठाऊक आहे. आम्ही त्यांना सांगितलं, ''तुम्ही माकडं

व्हा, धिक्कारलेली तिरस्कारित.''

६६) आम्ही त्या (घटनेला) त्या काळातील (लोकांना) तसेच नंतरच्या (पिढ्यांसाठी) बोधप्रद बनवलं जे सदाचारी लोक आहेत त्यांना त्यात बोध आहे.

६७) आणि मूसा (अ.) यांनी आपल्या लोकांस जे सांगितलं ते आठवा, ''अल्लाह तुम्हाला एका गायीचा बळी देण्याचा आदेश देतो.'' ते म्हणू लागले की, ''तुम्ही आमची थट्टा करता?'' मूसा (अ.) यांनी उत्तर दिलं, ''मला अडाणी लोकांसारखं वागण्यापासून अल्लाहच वाचव.''

६८) ते (लोक) म्हणाले, ''आमच्या वतीनं तुमच्या विधात्यास ती कशा प्रकारची आहे हे स्पष्ट करण्यास सांगा.'' ते (मूसा) म्हणाले, ''त्यांचं म्हणणं आहे ती वृद्ध अथवा लहान नसावी, तर मध्यम वयाची असावी. तेव्हा तुम्हाला जे सांगितलं जातं ते करा.''

६९) ते (लोक) म्हणाले, ''आमच्या वतीनं तुमच्या विधात्यास तिचा रंग कसा असावा ते विचारा.'' ते (मूसा) म्हणाले, ''तो म्हणतो, ती गडद पिवळ्या रंगाची, पाहणाऱ्यांना आकर्षक वाटावी.''

७०) ते (लोक) म्हणू लागले, ''आपल्या विधात्याला आमच्या वतीनं ती कशी असावी हे स्पष्ट करण्यास सांगा. कारण त्या गायीविषयी आम्ही संभ्रमात पडलो आहोत. अल्लाहने तसे इच्छिले तर निश्चितच आम्ही मार्ग काढू.''

७१) ते (मूसा) म्हणाले, ''तो म्हणतो, ती माणसाळलेली नसावी की नांगराला जुंपलेली नसावी की शेतीला पाणी देण्यास उपयोगात आणली गेलेली नसावी. ती निकोप असून तिला कसलाच डाग नसावा.'' ते म्हणाले, ''तुम्ही सत्य सांगितलं.'' त्यांनी मग तिचा बळी दिला. पण ते तसं करण्याच्या मन:स्थितीत नव्हते.

७२) तुम्ही जेव्हा एका माणसाची हत्या केली आणि आपसात वाद घालू लागले तुम्ही जे लपवू पाहत होता ते अल्लाह उघड करणार होता.

७३) तेव्हा आम्ही (अल्लाह) म्हणालो, तिचा (तिच्या मांसाचा) एक तुकडा (त्या मृतदेहावर) आपटा. अशाप्रकारे अल्लाह मृतांना जीवंत करेल. तुम्ही विचारविनिमय करावा याकरिता तो आपले संकेत दाखवतो.

७४) त्यानंतर मग तुमची हृदयं कठोर झाली पाषाणासारखी, किंबहुना त्यापेक्षाही अधिक. कारण काही पाषाणंही अशीही असतात ज्यांमधून पाण्याचे झरे निघतात. निश्चितच त्यातले काही दुभंगल्यास त्याच्यातून पाणी बाहेर पडते आणि त्यातील काही तर अल्लाहच्या भीतीनं खाली कोसळतात. तुम्ही जे काही करत असता त्याकडं अल्लाहचं दुर्लक्ष नाही.

७५) ते (लोक) तुम्हाला मान्य करतील अशी तुमची अपेक्षा आहे काय? त्यांच्यापैकी एका गटानं अल्लाहचं संबोधन ऐकलंय. पण त्यांना त्याचा अर्थ कळल्यावर ते त्याला जाणूनबुजून बदलून टाकतात.

७६) जेव्हा ते श्रद्धाळूंना भेटतात म्हणतात, आम्ही (देखील) मान्य केलं आणि जेव्हा ते परस्परांना भेटतात, तेव्हा (आपसात) म्हणतात, तुम्ही त्यांना ते सर्वकाही सांगता ज्या अल्लाहनं तुमच्यावर प्रकट केल्या आहेत? ज्यामुळे ते तुमच्या विधात्यापाशी तुमच्याविरूद्ध पुरावा म्हणून सादर करतील तुम्हांस हे समजत नाही.

७७) अल्लाहला सर्वकाही माहीत आहे ते जे लपवत आहेत आणि जे उघड करतात. त्यांना हे माहीत नाही?

७८) त्यांच्यामध्ये काही निरक्षर लोकांना ग्रंथाची माहिती नाही, तर निव्वळ कल्पना बाळगून तर्कवितर्क लावत राहतात.

७९) तेव्हा, जे लोक स्वत:च आपल्या हातांनी ग्रंथ रचतात आणि म्हणतात, हा तर अल्लाहकडंचा आहे त्यांचा विनाश होवो. ते क्षुल्लक मोलात त्याचा सौदाही करतात त्यांचा विनाश असो ज्यांचे हात हे रचतात आणि ते जे कमवतात त्यामुळे त्यांचा विनाश आहे.

८०) आणि ते म्हणतात, आम्हाला काही मोजके दिवसच अगनेचा स्पर्श होईल, त्यांना विचारा त्यांनी अल्लाहकडून तसं वचन घेतलंय? कारण

तो आपलं वचन कधीच मोडत नसतो. किंवा तुम्ही अल्लाहला अशा गोष्टी चिकटवता जे तुम्हाला माहीत नाही?

८१) नव्हे! ज्यानं वाईट (गोष्टी) कमवल्या आणि त्याच्या अपराधांनी तो वेढला गेला असे लोक नरकवासी आहेत, ते सदैव त्यातच राहतील.

८२) ज्यांनी श्रद्धा धारण केली आणि सत्कर्म करत राहिले ते स्वर्गातील लोक आहेत ते सदैव तेथेच राहतील.

८३) जेव्हा आम्ही इस्राईलच्या संततीकडून वचन घेतलं होतं, अल्लाहशिवाय कोणाची भक्ती करू नका, आपल्या माता-पित्याशी, नातेवाईकांशी, अनाथ व निराधारांशी दयेनं वागा. लोकांशी सभ्यतेनं बोला. नियमित नमाज पढा, जकात द्या. पण नंतर तुमच्यापैकी काहींचा अपवाद वगळता तुम्ही पाठ वळवली, तुम्ही मागे (वचनांशी) फिरणारच होता.

८४) आम्ही तुमच्याशी वचन घेतलं होतं ते आठवा, तुम्ही आपसात रक्तपात घडवू नका म्हणून. आपल्या लोकांना घरा-दारातून हाकलू नका, तुम्ही जो शब्द दिला होता त्याचे तुम्ही साक्षी आहात.

८५) आणि नंतर तुम्हीच ती माणसं आपल्या लोकांची कत्तल करणारे आणि आपल्याच लोकांना आपल्या वस्तीतून बाहेर घालवता. अत्याचारी आणि मर्यादांना मोडीत काढून त्यांच्यावर तुटून पडता. आणि ते बंदी म्हणून तुमच्याकडं आल्यास तुम्ही खंडणीचा व्हावहार करून त्यांना सोडवतात. वास्तविक तर त्यांना हाकलून देणंच तुम्हाला अवैध होतं. तुम्ही ग्रंथाचा काही भाग मान्य करता तर काही भाग नाकारता. (तुमच्यापैकी) असा व्यवहार करणाऱ्यांना आयुष्यात अपमान आणि निर्णयाच्या दिवशी कठोर शिक्षेपलीकडं त्यांना काय लाभणार. तुम्ही जे काही करता त्यापासून अल्लाह अनभिज्ञ नाही.

८६) हेच ते लोक आहेत ज्यांनी ऐहिक आयुष्याशी पारलौकिक जीवनाचा सौदा केला, त्यांच्या शिक्षेत काही कसर ठेवली जाणार नाही की त्यांना कसली मदत दिली जाईल.

८७) आम्ही मूसाना ग्रंथ दिला. त्यांच्या पाठोपाठ एकानंतर एक प्रेषित

पाठवले. मरयमपुत्र इसांना स्पष्ट संकेत दिले. रुहुल कुद्स (जिबरईल) करवी त्यांची मदत केली. आणि मग जेव्हा तुमच्याकडं प्रेषित असं काही घेऊन आलेत जे तुमच्या मनाला पटत नव्हते, तेव्हा तुम्ही अहंकार केला. एका गटाला तुम्ही खोटं ठरवता आणि इतर एका गटाला ठार करत असता.

८८) ते म्हणतात, ''आमची मनं वेष्टन टाकलेली आहेत.'' नव्हे त्यांच्या द्रोहामुळे अल्लाहने त्यांना धिक्कारलंय, फक्त मोजकेच लोक श्रद्धा बाळगतात.

८९) जेव्हा त्यांच्याकडं जे आहे त्याची पुष्टी करणारा, अल्लाहकडून एखादा ग्रंथ येतो, आणि ते आधी बंडखोरांविरूद्ध विजय मिळवण्यासाठी प्रार्थना करत असत जेव्हा त्यांच्याकडं तो ग्रंथ आला ज्यांच्याशी ते परिचितही होते तरीदेखील त्यांनी त्याला नाकारलं. अल्लाह अशा नाकारणाऱ्यांचा धिक्कार करतो.

९०) कशा वाईट पद्धतीनं त्यांनी आपल्या आत्म्याचा सौदा केला! अल्लाहनं जे अवतरलं ते नाकारलं. कारण अल्लाह आपल्या मर्जीनुसार आपली कृपा, आपल्या भक्तांपैकी कुणावरही अवतरतो. या द्वेषापोटी त्यांनी एकामागून एक कोप ओढवून घेतले. खरेच बंडखोरांसाठी लाजीरवाणी शिक्षा आहे.

९१) त्यांना जेव्हा सांगण्यात येतं, अल्लाहनं पाठवलंय ते मान्य करा. ते म्हणतात, ''जे काही आमच्यावर अवतरलंय तेच आम्ही मान्य करतो. त्याव्यतिरिक्त जे काही आहे ते नाकारतो.'' ते सत्य असून त्याच्याकडील (अवतरणाची) पुष्टी करणारा असूनदेखील. त्यांना सांगा, जर तुम्ही मान्य करणारे होता तर पूर्वीच्या प्रेषितांची कत्तल तुम्ही का म्हणून केली?

९२) आणि मूसा (अ.) तुमच्याकडं स्पष्ट संकेत घेऊन आले असता त्याच्यानंतर तुम्ही वासराला पूजेसाठी धरून बसला तुम्ही अत्याचारी आहात.

९३) आणि आठवा, आम्ही तुमच्याकडून वचन घेतलेलं, तूर पर्वतास तुमच्यावर उंचावलं आणि (म्हटलं) आम्ही दिलेलं ते घट्ट धरून ठेवा आणि ध्यानात असू द्या. ते म्हणाले, "होय आम्ही ऐकलं" आणि अवज्ञा केली. त्यांच्या द्रोहामुळं त्यांच्या मनांमध्ये वासरूच घर करून बसलं होतं. सांगा किती वाईट तुमच्या धर्माच्या या आज्ञा जर तशी तुमची श्रद्धा असेल तर?

९४) (त्यांना) सांगा जर परलोकात फक्त तुमच्यासाठीच अल्लाहकडं विशेष असं ठिकाण आहे, जे दुसऱ्या लोकांना नाही तेव्हा तुम्ही प्रामाणिक असाल तर मग मरणाची इच्छा करा.

९५) आपल्या हातांनी जे (कर्म) त्यांनी आगाऊ पाठवलंय त्यामुळे ते अजिबात तशी इच्छा बाळगणार नाहीत. अल्लाह (अशा) अत्याचारींना (चांगलं) ओळखतो.

९६) ते तुम्हाला ऐहिक जीवनामध्ये अत्यंत लोभी आढळतील. इतर लोकांपेक्षा जास्त, अनेकेश्वरींपेक्षाही जास्त, त्यांच्यातल्या प्रत्येकाला हजार वर्षांचं आयुष्य मिळण्याची इच्छा असते. त्यांना तेवढं आयुष्य जरी लाभलं तरी ते त्याच्या कोपापासून वाचू शकणार नाहीत. कारण ते जे काय करत असतात अल्लाह पाहत आहे.

९७) जे कोणी जिबराईलचे शत्रू असतील त्यांना सांगा, नि:संदेह त्यानं अल्लाहच्या आज्ञेनुसार तुमच्या मनावर हे अवतरलंय. पूर्वीच्यांची (ग्रंथाची) पुष्टी करतो. जो श्रद्धाळूंसाठी मार्गदर्शन तसेच शुभवार्ता आहे.

९८) जो कुणी अल्लाह, त्याचे दूत, प्रेषित, जिबराईल आणि मिकाईलचे शत्रू आहेत, अशा द्रोहींचा अल्लाह शत्रू आहे.

९९) आम्ही तुमच्याकडं स्पष्ट संकेत पठवलेत. अपराधी (लोकच) त्यांना नाकारतात.

१००) जेव्हा केव्हा त्यांनी वचन दिलं, त्यातील एका गटानं त्याचा भंग केला नाही? पण अनेकांना हे मान्य नाही.

१०१) अल्लाहकडून जेव्हा त्यांच्याकडं असलेल्याची पुष्टी करणारे प्रेषित आले, तेव्हा ग्रंथधारकांपैकी एका गटानं अल्लाहच्या ग्रंथाला आपल्या पाठीमागं टाकून दिलं, जसं त्यांना काही माहितीच नाही.

१०२) आणि सुलेमान (अ.) यांच्या राज्याचा उल्लेख करीत हे लोक सैतानाच्या शिकवणींचं अनुसरण करू लागले. सुलेमाननं नव्हता अव्हेर केला तर हे दुष्ट सैतानच बंड करून लोकांना जादू शिकवत असत आणि ज्या गोष्टी त्यांना बॅबिलॉनमध्ये हारुत व मारुत या (दान) देवदूतांना दिल्या गेल्या होत्या. पण ते तर कुणा एकालाही या गोष्टी शिकवत नसत. (उलट) ते सांगत आम्ही तर तुमची परीक्षा (घेत) आहोत, तेव्हा नाकारू नका. ते (लोक) पती-पत्नी यांच्यामध्ये दूही निर्माण करण्याच्या गोष्टी शिकत असत. वास्तविक अल्लाहच्या आज्ञेशिवाय ते त्यापासून कुणालाही काहीच हानी पोहचवू शकत नव्हते. ज्यामुळे त्यांना कसलाच लाभ होत नसून त्यांचीच हानी होत असे, अशा गोष्टी ते शिकत असत. त्यांना हे कळून चुकलं होतं की त्यांच्या या व्हावहारात त्यांना परलोकात कसलाच वाटा नाही. त्यांनी स्वत:चं किती क्षुल्लक मोल केलं हे त्यांना कळायला हवं होतं.

१०३) त्यांना हेदेखील कळायला हवं होतं की त्यांनी श्रद्धा धारण करून सदाचार अंगीकारला असता तर अल्लाहपाशी त्यांना उत्तम मोबदला मिळाला असता.

१०४) हे श्रद्धाळू लोकहो, (प्रेषितांशी बोलताना) 'राईना' (आम्हाला ऐका) म्हणू नका, तर 'अन्जुरना' (आमच्याकडं पाहा) असं म्हणा. त्यांनी सांगितलं ते ऐकत जा. बंड करणाऱ्यांना कठोर शिक्षा आहे.

१०५) ग्रंथधारक असोत की अनेकेश्वरी, तुमच्या विधात्याकडून तुमचं भलं घडावं हे त्यांना आवडत नाही. पण अल्लाह आपल्या मर्जीनुसार आपल्या कृपेसाठी कुणाचीही निवड करतो. कारण तोच अपार कृपाशाली आहे.

१०६) आम्ही आमचं कोणतं वचन (श्लोक) रद्द करतो अथवा त्याचं विस्मरण करतो, त्याऐवजी त्यापेक्षा उत्तम किंवा त्यासारखंच दुसरं वचन पुरवतो.

सर्व गोष्टींवर अल्लाह समर्थ आहे हे तुला ठाऊक नाही?

१०७) आणि तुला हेही माहीत नाही की आकाश आणि पृथ्वीचं अधिराज्य अल्लाहच्याच हाती आहे आणि अल्लाहव्यतिरिक्त तुमचा कुणी वाली नाही की मदतनीस नाही.

१०८) तुम्ही तुमच्या प्रेषितांशी तसेच प्रश्न करू पाहता जसे प्रश्न पूर्वी मूसा यांना विचारले गेले होते? जे (लोक) श्रद्धेऐवजी बंड अंगीकारतील ते निश्चितच सरळमार्गावरून भरकटले आहेत.

१०९) ग्रंथधारकांपैकी बरेच जण, त्यांच्या सत्यता उघड झाल्यावरदेखील, त्यांच्या मनातील विकृतीमुळं ते तुम्ही श्रद्धा धारण केल्यानंतर परत तुम्हाला अधर्माकडं वळवू पाहताहेत. अल्लाहचा निर्णय होईपर्यंत त्यांना क्षमा करत राहा. त्यांच्याकडं कानाडोळा करा. निश्चितच अल्लाह सर्व सामर्ध्यसंपन्न आहे.

११०) आणि नमाज कायम करा, जकात देत राहा, (अनिवार्य दानधर्म) आणि तुम्ही तुमच्यासाठी जे काही भलं आगाऊ पाठवाल ते अल्लाहकडून तुम्हाला मिळेल. कारण तुम्ही जे काही करीत असता अल्लाह ते पाहत आहे.

१११) ते म्हणतात, ज्यू आणि ख्रिस्ती वगळता कुणी स्वर्गात प्रवेश करणार नाही. या त्यांच्या (भेकड) आकांक्षा आहेत. त्यांना सांगा, जर 'तुम्ही खरे (बोलत) असाल तर काही पुरावा आणा.'

११२) तसं नव्हं, जो कुणी अल्लाहस आत्मसमर्पण करून चांगली कामं करील त्याच्यासाठी त्याच्या विधात्यापाशी बक्षीस आहे. त्यांना कसली भीती नसेल की दु:खाचे कारण नसेल.

११३) ज्यू धर्मीय म्हणतात ख्रिस्तींपाशी काहीच (धर्माचा आधार नाही) तर ख्रिस्ती म्हणतात ज्यू लोकांना कशाचाही आधार नाही. ते दोघं ग्रंथाचा अभ्यास करत असतात. त्यांचं म्हणणं अशा लोकांसारखं आहे ज्यांच्याकडं ज्ञान नाही. ज्या बाबतीत त्यांच्यात वाद आहे त्याचा निवाडा निर्णयाच्या दिवशी अल्लाहच करणार.

११४) जे लोक अल्लाहच्या मशीदीत त्याच्या नामस्मरणास (आराधनेस) मनाई करतात आणि त्यांचा विनाश करण्याचे प्रयत्न करत असतात त्यांच्यापेक्षा मोठा अत्याचारी कोण असू शकतो. त्या लोकांनी भीत-भीत त्यात (मशीदीत) प्रवेश करणे भाग आहे. या जगातही त्यांच्या (वाट्यात) निंदा-नालस्ती आहे आणि परलोकात तर त्यांना भयंकर शिक्षा मिळणार(च).

११५) पूर्व (असो की) पश्चिम सर्व अल्लाहच्याच (स्वाधीन) आहेत, कोणत्याही दिशेनं तुम्ही वळा तुमचा सामना अल्लाहशीच (आहे), कारण तो सर्वव्यापी असून सर्वज्ञ आहे.

११६) ते म्हणतात, अल्लाहनं मुलगा बनवलाय. (येशू ख्रिस्त अल्लाहची संतान असल्याची ख्रिस्तींची श्रद्धा आहे.) पवित्र आहे तो (अशा गोष्टींपासून) नव्हे जे काही आकाश आणि पृथ्वीत आहेत ते सर्व त्याचेच आहेत, सारेचे सारे त्याच्या अधीन आहेत.

११७) अवकाश आणि पृथ्वीचा मूळ उगम त्याच्यामुळंच आहे. तो जेव्हा एखाद्या घटना घडवण्याचा निर्णय करतो तेव्हा तो तसं 'होण्यास' म्हणतो आणि लगेच ती घडून जाते.

११८) ज्या लोकांना कसलंही ज्ञान नाही ते म्हणतात, अल्लाह आमच्याशी का बोलत नाही? अथवा एखादा संकेत आमच्याकडं का येत नाही? त्यांच्या पूर्वीची माणसंदेखील असंच म्हणत असत. त्यांच्यासारख्याच गोष्टी. त्यांची मनंही एकसारखीच झालेली आहेत. आम्ही तर आमचे संकेत विश्वास ठेवणाऱ्यांसाठी स्पष्ट केलेत.

११९) आम्ही तुम्हाला (प्रेषितांना) वास्तवात शुभवार्ता देणारे आणि सावध करण्यासाठी पाठवलंय. तुम्हाला नरकाचे धनी असलेल्यांच्या बाबतीत विचारलं जाणार नाही.

१२०) हे (जे) ज्यू आणि ख्रिस्ती लोक आहेत, जोवर तुम्ही त्यांच्या धर्माचा अंगीकार करत नाही, त्यांचं समाधान होणार नाही. त्यांना सांगा, खरं ते मार्गदर्शन तर अल्लाहचंच मार्गदर्शन होय. तुम्हाला जे ज्ञान

लाभलंय त्यानंतरदेखील तुम्ही त्यांच्या इच्छेनुसार वागू लागला तर अल्लाहपासून तुमची कोणी मदत करणार नाही.

१२१) आम्ही ज्यांना ग्रंथ दिला असे लोक प्रमाणिकपणे त्याचा अभ्यास करतात, अशा लोकांची त्यावर श्रद्धा असते आणि जे लोक त्याच्या विरूद्ध जातात त्यांच्या पदरात अपयश येते.

१२२) हे इस्राईलची संतती, मी तुम्हाला अनुग्रहित केलं ते आठवा, मी (तुम्हाला) इतर सर्व समूहांवर प्रतिष्ठा दिली होती.

१२३) तेव्हा त्या दिवसाचं भय बाळगा ज्या दिवशी कोणत्याही बाबतीत कुणी कोणाला उपयोगी पडणार नाही, कशा प्रकारची भरपाई स्वीकारली जाणार नाही, कुणाची मध्यस्थी लाभदायी ठरणार नाही आणि कुणाची मदत होऊ शकणार नाही.

१२४) आणि इब्राहीमची त्याच्या विधात्यानं काही बाबतीत परीक्षा घेतली. त्यात ते यशस्वी ठरले. तेव्हा तो (अल्लाह) म्हणाला, मी तुला साऱ्या मानवांचा नेता नियुक्त करतो. ते म्हणाले, माझ्या संततीचं काय? तो (अल्लाह) म्हणाला, अत्याचारींशी माझं कोणतं वचन नाही.

१२५) आणि जेव्हा आम्ही हे (काबा) गृह मानवांना सुरक्षितपणे एकत्र येण्याचं ठिकाण बनवले. इब्राहीमच्या स्थानाला नमाजचे स्थळ बनवा. मी माझ्या गृहाला (काबा) प्रदक्षिणा घालणाऱ्यांसाठी एकांतवासाकरिता, तसेच वाकणारे नतमस्तक होणाऱ्यासाठी स्वच्छ ठेवण्यास इब्राहीम आणि इस्माईल यांना आज्ञा दिली.

१२६) आणि ते आठवा, जेव्हा इब्राहीम म्हणाले, हे विधाता, या शहराला शांततेचं (स्थान) बनव. येथील लोकांपैकी जे अल्लाह आणि शेवटच्या दिवसावर श्रद्धा ठेवतील त्यांना फळांची तरतूद कर. तो (अल्लाह) म्हणाला, जे नाकारतील त्यांनाही काही प्रमाणात त्यांचा लाभ देऊ आणि मग त्यांना नरकाकडं (जाण्यास) विवश करीन- भयंकर असं परतीचं ठिकाण.

१२७) आणि आठवा, (जेव्हा) इब्राहीम आणि इस्माईल (काबा) गृहाचा पाया

रचत होते (अशी प्रार्थना करत की), आमच्या विधात्या, स्वीकार कर आमच्या (या कार्याला). तूच जाण ठेवणारा आणि ऐकणारा आहेस.

१२८) हे विधाता! आम्हाला आपला आज्ञाधारक बनव. आणि आमच्या वंशातून तुझी आज्ञा पाळणारा समूह बनव. आम्हाला हजच्या विधी शिकव. आमच्याकडं (दयेनं) वळ. तूच तर पुन्हा पुन्हा दयेनं वळवणारा आहेस.

१२९) आमच्या विधाता, त्यांच्यामधून प्रेषित पाठव. ते त्यांना तुझ्या वचनांची उजळणी करतील, त्यांना ग्रंथ आणि ज्ञान शिकवतील, त्यांना पावन करतील. तूच तर प्रभुत्वशाली आणि कौशल्यवान आहेस.

१३०) ज्यांनी स्वत:च स्वत:ला मूर्ख ठरवलं त्यांना सोडून इतर कोण इब्राहीमच्या धर्मापासून पाठ फिरवील? आम्ही त्यांची (इब्राहीमची) या जगात निवड केली आणि परलोकात त्यांची गणना सदाचारींत होईल.

१३१) त्यांच्या विधात्यानं जेव्हा त्यांना शरण येण्यास सांगितलं, ते म्हणाले, ''मी या विश्वाच्या विधात्यास शरण जातो.''

१३२) आणि इब्राहीमनं हाच वारसा आपल्या मुलांना दिला आणि याकूब यांनीही तोच वारसा पुढे चालवला. (ते म्हणाले) मुलांनो, अल्लाहनं तुमच्यासाठी धर्माची निवड केली. तेव्हा तुम्ही आज्ञाधारक असल्याशिवाय तुम्हाला मरण येता कामा नये.

१३३) जेव्हा याकूब मृत्यूस सामोरं जात होते. तुम्ही समक्ष होता? जेव्हा ते आपल्या मुलांना विचारलं होतं, ''माझ्यानंतर तुम्ही कुणाची भक्ती करणार?'' त्यांनी उत्तर दिलं, ''आम्ही तुमच्या आणि तुमच्या पूर्वजांच्या अल्लाहची भक्ती करू इब्राहीम, इस्माईल, इसहाक यांच्याच एकमेव अल्लाहची, आम्ही त्याचेच आज्ञाधारक आहोत.''

१३४) तो समुदाय होऊन गेला. त्यांनी जे कमविलं ते त्यांच्यासाठी, तुम्ही जे कमवाल ते तुमचं. त्यांच्या कर्मांविषयी तुम्हाला विचारणा केली जाणार नाही.

१३५) ते म्हणतात, मार्गदर्शन लाभायचं असेल तर ज्यू किंवा ख्रिस्ती व्हा. त्यांना सांगा, नव्हे आम्ही इब्राहीम यांच्याच खऱ्या धर्माचे पालन करू. त्यांनी (अल्लाहसोबत) इतर देवांना जोडलं नव्हतं.

१३६) तुम्ही सांगा, आम्ही अल्लाहवर श्रद्धा ठेवतो आणि जे काही आम्हास दिलं गेलं आणि जे काही इब्राहीम, इस्माईल, इसहाक, याकूब आणि त्यांच्या घराण्यांवर अवतरित झालं, तसेच जे काही मूसा आणि ईसा आणि इतर प्रेषितांना त्यांच्या विधात्याकडून दिलं गेलं त्यावर. आम्ही त्यांच्यात कसलाही भेद पाळत नाही आणि आम्ही त्याचेच आज्ञाधारक आहोत.

१३७) तेव्हा जशी श्रद्धा तुम्ही ठेवली तशी जर त्यांनी ती धारण केली तर त्यांनी रास्त मार्ग गाठला. पण जर त्यांनी तोंड फिरवलं तर मात्र ते हट्टी आहेत. त्यांच्याविरूद्ध अल्लाह तुमच्यासाठी पुरेसा आहे. तो सर्वश्रुत व सर्वज्ञ आहे.

१३८) हा अल्लाहचा रंग आहे आणि अल्लाहपेक्षा कोणता रंग तो उत्तम? आम्ही त्याचीच भक्ती करत आहोत.

१३९) तुम्ही अल्लाहच्या बाबतीत आमच्याशी वाद घालता, वास्तविक तोच तर आमचा पालनकर्ता आहे आणि तुमचादेखील पालनकर्ता आहे. आमची कर्मं आमच्यासाठी तुमची कर्मं ती तुमचीच. आम्ही त्याच्याशीच एकनिष्ठ आहोत.

१४०) तुम्ही असे म्हणता की, इब्राहीम, इस्माईल, इसहाक आणि याकूब व त्यांचे वंशज ज्यू अथवा ख्रिस्ती होते? त्यांना विचारा, तुम्हाला (जास्त) कळतं अथवा अल्लाहला माहीत आहे. जे ज्यांनी अल्लाहकडून लाभलेलं, त्याच्याकडील पुरावा दडवून ठेवला, त्यापेक्षा अन्यायी इतर कोण? ते जे करतात त्याच्याशी अल्लाह अनभिज्ञ नाही.

१४१) ते होऊन गेलेले लोक आहेत. त्यांनी जे कमवलं (त्यांचा लाभ) त्यांनाच आणि तुम्ही जे कमवलं तोच तुमचा. त्यांच्या कृत्यांविषयी तुम्हाला विचारलं जाणार नाही.

**पारा - २**

१४२) आता मूर्ख लोक म्हणतील, पूर्वी हे लोक त्यांच्या ज्या किबल्याकडं (दिशेकडं) होते त्यापासून वळवायला त्यांना झालंय तरी काय? त्यांना सांगा, पूर्व आणि पश्चिम सर्व अल्लाहच्याच (अधीन) आहेत. तो ज्यांना इच्छितो त्यांना सत्य मार्गाचं मार्गदर्शन करतो.

१४३) अशा प्रकारे आम्ही तुम्हाला मध्यममार्गी, संतुलित जनसमूहाच्या रूपात साकारलं. तुम्ही इतर समूहांवर साक्षी असावेत आणि प्रेषित तुमच्यासाठी साक्ष देतील. ज्या किबल्याकडं तुम्ही होता (नमाज करतेवेळी ज्या दिशेनं तोंड करत असत) तो आम्ही तुमच्यासाठी निश्चित केला नव्हता. त्याचं कारण कोण प्रेषितांचं अनुकरण करतो आणि कोण पाठ फिरवतो हे जाणून घेण्यासाठी. ही बाब अत्यंत कसोटीची होती. पण ज्यांना अल्लाहचं मार्गदर्शन लाभलं त्याच्यासाठी मुळीच नाही. अल्लाह तुमची श्रद्धा व्यर्थ जाऊ देणार नाही. कारण तो लोकांसाठी अत्यंत करुणा आणि दयाशील आहे.

१४४) (हे प्रेषित!) तुमचं पुन्हा पुन्हा आकाशाकडं तोंड फिरवणं आम्ही पाहत आहोत. आम्ही तुम्हाला तुमच्या पसंतीच्या किबल्याकडं वळवणार आहोत जो तुमच्या आवडीचा आहे. आता तुम्ही आपलं मुख मस्जिदे हराम (काबागृह) कडं वळवा. आता तुम्ही जिथं कुठं आसाल (नमाजसाठी) त्या दिशेनं आपलं तोंड करत जा आणि ज्या लोकांना आम्ही ग्रंथ दिलेत त्यांना त्यांच्या विधात्याकडच्या या सत्यतेचं त्यांना भान आहे. ते जे करत आहेत त्यापासून अल्लाह अनभिज्ञ नाही.

१४५) जरी तुम्ही या ग्रंथधारकांना (याविषयीचे) सर्व संकेत आणून दिले तरी ते तुमच्या किबल्याचं अनुकरण करणार नाहीत. (तसेच) तुम्हीदेखील त्यांच्या किबल्याचं अनुकरण करणार नाही. त्यांच्यातील कुणीही एकमेकांच्या किबल्याचं अनुकरण करणार नाही. आपणास ज्ञान ि-मळाल्यानंतरदेखील जर तुम्ही त्याच्या इच्छेप्रमाणं वागणार असाल तर तुम्ही दोषी ठराल.

१४६) आम्ही ज्या लोकांना ग्रंथ दिले ते याला तसेच ओळखून आहेत जसे

ते आपल्या मुलाबाळांना ओळखतात. तरीदेखील त्यांच्यामधील काही लोक जाणूनबुजून हे सत्य दडवतात.

१४७) तुमच्या विधात्याकडंचं हे सत्य आहे, तेव्हा याबाबत तुम्ही शंका बाळगणाऱ्यांपैकी होऊ नका.

१४८) प्रत्येकासाठी एक दिशा (ध्येय) आहे तिकडं(च) तो वळवतो, तेव्हा तुम्ही ज्यात सर्वकाही उत्तम असेल त्यात अग्रेसर व्हा. तुम्ही जिथं कुठं असाल अल्लाह तुम्हाला एकत्र आणणार. अल्लाह सर्वस्वी सामर्थ्यवान आहे.

१४९) तुम्ही कुठूनही निघाल तुमचं मुख मस्जिदे हराम (काबागृह) कडं वळवा, हेच तुमच्या विधात्याकडंचं सत्य आहे. तुम्ही जे काही करता त्याकडं अल्लाह दुर्लक्ष करत नाही.

१५०) तेव्हा तुम्ही कुठूनही निघत असाल तर तुमची दिशा (तोंड) मस्जिदे हरामकडंच (काबागृहाकडंच) वळवा आणि तुम्ही कुठेही असला तरी तुमचं तोंड (दिशा) मस्जिदे हरामकडं असू द्या. सबब लोकांना तुमच्याशी वाद घालण्यासाठी कारण नसावं. पण जे लोक दुराचारी आहेत त्यांना वगळून, तुम्ही त्यांची भीती बाळगू नका. माझी भीती बाळगा. माझे वरदान तुमच्यावर पुरेपूर करण्यासाठी, तुमचं मार्गदर्शन होण्याच्या अपेक्षेनं.

१५१) अशाच रीतीनं आम्ही तुमच्यातूनच एक प्रेषित तुमच्यात पाठवला. ते आमची वचनं तुम्हाला ऐकवतात. तुम्हाला पावन करतात. तुम्हाला ग्रंथाचं ज्ञान आणि प्रज्ञा देतात आणि अशा गोष्टीची शिकवण देतात ज्या तुम्हाला अवगत नव्हत्या.

१५२) तेव्हा माझं स्मरण करा. मी तुम्हाला आठवणीत ठेवीन. माझे आभार माना, कृतघ्न होऊ नका.

१५३) श्रद्धावंतहो, संयम आणि नमाजद्वारे मदत मागा, अल्लाह निश्चितच संयम बाळगणाऱ्यांच्या पाठीशी असतो.

१५४) अल्लाहच्या मार्गात कामी आलेत त्यांना मृत म्हणू नका. ते जीवित आहेत. तुम्हाला त्याचे भान नाही.

१५५) आम्ही भीतीनं, उपासमारीनं, वित्त आणि जीविताच्या नुकसानीनं अथवा पिकांच्या नुकसानीनं तुमची परीक्षा घेणार तेव्हा संयमानं वागणाऱ्यांना शुभवार्ता द्या.

१५६) हे ते लोक आहेत जे आपत्तीनं ग्रासल्यावर म्हणतात, ''आम्ही अल्लाहसाठी आहोत आणि त्याच्याकडंच आम्ही परतणार आहोत.''

१५७) अशाच लोकांना त्यांच्या विधात्याकडून अल्लाहचं वरदान आणि कृपा लाभते आणि हेच लोक मार्गदर्शित आहेत.

१५८) सफा आणि मरवा (काबागृह सान्निध्यातील दोन टेकड्या) अल्लाहचे संकेत आहेत. जो कुणी हजयात्रा किंवा उमरा (हजच्या ठराविक दि-वसांव्यतिरिक्त इतर काळात काबागृहाचे दर्शन) करत असेल तेव्हा कुणी या दोन टेकड्यांदरम्यान प्रदक्षिणा घालत असेल तर त्यात काही गैर नाही. आणि जर कुणी सद्‌भावनेनं पुण्य करत असेल तर अल्लाह मान राखणारा आणि जाणीव ठेवणारा आहे.

१५९) आम्ही जे संकेत स्पष्ट स्वरूपात अवतरलेत आणि जे मार्गदर्शन आम्ही लोकांसाठी ग्रंथात स्पष्ट केलंय त्यानंतर (देखील) जे लोक त्यांना लपवतात त्यांचा अल्लाहकडून धिक्कार आहे आणि इतर लोकही धिक्कार करतील.

१६०) अशा लोकांना वगळून जे पश्चात्ताप व्यक्त करतात, स्वत:ला सुधारतात आणि जाहीरपणे घोषित, अशा लोकांचा मी स्वीकार करतो. मी क्षमा करणारा आणि दयाशील आहे.

१६१) आणि ज्या लोकांनी द्रोह केला आणि विद्रोही अवस्थेतच ते मरण पावले तर अशा लोकांवर अल्लाहचा कोप आहे. तसेच देवदूत आणि सर्व मानवजातीचा धिक्कार असेल.

१६२) ते सदैव त्याच (अवस्थेत) राहतील, त्यांच्या शिक्षेत कमी होणार नाही

की त्यांना (त्यातून) उसंत मिळणार नाही.

१६३) अल्लाहच तुमचा एकमेव विधाता आहे. त्याच्याव्यतिरिक्त कुणीही भक्तीस पात्र नाही. तो अत्यंत कृपावंत आणि कनवाळू आहे.

१६४) आकाश आणि पृथ्वीच्या निर्मितीत, रात्रंदिवसाच्या फेरबदल आणि मानवांना ज्यांचा लाभ होतो त्या सागरांवर तरंगणाऱ्या जहाजात आणि आकाशातून अल्लाह लोकांच्या हितार्थ जी पर्जन्यवृष्टी करतो, ज्या (पाण्या) मुळे मृत अवस्थेतील पृथ्वीला परत सजीव करतो आणि त्यात सर्व प्रकारचे प्राणी विखरून दिले, वाऱ्यांत घडणारे बदल आणि ढगांत जे आकाश व पृथ्वीदरम्यान अधीन केलेत, हे सर्व निश्चितच ज्ञानी लोकांसाठी संकेत आहेत.

१६५) तरीदेखील जे लोक अल्लाहस सोडून इतरांना त्याच्या बरोबरीनं धरतात आणि त्यांच्यावर अल्लाहच्या तुलनेत प्रेम करतात, पण जे श्रद्ध लोक आहेत अल्लाहवर त्यांचे सर्वाधिक प्रेम असते. पण जे अपराधी लोक आहेत, त्यांना ही गोष्ट अल्लाहचा प्रकोप पाहिल्यावर कळेल. सर्व शक्ती अल्लाहकडं एकवटल्या आहेत आणि हे की अल्लाहचा प्रकोप खरेच भयंकर आहे.

१६६) त्या दिवशी ज्यांचे अनुसरण केलं गेलं होतं, ते आपल्या अणुसरण करणाऱ्यांशी दुरावा करतील. ते प्रकोपाला डोळ्यांनी पाहतील आणि सर्व संबंध तोडले जातील.

१६७) आणि ज्या लोकांनी त्यांचं अनुसरण केलं ते म्हणतील, आम्हाला जर आणखी एक (संधी) मिळाली असती तर आम्ही त्यांच्यापासून दूर होऊ जसं ते आमच्यापासून दूर गेले. अशा रीतीनं जेव्हा अल्लाह त्यांची कृत्यं त्यांना यातनादायक करून दाखवेल. पण ते त्या नरकातून बाहेर पडणार नाहीत.

१६८) हे लोकहो, पृथ्वीतील वैध व पवित्र वस्तू खा. सैतानाच्या वाटेला जाऊ नका, तो तुमचा उघड शत्रू आहे.

१६९) तो तर तुम्हाला दुष्ट आणि लज्जास्पद करण्यास प्रवृत्त करतो. आणि

ज्यामुळे अल्लाहबद्दल असे काही म्हणण्याचं ज्याची तुम्हाला माहिती नाही.

१७०) जेव्हा त्यांना सांगण्यात येतं, अल्लाहनं जे काही पाठवलंय त्याचं अनुसरण करा. ते म्हणतात, नव्हे आम्ही तर आमच्या पूर्वजांना ज्या मार्गावर पाहिलंय तीच वाट धरू, जरी त्यांच्या पूर्वजांना यत्किंचितही समज नसेना का. आणि त्यांना मार्गदर्शन लाभलेलं नसतानादेखील?

१७१) ज्या लोकांनी मान्य केलं नाही त्यांचं उदाहरण असं आहे जसं कुणी अशांना हाक देतो जे ऐकत नाहीत फक्त आरडाओरडीपलीकडं काहीच नाही. ते बहिरे, मुके आणि आंधळे आहेत. त्यांना काही कळत नाही.

१७२) श्रद्धावंत लोकहो, तुम्हाला पुरविलेल्या उपजीविकेतून शुद्ध वस्तू खा अल्लाहचं आभार माना जर तुम्ही फक्त त्याची भक्ती करीत असाल तर.

१७३) अल्लाहनं वास्तवात मेलेली जनावरं, रक्त, डुकराचं मांस आणि अल्लाहशिवाय इतर कोणाचं नाव घेतलेलं असेल ते अवैध ठरवलंय. पण जर कुणी लाचार झाला असेल अवज्ञा करणं किंवा मर्यादा मोडणं (त्याचं उद्दिष्ट) नसेल तर त्यात काही गैर नाही, कारण अल्लाह क्षमा करणारा नि कनवाळू आहे.

१७४) ग्रंथाद्वारे अल्लाहनं जे अवतरलंय त्यास जे लोक दडवून ठेवतात आणि क्षुल्लक ऐहिक लाभापोटी त्याचा सौदा करतात, अशी माणसं नरकाशिवाय कशानंही आपली पोटं भरत नाहीत. पुनरुत्थानाच्या दिवशी अल्लाह त्यांच्याशी बोलणार नाही की त्यांना शुद्ध करणार नाही. त्यांच्याकरिता यातनादायक शिक्षा असेल.

१७५) हे ते लोक आहेत ज्यांनी मार्गदर्शनाचा सौदा मार्गभ्रष्टतेच्या बदल्यात केला आणि क्षमेच्या जागी शिक्षा भोगणे (निवडले), नरकाग्नीसाठी केवढं त्यांचं साहस!

१७६) याचे कारण असं की अल्लाहनं सत्यतेनं (परिपूर्ण) ग्रंथ अवतरला आणि ज्या लोकांनी ग्रंथात मतभेद करीत (असहमती दर्शवली) ते

आपल्या हट्टीपणामुळे दूर निघून गेले.

१७७) तुम्ही तुमचे तोंड पूर्वेच्या दिशेनं केले अथवा पश्चिमेकडं केले हा सदाचार नव्हे. वास्तवात सदाचार म्हणजे हे की ज्यांनी अल्लाहवर श्रद्धा ठेवतात, तसेच शेवटच्या दिवसावर, देवदूतांवर, ग्रंथांवर आणि प्रेषितांवर श्रद्धा ठेवतात आणि त्याच्या प्रेमापोटी आपल्या संपत्तीतून आपल्या नातेवाईकांना, अनाथांना, निराधारांना, वाटसरूंना, जे मागतील त्यांना आणि गुलामीतून (सुटका) करण्याकरिता देतात. तसेच नियमित नमाजचे पठण करतात, जकात अदा करतात आणि दिलेला शब्द पाळतात. दु:खात आणि आपत्तीत व युद्धाच्या प्रसंगी धैर्य राखतात, असेच लोक सत्यार्थी आहेत आणि हेच लोक सदाचारी आहेत.

१७८) श्रद्धावंत लोकहो, हत्येच्या प्रकरणात तुमच्यावर (किसास) प्रतिवध विहित केलं गेलंय. स्वतंत्र (व्यक्तीची हत्या झाल्यास) स्वतंत्र व्यक्तीचा प्रतिवध गुलामाला गुलाम, महिलेची (हत्या झाल्यास) महिला, पण जर कुणी आपल्या बंधुत्वाच्या नात्यानं माफ करीत असेल तर सर्वसंमत पद्धतीनं ते अंमलात आणावं आणि उत्तम प्रकारे ती भरपाई करून द्या. ही सवलत तुमच्या विधात्याकडून कृपा आहे, पण यानंतर जर कुणी अतिरेक केला तर त्याच्यासाठी भयंकर शिक्षा आहे.

१७९) समंजस लोकहो! सदाचारी लोकांसाठी प्रतिवधाच्या या कायद्यात (वास्तविक पाहता) तुमच्या जीवाची हमी आहे म्हणजे तुम्ही सदाचारी व्हाल.

१८०) तुमच्यापैकी जेव्हा कुणाच्या मृत्यूची घटिका (जवळ) आल्यास त्यानं आपल्या माता-पिता आणि जवळच्या नातेवाईकांविषयी जी संपत्ती तो सोडून जातोय त्यासंबंधी प्रचलित पद्धतीनं मृत्यूपत्र करणं विहित केलं गेलंय. सदाचारी लोकांसाठी हे अनिवार्य आहे.

१८१) ते (मृत्यूपत्र) ऐकल्यानंतर जर कुणी त्यात फेरबदल केला तर ज्या लोकांनी त्यात बदल केला त्याचा ठपका त्यांच्यावरच राहील. अल्लाह सर्वकाही ऐकतो आणि जाणतो.

१८२) पण जर मृत्यूपत्र करणाऱ्यानं (अजाणतेपणानं) पक्षपात केला अथवा काही अनिष्ट केलं असल्याची भीती असल्यास उभयतांत सलोखा घडवून आणला तर त्याच्यावर कसलाही आक्षेप राहणार नाही, कारण अल्लाह (तर) दयेनं क्षमा करणारा आहे.

१८३) हे श्रद्धावंत लोकहो, जसे तुमच्या पूर्वीच्या लोकांवर उपवास (रोजा) करणं विहित केलं गेलं होतं तसेच तुमच्यावरही विहित केलं गेलंय तुम्ही सदाचारी व्हाल या अपेक्षेनं.

१८४) हे काही ठराविक दिवस आहेत तुमच्यापैकी जर कुणी आजारी पडला असेल अथवा प्रवासात असेल तर त्यानं ती संख्या (ठराविक दिवसां) नंतर भरून काढावी. (आजारी अथवा प्रवास संपल्यावर, जेव्हा उपवास करायचे असतील तेव्हा ती संख्या पूर्ण करावी.) ज्या लोकांना सामर्थ्य असूनही (ते उपवास करत नसतील) त्यांनी त्या बदल्यात निराधाराला जेवू घालावे. जो स्वखुशीनं काही चांगलं करत असेल ते त्याच्या भलाईचं आहे. पण तुम्हाला जाणीव असल्यास उपवास करणं हेच तुमच्यासाठी भलं आहे.

१८५) (हाच तो) रमजानचा महिना, ज्यात लोकांच्या मार्गदर्शनासाठी स्पष्ट मार्गदर्शन व कसोटी म्हणून कुराण अवतरण्यात आलं. तेव्हा ज्याला हा महिना लाभेल त्यानं उपवास करावेत. पण जर कुणी आजारी असेल अथवा प्रवासात असेल तर त्यानं ही संख्या नंतरच्या दिवसांत पूर्ण करावी. तुम्हास सवलत असावी ही अल्लाहची इच्छा आहे, अडचणीत टाकणं त्याची इच्छा नाही, जेणेकरून तुम्ही ती संख्या भरून काढावी आणि अल्लाहनं तुमचं जे मार्गदर्शन केलं त्यासाठी त्याचे गुणगान करा आणि त्याचे आभार माना.

१८६) माझा भक्त जेव्हा माझ्याविषयी तुमच्याकडं विचारणा करतो, मी त्याच्या जवळच असतो. जेव्हा तो हाक मारतो ती मी ऐकतो, त्यानेही माझं ऐकावं, माझ्यावर विश्वास ठेवावा, तरच ते रास्त मार्ग धरतील.

१८७) उपवासांच्या रात्री आपल्या पत्नीसमवेत असणं तुमच्यासाठी वैध आहे, कारण त्या तुमची वस्त्रं आहेत आणि तुम्ही त्यांची वस्त्रं आहात. तुम्ही

स्वत:शीच लबाडी करत होता, ते अल्लाहला माहीत होतं, म्हणून त्यानं ते नजरेआड करून तुम्हाला क्षमा करून टाकलं. तेव्हा आता तुम्ही त्यांच्याशी एकांतवास करा आणि अल्लाहनं जे विहित कलंय ते मिळवा. रात्रीच्या काळोखातून पहाटेचा शुभ्र चिन्हे स्पष्ट दिसेपर्यंत खा व प्या आणि मग रात्रीपर्यंत उपवास पाळा. आणि तुम्ही मशीदीत एकांतवास करत असाल तर आपल्या पत्नीजवळ जाऊ नका. या अल्लाहनं घालून दिलेल्या मर्यादा आहेत. त्यांच्या जवळ जाऊ नका. अशा रीतीनं अल्लाह आपली वचनं स्पष्ट करत असतो. तुम्ही सदाचार अंगीकारावा म्हणून.

१८८) तुम्ही तुमची संपत्ती आपसांत अवैध मार्गांनी खाऊ नका किंवा जाणूनबुजून इतर लोकांच्या संपत्ती हडप करण्यासाठी अधिकारीवर्गास वाममार्गाने ती (लाच म्हणून) पोहचवू नका.

१८९) ते चंद्रोदयाच्या बाबतीत तुम्हाला विचारतात, त्यांना सांगा, ते लोकांसाठी वेळ (निश्चित करण्याचं) प्रमाण आहे. तसेच हजच्या अवधीचं (प्रमाण). तुम्ही मागच्या बाजूनं घरात येणं सदवर्तन नाही, तर स्वत:ला आवरणं सद्‌गुण आहे. आपल्या घरात दारांमधूनच प्रवेश करा, अल्लाहची भीती बाळगा, तरच तुमचा अभ्युदय घडंल.

१९०) जे अल्लाहच्या मार्गात तुमच्याशी भांडतात त्यांच्याशी लढा द्या, पण अतिरेक करू नका. कारण अतिरेक करणारे अल्लाहला आवडत नाहीत.

१९१) ते जिथं भेटतील तिथंच त्यांना ठार करा, त्यांनी तुम्हाला जसं घालवून लावलं तसेच तुम्हीही त्यांना घालवून लावा. कारण अनाचार माजवणं कत्तलीपेक्षा भयानक असतो. ते जोवर काबागृहात तुमच्याशी लढा देत नाहीत तुम्हीही लढू नका, पण जर ते तुमच्याशी लढत असतील, तर तुम्हीही लढा द्या. अत्याचारींना हा धडा आहे.

१९२) पण जर त्यांनी माघार घेतली तर अल्लाह क्षमाशील आणि दयाशील आहे.

१९३) जोवर उपद्रव संपुष्टात येत नाही आणि अल्लाहचाच धर्म पाळला जात नाही तोवर त्यांच्याशी लढा द्या. जर त्यांनी माघार घेतली तर अत्याचारींशिवाय कुणाशीही अतिरेक नको.

१९४) प्रतिष्ठित महिना प्रतिष्ठित महिन्याच्या समान आहे आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत समान बदला आहे. तुमच्यावर जर कुणी अतिरेक केला तर तुम्ही त्याच्याशी त्याच प्रमाणात अतिरेक करा, अल्लाहची भीती बाळगा आणि जाणून घ्या भीती बाळगणाऱ्यांना अल्लाहची साक्ष असते.

१९५) अल्लाहच्या मार्गात खर्च करा आणि आपल्याच हातांनी आपला विनाश ओढवून घेऊ नका. उपकार करीत जा, अल्लाह परोपकारींचा स्नेही आहे.

१९६) अल्लाहसाठी हज आणि उमरा करा, पण जर तुम्हाला वेढा घालण्यात आला असेल तर जे काही बळीसाठी उपलब्ध असेल. (त्याचा बळी द्या.) आणि तो बळी निश्चित ठिकाणी पोचत नाही तोपर्यंत केशवपन करू नका. जर कुणी आजारी असेल किंवा त्याच्या डोक्याला इजा होत असेल तर त्या बदल्यात उपवास करा अथवा अन्नदान करा (सदका) किंवा बळी द्या. जेव्हा तुम्हाला शांतता लाभेल तेव्हा हजचा अवधी येईपर्यंत उमराचा लाभ घ्या आणि बळीसाठी जे काही मिळेल ते द्या. तसं शक्य नसल्यास हजच्या काळात तीन दिवसांचे उपवास करा आणि परतल्यानंतर सात (दिवसांचे उपवास) अशा प्रकारे एकूण दहाची संख्या, हे त्यांच्यासाठी आहे ज्यांची घरं काबागृहाच्या (मस्जिदे हराम) सान्निध्यात नाहीत. अल्लाह शिक्षा देण्यास कठोर आहे हे जाणून घ्या. तेव्हा अल्लाहची भीती असू द्या.

१९७) हजचे महिने सर्वांना माहीत आहेत तेव्हा ज्यानं हज करणं ठरवलं असेल त्यानं वासनांपासून दूर राहावे, अभद्र बोलू नये अथवा हजच्या काळात कुणाशी भांडण-तंटा करू नये. तुम्ही जे काही भलं करता ते अल्लाहला माहीत आहे आणि (प्रवासादरम्यान) काही तरतूद (शिदोरी) असू द्या, सत्कर्मच सर्वोत्तम शिदोरी आहे. समंजस लोकांनो माझी भीती

बाळगा.

१९८) तुमच्या विधात्याच्या विपुलतेतून काही मिळवण्याचा प्रयत्न केल्यास त्यात काही गैर नाही. अरफातहून परतल्यावर मशअरे हरामपाशी (पवित्र स्मारक) अल्लाहचं स्तवन करा, त्यानं तुम्हाला जसा मार्ग दाखवला, तशी त्याची आठवण करा. पूर्वी तर तुम्ही भरकटलेले होता.

१९९) मग जेव्हा लोक परतू लागतील तुम्हीही परता. अल्लाहकडं क्षमायाचना करा. अल्लाह फार क्षमाशील व दयाळू आहे.

२००) मग तुम्ही हजच्या सर्व विधी संपन्न केल्यावर अल्लाहची आठवण करा, जशी तुम्ही आपल्या पूर्वजांची आठवण करीत असता किंवा त्याहूनही अधिकच. जे लोक असे म्हणतात, आमच्या विधात्या, आम्हाला या जगातच सर्वकाही दे, त्यांचं परलोकात काही भलं नाही.

२०१) आणि त्यांच्यातील जे म्हणतात, आमच्या विधात्या, आम्हाला या जगात आणि परलोकातही चांगलं दे, तसेच नरकाच्या शिक्षेपासून आम्हाला वाचव.

२०२) अशा लोकांच्या भाग्यात त्यांनी जे कमवलं ते आहे आणि अल्लाह हिशेब घेण्यास तत्पर आहे.

२०३) नियुक्त केलेल्या दिवसांत अल्लाहचं स्मरण करा. जर कुणी (एक) दोन दिवसांतच परतण्याची घाई करत असेल तर त्यात गुन्हा नाही आणि ज्यानं उशीर केला त्याचाही दोष नाही. हे ईशपरायण (लोकां) साठी (आहे). अल्लाहला भीत राहा आणि जाणून घ्या त्याच्याकडंच तुम्ही सर्व एकवटणार आहात.

२०४) या जगातील जीवनाबद्दल लोकांमधून कुणाचं बोलणं तुम्हाला चकित करून टाकतं, तो आपल्या मनाच्या गोष्टींबाबत अल्लाहची साक्षही देतो, पण (खऱ्या अर्थानं) तो अट्टल भांडखोर आहे.

२०५) तो धरतीवर अनाचार माजवण्याच्या मागावर असतो शेती व

मानवजातीचा नाश करण्यासाठी. अल्लाहला अनाचार आवडत नाही.

२०६) त्याला अल्लाहची भीती दाखवली जाते तेव्हा उद्धटपणा त्यास अपराधाकडं वळवतो. नरकच त्याला पुरेसं आहे, किती भयंकर ठिकाण ते!

२०७) आणि लोकांपैकी असाही माणूस असतो जो अल्लाहच्या प्रसन्नतेखातर आपल्या जिवाचा सौदा करतो. अल्लाह आपल्या भक्तांशी सहानुभूती बाळगतो.

२०८) श्रद्धावंत लोकांनो, तुम्ही पुरेपूर इस्लामचा स्वीकार करा, (अल्लाहला शरण जा,) सैतानाच्या वाटेला जाऊ नका. तो तुमच्याकरिता उघड शत्रू आहे.

२०९) तुमच्याकडं स्पष्ट (संकेत) आल्यानंतरही तुम्ही डगमगूला लागाल तर लक्षात ठेवा. अल्लाह प्रभुत्वशाली नि सर्वज्ञ आहे.

२१०) अल्लाह आणि त्याच्या दुतांनी ढगांच्या छायेत त्यांच्याकडं येऊन सर्व प्रकरणं निकाली काढण्याची हे लोक वाट पाहत आहेत? पण सर्व प्रकरणं अल्लाहकडंच परततात.

२११) विचरा, इस्राईलच्या संततीला आम्ही त्यांना किती स्पष्ट संकेत दिले होते? अल्लाहचं वरदान मिळाल्यावर जे त्यात बदल घडवतात तर मग अल्लाह त्यांना शिक्षा करण्यास कठोर आहे.

२१२) द्रोही लोकांसाठी या जगतातील जीवन आकर्षक बनवलं गेलंय आणि ते श्रद्ध लोकांचा उपहास करतात, पण निर्णयाच्या दिवशी जे सदाचारी लोक आहेत तेच वरचढ ठरतील. अल्लाह इच्छितो त्यांना अमाप विपुलता देतो.

२१३) सुरुवातीस सर्व मानवजात एकच समूह होता. नंतर अल्लाहनं त्यांना शुभवार्ता देणारे आणि सावध करणारे प्रेषित पाठवले आणि त्यांच्या समवेत सत्यतेसहित ग्रंथ पाठवले, ज्या बाबींत लोकांमध्ये मतभेद आहेत त्यांचा निर्णय करण्यासाठी. पण ज्या लोकांना ग्रंथ दिले होते,

त्यांनीच त्यांच्याकडं स्पष्ट मार्गदर्शन असतानादेखील परस्परांमधील दुराग्रहामुळं मतभेद केला. अल्लाहनं श्रद्ध लोकांना आपल्या आज्ञेनं ज्याबाबत (हे लोक) मतभेद करत होते, त्याबाबत सत्यतेचं मार्गदर्शन केलं. अल्लाह ज्यांना इच्छितो त्यांना रास्त मार्ग दाखवतो.

२१४) तुम्ही सहजच स्वर्ग मिळवण्याचा अंदाज लावला? तुमच्या पूर्वीच्या लोकांचे जे हाल झाले तसं न होताच. त्यांना यातना आणि संकटांना तोंड द्यावं लागलं. ते इतकं हादरून गेलं की प्रेषित आणि त्यांच्या समवेत ज्यांनी श्रद्धा बाळगली होती, म्हणू लागले, कुठं आहे अल्लाहची मदत? ऐका, अल्लाहची मदत जवळच आहे.

२१५) ते विचारतात, आम्ही काय ते खर्च करावा? त्यांना सांगा, जे काही आपल्या आई-वडिलांसाठी, नातेवाईकांवर, अनाथ व निराधारांसाठी आणि वाटसरूंवर खर्च करता ते उत्तमच आहे आणि तुम्ही जे कोणतं पुण्याचं काम करता अल्लाहला त्याची जाण आहे.

२१६) लढा देणं तुम्हाला नेमून दिलेला आहे, मग ते तुम्हाला आवडत नसलं तरी. एखादी गोष्ट तुम्हाला आवडत नसेलही, पण ती तुमच्या भल्यासाठी असते आणि एखादी गोष्ट जरी तुम्हाला आवडत असली तरी ती तुमच्या हिताची नसेल अल्लाह जाणतो तुम्ही नाही जाणत.

२१७) ते मनाईच्या महिन्यात युद्ध करण्याबद्दल विचारतात. त्यांना सांगा, त्यात लढाई करणं भयंकर (पाप) आहे. पण अल्लाहच्या मार्गानं रोखणं, अल्लाहस नाकारणं, मस्जिदे हराम (काबागृहात प्रवेश करण्यास) मज्जाव करणं, तिथून लोकांना घालवून देणं, अल्लाहच्या दृष्टीत अधिक गंभीर (बाब) आहे. उपद्रव माजवणं कत्तलीपेक्षा भयंकर (पाप) आहे. ते तुमच्याशी सतत भांडत राहतील, तुम्हाला तुमच्या धर्मापासून परावृत्त करेपर्यंत. तुमच्यापैकी जो कुणी पाठ फिरवेल आणि त्याला अश्रद्ध असतानाच मरण आलं तर अशा लोकांचे सर्व कर्म वाया गेलं या जगतात तसेच परलोकातदेखील. अशीच माणसं नरकाचे धनी आहेत. तिथं ते सदैव राहतील.

२१८) निश्चितच ज्या लोकांनी श्रद्धा बाळगली आणि ज्या लोकांनी हिजरत

केली, आपली घरं सोडली, अल्लाहच्या मार्गात संघर्ष केला, हे लोकच अल्लाहच्या दयेची आशा बाळगतात. अल्लाह क्षमाशील आणि दयाशील आहे.

२१९) ते तुमच्याशी दारू आणि जुगाराच्या बाबतीत विचारतात. त्यांना सांगा, त्यांच्यामध्ये मोठं पाप आहे तसेच लोकांसाठी काही लाभदेखील. पण त्यामधील पाप त्यांच्या लाभांपेक्षा जास्त आहे आणि ते विचारतात, आम्ही काय ते खर्च करावा? सांगा, जे काही शिल्लक राहील ते (सर्व). अशाप्रकारे अल्लाह आपली वचनं तुमच्यासाठी स्पष्ट करतो. तुम्ही चिंतन करावं यासाठी.

२२०) या जगतातही आणि परलोकातदेखील. ते अनाथांविषयी तुम्हाला विचारतात, त्यांना सुधारणं त्यांच्या भल्याचं होईल. जर तुम्ही त्यांना मिसळून घेतलं तर ते तुमचे बांधव आहेत. बिघाड करणाऱ्यांना आणि सुधारणा घडवणाऱ्यांना अल्लाह ओळखतो. अल्लाहची मर्जी असती तर त्यानं तुम्हाला कष्टात टाकलं असतं. अल्लाह खरोखरच वैभवशाली आणि सर्वज्ञ आहे.

२२१) अनेकेश्वरी महिलांशी त्यांनी श्रद्धा धारण केल्याशिवाय विवाह करू नका, एक श्रद्ध गुलाम महिला अनेकेश्वरी स्त्रीपेक्षा अधिक बरी आहे जरी ती (अश्रद्ध स्त्री) तुम्हाला अतिशय मोहक वाटत असली तरी. तसेच अनेकेश्वरी व्यक्ती श्रद्धा बाळगत नाहीत तोवर त्यांच्याशी विवाह करू नका. एक श्रद्ध गुलामदेखील अनेकेश्वरींच्या तुलनेत चांगला आहे तो (अनेकेश्वरी) कितीही आकर्षक असला तरी. असे लोक नरकाकडं बोलवतात आणि अल्लाह आपल्या इच्छेनं तुम्हाला स्वर्गाकडं आणि क्षमेकडं बोलवतो. लोकांना बोध घडावा म्हणून तो आपली वचनं स्पष्ट करतो.

२२२) ते तुम्हाला ऋतुस्रावाबद्दल (मासिक पाळी) विचारतात, त्यांना सांगा ती त्रासदायक (अवस्था) आहे. ऋतुस्रावाच्या काळात त्यांच्यापासून दूर राहा. त्या स्वच्छ होईपर्यंत त्यांच्या जवळ जाऊ नका. त्या स्वच्छ झाल्यानंतर अल्लाहनं सांगितल्याप्रमाणं त्यांच्याकडं जा. निश्चितच

अल्लाहला त्याच्याकडं वळणारे आणि स्वच्छ व पावन लोक आवडतात, आणि श्रद्धावंतांना खूशखबर द्या.

२२३) तुमच्या स्त्रिया तुमच्यासाठी तुमच्या शेतीसमान आहेत. तुम्ही आपल्या शेतीत आवडेल तसं जा, पण आपल्या भविष्यासाठी काही आगाऊ (तरतूद) करून ठेवा. अल्लाहचं भय राखा. त्याच्याशी तुमची गाठ पडणार आहे हे लक्षात असू द्या.

२२४) सद्व्यवहार, सदाचार आणि लोकांच्या भल्याविरूद्ध अल्लाहच्या नावानं शपथांचा आधार घेऊ नका. अल्लाह सर्वकाही ऐकत आहे.

२२५) तुमच्या निरर्थक शपथांविषयी अल्लाह तुम्हाला (जबाबदार) धरत नसतो, पण तुमच्या हृदयात दडलेल्या हेतूबद्दल तुमची पकड करतो. अल्लाह क्षमा करणारा आणि दया दाखवणारा आहे.

२२६) जे लोक आपल्या स्त्रियांपासून दूर राहण्याची शपथ वाहतात त्यांच्या प्रतीक्षेची मुदत चार महिने आहे. नंतर ते त्यांच्यापाशी परततील तर अल्लाह माफ करतो आणि दया दाखवतो.

२२७) जर तुम्ही तलाक देणं ठरवलं असेल तर अल्लाह ऐकणारा, जाणीव ठेवणारा आहे.

२२८) घटस्फोटित स्त्रियांनी तीन मासिक पाळींची प्रतिक्षा करावी (इद्दतचा काळ) आणि अल्लाहनं त्यांच्या गर्भात जे निर्मिलंय त्यांना लपवून ठेवणं त्यांच्यासाठी वैध नाही. त्या अल्लाह आणि शेवटच्या दिवसावर विश्वास ठेवत असतील तर. जर त्यांचे पती सलोखा करू इच्छित असतील तर त्यांना आपल्या स्त्रियांना परत घेण्याचा अधिकार आहे. आणि त्यांना (स्त्रियांना) देखील तसेच (अधिकार) आहेत जसे त्यांच्यावर प्रचलित पद्धतीनुसार पतींचे अधिकार आहेत. पुरुषांना मात्र एक दर्जा जास्त आहे. अल्लाह वैभवशाली आणि प्रतिभासंपन्न आहे.

२२९) घटस्फोट फक्त दोन वेळा द्यायचा असतो. नंतर मग तुम्ही परिचित पद्धतीनुसार त्यांना आपल्या जवळ राहू द्या अथवा सन्मानपूर्वक त्यांना निरोप द्या. तुम्ही त्यांना (स्त्रियांना) जे काही दिलं असेल ते परत घेणं

तुमच्यासाठी वैध नाही, पण जर दोघांना अल्लाहच्या मर्यादा भंग होण्याची भीती वाटत असेल तर (ती गोष्ट वेगळी). त्या दोघांकडून अल्लाहच्या मर्यादा भंग होण्याची तुम्हाला भीती असेल तर स्त्रीनं प्रतिदान (फिदिया) देऊन मुक्त होण्यात काही गैर नाही. या अल्लाहनं घालून दिलेल्या मर्यादा आहे. जे अल्लाहच्या मर्यादांचं उल्लंघन करतात तेच लोक अत्याचारी आहेत.

२३०) तुम्ही तिला तलाक दिल्यानंतर ती तुमच्यासाठी वैध नाही. पण जर तिने दुसऱ्या व्यक्तीशी लग्न केलं आणि त्यानं (तिला) घटस्फोट दिला तर मग त्या दोघांचा कसलाही अपराध नाही. जर एकत्रित येऊन अल्लाहच्या मर्यादांचं पालन करण्याचा त्यांचा मानस असेल तर. या अल्लाहनं घालून दिलेल्या मर्यादा आहेत जाणकार लोकांना स्पष्ट सांगण्यासाठी.

२३१) तुम्ही आपल्या पत्नींना तलाक देऊन त्यांनी इद्दत पूर्ण केल्यानंतर त्यांना एकतर चांगल्या पद्धतीनं एकत्रित राहू द्या किंवा प्रचलित पद्धतीनुसार त्यांना निरोप द्या. त्यांचा छळ करण्यासाठी त्यांना रोखून धरू नका. तसे जे करतील ते स्वत:वर अत्याचार करतील. अल्लाहच्या वचनांची अवहेलना करू नका. तुमच्यावरील अल्लाहच्या वरदानाची आठवण ठेवा. तसेच ग्रंथाद्वारे जे बोधप्रद ज्ञान पाठवलं ते आठवणीत राहू द्या. अल्लाहच्या भीतीनं वागा. अल्लाहला प्रत्येक बाबीची माहिती आहे, हे लक्षात असू द्या.

२३२) तुम्ही आपल्या पत्नींस तलाक देऊन त्यांनी इद्दतची मुदत पूर्ण केल्यावर त्यांना इतर पतींशी आपसातील संमतीनुसार प्रचलित पद्धतीनं पुनर्विवाह करण्यास प्रतिबंध करू नका. तुमच्यातील जे लोक अल्लाह आणि अंतिम दिनावर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी हा उपदेश आहे. हेच तुमच्यासाठी अधिक पावन आणि पवित्र आहे. अल्लाहलाच माहिती आहे, तुम्हाला ते माहीत नाही.

२३३) ज्या मातांना आपल्या मुलांना स्तनपानाचा कालावधी पूर्ण करायचा असेल त्यांनी दोन वर्षं स्तनपान करावं. त्या मातांच्या अन्न-वस्त्रांची

तरतूद ज्याचं ते मूल आहे त्या पित्याला करावी लागेल. कुणावरही त्याच्या सहनशक्तीपलीकडं ओझं टाकलं जात नाही. मातेला तिच्या मुलामुळे त्रास देऊ नका. तसेच पित्यालाही मुलामुळे त्रास देऊ नये. वारसालाही हेच लागू आहे. मग आपसात राजीखुशीनं त्या दोघांना (मुलाचं) स्तनपान बंद करायचं असेल तर मग दोघांचा काही दोष नाही आणि आपल्या मुलानां स्तनपान करण्याचं प्रचलित पद्धतीनं ठरवलं असेल तुम्ही त्यांना जे काही द्यायचं ठरवलं असेल ते त्यांच्या हवाली. अल्लाहचं भय बाळगा आणि हे लक्षात राहू द्या, की तुम्ही जे काही करत आहात ते अल्लाह पाहत आहे.

२३४) तुमच्यापैकी मरण पावणारे ज्या (विधवा) पत्नींना मागं सोडतील, त्यांचा प्रतीक्षाकाल (इद्दतची मुदत) चार महिने दहा दिवस आहे. आपली इद्दत पूर्ण केल्यावर त्यांनी प्रचलित पद्धतीनुसार आपल्या हितात काही ठरवलं असेल तर त्यात काही दोष नाही. तुम्ही जे काही करता अल्लाहला त्याची माहिती आहे.

२३५) (अशा घटस्फोटित अगर विधवा) स्त्रियांनी लग्नाची मागणी करा अथवा तशी इच्छा आपल्या मनामध्ये बाळगण्यात काही दोष नाही. तुम्ही त्यांना याबाबतीत कळवाल हे अल्लाहला माहीत आहे. पण काही गुप्त करार न करता प्रचलित पद्धतीनं बोलणी करा. त्या इद्दतचा काळ पूर्ण करेपर्यंत विवाह करण्याचा निर्णय घेऊ नका. तुमच्या मनात जे काही दडलंय अल्लाहला त्याची माहिती आहे, म्हणून त्याचं भय बाळगा आणि अल्लाह क्षमाशील व निभावून घेणारा आहे याची जाणीव ठेवा.

२३६) तुम्ही आपल्या पत्नींना स्पर्श न करता अथवा त्यांचा मेहेर न ठरवता त्यांना तलाक देण्यात काही दोष नाही. श्रीमंत अथवा गरीब असतील तशा स्थितीनुसार, त्यांच्या खर्चाची तरतूद करणे सदाचारी लोकांना भाग आहे.

२३७) तुम्ही त्यांना स्पर्श न करताच तलाक दिला आणि त्यांचा मेहेर ठरवला असेल तर. त्याचा अर्धा भाग त्यांना देऊन टाका. पण जर त्यांनी किंवा त्यांच्या वारसानं ज्याच्या हाती विवाह करून देणं असेल ते माफ करून

टाकलं तर ती गोष्ट वेगळी. तुम्ही जर माफ केलं तर ही सदाचाराची गोष्ट आहे. एकमेकांवर उपकार करण्यास विसरू नका. तुम्ही जे काही करत असता निश्चितच अल्लाह ते पाहत असतो.

२३८) आपल्या नमाजांची (प्राथनांची) काळजी घ्या, विशेषत: मधल्या. अल्लाहसमोर तन्मयतेनं उभं राहा.

२३९) तुम्हाला (शत्रूची) भीती असेल तर पायी चालताना अथवा स्वारीवर (नमाज पढा) जेव्हा तुम्हाला शांतता लाभेल तेव्हा तुम्हाला अल्लाहनं शिकवलं त्यानुसार त्याचे स्मरण करा.

२४०) तुमच्यापैकी जे लोक मरणोत्तर आपल्या (विधवा) पत्नीं मागं सोडतील, त्यांना (विधवांना) घरातून काढू नका. एका वर्षासाठी त्यांच्या खाण्या-पिण्याची तजवीज करा. त्या स्वत: निघून जाऊन आपल्यासंबंधी काही उचित असा परिवार निवडतील तर त्यात काही दोष नाही. अल्लाह सर्वोच्च आणि प्रतिभाशाली आहे.

२४१) घटस्फोटित महिलांच्या उपजीविकेसाठी योग्य तरतूद करणं अल्लाहचं भय बाळगणाऱ्यांसाठी नेमून दिलेला आहे.

२४२) अशा रीतीनं अल्लाह आपल्या वचनांचं स्पष्टीकरण करतो तुम्हाला ते समजता यावं म्हणून.

२४३) हजारोंच्या संख्येत असतानाही जे लोक मृत्यूच्या भीतीनं आपली घरंदारं सोडून निघाले त्यांना तुम्ही पाहिलं नाही. अल्लाहनं 'मरा' म्हणून सांगितलं, परंतु त्यांना जीवदान दिलं. अल्लाह तर खरोखरच लोकांना वरदान देत असतो, पण बहुतेक लोक त्याचे आभार मानत नाहीत.

२४४) अल्लाहच्या मार्गात लढा द्या. हे जाणून घ्या, अल्लाह सर्वकाही ऐकतो आणि जाणतो.

२४५) असा कोण आहे जो अल्लाहला चांगल्या (पद्धतीचं) कर्ज देईल, त्यात तो (अल्लाह) कितीतरी पटीनं वाढ करेल, अल्लाहच टंचाईही आणि विपुलतादेखील देतो. त्याच्याकडंच तुम्हा सर्वांना परतायचंय.

२४६) मूसानंतर इस्राईलच्या संततीतील सरदारांनी आपल्या प्रेषितांना जे सांगितलं ते तुम्ही पाहिलं? त्यांनी सांगितलं आमच्यासाठी एक राजा नेमून दे, अल्लाहच्या मार्गात लढण्यासाठी. तो म्हणाला, तुम्हाला युद्ध करणे अनिवार्य केले तर तुम्ही लढणार नाही, हे शक्य आहे. ते म्हणाले, आमहाला काय झालंय? अल्लाहच्या मार्गात न लढायला? आम्हाला तर आमच्या घरादारांतून, मुलाबाळांपासून घालवून दिलेला आहे. मग जेव्हा युद्धाचे आदेश दिले गेले तर काहींना वगळून बाकीच्यांनी पाठ फिरवली. अल्लाह अशा अपराधींना (चांगलं) ओळखतो.

२४७) त्यांच्या प्रेषितांनी त्यांना सांगितलं, अल्लाहनं तालूतला तुमचा राजा नेमून दिलाय. ते म्हणू लागले, तो आमचा कसं बरं राजा होऊ शकतो, आम्ही राजा होण्यास अधिक पात्र आहोत. त्याला विपूल संपत्तीदेखील लाभलेली नाही. ते म्हणाले (मूसा) अल्लाहनं तुमच्यावर त्याची निवड केली आणि त्याला ज्ञान आमि शारीरिक शक्तीनं संपन्न केले. अल्लाह इच्छितो त्याला आपले राज्य बहाल करतो. अल्लाहच विपुलता देणारा आणि माहिती ठेवणारा आहे.

२४८) त्यांच्या प्रेषितांनी त्यांना सांगितलं, त्यांचा राजा म्हणून नेमलेल्याचा संकेत असा, तुमच्याकडं ती पेटी येईल ज्यात तुमच्या विधात्याकडून तुम्हाला मन:शांती लाभंल अशी सामग्री आहे. मूसा आणि हारुन यांच्या कुटुंबांनी सोडलेले अवशेष आहेत. देवदूत ती उचलून आणतील. तुम्ही विश्वास ठेवत असाल तर यामध्ये तुमच्यासाठी संकेत आहे.

२४९) मग जेव्हा तालूतनं आपल्या सैन्यासह आगेकूच केली, तो (आपल्या सैन्याला) म्हणाला, अल्लाह नदीजवळ निश्चितच तुमची परीक्षा घेईल. कुणी तिचं पाणी प्यालं तर त्याचा माझ्याशी संबंध नाही आणि जो ते (पाणी) चाखणारही नाही तो माझ्यासोबत राहील. पण कुणी ओंजळीनं एखादा घोट घेतला तर चालंल. काहींना वगळून सर्वांनी (पाणी) प्यायलं. जेव्हा तो (तालूत) आणि त्याच्याबरोबरच्या श्रद्धावंतांनी नदी पार केली (तेव्हा) ते म्हणू लागले, आजच्या दिवशी तर आम्हाला जालूत आणि त्याच्या सैन्याशी (लढण्याचं) अवसान

नाही. पण ज्यांना विश्वास होता अल्लाहशी त्यांची गाठ पडणार आहे ते म्हणाले, कितीतरी वेळा असं घडलंय की लहान फौजांनी मोठ्या फौजांवर अल्लाहच्या आज्ञेनं ताबा मिळवलाय. जे धैर्य दाखवतात, त्यांना अल्लाहची साथ असते.

२५०) जेव्हा त्यांनी जालूत आणि त्याच्या सैन्यांशी त्यांचा सामना झाला त्यांनी प्रार्थना केली, आमच्या विधात्या, आमच्या मनाला धीर दे, आमची पावलं भक्कम ठेव आणि बंडखोरांविरूद्ध आमची मदत कर.

२५१) मग अल्लाहच्या आज्ञेनं त्यांनी त्यांना पराभूत केलं. दाऊदनं (डेव्हिड) जालूतला ठार मारलं. अल्लाहनं त्याला सत्ता आणि ज्ञान दिलं आणि त्याला हवं होतं ते शिकवलं. जर अल्लाहनं एका समूहाच्या सहाय्यानं दुसऱ्या लोकसमूहाला नष्ट केलं नसतं तर धरतीवर अनाचारानं थैमान घातलं असतं. पण अल्लाह तर सर्व विश्वांवर वरदान करणारा आहे.

२५२) आम्ही तुम्हाला ऐकवतो ती ही अल्लाहची वचनं आहेत आणि निश्चितच तुम्ही प्रेषितांमधील आहात.

**पारा - ३**

२५३) हे (आमचे) प्रेषित आहेत. त्यांच्यातील काहींना आम्ही इतरांपेक्षा अधिक संपन्न केलं. त्यांच्यातील काहींशी अल्लाहनं संभाषण केलं आणि काहींचा मानमरातब उंचावला. आम्ही मरयमपुत्र ईसा (अ.) यांना स्पष्ट संकेत दिलं आणि पावन आत्म्यानं त्यांना साथ दिली. जर अल्लाहची तशी इच्छा असती तर त्यांच्या नंतर येणाऱ्यांनी त्यांच्याकडं स्पष्ट मार्गदर्शन आल्यानंतरदेखील त्यांच्याशी वाद घातला नसता. पण त्यांनी मतभेद केला. त्यांच्यातील काहींनी निष्ठा बाळगली तर काहींनी बंड केलं. पण जर अल्लाहची तशी मर्जी असती तर ते आपसात भांडले नसते. अल्लाह आपल्या योजनेनुसारच करत असतो.

२५४) श्रद्धावंत लोकहो, ज्या दिवशी खरेदी विक्री होणार नाही, मैत्री उरणार नाही की कुणाची शिफारस कामी येणार नाही, त्या (दिवसा)आधी आम्ही तुम्हाला दिलेल्या संसाधनांतून खर्च करा, न मानणारेच अपराधी

आहेत.

२५५) (फक्त) अल्लाहच, त्याव्यतिरिक्त इतर कुणी उपास्य नाही चिरंतनजीवी आणि शाश्वत. त्याला गुंगी येत नाही की झोप येत नाही, आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही त्याच्याच (अधीन). त्याच्या आज्ञेशिवाय त्याच्याकडं मध्यस्ती करणारा कुणीही नाही. त्याच्या समोरील आणि मागं सर्वांची त्याला माहिती आहे. त्याच्या मर्जीपलीकडं त्याच्याविषयीचं ज्ञाान त्यांच्या आवाक्यात नाही. त्याचं आसन आकाश आणि पृथ्वीवर विस्तारित आहे. त्याची जोपासना करताना त्याला थकवा येत नाही. तोच उदात्त आणि प्रतिभावंत आहे.

२५६) धर्माच्या बाबतीत सक्ती नाही. रास्त मार्गापासून वाममार्ग वेगळा केला गेलाय. तेव्हा ज्यानं बंडखोराला जुगारून अल्लाहशी एकनिष्ठता ठेवली त्यानं भक्कम न तुटणारा आधार धरला. अल्लाह ऐकणारा आणि माहिती ठेवणारा आहे.

२५७) अल्लाह श्रद्ध लोकांचा वाली आहे. त्यांना तो अंधारातून प्रकाशाकडं नेतो. ज्या लोकांनी नाकारलं त्यांचे समर्थक, बंडखोर आहेत, ते त्यांना प्रकाशाकडून अंधकाराकडं लोटतात. हे लोक नरकाचे धनी आहेत. ते सदैव तिथंच राहतील.

२५८) तुम्ही पाहिलं? ज्याने इब्राहीम (अ.) यांच्याशी त्यांच्या विधात्याविषयी वाद घातला त्याला अल्लाहनं सत्ता दिली होती म्हणून आणि जेव्हा इब्राहीम (अ.) यांनी म्हटलं, माझा विधाता जन्म आणि मृत्यू देणारा आहे. तो म्हणाला, मी देतो जन्म आणि मृत्यू. इब्राहीम (अ.) म्हणाले, माझा विधाता सूर्यास पूर्वेकडून उगवतो, तू त्याला पश्चिमेकडून उगव, तेव्हा तो बंडखोर गोंधळून गेला आणि अल्लाह अशा अत्याचारी लोकांच मार्गदर्शन करत नसतो.

२५९) अथवा एका अशा माणसासारखं जो अशा वस्तीतून जात होता जी आपल्या छतांसहित पार उद्ध्वस्त झाली होती. तो म्हणाला, नाश पावलेल्याला अल्लाह कसं काय परत उभारेल. अल्लाहनं त्याला शंभर वर्षं मृतावस्थेत ठेवून दिले आणि पुन्हा उठवलं. (अल्लाहनं)

विचारलं, तू किती काळ पडून राहिला? तो म्हणाला, एक दिवस किंवा त्याहून कमी पडून राहिलो (असेल). अल्लाहनं सांगितलं, नव्हे तू तर शंभर वर्ष पडून राहिला होता. आपल्या अन्न-पाण्याकडं बघ ते नासलं नाही, आपल्या गाढवाला बघ. आम्ही तुला लोकांसाठी एक संकेत बनवू. आपल्या हाडांना बघ आम्ही कशाप्रकारे त्यांची एकमेकांशी सांगड घालतो, मग त्यांच्यावर मांस चढवतो. जेव्हा (सर्वकाही) त्याच्यासाठी स्पष्ट झालं. तो म्हणाला, मला कळून चुकलं, प्रत्येक बाबीवर अल्लाहचं सामर्थ्य आहे ते.

२६०) आणि जेव्हा इब्राहीम (अ.) यांनी विधात्याला म्हटलं, तू मृतास कसं जीवित करतो ते मला दाखव. (अल्लाहनं) उत्तर दिलं, तुझा विश्वास नाही? ते म्हणाले, हो आहे. पण माझ्या मनाच्या समाधानासाठी (विचारतो). तो (अल्लाह) म्हणाला, चार पक्षी धरून ठेव. त्यांना तू आपलंसं कर (माणसाळून). मग त्या प्रत्येकाचा एक एक तुकडा प्रत्येक टेकडीवर ठेव. मग त्यांना हाक दे. ते तुझ्यापाशी धावत येतील. हे जाणून घे अल्लाह प्रतिभासंपन्न आणि वैभवशाली आहे.

२६१) आपली धन-संपत्ती अल्लाहच्या मार्गात उपयोगी आणणाऱ्याचं उदाहरण धान्याच्या एका दाण्याप्रमाणं आहे ज्यातून सात कणसं निघतील आणि प्रत्येक कणसात शंभर दाणे आणि अल्लाह आपल्या इच्छेनं त्यात अधिक वृद्धीही करतो. अल्लाह सर्वस्वी असून त्यास सर्वकाही ठाऊक असते.

२६२) जे लोक आपलं धन अल्लाहच्या मार्गात खर्च करतात आणि नंतर कसलं उपकार ठेवत नाहीत की कुणाला दु:ख पोचवता, त्यांची फळं त्यांच्या विधात्यापाशी आहेत, त्यांना कसलीही भीती नसंल की ते दु:खी होणार नाहीत.

२६३) इजा पोचवणाऱ्या दान-धर्मापेक्षा स्नेहाचं बोलणं आणि दोषांना नजरेआड करणं उत्तम आहे. अल्लाह तर निरपेक्ष आणि सहनशील आहे.

२६४) श्रद्धावंत लोकहो, लोकांसमोर प्रदर्शन मांडण्यासाठी आपलं धन

उपयोगी आणणाऱ्या एखाद्या माणसाप्रमाणं तुम्ही उपकार ठेवून आणि मनं दु:खी करून आपलं दान-धर्म वाया घालवू नका, त्याचा तर अल्लाह आणि शेवटच्या दिनावर विश्वासच नाही. त्याचं उदाहरण एखाद्या मातीचा थर असलेल्या खडकासारखं आहे, ज्यावर जोरात पाऊस पडला तर ती माती निघून जाते. त्यांनी जे कमवलं ते त्यांच्या हाती लागत नाही. जे लोक विश्वास बाळगत नाहीत अल्लाह त्यांचं मार्गदर्शन करत नाही.

२६५) जे लोक आपल्या संपदेतून अल्लाहच्या प्रसन्नतेखातर मानसिक निश्चयानं खर्च करतात, त्यांचं उदाहरण उंचावरील बागेप्रमाणं आहे, जोरदार पाऊस पडला तर दुप्पटीनं बहरते. दमदार पाऊस न पडता एखादी सर जरी पडली तरी पुरेशी आहे. तुम्ही जे करत आहात ते अल्लाहच्या पाहणीत आहे.

२६६) तुमच्यापैकी कुणास हे आवडेल? त्याची एक बाग असावी खजुर आणि द्राक्षांनी बहरलेली, त्याच्या खालून नद्या वाहत असतील. त्याच्यासाठी त्यामध्ये सर्व प्रकारची फळं असावीत. मग त्यास वृद्धापकाळानं गाठावं, त्याची मुलं कमजोर असावीत आणि त्यातच आगीच्या एका भयंकर वावटळानं त्यास तडाखा दिला आणि तो जळून भस्म झाला. अशा प्रकारे अल्लाह आपली वचनं तुमच्या चिंतनासाठी स्पष्ट करून देतो.

२६७) हे निष्ठावंत लोकहो, तुम्ही जे कमवलंय त्यातून स्वच्छ वस्तू तसेच आम्ही जमिनीतून तुमच्यासाठी जे उत्पन्न काढलंय त्यातून खर्च करा. आणि त्यातून जे वाईट प्रकारचं असंल ते खर्च करण्याची मानसिकता बाळगू नका. स्वत: तुम्हाला ते आवडत नसताना, जर तुमच्या नजरेत ते आलं नसंल तर ती गोष्ट वेगळी. जाणून घ्या अल्लाह निरपेक्ष असून सर्वगुणसंपन्न आहे.

२६८) सैतान तुम्हाला दारिद्र्याची भीती घालतो तसेच अश्लील वर्तनाकडं प्रोत्साहित करतो. अल्लाह तुम्हाला क्षमा आणि आपल्या वरदानाचं वचन देतो. अल्लाह सर्व बाबींची माहिती ठेवतो.

२६९) ज्याला इच्छितो त्याला अल्लाह प्रतिभासंपन्न करतो. ज्यांना प्रतिभा

लाभली त्यांना जणू उत्तम असे सर्वकाही लाभलं. पण समंजस आहेत तेच बोध घेत असतात.

२७०) तुम्ही आपल्या तरतूदींतून जे काही खर्च करता अथवा नवस करता त्यांची अल्लाहला माहिती असते. अत्याचारी लोकांसाठी कसलीही मदत मिळणार नाही.

२७१) तुम्ही जाहीररित्या केलेले दान-धर्म योग्य आहेत पण जर तुम्ही गरजवंतांना गुप्तपणे काही दिलं तर हे तुमच्यासाठी अधिक हिताचंय. तो तुमच्याकडून घडलेल्या अपराधांवर पडदा घालील आणि तुम्ही करत असलेल्या सर्व गोष्टींची अल्लाहला जाणीव आहे.

२७२) त्यांचं मार्गदर्शन करणं तुमची जबाबदारी नव्हे तर ज्याला इच्छितो त्याला अल्लाहच रास्त मार्ग दाखवतो. जे काही तुम्ही खर्च करता ते तुमच्या भल्यासाठी आणि अल्लाहची मर्जी संपादन करण्यापलीकडं कशासाठीही नव्हे. तुम्ही जी संपदा खर्च कराल ती तुम्हाला पुरेपूर (परत) मिळंल. तुमच्यावर मुळीच अन्याय केला जाणार नाही.

२७३) दारिद्र्यानं पछाडलेल्यांसाठी, जे अल्लाहच्या मार्गात वाहून गेलेत, ज्यांना हालचाल करता येत नाही, ते विनंती करत नसल्यानं कुणी अज्ञानी त्यांना धनसंपन्न समजत असंल, तुम्ही त्यांना त्यांच्या चेहऱ्यावरून ओळखू शकता ते लोकांच्या मागं लागून विनवणी करत नाहीत. तुम्ही जे काही खर्च करता अल्लाहला त्याची माहिती असते.

२७४) जे लोक आपल्या मालमत्तेतून रात्रंदिवस जाहीररित्या अथवा गुप्तपणे खर्च करतात त्यांच्या विधात्याकडून त्यांना त्याची प्रतिफळं लाभतील. त्यांना कसलंही भय नसंल की दु:खी होण्याचे कारण असेल.

२७५) जे लोक व्याज खातात ते जणू (कयामतच्या दिवशी) सैतानाच्या स्पर्शाने वेड लागल्याप्रमाणं उभं राहतील. याचं कारण असं की ते व्याजाची तुलना व्यापाराशी करतात. पण अल्लाहनं व्यापार वैध केला असून व्याजबट्टा निषिद्ध केलाय. ज्यांना अल्लाहपासून बोध मिळाले आणि तो मागं फिरला असंल त्यांनी पूर्वी जे केलं ते झालं. ते

प्रकरण अल्लाहच्या अधीन आहे. पण जो पुनरावृत्ती करेल असे लोक नरकाग्नीचे धनी असतील, त्यातच ते सदैव राहतील.

२७६) अल्लाह व्याजबट्ट्याची ऱ्हास करतो आणि दानधर्मात समृद्धी देतो. अल्लाहला कृतघ्न आणि पापी मुळीच आवडत नसतात.

२७७) निश्चितच अल्लाहची निष्ठा बाळगणारे आणि (त्यानुसार) सत्कर्म करणारे नियमित नमाज पढणाऱ्यांना तसेच जकात अदा करणाऱ्यांना त्यांच्या विधात्याकडून मोबदला लाभंल. त्यांना कसली भीती नसणार की ते दु:खीही होणार नाहीत.

२७८) श्रद्धावंत लोकहो, जर तुमची निष्ठा असेल तर अल्लाहला भिऊन वागा आणि व्याजातून जे काही बाकी (घेणे) असेल ते सोडून द्या.

२७९) पण जर तुम्ही तसं केलं नाही तर मग अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताशी युद्धास सामोरं जाण्याची तयारी ठेवा. जर तुम्ही परावृत्त झाला तर मूळ रक्कम तुमचीच आहे. तुम्ही इतरांशी अन्यायी वर्तणूक करू नका तुमच्यावरही अन्याय होणार नाही.

२८०) आणि जर तो अडचणीत असेल तर (त्याची आर्थिक) परिस्थिती सुधारेपर्यंत मुदत द्या आणि तुम्हाला जाणीव असेल तर त्याला (कर्जदारास) माफ करून टाकणं भल्याचं ठरेल.

२८१) ज्या दिवशी तुम्ही सर्व अल्लाहकडं एकवटले जाल त्या दिवसाचं भय बाळगा. मग ज्यांनी जे काही कमवलं असेल त्याची पुरेपूर परतफेड केली जाईल आणि त्यांच्याशी कसलाच अन्याय केला जाणार नाही.

२८२) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही (आपसात) एका ठराविक मुदतीसाठी देवाणघेवाणीचा करार करताना ते (रीतसर) लिहून घ्या. उभय पक्षांतील एकानं ते कायदेशीर लिहून घ्यावे आणि लिहणाऱ्यानं लिहण्यास नकार देऊ नये जसं अल्लाहनं त्याला शिकवलंय त्याप्रमाणं त्यांना लिहलं पाहिजे. कर्ज घेणाऱ्यानं ते सांगावं (काय लिहायचंय ते) आपल्या विधात्याची भीती बाळगत त्यामध्ये कसली कमतरता ठेवू नये. आणि जर कर्ज घेणाऱ्यास ते (पक्षकार) कळत नसंल आणि काय

लिहावं याचं त्याला सामर्थ्य नसंल तर त्याच्या पालकानं ते कायदेशीर लिहून घ्यावं. आपल्या पुरुषांपैकी दोन साक्षीदार नेमावेत. जर दोन पुरुष मिळत नसतील तर आपसातील मर्जीनं एक पुरुष आणि दोन स्त्रियांना साक्षीदार बनवा. जर एका स्त्रीच्या ध्यानात नसंल तर दुसरीनं त्याची आठवण करून द्यावी आणि जेव्हा त्यांना (साक्ष देण्यास) बोलविलं जाईल तेव्हा त्यांनी नकार देता कामा नये. करार लिहण्यात हलगर्जीपणा करू नये. प्रकरण अल्पावधीचं असो की लांब अवधीचं, अल्लाहजवळ ते न्यायाचं आहे. तसेच पुरावा देण्यास योग्यदेखील आहे आणि तुम्हाला शंका उपस्थित करण्यास वाव राहणार नाही, जर तुम्ही हातोहात सौदा केला आणि त्याची नोंद ठेवली नसंल तर त्यात काही गैर नाही. व्यवहार करताना तुम्ही साक्ष ठेवत जा आणि लिहणाऱ्यानं तसेच साक्षीदारानं काही कमी-जास्त करू नये. तुम्ही जर तसं केलं तर तुम्ही नक्कीच अपराधी व्हाल. तुम्ही अल्लाहचं भय राखा, अल्लाह तुम्हाला सर्वकाही शिकवील, कारण त्यास प्रत्येक बाब अवगत असते.

२८३) प्रवासाच्या दरम्यान तुम्हाला कुणी (करार) लिहून देणारा सापडत नसेल तर तुम्ही तारण म्हणून काही ताब्यात द्या. तुमच्यापैकी एकाने दुसऱ्यावर विश्वास ठेवला असेल तर त्याच्याकडं अनामत म्हणून ठेवलेली (वस्तू) त्यानं परत देऊन टाकावी, आपल्या विधात्या अल्लाहशी भीत राहावे. तुम्ही पुरावा लपवू नका. ज्यानं तो लपवला त्याच्या मनात पाप आहे. तुम्ही जे काही करता अल्लाहच्या ध्यानात आहे.

२८४) आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहचंच आहे. तुमच्या मनात असेल ते तुम्ही उघड केलंत अथवा ते दडवून ठेवलंत, अल्लाह त्याबाबतचा हिशेब घेणारच आहे. त्याच्या मर्जीत असेल त्याला तो क्षमा करून टाकील आणि ज्याला इच्छिल त्याला शिक्षा करील. अल्लाह प्रत्येक बाबीवर प्रभुत्व राखतो.

२८५) प्रेषित आणि श्रद्धावंत त्यांच्याकडं जे अवतरलं त्यावर विश्वास ठेवतात. तसेच अल्लाह त्याचे देवदूत, त्याचे धर्मग्रंथ आणि त्याचे

प्रेषित सर्वांना मान्य करतात. आम्ही त्याच्या प्रेषितांमध्ये भेदाभेद करत नाही आणि ते म्हणतात, आम्ही ऐकलं आणि पालन केलं. आमच्या विधात्या आम्हाला क्षमा कर, तुझ्याकडंच आम्हाला परतावयाचंय.

२८६) अल्लाह कुणावरही त्याच्या क्षमतेपलीकडं ओझं टाकत नाही. ज्यानं जे कमवलं तसं त्याला मिळेल. आणि (शिक्षा) मिळेल ती कमवली असल्यास. हे आमच्या विधात्या! विसर पडून आमच्याकडून झालेल्या चुकीबद्दल तू आम्हास धरू नकोस. आमच्या विधात्या! आमच्यापूर्वी होऊन गेलेल्यांवर (जबाबदाऱ्यांचं) जसं ओझं टाकलं होतं तसं आमच्यावर टाकू नकोस. आमच्या विधात्या आमच्या शक्तीपलीकडंचं ओझं आमच्यावर लादू नकोस. आमच्या पापांकडं दुर्लक्ष कर, आम्हाला माफ कर, आम्हास दया दाखव. तूच तर आमचा आधार आहेस. तेव्हा (धर्माला) नाकारणाऱ्यांविरूद्ध आमची मदत कर.

----

# ३. सूरह आले-इमरान

**मदीनाकालीन, आयती २००**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ लाम मीम.

२) फक्त अल्लाहच आहे त्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही शाश्वत आणि स्वयंभू.

३) त्यानं तुमच्यावर सत्यार्थी ग्रंथ अवतरले. पूर्वीच्या ग्रंथांची पुष्टी करणारा तसेच तोरह आणि इंजीलदेखील अवतरले.

४) यापूर्वी लोकांच्या मार्गदर्शनार्थ त्यानं कसोटी पाठवली. तेव्हा ज्या लोकांनी अल्लाहची वचनं नाकारली त्यांच्यासाठी कठोर शिक्षा आहे. (याद राखा) अल्लाह प्रभुत्वसंपन्न आणि (अपराधा) बद्दल (शिक्षा) देणारा आहे.

५) पृथ्वी आणि आकाशामधील अल्लाहपासून लपलेलं असं काही नाही.

६) उदरात हवं तसं तुम्हाला साकारणारा तोच आहे. अल्लाहव्यतिरिक्त कुणी ईश्वर (देव) नाही. तो स्वसामर्थ्यवान आणि प्रभुत्वसंपन्न आहे.

७) त्यानं तुमच्यावर ग्रंथ अवतरले. यामधील काही आयती (वचनं) मूलभूत (निर्णायक) आहे, त्या ग्रंथाच्या मुलाधार आहेत आणि इतर अस्पष्ट (अर्थाच्या). तेव्हा ज्यांच्या मनात तेढ असते ते अस्पष्ट (अर्थाच्या) जे काही असेल ते अंगीकारतात, विसंगतीच्या शोधात ते त्यांच्या गर्भित अर्थाचा (अंदाज) लावत असतात. त्याचा अर्थ अल्लाहशिवाय कुणाला माहीत नाही आणि ज्यांचं ज्ञान भक्कम असते. आम्ही ते सर्व मान्य करतो, जे आमच्या विधात्याकडचं आहे. जे समंजस (लोक) आहेत त्यांनाच ते अवगत होते.

८) हे आमच्या विधात्या! आम्हास मार्गदर्शन केल्यानंतर आमची मनं विचलित होऊ देऊ नकोस, आम्हाला आपल्या कृपेनं अनुगृहित कर.

तूच तर सर्वोत्तम देणारा आहेस.

९) हे विधात्या! तू सर्व मानवजातींना त्या दिवशी एकत्र करणारा आहे ज्यात शंका नाही. निश्चितच अल्लाह दिलेल्या वचनाविरूद्ध (काही) करत नसतो.

१०) विद्रोही लोकांची संपत्ती आणि संततीपैकी काहीही अल्लाहविरूद्ध (काहीएक) उपयोगी पडणार नाही. अशी माणसं तर नरकाचे इंधन होतील.

११) जशी फिरऔनच्या लोकांची गत झाली, तसेच त्यांच्या पूर्वीच्या ज्या लोकांनी आमची वचनं नाकारली त्यांच्या अपराधाबद्दल आम्ही त्यांना धरलं. अल्लाह शिक्षा देण्यास कठोर आहे.

१२) ज्या लोकांनी बंड पुकारलं त्यांना सांगा, त्यांच्यावर ताबा मिळवून ते नरकाकडं हाकलून दिले जातील, ते फारच वाईट ठिकाण आहे.

१३) जे दोन गट आपसात भिडले होते यामध्ये तुमच्यासाठी संकेत आहे. (त्यांच्यातील) एक गट अल्लाहच्या मार्गात लढा देत होता तर दुसऱ्यानं बंड केलं त्यांना त्याच्या उघड्या डोळ्यांनी ते (अल्लाहच्या मार्गात लढणारे) आपल्यापेक्षा दुप्पट दिसत होते. अल्लाह इच्छितो त्यांना आपल्या मदतीनं बळकटी देतो, जे डोळस आहेत त्यांना यामध्ये बोध आहे.

१४) स्त्रिया-मुलं, सोनं-चांदीची साठवण, निवडक घोडे पशू आणि शेतजमिनी या लोकांना भावणाऱ्या गोष्टी आम्ही मानवांसाठी आकर्षक बनवल्यात, या जगातल्या जीवनाची साधनं आहेत. पण खरं पाहता अल्लाहचं सान्निध्य अतिशय सुंदर आहे.

१५) त्यांना विचारा, मी यापेक्षा चांगल्या गोष्टींची माहिती देऊ? जे सदाचारी लोक आहेत त्यांच्यासाठी त्यांच्या विधात्याकडं अशा बागा आहेत ज्यांच्या खालून नद्या वाहतात. तिथं ते निरंतर राहतील, तसेच पावित्र्यसंपन्न सोबती आहेत आणि (त्याव्यतिरिक्त) अल्लाहची प्रसंन्नता. अल्लाह आपल्या भक्तांना (चांगल्या प्रकारे) पाहतो.

१६) हे लोक म्हणतात, आमच्या विधात्या! आम्ही श्रद्धा बाळगली तेव्हा आमच्या चुकांसाठी आम्हाला क्षमा कर आणि नरकाग्नीच्या शिक्षेपासून वाचव.

१७) ते (खऱ्या अर्थानं) सत्यनिष्ठ आणि दृढतेनं वागणारे आहेत, अल्लाहचं आज्ञापालन करणारे, (दानधर्म आणि इतर बाबींत) खर्च करणारे आणि रात्रीच्या शेवटच्या प्रहरी अल्लाहची क्षमायाचना करणारे आहेत.

१८) अल्लाहनं (च) साक्ष दिली, तसेच देवदूतांनी आणि ज्ञानी लोकांनीही. फक्त तोच आहे, त्याव्यतिरिक्त कोण ईश्वर (देव) नाही न्यायनीतीवर भक्कमपणे उभारलेला. त्या प्रभुत्वशाली, प्रतिभासंपन्न ईश्वराव्यतिरिक्त इतर कोण नाही.

१९) अल्लाहजवळ धर्म इस्लाम आहे. ज्यांना आम्ही ग्रंथ दिला आणि त्याच्याकडं ज्ञान पोचल्यावर त्यांनी आपल्या उद्धट कृतीमुळं मतभेद केला. तेव्हा जे अल्लाहच्या वचनांना नाकारतात त्यांचा सोक्ष-मोक्ष लावण्यास अल्लाह तत्पर आहे.

२०) नंतर मग जे वाद घालतात त्यांना सांगा, मी आणि माझे अनुयायी तर अल्लाहसमोर समर्पित झालेलो आहोत. तसेच ज्यांना ग्रंथ दिला आणि जे निरक्षर आहेत (असे लोक ज्यांना ग्रंथाचं ज्ञान नाही) त्यांना विचारा, तुम्हीसुद्धा शरण जाता? त्यांनी समर्पण केलं तर त्यांना रास्त मार्ग मिळाला आणि जर त्यांनी पाठ फिरवली तर त्यांना पोचता करणंच तुमचं काम आहे. अल्लाह आपल्या भक्तांना पाहतोय.

२१) अल्लाहच्या वचनांना नाकारणारे तसेच हकनाक प्रेषितांचा, आणि जे लोक मानवांना न्याय (वागणूक) करण्यास सांगतात त्यांचा वध करतात, त्यांना अल्लाहच्या कठोर शिक्षेची शुभवार्ता द्या.

२२) हीच ती माणसं आहेत ज्यांची सर्व कर्मे या जगातदेखील फोल ठरली आणि परलोकातदेखील. त्यांच्यासाठी कुणाची मदतही नाही.

२३) तुम्ही त्या लोकांना पाहिलंय ज्यांना ग्रंथाचा काही भाग दिला गेला? त्यांच्या (तंट्यां)मध्ये अल्लाहच्या ग्रंथानुसार निवाडा करण्यासाठी, पण

त्यांच्यातील एका गटानं पाठ फिरवली. (खरं तर) ते मागे फिरणारे आहेत.

२४) याचं कारण, नरकाग्नी त्यांना काही अवधीसाठीच स्पर्श करणार असं त्यांचं म्हणणं होय. त्यांनी घडवलेल्या गोष्टींनी धर्माच्या बाबतीत त्यांना फसवलंय.

२५) मग ज्या दिवशी त्यांना एकवटलं जाईल, ज्यात मुळीच शंका नाही, त्यांचे काय हाल होतील. ज्यांनी जे कमवलंय ते त्यांना पुरेपूर दिलं जाईल. त्यांच्यावर अन्याय होणार नाही.

२६) (प्रेषित) त्यांना सांगा, सर्व मालकी त्याचीच, ज्याला इच्छितो मर्जीनुसार सत्ता देतो आणि आपल्या मर्जीनंच ती हिरावून घेतो. आपल्या मर्जीत येईल त्याला सन्मानित करतो, मर्जीस येईल त्यास अपमानित करतो. सर्वकाही भल्या गोष्टी तुझ्याच हाती. निश्चितच तू सर्वसामर्थ्यवान आहेस.

२७) तूच (तर) दिवसावर रात्रीचं सावट टाकतो आणि रात्रीतून दिवस उजाडतो. निर्जीवातून सजीवास उभं करतो आणि सजीवातून निर्जीव काढतो. आणि तू इच्छितो त्याला सर्वकाही उदंड प्रदान करतो.

२८) श्रद्धावंतांनी मित्र-सोबती म्हणून श्रद्धाळूंना सोडून अश्रद्धांना निवडू नये. कुणी असं केलं तर अल्लाहचं त्याच्याशी काही देणं-घेणं नाही. पण जर तुम्ही त्याच्या भीतीपासून बचाव करण्यासाठी असं केलं तर ती गोष्ट वेगळी. अल्लाह तुम्हाला त्याच्या स्वत:पासून सावध करतो. अल्लाहकडंच तुम्हाला परतावयाचं आहे.

२९) त्यांना सांगा, त्याच्या मनात जे काही आहे ते तुम्ही लपवून ठेवा अगर जाहीर करा. अल्लाहला त्यांच्या (विषयीची) माहिती आहे. अल्लाह तर आकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही जाणतोय, प्रत्येक बाबींवर अल्लाह समर्थ आहे.

३०) ज्या दिवशी प्रत्येक व्यक्तीनं काय जे काही पुण्य केलं असेल अथवा पाप केलं असेल त्याला ते आढळेल, मग त्याला असं वाटेल की

त्याच्यात आणि त्या (दुष्ट कर्मात) अधिक अंतर असतं (तर किती बरं झालं असतं). अल्लाह सावध करतो तुम्हाला त्याच्या (स्वत:) पासून. अल्लाह तर आपल्या भक्तांवर प्रेम करणारा आहे.

३१) (हे प्रेषित!) त्यांना सांगा, जर तुम्ही अल्लाहशी प्रेम बाळगत असाल तर माझं अनुसरण करा. अल्लाहदेखील तुमच्यावर प्रेम करील. तुमच्या अपराधांना क्षमा करून टाकील, कारण अल्लाह तर कृपाशाली आणि क्षमा करणारा आहे.

३२) त्यांना सांगा, अल्लाह आणि प्रेषिताचं आज्ञापालन करण्यास तुम्ही जर पाठ फिरवली तर मग अशा नाकारणाऱ्यांना अल्लाह पसंत करीत नाही.

३३) अल्लाहने आदम आणि नूह आणि इब्राहीम व इम्रान यांच्या घराण्यांची सर्व विश्वावर सन्मानासाठी निवड केली.

३४) त्यांच्यातील काही एकमेकांशी संतती आहेत. अल्लाह सर्वकाही ऐकून आणि जाणून आहे.

३५) जेव्हा इम्रानच्या पत्नीनं म्हटलं, माझ्या विधात्या, माझ्या उदरात आहे ते तुला अर्पण करते, खास तुझ्या सेवेसाठी वाहून देते, तेव्हा माझं ते स्वीकार कर, कारण निश्चितच तू सर्वकाही ऐकतो आणि जाणतो.

३६) जेव्हा तिनं तिला जन्म दिला, ती म्हणाली, माझ्या विधात्या! मी तर एका मुलीला जन्म दिला, ती कोणास जन्मास घालणार याची अल्लाहला माहिती होती. मुलगा मुलीसारखा नसतो. मी तिचे नाव मरयम असं ठेवले आणि तिला व तिच्या (भावी) संततीला धिक्कारलेल्या सैतानापासून सुरक्षित ठेवण्यासाठी तुझ्या पदरी टाकते.

३७) तिच्या विधात्यानं औदार्यानं तिचा स्वीकार केला. चांगल्या रीतीनं तिचं संगोपन केलं. तिला जकरियाच्या पालकत्वात दिलं. जेव्हा केव्हा जकरिया तिच्या खोलीत जात असेल त्यांना तिच्याकडं खाद्यवस्तू आढळत. ते (जकरिया) त्यांना (मरयम यांना) विचारत, हे तुमच्याकडं कुठून आलं? त्या उत्तर देत, माझ्या अल्लाहकडून. निश्चितच अल्लाह

इच्छितो त्यांना अमाप उपजीविका देतो.

३८) तोच जकरियानी आपल्या विधात्याचा धावा केला नि म्हणाले, माझ्या विधात्या, तू मला तुझ्याकडून सद्‌गुणी अशी संतती दे. तूच तर प्रार्थना स्वीकारणारा आहेस.

३९) तेव्हा ते प्रार्थने (नमाज) साठी खोलीत उभे असताना देवदूतानं त्यांना हाक दिली, अल्लाह तुम्हाला यहयाची शुभवार्ता देतो. अल्लाहच्या आज्ञांची पुष्टी करणारा तो सरदार, स्वत:वर नियंत्रण ठेवणारा आणि सदाचारींमधील प्रेषित.

४०) त्यांनी विचारलं, मी तर वृद्धापकाळ गाठलाय. माझी पत्नी वांझ आहे. मला मूल कसं होणार? अल्लाह म्हणाला, अल्लाह जे इच्छितो ते अशाच रीतीनं घडवून आणतो.

४१) ते उत्तरात म्हणाले, माझ्यासाठी एखादा संकेत दे. अल्लाह म्हणाला, तुझा संकेत असा की तीन दिवस तू कुणाशीही सांकेतिक (चिन्हां) पलीकडं काही बोलणार नाही. तुझ्या विधात्याचं सातत्यानं स्मरण कर. सकाळ-संध्याकाळ त्याच्या महानतेचं गुणगाण कर.

४२) आणि मग मरयम यांना देवदूतांनी सांगितलं, अल्लाहनं निश्चितच तुमची निवड केली, पावन केलं आणि विश्वातील सर्व महिलांवर तुम्हाला सन्मानित केलं.

४३) हे मरयम, आपल्या विधात्याच्या आज्ञा पाळ. झुकणाऱ्यांसमवेत झुक आणि नतमस्तक हो.

४४) हा परोक्षातील वृत्तान्त आहे, आम्ही तुमच्याकडं पाठवतो ते, मरयमची देखभाल कोण करतील, यासाठी जेव्हा ते फासं टाकत होते त्या वेळी तुम्ही तिथं नव्हता. तसेच जेव्हा ते वाद घालीत होते त्या वेळीदेखील तुम्ही नव्हतेच.

४५) त्या वेळी देवदूत मरयमला म्हणाले, अल्लाह आपल्या वतीनं तुला सुवार्ता देतो. त्याचे नाव मरयमपुत्र ईसा असेल. जगात आणि परलोकात

सन्मानित आणि (अल्लाहच्या) निकटवर्तीयांपैकी असेल.

४६) तो लोकांशी पाळण्यात असताना तसेच प्रौढ वयात संभाषण करेल. तो सदाचारींपैकी असणार.

४७) त्या (मरयम) म्हणाल्या, मला तर कुणा पुरुषानं स्पर्शदेखील केला नसता मला मूल कसं होईल? अल्लाहनं सांगितलं, अल्लाह इच्छितो त्यास अशाच रीतीनं जन्म देतो. जेव्हा तो एखादा निर्णय घेतो तेव्हा तो म्हणतो 'हो' आणि ती (गोष्ट) घडून जाते.

४८) तो त्याला ग्रंथाचं ज्ञान देईल. प्रतिभासंपन्न करेल. तोराह आणि इंजील प्रदान करील.

४९) आणि इस्राईलच्या संततीकडं प्रेषित (म्हणून पाठवेल.) (ते त्यांना सांगतील) मी तुमच्या विधात्याकडून एका संकेतासहित आलोय. (ते असं) मी तुमच्यासमोर चिखलमातीपासून पक्षीसदृश काही साकारतो आणि त्यात फुंकतो, मग अल्लाहच्या आज्ञेनं तो पक्षी बनून जातो. आणि अल्लाहच्याच आज्ञेनं मी जन्मजात आंधळ्यांवर उपचार करतो, तसेच कुष्ठरोग्यांवरही आणि मृतास जीवित करतो. तुम्ही घरात जे काही खाता आणि साठा करून ठेवता ते तुम्हाला सांगतो. निश्चितच या सर्व बाबी तुमच्यासाठी संकेत आहेत. तुम्ही श्रद्धा ठेवावी यासाठी.

५०) तसेच मी माझ्या पूर्वीचा ग्रंथ तौराहची पुष्टी करतो आणि अशा वस्तूंना वैध ठरवण्यासाठी ज्या तुमच्यावर वर्ज्य केल्या गेल्या होत्या. मी तुमच्याकडं अल्लाहचं संकेत घेऊन आलो तेव्हा तुम्ही अल्लाहची भीती बाळगून माझं पालन करा.

५१) तोच माझा विधाता आणि तुमचादेखील. त्याचीच भक्ती करा, हाच रास्त मार्ग होय.

५२) मग जेव्हा ईसा यांना त्यांच्या द्रोहाचं भान झालं, त्यांनी विचारलं, अल्लाहप्रती मला मदत करणारे कोण? (त्यांचे) शिष्य म्हणाले, आम्ही आहोत अल्लाहचे मदतनीस. आम्ही अल्लाहवर श्रद्धा ठेवली आणि (तुम्ही) साक्ष द्या, आम्ही आज्ञाधारक आहोत म्हणून.

५३) आमच्या विधात्या, तू जे काही अवतरलंय ते आम्ही मान्य करतो. आम्ही प्रेषिताच्या आज्ञा पाळतो. तेव्हा तू साक्ष देणाऱ्यांसमवेत आमचा निर्णय लाव.

५४) (पण) त्यांनी कट रचला. अल्लाहनंही कट केला. अल्लाह तर कट रचणाऱ्यांमध्ये सर्वोत्तम आहे.

५५) जेव्हा अल्लाहनं ईसाला सांगितलं, मी तुझी सुटका करून माझ्याकडं उचलून घेईन. ज्या लोकांनी बंड पुकारलं त्यांच्यापासून तुला शुद्ध करीन आणि ज्या लोकांनी तुझं अनुसरण केलं त्यांना मी निर्णयाच्या (कयामतच्या) दिवशी बंडखोरांवर प्रभुत्व बहाल करीन. नंतर जेव्हा तुम्ही माझ्याकडं एकत्रित व्हाल, तुम्ही ज्या बाबींत एकमेकांशी मतभेद करीत असत त्यांचा निर्णय देईन.

५६) मग ज्या लोकांनी द्रोह केला, मी कठोर यातनांद्वारे त्यांना शिक्षा देईन, या जगात आणि परलोकातदेखील. त्यांना कुणाचीसुद्धा मदत लाभणार नाही.

५७) आणि ज्या लोकांनी श्रद्धा बाळगून सत्कर्मं केलीत, मी त्यांना त्यांची कमाई पुरेपूर देऊन टाकीन. अल्लाह अत्याचारींना पसंत करत नाही.

५८) बुद्धिमत्तेच्या उपदेशपर आणि या आयती आम्ही तुम्हाला वाचून दाखवतो.

५९) अल्लाहजवळ तर ईसा, आदम (अ.) सारखेच आहेत. त्यांना चिखलमातीतून साकारलं आणि म्हणालो 'घडो' तोच ते घडून गेलं.

६०) आता तुमच्या विधात्याकडचं हे सत्य आहे. तेव्हा तुम्ही शंका घेणारे नका बनवू.

६१) तुम्हाला ही सर्व माहिती मिळाल्यानंतरदेखील जे लोक या बाबतीत व तुमच्याबरोबर वाद उभे करतात त्यांना सांगा, बोलावून घेऊ आमची मुलं आणि तुमची मुलं, आमच्या स्त्रिया आणि तुमच्या स्त्रिया. आपण स्वत: आणि तुम्ही स्वत:. मग (आम्हांपैकी) खोटे असतील त्यांचा

अल्लाहनं धिक्कार करावा अशी विनंती करा.

६२) हा अगदी खरा वृत्तान्त आहे. अल्लाहव्यतिरिक्त कोणीही ईश्वर (देव) नाही. तोच सर्वोच्च आणि सर्वस्वी आहे.

६३) आणि जर तुम्ही मागे वळलात तर, (लक्षात असू द्या) अल्लाह उपद्रवींना (चांगलं) ओळखतो.

६४) सांगा ग्रंथधारकांना आमच्या आणि तुमच्यामधील ज्या समान गोष्टी आहेत त्याकडं (जवळ) येऊ. म्हणजे, अल्लाहव्यतिरिक्त कुणाची भक्ती करू नये, कशातही कुणाला त्याचा भागीदार बनवू नये आणि आपण एकमेकांना आपला विधाता बनवू नये. पण जर मागं फिरले तर त्यांना सांगा, आम्ही आज्ञाधारक (मुस्लिम) आहोत याची साक्ष राहू द्या.

६५) ग्रंथधारक लोकहो, तुम्ही इब्राहीमविषयी का वाद घालता, तोराह आणि इंजील तर त्यांच्यानंतर पाठवलेत (हे) तुम्हास समजत नाही?

६६) होय, तुम्हीच ती मंडळी, ज्ञान असताना वाद घालत होता, आता ज्याची तुम्हाला माहिती होती. ज्याविषयी तुम्हास माहिती नव्हती त्याबाबत आता का बरे वाद घालता? अल्लाहला माहीत आहे तुम्ही नाही जाणत.

६७) इब्राहीम ज्यू नव्हते की ख्रिस्तीही नव्हते, ते तर एकाग्र मुस्लिम (वाहून घेतलेले आज्ञाधारक) होते. अनेकेश्वरींपैकी नव्हते ते.

६८) निश्चितच ज्या लोकांनी इब्राहीम यांचे अनुसरण केले, आणि हे प्रेषित (मुहम्मद स.) आणि जे श्रद्धावंत आहेत ते इब्राहीम यांच्या अत्यंत जवळचे लोक आहेत. अल्लाह तर श्रद्धावंतांचं आश्रयस्थान आहे.

६९) ग्रंथधारकांपैकी काही लोकांनी तुम्हाला मार्गभ्रष्ट करण्याचा चंग बांधलाय, पण त्यांना हे कळत नाही की ते स्वत:लाच मार्गभ्रष्ट करताहेत.

७०) ग्रंथधारक लोकहो, तुम्ही साक्षी असतानादेखील अल्लाहची वचनं का

नाकारता?

७१) ग्रंथधारक लोकांनो, तुम्ही सत्यावर असत्याचं आवरण का बरं घालता आणि जाणूनबुजून सत्य लपवता?

७२) ग्रंथधारकांपैकी एका गटानं (एकमेकांना) असं सांगितलं, श्रद्ध लोकांवर जे काही अवतरलंय तुम्ही सकाळी ते मान्य करा आणि काही वेळानंतर (म्हणजे दुपारनंतर) ते नाकारीत जा, म्हणजे (अशा प्रकारे तेच) माघारी फिरतील.

७३) ''आणि जे तुमच्या धर्माचं आचरण करतात त्यांना सोडून इतर कोणाला मानू नका.'' त्यांना सांगा, रास्त मार्ग तर अल्लाहचाच होय, जसं ते तुम्हाला लाभलंय तसं कुणाला दिलं गेलं तर त्यांनी तुमच्या विधात्याकडं त्याबद्दलचा वाद मांडावा. तसेच त्यांना सांगा, विपुलता देणं तर अल्लाहच्याच हाती. आवडेल त्याला तो देत असतो. तो सर्वस्वी जाणकार आहे.

७४) जे आवडतील त्यांना तो आपली खास कृपा देतो. औदार्यात महानतम आहे.

७५) ग्रंथधारकांपैकी असेही आहेत ज्यांच्याकडं तुम्ही जर अमाप संपत्ती अमानत म्हणून ठेवले तर ते तुम्हाला परत करतील आणि असेही काही आहेत ज्यांच्याकडं तुम्ही एखादं नाणंदेखील सोपवलं तर तुम्ही त्यांच्या डोक्यावर जरी उभे राहिलात तरीदेखील ते परत करणार नाहीत. याचं कारण असं की त्यांच्या म्हणण्यानुसार धर्मग्रंथरहित लोकांशी आमचे काही देणं-घेणं नाही. ते जाणूबुजून अल्लाहच्या बाबतीत खोटं सांगत असतात.

७६) ऐकून घ्या जे लोक केलेल्या कराराशी ठाम राहतात आणि सदाचार अवलंबतात अशाच सदाचारींना अल्लाह पसंत करतो.

७७) अल्लाहला दिलेल्या शब्दाचा आणि वाहिलेल्या शपथांचा क्षुल्लक किंमतीत सौदा करता, त्याच्यासाठी परलोकात निश्चितच काही वाटा नाही, कयामतच्या (पुनरुत्थानाच्या) दिवशी अल्लाह त्यांच्याशी काही

बोलणार नाही की त्यांच्यावर नजरही टाकणार नाही. त्यांना (त्यांच्या अपराधांपासून) मुक्त करणार नाही. त्यांच्यासाठी कठोर शिक्षा आहे.

७८) त्यांच्यात असे काही लोक आहेत जे ग्रंथातील शब्दांचा विकृत उच्चार करून तो ग्रंथामधीलच मजकुर असल्याचे तुमची समजूत करण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक तो ग्रंथातील मजकुर नसतो. ते म्हणतात, आम्ही वाचतो तो अल्लाहकडचा आहे. पण तो अल्लाहकडचा नसतो. जाणूनबुजून ते अल्लाहविषयी खोटं बोलतात.

७९) कोणा व्यक्तीला, अल्लाहनं ग्रंथ, बुद्धिमत्ता आणि प्रेषितत्व बहाल केलं असल्यास त्यानं लोकांना अल्लाहला सोडून स्वत:ची भक्ती करावयास भाग पाडणं उचित नाही. त्यानं तर त्यांना धर्मोपदेशक होण्यास सांगायला हवं जसे तुम्ही ग्रंथाची शिकवण देतात आणि (स्वत:) त्याचं अध्ययन करतात.

८०) तसेच तो तुम्हाला देवदूत आणि प्रेषितांना विधाता म्हणून धरण्याचा आदेश देणार नाही. तो तुम्हाला तुम्ही आज्ञाधारक असताना, अवज्ञा करण्याचा आदेश देईल?

८१) अल्लाहनं जेव्हा प्रेषितांकडून वचन घेतलं, मी तुम्हास ग्रंथ आणि प्रतिभेनं संपन्न केलं आणि मग जे तुमच्याकडं आहे त्याची पुष्टी करत तुमच्याकडं दुसरा प्रेषित आल्यास तुम्ही त्याला मान्य करून त्याला अवश्य मदत कराल. त्यानं विचारलं, तुम्ही कबूल केलं? आणि माझ्याशी वचनबद्ध आहात? त्यांनी उत्तर दिलं, (होय) आम्ही कबूल केलं. तो म्हणाला, मग तुम्ही साक्षी राहा आणि मीदेखील तुमच्या बरोबरीनं साक्षी आहे.

८२) त्यानंतर जर कुणी मागं फिरला तर हेच लोक उल्लंघन करणारे आहेत.

८३) आकाश आणि पृथ्वीतील सारेकाही स्वेच्छेनं अथवा अनिच्छेनं त्याची आज्ञा पाळत असताना ते लोक अल्लाहचा धर्म सोडून इतर धर्माच्या मागं लागतील? त्याच्याकडंच तर ते परतणार आहेत.

८४) सांगा, आम्ही अल्लाहवर श्रद्धा बाळगली, तसेच जे काही आम्हावर

आणि इब्राहीम व इस्माईल, इस्हाक व याकूब आणि त्यांच्या घराण्यावर प्रकट झालं (त्यावर) तसंच त्यांच्या विधात्याकडून जे मूसा आणि ईसा आणि इतर प्रेषितांना दिलं गेलं (त्यावर). आम्ही त्यांच्यामध्ये भेदाभेद करत नाही. आम्ही तर त्याचे आज्ञाधारक (मुस्लिम) आहोत.

८५) आणि जर कुणी इस्लामशिवाय इतर धर्माची ओढ ठेवली तर त्याच्याकडून काहीच स्वीकारलं जाणार नाही. परलोकात तर तो कुचकामी ठरेल.

८६) श्रद्धा धारण करून प्रेषितांच्या सत्यतेची आणि त्यांच्याकडं आलेल्या स्पष्ट संकेतांची साक्ष दिल्यानंतरही जे लोक बंड करतील, अल्लाह त्यांना कसं मार्गदर्शन काय करील? अल्लाह तर अत्याचारींना कधीच मार्ग दाखवत नसतो.

८७) अशा लोकांचा मोबदला तर अल्लाह, देवदूत आणि सर्व मानवजातीकडून त्यांचा धिक्कारच असेल.

८८) अशाच (अवस्थेत) ते सदासर्वदा राहतील, त्यांच्या शिक्षेत कमी होणार नाही की त्यांना (अधिक) सवड दिली जाणार नाही.

८९) पण नंतर ज्या लोकांनी पश्चात्ताप व्यक्त केला आणि (स्वत:ला) सुधारलं, मग अल्लाह तर क्षमा करणारा आणि पराकोटीचा दयाशील आहे.

९०) ज्या लोकांनी श्रद्धा धारण केल्यानंतर द्रोह केला आणि मग (त्यांच्या) द्रोहात भरच पडत गेली. त्यांच्याकडून पश्चात्ताप स्वीकारला जाणार नाही, हे तर भरकटलेले लोक आहेत.

९१) निश्चितच ज्यांनी धर्माला नाकारलं आणि विद्रोही असतानाच ते मरण पावले तर (अशातल्या) कोणाकडूनही धरतीवरील सोन्याचा ढीगही (त्यांच्या सुटकेसाठी) स्वीकारला जाणार नाही, हे असे लोक आहेत ज्यांना कठोर शिक्षा असेल आणि कोणी त्यांना मदत करण्यास सरसावणार नाही.

**पारा - ४**

९२) तुम्हाला जे काही आवडते ते खर्च करत नाही तोवर तुम्ही पुण्य मिळवू शकणार नाही. आणि तुम्ही जे काही खर्च कराल ते अल्लाहच्या माहितीत आहेच.

९३) इस्राईलच्या संततीसाठी तोराहच्या अवतरणापूर्वी जे काही याकुब यांनी स्वत:साठी वर्ज्य केलं होतं ते सोडून सर्व खाद्यवस्तू त्यांच्यासाठी विधिवत होत्या. त्यांना सांगा, जर तुम्ही खरे असाल तर तोराह आणून ते वाचून घ्या.

९४) यानंतर ज्या लोकांनी खोट्या गोष्टींचा संबंध अल्लाहशी जोडला ते अत्याचारी आहेत.

९५) त्यांना सांगा, अल्लाह म्हणतो ते खरंय. तुम्ही एकाग्र इब्राहीम यांच्या धर्माचं आचरण करा. ते अनेकेश्वरवादींपैकी नव्हते.

९६) जगातलं पहिलंवहिलं हे श्रद्धागृह अनुगृहानं भरलेल्या मक्का शहरात विश्वांच्या मार्गदर्शनासाठी उभारलं गेलं.

९७) यामधील इब्राहीमचं स्थान स्पष्ट संकेत आहेत ज्यानं यात प्रवेश केला त्याला शांतता लाभते. ज्या लोकांना तसं सामर्थ्य असेल त्यांनी काबागृहाला हजसाठी जाणं हे अल्लाहसाठीचं कर्तव्य आहे. पण ज्यांनी ते नाकारलं, अल्लाहला तर या जगवासियांशी गरजमुक्त आहे.

९८) ग्रंथधारकांना विचारा, तुम्ही का बरं अल्लाहच्या वचनांना नाकारता? तुम्ही जे काही करताहात त्या तर अल्लाहच्या पाहणीत आहेत.

९९) आणि विचारा या ग्रंथधारकांना, ज्यांनी श्रद्धा धारण केली त्यांच्या मार्गात अडथळे का टाकता, तुम्ही त्याच्यामध्ये उणिवा शोधता? तुम्ही साक्षी आहात, जे काही तुम्ही करता त्याकडं अल्लाहचं लक्ष नाही असं नव्हे.

१००) श्रद्धावंत लोकहो, ज्यांना ग्रंथ दिला गेलाय त्यातील एका गटाच्या लोकांनी सांगितल्याप्रमाणं जर तुम्ही वागलात तर ते तुम्ही श्रद्धा धारण

केल्यानंतर तुम्हाला परत द्रोहाकडं वळवतील.

१०१) तुम्हाला अल्लाहची वचनं वाचून दाखवली जातात आणि तुमच्यामध्ये प्रेषित हजर असतानादेखील तुम्ही कसं बरं (त्यांना) नाकारता? आणि जो अल्लाहला घट्ट धरून ठेवेल त्याला नक्कीच रास्त मार्गाचं दर्शन घडल.

१०२) श्रद्ध लोकहो, अल्लाहचं भय बाळगा जसे त्याचे भय राखायला हवं आणि मुस्लिम नसताना तुम्हाला मरण येता कामा नये.

१०३) तुम्ही सर्वांनी एकत्रितपणे अल्लाहच्या दोरीस (आधारास) भक्कमपणे धरून ठेवा, आपसात विभक्त होऊ नका, तुमच्यावरील अल्लाहच्या अनुगृहांना आठवा, तुम्ही एकमेकांचे शत्रू असता त्यानं तुमच्या मनात प्रेम रोवलं आणि त्याच्या कृपेनं तुम्ही एकमेकांचे भाऊबंध झालात. तुम्ही नरकाग्नीच्या कडेला उभे असता त्यानं तुम्हाला वाचवलं. अशा रीतीनं अल्लाह आपली वचनं स्पष्ट करतो ज्यामुळे तुम्हाला मार्गदर्शन घडावं म्हणून.

१०४) तुमच्यापैकी असा एक गट असायला हवा लोकांना भल्या गोष्टींकडं आमंत्रित करणारा, सद्वर्तन करण्यास प्रवृत्त करणारा आणि दुष्कृत्यास आळा घालण्यासाठी. हेच लोक तर उत्कर्ष पावणारे आहेत.

१०५) अशा लोकांप्रमाणं होऊ नका जे आपसात विभक्त झालेत. (सर्वकाही) स्पष्ट झाल्यावरदेखील त्यांनी वादविवाद माजविला, अशा लोकांसाठी तर फार मोठी शिक्षा आहे.

१०६) ज्या दिवशी काही लोकांचे चेहरे तेजस्वी तर काही चेहरे काळे (पडलेले) असतील. ज्यांनी श्रद्धा धारण केल्यावर ती नाकारली त्यांचे चेहरे काळे (पडलेले असतील), अशांना सांगितलं जाईल, तुम्ही जे नाकारलात त्यासाठी शिक्षेची चव घ्या.

१०७) आणि ज्यांचे चेहरे तेजस्वी असतील ते अल्लाहच्या कृपेच्या सान्निध्यात असतील सदासर्वदा.

१०८) ही अल्लाहची वचनं आहेत आम्ही ती तुम्हांस प्रामाणिकपणे वाचून दाखवतो. अल्लाह जगवासीयांवर अत्याचार करू इच्छित नाही.

१०९) पृथ्वी आणि आकाशांमधील सर्वकाही अल्लाहसाठीच आणि सर्व प्रकरणे त्याच्याकडंच परतली जाणार आहेत.

११०) लोकांसाठी उभारलेले तुम्ही उत्कृष्ट समूह आहात. त्यांना सदाचार अवलंबण्यास सांगता आणि दुराचारास मनाई करता आणि अल्लाहशी श्रद्धा बाळगता. ग्रंथधारकांनी जर श्रद्धा धारण केली असती तर ते त्यांच्या भल्याचं असते. त्यांच्यात श्रद्धावान आहेत पण बहुतेक अवज्ञाकारी आहेत.

१११) तुम्हाला इजा पोहोचविण्यापलीकडं ते तुमचं काहीएक करू शकत नाहीत. तुमच्याशी लढा दिल्यास ते पाठ फिरवून पळतील. मग त्यांची कसली मदत होणार नाही.

११२) जिथं कुठं आढळतील तिथं त्यांना कलंकित केलं गेलंय. पण ज्यांनी जे अल्लाहच्या आश्रयाला आले असतील किंवा, लोकांचा आश्रय घेतला असेल त्यांना सोडून त्यांनी अल्लाहचा कोप ओढवुन घेतलाय. त्यांच्यावर भटकंती लादली गेलीय. त्यांच्याविषयी असं घडण्याचं कारण म्हणजे त्यांनी अल्लाहच्या वचनांना मान्य करण्यास नाकारलं. प्रेषितांना नाहक ठार केलं, त्यांनी अतिरेक केला आणि मर्यादांचं उल्लंघन केलं.

११३) पण सगळेच सारखे नाहीत. ग्रंथधारकांमधील एक गट (रास्त मार्ग) धरून आहे. रात्रीच्या प्रहरी ते अल्लाहच्या वचनांचं पठण करतात आणि नतमस्तक होतात.

११४) अल्लाहची श्रद्धा धारण करणारे आणि शेवटच्या दिनावर. आणि लोकांना सदाचार अवलंबण्यास प्रवृत्त करतात, दुराचारास आळा घालतात. भल्या कार्यात तत्परता दाखवणारे, हेच लोक तर सदाचारी असतात.

११५) कुणी काही भलं केलं असेल तर ते नाकारलं जाणार नाही, कारण

अल्लाहला सदाचारी कोण ते ठाऊक असते.

११६) ज्या लोकांनी बंड केलं, त्यांची धनसंपत्ती आणि त्यांची संतती अल्लाहविरूद्ध काहीएक उपयोगी पडणार नाही. अशी माणसं नरकाचे धनी होतील. ते सर्वकाळ तिथंच राहतील.

११७) उदाहरणादाखल सांगायचं तर ते जे काही या जगातल्या जीवनात खर्च करतात ते गारठलेल्या वाऱ्यासारखं आहे. ज्यांनी स्वत:वरच अत्याचार ओढवून घेतला त्यांच्या पिकांना आदळून त्या त्यांचा नाश करतात. अल्लाहनं नव्हता त्यांच्याशी अन्याय केला, त्यांनीच स्वत:वर अत्याचार केलेला आहे.

११८) श्रद्धावंत लोकांनो, तुम्ही आपल्या लोकांशिवाय कोणाशी जवळीक साधू नका. तुमच्या दैन्यावस्थांचं निवारण करण्यात त्यांना रस नाही. तुम्हाला ज्या गोष्टींचा त्रास होतो त्याच तर त्यांना हव्यात. त्यांचा द्वेष त्यांच्या तोंडून आधीच बाहेर पडलाय आणि त्यांच्या मनात जे दडलंय ते त्याहूनही भयंकर आहे. आम्ही तुम्हाला समज घडावी म्हणून आमची वचनं स्पष्ट करून दिली.

११९) तुम्ही त्यांचे स्नेही लोक आहात, पण त्यांना तुम्ही आवडत नाही. तुम्ही सर्व ग्रंथांना मान्य करता, ते तुम्हाला भेटल्यास म्हणता, आम्ही (सुद्धा) मान्य करतो आणि ते एकटे असताना तुमच्यावरील रागानं आपली बोटं चावता. त्यांना सांगा, आपल्या रागात भस्म व्हा. निश्चितच अल्लाहला मनातल्या सर्व गोष्टी अवगत असतात.

१२०) तुमचं काही भलं झालं तर त्यांना वाईट वाटते, तुमचं काही वाईट झालं तर त्यांना आनंद होतो. पण जर तुम्ही धैर्य राखलं आणि सदाचार अवलंबला तर त्यांच्या कुटील कारस्थानांचा तुम्हाला काहीएक त्रास होणार नाही. कारण ते जे काही करताहेत त्यांना अल्लाहनं वेढलेलं आहे.

१२१) आठवा ती सकाळ तुम्ही घराबाहेर पडून युद्धासाठी (उहूदच्या मैदानात) श्रद्धावंतांना ठिकठिकाणी नेमत होता. अल्लाह सर्वकाही ऐकून आणि

जाणून आहे.

१२२) आणि जेव्हा तुमच्यातील दोन गटांनी आपलं अवसान गमावलं होता, अल्लाह त्यांच्या मदतीस असतानादेखील, श्रद्धावंतांनी तर अल्लाहवरच भिस्त ठेवली पाहिजे.

१२३) खरं पाहता तुम्ही दुबळे असताना, बद्रच्या (युद्धाच्या) वेळी अल्लाहनं तुम्हांस मदत केलीय. (म्हणून) अल्लाहचं आभार मानण्यासाठी त्याची भीती बाळगा.

१२४) तुम्ही श्रद्धावंतांना म्हणत होता, तुमच्या विधात्यानं पाठवलेल्या तीन हजार देवदूतांद्वारे तुमची मदत करावी हे तुमच्यासाठी पुरेसं नाही?

१२५) होय, जर तुम्ही ठाम राहिला आणि रास्त वागलात आणि ते तुमच्यावर लगेच चाल करून आले तर तुमचा विधाता पाच हजार सुसज्ज देवदूतांकरवी तुम्हांस मदत करेल.

१२६) तुमच्या मनाचं समाधान व्हावं म्हणून अल्लाहनं या शुभ गोष्टी सांगितल्यात. वैभवशाली आणि प्रभुत्वसंपन्न अल्लाहच्या मदतीव्यतिरिक्त इतर कुणाची मदत (होत) नसते.

१२७) नाकारणाऱ्यांपैकी एका गटाला त्यांच्यातून तोडून टाकून त्यांना अपमानित केल्यावर त्यांनी परास्त होऊन निघून जाण्याकरिता.

१२८) या प्रकरणाशी तुमचं (प्रेषितांचं) काही देणंघेणं नाही. (अल्लाहनं) त्यांना क्षमा करून टाकावं अथवा त्यांना शिक्षा करावी. ते अत्याचारी आहेत.

१२९) (कारण) आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहच्याच (मालकीचं) आहे. हवं त्यांना क्षमा करतो, हवं त्यांना शिक्षा करतो. अल्लाह तर क्षमाशील आणि कृपावंत आहे.

१३०) श्रद्धावंत लोकहो, दुप्पट-चौपट (दरानं) चक्रवाढीनं व्याज खाऊ नका. अल्लाहचं भय बाळगा, मगच तुमचा उत्कर्ष घडंल.

१३१) तसेच नाकारणाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या नरकाग्नीची भीती

असू द्या.

१३२) अल्लाह आणि प्रेषितांच्या आज्ञा पाळा म्हणजे तुम्हाला दया लाभेल.

१३३) आणि धावत जा आपल्या विधात्याकडून क्षमा मिळवण्यासाठी, तसेच सद्‌वर्तनी लोकांसाठी तयार केलेल्या आकाश आणि पृथ्वीपर्यंत विस्तारलेल्या स्वर्गाकडं.

१३४) जे लोक भरभराटीत असोत की टंचाईत आपली संपत्ती (दानधर्मात) खर्च करतात आणि रागास आवरून घेतात, लोकांना माफ करून टाकतात, (असे) परोपकारी (लोक) अल्लाहला आवडतात.

१३५) ज्या लोकांनी अश्लील काही करून स्वत:वर अत्याचार करून घेतला, त्यांनी अल्लाहची आठवण करावी, केलेल्या पापाची क्षमा मागावी. अल्लाहव्यतिरिक्त कोण पापांना क्षमा करतो? जाणूनबुजून त्यांनी जे केलंय त्यावर अडून राहून नये.

१३६) अशा लोकांना त्यांच्या विधात्याकडून क्षमेचं बक्षीस आहे, तसेच स्वर्ग- ज्याच्याखालून नद्या वाहतात, तिथं ते सदैव राहतील. किती छान मोबदला प्रयत्नशील असणाऱ्यांसाठी हा?

१३७) तुमच्या आधी (कितीतरी) घटना घडून गेल्या तेव्हा पृथ्वीवर प्रवास करा आणि पाहा खोटं ठरवणाऱ्यांची कशी गत झाली.

१३८) हे लोकांसाठी विधान आहे. मार्गदर्शनार्थ, तसेच सद्‌वर्तनी लोकांसाठी शिकवण.

१३९) अवसान गमावू नका आणि दु:खीही होऊ नका. तुम्ही निष्ठावंत असलात तर तुम्हांसच वर्चस्व लाभेल.

१४०) सध्या तुम्हाला दुखापत झाली असेल. पण अशीच दुखापत त्या लोकांनादेखील पोचली (होती). काळाचं हे चक्र आम्ही लोकांमध्ये आळीपाळीनं फिरवतो. (अल्लाहशी) कोण एकनिष्ठ आहेत याची अल्लाहला माहिती मिळावी आणि तुमच्यातील काहींना साक्षीदार म्हणून धरण्यासाठी. अल्लाहला अत्याचारी आवडत नसतात.

१४१) तसेच श्रद्धावंत असतील त्यांना वेगळं करून जे नाकारणारे आहेत त्यांना नामशेष करण्यासाठी.

१४२) तुम्ही काय समजता, तुम्ही स्वर्गात जाणार? तुमच्यातील कोण संघर्षात धैर्य दाखवणार आहेत याची अल्लाहनं अजून परीक्षाही घेतली नसताना?

१४३) तिच्याशी तुमची गाठ पडण्याआधीच तुम्ही मरण येण्याची अभिलाषा बाळगली, आता खरोखर तुम्ही तिला पाहून घेतलं तुमच्या डोळ्यांदेखत.

१४४) मुहम्मद (स.) तर एक प्रेषित आहेत. त्यांच्यापूर्वीही प्रेषित होऊन गेलेत. तेव्हा जर त्यांना मरण आलं अथवा त्यांचा वध झाला तर तुम्ही आपल्या पाऊलवाटेवर मागं फिरणार? आणि जो कुणी आपल्या पाऊलवाटेवर मागं फिरंल अल्लाहचं काहीएक नुकसान करणार नाही. जे आभारी असतात त्यांना अल्लाह त्वरित प्रतिफळ देतो.

१४५) अल्लाहच्या आज्ञेशिवाय कुणाला मरण नाही. ठराविक वेळ नोंद करून ठेवलीय. कुणाला याच जगात (त्याचा) मोबदला हवा असंल तर आम्ही तो देऊन टाकू आणि ज्याला परलोकातील मोबदला हवा असेल तर आम्ही तो देऊ. जे कृतज्ञ असतात त्यांना आम्ही त्वरित मोबदला देतो.

१४६) कितीतरी प्रेषित बहुसंख्य निष्ठावान भक्तांसह लढले. अल्लाहच्या मार्गात त्यांच्यावर जी संकटं कोसळली त्यापासून ते निराश झाले नाहीत. दुबळे पडले नाहीत की खचले नाहीत. जे ठामपणे उभे राहतात अल्लाहला तेच लोक आवडतात.

१४७) त्यांचं काही म्हणणं नव्हतं या प्रार्थनेशिवाय, हे आमच्या विधात्या! आमच्या पापांना क्षमा कर, आणि आमच्याकडून काही आगळिक झाली असेल त्यास आमचे पाय भक्कम राहू देत आणि बंडखोरांविरूद्ध आम्हास मदत कर.

१४८) मग अल्लाहनं त्यांना इनाम बहाल केलं या जगातलं आणि परलोकात तर उत्कृष्ट इनाम. अल्लाह परोपकारींना पसंत करतो.

१४९) श्रद्धाळू लोकहो, तुम्ही जर द्रोह करणाऱ्या लोकांचं ऐकलं तर ते तुम्हाला तुमच्या पाऊलखुणांवर मागं वळवतील आणि तुम्ही जर माघार घेतली तर तुम्ही नुकसान करून घ्याल.

१५०) तुमचा संरक्षक तर अल्लाह आहे, उत्तमपैकी मदत करणारा.

१५१) आम्ही लवकरच नाकारणाऱ्यांच्या मनावर धाक बसवू त्यांनी अल्लाहचे भागीदार ठरविलं म्हणून, ज्यासाठी आम्ही कोणते अधिकार अवतरले नव्हते. नरकच त्यांचं ठिकाण आहे. किती वाईट ते अत्याचारींचं ठिकाण.

१५२) अल्लाहनं आपलं वचन राखलं, त्याच्या आज्ञेनंच तुम्ही त्यांना ठार करत होता, पण तुम्हाला जे हवं होतं ते तुम्हाला दाखवल्यानंतर मात्र तुम्ही कच खाल्ली आणि या कामी आपसात वाद घातला आणि त्याची अवज्ञा केली. तुमच्यामधील काहींना या जगाची (आवड) होती तर काहींना परलोकाची. तुमची परीक्षा घेण्यासाठी त्यानं तुम्हाला (शत्रूपासून) मागं वळवलं. (तरीदेखील) त्यानं तुम्हाला क्षमा केली. अल्लाह श्रद्धावंतांशी औदार्यानं वागतो.

१५३) तुम्ही कुणाकडंही न पाहता उंचीवर जात होता आणि प्रेषित तुम्हाला मागून हाक देत होते, तेव्हा अल्लाहनंदेखील तुम्हांस एकापाठोपाठ दुसऱ्या अरिष्टात टाकलं, म्हणजे तुमच्या हातून जे निसटून गेलं, आम्ही तुम्हावर जे काही ओढवलं त्यापासून तुम्ही दु:खी होऊ नयेत म्हणून. तुम्ही जे काही करत असता अल्लाहला त्याची खबर असते.

१५४) या दु:खद घटनेनंतर तुमच्यापैकी एका गटाला झोपेची गुंगी येऊन त्यांना शांतता लाभली, तर दुसऱ्या गटाला आपल्या जिवाची काळजी लागलेली होती. ते अज्ञानामुळं अल्लाहच्या बाबतीत चुकीची धारणा करत होते. त्यांचं म्हणणं होतं, यातील कोणती गोष्ट आपल्या हातात आहे. त्यांना सांगा, सर्वकाही अल्लाहच्याच अधिकारात आहे. ते आपल्या मनामध्ये जे दडवून बसले होते, ते तुम्हाला उघडपणे (बोलून) दाखवत नव्हते. ते म्हणत असत, आमच्या हातात काहीतरी असते तर आम्ही इथं मारले गेलो नसतो. त्यांना सांगा, तुम्ही तुमच्या

घरात जरी असता तरी ज्यांच्या मरणाची वेळ ठरलेली होती, ते त्यांच्या मृत्यूच्या स्थानाकडं निघणारच होते. हे सर्व तुमच्या मनामध्ये आहे त्याची परीक्षा घेऊन तुमची हृदये स्वच्छ करण्यासाठी. अल्लाह तर मनातल्या सर्व गोष्टींची माहिती ठेवतो.

१५५) ज्या दिवशी दोन गट एकमेकांशी भिडले तेव्हा तुमच्यामधील ज्या लोकांनी पाठ फिरवली, त्यांना खरं तर सैतानानं त्याच्या काही कृत्यांमुळं डळमळीत केलं होतं. तरीदेखील अल्लाहनं त्यांना क्षमा केली, खऱ्या अर्थानं तोच क्षमा करणारा आणि सहनशील आहे.

१५६) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अशा प्रकारच्या नाकारणाऱ्यासारखं बनू नका. जे आपल्या बांधवांना (उद्देशून) म्हणत असतात, जर तुम्ही प्रवासात अथवा लढाईत न गुंतता आमच्याबरोबर असता तर त्यांना मरणही आलं नसतं की ते मारलेही गेले नसते. त्यांच्या मनाला जडलेलं हे दुखणं अल्लाहकरवीच असतो. अल्लाहच जीवनही देतो आणि मृत्यूदेखील. जे काही तुम्ही करताहात अल्लाह ते पाहतोय.

१५७) अल्लाहच्या मार्गात जर तुमचा वध झाला अथवा तुम्ही मरण पावला तर नक्कीच अल्लाहकडून तुम्हाला क्षमा लाभेल आणि तुम्ही जे काही (धनसंपत्ती) साठवण करून ठेवता त्यापेक्षा हे उत्तम आहे.

१५८) तुम्ही मारले गेला अथवा तुम्हाला मरण आलं तर निश्चितच तुम्हाला अल्लाहकडं एकवटलं जाईल.

१५९) तुम्ही (प्रेषित) त्यांच्या बाबतीत मायाळू स्वभावाचे आहात हे अल्लाहच्या कृपेनंच. तुम्ही जर कडक आणि कठोर वृत्तीचे असता तर ते तुमच्याकडून पळून गेले असते. तेव्हा त्यांना माफ करा, त्यांच्यासाठी क्षमेची याचना करा. त्यांच्याशी सल्लामसलत करा आणि एकदा का ठरवल्यावर अल्लाहवर विश्वास टाका. निश्चितच अल्लाह विश्वास टाकणाऱ्यांना पसंत करतो.

१६०) अल्लाहनं तुम्हाला मदत केली तर कुणीही तुमच्यावर मात करू शकणार नाही आणि जर त्यानं तुम्हाला टाकून दिलं तर मग त्याच्यानंतर कोण

तुमच्या मदतीस येणार? श्रद्धावंतांनी अल्लाहवरच विश्वास टाकायला हवा.

१६१) (लोकांना) लपविणं हे कोणत्याही प्रेषिताचं काम असू शकत नाही. जर एखाद्यानं काही लपवल्यास निर्णयाच्या दिवशी तो लपवलेली गोष्ट सोबत घेऊन येईल. मग प्रत्येक व्यक्तीनं जे काही कमवलं असंल त्याला पुरेपूर दिलं जाईल. त्यांच्याशी अन्याय केला जाणार नाही.

१६२) अल्लाहस प्रसन्न करण्यासाठी ज्या व्यक्तीनं त्याचं आचरण केलं ती त्या व्यक्तीसारखी कशी होऊ शकते जिचा अल्लाहला संताप आहे आणि नरक ज्याचं ठिकाण आहे- अत्यंत वाईट ठिकाण.

१६३) अल्लाहपाशी ते विविध श्रेणीतले आहेत. ते जे करत असतात अल्लाह त्यांना पाहत असतो.

१६४) अल्लाहनं श्रद्धावंतांपैकी त्यांच्यातूनच एक प्रेषित पाठवला हा अल्लाहचा उपकारच होय. तो (प्रेषित) त्यांना त्याची (अल्लाहची) वचनं वाचून दाखवतो, त्यांच्यावर संस्कार करतो, त्यांना ग्रंथाची शिकवण आणि ज्ञान देतो. त्यांच्या आधी तर ते पार भरकटलेले (लोक) होते.

१६५) तुमच्यावर संकट कोसळलं (उहूदच्या युद्धात) पण त्याच्या तुलनेत दुप्पट यातना तुम्ही दिल्या होत्या (बद्रच्या युद्धात). तुम्ही विचारतात, कुठून (आलं) हे? त्यांना सांगा, ते तुम्ही स्वत:च ओढवलंय. अल्लाहला प्रत्येक बाबीवर सामर्थ्य आहे.

१६६) ज्या दिवशी अल्लाहच्या आज्ञेनं दोन फौजा एकमेकांस भिडल्या, तेव्हा तुम्ही जे सोसलं ते श्रद्धावंत कोण याची ओळख पारखण्यासाठी होतं.

१६७) कोण लोक दांभिक आहेत ते जाणून घेण्यासाठी. त्यांना सांगितलं गेलं- या, अल्लाहच्या मार्गात लढा द्या अगर संरक्षण करा. ते म्हणाले, आम्हाला जर युद्धाची कल्पना असती तर आम्ही नक्कीच तुम्हाला साथ दिली असती. ते त्या दिवशी श्रद्धेच्या तुलनेत अश्रद्धेच्या निकट होते. त्यांच्या मनात नव्हते ते आपल्या तोंडांनी सांगत होते. ते जे काही लपवीत आहेत अल्लाहला त्याची माहिती आहे.

१६८) ते स्वत: तर बसून राहिलेच (उलट) आपल्या भाऊबंधांना सांगत होते, तुम्ही जर आमचं ऐकलं असतं तर ते मारले गेले नसते. त्यांना सांगा, जर तुम्ही खरं असाल तर स्वत:चं मरण टाळून पाहा.

१६९) जे अल्लाहच्या मार्गात मारले गेले त्यांना मृत समजू नका. ते जीवंत आहेत, आपल्या विधात्याकडून त्यांना उपजीविका पुरविली जाते.

१७०) अल्लाहनं त्यांना जे वरदान दिलं त्यात ते आनंदित आहेत. आणि जे लोक मागं राहिले त्यांना (अजून) भेटले नाहीत त्यांच्यासाठी आनंद व्यक्त करताहेत. त्यांना कसली भीती नाही की दु:खाचं कारण नाही.

१७१) ते अल्लाहनं दिलेल्या देणग्यांचा गौरव करताहेत. अल्लाह श्रद्धावंतांचं प्रतिफळ कधीच वाया जाऊ देत नाही.

१७२) दुखापत पोचली असतानादेखील ज्यांनी अल्लाह आणि प्रेषितांच्या हाकेला उत्तर दिलं त्यांच्यापैकी जे रास्त व सद्‌वर्तनी असतील त्यांना मोठा मोबदला आहे.

१७३) लोकांनी त्यांना म्हटलं, तुमच्याविरूद्ध लोक एक (भलामोठा) जमाव गोळा करताहेत. त्याचं भय असू द्या. तेव्हा त्यांच्या श्रद्धेत आणखीनच भर पडली. ते म्हणाले, आमच्यासाठी तर अल्लाहच पुरेसा आहे आणि तोच उत्तमपैकी प्रकरण हाताळणारा आहे.

१७४) आणि मग ते अल्लाहची विपुलता आणि सन्मान लाभून परतले. त्यांचे काहीएक वाईट झालं नाही. त्यांनी अल्लाहच्या मर्जीचं आचरण केलं. अल्लाह उदंड अनुगृहसंपन्न आहे.

१७५) वास्तविक पाहता तुम्हाला तुमच्या साथीदारांची भीती घालणारा सैतान होता. तुम्ही निष्ठावंत असाल तर माझी भीती बाळगा. त्याला भिऊ नका.

१७६) जे लोक द्रोहाच्या मार्गात धावपळ करताहेत. त्यामुळे दु:खी होऊ नका. ते (लोक) अल्लाहचं काहीएक वाईट करू शकणार नाहीत. त्यांना परलोकात कसलाच वाटा न देण्याचं अल्लाहनं ठरवलंय. त्यांच्यासाठी

भयंकर शिक्षा आहे.

१७७) ज्या लोकांनी द्रोहाशी निष्ठेचा सौदा केला ते अल्लाहला मुळीच हानी पोचवू शकत नाहीत. त्यांच्यासाठी कठोर यातना आहेत.

१७८) ज्या लोकांनी बंड केलं त्यांना आम्ही दिलेली उसंत त्यांच्या भल्यासाठी आहे, असा त्यांनी विचार करू नये. आम्ही त्यांच्या पापांमध्ये भर पाडण्यासाठी ही उसंत देताहोत. त्यांना तर अपमानजनक शिक्षा आहे.

१७९) तुम्ही ज्या अवस्थेत आहात श्रद्धावंतांनादेखील त्याच अवस्थेत ठेवणं अल्लाहचं कार्य नव्हे. जे पवित्र आहेत त्यांना अपवित्रांपासून वेगळं करणारच. तसेच अल्लाह तुम्हाला अदृष्य जे काही आहे त्याची माहीती करून देईल. आपल्या प्रेषितांपैकी मात्र इच्छितो त्याची निवड करतो. तेव्हा अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी निष्ठा बाळगा. जर तुम्ही हे मान्य केलं आणि सद्वर्तन करत राहिलात तर तुमच्यासाठी मोठा मोबदला आहे.

१८०) अल्लाहनं आपल्या औदार्यातून ज्या लोकांना दिलंय त्याला लोभानं दाबून ठेवणं त्यांच्या हितात आहे अशा भ्रमात त्यांनी राहू नये. ते तर त्यांच्यासाठी (अतिशय) वाईट आहे. जे काही लोभानं ते रोखून ठेवतील ते लवकरच निर्णयाच्या दिवशी त्यांच्या गळ्यात अडकवले जाईल. आकाश आणि पृथ्वीचा वारसा अल्लाहसाठीच आहे. आणि तुम्ही जे काही करत राहता त्याची अल्लाह खबर राखतो.

१८१) 'आम्ही श्रीमंत आणि अल्लाह गरजवंत' असल्याचं त्यांचं म्हणणं अल्लाह ऐकून आहे. त्यांनी म्हटलेलं आणि प्रेषितांचा त्यांनी केलेला वध आम्ही नोंदवून ठेवतो आणि त्यांना सांगणार आहोत, आता तुम्ही शिक्षा म्हणून धगधगत्या नरकाग्नीची चव घ्या.

१८२) तुम्ही आपल्या हातांनी जे आगाऊ पाठवलंय त्याच्यासाठीच हे, अल्लाह तर भक्तांवर कधीच अत्याचार करत नाही.

१८३) जे लोक असे सांगतात, अल्लाहनं आमच्याकडून वचन घेतलंय की जोवर ते प्रेषित एखादा बळी आम्हाला दाखवत नाहीत ज्यास अग्नी

खाऊन टाकेल तोवर आम्ही श्रद्धा बाळगणार नाही, त्यांना विचारा, माझ्या आधी तुमच्याकडं स्पष्ट संकेत घेऊन कित्येक प्रेषित आलेत. तसेच तुम्ही जे काही विचारता तोदेखील संकेत तुम्ही जर वास्तववादी आहात तर त्यांचा वध का केला?

१८४) तरीदेखील ते तुम्हाला खोटं ठरवीत असतील तर तुमच्यापूर्वी जे प्रेषित स्पष्ट संकेत- दिव्य ग्रंथ घेऊन आले होते तेदेखील खोटं ठरवले गेलेत.

१८५) प्रत्येक जिवास मृत्यूची चव घ्यावीच लागणार. निर्णयाच्या दिवशी तुम्हास पुरेपूर मोबदला लाभेल. मग ज्याला नरकाग्नीपासून दूर सारून स्वर्गात प्रवेश दिला गेला, तोच यशस्वी ठरला. जगातला हा मोल एका मायाजालापलीकडं काय?

१८६) तुमच्या संपत्ती आणि प्राणांशी तुमची परीक्षा घेतली जाणारच आणि ज्या लोकांना ग्रंथ दिले गेले व जे अनेकेश्वरवादी लोक आहेत त्यांच्याकरवी तुम्हाला इजा पोचवणाऱ्या गोष्टी ऐकाव्या लागतील. पण जर तुम्ही ठाम राहून सद्वर्तन करत राहिलात तर ही बाब (सर्वार्थानं) धाडसाची ठरेल.

१८७) आणि आठवा, ग्रंथधारक लोकांकडून अल्लाहनं वचन घेतलं होतं ते लोकांना स्पष्ट करून सांगा, त्याला लपवून ठेवू नका. त्यांनी ते पाठीमागं टाकून दिलं आणि अल्पशा मोलात त्याचा सौदा केला. किती वाईट त्यांचा हा व्यवहार?

१८८) आपल्या कर्तृत्वावर ज्यांना आनंद वाटतो आहे आणि जे त्यांनी केलं नाही त्यासाठी आपली स्तुती करून घेणं त्यांना आवडते. ते शिक्षेपासून सुटले असा त्यांच्याविषयी विचार करू नका. त्यांच्यासाठी यातनादायक शिक्षा आहे.

१८९) आकाश आणि पृथ्वीचे अधिराज्य अल्लाहसाठीच. अल्लाहच सर्वस्वी सामर्थ्यवान आहे.

१९०) आकाश आणि पृथ्वीच्या निर्मितीत आणि रात्र व दिवसाचं आळीपाळीनं येणं, समंजस लोकांसाठी यामध्ये संकेत आहेत.

१९१) जे लोक उभ्यानं, बसून, एका कुशीवर टेकून अल्लाहची आठवण करतात आणि आकाश व पृथ्वीच्या उत्पत्तीविषयी विचार करतात, हे विधाता! तू हे सर्व उगाच निर्माण केलेलं नाही. तू धन्यतेस पात्र आहेस. वाचव आम्हाला नरकाग्नीच्या शिक्षेपासून.

१९२) हे विधाता! ज्याला तू अग्नीत टाकलंस तो अपमानित झाला. अशा अपराधींना कुणाची मदत मिळणार नाही.

१९३) हे आमच्या विधाता! आम्ही ऐकलंय एकाला साद घालताना, आम्हाला श्रद्धेकडं बोलवत होता- 'तुमच्या विधात्याची श्रद्धा धारण करा' म्हणत. ते आम्ही मान्य केलं. तेव्हा आमच्या विधाता! आमच्या पापांना क्षमा कर, आमच्यातल्या उणिवांना दूर कर आणि जे नेक लोक आहेत त्यांच्यासमवेत आमचा अंत कर.

१९४) आमच्या विधाता! तुझ्या प्रेषितांकडून जे वचन आम्हास दिलंय त्याची पूर्तता कर आणि निर्णयाच्या दिवशी आम्हाला अपमानित करू नकोस. निश्चित तू आपलं वचन मोडत नाहीस.

१९५) त्यांच्या विधात्यानं त्यांचं म्हणणं स्वीकारलं. मी तुमच्यातील कोणीही केलेलं कार्य वाया जाऊ देणार नाही. पुरुष असो की स्त्री, तुम्ही आपसात एकच आहात. ज्या लोकांनी घरदार सोडलं, ज्यांना त्यांच्या शहरामधून हाकलून दिलं, माझ्या मार्गात त्यांचा छळ केला गेला ते लढले आणि मारले गेले. मी त्यांच्या उणिवा त्यांच्यापासून नक्कीच दूर करीन आणि त्यांना अशा स्वर्गात प्रवेश देईन ज्याच्याखालून नद्या वाहत आहेत. अल्लाहकडून हे बक्षीस आहे आणि उत्तम बक्षीस तर अल्लाहपाशीच लाभते.

१९६) शहरामधून विद्रोही लोकांची धावपळ तुम्हाला फसवू नये.

१९७) हे तर कवडीमोलाचं, त्यांचं नंतरचं ठिकाण तर नरकच आहे, किती वाईट ते ठिकाण.

१९८) पण जे लोक आपल्या विधात्याची भीती बाळगून आहेत त्यांच्यासाठी स्वर्ग आहे ज्याच्याखालून नद्या वाहत असतील. त्यामध्ये ते सदैव

राहतील. अल्लाहकडून हा त्यांचा पाहुणचार आणि अल्लाहकडं जे काही आहे ते नेक लोकांसाठी सर्वोत्तम आहे.

१९९) आणि ग्रंथधारक लोकांपैकी ज्यांनी अल्लाहवर विश्वास ठेवला आणि तुमच्यावर जे अवतरलं त्यावर, तसेच त्यांच्यावर जे अवतरलं (ते मान्य करून) अल्लाहशी नम्रतेनं वागतात. अल्लाहच्या वचनांचा क्षुल्लक मोलात सौदा करत नाहीत त्यांच्यासाठी त्यांच्या विधात्याकडे मोबदला आहे आणि हिशेब करण्यात अल्लाह तत्पर आहे.

२००) श्रद्धावंत लोकहो, धैर्य राखा आणि दृढतेनं उभं राहा. एकमेकांस बळकटी द्या. अल्लाहला भीत राहा. तुम्ही यशस्वी व्हाल.

----

# ४. सूरह अन-निसा

**मदीनाकालीन, आयती १७६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) लोकहो, आपल्या विधात्याची भीती बाळगा, ज्यानं तुम्हाला एकाच जिवापासून निर्माण केलं. त्यापासूनच त्याचं जोडपं निर्मिलं आणि त्या उभयतांपासून असंख्य पुरुष व स्त्रिया विखुरल्या. आणि अल्लाहचं भय बाळगा ज्याच्या आधारानं तुम्ही एकमेकांशी आपल्या हक्कांची मागणी करता तसेच आपल्या नातेसंबंधांची जाण ठेवा. अल्लाह तुमच्यावर लक्ष ठेवून आहे.

२) अनाथांची मालमत्ता त्यांच्या हवाली करा. वाईट वस्तूची चांगल्या वस्तूशी अदलाबदल करू नका, आणि त्यांची मालमत्ता आपल्या मालमत्तेशी सरमिसळ करू नका, हे खरोखरच मोठं पाप आहे.

३) अनाथ (मुलींच्या) संदर्भात तुम्ही न्याय्य व्यवहार करू शकणार नाही याची भीती असेल तर तुम्हाला आवडतील त्या दोन किंवा तीन अथवा चार स्त्रियांशी विवाह करा, पण जर त्यांच्याशी न्याय्य वागणूक करणं तुम्हाला जमणार नाही अशी भीती असल्यास मग एकच पुरे. आणि जे तुमच्या मालकीतील (युद्धात ज्या स्त्रिया पकडल्या गेल्या असतील आणि मग नंतर शासनानं त्यांचा सांभाळ करण्यासाठी इतर लोकांच्या स्वाधीन केलं असेल अशा स्त्रिया) आहेत (त्यांच्याशी). न्यायाच्या दृष्टिकोनातून हे अधिक योग्य आहे.

४) स्त्रियांना त्यांचं स्त्रीधन (महेर) सौहार्दपूर्ण द्या. जर त्यांनी तुम्हाला त्यातलं स्वत:हून काही दिलं तर आनंदानं ते खा.

५) तुमच्या जगण्याचा आधार असलेल्या तुमच्या धनसंपत्तीला असमंजस लोकांच्या हवाली करू नका, त्यातून त्यांच्या अन्न-पाणी व वस्त्रांची तरतूद करा. आणि त्यांच्याशी समंजसपणे बोला.

६) लग्नाच्या वयात येईतोपर्यंत अनाथांची निगा राखा. मग जेव्हा त्यांच्यामध्ये

तुम्हाला क्षमता दिसून येईल तेव्हा त्यांची धनसंपत्ती त्यांच्या हवाली करा. ते मोठे होतील या भीतीपोटी घाईघाईनं त्यांच्या मालमत्तेतून गरजेपेक्षा जास्त उपयोगात आणू नका. पण (तुमच्यात) जे श्रीमंत असतील त्यांनी स्वत:ला (अनाथांच्या मालमत्तेशी) वाचवूनच ठेवावे, पण जर कुणी गरजू असेल तर ते परिचित पद्धतीनं ती उपयोगात आणू शकतो. त्यांची मालमत्ता त्यांच्या स्वाधीन करताना साक्षीदार ठेवा, पण हिशेब घेण्यासाठी तर अल्लाह पुरेसा आहे.

७) पुरुषांसाठी त्यांच्या माता-पिता आणि जवळच्या नातेवाईकांनी जे काही मागे सोडलं असेल त्यात त्यांचा वाटा आहे. तसेच स्त्रियांचा त्यांच्या माता-पिता आणि जवळच्या नातेवाईकांनी जे मागे सोडलं असेल त्यात वाटा आहे. मग कमी प्रमाणात असो की जास्त. त्यांचा वाटा निश्चित केलाय.

८) वाटणीच्या वेळी जर इतर नातेवाईक तसेच अनाथ आणि निराधार हजर असतील तर त्यातला काही भाग त्यांनाही देऊन टाका आणि त्यांच्याशी चांगुलपणानं बोला.

९) आपल्या कमजोर संततीला मागं सोडताना जशी भीती असते तशीच इतरांच्या बाबतीतदेखील त्यांनी काळजी घ्यायला हवी. अल्लाहची भीती बाळगून रास्त गोष्ट सांगा.

१०) जे लोक अन्यायाचा अवलंब करून अनाथांची मालमत्ता हडप करतात ते खऱ्या अर्थानं आपलं पोट आगीनं भरतात. लवकरच ते नरकात सामावतील.

११) तुमच्या मुलाबाळांच्या बाबतीत अल्लाह तुम्हाला (वारसासंबंधी) आदेश देतो. पुरुषांसाठी दोन स्त्रियांच्या वाट्याइतका. आणि जर फक्त मुलीच (वारस) असतील, दोन किंवा दोनपेक्षा जास्त तर त्यांचा वाटा दोन तृतियांश (२/३) असेल, जर एकच मुलगी असेल तर तिला निम्मा हिस्सा मिळेल. मयताची संतती असेल तर त्याच्या माता-पित्याला प्रत्येकास सहावा हिस्सा मिळेल. आणि मयताची संतती नसेल, माता-पिता तेवढेच (वारस) असतील, तेव्हा मातेस एक

तृतियांश. जर मयताचे भाऊ आणि बहिणी असतील तर मातेस सहावा हिस्सा (पण हे वितरण) मयतानं करून ठेवलेल्या मृत्यूपत्राची पूर्तता आणि त्याच्यावरील कर्ज सर्वकाही फेडल्यानंतर अमलात येईल. तुमचे वाडवडील अथवा तुमच्या मुलांपैकी तुमचा लाभ घडवण्यात कोण जवळचा ठरेल, तुम्हाला माहीत नाही. हे अल्लाहनं ठरवून दिलेलं आहे. अल्लाहच (खऱ्या अर्थानं) सर्वकाही अवगत असणारा आणि विवेकी आहे.

१२) तुमच्या पत्नींना संतती नसेल तर त्यांनी मागं सोडलेल्या संपत्तीत तुमचा अर्धा वाटा आहे आणि जर त्यांना संतती असेल तर मृत्यूपत्रात नोंदवलेल्याची पूर्तता करून आणि तिच्यावरील कर्जाची परतफेड करून बाकीच्या मालमत्तेत तुमचा वारसा हक्क एक चतुर्थांश आहे. आणि त्यांच्याकरिता (तुमच्या पत्नींसाठी) तुम्ही जे मागं सोडलं असेल त्यातील एक चतुर्थांश जर तुम्हाला मुलं नसतील तर. पण जर तुम्हाला मुलं असतील तर त्यांचा वाटा एक अष्ठमांश आहे. पण मयतानं केलेल्या मृत्यूपत्रातील बाबींची पूर्तता करून आणि कर्ज असेल त्याची परतफेड केल्यानंतरच (हे अमलात येईल). आणि जर एखाद्या अशा पुरुष अथवा स्त्रीचा वारसा असेल. ज्याला / जिला वडीलही नाहीत की त्याची स्वत:ची मुलंही नाहीत पण भाऊ आणि बहिणी असतील तर त्या दोघांना प्रत्येकास सहावा भाग मिळेल. पण जर एकापेक्षा जास्त भाऊ-बहिणी असतील तर एकतृतियांश संपत्तीत त्या सर्वांचा वाटा आहे. पण मयतानं केलेल्या मृत्यूपत्राची पूर्तता करून व मयतावरील कर्जाची परतफेड केल्यानंतरच (सर्व विभागणी) म्हणजे (मृत्यूपत्र आणि कर्जामुळे) कुणाचं नुकसान होता कामा नये, हे अल्लाहनं आज्ञांकित केलंय. अल्लाहला अवगत आहे आणि तो सहनशील आहे.

१३) या अल्लाहनं घालून दिलेल्या मर्यादा आहेत. आणि अल्लाह व जो कुणी त्याच्या प्रेषितांच्या आज्ञा पाळीत असेल त्याला स्वर्गात प्रवेश दिला जाईल ज्याखालून नद्या वाहत आहेत. सदैव तो तिथेच राहील. आणि हेच सर्वांत महान यश आहे.

१४) आणि ज्यानं अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताची अवज्ञा करून मर्यादांचं उल्लंघन केलं त्याला नरकाग्नीत टाकलं जाईल सदासर्वदासाठी. आणि त्याला अपमानजनक यातना देण्यात येतील.

१५) तुमच्या स्त्रियांपैकी कुणी व्यभिचाराचा अपराध केला असेल तर त्यांच्या (अशा स्त्रियां)विरूद्ध तुमच्यापैकी चार साक्षीदार आणि जर त्यांनी साक्ष दिली तर त्यांना मरण येईपर्यंत घरातच बंदिस्त ठेवा किंवा अल्लाह त्यांच्यासाठी कुठला पर्यायी मार्ग काढील.

१६) आणि जर दोन पुरुषांकडून हे कृत्य घडलं असेल तर त्यांना शिक्षा करा, पण जर त्यांनी पश्चात्ताप केला आणि स्वत:ला सुधारलं तर त्यांना सोडून द्या. अल्लाह खरंच पश्चात्ताप स्वीकारणारा आणि दया दाखवणारा आहे.

१७) अशाच लोकांचा पश्चात्ताप स्वीकार करणं अल्लाहवर अवलंबून आहे. जे अजाणतेपणानं दुष्ट कृत्यं करतात आणि मग लगेच पश्चात्ताप व्यक्त करतात अशाच लोकांकडून अल्लाह पश्चात्ताप स्वीकार करतो. अल्लाहला सर्वकाही माहीत असून तो कौशल्यवान आहे.

१८) जे लोक त्यांचे मरण येईल तोवर वाईट कृत्यं करत राहतात आणि मग म्हणतात, मी पश्चात्ताप करतो, अशा लोकांसाठी पश्चात्ताप स्वीकार केला जाणार नाही. तसेच जे लोक विद्रोही अवस्थेतच मरण पावतात त्यांनादेखील उपयोगी होणार नाही. त्यांच्यासाठी तर आम्ही कठोर शिक्षा तयार ठेवलीय.

१९) हे श्रद्धावंत लोकहो, तुम्ही बळेच स्त्रियांचे वारसदार होणं अवैध ठरवलंय. त्यांना रोखूनही ठेवू नका तुम्ही त्यांना जे काही दिलंय ते परत मिळवण्यासाठी, पण जर त्यांनी उघड बीभत्सपणा केला असेल तर अशांना सोडून. त्यांच्यासमवेत चांगुलपणानं राहा. तुम्हाला त्या आवडत नसल्या तरीही, एखादी गोष्ट आवडत नसेल, पण अल्लाहनं त्यामध्ये भलंमोठं असं काही ठेवलं असेल.

२०) तुम्ही जर एका पत्नीची जागा दुसऱ्या पत्नीशी बदलायचं ठरवलं

असेल तर तुम्ही जर तिला गडगंज खजिना जरी दिला असला तरी त्यातलं काहीएक परत घेऊ नका, कसं ते घेणार तुम्ही परत, आरोप ठेवून? उघड अपराध करून?

२१) आणि ते कसं तुम्ही परत घेणार, एकमेकांचा भोग घेतला असता? आणि त्यांनी तुमच्याशी पक्कं वचन घेतलं असता (देखील)?

२२) ज्या स्त्रियांशी तुमच्या पित्याने लग्न केलं त्यांच्याशी विवाह करू नका. मागं जे घडलं ते घडलं. ती अतिशय लज्जास्पद आणि भयंकर गोष्ट होती आणि अत्यंत वाईट रूढी होती.

२३) तुमच्या माता, तुमच्या मुली, तुमच्या बहिणी, आत्या, मावश्या, तुमच्या भाच्या, तुमच्या पुतण्या आणि तुमच्या दूध-माता, दूध-भगिनी, तुमच्या पत्नींच्या माता, तुमच्या ज्या पत्नींचा तुम्ही उपभोग घेतला आहे, त्यांच्या मुली निषिद्ध केल्या गेल्या आहेत. पण जर भोग घेतला नसेल तर यात काही गैर नाही, तसेच तुमच्या पोटी जन्मलेल्या तुमच्या मुलांच्या पत्नी तुम्हांस निषिद्ध ठरवलं आहे. दोन बहिणींना एकत्र विवाहसंबंधात ठेवू नका. मागं जे घडलं ते घडलं. अल्लाह क्षमाशील आणि कृपावंत आहे.

**पारा - ५**

२४) आणि विवाहबद्ध स्त्रिया निषिद्ध आहेत, ज्या तुमच्या उजव्या हातांनी मिळवलेल्या असतील (युद्धामध्ये पकडल्या गेलेल्या स्त्रिया) त्यांना सोडून. हा तुमच्यासाठी अल्लाहचा आदेश होय. याव्यतिरिक्त उरलेल्या सर्व स्त्रिया तुम्ही आपल्या मालमत्तेद्वारे विवाहबंधनात आणण्याकरिता त्या वैध आहेत, कामनापूर्तीसाठी नव्हे. तुमच्यापैकी ज्यांना त्यांच्याकडून (वैवाहिक जीवनाचा) लाभ घ्यायचा असेल त्यांनी त्यांच्यासाठी ठरवलेली (महेरची) रक्कम देऊन टाकावी. ती ठरवल्यानंतर तुम्ही आपसात काही तडजोड केली तर यात काही अपराध नाही. निश्चितच अल्लाह सर्वज्ञ आणि प्रतिभासंपन्न आहे.

२५) पण जर कोणाची परिस्थिती (स्वतंत्र) श्रद्धावंत स्त्रियांशी विवाह

करण्याची नसेल तर त्यानं युद्धात हाती आलेल्या श्रद्धावंत स्त्रीशी विवाह करावा. अल्लाह तुमच्या निष्ठेला चांगलं ओळखतो. तुम्ही एकमेकांपैकीच आहात, तेव्हा तुम्ही त्यांच्या मालकांच्या अनुमतीनं त्यांच्याशी विवाह करा आणि त्यांची महेरची (रक्कम) त्यांना द्या. प्रचलित पद्धतीनुसार त्यांना विवाहबंधनात आणण्यासाठी. भोगवस्तू म्हणून नव्हे की गुप्त प्रेमसंबंध ठेवणाऱ्याही नव्हेत. त्यांनी विवाहबद्ध झाल्यानंतर (देखील) व्यभिचार केला असेल तर त्यांच्यासाठी, स्वतंत्र मर्यादाशील स्त्रीच्या तुलनेत अर्ध्यानं त्यांना शिक्षा करा. ही (परवानगी) तुमच्यापैकी ज्यांना पाप घडण्याची भीती असेल त्याच्यासाठी आहे. तुम्ही संयम पाळला तर हे तुमच्यासाठी चांगलंच आहे. अल्लाह क्षमाशील आणि कृपाळू आहे.

२६) तुमच्यावर सर्वकाही स्पष्ट करून तुमच्या पूर्वीच्या लोकांच्या पद्धतीचा (अवलंब करण्यास) तुमचे मार्गदर्शन करण्याची आणि तुमच्याकडं वळण्याची अल्लाहची इच्छा आहे. कारण अल्लाह सर्वज्ञ आणि कौशल्यवान आहे.

२७) अल्लाह तुमच्याकडं वळू इच्छितो, आणि जे लोक वासनांच्या मागं लागलेत तुम्हाला (सन्मार्गापासून) मागं वळवण्याची तीव्र इच्छा बाळगून आहेत.

२८) तुमच्यावरील भार हलका करण्याचा अल्लाहचा मानस आहे. कारण मानव आपल्या निर्मितीत दुबळा आहे.

२९) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही तुमची संपत्ती आपसात अनाठायी खाऊन टाकू नका. तर एकमेकांशी सद्भावनेनं व्यापार करा आणि एकमेकांची हत्या करू नका. अल्लाह निश्चितच तुम्हाप्रत दयाशील आहे.

३०) आणि कुणी आगळीकपणे, अत्याचारानं असं केलं तर आम्ही लवकरच त्याला नरकाग्नीत टाकून देऊ. अल्लाहसाठी ही फार सोपी गोष्ट आहे.

३१) तुमच्यासाठी वर्ज्य केलेल्या, मोठमोठ्या पापांपासून तुम्ही स्वत:ला अलिप्त ठेवाल तर आम्ही तुमच्यापासून दुष्टतेस दूर सारू आणि आम्ही

तुम्हांस सन्मान बहाल करू.

३२) अल्लाहनं तुम्हापैकी काहींना इतरांच्या तुलनेत जास्तच काही दिलंय त्याचा लोभ करू नका. पुरुष जे कमवतात तेच त्यांच्या भाग्यातलं आणि स्त्रियांनी जे कमवलं ते त्यांच्या नशिबातलं. आणि अल्लाहला त्याच्या विपुलतेतून मागत राहा. अल्लाह निश्चितच सर्व बाबींची जाणीव ठेवणारा आहे.

३३) माता-पित्यानी आणि जवळच्या नातेवाईकांनी सोडून गेलेल्या मालमत्तेमध्ये सर्व वारसदारांचा वाटा नेमून दिलेला आहे. ज्या लोकांशी तुम्ही करारबद्ध आहात त्यांनाही त्यांचा वाटा देऊन टाका. अल्लाह नक्कीच प्रत्येक बाबींचा साक्षी आहे.

३४) पुरुष स्त्रियांचे संरक्षक आहेत. अल्लाहनं ज्याप्रकारे एकास दुसऱ्यावर प्राधान्य दिलंय त्याचे कारण त्यांनी आपली संपत्ती खर्ची घातली म्हणून. ज्या सदाचारी आहेत आज्ञा पाळणाऱ्या असतात, आणि पतीच्या गैरहजेरीत अल्लाहच्या देखरेखीखाली त्यांच्या (हक्कांचं) संरक्षण करतात. तुम्हाला ज्या स्त्रियांच्या गैरवर्तणुकीची भीती असेल त्यांना ताकीद द्या. त्यांना त्यांच्या खोलीमध्ये (शयनगृहात) एकटे सोडा. त्यांना मारा. मग जर त्या तुमचं ऐकत असतील तर त्यांच्यावर आरोप ठेवण्याचं निमित्त शोधू नका. अल्लाहच सर्वोच्च आणि महानतम आहे.

३५) त्या दोघांमध्ये फूट पडण्याचं भय वाटत असेल तर एक मध्यस्थ त्याच्या कुटुंबातला आणि दुसरा तिच्या कुटुंबातला नेमा. जर त्या दोघांना सलोखा घडवायचा असेल तर अल्लाह त्या दोघांत तडजोड घडवील. अल्लाहला संपूर्ण माहिती असून त्याला सर्वकाही अवगत आहे.

३६) अल्लाहची भक्ती करा, त्याचा कोणी भागीदार करू नका. आणि माता-पित्यांशी दयेनं वागा. तसेच जवळच्या नातेवाईकांशी, अनाथांशी, निराधारांशी, निकटच्या शेजाऱ्यांशी, निकटवर्ती, अनोळखी, सान्निध्यातील लोकांशी, प्रवाशांशी आणि तुमच्या अधीन असलेल्यांशी (सदवर्तनानं वागा), कारण अल्लाहला उद्दाम आणि

गर्विष्ट माणसं आवडत नसतात.

३७) जे लोक लोभी असून इतर लोकांनादेखील त्याचे धडे देतात, अल्लाहनं आपल्या कृपेनं त्यांना जे काही दिलंय ते लपवून ठेवतात (तेही अल्लाहला आवडत नाहीत) आम्ही अशा अधर्मी लोकांसाठी अपमानित करणारी शिक्षा तयार ठेवली आहे.

३८) आणि जे लोक इतरांना दाखवण्यासाठी आपली मालमत्ता खर्च करतात, अल्लाहवर त्यांची श्रद्धा नाही की अंतिम दिनावरदेखील त्यांचा विश्वास नाही. सैतानाला ज्यांनी सोबती निवडला, भयानकच तो सोबती (ठरला).

३९) त्यांनी जर अल्लाहवर विश्वास ठेवून अंतिम दिनाला मान्य केलं असतं आणि अल्लाहनं दिलेल्या साधनांतून त्यांनी खर्च केला तर त्यांचं काय बिघडलं असतं? अल्लाह त्यांना चांगले ओळखतो.

४०) अल्लाह तिळमात्रही अन्याय करत नाही. कुणी काही भलं केलं असेल तर त्याचं अनेक पटीनं भलं करतो आणि स्वत:कडूनही मोठा मोबदला देतो.

४१) आम्ही जेव्हा प्रत्येक लोकसमूहातून एक साक्षीदार उभा करू आणि आपणास (प्रेषितांना) त्यांच्यासमोर साक्षीदार म्हणून उभं केलं तर त्यांचे काय (हाल) होतील.

४२) ज्या लोकांनी द्रोह अंगीकारला आणि प्रेषितांची अवज्ञा केली त्या दिवशी अशी इच्छा करतील त्यांना जमिनीत पुरून ती सपाट केली जावी. ते अल्लाहशी कोणतीही बाब लपवू शकणार नाहीत.

४३) श्रद्धावंत लोकहो, नशेच्या स्थितीत प्रार्थनेच्या (नमाजच्या) जवळ जाऊ नका. तुम्ही तोंडानं काय म्हणता (उच्चारता) ते कळेपर्यंत. तसेच अपवित्र अवस्थेत असतानादेखील. जोवर तुम्ही स्नान करत नाही. तुम्ही प्रवासात असलात तर तो अपवाद वगळता. जर तुम्ही आजारी असाल किंवा प्रवासात असाल अथवा नैसर्गिक विधी उरकली असाल अथवा स्त्रीशी संगत केली असेल, आणि तुम्हाला पाणी उपलब्ध झालं

नसेल, तर पाक मातीचा उपयोग (तयम्मूम) करून तुमचं तोंड आणि हात स्वच्छ करा. अल्लाह नक्कीच क्षमा करणारा आणि नरमाईचा व्यवहार करणारा आहे.

४४) तुम्ही पाहत नाही आम्ही ज्यांना ग्रंथाचा काही भाग दिला, तरी त्यांनी वाममार्गाचा अवलंब केला आणि तुम्हीदेखील मार्गभ्रष्ट व्हावं असे त्यांना वाटते.

४५) अल्लाह तुमच्या शत्रूंना चांगलं ओळखून आहे. आणि अल्लाह त्यांना पुरून उरेल असा तुमचा वाली आहे. तुमच्या मदतीसदेखील अल्लाह पुरेसा आहे.

४६) ज्यू धर्मियांपैकी काही असे आहेत जे शब्दांना त्यांच्या (उच्चारांच्या) जागेवरून हलवतात आणि म्हणतात आम्ही ऐकलं आणि अवज्ञा केली. नि म्हणतात, ऐका (आमचं) त्यांना ऐकवलं जाऊ नये आणि 'राईना'चा उच्चार जिभेस वळवून करतात धर्माची कुचेष्टा करण्याच्या विचारानं. पण जर त्यांनी, आम्ही ऐकलं आणि पालन केलं आणि आमचं ऐका, आमच्याकडं पाहा, असं म्हटलं असतं तर ते त्यांच्या भल्याचं आणि जास्त रास्त होतं. पण अल्लाहनं त्यांच्या नकारामुळं त्यांचा धिक्कार केला. त्यांच्यातील अल्पशः लोकांना वगळता ते श्रद्धा बाळगणारे नाहीत.

४७) ग्रंथधारक लोकहो, आम्ही जे पाठवलंय त्यावर श्रद्धा ठेवा, जे पूर्वीपासून तुमच्याकडं आहे त्याची पुष्टी करतो, आम्ही बऱ्याच चेहऱ्यांना नाहीसं करून त्यांना पाठीकडं वळण्यापूर्वी. अथवा आम्ही सब्तवाल्यांचा जसा धिक्कार केला तसेच त्यांचाही धिक्कार करू. अल्लाहचा आदेश अंमलात येणारच.

४८) अल्लाहबरोबर जे लोक (इतरांना) भागीदार ठरवतात त्यांना अल्लाह कधीच क्षमा करणार नाही. त्याव्यतिरिक्त त्याच्या मर्जीस येईल त्यांना क्षमा करेल. अल्लाहचे भागीदार ठरवणं म्हणजे भयंकर असं पाप करणं होय.

४९) जे स्वत:ला पावन समजतात त्यांना तुम्ही बघितलं? पण अल्लाहच (खऱ्या अर्थानं) त्याच्या मर्जीनुसार ज्यास पावित्र्य देतो, त्याच्यावर कणभरदेखील अत्याचार होणार नाही.

५०) पाहा, अल्लाहच्या बाबतीत किती खोटं रचतात. हा उघडउघड अपराधच होय.

५१) तुम्ही त्या लोकांना पाहिलंय ज्यांना ग्रंथातून काही भाग दिला होता, तरीदेखील ते तर मूर्ती आणि मर्यादांचं उल्लंघन करणाऱ्यांशी निष्ठा ठेवतात. आणि ज्या लोकांनी द्रोह केला त्यांना सांगतात, श्रद्धावंतांपेक्षा हे अधिक रास्त मार्गदर्शन आहे.

५२) अशाच लोकांना अल्लाह अपमानित करतो आणि अल्लाह ज्यांना अपमानित करतो त्यांना मदतीस कुणी आढळणार नाही.

५३) त्यांच्या भाग्यात सत्तेचा काही वाटा आहे? तरीदेखील ते लोकांना कणभरदेखील देणार नाहीत.

५४) अथवा अल्लाहनं लोकांना आपल्या औदार्यातून जे दिलंय त्याचा त्यांना हेवा वाटतो? मग आम्ही इब्राहीम आणि त्यांच्या संततीला ग्रंथ दिला, ज्ञान दिलं आणि त्यांना भलंमोठं राज्यदेखील दिलं.

५५) त्यांच्यापैकी काहींनी ते मान्य केलं तर काही अडकून राहिले. (त्यांच्यासाठी) धगधगते नरकच पुरे.

५६) ज्या लोकांनी नाकारलं आम्ही लवकरच त्यांना अग्नीत टाकून देऊ. त्यांच्या चमड्या भाजून निघाल्यावर आम्ही दुसऱ्या कातडीनं ती बदलून टाकू त्यांनी शिक्षेची चव घ्यावी म्हणून. खरंच अल्लाहसाठी सारं वर्चस्व आणि तोच सर्वज्ञ आहे.

५७) आणि जे लोक श्रद्धा बाळगून सद्‌वर्तन करतात त्यांना लवकरच स्वर्गात दाखल करू ज्याच्याखालून नद्या वाहतात. त्यामध्ये ते सदासर्वदा राहतील. त्यांच्यासाठी तिथं शुद्ध सोबती असतील. दाट सावल्यांमध्ये त्यांना आम्ही दाखल करू.

५८) (तुमच्याकडील) ठेवी (ज्याची त्यांना) परत करा, ही अल्लाहची तुम्हास आज्ञा आहे. लोकांमध्ये न्यायनिवाडा करताना तो न्यायपूर्ण करा. याद्वारे अल्लाह तुम्हास चांगली शिकवण देतोय, अल्लाह ऐकणारा आणि पाहणारा आहे.

५९) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहची आज्ञा पाळा आणि प्रेषितांच्या आज्ञा पाळा आणि ज्या लोकांना अधिकार दिले गेलेत त्यांच्यादेखील. तुमच्यात कुठल्या प्रकरणाविषयी वाद निर्माण झाला असेल तर त्याला अल्लाह आणि प्रेषिताकडं सोपवा. जर अल्लाह आणि अंतिम दिनावर तुमचा विश्वास असेल तर हेच परिणामाच्या दृष्टीनं उत्तम आणि योग्य आहे.

६०) त्या लोकांना बघितलं? जे (लोक) तुमच्यावर जे अवतरलं आणि जे तुमच्यापूर्वी अवतरलं ते मान्य करण्याच्या बतावण्या मारतात, तरी आपली प्रकरणं निवाड्यासाठी बंडखोर सैतानाकडं नेतात, त्याला मान्य करू नका म्हणून, त्यांना आज्ञा दिल्या गेल्या असतानादेखील. सैतान त्यांना मार्गभ्रष्टतेत दूरवर नेऊ इच्छितो.

६१) त्यांना सांगितलं जाते- या, अल्लाहनं जे पाठवलं त्याकडं आणि प्रेषितांकडं, तेव्हा तुम्ही पाहाल दांभिक आहेत ते, थोडं थांबून तुमच्यापासून निघून जातात.

६२) मग काय घडेल बरं त्यांच्या बाबतीत, त्यांनी स्वत:च्या हातांनी जे आगाऊ पाठवलंय त्यामुळं त्यांच्यावर आपत्ती कोसळल्यास? मग नंतर ते तुमच्याकडं अल्लाहची शपथ वाहत परतात, 'आम्हाला तर आपसात सलोखा आणि सामंजस्य हवं होतं.'

६३) अशा लोकांच्या मनात काय आहे याची अल्लाहला माहिती आहे. त्यांच्याकडं दुर्लक्षच करा, त्यांना शिकवण द्या आणि त्यांच्या अंत:करणाला भिडेल असं काही सांगा.

६४) अल्लाहच्या आज्ञेनं प्रेषितांचं अनुसरण करणयासाठीच आम्ही त्यांना पाठवलं. स्वत:वर अत्याचार केल्यावर जर हे लोक तुमच्याकडं आले असते, अल्लाहशी क्षमायाचना केली असती, प्रेषितांनी त्यांच्यासाठी

क्षमा मागितली असती, तेव्हा त्यांना आढळून आलं असतं अल्लाह पश्चात्ताप स्वीकारणारा आणि कृपावंत आहे.

६५) तुमच्या विधात्याची शपथ! ते जोवर आपसातील कलहांचा निवाडा करण्याचा अधिकार तुम्हाला सोपवत नाहीत तोवर ते निष्ठावंत होणार नाहीत. आणि नंतर तुमच्या निर्णयाबद्दल आपल्या मनामध्ये त्यांना कसलाही आक्षेप नसेल आणि दिलेला निकाल ते उदार मनानं स्वीकारतील.

६६) आम्ही जर त्यांना आपल्या जिवांची आहुती अथवा आपली घरंदारं सोडून देण्याचा आदेश दिला असता तर त्यांच्यामधील काहींना वगळून ते तसं कधी केलं नसतं. ज्याची शिकवण त्यांना दिली जाते त्यानुसार त्यांनी आचरण केलं असतं तर त्यांच्या उद्धारासाठी ते चांगलं असतं.

६७) अशा स्थितीत आम्ही त्यांना आपल्याकडून मोठा मोबदला दिला असता.

६८) त्यांना रास्त मार्ग दाखवून दिला असता.

६९) ज्या लोकांनी अल्लाह आणि प्रेषितांच्या आज्ञा पाळल्या ते ज्यांच्यावर अल्लाहची कृपा घडली अशा लोकांसमवेत असतील, म्हणजे प्रेषित, निष्ठावान आणि साक्षी (शहीद) व सदाचारी आणि हे लोक (आपसात) उत्तम असे मित्र आहेत.

७०) त्यांच्यावर हे अल्लाहचं वरदान आहे आणि अल्लाहला त्याची पुरेशी माहिती आहे.

७१) श्रद्धावंत लोकहो, आपला बचाव करण्यास सज्ज असा. वेळप्रसंगी वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये निघा किंवा एकत्र घेऊन निघा.

७२) तुमच्यामध्ये कुणी मागंही राहणारच आणि तुमच्यावर जर संकट आलं तर तो म्हणेल, माझ्यावर अल्लाहची कृपाच झाली मी त्यांच्याबरोबर नव्हतो.

७३) आणि जर अल्लाहकडून कृपा लाभली तर तुमच्या आपसात काही

मैत्रीचे संबंध नसतानादेखील तो म्हणेल, मी जर त्यांच्याबरोबर असतो तर मलादेखील मोठं यश लाभलं असतं!

७४) अल्लाहच्या मार्गात त्यांना लढू द्या. त्यांना या जगातल्या जीवनाशी परलोकाचा सौदा करायचाय. आणि अल्लाहच्या मार्गात लढा देत असताना मरण आलं किंवा त्याला वर्चस्व लाभलं तर आम्ही लवकरच त्यांना मोठा असा मोबदला देणार आहोत.

७५) तुम्ही दीन-दलितांच्या (हितांसाठी) पुरुष व स्त्री आणि त्यांच्या संततीसाठी, अल्लाहच्या मार्गात का लढत नाही, जे म्हणतायत, आमच्या विधाता! आम्हाला या वस्तीतून बाहेर काढ. येथील लोक अत्याचारी आहेत आणि आमच्यासाठी आमचं संरक्षक उभं कर आणि आम्हाला तुझ्या वतीनं मदतगार बनव.

७६) श्रद्ध लोक अल्लाहच्या मार्गात लढत असतात तर विद्रोही लोक बंडखोर लोकांच्या बाजूनं लढताहेत. तुम्ही सैतानांच्या टोळीविरूद्ध लढा द्या. कारण सैतानाच्या चाली पोकळ असतात.

७७) तुम्ही त्या लोकांना पाहिलंय? त्यांना त्याचं हात रोखून ठेवण्यास सांगितलं गेलं होतं, आणि नियमित नमाज अदा करा (कायम करा) आणि जकात द्या, पण जेव्हा त्यांना युद्ध करण्याचा हुकूम दिला गेला, त्यातील एक गट लोकांना असा भितो जसा जणूकाही अल्लाहला भित आहेत, त्याहूनही अधिकच. आणि म्हणू लागले, आमच्या विधाता! आमच्यावर युद्ध करणं विहित का केलं? आम्हाला आणखीन काही सवलत का दिली नाहीस? त्यांना सांगा, या जगातील सुख-सुविधा अगदी क्षुल्लक आहेत. जे सदाचारी आहेत त्यांच्यासाठी तर परलोकच आहे. तुमच्यावर कणभरदेखील अन्याय होणार नाही.

७८) तुम्ही कुठेही असलात तरी तुम्हाला मरण येणारच, जर भक्कम किल्ल्यामध्ये असलात तरीदेखील. त्यांचं काही भलं झालं तर म्हणत, हे अल्लाहकडूनच. आणि त्यांच्यावर काही संकट ओढवलं तर म्हणतात, हे तुमच्यामुळं. त्यांना सांगा, सर्वकाही अल्लाहकडूनच. काय झालंय या लोकांना? त्यांना कोणत्याच गोष्टी कळत नाहीत.

७९) तुझं जे काही भलं घडतं ते अल्लाहकडून आणि जे काही वाईट घडतं ते तुमच्या स्वत:मुळं. आम्ही तुम्हास लोकांसाठी प्रेषित म्हणून पाठवलंय. आणि अल्लाह साक्षीस पुरेसा आहे.

८०) ज्यानं प्रेषितांच्या आज्ञा पाळल्या त्यांनं (वास्तविक पाहता) अल्लाहच्या आज्ञा पाळल्या. जर कुणी पाठ फिरवली तर आम्ही तुम्हाला पाहारा करण्यास पाठवलेलं नाही.

८१) ते म्हणतात, आम्ही आज्ञापालन केलं, आणि मग जेव्हा तुम्हाला सोडून जातात त्यांच्यातला एक गट तुम्ही जे काही सांगत असता त्याच्या विरूद्ध एकमेकांशी चर्चा करतो. पण रात्रीच्या वेळी ते जे काही चर्चा करत असतात, अल्लाह ते नोंदवून ठेवतो. त्यांच्याकडे दुर्लक्ष करा आणि अल्लाहवर विश्वास ठेवा. अल्लाहच पुरेसा आहे सर्वकाही हाताळण्यासाठी.

८२) ते कुरआनवर चिंतन करत नाहीत? जर हे अल्लाहव्यतिरिक्त इतर कोणाकडून आलं असतं तर नक्कीच त्यात कितीतरी विसंगती (आढळल्या) असत्या.

८३) त्यांच्याकडं कुठली शांततेची अगर एखाद्या धोक्याची बातमी पोचते (तेव्हा) ते लगेचच तिला चव्हाट्यावर आणतात, पण जर त्यांनी ती बातमी आपले प्रेषित आणि तसेच अधिकारीवर्गापर्यंत तर जाणकार लोकांनी तिच्या तळाशी जाऊन माहिती करून घेतली असती. जर अल्लाहची कृपा आणि दया तुम्हाला लाभली नसती तर तुमच्यामधील फार थोड्या (लोकांना) वगळता, तुम्ही सैतानाच्या मागं चालले असते.

८४) अल्लाहच्या मार्गात लढा - तुम्ही तुमच्या जिवापुरतं जबाबदार आहात - आणि श्रद्धावंतांना प्रवृत्त करा. लवकरच अल्लाह बंडखोर लोकांचा जोर नाहीसा करू शकतो, कारण युद्ध असो की शिक्षा (करणं) अल्लाहच शक्तिशाली आहे.

८५) जो कोणी एखाद्या नेक कृत्याची शिफारस करतो, त्यालादेखील त्यात वाटा असेल. आणि जो कुणी दुष्कृत्यांची शिफारस करतो त्याची झळ

त्यालादेखील पोचेल. सर्व बाबी अल्लाहच्याच अधीन आहेत.

८६) कुणी जर तुम्हाला शुभकामना व्यक्त केल्या तर तुम्ही त्याला त्याहून चांगल्या किंवा तशाच शुभेच्छा व्यक्त करा. अल्लाह सर्व बाबींचा हिशेब घेणार आहे.

८७) अल्लाहशिवाय इतर कुणीही ईश्वर नाही. तो निर्णयाच्या दिवशी तुम्हाला एकत्र आणणार आहे, यात शंका नाही. आणि अल्लाहच्या शब्दापेक्षा कोणाचा शब्द तो खरा?

८८) दांभिकांच्या बाबतीत तुम्ही का बरं दोन गटांत विभागून जावं? त्यांनी केलेल्या (कृत्यामुळं) अल्लाहनं त्यांना तोंडघशी पाडलं. अल्लाहनं ज्यांना मार्गभ्रष्ट केलं तुम्ही त्यांना मार्ग दाखवू इच्छिता? अल्लाह ज्याला मार्गभ्रष्ट करतो त्याच्यासाठी तुम्हास मार्ग मिळणार नाही.

८९) त्यांना वाटते तुम्हीदेखील धर्माला नाकारावं जसं त्यांनी नाकारलं होतं आणि दोन्ही सारखेच होऊन जावेत. जोपर्यंत ते (लोक) अल्लाहच्या मार्गात देश सोडत नाहीत तोवर त्यांना आपले वाली बनवू नका. त्यांनी जर पाठ फिरवली तर जिथं तिथं ते सापडतील त्यांना धरा आणि त्यांचा वध करा. आणि त्यांच्यापैकी कोणासही मित्र अथवा मदतनीस बनवू नका.

९०) ज्या लोकांचा संबंध अशा समूहाशी आहे ज्यांच्याशी तुम्ही करार केलेला असेल अथवा त्यांची मनं त्रस्त झालीत, तुमच्याशी लढा द्यावा की आपल्याच लोकांशी लढत राहावं म्हणून. आणि अल्लाहनं त्यांना तुमच्यावर ताबा दिला असता तर ते तुमच्याशी नक्कीच लढले असते. (अशात) जर ते तुमच्याशी फटकूनच राहिले, लढले नाहीत आणि उलट शरण येण्यास सांगत आहेत, तेव्हा अल्लाहनं तुमच्यासाठी कोणता मार्ग (त्यांचा छळ करण्यास) खुला केलेला नाही.

९१) इतर काही असे (लोकदेखील) तुम्हाला आढळतील, जे तुमच्याशी तसेच आपल्या लोकांबरोबर देखील शांततेनं राहू इच्छितात. पण जेव्हा केव्हा त्यांना दंगा माजविण्यासाठी बोलवलं जातं तेव्हा ते त्यात उडी

घेतात. जर ते तुमच्याशी परावृत्त झाले नाहीत आणि तहाची बोलणी केली नसेल आणि आपल्या हातांना रोखून ठेवलेलं नसेल तर जिथं ते तुम्हाला सापडतील त्यांना धरा आणि त्यांचा वध करा. आणि हेच ते लोक आहेत ज्यांच्यावर आम्ही तुम्हाला स्पष्ट अधिकार दिलेत.

९२) कोणत्याही श्रद्धावंतानं इतर श्रद्धावंताचा वध करता कामा नये. चुकून झाल्यास ती गोष्ट वेगळी. आणि ज्यानं श्रद्धावंताचा चुकून वध केला असेल तर (भरपाई म्हणून) एका श्रद्ध गुलामाची सुटका करावी आणि त्या व्यक्तीच्या वारसदारांना भरपाईची रक्कम द्यावी. त्यांनी जर माफ करून टाकलं असेल तर (गोष्ट वेगळी). जर त्याचा संबंध तुमच्या शत्रूलोकांशी असेल आणि तो श्रद्धावंत असेल तर भरपाई म्हणून एका श्रद्ध गुलामाची सुटका करावी. जर मयत व्यक्तीचा संबंध अशा समूहाशी असेल ज्याच्याशी तुम्ही आपसात करार केलेला आहे, तर त्याच्या वारसदारांना भरपाईची रक्कम देऊन टाकावी आणि एका श्रद्ध गुलामाची सुटका करावी. आणि जर हे सारं आपल्या ऐपतीबाहेर असेल तर त्यानं सतत दोन महिन्यांचे उपवास करावेत, हे अल्लाहसाठी प्रायश्चित्त आहे. आणि अल्लाह सर्व गोष्टींची माहिती ठेवणारा आणि ज्ञानी आहे.

९३) जर कुणी एका श्रद्धावंताचा जाणूनबुजून वध केला असेल तर त्याचा बदला नरक आहे. तिथं तो सदैव राहील. आणि त्याच्यावर अल्लाहचा कोप आहे, तिरस्कार आहे आणि त्याच्याकरिता मोठी शिक्षा तयार करून ठेवलीय.

९४) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अल्लाहच्या मार्गात निघाले असता चौकशी करून घ्या, कुणी तुम्हास 'सलाम' (अभिवादन) केला तर त्याला तू मुस्लिम नाहीस असं म्हणू नका. तुम्हाला या जगातली मालमत्ता हवी आहे. अल्लाहपाशी तर विपुल मालमत्ता आहे. आधी तुमची स्थितीदेखील तशीच होती. अल्लाहनं तुमच्यावर उपकार केले, तेव्हा चौकशी करत जा. निश्चितच तुम्ही जे काही करता त्या सर्वांची अल्लाहला माहिती आहे.

९५) श्रद्धावंतांपैकी जे कारण नसताना घरी बसून राहतात, आणि जे अल्लाहच्या कारणास्तव आपला जीव आणि संपत्ती पणाला लावतात, हे दोन्ही एकसारखे नाहीत. जे आपले प्राण आणि मालमत्ता पणाला लावून संघर्ष करतात, त्यांना अल्लाहचं वरदान लाभलं आणि घरी राहणाऱ्यांपेक्षा त्यांचा मरातब श्रेष्ठ केला. प्रत्येकास अल्लाहनं भलं वचन दिलंय. अल्लाहनं संघर्ष करणाऱ्यांना घरी बसून राहणाऱ्यांपेक्षा जास्त उपकृत केलं, मोठा मोबदला देऊन.

९६) अल्लाहकडं त्यांची मोठी श्रेणी आहे. त्यांना अल्लाहकडून क्षमा लाभेल, आणि त्याची दया. अल्लाह क्षमा करणारा आणि कृपावंत आहे.

९७) ज्या लोकांनी स्वत:शीच अन्याय केला त्यांचे प्रण काढून घेताना देवदूत त्यांना विचारतात, तुम्ही कशा अवस्थेत होता? ते उत्तर देतील, आम्ही या धरतीवर हलाखीच्या परिस्थितीत होतो. त्यावर ते (पुन्हा विचारतील) अल्लाहची धरती विशाल नव्हती देश-गाव सोडून जाण्यास? अशा लोकांचं ठिकाण नरक आहे, वाईट स्थान.

९८) पण पुरुषांपैकी जे दुर्बल आहेत, स्त्रिया आणि मुलं आणि ऐपत नसलेल्यांना वगळता ज्यांच्याकडं काहीच नाही आणि (या अवस्थेतून) मार्ग काढण्यासाठी कसली युक्ती करणं त्यांच्या आवाक्यात नाही.

९९) आशा आहे अल्लाहनं अशांना माफ करावं. कारण अल्लाह (अपराध) माफ करणारा आणि सोडून देणारा आहे.

१००) आणि अल्लाहच्या कारणास्तव आपला गाव-घरदार सोडून जातो त्याला आश्रयासाठी मुबलक जागा आणि साधनं आढळतील. आणि जो आपल्या घरातून अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांकडं गेला आणि नंतर त्याला जर मरण आलं तर अल्लाहकडं त्याचा मोबदला निश्चित झाला. अल्लाह कृपावंत आणि क्षमाशील आहे.

१०१) तुम्ही धरतीवर प्रवासात निघाले असता नमाज (मधील विधींची संख्या) कमी केल्यास काही हरकत नाही, विशेषत: तुम्हाला नाकारणाऱ्याकडून

तुमचा छळ होण्याच्या भयापोटी, कारण नाकारणारे तर तुमचे उघड शत्रू आहेत.

१०२) आणि (हे प्रेषित) तुम्ही त्यांच्या दरम्यान असून नमाजसाठी उभं असताना, त्यांच्यातील एका गटानं तुमच्याबरोबर आपली शस्त्रं घेऊन उभारावं, नंतर जेव्हा सजदा करून झाल्यास (नमाजमधील विधी उरकल्यावर) त्यांनी तुमच्या पाठीमागं जावं आणि दुसरा गट ज्यानं नमाज अदा केली नाही, त्यानं तुमच्याबरोबर नमाज पढावी आणि आपल्या बचावासाठी आपली शस्त्रं आपल्याजवळ बाळगावीत. कारण असा या श्रद्धाहीनांचा बेत आहे, शस्त्र आणि इतर सामुग्रीकडे तुमचं दुर्लक्ष झालं की त्यांनी तुमच्यावर तुटून पडावं. पण जर पावसामुळं तुम्हाला अडचण झाली असेल किंवा तुम्ही आजारपणामुळं गैरसोय अनुभवत असल्यास तुम्ही तुमची हत्यारं खाली ठेवलीत तर काही हरकत नाही. पण तुम्ही बचावासाठी सावधानता बाळगा. अल्लाहनं नाकारणाऱ्यांचा अपमान करणारी शिक्षा तयार ठेवलीय.

१०३) नमाज आटोपून झाल्यावर, उभं असताना, बसल्या जागी अथवा कडेस टेक लावून अल्लाहला आठवत राहा. तुमचं समाधान झाल्यास नमाज कायम करा. निश्चितच श्रद्धवंतांसाठी ठराविक वेळी प्रार्थना करणं (नमाज कायम करणं) अल्लाहनं विहित केलंय.

१०४) आणि शत्रूंचा पाठपुरावा करताना जर तुम्हाला त्रास सोसावा लागत असेल तर धीर सोडू नका, त्यांनादेखील ते भोगावं लागतं जसं तुम्हाला भोगावं लागतं. पण तुम्हाला तर अल्लाहकडून अपेक्षा आहेत. त्यांना आशा नाही, अल्लाहला (या) सर्व गोष्टी अवगत आहेत, तो ज्ञानी आहे.

१०५) आम्ही तुमच्याकडं ग्रंथ पाठवलाय अल्लाहनं सुचवल्याप्रमाणं लोकांमध्ये निर्णय करावा यासाठी. तुम्ही अपहार करणाऱ्यांचं समर्थन करता कामा नये.

१०६) अल्लाहकडं क्षमा मागा, तो क्षमाशील आणि दयावंत आहे.

१०७) जे लोक स्वत:शी प्रामाणिक नसतात त्यांची बाजू मांडू नका. कारण अल्लाहला लबाडी करणारे, गुन्हेगार आवडत नसतात.

१०८) ते लोकांशी लपवू पाहतात, पण अल्लाहशी ते लपवू शकत नाहीत. अल्लाहला पसंत नाही अशा गोष्टींवर ते रात्री जेव्हा चर्चा करत असतात, अल्लाह त्यांच्यामध्येच असतो. आणि अल्लाहची माहिती सर्वव्यापक आहे.

१०९) ऐकून घ्या, ते अशा तऱ्हेचे लोक आहेत ज्यांच्या वतीनं तुम्ही या जगात बाजू मांडली, पण निर्णयाच्या दिवशी त्यांची बाजू कोण मांडणार आणि कोण त्यांची वकिली करणार?

११०) जर कुणी वाईट केलं तर तो स्वत:शीच अन्याय असेल. पण जर अल्लाहकडं क्षमेसाठी याचना केली तर अल्लाह त्याला क्षमाशील आणि कृपावंत आढळेल.

१११) कुणी पाप कमवीत असेल तर जणू तो आपल्या जिवास पणाला लावतो. अल्लाहला सर्वकाही अवगत आहे तो प्रतिभाशाली आणि जाणणारा आहे.

११२) कुणी चूक अगर पाप करून त्याचा आरोप इतर कोणा निरपराधावर ठेवत असेल तर अशा कुभांड आणि पापांचा बोजा त्याला उचलावा लागेल. हा तर उघड अपराध आहे.

११३) तुझ्यावर अल्लाहची कृपा आणि दया नसती तर त्यांच्यातील एका गटानं तुम्हाला मार्गभ्रष्ट करण्याचा कट योजलेलाच होता, पण ते स्वत:च भरकटताहेत ते तुम्हाला काहीही करू शकत नाहीत. अल्लाहनं तुमच्यावर ग्रंथ आणि प्रतिभा अवतरली. तुम्ही जाणत नव्हता अशा गोष्टी तुम्हाला शिकविल्या, तुम्हाला तर अल्लाहचं मोठं वरदान लाभलंय.

११४) त्यांच्या गुप्त चर्चांमध्ये भलं काहीही नसतंय. पण दानधर्माविषयी चांगल्या गोष्टींसंबंधी आणि लोकांदरम्यान संबंध सुधारण्याविषयी जे काही चर्चा करतात असेल, आणि (जे लोक) अशा गोष्टी अल्लाहच्या

प्रसन्नतेसाठी हे करत असतील, तर आम्ही त्यांना लवकरच मोठा मोबदला देऊ.

११५) जर कोणी त्याला स्पष्ट मार्गदर्शन लाभल्यावरसुद्धा प्रेषितांचा विरोध करतो आणि इतर सर्व श्रद्धावंतांच्या मार्गाविरूद्ध जातो, मग आम्ही त्यांनी जे निवडलंय तेच त्याच्या हवाली करू, त्याला नरकात दाखल करू आणि परतण्यासाठीही अगदी वाईट स्थान असेल.

११६) त्याचे इतर भागीदार ठरवणाऱ्याना अल्लाह कधी क्षमा करत नाही. ती गोष्ट वगळता त्याच्या मर्जीस जे काही येईल ते क्षमा करतो. ज्यानं अल्लाहस इतर भागीदार जोडले तो मार्गभ्रष्ट झाला, मार्गभ्रष्टतेत दूरवर निघून गेला.

११७) ते (अल्लाहला) सोडून देवींचा धावा करणारे खऱ्या अर्थानं बंडखोर सैतानांचा धावा करतात.

११८) अल्लाहनं त्यांचा धिक्कार केलाय. सैतानानं सांगितलंय, मी तुझ्या भक्तांमधून ठराविक वाटा घेणारच आहे.

११९) मी त्यांची दिशाभूल करून टाकीन. त्यांच्यात मोह निर्माण करीन, मी त्यांना आदेश देईन आणि ते जनावरांचे कान चिरतील. माझ्या आदेशानुसारच ते अल्लाहनं निर्मितीमध्ये बदल घडवून आणतील. मग ज्यानं अल्लाहला सोडून सैतानाला आपला वाली म्हणून निवडलं त्यानं उघडउघड स्वत:चा ऱ्हास करून घेतला.

१२०) तो (सैतान) त्यांना वचनं देतो आणि त्यांच्यात आकांक्षा निर्माण करतो आणि सैतानाची वचनं कसली, निव्वळ फसवणुकीपलीकडं काहीच नाही.

१२१) अशा लोकांचं ठिकाण नरक आहे, तिच्यापासून पळण्यास त्यांना इतर ठिकाण आढळणार नाही.

१२२) जी लोकं श्रद्धा धारण करून भली कामं करतात त्यांना आम्ही अशा स्वर्गात दाखल करू ज्यांच्या खालून नद्या वाहतील, ते सदासर्वदा

तेथेच राहतील. अल्लाहचं वचनच (तेवढं) सत्य आहे. अल्लाहच्या वचनापेक्षा इतर कोणाचा शब्द अधिक सत्य?

१२३) तुमच्या इच्छा-आकांक्षांवर अवलंबून नाही, ना ग्रंथधारकांच्या इच्छा (तुमच्या उपयोगी पडणार), जो कुणी दुष्ट कृत्य करील त्याला त्याची फळं भोगावी लागतील. आणि अल्लाहस सोडून इतर कुणी त्याचा वाली नाही की मदतीस येणार.

१२४) आणि जे लोक चांगले कर्म करतील, मग ते पुरुष असोत की स्त्रिया, जर श्रद्धावंत असतील तर असे लोक स्वर्गात दाखल होतील. त्यांच्याशी तिळमात्रदेखील अन्याय केला जाणार नाही.

१२५) आणि धर्म पाळण्यात कोण बरं उत्तम, जो संपूर्णपणे अल्लाहस समर्पित झाला त्यापेक्षा? आणि तो नेकदेखील आहे आणि एकाग्र इब्राहीम यांच्या धर्माचं पालन करतो, अल्लाहनं इब्राहीम यांना मित्र म्हणून निवडले होते.

१२६) आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहसाठीच आहे. सर्व बाबी अल्लाहच्याच अधीन आहेत.

१२७) ते स्त्रियांविषयी तुम्हाला विचारतात. त्यांना सांगा, अल्लाह त्यांच्याविषयी आदेश देतो तसेच अनाथ स्त्रियांसंबंधीचे आदेशदेखील ग्रंथाद्वारे (कुरआनमध्ये) ऐकविले जातात. अनाथ स्त्रिया ज्यांना तुम्ही विहित केलं ते (महेर) देत नाही तरीदेखील त्यांच्याशी विवाह करू इच्छिता. तसेच दुर्बल आणि पीडित मुलांविषयीदेखील अल्लाह आदेश देतो. तुम्ही अनाथांशी न्यायाबाबत ठाम राहा. आणि तुम्ही जे काही भलं करता त्याबाबत अल्लाह परिचित आहे.

१२८) जर एखाद्या पत्नीला आपल्या पतीकडून छळ होण्याची किंवा तिच्याकडं दुर्लक्ष करण्याची भीती वाटत असेल तर त्यांनी आपसात तडजोड करण्यात काही गैर नाही. समेट घडवणं चांगलंच असतं. माणसं तशी लोभी वृत्तीची असतात. पण जर तुम्ही परोपकार केला आणि नियंत्रण राखलं तर तुम्ही जे काही करता ते अल्लाहला अवगत आहे.

१२९) तुमची कितीही उत्कट इच्छा असली तरी पत्नींदरम्यान न्याय राखणं तुमच्या आवाक्यात नाही. पण तुम्ही एकीकडंच संपूर्णपणे वळून जाऊ नका, आणि दुसऱ्या पत्नीला अधांतरी सोडून देऊ नका, आणि सुधारणा करत राहा. अल्लाहची भीती असू द्या. अल्लाह क्षमाशील आणि दयावंत आहे.

१३०) आणि जर त्यांना एकमेकांपासून निरोप घेणेच भाग पडत असेल तर अल्लाह त्यांना आपल्या औदार्यातून विपुल प्रमाणात देईल. कारण अल्लाहचं औदार्य विशाल असून तो सर्वज्ञ आहे.

१३१) आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहसाठीच आहे. आम्ही तुमच्यापूर्वी ज्यांना ग्रंथ दिले होते त्यांना आणि तुम्हाला ताकीद केली होती अल्लाहचं भय बाळगण्याची. तुम्ही जरी नाकारलं तरी आकाश आणि पृथ्वीतील सारंकाही अल्लाहचंच. अल्लाहला कसली अपेक्षा नाही, तोच सर्व स्तुतीस पात्र आहे.

१३२) होय, आकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही अल्लाहच्याच मालकीचं, ते हाताळण्यासाठी अल्लाहच पुरेसा आहे.

१३३) लोकहो, जर त्याची तशी इच्छा झाली तर तो तुम्हाला घालवून देऊन तुमच्या जागी इतरांना आणू शकतो. कारण अल्लाहला त्यावर सर्व सामर्थ्य आहे.

१३४) कुणाला याच जगी मोबदला हवा असेल, पण अल्लाहकडं तर या जगी आणि परलोकाचादेखील मोबदला आहे. अल्लाह सर्वकाही ऐकणारा आणि पाहणारा आहे.

१३५) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अल्लाहसाठी न्यायनिष्ठ राहा. जरी तुमच्याविरूद्ध किंवा तुमचे माता-पिता, तुमचे नातलग मग ते श्रीमंत असोत की गरीब, यांच्याविरूद्ध जरी साक्ष द्यावी लागली तरीदेखील. कारण अल्लाह त्यांचा सर्वाधिक हितचिंतक आहे. तेव्हा न्याय करताना तुम्ही आपल्या इच्छांच्या आहारी जाऊ नका, जर तुम्ही (साक्ष देण्यास) तोंड उघडलं नाही किंवा कानाडोळा करीत राहिला तर (लक्षात ठेवा)

तुम्ही जे काही करता ते सर्व अल्लाहला माहीत असते.

१३६) श्रद्धावंत लोकहो, निष्ठा ठेवा अल्लाहवर, त्याच्या प्रेषितावर, आणि त्याने आपल्या प्रेषितावर, जे ग्रंथ अवतरले त्यावर, तसेच पूर्वी जे ग्रंथ त्यानं अवतरलेत. ज्यानं अल्लाह, त्याचे दूत, त्याचे ग्रंथ, त्याचे प्रेषित आणि अंतिम दिनाला मानण्यास नकार दिला तर तो भरकटून दूरवर निघून गेला.

१३७) श्रद्धा धारण करून ज्या लोकांनी नाकारलं, पुन्हा मान्य केलं आणि पुन्हा नाकारलं आणि नंतर जे आपल्या द्रोहात भर घालत असतात, अशा लोकांना अल्लाह कधीच क्षमा करणार नाही की त्यांना कधी रास्त मार्गाकडं मार्गदर्शनही करणार नाही.

१३८) दांभिक लोकांना खूशखबर द्या त्यांच्यासाठी यातनादायक शिक्षेची.

१३९) तसेच त्या लोकांनादेखील जे श्रद्धावंतांना सोडून विद्रोही लोकांना आपलं मित्र बनवतात, त्यांच्याकडून त्यांना मानसन्मान मिळवायचाय? पण सर्व मानसन्मान अल्लाहसाठीच आहे.

१४०) ग्रंथाद्वारे तुम्हाला हा आदेश देण्यात आलेला आहे की, अल्लाहच्या वचनांची अवज्ञा केली जात असेल तर ते ऐकू नका आणि त्यांचं हसं केलं जात असेल तर अशा ठिकाणी बसू नका, ते दुसऱ्याविषयाकडं वळत नाहीत तोवर. अन्यथा तुम्हीही त्यांच्यासारखंच व्हाल. निश्चितच अल्लाह सर्व दांभिक लोकांना आणि नाकारणाऱ्यांना नरकात एकत्र करणार आहे.

१४१) हे लोक तुमच्याकडं डोळे लावून असतात, अल्लाहकडून तुम्हाला विजय मिळाल्यास ते म्हणतात, आम्ही तुमच्याबरोबर नव्हतो? आणि जर विद्रोहींचं भाग्य उजडलं तर म्हणतात, आम्ही वरचढ ठरलो नव्हतो, आम्ही तुम्हाला श्रद्धावंतांपासून वाचवलं होतं. तेव्हा निर्णयाच्या दिवशी अल्लाह तुमच्यात निर्णय लावून टाकीन आणि अल्लाह नाकारणाऱ्यांना श्रद्धावंतांवर मात करण्यास कधीही वाव देणार नाही.

१४२) दांभिक लोक अल्लाहला फसवत आहेत आणि तो त्यांच्यावर मात करत असतो. नमाजकरिता आळसेनं उभं राहतात लोकांना दाखवण्यासाठी, अल्लाहला क्वचितच स्मरण करतात.

१४३) अधांतरीच अडकलेले- या लोकांकडंही नाही आणि त्या लोकांकडंही नाही. अल्लाह ज्यांना मार्गभ्रष्ट करतो त्यांच्यासाठी कसलीच वाट आढळणार नाही.

१४४) श्रद्धावंत लोकहो, मुस्लिमांना सोडून अश्रद्ध लोकांना मित्र/संरक्षक बनवू नका, अल्लाहला तुमच्याविरूद्ध उघड पुरावा मिळावा असं तुम्हाला वाटतं?

१४५) निश्चितच दांभिक लोक नरकाच्या तळाशी असतील, त्यांना कुणाची मदत मिळणार नाही.

१४६) ज्या लोकांनी पश्चात्ताप व्यक्त केला आणि सुधारले, आणि अल्लाहस घट्ट धरून राहिले आणि धर्मात अल्लाहशी प्रामाणिक असतील असे लोक श्रद्धावंतांबरोबर असतील आणि अल्लाह श्रद्धावंतांना लवकरच मोठं इनाम बहाल करील.

१४७) तुम्ही जर आभार मानलं आणि विश्वास दाखवला तर तुम्हाला शिक्षा देऊन, अल्लाहला काय करायचंय? अल्लाह तर मोल करणारा आणि सर्वकाही ओळखणारा आहे.

**पारा - ६**

१४८) दुष्ट गोष्टींची जाहीर चर्चा करणं अल्लाहला आवडत नाही. कुणावर अत्याचार झाला असेल तर ती गोष्ट वेगळी. अल्लाह ऐकतो आणि जाणतो.

१४९) तुम्ही चांगली कामं जाहीरपणे केलीत अथवा गुप्तपणे किंवा कुणाची दुष्ट गोष्ट क्षमा करून टाकली तर अल्लाह क्षमा करतो आणि सर्व बाबींचं सामर्थ्य राखतो.

१५०) जे लोक अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांना नाकारतात आणि अल्लाह

आणि प्रेषितांमध्ये भेदभाव करू इच्छितात आणि म्हणतात, आम्ही काहींना मान्य करतो तर काहींना नाकारतो, आणि या दोन्हीं (श्रद्धा व अश्रद्धा) मधली एक मार्ग काढू इच्छितात.

१५१) निश्चितच हे लोक खऱ्या अर्थानं विद्रोही आहेत. आम्ही अशा नाकारणाऱ्यांसाठी अपमानजनक शिक्षा तयार ठेवलीय.

१५२) आणि जे लोक अल्लाह आणि त्याच्या (सर्व) प्रेषितांना मान्य करून त्यांच्यात भेदाभेद करत नाहीत अशा लोकांना लवकरच मोबदला दिला जाईल. अल्लाह क्षमाशील आणि दयावंत आहे.

१५३) (हे प्रेषित!) ग्रंथधारक तुमच्याकडं मागणी करतात त्यांच्यासाठी, आकाशातून तुम्ही एक ग्रंथ आणावा. यापेक्षाही बिकट मागणी त्यांनी मूसा यांच्याकडं केली होती. त्यांनी म्हटलं होतं, आम्हाला अल्लाह उघडपणे दाखव, त्यांच्या या कुचेष्टेमुळं त्यांच्यावर अकस्मात वीज कोसळली. मग नंतर त्यांच्याकडं उघड संकेत आले असतानादेखील त्यांनी वासराला पूजेसाठी धरून ठेवलं, आम्ही त्याकडंही दुर्लक्ष केलं आणि मूसा यांना स्पष्ट अधिकार प्रदान केले.

१५४) आणि त्यांच्याकडून वचन घेण्यासाठी आम्ही तूर पर्वताला त्यांच्यावर उचलून धरलं, आम्ही त्यांना सांगितलं, दरवाजातून दाखल होताना नतमस्तक व्हा, तसेच त्यांना आदेश दिला, सिब्त पाळण्याबाबात अतिरेक करू नका. आम्ही त्यांच्याकडून पक्कं वचन करवून घेतला.

१५५) तरी त्यांनी तो करार मोडला आणि अल्लाहच्या वचनांना नाकारलं, प्रेषितांचा नाहक वध केला, त्यांचं म्हणणं होतं, आमच्या हृदयांवर आवरण टाकलं गेलं होतं, म्हणून अल्लाहनंच त्यांच्या द्रोहामुळं (त्यांच्या हृदयांवर) मोहोर ठसवलीय. काहींचा अपवाद वगळता ते मान्य करणार नाहीत.

१५६) आणि त्यांनी आपल्या नकारानं मरयम यांच्यावर गंभीर आरोप ठेवला (म्हणून धिक्कारले गेले).

१५७) त्यांचं म्हणणं होतं, आम्ही अल्लाहचे प्रेषित मरयमपुत्र ईसा यांचा

वध केला, त्यांनी त्यांचा वध केला नाही की त्यांना सुळावर चढवलं नाही. तर वस्तुस्थिती त्यांच्यासाठी शंकास्पद करण्यात आली. जे लोक याबाबत मतभेद करतात ते संशयास्पद आहेत, फक्त कल्पनांच्या मागं आहेत, त्यांना काहीएक माहीत नाही. त्यांनी नक्कीच त्यांचा वध केलेला नाही.

१५८) अल्लाहनं त्यांना स्वत:कडं उचलून घेतलं, अल्लाह सर्वोच्च असून सर्वकाही जाणणारा आहे.

१५९) आणि ग्रंथधारकांपैकी असा कुणीही नसणार जो मरणापूर्वी त्यांच्यावर विश्वास धारण करणार नाही आणि निर्णयाच्या दिवशी ते त्यांची साक्ष देतील.

१६०) ज्यू लोकांच्या अन्यायी वर्तणुकीमुळं आणि अल्लाहच्या मार्गात कित्येकांची अडवणूक केल्यानं आम्ही ज्या पुष्कळ अशा पवित्र (खाद्य) वस्तू त्यांच्यासाठी अवैध ठरवल्या ज्या त्यांना विधिवत होत्या.

१६१) त्यांचं व्याजबट्टा घेणं- त्यांना मनाई केलेली असतानादेखील- लोकांची संपत्ती वाममार्गांनी खाऊन टाकणं, आम्ही त्यांच्यामधील नाकारणाऱ्यांसाठी कठोर शिक्षा तयार ठेवलीय.

१६२) परंतु त्यांच्यापैकी ज्ञानाच्या बाबतीत परिपक्व आहेत आणि जे श्रद्ध लोक आहेत ते, तुमच्यावर जे अवतरलंय आणि तुमच्यापूर्वी जे अवतरलंय ते मान्य करतात, नमाज कायम करतात आणि जकात अदा करतात आणि अल्लाह व अंतिम दिनाला मान्य करतात, अशा लोकांना आम्ही नक्कीच मोठा मोबदला देऊ.

१६३) आम्ही तुमच्याकडं जे दिव्य प्रकटन पाठवलं तसेच तुमच्यापूर्वी नूह आणि त्यांच्या नंतरच्या प्रेषितांकडं दिव्य प्रकटन पाठवलं होतं, तसेच इब्राहीम, इस्माईल व इस्हाक आणि याकुब आणि (त्यांच्या) संततीकडे, तसेच ईसा व अय्यूब, यूनुस, हारुन, सुलैमान यांना आणि दाऊद यांना, आम्ही जबूर (धर्मग्रंथ) दिला.

१६४) आणि काही प्रेषित ज्यांचं कथानक आम्ही पूर्वी तुम्हाला सांगितलं

आणि काही इतर प्रेषित ज्याचं कथानक आम्ही तुम्हाला ऐकवलं नाही आणि मूसा (अ.) यांच्याशी तर अल्लाहनं (प्रत्यक्ष) बोलणं केलं.

१६५) शुभवार्ता देणारे तसेच सावध करणारे प्रेषित पाठवले होते जेणेकरून या प्रेषितांनंतर लोकांना अल्लाहशी वाद घालण्यास वाव नसावा. आणि अल्लाह प्रभुत्वशाली प्रतिभासंपन्न आहे.

१६६) अल्लाह तर यासाठी साक्ष देतो जे त्यानं तुमच्याकडं अवतरलं ते आपल्या ज्ञानानं अवतरलेलं आहे देवदूतदेखील याची साक्ष देतात. (पण) अल्लाहची साक्ष पुरेसी आहे.

१६७) निश्चितच जे लोक नाकारतात आणि इतरांनाही अल्लाहच्या मार्गापासून रोखतात ते मार्गभ्रष्टतेत लांब निघून गेलेले आहेत.

१६८) निश्चितच जे लोक (धर्माला) नाकारतात आणि अत्याचार माजवितात, त्यांना अल्लाह कधी क्षमा करणार नाही नि रास्त मार्गही दाखवणार नाही.

१६९) नरकाचा तेवढा मार्ग वगळता ज्यात ते कायम तिथंच राहतील आणि अल्लाहसाठी हे करणं सोपं आहे.

१७०) लोकहो, तुमच्या विधात्याकडून तुमच्याकडं सत्यतेसहित प्रेषित आलेत. तेव्हा त्यांना मान्य केले तर ते तुमच्या भल्याचं आहे. पण जर तुम्ही नाकारलं तरी आकाश आणि पृथ्वीत जे काही आहे अल्लाहसाठीच आहे. आणि अल्लाहला सर्वकाही अवगत असून तो प्रतिभावंत आहे.

१७१) ग्रंथधारक लोकहो, आपल्या धर्मात अतिरेक करू नका आणि अल्लाहविषयी सत्य असेल तेच सांगा. मरयमपुत्र ईसा मसीह अल्लाहच्या एका प्रेषिताव्यतिरिक्त काही नव्हते. एक आदेश मरयमकडं पाठवला, अल्लाहकडंचा आत्मा, तेव्हा अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांवर श्रद्धा धारण करा. आणि (ईश्वर) तीन आहेत असे म्हणू नका. (अशा गोष्टींपासून) दूरच राहणं तुमच्या भल्याचं आहे. अल्लाह एकमेव उपास्य आहे. पुत्र धारण करण्यापासून तो पवित्र आहे. आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही त्याचंच आणि ते हाताळण्यासाठी

तो पुरेसा आहे.

१७२) मसीहना तसेच त्यांच्या जवळील देवदूतांना अल्लाहची भक्ती करण्यास मुळीच संकोच नव्हता. ज्या कुणाला त्याची भक्ती करणं कमीपणाचं वाटतं आणि ते अहंकार करत असतील तर तो त्यांना लवकरच आपल्याकडं एकवटणार आहे.

१७३) आणि जे लोकं श्रद्धा बाळगून भली कामं करतील तो त्यांना त्याचा पुरेपूर मोबदला देईल, आपल्या औदार्यानं काही अधिकच. आणि ज्या लोकांनी तिटकारा केला आणि उद्धट राहिले त्यांना तो कठोर शिक्षा देईल. त्यांना आपल्या मदतीला मित्र म्हणून अल्लाहव्यतिरिक्त कुणी आढळणार नाही.

१७४) लोकहो, तुमच्याकडं तुमच्या विधात्याकडून पुरावा आलेला आहे. आम्ही तुमच्याकडे दिव्य प्रकाश पाठवलाय.

१७५) ज्या लोकांनी अल्लाहवर श्रद्धा धारण केली आणि त्यास घट्ट धरून राहिले, त्यांना तो लवकरच आपल्या दया आणि औदार्यात दाखल करील आणि त्यांना स्वत:कडं येण्यास सरळमार्गाचं दर्शन घडवील.

१७६) ते विचारताहेत तुम्हाला, त्यांना सांगा, अल्लाह 'कलाला'च्या बाबतीत आदेश देतो. जर असा माणूस मरण पावला ज्याचा कोणी मुलगा नसेल, त्याची बहीण असेल तर त्या बहिणीला त्यांनी सोडलेल्या (संपत्तीतून) अर्धा वाटा मिळेल. आणि जर त्या बहिणीला कोणी संतती नसेल तर तो तिचा वारस होईल. जर मरण पावलेल्याच्या दोन बहिणी असतील तर त्यांच्यासाठी त्यांच्या भावानं सोडलेल्या मालमत्तेतून दोन तृतियांश वाटा आहे. आणि जर भाऊ-बहीण काही स्त्रिया आणि काही पुरुष असतील तर एका पुरुषासाठी दोन स्त्रियांच्या वाट्याएवढा हिस्सा मिळेल. अल्लाह तुमच्यासाठी स्पष्ट करून सांगतो तुम्ही चुकू नये म्हणून. अल्लाहस प्रत्येक बाबीची माहिती असते.

-------

# ५. सूरह अल-माईदा

**मदीनाकालीन आयती १२०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) श्रद्धावंत लोकहो, करारांचे पालन करा, तुमच्यासाठी, ज्यांच्याविषयी तुम्हाला सांगितलं जाईल ते सोडून चतुष्पाद वर्गातील सर्व प्राणी वैध आहेत. पण तुम्ही एहराम (हजदरम्यान परिधान केली जाणारी वस्त्रं) घातले असता, शिकार (करणं) वैध ठरवू नका. अल्लाह आपल्या मर्जीनुसार आज्ञा करतो.

२) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहच्या संकेतांचं अनादर करू नका, तसेच पावन महिन्यांचं, बळीसाठीच्या प्राण्यांचं, त्या प्राण्याच्या गळ्यात घातलेल्या पट्ट्यांचा, तसेच काबागृहास येणाऱ्यांचं, जे आपल्या विधात्याच्या अनुगृह आणि प्रसन्नतेच्या शोधात येतात. एहरामची वस्त्रं उतरवल्यास मग तुम्ही शिकार करू शकता. ज्या समूहानं तुमच्यासाठी काबागृहाचा मार्ग रोखून ठेवला होता, त्या समूहाशी शत्रुत्व पाळण्यात अतिरेक करू नका. नेकी आणि सदाचारांत एकमेकांची मदत करा, पण पाप आणि आकस यामध्ये तुम्ही मदत करू नका. अल्लाहची भीती बाळगा, अल्लाहची शिक्षा कठोर असते.

३) तुम्हास निषिद्ध केले गेले आहेत मृत प्राणी, रक्त, डुकराचं मांस, अल्लाहस सोडून इतर कोणाच्या नावानं ज्या (प्राण्याचा) बळी देण्यात आला असेल ते, गळा दाबल्यानं मरण पावलेला, अथवा जोरात आदळल्यानं मरण पावलेला, वरून खाली कोसळून, अथवा शिंग खुपसल्यानं मारला गेलेला असेल तो, अथवा एखाद्या वन्य पशुनं अर्धवट खाऊन सोडलेला. जर तुम्ही त्याचा रीतसर वध केला असेल तर ते वेगळं. तसेच ज्या प्राण्यांचा वेदीवर बळी देण्यात आला असेल ते आणि शकुनी बाणं फेकून वाटप केलेले मांस. हे अपराध आहे. आज विद्रोहींना तुमच्या धर्माशी पार निराशा झालीय. तेव्हा त्यांना भिऊ नका, माझी भीती बाळगा. आज तुमचा धर्म तुमच्यासाठी

परिपूर्ण करण्यात आला. आणि तुमच्यावरील माझ्या अनुग्रहाची पूर्तता केली, तुमच्यासाठी धर्म म्हणून इस्लामची निवड केली. जर कुणावर उपासमारी ओढवली असेल, पण अपराधाची ओढ नसेल तर अल्लाह क्षमा करतो आणि दयाही दाखवतो.

४) ते विचारतात, त्यांच्यासाठी काय वैध ठरवलं गेलंय? त्यांना सांगा, सर्व पवित्र वस्तू तुमच्यासाठी वैध केल्या गेल्यात. आणि तुम्ही अल्लाहनं दिलेल्या ज्ञानाच्या आधारानुसार शिकार करण्याचं प्रशिक्षण देतात अशा शिकारी जनावरांनी शिकार करून तुमच्यासाठी आणलंय त्यातून खा. त्यांच्यावर अल्लाहच्या नाव घ्या आणि अल्लाहशी भीत राहा. हिशेब घेण्यात अल्लाह तत्पर आहे.

५) आज पवित्र आणि उत्तम गोष्टी वैध ठरल्या गेल्यात. ग्रंथधारकांकडंचं अन्न तुमच्यासाठी आणि तुमच्याकडील अन्न त्यांच्यासाठी वैध ठरवलं गेलंय. श्रद्धावंतांमधील मर्यादाशील स्त्रिया तसेच तुमच्यापूर्वीच्या ग्रंथधारकांमधील मर्यादाशील स्त्रिया वैध असून तुम्ही त्यांना महेरची रक्कम देऊन विवाहबंधनात आणू शकता. व्यभिचार करण्यास आणि गुप्त संबंध ठेवण्यासाठी नव्हे. ज्यांनी विश्वासघात केला त्यांची सर्व कर्मं वाया गेली. आणि अंतिम दिनीदेखील तो आत्मघात करून घेणारा आहे.

६) श्रद्धावंत लोकहो, नमाजसाठी उभारण्याकरिता आपली तोंडवळा आणि हात कोपरापर्यंत धूत जा, डोक्यावरून (पाण्याचा) हात फिरवा, आपला पाय घोट्यापर्यंत धुवा. तुम्ही अपवित्र असल्यास (आंघोळ करून) चांगल्याप्रकारे स्वच्छ व्हा. पण जर तुम्ही आजारी असाल अथवा प्रवासात असाल अथवा नैसर्गिक विधी उरकून आला असाल अथवा स्त्रियांशी शारीरिक संबंध ठेवला असेल, आणि तुम्हास पाणी मिळेनास झाल्यास स्वच्छ मातीवर हात फिरवून ते आपल्या तोंडावर आणि हातांवर फिरवा, अल्लाह तुम्हाला स्वच्छ करू इच्छितो. तुम्हाला अडचणीत टाकणं त्याला आवडत नाही. तो तुम्हाला अनुग्रहानं संपन्न करू इच्छितो, तुम्ही त्याचं आभार मानावं म्हणून.

७) तुमच्यावरील अल्लाहच्या उपकारांची आठवण करा. त्याच्याशी केलेल्या कराराची, जेव्हा तुम्ही म्हटलं होतं, 'आम्ही ऐकलं आणि मान्य केलं' अल्लाहची भीती बाळगा. निश्चितच मनामधील गोष्टी अल्लाहच्या माहितीत असतात.

८) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहच्या बाजूनं न्यायाची साक्ष देण्यास उभं राहा. एखाद्या जनसमूहाचं शत्रुत्व तुम्हाला त्याच्याशी अन्याय करण्यास प्रवृत्त करता कामा नये. न्याय करा, हे ईशपरायणतेशी निगडीत आहे. अल्लाहची भीती बाळगत राहा. तुम्ही जे काही करत असता त्या सर्व गोष्टी अल्लाहला अवगत असतात.

९) जे लोक विश्वास धारण करून भली ती कामं करत राहतील, अल्लाह त्यांना क्षमा करून मोठा मोबदला देण्यास बांधील आहे.

१०) पण ज्या लोकांनी नाकारलं, आमची वचनं मोडीत काढली, असेच लोक नरकाचे धनी आहेत.

११) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहचे तुमच्यावरील उपकार आठवा जेव्हा एका समूहानं तुमच्यावर हात उगारण्याचा निश्चय केला होता तेव्हा त्यानं ते हात थोपवून धरले, (म्हणून) अल्लाहचीच भीती राखा आणि श्रद्धावंत लोक तर अल्लाहवरच भिस्त ठेवत असतात.

१२) अल्लाहनं इस्राईलच्या संततीकडून वचन घेतलं होतं, आम्ही (अल्लाह) त्यांच्यामध्ये बारा सरदार नेमून दिले होते आणि अल्लाहनं म्हटलं होतं की जर तुम्ही नियमित नमाजचे पठण केलं, जकात अदा करत राहिला, माझ्या प्रेषितांवर विश्वास ठेवला आणि त्यांना मदत केली आणि अल्लाहला उत्तम कर्ज (भक्ताच्या दानधर्माच्या कर्मास अल्लाह भक्ताकडून कर्ज संबोधतो) दिलं तर मी त्यांच्या अपराधांना त्यांच्यापासून दूर सारीन आणि त्यांना अशा स्वर्गात दाखल करीन ज्याखालून नद्या वाहत असतील. पण नंतर ज्यानं नकार दिला तो रास्त मार्गापासून भरकटला गेला.

१३) त्यांनी कराराचा भंग केल्यानं अल्लाहनं त्यांना धिक्कारलं, त्यांच्या

हृदयांना कठोर केलं, त्यांनी ग्रंथातील शब्दांचा मूळ अर्थ बदलून टाक. आणि ज्या मोठ्या भागाचं त्यांना स्मरण करून दिलं होतं ते विसरून टाकला. त्यांच्यामधील काहींना वगळता त्यांच्यामधील इतरांकडून होत असलेल्या विश्वासघाताची तुम्हाला माहिती मिळत असते त्यांना क्षमा करून टाका, सोडून द्या. अल्लाह उपकार करणाऱ्यांना पसंत करतो.

१४) आणि ज्या लोकांचं म्हणणं होतं, आम्ही नसारा (येशू ख्रिस्ताचे मदतनीस म्हणजे ख्रिस्ती लोक.) आहोत म्हणून आम्ही त्यांच्याकडून वचन घेतलं, मग नंतर त्यांना जे शिकवण दिली होती, त्यातील मोठा भाग त्यांनी विसरून टाकला. आम्ही त्यांच्यादरम्यान निर्णयाचा दिवस (येई)पर्यंत शत्रुत्व रोवले आणि अल्लाह त्यांना लवकरच ते काय करत होते ते दाखवून देईल.

१५) ग्रंथधारक लोकहो, तुमच्याकडं आमचे प्रेषित (मुहम्मद स.) आलेले आहेत, तुम्ही ग्रंथांमधील बराच (भाग) दडवून ठेवत होता तो उजेडात आणण्यासाठी. आणि कितीतरी गोष्टींकडे ते दुर्लक्ष करतात. तुमच्याकडं अल्लाहकडून एक प्रकाश आणि स्पष्ट ग्रंथ आलाय.

१६) त्याद्वारे अल्लाह अशा लोकांचं मार्गदर्शन करतो जे त्याच्या प्रसन्नतेच्या अधीन असतील शांतता आणि सुरक्षिततेकडं. आणि त्यांना आपल्या आज्ञेनं अंधारातून (काढून) प्रकाशाकडं नेतो आणि त्यांना रास्त मार्गाकडं संचलित करतो.

१७) जे लोक म्हणतात, मरयमपुत्र मसीहच अल्लाह आहे, ते निश्चितच विद्रोही लोक ठरले. त्यांना विचारा, अधिकार कोणाचा? अल्लाहविरूद्ध थोडासुद्धा? त्यांनी इच्छिले तर मरयमपुत्र मसीह आणि त्याच्या मातेला आणि पृथ्वीतील सर्वांचा नाश करून टाकील, कारण आकाश आणि पृथ्वी तसेच यामध्ये जे काही आहे ते अल्लाहच्या मालकीचं. इच्छितो ते निर्माण करतो, त्याची सत्ता प्रत्येक बाबीवर आहे.

१८) ज्यू धर्मिय आणि ख्रिस्ती म्हणतात, आम्ही अल्लाहची लेकरं असून त्याचे आवडते आहोत. त्यांना विचारा, मग अल्लाह त्यांच्या अपराधांपायी त्यांना शिक्षा का देतो? नव्हे तुम्हीदेखील त्याच्या

निर्मितीमधीलच माणसं आहात. तो आवडेल त्यांना क्षमा करतो आणि वाटेल त्यांना शिक्षा देतो. आकाश आणि पृथ्वी आणि त्यामधील सारंकाही त्यासाठीच, त्याच्याकडंच सर्वांना जायचंय.

१९) ग्रंथधारक लोकहो, प्रेषितांच्या शृंखलेतील आमचा प्रेषित दीर्घकाळानंतर तुम्हाला (सत्य) स्पष्ट करून देण्यासाठी आलेला आहे. नाहीतर तुम्ही म्हणाल, आमच्याकडं कुणी सुवृत्त देणारा आला नाही की सावध करणारा आला नाही. पण आता आलेत तुम्हाला सुवृत्त देणारे आणि सावध करणारे. अल्लाह प्रत्येक बाबीवर प्रभुत्व राखतो.

२०) आठवण करा, मूसानं आपल्या लोकांना सांगितलं ते; लोकहो, तुमच्यावर अल्लाहनं केलेलं वरदान आठवा, तुमच्यातून त्यानं प्रेषित बनवले आणि सत्ताधारी बनवले आणि जगात इतर कुणालाही जे दिलं नाही ते तुम्हाला दिलं.

२१) माझ्या लोकांनो, पवित्र भूमीत प्रवेश करा, जी अल्लाहनं विधीपूर्वक तुम्हाला बहाल केली आणि मागं वळू नका. नाहीतर तुम्ही स्वत:चा घात करून घ्याल.

२२) त्यांनी (त्यांच्या समूहांनी) उत्तरादाखल सांगितलं, मूसा! त्या भूमीत शक्तिशाली लोक राहतात, ते सोडून जात नाहीत तोवर आम्ही नाही प्रवेश करणार, ते जर तिथून निघून गेले तर आम्ही नक्कीच प्रवेश करू.

२३) त्यामधील (अल्लाहला) भिणारी दोन माणसं, ज्यांच्यावर अल्लाहनं कृपा केली होती, म्हणाली, तुम्ही वेशीतून त्यांच्यावर हल्ला करा. तुम्ही आत शिरलात की विजय तुमचाच. आणि तुम्ही निष्ठावंत असाल तर अल्लाहवर विश्वास ठेवा.

२४) ते लोक म्हणू लागले, ते लोक तेथे आहेत तोपर्यंत आम्ही नाही आत जाणार, तुम्ही आणि तुमचा विधाता (दोघं) जा आणि त्यांच्याशी लढा, आम्ही इथंच बसून राहू.

२५) मूसा म्हणाले, माझ्या विधाता! माझा अधिकार माझ्या स्वत:वर आणि

माझ्या भावावर आहे, तेव्हा आम्हाला या अपराधी लोकांपासून भिन्न कर.

२६) (अल्लाहनं) सांगितलं, ही भूमी पुढील चाळीस वर्षं त्यांच्यासाठी निषिद्ध केली गेली. ते वस्तीत भरकटतत फिरतील. अशा बंडखोरांबाबत तुम्ही दुःखी होऊ नका.

२७) त्यांना आदम यांच्या पुत्रांची सत्य हकीकत सांगा. जेव्हा दोघांनी बळी दिला, त्यातील एकाचा बळी आम्ही स्वीकारला आणि दुसऱ्याचा स्वीकारला नाही. (त्यावर) तो म्हणाला, मी नक्कीच तुला ठार मारीन. दुसऱ्यानं उत्तर दिलं, अल्लाह सदाचारी लोकांकडंचंच स्वीकारत असतो.

२८) तू मला मारण्यासाठी जरी माझ्यावर हात उगारला तरी मी तुझा वध करण्याकरिता माझा हात उचलणार नाही. मी तर अल्लाहला भितो, तो अखिल विश्वाचा विधाता आहे.

२९) माझी तर अशी इच्छा आहे की तू माझा आणि तुझ्या स्वतःच्या गुन्ह्यासाठी जबाबदार धरला जाऊन जे नरकाचे धनी आहेत, तूही त्यांच्यातलाच होऊन जावे. कारण अत्याचारी लोकांसाठी हीच योग्य शिक्षा आहे.

३०) आणि त्याच्या स्वार्थानं त्याला आपल्या भावाची हत्या करण्यास भाग पाडलं, त्यानं त्याचा वध केला आणि (सर्वकाही) गमावून बसला.

३१) तेव्हा अल्लाहनं एक डोमकावळा पाठवला जमीन खरडत, त्याच्या भावाचा मृतदेह कसा लपवता येईल हे दाखवण्यासाठी. (आणि) तो म्हणू लागला, किती अपमानास्पद गोष्ट ही, मी त्या कावळ्यासारखं तरी झालो असतो, आपल्या भावाचा मृतदेह मला लपवता आला असता. नंतर तो पश्चात्ताप करू लागला.

३२) याच घटनेवरून आम्ही इस्राईलच्या संततीला हे नियम घालून दिले की, जर कुणी एखाद्या व्यक्तीचा वध केला आणि तो दुसऱ्या व्यक्तीच्या खुनाच्या बदल्यात अथवा भूमीत उपद्रव माजवण्यासाठी नसेल तर

त्यानं जणू सर्व मानवजातीची हत्या केली. आणि जर कुणी एखाद्याचा जीव वाचवला तर त्यानं जणू साऱ्या लोकांचे प्राण वाचवले. आमचे प्रेषित स्पष्ट संकेतांसह आलेत. यानंतरदेखील त्यांच्यातले बऱ्यापैकी लोक (ज्यू लोक) पृथ्वीमध्ये अतिरेक माजवत आहेत.

३३) जे लोक अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी युद्ध करतात. धरतीवर उपद्रव माजविण्यासाठी झटत राहतात त्यांच्यासाठी हीच शिक्षा आहे. त्यानं ठार मारणं अथवा सुळावर चढवणं आणि विरूद्ध दिशेनं त्याचे हात आणि पाय कापणं किंवा त्यांचं देशातून हद्दपार करणं. या जगातील हेच त्यांचा अपमान असेल आणि परलोकात तर त्यांच्यासाठी भयंकर शिक्षा आहे.

३४) पण तुम्ही त्यांच्यावर ताबा मिळवण्याआधी जे लोक पश्चात्ताप व्यक्त करतील, तेव्हा हे जाणून घ्या, अल्लाह क्षमाशील आणि कृपावंत आहे.

३५) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहला भीत राहा आणि त्याचं सान्निध्य लाभावं यासाठी प्रयत्न करा आणि त्याच्या मार्गात संघर्ष करा म्हणजे तुमचा उत्कर्ष घडेल.

३६) पण ज्यांनी बंड पुकारलं त्यांनी जमिनीत असलेलं सर्वच्या सर्व व त्याच्या दुप्पटदेखील, अंतिम निर्णयदिनी आपल्या शिक्षेच्या बदल्यात देऊ केला, तरीदेखील ते त्यांच्याकडून स्वीकारलं जाणार नाही. त्यांच्यासाठी तर यातनादायक शिक्षा आहेच.

३७) ते नरकाग्नीतून पळ काढण्याची इच्छा बाळगतील, पण तिथून निघून जाणं त्यांना जमणार नाही. त्यांच्यासाठी ती कायमची शिक्षा आहे.

३८) पुरुष अथवा स्त्री चोर असतील तर त्या दोघांचे हात कापून टाका. त्यांनी केलेल्या (दुष्कर्माची) ही शिक्षा आहे. अल्लाहकडडून त्यांना अद्दल घडवण्यासाठी. अल्लाह प्रभुत्वशाली आणि प्रतिभासंपन्न आहे.

३९) जो आपल्या अत्याचाराविषयी पश्चात्ताप व्यक्त केला आणि सुधारला तर अल्लाह त्याच्याकडं वळतो, कारण तो क्षमाशील आणि कृपावंत

आहे.

४०) तुम्हाला माहिती नाही आकाश आणि पृथ्वी अल्लाहच्याच अधिराज्यात आहेत ते? हवं त्याला शिक्षा देईल आणि मर्जीस येईल त्याला तो सोडून देईल. सर्व बाबी अल्लाहच्याच अधीन आहेत.

४१) हे प्रेषित! काही लोक आपल्या तोंडानं जरी श्रद्धा बाळगण्याचं सांगत असतात तरीदेखील त्यांना ते नाकारण्याचीच घाई असते त्याचं तुम्हाला मुळीच दु:ख नको. त्यांच्या हृदयात श्रद्धा नसतेच. ज्यू लोकांमधील (काहीजण) खोट्या गोष्टींची हेरगिरी करतात, हेर आहेत दुसऱ्या लोकांसाठी जे तुमच्यापर्यंत आलेच नाहीत. शब्दांना त्यांच्या मूळ अर्थापासून फिरवतात. ते म्हणतात, जर तुम्हाला दिलं गेलं तर ते घ्या आणि नसेल तर ते मागू नका. अल्लाहनेच ज्यांना उपद्रवात अडकवण्याचं ठरवलं असेल त्यांना अल्लाहकडून वाचवणे तुमच्या हातात नाही. ही अशी माणसं आहेत ज्यांची मनं अल्लाह पवित्र करू इच्छित नाही. त्यांना या जगात नामुष्की आहे आणि परलोकात तर त्यांच्यासाठी भयंकर शिक्षा आहे.

४२) खोट्या (उद्दिष्टांसाठी) हेरगिरी करणारे आणि अवैध ते खाणारे, जर तुमच्याकडं आले तर तर तुम्ही त्यांच्यामध्ये निर्णय द्या किंवा नकार द्या. आणि तुम्ही नाकारलं तरी तुम्हाला काहीही करू शकणार नाहीत. पण जर तुम्ही त्यांच्यात निर्णय द्याल तर तो निर्णय न्यायावर आधारित असावा, कारण न्याय करणारे अल्लाहचे आवडते असतात.

४३) पण ते तुम्हाला न्याय करण्यासाठी कसं बोलवतील, त्यांच्याकडं तोरह (ग्रंथ) असताना ज्यामध्ये अल्लाहचे आदेश आहेत. तरीदेखील ते मागं फिरतात नव्हे ते मानणारे लोक नाहीत.

४४) निश्चितच आम्ही तोरह (ग्रंथ) अवतरला, त्यामध्ये मार्गदर्शन आणि प्रकाश आहे. त्याद्वारे आमचे प्रेषित आज्ञा देत असत. ते आज्ञाधारक होते. ज्यू लोकांना आणि त्यांचे धर्मपंडित आणि धर्मशास्त्रींना कारण त्यांना अल्लाहच्या ग्रंथाचं संरक्षण करणं आणि त्याची देखरेख करण्याची जबाबदारी होती. तेव्हा तुम्ही लोकांना भिऊ नका, माझी भीती बाळगा

आणि माझ्या वचनांना काडीमोल विकू नका. जे अल्लाहनं अवतरलं त्यानुसार न्याय करत नसतात असेच लोक विद्रोही आहेत.

४५) आणि आम्ही या ग्रंथाद्वारे त्यांच्यावर विहित केलं जिवासाठी जीव, डोळ्यासाठी डोळा, नाकासाठी नाक आणि कानासाठी कान आणि दातासाठी दात आणि दुखापत झाल्यास त्याचाही बदला आहे. जर कुणी माफ केलं तर तो त्याच्याकडून झालेल्या पापांच्या क्षमेसाठी (कफ्फारा) पश्चात्ताप असेल. आणि जे लोक त्यानुसार न्याय करत नाहीत ते वास्तविक अन्यायी आहेत.

४६) आम्ही त्यांच्या (मूसाच्या) पाठोपाठ मरयमपुत्र ईसा यांना पाठवलं, त्यांच्यापूर्वी तोरहमध्ये जे आलं होतं त्याची पुष्टी करणारा. आणि त्यांना आम्ही इंजील (न्यू टेस्टामेंट) (ग्रंथ) दिला, ज्यात मार्गदर्शनासाठी प्रकाश आहे. आणि त्यापूर्वी जी काही तोरहमध्ये सदाचारींना मार्गदर्शनपर शिकवण दिली गेली होती त्याची पुष्टी करणारा.

४७) आणि इंजीलधारक असतील त्यांचा न्यायनिवाडा त्यामध्ये अल्लाहनं जे पाठवलंय त्यानुसार करण्यासाठी आणि अल्लाहनं पाठवलंय त्यानुसार न्यायनिवाडा करत नाहीत, अशीच माणसं अपराधी असतात.

४८) आम्ही तुमच्याकडं सत्यासहित धर्मग्रंथ पाठवला, त्यापूर्वी जे धर्मग्रंथ पाठवले गेलेत त्यांची पुष्टी करणारा आणि त्यांचे रक्षण करणारा. तेव्हा त्यांच्यामध्ये अल्लाहनं पाठवलंय त्यानुसार न्याय करा, आपल्या इच्छांच्या मागं जाऊ नका. तुमच्याकडं सत्य आल्यानंतर. तुमच्यामधील प्रत्येकासाठी (वेगळा) कायदा आणि मार्ग नेमून दिलेला आहे. अल्लाहची तशी इच्छा असती तर त्यानं तुम्हाला एकच समुदाय बनवलं असतं, पण तुम्हाला त्यांन जे दिलंय त्याद्वारे तुमची परीक्षा घेणं त्यानं ठरवलंय. तेव्हा तुम्ही सदाचारात एकमेकांच्या पुढं जाण्याचा प्रयत्न करा. तुम्हा सर्वांना अल्लाहकडंच एकत्र व्हायचंय. तुम्ही ज्या गोष्टींविषयी मतभेद करत होता तो तुम्हाला त्या दाखवून देईल.

४९) अल्लाहनं पाठवलंय त्यानुसार न्याय करा, त्यांच्या इच्छांचे अनुसरण रकू नका. आणि अल्लाहनं जे तुमच्याकडं पाठवलंय त्यापासून

त्यांनी तुमची फसवणूक करू नये म्हणून त्याच्यापासून सावधानता बाळगा. आणि जर ते मागं फिरतील तर लक्षात असू द्या, त्यांनी केलेल्या अपराधांपायी त्यांना संकटात टाकण्याचं अल्लाहनं ठरवलंय त्यांच्यापैकी बहुतेक लोक अपराधी आहेत.

५०) त्यांना अज्ञानकाळातील रुढी-परंपरा पाळायच्या आहेत का? विश्वास धारण करणाऱ्यांना अल्लाहपेक्षा इतर कोण उत्तम न्याय देणार?

५१) हे श्रद्धावंत लोकहो, ज्यू आणि ख्रिस्तींना आपले वाली बनवू नका. ते एकमेकांचे मित्र आहेत. तुमच्यापैकी ज्यानं त्यांच्याशी मैत्री केली तो त्याच्यामधलाच असेल. अत्याचारी लोकांना अल्लाह कधीच मार्ग दाखवत नाही.

५२) तुम्ही पाहू शकता, ज्यांच्या मनात विकृती आहे ते त्यांच्याकडं (ज्यू आणि ख्रिस्तींकडं) धावून जातात. त्यांच्या मते, आम्ही संकटाच्या कालचक्रात अडकू नये. कदाचित अल्लाह तुम्हाला लवकरच विजयी करील किंवा आपल्या इच्छेनुसार असा निर्णय लावील तेव्हा त्यांनी आपल्या मनांमध्ये जे जोपसलं होतं त्यावर त्यांना पश्चात्ताप होईल.

५३) आणि जे श्रद्धावंत लोक आहेत ते म्हणतील, हेच का ते लोक जे अल्लाहच्या शपथा घेऊन सांगत असत, आम्ही तुमच्याच बरोबर आहोत. त्यांची सर्व कर्मं वाया गेली आणि त्यांनी विनाश पत्करला.

५४) श्रद्धावंत लोकहो, तुमच्यापैकी जर कुणी आपल्या धर्मापासून मागं फिरला तर अल्लाह लवकरच एक अशा समुदायाला उदयास आणील ज्यांना अल्लाहची आवड असेल आणि तो अल्लाहचा आवडता (समुदाय) असेल. श्रद्धावंतांसाठी त्यांच्या मनामध्ये विनम्रता असेल आणि बंडखोरांना भारी पडतील. अल्लाहच्या मार्गात संघर्ष करतील. अपमानित करणाऱ्यांच्या अपमानाला भिणार नाहीत. हे अल्लाहचं वरदान आहे. ज्यांना इच्छितो त्यांना ते प्रदान करतो. अल्लाह सर्वव्यापी ज्ञान बाळगणारा आहे.

५५) तुमचा वाली तर अल्लाह, त्याचा प्रेषित आणि श्रद्धावंत लोक आहेत

जे नियमित नमाजचे पठण करतात, जकात अदा करतात आणि (अल्लाहपुढं) विनम्रतेनं वाकतात.

५६) आणि जे लोक अल्लाह, त्याचे प्रेषित आणि त्यांना मानणाऱ्यांना आपला मित्र करतात ते अल्लाहच्या पक्षातले आहेत, त्यांना वर्चस्व लाभणारच.

५७) श्रद्धावंत लोकहो, जे ग्रंथधारक आणि नाकारणारे तुमच्या धर्माचा खेळ मांडून थट्टा करतात अशांना आपला वाली बनवू नका. तुम्ही श्रद्धा धारण केल्यानंतर फक्त अल्लाहचीच भीती बाळगा.

५८) जेव्हा तुम्ही नमाजसाठी (लोकांना) हाक देता, ते त्याची थट्टा करून खेळ करतात. त्या लोकांना समज नसल्यानं ते असं करतात.

५९) ग्रंथधारकांना विचारा, तुमचा संताप एवढ्यासाठी की आम्ही अल्लाहवर विश्वास ठेवून त्यानं जे पाठवलं, तसेच त्याआधी जे पाठवलं ते मान्य करतो, तुमच्यापैकी बहुतेक लोक अपराधी आहेत.

६०) त्यांना विचारा, मी दाखवून देऊ त्यांना, अल्लाहनं ज्यांना धिक्कारलं, आणि ज्यांच्यावर त्याचा प्रकोप कोसळला, त्यांच्यामधील काहींना माकडं आणि डुकरं बनवलं. यापेक्षा अधिक वाईट अवस्था ती कोणती? त्यांनी बंडखोरांची भक्ती केली म्हणूनच (हे सगळं). या लोकांची ही प्रचंड वाईट अशी अवस्था आहे, कारण ते सन्मार्गापासून भरकटलेले आहेत.

६१) ते तुमच्याकडं आम्ही विश्वासू आहोत असं म्हणत येतात. पण तुमच्याकडं आले तेव्हादेखील ते नाकारणारेच होते आणि त्याच अवस्थेत ते परतले. ते जे काही लपवताहेत अल्लाहला त्याची माहिती आहे.

६२) त्यांच्यापैकी बरेचजण पाप आणि अतिरेक माजविण्यात आणि तसेच निषिद्ध आहे ते खाण्यात चुरस करताना तुम्हाला आढळतील. ते जे काही करताय ते वाईट आहे.

६३) मग त्यांच्यामधील ईशभक्त आणि धर्मपंडित का प्रतिबंध करत नाहीत, त्यांना त्यांचे पापी बोलणे आणि मनाई केलेल्या वस्तू खाण्यापासून. त्यांची कृत्यंदेखील अत्यंत वाईट आहेत.

६४) ज्यू लोक म्हणतात, अल्लाहचे हात बांधलेले आहेत. त्यांचेच हात बांधले जावेत. त्यांच्या म्हणण्याचा धिक्कार असो. अल्लाहचे हात तर उदार आहेत, तो इच्छितो त्यानुसार (सढळ हातानं) खर्च करतो. तुमच्या विधात्यानं तुम्हावर जे अवतरलंय त्यामुळं तर त्यांची बंडखोरी आणि विद्रोही वृत्ती आणखी वाढीस लागणारे आहे. आम्ही त्यांच्यामध्ये निर्णयाच्या दिवसापर्यंत वैर आणि मत्सर रोवलाय. जेव्हा जेव्हा ते युद्धाची ठिणगी पेटवतात अल्लाह ती विझवून टाकतो. ते भूतलावर अनाचार माजवीत हिंडत आहेत, अल्लाहला अनाचारी लोक मुळीच आवडत नसतात.

६५) ग्रंथधारकांनी जर श्रद्धा बाळगली असती आणि सदाचार अंगीकारला असता तर आम्ही त्यांच्यातील वाईट गोष्टी दूर सारून त्यांना संपन्न अशा स्वर्गात प्रवेश दिला असता.

६६) त्यांनी जर तोरह आणि इंजील (मधील शिकवण) आणि त्यांच्या विधात्यानं जे पाठवलंय ते कायम ठेवलं असतं तर त्यांना वरून आणि खालून खाण्यासाठी (सर्वकाही) लाभलं असतं. त्यांच्यामधील एक गट सरळमार्गावर आहे, पण त्यांच्यातले बरेचजण मात्र वाईट कृत्यांत व्यस्त आहेत.

६७) हे प्रेषित, तुमच्या विधात्यानं तुमच्यावर पाठवलंय त्याचा प्रसार करा. जर तुम्ही तसं केलं नाही तर तुम्ही त्याचा संदेश पोचवला नाही. लोकांपासून अल्लाह तुमचं संरक्षण करील. नाकारणाऱ्यांना अल्लाह कधीही मार्गदर्शन घडवत नाही.

६८) ग्रंथधारकांना सांगून टाका, जर तुम्ही तोरह व इंजील आणि तुमच्या विधात्याकडून जे अवतरलंय ते स्थापन करत नसल्यास तुमचा मूळ आधारच नाही. पण तुमच्या विधात्यानं तुमच्यावर जे अवतरलंय त्यामुळं त्यांच्यातल्या बऱ्याच जणांची बंडखोरी आणि द्रोह उफाळून

येईल. अशा नाकारणाऱ्यांविषयी तुम्ही मुळीच दु:खी होता कामा नये.

६९) श्रद्धावंत असोत की ज्यू, साबी असोत अथवा ख्रिस्ती जे कुणी अल्लाह आणि अंतिम दिनावर विश्वास ठेवतील आणि सत्कर्म करत राहतील त्यांना दु:खी आणि निराश होण्याचं कारण नाही.

७०) आम्ही इस्त्राईलच्या संततीकडून वचन घेतलं होतं. त्यांच्याकडं प्रेषित पाठवलेत. पण जेव्हा कधी त्यांच्याकडं त्यांच्या मनांना नकोसं होतं तेच प्रेषितांनी आणलं तेव्हा काहींना त्यांनी खोटं ठरवलं तर काहींचा वध केला.

७१) त्यांना वाटले, असं केल्यानं त्यांच्याशी काही वाईट घडणार नाही. जणू ते स्वत:हून आंधळे आणि बहिरे झाले. तरीदेखील अल्लाहनं त्यांचा पश्चात्ताप स्वीकारला. नंतर पुन्हा आंधळे आणि बहिरे झाले. ते जे काही करत असतात अल्लाह पाहत आहे.

७२) जे लोक मरयमपुत्र ईसाला अल्लाह संबोधतात ते खऱ्या अर्थानं नाकारणारे लोक आहेत. ईसा यांचं म्हणणं तर असं की हे इस्त्राईलची संतती, अल्लाहची भक्ती करा, तो माझा विधाता आहे आणि तुमचादेखील विधाता आहे. निश्चितच ज्यांनी अल्लाहचे भागीदार ठरवतात त्यांना अल्लाहनं स्वर्ग वर्ज्य केला, त्यांचं ठिकाण तर नरक आहे. आणि अशा अत्याचाऱ्यांना कुणी मदत करणार नाही.

७३) असे लोकदेखील विद्रोही होत, जे म्हणतात, अल्लाह तीनपैकी एक आहे. एकच एक अल्लाहव्यतिरिक्त कुणीही ईश्वर नाही. जर हे लोक परावृत्त झाले नाहीत तर असं म्हणणाऱ्यांपैकी ज्या लोकांनी नकार दिला त्यांच्यासाठी कठोर शिक्षा आहे.

७४) ते अल्लाहकडं का वळत नाहीत आणि त्याची क्षमा का मागत नाहीत? अल्लाह तर क्षमाशील आणि कृपावंत आहे.

७५) मरयमपुत्र ईसा एक प्रेषितापलीकडं कोणच नाही. त्याआधी कित्येक प्रेषित होऊन गेलेत, त्यांच्या माता सत्यवती आहेत. ते दोघंही अन्न खात असत. पाहा, आम्ही त्यांच्यासाठी आपली वचनं कसं स्पष्ट करतो

आणि पाहा, ते कसं पालते पडतात.

७६) त्यांना विचारा, तुम्ही अल्लाहस सोडून अशांची भक्ती करता ज्यांच्या हाती तुम्हाला इजा पोचवणे अथवा तुमचा लाभ घडवण्यासारखं काहीच नाही. अल्लाह तर ऐकणारा आणि जाण ठेवणारा आहे.

७७) त्यांना सांगा, ग्रंथधारक लोकहो, आपल्या धर्मात अतिरेक करू नका. तसेच अशा लोकांच्या आकांक्षांमागं जाऊ नका जे पहिल्यापासूनच मार्गभ्रष्ट झालेत. आणि त्यांनी कित्येकांची दिशाभूल केली आणि स्वत:देखील रास्त मार्गापासून भरकटले.

७८) इस्राईलच्या संततीपैकी नाकारणाऱ्या लोकांना दाऊद आणि मरयमपुत्र ईसा यांनी शापित झाले, कारण त्यांनी अवज्ञा केली आणि अतिरेक माजवला.

७९) ज्या वाईट गोष्टी ते करत असत त्यापासून ते एकमेकांना मनाई करत नसत. ते जे करत होते ते वाईटच होतं.

८०) तुम्हाला त्यांच्यातील अनेकजण अश्रद्धावंतांशी मैत्री बाळगताना दिसतील. त्यांनी जे आगाऊ पाठवलंय ते स्वत: त्यांच्यासाठी किती वाईट आहे. त्यांच्यावर अल्लाहचा कोप आहे, ते सदैव यातनांमध्येच राहतील.

८१) त्यांनी जर अल्लाह आणि प्रेषितांवर तसेच त्यांच्याकडं जे पाठवलंय त्यावर विश्वास ठेवला असता तर (त्यांनी) त्यांना आपला वाली नसता केला. पण त्यांच्यातले बरेचजण अपराधी आहेत.

८२) तुम्हाला श्रद्धावंतांविरूद्ध वैरी करण्यात सर्वांत कठोर ज्यू आणि अनेकेश्वरी आढळतील आणि श्रद्धावंतांशी जवळीक आणि मैत्री साधण्यास आम्ही (नसारा) ख्रिस्ती आहोत असं म्हणणारे आढळतील. कारण यांच्यामध्ये ज्ञानास वाहलेले आणि संत लोक आहेत आणि ते अहंकार करत नाहीत.

**पारा - ७**

८३) प्रेषिताकडं अवतरित केलं ते ऐकत असतात तेव्हा त्यांच्या डोळ्यांत अश्रु वाहत असलेले तुम्हाला दिसतील, कारण त्यांनी ओळखलंय सत्य काय आहे ते. ते याचना करताहेत, आमच्या विधाता! आम्ही श्रद्धा बाळगली तेव्हा आपल्या साक्षीदारांमध्ये आमचीही नोंद घे.

८४) का बरं आम्ही विश्वास (निष्ठा) ठेवू नये अल्लाहवर? आणि जे सत्य आम्हाला प्राप्त झालंय त्यावर. आणि आम्हाला सदाचारी आहेत त्या लोकांची संगत द्यावी, हीच तमा आम्ही बाळगली.

८५) आणि त्यांच्या विनंतीप्रमाणेच आम्ही त्यांना असा स्वर्ग देऊ केला ज्याच्या खालून नद्या वाहतात, ते सर्वकाळ त्यामध्ये राहतील. जे भलं करतात त्यांचा मोबदला हाच.

८६) पण, ज्या लोकांनी नाकारलं आणि आमच्या संकेतांना खोटं ठरवतात ते नरकाचे धनी आहेत.

८७) श्रद्धावंत लोकहो, मर्यादा ओलांडू नका. अल्लाहनं ज्या पाक वस्तू वैध केल्यात त्यांना वर्ज्य करू नका. अल्लाहला अतिरेक करणारे आवडत नसतात.

८८) अल्लाहनं जी पवित्र संसाधनं वैध ठरवलीत त्याचा उपभोग घ्या. आणि ज्या अल्लाहला तुम्ही मान्य करता त्याचं भय बाळगा.

८९) ज्या वायफळ शपथा तुम्ही वाहता त्याबद्दल अल्लाह तुम्हाला (जबाबदार) धरणार नाही. पण विचारपूर्वक ज्या शपथा तुम्ही वाहता त्याबद्दल मात्र तुमच्याशी विचारणा होईल. त्यांचा पश्चात्ताप म्हणून तुम्ही दहा निराधारांना आपल्या घरच्यांना देता तसं सर्वसाधारण अन्न खाऊ घाला अथवा त्यांना वस्त्रे द्या किंवा एका गुलामास मुक्त करा. ज्यांच्याकडं काहीच नसेल त्यांनी तीन दिवस उपवास पाळावेत. हा झाला पश्चात्ताप तुम्ही शपथा वाहता त्याबद्दलचा. आपल्या शपथांचा मान राखा. तुम्ही आभार मानावं याकरिता अशा प्रकारे अल्लाह आपल्या आज्ञा स्पष्ट करून देतो.

९०) श्रद्धावंत लोकहो, मद्य, जुगार, वेदी आणि बाणांचा शकुन वास्तवात वाईट असून ती सैतानी कृत्यं आहेत. तुम्हास यशस्वी व्हायचं असल्यास या गोष्टींपासून दूरच राहा.

९१) तुमच्यात दारू आणि जुगार यांच्या कारणी तुमच्यामध्ये वैमनस्य भडकावणं ही सैतानाची योजना आहे. तसेच अल्लाहची आठवण आणि त्याच्या प्रार्थने (नमाज) पासून तुमचा अटकाव करण्याची (सुद्धा). तर मग तुम्ही त्यांच्यापासून दूर होणार नाहीत?

९२) अल्लाहच्या (आज्ञा) पाळा, तसेच प्रेषितांच्या (आज्ञा) पाळा, स्वत:ची काळजी घ्या. जर तुम्ही पाठ वळवली तर लक्षात ठेवा, आमच्या प्रेषितांची फक्त स्पष्ट रीतीनं (हे संदेश) पोचवण्याची जबाबदारी होय.

९३) श्रद्धा धारण करून जे लोक सत्कर्म करताहेत त्यांनी मागं अवैध असं काही सेवन केले असेल तर काही आक्षेप नाही, जर त्यांनी भविष्यात पथ्य पाळलं, श्रद्धा धारण केली आणि सत्कर्मं केलीत तर आणि पुन्हा भिऊन राहिले आणि श्रद्ध राहिले आणि पुन्हा भीती बाळगूनच भली कामं केली तर अशी भली माणसं अल्लाहला आवडत असतात.

९४) श्रद्धावंत लोकहो, तुमच्या हात-पाय आणि शस्त्रांच्या माऱ्यात असलेल्या शिकारांद्वारे अल्लाह तुमची परीक्षा घेईलच, कोण त्याला न पाहता भितो हे जाणून घेण्यासाठी. यानंतर जे अतिरेक करतील त्यांना कठोर शिक्षा दिली जाईल.

९५) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही एहरामच्या वेशात (हजचा विधी पाळत असताना) शिकार करता कामा नये. जर तुमच्यातील कुणी जाणूनबुजून तसं केलं तर जे मारलं गेलं त्यासमान पाळीव प्राण्याचा बळी त्याचा बदला होय. तुमच्यामधील दोन प्रामाणिक माणसांनी यासंदर्भात निर्णय घ्यावा आणि ती भेट काबागृहास पोचवावी. हे शक्य नसेल तर प्रायश्चित्त म्हणून निराधारांना जेऊ घालावं अथवा त्याच प्रमाणात उपवास करावेत, त्यांनी केलेल्या कृत्याचं फळ भोगावं म्हणून. मागं जे झालं ते अल्लाहनं सोडून दिलं, पण (आता) जर कुणी परत त्याची पुनरावृत्ती केली तर अल्लाह त्याचा बदला घेईल. आणि बदला घेण्यात

अल्लाह वरचढ ठरेल.

९६) तुमच्यासाठी समुद्रातील प्राण्यांची शिकार आणि त्याचं सेवन विधिवत केलंय ते तुमच्या हितासाठी, तसेच प्रवाशांसाठी. (एहरामच्या अवस्थेमध्ये) पण हजचा पोशाख परिधान केल्यानंतर, जमिनीवरील प्राणी तुम्हास मनाई केले आहेत. अल्लाहची भीती बाळगा, ज्याच्याकडं तुम्ही एकवटले जाल.

९७) अल्लाहनं काबागृहाला पवित्र आणि लोकांसाठी निवासाचे स्थान बनविले आहे. तसेच पवित्र महिने, बळी देण्याचे प्राणी आणि त्यांच्या गळ्यातील पट्टे, तुम्हाला ओळखता यावं म्हणून. अल्लाहला तर आकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही माहीत आहे. आणि अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे.

९८) जाणून घ्या, अल्लाह शिक्षा देण्यात कठोर आहे, तसेच अल्लाह क्षमा करणारा आणि कृपावंतदेखील आहे.

९९) प्रेषितांची जबाबदारी तर (संदेश) पोचवण्याची आहे, पण तुम्ही जे काही जाहीर करता आणि जे दडवून ठेवता त्याची माहिती अल्लाहला आहे.

१००) त्यांना सांगा, अपवित्र आणि पवित्र समान नसतात, जरी वाईट बाबी विपुल असल्याने तुम्हांस कितीही चांगले वाटेना. समंजस लोकहो, अल्लाहची भीती बाळगा (मगच) तुमचा उत्कर्ष घडेल.

१०१) श्रद्धावंत लोकहो, अशा गोष्टींविषयी विचारत जाऊ नका ज्यांना जाहीर केल्यास तुम्हाला वाईट वाटावं आणि कुरआनचं अवतरण होत असताना जर तुम्ही विचारलं तर त्या (गोष्टी) स्पष्टच केल्या जातील. आतापर्यंतचं अल्लाहनं माफ केलं. अल्लाह तर खूप क्षमाशील आणि सहनशील आहे.

१०२) एका समुदायानं तुमच्यापूर्वी त्याविषयी विचारणा केली असता ते नाकारणारे होऊन बसले.

१०३) अल्लाहनं बहिरा, साईबा, वसीला आणि हाम बनवलं नाही (अल्लाहनं उंटीणीचे कान चिरणे, तीस मोकाट सोडणे, अथवा जुळ्या गुराढोरांस मूर्तीस बळी देणं किंवा वांझ उंटीणीला मुक्त सोडून देण्याचा पायंडा घातला नव्हता), पण अश्रद्धावंत लोक अल्लाहला खोटं म्हणतात त्यांच्यातील बरेचजण समंजस नाहीत.

१०४) त्यांना अल्लाहनं जे अवतरलंय आणि प्रेषितांकडं बोलवलं जातो तेव्हा ते म्हणतात, आमचे पूर्वज आम्हाला ज्या (मार्गावर) आढळले ते आम्हाला पुरेसं आहे. जरी त्यांच्या पूर्वजांना कसली माहिती नव्हती, ना त्यांना मार्ग दाखवण्यात आला तरीदेखील?

१०५) श्रद्धावंत लोकहो, स्वत:ची काळजी घ्या. तुम्ही मार्गदर्शनाचं पालन केल्यास भरकटलेले लोक तुम्हाला काही इजा पोचवू शकणार नाहीत. तुम्हा सर्वांना अल्लाहकडं परतायचंय. मग तो तुम्ही जे करत होता ते तुम्हाला दाखवून देईल.

१०६) श्रद्धावंत लोकहो, तुमच्यापैकी कुणाचा मृत्यू येऊन ठेपल्यास (आणि त्याला मृत्यूपत्र करायचं असल्यास) तुमच्यापैकी दोन प्रामाणिक माणसांच्या साक्षीनं मृत्यूपत्र करा. पण जर तुम्ही धरतीवर प्रवासात असताना मृत्यूचं संकट येऊन ठेपल्यास इतर कोणत्याही दोन व्यक्तींची (साक्ष) चालेल. तुम्हाला शंका असल्यास त्या दोघांना प्रार्थनेनंतर रोखून ठेवा आणि त्या दोघांना अल्लाहच्या शपथेवर सांगू द्या, 'आम्ही यासाठी काही ऐवज घेतला नाही, कोणी आमचा जवळचा असला तरी आम्ही अल्लाहच्या नावानं दिलेली साक्ष लपणार नाही. तसं केल्यास आम्ही पापी ठरू.'

१०७) नंतर जर हे दोघे पापी असून गुन्ह्यात गुंतलेले असल्याचं निश्चित झाल्यास त्यांच्या जागी मयताच्या सर्वांत जवळच्या नातेवाईकांनी, ज्यांचा हक्क हिरावून घेतला जात होता, अशा इतर दोन व्यक्तींनी उभ राहावं. त्यांना अल्लाहच्या शपथेवर सांगू द्या, आमची साक्ष त्या दोघांपेक्षा जास्त तथ्यांवर आधारित आहे आणि आम्ही त्यामध्ये कसलंही उल्लंघन केलेलं नसून आम्ही तसं केलं असेल तर आम्ही

अन्यायी ठरू.

१०८) अशा रीतीनं ते खरीखुरी साक्ष देतील आणि त्यांना इतरांच्या शपथेनंतर त्यांची शपथ रद्द केली जाण्याची भीती वाटत राहील. अल्लाहची भीती बाळगा, त्याचे ऐका, कारण अल्लाह अपराधी लोकांना मार्गदर्शन करत नाही.

१०९) एकेदिवशी अल्लाह सर्व प्रेषितांना एकत्र करून त्यांना विचारेल, तुम्हाला (लोकांकडून) कसा प्रतिसाद मिळाला? ते म्हणतील, आम्हाला ते माहीत नाही. तूच तर सर्व गुप्त गोष्टींची माहिती ठेवतोस.

११०) ज्या वेळी अल्लाह म्हणेल, हे मरयमपुत्र ईसा, तुझ्यावरील आणि तुझ्या मातेवरील आमच्या वरदानांची आठवण कर, पवित्र आत्म्यानं तुला मदत केली, तू पाळण्यात असताना तसेच प्रौढावस्थेत लोकांशी बोलत असे, मी तुला ग्रंथ आणि शिकवण आणि समज दिली तोराहची आणि इंजीलची. माझ्या आज्ञेनुसार तू चिखलापासून पक्ष्यांची आकृती करीत आणि तिच्यात फुंकर मारली की तो जीवंत होत असे. माझ्या आज्ञेनुसार, तू जन्मजात आंधळे आणि महारोग जडलेल्यांना बरं केलंस आणि माझ्याच आज्ञेनुसार तू कबरीतून मृतांना जीवंत केलंस. आणि मी इस्राईलच्या संततीस (तुला इजा पोचवण्यापासून) अडवलं. जेव्हा तुम्ही त्यांच्याकडं स्पष्ट संकेतांसहित आलात, तेव्हा त्यांच्यामधील बंडखोरांनी सांगितलं, 'ही तर स्पष्ट जादू आहे.'

१११) जेव्हा मी अनुयायींना माझ्या आणि माझ्या प्रेषितांवर विश्वास ठेवण्यास प्रेरित केलं, ते म्हणू लागले, तू साक्ष दे आम्ही आज्ञाधारक झालोत.

११२) आणि अनुयायींनी जेव्हा विचारलं, हे मरयमपुत्र ईसा, तुमचा विधाता आमच्यासाठी आकाशातून जेवणाचं ताट पाठवू शकेल का? त्यांनी (ईसा यांनी) सांगितलं, तुम्ही विश्वास ठेवत असाल तर अल्लाहची भीती बाळगा.

११३) त्यांनी उत्तरात सांगितलं, आम्हाला त्यातून खावयाचं आहे, आमच्या मनाच्या समाधानासाठी आणि तुम्ही आमच्याशी खरं बोलला त्याची

खात्री करून घ्यावी म्हणून. आणि आम्ही स्वत: त्याचे साक्षीदार असावे म्हणून.

११४) मरयमपुत्र ईसानं प्रार्थना केली, अल्लाह- आमच्या विधाता! आमच्यासाठी आकाशातून मेजवानीसाठी ताट पाठव. आमच्यासाठी, आमच्या पूर्वीच्या आणि नंतर येणाऱ्यांसाठी तो आनंदाचा प्रसंग ठरावा. आणि तुझ्याकडंचा एक संकेत असावा यासाठी. तूच तर सर्वोत्तम उपजीविका देणारा आहेस, तेव्हा आमच्यासाठी तरतूद कर.

११५) अल्लाहनं उत्तर दिलं, मी पाठवून देईन तुमच्यासाठी. मग नंतर जे नाकारतील त्यांना मी अशी शिक्षा करीन जशी शिक्षा विश्वातील कोणासही केली नाही.

११६) आणि अल्लाह मरयमपुत्र ईसाला विचारेल, 'तू लोकांना सांगितलं होतं की मला आणि माझ्या मातेला अल्लाहव्यतिरिक्त ईश्वर म्हणून घ्यायचं?' ईसानी उत्तर दिलं, तू पवित्र आहेस, मला अधिकारच नाही असं काही सांगण्याचा. जर मी असं म्हणालो असतो तर तुला त्याची माहिती असती. माझ्या मनात आहे ते तुला ठाऊक आहे, पण जे तुझ्या मनात आहे त्याची मला माहिती नाही. तूच तर खरं पाहता गुपित गोष्टी जाणतोस.

११७) मी त्यांना तेच काही सांगितलं ज्याविषयी तू मला आदेश दिला होतास, 'अल्लाहची भक्ती करा, तोच माझा विधाता आणि तुमचादेखील विधाता आहे'. जोवर मी त्यांच्या दरम्यान होतो मी त्यांच्यावर नजर ठेवली आणि जेव्हा तू मला उचलून घेतलं तेव्हा आता तूच त्यांच्यावर लक्ष ठेवून होतास. कारण तूच तर सर्व बाबींचा एकमेव साक्षीदार आहेस.

११८) तू त्यांना शिक्षा केलीस तर ते तुझेच भक्त आहेत आणि जर तू त्यांना सोडून दिलं तर तूच सर्वोच्च आणि सर्वज्ञ आहेस.

११९) अल्लाह म्हणाला, हा तो दिवस जेव्हा सत्यता पाळणारे त्यांच्या सत्यतेमुळे लाभदायी ठरतील, त्यांच्यासाठी असे स्वर्ग आहेत ज्यांच्या

खालून नद्या वाहतात, ते तिथं सदासर्वकाळ राहतील. अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला आणि प्रसन्नता त्यांना अल्लाहची लाभली. हेच महान यश होय.

१२०) आकाश आणि पृथ्वीचं अधिराज्य आणि जे काही दरम्यान आहे ते अल्लाहसाठीच, आणि सर्व बाबींवर त्याचीच सत्ता आहे.

-------

# ६. सूरह अल-अनआम

**मक्काकालीन, आयती १६५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अल्लाहचीच स्तुती असो ज्यानं आकाश आणि पृथ्वी निर्माण केली आणि काळोख व प्रकाश बनवला. तरीदेखील त्याला नाकारणारे लोक इतरांना त्याच्या (विधात्याच्या) बरोबरीचं ठरवतात.

२) ज्यानं तुम्हाला मातीपासून निर्मिलं आणि नंतर ठराविक मुदत निश्चित केली आणि त्याच्याकडं एक ठराविक असा काळ आहे तरीदेखील तुम्ही संशय होता.

३) आकाशामध्ये आणि पृथ्वीत फक्त तोच अल्लाह आहे. तुम्ही जे काही लपवता आणि जे उघड करता त्याला माहीत आहे. तसेच तुम्ही जे काही कमवता त्याचीही त्याला माहिती आहे.

४) त्यांच्या विधात्याचे असे कोणतेच संकेत नाहीत जे त्यांच्याकडं आले नसतील. पण ते त्यांच्यापासून तोंड फिरवतात.

५) आणि सत्य त्यांच्यापर्यंत पोचूनही त्यांनी त्यास नाकारलं. पण ज्याची ते चेष्टा करीत असतात त्याची माहिती लवकरच त्यांना कळून येईल.

६) त्यांना दिसलं नाही त्यांच्या अगोदर आम्ही कित्येक जनसमूहांना नष्ट केलं. त्यांना आम्ही धरतीवर जसं प्रस्थापित केलं तसे तुम्हाला स्थापित केलं नाही. मग त्यांच्यावर आकाशातून मुसळधार पाऊस वर्षवला. त्यांच्या (पाया)खालून नद्या वाहू लागल्या. मग त्यांच्या अपराधांबद्दल त्यांना नष्ट केलं आणि त्यांच्यानंतर आम्ही दुसऱ्या जनसमूहांना उभ केलं.

७) आम्ही कागदावर लिहिलेला ग्रंथ जरी पाठवले आणि त्यांना आपल्या हातांनी स्पर्श जरी करता आलं तरीदेखील अश्रद्धावंत म्हणतील, हे दुसरं काही नसून उघड जादू आहे.

८) आणि म्हणतात, त्यांच्यावर एखादा देवदूत का बरं अवतरला नाही? आम्ही जर देवदूत पाठवला असता तर सर्व प्रकरणांचा निकालच लागला असता आणि त्यांना उसंत मिळाली नसती.

९) आम्ही जर देवदूत बनवला असता तरीदेखील मनुष्यरूपीच त्याला पाठवलं असतं. आणि आम्ही त्यांना (अशाच) गोंधळात टाकलं असतं. ज्या गोंधळात ते आता पडत आहेत.

१०) तुमच्या पूर्वीच्या प्रेषितांचीदेखील चेष्टा करण्यात आली आणि म्हणूनच त्यांच्यातील ज्या लोकांनी चेष्टा केली त्यांची जी चेष्टा ते करीत होते त्यानेच त्यांना वेढून टाकले.

११) त्यांना सांगा धरतीवर प्रवास करण्याचे आणि पाहा खोटं ठरवणाऱ्यांचं काय शेवट झालं ते.

१२) त्यांना विचारा, आकाश आणि पृथ्वीमधील आहे ते कोणासाठी? सांगा अल्लाहसाठीच. त्यानं स्वत:वर दयेची नीती अनिवार्य केलेली. तुम्हाला तो निर्णयाच्या दिवशी नक्कीच एकत्र आणणार यात शंका नाही. ज्या लोकांनी स्वत:चा ऱ्हास करून घेतलाय ते कधीच मान्य करणार नाहीत.

१३) रात्रीच्या (अंधारात) आणि दिवसाच्या (उजेडात) स्थिरावले सर्व त्याचेच आहे. आणि तोच सर्वकाही ऐकणारा आणि जाणणारा आहे.

१४) त्यांना सांगा, मी अल्लाहला सोडून दुसऱ्या कोणास आपला वाली बनवू? तो तर आकाश आणि पृथ्वी साकारणारा आहे. तो स्वत: खात नसून सर्वांना खाऊ घालतो. त्यांना सांगा, अल्लाहच्या आज्ञा धरण्यास मला सर्वप्रथम होण्याचा आदेश दिलाय. आणि तुम्ही अनेकेश्वरींपैकी होता कामा नये.

१५) सांगा, मी जर माझ्या विधात्याची अवज्ञा केला तर त्या भयंकर दिवशी शिक्षेची भीती वाटते.

१६) त्या दिवशी ज्यापासून (शिक्षा) परतून जाईल त्याला त्यांची मोठीच

कृपा लाभली आणि हेच तर महान यश आहे.

१७) अल्लाहनं जर तुम्हाला संकटात टाकलं तर त्याशिवाय कुणी तुम्हाला सावरणार नाही आणि जर त्यानं तुमचं काही भलं केलं तर तो सर्व बाबींवर सामर्थ्यवान आहे.

१८) आपल्या भक्तांवर त्याचं वर्चस्व आहे. तो प्रतिभासंपन्न आणि सर्वज्ञ आहे.

१९) त्यांना विचारा, सर्वश्रेष्ठ साक्ष कोणाची? त्यांना सांगा, माझ्या आणि तुमच्यामध्ये अल्लाह साक्षी आहे आणि माझ्याकडं हे कुरआन पाठवण्यात आलंय तुम्हाला आणि ज्यांच्यापर्यंत हे पोचेल त्यांना सावध करण्यासाठी. मग तुम्ही अल्लाहच्या बरोबरीनं इतरदेखील ईश्वर आहेत अशी साक्ष देणार? आणि सांगा, मी अशी साक्ष देणार नाही तोच एकमेव ईश्वर आहे आणि तुम्ही त्याच्याबरोबर दुसरे जे भागीदार ठरवता त्यांच्याशी माझं काही देणंघेणं नाही.

२०) ज्या लोकांना आम्ही ग्रंथ दिलाय ते त्याला आपल्या मुलाबाळांना जसं ओळखतात तसेच त्याला ओळखताहेत. पण ज्या लोकांनी स्वत:चा ऱ्हास करून घेतलाय. ते श्रद्धा धारण करणार नाहीत.

२१) जे लोक अल्लाहशी खोटं रचतात अथवा त्याच्या वचनांना खोटं ठरवता त्यापेक्षा अधिक अत्याचारी दुसरे ते कोण? निश्चितच अत्याचारींना कधीच यश लाभत नसते.

२२) ज्या दिवशी आम्ही त्या सर्वांना एकवटणार आहोत आणि ज्यांनी भागीदार ठरवलं त्यांना विचारणार, कुठे आहेत तुमचे ते भागीदार ज्यांची तुम्ही कल्पना बांधली होती.

२३) तेव्हा 'आमच्या विधात्या अल्लाहची शपथ! अल्लाहस इतर भागीदार जोडणारे आम्ही नव्हतो,' असं म्हणण्याव्यतिरिक्त त्यांच्याकडं कोणतीही पळवाट नसेल.

२४) पाहा, कसे त्यांनी स्वत:स खोटे जडले होते आणि ते ज्या बाता मारत

असत त्या हरवल्या गेल्या.

२५) त्यांच्यापैकी (काही) तुमच्याकडं कान धरून असतात, आम्ही त्यांच्या मनांवर पडदे टाकून दिलेत त्यांना ते समजून येऊ नये म्हणून आणि त्यांचे कान जड झालेत. त्यांनी जरी सर्व संकेत पाहिले असले तरी ते विश्वास करणार नाहीत. तुमच्याकडं येतात ते वाद घालण्याकरिता. ज्या लोकांनी ते नाकारलं ते म्हणतात, 'हे दुसरं काही नसून पूर्वापार कथा आहेत.'

२६) ते इतरांना त्यापासून दूर करतात आणि स्वत:देखील पळ काढतात. पण (असे करताना) ते स्वत:लाच हलाखीत टाकतात. याचं त्यांना भान नाही.

२७) आणि नरकाग्नीचा सामना करताना जर तुम्ही त्यांना पाहू शकाल तर ते म्हणत असतील, आम्हाला जर परत पाठवलं गेलं तर आमच्या विधात्याच्या वचनांना खोटं म्हणणार नाही आणि (आम्हीसुद्धा) विश्वास धारण करणाऱ्यांपैकी होऊ.

२८) नव्हे, पूर्वी ते जे लपवित असत ते उघडकीस आलं तरी. त्यांना जर परत पाठवलं गेलं तर ते पुन्हा तेच करू लागतील ज्याची त्यांना मनाई केलेली होती. निश्चितच ते खोटे आहेत.

२९) ते म्हणतात, जगातल्या या जीवनापलीकडं काहीच नाही. आम्हाला पुन्हा उठवलं जाणार नाही.

३०) त्यांना जेव्हा त्यांच्या विधात्यासमोर उभं केलेलं तुम्ही पाहिलं तेव्हा तो त्यांना विचारेल, 'हे सत्य नाही?' ते उत्तर देतील, 'होय, आमच्या विधात्याची शपथ!' तो त्यांना सांगून टाकेल, 'मग आता शिक्षेची मजा लुटा, तुम्ही जे नाकारलंत त्याकरिता.'

३१) ज्या लोकांनी अल्लाहशी भेट होणं खोटं म्हटलं ते निश्चितच अपयशी ठरतील, जेव्हा आकस्मिक ती घटका येऊन ठेपेल तेव्हा खेद व्यक्त करत ते म्हणतील, याबाबत आमच्याकडून झालेल्या चुकीबद्दल दु:ख वाटते ते आपलं ओझं आपल्या पाठीवर वाहतील. पाहा, ते जे उचलत

आहेत ते फार वाईट आहे.

३२) या जगातलं जीवन खेळ-तमाशापलीकडं काय? पण सदाचारी लोकांसाठी मरणोत्तर जीवनाचं ठिकाणच उत्तम आहे, तुम्हास हे कळत नाही काय?

३३) आम्हाला ठाऊक आहे त्यांचं बोलणं तुम्हाला दु:खी करतंय, पण हे अत्याचारी लोक तुम्हाला खोटं लेखत नसून अल्लाहच्या संकेतांना नकार देताहेत.

३४) तुमच्यापूर्वीही प्रेषितांना खोटं म्हटलं गेलंय. पण त्यांच्या नकारण्यावर त्यांनी संयमानं त्यांचा छळ सोसला, आमची त्यांना मदत पोचली तोपर्यंत. अल्लाहच्या निर्णयांना कुणी बदलू शकत नाही. आधीच्या प्रेषितांविषयीची माहिती तुम्हाला मिळालीच आहे.

३५) त्यांचा तोंड फिरवणं तुम्हाला असहाय्य होत असंल तर आणि तुमच्यात जमिनीतील एखादा भुयारी मार्ग अथवा आकाशात एखादी शिडी शोधून काढण्याची ऐपत असल्यास त्यांच्यासाठी संकेत घेऊन या. अल्लाहची तशी इच्छा असती तर त्याने मार्गदर्शन झालेल्या लोकांमध्ये त्यांना एकत्र केलं असतं. तुम्ही अज्ञानी (लोकां) पैकी होऊ नका.

३६) जे ऐकतात तेच लोक मान्य करतात. मरण पावलेल्यांना अल्लाह परत जीवंत करील आणि नंतर ते सर्व त्याच्याकडंच परतवले जातील.

३७) ते म्हणतात, का बरं त्याच्या विधात्याकडून त्याच्यासाठी एखादा संकेत पाठवला गेला नाही? त्यांना सांगा, एखादा संकेत अवतरण्याचं सामर्थ्य अल्लाह बाळगतो. (पण) त्यांच्यामधील बहुतेकांना हे माहीत नाही.

३८) भूतलावर वावरणारा कोणताही प्राणी अथवा आपल्या पंखांद्वारे उडणारा कोणताही पक्षी, तुमच्याप्रमाणं त्यांचेही विविध समूह आहेत. आम्ही या ग्रंथात काहीही वगळलेलं नाही, आणि परत ते आपल्या विधात्याकडंच एकवटले जाणाराहेत.

३९) ज्या लोकांनी आमच्या संकेतांना खोटं ठरवलं ते बहिरे आणि मुके आहेत. अंधारात (गुरफटलेले) आहेत. अल्लाह मर्जीस येईल त्यांना भरकटत सोडतो आणि मर्जीस येईल त्यांना रास्त मार्गावर लावून देतो.

४०) जर त्यांनी अल्लाहचा कोप कोसळताना पाहिला अथवा शेवटची घटका येऊन ठेपली तर तुम्ही अल्लाहला सोडून दुसऱ्याचा धावा करणार? ते खरे असतील तर त्यांना विचारा.

४१) नव्हे तुम्ही त्याचाच धावा करता त्यांची इच्छा असल्यास ते (इजा) दूर करतो. अशा वेळी तुम्ही त्याला जे भागीदार जोडता त्यांना विसरून जाता.

४२) तुमच्यापूर्वीही आम्ही कित्येक समुदायांकडं प्रेषितांना पाठवलं आणि त्यांना अडचणीत टाकलं आणि संकटे कोसळवली त्यांनी विनवण्या कराव्यात म्हणून.

४३) आणि जेव्हा त्यांना यातना दिल्या, का बरं त्यांनी विनवणी केली नाही, उलट त्यांची मनं कठोर झाली होती आणि सैतानानं त्यांची कृत्ये मोहक करून टाकली.

४४) आणि जेव्हा त्यांनी आमची शिकवण विसरून टाकली आम्ही त्यांच्यासाठी सुबत्तेची सर्व दारं उघडी केली. त्यांना दिलेल्या सुखसमृद्धीच्या आनंदात वाहून गेले. मग आम्ही आकस्मिक त्यांना धरलं तेव्हा ते निराश होऊन गेले.

४५) मग अत्याचारी समूहाला समूळ नष्ट केलं. सर्व स्तुती अल्लाहसाठीच, साऱ्या विश्वांचा तो विधाता आहे.

४६) त्यांना सांगा, त्यांनी विचार केला, जर अल्लाहनं तुमचं ऐकणं, तुमचं पाहणं काढून घेतलं आणि तुमच्या हृदयांवर मोहोर लावली तर अल्लाहशिवाय इतर कोणते देव तुम्हाला हे परत देऊ शकतील? पाहा, आम्ही कशा विविध रितीनं वचनांना स्पष्ट करतो, तरीदेखील ते मागं वळतात.

४७) त्यांना सांगा, पाहा, जर एकाकी अथवा उघडउघड अल्लाहचा कोप कोसळेल तेव्हा अत्याचारी लोकांशिवाय कोणाचा नाश होईल?

४८) आम्ही प्रेषितांना खूशखबर देण्यासाठी आणि सावध करण्यासाठी पाठवतो. काही इतर कारणांमुळे नव्हे. मग जे श्रद्धा धारण केली आणि सुधारले तर त्यांना भीतीचं कारण नाही की ते निराशही होणार नाहीत.

४९) ज्या लोकांनी आमच्या वचनांना खोटं लेखलं त्यांना शिक्षा होणारच, कारण ते उल्लंघन करत होते यासाठी.

५०) त्यांना सांगा, 'माझ्याकडं अल्लाहचे खजिने आहेत असे मी नाही म्हणत. मला परोक्षाचंही ज्ञान नाही आणि मी देवदूत असल्याचं म्हणत नाही. मी तर फक्त मला जे अवतरण पाठवण्यात येतं त्याचं पालन करतो.' सांगा, अंध आणि डोळस सारखेच असतात का? तुम्ही (या गोष्टीचा) विचार करत नाही?

५१) अशा लोकांना सावध करा, ज्यांना अशी भीती वाटते की त्यांच्या विधात्याकडं त्यांना एकवटलं जाईल, तेव्हा त्याच्याव्यतिरिक्त कुणीही त्यांचा वाली नसणार की कोण मध्यस्थी करणार, ज्यानं त्यांना वाचवलं असतं.

५२) जे लोक सकाळ-संध्याकाळ आपल्या विधात्याच्या दर्शनासाठी धावा करतात त्यांना दूर करू नका. त्यांच्या हिशोबातील एकाही गोष्टीसाठी तुम्ही जबाबदार नाही आणि तसेच तुमच्या हिशोबातील एकाही बाबीसाठी ते जबाबदार नाहीत. तुम्ही त्यांना दूर केलंत तर तुम्ही अन्यायी ठराल.

५३) अशा प्रकारे आम्ही त्यांच्यामधील काहींची इतर काही लोकांकरवी परीक्षा घेतली, कारण त्यांनी सांगावं, आमच्यामधील हेच आहेत ते लोक ज्यांना अल्लाहचं वरदान लाभलं? कोण कृतज्ञ आहेत याची अल्लाहला जाणीव नाही?

५४) आमच्या वचनांवर ज्यांनी श्रद्धा धारण केली ते तुमच्याकडं येतील तेव्हा त्यांना 'सलाम' (तुम्हाला शांतता लाभो) म्हणा तुमच्या विधात्यानं

स्वत:वर दया अनिवार्य केलेली आहे. तुमच्यापैकी अज्ञानामुळे जर कुणी दुष्ट असं काही केलं आणि नंतर पश्चात्ताप करून सुधारले तर तो (अल्लाह) क्षमा करणारा आणि अतिशय कृपाशाली आहे.

५५) अशा पद्धतीनं आम्ही वचनांचं विवेचन करतो, अपराधींनी अवलंबलेला मार्ग उघड करता यावा म्हणून.

५६) त्यांना सांगा, अल्लाहशिवाय तुम्ही ज्यांचा धावा करता त्यांची (उपासना) करण्यापासून मला मनाई करण्यात आली आहे. त्यांना सांगा, तुमच्या इच्छांनुरूप मी वागणार नाही. तसं केलं तर मी भटकून जाईन आणि मार्गदर्शन लाभलेल्यांपैकी नसणार.

५७) सांगा, निश्चितच मी आपल्या विधात्याकडंच स्पष्ट प्रमाणांवर कायम आहे, तुम्ही त्यांना खोटं म्हणता. तुम्हाला ज्या गोष्टीची घाई आहे ते माझ्या आवाक्यात नाही. अल्लाहशिवाय कोणाचा हुकूम चालत नाही. तो सत्य आहे तेच सांगतो आणि तोच सर्वोत्तम निर्णय करणारा आहे.

५८) सांगा, तुम्हाला ज्याची घाई आहे ते माझ्याकडं असते तर माझा आणि तुमचा केव्हाच निर्णय लागुन गेला असता. अल्लाह अन्यायींना चांगलं ओळखतो.

५९) ज्या परोक्षाविषयीची त्याच्याशिवाय कोणालाच माहिती नाही, त्याच्या चाव्या त्याच्याकडेच आहेत. धरतीवर आणि समुद्रात काय आहे ते त्यासच ठाऊक आहे. त्याच्या माहितीपलीकडं एकही पान गळून पडत नाही अथवा पृथ्वीच्या अंधारातला एकही दाणा नाही. ओलं अथवा कोरडं असं काहीच नाही ज्याची एका स्पष्ट दप्तरात नोंद नसेल.

६०) रात्री तुम्हाला मृतावस्थेत टाकणारा तोच आणि दिवसा तुम्ही जी धावपळ केली ती त्यास ठाऊक असते. दिवस उजाडल्यावर पुन्हा उठवून उभं करतो. निश्चित केलेली मुदत पुरी व्हावी यासाठी नंतर तुम्हाला त्याच्यापाशीच परतावयाचंय आणि मग तुम्ही जे काही करीत राहिलात ते तुम्हाला कळवलं जाईल.

६१) तो आपल्या भक्तांवर ताबा राखतो आणि निगा राखण्यासाठी

तुमच्यासाठी संरक्षक पाठवतो. तुमच्यातील एखाद्याच्या मृत्यूची घटका येऊन ठेपल्यास त्याचे प्राण हरण करण्यास आम्ही आमचे दूत पाठवतो, ते मुळीच कसूर करत नाहीत.

६२) आणि ते आपल्या खऱ्याखुऱ्या स्वामी, अल्लाहकडं परतवले जातील. ऐकूण घ्या निर्णयाचा अधिकार त्याचाच. आणि हिशेब घेण्यास तो तत्पर आहे.

६३) त्यांना विचारा, कोण त्यांना धरतीवरील आणि समुद्रातील अंधारातून वाचवतो, अशा वेळी तुम्ही त्याचाच धावा करतात, गुप्तपणे विनवणी करत. आणि म्हणतात, त्याने जर आमची यातून सुटका केली तर आम्ही आभार मानणारे असू.

६४) त्यांना सांगा, अल्लाहच तुम्हाला यातून वाचवतो तसेच सर्व तऱ्हेच्या यातनांतून, तरीदेखील तुम्ही (इतरांना त्याचे) भागीदार ठरवता?

६५) त्यांना सांगा, तो समर्थ आहे तुमच्यावर एखादी आपत्ती वरून कोसळवण्यास किंवा तुमच्या पायाखालून अथवा तुम्हाला गटागटांमध्ये विभागून एकमेकांस भिडवून देण्यास. तुमच्यापैकी एकाला दुसऱ्यापासून हिंसेची चव देण्यासाठी. पाहा, आम्ही कशा रीतीनं तुम्हाला समजता यावं म्हणून आपली वचनं स्पष्ट करतो.

६६) पण तुमच्या लोकांनी ते सत्य असूनही खोटं ठरवलं. त्यांना सांगा, मी काही तुमच्यावर मुकादम (ठेवलेला) नाही.

६७) प्रत्येक घटनेची एक वेळ निर्धारित आहे, तुम्हास ते लवकरच कळुन चुकेल.

६८) आमच्या वचनांविषयी लोकांना वाद घालताना पहिल्यास तुम्ही त्यांच्यापासुन दूर व्हा, ते इतर कोणत्या वादात गुंतेपर्यंत. जर सैतानाने तुम्हास विसर पाडलेला लक्षात आल्यास अशा अत्याचारी लोकांदरम्यान बसु नका.

६९) नेक असतील त्या लोकांना त्यांच्या हिशोबातली कसलीच (जबाबदारी)

नसेल. पण त्यांना शिकवण द्या, त्यांनी (अशा गोष्टीपासून) भीती बाळगावी म्हणून.

७०) ज्या लोकांनी आपल्या धर्माचा खेळ आणि करमणूक करून टाकलाय आणि या जगातील जीवनाने त्यांना फसवलं त्यांना सोडा. आणि या (कुरआनाद्वारे) त्यांना उपदेश द्या, कुणी आपल्या कर्मांमुळे धरला जाऊ नये यासाठी. अल्लाहव्यतिरिक्त त्यांचा कुणी वाली नाही की कोणी त्यांची मध्यस्थी करणार. (आपल्या कर्मांच्या) मोबदल्यात सर्वकाही दिले तरी ते स्वीकारू नका. हीच ती मंडळी जी आपल्या कर्मांमुळं धरली गेली. त्यांना पिण्यासाठी उकळतं पाणी मिळेल आणि कडक शिक्षा त्यांनी विद्रोह माजविला होता म्हणून.

७१) त्यांना विचारा, अल्लाहव्यतिरिक्त आम्ही अशांचा धावा करू जे आम्हाला लाभही होत नाही की इजाही होत नाही. आणि अल्लाहनं आमचं मार्गदर्शन घडवल्यावरही आम्ही त्या गृहस्थासारखं आपल्या पाऊलवाटांवर मागं फिरु ज्याला सैतानानं भुरळ घालून वाळवंटात हैराण (करण्यास) सोडून दिलं? त्याचे सोबती त्याला मार्ग दाखवण्यास 'आमच्याकडं ये' अशी हाक देतात. त्यांना सांगा, अल्लाहचं मार्गदर्शन तेच मार्गदर्शन होय. आम्हाला तर विश्वाच्या विधात्याच्या आज्ञा पाळण्याचे आदेश दिले गेलेत.

७२) तसंच, नियमित नमाज पढा आणि त्याची भीती बाळगा ज्याच्याकडं तुम्हाला एकवटावयचं आहे.

७३) त्यानेच आकाश आणि पृथ्वीला सत्य (प्रमाणात) निर्माण केलं. आणि ज्या दिवशी तो घडण्यास सांगेल ते घडून जाईल. त्याचे शब्द वस्तुनिष्ठ आहेत. ज्या दिवशी घोषणा केली जाईल तेव्हा त्याचंच अधिराज्य सर्वत्र गाजेल. गुप्त आणि उघड गोष्टी त्यासच ठाऊक आहेत आणि तोच सर्वपरिचित असलेला आणि प्रतिभासंपन्न आहे.

७४) जेव्हा इब्राहीमनं आपला पिता आज़रला विचारलं, तुम्ही मूर्तींना ईश्वर म्हणून मानता? निश्चितच मी तर तुला आणि तुझ्या समूहाला उघडउघड भरकटलेलं पाहतोय.

७५) अशा प्रकारे आम्ही इब्राहीम यांना आकाश आणि पृथ्वीच्या राज्याचे निरीक्षण करविले त्यांचा विश्वास बसावा याकरिता.

७६) मग जेव्हा रात्रीचा अंधार पसरला तेव्हा त्यांना एक तारा दिसला. तोच ते म्हणाले, हा माझा विधाता. पण जेव्हा तो लोप पावला तेव्हा म्हणाले, लोप पावणारे मला आवडत नाहीत.

७७) जेव्हा त्यांनी तेज:पुंज चंद्रास पाहिलं ते म्हणाले, हाच तो माझा प्रभू. जेव्हा तोही लुप्त झाला, ते म्हणाले, मला जर माझ्या विधात्यानं मार्ग दाखवला नाहीस तर मी मार्गभ्रष्ट लोकांमध्ये मोडेन.

७८) जेव्हा त्यांनी वैभवसंपन्न सूर्यास पाहिलं, ते म्हणू लागले, सर्वांत महान हाच माझा विधाता. जेव्हा तोही मावळून गेला, ते म्हणाले, माझ्या लोकहो, तुम्ही जे अनेकेश्वर माजविता त्याच्याशी माझं देणं-घेणं नाही.

७९) मी तर त्याच्याकडं एकाग्र होऊन आपलं तोंड वळवलंय ज्यानं आकाश आणि पृथ्वी निर्माण केली. मी अनेकेश्वरींमधील नाही.

८०) आणि मग त्याच्या लोकांनी त्यांच्याशी वाद घातला. ते म्हणाले, तुम्ही अल्लाहच्या बाबतीत माझ्याशी वाद घालता? त्यानं मला मार्गदर्शन केलंय. आणि तुम्ही जे भागीदार जोडताय त्यांना मी घाबरत नाही. माझ्या विधात्यानं काही इच्छिले असेल (ते सोडून). माझ्या विधात्याच्या ज्ञानाचं सर्वत्र प्रभुत्व आहे तरीदेखील तुम्ही (त्याचा) विचार करणार नाही.

८१) आणि का बरं मी भ्यावं तुम्ही जोडलेल्या भागीदारांना? अल्लाहचे भागीदार जोडताना तुम्ही तर कचरत असल्याचं वाटत नाही. ज्यांच्याविषयी त्याने तुम्हाला कसला अधिकारही दिलेला नाही. तेव्हा तुम्हाला ठाऊक असल्यास सांगा. या दोन गटांपैकी कोणास सुरक्षिततेचा अधिक हक्क आहे?

८२) ज्यांनी श्रद्धा धारण केली आणि अन्यायाशी आपल्या निष्ठेची सरमिसळ केली नाही, अशांनाच फक्त शांतता आणि मार्गदर्शन लाभलेलं आहे.

८३) इब्राहीमना त्यांच्या लोकांशी प्रतिकार करण्यास आम्ही असा युक्तिवाद मांडला होता. आम्ही इच्छितो त्यास उच्च दर्जा प्रदान करतो. निश्चितच तुमचा विधाता सर्वज्ञ प्रतिभावान आहे.

८४) आणि आम्ही त्यांना (इब्राहीम यांना) इस्हाक आणि याकूब दिले. त्या सर्वांचं मार्गदर्शन केलं. आणि त्याआधी आम्ही नूह यांचं मार्गदर्शन केलं आणि त्यांच्या वंशात दाऊद, सुलैमान, अय्यूब व यूसुफ व मूसा व हारुन यांनाही (मार्ग दाखवला). आम्ही भल्या लोकांना असाच मोबदला देतो.

८५) आणि जकरिया, यहया व ईसा आणि इलियास सर्वच सदाचारी लोकांमधील होते.

८६) तसेच इस्माईल आणि अलयसअ, यूनुस आणि लूत यांना सर्व विश्वांवर आम्ही श्रेष्ठत्व दिलं.

८७) आणि त्यांच्या पूर्वजांमधील काहींना व वंशाजांना, तसेच भाऊबंदकीची आम्ही निवड केली. त्यांना रास्त मार्गाचे दर्शन घडवलं.

८८) हे अल्लाहचं मार्गदर्शन आहे, आपल्या भक्तांपैकी इच्छिल त्यांना तो मार्ग दाखवतो. त्यांनी जर अनेकेश्वर केले असते तर त्यांनी केलेलं सर्वकाही व्यर्थ ठरलं असतं.

८९) हेच ते लोक होत ज्यांना आम्ही ग्रंथ दिला, सत्ता (शरीअत) दिली आणि प्रेषितत्व बहाल केलं. जर त्या लोकांनी यावर विश्वास ठेवला नाही तर आम्ही अशा लोकांच्या हाती हे (कार्य) सुपूर्द करू जे नाकारणारे नसतील.

९०) हेच ते लोक होत ज्यांना अल्लाहनं मार्गदर्शन केलं. तेव्हा त्यांचं अनुकरण करा. त्यांना सांगा, मी यासाठी तुमच्याकडून कोणता मोबदला मागत नाही. ही तर सर्व जगवासीयांसाठी शिकवण आहे, दुसरं काही नाही.

९१) आणि तुम्ही अल्लाहच्या क्षमतेचा जसा अंदाज लावायचा होता तसा

अंदाज तुम्हास लावता आला नाही. जेव्हा ते म्हणाले, अल्लाहनं कोणत्याही मानवावर काहीएक अवतरलेलं नाही. सांगा, मग कुणी ते ग्रंथ अवतरले, जे मूसा घेऊन आला, मानवजातीस प्रकाश आणि मार्गदर्शनार्थ, तुम्ही त्याची वेगवेगळी पानं करून दाखवता आणि पुष्कळसं दडवून ठेवता आणि तुम्हास व तुमच्या पूर्वजांना जे ठाऊक नव्हतं ते तुम्हाला शिकवलं. त्यांना सांगा, अल्लाहनंच ते अवतरलं आणि त्यांना त्यांच्या व्यर्थ आणि किरकोळ अशा गोष्टीत खेळत राहू द्या.

९२) वरदान ठरंल असा हा ग्रंथ आम्ही पाठवलाय. आपल्या आधीच्या ग्रंथांची पुष्टी करणारा आणि सर्व शहरांचा उगम ठरलेल्या अशा मक्कावासीयांना तसेच सभोवतालच्यांना तुम्ही सावध करावं म्हणून. आणि ज्या लोकांना परलोकाचा विश्वास आहे ते यावर श्रद्धा धारण करतात आणि आपल्या नमाजांचं (प्रार्थनेचं) रक्षण करतात.

९३) जो अल्लाहच्या संबंधात खोट्या गोष्टी रचतो अथवा म्हणतो माझ्याकडं जे दिव्य प्रकटन पाठवलं गेलंय, वास्तवात त्याच्याकडं काहीही पाठवलेलं नसतानादेखील. आणि म्हणतो, मीही अल्लाहनं अवतरलंय तसंच अवतरतो. त्यापेक्षा अपराधी इतर कोण? तुम्ही पाहाल, जेव्हा अपराधी मृत्यूच्या यातनांनी वेढलेले असतील आणि देवदूत आपलं (हात) पसरून त्यांना सांगतील आपले प्राण हरण करा, आज तुम्हास अपमानित करणारी शिक्षा केली जाईल. कारण तुम्ही अल्लाहच्या संबंधात असत्य गोष्टी सांगत असत आणि त्याच्या वचनांना उद्दामपणे धुडकावीत होते.

९४) खरोखरच तुम्ही आमच्याकडं एकटंच आलात जसं आम्ही तुम्हाला पहिल्यांदा जन्माला घातलं होतं, आम्ही तुम्हाला जे काही दिलं होतं ते सर्व आपल्या पाठीमागं सोडून दिलं. तुमच्याबरोबर आम्हास तुमचे ते मध्यस्त दिसत नाहीत ज्यांच्याविषयी तुम्ही ते तुमचे सोबती असल्याची कल्पना केली होती. तुमच्या आपसातील तो दुवा तुटून गेला आणि तुम्ही ज्या कल्पना करीत होता त्या सर्व फोल ठरल्या.

९५) अल्लाहच धान्याच्या बिजास आणि खजुरीची गुठळी दुभंगतो, तो मृतातून सजीवास आणि सजीवातून मृतास काढतो, असा तुमचा अल्लाह आहे तर तुम्ही फसण्यासाठी कुठे जाता.

९६) पहाटेस (रात्रीतून) छेदून काढतो, तुमच्या विश्रांतीसाठी रात्र बनवली आणि सूर्य व चंद्रास (स्थळकाळ) मापनासाठी बनवले. अशा निर्धारित मर्यादा घालून दिलेल्या आहेत, त्या सर्वोच्च आणि सर्वज्ञानं.

९७) आणि तारे बनवणारा तोच, तुम्हास समुद्र आणि धरतीच्या अंधारात मार्ग सुचावा याकरिता. आम्ही आमची वचनं स्पष्ट करून दिलीत ज्ञान बाळगणाऱ्या लोकांसाठी.

९८) त्यानं तुम्हाला एका जीवापासून निर्माण केलं, नंतर तुमच्या वास्तव्याचं एक ठिकाण दिलं तसंच तुम्हाला सुपूर्द करण्याची (मरणोत्तर) जागा. समंजस लोकांसाठी आम्ही आपली वचनं स्पष्ट करून दिलेली आहेत.

९९) आणि त्यानंच आकाशातून पाऊस पाठवला. त्याच्यापासून सर्व वनस्पती काढल्या, तिच्यामधून हिरवी पानं आणि.... तिच्यामधून तिच्यावर एकावर एक कणांचा थर असलेली (कणसं) आणि खजुरीच्या फुलोऱ्यातून फळांचे घड खाली लोंबणारी, द्राक्षं आणि जैतुन (ऑलिव्ह) आणि डाळिंबाची (एकमेकांसारखी (दिसणारी) बाग अथवा (गुणधर्मांत) वेगवेगळी. ही फळं कशी येतात आणि ती कशी पिकतात ते पाहा, यात श्रद्धा धारण करणाऱ्यांसाठी संकेत आहेत.

१००) त्यांनी जिन्नांना (अदृश्य निर्मिती) अल्लाहचे भागीदार बनवले. वास्तविक पाहता अल्लाहनेच त्यांना निर्माण केलंय. आणि काही कळत नसल्यानंदेखील अल्लाहची मुलं आणि मुली बनवतात, अशा गोष्टींपासून तो पवित्र आणि श्रेष्ठ आहे.

१०१) तो नव्यानं आकाश आणि पृथ्वी साकारणारा आहे. त्यास भार्या नसतानादेखील मुलगा कसा होणार, त्यानंच सर्व वस्तू निर्माण केल्या आणि तोच सर्व बाबींची माहिती ठेवणारा आहे.

१०२) असा तुमचा अल्लाह, तुमचा विधाता त्याच्याशिवाय कोण ईश्वर

नाही. सर्व वस्तुंचा तो निर्माता, त्याची भक्ती करा, तो सर्व प्रकरणं हाताळणारा आहे.

१०३) तुमच्या दृष्टीस त्याचं आकलन होणार नाही, तो तुमच्या दृष्टीलाही पाहतो. तो आकलनापलीकडचा असून सर्व गोष्टींची माहिती बाळगून आहे.

१०४) तुमच्या विधात्याकडून तुमचे डोळे उघडणारे असे पुरावे आलेत. ज्यांनी पाहून घेतलं ते त्यांच्यासाठीच (भलं) आणि ज्यांनी डोळेझाक केली त्यांवरच त्याची (जबाबदारी) मी काही तुमची देखरेख करणारा नाही.

१०५) अशा विविध पद्धतीनं आम्ही वचनांचं वर्णन करतो, तुम्ही अभ्यास करून आलात असं त्यांनी सांगावं यासाठी, तसंच ज्या लोकांना कळतं त्यांना स्पष्ट करून देण्यासाठी.

१०६) तुमच्या विधात्यानं जे (दैवी प्रकटन) पाठवलंय त्याचं पालन करा, त्याव्यतिरिक्त कोणी ईश्वर नाही, जे अनेकेश्वरी आहेत त्यांच्याशी सरतं घ्या.

१०७) अल्लाहनं इच्छिलं असतं तर त्यांनी भागीदार जोडले नसते, आम्ही तुम्हाला त्यांच्यावर लक्ष ठेवणारा नेमलं नाही की त्यांचं व्यवहार मार्गी लावणारा (बनवलं) नाही.

१०८) अल्लाहस सोडून ते ज्यांचा धावा करतात त्यांना अभद्र बोलू नका. त्यांना ज्ञान नसल्यानं ते अल्लाहची निंदा करतील. अशा रीतीनं आम्ही सर्व समूहांना त्यांची कृत्यं आकर्षक करून दिलीत. नंतर ते आपल्या विधात्याकडंच परतणार आहेत, तेव्हा ते जे काही करत असत ते त्यांना कळवून देऊ.

१०९) हे लोक जोरजोरानं अल्लाहची शपथ वाहतात, त्यांच्याकडं जर काही संकेत आले तर विश्वास करतील. त्यांना सांगा, अल्लाहकडं संकेत आहेत पण जर ते आले तरी ते अल्लाहवर विश्वास करणार नाहीत, हे तुम्हाला कसं समजावं?

११०) आम्ही त्यांच्या मनांना आणि दृष्टींना गोंधळात टाकू जसं त्यांनी पहिल्यांदा विश्वास केला नव्हता, आम्ही त्यांना त्यांच्या दुर्वतनात भरटकत सोडून देऊ.

**पारा - ८**

१११) आम्ही त्यांच्याकडं देवदूत पाठवले असते. मृत त्यांच्याशी बोलले असते आणि सर्व गोष्टी त्यांच्या समक्ष ठेवल्या असत्या तरीही त्यांनी विश्वास केला नसता. अल्लाहच्या इच्छेत हेच असेल ती गोष्ट वेगळी. त्यांच्यातले बहुतेक अज्ञानी आहेत.

११२) अशा प्रकारे आम्ही प्रत्येक प्रेषितास, माणूस आणि जिन्नांमधील दुष्ट लोकांस त्यांचा शत्रू बनविले. त्यांच्यामधील काही एकमेकांना अलंकृत गोष्टी सांगतात, मुक्तपणे, (त्यांना) फसवण्यासाठी. तुमच्या विधात्यानं इच्छिलं असतं तर त्यांनी (लोकांनी) तसं केलं नसतं. त्यांना आणि ते रचत असलेल्या गोष्टींना सोडून द्या.

११३) परलोकावर ज्यांचा विश्वास नाही अशा लोकांची मनं त्यांच्याकडं वळू देत. त्यात त्यांना आनंद वाटू शकेल. आणि त्यातून त्यांना जे मिळवता येईल ते मिळवू दे.

११४) मग मी अल्लाहला सोडून दुसरा न्याय करणारा शोधू? ज्यानं तुमच्याकडं विवेचन करून दिलेला ग्रंथ अवतरलाय. आणि ज्यांना विधात्याकडून हा ग्रंथ दिलाय त्यांना माहीत आहे तुमच्या विधात्यानं हा (ग्रंथ) सत्यतेला अनुसरून आहे. तुम्ही यात काही शंका-कुशंका घेऊ नका.

११५) तुझ्या विधात्याचे शब्द सत्य आणि न्यायसंपन्न आहेत. त्याच्या वचनांत कुणी बदल करणार नाही. तो सर्वकाही ऐकतो व जाणतो.

११६) धरतीवर अशा लोकांचा भरणा आहे ज्यांचं ऐकल्यास ते तुम्हाला अल्लाहच्या मार्गापासून भरकटून टाकतील. ते आपल्या कल्पनांच्या मागे पडलेले आहेत आणि तर्कवितर्क लावत असतात, दुसरं काही नाही.

११७) जे आपल्या मार्गाला मुकतात त्यांची तुमच्या विधात्याला माहिती आहे आणि जे मार्गदर्शित आहेत त्याचीही त्याला कल्पना आहे.

११८) त्याच्या वचनांवर तुमची श्रद्धा असेल तर ज्यांच्यावर अल्लाहचं नाव घेतलं गेलंय तेच खा.

११९) ज्याच्यावर अल्लाहचं नाव घेतलं गेलंय ते का बरे तुम्ही खात नाही, ज्या वस्तुंची मनाई केलीय त्या तुम्हाला स्पष्ट सांगितल्या असताना? नाईलाज झाला असेल अशी परिस्थिती वगळता, आणि बरेच जण अडाणीपणानं आपल्या इच्छांमागे पडून इतरांना मार्गभ्रष्ट करतात. अतिरेक करणाऱ्यांना तुमचा विधाता चांगलं ओळखतो.

१२०) जाहीर अथवा गुप्त पापं सोडून द्या. जे पाप करीत होते लवकरच त्यांना त्या वाईट कामांमुळं शिक्षा होईल.

१२१) ज्याच्यावर अल्लाहचं नाव घेतलं गेलं नसेल ते खाऊ नका, खरंच तो अपराध आहे. सैतान आपल्या मित्रांच्या मनांना पेचात आणि शंकांत टाकतात तुमच्याशी वाद घालावा म्हणून. जर तुम्ही त्यांचं म्हणणं ऐकलं तर तुम्ही अनेकेश्वरी ठराल.

१२२) मृत होता त्यास आम्ही सजीव केलं आणि प्रकाश दिला, लोकांमध्ये त्याला हिंडताफिरता यावं म्हणून, मग तो त्यांच्यासारखा होईल जे अंधारात आहेत आणि त्यातून तो कधी बाहेर पडणार नाही? अशाच प्रकारे नाकारणाऱ्यांनी त्यांची कृत्यं आकर्षक केलेली आहेत.

१२३) आम्ही प्रत्येक वस्तीत मोठमोठ्या अपराधींना त्यांमध्ये कट रचण्यास मोकळीक दिली, पण ते स्वत: आपल्याविरूद्ध कट-कारस्थान रचण्यापलीकडं काही करू शकत नाहीत. याचं त्यांना भान नाही.

१२४) त्यांच्याकडं जेव्हा एखादं वचन येते ते म्हणतात, अल्लाहच्या प्रेषितांना जे दिलं गेलं तेच आम्हाला दिलं जात नाही, तोवर आम्ही विश्वास ठेवणार नाही. आपल्या प्रेषितत्वाची जबाबदारी कोणास सोपवावी हे अल्लाहलाच ठाऊक आहे. तेव्हा ज्या लोकांनी अपराध माजविला त्यांचा अल्लाहकडून लवकरच तिरस्कार घडेल आणि जे कट-कारस्थान ते

करीत आहोत त्यासाठी कडक शासन होईल.

१२५) अल्लाह ज्यांना मार्गदर्शन करू इच्छितो त्यांचं इस्लामसाठी मन खुलं करतो आणि ज्याला मार्गभ्रष्ट करू इच्छितो त्यांचं ऊर संकुचित करून ते आवळून टाकतो, जणूकाही त्याला आकाशात चढल्यासारखे वाटते. जे लोक निष्ठा बाळगत नाहीत त्यांना अल्लाह अशा रीतीनं शासन घडवील.

१२६) हा मार्ग तुमच्या विधात्याचा रास्त असा मार्ग आहे, आम्ही आमची वचनं स्पष्ट करून सांगितली यापासून शिकवण घेतील अशा लोकांसाठी.

१२७) त्यांच्यासाठी त्यांच्या विधात्यापाशी शांतता नांदत असलेलं ठिकाण आहे आणि त्यांनी केलेल्या पुण्यासाठी तो त्यांचा वाली आणि मित्र आहे.

१२८) ज्या दिवशी तो सर्वांना एकत्रित करील आणि जिन्न लोकांना (यक्ष योनींना) संबोधून तो म्हणेल तुम्ही कित्येक मानवांवर ताबा मिळवला आणि मानवांमधील त्यांचे मित्र म्हणतील हे विधाता, आमच्यातल्या काहींनी एकमेकांशी साधून घेतलं आणि तू आम्हास नेमून दिलेली मुदत संपून गेली. (अल्लाह) म्हणेल, तुमचं ठिकाण आता नरगाग्नी आहे. तुम्ही तिथं कायमचं राहाल. अल्लाहची इच्छा असेल त्याचा अपवाद वगळता. तुमचा विधाता निश्चितच प्रतिभावंत आणि सर्वज्ञ आहे.

१२९) अशा प्रकारे आम्ही काही अपराधींना इतर अपराधींवर वर्चस्व देतो त्यांनी केलेल्या कर्मामुळे.

१३०) जिन्न आणि मानवांचे समूह! तुमच्याकडं तुमच्यामधूनच आमचे प्रेषित आले नव्हते? तुम्हास आमच्या वचनांचं वर्णन करण्यासाठी आणि हा दिवस गाठण्यापासून सावध नव्हतं केलं? ते म्हणतील आम्ही स्वत:विरूद्धच साक्ष देत आहोत. या जगातल्या जीवनाने त्यांना फसवलं. आणि ते स्वत:विरूद्ध नाकारणारे असल्याची साक्ष देत आहेत.

१३१) तुमचा विधाता त्याच्या कोणत्याही वस्तीला तेथील लोकांना अपराधापायी भान नसताना नष्ट करणार नाही.

१३२) लोकांचा त्यांच्या कर्मानुसार दर्जा आहे. तुमचा विधाता त्यांच्या कर्माकडं दुर्लक्ष करत नसतो.

१३३) तुमचा विधाता निरपेक्ष आणि कृपाशाली आहे. त्याच्या मर्जीस आल्यावर तुम्हाला घालवून देऊन तुमच्या जागी मर्जीस येईल त्यांना उभं करील, जसे त्याने तुम्हाला एका इतर समूहाच्या वंशातून उभं केलं त्याप्रमाणे.

१३४) तुम्हाला दिलेला शब्द प्रत्यक्षात येणारच. तुम्ही आम्हाला विवश करू शकत नाही.

१३५) सांगा, लोकहो, तुम्ही तुमच्या जागी हवं ते करा, मीही करत आहे. लवकरच तुम्हाला कळून चुकेल. कोणाचा शेवट उत्तम ठरणार. परलोकात अन्यायी कधीही यशस्वी होत नसतात.

१३६) अल्लाहनं जे कृषीउत्पन्न आणि पशु निर्माण केलेत त्यातून ते आपल्या परीनं म्हणतात, हा अल्लाहचा वाटा आणि हा आम्ही ठरवलेल्या (अल्लाहच्या) भागीदारांकरिता. त्यांनी जोडलेल्या भागादीरांचा वाटा अल्लाहला पोचत नाही. पण अल्लाहचा वाटा त्यांच्या कल्पित भागीदारांना मिळतो. किती वाईट हा त्यांचा निर्णय?

१३७) अशा प्रकारे त्यांनी (जोडलेल्या कल्पित) भागीदारांनी, अनेकेश्वरींना (स्वत:च्या) संततीला नष्ट करणे मोहक बनवलंय. त्याचा विनाश घडवण्यासाठी आणि त्यांच्या धर्मात गोंधळ उडवून देण्यासाठी. अल्लाहची तशी इच्छा असती तर त्यांनी (लोकांनी) तसं केलं नसतं. त्यांना आणि ते रचत असलेल्या खोट्या गोष्टींना सोडून द्या.

१३८) ते म्हणतात, ही जनावरं आणि कृषीउत्पादनं निषिद्ध आहेत. त्यांच्या कल्पनेनुसार त्यांची इच्छा असेल त्यांना सोडून इतर कुणी त्यांचा लाभ घेऊ शकत नाही. आणि काही जनावरांना वाहतुकीसाठी निषिद्ध ठरवलंय. तर काही जनावरांना अल्लाहचं नाव उच्चारत नाहीत या

सर्व त्याच्याविषयी मिथ्या गोष्टी आहेत, ते जे काही खोटंनाटं रचताहेत त्यासाठी आम्ही लवकरच शिक्षा करू.

१३९) ते म्हणतात, अमुक जनावरांच्या उदरात असेल ते फक्त आमच्या पुरुषांसाठी खास आहे आणि आमच्या महिलांना ते निषिद्ध आहेत. पण जर ते उपजतच मृत निघाले तर त्यात त्यांचा सर्वांचा वाटा आहे. त्यांच्या अशा गोष्टींसाठी तो त्यांना लवकरच शिक्षा घडवील. त्याला सर्व बाबी ठाऊक असून तो बुद्धिमान आहे.

१४०) ज्या लोकांनी मूर्खांसारखे कोणतं ज्ञान नसताना आपल्या मुलांची हत्या केली, त्यांनी आपला विनाश ओढवून घेतला. आणि अल्लाहविषयी खोट्या गोष्टी रचत अल्लाहनं केलेल्या तरतुदी निषिद्ध ठरवल्या ते भरकटून गेले. त्यांचं मार्गदर्शन होणार नव्हतं.

१४१) त्यानंच मांडवावर आणि मांडवांशिवाय पसरणाऱ्या बागा निर्माण केल्या, खजुरी तसेच विविध प्रकारच्या फळांच्या शेतजमिनी, जैतुन (ऑलिव्ह) आणि डाळिंब (दिसण्यात) एकसारखी पण (गुणधर्मांत) वेगवेगळी. त्यांची फळं आल्यास ती खा आणि पीक काढाल त्या दिवशी त्याचा हक्क (उशर – दहावा भाग) दान-धर्मात देऊन टाका. अपव्यय खर्च करू नका, अल्लाहला अपव्यय करणारे आवडत नाहीत.

१४२) आणि जनावरांपैकी काही वाहतुकीसाठी आहेत तर काही जमिनीवरील (लहानसहान) आहेत. अल्लाहनं केलेल्या तरतुदींतून खा. सैतानांच्या वाटेला जाऊ नका, तो तुमचा उघड उघड शत्रू आहे.

१४३) अल्लाहनं आठ जोडपी निर्माण केली (दोन नर आणि दोन माद्या) दोन मेंढ्यांची आणि दोन शेळीची. त्यांना विचारा, अल्लाहनं दोन्ही नर निषिद्ध केले की दोन्ही माद्या? अथवा त्या दोघांच्या गर्भात आहे ते? तुम्ही सत्य बोलत असाल तर मला ज्ञानाच्या आधारे सांगा.

१४४) तसेच उंटांचे दोन आणि गाईच्या दोन (प्रकार) आहेत. विचारा अल्लाहनं दोन्ही नर निषिद्ध केलेत की दोन्ही माद्या? अगर जे त्या दोघांच्या उदरात आहेत ते. अल्लाहनं आदेश दिला तेव्हा तुम्ही हजर

होता? अल्लाहविरूद्ध खोटं रचणाऱ्यांपेक्षा अत्याचारी इतर कोण? काही माहिती नसताना लोकांना भरकटण्यासाठी अल्लाहच्या बाबतीत (तसं खोटं रचतात) अशा अत्याचारींना मार्गदर्शन लाभत नसते.

१४५) त्यांना सांगा, मला जे पाठवण्यात आलंय (दिव्य प्रकटन) त्याच्यात तर मला जे खावयाचंय त्यात असं निषिद्ध केलेलं आढळत नाही. मृत प्राणी, वाहत असलेलं रक्त किंवा डुकराचं मांस, कारण ते घाण आहे अथवा अल्लाहला सोडून दुसऱ्याचं नाव उच्चारून कापलेलं. पण जर कुणाचा नाईलाज झाला असेल, अवज्ञा करणं किंवा अतिरेक करण्याचा हेतु नसेल (तो अपवाद वगळून). तुमचा विधाता क्षमा करणारा आणि कनवाळू आहे.

१४६) ज्यू लोकांसाठी आम्ही नखं असलेली सर्व (प्राणी) निषिद्ध ठरवले. तसंच आम्ही त्यांच्यासाठी गाय आणि शेळीची चरबीदेखील वर्ज्य केली. त्यांच्या पाठीस, कोथळ्यास आणि हाडांना चिकटून राहिलेली (चरबी) वगळता. आम्ही त्यांना त्यांच्या उल्लंघनासाठी ही शिक्षा दिली. आम्ही खरं तेच सांगतो.

१४७) त्यांनी जर तुम्हाला खोटं म्हटलं तर त्यांना सांगा, तुमचा विधाता उदार असून तो कृपा करणारा आहे. अपराधी लोकांवरील त्याचा कोप टाळला जाऊ शकत नाही.

१४८) अनेकेश्वरी लोक म्हणतात, अल्लाहनं इच्छिलं असतं तर आम्ही अनेकेश्वरी झालो नसतो, न आमचे वाडवडील. किंवा आम्ही कोणत्या वस्तूला निषिद्ध ठरवलं असतं. त्यांच्या आधीचे लोकदेखील असंच खोटं सांगत राहिले, आमच्या शिक्षेची चव त्यांना मिळेपर्यंत. त्यांना सांगा, तुमच्याकडं कुठली माहिती असेल तर ती आमच्यासमोर उघड करा. तुम्ही फक्त कल्पनांच्या मागं जाता आणि तर्कवितर्क लावत असता.

१४९) सांगा, अल्लाहचाच युक्तिवाद तेवढा निर्णायक आहे. त्यांनी इच्छिलं असतं तर त्यानं तुम्हा सर्वांना मार्गदर्शित केलं असतं.

१५०) त्यांना सांगा, बोलवा तुमच्या साक्षीदारांना, अल्लाहनं अमुक वस्तू निषिद्ध केल्याची साक्ष देण्यासाठी, त्यांनी जर तशी साक्ष दिली तरी तुम्ही त्यांच्या बाजूने साक्ष देऊ नका. ज्यांना आमच्या वचनांना खोटं म्हटलं त्यांच्या इच्छांचं पालन करू नका. ज्या लोकांचा परलोकावर विश्वास नसतो ते इतरांना आपल्या विधात्याच्या बरोबरीचं ठरवतात.

१५१) त्यांना सांगा, मी वाचून दाखवतो जे निषिद्ध केलंय ते, तुमच्या विधात्यानं तुम्हास, त्याचे भागीदार जोडू नका असे म्हटले आहे. मातापित्यांशी दयेनं वागा, आपल्या संततीचा दारिद्र्याच्या भयापोटी बळी घेऊ नका, आम्ही त्यांनाही उपजीविका पुरवतो आणि तुम्हालादेखील. अश्लील गोष्टींच्या जवळपास फटकू नका, उघड असो वा गुपित. अशा कोणत्याही जीवास ठार करू नका, ज्याला अल्लाहनं आदरणीय ठरवलंय. न्यायी कारणासाठी असेल तो अपवाद वगळता. या गोष्टी तुम्हाला आज्ञांकित करण्यात आल्या आहेत, तुम्हाला समज घडावी म्हणून.

१५२) अनाथांच्या मालमत्तेजवळ जाऊ नका, त्यांच्या भल्यासठी असेल ते सोडून. जोपर्यंत ते सज्ञानावस्थेत पोहोचत नाहीत. माप आणि तोल न्याय्य रीतीनं करा. कोणत्याही जीवांवर आम्ही तिच्या (सहन) शक्तीपलीकडं ओझं टाकत नाही. बोलाल ते न्यायाचं असावं. कोणाशी जवळचं नातं असलं तरी. अल्लाहला दिलेलं वचन पाळा, तुमच्या उपदेशासाठी या आज्ञा दिल्या जात आहेत.

१५३) हाच तो माझा रास्त मार्ग तो धरा, दुसऱ्यांच्या मार्गावर जाऊ नका ते तुम्हाला त्याच्या मार्गापासून इतरत्र वळवतील. तुम्हाला समज घडवण्यासाठी, तुम्हाला हे आज्ञांकित केलं जातंय.

१५४) आम्ही मूसांना ग्रंथ दिला, जे भले आहेत त्यांच्यासाठी आपलं अनुगृह परिपूर्ण करण्यास ज्यामध्ये सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण, तसेच मार्गदर्शन आणि कृपा. त्यांना आपल्या विधात्यास भेटायचं आहे यावर विश्वास करावा म्हणून.

१५५) आम्ही अनुगृहांनी संपन्न हा ग्रंथ अवतरला त्याचंच पालन करा. आणि

सद्वर्तन करा, म्हणजे तुम्हास कृपा लाभेल.

१५६) तसेच तुम्हाला हे म्हणता येऊ नये की आमच्या आधी फक्त दोन समूहांवर हे ग्रंथ अवतरले होते आणि आम्ही त्यातील शिकवणींशी अपरिचित होतो.

१५७) किंवा तुम्ही म्हणावं आम्हास जर ग्रंथ दिला गेला असता तर आम्ही त्यांच्यापेक्षा अधिक मार्गदर्शित झालो असतो. तेव्हा आता तुमच्या विधात्याकडून स्पष्ट असा पुरावा आलाय. मार्गदर्शन आणि कृपे (सहित), मग ज्यांनी अल्लाहची वचनं धिक्कारली आणि त्यांच्यापासून दूर गेले त्यांच्यापेक्षा अधिक अपराधी तो कोण? आम्ही अशा लोकांना लवकरच वाईट अशी शिक्षा करणार आहोत, ते आमच्या संकेतांपासून दूर जात होते म्हणून.

१५८) ते वाट पाहत आहेत देवदूत त्यांच्याकडं येण्याची, किंवा तुमचा विधाता येऊन उभा राहावा किंवा तुमच्या विधात्याचे काही संकेत त्यांच्याकडं यावेत म्हणून. पण ज्या दिवशी तुमच्या विधात्याचे संकेत येतील, त्यावर विश्वास ठेवणं त्यांच्या काही कामी येणार नाही, ज्यांनी आधी श्रद्धा धारण केली नव्हती किंवा आपल्या श्रद्धेपासून कोमते भलं करून घेतलं नव्हतं त्यांना सांगा, मग बसा वाट पाहत आम्हीदेखील वाट पाहत आहोत.

१५९) ज्या लोकांनी आपल्या धर्मात फूट पाडली आणि वेगवेगळ्या पंथांत विभागले गेले त्यांच्याशी तुमचं काही देणं-घेणं नाही. त्यांचं प्रकरण अल्लाहच्या हवाली आहे, मग आम्ही ते जे करत राहिले त्यांना (त्याचे परिणाम) दाखवून देऊ.

१६०) कुणी भलं केलं असेल तर त्याला दहा पटीनं मोबदला मिळेल. आणि ज्यांनी वाईट असं काही केल्यास त्यांना त्याच्या बरोबरीनं मोबदला मिळेल. त्यांच्याशी काही अन्याय केला जाणार नाही.

१६१) सांगा, माझ्या विधात्यानं नक्कीच मला रास्त मार्गाचं दर्शन घडवलंय. तोच खरा धर्म इब्राहीम यांचा ज्यावर ते ठाम होते. आणि ते (इब्राहीम)

अनेकेश्वरी नव्हते.

१६२) सांगा, माझी नमाज, माझं बलिदान, माझं जगणं आणि माझं मरणं – साऱ्या विश्वांचा विधाता अल्लाहसाठीच आहे.

१६३) त्याचा कुणी भागीदार नाही, मला याचा आदेश दिला गेलाय. आणि मी पहिलावहिला आज्ञा धारण करणारा आहे.

१६४) तुम्ही त्यांना विचारा, मी अल्लाहला सोडून दुसरा कुठला विधाता शोधून काढू, तोच तर सर्वांचा विधाता आहे. प्रत्येकास आपल्याच कर्मांचे परिणाम भोगावे लागतील. कुणी इतर कुणाचं ओझं वाहणार नाही. मग तुम्हाला तुमच्या विधात्याकडं परतावयाचंय. तुम्ही ज्याबाबत वाद घालत होता (त्याचं सत्य काय) ते दाखवलं जाईल.

१६५) तोच ज्यानं तुम्हाला धरतीवर आपला प्रतिनिधी बनवून पाठवलं. तुमच्यामधील काहींना इतर काहींपेक्षा वाढवून दर्जा दिलाय. त्यानं तुम्हाला जे प्रदान केलंय त्याद्वारे तुमची परीक्षा घेण्यासाठी. निश्चितच तुमचा विधाता शिक्षा करण्यात तत्पर आहे. तसेच तो क्षमा करणारा आणि कृपा करणारादेखील आहे.

-------

# ७. सूरह अल-आराफ

**मक्काकालीन, आयती २०६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ. लाम. मीम. सॉद.

२) आम्ही तुमच्यावर अवतरलेला हा ग्रंथ, याविषयी तुमच्या मनात कोणतीही शंका असता कामा नये. लोकांना सावध करण्यासाठी तसेच श्रद्धाळूंना उपदेश म्हणून.

३) तुमच्या विधात्यानं तुमच्याकडं जे अवतरलंय त्याचंच अनुसरण करा, त्याच्याव्यतिरिक्त कोणत्याही विभूतींचं अनुसरण करू नका. पण तुम्ही आमच्या उपदेशांची किंचितच आठवण करता.

४) कितीतरी वस्त्यांना आम्ही उद्ध्वस्त केलं, ते रात्री झोपेत असताना, अगर दुपारच्या प्रहरी विश्रांती घेत असताना आमचा प्रकोप (त्यांच्यावर) कोसळला.

५) आणि जेव्हा हे त्यांच्यावर कोसळलं तेव्हा ते ''नक्कीच आम्ही अत्याचारी आहोत.'' असेच बोलत होते.

६) आम्ही नक्कीच ज्यांच्याकडं प्रेषितांना पाठवलं त्यांना आणि प्रेषितांना (देखील) जाब विचारणार.

७) आम्ही आमच्या माहितीतील घडलेले सर्व प्रसंग त्याच्यासमोर कथन करू. कारण आम्ही कधीच अनवधान नव्हतो.

८) त्या दिवशी (कर्मांचा) तोल-मोल अधिकृत असेल. मग ज्यांचे पारडे जड असेल त्यांचा उत्कर्ष होईल.

९) आणि ज्यांचे पारडे हलके असेल हेच ते लोक आहेत ज्यांनी स्वत:चा आत्मघात करून घेतला. ज्याअर्थी त्यांनी आमच्या संकेतांशी अन्याय केला.

१०) आणि आम्ही (जेव्हा) तुम्हांस पृथ्वीत वसवलं, साधनं उपलब्ध करून दिली तेव्हा तुमच्यामधील मोजकेच लोक आभार मानतात.

११) आम्ही तुम्हाला निर्माण केलं, साकारलं मग आम्ही देवदूतांना, आदमसमोर नतमस्तक होण्यास सांगितलं. इबलीस वगळता सर्वच्या सर्व नतमस्तक झाले. तो नतमस्तक होणाऱ्यांपैकी नव्हता.

१२) (अल्लाहनं) म्हटलं, आमचा तसा आदेश असताना तुला नतमस्तक होण्यास कोणती अडचण होती? तो (इबलीस) म्हणाला, मी त्याहून श्रेष्ठ आहे, तू मला अग्नीपासून निर्माण केलं तर त्याला मातीतून (बनवलं).

१३) (अल्लाहनं) सांगितलं, खाली उतर येथून. इथं श्रेष्ठत्वाचा गर्व करण्याची तुझी लायकी नाही. चालता हो. निश्चितच तू नीचांपैकी आहेस.

१४) तो (इबलीस) म्हणाला, पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत मला अवकाश दे.

१५) निश्चितच, ज्यांना संधी दिली त्यातलाच तू आहेस.

१६) (इबलीस) म्हणाला, जशी तू माझी वाट चुकविली तसंच मीही त्यांना सरळमार्गापासून भ्रष्ट करण्यास नक्कीच ठाण मांडणार.

१७) मी त्यांच्यावर समोरून, पाठीमागून, उजवीकडून, डावीकडून तुटून पडीन. त्यांच्यातले बरेचशे लोक तुला कृतज्ञ आढळणार नाहीत.

१८) (अल्लाहनं) उत्तरादाखल बजावलं, चालता हो इथून. अपमानित आणि धि:क्कारित, नक्कीच जे तुझं अनुकरण करतील. त्यांच्या सर्वांशी मी नरक भरून टाकीन.

१९) आणि हे आदम! तू आणि तुझी पत्नी स्वर्गात राहा. वाटेल ते खा. पण त्या झाडाजवळ जाऊ नका (तसं केल्यास) अत्याचारींपैकी होऊन जाल.

२०) मग सैतान त्यांना फूस देऊ लागला. त्यांची लज्जास्थाने उघडकीस आणण्यासाठी, म्हणू लागला, तुमच्या पालनकर्त्यानं तुम्हाला या

झाडापासून वर्ज्य करण्याचं एवढंच कारण; तुम्ही देवदूत बनू नये अथवा अनंतकालीन आयुष्य लाभू नये.

२१) 'मी तुमचा शुभचिंतक' असल्याचं सांगून त्यानं शपथ वाहिली.

२२) असं करून त्यांच्यावर भुरळ घातली, त्यांनी त्या वृक्षाची चव घेतली, तोच त्यांची लज्जास्थाने उघडी झाली आणि ते स्वर्गातील पानं एकमेकांना जोडून झाकू लागले. त्यांच्या विधात्यानं मग त्यांना हाक देऊन सांगितलं, मी त्या झाडापाशी (जाण्यास) मज्जाव केला नव्हता? आणि म्हटलं नव्हतं, तुम्हाला सैतान तुमचा उघड शत्रू आहे म्हणून?

२३) ते म्हणू लागले, हे आमच्या पालनकर्त्या, आम्हीच स्वत:वर अत्याचार ओढवून घेतला. तू आम्हाला क्षमा केली नाहीस आणि दया दाखवली नाहीस तर नक्कीच आम्ही नाश करू.

२४) (अल्लाहनं) सांगितलं, उतरा, खाली जा, तुम्ही एकमेकांचे शत्रू आहात. तुमच्यासाठी आता एका ठराविक काळासाठी पृथ्वी तुमचं ठिकाण आणि जगण्याचे साधन आहे.

२५) आणि सांगितलं, तेथेच तुम्ही जगाल, त्यातच तुम्हाला मरण येईल आणि तिच्यामधूनच तुम्हाल (परत) काढलं जाईल.

२६) हे आदमची संतती, आम्ही तुमच्याकरिता वस्त्रं अवतरली, आपली गुपितं (अंग) झाकण्यासाठी तसेच सौंदर्याची (साधनं) म्हणून, पण वाईट वृत्तीशी अलिप्त ठेवणारी वस्त्रं उत्तम असतात. त्यांनी चिंतन करावं यासाठी अल्लाहच्या संकेतांमधील आहे हे.

२७) हे आदमच्या संतती! तुमच्या मातापित्यास जसे त्याने स्वर्गातून निघण्यास भाग पाडले त्यांना विवस्त्र करून त्यांची गुपितं उघडकीस आणली तसं तुम्हाला सैतानानं फितूर करू नये. निश्चितच तो आणि त्याचं टोळकं तुम्हाला अशा ठिकाणाहून पाहतायत जे तुम्हास दिसत नाही. जे श्रद्धाळू नाहीत अशांसाठी आम्ही सैतानांना त्यांचे वाली केलंय.

२८) जेव्हा ते व्यभिचार करतात तेव्हा ते म्हणतात, आमचे पूर्वज आम्हाला असंच आढळले आणि अल्लाहनंच असे आदेश दिलेत. त्यांना सांगा, अल्लाह व्यभिचार करण्यास कधीच सांगत नाही. तुम्हास माहीत नाहीत अशा गोष्टी अल्लाहशी का जोडता?

२९) (त्यांना) सांगा, माझ्या विधात्यानं न्यायाची आज्ञा दिलीय. सर्व प्रार्थनेस उभे असता आपली दिशा रास्त असू द्या. त्याचा धावा करा, प्रामाणिकपणे त्याचा धर्म पाळा. तुम्हाला सुरुवातीस (जन्म दिला) तसंच तुम्हाला परत उठवलं जाईल.

३०) काहींना त्यानं मार्गदर्शन केलं आणि इतर काहींचं मार्गभ्रष्ट होणं सिद्ध झालं. कारण त्यांनी अल्लाहस सोडून सैतानांना आपले स्वामी म्हणून धरले. आणि असे समजून राहिले की ते खरोखरच सरळमार्गी आहेत.

३१) हे आदमची संतती, प्रत्येक वेळी मशीदीकडं (प्रार्थनेसाठी) निघताना उचित असा आकर्षण अंगीकारा, खा-प्या, पण एका मर्यादेत राहून. तो निश्चितच उधळपट्टी करणाऱ्यांना पसंत करीत नाही.

३२) म्हणा, जी आकर्षणं आणि स्वच्छ व पावन उदरनिर्वाहाच्या वस्तू अल्लाहनं आपल्या भक्तांसाठी काढल्या आहेत त्या कुणी वर्ज्य केल्यात? सांगा त्यांना, श्रद्धाळूंसाठी या (वस्तू) जगातील जीवनासाठी आहेत आणि निर्णयाच्या दिवशी तर फक्त त्याच्यासाठीच आहेत. अशाप्रकारे आम्ही आमच्या वचनांचं विवेचन करतो ते जाणकारांसाठी.

३३) त्यांना सांगा माझ्या विधात्यानं व्यभिचारास अवैध ठरवलंय मग ते उघड असोत की गुप्त. तसेच पापं आणि सत्याधिष्ठित नसलेली उल्लंघनं, आणि अल्लाहचे भागीदार ठरवणं ज्यांच्याविषयी अधिकृत (प्रमाण) अवतरले नाहीत आणि अल्लाहविषयी असं काही बोलणे ज्याची तुम्हाला माहिती नाही.

३४) साऱ्या जनसमूहासाठी एक कालावधी ठरवलेला असतो, मग त्याचा ठराविक भाग संपुष्टात आला की एका घटकेचा विलंब होत नाही अथवा तो आगाऊ येत नाही.

३५) आदमच्या संतती! जेव्हा कधी तुमच्यातलेच तुमच्याकडे प्रेषित म्हणून येतील आणि माझ्या आयतींचं वर्णन करतील तेव्हा ज्यांनी सद्‌वर्तन केले आणि सुधारले त्यांच्यासाठी कसलीच भीती नसेल आणि ते दु:खीही होणार नाहीत.

३६) आणि जे लोक आमची वचनं फेटाळून लावली व त्याचा गर्व केला हे नरकाचे लोक आहेत ते कायमचं तिथंच राहतील.

३७) ज्याने अल्लाहविषयी खोट्या कल्पित गोष्टी रचल्या अथवा त्याच्या वचनांना नाकारलं त्यांच्यापेक्षा अधिक अन्यायी कोण? अशा लोकांना त्यांच्या नशिबी लिहिलेला वाटा त्यांना पोहचणारच. आमचे दूत त्यांचे प्राण काढून घेण्यास पोचतील आणि त्यांना विचारतील, अल्लाहऐवजी ज्यांचा तुम्ही धावा करीत राहिला ते कुठं आहेत आता? ते उत्तर देतील, ते तर आम्हाला सोडून पसार झाले, ते नाकारणाऱ्यांपैकीच होते याची साक्ष ते स्वत:च देतील.

३८) अल्लाह त्यांना सांगेल, पूर्वी होऊन गेलेल्या जिन्न आणि मानवांच्या समूहांबरोबरच तुम्हीसुद्धा नरकात दाखल व्हा. जेव्हा केव्हा नवी मंडळी दाखल होईल तेव्हा ती पूर्वीच्या मंडळींचा धि:क्कार करील. जेव्हा सर्वच्या सर्व एकत्र येतील ती मागून आलेली मंडळी आपल्या पूर्वीच्या लोकांबाबत म्हणेल, आमच्या विधाता! हे ते लोक आहेत ज्यांनी आमची वाट चुकविली. त्यांना नरकाग्नीची दुप्पट शिक्षा कर. अल्लाह म्हणेल, सर्वांसाठीच दुप्पट आहे. पण हे तुम्हाला कळलं नाही.

३९) आणि पूर्वीचे लोक म्हणतील, तुम्ही आमच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ नव्हते. आता मजा घ्या शिक्षेची. तुम्ही जे काही कमविलं त्याचं फळीत.

४०) निश्चितच ज्या लोकांनी आमच्या वचनांना फेटाळलं आणि (त्याचा) गर्व केला त्यांच्याकरिता आकाशाची दारं उघडली जाणार नाहीत, ते स्वर्गात दाखल होणार नाहीत, जोवर सुईच्या छिद्रातून उंट जात नाही. पापी लोकांना आमच्याकडून हाच मोबदला.

४१) नरकच त्यांचं अंथरुण आणि वरून पांघरण्यासाठीदेखील. अत्याचारींना

आमची हीच फळं.

४२) आणि ज्या लोकांनी श्रद्धा ठेवली व चांगली कर्म केलीत, तर कुणावरही आम्ही त्याच्या ऐपतीपलीकडं भार टाकत नाही. हे स्वर्गाचे लोक आहेत ते सदैव तेथेच राहतील.

४३) त्यांच्या मनातला क्लेष आम्ही काढून टाकला. त्यांच्या (स्वर्गाच्या) खालून नद्या वाहतात, ते म्हणतील, ज्या अल्लाहनं आम्हाला मार्ग दाखविला त्याचं स्तवन असो. अल्लाहनं जर आमचं मार्गदर्शन केलं नसतं तर मार्गदर्शन आम्हाला लाभलं नसतं. आमच्या विधात्याकडून सत्य घेऊन प्रेषित आले. आणि त्यांना सांगण्यात येईल, हा आहे तो स्वर्ग, ज्याचे तुम्ही वारसदार आहात, जे कर्म तुम्ही करत होते त्याबद्दल.

४४) स्वर्गातले लोक, नरकातल्यांना हाक मारून सांगतील, (पाहा!) आमच्या विधात्यानं आम्हाला दिलेल्या वचनांची पूर्ती केली. तुमचं काय? तुमच्या पालनकर्त्यानं दिलेली वचनं खरी ठरलीत? ते उत्तर देतील, हो. तेव्हा दवंडी पिटणारा त्यांना हाक देईल, अपराध्यांवर अल्लाहचा धि:क्कार असो,

४५) हे लोक, अल्लाहच्या मार्गात अडथळा आणत असत त्यातील उणिवा शोधत असत, आणि पारलौकिक जीवनाला नाकारत असत.

४६) त्याच्या मध्ये पडदा आहे. उंचवट्यावर काही माणसं जे प्रत्येकाला त्यांची तोंडावळ पाहून ओळखतील स्वर्गातल्यांना हाका मारून (शुभेच्छा व्यक्त करतील) तुम्हाला शांतता लाभो. ते स्वर्गात दाखल झालेले नाहीत (त्या) प्रतीक्षेत आहे.

४७) त्यांच्या नजरा जेव्हा नरकातल्या लोकांकडे वळतील, ते म्हणतील, आमच्या विधात्या! आम्हाला अपराधी लोकांचा सोबती बनवू नकोस.

४८) उंचवट्यावरील माणसं काही लोकांना त्यांच्या खूणेवरून ओळखून त्यांना हाक मारतील. तुमच्या मंडळींचं आणि तुमच्या अहंकारानं तुमचं काहीही भलं केलं नाही.

४९) याच लोकांवर अल्लाहची कृपा होणार नाही अशी तुम्ही शपथ वाहत होता? तुम्ही स्वर्गात प्रवेश करा, तुम्हाला कसलीच भीती नका की दु:खाचा कारण.

५०) मग नरकातले लोक स्वर्गातल्या लोकांना त्यांच्यासाठी पाणी ओतण्याची तसंच अल्लाहनं त्यांना जी उपजीविका दिलीय त्यातून काही देण्याची मागणी करतील. ते उत्तर देतील अल्लाहनं या वस्तू नाकारणाऱ्यांसाठी वर्ज्य केल्या आहेत.

५१) या लोकांनी (तर) धर्माचा खेळ आणि करमणूक केली आणि या जगातल्या जीवनानं त्यांच्यावर भुरळ घातली. आम्ही आज त्यांना तसंच विसरून गेलो जसं त्यांनी आजच्या या दिवसाला विसरलं होतं, आणि आमच्या वचनांना नाकारत राहिले.

५२) आम्ही त्यांच्याकडं ज्ञानावर आधारित विस्तारित ग्रंथ पाठवले, जे श्रद्धाळूंसाठी मार्गदर्शन आणि कृपा आहे.

५३) मग ते वाट पाहत आहेत, यात ज्यांचा उल्लेख आहे ते प्रत्यक्ष येण्याची? ज्या दिवशी त्यातलं म्हणणं प्रत्यक्षात येईल, तेव्हा ज्या लोकांनी आधी याला विसरलं होतं ते म्हणतील, निश्चितच आमच्या विधात्याचे प्रेषित सत्यच आणले होते. आमच्यावतीनं मध्यस्थी करण्यासाठी कुणी मध्यस्थ आहे का? किंवा आम्हाला परत पाठवलं जाईल आणि आम्ही जे काही करत राहिलो त्यापासून परावृत्त होऊ, त्यांनीच स्वत:चा घात करून घेतला आणि जे काही खोट्या गोष्टी रचत होते त्या त्यांच्यापासून दूर गेल्या.

५४) तुमचा विधाता अल्लाह आहे ज्यानं सहा दिवसांत अवकाश आणि पृथ्वीचं निर्माण केलं आणि मग सिंहासनावर विराजमान झाला. तोच रात्रीला दिवसाने झाकतो. तिच्यापाठोपाठ दिवस धावत येतो आणि सूर्य, चंद्र, तारे सर्व त्याच्या आदेशांच्या अधीन आहेत. लक्षात ठेवा, निर्माण करणं आणि प्रशासन करणं त्याचंच (काम) आहे. सर्व विश्वांचा विधाता अल्लाह, मोठा समृद्धशाली आहे.

५५) लीनतेने आणि नम्रतेनं आपल्या विधात्याचा धावा करा, मर्यादा मोडणं त्याला पसंत नाही.

५६) सुव्यवस्था नांदत असता पृथ्वीवर अत्याचार माजवू नका, त्याचा धावा करा भीती बाळगून व आशेनं. अल्लाहची कृपा भल्या लोकांच्या सान्निध्यात असते.

५७) आपल्या कृपेपुढं त्याची शुभवार्ता देणाऱ्या वाऱ्यांना पाठवणारा तोच. मग ते ढगांच्या जड ओझ्यानं भरले जातात. आम्ही त्यांना मृत (कोरड्या) शहराकडं लावून देतो आणि त्यांच्यातून पाऊस वर्षावतो. आणि मग त्यातून सर्व प्रकारची पिकं काढतो. अशाच प्रकारे आम्ही मृत पावलेल्यांना उभं करू. जेणेकरून तुम्ही चिंतन कराल.

५८) आणि तिच्या विधात्याच्या आदेशानुसार चांगल्या जमिनीतून चांगलंच उत्पादन निघते आणि जी वाईट आहे तिच्यातून वाईटापलीकडं काहीच निघत नाही. अशा रीतीनं आम्ही कृतज्ञ लोकांना विविध पद्धतीनं आमची वचनं स्पष्ट करतो.

५९) आम्ही नूह (अ.) यांना त्यांच्या समुदायाकडं पाठवलं. ते म्हणाले, माझ्या लोकहो, अल्लाहची भक्ती करा, इतर कोणी तुमचा ईश्वर नाही. मला भीती आहे एका भयंकर की तुमच्यावर प्रकोप कोसळण्याची.

६०) त्यांच्या लोकांमधील प्रमुख पुढारी म्हणाले, तुम्ही आम्हाला उघडपणे वाट चुकलेले दिसतात.

६१) ते म्हणाले, माझ्या लोकहो, मी नाही भरकटलेला, मी तर या विश्वांच्या विधात्याकडून प्रेषित आहे.

६२) मी माझ्या विधात्याचा संदेश तुम्हास पोचवतो, मी तुम्हाला सुचित करतो, अल्लाहकडून मला जे माहीत झालंय ते तुम्ही जाणत नाही.

६३) तुम्हाला नवल वाटते? तुमच्यामधील एका व्यक्तीद्वारे तुमच्या विधात्याचे संदेश येत आहेत याचे? तुम्हाला सावध करण्यासाठी, तुम्ही अल्लाहचं भय बाळगावं आणि तुमच्यावर अल्लाहची कृपा व्हावी

म्हणून?

६४) पण त्यांनी त्यांना धुडकावलं तेव्हा आम्ही त्यांना (नूह अ.) व त्यांच्याबरोबर नावेत असलेल्या लोकांना वाचवलं आणि ज्यांनी आमच्या वचनांना खोटं ठरवलं होतं त्यांना आम्ही बुडवून टाकलं, ते खरोखरच आंधळे होते.

६५) आम्ही आद लोकांसाठी त्यांच्या बांधवांपैकी हूद (अ.) यांना पाठवलं. ते (हूद अ.) म्हणाले, माझ्या लोकहो, अल्लाहची भक्ती करा, त्याच्याव्यतिरिक्त तुमचा इतर कोणी ईश्वर नाही. तुम्हाला भीती नाही का वाटत?

६६) त्यांच्या (हूद अ. यांच्या) समुदायातील नाकारणाऱ्यांमधील प्रमुख लोक म्हणाले, आम्हाला तर तुम्ही वेडसर दिसता, आम्हाला वाटतं तुम्ही खोटं आहात.

६७) ते म्हणाले, मला नाही वेड लागलं, मी तर सकल जगांच्या विधात्याकडून प्रेषित आहे.

६८) माझ्या विधात्यानं पाठवलं तेच मी पोचवतो आणि मी तुमचा हितचिंतक आहे.

६९) तुम्हाला नवल वाटते तुमच्यामधील एका व्यक्तीद्वारे तुमच्या विधात्याचे उपदेश येतात याचं? तुम्हाला सावध करण्यासाठी. त्यानं तुम्हाला नूह (अ.) यांच्या समुदायानंतर उत्तराधिकारी बनवलं त्याची आठवण करा. आणि तुम्हाला शक्तिशाली बनवलं. अल्लाहनं दिलेल्या देणगीची आठवण करा. तुमचा उत्कर्ष होईल.

७०) ते म्हणू लागले, तुम्ही आमच्याकडं यासाठी आलात, आम्ही एकट्या अल्लाहचीच भक्ती करावी आणि आमचे वाडवडील ज्यांची पूजा-अर्चा करीत त्यांना सोडून द्यावं म्हणून, मग जर तुम्ही खरं बोलत असाल तर आम्हाला ज्याची धमकी देता ते घडवूनच दाखवा.

७१) ते (हूद अ.) म्हणाले, माझ्या विधात्याचा कोप आणि शिक्षा तुमच्यावर

आधीच कोसळली आहे. तुम्ही ज्या नावांच्या बाबतीत माझ्याशी वाद घालता जी तुम्ही आणि तुमच्या वाडवडिलांनी ठेवली आहेत. त्यांच्याविषयी सनद अल्लाहनं अवतरल्या नाहीत. तर मग आता वाट पाहा, मीही आहे तुमच्याबरोबर वाट बघत बसलोय.

७२) आम्ही आमच्या कृपेनं त्यांना (हूद अ.) आणि त्यांच्याबरोबर होते त्या लोकांना वाचवलं आणि ज्यांनी आमची वचनं भंग केली, ते श्रद्ध नव्हते. त्यांची पाळंमुळं कापून टाकली.

७३) समूद (समूहाकडं) त्यांच्या बांधवांमधील सॉलेह यांना पाठवलं. ते म्हणाले, माझा समुदाय! अल्लाहची आराधना करा. त्याव्यतिरिक्त तुमचा कुणी ईश्वर नाही. तुमच्या विधात्याकडून तुमच्याकडं स्पष्ट संकेत आले आहेत. ही अल्लाहची उंटीण आहे. तिला अल्लाहच्या जमिनीत चरू द्या. तिला इजा देण्यासाठी हात नका लावू, नाहीतर भयानक प्रकोपात धरले जाल.

७४) आम्ही तुम्हाला आदचे वारस केले, जरा त्याची आठवण करा, आम्ही भूमीवर तुम्हाला वसाहती (निर्माण करून) दिल्या, खुल्या मैदानात तुम्ही महाली उभारता तर डोंगरामध्ये घरं कोरता, तेव्हा अल्लाहच्या या उदार देणग्या आठवत राहा. जमिनीवर अनाचार माजवीत फिरू नका.

७५) त्याच्या समुदायातील उद्धट सरदारांनी दीनदुबळ्यांमधील श्रद्धाळू लोकांना विचारलं, तुम्हाला माहीताय सॉलेह त्यांच्या विधात्याकडून पाठवलेले प्रेषित आहेत म्हणून? ते म्हणाले, निश्चितच, त्यांच्याबरोबर जो काही (संदेश) पाठवला गेलाय आम्ही त्यावर श्रद्धा ठेवतो.

७६) ऐटित वावरणाऱ्या त्या लोकांनी सांगितलं, तुम्ही जे मान्य करता आम्ही त्याला धुडकावून लावतो.

७७) मग नंतर त्यांनी (उद्दाम लोकांनी) आपल्या विधात्याच्या आदेशाला मोडीत काढून त्या उंटिणीची धोंडशीर कापली आणि सॉलेहला म्हणाले, जर तुम्ही प्रेषित असाल तर आम्हाला जी धमकी देता ती वास्तवात आणा.

७८) तोच सकाळच्या वेळी एका भूकंपानं त्यांना अकस्मात धरून घेतलं आणि आपापल्या घरात ते तोंडघशी पडून राहिले.

७९) आणि मग त्यांनी (सॉलेह) त्यांच्याकडून तोंड फिरवलं आणि म्हणाले, माझ्या विधात्याचा संदेश मी तुमच्यापर्यंत पोचवला, उपदेशही केला पण उपदेश करणारे तुम्हाला पसंत नाहीत.

८०) आणि लूत (अ.) यांनी जेव्हा आपल्या समुदायाला विचारलं, तुमच्यापूर्वी जगात कुणीही केलं नसेल असं अभद्र चाळं तुम्ही करता.

८१) तुम्ही स्त्रियांना सोडून पुरुषांकडं आपल्या कामवासना पूर्ण करता, तुम्ही तर सर्वच मर्यादा भंग करून टाकल्या.

८२) त्यांच्या लोकांना यापलीकडं दुसरा काही उत्तर सुचलं नसता ते म्हणाले, त्यांना या वस्तीतून हाकलून लावा, हे लोक तर पावित्र्य जपताहेत.

८३) आम्ही त्यांची पत्नी वगळता त्यांना व इतर कुटुंबीयांना वाचवलं. ती मागे राहणारी होती.

८४) आम्ही त्यांच्यावर (दगडांचा) वर्षाव केला. पाहा, त्या पापी लोकांचे शेवटी काय हाल झालं ते.

८५) आम्ही मदयनी लोकांकडं त्यांच्या भाऊबंदांपैकी शुऐब (अ.) यांना पाठवलं. ते म्हणाले, माझ्या बंधुनो, अल्लाहची भक्ती करा, त्याच्याव्यतिरिक्त इतर कोणी ईश्वर नाही. आता तुमच्याकडं तुमच्या विधात्याकडून स्पष्ट पुरावा आलाय, तेव्हा माप आणि तोल प्रामाणिकपणे करा. लोकांना द्यावयाच्या वस्तू कमी करू नका. धरतीवर सुव्यवस्था नांदत असताना, त्यामध्ये अनाचार माजवू नका. तुम्ही मान्य केलं तर हेच तुमच्या भल्याचं आहे.

८६) सर्व रस्त्यांवर लोकांना भीती घालत बसू नका. ज्यांनी श्रद्धा बाळगली त्यांच्यासाठी अल्लाहच्या मार्गात अडसर बनू नका, की त्यात काही त्रुटी काढू नका. तुम्ही संख्येनं कमी असता त्यानं (अल्लाहनं) त्यात वाढ केली, हे लक्षात असू द्या. आणि पाहा, ज्यांनी अनाचार माजवला

होता त्यांची शेवटी कशी गत झाली ते.

८७) माझ्याबरोबर जे काही पाठवलं गेलंय त्यावर काही लोकांनी विश्वास बाळगला आणि काहींनी विश्वास टाकला नाही. (श्रद्धा बाळगली नाही.) तर संयमानं वागा अल्लाहनं आमच्यात निर्णय घेईपर्यंत, कारण तोच खरा निकाल लावणारा आहे.

**पारा - ९**

८८) त्यांच्या समुदायातील प्रमुखांनी आपल्या अहंकारात सांगितलं, शुऐब! आम्ही तुम्हाला आणि तुमच्याबरोबर ज्यांनी श्रद्धा ठेवली त्या (सर्वांना) या वस्तीतून हाकलून देऊ. किंवा तुम्ही आमच्या धर्मात परत या. ते (शुऐब) म्हणाले, आम्हाला जर ते आवडत नसेल तरीसुद्धा?

८९) आम्ही जर तुमच्या धर्मात परतलो तर आम्ही अल्लाहविषयी खोट रचणारे ठरू. अल्लाहनं तर आम्हाला वाचवलंय त्यात परतण्याचं आमचं काम नाही. आमच्या विधात्या अल्लाहचीच जर तशी मर्जी असेल तर (ती गोष्ट वेगळी!) आमच्या विधात्याचं ज्ञान सर्वव्यापी आहे. अल्लाहवरच आम्ही भिस्त ठेवली. हे आमच्या विधात्या, आमच्या आणि आमच्या लोकांमध्ये तूच काय ते सत्याधिष्ठित निर्णय लाव. कारण तूच तर उत्तमपैकी निर्णय घेणारा आहेस.

९०) त्याच्या समुदायातील द्रोह करणाऱ्या सरदारांनी सांगितलं, जर तुम्ही शुऐबचे अनुकरण केलं तर नक्कीच तुम्ही आपला घात करून घ्याल.

९१) मग तेव्हा भूकंपानं त्यांना धरून टाकलं, पहाटेच्या वेळी ते आपल्या घरांत तोंडघशी पडून राहिले.

९२) शुऐबला ज्या लोकांनी धुडकावून लावलं ते जणू तिथं कधी राहतच नव्हते. (असे संपून गेले) शुऐबला खोटं ठरवणाऱ्यांनीच स्वत:चा घात करून घेतला.

९३) मग त्यांनी (शुऐब अ.) त्यांच्याकडून तोंड फिरवलं आणि म्हणाले, माझ्या समुदायातील लोकहो, मी आपल्या विधात्याचा संदेश तुम्हाला

पोचता केला, तुमचं हितदेखील जपलं, आता मी अशा विद्रोहींवर कसा दुखवटा प्रकट करू?

९४) आम्ही कोणत्याही वस्तीत तेथे प्रेषिताला पाठवलं नाही, तोवर तेथील लोकांना अडचणीत आणले नाही, जेणेकरून त्यांनी नम्रतेने वागावं.

९५) मग आम्ही त्यांची दूरवस्था दूर करून त्यांचा उद्धार केला समृद्ध झाल्यावर ते म्हणू लागले, आमच्या पूर्वजांवर (देखील) बरे-वाईट दिवस येऊन गेलेत, तेव्हा आम्ही अचानक त्यांना धरलं, याचा त्यांना सुगावाही लागला नव्हता.

९६) या वस्तीवाल्यांनी (देखील) जर श्रद्धा धारण केली असती आणि ईशपरायण झाले असते तर आम्ही आकाश आणि पृथ्वीची (दारं) उघडून त्यांना भरभराट दिली असती, नव्हे पण त्यांनी नाकारलं आणि म्हणूनच त्यांना आम्ही धरलं, ते त्यांच्या कर्मांमुळंच.

९७) वस्तीवाले रात्री झोपेत असताना आमचा प्रकोप त्यांच्यावर कोसळेल यापासून ते निश्चिंत आहेत?

९८) की दिवसाढवळ्या ते मौजमस्तीत असताना आमचा प्रकोप कोसळणार नसल्याचं त्यांना समाधान आहे.

९९) अल्लाहच्या युक्तींपासून ते सुरक्षित होते? (खरंतर) विनाश पावणारे लोक अल्लाहच्या युक्तींपासून (कधीही) सुरक्षित नसतात.

१००) ज्या लोकांना आम्ही या धरतीवर पूर्वीच्यांचे वारस बनवले त्यांना ह्याचा बोध मिळाला नाही की आमची तशी इच्छा असती तर त्यांच्या अपराधांपायी त्यांना संकटात टाकले असते, त्यांच्या मनावर मोहर लावली असती, त्यांना ऐकता येऊ नये म्हणून.

१०१) याच त्या वस्त्या ज्यांचा वृत्तान्त आम्ही तुम्हाल (प्रेषित मुहम्मद स.) सांगतो त्यांच्याकडं त्यांचे प्रेषित ठळक संकेत घेऊन आले, पण ज्यांनी त्यांना आधी धुडकावून लावलं होतं त्यांनी श्रद्धा बाळगली नाही. अशाच प्रकारे अल्लाह द्रोह करणाऱ्यांच्या अंत:करणावर मोहर लावून

टाकतो.

१०२) त्यांच्यापैकी कितीतरी लोक वचन पाळताना आम्हास आढळले नाहीत. तर अवज्ञा करणारे लोकच आम्हाला बहुसंख्येनं आळढले.

१०३) या (प्रेषितांनंतर) आम्ही मूसा (अ.) यांना (आपल्या संकेतांसह) फिरऔन आणि त्याच्या सरदारांकडं पाठवलं, त्यांनी ते नाकारून लावला. मग या उपद्रवींचा शेवट कसा झाला ते पाहा.

१०४) मूसा यांनी सांगितलं, फिरऔन! मी या विश्वांच्या विधात्याकडून पाठवलेला (प्रेषित) आहे.

१०५) अल्लाहच्या बाबतीत सत्यापलीकडं मी काहीएक सांगू नये एवढाच माझा अधिकार. मी तुझ्या विधात्याकडून ठळक गोष्टी घेऊन आलोय. तेव्हा इस्राईलच्या संततीला माझ्यासोबत पाठवून दे.

१०६) (फिरऔन) म्हणाला, जर तुम्ही रास्त असाल, तुम्ही खरोखरच संकेत घेऊन आला असाल तर ते मला दाखवा,

१०७) मूसा (अ.) यांनी आपली काठी खाली फेकली तोच तो उघडउघड सर्प बनला.

१०८) त्यांनी आपला हात बाहेर काढला, पाहणाऱ्यांना तो चकचकीत पांढरा दिसू लागला.

१०९) फिरऔनचे सरदार म्हणू लागले, हा तर पटाईत जादूगार दिसतो.

११०) तुम्हाला तुमच्या भूमीतून लावून द्यायचं पाहतोय तो, आता तुमचं काय म्हणणं याबाबतीत?

१११) आणि म्हणाले, त्याला आणि त्याच्या भावाला रोखून ठेवा आणि शहरांतून माणसं गोळा करणारे पाठवून द्या,

११२) ते तुझ्याकडं वाकबगार जादूगार घेऊन येतील.

११३) अशाप्रकारे जादूगार फिरऔनकडे आले आणि म्हणाले, आम्ही जर जिंकलो तर आम्हाला इनाम नक्कीच भेटंल?

११४) होय, (फिरऔन म्हणाला,) शिवाय तुम्ही माझ्या जवळची माणसं होणार.

११५) ते म्हणाले, मूसा तुम्ही टाकता की आधी आम्ही टाकू.

११६) मूसा म्हणाले, तुम्ही फेका. मग जेव्हा त्यांनी टाकले, त्यांच्या जादूनं लोकांचे डोळे चक्रावून गेले त्यांच्यावर दहशत बसवली, त्यांनी फार मोठी जादू केली.

११७) आम्ही मूसाला कळवलं, 'आपली काठी खाली फेका.' त्यांनी तसं करताच त्यांनी रचलेलं सर्व थोतांड त्यानं गिळून टाकलं.

११८) अशा तऱ्हेनं सत्य ते सिद्ध झालं आणि त्यांनी जे काही केलं होतं ते सगळं खोटं ठरलं.

११९) ते पराभूत होऊन उलटे बालिश बनले

१२०) सारेच्या सारे जादूगार नतमस्तक झाले.

१२१) ते म्हणाले, आम्ही विश्वांच्या विधात्यावर श्रद्धा धारण केली

१२२) जो मूसा आणि हारून (अ.) यांचा विधाता आहे.

१२३) फिरऔन म्हणाला, माझ्या अनुमतीपूर्वीच तुम्ही श्रद्धा धारण केली, ही तर तुमची चाल आहे. शहरात रचलेला कट. इथल्या लोकांना घालवून देण्याकरता, पण लवकरच तुम्हाला कळून चुकेल.

१२४) मी नक्कीच तुमचा एकीकडचा हात आणि दुसरीकडचा पाय कापून टाकीन, मग तुम्हा सर्वांना फासावर चढवून देईन.

१२५) ते म्हणाले, (ठीकाय.) आम्ही आमच्या विधात्याकडं परत जाणार आहोत.

१२६) तू आमच्यावर एवढ्यासाठीच सूड उगवतोय, की आमच्याकडं जेव्हा आमच्या विधात्याची वचनं आली आम्ही त्यांना मान्य केलं. हे आमच्या विधात्या! संयमाची दारं आमच्यासाठी उघडी कर, आम्ही तुझे आज्ञाधारक असतानाच आम्हाला मरण दे.

१२७) फिरऔनचे सरदार त्याला म्हणाले, तू मूसा आणि त्यांच्या जातीतील लोकांना देशात धुमाकळू माजविण्यासाठी आणि तुझ्यात तुझ्या देवीदेवतांना सोडून देण्यासाठी मोकळीस देशील? तो म्हणाला, आम्ही त्यांच्या मुलांची कत्तल करू, त्यांच्या स्त्रियांना जीवंत ठेवू, त्यांच्यावर आमचा ताबा आहे.

१२८) मूसा (अ.) यांनी आपल्या लोकांना सांगितलं, अल्लाहची मदत मागा, धीर धरा. ही धरती अल्लाहची आहे. तो ज्यांना इच्छितो, त्यांना तिचा वारस बनवतो. शेवट सदाचारींसाठीच आहे.

१२९) ते म्हणाले, आम्हाला यातना दिल्या गेल्या तुम्ही येण्यापूर्वी आणि तुम्ही आल्यानंतरही. मूसा (अ.) यांनी उत्तर दिलं, लवकरच तुमचा विधाता तुमच्या शत्रूंचा विध्वंस करून या धरतीचा तुम्हाला उत्तराधिकारी करेल. मग तुम्ही कसं वागता ते तो पाहील.

१३०) आणि मग आम्ही फिरऔनला दुष्काळ आणि पिकांच्या नुकसानीच्या तावडीत धरलं, यापासून तरी त्यांना बोध घेता यावा म्हणून.

१३१) त्यांना संपन्नता लाभते तेव्हा ते म्हणतात, हे तर आमचेच आहे आणि वाईट दिवस येऊन संकटे कोसळल्यास मात्र ते अपशकुन मूसा आणि त्यांच्या सोबतींच्या माथ्यावर टाकतात. लक्षात ठेवा, अल्लाहच्या ठायी तर हे त्यांचेच अपशकुन आहेत, पण पुष्कळशांना त्याची जाण नाही.

१३२) आणि म्हणू लागले, (मूसा) तुम्ही कोणतेही संकेत आणा आमच्यावर जादू करण्याकरिता आम्ही ते मान्य करणार नाही.

१३३) मग आम्ही त्यांच्यावर टोळधाड, जुआ, बेडुका आणि रक्ताची अशी एकामागून एक वादळं पाठवली, स्पष्ट लक्षणं, तरीदेखील त्यांनी उद्धटपणा (सुरूच) ठेवला. शेवटी ते अपराधी लोकच ठरले.

१३४) जेव्हा ते आपत्तीनं ग्रासले, ते म्हणू लागले, मूसा! तुझ्या विधात्यानं तुला वचन दिलंय त्याप्रमाणं आमच्यासाठी धावा कर. जर तू या आपत्तीतून सुटका केली तर आम्ही जरूर तुझा विश्वास करून इस्राईलच्या संततीला (बनी इस्राईल) तुझ्याबरोबर पाठवून देऊ.

१३५) त्यांनी एक निश्चित कालावधी पूर्ण करण्यासाठी आम्ही जेव्हा प्रत्येक वेळी आपल्या प्रकोपास लांबविलं तरीदेखील त्यांनी आपला शब्द पाळला नाही.

१३६) मग आम्ही बदला घेतला (त्यांच्या वाईट वृत्तीचा). आम्ही त्यांना नदीत बुडवून टाकलं. त्यांनी आमच्या संकेतांना खोटं ठरवलं म्हणून, आणि ते त्याकडं दुर्लक्ष करत राहिले या कारणास्तव.

१३७) पूर्व आणि पश्चिमेतील दीनदलितांना आम्ही सर्वसंपन्न देश बहाल करून दिला. अशा प्रकारे तुझ्या विधात्याच्या इस्राईलच्या संततीबाबतच्या वचनाची चांगल्या रीतीनं पूर्तता झाली ते ठाम राहिले म्हणून. आणि फिरऔन व त्याच्या समुदायांनी ज्या उंच-प्रचंड वास्तू व इमारती उभारल्या होत्या त्यांचा विध्वंस केला.

१३८) आम्ही जेव्हा इस्राईलच्या संततीला समुद्रपार नेलं ते अशा लोकांत आले ज्यांनी आपल्या मूर्तींना सर्वस्व वाहून घेतलेलं होतं. (इस्राईलच्या संततीनं मूसा यांना सांगितलं,) मूसा आमच्यासाठीही त्यांच्या देवांसारखाच एखादा देव घडवून द्या. ते म्हणाले, तुम्ही खरोखरच अडाणी लोक आहात.

१३९) हे लोक ज्यात गुंतलेत त्याचा नाश होणार आहे. जे काही ते करताहेत ते सगळं व्यर्थ आहे.

१४०) (मूसा अ.) म्हणाले, मी तुमच्यासाठी अल्लाहऐवजी दुसरा ईश्वर शोधून काढू? त्यानं (अल्लाहनं) तर तुम्हाला साऱ्या विश्वांत प्रतिष्ठा बहाल केलीय.

१४१) जरा आठवण करा, फिरऔनच्या (तावडीतून) तुमची सुटका केली ते, तो तुमचा छळ करत असे, तुमच्या मुलांना ठार करीत होता. तुमच्या स्त्रियांना जगू द्यायचा. ही अवस्था तुमच्या विधात्याकडून मोठ्या कसोटीची होती.

१४२) आम्ही मूसा यांच्याशी तीस रात्रींचं वचन घेतलं. त्यात दहा रात्रींची आणखीन वाढ करून, त्याच्या विधात्याशी (जवळीक साधण्यासाठी)

चाळीस रात्रींची मुदत पूर्ण केली. मूसांनी (जाताना) आपले भाऊ हारून यांना सांगितलं, 'मी आपल्या समुदायासाठी माझ्या मागे तुझी नियुक्ती करतो. सर्वकाही सुरळीत, शिस्तीनं चालू द्या. उपद्रव माजविणाऱ्यांचा अंगीकार करू नका.'

१४३) मग जेव्हा मूसा ठराविक भेटीसाठी आले, त्यांच्या विधात्यानं त्यांच्याशी संभाषण केलं, तेव्हा (मूसा अ.) म्हणाले, 'माझ्या विधाता, मला दाखव (तुझं दर्शन), तुला पाहायचंय मला.' अल्लाहनं सांगितलं, 'तुला पाहता येणार नाही, पण ठीकाय तू त्या पर्वताकडं बघ, जर तो आपल्या जागी टिकून राहिला तर तू मला पाहू शकशील.' जेव्हा त्यांच्या विधात्यानं त्या पर्वतावर आपलं तेज प्रकट केलं, त्या पर्वताची धूळधाण झाली. मूसा (अ.) बेशुद्ध अवस्थेत खाली पडले. शुद्धीवर आले तेव्हा म्हणू लागले, 'तुझा गौरव असो, मी पश्चात्ताप व्यक्त करून तुझ्याकडं वळतो. (तुला) मान्य करणाऱ्यांत मी सर्वप्रथम आहे.'

१४४) अल्लाहनं म्हटलं, 'मूसा मी लोकांसाठी तुझी निवड केली तुला प्रेषित बनवून आणि तुझ्याशी संभाषण करून मी तुला जे काही दिलंय ते धरून ठेव, आणि कृतज्ञ हो.

१४५) आणि आम्ही शिलांवर त्याच्यासाठी सर्व गोष्टींचं मार्गदर्शन आणि सर्व बाबींविषयी सविस्तर स्पष्टीकरण लिहून दिले. आता त्यांना घट्ट धरून ठेव. तसेच आपल्या लोकांना ताकीद कर त्या उत्तम गोष्टींचं अनुसरण करण्यास. लवकरच मी तुला (अल्लाहची) अवज्ञा करणाऱ्यांचं ठिकाण दाखवून देईन.

१४६) जे धरतीवर अकारण अहंकार माजवितात, अशा लोकांना लवकर मी माझ्या संकेतांपासून दूर करीन. त्यांनी सर्वच्या सर्व संकेत जरी पाहिले तरी ते त्यांना मान्य करणार नाहीत. सरळमार्ग त्यांच्या समक्ष असला तरी ते ती वाट धरणार नाहीत. चुकीचा मार्ग आढळल्यास मात्र ते त्याचा अवलंब करतील. आमच्या संकेतांकडे दुर्लक्ष करून त्यास फेटाळून लावल्याने त्यांच असं वर्तन आहे.

१४७) ज्या लोकांनी आमची वचनं आणि परलोकाशी गाठ पडण्याचं (सत्य)

फेटाळलं त्यांनी केलेल्या कर्मांची फळं यापेक्षा वेगळी कोणती?

१४८) मूसाच्या लोकांनी ते (पर्वताकडं गेल्या) नंतर आपल्या अलंकारांनी एका वासराच्या धडाची मूर्ती बनवली, ती हंबरणार असं भासत होती, पण त्यांना दिसत नव्हंत ती बोलत नव्हती की मार्ग दाखवू शकत नव्हती, त्यांनी तिला (उपास्य बनवून) धरून ठेवलं. ते अत्याचारी लोक होते.

१४९) आपल्या हातांनी काय घडवलं आणि आपण वाट चुकलो हे जेव्हा त्यांच्या लक्षात आलं तेव्हा म्हणू लागले, आमच्या विधात्यानं आमच्यावर उपकार केलं नाहीत आणि आम्हाला क्षमा केली नाही तर खरोखरच आम्ही विनाश पावल्याशिवाय राहणार नाही.

१५०) जेव्हा मूसा आपल्या लोकांत परतले, तोच रागावून दु:ख व्यक्त करत म्हणाले, कशा वाईट कृतीनं तुम्ही माझा वारसा चालवला, माझ्या पश्चात तुमच्या विधात्याच्या आदेशांविषयी घाई केली का? त्यांनी त्या शिला खाली ठेवल्या. आपल्या भावाचं डोकं धरून जवळ खेचलं. हारून म्हणाले, माझ्या बंधु! या लोकांनी मला दुबळं समजलं, मला ठार मारण्याच्या तयारीत होते. शत्रूंना आनंद वाटेल असे काही करू नका, अत्याचारी लोकांत माझी गणना करू नकोस.

१५१) मूसा (अ.) यांनी धावा केला, हे विधाता मला क्षमा कर, माझ्या भावालाही. तू सर्वस्व दया दाखवणारा आहेस. आम्हाला तुझ्या कृपेच्या छत्रछायेत दाखल कर.

१५२) जे लोक वासराला धरून बसले (उपास्य बनवून) लवकरच त्यांच्या विधात्याचा त्यांच्यावर कोप कोसळेल. या जगातदेखील ते अपमानित होतील. खोटं रचणाऱ्यांना हीच फळं भोगायची आहेत.

१५३) पण जे लोक दुष्कर्म करतात आणि नंतर पश्चात्ताप व्यक्त करतात आणि श्रद्धा धारण करतात, निश्चितच तुमचा विधाता वारंवार क्षमा करणारा आणि असीम कृपावंत आहे.

१५४) मूसाचा राग आवरता झाला, त्यांनी त्या शिला उचलल्या, त्यावर

आपल्या विधात्याशी भीती बाळगणाऱ्यांकरिता मार्गदर्शनाच्या गोष्टी आणि कृपेविषयीचं लिखाण होते.

१५५) मूसानी आपल्या लोकांमधून सत्तर जणांची आमच्या भेटीसाठी निवड केली तोच भूकंपानं त्यांना धरलं. मूसा (अ.) म्हणाले, माझ्या विधात्या, तू त्यांना आणि मला याआधी मारून टाकलं असतं. आमच्यातल्या मूर्ख लोकांनी केलेल्या कृत्यांबद्दल तू आमचा जीव घेणार? तसं नव्हं ही आमची परीक्षा आहे. तुझ्या मर्जीप्रमाणं काहींना मार्गभ्रष्ट करतो आणि इच्छितो त्यांना मार्गदर्शन करतो. तूच आमचा वाली आहेस. आम्हाला क्षमा कर, आम्हाला दयेनं वागव, तूच तर सर्वश्रेष्ठ क्षमा करणारा आहेस.

१५६) या जगात आणि परलोकातदेखील जे काही भलं आहे ते आमच्यासाठी (नशिबी) लिहून टाक, आम्ही तुझ्याकडंच तर वळलो आहोत. (अल्लाहनं) उत्तर दिलं, माझ्या मर्जीत येईल त्यांना मी शिक्षा करतो. माझी कृपा तर सर्व गोष्टींवर पसरलीय. जे लोक भीतीनं वागतात, जकात अदा करतात आणि श्रद्धा धारण करतात त्यांच्या नशिबी ती (कृपा) लिहून टाकीन.

१५७) जे लोक आमच्या निरक्षर प्रेषितांचं अनुकरण करतात, ज्यांचा उल्लेख त्यांच्याकडील तौराह आणि इंजील ह्या ग्रंथांमध्ये त्यांना आढळतो, त्यांना आज्ञा करतो न्याय स्थापनेची आणि त्यांना दुराचारापासन रोखतो, त्यांच्यासाठी स्वच्छ वस्तू वैध करतो नि जे काही दुष्ट-अभद्र आहे ते अवैध करतो. त्यांच्यावरील बोझ्यांतून त्यांची सुटका करतो आणि ज्या बंधनांत ते जखडले गेले आहेत ती (बंधनं) तोडतो. आणि म्हणून ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली, ते त्यांचं समर्थन करतील, त्याचे सहाय्य करतील आणि जो प्रकाश त्यांच्याबरोबर खाली पाठवला गेलाय त्याचं अनुसरण करतील अशा लोकांचा उत्कर्ष होईल.

१५८) (मुहम्मद स.) सांगा, लोकहो मी तुम्हा समस्त मानवांसाठी अल्लाहनं पाठवलेला प्रेषित आहे. आकाश आणि पृथ्वीवर त्याचंच अधिराज्य आहे. त्याच्याशिवाय कोणीही नाही. जन्म आणि मरण देणारा तोच.

तेव्हा श्रद्धा धारण करा अल्लाह आणि त्याच्या निरक्षर प्रेषितावर. जो अल्लाह आणि त्याच्या ग्रंथांना मान्य करा. त्यांचं अनुसरण करतो, म्हणजे तुमर्च मार्गदर्शन होईल.

१५९) मूसा (अ.) यांच्या समुदायातील एक गट आहे मार्गदर्शन करतो व त्यानुसार न्याय करतो.

१६०) आम्ही त्यांना बारा टोळ्यांमध्ये विभागलं. जेव्हा मूसाच्या समुदायानं पाणी मागितलं तेव्हा आम्ही मूसा यांना प्रेरणेद्वारे कळवलं, 'आपल्या काठीनं एका खडकावर फटका मारा'. त्यातून बारा झरे वाहू लागले. प्रत्येक गटानं त्यांचा पाणवठा ओळखून घेतला. आम्ही त्यांच्यावर ढगांची सावली केली. त्यांच्यावर मन्न आणि सलवा अवतरला. 'आम्ही तुम्हाला पुरवलेल्या स्वच्छ वस्तू खा' त्यांनी तर स्वत:शीच अनर्थ घडवला, आमच्याशी नव्हे.

१६१) आणि जेव्हा त्यांना सांगण्यात आलं, या वस्तीत राहा, आवडेल ते खा आणि 'हित्ततून' (आम्हाला क्षमा कर) म्हणत नम्रतेनं शहराच्या वेशीत प्रवेश करा, आम्ही तुमच्या चुका माफ करून टाकू, सदाचारींना संपन्न करू.

१६२) परंतु त्यांच्यातील अत्याचारी लोकांनी ते शब्द बदलून टाकले जे सांगण्यात आले होते आणि आम्ही त्यांच्यावर आकाशातून प्रकोप कोसळवला कारण ते अत्याचार माजवित होते.

१६३) (मुहम्मद स.) त्यांना विचारा, समुद्राकाठी वसलेल्या त्या शहराविषयी सब्त (पाळण्याच्या) बाबतीत त्यांनी (कसं) उल्लंघन केलं. ज्या दिवशी ते सब्त पाळीत त्या दिवशी मासे पाण्यावर तरंगत असत. आणि सब्त पाळीत नसत त्या दिवशी ते मासे येत नसत. अशाप्रकारे आम्ही त्यांची परीक्षा घेत होतो. कारण ते मर्यादा भंग करत होते.

१६४) त्यांच्यातल्या एका गटानं सांगितलं, अशा लोकांस तुम्ही का बरं उपदेश करता, अल्लाह ज्यांचा नाश करणार आहे किंवा त्यांना भयंकररीत्या कोपग्रस्त करणार आहे. त्यांना उत्तर दिलं, आम्ही आमच्या परीनं

आपल्या विधात्याचं कार्य (पूर्ण) करतो. कदाचित ते (अल्लाहचं) भयही बाळगतील.

१६५) आम्ही त्यांना जे काही समजवलं होतं त्याला त्यांनी (साफ) विसरून टाकलं. तेव्हा आम्ही जे लोक त्यांना वाईट वृत्तीशी रोखत होते त्यांना वाचवलं आणि ज्या लोकांनी अत्याचार केला त्यांना धरलं एका भयंकर प्रकोपानं. कारण ते अवज्ञा करत होते.

१६६) आम्ही त्यांना ज्या गोष्टींपासून रोखलं होतं ती बंधनं त्यांनी मोडली, तेव्हा आम्ही त्यांना सांगितलं, माकडे व्हा, अपमानित आणि तिरस्कारित (बना).

१६७) आणि मुहम्मद (स.)! जेव्हा तुमच्या विधात्यानं हे जाहीर केलं, निर्णयदिवसापर्यंत त्यांच्याकडं (ज्यू लोकांकडे) असे लोक पाठवत राहील जे त्यांचा तिरस्कार करून शिक्षा देत राहतील. तुमचा विधाता अद्दल घडवण्यात तत्पर आहे. तसेच तो क्षमा करणारा आणि अतिशय कृपावंत आहे.

१६८) आम्ही त्यांना भूतलावर विभिन्न टोळ्यांत विखरून टाकलं. त्यातले काही सदाचारी आहेत तर काही त्यांच्या उलट. आम्ही त्यांना चांगल्या आणि वाईट बाबींत आजमावलं, ते (आमच्याकडं) वळावेत म्हणून.

१६९) त्यांच्या पश्चात दुष्ट लोकांनी त्यांची जागा घेतली, त्यांना ग्रंथाचा वारसा लाभलेला असतानादेखील ते या जगातल्या हीन गोष्टी अंगीकारत आहेत. आणि म्हणतात यासाठी आम्हाला क्षमा केली जाईल. जर अशाच क्षुल्लक गोष्टी त्यांना पुन्हा मिळाल्या तर ते पुन्हा त्याच घेतील. त्यांच्याकडून (या) ग्रंथात (तौराह) (दिलेलं) वचन घेतलं गेलं नव्हतं? अल्लाहच्या बाबतीत सत्य आहे तेच सांगा म्हणून? आणि त्यांनी या ग्रंथाचे (तौराह) अध्ययन केलंय. सदाचारी लोकांसाठी तर परलोकातील निवासच उत्तम आहे. तुम्हाला कसं बरं कळत नाही?

१७०) जे लोक ग्रंथाला घट्ट धरून आहेत आणि नमाज कायम करतात, आम्ही निश्चितच प्रामाणिक लोकांचे कर्म वाया जाऊ देत नाही.

१७१) आम्ही जेव्हा पर्वताला उचलून त्यांच्यावर छतासारखं उभारलं त्यांना वाटलं तो त्यांच्यावर कोसळतो की काय. आम्ही त्यांना जे काही दिलंय त्यांना घट्ट धरून राहा. त्यात जो काही मजकूर आला आहे तो ध्यानात असू द्या, तुम्ही सदाचारी व्हाल.

१७२) आठवण करा, तुमच्या विधात्यानं आदमच्या मुलांपासून त्यांची संतती पुढे चालवली आणि स्वत: त्यांनाच साक्षीदार ठरवित विचारलं, 'मी तुमचा विधाता नाही?' त्यांनी उत्तर दिलं, 'हो, आम्ही साक्ष देतो.' नाही तर तुम्ही निर्णयाच्या दिवशी म्हणाला असता, ते आमच्या लक्षात नव्हतेच.

१७३) किंवा तुम्ही म्हणाल, निश्चितच आमच्या वाडवडिलांनी पूर्वी अनेकेश्वर केले होते, आम्ही त्यांच्यानंतरची संतती आहोत. त्यांनी केलेल्या चुकीबद्दल तू आमचा नाश करणार?

१७४) त्यांनी (आमच्याकडं) वळावं याकरिता आम्ही आमची वचनं अशा प्रकारे विस्तृत करतो.

१७५) त्यांना त्या इसमाची गोष्ट सांगा, ज्याला आम्ही आमची वचनं दिली होती. परंतु तो त्यांच्यापासून पसार झाला. आणि मग सैतान त्याच्या मागे पडला. शेवटी तो मार्गभ्रष्ट झाला.

१७६) आमची इच्छा असती तर या वचनांद्वारे आम्ही त्याला उच्च स्थान दिलं असतं, पण त्याचा कल जमिनीकडं (खालच्या स्तराकडं) होता. तो आपल्या वासनांमागं लागला, त्याचं हे असं वागणं कुत्र्यासारखं आहे. त्याला जर तुम्ही फटकं मारलं तर तो जीभ बाहेर काढून धाप देतो. आणि सोडून दिलं तरी धाप देतो. ज्या लोकांनी आमची वचनं फेटाळून लावली त्यांचं उदाहरणही यासारखंच आहे. त्यांना हे कथानकं ऐकवा, ते यावर विचारविनिमय करतील.

१७७) आमच्या संकेतांना धुडकावून लावणारे लोक दुष्टतेचं प्रतीक आहेत. ते स्वत:वरच अत्याचार करत आहेत.

१७८) ज्यांना अल्लाहचं मार्गदर्शन लाभते तेच रास्त मार्गावर असतात आणि

ज्यांना तो मार्गभ्रष्ट करतो ते अपयशी होतात.

१७९) आम्ही नरकासाठी पुष्कळ अशा मानव आणि जिन्नांना निर्माण केलंय. त्यांना मनं आहेत पण त्याची त्यांना जाण नाही. त्यांना डोळे आहेत पण त्याद्वारे ते काही पाहत नाहीत, त्यांना कान आहेत पण त्यापासून काही ऐकत नाहीत. त्यांची स्थिती जनावरांसारखी आहे, त्यांच्यापेक्षाही अधिक भरकटलेले. ते (या गोष्टींकडे) दुर्लक्ष करत आहेत.

१८०) अल्लाहची नावं (गुणविशेषणे) अतिशय सुंदर आहेत. त्यांच्याद्वारे त्याचा धावा करा आणि जे लोक त्याच्या नावांमध्ये त्रुटी काढतात त्यांना सोडून द्या. जे काही ते करीत आहेत त्याची फळं ते भोगणार आहेत.

१८१) आम्ही जन्म दिलेल्यांपैकी काही लोक सत्याचे मार्गदर्शन करतात आणि न्याय (प्रस्थापित) करतात.

१८२) ज्यांनी आमच्या आयतींना नाकारलं आम्ही त्यांना हळूहळू विनाशाकडे नेऊ हे त्यांना कळणारदेखील नाही.

१८३) मी त्यांना संधी देतो. पण माझी योजना सशक्त आहे.

१८४) त्यांचे सोबती (मुहम्मद स.) तर स्पष्ट प्रकारे ताकीद देणारे आहेत. त्यांना काही वेड लागलेलं नाही. याचा त्यांनी विचार केला नाही?

१८५) ते आकाश आणि धरतीचं अधिराज्य पाहत नाहीत. तसेच अल्लाहनं निर्माण केलेल्या वस्तू (ते पाहत नाहीत)? आणि हे (त्यांना दिसून येत नाही) की त्यांचा शेवट जवळ येऊन ठेपला असेल. यानंतर मग आणखी कशा गोष्टींवर ते श्रद्धा धारण करतील.

१८६) ज्यांना अल्लाह मार्गभ्रष्ट करतो त्यांना कोणी मार्गदर्शन करणारा नाही. त्यांना तो (अल्लाह) त्यांच्या दुर्वर्तनात भरकटत सोडून देतो.

१८७) ते तुमच्याशी (मुहम्मद स. यांच्याशी) प्रलयाच्या घटनेबाबत विचारपूस करतात, तिची ठराविक वेळ कोणती म्हणून. त्यांना सांगा त्याची माहिती माझ्या विधात्यालाच आहे. त्याच्याशिवाय कोणीही ती केव्हा

घडेल हे उघड करू शकणार नाही. पृथ्वी आणि अवकाशातील ती भयंकर अशी घटना आहे, जी आकस्मात कोसळेल. ते अशी विचारपूस करतात (जसे) तुम्ही तिच्या मागावर आहात. त्यांना सांगा, त्याची माहिती फक्त अल्लाहपाशीच आहे, पण बऱ्याच लोकांना त्याची जाण नाही.

१८८) त्यांना सांगा, माझ्या स्वत:साठीच्या भल्या-वाईट गोष्टीदेखील माझ्या अखत्यारित नाहीत, अल्लाहनेच इच्छिले ते. जर मला अज्ञाताचं ज्ञान असतं तर मी नक्कीच भल्या मोठ्या चांगल्या गोष्टी मिळवल्या असत्या आणि माझे काहीच वाईट झालं नसतं. मी तर श्रद्धाधारकांना, फक्त ताकीद देणारा आणि त्यांना आनंदाच्या गोष्टी ऐकवणारा आहे.

१८९) तोच, ज्यानं तुम्हाल एकाच जिवापासून निर्माण केलं. त्यापासून मग त्याचं जोडपं बनवलं, तिच्यापासून सुखसमाधान मिळावं म्हणून. आणि जेव्हा त्यानं (पुरुषानं) तिला झाकून घेतलं तेव्हा हलकंसं गर्भ धारण करून ती फिरत राहिली. जेव्हा ते जड झालं, तेव्हा दोघांनी आपल्या विधात्याचा धावा केला, 'तू आम्हाला सदाचारी मूल दिलं तर आम्ही तुझं आभार मानू.'

१९०) मग जेव्हा अल्लाहनं त्यांना चांगलं मूल दिलं तेव्हा अल्लाहनं जी भेट दिली त्याचं श्रेय त्यांनी इतरांनाही दिलं. पण अल्लाह तर ते जे भागीदार ठरवतात त्याहून सर्वोच्च आहे.

१९१) ते अशांना भागीदार बनवतात जे काही एक निर्माण करू शकत नाहीत, ते स्वत:च निर्मिले गेलेत?

१९२) त्याची मदत करण्याचं त्यांच्याकडं सामर्थ्य नाही, नव्हे ते तर स्वत:लाही मदत करू शकत नाहीत.

१९३) तुम्ही त्यांना मार्गदर्शनासाठी बोलवलं तर ते ऐकणार नाहीत, तुम्ही त्यांना हाक द्या की गप्प बसा, तुम्हाला ते सारखेच आहे.

१९४) अल्लाहव्यतिरिक्त तुम्ही ज्यांचा धावा करता ते तुमच्यासारखेच दास (मानव) आहेत. जर सत्य असालच तर तुम्ही ज्यांचा धावा करता

आणि त्यांनी तुम्हाला प्रतिसाद द्यायला हवा.

१९५) त्यांना चालता येण्यासाठी पाय आहेत? त्यांना हात आहेत धरण्यासाठी? पाहण्यासाठी डोळं आहेत त्यांच्याकडं? की कान आहेत ऐकू यावं म्हणून? सांगा त्यांना, बोलवा तुमच्या त्या भागीदारांना, रचू द्या त्यांना कट. मला उसंत देऊ नका.

१९६) माझा वाली तर अल्लाह आहे ज्यानं हा ग्रंथ अवतरला आणि तोच सदाचारी लोकांना पोसतो.

१९७) तुम्ही त्यास सोडून ज्या इतरांचा धावा करता त्यांच्यात तुम्हाला मदत करण्याचे सामर्थ्य नाही की ते स्वत:ची मदत करू शकतात.

१९८) तुम्ही त्यांना मागदर्शनासाठी बोलविलं तर त्यांना ते ऐकूही येत नाही. तुम्हाला वाटतं ते तुमच्याकडं टक लावून आहेत, पण त्यांना तर काही दिसतच नाही.

१९९) तुम्ही क्षमेनं वागा, भल्या गोष्टीचा (करण्याचा) निर्देश करा अज्ञानी लोकांना टाळा.

२००) जर (कधी) सैतानानं तुम्हाला प्रक्षुब्ध केलं तर अल्लाहचा आश्रय घ्या, तो सर्वकाही ऐकणारा आणि जाणणारा आहे.

२०१) जर सैतानानं काही दुर्विचार त्यांच्या मनात निर्मिले तरी (अल्लाहचं) भय बाळगणारे अल्लाहचे स्मरण करतात आणि लगेच भानावर येतात.

२०२) त्याचे (सैतानांचे) भाऊबंध त्यांना दुराचारात खोलवर बुडवून टाकतात, त्यात ते कसलीही कसर ठेवीत नाहीत.

२०३) जर कधी तुम्ही त्याच्याकडं एखादी आयत (श्लोक) घेऊन गेला नाहीत तर ते लगेच म्हणतात, स्वत:च का रचून आणली नाही? त्यांना सांगा, मी तर माझ्या विधात्यानं जे काही पाठवलंय त्याचं आचरण करतो. ज्ञानाच्या या गोष्टी (कुरआन) तुमच्या विधात्याकडून श्रद्धाळूंसाठी प्रबोधन आणि (त्याची) कृपा आहेत.

२०४) कुरआनचं पठण होत असता ते लक्षपूर्वक ऐकत जा आणि शांतता

पाळा, जेणेकरून कृपा लाभेल.

२०५) आपल्या विधात्याचं मनापासून स्मरण करा. नम्रतेनं आणि आदरानं. पण मोठ्या आवाजानं नको, सकाळ आणि संध्याकाळ आणि (त्याकडं) दुर्लक्ष करणाऱ्यांपैकी होऊ नका.

२०६) तुझ्या विधात्याशी जवळीक साधणारे त्याची भक्ती करण्यात अहंकार करत नाहीत त्याचा गौरव करतात आणि त्याच्यासमोर नतमस्तक होत राहतात.

-------

# ८. सूरह अल-अनफाल

**मदीनाकालीन, आयती ७५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) ते तुमच्याशी 'अनफाल'विषयी प्रश्न करत आहेत. त्यांना सांगा, अनफाल (युद्धात मिळवलेला माल) अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या अधीन आहे. अल्लाहचं भय बाळगा, तसेच तुमचे आपसातील संबंध व्यवस्थित राखा, आणि तुम्ही श्रद्धाळू असता, अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांच्या आज्ञा पाळा.

२) जे श्रद्धा लोक आहेत जेव्हा अल्लाहची आठवण काढली जाते, तेव्हा त्यांची मनं हेलावून जातात. आणि जेव्हा अल्लाहची वचनं (कुराण) त्यांना ऐकवली जातात त्यांची श्रद्धा अधिक बळकट होते, ते आपल्या विधात्यावर विश्‍वास ठेवतात. (विसंबून राहतात.)

३) जे नमाज कायम करतात (नियमितपणे) आणि आम्ही दिलेल्या साधनांमधून खर्च करतात.

४) हेच लोक वास्तवात श्रद्धाळू आहेत, त्यांच्या विधात्यापाशी त्यांच्यासाठी आदर-सन्मानाचे स्थान आहे, क्षमा आणि सन्मानपूर्वक साधनं.

५) तुमच्या विधात्यानं जेव्हा रास्त योजनेनुसार तुम्हास घरातून बाहेर आणलं, तेव्हा श्रद्धाळूंपैकी एका गटाला ते पटत नव्हते.

६) ते तुमच्याशी सत्याविषयी वाद घालत होते, ते स्पष्ट झालेला असताना, जणू त्यांना मृत्यूकडं लोटलं जात आहे आणि ते त्यास पाहत होते.

७) आणि अल्लाहनं जेव्हा वचन दिलं होतं, दोन गटांपैकी एक तुमच्या (बाजूनं) असेल, तुम्हाला वाटत होतं त्यातला नि:शस्त्र (दुर्बल) गट तुमचा असावा. अल्लाहची इच्छा आपल्या शब्दांनी सत्याला सत्य सिद्ध करण्याची होती. विद्रोहींची पाळंमुळं तोडून टाकण्यासाठी.

८) सत्याला सत्य आणि असत्याला खोटे ठरवण्यासाठी अपराधींना ते

पसंत नसले तरी.

९) जेव्हा तुम्ही तुमच्या विधात्याकडे मदतीची विनंती केली, ती त्यानं मान्य केली, 'मी तुम्हाला मदत करेन एकामागून एक हजार देवदूत पाठवून.'

१०) अल्लाहनं जे केलं ते तुमच्यासाठी शुभशकुन ठरावं, तुमच्या मनांना समाधान मिळवण्यासाठी अल्लाहव्यतिरिक्त कुणाकडून मदत मिळते? अल्लाह सर्वज्ञ आणि जोरकस आहे.

११) अल्लाहनं जे तुम्हाला ग़ुंगावस्थेत नेलं होतं ते तुम्हाला शांतता मिळावी म्हणूनच. आकाशातून तुमच्यावर पाऊस पाडला तो तुम्हाला स्वच्छ करण्यासाठीच आणि सैतानांची घाण धुवून काढण्यासाठी तुमची मनं दृढ व्हावीत आणि तुमचे पाय स्थिर व्हावेत यासाठी.

१२) आठवा, तुमच्या विधात्यानं देवदूतांना कळवलं, मी तुमच्या पाठीशी आहे, श्रद्धावंतांना भक्कमपणे उभे राखा, मी विद्रोही लोकांच्या मनात जरब बसवीन, तुम्ही त्यांच्या मानांवर प्रहार करा आणि त्यांच्या एक एक बोटांवर आघात करा.

१३) कारण अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या विरूद्ध गेले आहेत. जो कुणी अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचा विरोध करेल निश्चितच त्यांच्यासाठी अल्लाहची कठोर शिक्षा आहे.

१४) तेव्हा तुम्ही त्या शिक्षेची चव घ्या (प्रत्यय घ्या) विद्रोहींसाठी निश्चितच नरकाग्नीची शिक्षा आहे.

१५) श्रद्धावंतांनो, नाकारणाऱ्यांच्या लष्करास तुम्ही समोरे गेल्यास त्यांना पाठ दाखवू नका.

१६) अशा दिवशी जर कुणी दबा धरून बसणे किंवा आपल्या फौजांना जाऊन मिळून युद्ध करण्यासाठी या कारणांव्यतिरिक्त पाठ फिरवली तर त्यानं अल्लाहचा प्रकोप ओढवून घेतला. त्याचे ठिकाण नरक आहे. किती वाईट ते ठिकाण.

१७) तुम्ही त्यांना ठार केलं नाही, अल्लाहनं त्यांना ठार केलं. तुम्ही त्यांच्यावर जेव्हा (माती) फेकली ती तुम्ही फेकली नसून अल्लाहनं ती फेकली होती. श्रद्धावंतांना उत्तम प्रकारचा मोबदला देण्यासाठी. अल्लाहच ऐकणारा आणि जाणणारा आहे.

१८) तशी ती योजना तसेच अल्लाह बंड करणाऱ्यांच्या युक्त्या निकामी करणारा आहे.

१९) तुम्हाला तसा निर्णय हवा होता तर तो आता लागलेला आहे. तुम्ही मागे फिरला तर ते तुमच्यासाठी चांगलंच आहे. पण जर तुम्ही परत तेच केलं तर आम्हीही तसंच करू. तुम्ही कितीही मोठा जमाव केला तरी तो मुळीच तुमच्या कामी येणार नाही. (कारण) श्रद्धाधारकांच्या पाठीशी अल्लाह असतो.

२०) श्रद्धाळू लोकहो, अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञा पाळा, त्यांच्यापासून तोंड फिरवू नका, तुम्ही ऐकत आहात?

२१) त्या लोकांसारखं बनू नका जे म्हणतात, 'आम्ही ऐकतो', पण ते ऐकत नसत.

२२) ज्यांना समज नाही अशी माणसे अल्लाहच्या दृष्टीत मुके आणि बहिरे जनावरांपेक्षाही वाईट आहेत.

२३) जर अल्लाहला त्यांच्यात काही भलेपण असल्याची माहिती असती तर त्यानं त्यांना ऐकवलं असतं आणि ते ऐकवल्यानंतरदेखील ते मागे वळले असते (कारण) ते तोंड फिरवणारे आहेत.

२४) श्रद्धाधारकहो, अल्लाह आणि त्याच्या प्रेषितानं तुम्हाला हाक दिल्यास तुम्ही प्रतिसाद द्या. ते तुमच्या जगण्याचा आधार आहे. लक्षात ठेवा, अल्लाह मनुष्य आणि त्याच्या हृदयादरम्यान उभा असतो. आणि शेवटी त्याच्याकडंच तुम्ही सर्व एकवटले जाणार आहात.

२५) उपद्रवापासून सावध राहा. विशेषतः तुमच्यातील अत्याचारी लोकच तेवढे त्याला बळी पडणार नाहीत हे लक्षात राहू त्या. शिक्षा देण्यास

अल्लाह कठोर आहे.

२६) आणि आठवणीत राहून द्या, जेव्हा तुम्ही देशात संख्येने थोडेच होते. तुम्ही दलितावस्थेत होते. लोक तुमचे उच्चाटन करतील अशी तुम्हास भीती लागून होती, (अशावेळी) त्यानं तुम्हाला आश्रय दिला. आपल्या मदतीनं त्यानं तुमचा उद्धार केला, तुमच्या उपजीविकेसाठी शुद्ध साधनं दिलीत, जेणेकरून तुम्ही त्याचे आभार मानावे.

२७) श्रद्ध लोकहो, अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताशी विश्वासघात करू नका, तसेच तुमच्याकडील ठेवीत जाणूनबुजून अफरातफर करू नका.

२८) लक्षात ठेवा, तुमची संपत्ती आणि संतती मोठी परीक्षा आहे. सर्वोत्तम मोबदला तर अल्लाहकडंच आहे.

२९) श्रद्ध लोकहो, तुम्ही जर ईशपरायण झालात तर तो तुम्हाला कसोटी (योग्य अयोग्याची तपासणी करण्याची) देईल, तुमच्यातील दुर्गुण नष्ट करून तुम्हाला क्षमा करील. अल्लाह तर महान कृपा करणारा आहे.

३०) आठवण करा जेव्हा (मक्केतील) विद्रोही तुम्हाला (प्रेषित मुहम्मद यांना) बंदिस्त करण्यासाठी अथवा तुमचा वध करण्यासाठी वा तुम्हाला बाहेर घालवून देण्यासाठी गुप्त कारस्थान करीत होते. अल्लाहदेखील योजना आखित होता. अल्लाहच तर उत्तम योजना करणारा आहे.

३१) जेव्हा त्यांना आमची वचनं ऐकवली जातात, ते म्हणतात, हो ऐकल्या आम्ही त्या, वाटल्यास आम्हीदेखील असंच काही म्हटलं असतं, हे तर पूर्वजांचे कथानक आहे.

३२) आणि आठवा, ते म्हणत होते, हे अल्लाह, हे जर तुझ्याकडचं सत्य असेल तर आमच्यावर आकाशातून दगडांचा वर्षाव कर किंवा एखादा भयंकर प्रकोप पाठव.

३३) त्यांच्या दरम्यान तुम्ही (मुहम्मद स.) असताना अल्लाह तसं करणार नव्हता, ते क्षमा-याचना करत असताना अल्लाह त्यांना शिक्षा देणार नव्हता.

३४) अल्लाहनं त्यांना शिक्षा न देण्यासारखं असं कोणतं कारण होतं? ते मस्जिदे हराम (काबागृह) पासून रोखतात. ते त्याचे संस्थापक नाहीत. त्याचे संस्थापक तर फक्त सदाचारी लोकच आहेत. पण त्यांच्यामधील बहुतेकांना हे माहीत नाही.

३५) त्या (काबा) गृहाजवळील त्यांची उपासना (नमाज) तरी कशा प्रकारची होती? फक्त शिट्या आणि टाळ्या वाजवणं. तेव्हा तुम्ही जे नाकारलं आता त्याची शिक्षा चाखा.

३६) जे द्रोही लोक असतात आपली संपत्ती लोकांना सरळ मार्गावरून परावृत्त करण्यासाठी ती खर्च करतात, ते तशीच आपली संपत्तीची वाट लावत राहणार. शेवटी त्यांना दु:ख होणार आणि मग ते आहारी जातील. बंड करणारे लोक नरकाकडं एकवटले जातील.

३७) अमंगल लोकांना पावन लोकांपासून वेगळं करण्यासाठी, आणि दुष्ट लोकांना एकत्र करून त्या ढिगाला नरकात टाकण्यासाठी हेच ते लोक अपयशी ठरलेले.

३८) (हे मुहम्मद! स.) या बंड करणाऱ्या लोकांना सांगा, आता जरी ते परावृत्त झाले तर त्यांची मागील कृत्ये माफ केली जातील. जे झालं ते झालं, पण जर तेच करत राहिले तर पूर्वीच्यांचं काय झालं (ते त्यांनी पाहावं.)

३९) त्यांच्याशी युद्ध करा, उपद्रव नष्ट होत नाही तोपर्यंत आणि अल्लाहचाच धर्म सर्वत्र प्रसारित होईपर्यंत. पण जर त्यांनी माघार घेतली तर अल्लाह ते जे करत आहेत ते सर्वकाही पाहणारा आहे.

४०) आणि जर त्यांनी नाकारलंच तर जाण ठेवा अल्लाहच तुमचा संरक्षक आहे. सर्वोत्तम मदत करणारा आणि सुरक्षा प्रदान करणारा.

**पारा - १०**

४१) आणि हे समजून घ्या! तुम्हाला गनिमत (युद्धात मिळालेल्या) मधून ज्या काही वस्तू मिळतील, त्यातील एकपंचमांश भाग अल्लाह व

त्याचे प्रेषित, (प्रेषितांच्या) नातेवाईकांसाठी, अनाथांकरिता, गरजू तसेच वाटसरूंसाठी आहे. अल्लाह आणि जे काही आम्ही आमच्या भक्तावर अवतरित केलंय त्यावर तुमची श्रद्धा असेल तोवर, आणि कसोटीच्या दिवशी (बद्रच्या युद्धाप्रसंगी) ज्या दिवशी दोन फौजा भिडल्या होत्या, नक्कीच सर्व गोष्टी अल्लाहच्या अंकित आहेत.

४२) जेव्हा तुम्ही अलीकडच्या बाजूस होता आणि ते पलीकडील तटावर. तो काफिला तुमच्यापेक्षा खाली होता. जर तुम्ही एकमेकांशी भिडण्याचं ठरवलं असतं तर तुमच्यात मतभेद झाले असते, पण जे घडलं त्यास अल्लाहला पूर्णत्वास न्यायचं होतं. ज्याला ठार व्हायचं होतं त्यानं ते सबळ कारणामुळं मरावं आणि ज्यांना जगायचं होतं त्यांनाही जगायची स्पष्ट कारणं हवीत. अल्लाह सर्वकाही ऐकून व जाणून आहे.

४३) अल्लाहनं तुम्हाला स्वप्नात त्यांना संख्येनं कमी दाखवलं जर त्यांना संख्येत जास्त दाखवलं असतं तर या बाबतीत तुम्ही हवालदील झाला असता आणि आपसात निर्णयाच्या बाबतीत वाद घातला असता, पण अल्लाहनं वाचवलं, कारण अल्लाह तर तुमच्या मनातील (हालचाली) देखील जाणतो.

४४) आणि जेव्हा तुम्ही समोरासमोर आलात त्यानं तुमच्या डोळ्यांना त्यांची संख्या कमी करून दाखवली, तसेच त्यांच्या डोळ्यांनीदेखील तुम्हाला तुच्छ दाखवलं. कारण जी गोष्ट घडणार होती अल्लाहला ती साध्य करायची होती. शेवटी सर्व प्रकरणं (निर्णयासाठी) अल्लाहकडंच वळतात.

४५) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही एखाद्या समूहाला सामोरं गेल्यास दृढ राहा, आणि सातत्यानं अल्लाहची जाण ठेवा म्हणजे तुम्हाला यश मिळेल.

४६) अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञा पाळा, आपसात वादविवाद घालू नका, (तसं केल्यास) तुमची मनं जड होतील. तुमची हवा निघून जाईल, संयम राखा. अल्लाह संयम पाळणाऱ्यांची साथ देतो.

४७) जे उन्मत्तपणानं लोकांसमोर प्रदर्शन करीत अल्लाहच्या मार्गात अडसर

बनून घराबाहेर (युद्धासाठी) निघतात, (अशा लोकांसारखे होऊ नका. अल्लाहची माहिती सर्वव्यापी आहे.

४८) आठवण करा, जेव्हा सैतानानं त्यांची कृत्यं आकर्षित करून दिली. तो म्हणाला, 'मी तुमच्या पाठीशी असताना तुमच्यावर कुणी मात करू शकत नाही.' पण जेव्हा दोन्ही सैन्य एकमेकांच्या समोर आले तो उलटपावली पळू लागला. म्हणाला, 'माझा तुमच्याशी काही संबंध नाही. तुम्हाला जे दिसत नाही मी ते पाहत आहे. मला अल्लाहची भीती वाटते. शिक्षा देण्यास तो फार कठोर आहे.'

४९) आणि हे दांभिक आणि इतर लोक ज्यांच्या मनात विकृती आहे म्हणू लागले, या लोकांना (मुस्लिमांना) त्यांच्या धर्मानं घमेंडी बनवलंय. (पण) ज्यानं अल्लाहवर विश्वास टाकला तर अल्लाहच सर्वोच्च जाणकार आहे.

५०) जर तुम्हाला प्रत्यक्ष दिसत असेल तर (पाहा), जेव्हा देवदूत विद्रोहींचे आत्मे काढून घेतात तेव्हा त्यांच्या तोंडांवर व पाठीवर मारा करत म्हणत असतात, आता मजा घ्या नरकाग्नीच्या कोपाची.

५१) तुम्ही आपल्या हातांनी (कर्मांनी) जे काही आगाऊ पाठवलंय त्याचंच हे फळ आहे. अल्लाह तर आपल्या भक्तांशी कधीही अत्याचार करत नाही.

५२) फिरऔनच्या लोकांनी आणि त्याच्या पूर्वीच्यांनी अल्लाहच्या वचनांना नाकारण्याचा जो पायंडा घातला होता. त्यांच्या अपराधांसाठी अल्लाहनं त्यांना धरलं. अल्लाह शक्तिशाली आणि कठोर शिक्षा करणारा आहे.

५३) याचं कारण, अल्लाह ज्या लोकांना अनुग्रहीत करतो त्यात कधी बदल करत नाही, जोपर्यंत ते स्वत: आपले अंतरंग बदलत नाहीत. अल्लाह तर ऐकणारा आणि (सर्वकाही) जाणणारा आहे.

५४) फिरऔन आणि त्याच्या पूर्वीच्या लोकांनी आपल्या बाण्याप्रमाणं आपल्या विधात्याची वचनं खोटी ठरवली. त्यांच्या अपराधांपायी त्यांना आम्ही ठार केलं. फिरऔनच्या लोकांना बुडवून टाकलं. कारण ते

सारेचे सारे अत्याचारी होते.

५५) अल्लाहच्या दृष्टीत बंडखोर लोक जनावरांपेक्षाही वाईट आहेत. ते कधी मान्य करणार नाहीत.

५६) ज्या लोकांशी तुम्ही करार केले आणि त्यांनी आपल्या करारांचा वारंवार भंग केला, त्यांना (अल्लाहची) भीतीच नाही.

५७) जर तुम्हाला युद्धात वर्चस्व मिळालं तर त्यांच्याशी असा व्यवहार करा की जे त्यांच्या पाठीशी आहेत त्यांनी (भयभीत होऊन) पळ काढावा, जेणेकरून त्यांना बोध घडावा.

५८) एखाद्या समूहाशी तुम्हाला करार भंग होण्याची भीती असेल तर तुम्हीदेखील जशास तसे (त्यांचा करार) त्यांच्या तोंडावर फेकून द्या, विश्वासघात करणाऱ्यांना अल्लाह (मुळीच) पसंत करत नाही.

५९) विद्रोहींनी कधीही असा विचार करता कामा नये की ते सुटून जातील (अल्लाहच्या तावडीतून), ते कधीही त्यास विफल करू शकणार नाहीत.

६०) त्यांच्याविरूद्ध तुमच्यातली सर्व शक्ती एकवटून तयार राहा, सुसज्ज अललेले घोडे आणि इतर सामुग्रीसह. जे तुमचे आणि अल्लाहचे शत्रू आहेत त्यांच्यावर तुटून पडण्यासाठी, तसेच इतरांवर धाक बसवण्यासाठी, ज्यांना तुम्ही ओळखत नाही, अल्लाहला त्यांची माहीत आहे. अल्लाहच्या मार्गात तुम्ही जे काही खर्च कराल ते तुम्हाला पुरेपूर परत दिलं जाईल. तुमचं काहीएक नुकसान होणार नाही.

६१) जर ते कराराकडं वळत असेल तर तुम्हीसुद्धा झुका. अल्लाहवर विश्वास ठेवा, तो सारंकाही ऐकणारा आणि जाण ठेवणारा आहे.

६२) जर तुम्हाला ते फसवू इच्छित असतील तर अल्लाह तुमच्यासाठी पुरेसा आहे. तोच ज्याने स्वत:साठी श्रद्धावंतांकरवी तुम्हांस बळकटी दिली.

६३) त्यानं तुमच्या हृदयात स्नेह निर्माण केली. तुम्ही या धरतीवर जे काही आहे ते सारं खर्च केलं असता तरीदेखील तुम्ही त्यांच्या मनात प्रेमभाव

निर्माण करू शकला नसता. पण अल्लाहनंच त्यांच्यामध्ये स्नेह निर्माण केले. अल्लाहच तर परमोच्च युक्ती करणारा आहे.

६४) हे प्रेषित तुमच्यासाठी आणि जे श्रद्धावंत तुमचं अनुसरण करतात त्यांच्यासाठी अल्लाह पुरेसा आहे.

६५) हे प्रेषित श्रद्धावानांना लढण्यासाठी उद्युक्त करा. जर तुमच्यात सातत्यानं धैर्य धरणारे असे वीसजण असतील तर ते दोनशे लोकांवर मात करतील आणि जर तुमच्यापैकी असे शंभर (लोक) असतील तर ते हजार विद्रोहींवर वर्चस्व मिळवतील. कारण त्यांना काही सुचत नसते.

६६) सध्या अल्लाहनं तुमचं काम हलकं केलंय. कारण तुमच्यातलं दौर्बल्य त्याला माहीत आहे. तरीपण जर तुमच्यातील शंभर लोक साहसी असतील तर ते दोनशे लोकांवर मात करतील. आणि जर एक हजार (लोक) असे असतील तर अल्लाहच्या आज्ञेनं दोन हजार लोकांवर आघाडी घेतील. कारण जे धैर्यवान आहेत, अल्लाह त्यांना साथ देतो.

६७) जोपर्यंत सर्व प्रदेशात शत्रूचा बिमोड होत नाही तोवर त्यांना युद्धकैदी बनवणं हे एका प्रेषिताला उचित नाही. तुम्ही तर या जगाला लाभ पाहत आहात, पण अल्लाहच्या नजरेत परलोक आहे. अल्लाहच वैभवशाली आणि ज्ञानी आहे.

६८) अल्लाहनं पूर्वीच असे आदेश दिले नसते तर तुम्ही जे काही मिळवलं होतं त्यासाठी तुम्हाला भयंकर शिक्षा झाली असती.

६९) आता तुम्ही युद्धात जे मिळवलं त्या पवित्र आणि वैध वस्तुंचा उपभोग घ्या. अल्लाहची भीती बाळगा, तो अत्यंत कृपावंत आणि क्षमाशील आहे.

७०) हे प्रेषित, तुमच्या हाती जे युद्धकैदी आलेत त्यांना सांगा, अल्लाहला जर तुमच्यात काही भलेपणा आढळला तर तो तुमच्याकडून जे घेतलं गेलं त्यापेक्षाही चांगलं देईल, तो तुम्हाला क्षमा करून टाकील. कारण तो क्षमा करणारा आणि दया दाखवणारा आहे.

७१) जर तुमच्याशी विश्वासघात करण्याचा त्यांचा मानस असेल तर त्यांनी याआधी अल्लाहशी विश्वासघात केलाय. म्हणूनच त्यांना तुमच्या ताब्यात देण्यात आलं. अल्लाह सर्वकाही जाणणारा समंजस आहे.

७२) निश्चितच ज्यांनी श्रद्धा धारण केली, देशत्याग केला आणि अल्लाहच्या मार्गात आपल्या संपत्ती व जिवाशी संघर्ष केला आणि ज्या लोकांनी त्यांना आश्रय दिला, त्यांना मदत केली ते आपसात एकमेकांचे स्नेही संरक्षक आहेत. ज्यांनी श्रद्धा बाळगली, पण त्यांनी आपलं गाव सोडलं नाही, तुमच्यावर त्यांची कसलीच जबाबदारी नाही, जोपर्यंत तेसुद्धा (आपल्या) देशाचा त्याग करत नाहीत. पण जर त्यांनी धर्माच्या बाबतीत तुमची मदत मागितली तर त्यांच्या मदतीला जाणं तुमचं कर्तव्य आहे. पण ज्या लोकांशी तुम्ही करार केला असेल त्यांच्याविरूद्ध नाही. तुम्ही जे काही करता त्या सर्व गोष्टी अल्लाहच्या पाहणीत आहेत.

७३) तसेच ज्यांनी नाकारलं तेदेखील एकमेकांचे साथीदार आहेत. तुम्ही जर असं केलं नाही तर धरतीवर मोठा अनाचार व उपद्रव माजेल.

७४) ज्या लोकांनी श्रद्धा बाळगली, आपलं गाव सोडलं आणि अल्लाहच्या मार्गात संघर्ष केला आणि ज्यांनी त्यांना आश्रयस्थान दिलं आणि मदत केली तेच खऱ्या अर्थानं श्रद्ध लोक आहेत. त्यांच्यासाठी क्षमा आहे आणि सन्मानाची साधनं.

७५) ज्या लोकांनी नंतर श्रद्धा ठेवली, देश सोडला, तुमच्या बरोबरीनं संघर्ष केला हे लोक तुमच्यापैकीच आहेत. पण ज्यांच्याशी तुमची रक्ताची नाती आहेत अल्लाहच्या आदेशानुसार त्यांचे अधिकार अधिक आहेत. अल्लाहला सर्व गोष्टींची माहिती आहे.

-------

# ९. सूरह अत-तौबा

**मदीनाकालीन, आयती १२९**

१) ज्या अनेकेश्वरींशी तुम्ही करार केले होते आता अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांकडून त्या लोकांना मुक्त करण्यात येते.

२) तेव्हा आता आणखीन चार महिने तुम्ही त्या भूमीत चालून फिरून घ्या. पण लक्षात ठेवा, तुम्ही काही अल्लाहला हताश करू शकणार नाहीत, तर अल्लाह नाकारणाऱ्यांना अपमानित करणार आहे.

३) अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांकडून महान हजच्या दिवशी सर्व लोकांना ही जाहीर सूचना दिली जाते की, अल्लाह व त्याच्या प्रेषितांनी अनेकेश्वरींशी संबंध संपुष्टात आणले आहेत. तेव्हा जर तुम्ही पश्चात्ताप केलात तर ते तुमच्यासाठी भलं आहे, पण जर तुम्ही तोंड वळवाल तर लक्षात ठेवा, तुम्ही अल्लाहला हताश करू शकत नाही. आता विरोधकांना यातनादायक शिक्षेची खूशखबर देऊन टाका.

४) मात्र अशा अनेकेश्वरींना वगळून, ज्यांच्याशी तुम्ही केलेल्या करारांमध्ये त्यांनी कसली कुचराई केली नाही, आणि तुमच्याविरूद्ध कुणाची मदतही केली नाही, तेव्हा त्यांच्याशी तुम्ही (केलेल्या कराराची) मुदत संपेपर्यंत ते करार पाळा. अल्लाहला त्याला भिऊन वागणारे आवडत असतात.

५) मग जेव्हा आदरणीय महीने संपून जातील, तेव्हा अनेकेश्वरींना ठार करा जिथं भेटतील तिथं, त्यांना धरा, घेरून टाका आणि दबा धरून बसा. पण जर त्यांनी पश्चात्ताप व्यक्त करून नमाज कायम केली आणि जकात अदा केली तर मग त्यांचा पाठलाग सोडून द्या. अल्लाह क्षमा करणारा कृपावंत आहे.

६) आणि त्या अनेकेश्वरींपैकी कुणी शरण मागितली तर त्याला शरण द्या. त्यानं अल्लाहचा ग्रंथ ऐकावा म्हणून आणि त्याला सुरक्षित ठिकाणी पोहचवा. कारण लोक अज्ञान आहेत.

७) अल्लाहपाशी आणि त्याच्या प्रेषितापाशी अनेकेश्वरींशी कसला बरं करार असावा, त्या लोकांशिवाय ज्यांच्याशी तुम्ही काबागृहापाशी करार केला होता. तेव्हा जोवर ते तुमच्यासाठी (करारास) ठाम असतील तुम्हीदेखील ठाम राहा. अल्लाहला सदाचारी लोकांची आवड असते.

८) आणि कशामुळे? त्यांनी जर तुमच्यावर ताबा मिळविला तर तुमच्याशी असलेल्या जवळीकीचा ते विचार करणार नाहीत की आपला करार पाळणार नाहीत. ते तोंडीच तुमचं समाधान करू इच्छितात, पण त्यांची मनं त्याचा स्वीकार करत नाहीत. आणि त्यांच्यातले बरेचजण तर उल्लंघन करणारे आहेत.

९) त्यांनी अल्लाहच्या वचनांना कवडीमोल ठरवलं आणि त्याच्या मार्गात अडथळं उभारलं, ते जे करतात ते वाईटच आहे.

१०) ते कोणत्याही श्रद्धाधारकाच्या बाबतीत नातेसंबंधांचाही विचार करत नाहीत की (केलेल्या) करारांचा. हेच लोक अतिरेक माजविणारे आहेत.

११) पण जर त्यांनी पश्चात्ताप व्यक्त करून नियमित नमाज अदा करतील आणि जकात देतील तर मग ते तुमचे धर्मबांधव आहेत. आम्ही ज्ञान असणाऱ्या लोकांना वचनं स्पष्ट करून देतो.

१२) आणि त्यांनी करार करूनदेखील आपल्या शपथा मोडीत काढल्या आणि तुमच्या धर्मावर तुटून पडले, तर विद्रोही लोकांच्या प्रमुखांशी लढा द्या. त्यांच्या शपथांचं त्यांना काही वाटत नाही, कदाचित ते परावृत्त होतील.

१३) तुम्ही अशा लोकांशी लढणार नाहीत ज्यांनी आपल्या शपथा मोडीत काढल्या? प्रेषिताला देशातून काढून टाकण्याचा कट रचला आणि तुमच्याविरूद्ध (लढण्याची) सुरुवात त्यांनीच केली, तरी? तुम्ही त्यांना भिता? तुम्ही जर (वास्तविक) श्रद्धा धारण करणारे असाल तर अल्लाह जास्त पात्र आहे तुमच्या भीतीसाठी.

१४) तेव्हा लढा त्यांच्याशी, तुमच्या हातून त्यांना अल्लाहची शिक्षा घडावी म्हणून, तो त्यांना अपमानित करील, त्यांच्याविरूद्ध तुम्हाला मदत

करील, म्हणजे श्रद्धा धारण करणाऱ्यांच्या मनाचं समाधान होईल.

१५) त्यांच्या मनातला राग नाहीसा होईल. अल्लाहची इच्छा ज्यावर असेल त्याचा पश्चात्ताप स्वीकारील अल्लाह प्रतिभासंपन्न आणि सर्वज्ञ आहे.

१६) तुम्ही असं गृहीत धरलंत? तुमची सुटका केली जाईल म्हणून? तुमच्यापैकी कुणी संघर्ष केला आणि अल्लाह त्याच प्रेषित आणि श्रद्ध लोकांव्यतिरिक्त तुम्ही कुणाशी सलगी साधली याबाबतीत अल्लाहनं तर आणखीन माहिती करून घेतली नसताना? तुम्ही जी कर्मं करत असता त्याची अल्लाहला खबर आहे.

१७) जे अनेकेश्वरी लोक आपण विद्रोही असल्याची साक्ष देत आहेत त्यांनी अल्लाहच्या मशिदींची देखरेख करणं हे त्यांचं काम नव्हे, या लोकांची कर्मं तर वाया गेलीत, ते सदैव नरकात राहणारे आहेत.

१८) अल्लाहच्या मशिदींची काळजी घेणं तर अशा लोकांचं काम आहे जे अल्लाहवर श्रद्धा ठेवतात, परलोकाबाबत ज्यांचा विश्वास आहे, जे नमाज कायम करतात आणि जकात देतात आणि अल्लाहशिवाय कुणाला भीत नाहीत, आणि अशांनाच मार्गदर्शनही लाभंल याची अपेक्षा आहे.

१९) हाजी लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय करून देणं आणि मस्जिदे हरामची (काबागृह) लक्षपूर्वक देखरेख करण्यासच फक्त तुम्ही अल्लाहची श्रद्धा बाळगणं व परलोकावर विश्वास ठेवणं आणि अल्लाहच्या मार्गात लढा देण्यासरखं बनवलंत? अल्लाहपाशी ते बरोबरीचं नाही. अल्लाह अत्याचारी लोकांचं मार्गदर्शन घडवत नाही.

२०) ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आपलं घरदार सोडलं आणि अल्लाहच्या कार्यात आपला जीव आणि मालमत्ता पणास लावली त्यांचा दर्जा अल्लाहच्या दृष्टीत महान असतो. आणि हेच लोक यशस्वी होतील.

२१) त्यांना खूशखबर द्या त्यांच्या विधात्याकडच्या कृपेची, त्याच्या प्रसन्नतेची आणि अशा स्वर्गांची जिथं चिरस्थायी ऐश्वर्य आहे.

२२) तिथं ते सदासर्वकाळासाठी राहतील, निश्‍चितच अल्लाहपाशी त्यांच्यासाठी मोठा मोबदला आहे.

२३) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही तुमच्या वाडवडिलांना आणि भाऊबंधांना, जर श्रद्धेपेक्षा द्रोह करणं जास्त आवडीचं असेल तर त्यांना आपला वाली म्हणून धरता कामा नये. आणि तुमच्यापैकी जे त्यांना आपला संरक्षक करून घेतील ते लोक अत्याचारी आहेत.

२४) त्यांना विचारा, जर तुमचे वाडवडील, तुमची मुलं, तुमचे भाऊबंध, तुमच्या पत्नी अथवा तुमची नातीगोती, तुम्ही कमवलेली संपत्ती आणि तुमचं व्यापार-उदीम ज्यांच्या मंदावण्याची तुम्हाला भीती लागून आहे आणि तुमच्या आवडीची घरंदारं, तुम्हाला जर अल्लाह त्याच्या प्रेषित आणि त्याच्या मार्गात लढा देण्यापेक्षा अधिक आपुलकीची वाटत असतील तर मग वाट पाहा या बाबतीत अल्लाह काय निर्णय लावतो ते. अल्लाह अशा बंडखोरांना मार्गदर्शन करत नाही.

२५) अल्लाहनं कित्येक युद्धांत तुमची मदत केलीय. आणि हुनैनच्या (युद्धाच्या) वेळी तुम्ही आपल्या मोठ्या संख्येनं गर्विष्ट झाला होता, पण ही संख्या तुमच्या काही उपयोगी पडली नाही, आणि विस्तृत अशी भूमी तुम्हास आवळून धरली आणि मग तुम्ही पाठ फिरवून माघार घेतली.

२६) मग अल्लाहनं समाधान प्रदान केली, आपल्या प्रेषताला आणि श्रद्धावंतांनादेखील आणि सैन्य धाडले जे तुम्हाला दिसले नाही आणि ज्या लोकांनी बंड माजवला होता त्यांना शिक्षा केली. बंडखोरांची हीच शिक्षा.

२७) नंतर अल्लाहच्या इच्छेस येईल त्याचा पश्‍चात्ताप तो स्वीकारील, कारण अल्लाह क्षमा करणारा असा कृपावंत आहे.

२८) श्रद्धावंत लोकहो, अनेकेश्‍वरी लोक अपवित्र आहेत. या वर्षानंतर त्यांनी काबागृहाजवळ फिरकता कामा नये. जर तुम्हाला परावलंबनाची भीती वाटत असेल तर अल्लाहची इच्छा झाल्यास तो तुम्हाला लवकरच

त्याच्या वरदानानं स्वावलंबी करील. अल्लाह सर्वज्ञ आणि विवेकी आहे.

२९) त्या लोकांशी लढा जे अल्लाह आणि शेवटच्या दिवसावर विश्वास ठेवीत नाहीत. आणि अल्लाह व त्याच्या प्रेषितानं जे निषिद्ध केलंय त्याला निषिद्ध मानत नाहीत. तसेच जोवर ग्रंथधारक लोक सत्यधर्माचा स्वीकार करत नाहीत आणि अल्पसंख्याक बनून आपल्या हातांनी जिझिया देत नाहीत तोवर.

३०) ज्यू लोक उझैर अल्लाहचं पुत्र असल्याचं म्हणतात, तर नसारा (ख्रिस्ती) म्हणतात, मरयमपुत्र ईसा अल्लाहचा पुत्र आहे. हे त्यांच्या तोंडचे बोल आहेत. जुन्याकाळातील नाकारणाऱ्या लोकांचा पाढाच ते वाचताहेत, अल्लाह त्यांना नष्ट करो, कुठं ते भरकटत जात आहेत.

३१) त्यांनी आपल्या धर्मपंडितांना आणि संन्याशांना अल्लाहव्यतिरिक्त आपला स्वामी बनवलाय, तसेच मरयमपुत्र ईसालादेखील, तर फक्त एकमेव अशा ईश्वराची भक्ती करण्यास सांगितलं होतं, ज्याच्याव्यतिरिक्त इतर कोणी ईश्वर नाही. ते जे अनेकेश्वर माजवित आहेत अल्लाह त्याच्याशी पवित्र आहे.

३२) अल्लाहच्या प्रकाशाला आपल्या मुखांनं (फुंकून) विझविण्याचा त्यांचा मानस आहे. पण (अल्लाह) आपल्या प्रकाशाला परिपूर्ण केल्याशिवाय राहणार नाही, मग नाकारणाऱ्यांना ते कितीही वाईट वाटले तरी.

३३) तोच आहे ज्यानं आपली प्रेषितं पाठवलीत सत्यधर्म घेऊन सर्व धर्मांवर वर्चस्व मिळवून देण्यास. मग अनेकेश्वरींना त्याची कितीही तिडीक असली तरी.

३४) श्रद्धावंत लोकहो, निश्चितच पुष्कळ असे धर्मपंडित आणि साधू लोकांची मालमत्ता लुबाडून खाऊन टाकतात आणि त्यांना अल्लाहच्या मार्गापासून रोखतात. आणि जे लोक सोनं आणि चांदी साठवून ठेवतात आणि अल्लाहच्या कार्यात ती उपयोगी आणत नाहीत, त्यांना खूशखबर द्या यातनादायक शिक्षेची.

३५) एके दिवशी आम्ही हेच (सोनं आणि चांदी) नरकाग्नीत तापवू आणि मग त्यांच्या कपाळावर, त्यांच्या बाजूंवर आणि त्यांच्या पाठीवर त्यांना डाग दिला जाईल. हेच तुम्ही स्वत:साठी साठवून ठेवलंत. मग आता जे साठवून ठेवलं होतं त्याची चव घ्या.

३६) ज्या दिवशी अल्लाहनं आकाश आणि धरतीची निर्मिती केली त्याच्यापाशी महिन्यांची संख्या बारा असल्याचं त्यानं आज्ञांकित केलं. त्यातील चार (महिने) आदरणीय आहेत. हाच रास्त धर्म आहे. तुम्ही त्यामध्ये स्वत:वर अन्यायकारक असं काही करू नका. आणि सर्व अनेकेश्वरींशी लढा द्या, ज्याप्रमाणं ते एकत्रित होऊन तुमच्याशी लढताहेत. आणि लक्षात असू द्या अल्लाह सदाचारींच्या बाजूने असतो.

३७) ही अदलाबदल (महिन्यांची) द्रोहात भर घालते. जे विद्रोही आहेत ते यामुळं मार्गभ्रष्ट होऊन एका महिन्याला एका वर्षात वैध ठरवतात, तर दुसऱ्या वर्षी त्याला अवैध करतात. अल्लाहनं जे निषिद्ध ठरवलं त्याची संख्या अशा रीतीनं पूर्ण करता यावी म्हणून. आणि अल्लाहनं जे वैध ठरवलंय ते अवैध करून टाकतात. त्यांची वाईट कर्मं त्यांच्यासाठी आकर्षित केली गेलीत. अल्लाह नाकारणाऱ्यांना मार्गदर्शन करत नाही.

३८) श्रद्धावंत लोकहो, तुम्हास अल्लाहच्या मार्गात आगेकूच करण्यास सांगितलं असता का बरं तुमचे पाय जड होऊन जमिनीस धरून घेता? तुम्हाला परलोकापेक्षा या जगातलं जीवन जास्त आवडतं. जगातलं हे जीवन परलोकाच्या तुलनेत अगदी क्षुल्लक आहे.

३९) तुम्ही जर पुढं निघाला नाहीत तर अल्लाह तुम्हाला कठोर शिक्षा करील. आणि तुमच्या जागी इतर समूह उभा करील. तुम्ही त्याचे काहीएक बिघाड करू शकणार नाहीत. कारण अल्लाहच सर्वस्व सामर्थ्य आहे.

४०) तुम्ही जरी त्याच्या मदतीस सरसावला नसला तरी जेव्हा नाकारणाऱ्यांनी त्यांना (प्रेषित मुहम्मद स. यांना) घालवून दिलं तेव्हा अल्लाहनं मदत केलीय. ते सौरच्या गुहेत असताना दोघांपैकी दुसरे होते. ते आपल्या सोबत्याशी म्हणाले, घाबरू नका, अल्लाह आपल्या पाठीशी आहे. तशा

प्रकारे अल्लाहनं त्यांना समाधान बहाल केली आणि अशा शक्तींनी त्यांना मदत पुरविली ज्या तुम्हास दिसल्या नाहीत. नाकारणाऱ्यांचा शब्द नमवून टाकला आणि अल्लाहचा शब्दच परमोच्च असा आहे. अल्लाह सर्वोच्च आणि सर्वज्ञ आहे.

४१) तुम्ही निघा हलक्या अथवा भरीव साधनांनी आणि आपली मालमत्ता, आपला जीव अल्लाहच्या कार्यात संघर्ष करण्यात उपयोगी आणा. तुम्हाला कळत असेल तर हे तुमच्या भल्याचं आहे.

४२) जर सहजासहजी लाभ मिळणार असता तसेच प्रवास सोयिस्कर असता तर ते तुमच्या मागं निघाले असते. पण त्यांना हा मार्ग फारच लांबवरचा वाटतो. आता शपथा वाहतील, आम्हाला ते जमलं असतं तर आम्ही तुमच्या मागं निघालो असतो, ते स्वत:चा नाश करताहेत. ते खोटे असल्याचे अल्लाहला ठाऊक आहे.

४३) अल्लाह तुम्हास क्षमा करो. पण (हे मुहम्मद स.) त्यांना तुम्ही का बरं अनुमती दिली. त्यांच्यामधील खरे कोण हे उघड होण्याआधी आणि कोण खोटं अशांची ओळख पटण्याआधी.

४४) जे अल्लाहची श्रद्धा धारण करतात आणि शेवटच्या दिनावर त्यांचा विश्वास असतो, आपल्या मालमत्ता आणि जिवांसह संघर्ष करण्यास तुमच्याशी सवलत मागत नाहीत. अल्लाहला अशा सदाचारी लोकांची जाणीव आहे.

४५) जे लोक अल्लाहशी एकनिष्ठ नाहीत आणि शेवटच्या दिवसावर त्यांचा विश्वास नाही असेच (लोक) तुझ्याजवळ सूट मागतात. त्यांची हृदये संशयानं ग्रासलीत आणि आपल्या संशयात गुरफटले जाताहेत.

४६) त्यांनी जर निघण्याचा मानस धरला असता तर त्यासाठी त्यांनी काही तयारी केली असती, अल्लाहला त्यांचं उठणं पसंत नव्हतं म्हणून त्यांना मागंच राहू दिलं आणि सांगितलं, बसूनच राहा, बसून राहणाऱ्यांबरोबर.

४७) जर ते तुमच्याबरोबर निघाले असते तर तुमच्या अडचणींत भर

घालण्यापलीकडं त्यांनी काही केलं नसतं. तुमच्यात अनाचार माजविण्यास त्यांनी धावपळ केली असती. तुमच्यात त्यांचे हेर आहेत. अल्लाह अत्याचारींना चांगलं ओळखतो.

४८) त्या आधीही त्यांनी कट रचलेत आणि तुमच्या व्यवहारांत ढवळाढवळ करत राहिले. सत्य काय ते येऊन अल्लाहचा निर्णय उघड झाला, त्यांना जरी ते आवडलं नसलं तरी.

४९) त्यांच्यापैकी कुणी तुमच्याकडं सवलत मागतो, मला परीक्षेत टाकू नका म्हणत. पण ऐकून घ्या ते पूर्वीच परीक्षेत सापडलेत. नरकानं या बंडखोरांना वेढा घातलाय.

५०) तुझं काही भलं झाल्यास त्यांना वाईट वाटतं. आणि तुम्ही संकटात सापडाल तर ते म्हणतात, आम्ही पूर्वीच तजवीज करून ठेवली होती आणि आनंद व्यक्त करीत मागं वळून जातात.

५१) त्यांना सांगा, आमच्या नशिबात जे लिहलं असेल त्यापेक्षा आम्हास इतर काही होणार नाही,तोच आमचा वाली आहे आणि श्रद्धावंतांनी अल्लाहवरच भिस्त ठेवायला हवी.

५२) त्यांना सांगा तुम्ही आमच्याविषयी जे पाहू इच्छिता ती दोन चांगल्या गोष्टींपैकी एक आहे. (युद्धात विजय मिळविणं अथवा हौतात्म्य पत्करणं) आणि आम्ही तुमच्याविषयी जे पाहताहोत ते म्हणजे अल्लाहनं स्वत:च तुम्हाला शिक्षा करावी किंवा आमच्या हातून. तेव्हा तुम्ही वाट पाहत बसा, आम्ही तुमच्याबरोबर वाट पाहताहोत.

५३) त्यांना सांगा, तुम्ही आनंदानं खर्च करा अथवा नाराजीनं, ते तुमच्याकडून मुळीच स्वीकारलं जाणार नाही, तुम्ही उल्लंघन करणारी मंडळी आहात.

५४) त्यांनी केलेला खर्च ना स्वीकारला जाण्याचं कारण त्यांचा अल्लाह आणि त्याच्या प्रेषितास नाकारणं होय. आणि ते नमाजला येताना आळस करतात आणि ते जे खर्च करतात तेही नाराजीने.

५५) त्यांच्या संपत्ती आणि संततीनं तुम्ही चकीत होता कामा नये. अल्लाहनं त्यांना त्याद्वारे या जगातल्या जीवनात शिक्षा द्यायचं, तसेच अश्रद्धावस्थेतच त्यांचं प्राणहरण करायचं ठरवलं.

५६) ते तुमच्यामधीलच असल्याची अल्लाहची शपथ वाहतात, पण ते तुमच्यापैकी नाहीत, ते भित्रे आहेत.

५७) त्यांना जर कुठं शरण घेण्यास जागा सापडली किंवा एखादी गुहा अथवा कुठंतरी शिरून बसण्यास जागा मिळाली (तर) झपाट्यानं रस्सी तोडून पळून जातात तसं ते तिकडं वळतील.

५८) त्यांपैकी काही दानाच्या (वाटपा) बाबत तुमच्यावर आक्षेप घेतात, त्यांना त्यातून काही दिलं तर ते खूश होतील आणि जर दिलं नाही तर लगेच संतापून जातात.

५९) त्यांना अल्लाह आणि त्याच्या प्रेषितानं जे दिलं त्याचं त्यांनी समाधान मानलं असतं तर किती छान झालं असतं. ते म्हणाले असते, अल्लाहच आमच्यासाठी पुरेसा, अल्लाह आपल्या वरदानानं आम्हाला (आणखीनही) देईल, त्याचे प्रेषितसुद्धा. आम्ही तर अल्लाहशीच बांधील आहोत.

६०) जकात (दानधर्म) तर गोरगरिबांसाठी, निराधारांसाठी आणि जे त्या कामावर (जकातचे विश्वस्त) नेमलेत त्यांच्यासाठी आणि ज्यांची दिलजमाई करायचीय अशांसाठी, तसेच जे गुलामीत खितपत आहेत आणि कर्जबाजारी झालेत अशांना मुक्त करण्यासाठी आणि अल्लाहच्या कारणास्तव आणि वाटसरूंसाठी, अल्लाहकरवी अनिवार्य केलं गेलंय. अल्लाह सर्वज्ञ आणि प्रतिभावान आहे.

६१) त्यांच्यामध्ये प्रेषितांना त्रास देणारे लोक आहेत ते म्हणतात, ते तर भलतंच ऐकतात. (वास्तविक पाहता) त्यांना तुमच्या भल्याचं असेल तेच तो ऐकतो, तो अल्लाहवर श्रद्धा ठेवतो आणि श्रद्धा धारण करतात, त्यांचा विश्वास करतो. आणि तुमच्यामधील श्रद्धावंतासाठी कृपा आहे. जे लोक प्रेषिताला इजा पोचवतात त्यांच्यासाठी कठोर

शिक्षा आहे.

६२) ते तुम्हाला खूश करावं म्हणून अल्लाहची शपथ घेतात. जर ते निष्ठावंत असतील तर अल्लाह आणि त्याचे प्रेषित यांना संतुष्ट करणं अधिक उचित आहे.

६३) त्यांना माहीत नाही? जे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताला विरोध करतात त्यांच्यासाठी नरकाग्नी आहे, त्यात ते सदैव राहतील, तो मोठा अपमान आहे.

६४) दांभिक लोकांना अशी भीती लागून आहे की एखादा अध्याय अवतरून त्यांच्या मनांमधील हालचाली त्यांच्यावर (मुस्लिमांवर) उघड होतील. त्यांना सांगा, तुम्ही वात्रट बोलत राहा. तुम्हाला ज्याची भीती वाटते ती गोष्ट अल्लाह निश्चितच उघडकीस आणणार आहे.

६५) तुम्ही त्यांना प्रश्न केला तर ते म्हणतील, आम्ही तर करमणूक म्हणून खेळीमेळी करत होतो. त्यांना विचारा, तुम्ही अल्लाहशी, त्याच्या वचनांशी आणि प्रेषिताशी मस्करी करत होता?

६६) आता काही निमित्त पुढे करू नका, तुम्ही श्रद्धा धारण केल्यानंतर नाकारलात, तुमच्यापैकी काहींना आम्ही क्षमा करू तर इतर काहींना शिक्षा करणार, कारण ते अपराधी होते.

६७) दांभिक स्त्रिया आणि दांभिक पुरुष एकाच माळेचे मणी आहेत. वाईटाचा पुरस्कार करतात आणि सदाचारास मनाई करतात. आणि आपले हात आखडतात (खर्च करत नाहीत) त्यांनी अल्लाहला विसरलं म्हणून अल्लाहनंही त्यांना विसरून टाकलं. दांभिक लोक बंडखोरच आहेत.

६८) अल्लाहनं दांभिक पुरुष, दांभिक स्त्रिया आणि नाकारणाऱ्यांना वचन दिलंय नरकाग्नीचं, त्यात ते सदैव राहतील, त्यांच्यासाठी ते पुरेसं आहे. त्यांच्यावर अल्लाहचा धिक्कार आहे आणि त्यांना कायमची शिक्षा आहे.

६९) तुमच्यापूर्वी होऊन गेलेले लोक तुमच्यासारखेच होते. तुमच्यापेक्षा

शक्तिशाली होते. मोठी त्यांची संपत्ती आणि त्यांच्या संततीची संख्या, त्यांनी त्यांच्या वाट्याला आलं त्याचा उपभोग घेतला, तुम्हीही तुमच्या वाट्याला आलं त्याचा उपभोग घ्या, जसं तुमच्या पूर्वीच्यांनी आपल्या वाट्याला आलं त्याचा उपभोग घेतला, त्यांच्याप्रमाणेच तुम्हीही व्यर्थ गोष्टींत पडलात जसं ते पडले होते. अशाच लोकांची कर्मं या जगात तसेच परलोकातदेखील वाया गेलीत. आणि हेच लोक विनाश पावणारे आहेत.

७०) त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांची माहिती त्यांना मिळाली नाही? नूहच्या लोकांची. आद, समूद आणि इब्राहीमच्या लोकांची, तसेच मदयनवाले आणि उद्ध्वस्त झालेल्या वस्त्यांची, त्यांच्याकडं त्यांचे प्रेषित आले, स्पष्ट संकेतांसह. अल्लाहनं त्यांच्यावर अत्याचार करावा असं मुळीच नव्हतं. तेच स्वत:शी अन्याय करणारे होते.

७१) श्रद्ध पुरुष आणि श्रद्ध महिला एकमेकांचे संरक्षक मित्र असतात. न्याय्य आहे ते करण्यास प्रवृत्त करतात आणि गैर करण्यापासून रोखतात. तसेच नियमित नमाज अदा करतात, जकात देतात, अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांची आज्ञा पाळतात. याच लोकांवर अल्लाह कृपा करेल. अल्लाह सर्वोच्च प्रतिभासंपन्न आहे.

७२) अल्लाहनं निष्ठावंत पुरुष आणि निष्ठावंत महिलांना स्वर्गांचा शब्द दिलाय. ज्यांच्या खालून नद्या वाहतात. तिथं ते सदा-सर्वकाळ राहतील, तिथं पवित्र अशा सदनिका आहेत राहण्यासाठी स्वर्गाच्या बागा (आणि त्या सर्वांवर कडी) म्हणजे अल्लाहची प्रसन्नता (त्यांना लाभेल). आणि हीच परमोच्च फलश्रुती आहे.

७३) हे प्रेषित विद्रोही आणि दांभिक लोकांशी झुंज द्या. त्यांच्याशी कठोरतेने वागा. नरक त्यांचं ठिकाण आहे, वाईट असं ठिकाण.

७४) ते अल्लाहची शपथ वाहतात आम्ही तसं म्हटलं नसल्याची, पण त्यांनी नक्कीच आपला द्रोह व्यक्त केला आणि इस्लाम स्वीकारल्यानंतर बंड केलं आणि त्यांनी चंग बांधला, पण ते साकार करू शकले नाहीत. त्यांचा सूड एवढ्यासाठीच की अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांनी

आपल्या वरदानानं त्यांना श्रीमंत केले. त्यांनी जर पश्चात्ताप केला तर ते त्यांच्याच भल्याचं, पण जर मागं फिरले तर अल्लाह त्यांना यातनादायक शिक्षा देणारच, या जागी आणि परलोकातदेखील. आणि धरतीवर त्यांचं संरक्षण करण्यास त्यांच्या मदतीस कुणी येणार नाही.

७५) आणि त्यांच्यापैकी काही लोकांनी अल्लाहला वचन दिलं होतं, जर त्यांनी त्यात आपल्या वरदानातून काही दिलं तर ते दानधर्म करतील, आणि सदाचारी लोकांतील बनून राहतील.

७६) पण जेव्हा अल्लाहनं त्यांना विपुलता दिली तेव्हा ते लोभी झाले, आणि (आपल्या वचनापासून) मागं फिरले. वास्तवात ते मागं फिरणारेच आहेत.

७७) परिणामी त्यांची मनांमध्ये दांभिकपणानं जडवला, ज्या दिवशी त्याच्याशी गाठ आहे तोपर्यंत (कयामत), कारण त्यांनी अल्लाहला जे वचन दिलं होतं त्यांच्याविरूद्ध गेले आणि ते खोटं बोलत होते म्हणून.

७८) त्यांना ठाऊक नाही, अल्लाहला त्यांची गुपितं आणि त्यांच्या गुप्त चर्चेची माहिती असते. आणि परोक्षाच्या गोष्टी अल्लाहच्या जाणिवेत असतात.

७९) श्रद्धावंतांमधील जे लोक आनंदानं दानधर्म करतात, त्यांच्यात जे लोक उणिवा काढतात आणि जे लोकांना त्यांच्या मेहनतीचा मोबदला मिळतो त्यांची (दांभिकांकडून) थट्टा केली जाते, त्यांच्या मस्करीच्या उत्तरादाखल अल्लाहकडं त्यांना यातनादायक शिक्षा आहे.

८०) तुम्ही त्यांच्यासाठी क्षमायाचना करा अथवा करू नका, तुम्ही त्यांच्यासाठी सत्तर वेळा जरी क्षमायाचना केली तरी अल्लाह त्यांना क्षमा करणार नाही, कारण त्यांनी अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी बंड केलंय. अल्लाह अपराधी लोकांना कधी मार्ग दाखवत नसतो.

८१) जे मागं राहिले त्यांना अल्लाहच्या प्रेषितांमागं बसून राहण्यात आनंद वाटत होता. आणि आपल्या संपत्ती आणि प्राण अल्लाहच्या कार्यात पणाला लावणे त्यांना आवडले नाही, ते म्हटले अशा उष्णतेत बाहेर

पडू नका. त्यांना सांगा, नरकाची आग या उष्णतेपेक्षा तीव्र आहे, त्यांना हे कळून चुकले असते.

८२) त्यांनी आता हसणं कमी करून जास्त रडायचंय. त्यांनी जे कमवलंय त्याचं हे प्रतिफळ होय.

८३) नंतर अल्लाहनं त्यांच्यापैकी कोणत्या गटाकडं तुम्हांस परत नेलं. आणि त्यांनी निघण्यासाठी (युद्धात) तुमची परवानगी मागितली, तर त्यांना सांगून टाका, तुम्ही माझ्याबरोबर कधीही निघायचं नाही आणि माझ्यासोबत शत्रुशी कधी लढावयाचं नाही. पहिल्यांदा तुम्ही बसून राहणेच पसंत केलं होतं, तेव्हा आतादेखील तुम्ही मागं राहणाऱ्यांबरोबर बसून राहा.

८४) त्यांच्यापैकी कुणी मरण पावल्यास त्याच्या अंत्यविधीची नमाज कधीच पढू नका, तसेच त्यांच्या कबरीवर जाऊ नका. कारण त्यांनी अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी बंड केलंय. अपराधी अवस्थेतच ते मरण पावले.

८५) त्यांची श्रीमंती आणि त्यांच्या मुलाबाळांचं तुम्हाला नवल वाटू नये. याद्वारेच त्यांना अल्लाहनं या जगात शिक्षा करण्याचं ठरवलंय. बंडावस्थेतच त्यांचे प्राण हरण होणार आहेत.

८६) जेव्हा एखादा अध्याय अवतीर्ण होतो, (आणि सांगितले जाते) अल्लाहशी एकनिष्ठ होऊन प्रेषितांसह संघर्ष करण्यास तेव्हा त्यांच्यामधील सक्षम लोक तुमची परवानगी मागतात आणि म्हणतात, आम्हाला सोडून द्या, आम्ही बसून राहणाऱ्यांबरोबर होऊन जाऊ म्हणतात.

८७) मागं बसून राहणाऱ्या स्त्रियांबरोबर बसून राहणंच त्यांनी पसंत केलं. तेव्हा अल्लाहनं त्यांच्या मनांवर मोहर लावून टाकली म्हणून त्यांना काही सुचत नाही.

८८) पण प्रेषित आणि जे लोक त्यांच्याशी एकनिष्ठ होते त्यांनी आपली संपत्ती आणि जिवानिशी संघर्ष केला अशाच लोकांसाठी भलं ते सर्वकाही आहे. आणि हेच लोक उत्कर्ष पावणारे आहेत.

८९) अल्लाहनं त्यांच्यासाठी असे स्वर्ग तयार ठेवलेत ज्यांच्या खालून नद्या वाहतात, ते सदा तिथं राहणार आहेत. हे फार मोठे यश आहे.

९०) आणि अरबांपैकी खेडूत लोक निमित्त शोधत आले, त्यांना परवानगी मिळावी म्हणून. आणि जे लोक अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी खोटे बोलत होते ते बसून राहिले, तेव्हा ज्या लोकांनी विद्रोह अंगीकारला त्यांना लवकरच यातनादायक शिक्षा मिळेल.

९१) पण जे दुर्बल (म्हातारे) आहेत आणि आजारी आहेत आणि ज्या लोकांकडं साधनं नसतील त्यांच्यावर काही आक्षेप नाही, जर ते अल्लाहशी आणि त्याच्या प्रेषिताशी प्रामाणिक असतील. जे रास्त लोक आहेत त्यांच्यावर काही दोष नाही कारण अल्लाह क्षमा करणारा कृपावंत आहे.

९२) तसेच जे लोक स्वारीची तरतूद करून देण्यास तुमच्याकडं आले आणि तुम्ही म्हणालात मला काही आढळत नाही तुमच्या स्वारीकरिता तेव्हा ते परतले, पण दु:खी होऊन अश्रू ढाळत. त्यांच्याकडं तरतूद लावण्यास काही साधनं नाहीत तर त्यांच्यावरही काही ठपका नाही.

९३) दोष आहे फक्त अशा लोकांवरच जे श्रीमंत असूनदेखील तुमची परवानगी मागतात आणि त्यांना मागं राहणाऱ्या स्त्रियांप्रमाणे बसून राहण्यात आनंद वाटतो. अशा लोकांच्या मनांवर अल्लाहनं मोहर लावलीय म्हणून त्यांना काही कळत नाही.

**पारा - ११**

९४) तुम्ही त्यांच्याकडं परत आल्यास ते निमित्त पुढं करतील. त्यांना सांगा, बहाणे नका करू, आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवणार नाही. अल्लाहनं तुमचा सर्व अहवाल आम्हास अवगत केलाय, यापुढे अल्लाह आणि त्याचे प्रेषित तुमच्या चालींवर लक्ष ठेवणार आहेत आणि नंतर तुमचं गुप्त आणि उघड सर्वकाही ज्यास ठाऊक आहे, त्याच्याकडं परतवलं जाणार तेव्हा तुम्ही जे काही करत राहिलात ते तुम्हाला दाखवलं जाईल.

९५) तुम्ही त्यांच्याकडं परत गेल्यास ते अल्लाहच्या शपथा वाहतील, तुम्ही त्यांना क्षमा करावी म्हणून, खरंच त्यांना सोडून द्या. ते तर एक कलंक आहेत. नरकच त्यांचं ठिकाण आहे त्यांनी जे कमवलंय त्याचं प्रतिफळ.

९६) ते तुमच्या पुढं शपथा घेत आहेत, तुम्ही त्यांच्याशी संतुष्ट व्हावं म्हणून. पण जरी तुम्ही त्यांच्याशी संतुष्ट झालात तरी अल्लाह अशा अवज्ञाकारी लोकांशी संतुष्ट होणार नाही.

९७) ही खेडूत माणसं (अरब) आपल्या विद्रोहात आणि दांभिकपणात अतिशय कठोर असतात. आणि अल्लाहनं आपल्या प्रेषितावर ज्या आज्ञा पाठविल्या आहेत त्या त्यांना कळून येणार नाहीत, याच लायकीचे ते आहेत. अल्लाहस सर्वकाही ठाऊक असून तो ऐकणारा आहे.

९८) या खेडूत लोकांपैकी काही असे आहेत जे (अल्लाहच्या कारणास्तव) खर्च करण्यास (एक प्रकारचा) दंड समजतात. आणि तुम्ही एखाद्या चक्रात सापडावं याची ते वाट पाहतात. वास्तविक तेच एका भयंकर चक्रात अडकून पडलेत.

९९) या खेडूत लोकांपैकी ज्यांनी अल्लाह आणि परलोकावर विश्वास ठेवतात आणि ते जे काही खर्च करतात त्यास अल्लाहशी जवळीक साधणं आणि प्रेषितांचा आशीर्वाद लाभण्याचं साधन समजतात, होय, नक्कीच तो त्यांच्यासाठी जवळीक साधण्याचा (साधन) आहे. अल्लाह त्यांना लवकरच आपल्या कृपेखाली घेईल. निश्चितच अल्लाह क्षमा करणारा कृपावंत आहे.

१००) सर्वप्रथम (इस्लाम प्रवेशात) पुढाकार घेणारे ज्यांनी आपलं गाव सोडलं (हिजरत केली) ते आणि अनसार (मदीनेतील लोक) आहेत ज्यांनी अतिशय सुंदर रीतीनं त्याचं पालन केलं. अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला आणि ते अल्लाहला प्रसन्न झाले. त्यांच्यासाठी त्यानं असे स्वर्ग तयार ठेवलेत ज्यांच्या खालून नद्या वाहतात, तिथं ते सदैव राहतील. आणि हेच महान असे यश होय.

१०१) तुमच्या अवतीभवती जे खेडूत लोक आहेत त्यांच्यामधील काही दांभिक आहेत, तसेच मदीनेतील काही लोक दांभिकतेवर अडून बसलेत, तुम्ही नाही त्यांना ओळखत, आम्ही ओळखतो. आम्ही त्यांना दोन वेळा शिक्षा करू, नंतर भयंकर अशा शिक्षेकडं त्यांना परतवलं जाईल.

१०२) आणि काही इतर लोक आहेत त्यांनी आपला गुन्हा मान्य केला, त्यांनी चांगल्या आणि वाईट कर्मांची सरमिसळ केली, शक्यतो अल्लाह त्यांना क्षमा करील, कारण अल्लाह क्षमा करणारा कृपाशाली आहे.

१०३) त्यांच्या मालमत्तेतून जकात घ्या, त्यांना पावन आणि विशुद्ध करा, त्यांच्यासाठी प्रार्थना करा, तुमच्या प्रार्थनेनं त्यांना शांतता लाभेल. अल्लाह सर्वकाही ऐकतो आणि सर्वांची जाण ठेवतो.

१०४) त्यांना याची जाणीव नाही, अल्लाह आपल्या भक्तांकडं वळत असतो आणि त्यांच्या दानधर्मास स्वीकारतो आणि अल्लाहच खरे तर पश्चात्ताप स्वीकारणारा अतिशय कृपावंत आहे.

१०५) त्यांना सांगा, कर्म करीत राहा, म्हणून अल्लाह त्यांना पाहतो आणि त्याचा प्रेषित आणि श्रद्धावंतदेखील पाहताहेत. आणि लवकरच तुम्हाला, ज्यास तुमचं गुप्त आणि उघड सारंकाही ठाऊक आहे, त्याच्याकडं परत आणलं जाईल आणि मग तुम्ही जे करत राहिला ते तुम्हाला दाखवलं जाईल.

१०६) आणखीन काही अशीही (माणसं) आहेत ज्यांची प्रकरणं अल्लाहच्या निर्णयासाठी लांबणीवर टाकलेली आहेत. तो त्या लोकांना शिक्षा करील अथवा त्यांचा पश्चात्ताप स्वीकारील, अल्लाहच्या जाणीवेत सर्वकाही आहे आणि तोच प्रतिभासंपन्न आहे.

१०७) आणखी काही लोकांनी खोडसाळपणा करून एक मशीद (जिरार) उभारली, बंडाळी माजविण्याकरिता. श्रद्धावंतांत फाटाफूट उडवून देण्यासाठी. त्यासाठी दबा धरून बसता यावं म्हणून. ज्यांनी याआधी अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताशी युद्ध केलं तरीदेखील ते शपथा वाहतील की भलं असंच काही करण्याचा आमचा मानस होता म्हणून.

पण ते खोटं असल्याचीच अल्लाह साक्ष देतो.

१०८) तुम्ही तिच्यात (जिरार मशीदीत) कधीही पाय ठेवू नये, निश्चितच ती मशीद ज्याचा पायाच अगदी पहिल्याच दिनापासून सदाचारावर स्थापित केला गेला आहे तीच तुमच्या प्रार्थनेसाठी उभारण्यास योग्य आहे. त्यामध्ये असे लोक आहेत ज्यांना शुद्ध राहणे पसंत आहे. जे पावित्र्य अंगीकारतात ते अल्लाहच्या आवडीचे असतात.

१०९) तेव्हा ज्यानं आपल्या वास्तूची पायाभरणी अल्लाहच्या भीती आणि त्याच्या प्रसन्नतेनं केली तो उत्तम की ज्यानं आपल्या वास्तूचा पाया ढासळणाऱ्या कडेवर ठेवला आणि तो त्याच्यासहित नरकाग्नीत कोसळेल? अल्लाह तर अशा अत्याचारींना कधी मार्ग दाखवत नाही.

११०) त्यांनी उभारलेली ही वास्तू त्यांच्या मनांमध्ये नेहमी शंकाकुशंकांचं घर करून बसेल आणि त्यांच्या मनांची लक्तरं होतील. अल्लाह सर्वज्ञ असून प्रतिभावंत आहे.

१११) खरं तर अल्लाहनं श्रद्धावंतांच्या जिवांचा आणि त्यांच्या धनसंपत्तीचा स्वर्गाच्या मोबदल्यात सौदा केलाय. ते अल्लाहच्या कारणास्तव लढताहेत. ते मारतात आणि मारले जातात, एका सच्चा वचनाशी तो बांधील आहे, तौराहमध्ये, इंजील आणि कुरआनमध्ये. आणि अल्लाहच्या तुलनेत कोण तो आपलं वचन पाळणारा, तेव्हा तुम्ही झालेल्या व्यवहाराचा आनंद साजरा करा. तुम्ही त्याच्याशी केलेला तो सौदा होय. आणि हेच सर्वोत्तम यश आहे.

११२) जे पश्चात्ताप व्यक्त करणारे, भक्ती करणारे, गुणगान करणारे, (अल्लाहच्या मार्गात) संचार करणारे, (त्याच्या पुढे) झुकणारे, नतमस्तक होणारे आणि भल्याचा पुरस्कार करणारे व दुष्ट गोष्टींपासून परावृत्त करणारे आणि अल्लाहच्या मर्यादा जतन करणारे आहेत, यांना तसेच श्रद्धावंतांना सुवृत्त द्या.

११३) प्रेषित आणि श्रद्धावंतांनी अनेकेश्वरींसाठी क्षमायाचना करणं उचित नाही, जरी ते त्यांचे जवळचे नातलग असले तरी, ते नरकाचे धनी

असल्याचं त्यांच्यावर उघड झाले असता.

११४) इब्राहीम यांनी आपल्या पित्यासाठी जी क्षमायाचना केली होती ती त्यांना दिलेल्या वचनामुळे. जेव्हा ते अल्लाहचे शत्रू असल्याचं जाहीर झालं तेव्हा त्यांनी त्यांना (पित्याला) दूर केलं. इब्राहीम खरं पाहता मृदुहृदयी आणि सहनशील होते.

११५) त्यांनी कोणत्या गोष्टींशी अलिप्त राहावं हे स्पष्ट करून देण्याआधी कोणत्याही समूहास मार्गदर्शन करून त्यांना परत मार्गभ्रष्ट करणे हा अल्लाहचा शिरस्ता नाही.

११६) अल्लाहचंच अधिराज्य आहे आकाश आणि पृथ्वीवर. तोच जगवतो आणि तोच मृत्यू देतो आणि अल्लाहव्यतिरिक्त तुम्हास दुसरा कुणी संरक्षक आणि मदत करणारा नाही.

११७) अल्लाह आपल्या प्रेषिताकडं, तसंच जे लोक स्थलांतर करून आले होते, आणि ज्यांनी त्यांना कसोटीच्या काळात मदत दिली त्यांच्याकडं वळला (लक्ष दिलं) आणि त्यांच्यामधील काही लोकांची मनं विचलित होण्याआधी त्यांच्याकडं त्यानं (अल्लाहनं) लक्ष दिलं. निश्चितच तो त्यांच्यासाठी प्रेमळ आणि अतिशय दयावंत आहे.

११८) आणि त्या तिघांवरही त्यानं दया केली ज्यांचं प्रकरण मागं ठेवण्यात आलं होतं. ज्यांना या विस्तृत धरतीनं आवळून घेतलं होतं, आणि त्यांना आता कळून चुकलं होतं की अल्लाहव्यतिरिक्त इतर कुठं त्यांना निवारा नाही, तेव्हा त्याने त्यांच्याकडं लक्ष दिलं. त्यांनी पश्चात्ताप व्यक्त करावा म्हणून. कारण अल्लाह पश्चात्ताप स्वीकारून दया दाखवणारा आहे.

११९) श्रद्धावंत लोकांनो, अल्लाहची भीती बाळगा आणि जे सत्यवान आहेत त्यांना साथ द्या.

१२०) मदीनावासी आणि त्या परिसरातील खेडूत अरबांनी अल्लाहच्या प्रेषिताला सोडून घरी बसणं आणि आपल्या जिवांना त्यांच्या जिवावर प्राधान्य देणं उचित नव्हतं. कारण अल्लाहच्या मार्गात त्यांना तहान

किंवा थकवा आणि भुकेचा जो त्रास होत नाही, आणि ते असं काही करत नाहीत ज्याचा अश्रद्ध लोकांना राग येतो, आणि शत्रुंपासूनते जे काही मिळवतात त्या बदल्यात एका भल्या कर्माची नोंद केली जाते. अल्लाह परोपकारींची कर्मं वाया जाऊ देत नसतो.

१२१) आणि त्यांना कमी-अधिक जो काही खर्चही सोसावा लागतो किंवा त्यांना एखादी दरी पार करावी लागते, या सर्व गोष्टी त्यांच्या नावे लिहून ठेवल्या जातात अल्लाहनं त्यांना त्यांच्या कर्मांचा उत्तम मोबदला द्यावा म्हणून.

१२२) सर्वच्या सर्व श्रद्धावंतांनी एकत्र कूच करावे असं नको. (युद्धासाठी) प्रत्येक तुकडीतून एका गटानं का कूच करू नये, आणि (बाकीच्यांनी) धर्माची शिकवण घ्यावी आणि परतल्यावर त्यांनी आपल्या लोकांस ताकीद करावी.

१२३) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही आपल्याजवळील नाकारणाऱ्यांशी लढा, त्यांना तुमच्यामधील ठामपणा आढळू द्या. आणि लक्षात ठेवा अल्लाह सदाचारी लोकांची साथ देतो.

१२४) जेव्हा एखादा अध्याय अवतीर्ण होतो त्यांच्यामधील काहीजण विचारतात, तुमच्यापैकी कुणाच्या श्रद्धेत वृद्धी झाली? ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली त्यामुळे (अध्यायाच्या अवतरणामुळं) त्यांच्या श्रद्धेत वृद्धी झाली आणि ते त्याचा आनंद साजरा करतात.

१२५) आणि ज्या लोकांच्या मनांमध्ये विकृती आहे त्यांच्या दुष्टपणात आणखीनच दुष्टतेची भर पडते. त्यांना नकारावस्थेतच मरण येणार आहे.

१२६) दरवर्षी एक किंवा दोन वेळा त्यांची परीक्षा घेतली जाते तरीदेखील ते पश्चात्तापही व्यक्त करत नाहीत की कसला धडा घेत नाहीत, ते बोध घेत नाहीत.

१२७) जेव्हा एखादा अध्याय पाठवला जातो तेव्हा ते एकमेकांना पाहू लागतात, तुम्हाला कुणी (मुस्लिम) पाहत तर नाही म्हणून. आणि

नंतर ते बाजूस फिरतात. अल्लाहनं त्यांची मनं वळवली आहेत, ह्या लोकांना समज नसल्यानं.

१२८) तुमच्यामधीलच एक प्रेषित तुमच्याकडं आले. तुम्हाला काही त्रास होणं त्यांना जड जातं. तुमच्या भल्याची त्यांना अत्यंत हाव आहे आणि तो श्रद्धावंतांचा स्नेही आणि कृपावंत आहे.

१२९) तरीदेखील ते मागे फिरलेच तर त्यांना सांगा, अल्लाह मला पुरेसा आहे, अल्लाहव्यतिरिक्त इतर कुणी ईश्वर नाही. मी त्याच्यावरच भिस्त ठेवली, तोच सर्वोच्च सिंहासनाचा स्वामी आहे.

-------

# १०. सूरह यूनुस

**मक्काकालीन, आयती १०९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ, लाम, रा. प्रतिभासंपन्न ग्रंथाची ही वचनं आहेत.

२) लोकांना याचं आश्चर्य वाटतं; आम्ही त्यांच्यामधीलच एका माणसाकरवी दिव्य प्रकटन पाठवलं? त्यानं लोकांना सावध करावं आणि श्रद्धावंतांना खूशखबर द्यावी त्यांच्या विधात्याकडं त्यांचं स्थान श्रेष्ठ असल्याची. अश्रद्ध लोक म्हणाले, ही तर उघड जादू आहे.

३) तुमचा विधाता अल्लाह आहे, ज्यानं सहा दिवसांत अवकाश आणि पृथ्वी निर्माण केली, नंतर तो सिंहासनावर (अर्श) आरुढ झाला. सर्व व्यवस्था हाताळतो. त्याच्या परवानगीशिवाय कुणी कुणाची मध्यस्थी करू शकणार नाही. तो तुमचा विधाता आहे, त्याची भक्ती करा. मग का बरं तुम्ही बोध घेत नाही?

४) तुम्हा सर्वांना त्याच्याकडंच परतावयाचंय. अल्लाहचं वचन सत्य असते. तोच शून्यातून निर्माण करतो आणि मग त्यांची पुनरावृत्ती करतो, ज्या लोकांनी श्रद्धा धारण करून सदाचार अंगीकारला त्यांना त्यांचा न्याय्य मोबदला देण्यासाठी. ज्या लोकांनी विद्रोह अंगीकारला त्यांना उकळते पाणी आणि यातनादायक शिक्षा असेल, कारण ते बंड करत होते.

५) तोच ज्यानं सूर्याला तळपतं वैभव दिलं आणि चंद्रास प्रकाशमान केलं आणि त्याचे टप्पे निश्चित केले. तुम्हाला वर्षाचं गणित करता यावं आणि ते (तारखा) मोजता याव्यात म्हणून. अल्लाहनं हे सर्व हक्कानं निर्माण केलंय. अल्लाह आपली वचनं समंजस लोकांसाठी स्पष्ट करून देतो.

६) निश्चितच रात्र आणि दिवसाच्या फेरबदलांत आणि अवकाश आणि पृथ्वीमध्ये जे काही निर्माण केलंय त्यामध्ये प्रामाणिक लोकांसाठी संकेत आहेत.

७) ज्या लोकांना आमच्याशी गाठ पडण्याची अपेक्षा नाही आणि ह्या जगातल्या जीवनाशीच ते संतुष्ट आणि समाधानी आहेत. आणि जे लोक आमच्या वचनांकडं लक्ष देत नाहीत,

८) अशा लोकांचं ठिकाण नरक आहे; त्यांनी जे कमवलं त्याचं प्रतिफळ.

९) ज्या लोकांना श्रद्धा व्यक्त करून नेक कर्मं केलीत, त्यांचं मार्गदर्शन घडवू. त्यांच्या श्रद्धेमुळं त्यांना ऐश्वर्यसंपन्न स्वर्गांची देणगी आहे ज्यांच्या खालून नद्या वाहतात.

१०) तिथं ते धावा करतील, ईश्वरा तू पवित्र आहेस. एकमेकांचे अभिवादन करताना 'तुम्हाला शांतता लाभो' अशी त्यांची प्रार्थना असेल आणि त्यांच्या प्रार्थनेची सांगता 'सर्व स्तुती साऱ्या विश्वांचा विधाता अल्लाहसाठीच!' अशी असेल.

११) जर अल्लाहस लोकांचं लवकरच वाईट घडवायचं असतं, जसं त्यांना लवकर भलं घडवून घेण्याची इच्छा असते तर त्यांचं आयुष्य केव्हाच संपलं असतं. ज्यांना आमच्या भेटीची अपेक्षा नाही त्यांना आम्ही बंड माजविण्यास सोडून देतो.

१२) जेव्हा माणूस अडचणीत सापडतो तर तो पहुडलेल्या अवस्थेत, बसल्या जागी किंवा उभं असताना आमचा धावा करतो. आणि जेव्हा आम्ही त्याचं ते संकट दूर सारतो तोच तो असा पळत सुटतो, जणूकाही त्याला त्रास होत असताना त्यानं आम्हाला हाकच दिली नव्हती. अशा प्रकारे आम्ही मर्यादा भंग करणाऱ्यांना त्यांची कर्मं आकर्षित करून देतो.

१३) तुमच्या पूर्वीच्या कित्येक वस्त्यांचा आम्ही नाश केला, त्यांच्या अत्याचारांमुळे. त्यांच्याकडं आमचे प्रेषित स्पष्ट संकेत आणले तरी त्यांनी विश्वास केला नव्हता. आम्ही अपराधी लोकांना अशीच शिक्षा देतो.

१४) नंतर आम्ही धरतीवर त्यांच्या जागी तुम्हाला आणलं आहे, तुम्ही कसे आचरण करता ते पाहण्यासाठी.

१५) जेव्हा तुम्ही त्यांना आमची वचनं स्पष्ट करून देता, ज्या लोकांना आमच्या भेटीची अपेक्षा नाही ते म्हणतात, यापेक्षा दुसरा कुरआन आणा किंवा त्यास बदलून टाका. त्यांना सांगा, बदल करणं हे माझं काम नव्हे. माझ्याकडं जे येतं ते सोडून दुसऱ्या कशाचं मी पालन करत नाही. माझ्या विधात्याची अवज्ञा करण्यास त्या मोठ्या दिवसाच्या शिक्षेची मला भीती वाटते.

१६) त्यांना सांगा, जर अल्लाहची इच्छा असती तर मी हे कुरआन तुम्हाला वाचून दाखवलंच नसते की त्याची समज दिली असती. मी पूर्वीपासून तुमच्यामध्ये हयातभर राहिलोय. तुम्हाला हे समजत नाही?

१७) जो अल्लाहविषयी खोटे रचतो आणि त्याच्या वचनांना खोटं लेखतो त्यापेक्षा मोठा अत्याचारी कोण? अपराधी लोक कधी यशस्वी होत नसतात.

१८) आणि अल्लाहला सोडून ते अशांची भक्ती करतात जे त्यांना इजा करू शकत नाहीत की त्यांचा काही लाभ घडवत नाहीत. आणि म्हणतात, हे अल्लाहकडं आमचे मध्यस्थ आहेत. त्यांना विचारा, तुम्ही अल्लाहला ती माहिती पुरवता जी आकाश आणि पृथ्वीत त्याला माहीत नाही. पवित्र आहे तो आणि ज्यांना त्याचे भागीदार ठरवतात त्यांच्यापेक्षा कित्येक पटीनं उच्चतम आहे.

१९) सर्व लोक एका समूहातील होते. मग त्यांनी भेदाभेद केला. आणि तुझ्या विधात्याकडून आधीच शब्द गेला नसता तर ते ज्या बाबतीत मतभेद करत आहेत, त्याचा निर्णय लावला गेला असता.

२०) ते विचारतात, त्याच्या विधात्याकडून त्यांच्यावर एखादा संकेत का आला नाही. त्यांना सांगा, परोक्ष अल्लाहसाठीच आहे. तेव्हा तुम्हीही वाट पाहा. मीदेखील तुमच्याबरोबर वाट पाहत राहीन.

२१) आम्ही लोकांना संकटात टाकल्यानंतर जेव्हा आपल्या कृपेची चव देतो तेव्हा ते आमच्या वचनांमध्ये युक्त्या शोधू लागतात. त्यांना सांगा, प्रतियुक्ती करण्यात अल्लाह अतिशय तत्पर आहे. तुम्ही जे काही कट

कारस्थान करता आमचे दूत त्यांची नोंद करून ठेवतात.

२२) तोच तुम्हाला भूतलावर तसेच समुद्रावर हिंडू देतो, तुम्ही नौकेत स्वार झाल्यावर शुद्ध वारे त्यांना (नौकांना) घेऊन जातात आनंदीत होऊन. आणि नंतर वादळ-वारा येतो आणि सर्व दिशांनी लाटा आल्या, त्यांना कळून चुकलं, आता त्यांना घेरलं गेलंय. म्हणून मग ते अल्लाहचा धावा करतात एकनिष्ठ होऊन, जर तू आम्हाला यातून सावरलं तर आम्ही नक्कीच ऋण व्यक्त करू.

२३) जेव्हा त्यातून त्यांची सुटका झाली तेव्हा ते धरतीवर नाहक अनाचार माजवू लागले. लोकहो, तुमचा द्रोह तुमच्याच जिवांवर बेतणार आहे, या जगातल्या जीवनाची मौज आहे. नंतर तुम्हाला आमच्याकडंच परतावयाचंय. तेव्हा तुम्ही जे काही करत राहिला ते तुम्हाला दाखवून देऊ.

२४) या जगातल्या जीवनाचे उदाहरण म्हटल्यास आकाशातून पाऊस पडल्यानंतर जसं विविध प्रकारच्या वनस्पती येतात, जी माणसं आणि जनावरं खातात, धरती सौंदर्यानं फुलून गेली आणि धरतीवाल्यांनी अशी समज करून घेतली की तिच्यावर ते सामर्थ्य बाळगतात. तोच रात्री अथवा दिवसा आमचा हुकूम झाला आणि आम्ही कापलेल्या ढीगाप्रमाणं तिची अवस्था करून टाकली जसं आदल्या दिवशी ते (वनस्पती) तिथं (उगवल्या) नव्हत्याच. अशा रितीनं आम्ही आमची संकेतं उघड करून देतो लोकांनी विचार विनिमय करावा म्हणून.

२५) अल्लाह शांतता लाभलेल्या घराकडं हाक देतो आणि मर्जीस येईल त्याला रास्त मार्ग दाखवतो.

२६) ज्यांनी भलं केलं त्यांना भलं आहे. आणि त्याहूनही अधिक. त्यांचे चेहरे काळवंडणार नाहीत की तिरस्कारित होणार नाही. अशीच माणसं स्वर्गाचे धनी असतील. तिथं सदाकाळ राहतील.

२७) ज्या लोकांनी कुकर्मं केली असतील त्यांच्यासाठी तसाच वाईट बदला आहे. त्यांचा तिरस्कार होईल. त्यांना अल्लाहपासून कुणी वाचवणार

नाही. त्यांचे चेहरे जणू रात्रीच्या अंधारानं झाकले गेलेत, अशी माणसं नरकाचे धनी आहेत आणि सदैव तिथंच राहतील.

२८) त्या दिवशी आम्ही सर्वांना एकत्र करून ज्यांनी अनेकेश्वरवाद माजवला त्यांना सांगू, तुम्ही आणि तुमचे भागीदार आपापल्या जागी (राहा). मग आम्ही त्यांना विभक्त करू आणि त्यांचे भागीदार म्हणतील, तुम्ही आमची भक्ती करत नव्हते.

२९) आमच्यात आणि तुमच्यामध्ये अल्लाह साक्षीस पुरेसा आहे. आम्ही तुमच्या आराध्यांशी अनभिज्ञ होतो.

३०) प्रत्येक माणूस त्याने जो आगाऊ पाठवलाय त्याचा पडताळा करू शकेल. मग त्यांना त्यांच्या सत्याधिष्ठित स्वामीकडं परतवलं जाईल. आणि जे खोटं ते रचत होते ते सर्व हरवले जातील.

३१) त्यांना विचारा, कोण तुमची आकाशातून आणि धरतीवरून तरतूद करतो, कोण तुमच्या ऐकणं आणि पाहणं यावर सामर्थ्य ठेवतो, मृतातून कोण सजीवास काढतो आणि कोण सजीवातून मृतास बाहेर काढतो? आणि कोण सर्व प्रकरणांचं नियमन करतो. ते सांगतील, 'अल्लाह'. त्यांना विचारा, मग तुम्ही भीती का बाळगत नाही.

३२) हाच अल्लाह आहे तुमचा हक्काचा विधाता. आणि त्या सत्यास सोडलं तर जे उरतं ते खोटं. मग आता तुम्ही का बरं मागं वून जाता?

३३) अशा प्रकारे विद्रोही लोकांच्या बाबतीत तुमच्या विधात्याचा शब्द सिद्ध झाला ते विश्वास करणार नाहीत.

३४) त्यांना विचारा, तुम्ही जे भागीदार ठरवलेत त्यांच्यापैकी कुणी निर्मितीची सुरूवात करून तिची पुनरावृत्ती करणार. त्यांना सांगा, अल्लाह निर्मितीची सुरूवात करतो आणि त्याची पुनरावृत्ती करतो. मग तुम्ही कुठे पळ काढता?

३५) त्यांना विचारा, 'तुमच्या भागीदारांपैकी कुणी रास्त मार्ग सुचवणारा आहे?' आणि सांगा, 'त्यांना अल्लाह रास्त मार्ग सुचवतो.' मग जो

रास्त मार्ग दाखवतो, त्याचंच पालन केलं जावं याचा हक्कदार आहे? अथवा जोपर्यंत त्यास मार्गदर्शन केलं जात नाही, त्याला स्वत:चा मार्ग सुचत नाही तो? तुम्हाला काय झालंय, तुम्ही कसला निर्णय करता?

३६) आणि त्यांच्यामधील बहुतेक जण कल्पनांच्या मागं जातात. आणि अशा (पोकळ) कल्पना सत्याची ओळख करून घेण्यास मुळीच कामी येत नसतात. ते जे करीत आहेत ते सर्व अल्लासह ठाऊक आहे.

३७) अल्लाहशिवाय इतर कुणी हे कुरआन रचू शकतो असं हे (कुरआन) नव्हे. याआधी जे अवतरण झालं त्याची पुष्टी करणारा तसंच ग्रंथांचं विवरण आहे हे सर्व विश्वाच्या विधात्याकडून आहे. यात मुळीच शंका नाही.

३८) त्यांनी (मुहम्मद स. यांनी) हा ग्रंथ रचलेला आहे असं ते म्हणतात? त्यांना सांगा, तुम्ही खरे असाल तर तुम्ही (देखील) यासारखा एखादा अध्याय रचून आणा. या कामी तुम्हाला अल्लाहव्यतिरिक्त ज्यांना ज्यांना बोलवायचं असेल त्यांना बोलवा.

३९) नव्हे जे ज्ञान त्यांच्या आवाक्यात नाही आणि ज्याची वास्तविकता त्यांना पोचली नाही त्यास त्यांनी खोटं ठरवलं. अशाच प्रकारे त्यांच्या आधीच्या लोकांनीही खोटं म्हटलं होतं. बघा, मग अशा अत्याचारींची काय गत झाली ते.

४०) त्यांच्यामधील काहीजण त्यास मान्य करतील तर काहीजण मान्य करणार नाहीत. पण तुझा विधाता अशा अन्यायींना चांगलंच ओळखून आहे.

४१) त्यांनी तुम्हाला खोटं म्हटलं तर त्यांना सांगा, माझी कर्मं माझ्यासाठी आणि तुमची कर्मं तुम्हालाच. मी जे काही करतो त्यासाठी तुम्ही जबाबदार नाही तुमच्या कर्मांशी माझं काहीच देणंघेणं नाही.

४२) त्यांच्यातले काही तुमच्याकडं कान लावून धरतात, मग तुम्ही अशांना ऐकवणार जे बहिरे आहेत? आणि त्यांना काही कळत नसलं तरी?

४३) तसंच त्यांच्यामधील काही लोक तुमच्याकडं टक लावून बघतात, तेव्हा तुम्ही अशा आंधळ्यांना मार्ग दाखवणार त्यांना दिसत नसलं तरी?

४४) निश्चितच अल्लाह माणसांवर काहीएक अत्याचार करत नसतो, पण लोकं स्वत:शीच अन्याय करून घेत असतात.

४५) मग ज्या दिवशी तो सर्वांना एकत्रित करेल, (त्यांना वाटेल) जणू काही ते दिवसातील एक घटकाभरच थांबले होते, ते एकमेकांना ओळखतील. पण ज्यांनी अल्लाहच्या भेटीस खोटं ठरवलं होतं आणि जे कधीही रास्त मार्ग पावणारे नव्हते ते मात्र (सर्वकाही) गमावून बसतील.

४६) आम्ही त्यांना दिलेल्या वचनांपैकी काही तुम्हाला (तुमच्या हयातीतच) दाखवून द्यावं अथवा आम्ही तुम्हांस (जगातून) उठवलं तरी त्यांना आमच्याकडंच एकत्र व्हायचंय. मग ते जे करत राहिले त्यावर अल्लाह साक्षी असेल.

४७) प्रत्येक जनसमूहासाठी एक प्रेषित आहे. आणि मग जेव्हा त्यांचा प्रेषित आला तेव्हा त्यांच्यामध्ये न्यायसंगत निवाडा लावला गेला. त्यांच्यावर अत्याचार केला जात नसतो.

४८) ते विचारतात, मग केव्हा तुमचं वचन पूर्ण होणार, तुम्ही खरं (बोलत) असाल तर?

४९) त्यांना सांगा, अल्लाहची जशी मर्जी असेल, त्यापलीकडं माझ्या हाती माझं काही लाभ घडवून घेणं किंवा हानी पोहोचवणं नाही. प्रत्येक समुदायासाठी एक अवधी निश्चित केलाय. ती वेळ येऊन ठेपेल तेव्हा एका घटकेचाही विलंब होणार नाही की आगाऊ येणार नाही.

५०) पाहा, त्याचा प्रकोप रात्री किंवा दिवसा कोसळला तर तुम्ही काय करणार. मग कशासाठी अपराधी लोकांना घाई आहे?

५१) आणि मग तसं घडलेच तर तुम्ही विश्वास ठेवणार? आता विश्वास करण्यात काय (अर्थ)? (आतापर्यंत तर) तुम्ही घाईच करत होता (त्या

घटनेला नाकारत).

५२) अपराधींना म्हटलं जाईल, आता कायमस्वरूपी शिक्षा भोगा तुम्ही जे कमवत होता त्याचाच मोबदला तुम्हाला दिला जातो.

५३) ते विचारतात, ते सत्य आहे का? म्हणून तुम्ही सांगा, होय, माझ्या विधात्याची शपथ! निश्चितच ते सत्य आहे. तुम्ही त्यास डावलू शकत नाही.

५४) जर प्रत्येक अपराधी व्यक्तीच्या ताब्यात असलेले धरतीवरील सर्वकाही त्यानं मुक्तीसाठी खंडणी म्हणून जरी देण्याचं कबूल केलं तरी (त्यास काही अर्थ नसेल). ते शिक्षेस (समोरासमोर) पाहून आपल्या मनातल्या मनात पश्चात्ताप व्यक्त करतील, पण त्यांचा न्यायसंगत निकाल लावला जाईल. त्यांच्याशी मुळीच अन्याय होणार नाही.

५५) ऐकून घ्या, आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहच्याच मालकीचं आहे. आणि लक्षात ठेवा, अल्लाहनं दिलेला शब्द खात्रीपूर्वक आहे. पण त्यांच्यातल्या बहुतेकांना हे कळंत नाही.

५६) तोच जीवदान देतो आणि तोच प्राण हरवतो. आणि त्याच्याकडंच तुम्ही एकवटले जाणार आहात.

५७) लोकहो! तुमच्या विधात्याकडून उपदेश आलाय. तुमच्या मनांमधील विकृती आहेत त्यांवर उपायकारक अशा. श्रद्धावंतांसाठी मार्गदर्शन नि अनुग्रह म्हणून.

५८) त्यांना सांगा, हे अल्लाहचं वरदान आणि त्याच्या कृपेमुळे आहे. तेव्हा त्याचा आनंद साजरा करा, तुम्ही जी साठवण करून ठेवता त्यापेक्षा हे उत्तम आहे.

५९) त्यांना सांगा, पाहा, अल्लाहनं तुमच्या निर्वाहासाठी जे अवतरलं त्यातून तुम्ही काहींना वैध ठरवता तर काहींना अवैध ठरवता. त्यांना विचारा, अल्लाहनं तसा आदेश दिलाय? अथवा तुम्ही त्यावर खोटं रचता.

६०) आणि अल्लाहवर जे हे लोक खोटं रचतात त्यांचा विचार काय? कयामतच्या दिवशी (त्यांचं काय हाल होणार) निश्चितच अल्लाह लोकांना विपुलता प्रदान करणारा आहे. पण त्यांच्यातले बहुतेक लोक आभार व्यक्त करत नाहीत.

६१) (हे प्रेषित!) तुम्ही कोणत्याही कामात व्यस्त असा, आणि कुरआनातील कोणताही भाग वाचून दाखवा आणि (हे मानवांनो) तुम्ही कुठल्याही कार्यात (गुंतलेले) असा, तुम्ही त्यामध्ये व्यस्त असताना आम्ही तुम्हास पाहत आहोत. आणि पृथ्वी व आकाशामधील कणभरसुद्धा तुमच्या विधात्यापासून लपलेलं नाही. ते कणभर असो की अणूइतकं किंवा प्रचंड असं, सर्वकाही एका स्पष्ट ग्रंथात नोंदवलेलं आहे.

६२) ऐका, अल्लाहचे जे स्नेही आहेत त्यांना कसली भीती नको की दु:खाचं कारण नाही

६३) जे लोक विश्वास ठेवतात आणि सदाचार अंगीकारतात.

६४) त्यांच्यासाठी ह्या जगातल्या जीवनात सुवृत्त आहे. तसंच यानंतरच्या जीवनातदेखील, अल्लाहच्या शब्दांत बदल होत नसतो. हेच मोठं यश आहे.

६५) त्यांच्या म्हणण्यानं तुम्ही दुखावले जाऊ नये. सर्व सन्मान अल्लाहसाठीच आहे. तोच सर्वकाही ऐकणारा आणि जाणीव ठेवणारा आहे.

६६) ऐका, आकाश आणि पृथ्वीतील सारंकाही अल्लाहच्याच मालकीचं आहे. जे अल्लाहव्यतिरिक्त इतर भागीदारांचे पालन करतात ते भ्रामक कल्पनापलीकडं कुणाचं पालन करत नाहीत, ते फक्त अंदाज लावत असतात.

६७) त्यानंच रात्र बनवली तुम्हांस मन:शांती मिळावी म्हणून आणि दिवस (उजाडला) तुम्हाला पाहता यावं म्हणून. या गोष्टींमध्ये ऐकणाऱ्यांसाठी संकेत आहे.

६८) ते म्हणतात, अल्लाहनं पुत्र बनवलं, अल्लाह पवित्र आहे, तो निरपेक्ष

आहे आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही त्याच्यासाठीच (आहेत). तुम्ही अल्लाहच्या बाबतीत असं काही बोलता जे तुम्हाला माहीत नाही आणि तुमच्याकडं कसला पुरावादेखील नाही.

६९) (मुहम्मद स.) त्यांना सांगा, जे लोक अल्लाहच्या बाबतीत खोटंनाटं रचतात त्यांना कधी यश लाभणार नाही.

७०) या जगात त्यांच्यासाठी काही लाभ असेल. नंतर त्यांना आमच्याकडं यावयाचंय. मग आम्ही त्यांना कठोर शिक्षेचा उपभोग देऊ ते जे नाकारत राहिले त्यासाठी.

७१) त्यांना नूह (अ.) यांचं कथन ऐकवा. जेव्हा त्यांनी आपल्या लोकांना सांगितलं, जर माझं तुमच्यामध्ये राहणं आणि तुम्हाला अल्लाहच्या वचनांची शिकवण देणं खटकत असेल तर मी अल्लाहवर विश्वास ठेवतो. तुम्ही आणि तुमचे भागीदार मिळून काय करायचंय ते ठरवा. त्यात कसली उणीव राहू देऊ नका. मला सवड न देता माझ्याविरूद्ध जे काही करायचं असेल ते करून टाका.

७२) तुम्ही जर माघार घेतली तर मी तुमच्याकडून काही मोबदला मागणार नाही. माझा मोबदला तर अल्लाहकडंच आहे. मला आज्ञाधारक बनून राहण्याचा आदेश दिला गेलाय.

७३) त्यांनी त्याला खोटं ठरवलं. मग आम्ही त्याला आणि जे लोक त्याच्या बरोबर नौकेत स्वार होते त्यांना वाचवलं. आम्ही त्याला वारसदार बनवलं. ज्या लोकांनी आमच्या वचनांना खोटं ठरवलं त्यांना बुडवून टाकलं. तेव्हा पाहा, आता त्यांचे काय हाल झाले ज्यांना सावध केलं गेलं होतं.

७४) त्यांच्यानंतर कितीतरी प्रेषित त्यांच्या समुदायाकडं पाठवले. त्यांनी त्यांच्याकडं स्पष्ट प्रमाण आणले तरीदेखील त्यांनी त्या गोष्टीवर विश्वास ठेवला नाही ज्या त्यांनी आधीच धुडकावून लावल्या होत्या. अशा प्रकारे आम्ही अतिरेक माजविणाऱ्यांच्या मनांवर मोहर लावत असतो.

७५) त्यांच्यानंतर आम्ही मूसा (अ.) आणि हारुन यांना फिरऔन आणि त्याच्या प्रमुखांकडं पाठवलं आमच्या वचनांसह, त्यांनी उद्धटपणा केला. आणि ते अपराधी लोक होते.

७६) जेव्हा त्यांच्याप्रत आमच्याकडून सत्य पोहचते, ते म्हणत असतात, ही तर उघड उघड जादू आहे.

७७) मूसा म्हणाले, तुम्ही सत्याविषयी असं म्हणता तुमच्याकडं ते आल्यावर, ही जादू आहे? जादूगार कधी यशस्वी होत नसतात.

७८) तुम्ही आमच्याकडं यासाठी आलात? आम्हाला आमचे वाडवडील ज्या मार्गावर आढळले त्यापासून आम्हास दूर करण्याकरिता? आणि तुला व तुझ्या भावाला या धरतीवर महानता लाभावी म्हणून? आम्ही तुम्हा दोघांना मानणार नाही.

७९) फिरऔन म्हणाला, प्रत्येक वाकबगार जादूगार माझ्याकडं आणा.

८०) जेव्हा सर्व जादूगार आले, मूसा त्यांना म्हणाले, टाका तुम्हाला जे टाकायचं असेल.

८१) त्यांनी ते टाकल्यावर मूसा म्हणाले, तुम्ही जे आणलंय ही (तर) जादू आहे आणि अल्लाह आताच त्याला नाहीसं करून टाकेल. निश्चितच अल्लाह अनाचारी लोकांची कर्मं सुधारत नसतो.

८२) आणि अल्लाह आपल्या आज्ञेनं सत्य सिद्ध करील जरी ते अपराधींना आवडत नसलं तरी.

८३) तेव्हा मूसावर कुणी विश्वास ठेवला नाही त्यांच्या लोकांमधील काही तरुणांना वगळून. कारण त्यांना फिरऔन आणि त्याच्या सरदारांकडून भीती होती. त्यांचा ते छळ करतील म्हणून. खरोखरच धरतीवर फिरऔन उद्धट झालेला होता. त्याने सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या.

८४) मूसा म्हणाले, लोकहो! जर तुमची अल्लाहवर श्रद्धा असेल आणि तुम्ही आज्ञाधारक असाल तर मग त्याच्यावर विश्वास ठेवा.

८५) त्यांनी उत्तर दिलं, आम्ही अल्लाहवरच भिस्त ठेवली. तेव्हा अत्याचारी

लोकांना आमचा बळी देऊ नका.

८६) आणि तुझ्या कृपेनं अश्रद्ध लोकांपासून आमची सुटका कर.

८७) आम्ही मूसा आणि त्याच्या भावास कळवलं, आपल्या लोकांसाठी इजिप्तमध्ये घरादारांची तरतूद करा आणि आपली घरांची दिशा किबल्याकडं (उपासनेच्या दिशेनं) राहू द्या. नमाज कायम करा आणि श्रद्धावंतांना खूशखबर द्या.

८८) आणि मूसा म्हणाले, हे विधाता! तू खरोखरच फिरऔन आणि त्याच्या प्रमुखांना या जगातील जीवनात जे ऐश्वर्य आणि संपत्ती दिलीस ती तुझ्या मार्गापासून त्यांनी (इतरांची) दिशाभूल करावी म्हणून का? हे विधाता! त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट लाव आणि त्यांच्या मनांवर मोहर लावून टाक. ते कठोर शिक्षा पाहत नाहीत तोवर त्यांनी विश्वास ठेवू नये.

८९) त्यानं (अल्लाहनं) सांगितलं, तुझा धांवा स्वीकारला. तेव्हा आता तुम्ही ठाम उभं राहा. ज्यांना कळत नाही अशांची वाट धरू नका.

९०) आम्ही इस्राईलच्या संततीला समुद्रपार नेलं. पण फिरऔन आणि त्याच्या लष्करानं उद्दामपणे आणि त्वेष बाळगत त्यांचा पाठलाग केला. आणि जेव्हा फिरऔन समुद्रात बुडू लागला, तोच त्यानं उद्गारलं, 'मी विश्वास करतो, इस्राईलच्या संततीनं ज्याची श्रद्धा बाळगली त्याशिवाय कुणी ईश्वर नाही. मी आज्ञा पाळणाऱ्यांमधला आहे.'

९१) आता? (विश्वास ठेवतोस?) पूर्वी तर तू बंड करत राहिलास आणि अनाचार माजविणाऱ्यांपैकी होतास.

९२) आज आम्ही तुझ्या देहास जतन करून ठेवू. तुझ्यानंतर येणाऱ्या लोकांना एक (बोध) चिन्ह म्हणून तू उरावे यासाठी. (तरीदेखील) बहुतेक लोक आमच्या संकेतांकडं दुर्लक्ष करतात.

९३) आम्ही इस्राईलच्या संततीला वास्तव्यासाठी ठिकाण दिलंय, चांगल्यापैकी असं ठिकाण. आणि पाक वस्तूंची त्यांच्या उपजीविकेची

तरतूद केली. जोवर त्यांना ज्ञान मिळालं नव्हतं त्यांनी वाद घातला नव्हता. तुमचा विधाता निश्चितच कयामतच्या दिवशी त्यांचा निकाल लावणार आहे, ज्या बाबींमध्ये त्यांनी वाद घातला होता.

९४) आम्ही तुमच्याकडं जे अवतरित केलं त्यामध्ये तुम्हाला शंका असेल तर जे लोक तुमच्या आधीच्या ग्रंथांचं वाचन करत असतात त्यांना विचारा. तुमच्या विधात्याकडून सत्य तुमच्यापर्यंत पोहोचलंय. तेव्हा आता संशयात गुरफटत राहू नका.

९५) तसंच ज्या लोकांनी अल्लाहच्या वचनांना खोटं ठरवलं त्यांच्यासारखं होऊ नका. (तसं केल्यानं) तुम्हीही अपयश ओढवून घेणारे व्हाल.

९६) ज्या लोकांविषयी तुमच्या विधात्याचे शब्द खरे ठरलेत ते श्रद्धा बाळगणार नाहीत.

९७) त्यांच्याकडं सर्वचे सर्व संकेत आले तरी. ती कठोर शिक्षा (समक्षच) पाहतात तोवर.

९८) यूनुसच्या वस्तीतील लोकांना वगळता इतर कोणत्याही वस्तीवाल्यांनी का बरं विश्वास ठेवला नाही? त्यांच्या श्रद्धेमुळं त्यांचा लाभच घडला असता. त्यांनी श्रद्धा बाळगल्यावर आम्ही या जगातल्या जीवनातील अपमानजनक शिक्षा टाळली आणि एका अवधीपर्यंत त्यांना फायदाच मिळवून दिला.

९९) तुझ्या विधात्याची तशी इच्छा असती तर धरतीवरील सर्वच्या सर्व लोकांनी श्रद्धा बाळगली असती. तू लोकांना श्रद्धा धारण करण्यास भाग पाडशील?

१००) अल्लाहच्या आज्ञेशिवाय कोणीही श्रद्धा धारण करत नाही. आणि ज्या लोकांना कळत नाही त्यांना तिरस्कारीत लोटून देतो.

१०१) त्यांना सांगा, आकाश आणि पृथ्वीत काय काय आहे. पण हे संकेत आणि अशा सूचना अश्रद्ध लोकांच्या काही कामी येत नसतात.

१०२) मग यांना कशाची अपेक्षा आहे? त्याच्या आधी घडलेल्या घटनांची?

त्यांना सांगा, मग तुम्ही वाट पाहा आणि तुमच्याबरोबर मीही वाट पाहीन.

१०३) आम्ही आमच्या प्रेषितांना आणि ज्यांनी विश्वास ठेवला त्यांना अशा प्रकारे वाचवतो. श्रद्धावंतांना आम्ही वाचवून घेऊ, त्यांचा आमच्यावरचा तो हक्क आहे.

१०४) त्यांना सांगा, तुम्हाला माझ्या धर्माविषयी शंका असेल तर तुम्ही अल्लाहला वगळून ज्या कुणाची भक्ती करता, मी त्यांची भक्ती करणार नाही. मी तर त्या अल्लाहची भक्ती करतो जो तुम्हाला मरण देतो. श्रद्धावंतांपैकी असण्याची मला आज्ञा दिली गेलीय.

१०५) आणि एकाग्रतेनं धर्माकडं दिशा रोखून ठेवण्यास आणि कधीही अनेकेश्वरींपैकी होऊ नये (म्हणून).

१०६) आणि अल्लाहला सोडून मी अशांचा धावा करू जे माझं काही भलंही करू शकत नाहीत की वाईटही करू शकत नाहीत. जर तू तसं केलंस तर अत्याचारी होऊन जाईल.

१०७) आणि अल्लाहनं जर काही इजा पोहोचवली तर तिच्यावर कुणी उपचार करणार नाही. आणि जर त्याला तुमचं भलं करायचं झाल्यास कुणी त्याचं वरदान रोखून धरणार नाही. आपल्या भक्तांपैकी इच्छिल त्याला तो वरदानित करतो. तो क्षमा करणारा कृपावंत आहे.

१०८) (मुहम्मद स.) त्यांना सांगा, लोकहो! तुमच्या विधात्याकडून तुम्हांस सत्य पोचलंय. ज्याला मार्गदर्शन लाभलं ते त्याच्या स्वत:साठीच. आणि जो मार्गभ्रष्ट झाला त्याचं भरकटणं त्याच्याकरिताच वाईट आहे. माझा तुमच्यावर काही अधिकार नाही.

१०९) तुमच्याकडं जे पाठवलं गेलंय त्याचं पालन करा आणि अल्लाहचा निर्णय येईपर्यंत धीर धरा. तो चांगला निर्णय लावणारा आहे.

-------

# ११. सूरह हूद

**मक्काकालीन, आयती १२३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ, लाम, रा. हा ग्रंथ आहे ज्याची वचनं परिपक्व आहेत, आणि एका विद्वत्ताप्रचूर आणि सर्वज्ञाकडून ती स्पष्ट केलेली आहेत.

२) यास्तव की अल्लाहव्यतिरिक्त कुणाची भक्ती करू नका. निश्चितच मी त्याच्याकडचा ताकीद देणारा आणि खूशखबर देणारा आहे.

३) तुमच्या विधात्यापाशी तुम्ही क्षमायाचना करा नि पश्चात्ताप व्यक्त करा, तो तुमचं भलं करील. सुंदर असं भलं. एका ठराविक काळापर्यंत आणि गुणवत्तेनुसार आणखीही विपुल देईल, पण जर तुम्ही मात्र फिरलात तर मला त्या मोठ्या दिनी शिक्षेची भीती वाटते.

४) कारण तुम्हांस अल्लाहकडंच परतावयाचंय आणि प्रत्येक बाबीवर त्याचं सामर्थ्य आहे.

५) पाहा, ते आपली आपली छाती कशी फुगवतात अल्लाहपासून लपवण्याकरिता. पण लक्षात घ्या, जेव्हा ते लोक कपडे घालतात तेव्हा ते काय लपवितात आणि उघड करतात ते त्याला माहीत आहे. कारण तो मनांमधील (गोष्टी) सुद्धा जाणतोय.

**पारा - १२**

६) पृथ्वीमध्ये वावरणारा एकही प्राणी असा नाही ज्याच्या उपजीविकेची जबाबदारी अल्लाहवर नाही. त्यांचं ठिकाणही त्याला ठाऊक आहे. आणि शेवटी त्याला कुठं पुरवलं जाईल हे सर्व एका उज्ज्वल ग्रंथात नोंदवलंय.

७) तोच आहे ज्यानं आकाश आणि पृथ्वीची निर्मिती सहा दिवसांत केली. त्याचं सिंहासन पाण्यावर होतं. तुमच्यामध्ये कोणाचं आचरण उत्तम आहे हे पाहण्यासाठी. जर तुम्ही त्यांना म्हणाल, मृत्युनंतर तुम्हाला

परत उठवलं जाईल, तेव्हा ज्या लोकांना नाकारलंय. ते म्हणतील, ही तर उघड जादू आहे.

८) आणि आम्ही ठराविक मुदतीपर्यंत त्यांच्यावरची शिक्षा रोखून ठेवली तर ते म्हणतील, ती का लांबवली गेली? लक्षात ठेवा, ज्या दिवशी ती येईल मग ती टळणार नाही. आणि ज्याची ती टिंगल उडवित होते ती त्यांना वेढून टाकील.

९) आम्ही माणसांना एकदा आमच्या कृपेची चव देऊन मग ती हिरावून घेतल्यास तो निराश होऊन कृतघ्न होतो.

१०) आणि जर त्यास संकटानंतर काही भल्या देणगीचा उपभोग दिल्यास तो लगेच म्हणतो, माझं सर्व विघ्न संपलं. आणि मग आनंदाच्या गुर्मीत मग्न होतो.

११) पण संयमानं वागत सत्कर्मं करणाऱ्या लोकांकरिता क्षमा आणि उत्तम असा मोठा मोबदला आहे.

१२) तेव्हा तुम्ही पाठवलेल्या अनुभूतींचा काही भाग वगळणार? तुमच्या मनाला ते अस्वस्थ वाटते म्हणून? ते लोक म्हणतात, "त्याच्यावर एखादा खजिना का बरं अवतरला नाही किंवा एखादा देवदूत त्याच्यासोबत का नाही आला?" नव्हे तुम्ही तर फक्त ताकीद देणारे आहात. अल्लाह सर्व बाबी हाताळणारा आहे.

१३) तुम्ही हे (कुरआन) स्वत: रचलेलं आहे असे ते म्हणतात? त्यांना सांगा, तुम्ही खरं असाल तर अशा प्रकारची दहा वचनं रचून आणा आणि अल्लाहस सोडून वाटेल त्यांना तुमच्या मदतीसाठी बोलवून घ्या.

१४) जर त्यांनी तुमच्या आवाहनास प्रतिसाद दिला नाही, तेव्हा जाणून घ्या हे अल्लाहच्या ज्ञानाने अवतरलेला आहे, त्याच्याशिवाय कोणी ईश्वर नाही, मग नाही का तुम्ही शरण येणार?

१५) कुणाला या जगातलं जीवन आणि ऐश्वर्यच हवं असेल तर आम्ही

त्यांची कर्मं (कर्मांचा मोबदला) इथंच पूर्ण करू आणि त्यात कसली उणीव केली जाणार नाही.

१६) अशा लोकांना परलोकात नरकाग्नीपलीकडं काहीच (मिळणार) नाही. आणि त्यांनी इथं घडवलं ते सारं फोल ठरणार. तसंच जी काही कामं त्यांनी केली (असतील) ती व्यर्थ जाणार.

१७) अशा माणसाची (तुलना त्यांच्याशी कशी?) जो आपल्या विधात्याचे स्पष्ट प्रमाण बाळगतो, त्याच्याकडचा तो साक्षी आहे, आणि तो त्यांना वाचून दाखवतो, त्या आधी मूसाचा ग्रंथ होता, कृपा आणि मार्गदर्शनासाठी. असेच लोक त्यावर श्रद्धा ठेवतात. आणि त्यांच्यामधून जे नाकारतील त्यांचं ठिकाण नरकाग्नी असेल, यात मुळीच शंका नही. निश्चितच हे तुझ्या विधात्याकडून आलेलें सत्य आहे, पण बरेच लोक मान्य रत नाहीत.

१८) अल्लाहवर खोटं रचणाऱ्यांपेक्षा अधिक अत्याचारी कोण? ही मंडळी त्यांच्या विधात्यासमोर हजर केली जाईल आणि साक्षी देणारी म्हणतील, ह्याच लोकांनी आपल्या विधात्याविषयी खोटं (आरोप) म्हटलं होतं. ऐका, (या) अपराधींवर अल्लाहच धिक्कार आहे.

१९) जे लोक अल्लाहच्या मार्गात अडथळे उभारतात आणि त्यास (मार्गास) वाकडे करून पाहतात, हेच ते ज्यांनी परलोक नाकारलं.

२०) हे लोक धरतीवरील (अल्लाहची योजान) उधळून लावणार नाहीत त्यांच्यासाठी अल्लाहव्यतिरिक्त इतर कोण वाली नाही. त्यांची शिक्षा दुप्पट केली गेली, ते ऐकण्याच्या स्थितीत नाहीत की त्यांना दिसतही नाही.

२१) अशाच लोकांनी स्वत:चा घात करून घेतला आणि जी काही लबाडी ते रचत असत तेही गमवून बसले.

२२) ते परलोकातदेखील सर्वस्व गमावून बसतील यात शंकेस वाव नाही.

२३) ज्या लोकांनी श्रद्धा बाळगत सत्कर्मं केलीत आणि आपल्या विधात्याकडं

विनवणी केली, असे लोक स्वर्गाचे धनी असतील आणि सदैव तिथं राहतील.

२४) ह्या दोन गटांचं उदाहरण. एक बहिरा आणि आंधळा तर दुसरा पाहतो आणि ऐकतोही, असे दोघे सारखेच आहेत काय? तुम्ही (याकडं) लक्ष देणार नाही?

२५) आम्ही नूह यांना त्यांच्या लोकांकडं पाठवलं (नूह म्हणाले) निश्चितच मी तुम्हांस स्पष्ट ताकीद देणारा आहे.

२६) अल्लाहशिवाय कुणाची भक्ती करू नका. मला तुमच्या बाबतीत त्या दिवसाच्या यातनादायक शिक्षेची भीती लागून आहे.

२७) त्यांच्या लोकांमधील प्रमुखांनी त्यांना नाकारलं होतं. म्हणाले, तुम्ही आम्हांस आमच्यामधील एका माणसासारखंच दिसता आणि आम्हाला दिसत नाही कुणी तुमचं पालन केलं असेल, ते आमच्यामधील जे खालच्या स्तराचे लोक त्यांना वगळून, तेही वरकरणी आणि आम्हाला तुम्हांस आमच्यावर तुमचे काही श्रेष्ठत्व आहे असे दिसत नाही. आमच्या मते तर तुम्ही खोट्या (लोकां) पैकी आहात.

२८) ते (नूह) म्हणाले, माझ्या लोकांनो तुम्ही पाहा, जर मी माझ्या विधात्याकडून एक स्पष्ट प्रमाणानिशी आहे आणि त्यानं मला आपल्या कृपेनं नवाजलेलं आहे हे तर तुम्हांस दिसत नसेल. आणि जर तुम्हाला ते आवडत नसेल तर आम्ही बळजबरीनं तुम्हांस मान्य करायला लावू?

२९) माझ्या लोकहो, मी त्यासाठी तुमच्याकडून कसली संपत्ती मागत नाही. माझा मोबदला तर अल्लाहपाशीच आहे आणि ज्यांनी होकार दिला (श्रद्धा बाळगली) मी त्यांना हाकलून देणार नाही. ते आपल्या विधात्याची भेट घेणार आहेत. पण मला दिसतं तुम्ही तर अडाणी लोक आहात.

३०) आणि माझ्या लोकहो, मी जर त्यांना परतवलं तर मला अल्लाहकडून कोण वाचवील, तुम्ही (याकडं का) लक्ष देत नाही?

३१) मी तुम्हाला असं म्हणत नाही की माझ्याकडं अल्लाहचे खजिने आहेत. मला परोक्षाच्या गोष्टी माहीत नाहीत की मी काही देवदूतदेखील नाही. आणि तुमच्या नजरेत जे तुच्छ आहेत त्यांना अल्लाह काही भलं देणार नाही असंही मी सांगत नाही. त्यांच्या मनात जे आहे ते अल्लाहला ठाऊक आहे. मी जर तसं म्हणालो तर नक्कीच अपराधींपैकी असेन.

३२) ते लोक नूहला म्हणाले, तू आमच्याशी वाद घातलास आणि तो बराच लांबविला. तू जर खरा असशील तर ज्या शिक्षेविषयी तू आम्हांस धाक घालतो ती घेऊनच ये.

३३) ते (नूह) म्हणाले, त्याची इच्छा झाल्यास अल्लाहच तो (काय) तुम्हास (शिक्षा) आणील. तुम्ही त्याला उधळून लावू शकणार नाही.

३४) तुम्हाला सल्ला द्यावासा जरी मला वाटत असेल तर माझी शिकवण तुम्हाला फायदा पोचवणार नाही. जर अल्लाहनंच जर तुम्हाला भरकटत ठेवायचं ठरवलं असेल तर. तोच तुमचा विधाता आहे. त्याकडंच तुम्ही परतणार आहात.

३५) मी ते (कुरआन) रचून आणलं असं त्यांना म्हणायचंय त्यांना सांगा, मी जर ते रचलं असेल तर तो दोष माझा, पण तुम्ही जे अपराध करताहेत त्याच्याशी माझा काही संबंध नाही.

३६) आणि मग नूह यांना अनुभूतीद्वारे कळवण्यात आलं, ज्यांनी विश्वास ठेवला त्यांना सोडून तुमच्या लोकांमधून कुणी श्रद्धा बाळगणार नाही, तेव्हा ते जे करत आहेत त्यामुळे दु:खी होऊ नकोस.

३७) आम्ही कळवतो त्यानुसार आमच्या समोर ती एक नौका बांध. आणि ज्या लोकांनी अपराध केलाय त्यांच्या वतीनं आम्हांस काही बोलू नकोस. कारण लवकरच ते बुडणार आहेत.

३८) आणि ते नौका बांधत होते तेव्हा तिकडून नूहच्या लोकांचे प्रमुख जात असता त्यांची चेष्टा करीत. ते (नूह) म्हणाले, (आज जरी) तुम्ही आमच्यावर हसत असले तरी तुम्ही जशी आमची चेष्टा करता तशीच आम्हीदेखील तुमची टिंगल उडवू.

३९) कोणावर प्रकोप कोसळतो आणि कोणाची नामुष्की होईल. ते लवकरच तुम्हांस कळून चुकेल तो त्यांच्यावर कायमचा कोसळणार आहे.

४०) सरतेशेवटी आमचे आदेश आले नि भट्टी उफाळून निघाली. आम्ही सांगितलं (नूहना) त्या (नौकेमध्ये) प्रत्येकाची (प्राण्याची) एक एक जोडी नर आणि मादी ठेवा, तसंच आपल्या घराची मंडळी. पण ज्यांच्याविषयी (बुडण्याचा) आदेश झालेला आहे (त्याला सोडून). आणि ज्यानं श्रद्धा धारण केली त्यांनाही (नौकेत घ्या) पण त्यांच्यावर थोड्या लोकांना सोडून कुणी विश्वास टाकला नव्हता.

४१) त्यांनी म्हटले, तुम्ही त्यावर (नौकेवर) चढा. अल्लाहच्याच नावानं ती चालेल आणि थांबेल. माझा विधाता अतिशय कृपावंत व क्षमाशील आहे.

४२) आणि ती नौका त्यांना घेऊन पर्वतासमान लाटांवर तरंगत राहिली. काही अंतरावर थांबलेल्या आपल्या मुलास नूहनं हाक दिली. हे मुला, आमच्याबरोबर यात स्वार हो, नाकारणाऱ्यांच्या सांगत राहू नकोस.

४३) त्यानं उत्तर दिलं, मी एखाद्या पर्वतावर आसरा घेईन. तो मला पाण्यापासून वाचवील. नूह म्हणाले, अल्लाहच्या हुकुमाशिवाय आज कुणी वाचविणार नाही. ज्याच्यावर त्याची कृपा होईल त्यास वगळून (इतक्यातच) त्यांच्यामध्ये लाट आली आणि तो बुडणाऱ्यांमध्ये वाहून गेला.

४४) आणि मग (अल्लाहचा) आदेश आला, हे धरती! तुझं पाणी गिळून टाक. हे आकाश आता पुरे. पाणी ओसरलं आणि सर्व प्रकरण संपून गेलं. आणि ती (नौका) जूदी पर्वतावर आदळली. आणि म्हटलं गेलं अपराधी लोकांनी दूरच राहावं.

४५) आणि नूहनं आपल्या विधात्यास हाक दिली. माझ्या विधाता, माझा मुलगा माझ्या कुटुंबापैकीच आहे. तुझं वचन सत्य असते. तू न्याय देणाऱ्यांमध्ये सर्वोत्तम न्याय देणारा आहेस.

४६) त्यानं (अल्लाहनं) सांगितलं, हे नूह! तो तुझ्या कुटुंबापैकी नाही,

कारण त्याची वागणूक रास्त नाही. मला अशा गोष्टी विचारू नकोस ज्याविषयीची तुला माहिती नाही. मी तुला शिकवण देतो. तू अडाणी लोकांमधील होऊ नकोस.

४७) ते म्हणाले, माझ्या विधाता! मी तुझा आसरा मागतो, मी तुला असे प्रश्न करू नये ज्यांची मला माहिती नाही. तू जर मला क्षमा केले नाहीस, मला दया दाखवली नाहीस तर ते मला घातक ठरेल.

४८) सांगितलं गेलं, हे नूह! खाली उतरा आमच्या सुरक्षेने आणि आणि समृद्धी प्राप्त होऊन तू आणि जे लोक तुझ्या सोबत आहेत त्यांना आणि काही इतर लोकांना आम्ही लवकरच (या जगात) लाभ देऊ. नंतर त्यांना आमच्याकडून यातनादायक शिक्षा मिळेल.

४९) तुम्ही पाहिल्या - ऐकल्या नाहीत (परोक्ष) त्या घटनांचा हा वृत्तान्त आम्ही तुम्हांस कळवतो. याआधी तुम्हाला तसंच तुमच्या लोकांना यांची माहिती नव्हती. संयम पाळा. शेवटी सदाचारी लोकच उत्कर्ष पावतील.

५०) आणि आम्ही आद (च्या लोकांकडं) त्यांचे बंधु हूद यांना पाठवलं. ते म्हणाले, माझ्या लोकहो! अल्लाहची उपासना करा. त्याच्याव्यतिरिक्त तुमचा कुणी ईश्वर नाही. तुम्ही फक्त खोटं रचत आहात.

५१) माझ्या लोकांनो, मी त्यासाठी तुमच्याकडं काही मागणी घालत नाही. माझा मोबदला तर मला ज्यानं निर्माण केलंय त्याच्यावरच आहे हे कळत नाही का तुम्हांस?

५२) माझ्या लोकहो, आपल्या विधात्याकडे क्षमायाचना करा. त्याच्याकडं वळा, तोच आकाशातून विपुल वर्षाव करील आणि तुम्हांस अधिक बळ देईल आणि पापी बनून त्याच्याकडे तोंड फिरवू नका.

५३) ते म्हणाले, हूद! तुम्ही कोणतं प्रमाण घेऊन आमच्याकडं आला नाहीत, तुमच्या सांगण्यावरून आम्ही काय आपल्या देवांना सोडणार नाहीत की आम्ही तुझ्यावर विश्वास टाकणार नाही.

५४) आम्ही तर म्हणतो, आमचा एखाद्या देव वाईट रितीनं तुला संचारलाय. ते (हूद) म्हणाले, मी अल्लाहची साक्ष देतो. तुम्हीही साक्षी राहा. ज्यांना तुम्ही भागीदार करता त्यांच्याशी माझा कसलाही संबंध नाही.

५५) त्याच्याव्यतिरिक्त, तेव्हा तुम्ही सर्व माझ्याविरूद्ध जे काही कारस्थान करत आला ते करा, मला मुळीच उसंत देऊ नका.

५६) माझा भरवसा तर माझा आणि तुमचा विधाता अल्लाहवरच आहे. कोणी प्राणी असा नाही ज्याची बट त्याने धरलेली नाही. माझा विधाता निश्चितच सरळमार्गावर आहे.

५७) तुम्ही जर त्याच्याशी तोंड फिरवलं तरी माझ्याबरोबर जे पाठवलं होतं ते मी तुम्हांस पोचतं केलं. माझा विधाता तुमच्या जागी दुसऱ्या समूहास आणील आणि तुम्ही त्याचं काहीएक वाईट करू शकणार नाही. माझा विधाता नक्कीच सर्व बाबींची सुरक्षा करतो.

५८) आणि जेव्हा आमचा आदेश आला, आम्ही आमच्या कृपेनं हूद आणि त्याच्याबरोबर ज्या लोकांनी श्रद्धा बाळगली त्यांना वाचवलं आणि कठोर अशा शिक्षेनं त्यांची सुटका केली.

५९) तर हे आहेत आद (चे लोक) त्यांनी आपल्या विधात्याची वचनं नाकारली, त्याच्या प्रेषितांची अवज्ञा केली आणि हरेक उद्धट बंडखोरांच्या आज्ञा पाळल्या.

६०) म्हणून या जगात आणि कयामतच्या दिवशी एक तिरस्कार त्यांच्या मागावर लावून दिला. लक्षात घ्या, आद (च्या लोकांनी) आपल्या विधात्याला नाकारलं. ऐकून घ्या, हूद यांच्या समूहातील आद लोकांचा हा तिरस्कार होय.

६१) समूदकडं त्यांचे बंधु सॉलेह यांना (पाठवलं). ते (सॉलेह) म्हणाले, माझ्या लोकहो, अल्लाहची भक्ती करा. त्यास सोडून इतर कोण तुम्हांस ईश्वर नाही. त्यानं तुम्हांस जमिनीतून उभं केलं आणि तिच्यामध्येच वसवलं तेव्हा तुम्ही त्याशी क्षमायाचना करा. त्याकडं वळा. कारण माझा विधाता स्वीकारण्यास जवळच असतो.

६२) ते (लोक) म्हणाले, सॉलेह, पूर्वी तू आमच्या आशा-आकांक्षांचा केंद्रबिंदू होतास आणि तूच आम्हास आता मनाई करतो. आम्ही त्याची भक्ती करू नये ज्यांची भक्ती आमचे वाडवडील करत आलेत? तू ज्याच्याकडं आम्हांस बोलवतो त्याबाबतीत आम्हाला मोठी शंका आहे.

६३) ते (सॉलेह) म्हणाले, तुम्ही पाहताय का? माझ्याकडं माझ्या विधात्याचे स्पष्ट प्रमाण असते आणि त्यानं मला आपली कृपा केली असती, मी जर त्याची अवज्ञा केली तर माझ्या मदतीस (बचावासाठी) कोण येणार? तुम्ही माझ्या विनाशात भर घालण्यापलीकडं काही करत नाही.

६४) माझ्या लोकहो, ही अल्लाहची उंटीण आहे. तिला धरतीवर चरण्यास सोडून द्या. वाईट हेतूने तिला हात लावू नका. नसता लवकरच तुम्हांस शिक्षा घडेल.

६५) पण त्यांनी तिची धोंडशीर कापून टाकली. तेव्हा (सॉलेह) म्हणाले, आता तुम्ही तीन दिवस आपल्या घरांत वावरून घ्या. हे वचन फोल ठरणार नाही.

६६) आणि आमचा आदेश येताच आम्ही आमच्या कृपेनं सॉलेह आणि त्यांच्याबरोबर विश्वास ठेवणाऱ्यांना त्या दिवशी घडणाऱ्या निंदेनं वाचवलं. निश्चितच तुमचा विधाता शक्तीशाली आणि प्रभुत्वसंपन्न आहे.

६७) ज्यांनी अपराध केला त्यांना एका कर्कश आवाजानं धरून घेतलं. पहाट झाली आणि ते आपल्या घरांमध्ये तोंडघशी पडले.

६८) जणू ते कधी इथं राहतच नव्हते असं. लक्षात राहू द्या. समूदच्या लोकांनी आपल्या विधात्याशी बंड केलं. ऐका, आम्ही समूदच्या लोकांना धिक्कारलं गेलं.

६९) आमचे दूत इब्राहीमकडं सुवार्ता घेऊन आले. त्यांनी सलाम म्हटला. इब्राहीमनी (उत्तरादाखल) सलाम म्हटले. त्यांनी उशीर न लावता एक भाजलेलं वासरू आणलं.

७०) त्यांनी जेव्हा पाहिलं ते आपले हात त्याकडे (खाण्यासाठी) पुढे करत नाहीत. त्यांना संभ्रम झाला आणि भीती वाटली. ते (देवदूत) म्हणाले, भिऊ नकोस. आम्हांस निश्चितच लूतच्या लोकांकडं पाठवलं गेलंय.

७१) त्यांची पत्नी तिथं उभी होती. ती हसू लागली. आम्ही त्यांना इसहाकची खूशखबर दिली आणि इसहाकनंतर याकूबची (सुद्धा).

७२) ती म्हणाली, कायतरीच काय! मला मूल धरता येईल? मी वृद्ध असता आणि माझे पतीदेखील वृद्ध आहेत. अजबच ही गोष्ट!

७३) ते म्हणाले, अल्लाहच्या निर्णयाचं नवल वाटते? (इब्राहीमचे) कुटुंब! तुम्हांस अल्लाहची कृपा आणि त्याची धन्यता लाभो. तो प्रशंसेस पात्र आणि गौरवशाली आहे.

७४) मग जेव्हा इब्राहीम (अ.) यांना होत असलेली भीती नाहीशी झाली आणि त्यांना खूशखबर मिळाली तेव्हा ते लूत (अ.) च्या लोकांतर्फे आमच्याशी वाद घालू लागले.

७५) इब्राहीम खरंच सहनशील आणि कोमल मनाचे, आणि (अल्लहकडं) वळणारे होते.

७६) "इब्राहीम, आता (असलं विचार) सोडून द्या. तुझ्या विधात्याचा आदेश आलाय. आणि त्यांची शिक्षा टळणार नाही, ती येणारच.

७७) आमचे दूत लूत यांच्याकडं आल्यावर त्यांना पाहून ते दु:खी झाले. त्यांच्या हृदयकळा उठल्या आणि म्हणाले, हा सक्तीचा दिवस आहे.

७८) त्यांचे लोक धावत त्यांच्याकडं पोहचले. आधीपासूनच ती लोकं वाईट कामं करीत. ते म्हणाले, माझ्या लोकांनो, माझ्या मुली आहेत तुमच्यासाठी शुद्ध, अल्लाहची भीती बाळगा. माझ्या पाहुण्यांदेखत माझा अपमान करू नका. तुमच्यामध्ये एकही सदाचारी माणूस नाही?

७९) ते लोक म्हणाले, तुला माहीत आहे, तुझ्या मुलींची आम्हाला गरज नाही. आम्हाला काय हवंय तुला चांगलं ठाऊक आहे.

८०) ते (लूत) म्हणाले, तुम्हाला आवरण्याइतकी माझ्यात शक्ती असती

अथवा माझा पाया भक्कम असता!

८१) ते (देवदूत) म्हणाले, आम्ही तुझ्या विधात्याकडून पाठवले आहोत. ते काही करता तुझ्याजवळ पोचणार नाहीत. तुम्ही आपल्या घरच्यांना घेऊन रातोरात निघून जा. तुमच्या पत्नीस वगळता इतर कोणी मागे वळून पाहायचं नाही. त्यांना जे भोगायचंय ते भोगणारच. निश्चितच पहाटेची वेळ ठरलेली आहे. आणि पहाट आता जवळच नाही का?

८२) आमचा आदेश येताच आम्ही त्यांची उलथापालथ केली. भाजलेल्या मातीच्या दगडांचा त्यांच्यावर एकावर एक वर्षाव केला.

८३) तुझ्या विधात्याकडे (यासाठी) हे निश्चित केलेले होते आणि हे अपराध्यांपासून दूर नव्हते.

८४) आणि मदयनकडं त्यांच्या बांधवांमधून शुऐब यांना (पाठवलं). ते म्हणाले, माझ्या लोकहो! अल्लाहची भक्ती करा. त्याशिवाय तुमचा कोणी ईश्वर नाही आणि माप-वजनांत कसर ठेवू नका. मी पाहतो, तुम्ही भरभराटीत आहात. म्हणूनच मला तुम्हांस वेढून टाकणाऱ्या प्रकोपाची भीती वाटते.

८५) लोकहो, माप-वजन न्याय्य रितीनं पुरेपूर द्या. लोकांना त्यांच्या वस्तू कमी करून देऊ नका. धरतीवर अनाचार माजवित फिरू नका.

८६) तुमच्यासाठी अल्लाहनं तुमच्यासाठी जे शेष ठेवलंय ते तुम्हांस उत्तम आहे जर तुम्ही श्रद्ध असाल तर. मी काही तुमची देखभाल करणार नाही.

८७) ते (लोक) म्हणाले, शुऐब तुमची उपासना आम्हास ते सोडावयास लावते ज्यांची आराधना आमचे वाडवडील करत आलेत? आणि आमच्या संपत्तीत आम्हांस वाटेल तसं आम्ही करू नये? तुम्हीच का तेवढे सहनशील आणि रास्त?

८८) ते (शुऐब) म्हणाले, तुम्ही पाहताय ना माझ्या विधात्याकडून माझ्यापाशी ठळक प्रमाण आहे ते आणि त्यानं मला त्याच्याकडून उत्तम उपजीविका

दिलीय. मी ज्याची तुम्हांस मनाई करतो त्याच्याविरूद्ध वागण्याचा माझा बेत नाही. मला जमेल तेवढं मी सुधार घडवू इच्छितो. माझं भलं अल्लाहमुळंच. त्याच्यावर माझा भरवसा आहे. त्याच्याकडंच मी वळतो.

८९) माझ्या लोकहो, माझ्या बाबतीत तुमची कटुता तुम्हांस अपराध घडण्याचं कारण होऊ नये आणि तुम्हालादेखील तेच भोगावं लागेल, जसे नूहच्या लोकांना, अथवा हूदच्या लोकांना अथवा सॉलेहच्या लोकांना भोगावं लागलं. लूतचे लोक तर आपत्ती तुमच्यापासून काही लांबवर नाहीत.

९०) तेव्हा आपल्या विधात्याशी क्षमा-याचना करा. त्याच्याकडं वळा खरंच माझा विधाता दया दाखवणारा आणि मायाळू आहे.

९१) ते लोक म्हणाले, शुऐब! तू म्हणतो त्यातलं बऱ्यापैकी आम्हांस कळत नाही आणि आमच्यामध्ये तू अशक्त दिसतो, जर (तुझ्याबरोबर) भाऊबंदकी नसती तर आम्ही तुला दगडांनी ठेचलं असतं, तू आम्हांस जड झाला नसता.

९२) ते (शुऐब) म्हणाले, माझी भाऊबंदकी तुम्हांस अल्लाहपेक्षा जास्त जड वाटते? तुम्ही त्याला पाठीमागे घालून दिलंत? निश्चितच माझा विधाता तुम्ही जे करत आहात त्यास वेढा घालून आहे.

९३) लोकहो, तुम्ही आपल्या जागी करायचंय ते करत राहा, मीही आपलं काम करीन. लवकरच तुम्हाला कळून चुकेल कोणावर प्रकोप कोसळतो आणि त्यांना अपमानित करतो आणि कोण खोटं आहे? वाट पाहा, मीही तुमच्याबरोबर वाट पाहतोय.

९४) जेव्हा आमचा निर्णय लागला आम्ही शुऐब आणि त्याच्याबरोबर ज्यांनी श्रद्धा धारण केली होती, त्यांना आपल्या कृपेमुळं वाचवलं आणि ज्या लोकांनी अपराध केला त्यांना एका प्रचंड स्फोटानं वेढून टाकले. पहाट झाली नि ते आपल्या घरांमध्ये तोंडघशी पडले होते.

९५) जसं ते तिथं राहतच नव्हते. एका मदयनच्या लोकांना घालवण्यात

आलं जसं समूदच्या लोकांना घालवलं गेलं होतं.

९६) आम्ही मूसा (अ.) यांना स्पष्ट संकेत आणि स्पष्ट अधिकारांसह पाठवलं.

९७) फिरऔन आणि त्याच्या सरदारांकडं, कारण त्यांनी फिरऔनच्या आज्ञा पाळल्या होत्या आणि फिरऔनच्या आज्ञा रास्त नव्हत्या.

९८) कयामतच्या दिवशी तो आपल्या लोकांचं नेतृत्व करीत त्यांना नरकात आणून सोडेल. वाईट ठिकाण जिथं ते पोहचतात.

९९) या जगातही तिरस्कारानं त्यांचा पाठलाग केला आणि कयामतच्या दिवशीही. त्यांना बहाल केलेली ही बक्षीसं किती वाईट आहेत.

१००) आम्ही कथानक करतो तो वृत्तान्त ह्या वस्त्यांचा, त्यापैकी काही उभ्या आहेत तर बाकीच्या उद्ध्वस्त झाल्यात.

१०१) आम्ही नव्हता त्यांच्यावर अत्याचार केला, त्यांनीच स्वत:वर अत्याचार ओढवून घेतला. जेव्हा तुमच्या विधात्याचा आदेश आला तेव्हा अल्लाहला वगळून ते ज्या इतर ईश्वरांचा धावा करीत ते त्यांच्या काही कामी आले नाहीत. त्यांनी त्यांच्या विध्वंसात भरच टाकली.

१०२) अशी असते तुझ्या विधात्याची पकड. जेव्हा ते अपराध करत असतात तेव्हा त्या वस्त्यांची तो अशी पकड करतो. आणि त्याची पकड निश्चितच कठोर व यातनादायक असते.

१०३) निश्चितच परलोकाच्या शिक्षांबाबत जे भय बाळगून असतात त्यांच्यासाठी यामध्ये संकेत आहेत. एक (असा) दिवस आहे जेव्हा सर्व लोक एकत्रित होतील आणि तो सर्वांच्या हजेरीचा दिवस असेल.

१०४) एका ठराविक मुदतीपलीकडं आम्ही तो (दिवस) टाळणार नाही.

१०५) तो दिवस उजाडल्यास त्याच्या परवानगीविना कोणी बोलणार नाही. (त्यावेळी) काही अभागी असतील तर काही भाग्यवान.

१०६) अभागी ठरलेले नरकाग्नीत असतील. तिथं त्यांना फक्त आरडाओरड करणं असेल.

१०७) आकाश आणि पृथ्वी अस्तित्वात आहे तोवर ते सदैव तिथंच राहतील, तुझ्या विधात्याच्या इच्छेची (गोष्ट) वेगळी. तुझा विधाता ठरवतो ते करून टाकतो.

१०८) आणि जे उपकृत (आनंदित) असतील ते सदाकाळ स्वर्गात राहतील, आकाश आणि पृथ्वी अस्तित्वात आहेत तोवर. तुझ्या विधात्याच्या मर्जीचा अपवाद वगळता. ही बक्षीसं निरंतर अशी आहेत.

१०९) हे लोक (नाकारणारे) ज्यांची उपासना करतात त्यांच्याविषयी संभ्रमात पडू नका, त्यांचे पूर्वज ज्यांची भक्त करत आलेत त्यांनाच ते पूजतात, आम्ही त्यांच्या वाट्यातलं काही कमी न करता त्यांना पुरेपूर परत करणार (आहोत).

११०) आम्ही मूसा (अ.) यांना ग्रंथ दिला तर त्यामध्ये वादविवाद निर्माण झाले. जर आधीच तुमच्या विधात्याकडून एक शब्द दिला गेला नसता तर त्यांच्यादरम्यान निकाल (लगेच) लागून गेला असता. त्याबाबत ते संशयग्रस्त होऊन संभ्रमात पडलेत.

१११) आणि वेळ येईल तेव्हा तुझा विधाता त्यांच्या कर्मांचा पुरेपूर मोबदला देईल. निश्चितच ते जे करतात ते त्यास ठाऊक आहे.

११२) तेव्हा तुम्हांस आज्ञा दिली त्याप्रमाणं कायम राहा, ज्यांनी तुमच्याबरोबर पश्चात्ताप व्यक्त केला त्यांनीसुद्धा. उल्लंघन करू नका. तुम्ही जे काही करता ते त्यास दिसतं.

११३) ज्यांनी अपराध केला त्यांच्याकडं झुकू नका नसता तुम्हांसदेखील नरकाग्नी वेढून टाकील. अल्लाहव्यतिरिक्त कुणी तुमची देखभाल करणार नाही, कुणी तुमच्या मदतीला येणार नाही.

११४) दिवसाच्या दोन्ही टोकांवर तसंच रात्रीचा काही भाग उलटल्यावर नियमित नमाज अदा करा. लक्षात ठेवा, भली कर्मं दुष्ट कृत्यांना घालवून देतात. बोध घेणाऱ्यांना आठवण करून देतात.

११५) संयम ठेवा. अल्लाह नक्कीच परोपकार करणाऱ्यांचा मोबदला वाया

जाऊ देत नसतो.

११६) तुमच्या आधी होऊन गेलेल्या लोकांपैकी भली माणसं का बरं झाली नाहीत, त्यांनी धरतीवर अनाचार माजविणाऱ्यांस मज्जाव केला असता, त्यांच्यापैकी फक्त थोड्याशांनाच आम्ही वाचवलं, अत्याचारी लोक तर त्यांना दिल्या गेलेल्या चैनीतच मग्न झाले आणि म्हणूनच ते अपराधी ठरले.

११७) तुझा विधाता एखाद्या वस्तीला अपराधापायी नष्ट करत नसतो तिथली माणसं भली कर्मं करत असतानादेखील.

११८) तुझ्या विधात्यानं इच्छिलं असतं तर अखिल मानवजातीचा एकच समूह बनवलं असतं, तरीही त्यांनी मतभेद करणं सोडलं नसतं.

११९) ज्यांना तुझ्या विधात्यानं दया दाखवली त्यांचा अपवाद (वगळता) यासाठीच तर त्यांना निर्माण केलंय. तुझ्या विधात्याचं म्हणणं परिपूर्ण होणारच. नरकाला मानव आणि जिन्न या सर्वांना मिळून भरुन टाकीन.

१२०) प्रेषितांच्या अहवालामधील सर्वकाही आम्ही तुम्हांस कथन करतो, तुमच्या मनाला समाधान मिळावं म्हणून. याद्वारे सत्य तुमच्याकडं आलेलं आहे, तो श्रद्धावंतांच्या आठवणींसाठी उपदेश आहे.

१२१) ज्या लोकांनी विश्वास केला नाही त्यांना सांगा, त्यांनी आपल्या जागी काय ते करत राहावं, आम्हीही (आपली) कामं करताहोत.

१२२) तुम्हीही वाट पाहा, आम्हीदेखील वाट पाहताहोत.

१२३) आकाश आणि पृथ्वीमधील सर्व गुपितं अल्लाहपाशी आहेत. सर्व प्रकरणं त्याच्याकडं परतणार आहेत. तेव्हा त्याची भक्ती करा, त्याच्यावर विश्वास टाका. तुमचा विधाता तुमच्या कर्मांकडं दुर्लक्ष करत नसतो.

-------

# १२. सूरह यूसुफ

**मक्काकालीन, आयती १११**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ-लाम-रा, एका सुगम-सोप्या ग्रंथातील या आयती (श्लोक) आहेत.

२) आम्ही हे कुरआन अरबी (भाषेत) अवतरलं. तुम्हास समजता यावं म्हणून.

३) आम्ही कुरआनच्या प्रकटनाद्वारे अप्रतिम कथा सांगितल्या. पूर्वी ज्यांनी याकडे दुर्लक्ष केलं तुम्हीदेखील त्यांच्यापैकीच होते.

४) (आठवा) जेव्हा यूसुफनं आपल्या पित्यास सांगितलं, बाबा! मी (स्वप्नात) अकरा तारे, सूर्य आणि चंद्र माझ्यापुढं नतमस्तक होताना पाहिले.

५) (बापानं) सांगितलं, माझ्या मुला, आपलं हे स्वप्न आपल्या भावांना सांगू नकोस. ते तुझ्याविरूद्ध कटकारस्थान करतील. सैतान माणसांचा उघड शत्रू आहे.

६) तुझा विधाता तुझी निवड करेल आणि तुला घटनांमागील अर्थ लावणं शिकवील. अशाप्रकारे तो तुझ्यावर आणि याकुबच्या घराण्यावर आपलं वरदान परिपूर्ण करील जशी कृपा त्यानं याआधी तुझे वाडवडील इब्राहीम आणि इसहाक यांच्यावर केली होती. खरंच तुझा पालनकर्ता सुज्ञ आणि समंजस आहे.

७) यूसुफ आणि त्यांच्या भावांमध्ये प्रश्न करणाऱ्यांकरिता संकेत आहेत.

८) जेव्हा ते म्हणाले, आपण सर्व एकच कुटुंब असताना, यूसुफ आणि त्याच्या भावावरच आपल्या पित्याचं प्रेम जास्त आहे, खरंच ही आपल्या बापाची मोठी चूक आहे.

९) (एकजण म्हणाला) यूसुफला ठार मारा अगर त्याला भलत्याच ठिकाणी

घालवून द्या. तुमचा पिता तुमच्याकडं वळंल आणि मग नंतर प्रामाणिक लोकांपैकी होऊन जा.

१०) दुसरा म्हणाला, जर तुम्हाला काही करायचंच असेल तर यूसुफला ठार नका करू, त्याला एका आटलेल्या विहिरीत टाकून द्या, एखादा प्रवाशी त्याला काढून घेऊन जाईल.

११) (ते सर्व बापाकडं येऊन) म्हणाले, बाबा, तुम्हास झालंय तरी काय? यूसुफच्या बाबतीत आमच्यावर विश्वास नाही (तुमचा). आम्ही तर त्याची काळजी घेणारे आहोत.

१२) आमच्याबरोबर त्याला उद्या पाठवून द्या. काही खाईल- पिईल, मौज-मजा करील. आम्ही त्याची सुरक्षा करू.

१३) त्यांनी (बापानं) सांगितलं, होय. तुम्ही त्याला घेऊन जाण्याची गोष्ट मला दु:खी करते. एखादेवेळी तुमचं त्याच्याकडं लक्ष नसलं की लांडगा खाऊन टाकेल याची मला भीती वाटते.

१४) ते म्हणाले, आम्ही एकसंघ असताना जर त्यास लांडग्यानं गिळलंच तर ही गोष्ट आमच्या तोट्याची ठरेल.

१५) अशाप्रकारे ते त्यास घेऊन गेले आणि सगळ्यांनी मिळून ठरवलं की त्याला एका आटलेल्या विहिरीत टाकून द्यावं. आणि (मग) आम्ही त्याला (मनाच्या समाधनासाठी) संदेश पाठवला, (एकेदिवशी) तुम्ही त्यांना त्यांच्या कृत्याची हकीगत जरूर सांगाल, ज्याचा त्यांना मागमूसही नाही.

१६) अंधार पडल्यावर रडगाणं करीत ते बापाकडं परतले

१७) नि म्हणाले, बाबा आम्ही आपसांत धावण्याची शर्यत लावली. यूसुफला आमच्या सामानापाशी बसवलं असता त्याला लांडग्यानं खाऊन टाकलं. आम्ही खरे असलो तरी तुम्ही विश्वास नाही करणार.

१८) त्यांनी त्यांचा सदरा खोट्या रक्तानं माखून आणला. म्हणाला, (तसे) नव्हे, तुमच्या मनांनी एक गोष्ट शिजवली. (अशात) संयम बाळगणंच

उचित आहे. आणि तुम्ही जे काही सांगत आहात त्यावर अल्लाहचीच काय ती मदत घेईन.

१९) मग नंतर तिथं प्रवाशांचा एक काफिला येऊन धडकला. त्यांनी आपल्या पाणक्याला विहिरीवर धाडलं. त्यानं आपला पोहरा खाली सोडला तोच तो म्हणाला, (अहो!) चांगली बातमी आहे. इथं तर एक तरुण मुलगा आहे. आणि त्याला त्यांनी एका विकाऊ वस्तूप्रमाणे लपवलं. पण ते जे काय करीत होते ते अल्लाहला ठाऊक होते.

२०) त्यांनी क्षुल्लक किमतीत त्यांना विकून टाकलं. मोजके दिरहम (रुपये) घेऊन. त्यात त्यांना काही रस नव्हता.

२१) इजिप्तमधील एका माणसानं त्यांना विकत घेतलं. (तो) आपल्या पत्नीस म्हणाला, यास काळजीपूर्वक सांभाळ. तो आपल्या फायद्याचा ठरेल. अगर आपण त्याला आपलं पोर म्हणून दत्तक घेऊ. अशाप्रकारे आम्ही यूसुफ (अ.) यांना (इजिप्तच्या) भूमीत आधार उपलब्ध करून दिलं, त्यांना घटनांमागच्या हकीगती माहीत करून देण्यासाठी. आणि अल्लाहला आपल्या अधिकारांवर संपूर्ण प्रभुत्व आहे. (ही गोष्ट) कित्येक लोकांना कळत नाही.

२२) जेव्हा तो सज्ञानावस्थेस पोचला, आम्ही त्याला निर्णयशक्ती आणि ज्ञान दिलं. अशाच रीतीनं आम्ही सदाचारींना मोबदला देतो.

२३) पण जिच्या (स्त्रीच्या) घरात ते राहत होते, तिनं त्यास भुलवण्याचा विचार केला कारण स्वत:ला रोखू शकली नाही. दार बंद करून म्हणाली, ये! लवकर. ते म्हणाले, अल्लाहच मला वाचवो. माझ्या मालकांनी तर माझ्या राहण्याची चांगली सोय केलीय. खरंच अपराध्याचं कधीच चांगलं होत नसतं.

२४) तिनं मनांमध्ये जे ठरवलं होतं तसंच त्यानंदेखील मनांत आणलं असतं तर त्यानं आपल्या विधात्याचे स्पष्ट प्रमाण ओळखले नसते. अशा रीतीनं आम्ही त्याला दुष्ट आणि अश्लील कृत्यांपासून वळवलं. खरंच तो आमच्या प्रामाणिक भक्तांपैकी होता.

२५) ते दोघे दरवाजाकडं धावून गेले. त्या स्त्रीनं त्याचा सदरा पाठीमागून फाडून टाकला. दरवाजावर त्या स्त्रीच्या पतीशी त्यांचा सामना झाला. ती म्हणू लागली, ज्यानं तुझ्या पत्नीशी दुरवर्तन केलं त्यास कोणती शिक्षा? त्याला कैद करावं की कठोर शिक्षा (द्यावी)?

२६) ते (यूसुफ) म्हणाले, तिनंच मला भुलवून विवश करण्याचा प्रयत्न केला. घरातल्या एकानं साक्ष दिली, जर त्याचा सदरा पुढून फाटला असेल तर तो खोटं बोलतोय आणि ती सत्य सांगते.

२७) आणि जर त्याचा सदरा पाठीमागून फाटला असेल तर ती लबाड सांगते आणि तो खरं सांगतो.

२८) जेव्हा त्यास, त्याचा (यूसुफचा) सदरा पाठीमागून फाटलेला आढळला. तो म्हणाला, तुम्हा स्त्रियांची ही फसवणूक आहे आणि खरंच तुमच्या चाली दांडग्या असतात.

२९) हे यूसुफ, हा सगळा (प्रकार) विसर. आणि हे स्त्री, आपल्या अपराधाविषयी माझी क्षमा माग. तूच खरं पाहता चूक करणारी आहेस.

३०) आणि त्या शहरातल्या महिला म्हणाल्या, अजीजची पत्नी आपल्या गुलामाला स्वत:हून हिरावून घेते. त्याच्या प्रेमानं तिच्या मनात घर केलंय. आम्ही पाहतो ती उघड भरकटून गेलीय.

३१) जेव्हा तिनं त्यांचं हे कपटी बोलणं ऐकलं त्यांना तिनं निमंत्रण पाठवलं आणि एका मेजवानीचं आयोजन केलं. त्यांच्यातल्या प्रत्येकीच्या हातात (फळं कापण्याकरिता) एक सुरी दिली. आणि ती (यूसुफला) म्हणाली, 'बाहेर ये यांच्यासमोर.' त्यांनी त्याला पाहिलं. अवाक् होऊन (फळांऐवजी) आपला हात कापून घेतला आणि म्हणू लागल्या, हे अल्लाह! हा मनुष्य नाही, तर एखाद्या भव्य देवदूताशिवाय (दुसरा) कुणी नाही.

३२) ती म्हणाली, हाच तो ज्याच्या बाबतीत तुम्ही मला काहीबाही निंदनीय म्हणत होत्या आणि मी त्याला त्याच्या इच्छेविरूद्ध मोहात टाकण्याचा प्रयत्न करत होते. त्यानं स्वत:ला वाचवलं पण जर त्यानं मी म्हणते

तसं केलं नाही तर त्याला कैदेत टाकलं जाईल आणि (तो) तिरस्कारित होईल.

३३) ते (यूसुफ) म्हणाले, हे माझ्या विधात्या, त्या मला ज्याकडं बोलविताहेत त्यापेक्षा मी तुरुंगात जाणं पसंत करीन. जर त्यांच्या चाली तू परतवून लावल्या नाही तर मी त्यांच्याकडं वळून अज्ञानी होऊन जाईन.

३४) त्याच्या विधात्यानं त्याचं ऐकलं आणि त्यांच्या (स्त्रियांच्या) चाली परत लावल्या. खरंच तो ऐकणारा आणि जाणणारा आहे.

३५) नंतर मग त्यांनी संकेत पाहिले तेव्हा त्यांना एका निश्चित कालावधीसाठी कैदेत ठेवणंच बरं वाटलं.

३६) त्याच्याबरोबर दोन तरुणसुद्धा तुरुंगात दाखल झाले. त्यांच्यातल्या एकानं सांगितलं की मी स्वप्नात दारू गाळत असताना पाहिलं. दुसरा म्हणाला, मी स्वप्नात डोक्यावर भाकरी उचलल्या आहेत, त्यातून पक्षी खाताहेत. आम्हाला यांचा अर्थ काय ते सांगा, तुम्ही सदाचारी दिसता.

३७) तुम्हाला जेवण्यासाठी काही अन्न-पाणी येण्याआधी मी नक्कीच तुम्हाला तुमच्या स्वप्नांचा अर्थ सांगेन. जे ज्ञान माझ्या विधात्यानं मला दिलंय त्यातलाच तो भाग आहे. मी त्या लोकांचा धर्म सोडून दिलाय ज्यांना अल्लाहवर श्रद्धा नाही आणि परलोकाला नाकारतात.

३८) आणि मी माझे वाडवडील इब्राहीम, इसहाक आणि याकुब यांचा धर्म पाळतो. कोणालाही अल्लाहचे भागीदार ठरवणं हे आमचं काम नाही. ही आमच्यावर तसेच लोकांवर अल्लाहची कृपाच म्हणायची लागेल. पण कित्येक लोक कृतज्ञ होत नाहीत.

३९) तुरुंगातील माझ्या साथीदारांनो, एकमेव सर्वव्यापी अल्लाह बरा की कितीतरी भलतेसलते ईश्वर बरे?

४०) तुम्ही आणि तुमच्या पूर्वजांनी काही नावं दिलेली आहेत त्यांची तुम्ही पूजा करता. अल्लाहनं त्यांना अधिकृत केलं नाही. हुकूम मात्र फक्त अल्लाहचाच. त्याशिवाय कुणाची भक्ती करू नका, हा त्याचा आदेश

आहे. तोच रास्त आणि खरा धर्म होय. कित्येक लोकांना याचे ज्ञान नाही.

४१) तुरुंगातील माझ्या मित्रांनो! तुमच्यातला एक आपल्या मालकास दारूची व्यवस्था करेल, तर दुसरा फासावर जाईल. आणि पक्षी त्याच्या डोक्याला टोचा मारून खाऊन टाकतील. हा तो निवाडा ज्या बाबतीत तुम्ही मला विचारित होता.

४२) आणि त्या दोघांपैकी ज्या एकाचा प्राण वाचेल असा यूसुफनं अंदाज लावला होता त्याला ते म्हणाले, आपल्या मालकाकडे माझा विषय काढ. पण सैतानानं त्याला आपल्या मालकास काही सांगायचा विसर पाडल्यानं ते (यूसुफ) काही वर्षं कैदेतच राहिले.

४३) तो राजा म्हणाला, (स्वप्नात) मी पाहिलं, सात जाडजूड गाई आहेत. सात हिरवी कणसं आहेत, तर सात सुकलेली. माझ्या सरदार लोक! जर तुम्हाला स्वप्नांचा अर्थ लावणं जमत असंल तर माझ्या स्वप्नाचा अर्थ काय ते सांगा बरं.

४४) त्यांनी सांगितलं ही गोंधळून टाकणारी स्वप्नं आहेत. आम्ही स्वप्नांचा अर्थ जाणणारे नाहीत.

४५) त्या दोघांमधील ज्याची सुटका झाली होती त्याला एवढी मुदत निघून गेल्यावर आठवलं. त्यानं सांगितलं, मी तुम्हाला अर्थ सांगेन, मला पाठवा.

४६) हे सत्यनिष्ठ, यूसुफ! सात लठ्ठ गायींना सात रोडक्या गाई खात आहेत आणि सात हिरवी कणसं आहेत तर सात सुकलेली कणसं. मला या स्वप्नाचा उलगडा करून सांगा. मी त्या लोकांत परत जातो आणि मग त्यांना (सर्व हकीगत) कळून येईल.

४७) ते म्हणाले, तुम्ही सतत सात वर्षं शेती कराल. नंतर जे पीक काढाल तुम्ही ते तसंच कणसांत राहू द्या. थोडंफार खाण्यासाठी लागेल तेवढं त्यातून खाऊन टाका.

४८) त्यानंतरची सात वर्षं फार कष्टाची असतील. या काळात तुम्ही जे आधी तसेच जे कणसांमध्ये ठेवून दिलं होतं ते (धान्य) खाऊन टाकाल. आणि थोडंसं आणखीन तसंच शिल्लक राहू द्याल.

४९) त्यानंतरच्या वर्षात भरपूर पाऊस पडेल आणि लोक या वर्षी (पिकांपासून इतर) पदार्थ बनवतील.

५०) राजा म्हणाला, ''त्यास माझ्याकडं आणा.'' पण जेव्हा त्याचे प्रतिनिधी त्यांच्याकडं आले, यूसुफ म्हणाले, तुम्ही तुमच्या मालकाकडं परत जा आणि विचारा ज्या स्त्रियांनी आपले हात कापून घेतले होते त्या कशा आहेत. माझा विधाता तर त्यांचं कारस्थान (चांगल्या प्रकारे) जाणतो.

५१) तो (राजा) विचारू लागला, तुम्ही जेव्हा यूसुफला त्याच्या मर्जीविरूद्ध भुरळ घातली होती तेव्हा नक्की काय घडलं होतं? त्या म्हणाल्या, अल्लाहच वाचवो. आम्हाला त्यांच्यात काहीही वाईटपणा आढळला नाही. अझीझची पत्नी म्हणाली, मीच त्यांना प्रवृत्त केलं. ते तर सत्यवान आहेत.

५२) हे अशासाठी की मी त्याच्या (राजाच्या) पाठीमागे विश्वासघात केला नव्हता. खरंच अल्लाह कधीही अशा कट-कारस्थान रचणाऱ्यांना मार्ग दाखवत नाही.

**पारा - १३**

५३) मी स्वत:ला निर्दोष म्हणत नाही, कारण मानवी आत्मा नक्कीच दुष्ट प्रवृत्तींना बळी पडत असतो. माझ्या विधात्यानं कोणावर दया केली असेल (तर ती गोष्ट वेगळी). खरोखरच माझा पालनकर्ता नितांत दयाळू व क्षमा करणारा आहे.

५४) राजा म्हणाला, त्यांना माझ्याकडं आणा. मी त्यांना आपल्या वैयक्तिक सेवेसाठी खास ठेवतो. आणि राजानं त्यांना सांगितलं, आजपासून तुम्ही आमच्याकरिता सन्माननीय आणि विश्वसनीय आहात.

५५) ते म्हणाले, देशाच्या साधन-संपत्तीवर माझी नेमणूक करा ते सुरक्षित

ठेवणं (मला चांगलं) अवगत आहे.

५६) अशा रीतीनं आम्ही यूसुफ यांना त्या देशात स्थापित करून त्यांना आवडेल त्या ठिकाणी ताबा मिळवून दिला. इच्छितो त्यांना आम्ही आपली कृपा बहाल करतो. सदाचारीचा मोबदला आम्ही कधीच वाया जाऊ देत नाही.

५७) जे श्रद्धावंत आणि ईशपरायण आहेत त्या लोकांसाठी परलोकातील मोबदला हेच उत्तम आहे.

५८) नंतर यूसुफचे भाऊ येऊन दाखल झाले. त्यांना (यूसुफ यांना) त्यांची ओळख पटली, पण त्यांनी (यूसुफ यांना) ओळखले नाही.

५९) आणि नंतर जेव्हा त्याने त्यांना सर्व सामान-सुमान व्यवस्थित करून दिलं. ते (यूसुफ) म्हणाले, तुम्ही तुमच्या भावाला, ज्याच्या पित्याची तुम्हीदेखील संतान आहात, माझ्याकडे आणा. तुम्ही पाहत नाही मी पुरेपूर माप भरून देतो, तसेच पाहुणचारही चांगला करतो.

६०) पण जर तुम्ही माझ्याकडं आणलं नाही तर एक मापदेखील (धान्य) मिळणार नाही आणि तुम्ही माझ्याजवळ फिरकूही नका.

६१) ते म्हणाले आम्ही त्याच्या बापाजवळ आमची तशी इच्छा व्यक्त करू आणि नक्कीच आम्ही हे काम करू.

६२) आपल्या नोकरांना यूसुफ यांनी सांगितलं. त्यांनी धान्याच्या बदल्यात जे दिलंय ते त्यांच्या पोत्यातच ठेवून द्या. कदाचित ते आपल्या लोकांकडं परतल्यावर त्याला ओळखतील आणि मग परत येतील.

६३) आपल्या बापाकडं परतल्यावर ते म्हणाले, बाबा! (जर आम्ही आमच्या भावाला बरोबर घेऊन गेलो नाही तर) आम्हाला मुळीच धान्य मिळणार नाही. तेव्हा आमच्या भावाला आमच्याबरोबर पाठवून द्या. आम्ही काहीतरी घेऊन येऊ. आम्ही त्याची सर्वतोपरी काळजी घेणार आहोत.

६४) मी तुमच्या भावाच्या संदर्भात तुमच्यावर तसाच विश्वास करू जसा मी पूर्वी केला होता? अल्लाहच सर्वाधिक काळजी घेणारा आणि दया

दाखवणाऱ्यांमध्ये सर्वोत्तम दया करणारा आहे.

६५) त्यांनी नंतर जेव्हा आपलं गाठोडं उघडलं, त्यांना बदल्यात दिलेला त्यांचा माल सापडला. बाबा आम्हाला आणखी काय हवंय? हा आमचा माल आहे, जो आम्हाला परत दिला गेलाय आणि आम्ही आपल्यासाठी आणखीन धान्य आणू. आम्ही आमच्या भावाची काळजी घेऊ. आणि एका उंटावरील ओझ्यापेक्षा अधिक (धान्य) आणू. आम्ही आणलेले हे (धान्य) कमी आहे.

६६) तुम्ही अल्लाहच्या नावानं मला जोपर्यंत त्याला परत माझ्याकडं आणण्याचं पक्कं वचन देत नाही तोवर मी त्याला मुळीच तुमच्याबरोबर पाठवणार नाही. जर तुम्ही स्वतःच घेरला गेला तर ती गोष्ट वेगळी. आणि मग जेव्हा त्यांनी (याकुब अ. यांना) पक्क वचन दिले, ते म्हणाले, आम्ही जे काही बोलत आहोत त्यावर अल्लाह साक्षी आहे.

६७) आणि म्हणाले, मुलांनो! सर्वांनी दरवाजातून एकत्र प्रवेश करू नका. वेगवेगळ्या दारांनी आत जा. मी तुम्हाला अल्लाहनं (निर्धारित केलेल्या) कोणत्याही घटनेशी वाचवू शकत नाही. अल्लाहव्यतिरिक्त कोणाचा हुकूम चालत नाही. मी त्यावरच विश्वास टाकलाय. आणि सर्व विश्वास करणाऱ्यांनी त्याच्यावरच विश्वास ठेवायला हवा.

६८) जेव्हा ते बापानं सांगितल्याप्रमाणं आत दाखल झाले, ते त्यांना अल्लाहपासून कोणत्याही बाबतीत वाचवू शकणार नव्हते, तरी याकुबच्या मनातली ती इच्छा होती जी त्याने पूर्ण केली. आणि नक्कीच आम्ही दिलेल्या शिकवणीशी तो (याकुब) अवगत होता. पण कित्येक लोकांना हे माहीत नाही.

६९) जेव्हा ते यूसुफकडे येऊन दाखल झाले, त्यांनी आपल्या भावाला जवळ बोलावलं, म्हटलं, मी तुझा भाऊ आहे. ते तुझ्याशी जसा काही (व्यवहार) करत राहिले ते मनाला लावून घेऊन नकोस.

७०) मग जेव्हा त्यांचं सामानसुमान बांधून झालं. आपल्या भावाच्या सामानात आपला पाणी प्यायचा पेला ठेवून दिला. नंतर दवंडी देणाऱ्या एकानं

हाक मारली, अहो! काफिलेवाले, तुम्ही तर चोर निघालात.

७१) ते म्हणाले, काय ते तुम्ही गमावून बसलात?

७२) त्यांनी उत्तर दिलं, आम्हाला मालकाचा पेला सापडत नाहीय. जो कुणी ते आणून देईल त्याला एका उंटावरील बोजाइतके जिन्नस दिले जातील. मी हमी घेतो.

७३) ते म्हणाले, शपथ अल्लाहची! तुम्हास चांगले ठाऊकाय. आम्ही या देशात अनाचार माजविण्याकरता आलेलो नाही किंवा आम्ही चोर नाही.

७४) ते म्हणाले, जर तुम्ही खोटे ठरलात तर त्याचा दंड काय?

७५) ते (भाऊ) म्हणाले, ज्या कुणाच्या पोत्यात ते सापडेल त्यालाच दंड म्हणून धरले जावे. अशा रीतीनं आम्ही अत्याचारींना शिक्षा देतो.

७६) आपल्या भावांच्या आधी, त्यांनी सर्वांच्या पोत्यांची झडती घेतली. शेवटी त्यांनी तो पेला आपल्या भावाच्या पोत्यातून बाहेर काढला. ते (यूसुफ अ.) राजाच्या कायद्यानुसार, आपल्या भावाला ठेवून घेऊ शकत नव्हते म्हणून आम्ही यूसुफ (अ.) साठी ही युक्ती केली. अल्लाहची तशी इच्छा असती तर (ती गोष्ट वेगळी) अल्लाह इच्छितो त्यांना सन्मानित करतो. आणि प्रत्येक ज्ञानीपेक्षा तो वरचढ ज्ञानी आहे.

७७) ते म्हणाले, त्याने चोरी केली असेल, तर याआधी त्याच्या भावानेदेखील चोरी केली होती. पण यूसुफ (अ.) यांनी ही गोष्ट आपल्या मनातच दडवली, त्यांच्यावर काहीही उघड केलं नाही. म्हणाले, तुम्ही अगदी खालच्या दर्जाचे आहात. तुम्ही जे काही रचताय ते अल्लाहला (चांगलं) ठाऊकाय.

७८) ते म्हणाले, हे अझीझ, खरेच त्याचे पिता वयोवृद्ध गृहस्थ आहेत, त्याच्या जागी आमच्यापैकी कुणालातरी ठेवून घ्या. आम्हाला माहीताय तुम्ही फार परोपकारी आहात.

७९) यूसुफ म्हणाले, अल्लाहची शरण, ज्याच्याकडं आम्हाला आमची वस्तू

आढळली त्यास सोडून जर आम्ही इतराला ठेवून घ्यावं! तसं केल्यास आम्ही अत्याचारींपैकी होऊन जाऊ.

८०) ते निराश झाले आणि मग एकत्र येऊन आपसात विचारविनिमय करू लागले. त्यांचा थोरला भाऊ म्हणाला, तुम्हाला ठाऊक नाहीय, तुमच्या वडिलांनी अल्लाहच्या शपथेवर तुमच्याकडून हमी घेतली होती. याआधी तुम्ही यूसुफच्या बाबतीत अनर्थ केला होता. मी या देशातून जाणार नाही. जोपर्यंत माझे बाबा तशी अनुमती देत नाहीत, किंवा अल्लाहच मला काही युक्ती सुचवत नाही. तोच उत्तमपैकी निर्णय करणारा आहे.

८१) आपल्या वडिलांकडं परत जा आणि सांगा, तुमच्या मुलानं चोरी केली (म्हणून) आणि आम्ही तशी साक्ष दिली नाही. आम्ही तेच सांगितलं जे आम्हाला ठाऊक होतं. आमच्या माहितीपलीकडील गोष्टी आम्ही कसं जपणार.

८२) त्यांना विचारू द्या, आम्ही गेलो त्या वस्तीवाल्यांकडे आणि त्या काफिलेवाल्यांकडे ज्यांच्याबरोबर आम्ही परतलो, आम्ही तर खरं काय तेच सांगणार.

८३) त्यांनी (पित्यांनी) सांगितलं. नव्हे, तुम्ही मनानं एक गोष्ट रचलीय. (आता) धीर धरणेच उचित ठरेल. कदाचित अल्लाह त्या सर्वांना माझ्याकडं आणील. तोच (खरं काय) ते जाणतो आणि तोच विवेकी (युक्ती करणारा) आहे.

८४) मग त्यांनी आपलं तोंड फिरवलं. आणि म्हणाले, यूसुफचं मला दुःख आहे. त्यांचे डोळे दुःखानं पाढरे पडले. आणि (मनातल्या मनात) त्याला दडपून टाकलं.

८५) ते (भावंडे) म्हणाले, शपथ अल्लाहची! तुम्ही तर सदासर्वदा यूसुफचीच आठवण काढत राहणार. (त्याचा) रोग जडून मरेपर्यंत.

८६) ते (पिता, याकुब) म्हणाले, मी तर अल्लाहकडे माझ्या वेदना आणि दुःख व्यक्त करतो आणि अल्लाहकरवी ते (सर्वकाही) जाणतो जे

तुम्हाला माहीत नाही.

८७) मुलांनो, जा आणि शोधून काढा यूसुफ आणि त्याच्या भावाला. अल्लाहच्या दयेशी निराश नका होऊ. नाकारणाऱ्या लोकांना वगळता कुणीही अल्लाहच्या दयेशी निराश होत नसतात.

८८) नंतर ते त्याच्याकडं येऊन दाखल झाले. म्हणू लागले, हे अझीझ! आम्ही व आमच्या घरची (लोकं) पीडेनं ग्रासलेत. काही तुटपुंजे भांडवल आम्ही आणलंय. आम्हाला पुरेपूर जिन्नस आणि दानधर्म (म्हणून) द्या. अल्लाह दानधर्म करणाऱ्यांना मोबदला देतो.

८९) यूसुफ म्हणाले, माहितीय तुम्हाला, तुम्ही अडाणीपणामुळं यूसुफ आणि त्याच्या भावांशी काय केलं होतं?

९०) त्यांनी विचारलं, तुम्हीच यूसुफ आहात? ते उत्तरले, मी यूसुफ आणि हा माझा भाऊ. अल्लाहनंच केला उपकार आमच्यावर. जो कुणी अल्लाहला भिऊन धैर्यानं वागतो, अल्लाह कधीच अशा परोपकारींचा मोबदला वाया जाऊ देत नाही.

९१) शपथ अल्लाहची! अल्लाहनं तुम्हाला आमच्यावर प्राधान्य दिलं, आम्ही तर निव्वळ चुकलो होतो.

९२) (यूसुफ) म्हणाले, 'आज तुमच्यावर कसलाच आरोप नाही.' अल्लाह तुम्हाला क्षमा करो. कृपा करणाऱ्यांपैकी (एकमात्र) तो कृपावंत आहे.

९३) माझा हा सदरा घेऊन जा आणि माझ्या वडिलांच्या तोंडावर ते पसरवून टाका. माझ्या बाबांना दिसू लागेल. आणि तुम्ही सर्व कुटुंबासहित माझ्याकडं या.

९४) जेव्हा काफिला तेथून रवाना झाला. त्यांचे वडील (याकुब) म्हणाले, मला यूसुफचा सुगंध येतो. तुम्ही म्हणाल मला वेड लागलंय.

९५) खरंच. अल्लाहची शपथ! तुम्ही अजूनही जुनाट भ्रमात अडकलाय.

९६) नंतर जेव्हा खूशखबर देणारा आला आणि तो (सदरा) त्यांच्या चेहऱ्यावर पसरवला तेव्हा ते परत पाहू लागले नि म्हणाले, मी म्हणत

नव्हतो, की अल्लाहकरवी मला जी माहिती मिळते ती तुम्ही जाणत नाही.

९७) म्हणू लागले, बाबा! आमच्या पापासाठी क्षमायाचना करा. आम्ही नक्कीच गुन्हेगार आहोत.

९८) ते (याकुब अ.) म्हणाले, मी लवकरच माझ्या विधात्याशी तुमच्याकरिता क्षमा मागेन. तो फार क्षमा करणारा आणि दयावंत आहे.

९९) अशाप्रकारे ते जेव्हा यूसुफ (अ.) कडं येऊन दाखल झाले, त्यांनी आपल्या माता-पित्यांना स्वत:जवळ (राहायला) जागा दिली आणि म्हणाले, तुम्ही इजिप्तमध्ये प्रवेश घ्या. अल्लाहची इच्छा असल्यास तुम्ही निवांत राहाल.

१००) आणि आपल्या माता-पित्याना उच्चासनावर बसवलं आणि ते (लोक सन्मानार्थ) त्यांच्यासाठी नतमस्तक झाले. ते म्हणाले, बाबा, माझं ते पूर्वीचं स्वप्न असं साकार झालं. माझ्या पालनकर्त्यानं ते सिद्धीस नेलं. त्यानं मला तुरुंगातून काढून माझ्यावर (खरं तर) उपकारच केले. माझ्या आणि माझ्या भावांदरम्यान सैतानानं भांडणं लावून दिल्यानंतर, तुम्हा सर्वांना वाळवंटातून (इकडं) आणलं. माझा पालनकर्ता जे काही इच्छितो तो फारच कौशल्यानं घडवून आणतो. खरंच तो मोठा जाणकार आणि प्रतिभासंपन्न आहे.

१०१) माझ्या पालनकर्त्या! तू मला राज्य दिलं आणि घटनांमागचा अर्थ कळवला. हे आकाश आणि पृथ्वीच्या निर्माणकर्त्या, तूच माझा वाली आहेस, या जगात आणि परलोकातदेखील. मी आज्ञा पाळत असतानाच मला या जगातून उठव आणि सदाचारींमध्ये माझी वर्णी लाव.

१०२) हे तुम्ही पाहिलं ऐकलं नाही ते कथानक आहे जे त्यानं तुम्हास प्रकट केलं. ते जेव्हा एकत्रित येऊन कट रचत होते तेव्हा तुम्ही तिथं नव्हता.

१०३) तुम्ही काहीही करा, बरेचसे लोक श्रद्धा बाळगणार नाहीत.

१०४) तुम्ही तर त्यांना मोबदल्यात काही मागतसुद्धा नाही, कारण ही तर साऱ्या विश्वांकरिता उपदेश आहे.

१०५) आकाश आणि पृथ्वीत (अशा प्रकारचे) कितीतरी संकेत आहेत ज्यांचा त्यांना प्रत्यय येतो. पण ते त्यांच्याकडून तोंड फिरवतात.

१०६) त्यांच्यातली बरीचशी लोकं अल्लाहला मानत नाहीत. (कारण) ते अनेकेश्वरी आहेत.

१०७) त्यांच्यावर अल्लाहचा प्रकोप कोसळण्याची त्यांना भीती नाही? किंवा त्यांना सुगावाही न लागता अकस्मात प्रलय घडून जाईल.

१०८) त्यांना सांगा, हा माझा मार्ग हो, मी (तुम्हांस) अल्लाहकडं बोलवितो. मी आणि माझे अनुयायी ज्ञानावर आधारित (मार्ग अवलंबत) आहोत. अल्लाह पवित्र आहे. मी अनेकेश्वरीपैकी नाही.

१०९) आम्ही तुमच्या आधी अशा मानवांना पाठवलं ज्यांना आम्ही दिव्य प्रकटन दिलं. ते तुमच्या सान्निध्यात राहत होते. ते जमिनीत वावरले नाहीत, त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांचा अखेर कसा झाला ते पाहण्याकरिता? तुम्हाला समजत नाही परलोकातील ठिकाणच त्या लोकांसाठी उत्तम आहे, जे सदाचारी आहेत.

११०) जेव्हा प्रेषित निराश झाले आणि ते असे विचार करू लागले की त्यांना खोटं सांगण्यात आलं होतं तोच त्यांना आमची मदत झाली. ज्यांना वाचवायचं होतं त्यांना आम्ही वाचवलं, अपराधी जनसमूहाकडून आमचा प्रकोप कधी मागे वळत नाही.

१११) समंजस लोकांसाठी या बोधप्रद कथा आहेत, कपोलकल्पित गोष्टी नसून या पूर्वीच्या (ग्रंथांची) पुष्टी आणि सर्व गोष्टींचं वर्णन होय. आणि जे समूह ईमान धारण करतात (श्रद्धा बाळगतात) त्यांच्यासाठी मार्गदर्शन आणि कृपा.

-------

# १३. सूरह अर्रअद

**मदीनाकालीन, आयती ४३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ लाम मीम रा. या ग्रंथाची ही वचनं होय. तुमच्या विधात्यानं जी हक्कानं पाठवली आहेत, पण बहुतेक लोक विश्वास करत नाहीत.

२) तुम्ही पाहता अल्लाहच (आहे) ज्यानं कोणत्याही आधाराविना अवकाशास उभारलं, नंतर तो सिंहासनावर (अर्श) आरुढ झाला आणि सूर्य व चंद्रास अधीन केलं. सर्वांचं एका (विशिष्ट) कक्षेत एका ठराविक अवधीपर्यंत, तोच नियंत्रण करतो, आपले संकेत स्पष्ट करतो, तुम्ही त्याच्या भेटीविषयी विश्वास करावा म्हणून.

३) त्यानंच धरतीला विस्तारित केलं आणि तिच्यामध्ये पर्वतं उभी केलीत व नद्या (वाहिल्या) आणि सर्व प्रकारची फळं जोडीनं बनवली. दिवसावर रात्रीचं आवरण टाकतो. यामध्ये चिंतन करणाऱ्या लोकांस संकेत आहेत.

४) आणि धरतीवर वेगवेगळे भू-भाग आहेत. द्राक्षांच्या बागा आणि शेती, खजुरीची झाडं काही एकेरी, काही दुहेरी, एकाच पाण्यावर जगणारी आणि चवीच्या बाबतीत काहींना काहींपेक्षा आम्ही श्रेष्ठत्व देतो. निश्चितच यामध्ये समजुतदार लोकांसाठी संकेत आहेत.

५) आणि (असं असताना) त्यांचं असं आश्चर्यानं म्हणणं की एकदा माती झाल्यावर आम्ही नव्यानं कसं जन्म घेऊ, किती आश्चर्यजनक आहे? याच लोकांनी आपल्या विधात्याला नाकारलं, अशाच लोकांच्या मानांभोवती जोखड असेल. हेच लोक नरकाग्नीचे धनी ठरतील जिथं ते सदैव राहतील.

६) हे लोक भलाईपेक्षा वाईटाबाबत तुमच्याशी घाई करताहेत. त्यांच्यापूर्वी त्यांना बोध घेण्यासारख्या शिक्षा (लोकांना) झालेल्या आहेत. पण तुमचा विधाता लोकांनी अत्याचार घडवला असतानाही त्यांना क्षमा

करणारा आहे. तसंच तुमचा विधाता कठोर शिक्षाही देणारा आहे.

७) नाकारणारे लोक म्हणतात, त्याच्यावर त्यांच्या विधात्याकडून एखादा संकेत का अवतरला नाही? तुम्ही तर त्यांना सावध करणारे आहात. प्रत्येक समूहात एक मार्गदर्शन करणारा होऊन गेलाय.

८) प्रत्येक गर्भवतीच्या पोटात जे धारण करते ते अल्लाहला ठाऊक आहे आणि उदरात जे काही घटले आणि वाढले तेही. त्याच्याकडं प्रत्येक बाबींचे नियोजन आहे.

९) गुप्त आणि उघड सर्वकाही त्यास अवगत असतंय. तो श्रेष्ठ नि सर्वोच्च आहे.

१०) कुणी हळू बोलत असेल कुणी मोठ्यानं बोलतंय. रात्रीत लपलेलं असो की दिवसा संचार करणारं त्याला सर्व सारखेच आहेत.

११) माणसांच्या पुढं आणि मागं अल्लाहच्या आज्ञेनं त्याचे संरक्षण करणारे लावून दिलेत. कोणत्याही जनसमूहाच्या परिस्थितीत अल्लाह तोवर बदल करत नसतो जोवर ते स्वत:च बदल करत नसतात, अल्लाह जोवर एखाद्या जनसमूहाविषयी वाईट घडवण्याचं ठरवतो. मग त्याच्याव्यतिरिक्त कोणी मदत करू शकणार नाही.

१२) तुम्हांस विजेचा (कडकडाट करून) दाखवणारा तोच, तुमची भीती घालवण्यासाठी तसंच (तुमच्यात) उमेद जागवण्यासाठी पाण्यानं भरलेले ढगदेखील उचलतो.

१३) त्या गर्जना त्याच्या भीतीमुळं त्याचं स्तवन आणि गुणगान करतात. तसंच देवदूतदेखील. आणि कडकडणाऱ्या या विजा तो त्याच्या इच्छेस येईल त्यावर कोसळवतो. तरीदेखील हे (नाकारणारे लोक) अल्लाहच्या बाबतीत वाद घालतात. त्याची पकड अगदी कठोर आहे.

१४) त्याचा धावा केला जाणं त्याचा हक्क आहे. त्याला सोडून जे इतरांचा धावा करतात त्यांना ते कसलंही प्रतिसाद देत नाहीत. ज्या प्रकारे कुणी आपले हात पाण्याकडं लांबवतात, ते पाणी त्याच्या ओठापर्यंत

यावं म्हणून, पण तसं तो पोचत नाही. (त्याच प्रकारे) नाकारणाऱ्यांचा धावादेखील मार्गभ्रष्टतेपलीकडं काहीच नाही.

१५) अवकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही त्यांना आवडो न आवडो अल्लाहसमोर नतमस्तक होत असतात. तसंच त्यांच्या सावल्यादेखील सकाळ-संध्याकाळ तेच करतात.

१६) त्यांना विचारा, अवकाश आणि पृथ्वीचा विधाता कोण? सांगा अल्लाह(च). त्यांना विचारा, मग तुम्ही त्याला सोडून इतरांना आपलं संरक्षक कसं बनवता? ज्याच्याकडं स्वत:चं काही भलं-वाईट करून घेण्याची ऐपत नाही? त्यांना विचारा, आंधळे आणि डोळस सारखेच का? अंधार आणि प्रकाश सारखेच का? ज्यांना अल्लाहचे भागीदार बनवतात त्यांनी तसं काही निर्माण केलं जसं त्यानं (अल्लाहनं) निर्माण केलंय? आणि म्हणून निर्मितीची ती प्रक्रिया त्यांना संदिग्ध वाटू लागली? सांगा, अल्लाहच प्रत्येक वस्तूचा निर्माता आहे. तो एकमेव असून जबरदस्त आहे.

१७) त्यानं आकाशातून पाऊस पाडला, तेव्हा नदी-नाले आपापल्या क्षमतेप्रमाणं त्यास वाहून निघाले. पाण्यानं उसळण्यावर जसं पृष्ठभागावर फेस येतो तसंच दागिने आणि इतर वस्तू बनवण्यासाठी धातूंना वितळवतात तेव्हा अशाच प्रकारचा फेस येतो. अशा उदाहरणाद्वारे अल्लाह सत्य आणि असत्य विशद करून देतो. फेस आहे तो निघून जातो पण लोकांसाठी जे हिताचं असते ते जमिनीत टिकून राहतो. अशा रितीनं अल्लाह उदाहरणाद्वारे विवेचन करतो.

१८) ज्या लोकांनी आपल्या विधात्यास होकार दिला (त्याच्या आज्ञा पाळल्या) त्यांच्यासाठी सर्वकाही भलं आहे, पण ज्या लोकांनी त्यास नाकारलं त्यांच्यासाठी या धर्तीवर जे काही आहे अधिक तेवढाच आणखीन बदला (खंडणी) म्हणून जरी दिलं तरी (त्यांचा बचाव होणार नाही) त्यांना भयंकर हिशोब द्यावा लागेल. नरकच त्यांचं ठिकाण, वाईट असं ते ठिकाण असेल.

१९) तुमच्या विधात्यानं जे अवतरलंय ते सत्य असल्याची ज्याला जाणीव

आहे तो आंधळ्यासारखा होऊ शकतो का? ज्यांना समजतं त्यांनाच उपदेश लाभतो.

२०) जे अल्लाहला दिलेला शब्द पाळतात तसंच आपल्या कराराचा भंग करत नाहीत,

२१) अल्लाहनं जे (नातेसंबंध) जोडण्यास सांगितलंय त्यांना ते जोडून ठेवतात, ते आपल्या विधात्याशी भिऊन असतात आणि वाईट रितीनं त्यांना (हिशोब द्यावा लागू नये) याची चिंता लागून असते.

२२) ज्या लोकांनी आपल्या विधात्याच्या प्रसन्नतेखातर सातत्यानं धीर धरला, नमाज कायम केली आणि आम्ही दिलेल्या साधनांतून खर्च केला, मग (तो) उघड असो की गुप्त. आणि जे लोक भलाईद्वारे वाईट टाळतात त्यांच्यासाठीच परलोकाचं निवास असेल.

२३) शाश्वत स्वर्ग आहेत, त्यामध्ये ते प्रवेश पावतील. आणि त्यांचे वाडवडील, त्यांचे सहचर आणि त्यांच्या मुलांपैकी जे नेक असतील ते. आणि प्रत्येक दारानं देवदूत त्यांच्याकडं येतील.

२४) तुम्हांस शांतता लाभो (म्हणत ते अभिवादन करतील) कारण तुम्ही संयमाने वागलात. किती उत्तम देणगी ही परलोकाच्या निवासाची.

२५) आणि जे लोक अल्लाहशी पक्के वचन करून त्या करारास मोडून टाकतात आणि जे जोडण्याचा अल्लाहनं आदेश दिलेत ते तोडून टाकतात, धरतीवर अनाचार माजवतात त्यांचा धिक्कार आहे अल्लाहकडून. आणि त्यांचं वाईट असं ठिकाण आहे.

२६) ज्यांना इच्छितो त्यांना अल्लाह विपुल प्रमाणात साधनं बहाल करतो आणि इच्छितो त्यांना तोकडी साधनं देतो. ते लोक या जगातल्या जीवनावरच आनंद मनतात, पण परलोकाच्या तुलनेत जगातल्या जीवनाचं काय ते मोल?

२७) नाकारणारे लोक म्हणतात, त्यांच्यावर त्यांच्या विधात्याकडून काही संकेत का अवतरित झाले नाहीत? त्यांना सांगा, इच्छितो त्यांना

अल्लाह मार्गभ्रष्ट करतो आणि जे त्याच्याकडं रुजू होतात त्यांना आपल्याकडं मार्गदर्शन करवतो.

२८) ज्या लोकांनी श्रद्धा बाळगली त्यांच्या मनांना अल्लाहच्या आठवणीनं समाधान होतं आणि लक्षात ठेवा, अल्लाहच्या आठवणींमुळेच मनाला समाधान लाभते.

२९) श्रद्धा व्यक्त करून जे लोक नेक कर्म करतात त्यांच्यासाठी प्रसंन्नता आणि सुंदर असं ठिकाण आहे.

३०) अशा रितीनं आम्ही तुम्हांस एका लोकसमूहात पाठवलंय. याआधीही असे लोकसमूह होऊन गेलेत. आम्ही तुम्हांस अनुभूतीद्वारे जे पाठवलंय ते तुम्ही त्यांना वाचून दाखवण्यासाठी, तरीही ते असीम कृपावंताला नकारतात. त्यांना सांगा, तोच माझा विधाता. त्याच्याव्यतिरिक्त कुणीही ईश्वर नाही. मी त्याच्यावरच विश्वास टाकला आणि त्याच्याकडंच वळतो (रुजू होतो).

३१) जर असा एखादा कुरआन असता ज्यामुळे पर्वतांचं चालू लागणं, जमिनीचं दुभंगणं आणि मृतांनी बोलणं शक्य असतं, पण सर्व प्रकरणांचा अधिकार अल्लाहकडंच आहे. मग श्रद्धावंतांना याचं समाधान नाही? की अल्लाहला वाटलं असतं तर त्यानं सर्वांचं मार्गदर्शन घडवलं असतं. पण ज्या लोकांनी विश्वास ठेवला नाही त्यांना त्यांच्या कृत्यांमुळं पोचणाऱ्या संकटांचा कधी अंत नसेल किंवा त्यांच्या दारांपर्यंत ती येऊन कोसळतील, अल्लाहचं वचन प्रत्यक्षात येईपर्यंत. आणि निश्चितच अल्लाह आपल्या वचनांविरूद्ध वागत नसतो.

३२) तुमच्या पूर्वीच्या प्रेषितांचीही थट्टा केली गेली. ज्यांनी बंड केलं त्यांना मी ढील दिली आणि मग मी त्यांना धरलं. किती (भयानक) माझी ती शिक्षा?

३३) प्रत्येकानं जीवनात काय कमवलं यावर तो नजर ठेवतो (तो इतरांसारखा होऊ शकतो?) आणि त्यांनी अल्लाहचे भागीदार बनवले. त्यांना

त्यांची नावं तर विचारा किंवा तुम्ही (अल्लाहला) पृथ्वीमधील त्यास ते दाखवता जे त्यांच्या माहितीत नाही अथवा हे फक्त वरवरचं म्हणणं आहे. पण आम्ही नाकारणाऱ्या लोकांसाठी त्यांच्या युक्त्या मोहक बनल्या गेल्या आणि त्यांना (रास्त) मार्गापासून रोखलं गेलं. आणि ज्यांना अल्लाहनं मार्गभ्रष्ट केलं त्यांना कुणी वाट दाखवणारा नाही.

३४) त्यांच्यासाठी या जगातल्या जीवनात यातना आहेतच आणि परलोकात तर त्यांना आणखीन कठोर शिक्षा असेल. अल्लाहपासून त्यांना कुणी वाचवणार नाही.

३५) ज्या स्वर्गाचं सदाचारी लोकांना वचन दिलंय ती अशी आहेत ज्यांच्या खालून नद्या वाहतात, तिथं कायमचा आहार आहे आणि सावलीदेखील. हा सदाचारी लोकांचा परिणाम आणि नाकारणाऱ्यांची परिणती नरकाग्नी आहे.

३६) आम्ही ज्या लोकांना ग्रंथ दिला (त्यामध्ये) तुमच्यावर जे अवतरलंय त्यावर प्रसन्न आहेत आणि काही लोक त्यामधील काही (गोष्टींचा) इन्कार करतात. त्यांना सांगा, मला यापेक्षा अधिक काही सांगितलं गेलं नाही. मी अल्लाहची आराधना करतो आणि कुणास त्याचा भागीदार जोडत नाही. मी त्याच्याकडंच बोलवतो आणि तोच माझं ठिकाण.

३७) आम्ही हे निर्णायक संभाषण अरबी भाषेत अवतरलं. तुमच्याकडं ज्ञान पोचल्यानंतर देखील जर तुम्ही त्यांच्या इच्छा-आकांक्षांचे पालन केले तर मग अल्लाहविरूद्ध तुमची कोण मदत करणारा नसेल की बचाव करणारा नसेल.

३८) आम्ही तुमच्यापूर्वी देखील प्रेषित पाठवलेत. आम्ही त्यांच्यासाठी पत्नी बनविल्या, त्यांना मुलंबाळं दिलीत. कोणत्याही प्रेषिताला अल्लाहच्या अनुमतीशिवाय एखादा संकेत आणण्याचा (अधिकार) नाही. प्रत्येक युगासाठी एक ग्रंथ आहे.

३९) अल्लाह आपल्या मर्जीप्रमाणं (त्यातलं) काही नाहीसं करतो तर काही कायम ठेवतो. आणि मूळ ग्रंथ त्याच्यापाशीच आहे.

४०) आम्ही त्यांना दिलेल्या वचनांचा काही भाग (शिक्षा) तुम्हाला दाखवायचं अथवा तुम्हांस मरण द्यायचं काम आमचं आहे. तुमच्यावर फक्त ते त्यांना पोचतं करणं आहे. हिशोब घेणं आमचं काम.

४१) आम्ही धरतीला तिच्या परिसीमांपासून घटवत आहोत, हे ते पाहत नाहीत. अल्लाहच निर्णय लावतो आणि त्याचा निर्णय कुणी परतवू शकत नाही. आणि हिशोब घेण्यास तो तत्पर आहे.

४२) त्यांच्या आधी होऊन गेलेल्या लोकांनी योजना आखल्या, पण सर्व योजना अल्लाहचीच. प्रत्येक जीव जे कमवितो ते त्यास ठाऊक आहे आणि नाकारणाऱ्यांना लवकरच कळून चुकेल की शेवटचं ठिकाण कुणास लाभणार.

४३) नाकारणारे लोक म्हणतात, तुम्ही प्रेषित नाही. माझ्या आणि तुमच्या बाबतीत अल्लाहची साक्ष पुरेशी आहे आणि ज्यांच्याकडं अल्लाहचा ग्रंथ आहे (ते.)

-------

# १४. सूरह इब्राहीम

**मक्काकालीन, आयती ५२**

**पारा - १४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ लाम राऽ हा ग्रंथ आम्ही तुम्हांवर अवतरला, तुम्ही लोकांना अंधकारातून प्रकाशाकडं न्यावं यासाठी, त्यांच्या विधात्याच्या आज्ञेनुसार, सर्वोच्च स्तुतीस पात्र (अल्लाहच्या) च्या मार्गाकडे.

२) तो अल्लाह ज्याच्यासाठी अवकाश आणि पृथ्वीवरील सर्वकाही आहे. आणि नाकारणाऱ्यांना वाईट प्रकारची कठोर शिक्षा आहे.

३) तसंच ज्यांना परलोकापेक्षा जगातल्या जीवनाचीच जास्त आवड आहे, आणि जे अल्लाहच्या मार्गापासून (इतरांना) अटकाव करतात आणि त्यामध्ये त्रुटी शोधतात. हेच लोक मार्गभ्रष्टतेत ते लांबवर गेलेत.

४) आम्ही प्रेषितांना त्यांच्या लोकांच्या भाषेतच पाठवलं, त्यांनी त्यांना स्पष्ट करून देण्यासाठी. ज्यांना इच्छितो अल्लाह त्यांना मार्गभ्रष्ट करतो आणि इच्छितो त्यांना मार्गदर्शन घडवतो. तोच वर्चस्वसंपन्न आणि प्रतिभासंपन्न आहे.

५) आम्ही मूसा (अ.) यांना आमच्या वचनांसह त्यांच्या लोकांकडं पाठवलं त्यांनी आपल्या लोकांना अंधकारातून प्रकाशाकडं काढून आणावं म्हणून आणि त्यांना अल्लाहच्या (ऐतिहासिक) घटनांची आठवण करून देण्यास, निश्चितच त्यामध्ये संयमानं वागून आभार मानणाऱ्यांसाठी संकेत आहेत.

६) मूसा यांनी आपल्या लोकांस सांगितलं, तुमच्यावरील अल्लाहचं वरदान आठवा, जेव्हा त्यानं तुम्हांस फिरऔनच्या लोकांपासून मुक्त केलं ते तुम्हाला मोठी शिक्षा देत असत, तुमच्या मुलांची हत्या करीत, तर तुमच्या मुलींना ते जगू देत. यात तुमच्या विधात्याकडून मोठी परीक्षा

होती.

७) आणि आठवा जेव्हा तुमच्या विधात्यानं जाहीर केलं तुम्ही कृतज्ञ राहिलात तर मी आणखीन देईन, पण जर तुम्ही कृतघ्न झालात तर मग माझी शिक्षा कडक असेल.

८) मूसा म्हणाले, तुम्ही आणि धरतीवरील सर्वांनी एकत्रित होऊन कृतघ्नता दाखवली तरी अल्लाह निरपेक्ष आहे आणि स्तुतीस पात्र आहे.

९) तुमच्या आधीच्या लोकांचा अहवाल तुम्हाला पोहोचला नाही? नूहच्या लोकांचा, आद आणि समूद यांच्या? आणि त्यांच्या नंतरची लोकं, ज्यांच्या बाबतीत अल्लाहशिवाय कुणासच माहिती नाही. प्रेषितं संकेतं घेऊन त्यांच्याकडं आलेत त्यांनी आपल्या तोंडावर आपले हात ठेवले आणि सांगितलं, तुमच्याबरोबर जे पाठवलं गेलंय ते आम्ही मानीत नाही. तुम्ही ज्याच्याकडं आम्हास बोलविता त्याबाबत आम्ही साशंक आहोत, संभ्रमात आहोत.

१०) त्यांच्या प्रेषितांनी सांगितलं, आकाश आणि पृथ्वी बनवणाऱ्या अल्लाहच्या बाबतीत तुम्हाला शंका वाटते तो तुम्हास बोलवितो अपराध्यांना क्षमा करण्यासाठी. एका ठराविक अवधीसाठी तुम्हांस सवड देईल. त्यांनी उत्तर दिलं, तुम्हीदेखील आमच्यासारखंच माणूस, आणि आमचे पूर्वज ज्यांची भक्ती करीत त्यांपासून तुम्ही आम्हांस रोखू पाहता? मग तुम्ही स्पष्ट असा दाखला घेऊन या.

११) त्यांच्या प्रेषितांनी त्यांना सांगितलं, आम्ही नक्कीच तुमच्यासारखी माणसं आहोत. पण अल्लाह इच्छितो अशा त्यांच्या भक्तांवर उपकार करतो अल्लाहच्या आज्ञेविना काही स्पष्ट दाखलं आणणं आमचं काम नव्हे आणि जे विश्वासू असतात ते अल्लाहवरच विश्वास ठेवतात.

१२) आणि अल्लाहवर विश्वास न ठेवण्यास आम्हाला काय झालंय? त्यानं आम्हास आमचा मार्ग दाखवला आणि तुम्ही आम्हांस जी इजा पोचवता ती आम्ही धैर्यानं सोसू. आणि भरवसा करणाऱ्यांस अल्लाहवरच भिस्त ठेवायला हवी.

१३) नाकारणारे लोक आपल्या प्रेषितांना म्हणाले, आम्ही तुम्हास या भूमीतून बाहेर घालवूनच देऊ अथवा तुम्ही आमच्या धर्मामध्ये परत या, तेव्हा त्यांच्या विधात्यानं त्यांना (प्रेषितांना) अनुभूतीद्वारे कळवलं, आम्ही अत्याचाऱ्यांना नक्कीच नष्ट करणार आहोत.

१४) आणि त्यांच्यानंतर आम्ही त्या भूमीत तुमचं पुनर्वसन करून देऊ. हे त्यांच्यासाठी (वचन आहे) जे माझ्यासमक्ष उभं राहण्यास भितात तसंच आमच्या तंबीला भितात.

१५) त्यांनी विजयासाठी प्रार्थना केली. आणि प्रत्येक हट्टी वैफल्यानं ग्रासला.

१६) शिवाय नरक आहे, त्यांना पाण्याऐवजी पू पाजले जाईल.

१७) ते घोट घेतील, पण तो घशात उतरवू शकणार नाहीत. त्यांना मृत्यु चहुबाजूंनी वेढा घालील, पण ते मरणार नाहीत. याशिवाय त्यांना कठोर शिक्षा असेल.

१८) ज्या लोकांनी आपल्या विधात्याशी बंड केलं त्यांची कृत्यं राखेसारखी आहेत. वादळ आलं, जोरदार वारं वाहू लागलं (की उडून गेले) त्यांनी जे कमवलं त्यापैकी कशावरही त्यांना ताबा मिळणार नाही, हे पराकोटीचं भरकटणं आहे.

१९) तुम्ही पाहिलं नाही, अल्लाहनं आकाश आणि धरती हक्कानं निर्माण केली. त्याला वाटल्यास तुम्हाला घालवून एखादी नवी निर्मिती घडवेल.

२०) अल्लाहसाठी हे काही अवघड नाही.

२१) ते सर्व अल्लाहसमोर एकत्रित होतील आणि जे दुर्बल लोक आहेत ते उद्धट लोकांना म्हणतील, आम्ही निश्चितच तुमच्या पाठोपाठ चालत होतो, तेव्हा तुम्ही अल्लाहच्या शिक्षेस आमच्यापासून काही प्रमाणात तरी दूर करू शकता? ते म्हणतील अल्लाहनं आम्हास मार्ग दाखवला असता तर आम्हीही तुम्हाला मार्ग दाखवला असता, आता आम्ही आक्रोश करू अथवा आम्ही धीर धरू दोन्ही सारखेच. आमची सुटका नाही.

२२) निर्णय लागल्यावर सैतान म्हणेल, अल्लाहनं जे वचन दिलं होतं निश्चितच ते वचन सत्य ठरलं. मीही वचन दिलं होतं पण त्याच्याविरूद्ध गेलो. माझा तुमच्यावर कोणताच अधिकार नव्हता, पण मी तुम्हाला बोलवलं. तुम्ही माझं ऐकलंत. आता मला दोष देण्यापेक्षा तुम्ही स्वत:सच दोष द्या. मी तुमची विनवणी ऐकू शकत नाही की तुम्ही माझं आर्जव ऐकू शकता. तुम्ही मागे मला भागीदार केलं ते मी नाकारतो. अपराधी लोकांना खरंच यातनादायक शिक्षा आहे.

२३) आणि श्रद्धा बाळगत सत्कर्म करणाऱ्यासाठी स्वर्ग आहे. जिथं नद्या वाहतात तिथं ते त्यांच्या विधात्याच्या आज्ञेनं सदैव राहतील. तिथं त्यांचं सलाम म्हणत (शांतता लाभो) अभिवादन होईल.

२४) अल्लाह कसं उदाहरण देतो तुम्ही पाहिलंत? पवित्र वचनं (शब्द) एका पवित्र (चांगल्या) वृक्षासमान आहे. त्याची मुळं घट्ट असतात आणि फांद्या आकाशाला भिडलेल्या असतात.

२५) अल्लाहच्या आज्ञेनं तो सर्वकाळ आपली फळं देतो आणि अल्लाह लोकांना अशी उदाहरणं देत असतो, ते त्यांना उपदेश घडावा म्हणून.

२६) आणि वाईट शब्द वाईट वृक्षासमान असतात, ज्यांना जमिनीवरूनच उपटलं गेलं असेल. त्यास स्थैर्य नसते.

२७) दृढ वचनानं अल्लाह श्रद्ध लोकांना बळकटी देतो. या जगातल्या जीवनात तसंच परलोकातदेखील. आणि अपराधींना अल्लाह भरकटत ठेवतो. अल्लाह मर्जीस येईल ते करतो.

२८) ज्या लोकांनी अल्लाहची संपन्नता कृतघ्नतेनं बदलून टाकली आणि आपल्या लोकांना विनाशाच्या खाईत लोटून दिलं. त्यांना तुम्ही पाहिलं नाही?

२९) ते नरक आहे जिच्याशी भिडतील आणि ते वाईट ठिकाण आहे.

३०) त्यांनी अल्लाहबरोबर भागीदार बनवले त्यांना त्यांच्या मार्गापासून भरकटण्यासाठी. त्यांना सांगा, मौज करा तुमचं परतणं नरकातच आहे.

३१) आमच्या श्रद्ध भक्तांना नमाज कायम करण्यास सांगा आणि आम्ही त्यांना पुरविलेल्या साधनांतून गुप्त रितीनं अथवा जाहीरपणे खर्च करण्यास, त्या दिवसापूर्वी ज्या दिवशी आपसांत व्यवहार साधता येतील न मैत्री.

३२) अल्लाहनं आकाश आणि पृथ्वीची निर्मिती केली. आकाशातून पाऊस वर्षवला. त्यापासून तुमच्या उपजीविकेसाठी फळे काढली. नौका तुमच्या ताब्यात दिली त्याच्या आदेशानुसार समुद्रात संचार करण्यास आणि नद्यांना तुमच्या स्वाधीन केलं.

३३) आणि सूर्य व चंद्रही तुमच्या अधीन केले, एका नियमाचं ते पालन करतात. तसंच रात्र आणि दिवसही तुमच्या अधीन केले.

३४) तुम्ही मागितलं ते सर्वकाही दिलं, तुम्ही अल्लाहच्या देणगींची गणती करू लागलात तर तुम्ही ती गणना पूर्ण करू शकणार नाही. खरंच माणूस मोठा अन्यायी आणि कृतघ्न आहे.

३५) जेव्हा इब्राहीमनं विनंती केली ती आठवा, 'हे माझ्या विधाता, या शहरास शांततेचं स्थळ बनव आणि मला व माझ्या मुलांना मूर्तीपूजेपासून लांबच राहू दे.'

३६) हे माझ्या विधाता, निश्चितच त्यांनी पुष्कळ लोकांस मार्गभ्रष्ट केलं, पण ज्यांनी माझं पालन केलं ते माझ्यापैकी, आणि ज्यांनी माझी अवज्ञा केली तर तू कृपाळू आणि क्षमाशील आहे.

३७) आमच्या विधात्या, 'मी माझ्या संततीपैकी काहींना वाळवंट खाईत वसवलं, पवित्र गृहाच्या सान्निध्यात त्यांनी नमाज कायम करावी म्हणून. तेव्हा लोकांच्या मनात असं काही भर की त्यांनी तुझ्याकडं वळावं. त्यांच्या उपजीविकेस फळ दे, ते कृतज्ञ होतील?

३८) आमच्या विधात्या, आम्ही जे लपवितो आणि उघड करतो ते तुला माहीत असतं. धरतीवरील व आकाशातील एकही वस्तू अल्लाहपासून लपलेली नाही.

३९) सर्व प्रशंसा अल्लाहसाठीच, ज्यानं मला वृद्धावस्थेत इस्माईल आणि इसहाक बक्षीस म्हणून दिलेत. खरंच माझा विधाता याचना ऐकणारा आहे.

४०) माझ्या विधाता, मला नि माझ्या मुलांना नमाज कायम करणारे बनव. आमचा विधाता याचना ऐकणारा आहे.

४१) आमच्या विधात्या, हिशोब घेतला जाईल त्या दिवशी मला क्षमा कर. माझ्या माता-पित्यांना आणि श्रद्धाळूंनादेखील. माझ्या विधात्या, माझ्या प्रार्थना स्वीकार कर.

४२) जे अत्याचार माजवीत आहेत त्यांच्याकडं अल्लाहचं लक्ष नसेल असा विचार तुम्ही करू नका. तो त्यांना ज्या दिवसापर्यंत त्यांचे डोळे उघडेचे उघडेच राहतील तोवर सवड देतो.

४३) आपलं डोकं वर उचलून ते धावत सुटतील, त्यांच्या नजरा परतणार नाहीत, ते हवालदिल झालेले असतील.

४४) ज्या दिवशी आपत्ती कोसळेल त्या दिवसापासून लोकांना सावध करा, अत्याचारी लोकं म्हणतील, आमच्या विधाता, आम्हांस काही वेळ उसंत दे, आम्ही तुझे निमंत्रण स्वीकारू आणि प्रेषिताचं पालन करू. तुम्ही यापूर्वी शपथा वाहत नव्हता, आमचं पतन होणार नाही म्हणून?

४५) तुम्ही त्यांच्याच घरात राहत होता ज्यांनी स्वतःवर अत्याचार ओढवून घेतले होते, आम्ही त्यांच्याशी केलेला व्यवहार तुम्हावर उघड झाला होता. आम्ही तुम्हास उदाहरणादाखल हे वर्णन केलं.

४६) त्यांनी कट केले, ते अल्लाहच्या नजरेत आहेत, जर त्यांचे कट तर डोंगर हलवू शकणारे होते.

४७) अल्लाह प्रेषितांना दिलेल्या शब्दांपासून मागे फिरणार असा तुम्ही विचार बाळगू नका. अल्लाह प्रतिकार करण्याचं सर्व सामर्थ्य बाळगतो.

४८) एके दिवशी ही पृथ्वी दुसऱ्या पृथ्वीत बदलली जाईल आणि आकाशदेखील आणि ते सारेचे सारे एकमेव आणि सर्वशक्तिमान

अल्लाहसमोर हजर होतील.

४९) त्या दिवशी तुम्हाला अपराधी साखळदंड घातलेले दिसतील.

५०) त्यांची वस्त्रं काळ्या पदार्थांची (डांबराची) असून त्यांचे चेहरे आगीनं झाकलेले असतील.

५१) हे प्रत्येक जिवानं कमवलेल्याची कर्मांची परतफेड म्हणून. निश्चितच अल्लाह हिशेब चुकता करण्यात तत्पर आहे.

५२) हा (कुरआन) मानवजातीसाठी एक संदेश आहे. त्यांना ताकीद घडावी आणि तोच एकमेव ईश्वर आहे हे त्यांना कळावं यासाठी. तसेच समंजस लोकांनी त्यापासून बोध घ्यावा म्हणून.

-------

# १५. सूरह हिज्र

**मक्काकालीन, आयती ९९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलीफ लाम राऽ या आयती (वचनं) देदीप्यमान अशा कुरआन ग्रंथातील आहेत.

२) नाकारणाऱ्या लोकांनाही कधी कधी असे उत्कटतेनं वाटते की ते आज्ञाधारक असते.

३) पण सोडा त्यांना खाऊ-पिऊ द्या, मौज-मस्ती करू द्या आणि त्याच्या आकांक्षांनी त्यांना भुलवू द्या. त्यांना लवकरच कळून चुकेल.

४) आम्ही कोणत्याही वस्तीचा (उगाच) विध्वंस केला नाही त्याची वेळ ठरवलेली होती.

५) आणि कोणतेही लोकसमूह ठरवलेल्या मुदतीपलीकडं जगू शकत नाहीत की मागंही राहू शकत नाहीत.

६) ते (नाकारणारे लोक) म्हणाले, अहो तुम्ही! ज्याच्यावर कुरआन अवतरला तुम्ही तर वेडसर आहात.

७) तू खरा असशील तर आमच्याकडं देवदूतांना का बरं आणीत नाहीस?

८) आम्ही देवदूतांना पाठवत नसतो, पण सत्याधिष्ठित रितीनं आणि मग त्यांना सवड नाही दिली जाणार.

९) होय, आम्ही ही शिकवण (कुरआन) पाठवली आहे आणि आम्हीच तिचं जतन करू.

१०) आम्ही तुमच्या आधीही पूर्वीच्या समूहामध्ये प्रेषित पाठवलेत.

११) पण त्यांच्याकडं असा कोणताही प्रेषित आला नाही ज्याची त्यांनी थट्टा केली नसेल.

१२) आम्ही अपराधी लोकांच्या मनात ते भिनवलंय.

१३) नाही ते विश्वास करणार यावर (कुरआनवर), त्यांच्या पूर्वीच्यांनी हाच पायंडा घातलाय.

१४) आम्ही त्यांच्यासाठी आकाशाचं एखादं दार जरी उघडं केलं तरी ते त्यातून वर जाऊ लागले

१५) तरीही ते म्हणत राहतील आमचे डोळे धुंद केले गेले नि एक प्रकारची ही जादूच आहे.

१६) आम्ही आकाशात राशीमंडळ उभारलेत पाहणाऱ्यांस मोहक असे.

१७) आणि आम्ही शापित सैतानापासून त्याचे रक्षण केलं.

१८) कुणी चोरून ऐकण्याचा प्रयत्न केला तर तेजस्वी भडका त्याचा पाठलाग करतो.

१९) आम्ही धरती विस्तारली तिच्यात पर्वत रोवले आणि तिच्यात सर्व योग्य वनस्पती उगविल्या.

२०) आम्ही तिच्यात तुमची आर्थिक साधनं बनवली आणि त्यांच्या उदरनिर्वाहाचीही तरतूद केली ज्यांची तुम्ही करत नाही (त्यांनाही)

२१) अशी कोणती वस्तू नाही जिचे खजिने आमच्याकडं नसतील. आम्ही त्यांना ठराविक प्रमाणात अवतरतो.

२२) आम्ही बीजधारक वारे वाहिले आणि आकाशातून पाऊस वर्षवला. तुम्हास पिण्यासाठी तसा साठा तुमच्याकडं नव्हता.

२३) आम्हीच जीवन देतो व मरणही देतो आणि सर्वांचे वारसदार आम्हीच आहोत.

२४) तुमच्यापूर्वी जे (लोक) होऊन गेले ते आम्हांस ठाऊक आहेत आणि तुमच्या मागे कोण (असतील) तेही आम्हास ठाऊक आहेत.

२५) तुझा विधाताच त्या सर्वांना एकत्रित करील, तो सर्वज्ञ प्रतिभासंपन्न आहे.

२६) आम्ही मानवाची निर्मिती भाजलेल्या मातीपासून केली.

२७) आणि त्यापूर्वी जिन्नांना अग्नीच्या मूलभूत तत्त्वाद्वारे निर्माण केलं.

२८) मग जेव्हा तुझ्या विधात्यानं दूतांना सांगितलं, मी मानवाला भाजलेल्या मातीपासून निर्माण करणार आहे.

२९) त्यास सावरून त्याच्यात माझ्या चैतन्याची फुंकर घालेन तेव्हा त्यास नतमस्तक व्हा.

३०) आणि मग सर्व दूत त्यास नतमस्तक झाले.

३१) इब्लिस वगळता, त्यानं नाकारलं, त्यांच्याबरोबर नतमस्तक होण्यास.

३२) (अल्लाहनं) विचारलं, इब्लिस का बरं तू नतमस्तक होणाऱ्यांबरोबर नाहीस?

३३) तो म्हणाला, नाही. मी मानवांसमोर झुकणार नाही. त्याला तू भाजलेल्या मातीपासून निर्मिलंय.

३४) अल्लाह म्हणाला, निघून जा इथून. तू शापित आहेस.

३५) कयामतच्या दिवसापर्यंत तुझा धिःक्कार आहे.

३६) तो (इब्लिस) म्हणाला, माझ्या विधाता! मला सवड दे मृतांना पुन्हा उठवलं जाईल तोवर.

३७) अल्लाहनं सांगितलं, होय! तुला सवड दिली.

३८) ठरवलेल्या वेळेपर्यंत.

३९) (इब्लिस) म्हणाला, माझ्या विधाता! जसे तू मला चुकीच्या मार्गी लावलंस, मीही नक्कीच या धरतीवरील (सारंकाही) आकर्षक करीन आणि त्या सर्वांना पथभ्रष्ट करून टाकीन.

४०) पण जे तुला वाहून घेतलेले असतील अशा भक्तांना सोडून.

४१) अल्लाहनं सांगितलं, हा रास्त मार्ग सरळ माझ्यापर्यंत पोहोचतो.

४२) निश्चितच ते माझे भक्त आहेत. तुझा त्यांच्यावर काहीही अधिकार नाही. पण ज्यांनी मार्गभ्रष्ट होऊन तुझं पालन केलं त्यांना सोडून.

४३) आणि त्या सर्वांना (माझं) वचन आहे नरकाचं.

४४) त्यांस सात दरवाजे आहेत, प्रत्येक दार निश्‍चित टोळीस विभागलेला आहे.

४५) सदाचारी लोक मात्र झरे असलेल्या बागांमध्ये वावरतील.

४६) तुम्ही त्यामध्ये शांतता आणि सुरक्षिततेनं दाखल व्हा.

४७) आम्ही त्यांच्या मनामधील सर्वकाही कपटवगैरे काढून टाकलं. आता ते भाऊ-भाऊ म्हणून एकमेकांच्या समोर आसनांवर बसतील.

४८) आता त्यांना कोणतंही संकट स्पर्शही करणार नाही की ना त्यांना तिथून काढलं जाईल.

४९) माझ्या भक्तांना सूचना द्या, मी निश्‍चित क्षमाशाली आणि कनवाळू आहे.

५०) तसंच माझी शिक्षादेखील यातनादायक असते.

५१) त्यांना इब्राहीम (अ.) यांच्या पाहुण्यांचं वर्णन सांगा.

५२) ते (दूत) त्यांच्याकडं सलाम (अभिवादन) म्हणत दाखल झाले, ते इब्राहीम म्हणाले, मला भीती वाटते.

५३) ते (देवदूत) म्हणाले, भिऊ नका. आम्ही तुम्हास एका ज्ञानी पुत्राची खूशखबर देत आहोत.

५४) ते (इब्राहीम) म्हणाले, मला वृद्धापकाळानं ग्रासलं असता तुम्ही ही खूशखबर देता, पण कशाची ती सुवार्ता तुम्ही देता?

५५) ते म्हणाले, आम्ही सत्य आहे तेच सुवृत्त देतो. तुम्ही निराश नका होऊ.

५६) त्यांनी (इब्राहीम यांनी) उत्तर दिलं, आपल्या विधात्याच्या कृपेनं कोण निराश होईल, मार्गभ्रष्टांना सोडून?

५७) त्यांनी (इब्राहीम) विचारलं, कोणत्या मोहिमेवर तुम्ही पाठवले गेलात?

५८) त्यांनी (दूतांनी) उत्तर दिलं, आम्हास (एका) अपराधी समूहाकडं पाठवलं गेलंय.

५९) लूतच्या घराण्याला सोडून, आम्ही त्या सर्वांना वाचवणार आहोत

६०) त्यांची पत्नी वगळता. आमच्या अंदाजानुसार ती मागे राहणाऱ्यांपैकी असेल.

६१) मग जेव्हा हे दूत लूतच्या घराण्याकडं आले

६२) तोच ते म्हणाले, निश्चितच तुम्ही उपरे आहात.

६३) दूत म्हणाले, आम्ही तुमच्याकडं आलोय, ज्या (शिक्षे) संबंधी ते साशंक होते त्याविषयी.

६४) आमचं येणं सत्याधिष्ठित आहे आणि आम्ही खरं तेच सांगतो.

६५) आपल्या घरच्यांना घेऊन तुम्ही रात्रीचा काही भाग उरला असता निघा. स्वत: त्यांच्या मागं मागं चला. तुमच्यापैकी कुणी मागं वळून पाहू नका. तुम्हाला सांगितलं गेलं त्यानुसारच जा.

६६) आम्ही त्यांच्याकडं निर्णय पाठवून दिला की पहाट होताच त्यांना समूळ नष्ट केलं जाईल.

६७) आणि तिकडं शहराची माणसं हौसेनं पुढं आली.

६८) लूत (अ.) म्हणाले, ही माझी पाहुणेमंडळी आहे. तुम्ही माझी फजिती करू नका.

६९) अल्लाहची भीती बाळगा, मला अपमानित करू नका.

७०) ते (लोक) म्हणाले, आम्ही तुम्हास साऱ्या जगाचा पुरस्कार करण्यास मनाई केली नाही?

७१) ते (लूत) म्हणाले, या माझ्या मुली (लग्नास) घ्या, तुम्हास काही करावयाचं झाल्यास.

७२) (हे प्रेषित!) तुझ्या जिवाची शपथ! हे लोक आपल्या धुंदीतच मग्न होते.

७३) पण (पाहा) सूर्योदय होताच त्यांना एका (भयंकर) गर्जनेनं धरलं.

७४) आम्ही ती वस्ती उलथापालथ करून टाकली आणि त्यांच्यावर दगडांचा मारा केला.

७५) नक्कीच यात चिंतन करणाऱ्यांस संकेत आहेत.

७६) ती वस्ती थेट महामार्गावर होती.

७७) यात निष्ठावान लोकांसाठी संकेत आहेत.

७८) अरण्यातील लोक (शुऐब (अ.) यांच्या मदयनमधली) सुद्धा अपराधीच होते.

७९) म्हणून आम्ही त्यांचा बदला घेतला आणि त्या दोन्ही (वस्त्या) एका खुल्या महामार्गावर आहेत.

८०) नक्कीच हिज्रच्या लोकांनीही प्रेषितांना खोटं ठरवलं.

८१) त्यांना आम्ही आमची संकेतं दिलीत, पण त्यांनी तोंड फिरवलं.

८२) अभयच्या दृष्टीनं ते पर्वत कोरून निर्भयपणे घरे बनवीत.

८३) सकाळ होता एका मोठ्या गर्जनेनं त्यांनाही गाठलं.

८४) त्यांनी जे कमवलं होतं ते त्यांच्या काही कामी आलं नाही.

८५) आणि आम्ही आकाश आणि पृथ्वी आणि त्यामधील सर्व सत्याधिष्ठित निर्माण केले. ती घटिका (कयामत) येणारच आहे, तेव्हा (हे प्रेषिता!) तुम्ही उदार मनानं त्यांच्या (दोषांना) नजरेआड करा.

८६) तुमचा विधाता निर्माणकर्ता असून ज्ञानी आहे.

८७) आणि (प्रेषित) आम्ही तुम्हास वारंवार उच्चारावयाची सात (वचनं) दिलीत. ('अल-फातेहा' अध्याय) तसंच भव्य-दिव्य (असं) कुरआन दिले.

८८) तेव्हा आम्ही त्यांच्यापैकी विभिन्न लोकांना जे उपभोग दिलेत त्यावर डोळे वटारू नका. आणि त्यामुळं दु:खी होऊ नका, तर निष्ठावंतांशी

नम्रतेनं वागा.

८९) आणि मी स्पष्टपणे सावध करणारा आहे, असे म्हणा.

९०) ज्यांनी दुही माजवली होती त्यांच्यावर जशी ताकीद अवतरली होती, (तशीच आम्ही तुम्हावर अवतरतो).

९१) ज्यांनी कुरआनला विभागून त्याचे तुकडे-तुकडे केले होते. (काही भाग मान्य करीत तर काही भाग अमान्य करीत)

९२) तुझ्या विधात्याची शपथ! आम्ही त्या सर्वांना विचारणा करणारच

९३) ते जे करत होते त्या बाबतीत.

९४) तेव्हा तुम्हांस ज्या आज्ञा दिल्या आहेत त्या (त्यांना) स्पष्ट करून सांगा आणि अनेकेश्वरींशी दूर व्हा.

९५) जे लोक मस्करी करतात त्यांच्याविरूद्ध आम्ही तुम्हांस पुरेसे आहोत.

९६) जे लोक अल्लाहच्या तोडीस दुसरे ईश्वर उभारतात त्यांना लवकरच कळून चुकेल.

९७) ते लोक जे बोलताहेत त्यामुळं तुमचं मन दु:खी होते याची आम्हास जाणीव आहे.

९८) पण तुम्ही आपल्या विधात्याचं गुणगान आणि स्तवन करा आणि नतमस्तक व्हा.

९९) आणि आपल्या विधात्याची भक्ती करत राहा, ती अटळ गोष्ट (मृत्यू) वास्तवात येईपर्यंत.

-------

# १६. सूरह अन्नहल

**मक्काकालीन, आयती १२८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अल्लाहचा निर्णय आलेलाच आहे. तुम्ही त्याची घाई करू नका. हे लोक जे भागीदार ठरवत आहेत. अल्लाह त्यापेक्षा पवित्र आणि महान आहे.

२) (अल्लाह) आपल्या भक्तांपैकी ज्यांना इच्छितो त्यांच्याकडं आपल्या आदेशांद्वारे तो अनुभूतीसहित आपले दूत पाठवतो. त्यांना ही ताकीद देण्याकरिता की त्याच्याशिवाय इतर कोणी ईश्वर नाही. तेव्हा माझीच भीती बाळगा.

३) त्यानं आकाश आणि पृथ्वीला सत्य (संकल्पनेत) निर्माण केलं. तो महान आहे, हे लोक जे भागीदार त्यास जोडतात त्यांच्यापेक्षा.

४) त्यानं मानवाला वीर्यबिंदूतून निर्माण केलं, आणि मग तोच; वाद घालू लागला.

५) त्यानं निर्माण केलेल्या चतुष्पाद जनावरांपासून तुम्हास ऊब (लोकर आणि कातडी) लाभते, तसेच इतर लाभही आहेत. तसेच तुम्ही ते खाताही.

६) आणि त्यांमध्ये सौंदर्य आहे जेव्हा तुम्ही त्यांना सकाळी चरावयास नेता आणि संध्याकाळी त्यांना हाकलून परत आणता.

७) आणि ते शहरांकडं तुमचं ओझं वाहून नेतात जिथं तुमच्या जिवाची दमछाक झाल्याविना तुम्ही पोचू शकत नाही. तुमचा विधाता मोठा कृपावंत आणि दया दाखवणारा आहे.

८) घोडे, खेचर आणि गाढव तुम्हांस स्वारीसाठी आहे. शिवाय देखावाही. आणि ज्यांची तुम्हाला माहिती नाही तेही तो निर्माण करतो.

९) अल्लाहपर्यंत जाण्याचा मार्ग सरळ आहे. त्यास इतरही काही वाटा

फुटतात. त्यानं इच्छिलं असता तर तुम्ही सर्वांना सरळमार्गच दाखवला असता.

१०) ज्यानं आकाशातून पाणी वर्षवलं तोच तो, ते (पाणी) तुम्हास पिण्यासाठी, तसंच त्यापासून झाडं-झुडपांनाही पाणी मिळते.

११) त्यामध्ये जनावरांसाठी चारा आहे. त्या पाण्याद्वारे तो शेती पिकवतो जैतुन (ऑलिव्ह), खजूर आणि द्राक्षं व इतर सर्वच फळांची. यामध्ये चिंतन करणाऱ्यांस संकेत आहेत.

१२) रात्र आणि दिवसास तुमच्या अधीन केलं, तसंच सूर्य आणि चंद्रासही आणि तारे अल्लाहच्या हुकूमानुसार सेवेत आहेत. निश्चितच या सर्वांत प्रज्ञासंपन्नांसाठी संकेत आहेत.

१३) आणि तुमच्यासाठी धरतीमध्ये ज्या भिन्न-भिन्न रंगदार वस्तू आहेत त्यामध्ये मननपूर्वक विचार करणाऱ्या लोकांस संकेत आहेत.

१४) आणि त्यानं सागरही तुमच्या स्वाधीन केले. त्यांमधील ताजं मांस (सागरी आहार) तुम्हास खाण्यासाठी आणि त्यामधून तुम्हास अंगावर घालण्यासाठी अलंकार (मोती वगैरे) काढता यावेत म्हणून. आणि तुम्ही पाहता नौका कशा पाणी (लाटा) चिरून वाहतात, तुम्ही त्याच्या विपूलतेचा शोध करत राहावं आणि म्हणून त्याचे आभार मानावेत यासाठी.

१५) त्यानं धरतीमध्ये पर्वत उभारलेत, ती डगमगू नये म्हणून, नद्या आणि रस्ते, तुम्हास मार्ग मिळावेत म्हणून.

१६) आणि खूण ठेवण्यासाठी तारामंडळे ज्यामुळे तुम्ही वाट मिळवू शकता.

१७) तेव्हा जो (अल्लाह) निर्माण करतो त्यासारखा आहे जो (काही) निर्माण करत नाही? मग तुम्ही बोध घेणार नाही?

१८) अल्लाहच्या देणग्या मोजू लागला तर तुम्हास त्या मोजता येणार नाहीत. निश्चितच अल्लाह क्षमाशील आणि दयावंत आहे.

१९) तुम्ही जे लपून ठेवता ते आणि जे जाहीर करता तेही अल्लाहस ठाऊक

आहे.

२०) जे लोक अल्लाहशिवाय इतरांचा धावा करतात त्यांनी काही निर्माण केले नसून तेच निर्माण केलेले आहेत.

२१) ते मुर्दाड आहेत जीवंत नाहीत त्यांना माहीत नाही त्यांना कधी उठवलं जाईल.

२२) तुमचा ईश्वर एकमेव असा ईश्वर आहे. ज्यांना परलोकावर विश्वास नाही त्यांचे मन नकारात्मक वृत्तीचे आहे. ते अहंकारी आहेत.

२३) ते काय लपवतात आणि काय जाहीर करतात ते अल्लाहला निश्चितपणे ठाऊक आहे आणि उद्दाम लोक त्याला आवडत नसतात.

२४) अल्लाहनं काय अवतरलंय असे त्यांना विचारल्यास ते म्हणतात, ह्या तर पूर्वजांच्या कथा आहेत.

२५) आणि म्हणूनच पुनरुत्थानाच्या दिवशी ते आपलं सर्व ओझं उचलतील आणि ज्या अज्ञानी लोकांची त्यांनी दिशाभूल केली त्यांचंही ओझं. ऐकून घ्या ते जे म्हणत आहेत ते वाईट आहे.

२६) त्यांच्यापूर्वी लोकांनी (देखील) अशी कारस्थानं केलीत, म्हणूनच त्यांचा तो (कारस्थानाचा) इमला आम्ही पायासकट उखडून टाकला. आणि वरून त्यांच्यावर छत पडले. आणि त्याच्या विचारात नव्हती अशी शिक्षा आम्ही त्यांना दिली.

२७) कयामतच्या दिवशी त्यांना पुन्हा अपमानित करेल आणि विचारेल, कुठे आहेत माझे ते भागीदार ज्यांच्याविषयी तुम्ही वाद घालत होता. आणि ज्यांना ज्ञान मिळालं ते लोक म्हणतील, आज नाकारणाऱ्यांची अवस्था वाईट आहे आणि त्यांना नामुष्की आहे.

२८) आणि अपराधी अवस्थेतच दूत त्यांचे आत्मे काढून घेतील. आणि मग ते शरण येऊन म्हणतील, आम्ही दुष्ट असं काही करत नव्हतो, पण लक्षात ठेवा तुम्ही जे करत होता हे अल्लाहला ठाऊक आहे.

२९) आता तुम्ही नरकाच्या दरवाज्यात दाखल व्हा. तिथंच सदैव राहा. उद्धट

लोकांचं ठिकाण वाईटच असते.

३०) सदाचारी लोकांना, तुमच्या विधात्यानं काय अवतलंय, असं विचारल्यास ते म्हणतील, 'भलं ते.' ज्या लोकांनी भलं तेच केलं त्यांच्यासाठी या जागी भलं असेल आणि परलोकातील चांगलं घर. सदाचारींचं घर उत्कृष्ट असेल.

३१) अनंत स्वर्गांमध्ये ते दाखल होतील, ज्यांच्याखालून नद्या वाहतील, तिथं त्यांना हवं ते सर्वकाही असेल. अशा प्रकारे अल्लाह सदाचारींना फलश्रुती देतो.

३२) आणि दूत अशा लोकांचे प्राण शुद्ध अवस्थेत हरण करतात. ते म्हणतात, तुम्हास शांतता लाभो, तुमच्या नेक कर्मांमुळे स्वर्गात दाखल व्हा.

३३) ते कशाची वाट पाहत आहेत, देवदूत येण्याची की अल्लाहचा आदेश येण्याची? त्यांच्या आधीच्या लोकांनीही अशीच कर्मं केलीत. अल्लाहनं त्यांच्याशी नव्हता अन्याय केला, त्यांनी स्वत:वरच अत्याचार ओढवून घेतला.

३४) त्यांच्या वाईट कर्मांचं फलित त्यांना पोचतं झालं आणि ज्याची ते थट्टा उडवीत त्यानं त्यांना घेरून टाकलं.

३५) अनेकेश्वरी म्हणतात, अल्लाहची मर्जी असती तर आम्ही अथवा आमच्या पूर्वजांनी त्याच्याव्यतिरिक्त कशाचीही आराधना केली नसती. आणि त्याच्या आज्ञेशिवाय कोणतेही निर्बंध घातले नसते. त्यांच्या आधीच्या लोकांनीही तशीच कर्मं केली होती. मग प्रेषितांची जबाबदारी कोणती? स्पष्टपणे पोचवण्यापलीकडं?

३६) आम्ही हरेक लोकसमूहात प्रेषित पाठविले. (ही आज्ञा देऊन की) अल्लाहची भक्ती करा आणि उल्लंघन करणाऱ्यांशी फटकून राहा. त्यांपैकी अल्लाहनं कुणाचं मार्गदर्शन केलं. तर काहींच्या बाबतीत ते मार्गभ्रष्ट झाल्याचं सिद्ध झालं. तेव्हा धरतीवर संचार करा आणि पाहा खोटं ठरवणाऱ्यांचा शेवट कसा झाला ते.

३७) तुम्हाला जर त्यांना मार्गदर्शन घडवण्याची हौस असेल तर (लक्षात ठेवा) जे मार्गभ्रष्ट झालेत त्यांना अल्लाह मार्ग दाखवत नसतो आणि कोण त्यांच्या मदतीलाही येणार नाही.

३८) त्यांनी अल्लाहची जोरदार शपथ घेतली, जे मरण पावतात त्यांना अल्लाह उठवणार नाही. का नाही? त्या बाबतीत त्याचं वचन सच्चा आहे, पण बहुतेकांस ते ठाऊक नाही.

३९) कारण ज्या (बाबीं)मध्ये लोक मतभेद करतात त्यांना ते स्पष्ट करून देण्यासाठी, तसंच विरोधकांनाही हे कळून चुकावं की ते खोटे आहेत.

४०) आम्ही एखादी वस्तू घडवण्याचं ठरवतो तेव्हा आम्ही नुसतं 'घडो' म्हणतो आणि ती 'घडून जाते.'

४१) ज्यांच्यावर अत्याचार झाल्यामुळे त्यांनी अल्लाहसाठी आपली घरंदारं सोडली तर आम्ही त्यांना या जगात चांगली जागा देऊ. आणि परलोकात तर त्यांना याहून अधिक लाभेल. तेवढं त्यांनी (ज्यांनी स्थलांतर केलं नाही त्यांना) जाणून घेतलं असतं.

४२) ज्यांनी धैर्य दाखवलं आणि आपल्या विधात्यावर भिस्त ठेवली.

४३) आम्ही तुमच्या पूर्वीही जे प्रेषित पाठवले तेही मानवच होते आणि त्यांना अनुभूतीही दिली तेव्हा विचारा ज्यांच्या आठवणीत असेल तुम्ही त्यांना ओळखता का?

४४) आम्ही त्यांना स्पष्ट प्रमाण आणि ग्रंथ दिला आणि त्याचप्रकारे आम्ही तुमच्याकडं ही शिकवण (कुरआन) अवतरली. त्यांच्याकडं जे पाठवलंय ते लोकांना स्पष्ट करून देण्यास त्यांनी चिंतन करावं यासाठी.

४५) जे लोक कुटिल कारस्थानं रचत आहेत त्यांना भीती नाही अल्लाह त्यांना जमिनीत धसवून टाकेल याची? किंवा त्यांना कोणत्या दिशेने शिक्षा येऊन ठेपेल ज्याचा त्यांना लवलेशही नाही.

४६) अथवा चालत-फिरत असताना त्यांना धरलं जाईल, ते (अल्लाहला) विफल करू शकणार नाहीत.

४७) किंवा त्यांना अधिक भीती दाखवावी आणि मग धरलं जावं. निश्‍चितच तुमचा विधाता दयावंत आणि कृपासंपन्न आहे.

४८) अल्लाहनं निर्माण केलेल्या वस्तूंचं त्यांनी निरीक्षण केलं नाही? कशा त्यांच्या सावल्या उजवीकडून डावीकडं वळत असतात. अल्लाहस नतमस्तक होऊन? ते नम्रता व्यक्त करतात.

४९) आणि अल्लाहस नतमस्तक होतात. आकाश आणि धरतीवरील सर्व सजीव निर्मिती तसंच देवदूत. ते उद्धटपणाने वागत नाहीत.

५०) ते आपल्या विधात्याशी भिऊन असतात जो उच्चस्थानी आहे आणि (त्याने) दिलेल्या आदेशांप्रमाणेच ते वागत आहेत.

५१) अल्लाहनं म्हटलं, दोन ईश्‍वर धरू नका, तोच एकमेव ईश्‍वर आहे. तेव्हा माझंच भय बाळगा.

५२) आकाश आणि पृथ्वीवरील सर्वकाही त्याच्याच मालकीचं आणि त्याचाच धर्म अपरिहार्य आहे. मग तुम्ही इतरांची भीती बाळगणार का?

५३) तुम्हास जितक्या म्हणून देणग्या लाभल्या त्या अल्लाहच्याच, तरीपण तुम्हास काही इजा पोचली तर तुम्ही आरडाओरड करता.

५४) आणि ती यातना तो दूर करतो तेव्हा मात्र तुमच्यापैकी काहीजण आपल्या विधात्याशी इतरांना भागीदार जोडतात.

५५) आम्ही दिलंय त्याबद्दल कृतघ्न करण्यासाठी बरे, मग सुखोपभोग घेत राहा. लवकरच तुम्हाला कळून चुकेल.

५६) आम्ही त्यांना बहाल केलेल्या साधनांतून ते अशांना वाटा देता ज्यांच्याविषयी त्यांना काहीच माहिती नाही. शपथ अल्लाहची! तुम्ही जे रचत आहात त्याबाबतीत अवश्य विचारणा होईल.

५७) आणि अल्लाहसाठी मुली ठरवतात पण अल्लाह पवित्र आहे. आणि स्वत:साठी मात्र त्यांना जे हवं ते.

५८) एखाद्याला मुली (झाल्याची) खूशखबर दिली की त्याचा चेहरा काळा

पडतो आणि तो रागावून जातो.

५९) लोकांपासून लपून राहतो. त्याला जी शुभवार्ता दिली आहे तिला वाईट मानून (तो विचार करतो) त्या मुलीला (जीवंत) ठेवून अपमान सहन करावा अथवा तिला मातीत पुरून टाकावं. लक्षात ठेवा, तो निर्णय घेतो तो फार वाईट आहे.

६०) ज्या लोकांचा परलोकावर विश्वास नाही ते दुष्टांसमान आहेत. आणि अल्लाहचा दरारा वैभवशाली आहे. आणि तोच प्रभुत्वसंपन्न आणि प्रतिभासंपन्न आहे.

६१) जर अल्लाहला लोकांची त्यांच्या पापांबद्दल पकड करायची असती तर कोणत्याही सजीवास सोडलं नसतं, पण तो त्यांना ढील देतो एका ठराविक मुदतीपर्यंत आणि जेव्हा ती वेळ येते तेव्हा मात्र ती घटकेचाही मागं राहणार नाही की पुढं जाणार नाही.

६२) त्यांना जे आवडत नाहीत ते अल्लाहसाठी योजतात. त्यांच्या जीभा खोटं घडवत असतात की सर्वकाही भलं त्यांच्यासाठीच आहे, पण त्यांच्यासाठी नरक अपरिहार्य आहे. ते लवकरच तिथं पोचणार आहेत.

६३) अल्लाहची शपथ! आम्ही प्रत्येक समूहास प्रेषित दिला. पण सैतानानं त्यांना त्यांची कृत्ये मोहक करून टाकली म्हणून आज तोच त्यांचा वाली झाला, त्यांना यातनादायक शिक्षा असेल.

६४) जे लोक मतभेद करत होते त्यांना स्पष्ट करून (समजावून) देण्यासाठी आम्ही हा ग्रंथ तुम्हांस दिला तो श्रद्धावंतांसाठी मार्गदर्शक आणि कृपासंपन्न आहे.

६५) अल्लाहनं जेव्हा आकाशातून पाऊस वर्षवला तेव्हा मृतावस्थेतील धरती सजीव झाली. यात जे लोक ऐकतात त्यांना संकेत आहेत.

६६) आणि जनावरे तुम्हांसाठी बोधप्रद आहेत, आम्ही त्यांच्या पोटामधून मल आणि रक्त यांच्या दरम्यानातलं विशुद्ध आणि हवंसं पेय दुग्ध पिण्यास देतो.

६७) तसंच खजूर आणि द्राक्षं ज्यांच्यापासून तुम्ही मादक द्रव्यही बनवता आणि उत्तम असा आहारदेखील. लोकांना समजण्यासाठी यामध्ये संकेत आहेत.

६८) तुझ्या विधात्यानं मधमाशीस अनुभूतीनं कळवलं, आपलं पोळं पर्वतांमध्ये, (उंच) इमारतींमध्ये व झाडांमध्ये बांधावयास शिकवलं.

६९) आणि मग सर्व प्रकारची फळं खा आणि तुझ्या विधात्यानं सुरळीत आणि मोकळ्या केलेल्या मार्गाचा अवलंब कर त्यांच्या पोटातून एक पेय (मध) निघते, भिन्न-भिन्न रंगाचं लोकांसाठी गुणकारक असं. यामध्ये चिंतन करणाऱ्या लोकांस संकेतं आहेत.

७०) अल्लाहनं तुम्हाला निर्माण केलं आणि मरणही देतो, तुमच्यापैकी काहींना वृद्धावस्थेत पोचवतो, प्रथम सर्वकाही कळूनही आता त्यास काही कळेना असा होतो. अल्लाहच सर्वज्ञ आणि सामर्थ्यवान आहे.

७१) तुमच्यामधील काहींना अल्लाहनं इतरांपेक्षा अधिक साधनसंपन्न केलं. पण ज्या लोकांना अधिक साधनं दिली आहेत ते त्यामधून आपल्या हाताखालच्या लोकांना परत देणारे नाहीत, तेसुद्धा त्यांच्या बरोबरीचं व्हावेत म्हणून. (या वर्तणुकीनं) अल्लाहच्या देणगींना ते नाकारत आहेत?

७२) अल्लाहनं तुमच्यामधून तुमच्यासाठी जोडपे बनवले आणि त्यांच्यापासून मुलगे आणि नातवंडे दिली आणि तुम्हांस शुद्ध उपजीविका दिली. आणि मग ते पोकळ गोष्टी मानतात आणि अल्लाहच्या देणग्या नाकारतात.

७३) आणि ते अल्लाहला सोडून अशांची आराधना करतात ज्यांच्याकडं आकाश आणि पृथ्वीतून कसली साधनं देण्याची मालकी नाही की तशी त्यांची ऐपतही नाही.

७४) अल्लाहच्या बाबतीत कुणाशी तुलना करू नका. अल्लाह नक्कीच जाणतो तुम्ही जाणत नाही.

७५) अल्लाह उपमा देतो एका गुलामाची जो दुसऱ्याच्या मालकीत आहे, कशावरही त्यास सामर्थ्य नाही, आणि दुसरं असं आहे ज्याला आम्ही चांगली साधनं दिलीत त्यामधून तो उघड आणि गुप्तपणे खर्च करतो, हे दोन्ही सारखेच का? अल्लाहचा गौरव असो. पण पुष्कळ लोकांना हे कळत नाही.

७६) आणखी अल्लाह दोन माणसांचं उदाहरण देतो. एक मुका आहे, त्याच्याकडं कशाचेच सामर्थ्य नाही, आपल्या मालकावर तो बोजा आहे. त्याला कुठेही पाठवलं तर तो चांगलं असं काही आणत नाही. मग हा आणि तो जो न्याय्य आहे ते आदेश देतो, आणि रास्त मार्गावर आहे, हे दोन्ही सारखेच का?

७७) आकाश आणि पृथ्वीमधील सर्व गुपितं अल्लाहचीच, प्रलयांचं येणं, जसं डोळ्यांचं पातं लवणं, किंवा त्याहूनही लवकरच. अल्लाह सर्वसत्तासंपन्न आहे.

७८) अल्लाहनं तुम्हास तुमच्या मातांच्या उदरातून बाहेर आणलं, तुम्हास काहीच कळत नव्हतं. त्यानं तुम्हास ऐकू घातलं, डोळे दिले आणि मन दिलं. तुम्ही त्याचं आभार मानावं यासाठी.

७९) आणि त्यांनी पक्ष्यांना पाहिलं नाही, कसं ते आकाशात वातावरणाच्या अधीन आहेत. अल्लाहव्यतिरिक्त त्यांना कुणी रोखून धरत नाही. यामध्ये निष्ठावान लोकांसाठी संकेत आहेत.

८०) तुमच्या शांततेसाठी अल्लाहनं घरं दिलीत, आणि जनावरांच्या कातडीपासून (तात्पुरती) घरं बनवली. वजनात हलकी अशी, तुम्ही प्रवासात असता मुक्काम करण्यासाठी. आणि त्याच्यापासून लोकर, लव आणि त्यांच्या केसांपासून निरनिराळ्या उपयोगात आणावयाच्या वस्तू दिल्या, ठराविक काळापर्यंत.

८१) आणि अल्लाहनं अशा (वस्तू) बनवल्या ज्या तुम्हाला सावली देतात आणि पर्वतापासून संरक्षण दिलं आणि उष्णतेपासून बचाव करण्यास वस्त्रं बनवली आणि चिलखत तुमच्या आपसांतील आघातांपासून

बचाव करण्यास. अशा प्रकारे तो तुम्हांस वरदानसंपन्न करतो, तुम्ही आज्ञापालन करावं म्हणून.

८२) पण जर त्यांनी तोंड फिरवलं तर तुमचं काम स्पष्ट करून पोचवणं आहे.

८३) ते अल्लाहच्या संपन्नतेस ओळखून आहेत तरीदेखील ते नाकारतात. त्यांच्यापैकी बरेचजण कृतघ्न आहेत.

८४) आम्ही ज्या दिवशी प्रत्येक जनसमूहामधून एक साक्षीदार उभा करू, तेव्हा अपराधी लोकांपैकी कोणास काही सबब पुढे करण्याची अनुमती नसेल, आणि त्यांच्याकडून कसलं निमित्त स्वीकारलं जाणार नाही.

८५) आणि अपराधी लोकांस शिक्षा दिसून येईल तेव्हा ती कमी केली जाणार नाही की त्यांना सवलत दिली जाईल.

८६) आणि अनेकेश्वरी आपल्या (अल्लाहस जोडलेल्या) भागीदारांना पाहून म्हणतील, हे विधाता हेच आमचे भागीदार ज्यांचा तुला वगळून धावा करीत राहिलो, पण त्यांचे (भागीदार) त्यांचं म्हणणं त्यांच्याच पदरात टाकतील आणि म्हणतील, तुम्ही खोटं आहात.

८७) आणि त्या दिवशी ते शरण येतील, ते जे काही रचत होते ते फोल ठरतील.

८८) ज्या लोकांनी बंड करून अल्लाहच्या मार्गात अडथळे उभे केले, त्यांच्या या आतंकामुळं आम्ही त्यांच्या शिक्षेत वाढ करू. शिक्षेमागून शिक्षा (देऊ). त्यांनी अनाचार माजविला होता म्हणून.

८९) ज्या दिवशी आम्ही प्रत्येक समूहातून त्यांच्यापैकीच एक साक्षीदार उभा करू आणि आम्ही तुम्हांस (प्रेषितांना) त्या सर्वांवर साक्ष बनवू. आम्ही तुम्हांस ग्रंथ (कुरआन) दिला, प्रत्येक बाबीचा तपशीलासह. तसंच मार्गदर्शन आणि दया व आज्ञाधारकांसाठी शुभवार्ता.

९०) अल्लाह तुम्हांस आदेश देतो न्याय्य (वागणुकीचा), परोपकाराचा, आपल्या नातलगांना त्यांच्या हक्काधिकार देण्याचा, अश्लील गोष्टींची

मनाई करतो, तसंच दुष्ट वर्तणुकीची व अनाचार माजविण्याची मनाई करतो. तुम्हास उपदेश देतो, आठवणीत ठेवण्याकरिता.

९१) अल्लाहला दिलेलं वचन पाळा, दृढ शपथ मोडू नका. तुम्ही अल्लाहस जामीन केलंय. तुम्ही जे काय करता ते अल्लाहस ठाऊक आहे.

९२) अशा स्त्रीसारखे होऊ नका जी कष्ट करून धागा विणते आणि मग तेच तोडून तुकडे करून टाकते. तुम्ही आपल्या शपथांचा आपसांतील व्यवहारांत ढवळाढवळ करण्यासाठी उपयोग करता, एका गटास दुसऱ्या गटावर प्रभुत्व मिळावं यासाठी. पण अल्लाह याद्वारे तुमची परीक्षा घेतो. तुमच्यात जे वाद-विवाद आहेत त्यांना पुनरुत्थानाच्या दिवशी अवश्य स्पष्ट करून टाकील.

९३) अल्लाहची तशी इच्छा असती तर त्यानं तुम्हास एकच समूह बनवलं असतं. पण तो आपल्या मर्जीनुसार कोणाला मार्ग दाखवतो, कोणाला मार्गभ्रष्ट करतो आणि तुमच्या कर्मांविषयी तो विचारणा करणारच.

९४) आपसातील सबंध आणि व्यवहारांमध्ये आपल्या शपथांचा गैरवापर करू नका, तुमची स्थिती स्थिरावल्यानंतर त्यामुळं ती ढासळून जाईल, या कृत्यामुळं तुम्ही इतरांना अल्लाहच्या मार्गापासून रोखण्यास कारणीभूत ठराल, ज्याचं फलित तुम्हास भोगावं लागेल. आणि तुम्हाला कडक शिक्षा असेल.

९५) अल्लाहशी केलेल्या कराराचा कौडीमोल करू नका. तुम्ही जाणून घ्या अल्लाहपाशी नक्कीच तुम्हास भलं ते सर्वकाही आहे.

९६) तुमच्याकडंचं लगेच संपून जाते, पण अल्लाहकडं जे आहे ते शाश्वत आहे. संयमानं वागतात त्यांना त्यांच्या कर्मांच्या तुलनेत अधिक उत्तम मोबदला दिला जाईल.

९७) पुरुष अथवा स्त्रियांपैकी कुणीही श्रद्धा ठेवून नेक कर्म केले तर आम्ही त्यांना पावन जीवन देऊ. तसंच परलोकातदेखील त्यांना त्यांच्या कर्मांचा उत्तम मोबदला देऊ.

९८) तुम्ही कुरआनचे पठन करतेवेळी धि:क्कारलेल्या सैतानापासून अल्लाहचं शरण घ्या.

९९) जे लोक श्रद्धा बाळगून आपल्या विधात्यावरच विश्वास व्यक्त करतात त्यांच्यावर त्याचा (सैतानाचा) काही जोर चालत नाही.

१००) पण जे लोक त्यास (सैतानाला) आपला संरक्षक समजतात आणि (इतरांना) अल्लाहचे भागीदार ठरवतात त्यांच्यावर मात्र त्याचा अधिकार चालतो.

१०१) जेव्हा आम्ही एखादा आदेश बदलून त्याच्या जागी दुसरा आदेश देतो तेव्हा अल्लाहला त्यानं काय पाठवलंय हे ठाऊक असतं, पण ते (लोक) म्हणतात हे तुम्ही रचलंय. बहुतेकांना याचं भान नाही.

१०२) त्यांना सांगा, पाक आत्म्यानं (जिबराईल दूत) तुमच्या विधात्याकडंच सत्य तेच अवतरलंय. श्रद्ध बाळगणाऱ्यांना बळकटी देण्यासाठी तसंच आज्ञा पाळणाऱ्यास मार्गदर्शन आणि सुवृत्त.

१०३) आम्हास चांगले माहीत आहे ते म्हणतात, त्याला एक माणूस शिकवतो ज्या व्यक्तीकडं ते खुणावत आहेत आणि त्याची भाषा बिगरअरबी आहे. पण ही तर स्पष्ट अशी अरबी भाषा आहे.

१०४) ज्या लोकांचा अल्लाहच्या वचनांवर विश्वास नाही, अल्लाह त्यांना मार्गदर्शन करणार नाही, तर त्यांना कडक शिक्षा असेल.

१०५) ज्या लोकांचा अल्लाहच्या वचनांवर विश्वास नाही ते खोटं रचत असतात आणि तेच लोक खोटे आहेत.

१०६) श्रद्धा धारण केल्यावर अगतिकतेमुळं जर कुणी त्यास नाकारलं पण आपल्या श्रद्धेवर तो समाधानी असेल (अशांची पकड होणार नाही), पण ज्यांनी मनापासून नाकारलं तर अशा लोकांवर अल्लाहचा कोप असेल आणि त्यांना भयंकर शिक्षा दिली जाईल.

१०७) याचं कारण असं की त्यांनी परलोकी जीवनापेक्षा या जगातल्या जीवनालाच पसंत केलं, पण अल्लाह नाकारणाऱ्यांना कधी मार्गदर्शन

करत नाही.

१०८) हेच ते लोक अल्लाहनं ज्यांच्या मनावर, ऐकण्यावर आणि पाहण्यावर, मोहर लावली आणि हेच लोक दुर्लक्ष करणारे आहेत.

१०९) परलोकात हेच लोक आपला घात करून घेणारे आहेत यात मुळीच शंका नाही.

११०) ज्या लोकांचा छळ झाला म्हणून त्यांनी आपली घरं-दारं सोडलीत आणि सातत्यानं संघर्ष केला, आणि संयम दाखवला. तुझा विधाता त्यांच्यावर दया करणारा आहे आणि त्यांना क्षमा करणारा आहे.

१११) एके दिवशी (कयामतच्या दिवशी) प्रत्येकजण स्वत:साठीच धडपडत येईल, पण त्यांच्या कर्मांचं पुरेपूर परिणाम लाभेल कुणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही.

११२) एका वस्तीचा अहवाल उदाहरणादाखल अल्लाह देतो. तिथं सुख शांतता नांदत होती. चोहीकडून त्यांना विपूल साधनं उपलब्ध होती, पण त्यांनी अल्लाहच्या देणगींशी कृतघ्नता व्यक्त केली तेव्हा अल्लाहनं त्यांच्या कृत्यांचं फलित म्हणून त्यांना भूक आणि भय उपभोगावयास लावले.

११३) आणि त्यांच्यामधूनच एक प्रेषित त्यांच्याकडं आला तेव्हा त्यांनी त्यास खोटं ठरवलं, ते अत्याचारी होते म्हणून त्यांना प्रकोपानं गाठलं.

११४) तेव्हा अल्लाहनं तुम्हांस दिलेल्या वस्तुंपैकी वैध आणि पाक वस्तू खा, अल्लाहच्या देणगींचे आभार माना, तुम्हाला त्याची आराधना करायची झाल्यास.

११५) मृत आणि रक्त, तसेच डुकराचं मांस आणि अल्लाहशिवाय इतरांच्या नावे जे वाहिलं असेल ते निषिद्ध आहे. पण अवज्ञा आणि मर्यादा मोडण्याच्या हेतूनं नसून नाईलाजानं (काही खाल्ल्यास) अल्लाह क्षमा करून दया दाखवेल.

११६) आणि तोंडात जे येईल ते बेधडक बोलू नका की अमूक वस्तू वैध

आणि तमूक वस्तू निषिद्ध आहे. अशा बेतानं अल्लाहवर आरोप ठेवून खोटं ठरवणं होईल. जे लोक अल्लाहविषयी खोट्या (गोष्टी) घडवतात, ते कधीच यशस्वी होत नसतात.

११७) (त्यांना) थोडाफार लाभ घडेल, मात्र शिक्षा भयंकर असणार.

११८) आम्ही आधी वर ज्यांचा उल्लेख केला ते यहुदी लोकांसाठी(ही) निषिद्ध केलं होतं. आम्ही त्यांच्यावर काही अन्याय नव्हता केला त्यांनी स्वत:च अत्याचार करून घेतला.

११९) आणि (हे पाहा) तुमचा विधाता- ज्यांनी अडाणीपणामुळं दुष्कर्म केलेत, मग नंतर पश्चात्ताप व्यक्त करून सुधारलं, नि:संशय तुमचा विधाता त्यानंतर तुम्हास क्षमा करून दया करणार आहे.

१२०) इब्राहीम आपल्या अस्तित्वात एका समुदायासारखे होते पूर्णत: अल्लाहचे आज्ञाधारक आणि अल्लाहस वाहून घेतलेले, ते अनेकेश्वरींमधील नव्हते.

१२१) त्यांना (अल्लाहकडून) लाभलेल्या वरदानाबद्दल ते कृतज्ञ होते (अल्लाहनं) त्यांची निवड करून त्यांना रास्त मार्गाचं दर्शन घडविलं.

१२२) त्यांना आम्ही या जगात चांगलं ते दिलं आणि परलोकात ते नेक लोकांच्या सहवासात असतील.

१२३) आम्ही अनुभूतीद्वारे तुम्हास सांगितलं (अल्लाहस ) वाहून घेतलेल्या इब्राहीम यांचं पालन करण्यास, ते अनेकेश्वरी नव्हते.

१२४) जे लोक 'सब्त'च्या बाबतीत मतभेद बाळगत होते त्यांनाच तो अनिवार्य केला होता, ज्या बाबतीत ते मतभेद करतायत त्याचा निवाडा तुझा विधाता प्रलयाच्या दिवशी करणार आहे.

१२५) लोकांना आपल्या विधात्याकडं सामंजस्य आणि उत्तम शिकवणीद्वारे बोलवा आणि चांगल्या पद्धतीनं त्यांच्याशी चर्चा करा. जे लोक मार्गभ्रष्ट झालेत त्यांना तुझा विधाता ओळखतो, तसंच कोण मार्गदर्शनास (पात्र) आहेत हेही त्याला ठाऊक आहे.

१२६) त्यांना शिक्षा द्यायचीच झाल्यास जशी तुम्हाला शिक्षा दिली तेवढीच फक्त, पण जर तुम्ही धीर दाखवलं तर धैर्यशील लोकांसाठी हेच उत्तम आहे.

१२७) धैर्य दाखवा, हे धैर्य अल्लाहकडूनच आहे आणि दु:खी होऊ नका. ते जे कट करतात त्यामुळे निराश नका होऊ.

१२८) जे सदाचारी असतात आणि परोपकार करत असतात, अल्लाह त्यांच्या सान्निध्यात असतो.

-------

# १७. सूरह बनी इस्राईल

**मक्काकालीन, आयती १११**

**पारा - १५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) पवित्र आहे तो ज्यानं आपल्या भक्तास रातोरात मस्जिदे हराम (काबागृह) अक्सा मस्जिदकडं (जेरूसेलममधील मशीद) नेलं जिच्या परिसरास आम्ही समृद्धी आणि प्रसन्नता बहाल केली त्यास आपली संकेतं दाखवून देण्यासाठी, खरंच तो सर्वकाही ऐकतो आणि पाहतो.

२) आम्ही मूसा यांना ग्रंथ दिला आणि त्यास आम्ही इस्राईलच्या संततीसाठी मार्गदर्शन बनवलं, माझ्याशिवाय कुणासही आपला पुरस्कर्ता बनवू नका म्हणून.

३) ज्यांच्या संततीस आम्ही नूहबरोबर ज्यांना (नावेत) स्वार केलं, त्यांचे वंशज! तो आमचं कृतज्ञ भक्त होता.

४) आम्ही या ग्रंथाद्वारे इस्राईलच्या लोकांना स्पष्ट बजावलं होतं की तुम्ही दोन वेळा धरतीवर आतंक माजवला आणि तुम्ही नक्कीच अत्याचारी व्हाल.

५) आणि जेव्हा आमच्या वचनाची पहिली वेळ आली, आम्ही तुमच्याविरूद्ध युद्धात तरबेज आणि भयंकर भक्तांना पाठवलं ते तुमच्या शहरांमध्ये सर्वत्र शिरले. आमचं हे वचन साकारणारच होतं.

६) नंतर आम्ही पूर्वीची स्थिती बहाल करू त्यांच्याविरूद्ध तुम्हास वर्चस्व दिलं आणि धनसंपत्ती व संततीत वाढ करून अधिक सैन्यदल दिलं.

७) तुम्ही जर काही भली कामं केली तर ते स्वत: तुमच्यासाठीच भल्याचं आहे आणि दुष्ट असं काही केलं तर तेही तुमच्या स्वत:साठीच. आणि जेव्हा दुसऱ्या वचनाची वेळ आली, तेव्हा आम्ही त्यांना (तुमच्या शत्रूंना) तुमचे चेहरे विद्रुप करून टाकण्यासाठी आणि मस्जिद (अक्सा)

मध्ये घुसखोरी करण्यासाठी, जसं ते पहिल्यांदा घुसले होते आणि जिथं त्यांना वर्चस्व मिळालं ते सर्व उद्ध्वस्त करण्यासाठी.

८) पण तुमचा विधाता तुम्हांवर दयाही करेल. पण जर तुम्ही परत तेच केलं तर आम्हीही तसंच करू. आम्ही नरकाला बंडखोरांसाठी तुरुंग बनवलंय.

९) निश्चित हे कुरआन रास्त मार्गाकडं मार्गदर्शन करतो आणि निष्ठावंतांपैकी जी भली कर्म करतात त्यांना मोठ्या बक्षिसीची खूशखबर देतो.

१०) पण जे लोक परलोकावर विश्वास ठेवत नाहीत आम्ही त्यांच्यासाठी यातनादायक शिक्षा तयार ठेवली आहे.

११) माणूस ज्याप्रकारे इष्ट मागतो तसंच तो अनिष्ट गोष्टीसाठीही धावा करतो. कारण माणूस खरंच फार उतावीळ आहे.

१२) आम्ही रात्र आणि दिवस हे दोन संकेत बनवले. मग रात्रीचा संकेत मंद केला. आणि दिवसांचा संकेत दिसण्यासाठी बनवला. तुम्ही आपल्या विधात्याच्या विपुलतेचा शोध घ्यावा यासाठी आणि तसंच वर्षांची गणना आणि संख्या जाणून घ्यावं म्हणून आम्ही प्रत्येक बाबीचा तपशील स्पष्ट करून दिलाय.

१३) आम्ही प्रत्येक माणसाचं नशीब त्याच्या गळ्यात टाकलंय. पुनरुत्थानाच्या दिवशी नोंदवून ठेवलेलं ते मजकूर त्यास उघड दिसेल.

१४) वाचा आपल्या कर्मांची नोंद आज स्वत: तुझे अस्तित्वच तुझा हिशेब घेण्यास पुरेसं आहे.

१५) मग ज्याचं मार्गदर्शन घडलं तो त्याच्या स्वत:च्या मार्गदर्शनासाठीच, आणि जो मार्गभ्रष्ट झाला त्याचं भरकटणं त्याच्याचसाठी असेल. कुणी ओझं वाहणारा दुसऱ्याचं ओझं वाहत नसतो. आम्ही जोपर्यंत प्रेषित पाठवत नाही तोवर (कोणास) शिक्षाही देत नसतो.

१६) जेव्हा एखाद्या वस्तीला नष्ट करण्याचं आम्ही ठरवतो, तेथील सुख-संपन्न लोकांना आदेश पाठवतो ते त्याची अवज्ञा करू लागतात, अशा प्रकारे

ते शिक्षेस पात्र ठरतात आणि मग आम्ही त्यांना उद्‌ध्वस्त करून टाकतो.

१७) नूह यांच्यानंतर आम्ही कितीतरी वस्त्या नष्ट केल्या आहेत. आणि तुझा पालनकर्ता आपल्या भक्तांच्या अपराधांवर पाळंत ठेवण्यास आणि त्यांना पाहण्यास पुरेसा आहे.

१८) ज्यांना या (जगाच्या) वस्तू तुर्तास हव्या असतात आम्ही ज्याला इच्छितो, आणि जसं इच्छितो त्या लगबगीनं देऊन टाकतो. आणि मग त्याच्यासाठी नरक ठरवून देतो, त्यात तो दाखल होतो निंदनीय होऊन दूर ढकललेला.

१९) आणि ज्याला परलोकाची आवड असेल आणि त्यासाठी तो प्रयत्नशील असेल, आणि तो श्रद्धावान असला तर अशाच लोकांचे प्रयत्न स्वीकारले जातील.

२०) आम्ही यांनाही आणि त्यांनादेखील सर्वांनाच तुझ्या विधात्याच्या देणग्या बहाल करतो. आणि कोणीही तुझ्या विधात्याच्या देणगीपासून वंचित राहणार नाही.

२१) पाहा, आम्ही त्यांच्यापैकी काहींना इतरांपेक्षा कसं संपन्न केलं. पण परलोकातील दर्जे मोठे आणि संपन्नतेतही उत्तम आहेत.

२२) अल्लाहबरोबर इतरांना ईश्वर ठरवू नका. (तसे केल्यास) तू निंदेस पात्र होऊन अगतिक होऊन जाशील.

२३) तुझ्या विधात्यानं आज्ञा दिली त्याच्याशिवाय कुणाची भक्ती करू नका, माता-पित्याशी चांगुलपणानं वागा, त्यांच्यापैकी एक अथवा ते दोन्ही वृद्धापकाळात पोचले तर त्यांच्यासमोर 'ब्र' शब्ददेखील काढू नका, त्यांना झिडकारू नका, त्यांच्याशी आदरानं बोला.

२४) आणि त्यांच्यासमोर सहानुभूती व नम्रतेनं झुका आणि म्हणा, हे विधाता तू यांना दया दाखव जसं त्यांनी लहानपणी माझं पालन केलं.

२५) तुमच्या विधात्याला तुमच्या मनातील गोष्टी ठाऊक आहेत, जर तुम्ही

सदाचारी असलात तर निश्चितच तो पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्यास क्षमा करील.

२६) जवळच्या नातलगांना त्यांचे हक्काधिकार द्या, तसंच निराधारांचे आणि वाटसरूंचे हक्क (पाळा), अंदाधुंदीनं उधळपट्टी करू नका.

२७) निश्चितच वायफळ खर्च करणारे सैतानाचे भाऊबंद असतात. आणि सैतान आपल्या विधात्याशी कृतघ्न आहे.

२८) आणि जर (अडचणीत असल्यामुळं) तू त्यांच्याकडं दुर्लक्ष करत असशील आणि आपल्या विधात्याच्या कृपेच्या प्रतीक्षेत असशील तर नम्रतापूर्वक त्यांना (समजावून) सांगा.

२९) तुझे हात आपल्या मानेभोवती अडकून ठेवू नकोस की त्यांना पूर्णपणे मोकळं सोडून देऊ नको, तसं केल्यास लोकांच्या निंदेस पात्र ठरवून लाचार होशील.

३०) निश्चितच तुझा विधाता मर्जीस येईल त्यास विपूल साधनं देतो आणि मर्जीस येईल त्यास काटकसरीनं देतो. निश्चितच आपल्या भक्तांकडं त्याचं लक्ष असते, तो त्यांना पाहत असतो.

३१) दारिद्र्याच्या भीतीनं आपल्या मुलाबाळांना ठार करू नका, आम्ही त्यांनाही उपजीविका देतो आणि तुम्हासदेखील. त्यांची हत्या करणे निश्चितच मोठा अपराध आहे.

३२) आणि व्यभिचाराच्या जवळपासही फिरकू नका, हा निर्लज्जतेचा आणि दुष्ट मार्ग आहे.

३३) न्याय्य कारणानं असलेलं वगळता कुणाच्याही जिवास - अल्लाहनं ज्यास आदरणीय ठरवलंय - ठार करू नका. जर अन्यायानं कुणी मारला गेल्यास त्याच्या वारसास आम्ही अधिकार दिलाय, तेव्हा मर्यादा ओलांडून (कुणास) ठार करू नका. त्यास मदत लाभलेली असते.

३४) अनाथाच्या संपत्तीजवळही फिरकू नका, पण भल्या उद्देशानं, तो तारुण्य गाठत नाही तोवर, आणि दिलेलं वचन पाळा. वचनाविषयी

नक्कीच विचारलं जाईल.

३५) आणि माप करताना पुरेपूर मापून द्या, वजन करताना प्रमाणित अशा तराजूनं तोलून द्या. हेच उत्तम आहे परिणामांच्या दृष्टीनंही भलं आहे.

३६) जे तुम्हाला ठाऊक नाही त्याच्या मागे लागू नका. निश्चितच ऐकणं, पाहणं आणि मनात ठेवणं या सर्वांविषयी विचारणा होणारच.

३७) आणि पृथ्वीवर उद्दामपणे संचार करू नकोस, तू धरतीला दुभंगूही शकणार नाही की पर्वताएवढी उंची गाठू शकणार नाही.

३८) या सर्व दुष्ट (गोष्टी) तुझ्या विधात्यास आवडत नाहीत.

३९) तुझ्या विधात्यानं अनुभूतीद्वारे तुला बुद्धिमत्ता बहाल केलीय. अल्लाहच्या बरोबरीनं दुसऱ्या कुणास ईश्वर बनवू नका, मग तुझी निंदा करून तुला नरकात ढकलून दिलं जाईल.

४०) तुमच्या विधात्यानं तुमच्यासाठी मुलांची निवड केली आणि स्वत:साठी देवदूतांपैकी मुली निवडल्या? तुम्ही नक्कीच भलतंच असं काही बोलता.

४१) तुम्हांस उपदेश घडवण्यासाठी आम्ही कुरआनात विविध प्रकारे समजविली आहे, पण यामुळं त्यांच्या दुराग्रहातच भर पडली.

४२) ते म्हणतात त्याप्रमाणं जर त्याच्या जोडीनं दुसरेही देव असते तर त्यांनी त्याच्या सिंहासनाकडची वाट शोधली असती.

४३) तो पवित्र असून ते जे म्हणतात त्याहून उच्चस्थानी आहेत महान आणि परमोच्च.

४४) सातो आकाश आणि ही धरती व जे काही त्यात आहे सर्वचे सर्व त्याचे गुणगान करतात. कोणतीही वस्तू अशी नाही जी त्याचा गौरव करीत नसेल. पण त्यांची प्रशंसा तुम्हास कळत नाही. तो नक्कीच सहनशील आणि क्षमाशील आहे.

४५) जेव्हा तुम्ही कुरआनचं पठण करत असता आम्ही तुमच्यात आणि

ज्यांचा परलोकावर विश्वास नाही अशांमध्ये एक अदृश्य पडदा टाकून देतो.

४६) आम्ही त्यांच्या मनांवरही पडदा टाकून दिलाय त्यांना समजता येऊ नये यासाठी. तसंच त्यांचे कान बधीर केलेत. तुम्ही जेव्हा कुरआनद्वारे आपल्या एमकेव विधात्याची आठवण करत असता तेव्हा ते तिरस्कारानं पाठ वळवून पळ काढतात.

४७) ते जेव्हा तुमच्याकडं कान धरतात तेव्हा त्यांना काय ऐकायचंय ते आम्हास ठाऊक असतं. आणि जेव्हा ते खाजगीत बोलतात तेव्हा हे अत्याचारी म्हणत असतात, तुम्ही ज्याचं पालन करता तो तर एक झपाटलेला माणूस आहे.

४८) पाहा, ते तुमची तुलना कोणाशी करतात, ते भरकटलेत, त्यांना मार्ग सापडणारच नाही.

४९) ते म्हणतात, आमची हाडे आणि माती झाल्यावर आम्हांस नव्यानं निर्माण करून उठवलं जाईल?

५०) त्यांना सांगा, तुम्ही दगड व्हा अथवा लोखंड व्हा

५१) किंवा तुमच्या कल्पनेत असेल त्याहूनही अधिक मोठी अशी निर्मिती. मग ते विचारतील, आम्हास कोण परत घडवून आणील? त्यांना सांगा, ज्यानं तुम्हास पहिल्यांदा निर्माण केलं तोच. तेव्हा ते तुझ्याप्रत डोके हलवतील आणि विचारतील, 'ते कधी घडणार?' त्यांना सांगा, शक्यतो लवकरच घडेल ते.

५२) ज्या दिवशी तो तुम्हाला हाक देईल, उत्तरादाखल तुम्ही त्याचं गुणगान करीत निघून याल. तुम्हाला वाटेल, अल्पावधीसाठीच तुम्ही थांबला होता (जगात)

५३) माझ्या भक्तांना सांगा, त्यांनी चांगलं तेच बोलावं, सैतान नक्कीच त्यांच्यात कलह निर्माण करतो आणि खरंच सैतान तर मानवाचा उघड उघड शत्रू आहे.

५४) तुमचा विधाता तुम्हांस चांगलं ओळखतो. त्याच्या मर्जीस येईल तर तो तुम्हावर दया करील आणि वाटल्यास तुम्हाला शिक्षा देईल. आम्ही तुम्हास (मुहम्मद स. यांना) त्यांचा वकील म्हणून नेमलं नाही.

५५) आणि तुमचा विधाता आकाश आणि पृथ्वीवर कोण आहेत त्यांना ओळखतो. आम्ही काही प्रेषितांना इतर काही (प्रेषितांवर) प्राधान्य दिलं. दाऊद यांना आम्ही जबूर ग्रंथ दिला.

५६) त्यांना सांगा, आपल्या परिनं तुम्ही त्याच्याव्यतिरिक्त ज्याचा धावा करता ते तुमच्या अडचणींना दूर करू शकत नाहीत की त्यात बदल करू शकत नाहीत.

५७) हे लोक ज्यांचा धावा करतात ते स्वत:च आपल्या विधात्यापाशी पोचण्यास, कोणाची त्याच्याशी जवळीक आहे अशांचा वशिला शोधत असतात. त्याच्या कृपेची अपेक्षा करतात आणि त्याच्या शिक्षेची त्यांना भीती लागून असते. नक्कीच, तुझ्या विधात्याची शिक्षा भिण्यासारखीच (गोष्ट) आहे.

५८) अशी एकही वस्ती नाही जिला आम्ही पुनरुत्थानाच्या दिवसापूर्वी नष्ट करणार नाहीत अथवा त्यास (तेथील लोकांना) कठोर शिक्षा देणार आहोत. तसं विधीलिखितच आहे.

५९) आम्हाला संकेत पाठवण्यापासून कुणी मज्जाव केला नाही, पण त्यांच्या आधीच्या (लोकांनी) ते खोटं ठरवलं. आम्ही समुदच्या लोकांकडं त्यांचं डोळं उघडण्यास उंटीण पाठवली होती. त्यांनी तिच्यावर अत्याचार केला. आम्ही संकेत पाठवतो ते भीती घालण्यासाठीच.

६०) आम्ही तुम्हास सांगितलं की तुमच्या विधात्यानं लोकांस वेढलेलं आहे. आम्ही साक्षात जे घडवलं ते तुम्हास दाखवण्यासाठी नव्हे तर लोकांची कसोटी घेण्यासाठी तसंच तो शापित वृक्ष ज्याचा उल्लेख कुरआनात आहे. आम्ही त्यांना भीती घालतो, पण त्यामुळं त्यांच्या बंडाळीत मोठी भरच पडते.

६१) आम्ही दूतांना सांगितलं, आदम यांना नतमस्तक होण्यास, ते नतमस्तक

झाले पण इब्लीस वगळता. त्यानं विचारलं, मी त्यास नतमस्तक होऊ ज्यास तू चिखलमातीपासून निर्माण केलं?

६२) तो म्हणाला, पाहतोस तू? हाच तो ज्यास तू माझ्यापेक्षा अधिक सन्मानित केलं. पण जर तू मला पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत सवड दिली तर काहींचा अपवाद वगळता त्यांच्या वंशजांना समूळ नष्ट करीन.

६३) तो (अल्लाह) म्हणाला, ''जा तू, त्यांच्यापैकी जे तुझ्यामागं जातील त्यांना आणि तुम्हा सर्वांचा मोबदला नरक असेल, पुरेपूर मोबदला.

६४) यांच्यापैकी कुणावरही तू आपल्या वाणीनं हुरळ घाल, त्यांच्याविरूद्ध आपले प्यादे आणि स्वार घेऊन ये आणि संपत्ती व संततीत त्यांच्याशी भागीदारी कर आणि त्यांना आश्वासन दे'' आणि सैतानाचं आश्वासन, फसवणुकीपलीकडं काय ते.

६५) हे माझे भक्त आहेत, त्यांच्यावर तुझा अधिकार नाही. तुझा विधाता त्यांच्या देखरेखीस पुरेसा आहे.

६६) हा तुमचा विधाता जो समुद्रावर तुमची नौका तारुन नेतो, तुम्हास त्याच्या तरतुदींचा शोध घेता यावा म्हणून. तो तुमच्यासाठी अतिशय दयावंत आहे.

६७) आणि समुद्रात तुम्ही जेव्हा अडचणीत अडकता तेव्हा त्यास सोडून तुम्ही ज्याचा धावा करता ते सर्व हरवून जातात आणि जेव्हा तो तुम्हाला सुखरूप जमिनीवर परत आणतो तेव्हा तुम्ही त्याच्यापासून दूर सरता, मानव फारच कृतघ्न आहे.

६८) त्यानं तुम्हाला जमिनीत गडप करून टाकावं अथवा वावटळ उठवून तुमच्यावर दगडांचा मारा करावा. आणि कोणी तुमचा कैवारी नसावा याची तुम्हाला भीती (राहिली) नाही?

६९) किंवा तुम्ही आता निश्चिंत झालात की तो तुम्हाला दुसऱ्यांदा समुद्रात पाठवणार नाही आणि प्रचंड असं वादळ उठवून तुम्हाला बुडवून

टाकणार नाही, तुमच्या कृतघ्नतेपायी आणि कुणी तिथं आमच्याविरूद्ध (मदत करण्यास) आढळणार नाही?

७०) आम्ही आदमच्या संततीला खऱ्या अर्थानं सन्मान दिला, त्यांना धरती व सागरावर वाहतुकीची साधनं दिलीत आणि पाक वस्तू त्यांच्या उपजीविकेसाठी दिलीत आणि आम्ही त्यांना आपल्या कित्येक निर्मितीवर श्रेष्ठत्व दिले.

७१) आम्ही ज्या दिवशी सर्व लोकांना त्यांच्या नेत्यांसह बोलवू तेव्हा ज्यांच्या उजव्या हातात त्यांच्या कर्माचा लेखाजोखा देऊ ते आपल्या कर्मांची नोंद वाचतील आणि त्यांच्याशी तिळमात्रदेखील अन्याय केला जाणार नाही.

७२) आणि जो इथं आंधळा (बनून) राहिला परलोकातदेखील तो आंधळाच राहील मार्गभ्रष्ट झालेला.

७३) आणि (हे मुहम्मद स.) आम्ही जे तुम्हास प्रकट केले त्यापासून तुमची फसवणूक करण्यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले जेणेकरून तुम्ही आमच्याविरूद्ध खोटं काही रचून आणावं. तसं केल्यास त्यांनी तुम्हास मित्र बनवलं असतं.

७४) आम्ही जर तुम्हास दृढ ठेवलं नसतं तर तुम्ही थोडेफार त्यांच्याकडं झुकला असता.

७५) अशा स्थितीत आम्ही तुम्हास या जगात दुप्पट शिक्षा दिली असती आणि मरणोत्तरही दुप्पट आणि आमच्याविरूद्ध तुम्हास मदत करणारं कुणी आढळलं नसतं.

७६) आणि त्यांनी तुम्हास या भूमीतून (मक्केतून) घालवून देण्याची काहीच कसर सोडली नसती. पण जर त्यांनी तसं केलं असतं तर तुमच्यानंतर तेही काही काळच टिकले असते.

७७) (हे मुहम्मद स.) तुमच्यापूर्वी आम्ही जे प्रेषित पाठविले त्यांच्या बाबतीत हाच आमचा शिरस्ता आणि तुम्हास आमच्या पद्धतीत बदल आढळणार

नाही.

७८) सूर्य ढळण्यापासून रात्रीच्या काळोखा (पसरे) पर्यंत नमाज कायम करा, तसंच पहाटेचं कुरआन पठण करा. पहाटे कुरआन पठण करताना (देवदूत) साक्षी असतात.

७९) आणि रात्री काही काळ जागून (प्रार्थना, नमाज अदा करत) राहा, ती अधिक (देणगी) आहे. लवकरच तुझा विधाता वैभवशाली गौरवाचं स्थान देईल.

८०) आणि प्रार्थना करा, ''माझ्या विधाता, मला सत्यतेच्या दारातून प्रवेश दे, तसंच मला सत्यतेच्या मार्गानं परत कर आणि आपल्या वतीनं माझ्या मदतीस सामर्थ्य बहाल कर.''

८१) आणि म्हणा, सत्य आल्याने असत्य नामशेष झालं. खरंच असत्य नष्टच होणार होतं.

८२) आम्ही कुरआनचं अवतरण करतो श्रद्धावानांसाठी कृपा आणि उपायकारक असं. पण (यामुळे) अत्याचारींना अधिक काही मिळत नसून त्यांना आपयशच लाभतं.

८३) आम्ही मानवास देणगीनं उपकृत करताच तो ऐटीत येऊन पाठ फिरवतो आणि काही इजा पोचते तोच तो निराश होऊन जातो.

८४) सांगा, प्रत्येक त्यास घालून दिलेल्या परिपाठानुसार आचरण करतो. तुमचा विधाताच ओळखतो कोण अधिक रास्त मार्गावर आहे.

८५) ते आत्म्याविषयी तुम्हांस विचारतात. त्यांना सांगा, तो माझ्या विधात्याच्या आदेशांपैकी आहे. तुम्हाला याबाबत फार थोडंच ज्ञान दिलंय.

८६) आणि (हे प्रेषित!) आमच्या मर्जीस आलं तर आम्ही तुम्हास अनुभूतीद्वारे जे कळवलंय ते सर्व हिरावून घेऊन आणि आमच्याविरूद्ध कुणी पुरस्कर्ता तुम्हास आढळणार नाही,

८७) तुमच्या विधात्याच्या कृपेपलीकडं निश्चितच तुमच्यावर त्याचं मोठं

वरदान आहे.

८८) त्यांना सांगा, सर्वच्या सर्व मानवजाती आणि जिन्नांनी एकत्र येऊन या कुरआनासारखं काही आणायचं ठरवलं तरी ते तसं काही आणू शकणार नाहीत. भलं ते आपसांत एकमेकांना कितीही मदत का करेनात.

८९) आम्ही लोकांना विविध उदाहरणं देऊन कुरआनाची विवेचनं केलीत, पण बहुतेकांनी कृतघ्नता करणे तेवढंच कबूल केलं.

९०) ते म्हणाले, आम्ही जोवर तू आमच्यासाठी जमिनीतून एखादा झरा वाहून देत नाही तोवर आम्ही तुला मानणार नाही

९१) किंवा तुझ्याकडं खजूर आणि द्राक्षांची बाग असावी, त्यामधून तू नद्या प्रावाहीत कर,

९२) अथवा तू मगरुरीनं सांगत असतो त्याप्रमाणं आकाश तुकडे-तुकडे होऊन आमच्यावर कोसळू दे अथवा तू अल्लाह आणि त्याच्या दूतांना आमच्या समोरासमोर आणावं,

९३) तुझ्यासाठी सोन्यानं मढवलेलं घर असू दे किंवा तू आकाशात भरारी घे, पण जर तू आकाशात भरारी जरी घेतली तरी, आमच्या वाचण्यासाठी एखादा लिखित ग्रंथ आमच्यावर अवतरत नाही तोवर आम्ही मान्य करणार नाही. त्यांना सांगा, माझा विधाता पावन आहे. मी फक्त एक माणूस आणि (अल्लाहचा) प्रेषित आहे.

९४) आणि लोकांना विश्वास करण्यापासून रोखण्यास कुणी कारणीभूत ठरलं? पण हेच की, ते म्हणतात, अल्लाहनं माणसाला प्रेषित बनवून (का) पाठवलं?

९५) त्यांना सांगा, जर धरतीवर देवदूत असते आणि ते समाधानानं वावरत असते तर आम्ही त्यांच्याकडं आकाशातून देवदूताला प्रेषित करवून पाठवलं असतं.

९६) त्यांना सांगून टाका, माझ्यात आणि तुमच्यात अल्लाहच साक्षीसाठी

पुरेसा आहे. आणि तो आपल्या भक्तांविषयी माहिती ठेवणारा आणि पाहणारा आहे.

९७) अल्लाहनं ज्यांचं मार्गदर्शन घडवलं त्यासच मार्गदर्शन लाभलं आणि जो मार्गभ्रष्ट झाला त्याच्या मदतीला त्याच्याशिवाय कुणी आढळणार नाही. आम्ही पुनरुत्थानाच्या दिवशी आंधळं, मुकं आणि बहिरं होऊन तोंडघशी पडलेल्यांना एकत्रित करू, त्यांचं ठिकाण नरक असेल. नरकाग्नी मंद पडत असेल तर आम्ही पुन्हा ती त्यांच्यासाठी पेटवून देऊ.

९८) हीच त्यांची शिक्षा आहे. त्यांनी आमच्या संकेतांना नाकारलं आणि म्हणाले, आमची हाडं आणि माती झाल्यावरदेखील आम्हाला नव्यानं निर्माण करून उठवलं जाईल?

९९) ते पाहत नाहीत, अल्लाहनं जशी आकाश आणि पृथ्वीची निर्मिती केली त्यासारखंच निर्माण करण्याचं सामर्थ्य तो बाळगतो. त्यानं त्यांच्यासाठी एक मुदत निश्चित केलीय, यात काहीच शंका नाही, पण या अत्याचारींनी कृतघ्नतेपलीकडं काहीच स्वीकारलं नाही.

१००) त्यांना सांगा, जर माझ्या विधात्याच्या कृपेचे खजिने जरी तुमच्या मालकीत असते तरी तुम्ही ते खर्च होतील या भीतीनं त्यांना रोखून धरलं असतं. कारण माणूस लोभी असतो.

१०१) आम्ही मूसा यांना नऊ स्पष्ट संकेतं दिलीत, बनी इस्राईलना (इस्राईलच्या लोकांना) विचारा जेव्हा ते त्याच्याकडं आले तेव्हा फिरऔन त्यांना म्हणाला, नक्कीच माझ्या मते तर हे मूसा तुमच्यावर जादू केली गेलीय.

१०२) ते म्हणाले, तुला नक्कीच ठाऊक आहे आकाश आणि पृथ्वीच्या विधात्यानंच हे सर्व पाठवलेत, ठळक दिसणारा पुरावा आणि माझ्या मतानुसार हे फिरऔन, तू विनाशाकडं जात आहे.

१०३) त्यांना भूमीतून (इजिप्तमधून) घालवून देण्याचा त्यानं विचार केला पण आम्ही त्यास आणि त्याच्याबरोबर सर्वांनाच बुडवून टाकलं.

१०४) आम्ही त्यानंतर इस्राईलच्या लोकांना सांगितलं, या भूमीत शांततेनं राहा आणि आमच्या वचनानुसार शेवटची वेळ येऊन ठेपेल (मरणोत्तर जीवन) तेव्हा आम्ही तुम्हा सर्वांना एकत्रित करू.

१०५) आम्ही हक्कानं हे कुरआन अवतरलं आणि तो सत्यात उतरला आणि आम्ही तुम्हांस सावध करून देणारा तसंच शुभसंदेश देणारा म्हणून पाठवलं.

१०६) आम्ही या कुरआनचे वेगवेगळे भाग केले. तुम्हा लोकांना थांबून-थांबून पठण करण्यासाठी आणि त्यास आम्ही टप्प्याटप्प्यांनी अवतरलं.

१०७) त्यांना सांगा, तुम्ही यावर विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण यापूर्वी ज्यांना ज्ञान दिलं गेलं आणि जेव्हा त्यांच्यासमोर याचं पठण केलं जातं तेव्हा ते नम्रपणे साष्टांग नतमस्तक होतात.

१०८) आणि म्हणत असतात, निश्चितच आमचा विधाता पवित्र आहे आणि खरोखरच आमच्या विधात्याचं वचन परिपूर्ण होणार आहे.

१०९) आणि ते साष्टांग खाली पडतात पाणावलेल्या डोळ्यांनी आणि यामुळं त्यांच्या विनम्रतेत आणखीनच वृद्धी होते.

११०) त्यांना सांगा, तुम्ही अल्लाहच्या नावानं धावा करा किंवा परम दयावंताचा (रहमान) नामोच्चार करीत धावा करा. तुम्ही कोणत्याही नावानं त्याला हाक द्या, अत्यंत सुंदर अशी सर्व नावं त्याचीच आहेत. आपली नमाज फार मोठ्यानं अदा करू नका किंवा हळू आवाजातही नको, त्यामधील मधला मार्ग अवलंबा.

१११) आणि म्हणा, अल्लाहचा गौरव असो, ज्यानं कुणास पुत्रही बनवलं नाही की त्याच्या अधिकारात कोणी भागीदारही नाही आणि कुणी त्याला मदत करावी असा तो लाचार नाही आणि त्याच्या महानतेचं वर्णन करून गौरव करा.

-------

# १८. सूरह कहफ

## मक्काकालीन, आयती ११०

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अल्लाहची स्तुती असो ज्यानं आपल्या भक्तावर हा ग्रंथ अवतरला आणि ज्यात त्रुटींना काहीच स्थान (ठेवलं) नाही.

२) सरळ आणि सत्य, त्याच्या वतीनं सावध करण्यास कठोर शिक्षेपासून आणि श्रद्धावंत सदाचारी लोकांना उत्तम बक्षिसाची (स्वर्ग) खूशखबर देण्यासाठी.

३) ज्यात ते सदैव राहतील.

४) आणि ज्यांनी असं म्हटलं की अल्लाहनं एखाद्याला पुत्र बनवलाय त्यांना ताकीद देण्याकरिता.

५) त्यांना स्वत:ला त्याची जाण नाही की त्यांच्या पूर्वजांनादेखील नव्हती, एक गंभीर गोष्ट त्यांच्या तोंडातून निघते, ते जे काही म्हणतात ते खोट्या गोष्टींपलीकडं काहीच नाही.

६) जर त्यांनी या गोष्टींवर श्रद्धा ठेवली नाही तर तुम्ही त्यांच्या मागं लागून कदाचित दु:खी होऊन आपल्या जिवास धोका पत्कराल.

७) आम्ही या पृथ्वीवर जे काही बनवलंय ते तिचं सौंदर्य आहे कोण चांगलं कर्म करतो याचे परीक्षण करण्यासाठी.

८) आणि तिच्यावर (धरतीवर) असलेल्या सर्वांना आम्ही भुईसपाट करणार आहोत.

९) कहफवाले आणि शिलालेखवाले यांच्याविषयी तुमची काय धारणा आहे? ते आमचे विलक्षण संकेत आहेत.

१०) जेव्हा या तरुणांनी गुहेत आश्रय घेतला तेव्हा म्हणत होते, आमच्या पालनकर्त्या, आमच्यावर दया कर. आमचे व्यवहार रास्त दिशेत असू

देत.

११) आम्ही त्यांच्या कानावर पडदा (झोपेचा) टाकला त्या गुहेत वर्षानुवर्षं तसेच झोपत राहिले.

१२) आणि पुन्हा त्यांना उठवलं त्या दोघांमधील कुणाच्या लक्षात राहिलं, किती काळ ते तिथं पडून राहिले हे पाहण्यासाठी.

१३) आम्ही तुम्हाला त्यांचं खरं ते कथानक सांगतो. आपल्या विधात्यावर श्रद्धा ठेवणारे ते काही युवक होते. आम्ही त्यांना जास्तीतजास्त मार्गदर्शन केलं.

१४) ते उभे राहिले तेव्हा आम्ही त्यांची मनं ठाम केली. ते म्हणाले, आमचा पालनकर्ता पृथ्वी आणि आकाशांचा विधाता आहे, आम्ही त्याऐवजी इतर कुणा देवाकडं धाव घेणार नाहीत. आम्ही जर तसं म्हटलं तर ती अनुचित गोष्ट असेल.

१५) हे आमचे लोकसमूह आहेत ज्यांनी त्याच्याऐवजी इतरांना ईश्वर बनवलंय. ते त्यांच्याविषयी स्पष्ट पुरावा का आणत नाहीत? अल्लाहवर कुभांड रचनाऱ्यांपेक्षा मोठा अत्याचारी कोणता?

१६) अल्लाहला डावलून ज्यांची ते भक्ती करतात, त्याच्याशी जेव्हा तुम्ही परत फिरले तेव्हा तुम्ही त्या गुहेचा आश्रय घ्या. तुमचा पालनकर्ता तुम्हावर आपली कृपा पसरवील आणि तुमची कामं सुरळीत करील.

१७) सूर्य उगवताना तुम्हाला तो उजवीकडं ढळलेला आढळला असेल. तसेच तो मावळताना डावीकडून वळून जातो. ते गुहेतील मध्यभागी मोकळ्या जागी आहेत. हे अल्लाहच्या संकेतातलं आहे. अल्लाह ज्याचं मार्गदर्शन करतो तोच खऱ्या अर्थानं मार्गदर्शित आहे. आणि ज्याला मार्गभ्रष्ट केलं त्याचा कुणी वाली नसणार की दिशा दाखवणारा नसणार.

१८) तुम्ही त्यांना जागे समजता, नव्हे ते तर झोपलेले आहेत आणि आम्ही त्यांना उजवीकडं तर कधी डावीकडं वळवत असतो, त्यांचा कुत्रा

आपली पुढील दोन्ही पाय पसारून उंबरठ्यावर होता. जर तुम्ही त्यांना डोकावून पाहिलं असतं तर तुम्ही नक्कीच पाठ फिरवून पळाला असता आणि तुमच्यावर त्यांची दहशत बसली असती.

१९) आणि अशा रीतीनं आम्ही त्यांना उठवलं एकमेकांची विचारपुस करायला. त्यातला एक म्हणाला, किती वेळ तुम्ही इथं थांबला? ते म्हणाले, आम्ही फार तर एक दिवस किंवा त्यातला काही भाग इथं राहिलो असेल. तुमचा पालनकर्ताच काय ते जाणतो किती वेळ तुम्ही इथं राहिला. आपल्यातल्या एकाला काही नाणे देऊन शहराकडं पाठवा, त्यास पाहू द्या कोणतं अन्न शुद्ध आहे ते. तुमच्याकरिता ते अन्न घेऊन शांतपणे येऊ द्या कुणाला तुमच्याविषयीची माहिती देऊ नये.

२०) जर त्यांनी तुम्हाला पाहिलं तर तुम्हाला दगडांनी ठेचून काढतील किंवा तुम्हाला आपल्या समुदायात परत आणतील. तसं घडलंच तर तुम्ही कधीच यशस्वी होणार नाहीत.

२१) आणि अशाप्रकारे आम्ही लोकांना तुमच्याविषयी सावध केलं. अल्लाहचं वचन सत्य असतं. हे त्यांनी जाणून घ्यावं आणि प्रलयाबाबत कसलाच संदेह नाही. जेव्हा ते त्यांच्या बाबतीत आपसात वाद घालीत होते. ते म्हणाले, त्यांचं एखादं स्मारक उभारा. त्यांचा विधाता त्यांना चांगलं जाणतो. त्यात जे लोक वरचढ ठरले आम्ही त्यांच्यासाठी अवश्य एक मशीद (धर्मस्थळ) उभारू.

२२) काही म्हणतील ते तीनजण होते. चौथा त्यांचा कुत्रा तर काही म्हणतील (नव्हे) ते पाच होते आणि सहावा त्यांचा कुत्रा. काहीही माहीत नसताना अटकळ बांधित ते म्हणतील, ते सातजण होते आणि आठवा त्यांचा कुत्रा. तुम्ही सांगून टाका त्यांचा आकडा माझा विधाताच जाणतो, फार कमी लोकांना ते माहीत आहे. वाद घालू नका त्यांच्याबद्दल. वरवर जे दिसतं ते (घ्या) आणि त्यांच्याविषयी त्यातल्या कुणाशीही विचारपूस करू नका.

२३) आणि कोणत्याही बाबतीत मी ते उद्या करणारच असं म्हणू नका.

२४) पण जर अल्लाहनं (तसं) इच्छिलं तरच. कधी काही विसरले तर आपल्या विधात्याची आठवण करा. आणि म्हणा, माझा पालनकर्ता यापेक्षाही अधिक जवळचा सरळमार्ग सुचवेल अशी मला अपेक्षा आहे.

२५) ते त्या गुहेत तीनशे अधिक नऊ वर्षं राहिले.

२६) तुम्ही सांगा, अल्लाहलाच माहीत ते किती काळ राहिले त्यालाच आकाश आणि पृथ्वीतील अदृश्यांची माहिती आहे. किती उत्तम तो पाहतो आणि किती उत्तम तो ऐकतो, त्याच्याशिवाय त्यांचा कुणी वाली नाही आणि त्याच्या अधिकारात कुणीही भागीदार नाही.

२७) तुमच्या विधात्यानं तुमच्यावर ग्रंथातील ज्याचा आविष्कार केला ते पठण करा. अल्लाहच्या ज्ञानामध्ये कुणी फेरबदल करणार नाही आणि त्याला सोडून दुसरा कोणता आश्रय नाही.

२८) जे लोक रात्रंदिवस आपल्या विधात्याचा धावा करतात, त्याची मर्जी राखतात, अशा लोकांच्या सान्निध्यात राहा. या जगातल्या सौंदर्याच्या आहारी जाऊन त्यांच्याकडून आपले डोळे फिरवू नका. ज्यांची मनं आम्ही आमच्या स्मरणापासून विभक्त केली आहेत, जे आपल्या आकांक्षांचं अनुसरण करतात त्यांचं काही ऐकू नका त्यांनी यातल्या सीमा ओलांडल्या आहेत.

२९) आणि सांगा, हे सत्य तुमच्या विधात्याकडून (आहे) हवं त्यानं मान्य करावं हवं त्यानं नाकारावं, आम्ही अत्याचार माजवणाऱ्यांकरिता अग्नी तयार केलाय. त्यांना ती ज्वाला चोहोकडून वेढा घालील. त्यांनी जर याचना केली तर याचनेच्या उत्तरेत त्यांना वितळलेल्या पितळासारखं पाणी दिलं जाईल, ज्यानं त्यांचं तोंड भाजून जाईल. किती भयंकर त्यांचं पेय आणि त्यांचं ठिकाण.

३०) जे लोक श्रद्धा धारण करतील आणि सत्कर्म करतील ते आम्ही वाया जाऊ देणार नाही. जे सत्कर्म करतात त्यांना मोबदला मिळेल.

३१) हेच लोक आहेत ज्यांना स्वर्ग आहे ज्याच्या खालून निरंतर नद्या वाहतील, त्यात त्यांना सोन्याचं कंकण घातले जातील आणि ते हिरवी

आणि तलम रेशमी वस्त्रं परिधान करून उंचासनावर लोड लावून बसतील. सुंदर मोबदला आणि उत्तम ते स्थान.

३२) त्यांना दोन व्यक्तींचं उदाहरण ऐकवा, त्यातल्या एकाला आम्ही द्राक्षाच्या दोन बागा दिल्या. त्यांना (बागांना) खजुरीच्या झाडांनी वेढलं, त्यांच्या मध्यभागी शेती दिली.

३३) त्या दोन बागांना फळं आली आणि त्याच्या उत्पादनात कमी होत नसे. त्यांच्यादरम्यान एक नदी वाहिली.

३४) त्याला भरपूर फळं यायची. तो (एकेदिवशी) आपल्या मित्राला म्हणू लागला, माझ्याकडं तुझ्यापेक्षा जास्त संपत्ती आहे. माझं मनुष्यबळही मोठं आहे.

३५) तो आपल्या बागेत ऐटीत दाखल झाला. स्वत:वरच (जणू) अत्याचार करीत म्हणाला, मला वाटत नाही कधी याचा नाश होईल.

३६) मला असंदेखील वाटत नाही की प्रलय (येऊन) उभा राहील. आणि जर मी आपल्या विधात्याकडं परतलोच तर मला यापेक्षाही चांगली जागा मिळेल.

३७) त्यांच्यात असा संवाद होत असताना त्याच्या मित्रानं त्याला सांगितलं, तू त्याला नाकारतो ज्यानं तुला चिखलमातीनं निर्माण केलं. मग शुक्रबिंदूतून आणि नंतर तुला माणसाचा आकार दिला?

३८) पण अल्लाहच माझा विधाता आहे आणि माझ्या पालनकर्त्याचा कुणी भागीदार नाही.

३९) आणि जेव्हा तू आपल्या बागेत दाखल झाला तेव्हा 'अल्लाहची इच्छा असेल तेच' असं का नाही म्हणाला? अल्लाहव्यतिरिक्त कोणतं सामर्थ्य नाही. जर तू मला श्रीमंती आणि संततीच्या बाबतीत कमी लेखतो.

४०) तर यात नवल नाही की माझा विधाता तुझ्यापेक्षा उत्तम बाग मला देईल आणि तुझ्या बागेवर आकाशातून काही अनर्थ घडून ती भुईसपाट

होऊन जाईल.

४१) किंवा (त्या नदीतलं) पाणी आटून जाईल, मग तू कितीही शोधलं तरी ते तुला सापडणार नाही.

४२) त्या (बागेतले) सर्व फळं (एका अरिष्टानं) घेरली गेली आणि त्यानं जो काही खर्च केला होता (बागेच्या लागवडीवर) त्यावर तो हात चोळत राहिला. ती बाग मांडवासहित जमिनीवर आदळली. तेव्हा म्हणू लागला, मी जर कुणास आपल्या विधात्याचा भागीदार बनवला नसता!

४३) त्या वेळेस अल्लाहशिवाय माणसांची कुठली टोळी याच्या मदतीला नव्हती, तो स्वत: त्यावर काही उपाय करण्यास समर्थ नव्हता.

४४) अल्लाहच खऱ्या अर्थानं सक्षम, तोच उत्तम मोबदला देणारा, तोच उत्तमांपैकी यश (मिळवून) देणारा.

४५) त्यांना या जगातले उदाहरण द्या. आम्ही कसं पाऊस पाडतो, मग त्यात मिसळून झाडं-झुडपं उगवून येतात. मग नंतर सारं काही जळून चुरा-चुरा होऊन वाऱ्यानं (सर्वत्र) विखरून जातो. अल्लाहच (या) सर्व बाबींवर प्रभुत्वसंपन्न आहे.

४६) संपत्ती आणि संतती जागतिक जीवनाचे वैभव आहेत, पण तुझ्या विधात्याच्या दृष्टीत टिकाऊ गोष्ट म्हणजे सत्कर्म आहेत. मोबदल्याच्या दृष्टीनं आणि अपेक्षांच्या दृष्टीनंदेखील.

४७) एक दिवस तुम्ही पाहाल, आम्ही पर्वतांना चालते करू आणि पृथ्वी सपाट होऊन जाईल, आम्ही सर्वांना एकत्रित करू, कुणा एकालाही आम्ही सोडणार नाही.

४८) आणि त्यांना तुझ्या विधात्यासमोर रांगेत हजर करण्यात येईल. (शेवटी) तुम्ही आमच्यासमोर तसंच आला जसं आम्ही तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केलं होतं. तुम्ही तर असं भ्रमात होता की आम्ही परत भेटण्याची वेळ ठरवली(च) नाही.

४९) जेव्हा त्यांच्यासमोर (त्यांच्या कर्मांचं) दप्तर ठेवलं जाईल, तेव्हा जे

काही त्यात नोंदवलेलं आहे त्यामुळं अपराधींना भयभीत झालेलं पाहाल. आणि म्हणतील, (कसलं हे) दुर्दैवं आमचं, कसलं हे दफ्तर! लहान असो की मोठी गोष्ट काहीच यातून सुटलेलं नाही, सर्वांची यात नोंद आहे, जे काही त्यांनी केलं होतं (सर्वकाही) हजर आहे. तुमचा विधाता कुणाशीही अन्याय करणार नाही.

५०) जेव्हा आम्ही देवदूतांना सांगितलं आदमसमोर नतमस्तक होण्यास, इब्लीस वगळता सारेच्यासारे नतमस्तक झाले. तो जिन्नांपैकी (अदृश्य निर्मिती) होता. त्यानं आपल्या विधात्याशी बंड केलं. तेव्हा तुम्ही माझ्याऐवजी त्याला आणि त्याच्या अपत्यांस आपला वाली बनवता? ते तर तुमचे उघड शत्रू आहेत. अपराधींचा बदला वाईटच असणार.

५१) अवकाश आणि पृथ्वी निर्माण करताना मी त्यांना बोलवलं नव्हतं की त्यांना निर्माण करतेवेळी मार्गभ्रष्ट करणाऱ्यांची मी मदत घेत नसतो.

५२) ज्या दिवशी अल्लाह म्हणंल, ज्यांना तुम्ही माझे भागीदार समजत होता, त्यांना हाक मारा पण ते त्यांना उत्तर देणार नाहीत. आम्ही त्यांच्यासाठी सामाईक विनाशाचं स्थान बनवू.

५३) जेव्हा अपराधी त्या अग्नीला पाहतील, त्यांना कळून चुकेल की त्यांना त्यात पडावं लागंल. पण काही केल्या त्याच्यापासून पळून जाण्याचा मार्ग मिळणार नाही.

५४) आम्ही या कुराणात माणसांच्या (भल्यासाठी) वारंवार सर्व प्रकारची उदाहरणं दिली आहेत. पण माणूस तर प्रत्येक बाबतीत वाद घालणारा आहे.

५५) एकदा मार्गदर्शन लाभल्यावर ते मान्य करण्यास आणि आपल्या विधात्याकडं क्षमायाचना करण्यात या लोकांसमोर कोणता अडसर आहे? पूर्वजांचा शिरस्ता आणि प्रकोपाला समोरासमोर आणण्यापलीकडं (काहीच नाही).

५६) आम्ही प्रेषितांना खूशखबर देण्यासाठी व सावध करण्यासाठीच पाठवतो, पण जे लोक नाकारणारे आहेत ते वायफळ गोष्टींना धरून

वादविवाद घालतात, खऱ्या बाबींना खोटं ठरवण्याकरिता माझ्या संकेतांची आणि ताकीदींची त्यांनी चेष्टा करून टाकली.

५७) ज्याला त्याच्या विधात्याच्या उपदेशांची (आयतींची) आठवण करून दिली गेली पण त्यानं त्यांच्याकडं तोंड फिरवलं आणि आपल्या हातांनी त्यानं जे काही आगाऊ पाठवलंय त्याला विसरून गेले त्यांच्यापेक्षा अत्याचारी इतर कोण? आम्ही त्यांच्या हृदयांवर पडदे घातलेले आहेत, त्यांना हे काही समजू नये म्हणून आणि त्यांचे कान बधीर केलेत. अशात त्यांना तुम्ही मार्गदर्शनार्थ बोलवलं तरी त्यांना कधीही मर्गादर्शन लाभणार नाही.

५८) तुझा विधाता क्षमा करणारा कृपासंपन्न आहे. ते जे काही करतात त्यावर त्यांची लगेच पकड करायची असती तर त्यांच्यावर प्रकोप पाठवला असता. नव्हे त्यांच्यासाठी वेळ ठरलीय. त्याच्याशिवाय त्यांना इतरत्र आश्रयस्थान मिळणार नाही.

५९) या त्यांच्या वस्त्या आहेत जेव्हा त्यांनी अत्याचार माजवला आम्ही त्यांचा नाश केला. आम्ही त्यांच्या विध्वंसासाठी वेळ निश्चित केलीय.

६०) आठवण करा, जेव्हा मूसानं (अ.) आपल्या सेवकाला सांगितलं होतं की मी दोन नद्यांच्या संगमापर्यंत पोहोचेस्तव सोडणार नाही. अथवा मी दीर्घकाळ चालतच राहणार.

६१) मग जेव्हा ते दोन्ही नद्यांच्या संगमावर पोहोचले तेव्हा आपला मासा विसरले. त्या माशानं एका बोगद्यातून (गेल्याप्रमाणं) समुद्राची वाट धरली.

६२) थोडं पुढं गेल्यावर मूसा (अ.) आपल्या सेवकास म्हणाले, या प्रवासात आम्ही पार थकलो, आता सकाळचं जेवण आणा.

६३) तो (सेवक) म्हणाला, आपण पाहिलं, आम्ही त्या खडकापाशी उभं असताना काय घडलं? मी त्या माशाला विसरूनच गेलो. सैतानानंच ही भुरळ घातली ते तुम्हाला कळवण्यापासून आणि त्यानं कशा तऱ्हेनं समुद्रातून आपली वाट काढली.

६४) (मूसा अ.) म्हणाले, आपल्याला हवं होतं ते हेच (ठिकाण). मग ते दोघं आपल्या पाऊलखुणांनी परतले.

६५) मग आमच्या भक्तांपैकी एका भक्ताशी (खिजर) त्यांची भेट झाली. ज्यांना आम्ही आपल्याकरवी उपकृत केलं होतं आणि आम्ही त्यांना रास्त ज्ञान दिलं होतं.

६६) मूसा (अ.) यांनी त्यांना सांगितलं, मी अनुसरण करू तुमचं? आपणास जो रास्त मार्ग शिकवला गेलाय तेच मलाही शिकवाल.

६७) ते (खिजर अ.) म्हणाले, नक्कीच. पण तुम्ही माझ्याबरोबर असताना धीर धरणार नाही.

६८) आणि कसं बरं तुम्ही धीर धरणार, ज्याचं तुम्हाला सर्वस्वी ज्ञान नाही.

६९) मूसा म्हणाले, जर अल्लाहनं इच्छिलं तर मी तुम्हास संयमी आढळेन आणि कशाही बाबतीत तुमची अवज्ञा करणार नाही.

७०) मग त्यांनी सांगितलं, तुम्हाला माझ्याबरोबर यायचंच असल्यास मी स्वत: तो विषय काढल्याशिवाय मला कोणत्याही गोष्टीविषयी विचारायचं नाही.

७१) मग ते दोघं निघाले. जेव्हा नावेपर्यंत पोहोचून त्यात स्वार झाले तेव्हा त्यांनी (खिजर यांनी) त्यात एक भोक पाडलं. (मूसा अ.) म्हणाले, यातील लोक बुडून जावेत म्हणूनच तुम्ही हे भोक पाडलं. तुम्ही एक भयंकर प्रकार केलाय.

७२) त्यांनी सांगितलं, मी म्हटलं नव्हतं का तुम्ही माझ्याबरोबर धीर धरणार नाही ते.

७३) मूसा म्हणाले, मी जे विसरून गेलो त्याची मला शिक्षा करू नका. या प्रकरणात मला अडचणीत टाकू नका.

७४) ते पुन्हा निघाले एका तरुणाशी त्यांची भेट झाली आणि त्याला त्यांनी (खिजर अ.) ठार केलं. (मूसा) म्हणाले, तुम्ही एका निष्पाप व्यक्तीचा वध केला, इतर व्यक्तींच्या बदल्यात नसता, खरंच तुम्ही फारच वाईट

कृती केली.

**पारा - १६**

७५) त्यांनी सांगितलं, मी म्हटलो नव्हतो, तुम्ही माझ्याबरोबर धीर धरणार नाही म्हणून!

७६) (मूसा अ.) म्हणाले, मी यानंतर जर कोणत्याही बाबतीत प्रश्न केला तर तुम्ही मला सोबत राहू देऊ नका. आता तुम्हाला माझ्याकडून पुरेशी सबब आहे.

७७) ते परत निघाले आणि एका गावात पोहोचले. त्यांनी त्या गावकऱ्यांना काही खावयास मागितलं. पण त्यांनी पाहुणचार करण्यास नकार दिला. तिथं मग त्यांनी एक भिंत पाहिली जी पडण्याच्या बेतात होती. त्यांनी (खिजर अ.) ती उभी केली. (मूसा अ.) म्हणाले, वाटल्यास तुम्ही त्याचा मोबदला घेतला असता.

७८) त्यांनी (खिजर अ.) सांगितलं, पुरं, आता आपण निरोप घेऊ या आणि मी ती सर्व हकीकत सांगतो ज्यावर तुम्ही धीर धरू शकला नाही.

७९) ती नाव गरीब लोकांची होती. समुद्रात ते गरीब लोक काम करीत. म्हणून मी विचार केला, तिला डाग लावण्याचं कारण तिच्या पुढंच एक राजा होता आणि तो प्रत्येक नाव बळकावायचा.

८०) त्या मुलाची गोष्ट अशी की त्याचे आई-वडील श्रद्धाळू आहेत. आम्हास अशी भीती वाटली तो त्यांच्याविरूद्ध बंड करून त्यांना इजा पोहोचवील.

८१) आम्हाला असं वाटलं, त्यांचा विधाता त्याच्या जागी अधिक चांगलं, पावन, दयाशील (पुत्र) त्यांना देईल.

८२) आता उरली त्या भिंतीची गोष्ट, ती शहरातल्या दोन अनाथ मुलांची होती. तिच्याखाली त्या दोघांसाठी खजिना होता. त्यांचा पिता सदाचारी होता. तेव्हा तुमच्या विधात्याची अशी मर्जी होती की ती मुलं सज्ञान अवस्थेला जाऊन तुमच्या पालनकर्त्याच्या कृपेचा तो खजिना त्यांनी

काढून घ्यावा. मी हे (सर्व) काही स्वत:च्या मर्जीनं केलं नाही. ही ती हकीगत (या सर्व प्रकारांची) ज्यावर तुम्हास धीर धरता आला नाही.

८३) ते आपणास (प्रेषितांना) जुलकरनैनच्या बाबतीत विचारतायत. तुम्ही सांगा मी आता त्यांचा तपशील वाचून दाखवतो.

८४) निश्चितच आम्ही त्याला पृथ्वीवर सत्ता दिली आणि त्याला सर्व प्रकारची साधनं दिली होती.

८५) त्यानं एक मोहीम हाती घेतली.

८६) सूर्य मावळतो त्या ठिकाणापर्यंत तो पोहोचला. तो गढूळ पाण्याच्या झऱ्यात मावळताना त्याला आढळला. आणि जवळच त्यास (जुलकरनैनला) एक जनसमूह आढळला. आम्ही म्हणालो, जुलकरनैन! वाटल्यास तू त्यांना शिक्षा दे अथवा त्यांच्याशी चांगुलपणाचा (व्यवहार) कर (आता हे तुझ्याच हाती).

८७) तो म्हणाला, ज्याने अत्याचार माजविला आम्ही त्याला शिक्षा देऊ. नंतर त्याला त्याच्या विधात्याकडं पाठवलं जाईल. मग तो त्याला भयंकर शिक्षा देईल.

८८) आणि ज्यानं श्रद्धा धारण केली आणि सत्कर्म केलं त्याचा मोबदला उत्तम असेल व तसेच आम्ही त्याला अशाच आज्ञा देऊ जे त्याच्यासाठी सहज सोपं असेल.

८९) पुन्हा तो दुसऱ्या मोहिमेकडे वळला.

९०) आणि तो उगवत्या सूर्याच्या ठिकाणी पोहोचला. तेव्हा त्याला तो अशा जनसमूहावर उगवताना आढळला ज्याच्यासाठी आम्ही कसलाच आश्रय बनवला नव्हता.

९१) असं होतं (ते प्रकरण) आणि त्याच्याकडं जे काही होतं ते आमच्या माहितीत होतं.

९२) त्यानं पुन्हा एक मोहीम हाती घेतली.

९३) तो दोन पर्वतांच्या मध्यभागी पोहोचला. त्याला तिथं असे लोक आढळले ज्यांना काही बोललेला कळंत असेल असं वाटत नव्हतं.

९४) ते म्हणू लागले, जुलकरनैन! याजूज आणि माजूज यांनी या भूमीत अनाचार माजवलाय. आम्ही तुम्हाला काही माल देऊ आणि तुम्ही आमच्या आणि त्यांच्या दरम्यान एक संरक्षण भिंत उभारा.

९५) ते (जुलकरनैन) म्हणाले, मला माझ्या विधात्यानं जी काही साधनं दिलीयत ती पुरेशी आहेत. तुम्ही श्रमानं मला मदत करा, मी तुमच्या आणि त्यांच्या मधोमध मजबूत व भक्कम अशी भिंत उभारतो.

९६) मला लोखंडी पत्रे आणून द्या. तोपर्यंत त्यांनी दोन्ही डोंगरांमधील पोकळी भरून काढली. मग म्हणाले, आता जोपर्यंत हे आगीप्रमाणं (लाल) होत नाही, फुंकत राहा (भात्यानं), नंतर त्यानं सांगितलं, आता वितळलेलं तांबं आणा, मी त्यावर टाकतो.

९७) आता ते (याजूज व माजूज) त्यावर चढू शकणार नाहीत की त्यात त्यांना सुरुंगही लावता येणार नाही.

९८) तो म्हणाला, हे सर्व माझ्या विधात्याच्या कृपेमुळं. माझ्या पालनकर्त्यानं ठरवलेली वेळ आली की तो याला सपाट करून टाकील. कारण त्याचं वचन पक्कं असतंय.

९९) आणि आम्ही त्या दिवशी त्या लोकांना (समुद्राच्या लाटांप्रमाणं) एकमेकांवर आदळू. मग नरशिंग फुंकलं जाईल. तेव्हा त्या सर्वांना एकत्रित करू.

१००) त्या दिवशी आम्ही नरक व नाकारणाऱ्यांना समोरासमोर आणू.

१०१) माझ्या बाबतीत त्यांच्या डोळ्यांवर पडदा पडलेला होता. (मला पार विसरून गेले होते) तसेच ते काही ऐकण्याचं बेतातही नव्हते.

१०२) मला वगळून माझ्याच भक्तांना आपला स्वामी ठरवण्याच्या बेतात हे विद्रोही लोक होते? निश्चितच आम्ही नाकारणाऱ्यांच्या पाहुणचारासाठी नरक सुसज्ज करून ठेवलंय.

१०३) सांगा त्यांना, तुम्हाला दाखवू आम्ही आपल्या कर्मांचा सर्वांत मोठा फटका कोणावर बसणार ते?

१०४) अशी ती माणसं ज्यांचे सर्व प्रयत्न या जगात निकामी ठरले. पण त्यांना असं वाटत असंल की ते जे (कर्म) करताहेत ते योग्य आहेत.

१०५) हेच ते लोक आपल्या विधात्याच्या संकेतांना व त्याच्यासमोर हजर होण्यास नाकारत राहिले. त्यांची सर्व कर्मे वाया गेली. कयामतच्या दिवशी आम्ही त्यांना काडीची किंमत देणार नाही.

१०६) हाच त्यांचा मोबदला. नरक, ज्यास ते नाकारत राहिले आणि माझ्या (ग्रंथातील) आयतींची माझ्या प्रेषितांची चेष्टा करत राहिले.

१०७) श्रद्धा धारण करणाऱ्या ज्या लोकांनी सत्कर्मे केली निश्चितच त्यांच्या स्वागतासाठी स्वर्गाच्या बागा आहेत.

१०८) ते तिथं सदासर्वदा राहतील. त्यात (त्या अवस्थेत) बदल होणं त्यांना आवडणार नाही.

१०९) माझ्या विधात्याच्या गोष्टी (लिहिण्यास) जर महासागराची शाई झाली तरीदेखील त्या (गोष्टी) संपण्याआधी महासागरे संपून जातील, आम्ही त्यासारखा आणखीन एखादा सागर आणला मदतीसाठी (तरी तोही पुरणार नाही).

११०) (हे प्रेषित) त्यांना सांगा, मीही तुमच्यासारखा माणूसच, पण माझ्याकडं दिव्य प्रकटन पाठवलं जातं. तुमचा ईश्वर एकच एक ईश्वर ज्यास आपल्या विधात्याशी भेट हवी, त्यानं चांगली कर्मं करावीत आणि आपल्या विधात्याच्या आराधनेत कोणास भागीदार करू नये.

-------

# १९. सूरह मरयम

## मक्काकालीन, आयती ९८

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) काफ. हा. या. ऐन. स्वाद.

२) तुझ्या विधात्याची त्याचे भक्त जकरियावरील कृपेचं यात वर्णन आहे.

३) जेव्हा त्यांनी आपल्या विधात्यास, नम्रतेनं हाक दिली

४) ते म्हणाले, माझ्या विधाता! वृद्धापकाळात माझी हाडं मरगळली असून माझे केस पांढरे होऊन चमकत आहेत. माझ्या विधात्या, मी तुला मागितलं आणि वंचित राहिलो असं कधी घडलं नाही.

५) माझ्यानंतर माझ्या नातेवाईकांची भीती वाटते, माझी पत्नीही वांझ आहे. आता तूच आपल्याकरवी एक वारस दे.

६) तो वंशज होईल माझा आणि याकूब (अ.) यांच्या घराण्याचं आणि हे माझ्या विधाता! त्यास तू आवडता बनव.

७) (म्हटलं गेलं) हे जकरिया, आम्ही निश्चितच तुला एका मुलाची खूशखबर देतो. त्याचं नाव यहया असेल. आम्ही याआधी कुणासच हे नाव दिलं नाही.

८) ते म्हणाले, माझ्या विधाता! मला कसा बरं मुलगा होईल माझी पत्नी वांझ असता आणि वाढत्या वयाची मी परिसीमा गाठली असताना?

९) तो (अल्लाह) म्हणाला, असेच होईल. तुझ्या विधात्याचं हे म्हणणं होय. माझ्यासाठी हे सोपं आहे. तू काहीच नसताना मी पूर्वी तुला जन्मास आणलं.

१०) ते (जकरिया) म्हणाले, माझ्या विधाता! माझ्यासाठी एखादा संकेत घडंव. तू व्यवस्थित असूनही तीन (दिवस आणि) रात्री कुणाशी बोलणार नाही हाच तुझा संकेत.

११) तेव्हा ते आमच्या आराधना घरातून बाहेर पडले आणि आपल्या लोकांकडं आले आणि त्यांना सकाळ-सांज त्याचं स्तवन करण्यास सुचवलं.

१२) यहया! ग्रंथास घट्ट धरून ठेवा. आम्ही त्यांना बालपणापासून सूज्ञपणा दिला.

१३) आणि आम्ही त्यांना सौहार्द आणि पावित्र्य दिले. ते सदाचारी होते.

१४) आपल्या माता-पित्याची सेवा करणारे होते. उद्धट किंवा अवज्ञाकारी नव्हते.

१५) ते जन्मास आले त्या दिवशी शांतता नांदो त्यांच्यावर आणि ज्या दिवशी ते मरण पावतील आणि जेव्हा त्यांना सजीव उभं केलं जाईल.

१६) ग्रंथात मरयमचा उल्लेख करा, जेव्हा त्या आपल्या कुटुंबीयांना सोडून पूर्वेकडच्या एका जागी गेल्या

१७) आणि मग त्यांच्यापासून त्यांनी पडदा केला, मग आम्ही त्यांच्याकडं हुबेहूब मानवरूपी आमच्या दूतास पाठवलं.

१८) मी तुझ्यापासून परम दयावंताचा आश्रय मागते, जर तू सदाचारी असशील तर (येथून निघून जा.)

१९) तो म्हणाला, मी तुझ्या विधात्याकडून पाठवला गेलोय, तुम्हांस एका पावन मुलाची भेट देण्यासाठी.

२०) त्या म्हणाल्या, मला कोणा पुरुषानं स्पर्श केला नाही आणि आणि मी शुद्धता भंग केली नसताना कसं बरं मला मुलगा होईल?

२१) ते म्हणाले, असेच होईल, तुझा विधाता म्हणतो, त्यास हे सोपं आहे. लोकांसाठी त्यास एक संकेत बनवण्यासाठी आमच्या कृपेचं हे घडणं ठरवलेलंच आहे.

२२) मग तिनं त्याचे गर्भ धारले. आणि त्यास घेऊन त्या दूरवरच्या ठिकाणी गेल्या.

२३) प्रसुतीच्या वेदनांमुळे त्या खजुरीच्या झाडाखाली पोहोचल्या आणि म्हणू लागल्या, मी या आधीच मेले असते आणि (इतरांना) माझा विसर पडला असता तर!

२४) ‘‘घाबरू नकोस.’’ खालून एकानं (दूतानं) हाक मारली, ‘‘तुझ्या विधात्यानं तुझ्या पायथ्याशी एक झरा वाहिलाय.

२५) आणि खजुरीच्या झाडाला आपल्याकडं हलंव. तुझ्यासाठी ताज्या खजुरी खाली पडतील.

२६) ते खा आणि (पाणी) पी आणि डोळ्यांना (पाण्याचा) गारवा दे. जर कुणी माणूस तुला दिसला तर सांग, मी त्या दयावंतास उपवास (पाळण्याचे नवस) केले तेव्हा मी कोणत्याही इसमाशी आज बोलणार नाही.

२७) मग त्यास घेऊन आपल्या लोकांपाशी आल्या. ते म्हणाले, मरयम! तुम्ही भयंकरच अशी गोष्ट आणली.

२८) हारुनच्या भगिनी! तुमचे पिता दुष्ट वाईट की तुझी आईदेखील वाईट वर्तनाची नव्हती.

२९) त्यांनी (मरयम यांनी) त्याच्याकडं (मुलाकडं) बोट दाखवलं. ते म्हणाले, आम्ही पाळण्यात असलेल्या मुलाशी कसं काय बोलू?

३०) त्यानं (मुलानं) सांगितलं, मी अल्लाहचा भक्त आहे. त्यानं मला ग्रंथ दिला आणि प्रेषित नेमलं.

३१) आणि मी जिथं कुठं असलो त्यानं मला समृद्ध केलं आणि मला आयुष्यभर नमाज आणि जकात (अदा) करण्याचा आदेश दिला गेलाय,

३२) तसंच आईशी कणवाळूपणानं वागण्याचा. मला उद्धट आणि कठोर बनवलं नाही.

३३) तेव्हा मला शांतता लाभो, ज्या दिवशी मी जन्मलो, ज्या दिवशी मला मरण येईल आणि ज्या दिवशी मी जीवंत उठवला जाईन.

३४) हे मरयमपुत्र ईसा आहेत. एक वास्तव ज्या बाबतीत ते साशंक आहेत.

३५) कुणास पुत्र बनवणं अल्लाहस साजेसं नाही. तो पवित्र आहे. जेव्हा तो काही घडवण्याचा निर्णय घेतो, तो नुसतेच म्हणतो, 'घडो' आणि ते 'घडून' जाते.

३६) अल्लाहच माझा आणि तुमचा विधाता आहे. त्याचीच भक्ती करा हाच रास्त मार्ग आहे.

३७) पण नंतर (विविध) पंथांनी आपसांत मतभेद केला. म्हणून ज्या लोकांनी त्या दिवशी (कयामतच्या दिवशी) हजर होणे नाकारलंय त्यांचा धि:क्कार आहे.

३८) ज्या दिवशी ते आमच्या समक्ष येतील तेव्हा ते काय काय ऐकतील आणि काय काय पाहतील, पण आज हे अत्याचारी लोक उघड-उघड मार्गभ्रष्ट झालेत.

३९) प्रकरण निकाली लागल्यामुळं ज्या दिवशी त्यांना खेद वाटेल त्यापासून त्यांना सावध करा, ते गाफील असल्यामुळं विश्वास धारण करत नाहीत.

४०) या धरतीचा, त्याच्यावरील जे काही आहे त्याचा वारसा आम्हासच लाभणार आहे. तेही आमच्याकडंच परतले जाणार आहेत.

४१) हे प्रेषित! ग्रंथात इब्राहीम (अ.) यांचाही उल्लेख करा. निश्चितच ते सत्यतेनं परिपूर्ण प्रेषित होते.

४२) जेव्हा त्यांनी बापास सांगितलं, बाबा! का बरं तुम्ही अशांची भक्ती करता जे काही ऐकत नाहीत की पाहत नाहीत, अथवा ना तुमच्या काही कामी येतात.

४३) बाबा! माझ्याकडं (मला) जे ज्ञान पोचलंय ते तुम्हांस पोचलेलं नाही. माझं ऐका, मी तुम्हास सरळमार्ग दाखवीन.

४४) बाबा! सैतानाची भक्ती नका करू. सैतानानं नक्कीच परम दयावंताची अवज्ञा केलीय.

४५) बाबा! मला नक्कीच भीती वाटते त्या दयावंताची, तुम्हांस शिक्षा होईल आणि तुम्ही सैतानाचेच सोबती होऊन जाल.

४६) तो (इब्राहीमचा बाप) म्हणू लागला, इब्राहीम! तू माझ्या देवांपासून (उपास्यांपासून) फिरला की काय! तू जर परावृत्त झाला नाहीस तर मी तुला दगडांनी ठेचून काढीन. आता तू जा मला सोडून काही काळासाठी.

४७) (इब्राहीम) म्हणाले, तुम्हांस शांतता लाभो, मी माझ्या विधात्याशी तुमच्यासाठी क्षमायाचना करतो, तो निश्चितच माझ्यासाठी दयावंत आहे.

४८) मी तुम्हाला आणि अल्लाहला सोडून ज्यांची तुम्ही आराधना करता त्या सर्वांना सोडून दिलं. मी माझ्या विधात्याचा धावा करतो. माझ्या विधात्याचा धावा करण्यापासून मी वंचित राहणार नाही हीच माझी आशा.

४९) जेव्हा इब्राहीम यांनी त्यांना (बाबांना) आणि अल्लाहव्यतिरिक्त ज्यांची ते आराधना करीत त्यांना सोडून दिले तेव्हा आम्ही त्यांना इसहाक आणि याकूब यांचे वरदान दिले आणि त्या सर्वांना प्रेषित बनवलं.

५०) आमच्या कृपेनं आम्ही त्यांना खूप काही देणगी दिली आणि आम्ही त्यांना खरं नावलौकिक प्रदान केलं.

५१) आणि या ग्रंथात मूसा (अ.) यांचाही उल्लेख करा, ते खास निवडलेले प्रेषित आणि प्रवक्ता होते.

५२) आम्ही त्यांना तूर (पर्वताच्या) उजव्या बाजूनं हाक दिली आणि संभाषणासाठी त्यांना जवळ केलं.

५३) आम्ही आमच्या कृपेनं त्यांचे बंधु हारुन यांना प्रेषितत्व बहाल केलं.

५४) तसंच या ग्रंथात इस्माईल यांचाही उल्लेख येऊ दे, ते निश्चितच वचनं सत्यतेनं पाळीत आणि प्रेषित व प्रवक्ता होते.

५५) ते आपल्या कुटुंबीयांना नमाज आणि जकातच्या आज्ञा देत आणि

आपल्या विधात्याची मर्जी राखून होते.

५६) ग्रंथात इद्रीस (अ.) यांचाही उल्लेख करा, ते एक सत्याधिष्ठित प्रेषित होते.

५७) आम्ही त्यांना उच्चस्थानी उंचावलं.

५८) प्रेषितांपैकी हे ते लोक ज्यांना अल्लाहनं समृद्ध केलं. आदमच्या संततीमधील आणि त्यांच्यामधून ज्यांना आम्ही नूहबरोबर (नौकेत) स्वार केलं होतं, तसंच इब्राहीम आणि इस्राईल (याकूब) यांच्या वंशातून ज्यांना आम्ही निवडलं त्यांचं मार्गदर्शन केलं त्यांपैकी. त्यांना जेव्हा परमोच्च दयावंताच्या आयती (वचनं) ऐकविली जात तेव्हा ते पाणावलेल्या डोळ्यांनी नतमस्तक होऊन खाली लोटतात.

५९) त्यांच्यानंतर वाईट लोकांची पिढी आली, तिनं नमाज चुकविली आणि वासनांच्या पाठी लागले म्हणून त्यांना भ्रष्ट मार्गांच्या परिणामास सामोरं जावं लागेल.

६०) पण ज्यांनी पश्चात्ताप व्यक्त केला, विश्वास ठेवून नेक कर्मं केलीत, तेच लोक स्वर्गात प्रवेश करतील आणि त्यांच्यावर काहीच अन्याय होणार नाही.

६१) निरंतर असे स्वर्ग परमोच्च दयावंतानं ज्यांच्याविषयीचं अभिवचन अप्रत्यक्षपणे आपल्या भक्तांना दिलं होतं. निश्चितच त्याचं अभिवचन साकारणारच.

६२) तिथं त्यांना शांततेच्या अभिवादनापलीकडील कोणतीही निरर्थक गोष्ट ऐकू येणार नाही. सकाळ-संध्याकाळ त्यांच्या अन्न-पाण्याची सोय होईल.

६३) हेच ते स्वर्ग ज्यांचा वारसा आमच्या सदाचारी भक्तांना लाभेल.

६४) (देवदूत म्हणतात) आम्ही तुमच्या विधात्याच्या आज्ञेशिवाय खाली येत नाही. आमच्या समोर आहे ते त्याचंच होय, आमच्या मागं आणि दरम्यान आहे तेही त्याचंच होय. तुमचा विधाता विसरणारा नाही.

६५) आकाश आणि पृथ्वीचा आणि त्यामधील सर्वांचा विधाता तोच. त्याचीच भक्ती करा आणि त्याच्या आराधनेत ठाम राहा. त्याच्यासमान तुम्हांस कुणी ठाऊक आहे?

६६) माणूस विचारतो, मी मेल्यावरही मला (जमिनीतून) जीवंत काढलं जाईल?

६७) माणसास आठवत नाही आम्ही यापूर्वीही त्याला जन्माला आणलं ते? तो काहीच नसताना.

६८) तुझ्या विधात्याची शपथ! आम्ही त्यांना आणि सैतानाला एकत्रित करू आणि आम्ही नरकाच्या समोर त्यांना गुडघे टेकत हजर करू.

६९) आणि मग आम्ही खात्रीनं प्रत्येक समुदायातून अशांना बाहेर काढू ज्यांनी कृपावंताशी बंड केलं होतं.

७०) आम्हास ठाऊक आहे ते लोक जे (नरकात) जाऊन मिसळण्यास कोण अधिक लायकीचे आहेत.

७१) तुमच्यापैकी असा एकही नाही जो नरकाच्या सान्निध्यात येणार नाही, तुमच्या विधात्यानं हे निश्चित केलंय.

७२) मग आम्ही सदाचारी लोकांना वाचवू आणि अत्याचारींना त्यामध्ये गुडघ्यावर वाकत सोडून देऊ.

७३) जेव्हा नाकारणाऱ्यांना आमच्या स्पष्ट आयती (वचनं) ऐकविली जात, ते श्रद्धावंतांना विचारतात, उभय पक्षांपैकी कोणाचं स्थान उत्तम आणि कोणाची संगत उत्तम?

७४) आम्ही त्यांच्या आधी कितीतरी समूहांना नष्ट केलंय ज्यांच्याकडं कितीतरी सामुग्री होती आणि केवढा त्यांचा दरारा होता.

७५) जे भरकटलेत त्यांना सांगा, नितांत कृपावंत त्यांना मार्गभ्रष्टतेतच खितपत ठेवतो, तोवर जेव्हा त्यांच्या पाहणीत येईल एकतर ती शिक्षा किंवा ती वेळ (कयामतची) ज्याचं त्यांना वचन दिलं गेलंय. आणि मग त्यांना कळून चुकेल कुणाची अवस्था वाईट आहे आणि कोण दुबळा

समूह आहे.

७६) ज्यांना मार्गदर्शन लाभलं अल्लाह त्यांच्या मार्गदर्शनात भरच टाकतो आणि तुमच्या विधात्याकडं चिरस्थायी कर्म प्रतिफळाच्या दृष्टीनं आणि परिणामांच्या दृष्टीनंही उत्तम आहेत.

७७) तुम्ही पाहता ज्यानं आमच्या आयतींना (वचननांना) नाकारलं आणि तरीही म्हणतो, मला संपत्ती आणि संतती लाभणारच.

७८) त्यानं अदृष्याचा आढावा घेतला की नितांत कृपावंताकडून त्यानं वचन घेतलंय.

७९) आणि खरंच तो म्हणतो, त्याची आम्ही नोंद घेऊ आणि त्याच्या शिक्षेत भर घालू.

८०) आणि ज्या (वैभवांविषयी आणि साधनसामुग्रीविषयी) तो बोलतो तो आमचाच वारसा, तो एकटाच आमच्या समक्ष हजर होईल.

८१) त्यांना वैभव लाभावं म्हणून त्यांनी अल्लाहला सोडून इतरांना ईश्वर बनवलंय.

८२) मुळीच नाही. लवकरच ते त्यांच्या भक्तीचा नकार देतील आणि त्यांच्याविरूद्ध जातील.

८३) तुम्हाला दिसत नाही आम्ही नाकारणाऱ्यांकडं सैतानांना पाठवून दिलं, ते त्यांना अधिकच भडकवित आहेत.

८४) तेव्हा तुम्ही नका घाई करू, आम्ही त्याचे दिवस मोजीत आहोत.

८५) त्या दिवशी आम्ही सदाचारींना नितांत कृपावंतापाशी सन्मानानं एकत्र करू.

८६) आणि अपराधींना नरकाकडं तहानलेले हाकून देऊ.

८७) ज्यांस नितांत कृपावंताची अनुमती लाभली असेल त्यांना वगळता कुणी मध्यस्थी करण्याचं सामर्थ्य बाळगणार नाही.

८८) ते म्हणतात, नितांत कृपावंतानं पुत्र बनवलं आहे.

८९) तुम्ही अतिशय वाईट अशी गोष्ट घडविली.

९०) आकाश फाटून जाण्याचा बेत आहे, ही धरती दुभंगली जाईल आणि पर्वतांचे तुकडे तुकडे होतील.

९१) कारण त्यांनी नितांत कृपावंतास मुलगा झाल्याचं जडवलं.

९२) मुलगा बाळगणं त्या महान कृपावंतास शोभत नाही.

९३) आकाश आणि पृथ्वीत असा कोणी नाही ज्यास त्या महान कृपावंताकडं एक भक्त म्हणून येण्यास भाग पडत नसेल.

९४) त्यानं त्या सर्वांची बेरीज करून ठेवली असून त्यांचं मोजमाप केलंय.

९५) त्यांच्यापैकी प्रत्येकजण पुनरुत्थानाच्या (कयामतच्या) दिवशी एकएकटा त्याच्यासमोर उभा राहील.

९६) ज्यांनी एकनिष्ठ होऊन नेक कर्मं केलीत त्यांच्या बाबतीत तो श्रेष्ठ कृपावंत (मनांमध्ये) प्रेमभावना निर्माण करेल.

९७) आम्ही हे (कुरआन) तुमच्या भाषेत सोपं करून दिलंय, सदाचारींना शुभवार्ता देण्यास आणि जे भांडखोर आहेत त्यांना तंबी देण्यासाठी.

९८) आम्ही तुमच्या आधीच्या कितीतरी समूहांना नष्ट केलंय, त्यांच्यापैकी कुणाचा तुम्हास सुगावा लागतो किंवा त्यांची चाहूल ऐकू येते?

-------

# २०. सूरह ताहा

## मक्काकालीन, आयती १३५

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) ताहा.

२) आम्ही तुम्हांस कष्ट देण्यासठी हे कुरआन अवतरलं नाही.

३) पण जे भितात त्यांच्यासाठी मात्र हे बोध घडवण्यासाठी आहे.

४) ज्यानं ही धरती आणि उंच-उंच आकाशं निर्माण केलीत त्याच्याकडून अवतरलेला.

५) (जो) महान कृपावंत सिंहासनावर आरुढ आहे.

६) आकाश आणि पृथ्वीत आणि त्यांच्या उभयतांत आणि जमिनीखाली सर्वकाही त्याच्याच मालकीचं आहे.

७) तुम्ही मोठ्यानं बोलला तरी आणि जे काही गुप्त अथवा लपलंय ते सर्व त्यास ठाऊक आहे.

८) अल्लाहशिवाय कुणी ईश्वर नाही. सारी सुंदर नावं त्याचीच आहेत.

९) तुम्हास मूसाची गोष्ट कळली?

१०) त्यांनी एक आग पाहिली तोच त्यांनी आपल्या कुटुंबीयास सांगितलं, थांबा मी अग्नी पाहिलीय. मी त्यामधील एखादा निखारा घेऊन येईन अथवा त्या अग्नीद्वारे मला मार्ग सुचवला जाईल.

११) तोच ते तिथं गेले तोच ''हे मूसा!'' म्हणून आवाज आला.

१२) निश्चितच मी तुझा विधाता आहे. तू आपली पादत्राणं काढून टाक. आणि निश्चितच तू तुवाच्या पवित्र दरीत आहेस.

१३) मी तुला निवडलंय, आता जे कळवण्यात येईल ते ऐक.

१४) निश्चितच मीच अल्लाह आहे, माझ्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही.

तेव्हा माझी आराधना करा आणि माझ्या आठवणीसाठी नमाज कायम करा.

१५) आणि नक्कीच (कयामतची) वेळ येणारच, मी ती गुप्त ठेवू इच्छितो, जेणेकरून प्रत्येकास त्याच्या प्रयत्नांचं फळ दिलं जावं.

१६) आणि आपल्या वासनांमागं लागल्यामुळं ज्यांचा यावर विश्वास नाही त्याने तुम्हास रोखता कामा नये, नाहीतर तुमचा नाश होईल.

१७) मूसा! तुमच्या उजव्या हातात काय ते?

१८) त्यांनी उत्तर दिलं, ती माझी काठी होय, मी तिचा आधार घेतो आणि आपल्या शेळ्यांसाठी पाला झाडतो आणि ती मला इतर कामांतही उपयोगी पडते.

१९) (अल्लाह) म्हणाला, मूसा ती खाली टाक.

२०) त्यांनी ती (खाली) फेकताच ती एक साप होऊन पळू लागली.

२१) म्हटलं, भिऊ नकोस धर तिला. आम्ही लवकरच तिला पूर्व स्थितीत आणू.

२२) आता तुझा हात तुझ्या काखेत घे. तो कसल्याही विकारावाचून, पांढरा शुभ्र निघेल. हा झाला दुसरा संकेत.

२३) आम्ही आमच्या मोठ्या संकेतांपैकी तुम्हास दाखवण्यासाठी.

२४) फिरऔनकडं जा त्यानं बंड माजवलंय.

२५) ते (मूसा) म्हणाले, हे विधाता! माझं अंतःकरण विशाल कर

२६) आणि माझं कार्य सुलभ कर.

२७) माझ्या बोलण्यातून दोष दूर कर.

२८) मी बोललो ते त्यांना कळू दे

२९) आणि माझ्या कुटुंबापैकी मला एक सहकारी दे

३०) माझ्या हारुन या भावास

३१) त्याच्यापासून माझ्या शक्तीत भर घाल.

३२) आणि माझ्या कार्यात त्यास सहभागी कर.

३३) अशा रितीनं आम्ही तुझा खूप गौरव करू.

३४) आणि तुझं खूप खूप स्मरण करत राहू.

३५) तू आम्हास चांगलं पाहतो आहेस (ओळखत आहेस)

३६) अल्लाह म्हणाला, तू आमच्याकडे जे मागितलं ते खंरच आम्ही तुला बहाल केलं.

३७) आम्ही आणखी एकदा तुझ्यावर उपकार केले.

३८) ज्याप्रकारे आम्ही तुझ्या आईस अनुभूतीद्वारे जे कळवायचं होतं ते कळवलं होतं.

३९) तू त्यास (मूसा अ. यांना जेव्हा ते तान्हं बाळ होते त्या वेळी) एका पेटीत बंद कर आणि ती पेटी ठेवून वाहून दे. ती नदी मग त्यास काठावर तारुन नेईल, माझं आणि त्याचा शत्रू ती उचलून घेईल. मी तुझ्यावर माझ्या प्रेमाची सावली केली, माझ्या नजरेखाली तुझं संगोपन व्हावं यासाठी.

४०) तुझी बहीण (त्या नदीजवळून) जात असताना (फिरऔनशी) म्हणत होती, मी सांगू तुम्हाला कोण त्या बाळाचं संगोपन करील? अशा प्रकारे आम्ही तुला तुझ्या आईकडं परत पाठवलं तिला नेत्रसुख मिळावं आणि तिला दु:ख वाटू नये म्हणून. तू एका माणसाचा वध केला, पण त्या दु:खापासून आम्ही तुला मुक्त केले. तुझ्या कितीतरी परीक्षा घेतल्या, कितीतरी वर्षे तू मदयनवाल्यांसमवेत घालविली आणि मूसा! मग योग्य वेळी तू आमच्याकडं आलास.

४१) मी तुला खास माझ्या बनवलं

४२) तेव्हा तू आणि तुझा भाऊ संकेतांसह जा आणि माझ्या आठवणीकडं कानाडोळा करू नकोस.

४३) तुम्ही उभयतांनी फिरऔनकडं जा त्यानं बंड माजविलंय.

४४) पण त्याच्याशी नरमाईनं बोला, कदाचित त्याला उपदेश घडेल अथवा त्यास भीती वाटेल.

४५) उभयतांनी सांगितलं, आमच्या विधात्या! आम्हाला भीती वाटते तो आमच्यावर अत्याचार करील आणि अतिरेक माजवेल.

४६) तो (अल्लाह) म्हणाला, भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे. मला सर्वकाही ऐकू येतं आणि मी पाहतोय.

४७) तुम्ही जा त्याच्याकडं त्याला सांगा, तुझ्या विधात्यानं आम्हांस पाठवलंय, तेव्हा इस्राईलच्या लोकांना आमच्याबरोबर पाठव. त्यांचा छळ करू नको. आम्ही तुझ्याकडं आमच्या विधात्याच्या आयती (वचनां) सह आलो आहोत. ज्यांनी (या) मार्गदर्शनांचे पालन केलं त्यांना शांतता लाभो.

४८) नक्कीच, आम्हाला अनुभूतीनं कळवलं गेलंय. ज्यांनी खोटं ठरवत पाठ फिरवली त्यांना शिक्षा घडेल.

४९) त्यानं (फिरऔननं) विचारलं, ''बरं तर मूसा कोण तुमचा विधाता?

५०) त्यांनी (मूसा अ. यांनी) उत्तर दिलं, ज्यानं सर्व वस्तुंना त्यांचा आकार दिला तसंच मार्गदर्शन घडवलं, तोच आमचा विधाता.

५१) त्यानं (फिरऔननं) विचारलं, मग मागील समुदायांची काय गत (होणार)?

५२) ते (मूसा अ.) म्हणाले, त्याची माहिती माझ्या विधात्याकडं नोंदवलेली आहे, माझा विधाता कधी चुकत नाही की विसरतही नाही.

५३) तोच ज्यानं ही धरती विस्तारली आणि तिच्यात (तुमच्या चालण्यासाठी) मार्ग बनवलं. आकाशातून पाऊस वर्षविला, त्याद्वारे विविध प्रकारच्या वनस्पती काढल्या.

५४) तुमच्या खाण्यासाठी तसंच तुमच्या गुराढोरांना चारा म्हणून. खरंच

ज्यांना समज आहे त्यांना यात संकेत आहेत.

५५) याच (धरती) पासून तुम्हास जन्माला घातलं, तिच्यामध्येच आम्ही तुम्हांस पुरणार आहोत आणि तिच्यामधूनच तुम्हांस दुसऱ्यांदा परत (बाहेर) काढणार आहोत.

५६) आम्ही त्यास (फिरऔनला) आपली सर्व संकेतं दाखविली, तरी पण त्यानं ती खोटी ठरवत नाकारली.

५७) म्हणू लागला, ‘‘मूसा आपल्या जादूच्या जोरावर आम्हाला या देशातून घालवून देण्यास इथं आला आहेस?’’

५८) आम्ही तुझ्या जादूच्या तोडीस तशीच जादू घडवू. तेव्हा तू आमच्या आणि तुझ्यामध्ये एक वेळ निश्चित कर. आम्हीही मग यापासून मागे फिरणार नाही आणि तूही फिरू नकोस, एका खुल्या मैदानात (स्पर्धेचे आयोजन होईल).

५९) मूसा म्हणाले, ‘‘तर उत्सवाचा दिवस ठरला, लोकांना दिवस उजाडल्यानंतर जमू द्या.’’

६०) फिरऔन तिथून निघून गेला आणि आपली सामग्री गोळा करून परत आला.

६१) मूसा यांनी त्याला सांगितलं, धिक्कार असो तुमचा, अल्लाहच्या बाबतीत खोटंनाटं घडवू नका, तो तुम्हाला शिक्षा देऊन नष्ट करील आणि खोटे रचणाऱ्यांच्या पदरी विफलताच येते.

६२) ते (जादूगार) आपसांत या प्रकरणाविषयी वाद घालू लागले आणि गुप्तपणे चर्चा करू लागले.

६३) ते म्हणत होते, हे दोघे जादूगार आहेत आणि आपल्या जादूद्वारे ते तुम्हाला या देशातून घालवून देऊन तुमच्या चांगल्या परंपरांचं उच्चाटन करू पाहताहेत.

६४) तुम्ही आपल्या सर्व युक्त्या एकवटा आणि एकजूट होऊन ठाम राहा. आज जो वरचढ ठरील तोच यशस्वी राहील.

६५) ते म्हणाले, ''मूसा, तुम्ही आधी टाकता की आम्ही आधी टाकू?''

६६) ते (मूसा अ.) म्हणाले, नाही, आधी तुम्ही टाका, तोच (त्यांनी टाकलेल्या) काठ्या आणि दोऱ्या, त्यांच्या जादूने वळवळत आहेत की काय असा मूसा (अ.) यांना भास झाला.

६७) मूसा मनातल्या मनात घाबरून गेले.

६८) आम्ही (अल्लाह) त्यास सांगितलं, घाबरू नका. तुम्हीच वरचढ ठरणार

६९) आणि तुमच्या उजव्या हातात आहे ते (खाली) टाकून द्या, त्यांनी जे काही बनवलंय त्यांना तो गिळून टाकील आणि त्यांनी जे बनवलेत ते केवळ जादूची चलाखी आहे, आणि जादूगार काही केल्या यशस्वी होत नसतो.

७०) अशा रितीनं सारे जादूगार नतमस्तक झाले आणि उद्‌गारले, आम्ही मूसा आणि हारूनच्या विधात्याला मान्य केलं.

७१) (फिरऔन) म्हणाला, ''माझ्या अनुमतीआधीच तुम्ही विश्वास ठेवता?'' (म्हणजे) तो तुमचा गुरू आहे ज्यानं तुम्हाला जादू शिकवली. मी निश्चितच तुमचे हात आणि तुमचे पाय विरूद्ध बाजुंनी कापून टाकीन आणि खजुरीच्या झाडाशी तुम्हाला फासावर लटकवीन, तेव्हा तुम्हाला कळून चुकेल आमच्यापैकी कोण अधिक कठोर आणि कायमची शिक्षा देतो ते.

७२) ते म्हणू लागले, ''तुला काय जे करायचं असेल ते करून टाक, आम्ही तर आमच्याकडं जी स्पष्ट प्रमाणं आलीत आणि ज्यानं आम्हाला निर्माण केलंय त्यांच्यावर तुला प्राधान्य देणार नाही. (करून करून) तू या जगातील आयुष्यापुरताच काय ते करशील.

७३) आम्ही तर निश्चितच आमच्या विधात्याशी एकनिष्ठ झालोत, त्यानं आमच्या चुकांना क्षमा करावी म्हणून आणि आमच्याकडून बळजबरीनं तू जी जादू आम्हास करावयास लावली त्यापासून. अल्लाहच सर्वोत्कृष्ट आणि शाश्वत आहे.

७४) जो पापी म्हणून आपल्या विधात्यापाशी येतो खरंच त्याच्यासाठी नरक असेल. तिथं त्याला मरणही नाही की जगणंही नाही.

७५) आणि जो श्रद्धा ठेवून त्याच्याकडं येतो आणि सत्कर्म केलीत अशाच लोकांसाठी सन्मानाच्या उच्च श्रेणी आहेत.

७६) निरंतर स्वर्ग ज्यांच्याखालून नद्या वाहत आहेत तिथं ते सदैव राहतील. ज्यांनी स्वत:स पावन करून घेतलं त्यांच्यासाठी हा असा मोबदला आहे.

७७) आम्ही मूसा यांना कळवलं, आमच्या भक्तांना रातोरात घेऊन जा, नदीच्या पाण्यावर (काठी) आदळून त्यांच्यासाठी वाट करून दे. पकडलं जाण्याची भीती बाळगू नकोस की दुसरा कसला धोका नाही.

७८) लगेच फिरऔननं आपल्या सैन्यासह त्यांचा पाठलाग केला, पण पाण्यानं त्यांना वेढून बुडवून टाकलं.

७९) फिरऔननं आपल्या लोकांना सरळ मार्ग न दाखवता त्यांना मार्गभ्रष्ट केले.

८०) इस्राईलच्या लोकांनो! आम्ही तुमच्या शत्रूपासून तुमची सुटका केली आणि तूर पर्वताच्या उजव्या बाजूस तुम्हाला वचन दिलं आणि तुमच्यासाठी 'मन्न' आणि 'सलवा' यांना खाली पाठवलं.

८१) तेव्हा आम्ही तरतूद केलेल्या पाक वस्तू खा, या बाबतीत अतिरेक नका करू अन्यथा तुमच्यावर माझा कोप होईल आणि ज्याच्यावर माझा कोप गुदरतो त्यांचा नाश होऊन जातो.

८२) पण जे प्रायश्चित्त करून श्रद्धा धारण करतात आणि आपल्या कर्मांना सुधारतात ते मार्गदर्शित होतात त्यास मी क्षमा करतो.

८३) (अल्लाहनं विचारलं) ''मूसा! का बरं घाई केलीस, आपल्या लोकांना मागं सोडून आलास.''

८४) (मूसा) म्हणाले, ''तुझ्या प्रसन्नतेखातर केली मी घाई, माझ्या विधात्या! ते सर्व माझ्या मागोमाग येत आहेत.''

८५) तो (अल्लाह) म्हणाला, ''तुझ्यामागं आम्ही तुझ्या लोकांना परीक्षेत टाकलं. कारण सामिरीनं त्यांना मार्गभ्रष्ट केलं.''

८६) दु:खी होऊन रागाच्या भरात मूसा आपल्या लोकांकडं परतले आणि म्हणाले, ''माझ्या लोकांनो! माझ्या विधात्यानं तुम्हाला एक चांगल वचन नव्हत दिलं? की ती मुदत (वचनपूर्तीची) तुम्हाला मोठी वाटली? अथवा तुमच्या विधात्याचा कोप तुमच्यावर कोसळण्याची तुम्हाला हौस आहे? मग (का) तुम्ही दिलेल्या वचनाविरूद्ध गेलात?''

८७) ते लोक म्हणू लागले, ''आम्ही आमच्या मर्जीनं नाही मोडलं ते वचन, तर आमच्यावर लोकांच्या दागदागिन्याचं ओझं लादलेलं होतं. आम्ही ते (आगीत) टाकून दिलं. कारण सामिरीनंच तसं सुचवलं होतं.''

८८) आणि मग त्यानं एक वासराचा पुतळा काढला (बनवला) तो हंबरत असल्याचं वाटलं तेव्हा ते म्हणाले, ''हा तुमचा ईश्वर होय आणि मूसाचाही ईश्वर! पण ते (मूसा) विसरलेत.

८९) पण तो त्यांच्या बोलण्याचं उत्तर देत नाही हे त्यांना दिसत नाही. त्यांना तो कसली इजा पोचवत नाही की ना त्यांना कशाचा लाभ घडवतो.

९०) पण हारुन (अ.) यांनी त्यांना बजावलं होतं, ''माझ्या लोकांनो! तुमची परीक्षा घेतली गेली, दुसरं काहीच नाही. तुमचा विधाता तर परम कृपावंत आहे, तेव्हा माझं पालन करा आणि माझं म्हणणं ऐका.''

९१) ते लोक म्हणाले, जोवर मूसा आमच्याकडं परतत नाही तोवर आम्ही इथून हटणार नाही, आम्ही इथंच बसून राहणार आहोत.''

९२) मग त्यांनी (मूसा अ. यांनी) हारुनला विचारलं, ''हारुन! तुम्ही त्यांना भरकटलेलं असल्याचं पाहिल्यावर,

९३) का बरं माझं पालन केलं नाही, माझ्या आदेशांची अवज्ञा केली की काय?''

९४) ते (हारुन) म्हणाले, ''माझ्या आईच्या मुला! माझ्या दाढी आणि डोक्यावरील केसांना हात लावू नकोस. मला ह्याची भीती लागून होती

की तुम्ही म्हणाल, मीच इस्राईलच्या लोकांमध्ये फूट पाडली आणि माझ्या शब्दांचा मान राखला नाही.''

९५) आता मूसा (अ.) यांनी सामिरीस विचारलं, ''तुझं काय?''

९६) तो (सामिरी) म्हणाला, ''जे त्यांना दिसलं नाही, ते मी पाहिलं. मी प्रेषितांच्या (जिब्रईल) पायाखालची मूठभर (माती) घेतली आणि ती (वासरांच्या पुतळ्यावर) टाकली. माझ्या मनानंच मला हे सुचवलं.''

९७) मूसा (अ.) म्हणाले, ''जा इथून! तू म्हणत राहशील, 'मला स्पर्श करू नका,' हीच तुला या आयुष्यातील शिक्षा असेल. तुझ्यासाठी हे एक वचन आहे ते टळणार नाही. आपल्या देवाकडं बघ, ज्याची तू निष्ठा बाळगतो. आम्ही त्यास जाळून टाकू आणि ते (तिची राख) नदीत वाहून देऊ.''

९८) तुमचा ईश्वर तर दुसरा कोणी नसून अल्लाह आहे, त्याच्याशिवाय इतर ईश्वर नाही. सर्वच गोष्टी त्याच्या ज्ञानांतर्गत आहेत.

९९) अशा रितीनं आम्ही घडून गेलेल्या घटनांचं कथन करतो. आम्ही तुम्हांस आपल्याकडून उपदेश (कुरआन) दिलाय.

१००) ज्यानं त्याच्याकडं पाठ फिरवली तो पुनरुत्थानाच्या दिवशी भयंकर ओझं उचलेल.

१०१) ते सदैव त्यातच राहतील, पुनरुत्थानाच्या दिवशी ते जे वाहतील त्यांच्यासाठी वाईट असेल.

१०२) ज्या दिवशी तुतारी फुंकली जाईल तेव्हा पापी लोकांना आम्ही गोळा करू, त्यांचे डोळे निळे पडलेले असतील.

१०३) ते आपसांत एकमेकांशी कुजबुज करतील, तुम्ही तर (जगात) दहाएक दिवसच राहिलात.

१०४) पण त्यांना जे म्हणायचंय ते आम्हाला माहीत आहे. त्याच्यामधील ज्याचं आचरण सर्वोत्तम असेल तो म्हणेल, तुम्ही फार तर एकच दिवस राहिलो असेल.

१०५) ते तुम्हाला पर्वतांविषयी विचारतात, त्यांना सांगा, माझा विधाता त्यांचा चक्काचूर करून त्यांना विखरून टाकील.

१०६) तिला (जमिनीला) तो सपाट मैदान करून सोडून देईल.

१०७) तुला त्या जागी काही वेडंवाकडं दिसणार नाही की ना कसली उंची.

१०८) त्या दिवशी सर्वच्या सर्व एका साद घालणाऱ्याची पाठ धरतील. कुणी त्याच्याविरूद्ध जाणार नाही. त्या परम कृपावंताच्या उपस्थितीत सारे आवाज शांत होतील. तुला फक्त (पावलांचा) मंद आवाज ऐकू येईल.

१०९) त्या दिवशी ज्यास त्या परम कृपावंताने परवानगी दिली असेल आणि ज्यांच म्हणणं त्यास पसंत पडला असेल त्याशिवाय कुणाची मध्यस्ती लाभणार नाही.

११०) त्यांच्या मागं काय (घडलंय) आणि पुढं काय (होणार) आहे हे त्यास माहीत आहे. ते आपल्या माहितीद्वारे त्याचं आकलन करू शकत नाहीत.

१११) त्या स्वयंभू आणि चिरस्थायीसमोर त्यांची तोंडं झुकलेली असतील, ज्यानं पापांचा भार लादला तो निराश होऊन जाईल

११२) आणि जो भल्यापैकी कर्म करीत असेल तसंच तो श्रद्धावंतदेखील असेल तर त्यास कसल्या अन्यायाची भीती नसेल किंवा त्याच्या हक्कात कपात होणार नाही.

११३) अशा रितीनं आम्ही हे अरबी (भाषेत) कुरआन अवतरलं आणि त्याद्वारे आम्ही विविध प्रकारे ताकीद दिली, तुम्ही सदाचारी व्हावं यासाठी किंवा त्यापासून तुम्हांस उपदेश घडावा.

११४) अल्लाहच परमोच्च आणि खऱ्या अर्थानं सार्वभौम आहे. तुम्हांस त्याचं प्रकटन पूर्णपणे कळत नाही तोवर तुम्ही कुरआनच्या वाचनात घाई करत जाऊ नका आणि प्रार्थना करत जा. ''माझ्या विधात्या! माझ्या ज्ञानास समृद्ध कर.

११५) आम्ही पूर्वी आदमशी असाच करार केला होता, पण तो विसरून गेला.

आम्हास त्याच्या निश्चयात ठामपण आढळलं नाही.

११६) आम्ही जेव्हा दूतांस आदमसमोर नतमस्तक होण्यास सांगितलं तेव्हा ते सारेचे सारे नतमस्तक झाले पण इबलीसनं नाकारलं.

११७) म्हणून आम्ही आदम यांना सांगितलं, हा तुझा आणि तुझ्या पत्नीचा वैरी आहे. त्यानं तुम्हा दोघांना स्वर्गाबाहेर घालवून देऊ नये, (असं झाल्यास) तुम्ही संकटात पडाल.

११८) इथं तर तुम्हांस उपाशी राहावं लागत नाही की उघडे (वस्त्रहीन) राहावं लागत नाही.

११९) तसंच ना तुम्हाला तहानेचा त्रास आहे की उन्हाची झळ पोचते.

१२०) पण सैतानानं त्यांना भुलवलं आणि म्हणाला, आदम! मी तुला शाश्वत असा वृक्ष दाखवू? आणि असे राज्य ज्याला अंतच नाही?

१२१) मग त्या उभयतांनी त्या झाडाचं फळ खाल्लं आणि त्यांची गुप्तांगं उघडी पडली आणि स्वर्गातील पानांनी ते आपलं शरीर झाकू लागले आणि आदम यांनी आपल्या विधात्याशी दगा केला. ते भरकटून गेले.

१२२) पण त्यांच्या विधात्यानं मात्र त्यांचा स्वीकार केला. त्यांच्याकडं वळला आणि त्यांना मार्ग दाखवला

१२३) नि म्हणाला, ''तुम्ही सर्वांनी इथून जा. तुम्ही एकमेकांचे वैरी ठराल. माझ्याकडून तुमच्याप्रत मार्गदर्शन आल्यास जे माझ्या मार्गदर्शनाचं पालन करतील ते कधी भरकटणार नाहीत अथवा अभागी ठरणार नाहीत.

१२४) जर माझ्या आठवणीकडं पाठ फिरवली तर त्यांचं जगणे अडचणीचं होईल आणि पुनरुत्थानाच्या दिवशी आम्ही त्यास आंधळं उभं करू.''

१२५) तो म्हणंल, ''माझ्या विधात्या! का बरं तू मला आंधळं उभं केलंस, मला तर पाहता येत होतं?''

१२६) तो (अल्लाह) उत्तर देईल, जशा प्रकारे तुझ्याकडं आमच्या आयती (वचनं) येत असता तू ते विसरलास तशाच पद्धतीनं आम्हीही आज तुला विसरून टाकू.

१२७) जे मर्यादा मोडतात आणि आपल्या विधात्याच्या आयतींशी (वचनांशी) एकनिष्ठ होत नसतो त्यास आम्ही असाच मोबदला देतो, परलोकातील शिक्षा तर आणखीनच कठोर आणि कायमची राहणार आहे.

१२८) लोकांना याचाही (गोष्टीचाही) बोध झाला नाही की आम्ही त्यांच्यापूर्वी कितीतरी पिढ्यांना नष्ट केलं? ज्यांच्या (उध्वस्त झालेल्या) घरांमधून ते संचार करतात, समंजस लोकांना यामध्ये निश्चितच संकेत आहेत.

१२९) तुमच्या विधात्यानं एक हुकूम दिला नसता आणि एक अवधी निश्चित केला गेला नसता तर त्यांना एव्हाना शिक्षा घडून गेली असती.

१३०) तेव्हा आता धीर धरा, ते काय म्हणतात (ते म्हणू द्या) आणि आपल्या विधात्याच्या गौरव करा सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तापूर्वी आणि रात्रीच्या प्रहरी, तसंच दिवसा स्तुती करा, तुम्ही प्रसन्न व्हाल.

१३१) आम्ही विभिन्न लोकांना या जगाच्या आयुष्यात जे वैभव आणि सुखोपभोगाची साधनं दिलीत त्यांच्याकडं डोळे वटारू नका. आम्ही त्यापासून त्यांची कसोटी घेत आहोत. तुझ्या विधात्याची तरतूद तर समृद्ध आणि शाश्वत आहे.

१३२) आपल्या घरातल्यांना नमाजच्या आज्ञा द्या आणि (तुम्हीही) त्यावर ठाम राहा. आम्ही तुमच्याकडून उपजीविका मागत नसतो. आम्हीच तुमची तरतूद करतो आणि अंततः ते सदाचारीचं प्रतिफळ होय.

१३३) ते विचारतात, आपल्या विधात्याकडून आमच्यासाठी संकेत का आणले नाहीत. त्यांच्याकडं स्पष्ट प्रमाण आले नव्हते पूर्वीच्या ग्रंथांमध्ये?

१३४) आम्ही जर पूर्वीच त्यांना शिक्षा देऊन ठार केलं असतं तर ते म्हणाले असते, तू आमच्याकडं एखादा प्रेषित का पाठवला नाहीस? अपमानित आणि तिरस्कारित होण्याआधी आम्ही त्याचं पालन केलं असतं.

१३५) त्यांना सांगा, सगळे पाहताहेत तसंच तुम्हीही पाहत राहा. लवकरच तुम्हाला कळून चुकेल कोण रास्त मार्गावर आहेत आणि कोणाचं मार्गदर्शन झालंय ते.

-------

# २१. सूरह अल अंबिया

## मक्काकालीन, आयती ११२

**पारा - १७**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) लोकांचा हिशेब देण्याची वेळ जवळ आली असतानादेखील ते पाठ फिरवून दुर्लक्ष करताहेत.

२) त्यांच्या विधात्याकडून जो काही नवा उपदेश येत असतो, पण ते त्यास खेळीमेळीत ऐकत असतात.

३) त्यांची मनं गाफील आहेत, अपराधी लोक आपसांत कुजबुज करतात, कोण हा? तुमच्यासारखाच एक माणूस आणि डोळ्यांदेखत तुम्ही (त्याच्या) जादूटोण्यात अडकणार?

४) त्यांनी (प्रेषित मुहम्मद स. यांनी) सांगितलं, आकाश आणि पृथ्वीत जे काही बोललं जातं (सारं) माझ्या विधात्यास ठाऊक असते. तो सर्वकाही ऐकतो आणि जाणतो.

५) पण ते म्हणतात, नाही हा तर स्वप्नांचा भ्रम आहे, नव्हे त्यांनीच ते घडवलंय, तो तर एखाद्या कवी आहे, त्यांनी आमच्याकडं संकेत आणू देत. जसे त्याच्या प्रेषितांनी आणले होते.

६) त्यांच्यापूर्वी आम्ही ज्या लोकांना नष्ट केलं, त्यावर त्यांनी (ती संकेतं पाहूनदेखील) विश्वास केला नव्हता तेव्हा आता काय हे विश्वास ठेवणार आहेत?

७) तुमच्या आधी आम्ही मानवांना (प्रेषित) म्हणून पाठवलं होतं. आम्ही त्यांना अनुभूतीद्वारे कळवलं. तुम्हाला जर हे ठाऊक नसंल तर ज्यांच्याकडं आठवणी आहेत (ग्रंथ आहेत) त्यांना विचारा.

८) आम्ही त्यांना असं शरीर दिलं नव्हतं जे अन्न खात नसत किंवा ते सदाकाळ जगणार नव्हते.

९) मग आम्ही त्यांना दिलेल्या वचनांची पूर्तता केली, आम्ही त्यांना वाचवलं आमच्या इच्छेप्रमाणं, पण ज्यांनी मर्यादांचं उल्लंघन केलं त्यांना नष्ट करून टाकलं.

१०) आम्ही तुमच्यासाठी हा ग्रंथ अवतरला, यात तुमचा उल्लेख आहे, ते तुम्ही समजून घेणार नाही?

११) ते अत्याचारी असल्यानं आम्ही कितीतरी समूहांना नष्ट करून टाकलं आणि त्यांच्या जागी इतर लोकांना आणलं.

१२) त्यांना आमच्या प्रकोपाची चाहूल लागताच ते पळत सुटले.

१३) पळू नका. आपल्या घरांकडं वळा आणि जिथं तुम्हांस ऐश्वर्य आणि सुखसोयी लाभल्या होत्या. तुम्हांस जाब विचारला जावा म्हणून.

१४) तेव्हा ते म्हणू लागले, आमचं दुर्दैव. खरंच आम्ही अपराधी होतो.

१५) आम्ही त्यांना कापून टाकलेल्या पिकाप्रमाणं (शेतीप्रमाणं) आणि विझून गेलेल्या आगीप्रमाणं करून टाकेपर्यंत ते (अशीच) हाक देत राहिले.

१६) आकाश पृथ्वी आणि त्यामध्ये जे आहे ते काही खेळ मांडण्यासाठी नाही आम्ही निर्माण केलं.

१७) जर आम्हाला तसंच करायचं असतं आणि आम्हाला खेळच मांडायचा असता तर ते आम्ही बनवलं असतं.

१८) पण आम्ही तर खोटेपणावर सत्याचा मारा करून त्याचं मस्तकच चिरडून टाकतो आणि लगेच तो नाहीसा होऊन जातो, दुर्दैव तुमचा, कशा कशा गोष्टी तुम्ही घडवता.

१९) आकाश आणि धरतीमधील सर्वकाही त्याच्याच मालकीचं आहे आणि जे त्याच्या सान्निध्यात आहेत, उद्दाम होऊन त्याच्या भक्तीपासून बंड करत नाहीत की त्यांना कंटाळाही येत नाही.

२०) रात्रंदिवस त्याचे गुणगान करत राहतात, त्यांना थकवा येत नाही.

२१) त्यांनी धरतीपासून काही वेगळेच देव बनवलेत, ते त्यांना (मरणोत्तर)

पुन्हा उभं करणार आहेत?

२२) जर अल्लाहला सोडून या दोहोंत (आकाश आणि पृथ्वीत) इतर देव (ईश्वर) असते तर अनाचार माजला असता. पण भव्य सिंहासनाचा स्वामी अल्लाह, ते ज्या गोष्टी घडत आहेत त्यापासून तो अलिप्त आहे.

२३) त्याच्याशी कुणी विचारणा करू शकत नाही, तर त्यांच्याशीच विचारणा केली जाईल.

२४) त्यांनी त्याच्याव्यतिरिक्त इतर ईश्वर (देव) धरून ठेवलेत. त्यांना सांगा पुरावा आणावयास. हा आहे ग्रंथ. जे माझ्यासोबत आहेत त्यांचा आणि माझ्या पूर्वीच्यांचाही. पण त्यांच्यापैकी कित्येकांना सत्य काय ते कळत नाही म्हणून ते वळून जातात.

२५) आम्ही तुमच्यापूर्वी एकही (असा) प्रेषित पाठवला नाही ज्यास आम्ही अनुभूती दिली नसेल की आमच्याव्यतिरिक्त कुणाचीही उपासना करणे उपयोगी नाही. म्हणून माझीच (फक्त) भक्ती करा.

२६) आणि ते म्हणतात, परम कृपावंतानं मुलगा बाळगलाय. पवित्र आहे तो. ते तर (दूत) त्याचे प्रतिष्ठित भक्त आहेत.

२७) त्याच्या (बोलण्या) आधी ते काही बोलू शकत नाही, ते तर त्याच्या आज्ञा पाळतात.

२८) त्यांच्यासमोर काय आणि त्यांच्या पाठीशी काय असतं ते त्यास ठाऊक असतंय. ज्यांच्याबाबत त्याची मर्जी असते त्यांना सोडून ते इतरांसाठी शिफारस करत नाहीत आणि ते तर त्याच्या भीतीनं झपाटलेले असतात.

२९) त्यांच्यापैकी जर कुणी असं म्हटलं की मी त्याच्याव्यतिरिक्त ईश्वर आहे त्यास आम्ही नरकाची शिक्षा देणार, अपराधी लोकांना आम्ही अशीच शिक्षा देतो.

३०) नाकारणाऱ्यांनी हे पाहिलं नाही. आकाश आणि पृथ्वी (ही सृष्टी निर्मितीच्या वेळी) एकसंघ होते, मग आम्ही त्यांना विभक्त केलं,

आम्ही पाण्यापासून प्रत्येक सजीव निर्माण केला, तेव्हा ते यावर विश्वास ठेवणार नाहीत?

३१) आम्ही या धरतीमध्ये पर्वतं बनलीत ती कलंडू नये म्हणून आणि आम्ही त्यामध्ये प्रशस्त मार्ग बनवलेत त्यांचं मार्गदर्शन होण्याकरिता.

३२) आम्ही आकाशरुपी एक सुरक्षित छत बनवलं तरीही ते आमच्या संकेतांपासून दूर वळतात?

३३) तो व ज्यानं दिवस आणि रात्र निर्माण केले, सूर्य आणि चंद्र सारेच्या सारे आपापल्या वर्तुळात तरंगताहेत.

३४) आम्ही तुमच्यापूर्वी कुणाही माणसाला कायमचं हयात ठेवलं नाही, तेव्हा जर तुम्हांस मरण आलं तर हे लोक कायमचे जगणार आहेत?

३५) प्रत्येक जिवास मृत्यूचा उपभोग घ्यायचाय. आम्ही भल्या-बुऱ्यातून तुमची कसोटी घेणारच आहोत. तुम्ही आमच्याकडंच परतणार आहात.

३६) जेव्हा हे श्रद्धाहीन लोक तुम्हांस पाहतात तेव्हा (यामुळं) तुमचं हसं आणि मस्करी करतात की हाच तो तुमच्या देवांबद्दल बोलणारा? आणि त्या परम कृपावंताच्या आठवणी नाकारताहेत.

३७) माणूस मुळातच घाई करणारा आहे. तुम्ही घाई करू नका, मी लवकरच तुम्हांस माझे संकेत दाखवून देणार आहे.

३८) ते विचारतात, जर तुम्ही खरं (बोलत) असलात तर ते वचन (कयामत) कधी घडणार?

३९) नाकारणाऱ्यांना हे कळायला हवं होतं, ते आपल्या तोंडांना आणि पाठींना आगीपासून वाचवू शकणार नाही, त्यांना कुठून मदतही मिळणार नाही.

४०) नव्हे ती त्यांना एकाकी गाठेल आणि त्यांना भांबावून टाकेल. ती परतवून लावण्याचं त्यांच्यात सामर्थ्य नसेल की त्यांना उसंत मिळेल.

४१) तुमच्या आधीच्या प्रेषितांचीदेखील अशीच थट्टा केली गेली, पण चेष्टा

उडविणारे स्वत:च त्याचे बळी पडले.

४२) त्यांना सांगा, परम कृपावंताच्या (कोपापासून) कोण तुमची दिवसा आणि रात्री सुरक्षा करतील? पण ते आपल्या विधात्याच्या आठवणीपासून दूर वळून जातात.

४३) आमच्याव्यतिरिक्त त्यांचे जे देव (उपास्य) आहेत जे आमच्यापासून त्यांचं रक्षण करतात ते तर स्वत:च्या मदतीचंही सामर्थ्य बाळगत नाहीत. मग आमच्याविरूद्ध त्यांचं कोण रक्षण करणार?

४४) आम्ही आयुष्यभर त्यांना आणि त्यांच्या पूर्वजांना (जगण्याची) साधनं देत राहिले. ते पाहत नाही आम्ही या धरतीची चोहोबाजुंनी कपात करत आहोत, तर मग ते त्यावर मात करू शकतील का?

४५) त्यांना सांगा, मी तुम्हास अनुभूतीद्वारे सावधान करतो, पण त्यांना सावध करण्यासाठी दिलेली हांक बहिरे ऐकत नसतात.

४६) त्यांच्या विधात्याच्या कोपाची एक झळ जरी त्यांना स्पर्शून गेली तर ते दुखवटा व्यक्त करत म्हणतील, आम्ही खरंच अपराधी होतो!

४७) पुनरुत्थानाच्या दिवशी आम्ही समतोल न्याय स्थापन करू कोणत्याही इसमाशी काहीच अन्याय केला जाणार नाही. तिळमात्र जरी कुणाचं काही (कर्म) असेल तर आम्ही ते हिशेबात धरू. आम्ही हिशेब घेण्यास समर्थ आहोत.

४८) याआधी आम्ही मूसा आणि हारुन यांना (न्यायाची) कसोटी दिली, तसंच सदाचारींसाठी एक प्रकाश आणि शिकवण दिली.

४९) जे आपल्या विधात्यास पाहिलं नसतानाही त्याची भीती बाळगतात आणि त्या (कयामतच्या) घटिकेची ज्यांना धाक असते.

५०) आम्ही ही समृद्ध आणि संपन्न शिकवण पाठवली असता तुम्ही ती नाकारता?

५१) त्याआधी आम्ही इब्राहीम यांना आधीपासूनच रास्त समज दिली होती आणि आम्ही त्यांच्याविषयी परिचित होतो

५२) जेव्हा त्यांना आपल्या पित्यांशी आणि आपल्या लोकांशी विचारणा केली, कशाच्या या मूर्ती ज्यांच्यापुढे तुम्ही एकाग्रचित्त बसता.

५३) त्यांनी (लोकांनी) उत्तर दिलं, आम्हास आमचे पूर्वज त्यांचीच आराधना करताना आढळले होते.

५४) इब्राहीम म्हणाले, खरंच तुम्ही आणि तुमचे पूर्वज उघड मार्गभ्रष्ट राहिलात.

५५) ते म्हणाले, तुम्ही आमच्याकडं सत्य आणलंय की आमची थट्टा करता.

५६) ते (इब्राहीम अ.) म्हणाले, नव्हे तुमचा विधाता तर सर्व अवकाश आणि पृथ्वीचा विधाता आहे. ज्यानं ते निर्माण केलंय आणि मी तुमच्या समक्ष साक्ष देतो.

५७) आणि अल्लाह शपथ! मी नक्कीच एक बेत केलाय तुमच्या मूर्तींबद्दल. तुम्ही इथून वळून गेल्यानंतर (मी ते करीन).

५८) मग त्यांनी त्या मोठ्याला सोडून, ते त्याच्याकडं (विचारपूस करण्यास) फिरतील म्हणून (बाकीच्यांचे) तुकडे करून टाकले.

५९) त्यांनी विचारलं, कोण तो? ज्यानं आमच्या देवांची (उपास्यांची) ही गत केली, तो तर खरा अत्याचारींपैकी आहे.

६०) म्हणाले, आम्ही ऐकलं, एक तरुण यांच्याविषयी बोलत होता. त्याचं नाव इब्राहीम आहे.

६१) ते म्हणाले, त्याला लोकांसमक्ष आणा आणि त्यांनी त्यास पाहू द्या.

६२) त्यांनी विचारलं, इब्राहीम आमच्या देवांशी तू केलास हा (व्यवहार)?

६३) ते (इब्राहीम) म्हणाले, नाही, पण तुम्ही त्यांच्या त्या मोठ्यांना विचारा जर ते बोलत असतील तर, त्यानंच हे सर्व केलंय.

६४) त्यावर ते मनातल्या मनात विचार करू लागले आणि म्हणाले, खात्रीनं तूच अपराधी आहेस.

६५) आणि मग त्यांचं डोकं चक्रावलं, तुला चांगलं माहीत आहे या (मूर्ती)

काही सांगू शकत नाहीत ते.

६६) तेव्हा ते (इब्राहीम अ.) म्हणाले, मग तुम्ही अल्लाहस सोडून अशांची भक्ती का बरं करता जे तुमचं काही भलं करू शकत नाहीत की वाईटही करू शकत नाहीत.

६७) दुर्दैव तुमचं आणि अल्लाहस सोडून तुम्ही ज्यांची भक्ती करता, तुम्हाला समजत नाही?

६८) ते म्हणू लागले, तुम्हाला काही करायचं असेल तर आपल्या उपास्यांची मदत करा आणि याला जाळून टाका.

६९) आम्ही आदेश दिला, ''अग्नी तू थंड हो आणि इब्राहीम यांना सुरक्षा दे.''

७०) त्यांनी त्यांच्याविरूद्ध बेत केला आणि आम्ही उलट त्यांनाच अपयशी केलं.

७१) आम्ही त्यांना आणि लूत यांना वाचवलं, त्या भूमीकडं पाठवून दिलं ज्यास आम्ही सकल जगात संपन्न केलीय.

७२) आणि मग आम्ही त्यांना इसहाक आणि याकूब नातूची देणगी दिली आणि सर्वांना सत्कर्मी बनवलं.

७३) मग आम्ही त्यांना नेते बनवलं, ते आमच्या आज्ञेनुसार मार्गदर्शन करत, आम्ही त्यांना अनुभूतीद्वारे भली कामं करण्याची प्रेरणा दिली, तसंच नमाज कायम करण्याची आणि जकात देण्याची, ते आमची भक्ती करणारे होते.

७४) आम्ही लूत यांना विवेक आणि ज्ञान दिलं आणि ज्या वस्तीत अघोरी कृत्यं होत होती तिथून त्यांची सुटका केली, ते नक्कीच वाईटास वाहून गेलेले पापी (लोक) होते.

७५) आम्ही त्यांना आपल्या दयेत सामावून घेतलं, तो सत्कर्मी होता.

७६) आठवा, याआधी नूह यांनी धावा केला, आम्ही तो स्वीकारून त्यांची

आणि त्यांच्या कुटुंबीयांची भयंकर यातनेतून सुटका केली.

७७) आणि ज्या लोकांनी आमच्या आयतींना खोटं म्हटलं त्यांच्याविरूद्ध त्यांची मदत केली. ते अत्यंत वाईट लोक होते आम्ही त्या सर्वांना बुडवून टाकलं.

७८) आणि दाऊद व सुलैमान (अ.) यांचीही आठवण असू द्या. जेव्हा काही लोकांच्या मेंढ्या एका शेतात चरत होत्या आणि ते त्याविषयी निकाल लावत होते, आम्ही त्या निकालास साक्षी होतो.

७९) आम्ही सुलेमान यांना (ते प्रकरण) समजावून दिलं, त्या सर्वांना आम्ही निर्णयशक्ती आणि ज्ञान दिलं, आम्ही पर्वत आणि पक्ष्यांना दाऊदच्या अधीन केलं, ते आमचे गुणगान करत, आम्हीच ते करवून घेत.

८०) आम्ही त्यांना चिलखत बनवण्यास शिकवलं युद्धाच्या वेळी बचाव करता यावा म्हणून. तेव्हा तुम्ही आमचं आभार मानणार नाही?

८१) तसंच आम्ही झंझावाती वाऱ्यास सुलैमान यांच्या (अधीन केलं) त्यांच्या आज्ञेनं त्या आम्ही संपन्न नि समृद्ध केलेल्या शहरांकडं (पॅलेस्टाईन आणि सीरिया) वाहत होते. प्रत्येक बाबी आम्हाला अवगत आहेत.

८२) आणि आम्ही काही सैतानांनाही त्यांच्या अधीन केलं होतं ते त्यांच्यासाठी (समुद्रात) बुडी घेत असत आणि त्याच्याव्यतिरिक्त इतर कामंही ते करीत. आम्ही त्यांचे संरक्षण करीत होतो.

८३) तसंच अय्यूब यांचीही आठवण करा जेव्हा त्यांनी आपल्या विधात्याचा धावा केला, ''मला आपत्तीनं ग्रासलंय. आता तूच दया करणाऱ्यांमध्ये परम कृपावंत आहे.

८४) आम्ही ते (धावा) स्वीकारलं, ती आपत्ती दूर केली आणि त्यांचं कुटुंबीय त्यांना परत दिले, शिवाय आमची कृपा म्हणून आणखीनही काही (नातेवाईक) त्यांना आपल्याकडून दिलेत. आमची भक्ती करणाऱ्यांसाठी एक आठवण म्हणून.

८५) इस्माईल, इद्रीस आणि झुलकिफ्ल सर्वच संयमी होते.

८६) आम्ही त्यांना आपल्या दयेत सामावून घेतलं, कारण ते सदाचारी लोकांपैकी होते.

८७) आणि जन्नूनचं (मासेवाले) प्रकरण आठवा, संतापून ते निघून गेले आणि असा तर्क लावला की आम्ही त्यांची पकड करणार नाही, पण (जेव्हा माश्यानं त्यांना गिळून टाकलं) अंधाराच्या तळातून त्यांनी धावा केला, ''तुझ्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही. तू पवित्र आहेस. खरं तर मीच अपराधी होतो.''

८८) आम्ही ते ऐकलं त्या दु:खदायक स्थितीपासून त्यांची सुटका केली, श्रद्धा बाळगणाऱ्यांना आम्ही अशाच प्रकारे वाचवतो.

८९) जेव्हा जकरियांनी आपल्या विधात्याकडं धावा केला, ''माझ्या विधात्या! मला एकटा (विनासंतती) सोडू नकोस, तू तर सर्वोत्तम वारस आहे.''

९०) आम्ही ते (धावा) स्वीकारलं आणि आम्ही त्यांच्या पत्नीस धडधाकट करून त्यांना यहयाची देणगी दिली. ते सर्व भली कामं करण्यात तत्पर असत. अपेक्षा आणि भीतीनं आमच्या धावा करीत. आणि आमच्यासमोर नम्रतेनं झुकत.

९१) आणि त्यांची (मरयम अ.) आठवण करा ज्यांनी आपल्या शीलाचं रक्षण केलं, आम्ही तिच्यात आमचं चैतन्य फुंकलं, तिला आणि तिच्या पुत्रात सकल जगासाठी संकेत बनवला.

९२) तुमचं हा समूह एकमेव समूह आहे, मी तुमचा विधाता आहे. तेव्हा तुम्ही माझीच भक्ती करा.

९३) पण त्यांनी आपल्या धर्माचे आपसांत तुकडे तुकडे करून टाकले. (पण) सारे आमच्याकडंच परतणार आहेत.

९४) ज्याने सत्कर्मं केलीत आणि (त्याचबरोबर) जर तो श्रद्धावान असेल तर त्याचे प्रयत्न वाया जाणार नाहीत, निश्चित त्यांना नोंदवून ठेवू.

९५) आम्ही ज्या वस्तीला नष्ट केले तिचे पुनर्वसन निषिद्ध ठरवलं आहे.

९६) जोवर याजूज आणि माजूज यांना मोकळं सोडून देण्यात येईल आणि

ते प्रत्येक डोंगरावरून धावत सुटतील.

९७) सत्य वचनाच्या पूर्ततेची वेळ जवळ येताच नाकारणाऱ्यांचं डोळे फाटून जातील. आमचं दुर्दैवं आम्ही याकडं दुर्लक्ष केलं, नव्हे आम्ही अपराधी होतो.

९८) तुम्ही आणि अल्लाहस सोडून तुम्ही ज्यांची आराधना करीत होता ते नरकाचे इंधन आहात. तुम्ही तिथंच जाऊन धडकणार.

९९) ते त्यामध्ये कायमचं राहतील. जर ते देव (उपास्य) असतेच तर त्यात गेले नसते.

१००) तिथं ते टाहो फोडत बसतील आणि (इतर) काही एक त्यांना ऐकू येणार नाही.

१०१) ज्यांच्या बाबतीत आमच्याकडून निश्चितच भलं ठरवून दिलं गेलंय अशानं त्यापासून दूर ठेवलं जाईल.

१०२) त्यांची चाहूलही यांना लागणार नाही. त्यांच्या मनाच्या इच्छांमध्ये ते दंग राहतील.

१०३) त्यांना (कयामतची) प्रचंड भीती मुळीच अस्वस्थ करणार नाही. दूत त्यांचं स्वागत करतील, हाच तो दिवस तुमच्यासाठी वचनबद्ध केलेला.

१०४) दिवशी अवकाशाला एखाद्या लिहलेल्या गुंडाळीप्रमाणं गुंडाळलं जाईल. आम्ही त्याची मग पुनरावृत्ती करू जसं आम्ही पहिल्यांदा निर्माण केलं होतं. हे वचन आहे आमचं, आम्ही हे पूर्ण करणारच आहोत.

१०५) जबूर ग्रंथामध्येही आम्ही हा उपदेश नोंदवून ठेवलंय, माझ्या भक्तांपैकी नेक आहेत त्यांनाच पृथ्वीचा वारसा लाभणार आहे.

१०६) यामध्ये आमची आराधना करणाऱ्यांसाठी एक संदेश आहे.

१०७) आणि (हे प्रेषित!) आम्ही तुम्हांस सकल जगांसाठी दयाधन (बनवूनच) पाठवलंय.

१०८) त्यांना सांगा, मला अनुभूतीद्वारे कळवलं गेलंय, तुमचा ईश्वर एकमेव

अल्लाह आहे, तेव्हा तुम्ही आज्ञापालन करणार नाहीत का?

१०९) (तरीदेखील) त्यांनी जर तोंड फिरवलं तर त्यांना सांगा, मी तुम्हांस सदैव सावध केलंय. आणि तुम्हाला जे वचन दिलं गेलंय ते जवळ आहे की लांबवर हे मला ठाऊक नाही.

११०) तुम्ही जे मोठ्यानं बोलता आणि जे काही लपवता ते सर्व त्यास ठाऊक आहे.

१११) हा जो (उशीर) होतोय याद्वारे तुमची परीक्षा घेतली जाते की एका ठराविक वेळेपर्यंत तुम्हांस सुखोपभोगाची संधी (दिली जात) आहे हेही मला ठाऊक नाही.

११२) (प्रेषित) म्हणाले, हे माझ्या विधात्या! सत्य तोच निवाडा लाव, आमचा विधाता परम कृपावंत आहे. तुम्ही जे काही घडवता त्याविरूद्ध त्याचंच सहाय्य मागितलं जातं.

-------

# २२. सूरह अल हज्ज

**मदीनाकालीन, आयती ७८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हे मानवांनो! आपल्या विधात्याची भीती बाळगा. कयामतचा (पुनरुत्थानाच्या दिवशीचा) हादरा निश्चितच एक भयंकर अशी गोष्ट आहे.

२) त्या दिवशी तुम्ही पाहाल दूध पाजणारी (माता) ज्या आपल्या बाळास ती दूध पाजत होती, ती त्यास विसरून जाईल आणि प्रत्येक गर्भवतीचा गर्भपात होईल. आणि तुम्ही लोकांना नशेत असल्यासारखं पाहाल, पण त्यांनी नशा केलेली नसेल. अल्लाहचा कोपच इतका भयंकर असेल.

३) आणि काही माणसं काहीएक कळत नसूनदेखील अल्लाहच्या बाबतीत वाद घालतात आणि प्रत्येक बंडखोर सैतानाच्या मागं जातात.

४) ज्यानं त्यांच्याशी मैत्री केली तो त्याचा मार्ग चुकवून त्याला नरकाच्या कोपाच्या मार्गी लावून देईल, हे विधीलिखत आहे.

५) हे मानवांनो, जर तुम्हास मरणोत्तर जीवनासंबंधी शंका असेल, तर विचार करा आम्ही तुम्हास (कसं) चिखलमातीपासून निर्माण केलं, मग वीर्यापासून, मग गोठलेल्या रक्तापासून आणि नंतर मासाच्या तुकड्यापासून अर्धवट साकारलं आणि अर्धवट विना आकाराचा तुमच्यावर स्पष्ट करण्यासाठी आम्ही आपल्या इच्छेनुसार ते मातांच्या उदरांत ठराविक वेळेपर्यंत स्थिरावतो. आणि नंतर तुम्हांस एका बाळाच्या रूपात बाहेर काढतो, नंतर तुम्हांस तारुण्यापर्यंत पोचवतो आणि तुमच्यापैकी काही मरण पावतात तर तुमच्यातील काही जीर्ण वृद्धापकाळ गाठतात. त्यांना एकदा सर्वकाही कळून आता काहीएक कळेनासं होतंय. आणि धरतीला पाहता ती कशी ओसाड पडली होती. आम्ही मग तिच्यावर पाऊस पाडला, तेव्हा ती तरारून निघाली,

फुलली आणि सर्व प्रकारच्या सुंदर वनस्पती उगवल्या.

६) ह्याचं कारण असं की अल्लाहच एकमेव सत्य आहे, तोच मृतास जीवन देतो आणि सर्व बाबींवर त्याचंच सामर्थ्य आहे.

७) पुनरुत्थान घडणारच यात काही शंका नाही. आणि जे कबरीत आहेत त्या सर्वांना अल्लाह निश्चितच उभं करील.

८) तसंच लोकांमध्ये (असेही) आहेत ज्यांना कसलं ज्ञान नसतानादेखील तो अल्लाहच्या बाबतीत वाद घालतो, त्याच्याकडं मार्गदर्शनही नाही की कोणता स्पष्ट ग्रंथ नाही.

९) अहंकारानं दूर वळतात. लोकांना अल्लाहच्या मार्गापासून भ्रष्ट करण्यासाठी या जीवनात त्यांच्या पदरी अपमान असेल आणि पुनरुत्थानाच्या दिवशी तर आम्ही त्यांस धगधगत्या आगीचा उपभोग देऊ.

१०) हे सर्व त्यांच्या हातांनी जे (कर्म) आगाऊ पाठविली आहेत त्यामुळंच, अल्लाह तर आपल्या भक्तांवर कधीच अत्याचार करत नसतो.

११) आणि असे लोकही आहेत जे कुंपणावर बसून अल्लाहची आराधना करतात. त्यांच काही भलं झालं तर त्यांना समाधान होतं, पण जर एखादं संकट आलं तर मागं वळतात, ते लोक इहलोक आणि परलोक दोन्हीही गमावून बसतात. आणि हेच ते उघड उघड नुकसान.

१२) ते अल्लाहला सोडून अशांचा धावा करतात जे त्यांना इजाही पोहचवू शकत नाहीत की त्यांचा काही लाभही घडवत नाहीत. हीच पराकोटीची मार्गभ्रष्टता.

१३) ते अशांचा धावा करतात ज्यांच्यापासून लाभापेक्षा नुकसानच जास्त जवळचं आहे. किती वाईट त्यांचा हस्तक आणि किती वाईट त्यांचा हा सोबती.

१४) पण ज्या लोकांनी श्रद्धा धारण करून नेक कर्मं केलीत त्यांना अल्लाह अशा स्वर्गात दाखल करील ज्यांच्या खालून नद्या वाहतात. अल्लाह

इच्छितो ते निश्‍चितच करत असतो.

१५) जर कुणाला असं वाटत असेल की अल्लाह त्यांची (प्रेषितांची) या जगात तसंच परलोकात मदत करणार नाही, तर त्यानं आकाशाला एक दोर ताणू दे, मग गळ्यात फास लावून या धरतीशी आपला संबंध तोडून टाकू दे, मग पाहू दे या युक्तीनं त्याचा संताप दूर झाला की नाही.

१६) अशा प्रकारे आम्ही या स्पष्ट आयती (वचनं) अवतरल्या ज्यांना इच्छितो अल्लाह त्यास मार्गदर्शन घडवतो.

१७) जे श्रद्धावंत आहेत आणि जे ज्यू धर्मिय आहेत, साबिई, ख्रिस्ती व मजूशी आहेत आणि जे अनेकेश्‍वरीय आहेत त्या सर्वांमध्ये अल्लाह पुनरुत्थानाच्या दिवशी निकाल लावून देईल, कारण अल्लाह प्रत्येक बाबीचा साक्षी आहे.

१८) तुम्ही पाहत नाही. अवकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहपुढं नतमस्तक आहेत. तसंच सूर्य, चंद्र, तारे, पर्वत, वृक्षं व प्राणी आणि बहुसंख्येनं मानवजातीतील (लोकं) मोठ्या संख्येनं शिक्षेस पात्र आहेत. अल्लाह ज्यांना अपमानित करतो त्यांचा कुणी आदर करत नसतो. जे इच्छितो ते अल्लाह करत असतो.

१९) दोन प्रतिस्पर्धी आपल्या विधात्याविषयी परस्परांशी वाद घालतात. ज्या लोकांनी नाकारलं त्यांच्यासाठी अग्नीची वस्त्रं तयार ठेवलीत. त्यांच्या डोक्यावर उकळतं पाणी ओतलं जाईल.

२०) त्यामुळं त्यांच्या पोटात जे काही आहे ते वितळून जाईल आणि त्यांची कातडीदेखील.

२१) तसंच त्यांच्यासाठी लोखंडी घण असतील.

२२) प्रत्येक वेळी ते दु:खामुळं तेथून पळ काढण्याची इच्छा करतील, त्यांना परत त्यामध्ये ढकललं जाईल. आणि (सांगितलं जाईल) आता अग्नीच्या कोपाचा उपभोग घ्या.

२३) (दुसरीकडं) जे श्रद्धावंत लोक आहेत आणि त्यांनी सत्कर्मं केलीत त्यांना अशा स्वर्गांत दाखल केलं जाईल ज्यांच्या खालून नद्या वाहतात, तिथं त्यांच्यासाठी सोन्याची कंकणं असतील आणि ते मोत्यांनी मढविलं जाईल. त्यांची वस्त्रं रेशमी असतील.

२४) त्यांना विशुद्ध शब्दांनी मार्गदर्शन केलं जाईल. आणि सर्वथा प्रशंसेस पात्र अशा (अल्लाह) ची वाट दाखवली जाईल.

२५) जे लोक बंड करतात आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखतात तसंच पवित्र मशिदी (काबागृहा) पासून, जी आम्ही सर्व लोकांसाठी, तिथं वास्तव्य करणाऱ्या आणि प्रवाशांना सारखीच खुली केलीय. तीमध्ये जर कुणी वाममार्गाचा अवलंब करू इच्छित असेल किंवा अत्याचार घडवण्याची इच्छा बाळगत असेल तर आम्ही त्यास यातनादायक शिक्षा उपभोगण्यास देऊ.

२६) आणि आठवा आम्ही इब्राहीम यांना एका घराची (काबागृहाची) सोय करून दिली आणि (सांगितलं) माझा कुणी भागीदार जोडू नका आणि माझ्या घराला प्रदक्षिणा घालणाऱ्यांसाठी तसंच तिथं उभं राहणाऱ्यांसाठी आणि (नम्रपणे) वाकणाऱ्यांसाठी व नतमस्तक होणाऱ्यांसाठी पुनीत ठेव.

२७) आणि लोकांमध्ये हज्जची घोषणा करा, त्यांना तुमच्याकडं येऊ देत पायी अथवा दुबळ्या उंटावर स्वार होऊन दूरवरच्या ठिकाणांहून.

२८) पाहू देत त्यांना कोणते फायदे लाभणार आहेत ते आणि ज्या चतुष्पाद जनावरांची आम्ही तरतूद केलीय, नियुक्त केलेल्या दिवशी त्यांच्यावर अल्लाहचं नाव घ्या (त्यांना जुबह करण्यास). त्यातून तुम्हीही खा आणि लाचार वंचितांनाही खाऊ घाला.

२९) नंतर त्यांना आपली अस्वच्छता दूर करू द्या. आणि आपलं नवस फेडू द्या. आणि पुरातन वास्तूची (काबागृहाची) प्रदक्षिणा घालू द्या.

३०) अशी ही रीत. आणि ज्यानं अल्लाहच्या प्रतीकांचा आदर केला त्यांच्यासाठी त्यांच्या विधात्यापाशी भलं आहे. आणि ज्यांच्या नावाचा

उल्लेख केला गेलाय अशांना सोडून इतर जनावरं तुमच्यासाठी विधीवत केलीत. तेव्हा तुम्ही घृणास्पद बाबींपासून तसंच मूर्तींपासून अलिप्त राहा. आणि खोट्या गोष्टीपासून स्वत:ला दूर ठेवा.

३१) कुणास भागीदार न करता अल्लाहसाठीच एकाग्र व्हा, ज्यानं अल्लाहस भागीदार जोडला तो आकाशातून खाली कोसळल्यासारखा आहे. त्यास एकतर पक्षी उचलून नेतील किंवा वारा त्यांना दूरवरच्या ठिकाणावर आदळून टाकेल.

३२) तर ही अशी रीत, जो अल्लाहच्या प्रतीकांचा आदर करतो तो मनापासून सदाचारी असतो.

३३) त्याच्यापासून (कुरबानीसाठी आणलेल्या जनावरांमध्ये) ठराविक मुदतीपर्यंत तुम्ही लाभ घेऊ शकता. नंतर त्यांना पुरातन वास्तू (काबागृह) कडं पोचायचंय.

३४) सर्व जनसमूहांसाठी आम्ही बळी देण्याची प्रथा घालून दिलीय. आम्ही त्यांना जी चतुष्पाद जनावरांची तरतूद केलीय त्यांच्यावर त्यांनी अल्लाहचं नाव उच्चारावं (बळी देतेवेळी). तुमचा ईश्वर एकमेव अल्लाह आहे, तेव्हा त्यास समर्पित व्हा आणि (हे प्रेषित) आणि नम्रतेनं वागणाऱ्यांस सुवार्ता द्या.

३५) अल्लाहची आठवण काढताच अशा लोकांची मनं भयानं भरून जातात. त्यांच्यावर आपत्ती कोसळण्यास ते धैर्य दाखवतात आणि नमाज कायम ठेवतात. तसंच आम्ही केलेल्या तरतुदीतून ते खर्च करतात.

३६) बळी दिल्या जाणाऱ्या उंटांना आम्ही अल्लाहच्या प्रतीकांपैकी बनवलंय. त्यामध्ये तुमचं हित आहे. बळी देण्यासाठी त्यांना ओळीत उभं करून त्यांच्यावर अल्लाहचं नाव उच्चारा, ते आपल्या कुशीवर खाली पडल्यानंतर त्यामधून तुम्हीही खा आणि तसंच मागणाऱ्यांना व गरजूंनाही खावयास द्या. तुम्ही कृतज्ञ राहावं म्हणून आम्ही त्यांना तुमच्या अधीन केलेत.

३७) अल्लाहप्रत त्यांचं मांस किंवा रक्त पोचत नसते तर त्यामागची तुमची

निष्ठा पोचते. ज्या प्रकारे आम्ही तुमच्या स्वाधीन केलं, त्यानं तुम्हाला जे मार्गदर्शन केलं, त्यासाठी अल्लाहचा गौरव करावा म्हणून. तसंच परोपकारींना खूशखबर द्या.

३८) जे (अल्लाहशी) एकनिष्ठ आहेत अल्लाह त्यांचं रक्षण करतो. अल्लाहस कोणी कृतघ्नता आणि बंडाळी माजविणारे आवडत नाहीत.

३९) ज्यांच्याविरूद्ध युद्ध केलं जातंय त्यांना त्यांच्यावर होत असलेल्या अत्याचारांचा (बिमोड करण्यासाठी) परवानगी दिली गेली. आणि अल्लाह त्यांच्या मदतीस समर्थ आहे.

४०) ज्या लोकांना नाहक त्यांच्या घरातून घालवण्यात आलं, कारण ते म्हणतात, अल्लाह आमचा विधाता आहे. जर अल्लाहनं काही लोकांचा इतर लोकांकरवी बिमोड केला नसता तर मठं, गिरिजाघरं (ख्रिस्ती लोकांचे) यहुदी लोकांची देवळं आणि मशिदींचा विध्वंस केला गेला असता, ज्यांत अल्लाहचं भरपूर नामस्मरण होते. अल्लाह त्यांना मदत करतो जे त्याची मदत करतात. निश्चितच अल्लाह प्रभुत्वसंपन्न आणि सर्वशक्तीसंपन्न आहे.

४१) आम्ही ज्या लोकांना धरतीवर स्थापित करतो ते नमाज कायम करतात, जकात देतात, भलं ते करण्यास सांगतात आणि वाईट कर्मांस मनाई करतात. आणि सर्व प्रकरणांची परिणती अल्लाहकडंच आहे.

४२) त्यांनी जर तुम्हाला खोटं ठरवलं तर पूर्वी नूह, आद आणि समूद यांनादेखील खोटं ठरवलं गेलंय.

४३) तसंच इब्राहीमच्या लोकांना आणि लूतच्याही लोकांना,

४४) आणि मदयनच्या लोकांना आणि मूसाच्या लोकांनादेखील खोटं ठरवलं. आम्ही बंडखोरांना सवड दिली आणि मग त्यांची पकड केली, तेव्हा काय गत झाली त्यांची आम्हांस नाकारल्यानं.

४५) आम्ही कितीतरी वस्त्यांचा नाश केला, त्या अत्याचारी होत्या म्हणून, ते छतांखाली चिरडले गेले, कितीतरी विहीरी आणि भव्य महाल

निरुपयोगी झालेत.

४६) ते धरतीवर संचार करत नाहीत ज्यामुळं त्यांच्या मनांना बोध घडला असता, त्यांच्या कानांनी ऐकलं असतं. खरे पाहता डोळे आंधळे नसतात, उरातील अंत:करण आंधळे होऊन जातात.

४७) ते शिक्षेची घाई करतात, अल्लाह आपल्या वचनांविरूद्ध कधीच करत नाही. पण तुमच्या विधात्याकडंच एक दिवस तुमच्या गणिताच्या तुलनेत एक हजार वर्षं एवढा आहे.

४८) कित्येक वस्त्या अत्याचारांमध्ये गुरफटल्या असता मी त्यांना सवड दिली. आणि मग त्यांची पकड केली. माझ्याकडंच (त्यांना) परतावयाचंय.

४९) सांगा, लोकहो! मी तर तुमच्यासाठी एक स्पष्ट ताकीद देणारा आहे.

५०) तेव्हा ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि नेक कर्म केलीत तर त्यांना क्षमा आहे सन्मानपूर्वक विपूल उदरनिर्वाह आहे.

५१) जे लोक आमच्या आयतींना (वचनांना) उधळून लावण्याचा प्रयत्न करतात ते नरकाचे धनी आहेत.

५२) आम्ही तुमच्या आधी असा कोणताही प्रेषित अथवा संदेष्टा पाठवला नाही जेव्हा त्यानं (त्या संदेशाचा) पठण दिलं तेव्हा सैतानानं त्या पठणात ढवळाढवळ केली नसेल. पण अल्लाह सैतानानं केलेली ढवळाढवळ रद्द करतो आणि अल्लाह आपल्या आयती भक्कम करतो, कारण अल्लाहस सबंध माहिती आणि ज्ञान असते.

५३) सैतानानं जे सुचवलं त्याद्वारे ज्यांच्या मनांत विकृती आहे अशांची परीक्षा असते कारण त्यांची हृदयं कठोर झालीत. हे अत्याचारी लोक विरोध करण्यात फार लांब गेलेत.

५४) तसंच ज्यांना ज्ञान दिल गेलंय त्यांना हे सत्य तुमच्या विधात्याकडून (आलं) आहे. हे कळून देण्यासाठी तेव्हा त्यावर त्यांनी विश्‍वास ठेवावा आणि त्यांच्या मनांना नमू देत, जे श्रद्धा धारण करतात,

त्यांनाच अल्लाह रास्त मार्ग दाखवतो.

५५) पण ज्या लोकांनी नकार दिला ते कधीच याबाबत शंका घेण्याचं थांबवणार नाहीत. जोवर (कयामतची) घटिका येऊन धडकत नाही किंवा त्या दुर्दैवी दिवसाची शिक्षा त्यांच्याप्रत येत नाही.

५६) त्या दिवशी अल्लाहच सार्वभौम असेल, त्यांच्याबाबत तोच निर्णय देईल. ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि भली कर्मं केलीत त्यांच्यासाठी संपन्न असे स्वर्ग असतील.

५७) आणि ज्यांनी नाकारलं आणि आमच्या आयतींना (वचनांना) खोटं ठरवलं अशा लोकांना अपमानकारक शिक्षा असेल.

५८) जे लोक अल्लाहच्या कार्यात आपली घरंदारं सोडतात आणि मारले गेलेत किंवा त्यांना मरण आलं, अल्लाह उत्तम साधनांनी त्यांची तरतूद करील. आणि अल्लाहच सर्वोत्तम उपजीविका देणारा आहे.

५९) तो त्यांना अशा जागी प्रवेश देईल जिथं ते प्रसन्न होतील. अल्लाह नक्कीच सर्वज्ञ आणि सहनशील आहे.

६०) असं हे कुणी कुणाला जितका त्रास दिला असंल तेवढाच बदला त्यानं घ्यावा. तरीदेखील त्याच्यावर अतिरेक झाला तर अल्लाह त्यास मदत करील. कारण अल्लाहच क्षमा करतो आणि माफही करतो.

६१) कारण असे की अल्लाह रात्रीस दिवसात उजाडतो आणि दिवसास रात्रीत विलीन करतो. आणि अल्लाह सर्वकाही ऐकतो आणि पाहतो.

६२) याचं कारण अल्लाहच तेवढा सत्य आहे आणि त्याव्यतिरिक्त हे (लोक) ज्या कुणाचा धावा करतात ते मिथ्या आहे. अल्लाहच परमोच्च आणि महानतम आहे.

६३) तुम्हांस दिसत नाही, आकाशातून अल्लाहनं पाऊस पाडले आणि धरती हिरवी होऊन जाते. अल्लाहच सूक्ष्म रहस्यांचा जाणकार आहे.

६४) अवकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही त्याच्याच मालकीचे पण अल्लाह सर्व गरजांपासून मुक्त आणि सर्व प्रशंसेस पात्र आहे.

६५) दिसत नाही तुम्हांस, अल्लाहनं धरतीवरील सर्वकाही तुमच्या स्वाधीन केलंय, त्याच्याच आज्ञेनं समुद्रात नौका संचार करतात आणि त्यानेच आकाशाला रोखून धरलंय त्याच्या परवानगीशिवाय तो धरतीवर कोसळू नये म्हणून. निश्चितच अल्लाह मानवांप्रत अतिशय प्रेमळ आणि दयाळू आहे.

६६) त्यानंच तुम्हाला जागवलं, नंतर मग मरण देईल आणि पुन्हा तोच तुम्हांस सजीव करील. पण हा मनुष्य खरेच (ही) सत्यता नाकारतो.

६७) आम्ही प्रत्येक लोकसमूहात उपासनेची पद्धत घालून दिलीय. त्याचंच ते अवलंब करतात, तेव्हा याबाबत वाद घालता कामा नये, (तुम्ही त्यांना) आपल्या विधात्याकडं बोलवा. कारण तुम्ही रास्त मार्गावर आहात.

६८) त्यांनी जर तुमच्याशी वाद घातला तर (त्यांना) सांगा, तुम्ही जे करत आहात ते अल्लाहस ठाऊक आहे.

६९) ज्या बाबतीत तुम्ही मतभेद करत होता त्याचा निवाडा पुनरुत्थानाच्या दिवशी अल्लाहच करून टाकील.

७०) अवकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहस ठाऊक आहे, याची तुम्हाला माहिती नाही? ते सर्व नोंदवून ठेवलंय. तसं करणे निश्चितच अल्लाहस सोपं आहे.

७१) अल्लाहस सोडून ते ज्यांची भक्ती करताहेत (त्यांच्यासाठी) त्यांना कोणती सनद पाठवली नाही आणि त्याबाबत त्यांना कसलंही ज्ञान नाही, अशा अन्यायी लोकांस कुणाची मदत नसणार.

७२) जेव्हा आमच्या आयती (वचनं) त्यांना वाचून दाखवली जातात तेव्हा नाकारणाऱ्यांच्या चेहऱ्यावरून त्यांचा नकार तुम्ही ओळखता आणि जे लोक आमच्या आयती वाचून दाखवतात त्यांच्यावर ते लगेच तुटून पडतील (असे वाटते) त्यांना विचारा, मी दाखवून देऊ यापेक्षा भयानक काय ते, नरकाग्नी, ज्याचा अल्लाहनं नाकारणाऱ्यांना शब्द दिलाय, ते वाईट ठिकाण आहे.

७३) लोकहो, एक उदाहरण आहे ते ऐका, तुम्ही अल्लाहशिवाय ज्यांचा धावा करता, ते सर्व एकत्रित येऊनही एक माशीदेखील निर्माण करू शकणार नाही आणि त्या माशीनं जर त्यांच्याकडून काही हिसकावून घेतलं तर ते त्यांना परतही मिळवता येत नाही. दोन्हीही दुबळे- जे मागतात ते आणि ज्यांना मागितले जाते तेही.

७४) जशी करायला हवी होती तशी कदर अल्लाहची त्यांनी केलीच नाही. अल्लाह शक्तिशाली आणि प्रभुत्वसंपन्न आहे.

७५) अल्लाह आपले संदेशवाहक दूतांमधून आणि मानवांमधून निवडतो. अल्लाह सर्वकाही ऐकतो नि पाहतो.

७६) त्यास ठाऊक आहे त्यांच्यासमोर काय आहे आणि त्यांच्या पाठीमागं काय आहे ते, आणि सर्व प्रकरणं अल्लाहप्रतच परतणार आहेत.

७७) श्रद्ध लोकहो! वाका, नतमस्तक व्हा, आपल्या विधात्याची आराधना करा, भली ती (कामं) करा म्हणजे तुमचा उत्कर्ष घडेल.

७८) त्याच्या कारणास्तव संघर्ष करा जसा करायला हवा, त्यानं (अल्लाहनं) तुमची निवड केली, धर्मामध्ये तुमच्यासाठी कसली अडचण ठेवली नाही, तुमच्या पित्याचा (इब्राहीम) तोच तुमचा धर्म, त्यानं तुम्हांस मुस्लिम हे नाव दिलंय. यापूर्वी आणि यामध्ये (कुरआनात) देखील प्रेषित तुमच्यासाठी साक्ष राहावेत आणि तुम्ही मानवजातीसाठी साक्ष राहावं म्हणून. तेव्हा नमाज अदा करा, जकात द्या, अल्लाहस घट्ट धरून राहा, तोच तुमचा संरक्षक. किती उत्तम संरक्षक आणि किती उत्तम मदत करणारा.

-------

# २३. सूरह अल मूमीनून

**मक्काकालीन, आयती ११८**

**पारा - १८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) श्रद्धावंताचा उत्कर्ष होणार,

२) जे लोक आपल्या नमाजांमध्ये विनम्र होतात,

३) व्यर्थ गोष्टी टाळतात ते,

४) आणि जकात देतात.

५) आपल्या गुप्तांगाचं रक्षण करतात.

६) आपल्या पत्नींना सोडून किंवा अशा स्त्रिया (म्हणजे ज्या स्त्रिया युद्धात पकडल्या जात आणि शासनाकडून त्यांची देखभाल करण्यास मुस्लिमांमध्ये वाटून दिल्या असतील, तर अशा स्त्रियांशी मुस्लिमांनी विधिवत संबंध जोडण्यात काही गैर नाही.) ज्या त्यांच्या मालकीत असतील, त्यांच्या बाबतीत ते निंदनीय नाहीत.

७) पण जर कुणी या पलीकडं काही इच्छित असेल तर ते (लोक मर्यादांचं) उल्लंघन करणारे आहेत.

८) जे लोक दिलेल्या अमानती व वचनं पाळतात

९) आणि आपल्या नमाजांविषयी दक्ष असतात,

१०) तेच वारस असतील

११) याच लोकांना उच्च दर्जाच्या स्वर्गांचा वारसा लाभेल ते कायम तिथंच राहतील.

१२) आम्ही मनुष्यास चिखलमातीपासून निर्माण केलं,

१३) मग आम्ही त्या शुक्रबिंदूस एका सुरक्षित जागी स्थिरावलं.

१४) शुक्रबिंदूस नंतर गोठलेल्या रक्ताचा आकार दिला. नंतर त्या गोठलेल्या रक्तापासून मांस बनवलं. त्या मांसापासून मग हाडं बनवली. त्या हाडांवर पुन्हा मांसाचं आवरण चढवलं. आम्ही मग त्याला एका नवीन रूपात घडवलं. अल्लाह उपकारक असून सर्वोत्तम निर्माणकर्ता आहे.

१५) यानंतर तुम्ही निश्चितच मरण पावणार

१६) आणि मग कयामतच्या दिवशी निश्चितच तुम्हास उभं केलं जाईल.

१७) तुमच्यावर (ग्रहांचे) सात रस्ते निर्माण केले. आम्ही निर्मितीच्या बाबतीत दुर्लक्ष करत नसतो.

१८) आम्ही आकाशातून मोजका पाऊस पाडतो आणि जमिनीत ते तुंबवून ठेवलं (जिरवतो) आणि आम्ही त्यास (वाहून) नेण्यातही समर्थ आहोत.

१९) त्याद्वारे आम्ही तुम्हांस खजुरीच्या व द्राक्षांच्या बागा उभ्या केल्यात. त्यांमध्ये तुम्हांस खाण्यासाठी भरपूर फळं लागतात.

२०) तसेच तूर-सीना खालून (जैतूनची) झाडं उगवतात, (त्यामध्ये) तुमच्या अन्नासाठी तेल आणि भाजी असते.

२१) आणि पशुंमध्येदेखील तुमच्यासाठी एक बोध (हित) दडलंय. त्यांच्या पोटांद्वारे तुम्हास (दूध) पाजतो, आणखीनही पुष्कळ फायदे आहेत, तुम्ही त्यांच्यातून (मांस) खाता.

२२) त्यांच्यावर आणि नौकांवर तुम्ही स्वार होता.

२३) आम्ही नूह यांना त्यांच्या लोकांकडं पाठवलं. ते म्हणाले, माझ्या लोकांनो! अल्लाहचीच आराधना करा. त्याच्याव्यतिरिक्त कुणीही ईश्वर (देव) नाही. तेव्हा तुम्ही (त्यास) भिणार नाही?

२४) तेव्हा, ज्या लोकांनी नकार दिला होता त्यांच्यातील प्रतिष्ठित मंडळी म्हणाली, हा कोण? आपल्यासारखाच एक माणूस. तुमच्यावर आपलं प्रभुत्व गाजवू पाहतो. अल्लाहला वाटलं असतं तर त्यानं दूत पाठवला असता. आम्ही आमच्या पूर्वजांकडून असं काहीच ऐकलेलं नाही.

२५) हा (तसा) काही नसून एक वेड लागलेला माणूस आहे, काही काळ आपण वाट पाहू या.

२६) ते (नूह) म्हणाले, माझ्या विधात्या! मला मदत कर. ते मला खोटं ठरवतात.

२७) आम्ही तेव्हा अनुभूतीनं त्यांना आमच्यादेखत एक नौका बांधण्यास कळवलं आणि आमच्या आदेशानं जेव्हा पृथ्वीतील (पाणी) उसळी मारेल तेव्हा त्या (नौके) मध्ये प्रत्येक प्राण्याची दोन-दोन जोडपी घ्या, तसंच आपल्या घरच्यांना. पण ज्यांच्या बाबतीत पूर्वीच निर्णय दिलेला आहे. (त्यांना वगळून) ज्यांनी अपराध केलाय त्यांच्याविषयी मला बोलू नकोस, ते सर्व बुडून जाणारे आहेत.

२८) जेव्हा तुम्ही आणि जे तुमच्या बरोबर आहेत सर्वांनी बसून घेतलं तेव्हा अल्लाहचा गौरव करा, ज्यानं अपराधी लोकांमधून तुमची सुटका केली.

२९) आणि म्हणा, माझ्या विधात्या! मला समृद्ध ठिकाणी उतरव (पोचव), तूच तर उत्तम असा उतरवणारा आहेस.

३०) यामध्ये निश्चितच संकेत आहेत. आणि (याद्वारे) आम्ही परीक्षा घेणार आहोत.

३१) आम्ही त्यांच्यानंतर दुसऱ्या समूहास उभं केलं.

३२) आणि त्यांच्याकडं प्रेषित पाठवला त्याच्यामधून (हे सांगून) ‘अल्लाहचीच आराधना करा त्याच्याव्यतिरिक्त इतर कोण ईश्वर (देव) नाही.’ तुम्ही नाही भीती बाळगणार?

३३) (तेव्हा) त्याच्या लोकांमधील ज्या प्रतिष्ठित लोकांनी (हे मानण्यास) नकार दिला होता, तसेच परलोकातील भेट घडणार आहे हे नाकारलं होतं, ज्यांना आम्ही या जगात चैनीचं जीवन दिलं होतं. म्हणाले, कोण तो हा? आपल्यासारखाच एक माणूस. आपण जे खाता तेच तोही खातो, तुम्ही पिता तेच तोही पितो.

३४) जर तुम्ही आपल्यासारख्याच एका माणसाचं पालन केलं तर नक्कीच घात करवून बसाल.

३५) तुम्हाला तो अशी हमी देतो की तुम्ही मरून गेला आणि तुमच्या हाडा-(मांसा)ची माती झाली तरीदेखील तुम्हांस (तीमधून) काढलं जाईल?

३६) काहीच नाही. तुम्हास वचन देतो तसं काहीच नाही.

३७) जगातल्या या जगण्यापलीकडं काहीच नाही. आम्ही मरू आणि आम्ही जगू, पण आम्ही पुन्हा उठवले जाणार नाहीतच.

३८) एका माणसापलीकडं तो काहीच नाही नि अल्लाहच्या बाबतीत तर तो खोटंच रचतो. आम्हाला नाही त्याच्यावर श्रद्धा ठेवायची.

३९) प्रेषित म्हणाले, ''हे माझ्या विधात्या! ते मला खोटं म्हणतात, तू मला मदत कर.''

४०) (अल्लाहनं) म्हटलं, थोड्याच वेळात त्यांना पश्चात्ताप घडणार आहे.

४१) तेव्हा आदेशानुसार एका धडाक्यानं त्यांना गाठलं आणि आम्ही त्यांचा केरकचरा करून टाकला. पापी लोकांना लांबवरच राहू दे.

४२) आम्ही त्यांच्यानंतर आणखीन समूहांना उदयास आणलं.

४३) कोणताही समूह पूर्वनिश्चित मुदतीआधी जात नसतो की ना मुदत (संपल्यानंतर) उरतो.

४४) आम्ही नंतर एकापाठोपाठ एक प्रेषित पाठवित राहिलो. जेव्हा त्या समूहाचे प्रेषित त्यांच्याकडं आले त्यांनी त्यांना खोटं ठरवलं. तेव्हा आम्ही एकानंतर दुसऱ्या समूहास नष्ट करत राहिलो आणि अशा प्रकारे त्यांचे किस्से करून टाकले. विश्वास न ठेवणाऱ्यांचा तिरस्कारच होत असतो.

४५) मग आम्ही मूसा आणि त्यांचे बंधु हारुन यांना आपली संकेतं आणि स्पष्ट अधिकार देऊन पाठवलं

४६) फिरऔन आणि त्याच्या सरदारांकडं, पण त्यांनी उद्धटपणा केला, ते उद्दाम होते.

४७) ते म्हणाले, आम्ही आमच्यासारख्याच दोन माणसांवर विश्वास ठेवलाय, त्यांचे लोक तर आमच्या अंकित आहेत.

४८) आणि त्यांनी त्या दोघांना खोटं ठरवलं (म्हणून) नाश पावणारे झाले.

४९) आम्ही मूसा यांना लोकांच्या मार्गदर्शनार्थ ग्रंथ दिला.

५०) आम्ही मरयम आणि त्यांच्या पुत्रास एक संकेत दिला, त्यांना एका उंच जागी शरण दिलं निवाऱ्यासाठी तिथं पाण्याचे झरे होते.

५१) हे प्रेषित! पाक वस्तू खा आणि नेक कर्म करा. तुम्ही जी कामं करता ती मला ठाऊक आहेत.

५२) निश्चितच हा तुमचा समूह एकमेव (असा) समूह आहे. मी तुमचा विधाता आहे, माझी भीती असू द्या.

५३) पण लोकांनी आपल्या धर्मास आपसांत (पंथांमध्ये) विभागून टाकलं आणि हरेक गट त्याच्याकडं जे आहे त्याच्या आनंदात मग्न आहे.

५४) त्यांना राहू दे एका मुदतीपर्यंत याच अवस्थेत.

५५) त्यांना काय वाटतं, आम्ही त्यांना मदत करतो, संपत्ती आणि संततीनं.

५६) आम्ही त्यांचं भलं करण्यास तत्पर आहोत? नव्हे त्यांना याचं भान नाही.

५७) जे लोक आपल्या विधात्याशी भिऊन असतात,

५८) आणि जे लोक आपल्या विधात्याच्या आयतींवर श्रद्धा ठेवतात,

५९) आणि जे लोक आपल्या विधात्यास भागीदार जोडत नसतात,

६०) आणि जे लोक (इतरांना) देत असतात जे काही देणं (शक्य) असेल. आणि त्यांच्या हृदयांना आपल्या विधात्याकडं परतण्याची सतत भीती लागून असते.

६१) हेच लोक आहेत ज्यांना भलं करण्याची घाई असते आणि म्हणून हेच अग्रणी ठरतील.

६२) आम्ही कोणत्याही जिवावर त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक ओझं टाकत नसतो. आमच्याकडं सर्व यथायोग्य नोंदवलेला आहे. त्यांच्याशी मुळीच अन्याय केला जाणार नाही.

६३) पण यामुळं त्यांच्या अंत:करणाला याची जाण नाही, याशिवायही ते इतर (वाईट) कर्मं करतच असतात.

६४) आम्ही जेव्हा त्यांच्यामधील विलासी लोकांची शिक्षा (देण्यासाठी) पकड केली तेव्हा ते विनवणी करू लागले.

६५) पण आजच्या दिवशी कसलीच विनंती नको, आमच्याकडून तुम्हांस मदत लाभणार नाही.

६६) जेव्हा तुम्हांस माझ्या आयती (वचनं) वाचून दाखविली जात तेव्हा (तर) तुम्ही आपल्या टाचांवर मागं वळत होता.

६७) ऐटीत, बडबडत, उत्कट रात्री चव्हाट्यावर मौजमस्ती करता

६८) त्यांनी या वचनावर (कुरआन) चिंतन केलं नाही? की त्यांच्याकडं अशा काही बाबी आल्या ज्या त्यांच्या पूर्वजांकडं आल्या नव्हत्या?

६९) किंवा त्यांनी आपल्या प्रेषितास ओळखलं नाही म्हणून त्यास नाकारता.

७०) त्याचं म्हणणं काय? ते वेडसर आहेत? नव्हं त्यांनी तर त्यांच्याप्रत सत्य (हेच) आणलंय. पण त्यांच्यातील बहुतेकांना त्या सत्याचा द्वेष आहे.

७१) पण जर सत्यानं त्यांनी हवं त्याचं पालन केलं असते तर आकाश आणि पृथ्वी आणि त्यांच्यामधील सर्वकाही विस्कळीत झालं असतं. नव्हे आम्ही तर त्यांना शिकवण देऊ केलीय, पण ते या शिकवणींपासून दूर वळतात.

७२) तुम्ही त्यांच्याशी काही मोबदला मागता? मोबदला देणारा तर अल्लाह

आहे आणि तोच तर तरतूद करण्यास सर्वोत्तम आहे.

७३) निश्चितच तुम्ही तर त्यांना रास्त मार्गाकडं बोलवता.

७४) ज्या लोकांना परलोकावर विश्वास नाही ते रास्त मार्गापासून ढळले आहेत.

७५) आम्ही जर त्यांना दया दाखवली, त्यांच्यावरील आपत्ती दूर केली तरी ते मर्यादेबाहेर भरकटत लांब निघून जातील.

७६) आम्ही त्यांना शिक्षा घडवली तरी ते आपल्या विधात्यापुढं नमले नाहीत की विनवणी केली.

७७) जेव्हा आम्ही त्यांच्याकरिता कठोर शिक्षेची दारं उघडी केली तेव्हा मात्र ते निराश झाले.

७८) त्यानंच तुम्हांस ऐकण्यासाठी कान दिले, दृष्टी दिली, (चिंतन करण्यासाठी) मन दिलं तरीदेखील तुम्ही किंचितच आभार व्यक्त करता.

७९) त्यानंच तुम्हाला धरतीवर विस्तारलं आणि त्याकडंच तुम्ही एकत्रित होणार आहात.

८०) आणि तुम्हाला समजत नाही, तोच तुम्हांस जन्म आणि मृत्यू देतो आणि रात्र व दिवसाचं (एकमेकांशी) बदल तोच घडवतो ते?

८१) पण त्यांनी तेच सांगितलं जे त्यांचे पूर्वज म्हणत असत.

८२) म्हणाले, आम्ही मेल्यावर माती आणि हाडं होऊन गेल्यावर आम्हाला परत उभं केलं जाणार?

८३) अशी वचनं आम्हांस आणि आमच्या पूर्वजांनाही सांगितली गेलीत. ह्या तर पूर्वजांच्या कथा आहेत.

८४) त्यांना विचारा, जर तुम्हाला माहिती असेल तर सांगा (बरं) ही धरती आणि तिच्यामधील सर्वकाही कोणाचं आहे?

८५) ते उत्तर देतील, हे सारं अल्लाहचंच आहे. त्यांना सांगा, मग तुम्ही

विचार का करत नाहीत?

८६) त्यांना विचारा, सप्तअवकाशांचा स्वामी कोण? आणि कोण सर्वोच्च सिंहासनाचा विधाता?

८७) ते म्हणतील, सारं अल्लाहचंच. त्यांना सांगा, मग तुम्हाला भीती नाही वाटत?

८८) त्यांना विचारा, कुणाच्या हातात सर्व बाबींचं अधिराज्य आहे, कोण संरक्षण देतो, आणि त्याच्याविरूद्ध कुणी संरक्षण देऊ शकत नाही. माहिती आहे याची तुम्हास?

८९) ते उत्तर देतील, सारं अल्लाहचंच. त्यांना सांगा, मग तुम्ही कसे जादूत फसवले जाता?

९०) आम्ही तर त्यांच्याप्रत सत्यच पाठवलं, पण ते खोटारडे आहेत.

९१) अल्लाहनं कोणासही आपला पुत्र बनवलं नाही आणि त्याच्या बरोबरीनं इतर कोणी ईश्वर (देव) नाही. जर तसं असतं तर प्रत्येक ईश्वरानं जे काही निर्माण केलं (ती निर्मिती) त्यानं नेली असती. आणि ते एकमेकांशी भिडले असते. अल्लाहचा गौरव असो, ज्या गोष्टी हे (लोक) रचत आहेत त्यापासून तो मुक्त आहे.

९२) उघड आणि दडलेलं सर्व त्यास ठाऊक आहे. जे भागीदार त्यास हे लोक योजित आहेत त्या सर्वांवर त्याचं प्रभुत्व आहे.

९३) म्हणा, माझ्या विधाता! ज्या गोष्टींचं तू वचन दिलं आहेस (प्रकोपाचं वचन), जर ते माझ्या समक्ष तुला आणायचं असल्यास

९४) माझ्या विधाता, मला तू या पापी लोकांमधील बनवू नकोस.

९५) आणि त्यांना जी धमकी दिली आहे ती करून दाखविण्यास आम्ही समर्थ आहोत.

९६) वाईटास चांगल्या गोष्टीने परतून लावा, ते जे रचत आहेत ते आम्हांस ठाऊक आहे.

९७) (तुम्ही) प्रार्थना करा, माझ्या विधाता! सैतानाच्या क्लृप्तींपासून मी तुझं शरण मागतो.

९८) आणि माझ्या विधाता! मी शरण मागतो त्या माझ्याजवळ येऊ नयेत.

९९) जेव्हा त्यांच्यातील एखाद्यासमक्ष मृत्यू येतो तेव्हा तो म्हणतो, माझ्या विधाता! मला परत (जगात) पाठवून दे.

१००) कदाचित राहून गेलेली नेक कामं मला करता येतील. मुळीच नाही. तो जे बोलून दाखवतो, ते त्याचे बोल आहेत. आता त्यांच्यासमोर एक पडदा (बरज़ख़) आहे. ज्या दिवशी त्यांना पुन्हा उठवलं जाईल तोवर.

१०१) ज्या दिवशी शंख फुंकलं जाईल. त्या दिवशी त्यांच्यामध्ये कसले नातेसंबंध उरणार नाहीत की कुणी एकमेकांची काळजी घेणार.

१०२) ज्यांचं पारडं (पुण्यानं) जड असेल, तेच लोक उत्कर्ष पावणारे ठरतील.

१०३) आणि ज्यांचं पारडं हलकं असेल, अशा लोकांनी स्वत:चा आघात ओढवून घेतला, ते कायमचं नरकात जातील.

१०४) त्यांची तोंडं आगीनं भाजून निघतील आणि विकृत होऊन जातील.

१०५) तुम्हास माझ्या आयती (वचनं) ऐकविल्या जात होत्या, पण तुम्ही त्या खोट्या ठरवत असत.

१०६) ते म्हणतील, आमच्या विधाता! आमच्या दुर्दैवानं आमच्यावर मात केली, आम्ही मार्गभ्रष्ट लोक होऊन बसलो.

१०७) आमच्या विधाता! तू आम्हांस यातून बाहेर काढ. आम्ही जर परत तेच (दुष्कर्म) केलं तर आम्ही नक्कीच अपराधी ठरू.

१०८) अल्लाह म्हणेल, जा तिथंच! धिक्कारलेल्यानो त्यातच पडून राहा, मला बोलू नका.

१०९) माझ्या भक्तांपैकी काही असे (भक्त) होते जे म्हणत, आमच्या विधाता! आम्ही श्रद्ध झालो. आम्हांस क्षमा कर, दया दाखव. तूच तर सर्वतोपरी दया दाखवणारा आहेस.

११०) पण तुम्ही त्यांची टिंगल केली, त्यांनी तुम्हांस मला विसरण्यासही भाग पाडलं. तरीदेखील तुम्ही त्यांच्याबरोबर हसं करण्यात गुंतलात.

१११) पण त्यांनी त्यावर संयम दाखवला. म्हणून मी आज त्यांना त्याचं फळ देतो. तेच यशस्वी होणार आहेत.

११२) (अल्लाह) विचारेल, तुम्ही या धरतीवर किती वर्षं राहिला असाल.

११३) ते म्हणतील, एक दिवस किंवा दिवसाचा काही भाग. ज्यांना हिशेब कळतो त्यांना विचारा.

११४) तो म्हणेल, (नव्हं) तुम्ही थोडाच (वेळ) राहिलात. तुम्हाला याची कल्पना असती (तर!)

११५) तुम्हाला काय वाटतं, आम्ही तुम्हांस उगाच निर्माण केलं? आणि तुम्ही आमच्याकडं परतणार नाहीत.

११६) अल्लाहच खऱ्या अर्थानं सर्वोच्च अधिपती आहे. त्याच्याशिवाय इतर कुणी ईश्वर (देव) नाही. वैभवशाली सिंहासनाचा स्वामी तोच.

११७) अल्लाहच्या बरोबरीनं जे इतर देवांचा (उपास्यांचा) धावा करतात त्यांच्याविषयी काही पुरावा नाही. त्यांच्या विधात्याकडं त्यांचा हिशेब आहे. असले नाकारणारे कधी यश प्राप्त करू शकणार नाहीत.

११८) तेव्हा प्रार्थना करा, माझ्या विधाता! तू क्षमा कर, दया दाखव. तूच तर सर्वोत्तम दया करणारा आहेस.

-------

# २४. सूरह अन्नूर

**मदीनाकालीन, आयती ६४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आम्ही हा सूरह (अध्याय) अवतरला आणि यामधील आदेश तुमच्यावर अनिवार्य केले. यात आम्ही आयतींना स्पष्ट करून पाठवलं. त्या तुमच्या लक्षात आणून देण्याकरिता.

२) स्त्री अथवा पुरुषानं व्यभिचार केल्यास दोघांना शंभर फटके मारा. अल्लाहचा आदेश अंमलात आणताना त्यांच्याशी दया करू नका, जर तुम्ही अल्लाह आणि शेवटच्या दिनावर (परलोक) विश्वास ठेवत असाल तर, त्यांना शिक्षा देतेवेळी मुस्लिमांमधील एक गट हजर राहावा.

३) व्यभिचारी पुरुषानं व्यभिचारी स्त्रीशी किंवा अनेकेश्वरी स्त्रीशीच विवाह करतो. तसंच व्यभिचारी स्त्रीचा विवाह व्यभिचारी अथवा अनेकेश्वरी पुरुषाशी होत असतो. अशा गोष्टी करणं श्रद्धावंतांकरिता वर्ज्य आहेत.

४) जे लोक निष्कलंक महिलांवर आरोप ठेवतात आणि त्याबाबत त्यांनी जर चार साक्षीदार आणले नाहीत, तर अशांना ऐंशी फटके मारा. यापुढं त्यांची साक्ष नेहमीसाठी स्वीकारू नका, हे पापी लोक आहेत.

५) पण ज्या लोकांनी नंतर पश्चात्ताप व्यक्त करून स्वत: सुधारले तर अल्लाह क्षमा करून दया करणारा आहे.

६) जे आपल्या पत्नींवर आरोप ठेवतात, पण त्यांच्या स्वत:पलीकडं त्यांच्यापाशी पुरावा नसल्यास तो सत्य बोलत आहे म्हणून त्यानं अल्लाहच्या शपथेनं चार वेळा साक्ष घ्यावी.

७) आणि पाचव्या वेळी त्यांना म्हणू दे जर तो खोटं बोलत असेल तर त्याच्यावर अल्लाहचा धि:क्कार असो.

८) आणि तसंच जर स्त्रीनं अल्लाहच्या साक्षीनं चार वेळा शपथ घेतली,

तो माणूस खोटं बोलतो तर मग तिची शिक्षा टळली जाईल.

९) आणि पाचव्या वेळी तीस म्हणू दे जर तो सत्य बोलत असेल तर माझ्यावर अल्लाहचा कोप होवो.

१०) पण जर तुम्हांस अल्लाहचं वरदान लाभलं नसतं नि त्याची कृपा नसती तर (तुमची काय अवस्था झाली असती). पण अल्लाह पश्चात्ताप स्वीकारणारा मोठा प्रभुत्वसंपन्न आहे.

११) जे लोक असा आरोप करतात ते तुमच्यापैकीच आहेत. ह्या गोष्टीस वाईट समजू नका, तर ती तुमच्या भल्याचीच आहे. त्यांच्यामधील प्रत्येक माणसास त्यानं जेवढं पाप केलं असेल त्याच प्रमाणात (शिक्षा दिली) जाईल आणि त्यांच्यामधील ज्यानं मोठा वाटा उचलला असेल त्याला मोठी शिक्षा आहे.

१२) पण श्रद्ध पुरुष आणि महिलांनी असं काही ऐकलं असता त्यांनी स्वत:विषयी चांगली कल्पना का केली नाही? आणि का म्हणाले नाही की हा तर केवळ एक निव्वळ आरोप आहे.

१३) त्यांनी त्याविरूद्ध चार साक्षी का पुढे केले नाहीत, त्यांनी साक्षी पुढं आणले नाहीत म्हणून अल्लाहपाशी तेच खोटे ठरलेत.

१४) जर या जगात आणि परलोकातदेखील तुम्हांस अल्लाहचं वरदान आणि त्याची कृपा लाभली नसती तर तुम्ही ज्या प्रकरणांत गुंतला होता त्यामुळं तुम्हांस भयंकर शिक्षा झाली असती.

१५) ज्या गोष्टींची तुम्हांस मुळात माहितीच नव्हती (तरीपण) तुम्ही तोंडातोंडी चर्चा करू लागलात. स्वत:च्या तोंडाने ती उच्चारली, तुम्ही तिला क्षुल्लक समजलं, पण अल्लाहपाशी ती फार मोठी (गोष्ट) होती.

१६) आणि जेव्हा तुम्ही ते ऐकलं तेव्हा, का बरं असं म्हणाला नाही की आम्हाला ते (ऐकायचं) नाही आणि तसं काही बोलणंही उचित नाही, अल्लाह पावन आहेस तू, हा तर मोठा आरोप आहे.

१७) अल्लाह तुम्हास शिकवण देतो, तुम्ही जर श्रद्ध असलात तर परत

कधीही असं काही करू नका.

१८) अल्लाह तुम्हासाठी आयती (वचनं) स्पष्ट करून देतो. कारण त्यासच परिपूर्ण ज्ञान असून तो विवेकपूर्ण आहे.

१९) ज्या लोकांना श्रद्ध लोकांविषयी अश्लील गोष्टी पसरविणं आवडतं, त्यांना या जगात तसंच परलोकातदेखील कडक शासन असेल. अल्लाहला सर्वकाही ठाऊक असते, तुम्हाला माहिती नसते.

२०) पण जर तुम्हांस अल्लाहचं वरदान आणि त्याची कृपा लाभली नसती तर (फार वाईट परिणाम उमटले असते.) पण तो प्रेमळ आणि दयावंत आहे.

२१) श्रद्ध लोकहो, सैतानाच्या वाटेला जाऊ नका, जे सैतानाची वाट धरतात, त्यांना तो अश्लील आणि वाईट गोष्टी करण्यास प्रवृत्त करतो. जर तुम्हांस अल्लाहचं वरदान आणि त्याची कृपा लाभली नसती तर तुम्हांपैकी कुणीही कधीच शुद्ध (आचरणाचं) नसतं. पण अल्लाह ज्यास इच्छितो त्यास विशुद्ध करतो, अल्लाह सर्वकाही ऐकून आणि जाणून असतो.

२२) तुमच्यामधील ज्यांना विपुलता आणि संपन्नता लाभली त्यांनी नातलगांना, निराधारांना आणि अल्लाहच्या मार्गात घरंदारं सोडणाऱ्यांना काही न देण्याची शपथ खाऊ नये. (त्यांना) क्षमा करा आणि (त्यांच्या चुकांकडं) दुर्लक्ष करा. अल्लाहनं तुम्हांस क्षमा करणं आवडत नाही? अल्लाह तर क्षमाशाली आणि कृपावंत आहे.

२३) जे लोक विनयशील आणि भोळ्या श्रद्ध स्त्रियांवर आरोप लावतात त्यांना या जन्मात आणि परलोकातदेखील धिक्कारलं जाईल आणि त्यांना कडक शिक्षा दिली जाईल.

२४) ज्या दिवशी त्यांच्या कृत्यांबाबत (त्यांच्याच) जिभा, हात आणि पाय त्यांच्याविरूद्ध साक्ष देतील.

२५) त्या दिवशी अल्लाह त्यांना पुरेपूर वाजवी मोबदला देईल आणि त्यांना

कळून चुकेल की अल्लाहच फक्त प्रकट सत्यता आहे.

२६) दुष्ट स्त्रिया दुष्ट पुरुषांसाठी, दुष्ट पुरुष दुष्ट स्त्रियांसाठी आणि पावन स्त्रिया विशुद्ध पुरुषांसाठी, विशुद्ध पुरुष विशुद्ध स्त्रियांसाठी आहेत. त्यांच्याबाबत जे बोललं जातं त्या (गोष्टीं) पासून ते (सुशील स्त्रिया आणि सुशील पुरुष) अलिप्त आहेत. त्यांच्यासाठी क्षमा असते आणि सन्मानाची तरतूद आहे.

२७) श्रद्धावंत लोकहो! आपल्या घरांशिवाय इतरांच्या घरांमध्ये त्यांची परवानगी न घेता आणि त्यामधील लोकांना अभिवादन केल्याशिवाय आत जाऊ नका. तुम्ही लक्ष दिलं तर हे तुमच्या भल्याचं आहे.

२८) जर त्या (घरांमध्ये) तुम्हांस कुणी आढळलं नाही तर तुम्हांस परवानगी मिळेपर्यंत घरांच्या आत जाऊ नका. तुम्हांस जर परत जाण्यास सांगण्यात आलं तर परत जा. यामुळं तुम्हांस पावित्र्य लाभेल. तुम्ही जे काही करता ते अल्लाहस ठाऊक असते.

२९) ज्या घरांमध्ये कुणी राहत नसेल आणि तिथं तुमच्यासाठी काही लाभाची वस्तू असेल तर अशा घरांमध्ये जाण्यास काही आक्षेप नाही. तुम्ही जे उघड करता आणि लपवून काय ठेवता ते अल्लाहला माहीत आहे.

३०) श्रद्धावंत लोकांना आपल्या नजरा खाली ठेवण्यास सांगा, तसंच आपल्या शीलांचं रक्षण करा, हे तुमच्या पावित्र्यासाठी आहे. ते जे काही करता अल्लाहस ठाऊक आहे.

३१) श्रद्ध स्त्रियांना सांगा, आपली दृष्टी खाली ठेवा, आपल्या लज्जास्थानाचं रक्षण करा, आणि आपलं रूप आणि अलंकार यांचं प्रदर्शन घडवू नका. पण जे साहजिकच दिसून येते ते सोडून. आपला पदर आपल्या छातीवर घालून ठेवा. आपलं रूप, आपला पती, आपले पिता, आपले सासरे, आपले पुत्र, आपल्या पतीचे पुत्र, आपले भाऊ, आपल्या भावांचे पुत्र, बहिणीची मुले आणि आपल्या स्त्रिया, स्वत:च्या मालकीच्या मुली आणि आपले नोकर-चाकर, ज्यांना शारीरिक गरज नसेल आणि अशी मुले जे अद्याप स्त्रियांच्या गुपितांशी परिचित नाहीत,

यांचा अपवाद वगळता इतरांवर उघड करू नका. आपल्या भूषणांकडं लक्ष जावू नये म्हणून जमिनीवर (पाय) आपटू नका. आणि श्रद्ध लोकहो! तुम्ही सर्वांनी अल्लाहकडं वळा, तुमचा उत्कर्ष घडेल.

३२) तुम्ही विधवा स्त्रीचा विवाह करून द्या. तसंच तुमच्या दास-दासींपैकी जे सद्गुणी असतील त्यांचे विवाह करून द्या. जर ते गरिबीत असतील तर अल्लाह आपल्या औदार्याद्वारे त्यांना स्वावलंबी करेल. कारण अल्लाह उदार आणि सर्वज्ञ आहे.

३३) ज्यांच्याकडं विवाहासाठी साधन-संपत्ती नसेल अशांना अल्लाहनं आपल्या औदार्यातून स्वावलंबी करेपर्यंत स्वत:स नियंत्रित ठेवावं. आणि तुमच्या अंकितांपैकी जर कुणी तुमच्याशी लिखित परवानगी (गुलामीतून मुक्त होण्यास) मागितली आणि जर तुम्हास यामध्ये काही भलं आढळत असेल तर तुम्ही त्यांना तसं लिखित स्वरूपात देऊन टाका. तसंच अल्लाहनं तुम्हांस जी साधनं दिलीत त्यामधून त्यांनाही द्या. आपल्या दासींना जर त्या पवित्र राहू इच्छित असतील तर तुमच्या ऐहिक लाभासाठी त्यांना व्यभिचारास बळी पाडू नका. जर कुणी त्यांना विवश केलं तर त्यांना विवश केलं गेल्यानं अल्लाह त्यांना क्षमा करणारा दयावंत आहे.

३४) आम्ही तुमच्याकडं स्पष्ट अशा आयती (वचनं) पाठवली आहेत आणि तुमच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांची उदाहरणं सदाचारी लोकांना शिकवण म्हणून.

३५) अल्लाह आकाश आणि पृथ्वीचा प्रकाश होय. असा तो प्रकाश जणू कोनाड्यात ठेवलेला एक दिवा. तो दिवा काचेत ठेवलेला, ती काच जणू एक तेजपुंज तारा, पवित्र जैतुनच्या वृक्षाच्या तेलानं पेटवलेला. पौर्वात्यही नाही की पाश्चिमात्यही नाही. त्यास अग्नीचा स्पर्श होवो अगर ना होवो स्वत:च प्रकाशमान, प्रकाशावर प्रकाश. ज्यास इच्छितो अल्लाह त्यास (आपल्या) प्रकाशाकडं मार्गदर्शन करतो. अशी उदाहरणं अल्लाह लोकांसाठी घालून देतो. अल्लाहला तर प्रत्येक बाबीचं ज्ञान आहे.

३६) (हा दिवा) अशा लोकांच्या घरी (असेल) ज्यांना अल्लाहनं उदात्तता बहाल केली आणि त्या (घरांमध्ये) सकाळ- संध्याकाळ त्याच्या नामस्मरणासाठी त्याचा गौरव करत असतात.

३७) असे ते लोक ज्यांना व्यवहार आणि व्यापार अल्लाहच्या स्मरणापासून विचलित करत नाही, ते नमाज कायम करण्यापासून आणि जकात अदा करण्यापासून. त्यांना त्या दिवसाची भीती असते. ज्या दिवशी हृदयं आणि डोळं पांढरे पडतील.

३८) अल्लाहनं त्यांना त्यांच्या कर्मांसाठी भला मोबदला द्यावा आणि आपल्या विपूलतेतून अधिक द्यावा यासाठी. ज्यांना इच्छितो त्यांना अल्लाह अमाप साधनं देतो.

३९) ज्या लोकांनी नाकारलं त्याची कर्मं वाळवंटातील मृगजळाप्रमाणं आहेत. तहानलेला माणूस त्यास पाणी समजतो, पण तिथं पोचल्यास त्याला काहीच आढळत नाही. पण तिथं त्यास त्याच्यासोबत असलेला अल्लाह आढळतो. आणि तो (अल्लाह) त्यास त्याचा हिशेब पुरेपूर चुकता करतो. अल्लाह हिशेब घेण्यास तत्पर आहे.

४०) किंवा (त्यांची गत) अशी जसं खोल समुद्रातील अंधार. वरून एक लाट, तिच्यावर दुसरी लाट, त्यावर ढगांचं आवरण, अंधाराच्या थरावर दुसरा थर. त्यानं आपले हात पुढं केले तर तो दिसणारही नाही. कारण अल्लाहनं ज्यास प्रकाश दिला नाही त्यास प्रकाश नाहीच.

४१) तू पाहिलं नाहीस आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहचाच गौरव करतात. तसंच पंख पसारलेले पक्षीदेखील प्रत्येकास आपली प्रार्थना आणि स्तुतीसूत्रं ठाऊक आहेत आणि ते जे काही करताहेत अल्लाहस ठाऊक आहे.

४२) आकाश आणि पृथ्वीचं अधिराज्य अल्लाहचंच आणि अल्लाहकडंच परतणं आहे.

४३) तुम्हांस दिसत नाही अल्लाह ढगांना (कसं) चालवतो, त्यांना एकत्र करतो, थरावर थर. आणि मग त्यांच्यामधून पाऊस पडतो. आणि

आकाशातून डोंगराप्रत गारा खाली पाठवतो, आपल्या मर्जीनुसार कुणावरही त्याचा मारा करतो, आणि मर्जीनुसार कुणापासून तो दूर सारतो. त्याच्या विजेचं तेज असं जणू डोळ्यांची दृष्टी निघून जाईल.

४४) अल्लाहच रात्र आणि दिवसाची अदलाबदल करतो. ज्यांच्याकंड दृष्टी आहे त्यांना ह्या गोष्टींमध्ये बोधप्रद उदाहरणं आहेत.

४५) अल्लाहनं सर्व प्राणी पाण्यापासून निर्माण केलेत. त्यांच्यामधले काही आपल्या पोटांवर चालतात तर त्यांच्यामधले काही दोन पायांवर चालतात आणि त्याच्यामधले काही चार (पायांवर) चालतात. इच्छेस येईल तसं अल्लाह निर्माण करतो. अल्लाहचं सर्व बाबींवर प्रभुत्व आहे.

४६) आम्ही नक्कीच स्पष्ट आयती (वचनं) पाठवली आहेत मर्जीस येईल त्यास अल्लाह रास्त मार्गाचं दर्शन घडवतो.

४७) ते म्हणतात, आम्ही अल्लाह आणि प्रेषितांवर श्रद्धा ठेवली आणि पालन केलं. मग यानंतर त्यांच्यामधील काहींनी पाठ फिरवली. नाहीत श्रद्धा धारण करणारे ते.

४८) त्यांना त्यांच्यामध्ये निर्णयासाठी अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताकडं बोलविलं जात असता त्यांच्यातील एक गट कसा तोंड फिरवतो.

४९) जर सत्य त्यांच्यापाशी असते तर ते आनंदानं त्यांच्याकडं (अल्लाहकडं) आले असते.

५०) त्यांच्या हृदयांना रोग जडलाय की त्यांना काही संभ्रम आहे अथवा त्यांना भीती आहे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताकडून कसला अन्याय घडण्याची? नव्हे (उलट) तेच अपराधी आहेत.

५१) श्रद्ध लोकांचं वर्तन असं की जेव्हा त्यांच्यामध्ये काही निर्णय लावण्यास त्यांना अल्लाह आणि प्रेषिताकडं बोलवलं जातं तेव्हा ते म्हणतात, हो, आम्ही ऐकलं आणि पालन केलं. असेच लोक उत्कर्ष पावणारे आहेत.

५२) आणि जे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचं पालन करतात अल्लाहस

भितात आणि सदाचार अवलंबतात तेच सार्थकी ठरणार आहेत.

५३) त्यांनी जोरजोरात अल्लाहच्या शपथा वाहिल्या, त्यांना जर तुम्ही आदेश दिले तर ते (जिहादसाठी) पुढं येतील. त्यांना सांगा, शपथा वाहू नका. तुमचं आज्ञापालन हवं आहे. तुम्ही जे काही करता ते अल्लाहला ठाऊक आहे.

५४) त्यांना सांगा, अल्लाहचं पालन करा आणि प्रेषितांचं पालन करा, पण जर तुम्ही मागं फिरलात तर त्याच्यावर जो भार टाकला गेला त्यास ते (जबाबदार) आणि तुमच्यावर जो भार टाकला गेला त्यास तुम्हीच (जबाबदार). तुम्ही जर त्यांचं पालन केलं तर तुमचं मार्गदर्शन होईल आणि प्रेषितांची जबाबदारी तर केवळ स्पष्टपणे पोचवण्याचीच तेवढी.

५५) तुमच्यापैकी ज्यांनी श्रद्धा बाळगून सत्कर्म केलीत त्यांना अल्लाहनं वचन दिलंय या धरतीवर त्यांना उत्तराधिकारी म्हणून नेमण्याचं. जसं त्यांच्या पूर्वीच्या लोकांना उत्तराधिकारी नेमलं होतं, तसंच त्यांच्या धर्मास ज्याला अल्लाहनं पसंत केलंय त्यास शक्तिशाली करील आणि त्यांना प्राप्त परिस्थितीतील भीतीच्या अवस्थेला शांततेत परिवर्तीत करील. ते माझीच आराधना करणार. मला कुणी भागीदार जोडणार नाहीत. पण यानंतर जे कृतघ्न होतील ते अवज्ञा करणारे ठरतील.

५६) तेव्हा नमाज कायम करा, जकात अदा करा आणि प्रेषितांचं पालन करा, म्हणजे तुम्हांस दया लाभेल.

५७) बंड माजविणारे लोक धरतीवर विवश करणार असा तुम्ही कयास लावू नका. नरकाग्नी त्यांचं ठिकाण आहे. वाईट असं ते ठिकाण.

५८) श्रद्ध लोकहो! तुमचे जे नोकर-चाकर आहेत आणि जी वयात न आलेली मुलं आहेत त्यांनी तीन वेळा तुमची परवानगी घ्यावी. पहाटेच्या नमाजआधी आणि दुपारच्या वेळी जेव्हा तुम्ही वस्त्रं उतरवता आणि (रात्रीच्या) इशाच्या नमाजनंतर. ह्या तीन तुमच्या पडद्याच्या वेळा आहेत. यानंतर त्यांना आणि तुम्हांस एकमेकांकडं ये-जा करण्यात काही गैर नाही. अशा रितीनं अल्लाह आपली वचनं (आयती) तुमच्यासाठी

स्पष्ट करून देतो. कारण तो सर्वज्ञ आणि विद्वत्ताप्रचुर आहे.

५९) आणि तुमची मुलं वयात आल्यानंतर जसं त्यांच्या आधीचे ज्येष्ठ लोक करत असत तशी त्यांनी परवानगी घ्यावी. अशा रितीनं अल्लाह आपल्या आयती (वचनं) स्पष्ट करून देतो. कारण तो सर्वज्ञ आणि प्रतिभासंपन्न आहे.

६०) वृद्ध स्त्रिया ज्यांना विवाहाची अपेक्षा नसेल त्यांनी जर आपली बाह्य वस्त्रं उतरवून ठेवली, पण आपल्या रूपाचं प्रदर्शन करत नसतील तर यात काही गैर नाही, पण जर त्या त्यापासूनही दूर राहिल्या तर हे त्यांच्यासाठी उत्तमच. अल्लाह ऐकतो आणि जाणतो.

६१) कुणी अंध किंवा लंगडे आणि आजारी असल्यास काही हरकत नाही. तसंच तुम्ही आपल्या घरातून खा किंवा आपल्या आई-बापांच्या घरी खा, आपल्या भावांच्या घरी खा, आपल्या बहिणींच्या घरी, आपल्या काकांच्या घरी खा अथवा आपल्या आत्यांच्या घरी खा, आपल्या मामांच्या घरी, आपल्या मावश्यांच्या घरी किंवा त्या घरी ज्याच्या किल्ल्या तुमच्या ताब्यात आहेत किंवा आपल्या मित्रांच्या घरी खाण्यास काही हरकत नाही. तसंच तुम्ही एकत्र बसून खा अथवा वेगवेगळं भोजन घेतलं तरी त्यामध्ये काही दोष नाही. तुम्ही घरात प्रवेश करताना एकमेकास सलाम (अभिवादन) करा. अल्लाहकडून शुभेच्छा द्या समृद्धीच्या आणि पावित्र्याच्या. अशा प्रकारे अल्लाह आयती स्पष्ट करतो. तुम्हास समजता यावं म्हणून.

६२) जे अल्लाह आणि त्याच्या प्रेषितावर श्रद्धा ठेवतात ते श्रद्धावंत आहेत आणि जेव्हा ते काही प्रकरणांबाबत एकत्र येतात (आपल्या प्रेषितापाशी) सामूहिक कारणास्तव तेव्हा जोवर जाण्यास परवानगी घेत नाही ते तिथून उठून जात नसतात. आणि जे लोक तुमची परवानगी मागतात (प्रेषितांची) हेच लोक अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी एकनिष्ठ असतात. तेव्हा त्यांच्यापैकी जर कुणी काही कामासाठी परवानगी मागितली, स्वत:च्या काही कामासाठी तर तुमची इच्छा असेल त्यास परवानगी द्या. आणि त्याच्यासाठी अल्लाहपाशी क्षमायाचना करा.

अल्लाह क्षमा करतो. तो कृपावंत आहे.

६३) तुम्ही जसं एकमेकांना बोलविता त्याप्रमाणं प्रेषितांना बोलवू नका. कोण काही निमित्त करून. मुकाट्यानं निसटून जातो ते अल्लाहस ठाऊक असते. जे लोक त्याच्या आज्ञेविरूद्ध जातात त्यांनी दक्ष राहावं. त्याच्यावर एखादे संकट कोसळेल अथवा त्यांना दु:खद शिक्षा मिळेल.

६४) ऐकून घ्या. आकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही अल्लाहच्याच मालकीचं आहे. तुमची स्थिती कशी आहे ते अल्लाहला माहीत आहे. ज्या दिवशी ते त्याच्याकडं परतवले जातील, तेव्हा त्यांनी काय काय केलंय ते त्यांना दाखवण्यात येईल. अल्लाहस प्रत्येक बाबीचं ज्ञान आहे.

-------

# २५. सूरह अल फुरकान

**मक्काकालीन, आयती ७७**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) तो (अल्लाह) संपन्न आहे तो ज्यानं ही कसोटी (फुरकान- चांगल्या आणि वाईट गोष्टींमध्ये फरक घडवून आणणारा) आपल्या भक्तांवर (प्रेषितांवर) अवतरली, तो सकल जगाला ताकीद द्यावी यासाठी.

२) तोच आकाश आणि पृथ्वीवर ज्याचं अधिराज्य आहे. त्यानं कुणास पुत्र बनवलं नाही की त्याच्या अधिराज्यात कोणी त्याचा भागीदार आहे. त्यानंच सर्वकाही निर्माण केलंय आणि त्यांना प्रमाण घालून दिलं.

३) तरी त्यांनी त्यास सोडून इतर उपास्य (देव) बनवले जे काहीही निर्माण करू शकत नाहीत ते स्वत:च निर्माण केले गेलेत. त्यांना स्वत:स काही इजा पोचवण्याची अगर काही भलं करून घेण्याचा त्यांना काही अधिकार नाही. तसंच त्यांना मरण अथवा जीवन किंवा पुनरुज्जीवनाचाही काही अधिकार नाही.

४) नाकारणारे म्हणतात, हे काही नाही खोटं आहे त्यांनी घडलेलं आणि इतरांनी त्यामध्ये त्याची मदत केलीय. हा मोठा अत्याचार आहे आणि खोटेपणावर हे उठलेत.

५) ते म्हणतात, हे पूर्वीच्या लोकांचं कथानक आहे त्यांनी लिहून काढलेलं. जे त्यांना सकाळ-संध्याकाळ ऐकविलं जातं.

६) त्यांना सांगा, पृथ्वी आणि आकाशांची गुपितं ज्यास माहीत आहेत त्यानं हे (कुरआन) अवतरलंय. तो क्षमाशील आणि दयावंत आहे.

७) ते म्हणतात, कसला हा प्रेषित! अन्न खातो आणि बाजारहाटमध्ये हिंडतो फिरतो. त्याच्याबरोबर एखादा देवदूत का बरं पाठवण्यात आला नाही, तो त्याच्या बरोबरीनं सावध करण्यासाठी.

८) किंवा त्याच्यासाठी एखादा खजिना असता अगर एखादी बाग असती

खाण्यासाठी. आणि ते अपराधी म्हणाले, तुम्ही तर एका झपाटलेल्या माणसाच्या मागं लागला आहात.

९) पाहा तर ते तुम्हांस कशी उदाहरणं योजतात. ते बहकलेत. त्यांना कोणता मार्ग सापडत नाही.

१०) फार संपन्न आहे तो त्याची इच्छा असती तर त्यानं तुमच्यासाठी याहून अधिक उत्तम बागा देऊ केल्या असत्या ज्यांच्या खालून नद्या वाहतात. आणि तुझ्यासाठी महाल उभा केला असता.

११) पण त्यांनी कयामतची घटिका नाकारली, पण जे त्या घटिकेला नाकारतात त्यांच्यासाठी आम्ही नरक तयार ठेवलाय.

१२) ती (नरक) जेव्हा त्यांना दूरवरून पाहील तेव्हा तिचा क्रोध आणि तीव्रता त्यांना ऐकू येईल.

१३) आणि जेव्हा त्यांना नरकाच्या एखाद्या आखुड जागेत एकत्रित बांधून टाकलं जाईल तेव्हा ते आपल्या मरणाला हाक मारतील.

१४) त्यांना म्हटलं जाईल आज एका मरणाला हाक देऊ नका तर तुम्ही अनेक मरणांचा धावा करा.

१५) विचारा त्यांना हे उत्तम की सदाचारींना दिलेलं अनंतकालीन स्वर्गाचं वचन? तो त्यांचा मोबदला असून परतीचं ठिकाण आहे.

१६) ते सदैव तिथं राहतील आणि वाटेल ते त्यांच्यासाठी तिथं उपलब्ध असेल. तुझ्या विधात्याचं हे वचन आहे पाळण्याजोगं.

१७) ज्या दिवशी त्यांना आणि ज्यांची ती अल्लाहला सोडून भक्ती करत असत त्यांना एकत्रित विचारलं जाईल. तुम्ही माझ्या भक्तांना मार्गभ्रष्ट केलं की ते स्वत: वाट चुकून गेलेत?

१८) ते उत्तर देतील, धन्य आहेस तू. आमची काय धडगत तुला सोडून इतरांना आपला वाली बनवण्याची. पण तूच त्यांना आणि त्यांच्या पूर्वजांना सुबत्ता बहाल केलीस. आणि ते तुझी शिकवण विसरून गेले ते नाश पावणारे लोक होते.

१९) तुम्ही जे म्हणत होता ते त्यांनी खोटं ठरवलं. आता तुम्ही ती शिक्षा परतवू शकत नाही की कसली मदत तुम्हांस लाभणार. आणि तुम्हांपैकी जो कुणी अत्याचार माजवील आम्ही त्यास मोठ्या शिक्षेचा उपभोग देऊ.

२०) आम्ही तुमच्या आधी ज्यांना प्रेषित करून पाठवलं होतं तेदेखील अन्न खात असत आणि बाजारांमध्ये हिंडत फिरत असत. आणि आम्ही तुमच्यापैकी काहींना दुसऱ्या लोकांसाठी कसोटी बनवली तेव्हा तुम्ही धैर्य दाखवाल? तुमचा विधाता हे पाहणारा आहे.

**पारा - १९**

२१) आणि ज्या लोकांना आमच्या भेटीची अपेक्षा नाही ते म्हणतात, आमच्यासाठी एखादा दूत का पाठवला नाही? किंवा आम्ही आमच्या विधात्यास पाहिलं असतं. त्यांनी स्वत:बद्दल मोठा अहंकार बाळगला आणि अफाट वृत्ती अंगीकारली.

२२) पण ज्या दिवशी ते दूतांना समक्ष पाहतील त्या अपराधींना तो शुभदिन नसेल. आणि म्हणतील, आमच्या दरम्यान एखादा अडथळा असावा.

२३) आम्ही जेव्हा त्यांच्या कृत्यांकडं लक्ष देऊ तेव्हा आम्ही त्यांची धुळदाण करून टाकू.

२४) त्या दिवशी स्वर्गाचे जे धनी असतील त्यांचे निवास उत्तम आणि आरामदायक असतील.

२५) ज्या दिवशी आकाश ढगांनी फाटलं जाईल आणि मोठ्या संख्येनं देवदूत खाली उतरतील

२६) त्या दिवशी अधिराज्य खऱ्या अर्थानं त्या नितांत कृपावंताचंच असेल आणि तो दिवस नाकारणाऱ्यांसाठी अडचणीचा ठरेल.

२७) त्या दिवशी अपराधी आपल्या हातांचा चावा घेत राहतील आणि म्हणतील, जर का मी प्रेषितांबरोबर सरळ वाट धरली असती!

२८) माझं नशीब, धिक्कार असो मी त्या अमुकास मित्र केलं नसतं.

२९) माझ्याकडं ती शिकवण आली असतादेखील त्यानं माझी दिशाभूल केली. सैतान तर मानवाला ऐनवेळी एकाकी सोडून जाणाराच आहे.

३०) प्रेषित म्हणतील, माझ्या विधाता! माझ्या लोकांनी तर या कुरआनाला सोडून दिलेलं आहे.

३१) अशाच प्रकारे आम्ही प्रत्येक प्रेषितास पापी लोकांमधून शत्रू बनवले. पण तुमचा विधाता तुमच्या मार्गदर्शनासाठी आणि मदतीस पुरेसा आहे.

३२) नाकारणारे लोक म्हणाले, का बरं संपूर्ण कुरआन एकदाच पाठवण्यात आलं नाही? कारण असं की आम्हाला याद्वारे तुमची मनं बळकट करायची होती म्हणून आम्ही ते क्रमाक्रमानं वाचून दाखवलं.

३३) आणि हे लोक तुमच्याकडं असा कसला नवा प्रश्न विचारत नसतात (पण), आम्ही खरं उत्तर आणि उत्तम स्पष्टीकरण करून देतो.

३४) ज्यांचं तोंड नरकाग्नीच्या दिशेनं करून त्यांना एकवटलं जाईल, त्यांची अवस्था (वाईट) आहे आणि ते आपल्या मार्गास मुकले आहेत.

३५) आम्ही मूसा यांना ग्रंथ दिला. त्यांचे भाऊ हारुन यांना त्यांचा सहाय्यक बनवलं.

३६) आणि म्हणालो, तुम्ही त्या लोकांकडं जा ज्यांनी आमच्या आयतींना (वचनांना) खोटं ठरवलं आणि म्हणून आम्ही त्यांना अत्यंत वाईट रितीनं उद्ध्वस्त करून टाकलं.

३७) आणि नूहच्या लोकांनी जेव्हा प्रेषितांना खोटं ठरवलं, आम्ही त्यांना बुडवून टाकलं आणि त्यांना लोकांसाठी (उद्बोधक) संकेत बनवले. आम्ही पापी लोकांसाठी यातनादायक शिक्षा योजून ठेवलीय.

३८) तसंच आद आणि समूद आणि 'अर्रस'चे (अर्रस- यमामामधील एक गाव. ज्या लोकांनी आपल्या त्या काळच्या प्रेषितांना विहिरीत लटकवून ठार केलं होतं.) निवासी आणि त्यांच्यामधील अनेक लोकसमूह....

३९) आम्ही प्रत्येकास उदाहरणं दिली (समजण्यासाठी, पण त्यांनी धडा घेतला नाही). मग सर्वांचा नाश करून टाकला.

४०) ज्या वस्तीवर आम्ही दगडांचा अत्यंत वाईट मारा केला होता ती वस्ती त्यांनी पाहिली आहे. तेव्हा त्यांना काही दिसत नाही? पण नव्हे त्यांना विश्वास नाही परत उठवलं जाण्याचा.

४१) तुम्हांस पाहिल्यावर ते तुमची चेष्टा करतात (नि म्हणतात), हाच का तो अल्लाहनं प्रेषित करून पाठवलेला!

४२) आम्ही जर त्याच्याशी ठाम राहिलो नसतो, त्यानं आम्हांस आमच्या उपास्यांविरूद्ध (देवांविरूद्ध) नक्कीच भलतीकडं नेलं असतं. पण त्यांना लवकरच कळून चुकेल शिक्षा दिसून आल्यावर कोण मार्गभ्रष्ट झालाय ते.

४३) तुम्ही पाहिलं आपल्या वासनांना ज्यांनी देव बनवलं. तुम्ही त्यांचं संरक्षक होणार का?

४४) किंवा त्यांच्यापैकी पुष्कळसे लोक ऐकतात आणि त्यांना समजतं, अशी तुमची कल्पना आहे? नव्हे ते जनावरांसारखे आहेत. अत्यंत वाईट रितीनं वाट चुकलेत.

४५) तुझ्या विधात्याकडं पाहत नाही त्यानं सावली कशी लांबवली. त्याची इच्छा असती तर ती स्थिर राहिली असती. मग सूर्यास आम्ही तिथं दिशा निर्देशक केले.

४६) मग आम्ही तिला टप्प्याटप्प्यांनी आपल्याकडं आवळून घेतलं.

४७) तोच ज्यानं रात्रीस तुमच्यासाठी पांघरूण बनवलं, झोपेला विश्रांती बनवली आणि दिवसास परत उठवून (उभं राहण्याची) वेळ बनवली.

४८) आणि त्यानंच आपल्या दयेची खूशखबर देण्यास वारा पाठवला आणि मग आकाशातून विशुद्ध पाऊस वर्षविला

४९) मृत असलेल्या शहरांना सजीव करण्यासाठी आणि आम्ही जे असंख्य पशु व मानव निर्माण केलेत त्यांची तहान भागविण्यासाठी.

५०) आम्ही त्यांच्यामध्ये त्याची वाटणी केली त्यांनी बोध घ्यावा म्हणून. पण अनेकांनी ते स्वीकारलं नाही ते कृतघ्न आहेत.

५१) आमची इच्छा असती तर प्रत्येक वस्तीत एक ताकीद देणारा पाठवला असता.

५२) तुम्ही नाकारणाऱ्यांचं ऐकू नका. त्यांच्याविरूद्ध या (कुरआन) द्वारे तीव्र संघर्ष करा.

५३) तोच आहे ज्यानं दोन प्रवाहांना (समुद्रातील) एकमेकांशी मिळवलं. एक गोड व चवदार तर दुसरा कडवट व खारट. त्या दोघांच्या मधोमध एक पडदा आहे.

५४) त्यानंच पाण्यापासून मनुष्यास निर्माण केलं आणि मग वंश व सासरची नातीगोती बनवलीत. तुझा विधाता सामर्थ्य बाळगतो.

५५) (तरीदेखील) ते अल्लाहस सोडून अशांची भक्ती करतात जे त्यांचं भलंही करू शकत नाहीत की काही इजादेखील पोचवू शकत नाहीत. आणि बंडखोर नेहमीच आपल्या विधात्याविरूद्धचा पक्ष घेत असतो.

५६) आम्ही तुम्हांस (प्रेषितांना) सुवृत्त देणारा तसंच ताकीद देणारा म्हणून पाठवलंय.

५७) त्यांना सांगा, मी या कामासाठी तुमच्याकडून कसला मोबदला मागत नाही, पण इच्छा असेल तर प्रत्येकानं आपल्या विधात्याचा मार्ग स्वीकारावा.

५८) जो स्वयंभू सदैव जीवंत असून ज्यास कधीच मरण नाही, त्यावर विश्वास ठेवा, त्याच्या पावित्र्याचं गुणगान करा. तो आपल्या भक्तांच्या पापांची माहिती ठेवण्यास सक्षम आहे.

५९) तोच आहे ज्यानं अवकाश आणि पृथ्वी आणि त्यामध्ये जे काही आहे सहा दिवसांत निर्माण केलं. मग सिंहासनावर विराजमान झाला. तो परम कृपावंत आहे, कुणीही जाणकारास त्याच्याविषयी विचारा.

६०) त्यांना परम कृपावंतापुढं नतमस्तक होण्यास सांगितल्यावर ते विचारतात, कोण तो परम कृपावंत? तू म्हणशील त्याच्यापुढं आम्ही नतमस्तक व्हावं? यामुळं ते अधिकच विचलित झाले.

६१) धन्य तो ज्यानं आकाशात राशी बनवल्या आणि त्यामध्ये दिवा (सूर्य) आणि चंद्रप्रकाश बनवला.

६२) आणि त्यानंच रात्र आणि दिवसास एकमेकांच्या पाठोपाठ येण्यास भाग पाडलं. ज्याची बोध घेण्याची तसंच आभार मानण्याची इच्छा असेल त्याच्यासाठी.

६३) जे परम कृपावंताची आराधना करणारे आहेत ते धरतीवर नम्रतेनं वावरतात आणि अज्ञानी लोक वाद घातल्यास त्यांना सांगतात, तुम्हांस सलाम.

६४) आणि आपल्या विधात्यापुढं नतमस्तक होत रात्रभर उभं राहतात.

६५) नि म्हणतात, आमच्या विधाता! आम्हांपासून नरकाची शिक्षा दूर कर. तिची शिक्षा खरंच अंमलात येणार आहे.

६६) निश्चितच ते वाईट स्थान आणि ठिकाण आहे.

६७) जे लोक खर्च करतात, उधळपट्टी करत नाहीत अथवा कंजूसी करीत नाहीत ते संतुलन कायम राखतात.

६८) आणि ते लोक अल्लाहच्या बरोबरीनं दुसऱ्या उपास्यांचा (देवांचा) धावा करत नसतात आणि वैध कारणाशिवाय अल्लाहनं निषिद्ध ठरवलेल्या जिवाची हत्या करत नाहीत. व्यभिचार करत नाहीत आणि जो असं काही करील त्यास शिक्षा भोगावी लागेल.

६९) कयामतच्या दिवशी त्यास दुप्पट शिक्षा होईल आणि तो नेहमी अपमानित होऊन राहील.

७०) पण ज्यानं पश्चात्ताप व्यक्त केला, श्रद्धा धारण केली आणि भली कर्मं केलीत, अल्लाह त्यांच्या दुष्कृत्यांना भल्या कर्मांनी बदलेल, कारण अल्लाह क्षमाशील आणि दया दाखवणारा आहे.

७१) ज्यानं पश्चात्ताप व्यक्त केला आणि भली कर्मं केलीत तो खऱ्या अर्थानं अल्लाहकडं वळून येतो.

७२) ते लोक खोटी साक्ष देत नसतात आणि वायफळ गोष्टींजवळून जाणं भाग पडल्यास सज्जनांप्रमाणं निघून जातात.

७३) आणि अशा लोकांना त्यांच्या विधात्याची शिकवण लक्षात आणून दिल्यास ते अंध आणि बहिऱ्याप्रमाणं वागत नाहीत.

७४) आणि असे लोक प्रार्थना करतात, आमच्या विधाता! आम्हांस अशा पत्नी आणि मुलं दे ज्यांच्यामुळं आम्हांस नेत्रसुख लाभावं आणि आम्हांस सदाचारी लोकांमध्ये अग्रेसर बनव.

७५) हेच ते लोक ज्यांनी धैर्य दाखवलं म्हणून त्याच्या मोबदल्यात त्यांना (स्वर्गात) उच्चतम स्थान दिलं जाईल आणि तिथं त्यांचं स्वागत शुभेच्छा आणि 'सलाम' म्हणून केलं जाईल.

७६) तिथं ते सदैव राहतील. किती उत्तम हे स्थान आणि ठिकाण.

७७) त्यांना सांगा, तुम्ही त्याचा धावा केला नाही तरी माझ्या विधात्यास त्याची पर्वा नाही. तुम्ही खोटं ठरवलं म्हणून लवकरच (शिक्षा) अनिवार्य होईल.

-------

# २६. सूरह अश्शुअरा

## मक्काकालीन, आयती २२७

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) ता सीन मीम.

२) या एका स्पष्ट ग्रंथाच्या आयती (वचनं) आहेत.

३) ते लोक श्रद्धा धारण करत नाहीत म्हणून तुम्ही स्वतःचा जीव गमावून बसाल?

४) वाटल्यास आम्ही त्यांच्यासाठी आकाशातून एखादा संकेत पाठवू आणि मग त्याच्यापुढं त्यांच्या माना वाकतील.

५) त्या परम कृपावंताकडून त्यांच्याकडं जेव्हा केव्हा नवीन शिकवण येते पण ते तिच्यापासून दूर वळतात.

६) त्यांनी खोटं ठरवलं आणि ज्या (गोष्टींची) ते चेष्टा करत, लवकरच त्याची वस्तुस्थिती त्यांना कळून चुकेल.

७) ते धरतीकडं पाहत नाहीत, आम्ही कितीतरी प्रकारच्या उमद्या वनस्पती जोडीने उगवल्या.

८) खरंच यामध्ये संकेत आहेत, पण बहुतेक लोक हे मान्य करत नाहीत.

९) निश्चितच तुझा विधाता प्रभुत्वशाली आणि कृपावंत आहे.

१०) जेव्हा तुमच्या विधात्यानं मूसाला अत्याचारी लोकांकडं जाण्यास हाक दिली

११) फिरऔनच्या लोकांपाशी ते (मला) भीत नाहीत काय?

१२) (मूसा) म्हणाले, माझ्या विधाता! मला भीती वाटते, ते (मला) खोटं म्हणतील.

१३) माझ्या हृदयावर दडपण येतं. बोलताना अडखळतो. माझ्या भावास

हारूनलाही पाठव.

१४) त्यांनी माझ्यावर आरोपही ठेवलाय. ते मला ठार मारतील म्हणून मी भितो.

१५) (अल्लाह) म्हणाला, मुळीच नाही. जा, तुम्ही दोघं माझ्या संकेतांसह. मी तुमच्या पाठीशी आहे ऐकायला.

१६) तुम्ही दोघं जा फिरऔनकडं नि सांगा, आम्ही सकल जगाच्या विधात्याकडून पाठवले गेले (प्रेषित) आहोत

१७) तू इस्राईलच्या संततीस आमच्याबरोबर पाठवून द्यावं म्हणून.

१८) (फिरऔन) म्हणाला, तुझ्या लहानपणी आम्ही आमच्यात तुला सांभाळलं नाही? आपल्या आयुष्याची कितीतरी वर्षे तू आमच्यात घालवलीस.

१९) तू जे केलंस? असं काही काम केलंस (किब्ती लोकांपैकी एका माणसाची हत्या), तू तर कृतघ्न आहेस.

२०) मूसा म्हणाले, हो मी केलं ते. पण त्यावेळी मला कळत नव्हतं.

२१) तुझ्या भीतीमुळं मी निघून गेलो. माझ्या विधात्यानं मग मला विवेक दिला, मला प्रेषित बनवलं.

२२) आणि तू कशाचा उपकार केल्याचं सांगतो, इस्राईलच्या संततीस गुलाम बनवलं ते?

२३) फिरऔननं विचारलं, सकल जगाचा विधाता म्हणजे काय?

२४) मूसा (अ.) यांनी उत्तर दिलं, अवकाश आणि पृथ्वीचा आणि त्यामध्ये जे काही आहे त्या सर्वांचा विधाता. जर तुझा विश्वास बसत असेल तर.

२५) त्यानं (फिरऔननं) सभोवार असलेल्यांना म्हटलं, ''तुम्ही ऐकलं नाही?''

२६) मूसा (अ.) म्हणाले, ''तोच तुमचा विधाता तुमच्या वाडवडिलांचा

विधाता नि पूर्वजांचा.''

२७) फिरऔन म्हणाला, ''तुमचा प्रेषित जो तुमच्याकडं पाठवला गेलाय, खरंच वेडसर माणूस आहे.''

२८) मूसा (अ.) म्हणाले, पण जर तुला काही अक्कल असेल तर, तोच पूर्वेचा विधाता आणि पश्चिमेचादेखील विधाता. आणि यामध्ये जे काही आहे सर्वांचा (विधाता).

२९) (फिरऔन) म्हणाला, जर माझ्याव्यतिरिक्त तू दुसऱ्यास देव मानलं असशील तर मी तुला तुरुंगात टाकीन.

३०) (मूसा अ.) म्हणाले, मी जर स्पष्ट असं काही आणलं तरी?

३१) (फिरऔन) म्हणाला, बरं दाखवं, जर तुम्ही खरं असाल तर.

३२) मूसा (अ.) यांनी आपली काठी खाली टाकताच ती अजगर बनली.

३३) त्यांनी आपला हात बाहेर काढला, तेव्हा तो पाहणाऱ्यांना चमकत असलेला दिसू लागला.

३४) फिरऔननं आपल्या सभोवारच्या सरदारांना सांगितलं, हा तर पट्टीचा जादूगार आहे.

३५) त्याची तर तुम्हांस आपल्या जादूनं या भूमीतून घालवून देण्याची योजना आहे. तेव्हा तुमचं काय म्हणणं आहे?

३६) ते (सरदार) म्हणाले, त्यास आणि त्याच्या भावास उसंत दे आणि गावोगावी दवंडी देणारे पाठवू दे.

३७) आणि सर्व वाकबगार जादूगारांना तुझ्याकडं घेऊन येऊ दे.

३८) तेव्हा एका ठराविक वेळी सारेच्या सारे जादूगार जमा झाले.

३९) लोकांना हाक दिली, ''तुम्ही जमलात काय!''

४०) जर ते जादूगार श्रेष्ठ ठरले तर आम्ही त्यांचं पालन करू.

४१) जेव्हा ते सर्व जादूगार जमले, त्यांनी फिरऔनला विचारलं, जर आम्ही

जिंकलो तर आम्हांस काही बक्षीस मिळेल ना नक्कीच.

४२) फिरऔन म्हणाला, होय! आणि तसंच तुम्ही माझी जवळची मंडळी असणार.

४३) आता मूसा म्हणाले, मग फेका आता तुम्हांस काय फेकायचंय ते.

४४) त्यांनी आपल्या दोऱ्या आणि काठ्या खाली फेकल्या आणि म्हणू लागले, फिरऔनच्या धाकानं आम्हीच जिंकू.

४५) मग जेव्हा मूसा यांनी आपली काठी टाकली त्यांनी रचलेलं सर्व काही गिळून टाकलं.

४६) लगेच सारे जादूगार खाली पडून नतमस्तक झाले,

४७) नि म्हणू लागले, आम्ही सकल जगताच्या विधात्यावर श्रद्धा ठेवतो,

४८) मूसा (अ.) आणि हारून (अ.) यांच्या विधात्यावर.

४९) फिरऔन म्हणाला, मी तुम्हांस परवानगी द्यायच्या आधीच तुम्ही (त्यास) मानलं? निश्चितच तो तुमचा गुरू असेल. तुम्हाला त्यानं जादू शिकवली. लवकरच तुम्हांस कळून येईल. मी तुमचं हात आणि पाय विरूदध दिशेनं कापून टाकीन आणि तुम्हा सर्वांना फासावर लटकवीन.

५०) ते म्हणाले, काही हरकत नाही. आम्ही निश्चितच आमच्या विधात्याकडं परत जाऊ.

५१) आमचा विधाता आमच्या चुकांना क्षमा करो हीच आमची इच्छा. आम्ही श्रद्धा बाळगणाऱ्यांमध्ये अग्रेसर असू.

५२) मग आम्ही (अल्लाहनं) मूसा यांना कळवलं, तुम्ही रातोरात माझ्या भक्तांना घेऊन निघा. तुमचा पाठलाग केला जाईल.

५३) फिरऔननं इतर शहरांमध्ये आपले दूत पाठवून दिले.

५४) (म्हणाला,) हे लोक निश्चितच लहानसा गट आहे,

५५) तरीदेखील त्यांनी आम्हांस भडकवलंय,

५६) आणि आपण तर जमावानं मोठं आणि दक्ष आहोत.

५७) मग आम्ही (अल्लाहनं) त्यांना बागांमधून, झऱ्यांमधून,

५८) आणि खजिन्यांमधून आणि एका मोठ्या (राज्यातून) हाकलून दिलं.

५९) हे असं घडलं. आम्ही इस्राईलच्या लोकांना त्यांचे वारस बनवलं.

६०) मग सूर्य उजाडता त्यांचा (इस्राईलच्या लोकांचा) पाठलाग सुरू झाला.

६१) जेव्हा दोन्ही गट समोरासमोर आले तेव्हा मूसा (अ.) यांचे लोक म्हणाले, शेवटी आम्ही धरलो गेलो.

६२) (मूसा) म्हणाले, मुळीच नाही. माझा विधाता माझ्या पाठीशी आहे. लवकरच तो मला मार्ग सुचवंल.

६३) आम्ही मूसा यांना अनुभूतीद्वारे कळवलं, आपली काठी समुद्रावर आपट आणि लगेच तो समुद्र दुभंगला आणि दोन्ही भाग विलग होऊन मोठ्या पर्वतांसारखे उभे राहिले.

६४) आणि दुसऱ्यांना (फिरऔनच्या ताफ्याला) आम्ही त्या जागी आणलं.

६५) आणि मूसा आणि जे (लोक) त्यांच्याबरोबर होते त्या सर्वांना वाचवलं.

६६) (त्या) दुसऱ्यांना आम्ही बुडवून टाकलं.

६७) निश्चितच या (घटने)मध्ये संकेत आहेत. पण त्यांच्यातले बहुतेक मान्य करत नाहीत.

६८) तुमचा विधाता तर निश्चितच प्रभुत्वशाली आणि मोठा कृपावंत आहे.

६९) त्यांना इब्राहीम यांची कथा ऐकवा.

७०) जेव्हा त्यांनी आपल्या बापास आणि आपल्या लोकांस विचारलं, तुम्ही कुणाची भक्ती करता?

७१) त्यांनी उत्तर दिलं, आम्ही मूर्तींची पूजा करतो, त्यांच्यासमोर एकाग्र बसतो.

७२) (इब्राहीम) यांनी विचारलं, तुम्ही त्यांना हाक देता तेव्हा ते प्रतिसाद देतात?

७३) किंवा तुम्हांस काही लाभ घडवतात त्या अथवा काही हानी पोचवतात?

७४) त्यांनी उत्तर दिलं, आम्ही तर आपल्या पूर्वजांना असंच करताना पाहिलंय.

७५) (इब्राहीम) म्हणाले, तुम्ही कधी विचार केलाय, तुम्ही कुणाची भक्ती करत होता?

७६) आणि पूर्वी तुमचे पूर्वजदेखील?

७७) ते तर माझं शत्रू आहेत. पण सकल विश्वांचा विधात्याची (आराधना करतो)

७८) त्यानंच मला जन्माला घातलं आणि तोच मला मार्गदर्शन करतो.

७९) तोच माझ्या अन्नपाण्याची तजवीज करतो.

८०) मी आजारी पडल्यास मला बरं करतो.

८१) तो मला मरण देईल, पुन्हा मला जीवंत करील.

८२) आणि मी आशा बाळगतो, तोच मला माझ्या चुकांबद्दल निर्णयाच्या दिवशी क्षमा करील.

८३) माझ्या विधाता! तू मला उदारहस्ते समज दे आणि नेक लोकांशी जोड.

८४) आणि नंतरच्या लोकांनी माझा सन्मानानं उल्लेख करू दे.

८५) आणि मला सर्वसंपन्न स्वर्गाचा वारस बनव.

८६) माझ्या पित्यास क्षमा कर. तो मार्गभ्रष्टांपैकी होऊन गेलाय.

८७) ज्या दिवशी सर्वांना उठवलं जाईल तेव्हा तू मला अपमानित करू नकोस

८८) त्या दिवशी मुलंबाळं आणि श्रीमंती काही कामी येणार नाही

८९) जी व्यक्ती निर्मळ अंत:करणानं अल्लाहसमक्ष हजर होईल त्यास वगळून.

९०) सदाचारी लोकांजवळ स्वर्ग आणले जातील.

९१) मार्गभ्रष्टांपुढं नरकाग्नी आणला जाईल.

९२) त्यांना विचारा तुम्ही ज्यांची भक्ती करत होता ते कुठं आहेत?

९३) अल्लाहला सोडून, आता ते तुम्हाला मदत करू शकता? की स्वत:ला तरी मदत करून घेतील.

९४) ते मार्गभ्रष्ट तिच्यात ते तोंडघशी ढकलले जातील.

९५) तसंच सैतानांची फौज, सारेच्या सारे.

९६) ते तिच्यामध्ये (नरकात) आपसांत भांडताना म्हणतील,

९७) अल्लाहची शपथ! आम्ही उघड उघड मार्गभ्रष्ट होतो,

९८) ज्या वेळी आम्ही तुमची सकल जगतांच्या विधात्याशी तुलना करीत असत

९९) आम्हास ह्याच अपराधी लोकांनी मार्गभ्रष्टतेत टाकलं.

१००) आता आमच्यामध्ये कोण मध्यस्थी करू शकत नाही

१०१) की कोणी मित्र नाही सहानुभूतीस पात्र.

१०२) पण जर का आम्हांस परत जाण्याची (जगात) संधी मिळाली तर आम्ही श्रद्ध लोकांपैकी असू.

१०३) यामध्ये निश्चितच संकेत आहे, पण त्यांच्यापैकी अनेक लोक मान्य करणार नाहीत.

१०४) तुमचा विधाता तर खरंच प्रभुत्वसंपन्न असून दया दाखवणारा आहे.

१०५) नूहच्या लोकांनीही प्रेषितांना खोटं म्हटलं.

१०६) आठवा, त्यांचे बंधु नूह यांनी त्यांना सांगितलं, तुम्हांस भीती नाही

वाटत?

१०७) मी प्रेषित आहे तुमच्यासाठी विश्वास करण्याजोगा,

१०८) तेव्हा अल्लाहशी भीतीनं वागा आणि माझं (आज्ञा)पालन करा.

१०९) मी तुमच्याकडून मोबदल्याची मागणी करत नाही, मला तर सकल जगतांचा विधाताच मोबदला देईल.

११०) तेव्हा अल्लाहंच भय राखा नि माझ्या आज्ञा पाळा.

१११) ते म्हणाले, आम्ही तुझ्यावर श्रद्धा ठेवू? क्षूद्र लोकंच तर तुझं पालन करताहेत.

११२) (नूह) म्हणाले, मला नाही माहीत ते काय काम करताहेत.

११३) त्यांचा हिशेब तर माझ्या विधात्यापाशीच जर तुम्हांस काही कळत असेल तर

११४) मी नाही श्रद्धावंतांकडं दुर्लक्ष करणार.

११५) मी तर फक्त स्पष्टपणे लोकांना सावध करणारा आहे.

११६) ते म्हणाले, नूह! जर तू माघार नाहीस घेतली तर आम्ही तुला दगडांनी ठेचून काढू.

११७) नूह म्हणाले, माझ्या विधाता! माझ्या लोकांनी तर खरंच मला खोटं म्हटलं.

११८) तर आता माझ्या आणि त्यांच्यामध्ये तूच काही निर्णय कर स्पष्टपणे उलगडा आणि माझी व माझ्यासोबत जे श्रद्ध लोक आहेत त्यांची सुटका कर.

११९) आणि मग आम्ही त्याची आणि त्याच्यासोबत नौकेत असलेल्यांची सुटका केली.

१२०) आणि जे लोक त्यांच्या मागं उरले त्यांना बुडवून टाकलं.

१२१) यामध्ये (देखील) एक संकेत आहे. पण त्यांच्यात अनेक यास मान्य

करत नाहीत.

१२२) (तरी)पण तुमचा विधाता तर प्रभुत्वशाली असून दया करणारा आहे.

१२३) आदच्या लोकांनीही प्रेषितांना (असंच) खोटं ठरवलं.

१२४) जेव्हा त्यांचे बंधु हूद यांना त्यांनी विचारलं, तुम्हाला भीती नाही वाटत?

१२५) मी तुमच्याकडं प्रेषित (म्हणून आलो) आहे विश्वास करण्याजोगा,

१२६) तेव्हा अल्लाहचं भय बाळगा नि माझ्या आज्ञा पाळा.

१२७) यासाठी मी काही मोबदला मागत नाही तुमच्याकडून. माझा मोबदला तर सकल जगांचा विधाता देईल.

१२८) तुम्ही प्रत्येक उंच जागी एक चिन्ह विनाकारण उभारता कशासाठी ते?

१२९) आणि तुम्ही एक भक्कम वैभवशाली महाल बांधता, जणू तुम्हांस सदैव राहायचं असल्यासारखं.

१३०) आणि एखाद्या जुलमी राजाप्रमाणं लोकांशी बळाचा व्यवहार करता.

१३१) अल्लाहचं भय बाळगा, माझ्या आज्ञा पाळा

१३२) आणि ज्यानं तुमची साथ दिली ते तुम्हांस माहीत आहे त्याचं भय बाळगा.

१३३) विविध पशु आणि मुलांद्वारे ज्यानं तुम्हाला मदत केली

१३४) बागा आणि झरे (बहाल केले).

१३५) मला खरंच भीती वाटते तुम्हांस त्या मोठ्या दिवशी शिक्षा होण्याची.

१३६) ते म्हणाले, तुम्ही आम्हांस उपदेश करा अगर करू नका, आम्हांस ते सारखंच आहे.

१३७) पूर्वजांनी घालून दिलेल्या ह्या गोष्टी आहेत (इतर काही नाही).

१३८) आम्हांस कसलीही शिक्षा होणार नाही.

१३९) त्यांनी (अशा प्रकारे) खोटं ठरवलं म्हणून आम्ही त्यांना नष्ट केलं. यामध्ये संकेत आहेत, पण बहुतेक ते मान्य करत नाहीत.

१४०) पण तुमचा विधाता प्रभुत्वसंपन्न आणि कृपावंत आहे.

१४१) समूदच्या (लोकांनीदेखील) प्रेषितांना खोटं म्हटलं.

१४२) त्यांचे बंधु सालेहनी जेव्हा त्यांना विचारलं, तुम्ही भीत नाही?

१४३) मी तुमच्याकडं विश्वासपात्र प्रेषित आहे.

१४४) तेव्हा अल्लाहचं भय राखा नि माझं (आज्ञा)पालन करा.

१४५) मी त्यासाठी तुमच्याकडून काही मोबदला मागत नाही. माझा मोबदला तर सकल जगांचा विधाता अल्लाहकडं आहे.

१४६) इथं जे काही तुम्हांस उपलब्ध आहे त्यातच तुम्हांस राहू दिलं जाईल?

१४७) बागा आणि झऱ्यांमध्ये.

१४८) शेतींमध्ये, खजुरीच्या बागांमध्ये नरम (चवदार) घड असलेल्या?

१४९) तुम्ही पर्वतं कोरून इमारती बनवता आणि आनंदित होता,

१५०) अल्लाहचं भय राखा, माझ्या आज्ञा पाळा,

१५१) अतिरेक्यांच्या आहारी जाऊ नका.

१५२) ते धरतीवर अनाचार माजवतात सुधार करत नाहीत,

१५३) ते लोक म्हणाले, तुमच्यावर तर जादू केलेली दिसते.

१५४) तुम्ही तर आमच्यासारखंच माणूस आहात. जर तुम्ही खरं असाल तर एखादा संकेत आणा.

१५५) सालेह म्हणाले, ही उंटीण, एका ठराविक दिवशी ती पाणी पिईल आणि दुसऱ्या एका दिवशी तुम्ही पाणी प्यायचं.

१५६) कोणत्या वाईट हेतूनं तिला हात लावू नका नाहीतर एका भयानक दिवशी तुम्ही शिक्षेच्या तावडीत सापडाल.

१५७) पण नंतर त्यांनी तिची धोंडशीर कापून टाकली आणि कासाविस झाले.

१५८) त्यांना शिक्षा झाली. यामध्ये संकेत आहेत, पण त्यांच्यातील बहुतेकांना ते मान्य नाही.

१५९) तुमचा विधाता प्रभुत्वशाली आणि दयावंत आहे.

१६०) लूतच्या लोकांनी प्रेषितांना खोटं ठरवलं.

१६१) तेव्हा त्यांचे बंधु लूत यांनी त्यांना विचारलं, तुम्हांस भीती नाही वाटत?

१६२) मी तुमचा विश्वासपात्र प्रेषित आहे.

१६३) तेव्हा अल्लाहचं भय बाळगा नि माझ्या आज्ञा पाळा.

१६४) मी काही यासाठी तुमच्याकडून मोबदला मागत नाही. माझा मोबदला तर सकल जगांच्या विधात्याकडं आहे.

१६५) तुम्ही जगातील (निर्मितीपैकी) पुरुषांजवळ जाता? (समलिंगी संबंधासाठी)

१६६) तुमच्या विधात्यानं तुम्हांसाठी ज्यांना सहचारणी बनवलंय त्यांना सोडून. तुम्ही उल्लंघन करणारे लोक आहात.

१६७) ते लोक म्हणाले, लूत! जर तुम्ही माघार घेतली नाही तर तुम्हांस (गावातून) घालवून देऊ.

१६८) ते (लूत अ.) म्हणाले, मी तुमच्या वाईट कृत्यांचा निषेध करतो.

१६९) माझ्या विधाता! मला नि माझ्या कुटुंबीयांना या कृत्यांपासून वाचव.

१७०) आम्ही मग त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना वाचवलं.

१७१) मागं राहिलेल्या एका म्हाताऱ्या महिलेला सोडून.

१७२) मग आम्ही बाकीच्या सर्वांचा नाश केला. कसलं ते मारा ज्यांना ताकीद दिली होती.

१७३) आम्ही त्यांच्यावर दगडांचा मारा केला जणू तो दगडांच्या भयंकर

पाऊसासारखाच होता. ताकीद दिलेल्यांवर भयंकर असा मारा.

१७४) यामध्ये संकेत आहेत. पण त्यांच्यातील बहुतेक ते मानत नाहीत.

१७५) तुमचा विधाता मात्र प्रभुत्वसंपन्न आणि कृपावंत आहे.

१७६) 'ऐका'च्या निवासींनीसुद्धा प्रेषितांना अव्हेरलं

१७७) तेव्हा त्यांचे बंधु शुऐब यांनी त्यांना विचारलं, तुम्हांस भीती नाही वाटत?

१७८) मी तुमचा प्रेषित आहे विश्वास करण्याजोगा,

१७९) म्हणून तुम्ही अल्लाहचं भय बाळगा नि माझ्या आज्ञा पाळा.

१८०) मी या कामी तुम्हांकडून मोबदला मागत नाही. माझा सकल विश्वांचा विधाता आहे मला मोबदला देणारा.

१८१) तुम्ही पुरेपूर मोजमाप करा. कोणाचं नुकसान करू नका.

१८२) प्रामाणिक तराजूनं तोला.

१८३) लोकांच्या वस्तूंमध्ये घट करू नका, धरतीवर अनाचार माजवित फिरू नका.

१८४) ज्यानं तुम्हांस आणि तुमच्या पूर्वजांना निर्माण केलं त्याचं भय राखा.

१८५) ते म्हणू लागले तुमच्यावर तर जादू केलेली दिसतेय.

१८६) तुम्ही तर आमच्यासारखंच माणूस आहात, पण आमचा कयास असा की तुम्ही खोट्यांपैकी आहात.

१८७) जर तुम्ही खरं असाल तर आकाशातला एखादा तुकडा आमच्यावर पाडा.

१८८) (शुऐब) म्हणाले, तुमची कृत्यं माझ्या विधात्यास अवगत आहेत.

१८९) पण त्यांनी ते नाकारलं म्हणून त्यांच्यावर अंधाराची शिक्षा पसरली, ती त्या भयंकर दिवसाची शिक्षा होती.

१९०) यामध्ये संकेत आहेत, पण त्यांच्यापैकी बहुतेक ते मानत नाहीत.

१९१) तुमचा विधाता मात्र सर्वोच्च आणि कृपावंत आहे.

१९२) सकल विश्वांच्या विधात्यानं हा (ग्रंथ) अवतरलाय.

१९३) एका सच्चा आत्म्यानं (जिबराईल अ.) तो खाली आणलाय.

१९४) तुमच्या मनांसाठी, तुम्ही सावध करणाऱ्यांपैकी व्हावं म्हणून.

१९५) सुबोध अरबी भाषेमध्ये.

१९६) याचा उल्लेख पूर्वीच्या (प्रेषितांच्या) स्मृतींमध्ये आहे.

१९७) इस्राईलच्या लोकांच्या धर्मपंडितांच्या हे अवगत आहे, मग ते त्याच्यासाठी संकेत नव्हे का?

१९८) आम्ही जर त्यास कुणा अरबेतरावर अवतरलं असतं

१९९) आणि त्यानं ते वाचून दाखवलं असतं तरीदेखील त्यांनी विश्वास केला नसता.

२००) आम्ही पापी लोकांच्या मनांमध्ये तसं (नाकारणं) भिनवलंय.

२०१) जोपर्यंत ते यातनादायक शिक्षेस पाहून घेणार नाहीत, ते श्रद्धा धारण करणार नाहीत.

२०२) तो त्यांच्यावर अकस्मात कोसळेल, त्याचा त्यांना थांगपत्ताही नसताना.

२०३) आणि मग ते विचारतील आम्हाला सवड दिली जाईल काय?

२०४) त्यांना घाई आहे आमच्या शिक्षेची?

२०५) (तुम्हांस) दिसत नाही आम्ही कैक वर्षं त्यांना मौज करू दिली.

२०६) आणि मग त्यांना दिलेलं शिक्षेचं वचन घडलंच

२०७) तर त्यांना आम्ही ज्या सुखवस्तू बहाल केल्या होत्या त्या त्यांच्या काय कामी येणार?

२०८) आम्ही जोवर सावध करणारे (पाठवले) नाहीत तोवर आम्ही कोणत्याच

वस्त्यांना उद्ध्वस्त केलं नाही.

२०९) त्यांना आधी शिकवण दिली, आम्ही अन्याय करत नसतो.

२१०) आणि सैतान हे ग्रंथ (कुरआन) आणत नसतात.

२११) त्यांची तशी लायकी नाही की त्यांनी हे (काम) करावे.

२१२) त्यांना ऐकू येऊ नये म्हणून दूर करण्यात आलंय.

२१३) तेव्हा तुम्ही अल्लाहच्या बरोबरीनं इतरांचा धावा करू नका, नसता तुम्हांस शिक्षा घडेल.

२१४) तुम्ही आपल्या आप्तेष्टांना सावध करा

२१५) जे श्रद्धावंत तुमचं (आज्ञा)पालन करतील त्यांच्याशी आदरानं वागा.

२१६) पण जर त्यांनी अवज्ञा केली तर सांगून टाका तुमच्या कृत्यांशी माझा काही संबंध नाही.

२१७) आणि सर्वोच्च अशा दयावंतावर भिस्त ठेवा.

२१८) तुम्ही उभं असता (नमाजच्या अवस्थेत) तो तुम्हांस पाहत असतो

२१९) आणि नतमस्तक झालेल्यांमध्ये तुमच्या हालचालींना (देखील पाहत असतो.)

२२०) तो निश्चितच सर्वकाही ऐकणारा आणि सर्वज्ञ आहे.

२२१) मी तुम्हांस दाखवू सैतान कोणाच्या मागं असतात!

२२२) प्रत्येक खोट्या गोष्टी रचणाऱ्या आणि पापी लोकांवर ते अवतरतात.

२२३) त्यांच्या कानांवर सांगोवांगी गोष्टी घालत असता ज्यांपैकी कितीतरी खोट्या असतात.

२२४) आणि भरकटलेले लोक असतात, कवी लोक, ते त्यांचं अनुकरण करतात.

२२५) तुम्ही पाहिलं असेल त्यांना प्रत्येक दरीतून भटकताना.

२२६) ते अशा गोष्टी सांगत असतात ज्यांचं आचरण स्वत: करत नाहीत.

२२७) पण अशा लोकांना वगळता जे श्रद्धा बाळगून नेक कर्मं करत असतात आणि अल्लाहच्या स्मरणात पुष्कळसं मग्न असतात आणि त्यांच्यावर अन्याय झाल्यास त्याचा बदला घेतात आणि जे लोक अत्याचार करताहेत त्यांना लवकरच कळून चुकेल, त्यांना कोणत्या अवस्थेस तोंड द्यावं लागणार आहे.

-------

# २७. सूरह अन्नम्ल

**मक्काकालीन, आयती ९३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) ता सीन. ह्या कुरआनच्या आयती (वचनं) होय स्पष्ट अशा ग्रंथा (च्या)

२) श्रद्ध लोकांसाठी मार्गदर्शक आणि सुवार्ता देणाऱ्या.

३) जे लोक नमाज पढतात, जकात अदा करतात आणि परलोकावर विश्वास ठेवतात.

४) ज्या लोकांचा परलोकावर विश्वास नाही, आम्ही त्यांची कृत्यं मोहक बनवलीत म्हणून ते भरकटण्यातच व्यस्त आहेत.

५) अशाच लोकांना वाईट शिक्षा असेल आणि परलोकात त्यांना अधिकच तोटा सहन करावा लागणार आहे.

६) तुम्हांस हा कुरआन एका प्रतिभासंपन्न आणि सर्वज्ञाकडून दिला गेलाय.

७) आठवा, जेव्हा मूसा (अ.) यांनी आपल्या कुटुंबीयांस म्हटलं, मी एक आग पाहिलीय, मी लवकरच त्याची माहिती आणीन किंवा एखादं जळतं कोलित आणतो तुम्हांस तापवता यावं म्हणून.

८) जेव्हा ते त्या आगीपाशी गेले त्यांना आवाज आला, ''धन्य तो जो या प्रकाशमान अग्नीत आहे आणि जो त्याच्या सान्निध्यात आहे. आणि अल्लाह पावन आहे सकल जगतांचा विधाता.

९) मूसा! निश्चित मीच तो अल्लाह प्रभुत्वशाली आणि विवेकी.

१०) 'आपली काठी खाली टाक.' जेव्हा ती साप असल्यागत वळवळू लागली तेव्हा मूसा मागं फिरले आणि वळून पाहिलं नाही. 'मूसा! भिऊ नकोस. माझ्यासमक्ष प्रेषितांना भीती वाटत नसते.'

११) पण जर कुणी अन्याय केला असल्यास (त्यास वगळून) पण जर त्यानं दुष्टास बदलून काही भलं केलं असल्यास, मग मी क्षमा करणारा आणि

दया दाखवणारा आहे.

१२) आता तुझे हात आपल्या छातीशी लाव, बाहेर काढल्यास तो निखालस शुभ्र निघेल. आता तू नाऊपैकी हे (दोन) चमत्कार घेऊन फिरऔन आणि त्याच्या लोकांकडं जा. ते निश्चितच पापी लोक आहेत.

१३) जेव्हा डोळे उघडणारे हे आमचे संकेत त्यांनी पाहिले तेव्हा ते म्हणाले, ही तर उघड उघड जादू आहे.

१४) जरी त्यांच्या मनांना त्यांची खात्री पटली तरीदेखील त्यांनी अन्यायानं आणि अहंकारामुळं त्यांना नाकारलं. मग पाहा, शेवटी काय घडले त्या उपद्रवी लोकांशी.

१५) आम्ही दाऊद आणि सुलैमान यांना ज्ञान दिलं तेव्हा अल्लाहंच कौतुक केलं नि म्हणाले, त्यांनी इतर श्रद्धावंत भक्तांच्या तुलनेत आम्हांस प्राधान्य दिलं.

१६) सुलैमान यांना दाऊदचे वारस बनवले. ते म्हणाले, लोकहो! मला पक्ष्यांची भाषा शिकवण्यात आली आणि सर्वकाही वस्तु दिल्या. खरंच हे उघड असं वरदान आहे.

१७) आणि जिन्न, मानव आणि पक्ष्यांना सुलैमानच्या अंकित करून त्यांना संघटित सैन्य दिले, त्यांना रोखण्यात आलं.

१८) ते मुंग्यांच्या एका दरीत पोहोचले असता एक मुंगी म्हणाली, मुंग्यांनो! तुम्ही आपल्या घरांत जा, सुलैमान आणि त्यांचा ताफा नकळत तुम्हाला चिरडून टाकील.

१९) तिच्या बोलण्याचं त्यांना हसू आलं नि म्हणाले, माझ्या विधाता! तू मला आणि माझ्या आईवडिलांना जी देणगी बहाल केलीस त्याचे आभार मानण्याची मला बुद्धी दे. मी सत्कर्म करत राहीन तुझ्याच प्रसन्नतेसाठी. आणि जे तुझे नेक भक्त आहेत त्यांच्यामध्ये मला दाखल कर.

२०) पक्ष्यांचं अवलोकन करताना त्यांनी विचारलं, हे काय हुदहुद (एक

पक्षी) माझ्या नजरेस पडत नाही, तो कुठे गायब झालाय.

२१) जर त्यानं माझ्याकडं सबळ पुरावे आणले नाहीत तर मी त्यास कडक शिक्षा करीन. एखादेवेळी मी त्यास जुबह करीन (कापून टाकीन).

२२) पण हुदहुदला येण्यास काही विलंब झाला नाही. तो म्हणू लागला, तुम्हांस नव्हती ती माहिती मी आणलीय. सबा विषयीचा खरा अहवाल.

२३) मी एका महिलेस पाहिलं, ती राज्य गाजवते लोकांवर. तिच्याकडं सर्वकाही आहे, एक भव्य असं सिंहासन (सुद्धा).

२४) मी तिला आणि तिच्या लोकांना अल्लाहला सोडून सूर्याची पूजा करताना पाहिलं. सैतानानं त्यांची कर्मं त्यांच्यासाठी मोहक करून ठेवलीत. त्यांना रास्त मार्गापासून त्यानं रोखून धरलंय. म्हणून त्यांना वाट सुचत नाही.

२५) ते (लोक) का बरं अल्लाहस नतमस्तक होत नाहीत जो धरती आणि आकाशांमध्ये जे काही दडलंय ते काढतो आणि तुम्ही जे दडवून ठेवलंय किंवा उघड करता ते सर्व त्यास ठाऊक आहे.

२६) अल्लाहच एकमेव ईश्वर आहे, त्याच्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही. तो भव्य सिंहासनाचा विधाता आहे.

२७) ते (सुलैमान) म्हणाले, पाहून घेऊ आताच तू खरं बोलतोस की खोटं.

२८) माझं हे पत्र घेऊन जा, त्यांना देऊन टाक आणि निघून ये, ते परत काय उत्तर देतात ते पाहू या.

२९) ती महिला म्हणाली, सरदार लोकांनो, माझ्याकडं एक पत्र आलंय आदरास पात्र असं.

३०) निश्चितच ते सुलैमान यांच्याकडून आलेलं असून (सुरवातीस) परम कृपावंत व दयावंत अल्लाहच्या नावानं आहे.

३१) 'नि माझ्याविरूद्ध उद्दाम होऊ नका, माझ्याकडं आज्ञाधारक बनून या.'

३२) तेव्हा तुम्ही सरदार लोक माझ्या ह्या प्रकरणाविषयी मला सल्ला द्या.

कारण तुम्ही हजर असल्याशिवाय मी कोणत्याच प्रकरणात निर्णय घेत नसते.

३३) ते (सरदार) म्हणाले, आमच्याकडं भरपूर बळ आहे, आम्ही लढाई करण्यात सरस आहोत. आता आदेश देणं तुझ्या अधिकारात आहे. तेव्हा तुला काय आदेश द्यायचाय तो देऊन टाक.

३४) ती म्हणाली, जेव्हा राजे लोक एखाद्या वस्तीवर स्वारी करतात तेव्हा तिथं विध्वंस करून टाकतात, तेथील प्रतिष्ठित लोकांना अपमानित करतात, असाच त्यांचा शिरस्ता असतो.

३५) मी असं करते, त्यांना एक नजराणा पाठवते आणि मग पाहते माझे दूत काय उत्तर आणतात ते.

३६) जेव्हा ते (राजदूत) सुलैमानकडं पोहोचले (तेव्हा सुलैमान) म्हणाले, तुम्ही संपत्तीनं मला मदत करू पाहता, मला अल्लाहनं जे दिलंय ते तुमच्यापाशी असलेल्यापेक्षा उत्तम आहे. जा तुम्हीच खूश राहा त्या बक्षीसानं.

३७) त्यांच्याकडंच परत जा, आम्ही असे सैन्य घेऊन स्वारी करू ज्यास त्यांना तोंड देता येणार नाही. आम्ही त्यांना तिथून अपमानित करून घालवून देऊ आणि ते खचले जातील.

३८) (सुलैमान) म्हणाले, हे सरदार लोक! ती मला शरण येण्यापूर्वीच तिचं सिंहासन तुमच्यापैकी कोण घेऊन येईल?

३९) जिन्नांपैकी एक धिप्पाड यक्ष म्हणाला, मी आणून देईन ते, तुम्ही आपल्या जागेवरून उठण्याआधी. मी त्यास सक्षम आणि विश्वसनीय आहे.

४०) ज्यास ग्रंथांचं ज्ञान होतं असा एकजण म्हणाला, मी तर तुम्ही आपली पापणी लवते न लवते तेवढ्यातच ते आणून देईन. सुलैमान यांनी ते आपल्यासमोर आणून ठेवलेलं पाहिलं तेव्हा म्हणाले, हे माझ्या विधात्याचं वरदान आहे. मी कृतज्ञता व्यक्त करतो की कृतघ्न होतो

याची परीक्षा घेण्यासाठी. आणि जो कुणी कृतज्ञता व्यक्त करतो तो स्वत:साठीच कृतज्ञ असतो आणि जर कुणी कृतघ्न झाला तर माझा विधाता निरपेक्ष असून सन्मानास पात्र आहे.

४१) सुलैमान म्हणाले, तिच्या सिंहासनाचं रूप बदलून टाका आणि पाहू या ते तिच्या लक्षात येतं की ती असंमजस लोकांपैकी आहे.

४२) ती आल्यावर तिला विचारण्यात आलं, हेच का ते तुझं सिंहासन? ती म्हणाली, जणू हेच ते. आम्हास याबाबतची माहिती आधीच मिळाली होती. आम्ही आज्ञाधारकच (मुस्लिम) होतो.

४३) ती अल्लाहस सोडून ज्यांची आराधना करत असे त्यापासून सुलैमान यांनी तिला रोखलं. ती तर नाकारणाऱ्यांमधलीच होती.

४४) तिला भव्य महालात बोलवण्यात आलं, पण आत जाताना तिथं तिला खोल पाणी असल्यासारखं दिसलं म्हणून तिनं आपली वस्त्रं वर उचलली. सुलैमान म्हणाले, हा तर काचेचा महाल आहे. ती म्हणू लागली, माझ्या विधाता! मी स्वत:वरच अन्याय केला. आता मी सुलैमान यांच्याप्रमाणंच सकल जगांचा विधाता अल्लाहस शरण जाते. (इस्लाम प्रवेश करते.)

४५) आम्ही समूदच्या लोकांकडं त्यांचे बंधु सॉलेह यांना पाठवलं अल्लाहचीच भक्ती करण्यास (सांगण्यास्तव), पण ते आपसातच भांडू लागले.

४६) त्यांनी (सॉलेह यांनी) विचारलं, माझ्या लोकांनो, का बरं तुम्ही वाईटासाठी घाई करता, काही भलं होण्याआधीच? तुम्ही अल्लाहकडे क्षमायाचना का करत नाही, त्यानं तुम्हांस दया दाखवावी म्हणून?

४७) ते म्हणाले, आम्हांस तुम्ही आणि तुमचे सोबती अपशकुन वाटले. (सॉलेह) म्हणाले, तुमचे अपशकुन अल्लाहकडून घडतात. तुमच्या लोकांची परीक्षा घेतली जातेय.

४८) त्या शहरांमध्ये (असे) नऊ लोक होते ते धरतीवर अनाचार माजवायचे आणि काही सुधारणा करत नव्हते.

४९) ते म्हणाले, आम्ही आपसात शपथ घेऊ, आपण एका रात्री त्याच्या आणि त्याच्या कुटुंबावर हल्ला करू आणि त्याच्या वारसास सांगू, 'आम्ही खात्रीनं सांगतो त्यांच्या कत्तलीच्या वेळी आम्ही तिथं नव्हतोच. आम्ही सांगतो ते खरं आहे.'

५०) त्यांनी एक कट केला आणि योजना आखली. आम्हीही एक योजना केली होती, पण त्यांना तिचा थांगपत्ता नव्हता.

५१) पाहा, शेवटी काय गत झाली त्या कट रचणाऱ्यांची, आम्ही त्यांचा आणि त्यांच्या लोकांचा सर्वनाश केला.

५२) त्यांची ही घरे आहेत पडझड झालेली, त्यांच्या अत्याचारामुळे ह्यामध्ये समंजस लोकांसाठी संकेत आहेत.

५३) ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि जे सदाचारानं वागतात, त्यांना आम्ही वाचवलं.

५४) आणि लूत यांनी आपल्या लोकांस सांगितलं, पाहताय ना, तुम्ही व्यभिचार माजवत आहात?

५५) तुम्ही स्त्रियांना सोडून कामवासनांसाठी पुरुषांजवळ जाता. तुम्ही अडाणी लोक आहात.

**पारा - २०**

५६) उत्तरादाखल लूतचे लोक म्हणू लागले, लूतच्या लोकांना शहरातून घालवून द्या, त्या लोकांना पावित्र्याची आवड आहे.

५७) आम्ही त्यांच्या पत्नीस सोडून (बाकीच्या) कुटुंबीयांना वाचवलं. तिला मागं राहणाऱ्या लोकांमध्येच राहू दिलं.

५८) आम्ही सावध केलेल्या लोकांवर भयंकर वर्षाव केला.

५९) त्यांना सांगा, अल्लाहचा गौरव असो आणि त्यानं ज्या भक्तांना निवडून घेतलं त्यांना सलाम. अल्लाह अधिक चांगला की (ज्यांना) हे लोक त्याचे भागीदार जोडतात ते?

६०) कोण तो ज्यानं अवकाश आणि पृथ्वीची निर्मिती केली आणि आकाशातून तुमच्यासाठी पाऊस पाडला आणि मग त्यापासून सुंदर बागा उगवल्या. तुम्हांस अशी झाडं उगवणं शक्य नव्हतं. अल्लाहच्या जोडीनं दुसरंही ईश्वर (उपास्य) आहे काय? नव्हे हेच लोक वाममार्गी गेलेत.

६१) कोण तो? ज्यानं धरतीमध्ये राहण्यास योग्य असं वातावरण बनवलं, तीमध्ये नदी-नाले व पर्वत आणि दोन (पाण्याच्या) प्रवाहांमध्ये अंतर ठेवलं, अल्लाहव्यतिरिक्त दुसरा कोण आहे? पण बहुतेकांना याचं भान नाही.

६२) कुणी अडचणीत असताना जेव्हा त्याचा धावा करतो, तेव्हा त्याचं ऐकतो तो कोण बरं? त्या अडचणी दूर सारतो, तुम्हांस धरतीवर (आपला) प्रतिनिधी नेमतो, अल्लाहव्यतिरिक्त दुसराही कुणी आहे? पण काही मोजकेच लोक याची आठवण ठेवतात.

६३) कोण बरं तुम्हांस धरती आणि समुद्राच्या काळोखांच्या खोलीतून मार्ग दाखवतो, आपल्या कृपेनं वाऱ्यांना सुवार्तेचे पाईक म्हणून (पाऊस आधी) कोण पाठवतो? अल्लाहच्या जोडीनं इतर कुणी ईश्वर? ते (लोक) ज्यांना भागीदार करतात त्यापेक्षा उच्चतम आहे तो.

६४) कोण पहिल्यांदा निर्मितीचा आरंभ करतो? आणि मग त्याची पुनरावृत्ती करतो आणि आकाश व धरतीद्वारे कोण तुमच्या गरजा भागवतो, अल्लाहच्या बरोबरीनं इतर कुणी देव? मग त्यांना सांगा, जर ते खरे असतील तर पुरावा घेऊन येण्यास.

६५) त्यांना सांगा, त्यांना माहीत नाही आकाश आणि पृथ्वीमध्ये काय दडलंय, फक्त अल्लाहलाच ते माहीत आहे आणि त्यांना कधी उठवलं जाईल याचंदेखील भान नाही.

६६) परलोकासंबंधी त्यांचं ज्ञान कुजकट होऊन गेलंय, नव्हे त्याच्याविषयी ते संभ्रमात आहेत, नव्हे त्याबद्दल ते आंधळे होऊन गेलेत.

६७) विश्वास न ठेवणारे लोक विचारतात, आमची आणि आमच्या

वाडवडिलांची माती होऊन गेल्यावरदेखील आम्हांस परत काढलं जाईल?

६८) आम्हांस आणि आमच्या वाडवडिलांना असंच वचन दिलं गेलं होतं, या तर पूर्वापार कथा आहेत बाकी काहीच नाही.

६९) त्यांना सांगा, धरतीवरून संचार करा आणि पाहा (अशा) अपराधी लोकांचा शेवट कसा झाला ते.

७०) तुम्ही त्यामुळं दु:खी नका होऊ, त्याच्या कट-कारस्थानानं अस्वस्थ होऊ नका.

७१) ते विचारतात, तुम्ही खरं असाल तर ते वचन कधी खरं उतरेल?

७२) त्यांना सांगा, तुम्ही ज्या शिक्षेची घाई करता ती जवळच आली असेल.

७३) पण तुमचा विधाता मानवाशी दयेनं वागणारा आहे, पण बहुतेक लोक कृतघ्न असतात.

७४) आणि तुमच्या विधात्याला त्यांच्या मनांमध्ये काय आहे आणि काय ते उघडपणे बोलतात सर्वकाही अवगत आहे.

७५) आणि अवकाश व पृथ्वीतील असं काही लपलेलं नाही ज्याचा उल्लेख एका स्पष्ट ग्रंथात (कुरआनमध्ये) नसेल.

७६) बनी इस्राईलच्या बऱ्याचशा लोकांचा ज्या गोष्टीत दुमत आहे हे कुरआन त्यांचा उल्लेख करतो.

७७) आणि श्रद्धावंतांसाठी हे (कुरआन) निश्चितच मार्गदर्शक असून कृपा आहे.

७८) तुमचा विधाता त्यांच्यामध्ये (दुमत असलेल्यांमध्ये) निवाडा करील, तो प्रभुत्वसंपन्न असून सर्वज्ञ आहे.

७९) तेव्हा अल्लाहवरच विश्वास ठेवा, कारण तुम्ही स्पष्ट सत्यावर (चालत) आहात.

८०) तुम्ही मृतांना काही ऐकवू शकत नाही, तसंच जे बहिरे आहेत त्यांना

तुमचं म्हणणं ऐकू येणार नाही. (म्हणूनच) ते पाठ वळवून मागं जातात.

८१) अंध लोकांनी जो चुकीचा मार्ग अवलंबलाय त्यांना तुम्ही मार्ग दाखवू शकत नाही. तुम्ही तर फक्त अशांनाच ऐकवू शकता ज्यांना आमच्या आयतींवर (वचनांवर) श्रद्धा आहे आणि जे आज्ञा पाळताहेत.

८२) जेव्हा त्यांच्या बाबतीत (आम्ही) दिलेलं वचन पूर्ण होईल, आम्ही त्यांच्याप्रत जमिनीतून एक (असा) प्राणी उभा करू जो त्यांच्याशी बोलू लागेल. कारण मनुष्यजातीस तर आमच्या आयतींवर (कुरआनवर) विश्वास बसत नव्हता.

८३) ज्या दिवशी, जे लोक आमच्या आयतींना खोटं ठरवत असत अशा प्रत्येक लोकसमूहातील लोकांना एकत्रित करून त्यांना श्रेणींत रचलं जाईल.

८४) ते (अल्लाहप्रत) येईपर्यंत, आणि विचारलं जाईल, तुम्ही आमच्या आयती नाकारल्या होत्या, त्या ज्ञानाचा आढावा घेतला नसतानादेखील. का बरं तुम्ही तसं करत होता?

८५) त्यांना बोलता येणार नाही, त्यांनी अपराध केला होता. त्यांच्या बाबतीत आमचा शब्द (शिक्षेचा) पूर्ण झाला.

८६) त्यांना दिसत नाही आम्ही (त्यांच्या) विश्रांतीसाठी रात्र बनवली आणि दिवस बनवला त्यांना पाहता यावं म्हणून. जे श्रद्धावंत आहेत त्यांच्यासाठी यांमध्ये संकेत आहेत.

८७) ज्या दिवशी तुतारी फुंकली जाईल, तेव्हा जे आकाशात आहेत आणि धरतीमध्ये आहेत ते सर्व भयानं ग्रासले जातील. पण अल्लाहची इच्छा असेल त्यास सोडून आणि सारेचे सारे त्याच्यासमोर हतबल होऊन जातील.

८८) पर्वतांना पाहून ते किती भक्कमपणे स्थिर आहेत असं तुम्हांस वाटतं, पण कयामतच्या दिवशी ते ढगांप्रमाणे चालू लागतील. अल्लाहचीच

ही कामगिरी, ज्यानं प्रत्येक वस्तू कौशल्यानं साकारली आणि तुम्ही जे काही करता ते अल्लाहस ठाऊक आहे.

८९) जो भली कामं करून येईल त्यास त्यापेक्षाही (जास्त) भलंच लाभेल आणि त्या दिवशी तो भयापासून सुरक्षित असेल.

९०) आणि जे वाईट अशी कृत्यं करून येतील ते तोंडघशी अग्नीत टाकले जातील. तुम्ही जे काही करत होता त्यानुसार तुम्हाला मोबदला दिला जाईल.

९१) मला तर या शहराच्या (मक्का) विधात्याची आराधना करण्याचे आदेश आहेत. ज्यानं त्यास सन्मानित केलं, सारंकाही त्याचंच आहे. आणि मला तर आज्ञा पाळण्याचेच आदेश दिले गेलेत.

९२) तसेच कुरआनचं वाचन करून ऐकवावं, कुणास मार्गदर्शन हवं असेल तर तो त्याच्या स्वत:साठीच असते, पण जर कुणी मार्गभ्रष्ट होत असेल तर त्यांना सांगा, मी तर ताकीद देणारा आहे.

९३) आणि सांगा, अल्लाहचाच गौरव असो, तो आपले संकेत लवकरच तुम्हांस दाखवून देईल, तुम्ही त्यांना ओळखू याल आणि तुम्ही जे करत आहात त्याकडं तुमचा विधाता दुर्लक्ष करत नाही.

-------

# २८. सूरह अल कसस

**मक्काकालीन, आयती ८८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) ता सीन मीम.

२) ह्या एका स्पष्ट ग्रंथाच्या आयती होय.

३) मूसा आणि फिरऔनच्या बाबतीत सत्य अहवाल आम्ही तुम्हास वाचून दाखवतो, जे श्रद्धा बाळगतात त्यांच्यासाठी.

४) फिरऔननं या धरतीवर अफाट वृत्ती अवलंबून आपल्या लोकांना जाती-जातींमध्ये विभागून टाकलं होतं आणि त्यातील एका गटाला जेरीस आणून सोडलं होतं. त्यांच्या मुलांची कत्तल करत असे आणि त्यांच्या मुलींना जीवित ठेवत असे. खरंच तो अनाचारी होता.

५) आम्हांस वाटे, ज्या लोकांना दुबळं करून ठेवण्यात आलं त्यांच्यावर कृपा करून त्यांना नेता बनवून वारस करावं.

६) त्यांना धरतीवर सत्ता बहाल करावी आणि फिरऔन, हामान व त्यांच्या सैन्यांना त्यांच्याकरवी (त्या दुबळ्या लोकांना) तेच करून दाखवून द्यावं ज्यांच त्यांना भय वाटत असे.

७) आम्ही मूसा यांच्या आईस अनुभूतीद्वारे कळवलं त्यास (बाल्यावस्थेतील मूसा यांना) दूध पाजण्यास आणि जेव्हा त्याच्याविषयी भीती वाटे तेव्हा त्यास नदीत टाकून द्यावे. भिऊ नये की दु:खीही होऊ नये. आम्ही त्यास परत तुझ्याकडे आणून देऊ आणि त्यास प्रेषितांपैकी (एक प्रेषित) बनवू.

८) फिरऔनच्या कुटुंबीयांनी त्यास (नदीतून) उचलून घेतलं, जे त्यांचे शत्रू होऊन त्यांच्या दु:खांचं कारण होणार होते. फिरऔन, हामान आणि त्यांच्या सैन्याकडून निश्चितच चूक झाली.

९) फिरऔनची पत्नी म्हणाली, माझ्या आणि तुझ्या डोळ्यांचं हे सुख

आहे, यास ठार करू नकोस. किंबहुना ते आपल्या काही उपयोगी पडेल. आपण त्यास पुत्र म्हणून दत्तक घेऊ, पण त्यांना (वस्तुस्थितीचं) भान राहिलं नव्हतं.

१०) मूसाची आई हवालदिल झाली होती. ती श्रद्धाधारक असल्याचं आम्ही तिच्या मनावर बिंबवलं नसतं तर तिनं आपली (अवस्था) उघड केली असती.

११) तिनं (मूसा यांच्या आईनं) त्याच्या बहिणीस त्याच्या मागावर जाऊन त्यांना कळू न देता दूरवरून पाहण्यास सांगितलं.

१२) आम्ही स्तनपान करणाऱ्या महिलांना आधीच रोखून ठेवलं होतं. तिनं (मूसाच्या बहिणीनं) त्यांना विचारलं, तुमच्यासाठी त्याचं (बाळाचं) संगोपन करण्यास एका घराविषयी मी सांगू? ते लोक त्याची काळजीही घेतील.

१३) शेवटी आम्ही त्यास त्याच्या आईपाशी परत पाठवलं तिच्या डोळ्यांच्या समाधानासाठी, ती दुःखी होऊ नये म्हणून. आणि अल्लाहचं वचन सत्य असते हेही तिला कळावं म्हणून. पण बहुतेक लोकांना हे माहीत नाही.

१४) जेव्हा ते (मूसा अ.) तरुण वयात आले आणि धडधाकट झाले तेव्हा आम्ही त्यांना समज आणि ज्ञान बहाल केलं. आम्ही नेक काम करणाऱ्यांना असाच मोबदला देत असतो.

१५) आणि ते शहरामध्ये दाखल झाले त्या वेळी तेथील लोक बेसावध होते, त्यांना दोन माणसे एकमेकांशी भांडत असताना आढळली. त्यापैकी एकाचा संबंध त्यांच्या (मूसा यांच्या) भाऊकीशी (बनी इस्राईलशी) होता, तर दुसरा शत्रूपक्षाचा होता. ज्याचा संबंध त्यांच्याशी होता त्यानं शत्रूपक्षाविरूद्ध त्यांच्याकडं मदत मागितली. मूसा यांनी त्यास एक ठोसा लगावला आणि त्याचा शेवट केला. ते म्हणाले, हे तर सैतानाचं काम झालं. तो निश्चितच उघड उघड गैरमार्गी नेतो.

१६) ते म्हणू लागले, माझ्या विधाता! मी स्वतःवरच अन्याय केला. मला तू

क्षमा कर! त्यानं (अल्लाहनं) त्यास माफ करून टाकलं. तो निश्चितच क्षमाशील आणि कृपावंत आहे.

१७) ते (मूसा) म्हणू लागले, हे विधाता! ज्याअर्थी तू माझ्यावर उपकार केलेस तसेच मी (कधीही) पापींना मदत करणार नाही.

१८) ते भयभीत अवस्थेत, असतानाच त्या शहरात पहाटेची वेळ झाली. तोच ज्यानं आदल्या दिवशी त्यांच्याकडे मदत मागितली होती, पुन्हा विनंती करत होता. मूसा (अ.) त्यास म्हणाले, तू तर नक्कीच उघडरित्या मार्गभ्रष्ट दिसतोस.

१९) मूसा यांनी जेव्हा त्या माणसावर हात उगारण्याचं ठरवलं जो त्या दोघांचा शत्रू होता तोच तो म्हणू लागला, मूसा! जसं काल तू एका माणसास ठार मारलं तसंच मलाही ठार करू इच्छितो की काय? तू तर या देशात जोरजुलूम करू इच्छितो आणि काही सुधारणा करण्याचा तुझा बेत नाही.

२०) शहराच्या दूरवरच्या टोकावरून एक मनुष्य धावत आला नि म्हणाला, मूसा! सरदार लोक आपसांत सल्लामसलत करत आहेत तुम्हाला मारून टाकण्याकरिता. तुम्ही इथून निघून जा. मी तुमचा हितचिंतक आहे.

२१) भयभीत होऊन आता काय होईल असा विचार करीत ते निघून गेले आणि प्रार्थना केली, माझ्या विधाता! ह्या अत्याचारी लोकांपासून मला वाचव.

२२) जेव्हा त्यांनी मदयनची वाट धरली तेव्हा म्हणाले, मला खात्री आहे माझा विधाता मला रास्त मार्ग सुचवेलच.

२३) जेव्हा ते मदयनच्या एका पाणवठ्यावर पोहोचले त्यांनी पाहिलं काही लोक (आपल्या जनावरांस) पाणी पाजताहेत आणि दोन मुली आपल्या कळपास मागं सारीत होत्या. त्यांनी त्यांना विचारलं, तुमचं काय? त्या म्हणाल्या, जोवर हे गुराखी आपली जनावरं घेऊन जात नाहीत आम्ही यांना पाणी पाजू शकत नाही. आमचे वडील वयोवृद्ध आहेत.

२४) त्यांनी (त्यांच्या कळपास) पाणी पाजवलं आणि सावलीत जाऊन म्हणाले, माझ्या विधाता! मला तू जे काही बक्षीस देशील मी त्याचा गरजवंत आहे.

२५) त्या दोघींपैकी एक त्यांच्याकडं लाजत लाजत येऊन म्हणाली, माझे वडील तुम्हांस बोलवत आहेत. तुम्ही आमच्या कळपास पाणी दिलं म्हणून त्याचा मोबदला देण्यासाठी. जेव्हा ते (मूसा) त्यांच्याकडं (शुऐब) आले तेव्हा त्यांनी सर्व अहवाल सांगितला. त्यावर ते म्हणाले, तुम्ही अत्याचारी लोकांच्या तावडीतून सुटून आलात. आता भ्यायचं कारण नाही.

२६) त्या दोघींपैकी एकीनं सांगितलं, बाबा! यांना तुम्ही कामावर ठेवून घ्या. तुम्हास एक विश्वासू आणि शक्तीशाली असा उत्तम सेवक लाभेल.

२७) ते (शुऐब, मुलीचे पिता) म्हणाले, माझा विचार असा आहे की एका अटीवर माझ्या ह्या मुलींपैकी एकीशी तुम्ही विवाह करावा. ती म्हणजे तुम्ही आठ वर्षं माझी नोकरी करावी. जर दहा वर्षं पूर्ण केली तर ती तुमची मर्जी. तुमच्यावर मी सक्ती करणार नाही. जर अल्लाहची इच्छा असली तर मी तुम्हांस नेक लोकांपैकी आढळेन.

२८) ते (मूसा) म्हणाले, तर हा तुमच्या आणि माझ्यात (करार) आहे. दोहोंपैकी कोणतीही अट मी पुरी करेन. याबाबत माझ्यावर काही दोष नसावा. आपण जे काही बोलताहोत त्यावर अल्लाह साक्षी (असेल).

२९) मूसा (अ.) यांनी जेव्हा ती मुदत पूर्ण केली तेव्हा ते आपल्या मंडळीस घेऊन निघाले, तोच त्यांनी तूर पर्वताच्या दिशेनं आग पाहिली. त्यांनी आपल्या कुटुंबीयांस सांगितलं, थांबा! मी नक्कीच आग पाहिलीय. मी तिथून (त्याची) काही माहिती आणतो किंवा एखादं जळतं कोलित तुम्हांस तापवता यावं म्हणून आणतो.

३०) जेव्हा ते त्या (आगी) जवळ आले तेव्हा ऐमनच्या अनुग्रहित दरीच्या उजवेकडील एका वृक्षापासून त्यांना हाक दिली गेली, ''हे मूसा! मी अल्लाह आहे सकल विश्वांचा विधाता!

३१) आपली काठी खाली टाक. त्यांनी ती सापासारखं वळवळताना पाहिली, मागं फिरले आणि वळूनसुद्धा पाहिलं नाही. आम्ही म्हटलं, मूसा पुढं ये. घाबरू नकोस. तू सुरक्षित आहेस.

३२) (आता) आपला हात आपल्या उराजवळ ने, तो विशुद्ध पांढरा शुभ्र निघेल. आता आपल्या बाहू जवळ घे. भीती वाटू नये म्हणून. फिरऔन आणि त्याच्या सरदारांसाठी तुझ्या विधात्याकडचे हे दोन पुरावे आहेत. ते फार बंडखोर लोक आहेत.

३३) मूसा (अ.) म्हणाले, माझ्या विधाता! मी त्यांच्यापैकी एकास ठार मारलंय. आता मला भीती वाटते, ते मला मारून टाकतील.

३४) माझा भाऊ हारुन, बोलण्यात माझ्यापेक्षा सरस आहे. त्यास माझ्याबरोबर पाठव मदतीसाठी. तो पुष्टी करील, मला भीती वाटते ते मला खोटं ठरवून नाकारतील.

३५) आम्ही आताच तुझ्या भावाद्वारे तुम्हांस (त्यांच्यावर) वर्चस्व मिळवून देऊ. आमच्या संकेतांमुळं ते तुमच्या दोघांजवळ फिरकणारही नाहीत. तुम्ही दोघं आणि जे तुमचा पालन करतील त्यांना आम्ही वर्चस्व बहाल करू.

३६) मग मूसा (अ.) ठळक संकेत घेऊन त्यांच्याकडं आले तेव्हा ते म्हणाले, हे जादूपलीकडं काही नाही. त्यांनी रचलंय ते. आम्ही आमच्या पूर्वीच्या वाडवडिलांकडून असं काही ऐकलेलं नाही.

३७) मूसा म्हणाले, ज्यानं त्याच्याकडून मार्गदर्शन आणलंय त्यास माझा विधाता उत्तम रितीनं ओळखतो. ज्याच्यासाठी परलोकातील चांगल ठिकाण आहे. पापी लोकांचा कधी कल्याण होत नसते.

३८) फिरऔन आपल्या सरदारांस म्हणू लागला, माझ्याव्यतिरिक्त तुमचा दुसरा कुणी ईश्वर माझ्या माहितीत नाही. हामान माझ्यासाठी (विटांची) एक भट्टी पेटव, त्यापासून माझ्यासाठी एक उंच मनोरा उभा कर म्हणजे मला त्यावरून मूसाच्या ईश्वराकडं डोकावून पाहता येईल. (पण) माझ्या मते तर तो खोटारडाच आहे.

३९) तो आणि त्याचं लष्कर धरतीवर नाहक घमेंड मिरवू लागले. त्यांना वाटलं आमच्याप्रत त्यांना परतायचं नाही.

४०) मग आम्ही त्यास त्याच्या लष्करासहित धरलं आणि त्यांना समुद्रात फेकून दिलं. पाहा तर पापी लोकांची शेवटी काय गत झाली ती.

४१) आम्ही त्यांना नरकाग्नीकडं बोलवणारे म्होरके बनवले. कयामतच्या दिवशी त्यांना कसलीच मदत लाभणार नाही.

४२) तसंच या जगी एक शाप त्यांच्या मागावर राहील. कयामतच्या दिवशी ते तिरस्कारित लोकांमध्ये मोडतील.

४३) आम्ही पूर्वीच्या पिढ्यांना नष्ट केल्यानंतर मूसा यांना ग्रंथ दिला. लोकांचे डोळे उघडावेत म्हणून. तसंच त्यांनी बोध घ्यावा म्हणून, मार्गदर्शन आणि कृपा (बहाल केली).

४४) आम्ही जेव्हा मूसा यांना दैवी आज्ञा दिल्या त्या वेळी तुम्ही (प्रेषित मुहम्मद स.) (तूर पर्वताच्या) पश्चिमेस नव्हता की तुम्ही ती (घटनाही) पाहिलेली नाही.

४५) आम्ही कितीतरी पिढ्या उदयास आणल्या. त्यांच्यावर दीर्घकाळ लोटला तुम्ही मदयन लोकांमधील रहिवासीही नव्हते त्यांना आमच्या आयती (वचनं) वाचून दाखवण्यासाठी आम्ही तर तुम्हांस प्रेषित करून पाठवणार होतो.

४६) आम्ही जेव्हा मूसा यांना तूर (पर्वताच्या) दिशेने हाक दिली त्या वेळीही तुम्ही नव्हता पण तुमच्या विधात्याची ही कृपा आहे. अशा समूहास सावध करण्यासाठी ज्यांच्याकडं पूर्वी कुणी ताकीद देण्यास आलेलं नाही, त्यांना बोध घेता यावा म्हणून.

४७) त्यांनी आपल्या हातांनी जे आगाऊ पाठवलंय त्यामुळं जर त्यांना आपत्तीनं घेरलं तेव्हा ते म्हणतात, आमच्या विधाता! आम्हांकडं एखादा प्रेषित का बरं पाठवला नाहीस, आम्ही तुझ्या आज्ञा पाळल्या असत्या आणि श्रद्धा धारण केली असती.

४८) पण जेव्हा त्यांना आमच्याकडून सत्य येऊन पोचलं तेव्हा म्हणू लागले, जे मूसाला दिलं गेलं ते आम्हांस का बरं दिलं नाही? त्यांनी त्यास नाकारलं नव्हतं जे आधी मूसा यांना दिलं गेलं होतं? ते म्हणाले, दोघे जादूगार आहेत एकमेकांना पूरक. ते म्हणाले, आम्ही तर नक्कीच नाकारत आहोत.

४९) त्यांना सांगा, मग जर तुम्ही खरं असाल तर तुम्हीच अल्लाहकडून असा ग्रंथ घेऊन या जो या दोन्हींपैकी (कुरआन आणि तोराह) अधिक चांगलं मार्गदर्शक असेल. मीही त्याचं पालन करीन.

५०) जर त्यांनी तुम्हास प्रतिसाद दिला नाही तर हे लक्षात असू द्या, ते स्वत:च्या इच्छांचं पालन करताहेत. आणि जे अल्लाहच्या मार्गदर्शनास सोडून स्वत:च्या इच्छांमागं जातात त्यांच्यापेक्षा मार्गभ्रष्ट कोण? अल्लाह अत्याचारी लोकांस मार्ग दाखवत नसतो.

५१) आम्ही त्यांना सतत हा संदेश पोचत राहिला त्यांना उपदेश करण्यासाठी.

५२) याआधी आम्ही ज्या लोकांना ग्रंथ दिला होता त्यांनी त्यावर निष्ठा ठेवली.

५३) जेव्हा ते त्यांना वाचून दाखवलं जातं तेव्हा म्हणतात, आम्ही एकनिष्ठ झालो. ते आमच्या विधात्याकडचं सत्य आहे. आम्ही तर पूर्वीपासूनच मुस्लिम (आज्ञाधारक) आहोत.

५४) अशा लोकांसाठी दुप्पट मोबदला दिला जाणार, कारण त्यांनी संयम पाळला आणि भलाईनं वाईटाचा बिमोड करतात आणि आम्ही दिलेल्या साधनांतून (इतरांसाठी) खर्च करतात.

५५) वायफळ गोष्टी ऐकल्यास तिच्यापासून दूर जातात नि म्हणतात, आम्हांस आमची कर्मं आणि तुमची कर्मं तुम्हांस. तुम्हांस शांतता लाभो, आम्ही अडाण्यांच्या मागं जात नाही.

५६) तुम्ही आपल्या मर्जीप्रमाणे कुणास मार्गदर्शन करू शकत नाही, पण अल्लाह ज्यास इच्छितो त्याला मार्गदर्शन करतो, कारण त्यास ठाऊक

आहे कोण मार्गदर्शन स्वीकार करतो.

५७) ते म्हणतात, जरी आम्ही तुमच्याबरोबर हे मार्गदर्शन अनुसरलं तर आम्हांस भीती वाटते आमच्या भूमीतून आम्हांस उपटून टाकलं जाईल. आम्ही त्यांना 'हरम'मध्ये (सुरक्षित स्थानी) निवास दिला नाही? ज्याच्याकडं आमच्याकडून त्यांच्या उपजीविकेसाठी सर्व प्रकारची फळं येतात. पण बहुतेक लोकांना ह्याची कल्पना नाही.

५८) आम्ही अशा कित्येक वस्त्या उद्ध्वस्त करून टाकल्या ज्यांना आपल्या आर्थिक साधनांचा गर्व वाटत असे. ह्याच त्यांच्या काही ओसाड पडलेल्या वस्त्या, त्यांच्यानंतर आम्हीच त्यांचे वारस झालो.

५९) तुमचा विधाता जोपर्यंत एखाद्या मोठ्या वस्तीमध्ये प्रेषितास पाठवत नाही त्यांना आमच्या आयती वाचून दाखवण्यासाठी, तसंच त्या वस्तीतील लोक अत्याचारी असल्याशिवाय आम्ही त्यांचा नाश करीत नसतो.

६०) तुम्हांस जे काही दिलं गेलंय ती फक्त या जगातल्या जीवनातील साधनं आणि तिचं सौंदर्य आहे. पण जे अल्लाहपाशी आहे ते अधिक उत्तम आणि शाश्वत आहे. तुम्हांस समज नाही?

६१) आम्ही ज्यास उत्तम वचन दिलं ते त्यास लाभेल. आणि तो अशा माणसासारखा आहे काय ज्यास आम्ही जगातल्या सुखसोयी दिल्या आणि कयामतच्या दिवशी त्यास हजर केलं जाईल?

६२) ज्या दिवशी तो त्यांना हाक देईल. म्हणेल, कुठं आहेत माझे भागीदार ज्यांची तुम्ही कल्पना केली होती?

६३) आणि मग ज्यांच्याविरूद्ध आरोप सिद्ध होईल ते म्हणतील, आमच्या विधाता! आम्ही ज्यांना भ्रष्ट केलं हेच ते लोक. जसं आम्ही मार्गभ्रष्ट झालो, तसंच त्यांनाही चुकीचा मार्ग दाखवला. आम्ही तुझ्या देखत या जबाबदारीतून मुक्त करून घेतो, ते आमची भक्ती करीत नसत.

६४) त्यांना सांगितलं जाईल, बोलवा तुमच्या भागीदारांना. ते त्यांना

बोलवतील, पण त्यांना ते उत्तर देणार नाहीत. त्यांना शिक्षा दिसून येईल; जर का त्यांनी मार्गदर्शन प्राप्त केलं असतं तर.

६५) त्या दिवशी त्यांना हाक देऊन विचारलं जाईल, प्रेषितांना तुम्ही काय उत्तर दिलं होतं?

६६) त्यांना त्या दिवशी काहीच सुचणार नाही. ते आपसांतही काही विचार करणार नाहीत.

६७) पण ज्यानं पश्चात्ताप व्यक्त केला, श्रद्धा ठेवून चांगली कर्मं केलीत तर त्यास यश लाभणे अपेक्षित आहे.

६८) तुमचा विधाता जे इच्छितो आणि ज्याची निवड करतो तेच निर्मितो. त्यांचा कसला अधिकार? अल्लाह धन्य असो ज्यांना ते भागीदार करतात त्यांच्यापेक्षा तो उच्चतर आहे.

६९) आणि ते मनामध्ये काय दडवतात आणि काय जाहीर करतात ते तुमच्या विधात्यास ठाऊक आहे.

७०) आणि तो अल्लाहच, त्याच्याशिवाय इतर कोण उपास्य (ईश्वर) नाही. सर्व स्तवन त्याच्यासाठीच, या जगात आणि नंतरदेखील परलोकात हुकूम त्याचाच आणि त्याच्याकडंच तुम्ही परतणार.

७१) त्यांना विचारा, पाहा जर अल्लाहनं रात्रीस कयामतच्या दिवसापर्यंत निरंतर कायम ठेवलं असतं तर अल्लाहव्यतिरिक्त कोण असा उपास्य (ईश्वर) जो तुम्हांस प्रकाश देऊ करील. ऐकू येतं तुम्हांस?

७२) त्यांना विचारा, तुम्ही पाहत नाही, जर अल्लाहनं दिवसास कयामतच्या दिवसापर्यंत निरंतर कायम ठेवलं, तर अल्लाहव्यतिरिक्त दुसरा कोण उपास्य (ईश्वर) ज्यानं त्यांच्या विश्रांतीसाठी रात्र आणली असती, त्यांना पाहता येत नाही?

७३) त्यानं आपल्या कृपेनं रात्र आणि दिवस बनवले, तुम्हांस (रात्र) विश्रांतीसाठी आणि (दिवस) त्याच्या विपुलतेतून काही मिळवण्यासाठी. तुम्ही कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून.

७४) त्या दिवशी त्यांना हाक देऊन विचारलं जाईल, कुठं आहेत तुमच्या कल्पनेतील माझे भागीदार?

७५) आम्ही प्रत्येक लोकसमूहातून एक साक्षीदार उभा करू आणि त्यांना सांगू, तुमचा पुरावा सादर करा. तेव्हा त्यांना कळून येईल की सत्य तर अल्लाहपाशीच आहे. आणि त्यांनी जे काही रचलं होतं ते वाया जाईल.

७६) कारुन हे मूसा (अ.) यांच्या लोकांपैकी एक. त्यांनी त्यांच्याशी दुर्वर्तन केलं, त्यास आम्ही एवढे खजिने बहाल केले होते की ज्यांच्या किल्ल्या शक्तीशाली लोकांच्या एका गटासही उचलता येत नसत. त्यास त्याचे लोक म्हणाले, गर्विष्ठ होऊ नकोस. अल्लाह गर्विष्ठांना पसंत करत नसतो.

७७) अल्लाहनं तुला जे दिलंय त्यापासून परलोकाची तरतूद कर. तसंच या जगातील तुझा भागही विसरू नकोस. आणि भलं कर जसं अल्लाहनं तुझ्याशी भलं केलंय. धरतीवर उपद्रव माजवू नकोस. उपद्रव माजविणारे अल्लाहस पसंत नसतात.

७८) तो म्हणाला, हे तर मला माझ्यामध्ये असलेल्या कौशल्यामुळं दिलं गेलंय. त्याला माहीत नाही अल्लाहनं किती पिढ्या नष्ट केल्यात जे त्याच्यापेक्षाही शक्तीशाली होत्या आणि प्रचंड संख्येनं होते. त्यांच्या पापांविषयी अपराधी लोकांना विचारलं जाणार नाही.

७९) तो (एकेदिवशी) लोकांसमोर नटूनथटून दिमाखात निघाला. ज्यांना या ऐहिक जीवनाची हौस होती, ते म्हणाले, कारुनला जे दिलं गेलंय ते आमच्यापाशीही असतं. खरंच खूपच नशीबवान आहे तो.

८०) पण ज्या लोकांना ज्ञान बहाल केलं होतं ते म्हणाले, दुर्दैव तुमचं! ज्यानं श्रद्धा बाळगली आणि नेक कर्म केलीत त्यांना अल्लाहचा मोबदलाच उत्तम होय. आणि जे संयम दाखवतात त्यांच्या व्यतिरिक्त हे कुणाला लाभत नसते.

८१) आम्ही कारुनला आणि त्याच्या घरच्यांना जमिनीत गाडून टाकलं.

मग अल्लाहशिवाय त्याच्या मदतीस कोणी समूह नव्हता आणि तो स्वत:देखील प्रतिकार करू शकला नाही.

८२) कालपर्यंत ज्यांना त्याचा हेवा वाटे सकाळी म्हणू लागले, काय हे दुर्दैव! अल्लाह आपल्या भक्तांपैकी ज्यांना इच्छितो विपूल साधनं बहाल करतो आणि (काहींना) काटकसरेनं देतो. जर अल्लाहनं आमच्यावर उपकार केले नसते तर आम्हांसदेखील जमिनीत गाडून टाकलं असता आणि काय हे दुर्दैव! नाकारणाऱ्यांना यशच येत नाही.

८३) हा परलोकातील निवास होय. आम्ही त्यांच्यासाठी बनवलाय जे धरतीवर मोठेपण इच्छित नाहीत. तसंच अनाचारही माजवत नाहीत. आणि सदाचारींचाच शेवट उत्तम असेल.

८४) कुणी भलं करून आलं तर त्यास त्यापेक्षा उत्तम (मोबदला) मिळेल. पण जर कुणी वाईट घेऊन आला असल्यास त्यास तसाच मोबदला मिळेल जशी कृत्यं त्यांन केलीत.

८५) ज्यानं तुम्हांवर हे कुरआन अनिवार्य केलंय तो तुम्हांस मूळ ठिकाणी (मक्का) परत आणील. त्यांना सांगा, माझ्या विधात्यास ठाऊक आहे कोणास मार्गदर्शन लाभलंय आणि कोण उघड मार्गभ्रष्ट झालाय.

८६) तुमची तर ही अपेक्षाच नव्हती, तुमच्याकडं ग्रंथ पाठवला जाईल, पण माझ्या विधात्याच्या कृपेमुळं (हे घडलंय), तेव्हा तुम्ही नाकारणाऱ्यांस मदत पुरवू नका.

८७) तुमच्याकडं अल्लाहच्या आयती (वचनं) अवतरल्या असता त्यांना त्यांच्यापासून रोखता कामा नये. आपल्या विधात्याकडं बोलवा आणि अनेकेश्वरींपैकी होऊ नका.

८८) तसंच अल्लाहबरोबर दुसऱ्या कुणा उपास्याचा (ईश्वराचा) धावा करू नका. त्याच्याव्यतिरिक्त कुणीही उपास्य (ईश्वर) नाही. त्याचं अस्तित्व वगळता सर्व काही नष्ट होईल. हुकूम त्याचाच, त्याच्याकडंच तुम्ही परतणार.

-------

# २९. सूरह अल अनकबूत

**मक्काकालीन, आयती ६९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आलिफ लाम मीम.

२) लोकांना असं वाटतं की, "आम्ही श्रद्धा बाळगली" म्हटले तर त्यांना सोडलं जाईल, आणि त्यांची परीक्षा घेतली जाणार नाही?

३) आम्ही त्यांच्या पूर्वीच्या लोकांची परीक्षा घेतलेली आहे. अल्लाह माहीत करून घेईल जे प्रामाणिक आहेत त्यांच्याविषयी आणि कोण खोटं बोलतात तेही माहीत करून घेईलच.

४) जे वाईट कर्मं करतात त्यांना वाटतं ते आमच्यापासून पळून जातील? त्यांचा हा विचार वाईट आहे.

५) ज्या कोणास अल्लाहच्या भेटीची अपेक्षा आहे, तर अल्लाहचं वचन पूर्ण होणारच. तो ऐकतो आणि जाणतो.

६) कोणी प्रयत्न करीत असेल तर तो स्वत:साठीच प्रयत्न करीत असतो. अल्लाह तर निश्चितच सर्व जगवासीयांपासून निरपेक्ष आहे.

७) जे श्रद्धा धारण करतात आणि सत्कर्मं करतात आम्ही त्यांच्यामधील वाईट गोष्टी दूर करू आणि आम्ही त्यांच्या कार्याचा उत्तम मोबदला देऊ.

८) आम्ही मानवास ताकीद दिली आहे आपल्या माता-पित्यांशी चांगुलपणानं वागण्याची. पण जर त्यांनी तुझ्यावर दबाव आणला, माझ्याबरोबर इतरांना भागीदार करण्याचं, ज्याच्याविषयी तुला काही माहिती नाही तर त्यांचं ऐकू नकोस. तुम्हांस माझ्याकडं परतावयाचंय. आणि मग तुम्ही जे करत होता ते मी दाखवून देईन.

९) जे लोक श्रद्धा धारण करतात आणि सत्कर्मं करतात त्यांना आम्ही भल्या लोकांमध्ये सामील करू.

१०) लोकांमध्ये काही असे आहेत जे म्हणतात, आम्ही श्रद्धा धारण केली, पण जेव्हा अल्लाहच्या कारणास्तव त्यांचा छळ होतो ते समजतात जणू ही अल्लाहचीच शिक्षा आहे. पण जेव्हा तुमच्या विधात्याकडून त्यांची काही मदत होते तेव्हा ते म्हणतात, आम्ही तर निश्चितच तुमच्याबरोबर आहोत.जगवासीयांच्या मनांमध्ये काय आहे ते अल्लाहस ठाऊक नाही?

११) जे श्रद्धावंत आहेत त्यांची माहिती अल्लाहस आहे. तसंच जे दांभिक आहेत तेही त्यास ठाऊक आहेत.

१२) नाकारणारे लोक श्रद्धावंतांना म्हणतात, तुम्ही आमच्या मार्गानं चला आम्ही तुमच्या सर्व चुका उचलून घेऊ. वास्तवात ते कसलंही ओझं उचलणार नाहीत. ते खोटे आहेत.

१३) ते तर स्वत:चंच ओझं उचलणार आहेत आणि इतरही काही ओझं, मात्र कयामतच्या दिवशी ते जे खोटं (खोट्या गोष्टी) घडत असत त्याविषयी त्यांना विचारलं जाईल.

१४) आम्ही नूह यांना त्यांच्या लोकांकडं पाठवलं. ते नऊशे पन्नास (९५०) वर्षं त्यांच्यामध्ये राहिले. ते (नूहचे लोक) पापी होते. त्यांना महापुरात बुडवून टाकलं.

१५) पण त्यांना (नूह यांना) आणि नौकेमधील (लोकांना) वाचवलं आणि जगवासीयांसाठी या घटनेला संकेत बनवलं.

१६) आठवा, जेव्हा इब्राहीम आपल्या लोकांस म्हणाले, अल्लाहची आराधना करा, त्याची भीती बाळगा, जर तुम्हांस समज असेल तर हेच तुमच्यासाठी उत्तम आहे.

१७) पण तुम्ही तर अल्लाहस सोडून मूर्तीची पूजा करता, तुम्ही खोटं करत आहात. अल्लाहस सोडून तुम्ही ज्यांचीदेखील पूजा करता ते तुमच्या उदरनिर्वाहाच्या साधनांचे मालक नाहीत. तुम्ही अल्लाहकडून निर्वाहाची मागणी करा. त्याची भक्ती करा. त्याचं आभार माना, त्याच्याकडंच तुम्हांस परतावयाचंय.

१८) पण जर तुम्ही खोटं ठरवलं तर तुमच्या पूर्वीच्या समूहांनीही खोटं ठरवलंय. स्पष्ट करून पोचवण्यापलीकडं प्रेषितांवर कोणती (जबाबदारी) नाही.

१९) तुम्ही पाहत नाही अल्लाह निर्माणप्रक्रियेची सुरवात कशी करतो. आणि त्याची पुनरावृत्तीही करतो. अल्लाहसाठी हे (अगदी) सोपं आहे.

२०) त्यांना सांगा, पृथ्वीमध्ये संचार करा आणि बघा अल्लाहनं निर्मितीचा आरंभ कसा केला आणि मग दुसऱ्यांदा जीवित करील. अल्लाह सर्व बाबींचं सामर्थ्य बाळगतो.

२१) वाटेल त्यांना शिक्षा देतो आणि वाटेल त्यांना दया दाखवतो. आणि तुम्ही त्याच्याकडंच परतवले जाणार आहात.

२२) तुम्ही त्यास धरतीवरही किंवा आकाशातही विफल करू शकणार नाही. अल्लाह सोडून तुमचा कुणी रक्षक नाही की कोणी मदत करणारा नाही.

२३) जे लोक अल्लाहच्या आयती आणि त्याची गाठ घेणं नाकारतात (वास्तविक पाहता) ते लोक माझ्या दयेपासून निराश झालेत. अशा लोकांना यातनादायक शिक्षा आहे.

२४) त्यांच्या (इब्राहीम अ. यांच्या) लोकांचं उत्तर यापलीकडं दुसरं काय होतं? की त्यास मारून टाका अथवा जाळून टाका. अल्लाहनं त्यास आगीतून वाचवलं. श्रद्धावंत लोकांसाठी यामध्ये संकेत आहेत.

२५) ते (इब्राहीम) म्हणाले, तुम्ही अल्लाहस सोडून मूर्ती बनवल्या आहेत, पण तुमची ही मैत्री या जगापुरतीच, कयामतच्या दिवशी तुम्ही एकमेकांविरूद्ध व्हाल, एकमेकांचा धिक्कार कराल, तुमचं ठिकाण तर नरकाग्नीच. तुमच्या मदतीसाठी कुणी नसेल.

२६) लूतनी श्रद्धा धारण केली. म्हणाले, मी माझ्या विधात्यासाठी देशही सोडणार आहे. तोच समंजस आणि प्रभुत्वशाली आहे.

२७) आम्ही त्यास (इब्राहीम अ.) यांना इसहाक आणि याकूब दिले. त्यांच्या वंशात प्रेषित बनवलं आणि ग्रंथ (दिलं). त्यांना याच जगी मोबदला

दिला आणि परलोकात ते नेक लोकांमध्ये असतील.

२८) आणि लूत यांना (पाठवलं) ते आपल्या लोकांस म्हणाले, तुम्ही अशी काही अश्लील कृत्यं करता जी तुमच्यापूर्वी विश्वामध्ये कुणी एकानंही केली नाहीत.

२९) तुम्ही पुरुषांशी अश्लील (कृत्यं) करता आणि वाटमारी करता, आपल्या बैठकांमध्ये वाईट कृत्यं करता. तेव्हा त्यांच्या लोकांचं उत्तर यापलीकडं काय होतं? ते म्हणाले, आणा अल्लाहचा प्रकोप जर तुम्ही खरं असाल तर.

३०) ते (लूत) म्हणाले, माझ्या विधाता! तूच मला मदत कर ह्या उपद्रवी लोकांविरूद्ध.

३१) जेव्हा आमचे दूत सुवृत्त घेऊन इब्राहीमकडं आले नि म्हणाले, आम्ही नक्कीच ही वस्ती उद्ध्वस्त करणार आहोत. इथले लोक निश्चितच पापी आहेत.

३२) ते (इब्राहीम) म्हणाले, याच वस्तीमध्ये लूतदेखील आहेत. त्यांनी उत्तर दिलं, ठाऊक आहे आम्हांस जे या वस्तीमध्ये आहेत. आम्ही त्यांस आणि त्यांच्या कुटुंबीयांस त्याची पत्नी वगळता, वाचवू. ती मागे राहणाऱ्यांपैकी आहे.

३३) मग जेव्हा आमचे दूत लूतपाशी आले तेव्हा ते घाबरले, त्यांच्या बाबतीत अडचणीत आले. ते म्हणाले, भिऊ नका, दु:खीही होऊ नका. आम्ही तुमच्या पत्नी वगळता तुम्हांस आणि तुमच्या कुटुंबीयांस वाचवू. ती मात्र मागं राहणार आहे.

३४) आम्ही ह्या वस्तीवर आकाशातून प्रकोप पाठवणार आहोत. कारण ते वाईट कृत्यं करत होते.

३५) आम्ही त्या वस्तीचे स्पष्ट अवशेष संकेत म्हणून समंजस लोकांसाठी शिल्लक ठेवलेत.

३६) मदयन (च्या लोकां)कडं आम्ही त्यांचे बंधु शुऐब यांना (पाठवलं).

ते म्हणाले, माझ्या लोकांनो, अल्लाहची आराधना करा, परलोकाची अपेक्षा करा, धरतीमध्ये हिंसा माजवू नका.

३७) पण त्यांनी त्यांना खोटं ठरवलं तेव्हा त्यांना एका भूकंपानं गाठलं असता सकाळी ते आपल्या घरांमध्ये तोंडघशी पडले.

३८) तसंच आद आणि समूद यांची (अवस्था) देखील त्यांच्या (पडीक) घरा-दारांवरून तुम्हांस स्पष्ट (दिसते) आहे. सैतानानं त्यांच्या कृत्यांना आकर्षक बनवलं होतं. त्यांना (रास्त) मार्गापासून रोखलं त्यांना समज असतानादेखील.

३९) तसंच कारुन, फिरऔन आणि हामान यांनाही (आम्ही नष्ट केलं कारण) मूसा त्यांच्याकडं स्पष्ट संकेत घेऊन आले असता त्यांनी धरतीवर उद्धटपणा केला. ते आम्हापासून पळून जाणार नव्हते.

४०) आम्ही त्या सर्वांना त्यांच्या पापांबद्दल धरलं. काही असे आहेत ज्यांच्यावर दगडांचा मारा केला, काहींना भयंकर आवाजानं धरलं, त्यांच्यापैकी काहींना आम्ही जमिनीत पुरलं तर काहींना बुडवलं. अल्लाहनं त्यांच्याशी असा अन्याय केला नसता, त्यांनी स्वत: अत्याचार करून घेतला.

४१) जे लोक अल्लाहस सोडून इतरांना आपला वाली बनवतात त्यांचं उदाहरण कोळ्यासारखं आहे. तो जसं घर बनवतो, सर्वांत फुसकं घर कोळ्याचंच असते. जर का त्यांना हे कळलं असतं.

४२) अल्लाहला सोडून ते (ज्यांचा) धावा करतात त्या सर्वांना अल्लाह ओळखतो. प्रभुत्वशाली आणि प्रतिभासंपन्न तोच आहे.

४३) आम्ही लोकांसमोर अशी उदाहरणं ठेवत असतो, पण ज्यांस ज्ञान नाही अशांना ती समजत नाहीत.

४४) अल्लाहनं अवकाश आणि पृथ्वी सत्याधिष्ठित निर्माण केली. यामध्ये श्रद्धावंतांसाठी संकेत आहेत.

४५) ग्रंथामधून तुम्हांस अनुभूतीद्वारे जे पाठवलं गेलंय त्याचं पठण करा,

नमाज कायम करा, निश्चितच नमाज अश्लील व वाईट गोष्टींस रोखते. अल्लाहचं स्मरण महत्त्वाचं आहे. काय तुम्ही करता ते अल्लाहस ठाऊक आहे.

**पारा - २१**

४६) तुम्ही ग्रंथधारकांशी वाद घालू नका, परंतु त्यांच्यापैकी काहींनी अत्याचार केला असल्यास भल्या रितीनं (प्रत्युत्तर द्या), आणि सांगा, आमचा त्यावर विश्वास आहे जे आम्हांस पाठवलं गेलंय. तसेच तुमच्यावर जे अवतरलं त्यावर. आमचा आणि तुमचा ईश्वर एकच. आम्ही त्यासच शरण गेलोत.

४७) अशा रितीनं आम्ही तुम्हांवर ग्रंथ अवतरला तेव्हा आम्ही ज्यांना ग्रंथ दिला ते श्रद्धा व्यक्त करतात. तसेच पूर्वीचे ग्रंथधारकदेखील श्रद्धा बाळगतात. आमच्या आयतींना (केवळ) अश्रद्ध लोक तेवढेच नाकारतात.

४८) आणि तुम्ही (मुहम्मद स.) याआधी कोणता ग्रंथ वाचत नव्हता की ते आपण उजव्या हातानं लिहीत होता. तसं असतं तर जे असत्याच्या मार्गावर असतात त्यांनी संशय घेतला असता.

४९) या तर स्पष्ट आयती (वचनं) आहेत ज्या लोकांना ज्ञान दिलं गेलंय त्यांच्या हृदयांमध्ये (सुरक्षित आहेत). आमच्या आयतींना अन्यायी लोकच नकार देतात.

५०) ते म्हणतात, त्याच्या विधात्याकडून त्याच्यावर संकेत का अवतरले नाहीत. त्यांना सांगा, संकेत तर अल्लाहपाशी आहेत. मी केवळ स्पष्टपणे ताकीद देणारा आहे.

५१) आम्ही तुमच्यावर ग्रंथ अवतरला जे तुम्हांस वाचून दाखवलं जातं हे त्या लोकांना पुरेसं नाही काय? निश्चितच यामध्ये श्रद्ध लोकांसाठी कृपावजा उपदेश आहे.

५२) त्यांना सांगा, माझ्या आणि तुमच्या दरम्यान साक्षी म्हणून अल्लाह

पुरेसा आहे. त्यास ठाऊक आहे. अवकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही. जे लोक पोकळ गोष्टी मान्य करतात आणि अल्लाहस नाकारतात तेच लोक विनाश पावतात.

५३) ते घाई करतात प्रकोप घडवून येण्यासाठी. आम्ही जर त्याची मुदत निश्चित केली नसती तर तो येऊन ठेपला असता. तो कोसळणारच अकस्मात- त्यांना नकळत.

५४) ते शिक्षेसाठी घाई करत आहेत, पण नरकानं नाकारणाऱ्यांभोवती वेढा घातलाय.

५५) ज्या दिवशी त्यांना प्रकोप वरून आणि पायाखालून पांघरून घेरून टाकील. अल्लाह म्हणेल, आता उपभोग घ्या तुम्ही जे काही करत राहिलात त्याचा.

५६) श्रद्धा धारण केलेले माझे भक्त लोकहो, माझी धरती विशाल आहे, तुम्ही माझीच आराधना करा.

५७) प्रत्येक जिवास मृत्यूचा चव घ्यायचीय. पुन्हा तुम्ही आमच्याकडंच परतणार आहात.

५८) जे लोक श्रद्धा बाळगतात आणि नेक कर्म करतात आम्ही त्यांना स्वर्गात उत्तुंग महालांमध्ये जागा देऊ ज्याच्या खालून नद्या वाहतात. ते सदैव तिथं राहतील. किती छान मोबदला (सु)कर्म करणारांना

५९) जे संयम बाळगतात आणि आपल्या विधात्यावर विश्वास ठेवतात.

६०) कित्येक प्राणी (असे) आहेत जे आपला उदरनिर्वाह वाहत नसतात. अल्लाह त्यांना तरतूद करतो आणि तुम्हांसही. तो ऐकत असतो आणि जाण ठेवतो.

६१) तुम्ही जर त्यांना विचारलं, कुणी निर्माण केलं हे आकाश व पृथ्वी आणि (कुणी) अधीन केलं सूर्या व चंद्रास. ते जरूर उत्तर देतील, अल्लाहनं. मग कुठं ते फसतात.

६२) अल्लाह आपल्या भक्तांपैकी इच्छितो त्यांना विपूल साधनं बहाल

करतो, तर कुणास काटकसरीनं देतो. अल्लाहस प्रत्येक बाब माहीत आहे.

६३) जर तुम्ही त्यांना विचारलं, कोण आकाशातून पाऊस पाठवतो आणि त्यापासून मृतावस्थेतील धरतीस कोण सजीव करतो. ते नक्कीच म्हणतील, अल्लाह. म्हणा, अल्लाहचा गौरव असो. पण बहुतेकांना हे समजत नाही.

६४) जगातलं हे जगणं काय खेळ आणि मौजेपलीकडं? वास्तवात परलोकाच्या घरातलंच खरं जगणं जर का त्यांना हे कळलं असतं.

६५) जेव्हा नौकेमध्ये स्वार असतात एकनिष्ठ होऊन श्रद्धेने अल्लाहचाच धावा करतात, पण अल्लाह जेव्हा सुखरूप त्यांना वाचवून भूमीवर आणतो तेव्हा ते लगेच अनेकेश्वरवाद माजवतात.

६६) कृतघ्न होतात त्यांना जे दिलं होतं त्याबद्दल आणि मौजमजेत वाहून जातात, पण त्यांना लवकच कळून येईल.

६७) ते पाहत नाहीत आम्ही हरम (काबागृह) बनवलं - शांततापूर्ण वास्तू आणि तरीपण त्याच्या सभोवारचे लोक लुबाडले जातात. ते पोकळ गोष्टी मान्य करतात आणि अल्लाहशी कृतघ्न होतात?

६८) जो अल्लाहच्या बाबतीत खोटं रचतो त्यापेक्षा मोठा अत्याचारी कोण? अथवा सत्य पोचूनही ते नाकारतो, अशा नाकारणाऱ्यास नरकच त्यांचं ठिकाण नको का?

६९) जे लोक आमच्या कारणास्तव प्रयत्न करतात आम्ही त्यांना आमचा मार्ग दाखवून देऊ. अल्लाह नेकी करणाऱ्यांची साथ देतो.

-------

# ३०. सूरह अर्रुम

**मक्काकालीन, आयती ६०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलिफ़ऽ लामऽ मीमऽ.

२) पराभूत झाले रोमन लोक.

३) जवळच्या प्रदेशात, पण आपल्या पराभवानंतर ते परत विजयी होतील.

४) काही वर्षांनी, आधीचा निर्णय आणि नंतरचाही अल्लाहचाच. त्या दिवशी श्रद्धावंतांस आनंद वाटेल.

५) अल्लाहच्या मदतीमुळं, तो मर्जीस येईल त्याची मदत करत असतो. तोच प्रभुत्वसंपन्न आणि दयावंत आहे.

६) हे अल्लाहचं वचन आहे. आपल्या वचनांविरूद्ध अल्लाह जात नसतो, पण बहुतेक लोकांस याची कल्पना नसते.

७) त्यांना या जगाच्या बाहेरील जीवनाचीच फक्त माहिती असते, पण आपल्या परलोकाच्या बाबतीत ते दुर्लक्ष करत असतात.

८) ते स्वत:चं अध्ययन करत नाहीत? त्यानं (अल्लाहनं) हे अवकाश, ही पृथ्वी आणि या दोहोंमध्ये जे काही आहे ते सहजासहजी निर्माण केले नसून ते सत्यतेवर आधारित आहे आणि एका निश्चित कालावधीसाठी आहे. (तरीदेखील) अशी माणसं आपल्या विधात्याच्या भेटीस नाकारत आहेत.

९) ते जगभर संचार करत नाहीत. त्यांच्या आधीच्या लोकांचा शेवट कसा झाला ते पाहिलं असतं. ते लोक त्यांच्यापेक्षा अधिक शक्तिशाली होते. त्यांनी जमिनीची मशागत केली, तीमध्ये त्यांनी वसाहती केल्या (आजच्या लोकांनी) केलेल्या वसाहतींपेक्षा मोठ्या संख्येनं. त्यांच्यामध्ये प्रेषित होऊन गेलेत स्पष्ट संकेतांसहित. अल्लाहनं त्यांच्यावर अत्याचार केले नव्हते, त्यांनी स्वत:हून अन्याय ओढवून घेतला.

१०) नंतर ज्यांनी वाईट कर्मं केलीत त्यांचा शेवटही वाईट झाला, त्यांनी अल्लाहच्या आयतींना (ग्रंथांना) खोटं ठरवलं आणि त्यांची चेष्टा केली.

११) अल्लाह निर्माणप्रक्रियेचा आरंभ करतो आणि मग दुसऱ्यांदा निर्मिती. आणि तुम्ही त्याच्याकडंच परतवले जाणार आहात.

१२) ज्या दिवशी प्रलय घडेल अपराधी निराश होऊन जातील.

१३) त्यांनी जे भागीदार करून ठेवले होते ते त्यांची मध्यस्ती करू शकणार नाहीत. म्हणून ते आपल्या भागीदारांना नाकारून टाकतील.

१४) ज्या दिवशी प्रलय येऊन ठेपेल, त्या दिवशी त्यांचे वेगवेगळे गट पडतील.

१५) ज्या लोकांनी श्रद्धा ठेवली आणि सत्कर्मं केली त्यांना स्वर्गात आनंदमय वातावरण लाभेल.

१६) ज्या लोकांनी बंड केलं, आमच्या आयतींना (वचनांना) आणि शेवटच्या दिवसाच्या भेटीस खोटं ठरवलं अशा लोकांना शिक्षेस सामोरं जावं लागेल.

१७) तेव्हा संध्याकाळ-सकाळ अल्लाहच्या पावित्र्याचा गौरव करा.

१८) आणि त्याचाच गौरव आकाश आणि पृथ्वीत दिवस ढळत असताना व दुपारी.

१९) तो मृतांतून सजीवांस काढतो आणि सजीवांतून मृतांस, आणि ही धरती मृतावस्थेत असता तिला सजीव करतो. अशाच रितीनं तुम्हांसही उठवलं जाईल.

२०) तुम्हांस चिखलमातीपासून निर्माण केलं, तेही त्याच्या संकेतांपैकीच. आणि पाहा, तुम्ही कसं सर्वत्र पसरलात.

२१) आणि हेदेखील त्याच्या संकेतांपैकीच, तुम्हांमधूनच तुमची जोडपी निर्माण केली (पुरुषासाठी स्त्री आणि स्त्रीसाठी पुरुष) तुम्हांस त्यांच्या

सान्निध्यात सुखसमाधान लाभावं म्हणून. आणि तुमच्यामध्ये त्यानं प्रेम आणि दया रोवले. यामध्ये अध्ययन करणाऱ्या लोकांस संकेत आहेत.

२२) आकाश आणि धरतीची निर्मितीही त्याच्याच संकेतांपैकी, तुमच्या विविध भाषा आणि तुमची विविध रंगरुपं यामध्येही संकेतं आहेत, विद्वान लोकांसाठी.

२३) आणि हेदेखील त्याच्याच संकेतांमधील, रात्री तुमचं झोपणं आणि दिवसा त्याच्या विपूलतेचा शोध घेणं (रोजीरोटीचा शोध) यामध्येही संकेत आहेत ऐकणाऱ्यांसाठी.

२४) आणि त्याचाच हादेखील संकेत तो तुम्हांस विजेचा (कडकडाट) दाखवतो ज्यामुळं भीती (निर्माण होते) तसेच आशा (जगतात) आणि आकाशातून पाऊस पाडतो मृत झालेल्या (कोरड्या) धरतीस सजीव करण्याकरिता. यामध्ये संकेत आहेत बुद्धिमंतांसाठी.

२५) आणि हे अवकाश व पृथ्वी जसं त्याच्या हुकमाचं पालन करत कायम आहेत त्याच्याच संकेतांमधील. मग पुन्हा जेव्हा तो तुम्हांस हाक देऊन जमिनीतून बोलवील, तोच तुम्ही निघून याल.

२६) अवकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही त्याच्या मालकीचं, सारे त्याच्याशीच एकनिष्ठ.

२७) निर्मितीस शून्यातून चालना देणारा तोच आणि दुसऱ्यांदा घडवणाराही तोच, त्याच्यासाठी हे अगदी सोपं आहे. अवकाश आणि पृथ्वीत उदात्त त्याचेच वैभव, तोच प्रभुत्वशाली आणि विवेकी.

२८) स्वत:चेच उदाहरण घ्या, तुमच्या मालकीत जे लोक आहेत त्यांना त्या साधनांमध्ये भागीदार बनवता काय? आम्ही तुम्हांस जे बहाल केलेत? ज्यामुळं तुमच्यामध्ये समानता नांदेल. तुम्ही त्यांना तसंच भिता जसं तुम्ही आपल्या लोकांस भिता. अशा रितीनं आम्ही आयती स्पष्ट करून देतो विद्वत्ताप्रचूर लोकांसाठी.

२९) नव्हं हे अपराधी तर ज्ञान नसल्यामुळं आपल्या वासनांमागं जातात.

मग ज्यांना अल्लाहनंच गैरमार्गी लावलं त्यांना कसे मार्गदर्शन लाभेल. त्यांना कुणी मदत पुरवावयासही नाही.

३०) तेव्हा धर्मासाठी एकाग्र व्हा. अल्लाहनं (घालून दिलेले हे) निसर्गनियम आहेत आणि त्या निसर्गनियमांनुसारच मानवांना निर्माण केलंय. अल्लाहच्या निर्मितीत बदल होत नसतो. हाच धर्म रास्त आहे बहुतेक लोकांना हे माहीत नाही.

३१) त्याच्याकडं वळून राहा (लक्ष द्या), त्याचीच भीती असू द्या, नमाज कायम करा, अनेकेश्वरींपैकी होऊ नका.

३२) ज्या लोकांनी आपल्या धर्माची शकले केली आणि पंथ बनून गेले, आणि ज्या गटाकडं जे आहे त्याच्यातच मौज-मजेत मग्न झालेत.

३३) जेव्हा लोकांना आपत्ती असते तेव्हा ते आपल्या विधात्यास हाक देतात, त्याच्याकडं वळतात. जेव्हा आम्ही त्यास दया दाखवतो, तोच त्यांच्यापैकी काही त्यांच्या विधात्यास इतर भागीदार जोडतात.

३४) आम्ही त्यांना जे दिलं त्याबाबत कृतघ्न होण्यासाठी सुखोपभोग घेत राहा. (पण) तुम्हांस लवकरच कळून चुकेल.

३५) त्याच्याबरोबर (अल्लाहबरोबर) ते जे इतर भागीदार जोडतात, त्यांच्या समर्थनार्थ आम्ही कोणते अधिकार पाठवलेत?

३६) आम्ही लोकांना दया दाखवतो, तेव्हा ते फुलून जातात, आणि त्यांनी स्वत:च्या हातांनी जे आगाऊ पाठवलंय त्यामुळं काही वाईट घडल्यास निराश होऊन जातात.

३७) ते पाहत नाहीत अल्लाह इच्छितो त्यांना विपूल साधनं देतो आणि काटकसरीनं (देतो ज्यांना इच्छितो). यामध्ये श्रद्ध लोकांसाठी संकेत आहेत.

३८) तुमच्याशी जवळीक असलेल्यांना त्यांचा हक्क (देणं) द्या. तसंच निराधारांना, प्रवासात आहेत त्यांना, ज्यांना अल्लाहची मर्जी हवी त्यांच्यासाठी हे उत्तम आहे. अशाच लोकांचा उत्कर्ष घडेल.

३९) तुम्ही लोकांच्या संपत्तीत वाढ होण्यास व्याज म्हणून जे देता अल्लाहजवळ त्याचा लाभ होणार नाही. पण तुम्ही अल्लाहच्या मर्जीखातर जी जकात (अनिवार्य दानधर्म) देता अशा माणसांची संपत्ती वाढत जाते.

४०) अल्लाहनं तुम्हांस जन्म दिला, तुमचे संगोपन केले, मग तुम्हांस मरण देतो आणि मग तुम्हांस सजीव करतो. आहेत तुमचे कोण भागीदार ह्या कामांपैकी एक तरी काम करू शकणारे! धन्य असो तो असीम आहे (अल्लाहचं) आणि जे (त्याचे) भागीदार बनवतात त्यांच्यापेक्षा तो श्रेष्ठ आहे.

४१) लोकांनी आपल्या हातांनी जे घडवलं त्यामुळं जळी-स्थळी अनाचार माजला. त्यामुळं त्यांना त्यांच्या काही कृत्यांचं फळ चाखू द्या, शक्यतो ते परत फिरतील.

४२) त्यांना सांगा, धरतीवर संचार करा आणि पाहा पूर्वीच्यांची शेवटी काय गत झाली ते. कारण त्यांच्यातले बहुसंख्य अनेकेश्वरी होते.

४३) तेव्हा रास्त धर्माकडंच तुमचं लक्ष असू द्या. अल्लाहनं अटळ केलेल्या दिवसाआधी, ज्या दिवशी सर्व वेगवेगळे केले जातील.

४४) ज्यांनी नाकारलं, ते नाकारणं त्यांना भोगावं लागेल. आणि जे नेक कर्म करतात ते स्वत:ची तरतूद करून घेतील.

४५) ज्यांनी श्रद्धा धारण केली आणि सत्कर्मं केली त्यांना त्याच्या कृपेने मोबदला देण्यास. तो नाकारणाऱ्यास मुळीच पसंत करत नाही.

४६) आणि (हेही) त्याच्या संकेतांपैकीच. तो वाऱ्यांना खूशखबर देण्यास पाठवतो, तुम्हांस त्याच्या कृपेनं उपकृत करण्यास. आणि त्याच्या आज्ञेनुसार नौका (सुरक्षित) चालतात त्याच्या विपुलतेचा शोध घेऊन तुम्ही त्यास कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी.

४७) आम्ही पूर्वीही प्रेषित पाठवलेत त्यांच्या लोकांकडं स्पष्ट संकेत घेऊन ते त्यांच्याकडं आले, पण ज्यांनी अपराध केले आम्ही त्यांचा प्रतिकार

केला. श्रद्धावंतांना मदत करण्यास आम्ही बांधील आहोत.

४८) अल्लाह वाऱ्यांना पाठवतो तेव्हा ते ढग उचलून आणतात. मग त्यांना जसं इच्छितो तसं आकाशात पसरवून देतो. मग त्या (ढगांना) तुकड्यांमध्ये विभागतो, मग तुम्ही त्यांच्यामधून पाऊस पडताना पाहता. आपल्या भक्तांपैकी ज्यांना इच्छितो त्यांना तो (हा पाऊस) पोचवतो तेव्हा ते हर्षोल्हास साजरा करतात.

४९) पण आधी ते (पाऊस) पडण्याआधी निराश होत होते.

५०) तेव्हा पाहा, अल्लाहच्या कृपेचं प्रतीक, जमिनीस तिच्या मृतावस्थेतून कसं सजीव करतो. तोच मृतांनाही जीवंत उठवणारा आहे. तो सर्व बाबींवर समर्थ आहे.

५१) आम्ही जर (असा) वारा पाठवला ज्यामुळं त्यांची (पिकं) पिवळी पडली तर मग त्यानंतर ते नक्कीच कृतघ्न होतील.

५२) तुम्ही मृतांस ऐकवू शकत नाही की बहिऱ्यांनाही ऐकवू शकता. जेव्हा ते पाठ दाखवून (निघून) जातात.

५३) तुम्ही अंध माणसाला त्याची वाट चुकल्यास (रास्त) मार्ग दाखवू शकत नाही, ऐकवूही शकत नाही. पण फक्त ज्यांनी आमच्या आयतींवर श्रद्धा ठेवली ते आज्ञाधारक आहेत.

५४) अल्लाहनं तुम्हांस दुर्बलावस्थेत जन्माला घातलं, मग या दुर्बलावस्थेनंतर तुम्हांस सशक्त केलं आणि त्या शक्तीनंतर पुन्हा दुर्बल करून म्हातारपण दिलं. इच्छितो ते निर्माण करतो. तो सर्वज्ञ असून सामर्थ्यवान आहे.

५५) ज्या दिवशी (कयामतच्या दिवशी) अपराधी लोक शपथेवर म्हणतील, ते घटिकेपेक्षा जास्त थांबले नसतील, अशाच रितीनं ते फसले जात असत.

५६) आणि ज्यांना ज्ञान व श्रद्धा दिली गेली ते म्हणतील, खरं तर तुम्ही अल्लाहनं विहीत केलेल्या दिवसापर्यंत थांबलात, आणि हाच तो उठून उभारण्याचा दिवस. पण तुम्हांस हे माहीत नव्हतं.

५७) ज्या दिवशी अपराधी लोकांनी पुढं केलेली सबब कामी येणार नाही की त्यांची विनवणी कामी येणार.

५८) आम्ही या कुरआनद्वारे लोकांसमोर हरप्रकारची उदाहरणं ठेवली, आणि तुम्ही त्यांच्यासमक्ष कोणते संकेत आणल्यास नाकारणारे म्हणतील, तुम्ही फसवेगिरी करता.

५९) अशा रितीनं अल्लाह अडाणी लोकांच्या हृदयांवर मोहर लावतो.

६०) तेव्हा धैर्य राखा, अल्लाहचं वचन सत्यात येणार; ज्या लोकांचा विश्वास नाही त्यांना तुम्ही दुबळं आढळता कामा नये.

-------

# ३१. सूरह लुकमान

**मक्काकालीन, आयती ३४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलिफऽ लामऽ मीमऽ.

२) एका प्रतिभासंपन्न ग्रंथाच्या या आयती होत.

३) भल्या लोकांसाठी मार्गदर्शन आणि कृपा.

४) जे लोक नमाज कायम करतात, जकात देतात आणि ज्यांचा परलोकावर विश्वास आहे

५) अशाच लोकांस त्यांच्या विधात्याचं मार्गदर्शन आहे. आणि हेच लोक उत्कर्ष पावतील.

६) माणसांपैकी जे लोक वायफळ गोष्टी मोल घेतात, समज नसल्यानं त्यांना अल्लाहच्या मार्गापासून पथभ्रष्ट करतात आणि त्यांची चेष्टा उडवतात. अशा लोकांना लज्जास्पद शिक्षा होईल.

७) जेव्हा त्यांना आमच्या आयती ऐकविल्या जातात तेव्हा ते अहंकारानं तोड फिरवतात, जसं त्यांनी ऐकलंच नसावं त्यांचे कान बहिरे असल्यागत. त्यांना आमच्या कडक शिक्षेची खूशखबर द्या.

८) जे श्रद्धावंत लोक आहेत आणि सत्कर्मं करतात, त्यांच्यासाठी निश्चितच संपन्न असे स्वर्ग आहे.

९) ते सदाकाळ तिथं राहतील. हे अल्लाहचं वचन आहे, सत्य वचन. तोच प्रभुत्वशाली व प्रतिभावंत आहे.

१०) त्यानं कोणत्याही आधाराविना आकाश निर्माण केले, तुम्ही पाहतच आहात आणि धरतीत पर्वतं रोवली तुम्हांस घेऊन ती कलंडू नये म्हणून. आणि यामध्ये (धरतीवर) सर्व प्रकारचे प्राणी पसरवले, आकाशातून पाऊस पाठवला आणि त्यापासून हरप्रकारच्या उत्तम

(जोड्या) उगवल्या.

११) ही अल्लाहची निर्मिती आहे. (आता) तुम्ही मला दाखवा, तो सोडून इतरांनी काय निर्माण केलं. नव्हे अपराधी आहेत ते पार भरकटलेले.

१२) आम्ही लुकमान यांना ज्ञान बहाल केलं. त्यांनी अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करण्यास. पण जो कुणी कृतज्ञ होतो तो स्वत:शी कृतज्ञ होतो. जर कुणी कृतघ्न झाला तर अल्लाह निरपेक्ष असून प्रशंसेस पात्र आहे.

१३) आठवा, आपल्या पुत्रास उपदेश करीत लुकमान म्हणाले, माझ्या मुला! अल्लाहस कुणी भागीदार बनवू नकोस, अनेकेश्वरवाद माजवणं मोठं पाप आहे.

१४) आम्ही मानवास माता-पित्याशी (भलाईनं वागण्याची) ताकीद दिली. तिच्या आईनं कष्टावर कष्ट सहन करीत त्यास धारलं, दोन वर्षं त्यास अंगावर पाजलं. तेव्हा माझं कृतज्ञ व्हा आणि माता-पित्यांचं. माझ्याप्रतच येणं आहे.

१५) पण जर त्यांनी तुला माझं भागीदार ठरवण्याचा आग्रह धरला, ज्यांच्याबाबतीत तुला माहिती नाही, तर त्यांचं ऐकू नका, तर आयुष्यभर त्यांच्यासोबत भल्या पद्धतीनं राहा. आणि माझ्याकडं येणारा मार्ग अवलंब कर, तुला माझ्याकडंच परतावयाचंय. तेव्हा तू करत राहिला ते मी तुला दाखवून देईन.

१६) माझ्या मुला! तिळमात्र जरी काही (वाईट) असेल आणि ते एखाद्या खडकाखाली दडलं असेल अथवा आकाशात किंवा पृथ्वीमध्ये जरी (लपलेलं) असेल, तर अल्लाह (पुढं) आणील. अल्लाह निश्चितच सूक्ष्मदर्शी आणि बुद्धिवंत आहे.

१७) माझ्या मुला! नमाज कायम कर, न्याय्य ते कर, गैर असेल त्याची मनाई कर, काही आपत्ती कोसळल्यास संयमानं वाग, निश्चितच ही कामं मोठ्या हिंमतीची आहेत.

१८) लोकांशी बोलताना तोंड वाकडं करू नकोस, जमिनीवर ऐटीत मिरवू

नकोस, कारण अल्लाहस उद्धटपणा करणारे आवडत नसतात.

१९) मध्यम गतीनं चालत जा, आपला आवाज धिमा असू दे, कारण गाढवाचा आवाज सर्वांत वाईट असतो.

२०) तुम्ही पाहत नाही अल्लाहनं अवकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही तुमच्या अंकित केलं आणि उघड अथवा गुप्त, आपल्या औदार्यातून भरपूर असं दिलं. काही माणसं अशी आहेत जी अल्लाहसंबंधी कसलंच ज्ञान नसताना मार्गदर्शन लाभलेलं नसताना की ग्रंथ नसताना वाद घालतात.

२१) त्यांना अल्लाहनं जे पाठवलंय त्याचं पालन करण्यास सांगितलं असता ते म्हणतात, आम्ही तर आमचे पूर्वज ज्या (मार्गावर) आढळले त्याचंच पालन करणार. जर सैतान त्यांना नरकाच्या शिक्षेकडं बोलवत असेल तरीदेखील?

२२) जो अल्लाहस समर्पित झाला आणि तो नेक असेल तर त्यानं भक्कम आधार धरला आणि सर्व प्रकरणांची परिणती अल्लाहकडंच आहे.

२३) कुणी नाकारत असेल तर त्या नकारानं तुम्ही दु:खी होऊ नका. ते आमच्याकडंच परतणार आहेत. तेव्हा आम्ही दाखवून देऊ ते जे करत होते. अल्लाहस निश्चितच हृदयातील गोष्टी माहीत असतात.

२४) आम्ही त्यांना थोडंसं सुख देऊ आणि मग त्यांना एका भीषण शिक्षेकडं खेचून आणू.

२५) तुम्ही जर त्यांना विचारलं, कुणी बरं हे आकाश आणि पृथ्वी निर्माण केले? ते नक्कीच म्हणतील, अल्लाहनं. सांगा, अल्लाहचा गौरव असो, बहुतेकांना हे माहीत नाही.

२६) अवकाश आणि पृथ्वीमधील सर्व अल्लाहच्याच मालकीचं. अल्लाह गरजमुक्त आणि प्रशंसेस पात्र आहे.

२७) जरी धरतीवरील सारेच्या सारे वृक्ष लेखण्या बनल्या आणि सर्व समुद्र त्यामध्ये आणखी सात समुद्राची भर टाकून शाई बनले तरीदेखील अल्लाहच्या गोष्टी संपणार नाहीत. अल्लाह प्रभुत्वसंपन्न आणि विवेकी आहे.

२८) तुमची उत्पत्ती आणि पुनरुत्थान फक्त एका आत्म्यास (जन्म देण्या) सारखं आहे. अल्लाह निश्चितच ऐकतो आणि पाहतो.

२९) तुम्ही पाहत नाहीत, अल्लाह दिवसास रात्रीत विलीन करतो आणि रात्रीतून दिवस उजाडतो. त्यांना सूर्य आणि चंद्रास अंकित केलं आणि सर्व आपल्या ठराविक मुदतीपर्यंत भ्रमण करत राहतील. आणि तुम्ही जे काही करता त्याची अल्लाहस माहिती असते.

३०) कारण अल्लाहच सत्य आहे, त्यास सोडून ज्या इतरांचा धावा करतात ते लबाड आहेत. अल्लाहच सर्वोच्च नि महान आहे.

३१) तुम्ही पाहत नाही अल्लाहच्या कृपेमुळं समुद्रात नौका चालत असतात. त्याचे संकेत निदर्शनास आणण्यासाठी. यामध्ये संकेत आहेत जे सातत्य राखतात, आणि कृतज्ञ असतात त्यांच्यासाठी.

३२) जेव्हा एखादी लाट त्यांना छत्रासारखी वेढून टाकते तेव्हा ते निखालस श्रद्धापूर्वक केवळ अल्लाहचाच धावा करतात. मग आम्ही जेव्हा वाचवून भूमीकडं आणतो, तेव्हा त्यांच्यामधील काही मर्यादा पाळतात आणि आमच्या आयतींचा (आदेशांचा) भंग करत नाहीत, वचनभंग करणाऱ्या कृतघ्न लोकांशिवाय दुसरं कुणी नाही.

३३) लोकहो! आपल्या विधात्यास भिऊन राहा, तसंच ह्याचीही भीती असू द्या ज्या दिवशी पिता आपल्या मुलासाठी की मुलगा पित्यास काही कामी येणार (नाही). अल्लाहचा शब्द सत्य आहे. या जगातलं जीवन तुम्हांस भुलवू नये अथवा फसवेगिरी करणारे अल्लाहबद्दल तुमची फसवणूक करू नयेत.

३४) त्या घटिकेबद्दल अल्लाहसच माहीत आहे, तोच पाऊस वर्षवतो आणि उदरांत (मातेच्या) काय आहे त्यासच माहीत आहे. आपण उद्या काय करणार आहोत ते आपणासही ठाऊक नसतं, आणि कोणत्या जागी त्यास मरण येईल हेही कोणासच ठाऊक नाही. पण अल्लाह सर्वज्ञ आहे, त्यास सर्व (बाबींची) माहिती आहे.

-------

# ३२. सूरह अस्सजदा

**मक्काकालीन, आयती ३०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अलिफऽ लामऽ मीमऽ.

२) हा ग्रंथ सकल विश्वाच्या विधात्यानं पाठवलाय यात मुळीच संदेह नाही.

३) त्यांचं म्हणणं काय? तुम्ही ते रचलंय? नव्हं हे तर तुमच्या विधात्याचं सत्य आहे. त्या लोकांना ताकीद देण्यासाठी ज्यांना ताकीद देण्यास तुमच्यापूर्वी कोणी आलं नव्हतं. म्हणजे त्यांना मार्गदर्शन लाभेल.

४) तो अल्लाहच ज्यानं हे अवकाश व धरतीस आणि त्यामधील सर्वकाही सहा दिवसांमध्ये निर्माण करून सिंहासनावर विराजमान झाला. त्यास सोडून तुमचा कोणी संरक्षक नाही की मध्यस्त नाही. तुम्ही मग याकडं लक्ष देणार नाही?

५) आकाश ते पाताळापर्यंतच्या सर्व व्यवहारांची तजवीज तोच करतो, मग एक दिवस तुमच्या गणनेनुसार जी संख्या एक हजार वर्षं इतकी आहे तो (त्या व्यवहारांचा अहवाल) त्याच्यापाशी जाईल.

६) तो गुपित आणि उघड सर्वांची माहिती ठेवतो. तो सर्वोच्च व कृपावंत आहे.

७) त्यानं जे निर्माण केलं ते सौंदर्यानं निर्माण केलं, त्यानं माणसाच्या निर्माणप्रक्रियेचा आरंभ चिखलमातीपासून केला.

८) मग एका क्षुल्लक प्रकारच्या पाण्याच्या सत्वानं त्याचा वंश चालवला.

९) मग त्यास साकारलं आणि आपल्या आत्म्यातून त्यात फुंकलं, मग पुन्हा तुमचं कान, डोळं आणि हृदय बनवलं, पण तुमच्यातले काही मोजकेच लोक कृतज्ञ होतात.

१०) ते विचारतात, मग काय आमची माती होऊन गेल्यावर आम्ही नव्यानं जन्म घेऊ? नव्हे ते आपल्या विधात्याच्या भेटीस नाकारतात.

११) त्यांना सांगा, तुमच्यावर नियुक्त मृत्यूचा दूत ताबा मिळवेल आणि मग तुम्ही आम्हाकडं परतवले जाणार आहात.

१२) पाहा, अपराधी लोक आपल्या विधात्यासमोर मान खाली घालून (म्हणत असतील) आमच्या विधाता! आम्ही पाहून घेतलं आणि ऐकून घेतलं. (आता) आम्हांस परत पाठव, आम्ही चांगलं कर्म करू. (आता) आम्हांस खात्री पटली.

१३) आम्ही ठरवलं असतं तर नक्कीच प्रत्येकास मार्गदर्शन दिलं असतं. पण आता माझं शब्द सत्यात उतरलं. मी भरून टाकीन नरकाला, जिन्न आणि मानवांनी दोन्हींनी.

१४) आता उपभोग घ्या त्या दिवसाच्या भेटीस्तव. तुम्ही जे विसरून टाकलं होतं म्हणून आम्हीही तुम्हांस विसरून गेलो. आता कायम शिक्षा उपभोगा तुमच्या कर्मांचं प्रतिफळ.

१५) आमच्या आयतींशी तेच श्रद्धा ठेवतात ज्यांना त्यांचं स्मरण केल्यास ते नतमस्तक होतात, आपल्या विधात्याच्या गौरव आणि पावित्र्याचं गुणगान करतात आणि मुळीच उद्दाम होत नसतात.

१६) जे आपली कुशी सोडून देतात (झोपत नाहीत) आपल्या विधात्याच्या भीती आणि अपेक्षेनं धावा करतात, आणि आम्ही बहाला केलेल्या साधनांमधून खर्च करतात.

१७) त्यांच्या कर्मांचा मोबदला म्हणून त्यांच्या डोळ्यांनी सुखकारक असं काय लपवून ठेवलंय हे कोणासही माहीत नाही.

१८) जो एकनिष्ठ असतो तो बंडखोरासारखा असतो का? ते समान नसतात.

१९) ज्यांनी श्रद्धा बाळगली आणि सत्कर्मं केलीत त्यांच्या आदरार्थ घरासमान स्वर्ग आहेत. त्यांच्या सत्कर्मांचा मोबदला.

२०) आणि ज्या लोकांनी बंड केला, त्यांचं (ठिकाण) नरकाग्नी आहे,

त्यातून त्यांनी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर पुन्हा त्यातच ढकललं जाईल आणि सांगण्यात येईल, तुम्ही जे खोटं ठरवत असत त्याबद्दल नरकाग्नीच्या शिक्षेचा उपभोग घ्या.

२१) आम्ही त्यांना त्या महान शिक्षेआधी (या जगात) शिक्षेची चव देऊ त्यांनी परतावं म्हणून.

२२) ज्यास त्याच्या विधात्याच्या आयतींची शिकवण देऊनही त्यानं तोंड वळवलं, त्यापेक्षा आणखी अपराधी कोण? आम्ही अपराधी लोकांशी बदला घेणारच.

२३) आम्ही मूसांना ग्रंथ दिला, तेव्हा त्याच्या भेटीविषयी संभ्रम नको आणि आम्ही त्यास इस्राइलच्या लोकांसाठी मार्गदर्शन बनवलं.

२४) आम्ही त्यांच्यामधून नेते उभे केले, ते संयमानं आमच्या आदेशांनुसार मार्गदर्शन करत होते आणि आमच्या आयतींविषयी विश्वास बाळगत होते.

२५) निश्चितच ज्या बाबतीत त्यांचे मतभेद आहेत, कयामतच्या दिवशी तुमचा विधाता त्या बाबतीत निकाल लावील.

२६) आम्ही यांच्यापूर्वी अशा कितीतरी लोकसमूहांना नष्ट केलं ज्यांच्या अवशेषांमध्ये हे फिरत आहेत, मग यापासून त्यांनी धडा नाही का घेतला, यामध्ये आमचं संकेत आहेत, त्यांना ते ऐकू येत नाहीत?

२७) त्यांना दिसत नाही कोरडी पडलेल्या जमिनीत आम्ही पाणी वाहून देतो, मग त्यापासून आम्ही पिकं काढतो, त्यातून त्यांची जनावरं आणि ते खातात. त्यांना पाहता येत नाही?

२८) हे विचारतात, तुम्ही जर सत्य (बोलत) असाल तर याचा उलगडा कधी होणार?

२९) त्यांना सांगा, जरी त्यांनी (आता) निर्णयाच्या दिवशी त्यांनी श्रद्धा राखली तर काही लाभणार नाही. त्यांना सवडही दिली जाणार नाही.

३०) तेव्हा त्यांच्यापासून दूर व्हा. वाट पाहा, तेसुद्धा वाट पाहताहेत.

-------

# ३३. सूरह अल अहजाब

**मदीनाकालीन, आयती ७३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हे प्रेषित! अल्लाहस भिऊन राहा, नाकारणाऱ्यांचं आणि दांभिकांचं ऐकू नका. अल्लाहच सर्वज्ञ आणि प्रतिभासंपन्न आहे.

२) तुमच्या विधात्यानं तुम्हांस जे अनुभूतीद्वारे कळवलंय त्याचं पालन करा. कारण तुम्ही जे काही करता त्याची अल्लाहस माहिती आहे.

३) अल्लाहवर विश्वास ठेवा. अल्लाह तुमचा पुरेसा वाली आहे.

४) अल्लाहनं कुणा एका मनुष्याच्या उरात दोन हृदयं बनवली नाहीत. तुमच्या पत्नींस जर आई म्हणून संबोधलं तरी त्यांना तुमच्या माता नाही बनवल्या. तसंच तुम्ही ज्यांना दत्तक घेतलं असेल त्यांना तुमची मुलं बनवली नाही, ह्या तर फक्त तुम्ही आपल्या तोंडांनी म्हणत असता. पण अल्लाह सत्य तेच सांगतो, तो तुम्हांस मार्ग दाखवतो.

५) त्यांना त्यांच्या वडिलोपार्जित नावानंच बोलवत जा, हेच अल्लाहच्या दृष्टीनं न्याय्य आहे. पण जर तुम्हांस त्यांच्या बापांविषयी माहिती नसेल तर मग ते तुमचे धर्मबंधु आणि स्नेही आहेत. तुम्ही चुकलात त्याबद्दल तुमचा काही दोष नाही. परंतु जर तुम्ही मनापासून मुद्दाम केलं तर (विचारणा होईल), अल्लाह क्षमाशील आणि कृपावंत आहे.

६) प्रेषित श्रद्धावंतास त्यांच्या स्वत:च्या जिवांपेक्षा अधिक जवळचे आहेत. त्यांच्या (प्रेषितांच्या) पत्नीं त्यांच्या माता होत. आणि अल्लाहच्या हुकमानुसार श्रद्धावंत आणि स्थलांतरित लोकांपेक्षा रक्ताची नाती एकमेकांस अधिक जवळची आहेत. तरीपण तुम्ही आपल्या स्नेही लोकांशी उचित पद्धतीनं वागा, अल्लाहच्या ग्रंथामध्ये याचा उल्लेख केलाय.

७) आणि आठवण राहू द्या, आम्ही प्रेषितांकडून करार करून घेतलाय.

तुमच्याशी, नूह यांच्याशी आणि इब्राहीम व मूसा, तसंच मरयमपुत्र ईसा यांच्याशी आम्ही पक्कं वचन घेतलंय.

८) असं की या सच्चा लोकांस त्यांच्या सत्यतेविषयी विचारलं जाईल, आणि ज्यांना विश्वास नाही त्यांच्यासाठी यातनादायक शिक्षा तयार ठेवलीय.

९) श्रद्धावंत लोकहो! तुमच्यावर अल्लाहनं केलेली कृपा आठवा, जेव्हा तुमच्यावर सैन्य चालून आलं तेव्हा आम्ही त्यांच्यावर एक भयंकर वादळ पाठवलं आणि सैन्य पाठवलं जे तुम्हांस दिसलं नाही. पण तुम्ही जे करत होता त्यास अल्लाह पाहत होता.

१०) जेव्हा ते तुमच्यावरून आणि खालून चालून आले तेव्हा तुमचे डोळे मिटून गेले, काळीज तोंडाशी आले. आणि तुम्ही अल्लाहच्या बाबतीत काहीबाही विचार करू लागलात.

११) या ठिकाणी श्रद्धावंतांची परीक्षा घेण्यात आली आणि ते प्रचंड हादऱ्यानं हादरून गेले.

१२) तेव्हा दांभिक आणि अशी माणसं ज्यांच्या मनांना विकृती जडलीय म्हणू लागले, अल्लाह आणि त्याच्या प्रेषितानं जे वचन दिलं ते फसवणुकीपलीकडं काहीच नव्हतं.

१३) त्यांच्यापैकी एक गट म्हणाला, मदीनेचे लोकहो! आता तुमचं काही खरं नाही. आता परत चला, तर (आणखीन) एक गट प्रेषितांकडं असे सांगत परवानगी मागत होता, की आमची घरं सुरक्षित नाहीत, पण ते धोक्यात नव्हते. त्यांना तर नुसती पळ काढायची होती.

१४) पण जर का त्याच्या (मदीनेच्या) सभोवारून ते (शत्रू) आत शिरले असते आणि त्यांना (शत्रूद्वारे) दंगल माजवण्यास उत्तेजन दिलं तर त्यांनी त्यास होकार दिला असता, थोडासुद्धा उशीर न लावता.

१५) वास्तविक पाहता त्यांनी आधी अल्लाहस वचन दिलं होतं ते पाठ दाखवणार नाहीत म्हणून अल्लाहस जे वचन दिलेलं होतं त्याबाबत

त्यांना विचारलं जाईल.

१६) त्यांना सांगा, तुम्ही मृत्यू किंवा हत्येच्या (भीतीनं) पळून जात असाल तर तुमचं पळून जाणं काही हितकारक ठरणार नाही. शिवाय ते औटघटकेचं ठरेल.

१७) त्यांना सांगा, जर अल्लाह तुमच्या वाईटावर असेल अथवा त्यानं तुम्हांस कृपा करण्याचं इच्छिलं असेल तर कोण तुम्हांस अल्लाहपासून वाचवू शकेल! अल्लाहव्यतिरिक्त त्यांना कुणी वाली किंवा मदत पुरवणारा नाही.

१८) जे लोक अडथळे आणत आहेत आणि आपल्या बंधुंना म्हणतात, (परत) या आमच्याकडं, त्यांना अल्लाह ओळखून आहे. हे लोक युद्धात थोडाच वेळ टिकत असतात.

१९) तुमच्या बाबतीत अभिलाषी आहेत, धोक्याची वेळ आल्यास तुम्ही पाहा त्यांना जसे एखाद्यास मृत्यू ओढवून घेत असताना तो जसं डोळे गरगरून पाहत असतो तसंच ते तुम्हांस पाहतात. मात्र जेव्हा ती भीती टळते तेव्हा लोभी बनून तीव्र भाषेत तुमच्याविरूद्ध त्वेषानं बोलू लागतात. ते श्रद्धा धारण करणार नाहीत, म्हणून अल्लाहनं त्यांची सारी कर्मं फोल ठरवून दिली, तसं करणं अल्लाहस सोपं आहे.

२०) त्यांना वाटू लागतं, (शत्रूंचा) जमाव अजून गेलेला नाही. आणि जर तो जमाव परत आला तर त्यांची इच्छा असते वाळवंटात दूर निघून जावं खेडूत अरबांमध्ये आणि तिथून तुमच्या हालचालींची माहिती घेत राहावी. ते तुमच्यामध्ये राहिलेही असते तरी युद्धात त्यांनी नावापुरताच भाग घेतला असता.

२१) तुमच्यामधील अशा प्रत्येकासाठी ज्यांना अल्लाह आणि परलोकाच्या बाबतीत आकांक्षा आहेत आणि जे अल्लाहच्या स्मरणात मग्न असतात त्यांच्यासाठी अल्लाहच्या प्रेषितांमध्ये उत्कृष्ट आदर्श आहे.

२२) शत्रूंचा जमाव पाहताच श्रद्धावंत म्हणू लागले, हेच ते वचन जे आम्हांस अल्लाह आणि त्याच्या प्रेषितानं दिलं होतं. अल्लाह आणि

त्याच्या प्रेषितांचं म्हणणं खरं होतं. यामुळं त्यांच्या श्रद्धेत भरच पडली नि आज्ञापालनात त्यांचा उत्साह आणखीनच वाढला.

२३) श्रद्धावंत लोकांपैकी काही व्यक्तींनी अल्लाहस दिलेलं वचन सत्यात आणलं. त्यांच्यापैकी काहींनी आपलं नवसं (अल्लाहच्या कारणास्तव आपल्या प्राणांची आहुती देण्याचं वचन.) फेडलं तर काही वाट पाहत आहेत ते बदललेले नाहीत.

२४) हे अल्लाहस सत्यवान लोकांना त्यांच्या सत्यतेचा मोबदला देण्यासाठी आहे. आपल्या मर्जीनुसार दांभिकांना तो शिक्षा देईल अथवा त्यांच्याकडून पश्चात्ताप स्वीकारील, कारण अल्लाह क्षमाशील आणि दया दाखवणारा आहे.

२५) अल्लाहनं अश्रद्धांना परतवून लावला, त्यांचा त्वेष त्यांना उपयोगी पडला नाही, आणि विश्वासूंना अल्लाह त्यांच्या लढ्यात पुरेसा आहे. तोच शक्तिशाली आणि प्रभुत्वशाली आहे.

२६) आणि ग्रंथधारकांमधून ज्यांनी त्यांना मदत पुरवली होती त्यांना त्यांच्या बालेकिल्ल्यातून खाली आणलं आणि काहींना तुम्ही ठार केलं तर काहींना कैदी बनवलंत. (यामुळं) त्यांच्या हृदयांवर धाक बसवली.

२७) आणि तुम्हांस त्यांच्या जमिनींचा, त्यांच्या घरांचा, त्यांच्या संपत्तीचा आणि ज्या भूमीवर तुम्ही पाऊल (सुद्धा) टाकलं नव्हतं त्यांचा वारस बनवला. अल्लाहस सर्व बाबींवर सामर्थ्य आहे.

२८) हे प्रेषित! तुमच्या पत्नींस सांगा, जर तुम्हांस याच जगातलं जीवन आणि त्याचं ऐश्वर्य आवडत असेल तर मी तुम्हांस काही देऊन उत्तम रितीनं निरोप देतो.

२९) पण जर तुम्हांस अल्लाह, त्याचे प्रेषित आणि परलोकातील घराची आवड असेल तर मग तुमच्यापैकी जे नेक आहेत त्यांच्यासाठी अल्लाहनं महान मोबदला तयार ठेवलाय.

३०) प्रेषितांच्या पत्नीं! तुम्हांपैकी जर कुणी उघड गैरवर्तणूक घडवली असेल

तर तिला दुप्पट शिक्षा मिळेल आणि अल्लाहस हे सोपं आहे.

**पारा - २२**

३१) आणि (जर) तुमच्यापैकी कुणी अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचं पालन करून सत्कर्म केले असल्यास आम्ही त्यांना दुपटीनं मोबदला देऊ. आणि त्यांच्यासाठी आम्ही औदार्यपूर्ण उपजीविका तयार ठेवलीय.

३२) प्रेषिताच्या पत्नी! तुम्ही इतर स्त्रियांप्रमाणं नाहीत. तुम्ही सदाचारी असल्यास कोणाशी बोलताना मृदुभाषी असता कामा नये. ज्याच्या हृदयात विकृती असेल तो लोभात पडेल. स्पष्ट आणि सरळ सरळ बोलत जा.

३३) आपल्या घरांमध्ये राहा, अज्ञानपूर्व काळात होई तशा शृंगाराचं दर्शन घडवू नका, नमाज कायम करा, जकात अदा करा, अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचं अनुसरण करा. तुम्ही (प्रेषिताचे) कुटुंबीय आहात. तुमच्यामधील विकृती दूर करणं ही अल्लाहची इच्छा आहे. तो तुम्हांस पावन आणि निष्कलंकित करू इच्छितो.

३४) तुमच्या घरांमध्ये अल्लाहच्या आयती (कुरआन) आणि प्रतिभांचं जे वर्णन होतं त्याची आठवण राहू द्या. अल्लाह सूक्ष्म बाबींची माहिती बाळगतो.

३५) मुस्लिम पुरुष व मुस्लिम स्त्रिया, श्रद्धाळू पुरुष व श्रद्धाळू स्त्रिया, सदाचारी पुरुष व सदाचारी स्त्रिया, रास्त पुरुष व रास्त स्त्रिया, संयमी पुरुष व संयमी स्त्रिया, विनम्र पुरुष व विनम्र स्त्रिया, दानधर्म करणारे पुरुष आणि दानधर्म करणाऱ्या स्त्रिया, उपवास करणारे पुरुष व उपवास करणाऱ्या स्त्रिया, शीलांचं रक्षण करणारे पुरुष व शीलांचं रक्षण करणाऱ्या स्त्रिया आणि बहुतांश अल्लाहचं स्मरण करणारे पुरुष व अल्लाहचं स्मरण करणाऱ्या स्त्रिया यांच्यासाठी निश्चितच अल्लाहनं क्षमा आणि महान मोबदला तयार ठेवलाय.

३६) एखाद्या प्रकरणात जेव्हा अल्लाह आणि त्याच्या प्रेषितानं एकदा निर्णय घेतल्यानंतर तर कुणीही श्रद्धाळू पुरुष अथवा श्रद्धाळू स्त्रीस त्या

प्रकरणात कसला अधिकार उरत नाही. जर कुणी अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताची अवज्ञा केली तर तो उघड मार्गभ्रष्ट होऊन जाईल.

३७) ज्या व्यक्तीस अल्लाह आणि तुमची कृपा लाभली, आठवा त्याच्याशी तुम्ही बोलत होता, आपल्या पत्नीस सोडू नका, अल्लाहची भीती ठेवा, लोकांच्या भीतीपायी तुम्ही आपल्या मनामध्ये जी गोष्ट लपवत होता तीस अल्लाह उघड करणार होता. पण अल्लाहच भीती बाळगण्यास योग्य आहे. जेव्हा ज़ैदनं (घटस्फोटासंबंधीची) औपचारिकता पूर्ण केली तेव्हा आम्ही त्यांना (जैनब यांना) तुमच्याशी विवाहबद्ध केलं, आपल्या दत्तकपुत्राच्या पत्नीशी विवाह करण्यास श्रद्धावंतांवर आक्षेप नसावा यासाठी. त्यासंबंधीची औपचारिकता पूर्ण केल्यानंतर, अल्लाहचाच निर्णय अंमलात येणार.

३८) अल्लाहनं त्यास जे विहित केलंय त्या बाबतीत प्रेषितावर कोणता दोष नाही. पूर्वी जे लोक होऊन गेलेत त्यांच्या बाबतीत हीच अल्लाहची प्रथा होती. अल्लाहची आज्ञा एक अंतिम निर्णय असतो.

३९) (त्यांच्यासाठी) जे अल्लाहच्या संदेशाचा प्रचार करतात, त्याची भीती बाळगतात आणि एका अल्लाहव्यतिरिक्त कुणासच भित नसतात अल्लाह हिशेब घेण्यात पुरेसा आहे.

४०) मुहम्मद (स.) तुमच्या पुरुषांपैकी कोणाचे पिता नसून अल्लाहचे प्रेषित आणि सर्व प्रेषितांपैकी अखेरचे प्रेषित आहेत. अल्लाहस सर्व बाबींची माहिती आहे.

४१) श्रद्धावंत लोकहो! अल्लाहचे अधिकाधिक स्मरण करा.

४२) सकाळ-संध्याकाळ त्याचा गौरव करा.

४३) तोच तुम्हांवर कृपा करतो आणि त्याचे दूतदेखील. तुम्हांस अंधकारातून (अज्ञानाच्या) प्रकाशाकडं आणण्यासाठी, आणि तो श्रद्धाळूंवर दया करणारा आहे..

४४) ज्या दिवशी ते त्यास भेटतील अभिवादनार्थ तो त्यांचं शांतता लाभावी

म्हणून स्वागत करील. त्यांच्यासाठी भरघोस मोबदला तयार आहे.

४५) हे प्रेषित! आम्ही तुम्हाला साक्षीदार, सुवृत्त देणारा आणि ताकीद देणारा म्हणून पाठवलंय.

४६) आणि त्याच्या परवानगीनं अल्लाहकडं बोलवणारा आणि प्रकाश देणारा दिवा.

४७) श्रद्धाळूंना सुवृत्त द्या, त्यांच्यासाठी अल्लाहचं मोठं वरदान आहे.

४८) अश्रद्ध आणि दांभिकांचं ऐकू नका, त्यांच्या इजांकडं लक्ष देऊ नका, अल्लाहवरच विश्वास ठेवा. तोच तुमच्या मदतीस पुरेसा आहे.

४९) श्रद्ध लोकहो! तुम्ही श्रद्ध महिलांशी विवाह करून त्यांना स्पर्श न करता घटस्पोट दिल्यास त्यांना इद्दतचा काळ पूर्ण करावयास लावण्याचा तुम्हांस काही अधिकार नाही. त्यांना काही आर्थिक सहाय्य देऊन भल्या पद्धतीनं निरोप द्या.

५०) हे प्रेषित! तुम्ही ज्या पत्नींना मेहेर (स्त्रीधन) दिलंय त्या तुम्हांस विधिवत केल्या आहेत, त्याचप्रमाणं युद्धकैदींमधून आम्ही ज्या स्त्रिया तुम्हांस दिल्या आहेत त्या आणि तुमच्या चुलत्याच्या मुली व तुमच्या आत्याच्या मुली, तुमच्या मामाच्या मुली, तुमच्या मावशीच्या मुली, ज्यांनी तुमच्यासोबत स्थलांतर केलं. जर प्रेषिताची इच्छा असेल एखाद्या अशा श्रद्ध स्त्रीशी विवाहबद्ध होऊ शकतो, जिनं स्वत:स प्रेषितांना वाहून दिलं असेल. हे तुमच्यासाठी खास आहे. (प्रेषित मुहम्मद स. यांच्यासाठी) इतर श्रद्धावंत पुरुषांसाठी नव्हे. आम्ही त्यांच्यासाठी पत्नीं आणि ज्या त्यांच्या मालकीत आहेत त्यांच्यासंबंधी जे नियुक्त केलं ते आम्हास ठाऊक आहे. तुमच्यासाठी कोणती अडचण राहू नये म्हणून. अल्लाह क्षमाशील आणि दयावंत आहे.

५१) त्यांच्यामधून तुमच्या मर्जीस येईल त्यास तुम्ही लांब ठेवू शकता आणि इच्छेनुसार जवळ बाळगू शकता. आणि जिला तुम्ही दूर केलं होतं तिला परत बोलवून घेतलं तरी काही हरकत नाही. यामुळं त्यांचं डोळं सुखावण्याची शक्यता आहे, आणि त्या दु:खी होणार नाहीत.

त्या सर्वांनी आपण जे देऊ केलं त्यावर प्रसन्न असाव्यात. त्यांच्या हृदयांत काय आहे ते अल्लाहस ठाऊक आहे. अल्लाहच सर्वज्ञ आणि सहनशील आहे.

५२) यानंतर तुम्हांस इतर स्त्रिया विधिवत नाहीत. आणि जरी तुम्हांस त्यांचं सौंदर्य आवडलं तरी तुम्ही त्यांना इतर स्त्रीशी बदलू शकत नाही. फक्त आपल्या मालकीतील स्त्रियांना वगळता. अल्लाह प्रत्येक बाबीवर लक्ष ठेवून असतो.

५३) श्रद्धावंत लोकहो! तुम्हांस परवानगी दिल्याशिवाय प्रेषिताच्या घरी जाऊ नका. स्वयंपाक तयार होण्याची वाट पाहत बसू नका, जेवायला बोलवल्यास तुम्ही (घरी) जा, जेवण उरकताच (तिथून) निघून या आणि बोलत बसू नका, तुमच्या अशा गोष्टी प्रेषितांना जड जातात, पण तसं सांगण्यास त्यांना संकोच वाटतो, पण अल्लाहस सत्य आहे ते बोलण्यास संकोच वाटत नाही. त्यांच्याशी (प्रेषितांच्या पत्नीशी) काही मागायचं असल्यास ते पडद्याच्या आडून मागा, हे तुमच्या आणि त्यांच्या मनांच्या पावित्र्यासाठी उचित आहे. आणि अल्लाहच्या प्रेषितास अडचणीत आणणं तुमच्यासाठी वैध नाही. तसंच त्यांच्यानंतर त्यांच्या पत्नींशी कधीही विवाह करता कामा नये. अल्लाहच्या दृष्टीत हा मोठा अपराध आहे.

५४) तुम्ही कोणत्या गोष्टी उघड करा किंवा ते लपवा अल्लाहस त्या सर्व बाबींची माहिती असते.

५५) त्यांनी (प्रेषितांच्या पत्नींनी) आपल्या पित्याशी, आपल्या मुलांशी, आपल्या भावांशी, आपल्या भावांच्या मुलांशी, आपल्या बहिणींच्या मुलांशी, घरातील इतर स्त्रियांशी, आणि ज्या त्यांच्या मालकीत असतील अशा स्त्रियांशी (व्यवहार) करण्यात त्यांच्यावर काही दोष नाही, त्यांना अल्लाहचे भय असावे, अल्लाह प्रत्येक बाबीवर साक्ष आहे.

५६) अल्लाह आणि त्याचे दूत प्रेषितांसाठी शुभचिंतन व्यक्त करतात (दरूद पाठवतात), तेव्हा श्रद्धावंत लोकहो, तुम्हीसुद्धा त्यांच्यासाठी शुभचिंतन

व्यक्त करा आणि सलाम पाठवा.

५७) जे लोक अल्लाह आणि त्याच्या प्रेषितास त्रास देतात अल्लाह या जगी आणि परलोकात त्यांचा धिक्कार करतो आणि त्यांच्यासाठी अपमानास्पद शिक्षा तयार आहे.

५८) जे लोक कारण नसता श्रद्धावंत पुरुष आणि श्रद्धावंत स्त्रियांना त्रास देतात, ते निंदानालस्ती आणि उघड पाप ओढवून घेतात.

५९) हे प्रेषित! आपल्या पत्नींस, मुली आणि श्रद्ध स्त्रियांना स्वत:वर चादरीनं झाकून घ्यावयास सांगा. म्हणजे त्यांची ओळख (होईल) आणि त्यांना छळलं जाणार नाही. अल्लाह क्षमाशाली आणि दयावंत आहे.

६०) दांभिक आणि ज्यांच्या मनास विकृतीनं ग्रासलंय, तसंच मदीनेत जे लोक खोट्या अफवा पसरवतात, जर परावृत्त झाले नाहीत तर आम्ही तुम्हांस त्यांच्याविरूद्ध उभं करू, मग ते इथं (मदीनेत) तुमच्या शेजारी जास्त काळ टिकणार नाहीत.

६१) हे तिरस्कारित लोक आहेत जिथं जिथं आढळतील तिथून धरले जाऊन त्यांना ठार केलं जाईल.

६२) मागच्या काळात जे लोक होऊन गेलेत (त्यांच्या बाबतीतही) अल्लाहची अशीच रीत होती. आणि अल्लाहच्या पद्धतीमध्ये बदल होत नसतो.

६३) लोक तुम्हांस कयामतच्या बाबतीत विचारतात. त्यांना सांगा, तिची माहिती अल्लाहकडंच आहे. तुम्ही काय समजता? ती घटका जवळच आली असणार.

६४) अल्लाहनं नाकारणाऱ्यासाठी तिरस्कार आणि जळजळीत अग्नी तयार ठेवलाय.

६५) त्यात ते सदैव राहतील. त्यांना कुणी वाचवणार नाही की कोणी मदत करू शकणार.

६६) त्या दिवशी त्यांची तोंडं नरकाग्नीमध्ये उलटपालट केली जातील (भाजले जातील), ते म्हणू लागतील, आमचं दुर्दैवं! आम्ही अल्लाहचं

ऐकलं असतं, प्रेषितांच्या आज्ञा पाळल्या असत्या.

६७) तसंच ते म्हणतील, आमच्या विधाता! आम्ही तर आमच्या सरदाराचं आणि प्रमुखांचं पालन केलं. त्यांनीच आम्हांस गैरमार्गी लावलं.

६८) आमच्या विधाता! त्यांना दुप्पट शिक्षा कर आणि त्यांचा मोठा तिरस्कार घडव.

६९) श्रद्धावंत लोकहो! तुम्ही त्यांच्याप्रमाणं होऊ नका ज्यांनी मूसा यांना त्रास दिला, पण अल्लाहनं त्यांना (मूसा यांना) त्यांच्या आरोपातून मुक्त केलं. अल्लाहच्या दृष्टीत ते प्रतिष्ठित होते.

७०) श्रद्धावंत लोकहो! अल्लाहचं भय बाळगा, नेमकं आणि सरळ बोलत जा.

७१) तो (अल्लाह) तुमच्या वर्तणुकीत सुधारणा घडवंल. आणि तुमचं पाप क्षमा करील. जो अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांच्या आज्ञा पाळतो त्याचा मोठा उत्कर्ष होतो.

७२) आम्ही ही अमानत (जबाबदारी) आकाश, पृथ्वी आणि पर्वतांना देऊ केली, त्यांनी भिऊन जाऊन ती उचलण्यास नकार दिला. पण मानवानं ती उचलली. तो तर खरंच अन्यायी आणि मूर्ख निघाला.

७३) (परिणामी) दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया, अनेकश्वरी पुरुष आणि अनेकेश्वरी स्त्रिया यांना शिक्षा करण्यासाठी श्रद्ध पुरुष आणि श्रद्ध स्त्रियांचा पश्चात्ताप अल्लाहनं स्वीकारण्यासाठी. अल्लाह क्षमाशील व दयावंत आहे.

-------

# ३४. सूरह सबा

### मक्काकालीन, आयती ५४

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सर्व स्तवन त्याच अल्लाहसाठी ज्याच्या मालकीत अवकाशातील आणि पृथ्वीतील सर्वकाही आहे आणि परलोकात (सुद्धा) त्याचाच गौरव (असेल). तोच विवेकशील आणि तोच सर्वज्ञ आहे.

२) खाली जमिनीत काय जाते आणि तिच्यामधून काय (काय) निघते आणि आकाशातून खाली काय येते आणि आकाशाकडं काय जाते ते त्यास ठाऊक आहे. अल्लाह क्षमाशील आणि दयावंत आहे.

३) नाकारणारे लोक म्हणतात, आम्हावर कयामत येणार नाही. त्यांना सांगा, माझ्या विधात्याची शपथ! ती येणारच. जे अज्ञात आहे ते तो जाणतो. आकाश आणि धरतीवरील तिळमात्रही त्याच्यापासून लपून नाही किंवा त्याहीपेक्षा लहान अथवा मोठं (सर्व) एका दिव्य ग्रंथामध्ये नोंदवलंय.

४) जे श्रद्धावंत आणि सत्कर्मी आहेत त्यांना मोबदला देण्यासाठी हेच ते लोक आहेत ज्यांना क्षमा आणि सन्मानाची तरतूद लाभेल.

५) जे आमच्या आयतींना विफल ठरवण्याचा प्रयत्न करतात त्यांच्यासाठी कडक आणि कठोर शिक्षा आहे.

६) ज्या लोकांना ज्ञान बहाल केलं गेलंय ते समजतात तुमच्या विधात्याकडून जे पाठवलं गेलंय. तोच सत्य आहे आणि तो त्यांना प्रशंसेस पात्र व प्रभुत्वशालीचा मार्ग दाखवतो.

७) अविश्वासू लोक म्हणतात, आम्ही तुम्हांस एक असा व्यक्तीचा ठाव देतो जो सांगतो की (मेल्यानंतर) जेव्हा तुमचा कण न् कण होऊन विखरून गेला असतानासुद्धा नव्यानं तुम्ही जन्म घ्याल.

८) त्यानं अल्लाहबाबत खोटं रचलंय किंवा त्याला वेड लागलंय. मात्र

ज्यांचा परलोकावर विश्वास नाही, ते शिक्षा आणि मार्गभ्रष्टतेत लांबवर गेलेत.

९) त्यांच्या मागं आणि पुढं जे आकाश व धरतीत आहे त्यांना दिसत नाही? आमच्या मर्जीस आलं तर आम्ही त्यांना जमिनीत पुरून टाकू अथवा आकाशातला एखादा तुकडा (उल्का) त्यांच्यावर आदळून देऊ. यामध्ये प्रत्येक भक्तास वळण्यासाठी संकेत आहे.

१०) आम्ही दाऊद यांना आमचं वरदान बहाल केलं, ''पर्वतांनो तुम्ही त्यांच्यासोबत (अल्लाहची) प्रशंसा करा. पक्ष्यांनो तुम्हीसुद्धा.'' आम्ही त्यांच्यासाठी लोखंडास मऊ केलं.

११) निश्चितच तुम्ही चिलखत बनव (त्या चिलखतीमधील) साखळ्या आणि कड्यांचं मोजमाप करून. आणि चांगली कर्मं करा, आम्ही पाहताहोत तुम्ही जे करता ते.

१२) आणि वाऱ्यांना सुलेमान यांच्या (अंकित) केलं, ज्यांच्या पहाटेचा अवधी एका महिन्याच्या प्रवासाइतका आणि संध्याकाळचा अवधी एक महिन्याच्या प्रवासाइतका होता. आम्ही त्यांना वितळलेल्या तांब्याचा झरा दिला. जिन्नांपैकी (अदृश्य) काही त्यांच्यादेखत काम करीत असत, त्यांच्या विधात्याच्या आज्ञेनं. कुणी आमच्या हुकमाबाहेर गेला तर आम्ही त्यास जळजळीत अग्नीच्या शिक्षेचा उपभोग देतो.

१३) ते (जिन्न) त्यांच्या (सुलेमान यांच्या) म्हणण्यानुसार काम करीत. त्यांच्यासाठी उत्तुंग कमानी (इमारती) आणि चित्रं, हौदाएवढ्या मोठ्या कढाया, आणि घट्ट बसवलेली डेग. दाऊदच्या पुत्रा! काम करा नि आभार माना, पण माझ्या भक्तांमध्ये मोजकेच लोक कृतज्ञ असतात.

१४) आम्ही जेव्हा त्यांचा मृत्यू घडवला तेव्हा त्यांना (जिन्नांना) त्याच्या मृत्यूचा पत्ता लागला नाही. कीटकांनी त्यांची काठी खाऊन टाकली. मग ते खाली पडले. तेव्हा जिन्नांना काय घडलं याची कल्पना आली. त्यांना जर अज्ञात ठाऊक असतं तर ते अपमानास्पद शिक्षेत अडकले नसते.

१५) सबाकरिता त्यांचा निवासस्थानच एक संकेत होता. तिथं दोन बागा होत्या उजवी आणि डावीकडं. (आम्ही म्हणालो,) तुमच्या विधात्यानं जी उपजीविका बहाल केली ती खा आणि त्याचं आभार माना. स्वच्छ आणि उत्कृष्ट स्थान. आणि विधाता क्षमा करणारा.

१६) पण त्यांनी पाठ फिरवली तेव्हा आम्ही धरण फोडून पूर धाडला आणि त्यांना त्या बागांच्या ठिकाणी दुसऱ्या दोन बागा दिल्या ज्यामध्ये कडू फळांची काही झाडं आणि काही बोरीची झाडं होती.

१७) त्यांच्या कृतघ्नतेचं हे असं प्रतिफळ दिलं. जे कृतघ्न असतात त्याची आम्ही अशीच परतफेड करतो.

१८) आणि आम्ही त्यांच्या व इतर शहरांच्या दरम्यान ज्यांना समृद्ध केलं होतं, नजरेस पडणाऱ्या (जोडवस्त्या) वस्त्या वसवल्या. त्यांच्यामध्ये प्रवासाचे टप्पे नेमून दिले. त्यामध्ये रात्रंदिवस सुरक्षित प्रवास करा.

१९) पण ते म्हणू लागले, हे विधाता! आमच्या प्रवासात दूरवरचे टप्पे ठेव. त्यांनी स्वत:च अन्याय ओढवून घेतला असता आम्ही त्यांच्या कथाच करून सोडल्या आणि त्यांना विखरून टाकलं, यामध्ये निश्चितच संकेत आहेत सातत्यानं धैर्य राखतात त्यांना आणि कृतज्ञ असतात त्यांना.

२०) त्यांच्या अनुषंगानं इब्लीसची योजना प्रत्यक्षात आली, श्रद्धावंतांपैकी एका गटास वगळता सर्वांनी त्याचे अनुसरण केले.

२१) पण इब्लीसला त्यांच्यावर काही अधिकार नव्हता. आम्हांस हे माहीत करून घ्यायचं होतं की कोणाचा परलोकावर विश्वास आहे आणि कोणास त्याबाबत शंका आहे. तुमचा विधाता सर्व बाबींवर लक्ष ठेवून आहे.

२२) त्यांना सांगा, तुम्ही अल्लाहव्यतिरिक्त ज्याची कल्पना करता त्याचा धावा करा त्यांना ह्या आकाश आणि पृथ्वीमध्ये तिळमात्रही मालकी नाही. त्यामध्ये (आकाश आणि पृथ्वीत) त्याचा कोण भागीदार नाही आणि त्यांच्यापैकी कुणी त्याचा मदतनीस नाही.

२३) त्याची परवानगी असेल त्यास सोडून. कोणाच्या मध्यस्थीचा काही लाभ होणार नाही. तथापि, त्याच्या मनांमधली घबराट दूर केली जाते तेव्हा ते म्हणतात, ''तुमच्या विधात्यानं काय म्हटलं?'' ते (दूत) उत्तरतात, त्यानं 'सत्य' आहे तेच सांगितलं. तो सर्वोच्च आणि महान आहे.

२४) विचारा, ''तुम्हांस आकाश आणि पृथ्वीमधून कोण निर्वाह पुरवतो?'' म्हणा, ''अल्लाह.'' आम्ही अथवा तुम्ही दोघांपैकी एक रास्त मार्गावर आहे अथवा भरकटलेला आहे.

२५) त्यांना सांगा, आमच्या पापांबद्दल तुम्हांस विचारलं जाणार नाही, तसंच तुम्ही काय करता याबद्दल आम्हांस विचारण्यात येणार नाही.

२६) त्यांना सांगा, आमचा विधाता आम्हा सर्वांना एकत्र करील आणि मग आमच्यामध्ये सत्य निर्णय करील. तोच निर्णय करणारा आणि सर्वज्ञ आहे.

२७) त्यांना सांगा, दाखवा त्याचे भागीदार जे तुम्ही जोडत होता ते. मुळीच नव्हे. अल्लाहच प्रभुत्वसंपन्न आणि प्रतिभावंत.

२८) आम्ही तुम्हांस लोकांना सुवृत्त व ताकीद देण्यासाठी, पण बहुतेक लोकांना हे ठाऊक नाही.

२९) आणि म्हणून विचारता ते वचन (कयामत) कधी घडेल, जर तुम्ही खरं बोलत असाल तर.

३०) त्यांना सांगा, तुमच्यासाठी एक दिवस निश्चित केलाय. आणि त्यापासून तुम्ही एक तासभर मागं राहू शकणार नाही की घडीभर पुढं जाणार नाही.

३१) नाकारणारे म्हणतात, आम्ही ह्या कुरआनास मानणार नाही आणि त्याआधीच्या ग्रंथांनादेखील मानणार नाही. तुम्ही पाहा, जेव्हा पापींना त्यांच्या विधात्यासमोर उभं केलं जाईल तेव्हा ते एकमेकांचं म्हणणं रद्द करतील. पैकी दुबळे लोक उद्धट लोकांस म्हणतील, तुम्ही नसता तर

आम्ही विश्वास ठेवला असता.

३२) उद्धट लोक दुबळ्या लोकांना सांगतील, ''आम्ही रोखून धरलं तुम्हांस?'' ते मार्गदर्शन तुम्हांस पोचलं असता. तुम्हीच पापी आहात.

३३) दुर्बल लोक उद्धट लोकांस म्हणतील, होय. रात्रंदिवस चाललेली तुमची ती कारस्थानं, तुम्ही आम्हांस अल्लाहस नाकारण्यास लावलं आणि त्याचे भागीदार जोडण्यास सांगितलं. शिक्षेस पाहिल्यावर ते होणारा पश्चात्ताप लपवतील. पण आम्ही त्या नाकारणाऱ्या लोकांच्या गळ्यात साखळ्या घालू, त्यांना त्यांच्या कर्मांची परतफेड करू.

३४) आम्ही ज्या कोणत्या वस्तीमध्ये ताकीद देणारा पाठवला तिथले सुखवस्तू लोक म्हणाले, तुम्हांस जे (मार्गदर्शन) देऊन पाठवलंय आम्ही त्यास नाकारतो.

३५) आणि म्हणाले, संतती आणि संपत्तीच्या बाबतीत आम्ही (तुमच्यापेक्षा) वरचढ आहोत. आम्हांस शिक्षा होणार नाही.

३६) त्यांना सांगा, माझा विधाता मर्जीनुसार कोणास अधिक साधनं देतो तर कोणास काटकसरीनं देतो. बहुतेक लोकांस हे माहीत नाही.

३७) आणि तुमच्या संतती आणि श्रीमंतीमुळं तुम्हांस आमच्या निकटचे स्थान मिळत नाही. पण जे श्रद्धा ठेवतात आणि सत्कर्म करतात त्यांच्यासाठी दुप्पट मोबदला असेल. त्यांच्या (सत्) कर्मांमुळं त्यांना उत्तुंग महालांमध्ये समाधानाने राहतील.

३८) आणि जे लोक आमच्या आयतींना विफल करण्याचा प्रयत्न करतात त्यांना शिक्षा (भोगावयास) हजर केलं जाईल.

३९) त्यांना सांगा, माझा विधाता आपल्या भक्तांपैकी ज्यांना इच्छितो त्यांना विपूल साधनं देतो, तर काहींना मोजमाप करून देतो. तुम्ही जे काही खर्च करता त्याचा मोबदला देईल, कारण तो निर्वाह देण्यात उत्तम आहे.

४०) एके दिवशी तो सर्वांना गोळा करून देवदूतांना विचारील, हे लोक

तुमचीच पूजा करत होते?

४१) ते देवदूत उत्तर देतील, पाक आहेस तू, तूच आमचा संरक्षक, ते नव्हेत. ते जिन्नांची (अदृश्य) पूजा करत होते. काहींची त्यांच्यावर श्रद्धासुद्धा आहे.

४२) आज तुमच्यापैकी कोणी एकमेकांचा लाभ घडवण्याचा अथवा त्यांना हानी पोचवण्याचा अधिकार बाळगत नाही. आणि ज्या लोकांनी अत्याचार केला त्यांना सांगण्यात येईल, आता नरकाग्नीची शिक्षा भोगा तुम्ही ज्यास खोटं ठरवत असत.

४३) जेव्हा त्यांना आमच्या स्पष्ट आयती ऐकविल्या जातात तेव्हा म्हणतात, हा तर तुमच्यासारखाच माणूस आहे, तुम्ही आपल्या ज्या पूर्वजांची भक्ती करत असत त्यापासून तुम्हांस रोखू पाहतो. आणि म्हणतात, हे (कुरआन) तर कल्पलेलं थोतांड! जेव्हा ते सत्य त्यांना पोचलं त्याबाबत नाकारणारे म्हणाले, ही तर उघड जादू आहे.

४४) आम्ही त्यांना (अनेकेश्वरी अरबांना) वाचण्यासाठी पुस्तकं दिली नव्हती आणि तुमच्यापूर्वी ताकीद देण्यासही कुणाला पाठवलं नव्हतं.

४५) तुमच्या पूर्वीच्या लोकांनीही खोटं म्हटलं होतं. हे (अनेकेश्वरी अरब लोक) त्याच्या तुलनेत एक दशांशापर्यंतही पोचले नाहीत जे आम्ही त्यांना दिलं होतं. त्यांनी माझ्या प्रेषितांना खोटं ठरवलं, मग पाहा कशी कठोर माझी शिक्षा झाली.

४६) त्यांना सांगा, मी तुम्हांस एका गोष्टीचा उपदेश देतो, अल्लाहसाठी तुम्ही जोडीनं किंवा एकेरीनं उभं राहा आणि विचारविनिमय करा. तुमच्या सोबत्यास वेड लागलेलं नाही, ते तर तुम्हांस सावध करताहेत एक कठोर शिक्षा येण्यापूर्वी.

४७) त्यांना सांगा, बदल्यात मी जे मागितलंय ते तुमच्याकडंच राहू द्या. माझा मोबदला तर अल्लाहच देईल. तो सर्व गोष्टींचा साक्षीदार आहे.

४८) त्यांना सांगा, माझा विधाता तर सत्य अवतरित करतो आणि त्यास

सर्व गुपितांचं ज्ञान आहे.

४९) त्यांना सांगा, सत्य पोचलंय. खोटं काही नवीन निर्माण करत नसते की पुनरावृत्तीही करत नाही.

५०) त्यांना सांगा, जर मी भरकटलो असेल तर मी माझंच नुकसान करून घेतो आणि जर मला मार्गदर्शन लाभलं तर माझ्या विधात्याच्या प्रेरणेमुळेच ते. तो सर्वकाही ऐकतो, तो निश्चितच जवळ असून ऐकणारा आहे.

५१) तुम्ही पाहा, जेव्हा ते घाबरून जातील. पण ते त्यापासून निसटू शकणार नाहीत. जवळच धरले जातील.

५२) ते म्हणतील, आम्ही श्रद्धा ठेवली, पण हे कसं (शक्य) श्रद्धेपासून एवढ्या लांब निघून गेल्यावर.

५३) त्यांनी तर आधीच नाकारलं होतं आणि दूर राहून काही पाहत नसताना काहीतरीच फेकत आहेत. (बिनबुडाच्या बाता मारताहेत.)

५४) आता त्यांच्या आणि त्यांना जे हवं होतं त्यामध्ये अडथळा घातला गेला, ज्याप्रमाणं त्यांच्यापूर्वीच्या (लोकां)विषयी केलं होतं. ते संभ्रमावस्थेत होते.

-------

# ३५. सूरह फातिर

**मक्काकालीन, आयती ४५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सर्व स्तवन अल्लाहसाठीच ज्यानं आकाश आणि पृथ्वी साकारली, दोन अथवा तीन अथवा चार पंख असलेली देवदूतं संदेशवाहक बनवली. निर्मितीत इच्छितो तशी भर घालतो. अल्लाह प्रत्येक बाबीवर सामर्थ्यवान आहे.

२) लोकांसाठी अल्लाह आपली दया खुली करतो. त्यास कुणी रोखून धरणारा नाही, आणि जर त्यानं रोखून धरलं तर त्याच्याशिवाय कुणी पाठवणारा नाही. तोच प्रभुत्वशाली आणि प्रतिभाशाली आहे.

३) लोकहो, तुमच्यावरील अल्लाहचं उपकार आठवा. अल्लाहव्यतिरिक्त दुसरा कुणी निर्माता आकाश आणि पृथ्वीमधील साधनं देतो? त्याच्याशिवाय इतर कोण उपास्य (देव) नाही, मग तुम्ही कुठं फसता.

४) पण जरी त्यांनी तुम्हांस खोटं ठरवलं तर तुमच्यापूर्वीच्या प्रेषितांनाही खोटं म्हटलं गेलं, ती (सर्व) प्रकरणं अल्लाहपाशी जातात.

५) लोकहो, अल्लाहचं वचन सत्य असते. जगातलं हे जीवन तुम्हांस भुलवू नये. तसंच भुलवणाऱ्या (सैताना) कडून अल्लाहबद्दल फसवले जाऊ नका.

६) सैतान तुमचा शत्रू आहे. त्यास शत्रूच राहू द्या, तो तर आपल्या मंडळीला बोलवतो, म्हणजे त्यांना जळजळीत नरकात टाकण्यासाठी.

७) ज्या लोकांनी नाकारलं त्यांना कडक शिक्षा असेल, पण ज्यांनी श्रद्धा धारण केली आणि नेक कर्म केली त्यांना क्षमा आहे, तसंच भव्य मोबदला.

८) ज्यास त्याची वाईट कर्मं आकर्षित केली गेली आणि तो त्यांना (खरंच) उत्तम समजू लागतो (तो सत्कर्मं करणाऱ्यांच्या तोडीचा होईल?)

निश्चितच मर्जीस येईल त्यास अल्लाह मार्गदर्शन घडवतो आणि मर्जीनुसार कुणाला मार्गभ्रष्ट करतो. त्यांच्यामुळं तुमचा जीव दुःखात घालू नका. ते काय करीत आहेत अल्लाहला ठाऊक आहे.

९) तोच अल्लाह वाऱ्यांना पाठवतो, मग ते ढगांस उचलून घेतात, मग आम्ही त्यास मृत पावलेल्या भूमीकडं नेतो आणि त्यापासून मृतावस्थेतील जमिनीस पुनर्जीवित करतो. अशाच प्रकारे (तुमचं) पुनरुज्जीवन होणार.

१०) ज्या कुणास प्रतिष्ठा हवी असेल तर (लक्षात ठेवा) सर्व प्रतिष्ठा अल्लाहच्याच ठायी आहे. चांगलं बोलणं त्याच्याप्रतच पोचते आणि तोच तुमच्या पुण्यकर्मांस उदात्त करतो. जे लोक दुष्ट कट आखतात त्यांना कठोर शिक्षा असेल. आणि त्यांचे कट फोल ठरतील.

११) अल्लाहनं तुम्हांस मातीतून निर्माण केलं. मग शुक्रबिंदूपासून. पुन्हा तुमची जोडपी बनवली. कोणीही नारी त्याच्या माहितीपलीकडं गर्भ धारण करत नाही की (बाळ) जन्माला घालत नाही. तसंच कोणत्याही मनुष्यास दीर्घायुष्य लाभणं किंवा त्याच्या आयुष्यात घट करणं सर्व एका दप्तरात (नोंदवलेलं) आहे. हे अल्लाहसाठी सोपं आहे.

१२) पाण्याचे दोन प्रवाह सारखे नाहीत, एक गोड असून पिण्यास योग्य आणि सोपा आहे, दुसरा खारट व कडू. मात्र त्या दोन्हींमधून तुम्ही ताजं मांस खाता, आणि त्यामधूनच तुम्ही दागिनेही काढता (मोती वगैरे) घालण्यासाठी. आणि तुम्ही त्यामध्ये नौकाही पाहता कशा त्या लाटा कापतात, त्याचं वरदान प्राप्त करण्यासाठी, तुम्ही कृतज्ञ राहावं म्हणून.

१३) तो रात्रीस दिवसांत विलीन करतो आणि दिवसास रात्रीत विलीन करतो. सूर्य आणि चंद्रास अधीन केलं, प्रत्येक ठराविक मुदतीत भ्रमण करत असतात. तो अल्लाह तुमचा विधाता आहे. अधिराज्य त्याच्यासाठीच आहे. जे लोक त्यास सोडून दुसऱ्यांचा धावा करतात ते खजुरीच्या बियांवरील सालीएवढ्या (क्षुल्लक) वस्तुचेही मालक नाहीत.

१४) तुम्ही अशांचा धावा करता ज्यांना ऐकू येत नाही, आणि जरी त्यांनी ऐकलं तरी ते तुम्हाला प्रतिसाद देत नसतात. कयामतच्या दिवशी ते तुम्ही जोडलेली भागीदारी नाकारतील. आणि (अल्लाह) जो माहिती बाळगतो त्याप्रमाणं दुसरा कुणी सांगू शकणार नाही.

१५) लोकहो, तुम्हांस अल्लाहची गरज आहे आणि अल्लाह गरजमुक्त आणि प्रशंसेस पात्र आहे.

१६) त्यास तशी इच्छा झाली तर तुम्हांस घालवून देऊन एक नवी निर्मिती उदयास आणील.

१७) हे अल्लाहस कठीण नाही.

१८) कुणी दुसऱ्याचं ओझं उचलणार नाही. ओझं वाहणारानं आपलं ओझं उचलण्यास कुणाला बोलवलं तरी तो काही एक उचलणार नाही. जरी तो त्याचा नातलग असला तरी. तुम्ही त्यांनाच सावध करू शकता जे आपल्या विधात्याशी भिऊन असतात, त्यास न पाहता आणि नमाज कायम करतात, जो स्वत:स पावन राखतो ते त्याच्या स्वत:च्याच पावित्र्यासाठी. आणि अल्लाहकडंच परतून जायचंय.

१९) आंधळा आणि डोळस सारखे नसतात.

२०) किंवा अंधकार आणि प्रकाश (सारखे नसतात).

२१) तसंच सावली आणि ऊन्हाची झळ.

२२) आणि (म्हणून) जीवंत आणि मरण पावलेले सारखे नसतात. अल्लाह इच्छेनुसार कुणासही ऐकवू शकतो, पण जे कबरीत आहेत त्यांना तुम्ही ऐकावयास लावू शकत नाही.

२३) तुम्ही तर फक्त सावध करणारे आहात.

२४) आम्ही तुम्हांस सत्यासहित सुवृत्त देणारा आणि सावधान करणारा बनवून पाठवलंय. एकही समूह असा नाही ज्याच्यामध्ये ताकीद देणारा आलेला नसावा.

२५) त्यांनी तुम्हांस जर खोटं म्हटलं तर त्यांच्या पूर्वीच्यांनाही त्यांनी खोटं म्हटलेलं आहे. त्यांच्या प्रेषितांनी त्यांच्याकडं स्पष्ट पुरावे आणलेत स्मृती आणि दिव्य ग्रंथांसहित.

२६) मग पुन्हा ज्यांनी नाकारलं होतं त्यांची पकड केली, कशी होती ती शिक्षा!

२७) तुम्ही पाहत नाही अल्लाह आकाशातून पाणी पाठवतो, त्यापासून विविध रंगांची फळं काढतो, डोंगरांमध्ये पांढऱ्या आणि तांबड्या पाऊलवाटा, विविध रंगांच्या त्यांच्यातील काही गडद काळ्या रंगाच्या.

२८) तसंच लोकांचेही आणि जनावरं आणि इतर प्राण्यांचे रंग विविध असतात. खरं पाहता त्याच्या भक्तांपैकी ज्यांना ज्ञान आहे तेच अल्लाहस भीत असतात. निश्चितच अल्लाह प्रभुत्वसंपन्न आणि क्षमाशील आहे.

२९) जे लोक अल्लाहच्या ग्रंथाचं पठण करतात, नमाज कायम करतात आणि त्यांना बहाल केलेल्या साधनांमधून उघडपणे अथवा गुप्तपणे खर्च करतात, त्यांना व्यवहारात मुळीच तोटा होणार नाही.

३०) त्यांना त्याचा पुरेपूर मोबदला देईल, शिवाय आपल्या विपुलतेतून अधिकच भर घालील. तो क्षमाशील, कदर करणारा आहे.

३१) आम्ही अनुभूतीद्वारे तुम्हांस जो ग्रंथ दिलाय ते सत्य आहे. त्यांच्याकडे असलेल्यांची पुष्टी करतो. अल्लाह आपल्या भक्तांविषयी माहिती ठेवतो आणि त्यांना पाहत असतो.

३२) आम्ही आपल्या निवडक भक्तांना ग्रंथाचे वारस केले, त्यांच्यापैकी काही (कष्ट सहन करून) स्वत:शी अन्याय करणारे आहेत, तर काही मध्यममार्गी आहेत, तर काही अल्लाहच्या अनुमतीनं भली कामं करण्यात अग्रेसर असतात. हेच मोठं वरदान आहे.

३३) ते अनंतकालीन स्वर्गांमध्ये प्रवेश घेतील, तिथं त्यांना सजवलं जाईल सोन्या-मोत्यांच्या कंकणांनी, आणि त्यांची वस्त्र रेशमाची असतील.

३४) ते म्हणतील, ‘‘अल्लाहचा गौरव असो, ज्यांनं आमच्या दुःखांना नाहीसं केलं. निश्चितच आमचा विधाता अतिशय क्षमा करणारा आणि जाणीव ठेवणारा आहे.

३५) ज्यानं आपल्या औदार्यातून आम्हांस चिरंनतन घरं दिलीत, इथं आम्हांस कोणतंही कष्ट स्पर्श करणार नाही की थकवा येणार नाही.

३६) नाकारणाऱ्या लोकांस नरकाग्नी असेल. त्यांचा निवाडा लागणार नाही. त्यांना मरण यावं म्हणून, की त्यांच्या शिक्षेत घट केली जाईल. सर्व कृतघ्न लोकांस आम्ही अशीच प्रतिफळं देतो.

३७) तिथं ते आरडाओरड करतील. आमच्या विधात्या, आम्हांस इथून काढून टाक, आम्ही जी कर्मं करत होतो त्या उलट आता आम्ही सत्कर्म करू. ‘आम्ही तुम्हांस पुरेसं आयुष्य नव्हतं दिलं ज्यामध्ये कोणास हवा असता तर त्यास उपदेश लाभला असता. तुम्हांकडं सावध करणारेही आले होते आता उपभोगा. अत्याचाऱ्यांना कुणी मदत करत नसतो.’

३८) निश्चितच अल्लाहला आकाश आणि पृथ्वीमधील लपलेल्या (सर्व गोष्टी) ठाऊक आहेत आणि लोकांच्या मनांमध्ये काय आहे हेही त्यास माहीत असतंय.

३९) त्यानं तुम्हांस धरतीवर उत्तराधिकारी बनवलं. ज्यानं नाकारलं, त्याच्या नकाराची जबाबदारी त्याचीच. नाकारणाऱ्यांच्या नाकारण्यामुळं त्यांच्या विधात्याजवळून प्रकोपात भर टाकण्यापलीकडं काहीच मिळत नाही. नाकारणाऱ्यांचा त्यांच्या नाकारण्यानं आणखीनच घात होतो.

४०) त्यांना विचारा अल्लाहला सोडून ज्या भागीदारांचा तुम्ही धावा करता त्यांना तुम्ही कधी पाहिलंय? मलाही दाखवा मग त्यांनी धरतीपासून काय उत्पन्न केलंय ते किंवा आकाश (बनवण्यात) त्यांची कसली भागीदारी आहे? आम्ही त्यांना कोणता ग्रंथ दिलाय ज्याचा त्यांच्याकडं स्पष्ट आधार आहे नव्हे अत्याचारी एकमेकांनाच फसवतात.

४१) अल्लाहनं आकाश आणि पृथ्वीला धरून ठेवलंय ते कोलमडू नयेत

म्हणून. ते ढळून गेले तर नंतर कुणी धरून ठेवणार नाही. तो निश्चितच सहनशील आणि क्षमाशाली आहे.

४२) त्यांनी अल्लाहच्या नावानं शपथा वाहिल्या होत्या. जोरदार शपथा, त्यांना कुणी ताकीद देणारा आला तर ते कोणत्याही लोकांपेक्षा अधिक मार्गदर्शन (अनुसरतील) पण जेव्हा त्यांच्याप्रत एक ताकीद देणारा आला तेव्हा त्यांच्या द्वेषातच भर पडली.

४३) धरतीवर त्याच्या अहंकारामुळं, आणि दुष्ट कटामुळं, आणि दुष्ट कारस्थानं स्वत:च्याच अंगलट येत असतात. आता ते पूर्वजांच्या रितीची वाट पाहताहेत? पण अल्लाहच्या पद्धतीत तुम्हांस कोणता बदल घडलेला आढळणार नाही, आणि त्याच्या पद्धतीत कोणता फेरबदलही आढळणार नाही.

४४) ते धरतीवर फिरत नाहीत, त्याच्या आधी जे होऊन गेले त्यांचा अंत कसा झाला ते पाहण्यास. ते तुमच्यापेक्षा अधिक बलाढ्य होते. पण आकाश आणि धरतीवर असं काही नाही जो अल्लाहस शह देऊ शकेल. निश्चितच तो सर्वज्ञ आणि सार्वभौम आहे.

४५) जर अल्लाहस लोकांना त्यांच्या कर्मापायी (शिक्षा देण्यास) धरायचं झाल्यास कोणत्याही सजीवास भूतलावर राहू दिलं नसतं, पण तो त्यांना ठराविक मुदतीची मोकळीक देतो, जेव्हा ती मुदत संपून जाईल अल्लाह निश्चितच आपल्या भक्तांना पाहणार आहे.

-------

# ३६. सूरह यासीन

## मक्काकालीन, आयती ८३

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) यासीन.

२) या ज्ञानपूर्ण कुराणची शपथ,

३) निश्चितच तुम्ही प्रेषितांपैकी आहात,

४) सरळमार्गावर आहात.

५) प्रभुत्वशाली दयावानानं (हा ग्रंथ) अवतरलाय.

६) एका अशा समुदायाला सावध करण्यासाठी ज्यांच्या वाडवडिलांना कुणी ताकीद दिली नव्हती. म्हणून ते गाफीलच राहिले.

७) त्यांच्या बऱ्याच लोकांबाबत (अल्लाहच्या अस्तित्वाचं) सत्य सिद्ध झालं (असलं तरी) ते श्रद्धा बाळगणार नाहीत.

८) आम्ही त्यांच्या मानेभोवती हनुवटीपर्यंत जोखड टाकलंय, ज्यामुळं त्यांची डोकी वर खेचली जातात.

९) आणि आम्ही त्यांच्यासमोर आणि पाठीमागं भिंती उभारल्यात. (अशाप्रकारे) ते झाकले गेले असल्यानं त्यांना काहीच दिसत नाही.

१०) त्यांना तुम्ही सावध करा अथवा करू नका सारखंच आहे, ते मान्य करणार नाहीत.

११) जे उपदेशांचं अनुसरण करतील आणि नितांत दयावानास न पाहता भीत आहेत अशांनाच फक्त तुम्ही उपदेश करीत आहात, त्यांना क्षमेची व औदार्यपूर्ण बक्षीस लाभण्याची शुभवार्ता द्या.

१२) निश्चितच आम्ही मृतांस जीवित करू, त्यांनी जे कर्म आगाऊ पाठवलेत आणि मागे सोडलेले अवशेष त्या सर्वांची आम्ही एका स्पष्ट ग्रंथात गोळाबेरीज करून ठेवलीय.

१३) त्यांच्यासमोर त्या वस्तीवाल्यांचे उदाहरण ठेवा जेव्हा त्यांच्याकडे प्रेषित आले.

१४) जेव्हा त्यांच्याकडे आम्ही दोन प्रेषित पाठविले, त्यांनी त्यांना खोटं ठरवलं. त्यांना बळकटी देण्यास आम्ही तिसरा प्रेषित पाठवला. ते सर्व म्हणत राहिले, आम्ही निश्चितच तुमच्याकडे प्रेषित म्हणून पाठवलो गेलो आहोत.

१५) त्या (वस्तीतल्या लोकांनी) सांगितलं, तुम्ही तर आमच्यासारखेच माणूस आहात. ईश्वरानं काहीच अवतरलं नाही. तुम्ही खोटं बोलत आहात.

१६) ते म्हणाले, आमच्या विधात्यास ठाऊक आहे आम्ही तुमच्याकडे पाठवलो गेलो आहोत.

१७) आम्हावर स्पष्ट संदेश पोहोचण्यापलीकडे काहीच नाही.

१८) (वस्तीवाले) म्हणाले, आमच्यापुरतं तर तुम्ही अपशकुनच. तुम्ही जर परावृत्त झाला नाही तर आम्ही दगडांनी ठेचून काढू. आमच्याकडून तुम्हाला भयंकर यातनाच मिळतील.

१९) प्रेषितांनी सांगितले, तुमचं शकुन-अपशकुन तुमच्याकडंच राहू द्या. (आम्ही) तुम्हाला उपदेश दिला म्हणून तुम्ही असे करता? नव्हे, तुम्ही तर सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत.

२०) तेवढ्यातच शहरातला दूरवरचा एक माणूस धावत आला. आणि म्हणाला, माझ्या जातीबांधवांनो! प्रेषितांच्या आज्ञा पाळा.

२१) त्यांचं पालन करा, ते तुमच्यापाशी कसलाच मोबदला मागत नाहीत ते सरळमार्गी आहेत.

२२) आणि मला काय झालंय? ज्याने मला निर्माण केलं आणि ज्याकडे तुम्हास परतावयाचं आहे त्याची मी भक्ती करू नये.

२३) त्यास सोडून मी अशा देवीदेवतांची उपासना करू (धरून बसू) की जर अल्लाहने मला इजा द्यायचं ठरवलं तर त्यांची मध्यस्थी काहीएक

कामी येणार नाही. ते मला त्यातून सोडवूही शकणार नाहीत.

२४) निश्चितच मी जर तसं केलं तर मी उघड मार्गभ्रष्ट होऊन जाईन.

२५) ऐकून घ्या मी तर तुमच्या विधात्यावर श्रद्धा बाळगलीय.

२६) (लोकांनी त्या माणसाला ठार मारून टाकलं) तेव्हा त्यास आवाहन केलं गेलं, तू स्वर्गात दाखल हो. तो म्हणाला, माझ्या लोकांना हे समजलं असतं!

२७) की माझ्या विधात्यानं मला क्षमा करून टाकली आणि सन्मानितांमध्ये माझीदेखील वर्णी लावली.

**पारा - २३**

२८) नंतर त्याच्या लोकांवर आम्ही आकाशातून कोणतं लष्कर (दूतांचं) पाठवलं नाही, नव्हे आम्ही तसं करणार नव्हतोच.

२९) (त्यांची) शिक्षा) अशी की, एक भयंकर विस्फोट आणि क्षणार्धात ते सर्व विझून गेले.

३०) दु:ख वाटतं भक्तांचं. त्यांच्याकडे जे कुणी प्रेषित आले ते त्यांची कुचेष्टाच करत राहिले.

३१) आम्ही त्यांच्या आधीच्या पिढ्यान्‌पिढ्या कशा नष्ट केल्या, त्यांना ते दिसत नाही? नंतर ते कधी त्यांच्याकडे परतणार नाहीत.

३२) ते सर्वचे सर्व आमच्याकडे हजर होतील.

३३) शुष्क झालेली ही धरती त्यांच्यासाठी एक संकेत आहे आम्ही (कसं) तिला जिवंत केलं, त्यातून अन्नधान्याचं पीक काढलं, जे ते खातात.

३४) (तसेच) त्यातून खजुरीच्या, द्राक्षांच्या बागा उभ्या केल्या आणि पाण्याचे झरे वाहिले.

३५) त्यांनी त्यांची फळे खावीत म्हणून. त्यांनी हे सगळं आपल्या हातानी बनवलं नाही. मग ते आभार मानणार नाहीत?

३६) धन्य आहे तो, ज्यानं जमिनीतून उगवणाऱ्या सर्व (वनस्पती) आणि त्यांच्या जिवांपासून सुद्धा, जोडप्यानं निर्माण केलं, हे त्यांना माहीत नाही.

३७) आणि रात्र एक संकेत आहे त्यांच्यासाठी, तिच्यामधून आम्ही दिवसास खेचून आणतो. मग ते (कसं) काळोखात बुडून जातात.

३८) आणि सूर्य आपल्या ठराविक कक्षेत फिरत राहतो. हे सर्व प्रभुत्वशाली आणि सर्वज्ञाने ठरवलेल्या योजनेनुसार आहे.

३९) चंद्रासाठी आम्ही टप्पे ठरवून दिलेत. शेवटी तो सुकलेल्या फांदी होऊन जातो.

४०) सूर्याची ऐपत नाही चंद्राला गाठण्याची, ना रात्र दिवसावर मात करू शकते. सारेच आपापल्या मर्यादांचं पालन करतायत.

४१) आणि आम्ही त्यांच्या वंशाला एका भरलेल्या नौकेत स्वार केलं. हेही त्यांच्यासाठी संकेतच.

४२) तसेच आम्ही यासारखी इतर वाहनेदेखील त्यांच्यासाठी निर्मिली ज्यांना हे उपयोगात आणतात.

४३) वाटल्यास आम्ही त्यांना बुडवून टाकू. (तेव्हा) कुणी विचारणा करणारा नसेल की त्यांना वाचवू शकेल.

४४) त्यांना ठराविक काळापर्यंत जगण्याची संधी ही आमच्या कृपेमुळेच आहे.

४५) आमच्या (या) कृपेस पात्र ठरण्यासाठी त्यांना सांगण्यात येते, आपल्या (नजरे) समोरील आणि मागील परिणामांपासून भीत राहा.

४६) त्यांच्या विधात्याकडून आलेल्या संकेतांपैकी जे काही संकेत येतात, त्यांना ते नजरेआड करतात,

४७) आणि जेव्हा त्यांना सांगितलं जातं की अल्लाहनं दिलेल्या साधनांतून खर्च करा, तर हे विद्रोही श्रद्धाधारकांना हिनवतात की ज्यांना इच्छिलं

असतं तर अल्लाहनंच, स्वत: त्यांना पोसलं असतं, अशांना आम्ही खायला द्यावं. तुम्ही तर उघडउघड भरकटले आहात.

४८) आणि हे म्हणतात, तुम्ही खरे असाल तर (सांगा कयामतची ही) वचनं कधी वास्तवात येणार

४९) ते ज्याची वाट पाहत आहेत तो भलामोठा स्फोट आहे. ते आपसात वाद घालत असतानाच त्यांना वेढून घेईल.

५०) त्यांना मृत्यूपत्र लिहून ठेवण्याससुद्धा वेळ मिळणार नाही की आपापल्या घरच्यांकडे परतता येईल.

५१) त्यातच एक तुतारी (नरसिंघा) फुंकली जाईल. लगेच ते कबरीतून (उठून) आपल्या विधात्याची वाट धरतील.

५२) नि म्हणतील, कसलं आमचं दुर्दैव, आम्ही शांत अवस्थेत कबरीत असताना आम्हाला कुणी उठविलं. हेच ते वचन कृपावंतानं दिलेलं, आणि प्रेषितांनी (ज्याची) सत्यता वर्तवली होती.

५३) तो एका प्रचंड स्फोटापलीकडं काहीच नाही आणि सारेच आमच्यासमोर हजर केले जातील.

५४) आज कुणावरही कसलाच अन्याय केला जाणार नाही आणि जे काही तुम्ही करत राहिले त्याच प्रमाणात मोबदला दिला जाईल.

५५) स्वर्गातील लोक जे काही करतील त्याच आनंदात मग्न होऊन जातील.

५६) ते आपापल्या मंडळींसह दाट सावलीत उच्चांसनांवर लोड लावून बसतील.

५७) त्यांच्याकरिता तेथे सर्व प्रकारची फळे आहेत (शिवाय) जे काही मागतील तेथे उपलब्ध असेल.

५८) परम दयाळू विधात्याकडून त्यांना सलाम म्हणून त्यांचं स्वागत केलं जाईल.

५९) हे अपराधी लोकहो, आज तुम्ही अलग व्हा.

६०) हे आदमची संतती, मी तुम्हाला हुकूम दिला नव्हता? सैतानाची आराधना करू नका (म्हणून), तो तुमचा उघड शत्रू आहे.

६१) आणि माझीच भक्ती करा हाच तो सरळमार्ग,

६२) समजलं नाही, तुम्हाला तुमच्यापैकी कित्येकांना त्यानं पदभ्रष्ट केले ते?

६३) हे आहे ते नरक ज्याचं तुम्हाला वचन दिलं गेलं होतं.

६४) तुम्ही ज्याचा नकार देत राहिला त्याकरिता तिच्यात दाखल व्हा.

६५) आज आम्ही त्यांच्या तोंडावर मोहर ठोकू, आता त्यांचे हात सर्वकाही आम्हाला सांगतील. आणि ते जे काही करत राहिले त्याची साक्ष त्यांचे पाय देतील.

६६) आमची इच्छा झाली तर आम्ही त्यांचे डोळे नष्ट करून टाकू. त्यांनी धाव घेतली तर कुठून त्यांना मार्ग सापडेल?

६७) आम्ही इच्छिले तर त्यांना बसल्या जागी विकृत करून टाकू,मग ते पुढं चालू शकतील की मागं परतणे त्यांना जमेल.

६८) आम्ही ज्यांना दीर्घायुष्य देतो त्यांना (वाकवून) उलटं करून टाकतो, (तरीदेखील) त्यांना हे समजत नाही.

६९) आम्ही (त्यांना) प्रेषितांना काव्य शिकविलं नाही ते त्यांना शोभत नाही, हा तर एक उपदेशपर स्पष्ट ग्रंथ होय.

७०) हयात असलेल्यांना (माणसांना) सावध करण्यासाठी आणि द्रोह करणाऱ्यांवर प्रमाण सिद्ध करण्यासाठी.

७१) आम्ही आपल्या हातांनी त्यांच्यासाठी साकारलेल्या निर्मितींना पाहत नाही. त्यापैकी त्यांच्या मालकीतील प्राणी आहेत.

७२) त्यांना आम्ही त्यांच्या अधीन केलं. पैकी काहींचा स्वारीसाठी उपयोग करतात तर काहींचा ते खातात.

७३) ते त्यांच्यासाठी कितीतरी उपयोगी आहेत. तसेच पेय (दूध) देखील आहे. तरीही ते कृतज्ञ होत नाहीत?

७४) आणि त्यांनी अल्लाहशिवाय इतरांना देव मानलं ते त्यांच्या मदतीला येतील म्हणून.

७५) तुमची मदत करण्याची त्यांची क्षमता नाही. त्यांना आमच्या समक्ष हजर केलं जाईल. लष्कररुपी.

७६) ते ज्या बाता मारतायत त्यांनी (तुमचं मन) दुखू नये. जे काही ते लपवतात आणि ज्यांचा डंका पिटतात आम्ही (सर्वकाही) जाणत आहोत.

७७) आम्ही मानवास विर्यापासून निर्माण केलं. हे त्यानं पाहिलं नाही? (आणि) लगेच तो उघड वाद घालू लागला.

७८) तो आम्हालाच उदाहरण देऊ लागला. आपल्या जन्मास विसरला. म्हणू लागला, कुजलेल्या या हाडांना कोण जीवित करेल?

७९) त्याला सांगा (हे प्रेषित) ज्यानं प्रथम तुम्हाला जन्मास आणलं तोच त्यांना पुनरुज्जीवित करेल. कोणत्याही पद्धतीनं निर्माण करण्याची कला आहे त्याच्याकडे.

८०) त्यानंच तर हिरव्या झाडांपासून आग उत्पन्न केली, आता तुम्ही त्यापासून चुली पेटवता.

८१) ज्यानं धरती आणि आकाश निर्मिले, त्याला त्यांच्यासारखं निर्माण करण्यावर प्रभुत्व नाही? का नाही? तो तर सर्वज्ञ आहे सर्वोच्च कौशल्यवान निर्माता (होय.)

८२) जेव्हा तो एखादा संकल्प करतो, त्याचं म्हणणं एवढंच, तो म्हणतो ‘हो’ आणि ती (गोष्ट) आकारात येते.

८३) धन्य आहे तो ज्याच्या हाती संपूर्ण अधिराज्य आहे, त्याकडेच तुम्हाला परतायचंय.

-------

# ३७. सूरह अस्साफ्फात

### मक्काकालीन, आयती १८२

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ रांगेत कतारबद्ध होणाऱ्यांची,

२) मग जे पिटाळून लावतात (दुष्टतेस) त्यांची,

३) आणि त्यांची (शपथ) जे उपदेश (कुरआन) वाचून दाखवत असतात.

४) तुमचा ईश्वर एकमेव एकच

५) आकाश आणि पृथ्वीचा विधाता तसंच जे काही त्यामध्ये आहेत त्या सर्वांचा आणि सर्व पूर्वांचा.

६) आम्ही या धरतीवरील आकाशास तारकांच्या सौंदर्यानं सजवलं,

७) आणि त्यास सर्व बंडखोर सैतानांपासून सुरक्षित केलं.

८) प्रतिष्ठित मंडळींचं (दूतलोक) ते काही ऐकू शकत नाहीत कारण चहुबाजुंनी त्यांना हुसकावून लावलं जातं.

९) त्यांना कायमची शिक्षा आहे.

१०) हुसकावून जर कुणी पळू लागल्यास उल्केनं त्याचा पाठलाग केला जातो.

११) त्यांना विचारा, त्यांची निर्मिती अधिक कठीण की आम्ही जे निर्माण केलं ते? आम्ही त्यांना चिकटमातीपासून निर्माण केलं.

१२) तुम्हांस नवल वाटतं आणि ते चेष्टा करतात.

१३) त्यांना उपदेश दिल्यास ते लक्ष देत नाहीत.

१४) एखादा संकेत पाहिला तर त्यांचा हंशा उडवितात

१५) नि म्हणतात, ही तर उघड उघड जादू आहे.

१६) आम्ही मेलो, आमची हाडं आणि माती होऊन गेली तरी आम्हांस (जीवंत) उठवलं जाईल?

१७) आमच्या पूर्वजांना सुद्धा?

१८) त्यांना सांगा, होय! तुमचा अपमान केला जाईल.

१९) फक्त एकच दटावणी होईल. आणि लगेच ते (डोळ्यांनी) पाहू लागतील

२०) ते म्हणू लागतील, दुर्दैव आमचं. हा तर निर्णयाचा दिवस आहे.

२१) (होय) हा निर्णयाचा (च) दिवस, ज्यास तुम्ही खोटं म्हणत होता.

२२) एकत्रित करा अत्याचारी आणि त्यांच्या मंडळींना, ज्यांची ते पूजा करीत असत,

२३) अल्लाह सोडून आणि दाखवा त्यांना नरकाची वाट.

२४) जरा थांबवा, त्यांच्याकडे विचारणा करू द्या.

२५) का बरं (आता) तुम्ही एकमेकांना मदत करत नाही?

२६) आज तर ते स्वत:च मान (खाली) घालून शरण येत आहेत

२७) आणि एकमेकांकडे वळून आपसात विचारपूस करतील.

२८) म्हणतील, तुम्ही तर आमच्यावर उजव्या बाजूनं (चवताळून) येत होता.

२९) ते उत्तर देतील, नव्हे तुम्हीच श्रद्धा बाळगत नव्हता.

३०) आम्हांस तुम्हांवर मुळीच अधिकार नव्हता, तुम्ही बंडखोर लोकांपैकी होते.

३१) आमच्या विधात्याचं म्हणणं आता सिद्ध झालं, आम्हांस आता (शिक्षा) उपभोगायचीय.

३२) आम्ही स्वत:च भरकटलो होतो, तुम्हालाही फसवलं.

३३) (म्हणूनच) त्यांना त्या दिवशी शिक्षेतही वाटा घ्यावा लागेल.

३४) पापी लोकांना आम्ही अशीच वागणूक देतो.

३५) कारण त्यांना अल्लाहशिवाय कुणी उपास्य (ईश्वर) नाही असे सांगितलं असतानादेखील ते अहंकार करत असत.

३६) म्हणतात, एका झपाटलेल्या कवीखातर आम्ही आमच्या देवांस सोडून देऊ.

३७) नव्हे ते सत्य घेऊन आलेत आणि (पूर्वीच्या) प्रेषितांची पुष्टी करतात.

३८) तुम्ही दु:खद शिक्षा भोगणारच.

३९) तुमच्याच कृत्यांची परतफेड केली जाईल,

४०) पण जे अल्लाहचे प्रामाणिक भक्त आहेत त्यांना सोडून.

४१) त्यांच्यासाठी उपजीविकेची तरतूद केलेली आहे.

४२) फळं आणि मानसन्मान

४३) समृद्ध अशा स्वर्गांमध्ये

४४) समोरासमोर उच्च स्थानांवर (बसले असतील).

४५) स्वच्छ पेयाचा कप त्यांच्यामधून फिरवला जाईल

४६) पांढरंशुभ्र नि पिण्यास मधुर

४७) ज्यामुळं डोक्यास त्रास होणार नाही की नशा येणार नाही

४८) त्यांच्या सान्निध्यात देखण्या, डोळस आणि विनम्र स्त्रिया असतील

४९) झाकून ठेवलेली अंडीच जणू.

५०) आपसात संवाद घालीत ते एकमेकांकडं वळतील.

५१) पैकी एकजण म्हणेल, माझा एक सोबती होता,

५२) तो मला विचारत असे, तू ह्या सत्यास (कयामत) मानणारा आहेस?

५३) (म्हणजे) आम्ही मेल्यानंतर हाडं आणि माती होऊन गेल्यावरसुद्धा आम्हांस (आमच्या कर्मांचा) बदला दिला जाईल?

५४) तो म्हणेल, तुम्ही खाली पाहता?

५५) डोकावून पाहिल्यास तो त्यास नरकामध्ये दिसेल.

५६) तो म्हणेल, अल्लाहची शपथ! तू तर माझा नाशच केला असता.

५७) माझ्या विधात्याची कृपा मला लाभली नसती तर मलाही (शिक्षेसाठी) हजर केलं गेलं असतं.

५८) आम्ही आता नाही मरणार?

५९) पूर्वी जे मरण आलं तेच आणि आम्हांस शिक्षाही होणार नाही.

६०) निश्चितच हेच आहेत ज्यांना मोठं यश लाभेल

६१) अशा लाभासाठी सर्वांनी कर्म करायला हवं, जे (लोक) कर्म करतात.

६२) ही चांगली मेजवानी की जक्कूमच्या वृक्षाची.

६३) आम्ही त्यास पापी लोकांसाठी परीक्षा म्हणून बनवलंय.

६४) तो वृक्ष नरकातील मुळांपासून अंकुरलाय.

६५) त्याच्या फळांचे घड जणू काही सैतानांची डोकीच.

६६) ते (लोक) तीच (फळं) खातील आणि त्यापासूनच आपली पोटं भरतील.

६७) आणि त्यावर त्यांना उकळत्या पाण्यापासून बनवलेलं मिश्रण दिलं जाईल.

६८) आणि मग नरकाग्नीकडं वळतील.

६९) खचितच त्यांनी आपल्या पूर्वजांना चुकीच्या मार्गावर पाहिलं होतं.

७०) आणि म्हणूनच त्यांच्या पाऊलखुणांवर धावत राहिले.

७१) त्यांच्या पूर्वजांपैकी बहुतेक मार्गभ्रष्टच होते.

७२) आम्ही त्यांच्यामध्ये ताकीद देणारे पाठवले.

७३) पाहा, मग ज्यांना सावध केलं होतं, त्यांचा शेवट कसा झाला?

७४) अल्लाहचे जे प्रामाणिक भक्त होते त्यांना सोडून.

७५) आणि नूह यांनी (जेव्हा) आमचा धावा केला, किती औदार्यानं आम्ही त्यास प्रतिसाद दिला.

७६) आम्ही त्यास आणि त्याच्या कुटुंबीयांना एका भयंकर आपत्तीतून वाचवलं.

७७) आणि त्याच्या वंशास जगवलं.

७८) आणि नंतरच्या पिढ्यांमध्ये त्यांचं स्मरण कायम केलं.

७९) सकल विश्वांमध्ये नूह यांना शांतता लाभो.

८०) आम्ही अशाच रितीनं नेक लोकांना बक्षीस देतो.

८१) कारण ते आमच्याशी एकनिष्ठ भक्तांपैकी होते.

८२) इतरांना आम्ही बुडवून टाकलं

८३) आणि इब्राहीम त्यांचाच (नूह यांचा) मार्ग अवलंबणारे होते.

८४) जेव्हा ते आपल्या विधात्याकडं शुद्ध मनानं आले.

८५) आठवा, त्यांनी आपल्या पित्यास आणि लोकांना विचारलं, तुम्ही कशाची पूजा करता?

८६) तुम्हाला अल्लाहशिवाय थोतांड ईश्वरं हवेत?

८७) आणि विश्वांच्या विधात्याविषयी तुमची कल्पना काय ती?

८८) आणि मग त्यांनी तारांकडं नजर टाकली

८९) म्हणाले, मला बरं वाटत नाही.

९०) आणि म्हणून ते त्यांच्यापासून वळले नि निघून गेले.

९१) आणि मग ते त्यांच्या देवतांकडं आले नि विचारलं, तुम्ही खात नाहीत?

९२) काय झालं, तुम्ही बोलत का नाही?

९३) मग सर्वशक्तीनिशी ते त्यांच्यावर तुटून पडले.

९४) आणि मग ते लोक घाबरून धावत त्यांच्याकडं आले.

९५) त्यांनी (इब्राहीम यांनी) त्यांना विचारलं, तुम्ही स्वत:च जे घडवता त्यांची पूजा करता?

९६) अल्लाहनं तुम्हाला निर्मिलं आणि तुम्ही जे काही बनवता (तेही)

९७) ते (एकमेकांना) म्हणू लागले, याच्यासाठी एक भट्टी बांधा आणि त्या धगधगत्या आगीत त्यास टाकून द्या.

९८) त्यांनी एक कट योजला होता, पण आम्ही त्यांचंच पतन केलं.

९९) ते (इब्राहीम) म्हणाले, मी माझ्या विधात्याकडं जातो, तोच मला मार्ग दाखवंल.

१००) (म्हणाले) माझ्या विधात्या, मला एक सदाचारी (पुत्र) दे.

१०१) आम्ही त्यांना एक (औदार्यपूर्ण आणि) समंजस पुत्राची खूशखबर दिली.

१०२) नंतर जेव्हा तो (मुलगा) वयात आला आणि त्यांच्याबरोबर धावपळ करू लागला तेव्हा ते म्हणाले, माझ्या मुला! मी स्वप्नात तुझा बळी देत होतो. आता तुझं मत काय ते पाहून घे. तो म्हणाला, बाबा! तुम्हांस जी आज्ञा दिली जाते ती पाळा, अल्लाहच्या इच्छेनं आपणास मी धैर्यशील आढळेन.

१०३) दोघांनी मग आज्ञा पाळली, आणि त्यांनी मुलास पालथं केलं.

१०४) तोच आम्ही त्यांना हाक दिली, इब्राहीम!

१०५) तू स्वप्न साकारलंस. आम्ही सदाचारींना असंच मोबदला करतो.

१०६) ही तर एक उघड परीक्षा होती.

१०७) आम्ही एका मोठ्या बळीऐवजी प्रतिबळी दिला.

१०८) आणि पुढच्या पिढ्यांमध्ये त्याचं कायम केलं.

१०९) सलाम इब्राहीम यांना.

११०) आम्ही सत्कर्मी लोकांना असाच मोबदला देतो.

१११) ते खरोखरीच आमच्याशी एकनिष्ठ भक्तांपैकी होते.

११२) आम्ही त्यांना इसहाक यांचं सुवृत्त दिलं. ते प्रेषित आणि सदाचारी (लोकां)पैकी होते.

११३) आम्ही त्यांना आणि इसहाक यांना संपन्न केलं. त्यांच्या वंशात सत्कर्मींही असतील आणि इतर काही स्वत:च्या जिवांशी उघड अन्याय करणारेही असतील.

११४) आम्ही मूसा आणि हारुन यांना उपकृत केलं.

११५) त्या दोघांची आणि त्यांच्या लोकांची भयंकर यातनांतून सुटका केली.

११६) त्यांना मदत पुरविली म्हणून त्यांनी वर्चस्व मिळवलं.

११७) आम्ही दोघांना स्पष्ट ग्रंथ दिले

११८) आणि दोघांना रास्त मार्गाकडं मार्गदर्शन केलं.

११९) आणि नंतरच्या पिढ्यांमध्ये त्या दोघांचं स्मरण कायम केलं.

१२०) मूसा आणि हारुन यांना शांतता लाभो.

१२१) आम्ही सदाचारींना असाच मोबदला देतो.

१२२) ते दोघं आमच्या एकनिष्ठ भक्तांपैकी होते.

१२३) आणि इलियास प्रेषितांपैकी होते.

१२४) आठवा, त्यांनी आपल्या लोकांस सांगितलं, तुम्ही (अल्लाहस) भीत नाही?

१२५) तुम्ही बअल (मूर्ती) ची पूजा करता आणि सर्वोत्तम निर्मात्यास सोडून देता?

१२६) अल्लाहच तुमचा आणि तुमचा पूर्वजांचा विधाता आहे.

१२७) पण त्यांनी त्यास नकार दिला आणि त्यांना म्हणूनच हजर केलं जाईल

१२८) जे अल्लाहचे प्रामाणिक भक्त आहेत त्यांना सोडून.

१२९) नंतरच्या पिढ्यांमध्ये त्यांचे स्मरण जारी ठेवलं.

१३०) इलियास यांना शांतता लाभो.

१३१) सत्कर्मी लोकांस आम्ही असाच मोबदला देतो.

१३२) ते आमच्या एकनिष्ठ भक्तांपैकी होते.

१३३) आणि लूतदेखील प्रेषितांपैकी होते.

१३४) आठवा, आम्ही त्यास आणि त्यांच्या सर्व कुटुंबीयांस वाचवलं

१३५) मागं असणाऱ्या एका वृद्ध महिलेस वगळता.

१३६) आम्ही नंतर बाकीच्यांना नष्ट केलं.

१३७) तुम्ही दिवसा त्यांच्या (वस्ती) वरून ये-जा करता.

१३८) रात्रीदेखील - तेव्हा तुम्हांस समज घडत नाही.

१३९) आणि यूनुस प्रेषितांपैकी होते.

१४०) जेव्हा ते एका भरलेल्या जहाजावर पळून गेले.

१४१) तिथं ते फासे टाकणाऱ्यांमध्ये सामील झाले, पण त्यांनाच दोषी ठरवण्यात आलं.

१४२) आणि त्यास माशानं गिळून टाकलं. ते (स्वत:स) दोष देत होते.

१४३) आणि जर त्यांनी अल्लाहचं गौरवगाण केलं नसतं तर

१४४) ते खात्रीनं पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत माशाच्या पोटातच राहिले असते.

१४५) आम्ही त्यांना ओसाड ठिकाणी आजारी अवस्थेत फेकून दिलं.

१४६) मग आम्ही त्यांच्यासाठी एक वेलीवजा झुडुप उगविलं.

१४७) आणि त्यांना एक लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकांकडं पाठवलं.

१४८) त्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि आम्ही काही काळ सुखोपभोग दिला.

१४९) त्यांना विचारा, तुमच्या विधात्याकरिता तर मुली आणि त्यांच्यासाठी मुलं आहेत?

१५०) आम्ही दूतांना स्त्रिया बनवलं? ते पाहत होते?

१५१) नव्हे, ते जे सांगतात, त्यांनी स्वत: ते घडवलंय

१५२) (की) अल्लाह संतती बाळगतो आहे. ते निव्वळ खोटारडे आहेत.

१५३) त्यानं मुलांऐवजी मुलींना पसंत केलं?

१५४) तुम्ही काहीही कसं ठरवता, काय झालंय तुम्हाला,

१५५) तुम्ही लक्ष देणार नाही का?

१५६) तुमच्याकडं कोणता स्पष्ट अधिकार आहे?

१५७) तेव्हा आणा ते ग्रंथ जर तुम्ही खरे असाल.

१५८) आणि त्यांनी त्याच्याशी जिन्नांचं नातं जोडलं, पण जिन्नांना (अदृश्य) माहीत आहे त्यांना त्याच्यासमोर हजर व्हायचं आहे.

१५९) ते जे घडत असतात त्यापासून अल्लाह पवित्र आहे.

१६०) अल्लाहचे जे प्रामाणिक भक्त आहेत त्यांना सोडून

१६१) तुम्ही आणि ते ज्यांची पूजा करतात.

१६२) त्यांच्याविरूद्ध कुणालाही भरकटवू शकत नाही,

१६३) पण जो नरकात जाणार असेल त्यास वगळता.

१६४) (दूत म्हणतात) आम्हांपैकी असा कोणी नाही ज्याचं स्थान निश्चित केलेलं नसेल.

१६५) आम्ही शिस्तबद्ध पंक्तीत उभं आहोत.

१६६) आम्हीच गुणगान करणारे आहोत.

१६७) निश्चितच ते म्हणत असत,

१६८) जर आमच्याकडं पूर्वींच्यांचे उपदेश असते

१६९) तर मग आम्हीही अल्लाहचं प्रामाणिक भक्त झालो असतो.

१७०) पण त्यांनी नकार दिला तेव्हा लवकरच त्यांना कळून चुकेल.

१७१) आमच्या प्रेषितांना आमचा शब्द आधीच पोचलाय.

१७२) त्यांना नक्कीच मदत पुरविली जाईल

१७३) आणि आमचंच सैन्य वरचढ ठरेल.

१७४) काही काळ त्यांच्याकडं दुर्लक्ष करा,

१७५) त्यांना पाहत राहा ते लवकर (आपला परिणाम) पाहून घेतील.

१७६) ते आमच्या शिक्षेसाठी घाई करताहेत?

१७७) जेव्हा ते त्यांच्या अंगणात त्यांच्यावर कोसळंल तेव्हा ज्यांना सावध केलं गेलं होतं त्यांची सकाळ दुर्भाग्याची असेल.

१७८) काही काळ त्यांच्याकडं लक्ष देऊ नका

१७९) आणि पाहा ते लवकरच काय पाहणार आहेत ते.

१८०) तुमचा विधाता ते जे घडवतात त्यापासून अलिप्त असून गौरवास पात्र आहे.

१८१) प्रेषितांना शांतता लाभो.

१८२) सकल विश्वांचा विधाता अल्लाहचा गौरव असो.

-------

# ३८. सूरह सॉद

**मक्काकालीन, आयती ८८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सॉद॰ शपथ उपदेशपर कुरआनची.

२) पण ज्या लोकांनी नाकारलं ते अहंकारी आणि फुटीरवादी आहेत.

३) त्यांच्या आधी आम्ही कितीतरी समूहांना नष्ट केलं, शेवटी ते विनवणी करू लागले. पण आता सुटकेची वेळ निघून गेली होती.

४) त्यांना नवल वाटलं, त्यांना ताकीद देण्यासाठी त्यांच्यापैकीच एकजण आला. नाकारणारे म्हणू लागले, हा तर खोटारडा जादूगार आहे.

५) त्यानं साऱ्या ईश्वरांना एकमेव ईश्वर बनवून टाकलं? ही तर खरं नवलाईच.

६) त्यांच्यामधील सरदार निघून जाताना म्हणाले, चला आपापल्या देवांशी ठाम राहा. यामध्ये त्याचा स्वार्थ दिसतो.

७) आम्ही अलीकडच्या धर्माबाबत असं काही ऐकलं नाही, हे तर बनावट कथानकापलीकडं काही नाही.

८) आम्हांपैकी फक्त त्याच्यावरच उपदेश (कुरआन) अवतरला? खरं पाहता ते माझ्या उपदेशाविषयी साशंक आहेत, पण त्यांनी अद्याप माझी शिक्षा भोगलेली नाही.

९) त्यांच्याकडं त्यांच्या विधात्याच्या दयेचे खजिने आहेत? जो प्रभुत्वसंपन्न आणि उदंड दाता आहे.

१०) की त्यांच्याकडं आकाश, पृथ्वी आणि या दोहोंमधील जे सर्वकाही आहे त्याची मालकी आहे? मग चढू द्या त्यांना वर दोरखंड लावून.

११) हादेखील इथं पराभूत झालेल्या (लोकांच्या) समूहामधील एक समूह

१२) त्यांच्या आधीही, नूहच्या लोकांनी, आदच्या लोकांनी आणि

वधस्तंभवाले फिरऔन यांनी (प्रेषितांना) खोटं ठरवलंय.

१३) तसंच समूद आणि लूत यांच्या लोकांनी आणि ऐका वाल्यांनी, हेच ते समूह आहेत.

१४) ह्या सर्वांनी प्रेषितांना खोटं ठरवलं म्हणून (त्यांना) शिक्षा झाली.

१५) हे फक्त एकाच प्रचंड स्फोटाची वाट पाहताहेत आणि त्यांना उसंत नसणार.

१६) आणि ते (चेष्टेनं) म्हणाले होते, आमच्या विधात्या, आम्हांस लवकरच शिक्षा दे, हिशेब देण्याचा दिवस उजाडण्याआधीच.

१७) ते (लोक) जे बोलतात त्यावर धीर धरा आणि आमचे भक्त सामर्थ्यवान दाऊद यांची आठवण करा. ते सातत्यानं (अल्लाहकडं) धाव घेत असत.

१८) आम्ही पर्वतांना त्यांच्या अंकित केलं होतं. ते सकाळ-संध्याकाळ त्यांच्याबरोबर गुणगान करत असत.

१९) आणि पक्षी एकत्रित होऊन सर्वचे सर्व त्यांच्याकडं वळंत असत.

२०) आम्ही त्यांच्या राज्यास बळकटी दिली आणि त्यांना विद्वत्ताप्रचुर केलं आणि बोलण्यात निर्णायक क्षमता दिली.

२१) आणि तुम्हांस ती बातमी मिळाली जेव्हा वाद घालणारे भिंतीवर चढून आत धर्मस्थळामध्ये शिरले होते?

२२) जेव्हा ते दाऊद यांच्या समक्ष उभे राहिले, ते त्यांना घाबरून गेले. ते म्हणाले, भिऊ नका. आम्ही वादी-प्रतिवादी आहोत आणि आमच्यापैकी एकानं दुसऱ्यावर अतिरेक केलाय. तेव्हा तुम्ही आमच्यामध्ये सत्य ते निर्णय द्या. अन्याय नका करू. आम्हांस रास्त मार्ग दाखवा.

२३) हा माझा भाऊ. त्याच्याकडं ९९ मेंढ्या आहेत. आणि माझ्याजवळ एकच मेंढी आहे. आता तो म्हणतो ती मेंढीसुद्धा मला देऊन टाक. आणि आपल्या बोलण्यात त्यानं मला पछाडलंय.

२४) (दाऊद) म्हणाले, खरंच त्यानं आपल्या मेंढ्यामध्ये तुझ्या मेंढीची भर घालण्याची मागणी करून तुझ्याशी अन्याय केलाय. आणि एकमेकांशी जुळवून राहणारे अनेक लोक एकमेकांशी अतिरेक करत असतात. पण त्यांना वगळून जे श्रद्ध असतात आणि भली कामं करत असतात पण अशी (माणसं) फार कमी आहेत. दाऊद यांना वाटलं आम्ही त्यांची परीक्षा घेतली म्हणून त्यांनी आपल्या विधात्याशी क्षमायाचना केली आणि नम्रतेनं नतमस्तक झाले.

२५) आम्ही त्याबद्दल त्यांना क्षमा केली. आणि त्यांच्याशी आमची जवळीक असून त्यांना सुंदर असं ठिकाण आहे.

२६) आणि दाऊद! आम्ही तुम्हांस ह्या धरतीवर (आमचा) प्रतिनिधी नियुक्त केलं. तेव्हा लोकांच्या दरम्यान न्याय-निवाडा करा, आपल्या आकांक्षांमागं जाऊ नका, अन्यथा त्या तुम्हांस अल्लाहच्या मार्गापासून वळवतील. आणि जे लोक अल्लाहच्या मार्गापासून भ्रष्ट होत असतात त्यांना कडक शिक्षा असेल. कारण त्यांना हिशेब देण्याच्या दिवसाचा विसर पडला.

२७) आम्ही हे आकाश आणि पृथ्वी आणि त्या दोहोंमधील सर्वकाही अनाठायी निर्माण केलं नाही. पण जे नाकारणारे लोक आहेत ते तसा विचार करतात. या नाकारणाऱ्यांचा नरकाग्नीपासून सर्वनाश होईल.

२८) ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि भली कामं करतात त्यांना आम्ही धरतीवर बिघाड माजविणाऱ्या लोकांप्रमाणं बनवून टाकू? किंवा आम्ही सदाचारींना दुराचारींप्रमाणं बनवू?

२९) आम्ही तुम्हांस एक समृद्ध ग्रंथ पाठवलाय. त्यामधील आयतींवर (वचनांवर) चिंतन करावं आणि समंजस लोकांनी बोध घ्यावा.

३०) आम्ही दाऊद यांना सुलेमान (पुत्र) दिला, उच्चप्रतीचा भक्त. त्याच्याकडं (अल्लाहकडं) वळणारा.

३१) जेव्हा एका संध्याकाळी त्यांना उत्तम दर्जाचं घोडं सादर केलं गेलं.

३२) ते म्हणाले, आपल्या विधात्याच्या स्मरणाकडं दुर्लक्ष करून मी संपत्तीशी प्रेम केलं सूर्य पश्चिमेत विलीन झाला तोपर्यंत.

३३) त्यांना पुन्हा माझ्यासमोर आणा. आणि ते त्यांच्या माना व पायांवरून हात फेरू लागले.

३४) आम्ही सुलेमान यांची परीक्षा घेतली, त्यांच्या सिंहासनावर एक धड टाकून. आणि मग ते आम्हांकडं वळले.

३५) ते विनंती करू लागले, माझ्या विधात्या! मला क्षमा कर आणि मला असं राज्य दे जसे माझ्यानंतर कुणासही मिळणार नाही. तूच तर सर्वकाही देणारा आहेस.

३६) आम्ही वाऱ्यांना त्यांच्या अंकित केलं, त्याच्या आज्ञेनुसार ते वाहत असत आणि ते त्यांना जिथं जायचं तिथं हळूवार पोचवत असत.

३७) आणि बांधकाम करणारे व पाणबुडे जिन्न आम्ही त्यांच्या ताब्यात दिले.

३८) आणि काही इतरही साखळ्यांनी बांधून टाकलेले.

३९) ही आमची देणगी. आता तुम्ही त्यातून इतरांना उपकृत करा अथवा रोखून धरा. तुमच्याकडं कसला हिशेब (मागितला जाणार) नाही.

४०) आणि त्यांना आमच्याकडं जवळीक असेल तसेच एक सुंदर असं ठिकाण.

४१) आमचं भक्त अय्यूब यांची आठवण करा. जेव्हा त्यांनी आपल्या विधात्याचा धावा केला कारण सैतानानं मला इजा पोचवली, मला यातना दिली (म्हणून)

४२) (आम्ही) म्हणालो, आपला पाय जमिनीवर आपटा आणि हे पाहा थंड आणि गोड पाणी पिण्यास आणि अंघोळीसाठी.

४३) त्याचबरोबर आम्ही त्यांना त्यांचं कुटुंबही परत दिलं आणि अधिक तितकंच, आमच्याकडची संपन्नता, समंजस लोकांसाठी उपदेशपर.

४४) हातात मूठभर गवत घ्या, ते आपटा, आपली शपथ मोडू नका. ते

आम्हांस धैर्यशील आढळले, एक उत्तम भक्त. ते खरंच (अल्लाहकडं) वळणारे होते.

४५) आमचे भक्त इब्राहीम, इहसाक आणि याकूब यांचा उल्लेख करा, सर्वांकडे सामर्थ्य आणि दूरदृष्टी होती.

४६) आम्ही त्यांना खास गुणवैशिष्ट्ये दिली होती, ते म्हणजे (परलोकाच्या) घराचे स्मरण.

४७) ते आमचे सर्वोत्तम आणि निवडक लोक होते.

४८) तसेच आमचे भक्त इस्माईल, अल-यसअ आणि जलकिफ्लचाही उल्लेख करा. हे सारे सर्वोत्तम लोकांमधून होते.

४९) ही एक आठवण होती, सदाचारी लोकांना, सुंदर असं ठिकाण आहे.

५०) अनंतकालीन स्वर्गांची दारं त्यांच्यासाठी खुली असतील.

५१) तिथं ते रेलून असतील आणि असंख्य फळफळावळ आणि पेय मागवून घेतील.

५२) आणि त्यांच्या सान्निध्यात समवयस्क मंडळी, नजरा खाली करून असतील.

५३) ह्यांचंच तुम्हांस वचन दिलं जातं हिशेबाच्या दिवशी.

५४) ही आमची साधनं आहेत कधी न संपणारी.

५५) असंच हे, पण बंडखोरांचं ठिकाण फारच वाईट (असेल).

५६) नरक (आहे ते), तिच्याशी ते भिडतील, किती वाईट ठिकाण.

५७) इथं त्यांना उकळतं पाणी आणि पूचा उपभोग घेऊ दे.

५८) आणि अशाच प्रकारच्या इतर कितीतरी (शिक्षा)

५९) ही दुसरी एक पलटन तुझ्याकडं येत आहे त्याचं स्वागत नसो. ते नरकात जाणार आहेत.

६०) ते म्हणतील, नव्हं तुमचं स्वागत नको, तुम्हीच तर आम्हाला ही शिक्षा

ओढवून आणली. राहण्याचं हे ठिकाण किती वाईट आहे.

६१) ते म्हणतील, आमच्या विधात्या, ज्यांनी आम्हांवर हे (संकट) कोसळवलंय त्यांना तू नरकात दुपटीनं शिक्षा कर.

६२) आणि ते म्हणतील, आम्हांस काय झालंय, ती मंडळी आम्हांस दिसत नाही ज्यांची गणना आम्ही वाईट लोकांत करत होतो.

६३) आम्ही उगाच त्यांची चेष्टा करत होतो. अथवा ते आमच्या नजरेस पडत नाहीत.

६४) खरंच आहे ते नरकातील लोकांचे आपसात असेच तंटे होतील.

६५) त्यांना सांगा, मी केवळ ताकीद देणारा आहे. अल्लाहव्यतिरिक्त इतर कोणी ईश्वर नाही, तोच एकमेव सर्वशक्तिमान आहे,

६६) आकाश आणि पृथ्वी आणि त्यामधील सर्वांचा स्वामी, प्रभुत्वसंपन्न आणि क्षमाशाली.

६७) त्यांना सांगा, हा तर महान संदेश आहे.

६८) त्याकडं तुम्ही लक्ष देत नाहीत.

६९) मला काही माहिती नव्हती वरिष्ठ मंडळींविषयी, ते आपसात जे वाद घालत होते त्याबाबत.

७०) मी तर स्पष्टपणे सावधान करणारा असल्याची मला दिव्य अनुभूती होत असे.

७१) आठवा, जेव्हा तुमच्या विधात्यानं दूतांना सांगितलं, मी मातीपासून एक माणूस घडवणार आहे.

७२) जेव्हा मी त्यास साकारेन, आणि त्यामध्ये माझे चैतन्य फुंकीन तेव्हा तुम्ही त्याला नतमस्तक व्हा.

७३) तेव्हा सर्व देवदूत एकत्र होऊन नतमस्तक झाले

७४) इब्लीस वगळता, त्यानं अहंकार केला आणि बंड करणाऱ्यांपैकी झाला.

७५) अल्लाहनं विचारलं, इब्लीस, त्यास नतमस्तक होण्यापासून तुझं काय नडलं, ज्यास मी माझ्या हातांनी निर्माण केलं, उद्धटपणा तुझा की तू प्रतिष्ठितांपैकी आहेस.

७६) त्यानं (इब्लीसनं) उत्तर दिलं, मी त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. तू मला अग्नीपासून निर्माण केलं आणि त्यास मातीतून साकारलं.

७७) (अल्लाहनं) म्हटलं, चालता हो इथून. तू शापित झाला आहेस.

७८) निश्चितच तुझ्यावर माझा धिक्कार असो निर्णयाच्या (कयामतच्या) दिनापर्यंत.

७९) तो (इब्लीस) म्हणाला, माझ्या विधात्या! ज्या दिवशी (मृतांना) उठवलं जाईल तोवर मला उसंत दे.

८०) होय, निश्चितच दिली तुला उसंत

८१) एका ठराविक अवधीपर्यंत,

८२) त्यानं (इब्लीसनं) सांगितलं. तुझ्या प्रतिष्ठेची शपथ! मी त्या सर्वांना पथभ्रष्ट करून टाकीन

८३) तुझे जे प्रामाणिक भक्त आहेत त्यांना वगळून.

८४) (अल्लाहनं) म्हटलं, हे खरंय, मी न्याय्य तेच सांगतो.

८५) मी नरकाला भरून टाकीन, तू आणि तुझं पालन करतील त्या सर्वांनी.

८६) हे प्रेषित! त्यांना सांगा, मी या कामी तुमच्याकडून कोणताच मोल मागत नाही की मी बनावट लोकांपैकी नाही.

८७) हे (कुरआन) तर अखिल विश्वासाठी उपदेश आहे.

८८) आणि काही काळ लोटल्यानंतर तुम्हांस याबाबत सर्वकाही कळून येईल.

-------

# ३९. सूरह अजज़ुमर

**मक्काकालीन, आयती ७५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) प्रभुत्वशाली आणि प्रतिभासंपन्न अल्लाहकडून या ग्रंथाचं अवतरण झालंय.

२) आम्ही तुमच्याकडं हा ग्रंथ सत्याधिष्ठित अवतरलाय. तेव्हा तुम्ही अल्लाहची आराधना करा आणि धर्मास त्याच्यासाठीच विशुद्ध करा.

३) लक्षात असू द्या, धर्म फक्त अल्लाहचाच. जे लोक त्यास सोडून इतरांशी सलगी करतात (ते म्हणतात), आम्ही अल्लाहशी जवळीक साधण्यासाठी त्यांची उपासना करतो. ज्या बाबतीत ते वाद घालीत, अल्लाह त्याचा निर्णय देईल. जो खोटारडा आणि कृतघ्न असतो त्यास अल्लाह मार्ग दाखवत नाही.

४) जर एखाद्यास पुत्र घेण्याची इच्छा असतीच तर त्यानं आपल्या निर्मितीमधून हवी त्याची निवड केली असती. तो पवित्र आहे, तो अल्लाह एकमेव आणि सर्वशक्तिमान आहे.

५) आकाश आणि पृथ्वीला हक्कानं निर्माण केलं. दिवसावर रात्रीचं आवरण घालतो आणि रात्रीवर दिवसाचं. सूर्य व चंद्रास अधीन केलं, प्रत्येक नियुक्त केलेल्या मुदतीपर्यंत भ्रमण करत राहील. लक्षात ठेवा, तोच प्रभुत्वशाली असून क्षमा करणारा आहे.

६) एकाच जिवापासून तुमची निर्मिती केली आणि त्याच्यापासून त्याची जोडपी बनवली आणि आठ प्रकारची जनावरं तुम्हास दिली. तुमच्या मातांच्या गर्भात तुम्हांस उत्पन्न करतो. तीन अंधारमय स्थितीत, एकानंतर एक आकार, असा हा तुमचा अल्लाह तुमचा विधाता. त्याचंच सार्वभौमत्व, त्याच्याशिवाय इतर कोणीच नाही. तेव्हा तुम्ही वळून कुठं जाता?

७) तुम्ही जर कृतघ्न झालात तर अल्लाह तुमच्यापासून गरजमुक्त आहे. त्याच्या भक्तांनी कृतघ्न असणं त्यास पसंत नाही. तुम्ही कृतज्ञ झाला तर तुमच्यासाठी ते त्यास पसंत आहे. ओझं वाहणारा कुणी इतर कुणाचं ओझं वाहणार नाही. नंतर तुम्ही तुमच्या विधात्याकडंच परतणार आहात. तेव्हा तुम्ही जे करत राहिलात ते तुम्हांस तो कळवून देईल. त्यास मनांमधील गोष्टी अवगत असतात.

८) जेव्हा माणसास एखादी विपत्ती स्पर्शून जाते तेव्हा तो आपल्या विधात्याकडं वळतो, त्याचा धावा करतो. आणि नंतर जेव्हा त्यास तो वरदान देतो तेव्हा तो ज्यासाठी पूर्वी त्याचा धावा करत होता ते विसरून जातो. आणि अल्लाहसाठी भागीदार बनवतो. त्याच्या (अल्लाहच्या) मार्गापासून भरकटवण्यासाठी. त्यांना सांगा, काही काळ तू आपल्या नकाराचा आनंद घे. तू निश्चितच नरकाचा धनी असशील.

९) जो रात्रीच्या प्रहरी (जो) नतमस्तक होऊन उभ्यानं आराधाना करतो, परलोकाची भीती बाळगतो आणि आपल्या विधात्याच्या दयेची कामना करतो त्यांना विचारा, ज्ञान ठेवणारे आणि ज्यांना ज्ञान नाही सारखेच असतात काय? समंजस आहेत तेच उपदेश स्वीकारतात.

१०) त्यांना सांगा, माझी श्रद्धा धारण केलेल्या भक्तहो, आपल्या विधात्याची भीती असू द्या. या जगात जे (लोक) भली कामं करतात त्यांच्यासाठी भलाई आहे. अल्लाहची धरती उदंड आहे. धैर्यानं वागतील त्यांच्यासाठी अमाप आणि पुरेपूर मोबदला आहे.

११) त्यांान सांगा, मला आज्ञा दिली, धर्मास समर्पित होऊन अल्लाहची आराधना करावी.

१२) तसंच मला हेही म्हटलं गेलंय की मी आज्ञाधारकांपैकी (मुस्लिम) पहिलावहिला असेन.

१३) आणि सांगा, आपल्या विधात्याची अवज्ञा करण्यास मी त्या महान दिवशी घडणाऱ्या शिक्षेस भीत आहे.

१४) सांगा, मी अल्लाहची आराधना करतो. केवळ त्याच्यासाठीच माझा धर्म

आहे.

१५) पण तुम्ही त्याच्याव्यतिरिक्त वाटेल त्याची उपासना करा, त्यांना सांगा जे स्वत:चा आणि आपल्या कुटुंबीयांचा घात करून घेतात, तेच कयामतच्या दिवशी नुकसान सहन करतील. आणि लक्षात ठेवा हेच भयंकर अपयश आहे.

१६) त्यांच्यासाठी वरून आणि खालून नरक असेल. अल्लाह आपल्या भक्तांना याचीच भीती घालतो. माझे भक्तहो, माझं भय बाळगा.

१७) मग जे लोक बंडखोर लोकांच्या भक्तीपासून लांब राहतात आणि अल्लाहकडं वळतात; त्यांच्यासाठी सुवृत्त आहे. माझ्या भक्तांना ही खूशखबर द्या.

१८) जे लोक (लक्ष लावून) ऐकतात. आणि त्याच्या भल्या गोष्टींचे पालन करतात अशाच लोकांना अल्लाहचं मार्गदर्शन लाभतं आणि अशी माणसं समंजस असतात.

१९) मग ज्यांच्याविरूद्ध शिक्षेचा निर्णय सिद्ध झाला आणि जो नरकाग्नीत (पडला) त्याची तुम्ही सुटका कराल?

२०) जे लोक आपल्या विधात्यास भिऊन असतात त्यांच्यासाठी एकावर एक उच्चतम महाल आहेत, त्यांच्या खालून नद्या वाहतील. अल्लाहचं हे आश्‍वासन आहे आणि अल्लाह विश्‍वासघात करत नसतो.

२१) तुम्ही पाहिलं नाही अल्लाहनं आकाशातून पाणी पाठवलं आणि जमिनीतून त्याचे झरे वाहवतो आणि मग त्याच्यापासून विविध रंगांची-प्रकारची शेती पिकवतो, ती वाळल्यानंतर तुला पिवळी दिसते, अखेरीस त्याचं भुसकट करतो. यामध्ये समंजस लोकांस उपदेश आहे.

२२) ज्याचं हृदय अल्लाहनं इस्लामसाठी उघडलं आणि त्याच्या विधात्याकडून ज्यास दिव्यजागृती लाभली, आणि ज्यांची मनं अल्लाहच्या स्मरणाबाबत कठोर आहेत त्यांचा धिक्कार असतो. हे लोक उघड (उघड) मार्गभ्रष्टतेत आहेत. (मग अशी माणसं सारखी

कशी?)

२३) अल्लाहनं एका ग्रंथाद्वारे सुंदर गोष्टी पाठवल्या, ज्यामधील आयती (वचनं) मिळतीजुळती असून वारंवार आलेली आहेत. आणि जे लोक आपल्या विधात्याची भीती बाळगतात त्यांच्या अंगावर शहारे उभे राहतात. आणि मग त्यांचं शरीर आणि हृदयं मऊ होतात आणि अल्लाहचं स्मरण करू लागतात. हे अल्लाहचं मार्गदर्शन होय. ज्यास इच्छितो त्यास मार्ग दाखवतो आणि अल्लाहनंच जर कुणास मार्गभ्रष्ट केलं तर त्यास कुणी मार्ग दाखवणारा नाही.

२४) मग (जर) कुणी कयामतच्या दिवशी घडणाऱ्या शिक्षेपासून आपलं तोंड वाचवत असेल (तर त्यापेक्षा दुर्दैवी दुसरा कोण?) अपराधींना सांगण्यात येईल, तुम्ही जे कमवत असत त्याचा उपभोग घ्या.

२५) त्यांच्या पूर्वीच्या लोकांनी खोटं ठरवलं तेव्हा त्यांना कोणत्या दिशेनं शिक्षा झाली, हेही त्यांना जाणवलं नाही.

२६) अल्लाहनं त्यांना याच जगी मानहानीची चव दिली. आणि परलोकातील शिक्षा यापेक्षा भयंकर आहे ते त्यांना कळलं असते.

२७) आम्ही या कुरआनद्वारे, त्यांना उपदेश घडवण्यासाठी कितीतरी उदाहरणं दिलीत.

२८) अरबी भाषेतील हे कुरआन आहे, त्यात कसली त्रुटी नाही, त्यांनी सदाचार अंगीकारावा म्हणून.

२९) अल्लाह एक उदाहरण देतो, एका गुलाम माणसाचे अनेक स्वामी आहेत आपसात भांडणारे. आणि एक दुसरा माणूस एकाच धन्याचा दास. त्या दोघांची स्थिती सारखीच काय? अल्लाहचा गौरव असो, कित्येकांना हे कळत नाही.

३०) तुम्हीही मरणार आहात आणि तेही मरण पावतील.

३१) आणि मग तुम्ही कयामतच्या दिवशी निश्चितच आपल्या विधात्यासमोर आपलं म्हणणं सादर कराल.

**पारा - २४**

३२) त्याच्यापेक्षा पापी इतर कोण जो अल्लाहविरूद्ध खोटं बोलतो आणि सत्य काय ते पोचूनही त्यास खोटं ठरवतो? अशा नाकारणाऱ्याचं ठिकाण नरकच नव्हे?

३३) जे सत्य आणतात आणि जे त्यास मान्य करतात असेच लोक सदाचारी आहेत.

३४) त्याच्या विधात्याकडं त्यांना हवं ते मिळेल. भलं करतात त्यांना असाच मोबदला आहे.

३५) त्यांच्या कर्मात काही कसूर असेल तर अल्लाह ते नाहीसं करील. आणि त्यांच्या कर्मांचा चांगला असा मोबदला देईल.

३६) अल्लाह आपल्या भक्तांसाठी पुरेसा नाही का? ते तुम्हांस त्याच्याऐवजी इतरांची भीती दाखवतात. अल्लाह ज्यास मार्गभ्रष्ट करतो त्यास कुणी मार्ग दाखवणारा नाही.

३७) आणि अल्लाह ज्यास मार्गदर्शन घडवतो त्यास कुणी मार्गभ्रष्ट करू शकत नाही. अल्लाह सर्वोच्च सामर्थ्यवान आणि प्रतिकार करणारा नाही का?

३८) तुम्ही जर त्यांना विचारलं, हे आकाश आणि पृथ्वी कुणी निर्माण केली? ते निश्चितच उत्तर देतील, अल्लाहनं. मग त्यांना सांगा, पाहा, अल्लाहनं जर मला काही इजा पोचवण्याचं ठरवलं तर अल्लाहस सोडून ज्यांचा तुम्ही धावा करता ते त्यावर उपाय करू शकतात? आणि जर त्यानं माझ्यावर कृपा करायची ठरवली असेल तर ते त्याची कृपा रोखून धरू शकतात? त्यांना सांगा, अल्लाहच मला पुरेसा आहे. आणि विश्वास करणारे त्याच्याशीच एकनिष्ठ असतात.

३९) त्यांना सांगा, माझे लोकहो! तुम्ही आपल्या जागी जे करायचं ते करा मी माझं काम करतो. तुम्हाला लवकरच कळून चुकेल.

४०) कुणास शिक्षा घडते तिरस्काराची आणि कुणास कायमची शिक्षा होईल.

४१) आम्ही मानवजाती (च्या भल्या) साठी तुम्हांस सत्याधिष्ठित ग्रंथ पाठवला. आता ज्यास मार्गदर्शन लाभलं ते त्याच्याच (भल्या) साठी. आणि जो मार्गभ्रष्ट झाला ती त्याचीच जबाबदारी. तुम्ही काही त्यांचे संरक्षक नाही.

४२) मृत्युसमयी अल्लाह आत्मे काढून घेतो, पण ज्यांना मरण येत नाही त्यांचे आत्मे ते झोपेत असताना तो ताब्यात घेतो. ज्यांच्या मृत्युविषयी निर्णय घेतला जातो त्यांचे आत्मे तो रोखून ठेवतो आणि इतरांचे आत्मे एका ठराविक मुदतीसाठी परत पाठवतो. यामध्ये चिंतन करणाऱ्यांस संकेत आहेत.

४३) त्यांनी अल्लाहस सोडून इतरांना मध्यस्थ केले आहे? त्यांना सांगा, जरी त्यांना काही अधिकार नसला की त्यांना समजदेखील नसली तरी?

४४) त्यांना सांगा, मध्यस्थ असण्याचे सर्व अधिकार अल्लाहचेच. आकाश आणि पृथ्वीची मालकी त्याचीच. तुम्ही नंतर त्याच्याकडंच परतणार आहात.

४५) ज्या लोकांचा परलोकावर विश्वास नाही, एकमेव अल्लाहचा विषय काढताच त्यांची मनं तिरस्कार करू लागतात. मात्र जेव्हा त्यास सोडून इतरांचा उल्लेख केला जातो तेव्हा आनंदानं भरून जातात.

४६) सांगा, आकाश आणि पृथ्वी साकारणारा अल्लाह, गुप्त आणि जाहीर सर्वांची माहिती बाळगणारा, तूच आपल्या भक्तांमध्ये त्याचा निर्णय लावून दे ज्याच्याबाबतीत ते मतभेद करत असतात.

४७) ज्या लोकांनी अत्याचार माजविले त्यांच्याकड असलेलें जमिनीतील सर्वकाही अधिक तेवढंच, त्यांनी निर्णयदिनाची शिक्षा टाळण्यासाठी बदल्यात दान देऊ केलं तरी (ती उपयोगी पडणार नाही). अल्लाहकडून त्यांच्यासमोर असं काही येईल ज्याची त्यांनी कल्पनाही केली नसेल.

४८) त्यांची वाईट (कृत्यं) उघड होतील, आणि ते ज्याची चेष्टा करत असत ती त्यांना वेढून टाकील.

४९) माणसाला एखादी विपत्ती स्पर्शून जाते तेव्हा तो आमचा धावा करतो, पण जेव्हा आम्ही त्यास सुख पोचवतो तेव्हा तो म्हणतो, मला ज्याची माहिती होती ते मला लाभलं. नव्हे ही तर एक परीक्षा आहे, अनेकांना हे कळत नसतं.

५०) त्यांच्या आधीचे लोकही असंच म्हणत असत, पण ते जे काही कमवत असत ते त्यांच्यासाठी काही उपयोगी पडलं नाही.

५१) त्यांनी जी वाईट कर्मं केली होती त्यांचा परिणाम त्यांना भोगावा लागला. त्यांच्यापैकी ज्या लोकांनी अत्याचार केले त्यांचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतील. ते (अल्लाहला) विफल करू शकत नाहीत.

५२) त्यांना ठाऊक नाही, अल्लाह ज्यांना इच्छितो त्यांना विपुल साधनं देतो, आणि (ज्यांना इच्छितो) काटकसरीनं देतो. यामध्ये श्रद्ध लोकांसाठी संकेतं आहेत.

५३) त्यांना सांगा, माझे भक्तहो, ज्यांनी स्वत:शी अतिरेक केला (त्यांनी), अल्लाहच्या कृपेपासून निराश होऊ नये. निश्चितच अल्लाह सारी पापं क्षमा करील. तोच खरा क्षमाशील व दयावंत आहे.

५४) आपल्या विधात्याकडं वळा, त्यास शरण जा, तुम्हांस शिक्षा घडण्याआधी. नंतर तुम्हांस मदत मिळणार नाही.

५५) आणि तुमच्या विधात्याकडून जे उत्तम (ग्रंथ) तुम्हांस पाठवले गेलंय त्याचं पालन करा भान नसताना तुमच्यावर अचानक शिक्षा कोसळण्यापूर्वी.

५६) अन्यथा कुणी म्हणंल, माझं दुर्दैव! मी अल्लाहच्या बाबतीत दुर्लक्ष केलं. आणि मी तर चेष्टा करणाऱ्यांपैकी राहिलो.

५७) किंवा असं म्हणंल, मला जर अल्लाहनं मार्गदर्शन घडवलं असतं तर मी (ही) सदाचारींपैकी असतो.

५८) किंवा शिक्षेस सामोरं जाताना तो म्हणंल, मला जर आणखीन एक संधी मिळाली असती तर मीही नेक लोकांपैकी होऊन जाईन.

५९) (अल्लाह म्हणेल,) होय. तुझ्याकडं आमच्या आयती (वचनं) आल्या असता तू खोटं ठरवलंस. उद्धटपणा केला आणि (म्हणून) नाकारणाऱ्यांपैकी झाला.

६०) आणि तुम्ही पाहाल ज्या लोकांनी अल्लाहच्या बाबतीत खोटं सांगितलं त्यांची तोंडं काळी पडलेली असतील. मग अशा घमेंडी लोकांचं ठिकाण नरक नसावं का?

६१) ज्या लोकांनी सदाचार अंगीकारला, त्यांना यश लाभवून अल्लाह त्यांना मुक्त करील. त्यांना वाईट असं काही स्पर्श करणार नाही की त्यांना कसलं दु:ख जडणार नाही.

६२) अल्लाहनंच सर्वकाही निर्माण केलं असून तोच सर्व व्यवस्था लावणारा आहे.

६३) आकाश आणि पृथ्वीच्या किल्ल्या त्याच्याकडंच आहेत. ज्या लोकांनी त्याच्या आयती नाकारल्या तेच नुकसानीत आहेत.

६४) त्यांना सांगा, अडाणी लोकांनो, मला अल्लाहशिवाय इतरांची आराधना करावयास सांगता!

६५) आम्ही तुम्हांस आणि तुमच्या पूर्वीच्यांनाही दिव्य-अनुभूतीद्वारे कळवलंय, जर तुम्ही अनेक ईश्वर मान्य केले तर तुमची कार्यं वाया जातील आणि तुम्हांस तोटा सहन करावा लागेल.

६६) नव्हे, अल्लाहचीच आराधना करा आणि कृतज्ञ बनून राहा.

६७) अल्लाहच्या (सामर्थ्याचा) जसा सर्वथैव अंदाज लावावयास हवा होता, तसा अंदाज तुम्ही लावलाच नाही. कयामतच्या दिवशी सर्व चराचर त्याच्या मुठीत असेल आणि अवकाश त्याच्या उजव्या हातात गुंडाळलेलं असेल. धन्य असो त्याची, तो उदात्त आहे त्यास भागीदार जोडण्यापासून.

६८) जेव्हा शंख फुंकलं जाईल, तेव्हा आकाश आणि पृथ्वीमधील सर्व बेभान होऊन जातील अल्लाहच्या मर्जीस येईल ते सोडून. आणि जेव्हा

दुसऱ्यांदा शंख फुंकण्यात येईल तेव्हा ते उठून उभे राहतील आणि (इकडंतिकंड) पाहू लागतील.

६९) आणि धरती आपल्या विधात्याच्या वैभवानं उजळून निघेल. (कर्माचं) दप्तर उघडलं जाईल. प्रेषित आणि साक्षीदार बोलवले जातील. आणि त्यांच्यामध्ये न्याय्य निर्णय दिला जाईल. कोणाशीही अन्याय होणार नाही.

७०) प्रत्येकास त्याच्या कर्मांचा पुरेपूर मोबदला दिला जाईल, आणि त्यानं काय केलं त्यास चांगलं ठाऊक आहे.

७१) नाकारणाऱ्यांच्या जमावाला नरकाकडं लावून दिलं जाईल. तिथं पोचल्यावर तिची दारं उघडली जातील आणि तिचे पहारेकरी हटकतील, तुमच्याकडं प्रेषित नव्हते आले. तुमच्या विधात्याची वचनं (आयती) वाचून दाखवण्यास तुम्हाला? आणि ताकीद देण्यासाठी, त्या दिवशी तुमच्या होणाऱ्या भेटीसंबंधी? ते उत्तर देतील, 'होय.' पण नाकारणाऱ्याविरूद्ध शिक्षेचा आदेश लागू झाला.

७२) सांगितलं जाईल, नरकाच्या दारांतून दाखल व्हा त्यामध्ये कायमस्वरूपी राहण्यासाठी. अहंकारींचं ठिकाण वाईटच असते.

७३) आणि जे लोक आपल्या विधात्यास भीत असत त्यांना समूहा-समूहानं स्वर्गाकडं नेलं जाईल. ते तिथं पोचल्यावर त्याची दारं उघडली जातील. त्याचे पहारेकरी त्यांच्या स्वागतार्थ म्हणतील, शांतता लाभो तुम्हांस. बरे झाले, इथं प्रवेश घ्या सदैव राहण्यासाठी.

७४) आणि ते अल्लाहचा गौरव साजरा करत म्हणतील, त्यानं दिलेलं वचन पूर्ण केलं. आम्हांस भूमीचा वारसा स्वर्गात दिला. आता आम्ही स्वर्गात वाटेल तिथं राहू. केलेल्या कर्मांचा किती छान मोबदला!

७५) आणि तुम्ही देवदूतांना पाहाल, सिंहासनाच्या सभोवार आपल्या विधात्याचं स्तवन आणि पवित्रगाण करताना. त्यांच्यामध्ये न्याय्य निर्णय घेतले जातील आणि म्हटलं जाईल, अल्लाहचाच गौरव असो, अखिल विश्वांचा विधाता तो.

-------

# ४०. सूरह अल-मुअमिन

**मक्काकालीन, आयती ८५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हामीम!

२) हा ग्रंथ (कुरआन) सर्वोच्च आणि सर्वज्ञ अल्लाहकडून पाठवला गेलाय.

३) पापांची क्षमा करणारा, पश्चात्ताप स्वीकारणारा, शिक्षा देण्यास कठोर, समृद्धशाली. त्याच्याशिवाय इतर कुणी ईश्वर नाही. त्याच्याप्रतच (सर्वांना) जावयाचंय.

४) जे नाकारणारे आहेत तेच अल्लाहच्या आयतींबाबत वाद घालतात, शहरांमध्ये त्यांचं वावरणं तुम्हांस फसवू नये.

५) त्यांच्या आधी नूह यांना खोटं ठरवलं गेलं. आणि त्याच्यानंतर इतर जमातींनीसुद्धा. प्रत्येक समूहानं आपल्या प्रेषितास ताब्यात घेण्याचा कट रचला, सत्यास मागं टाकण्यासाठी वाद उपस्थित केला. आम्ही मग त्यांना पकडलं. आणि पाहा, माझी शिक्षा किती कठोर आहे.

६) अशा प्रकारे नाकारणाऱ्यांविरूद्ध तुमच्या विधात्याचा निर्णय अमलात आला, ते नरकातीलच आहे.

७) ज्या (दूतांनी) सिंहासन उचलून धरलंय आणि जे त्याच्या सभोवार आहेत, ते आपल्या विधात्याचं पवित्रगाण करतात, त्याच्याशी एकनिष्ठ असतात. आणि ज्यांनी श्रद्धा धारण केली त्यांच्यासाठी क्षमेची याचना करतात. आमच्या विधात्या! तुझ्या दयेनं आणि ज्ञानानं सर्वस्व व्यापून टाकलंय, तेव्हा जे पश्चात्ताप व्यक्त करतात आणि तुझा मार्ग अवलंबतात, त्यांना तू क्षमा कर आणि त्यांना नरकाच्या शिक्षेपासून वाचव.

८) आमच्या विधात्या! त्यांना शाश्वत स्वर्गामध्ये प्रवेश दे ज्याचा तू त्यांना शब्द दिलाय. आणि त्यांच्या पूर्वजांपैकी त्यांच्या पत्नींना आणि त्यांच्या

वंशातील जे नेक आहेत (त्यांनासुद्धा). निश्चितच तूच सर्वोच्च आणि सर्वज्ञ आहेस.

९) त्यांना वाईट गोष्टींपासून वाचवं. त्या दिवशी वाईट (गोष्टींपासून) जो सुरक्षित राहील त्यास तुझी कृपा लाभली आणि हेच तर महान यश आहे.

१०) नाकारणाऱ्या लोकांस हाक देऊन सांगितलं जाईल, (तुमच्या बाबतीत) अल्लाहनं तिटकार करणं, स्वत:विषयी तुमच्या तिटकारापेक्षा मोठा आहे. तुम्हांस श्रद्धा धारण करण्यास बोलवलं असता तुम्ही नकार देत असत.

११) ते म्हणतील, आमच्या विधाता! तू आम्हांस दोन वेळा मृतावस्थेत ठेवलं आणि दोनदा जीवनदान दिलं. आम्ही आमची पापं मान्य करतो. तेव्हा आता इथून निघण्याची कोणती वाट आहे?

१२) तुमच्या बाबतीत (हे घडण्याचं) कारण असं की एकमेव अल्लाहचा धावा केला जात असताना तुम्ही त्यास नाकारत होता आणि त्यास इतर भागीदार जोडल्यास तुम्ही ते मान्य करत होता. आता निर्णय देणं सर्वोच्च आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहच्याच हाती.

१३) तो तुम्हांस आपली संकेतं दाखवतो, आकाशातून तुमच्या उपजीविकेची तरतूद करतो. जो (अल्लाहकडं) वळतो त्यासच बोध घडतो.

१४) आता धर्माच्या बाबतीत प्रामाणिकपणं अल्लाहचाच धावा करा. नाकारणाऱ्यांना मग किती का वाईट वाटेना!

१५) उदात्त दर्जाचा, सिंहासनाचा स्वामी, आपल्या भक्तांपैकी मर्जीस येईल त्यास आपल्या आदेशानं दिव्य-अनुभूती देतो, त्यानं निर्णयाच्या दिवसाबाबत सावध राहावं म्हणून.

१६) ज्या दिवशी ते उघडे पडतील, अल्लाहपासून त्यांचं काहीएक लपलेलं नसेल. (विचारलं जाईल) आज कुणाचं सार्वभौम? (घोषणा होईल) सर्वशक्तिमान एकमेव अल्लाहसाठीच.

१७) आज सर्वांना त्यांच्या कमाईची परतफेड केली जाईल, आज अन्याय होणार नाही. अल्लाह हिशेब घेण्यास तत्पर आहे.

१८) जवळ येत असलेल्या दिवसापासून (कयामत) त्यांना सावध करा. जेव्हा जीव घुटमळून तोंडाशी येईल, अपराध्याचा कुणी मित्र नसेल की मध्यस्थ नसेल ज्यांचं ऐकलं जाईल.

१९) त्यास ठाऊक आहे भुरळ घालणाऱ्या डोळ्यांची चलाखी आणि मनांमध्ये लपवून ठेवलंय ते.

२०) अल्लाह न्याय्य निर्णय देतो. जे लोक त्यास सोडून इतरांचा धावा करतात त्यांच्या हाती कोणताच निर्णय नाही. अल्लाहच (तेवढा) ऐकणारा आणि पाहणारा आहे.

२१) त्यांनी धरतीवर संचार करून पाहिलं नाही त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्यांचा शेवट कसा झाला? ते त्यांच्यापेक्षा अधिक शक्तिशाली होते आणि धरतीवरील त्यांचे अवशेषदेखील (त्यांनी मागं सोडलेले). त्यांच्या पापांमुळं अल्लाहनं त्यांची पकड केली, आता त्यांना अल्लाहपासून कुणी वाचवू शकणार नाही.

२२) याचं कारण त्यांच्याकडं त्याचे प्रेषित स्पष्ट संकेतं घेऊन येत राहिले. पण त्यांनी त्यांस नाकारलं. तेव्हा अल्लाहनं त्यांची पकड केली. तो सामर्थ्यवान असून शिक्षा देण्यात कठोर आहे.

२३) आम्ही मूसा यांना आमच्या आयती आणि स्पष्ट अधिकारांसह पाठवलं

२४) फिरऔन, हामान आणि कारुनकडं. ते (त्यांना) म्हणाले, तुम्ही खोटं जादूगार आहात.

२५) जेव्हा त्यांनी आमची सत्यता त्यांच्या समक्ष मांडली, तेव्हा त्यांनी सांगून ठेवलं ज्यांनी यांच्यावर विश्वास टाकला त्यांच्या मुलांना मारून टाका आणि मुलींना जीवंत राहू द्या. पण बंडखोर लोकांची कारस्थानं फोलच ठरत असतात.

२६) फिरऔन म्हणाला, सोडा! मला मूसाचा वध करू द्या. बोलवू द्या

त्यास आपल्या विधात्याला. मला भीती वाटते ते तुमचा धर्म बदलून टाकतील अथवा देशात उपद्रव घडवून आणतील.

२७) मूसा म्हणाले, मी माझ्या आणि तुमच्या विधात्याचा आश्रय घेतो. प्रत्येक अहंकारी आणि ज्यांचा हिशेब देण्याच्या दिवसावर विश्वास नाही (अशा) सर्वांपासून.

२८) फिरऔनच्या लोकांपैकी एक श्रद्ध व्यक्ती जिनं आपली श्रद्धा लपवली होती, म्हणाली, तुम्ही एखाद्या माणसाची हत्या यामुळं करू पाहता की तो म्हणतो अल्लाह माझा विधाता आहे आणि तुमच्याकडं आपल्या विधात्याची स्पष्ट संकेतं आणलीत? जर तो खोटं बोलत असेल तर तो स्वत:शीच खोटं बोलेल. आणि त्याचं म्हणणं सत्य असेल तर तुम्हांस तो जे वचन देतो त्याचं काहीतरी संकट तुमच्यावर येणारच. अल्लाह निश्चितच अतिरेक माजवणाऱ्या खोट्यास मार्ग दाखवत नसतो.

२९) माझ्या लोकांनो, आज तुमचं अधिराज्य आहे. देशात तुम्हांस वर्चस्व मिळालंय. आमच्यावर अल्लाहचा प्रकोप कोसळल्यास कोण आमच्या मदतीस येणार? फिरऔन म्हणाला, मला जे दिसतं तेच मी तुम्हाला दाखवतो. मी तुम्हांस भला तोच मार्ग दाखवतो.

३०) त्यावर तो श्रद्ध माणूस म्हणाला, माझ्या लोकहो! मला भीती वाटते, तुमच्यावर पूर्वीच्या लोकांसारखी वाईट वेळ येईल.

३१) जसे नूहच्या लोकांचे हाल झाले, आद आणि समूद व त्यांच्यानंतर जे (होऊन गेले) त्यांच्यासारखंच तुमचं हाल होतील. अल्लाह आपल्या भक्तांशी अत्याचार करू इच्छित नसतो.

३२) माझ्या लोकहो! मला भीती वाटते, ज्या दिवशी तुमच्यामध्ये हाहाकार माजेल.

३३) ज्या दिवशी तुम्ही मागं वळून पळत सुटाल, अल्लाहपासून तुमचा बचाव करण्यास कुणी नसेल. आणि अल्लाहनं ज्यांना मार्गभ्रष्ट केलं त्यांना कोण मार्ग दाखवणार?

३४) जेव्हा यूसुफ आले तुमच्याकडं स्पष्ट प्रमाणांसहित, तेव्हा त्यांनी तुमच्यासाठी जे आणलं त्याबाबतीत तुम्ही ते मरेपर्यंत शंका घेत राहिले आणि म्हणू लागले, त्यांच्यानंतर आता अल्लाह कोणताही प्रेषित पाठवणार नाही. जे भ्रमात राहतात आणि उल्लंघन करत असतात त्यांना अल्लाह असंच मार्गभ्रष्ट करत असतो.

३५) जे लोक अल्लाहच्या आयतींविषयी कोणतेही अधिकार नसताना वादविवाद करतात, अल्लाह आणि श्रद्ध लोकांना या (वायफळ) गोष्टी मुळीच पसंत नाहीत. उद्धट आणि कठोर लोकांच्या मनांना (अल्लाह) असंच मोहोरबंद करतो.

३६) फिरऔन हामानला म्हणाला, माझ्यासाठी एक उत्तुंग महाल उभार, मला वाट सापडेल.

३७) आकाशांची वाट, मूसाच्या ईश्वरास डोकावून पाहता येईल. माझ्या मते तर ते खोटेच आहेत. अशा रितीनं आम्ही फिरऔनला त्याची वाईट कर्मं आकर्षित करून रास्त मार्गाकडं जाण्यास अडथळा केला. फिरऔनचा कट म्हणजे विनाशच होता.

३८) श्रद्धा धारण केलेला माणूस म्हणाला, लोकहो! तुम्ही माझ्या मागं या. मी तुम्हांस भला तो मार्ग दाखवीन.

३९) माझ्या लोकहो! जगाचं हे जगणं काहींसच सुखोपभोग आहे आणि परलोकातील घर मात्र कायमस्वरूपी आहे.

४०) ज्यानं वाईट कृत्यं केलीत त्यास तसाच (मोबदला) लाभेल आणि ज्यांनी नेक कर्मं केलीत, पुरुष असोत की स्त्री, मात्र ते श्रद्धावान असतील तर अशी माणसं स्वर्गात जातील जिथं त्यांना अमाप उपजीविका लाभेल.

४१) माझ्या बांधवानो! मला याचं नवलच वाटते, मी तुम्हांस मुक्तीकडं बोलवतो आणि तुम्ही मला नरकाग्नीचं निमंत्रण देता.

४२) तुम्ही मला अल्लाहशी बंड करण्यास बोलवता आणि त्याच्याबरोबर असे भागीदार जोडण्यास सांगता ज्यांच्या बाबतीत मला कसलीच

माहिती नाही. आणि मी तुम्हांस सर्वसामर्थ्यवान आणि क्षमाशालीकडं बोलवतो.

४३) यात मुळीच शंका नाही, तुम्ही मला ज्यांच्याकडं बोलवता, त्यांच्याकडं बोलवण्याची लायकी या जगात आणि परलोकातदेखील नाही. अल्लाहपाशीच आम्हांस परतावयाचंय. उल्लंघन करणारे नरकाग्नीचे धनी आहेत.

४४) मी तुम्हांस सांगतो ते लवकरच तुमच्या लक्षात येईल. मी माझं उद्दिष्ट अल्लाहस सोपवतो. अल्लाह आपल्या भक्तांना पाहत असतो.

४५) अल्लाहनं त्यास त्याच्या विरूद्धच्या वाईट कटांतून वाचवलं आणि फिरऔनच्या लोकांना वाईट शिक्षेनं सर्व बाजूंनी घेरलं.

४६) त्यांना सकाळ-संध्याकाळ नरकाग्नीसमोर उभं केलं जाईल. आणि ज्या दिवशी प्रलय घडेल, फिरऔनच्या लोकांस कठोर शिक्षा करण्याचा आदेश दिला जाईल.

४७) नरकाग्नीत त्यांची भांडणं होताना, दुबळे लोक दांडगाई करणाऱ्या लोकांस म्हणतील, आम्ही (जगात) तुमच्या ताब्यात होतो, आता तुम्ही ही अग्नी आम्हांपासून दूर करणार का?

४८) ते अहंकारी लोक म्हणतील, आता आपण सगळेच यामध्ये आहोत. आणि भक्तांमध्ये अल्लाहनं आपला निर्णय देऊन टाकलाय.

४९) नरकातील लोक तिथल्या पहारेकऱ्यांना म्हणतील, आपल्या विधात्याचा धावा करा. एका दिवसासाठी तरी आमची शिक्षा हलकी करा म्हणून.

५०) ते विचारतील, तुमच्याकडं तुमचे प्रेषित उघड संकेतांसह नव्हते आले? ते म्हणतील, 'होय.' ते उत्तर देतील, 'मग तुम्ही करा धावा.' पण नाकारणाऱ्यांचा धावा काही कामाच्या नसतो.

५१) आम्ही आमच्या प्रेषितांची आणि श्रद्ध लोकांची जगातील जीवनात तसंच ज्या दिवशी साक्षीदार उभं राहतील, जरूर मदत करू.

५२) ज्या दिवशी अत्याचारींना काही लाभदायक नसेल काहीही निमित्त पुढं

केलं तरी त्यांचा धिक्कार असेल आणि वाईट त्यांचं ठिकाण असेल.

५३) आम्ही मूसा यांना मार्गदर्शन दिलं आणि इस्राईलच्या लोकांना ग्रंथाचा वारसा दिला.

५४) समंजस लोकांसाठी उपदेशपर मार्गदर्शन.

५५) तेव्हा धीर धरा, अल्लाहचं वचन सत्य ठरणार, आपल्या पापांची क्षमा मागा. आणि सांज-सकाळ आपल्या विधात्याचा गौरव करत त्याचं पावित्र्यगान करा.

५६) जे लोक अल्लाहच्या आयतींविषयी वाद घालत असतात, त्यांच्याकडं कोणतेही अधिकार नसतानादेखील त्यांच्या मनांत मोठेपणा (बाळगण्याची) धडपड असते ज्यास ते कधी गाठू शकत नाहीत. अल्लाहचा आश्रय घ्या, तोच सर्वकाही ऐकतो आणि पाहतो.

५७) आकाश आणि पृथ्वीची निर्मिती करणं मानवनिर्मितीपेक्षा मोठे काम आहे, पण अनेक लोकांना याची जाणीव नाही.

५८) अंध आणि डोळस, ज्यांनी श्रद्धा धारण केली, नेक कर्म केलीत आणि जे अवज्ञाकारी आहेत ते समान नसतात, पण तुम्ही कमीच लक्ष देता.

५९) कयामत येणारच यात काही शंका नाही, पण बहुतेकांना यावर विश्वास नाही.

६०) तुमचा विधाता म्हणतो, माझा धावा करा मी तो स्वीकारीन. जे लोक माझी भक्ती करण्यापासून घमेंडी करतात ते लवकरच अपमानित होऊन नरकात जातील.

६१) अल्लाहनं तुम्हांस विश्रांतीसाठी रात्र बनवली आणि तुम्हांस पाहता यावं म्हणून दिवस. अल्लाह तर मानवासाठी संपन्नतेनं परिपूर्ण आहे तरी पुष्कळसे लोक आभार मानत नाहीत.

६२) हाच तुमचा अल्लाह तुमचा विधाता प्रत्येक वस्तूचा निर्माता, त्याच्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही. कुठं मग तुम्ही फसले जाता.

६३) जे लोक अल्लाहच्या आयतींना नाकारतात तेही अशाच प्रकारे फसले जातात.

६४) अल्लाहनं तुमच्या निवासासाठी पृथ्वी बनवली आणि आकाशास छत (बनवलं), तुम्हांस साकारलं सुंदर आकारानं, निर्वासाहाठी विशुद्ध गोष्टींची तरतूद केली. असा हा तुमचा अल्लाह, तुमचा विधाता संपन्नतेनं परिपूर्ण, तोच अखिल विश्वांचा विधाता.

६५) तो निरंतर जीवित आहे, त्याच्याव्यतिरिक्त कुणी ईश्वर (उपास्य) नाही. तेव्हा धर्माचं प्रामाणिकपणे पालन करून त्याचाच धावा करा. गौरव असो सकल विश्वांच्या विधात्याचा.

६६) त्यांना सांगा, अल्लाहस सोडून तुम्ही ज्यांचा धावा करता त्यांची आराधाना करण्यास मला मनाई केली आहे - माझ्या विधात्याचं स्पष्ट प्रमाण माझ्याकडं आलं असता - आणि मला आज्ञा दिली गेली सकल विश्वांच्या विधात्यास शरण जाण्याची.

६७) तोच ज्यानं तुम्हांस मातीतून निर्माण केलं. नंतर वीर्यापासून, मग रक्ताच्या गोळ्यापासून, नंतर तुम्हांस मूल म्हणून बाहेर काढलं, मग तुम्हांस तारुण्यापर्यंत पोचवलं, तुम्हांस वृद्ध केलं, तुमच्यामधील काही आधीच मृत्यू पावतात आणि काहींना निश्चित वयापर्यंत पोचवतो. तुम्हांस समज घडवण्यासाठी.

६८) तोच जगवतो आणि मरण देतो, जेव्हा तो एखादा निर्णय घेतो तो म्हणतो 'हो' आणि ते 'घडून जाते.'

६९) तुम्ही त्या लोकांस पाहिलं जे अल्लाहच्या आयतींविषयी वाद घालतात, कुठं ते भरकटत असतात.

७०) जे लोक या ग्रंथास आणि आम्ही आमच्या प्रेषितांच्या सोबत पाठवलं त्यांना खोटं ठरवतात, त्यांना लवकरच कळून चुकेल.

७१) जेव्हा त्यांच्या मानांभोवती साखळ्या आणि जोखड असतील, त्यांना खेचून नेलं जाईल.

७२) उकळत्या पाण्यात आणि नरकाग्नीत लोटून दिलं जाईल.

७३) आणि मग त्यांना विचारलं जाईल, तुम्ही ज्यांना भागीदार ठरवत असत ते कुठं आहेत?

७४) अल्लाहस सोडून, ते म्हणतील, आम्ही त्यांना हरवून बसलो, नव्हे पण आम्ही पूर्वी कुणाचाही धावा करत नव्हतो. अल्लाह नास्तिकांना असंच मार्गभ्रष्ट करत असतो.

७५) तुमच्या बाबतीत (हे घडण्याचं कारण असं की) तुम्ही धरतीवर नाहक हर्षोल्हासात दंग होता आणि ऐटित वावरत होता.

७६) आता जा नरकाच्या दारी कायमस्वरुपी, अहंकारी लोकांचं ठिकाण वाईटच असते.

७७) धैर्यानं वागा, अल्लाहचं वचन सत्य आहे. आम्ही त्यांना दिलेलं वचन (शिक्षा) काही अंशी तुमच्या निदर्शनास आणलं अथवा आपणास मरण दिलं, तरी ते आम्हाकडंच परतणार आहेत.

७८) आम्ही तुमच्यापूर्वी प्रेषितं पाठवली आहेत, पैकी काहींचा अहवाल तुम्हांस सांगितला आणि काहींचा अहवाल आम्ही सांगितला नाही. आणि कोणत्याही प्रेषितास त्याच्या परवानगीशिवाय एखादा संकेत आणणं शक्य नाही. अल्लाहचं आदेश येताच न्याय्य निकाल दिला गेला तेव्हा असत्यावर ज्यांची मदार होती ते निष्फळ ठरले.

७९) अल्लाहनं तुमच्यासाठी जनावरं निर्माण केलीत, काही तुमच्या स्वारीसाठी तर काही खाण्यासाठी.

८०) ते तुमच्यासाठी लाभदायक आहेत, त्यांच्यापासून तुम्ही आपल्या मनात येतील त्या गरजांचं समाधान करू शकता. आणि नौका तुमच्या वाहतुकीची साधनं आहेत.

८१) तो तुम्हांस आपली संकेतं दाखवतो आणि किती म्हणून संकेतांचा तुम्ही इन्कार करणार.

८२) ते धरतीवर वावरत नसतात, त्यांच्या पूर्वीच्या लोकांचा शेवट कसा

झाला ते पाहण्यासाठी ते संख्येनं खूप होते आणि सामर्थ्यात वरचढ. त्यांनी भूमीवर आपला ठसाही उमटवला आहे. पण त्यांनी जे काही मिळवलं ते त्यांच्या काहीएक कामी आलं नाही.

८३) जेव्हा त्यांच्याकडं त्यांचे प्रेषित स्पष्ट संकेत घेऊन आले तव्हा ते त्यांच्यापाशी असलेल्या ज्ञानातच रमलेले होते. ज्या बाबतीत ते चेष्टा करत, त्यानंच त्यांना वेढून टाकलं.

८४) आमची शिक्षा पाहताच म्हणू लागले, आम्ही एकमेव अल्लाहवर विश्वास ठेवतो आणि ज्यांना आम्ही त्याचे भागीदार जोडले होते, त्यांना झुगारून देतो.

८५) पण आमची शिक्षा त्यांना दिसल्यावर (विश्वास ठेवण्यानं) त्यांचा काही लाभ होणार नाही. अल्लाहचा आपल्या भक्तांबाबत हाच शिरस्ता चालत आलाय. आणि या ठिकाणी नाकारणारे निष्फळ ठरले.

-------

# ४१. सूरह हामीम-अस्सजदा

**मक्काकालीन, आयती ५४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हामीम!

२) परमोच्च दयावंत नि कृपावंतनं पाठवलेला

३) हा ग्रंथ ज्याच्या आयती (वचनं) स्पष्ट असून तो अरबी भाषेतील कुरआन आहे, समंजस लोकांसाठी

४) खूशखबर तसंच ताकीद देणारा. पण पुष्कळ लोकांनी त्याच्यापासून तोंड फिरवलं, त्यांना ऐकायचं नाही.

५) आणि म्हणतात, तुम्ही ज्याच्याकडं आम्हांस बोलवता त्यापासून आमच्या मनांवर आवरण घातलं गेलंय, आमचे कान बधीर आहेत, आमच्या आणि तुमच्यामध्ये एक पडदा आहे. तुम्ही तुमचं करा आम्ही आम्हापुरतं करताहोत.

६) त्यांना सांगा, मीही तुमच्यासारखा एक माणूसच, मला दिव्य-अनुभूती होते. तुमचा ईश्वर एकमेव आहे. तेव्हा त्याच्यापुढं उभं राहा आणि त्याच्याकडे क्षमायाचना करा. अनेकेश्वरींचा धिक्कार असो,

७) जे जकात देत नाहीत आणि परलोकाचा इन्कार करतात.

८) पण जे लोक श्रद्ध असून नेक कर्मं करतात त्यांच्यासाठी अखंड मोबदला आहे.

९) त्यांना सांगा, ज्यानं दोनच दिवसांत ही पृथ्वी निर्माण केली त्यास नाकारता आणि त्यास भागीदार जोडता, तो (तर) सकल विश्वांचा विधाता आहे.

१०) तिच्यामध्ये त्यानं पर्वतं उभारली आणि त्यांना संपन्न केलं. त्यांच्यात गरजवंतांच्या आहारासाठी उत्पन्नाचा अंदाज ठरवून दिला, चार दिवसांत

(ही कामं पूर्ण झाली), प्रत्येकाच्या मागणीनुसार.

११) आणि मग त्यानं आकाशाकडं लक्ष पुरवलं. ते धुरासारखं होतं, त्यानं उभयतांस सांगितलं, तुम्ही स्वेच्छेनं किंवा बळजबरीनं (एकत्र) या. ते म्हणाले, आम्ही स्वेच्छेनं (एकत्र) येतो.

१२) आणि मग दोन दिवसांत सात आकाशं उभी केली आणि प्रत्येक आकाशास त्याचं कार्य नेमून दिलं आणि या जगाच्या आकाशास दिव्यांनी सजवलं तसंच पहारा म्हणूनही. ही योजना एका प्रभुत्वसंपन्न नि सर्वज्ञाची आहे.

१३) तरीही त्यांनी तोंड फिरवलं तर त्यांना सांगा, एका भयंकर गर्जनेनं आद आणि समूद लोकांची जशी गत झाली होती, तशाच गर्जनेपासून मी तुम्हांस सावध करतो.

१४) त्यांच्याकडं आधी आणि त्यांच्यानंतर प्रेषित येऊन गेले, (त्यांना सांगत) अल्लाहशिवाय इतर कोणाची भक्ती करू नका. त्यांनी उत्तर दिलं, आमच्या विधात्यास वाटलं असतं तर त्यानं आपला दूत पाठवला असता. आम्ही तर तुम्ही जे घेऊन आलात त्यास नाकारतो.

१५) आद (चे लोक) पृथ्वीत नाहक अहंकार माजवू लागले आणि म्हणत, आमच्यापेक्षा इतर कोण बलवान. त्यांना दिसत नाही, अल्लाह - ज्यानं त्यांना निर्माण केलं तो सामर्थ्यात भारदस्त आहे. तरीही ते आमच्या आयतींना नकारतात.

१६) आम्ही अरिष्टाच्या दिवसांत त्यांच्याकडं वादळ पाठवलं त्यांना नामुष्कीच्या शिक्षेचा उपभोग देण्यासाठी याच जीवनात, परलोकातील शिक्षा तर अधिकच मानहानीकारक ठरेल, त्यांच्या मदतीस कुणी येणार नाही.

१७) आम्ही समूद (लोकांना) मार्ग दाखवला असता, त्यांनी त्या मार्गदर्शनापेक्षा अंधत्वास पसंत केलं. त्यांच्या कर्तृत्वामुळं एका गर्जनेनं त्यांच्यावर नामुष्कीचा प्रकोप कोसळला.

१८) जे श्रद्ध आणि सदाचारी होते त्यांना मात्र आम्ही वाचवलं.

१९) ज्या दिवशी अल्लाहचे शत्रू नरकाग्नीकडं लावून दिले जातील, टोळीटोळीनं,

२०) तिथं पोचल्यावर त्यांचं कान, डोळं आणि त्यांची त्वचा त्यांच्या कर्मांबद्दल त्यांच्याविरूद्ध साक्ष देतील.

२१) ते आपल्या त्वचेस विचारतील, तुम्ही आमच्याविरूद्ध का बरं साक्ष दिली. ती म्हणेल, ज्या अल्लाहनं प्रत्येक वस्तूला वाचा दिली त्यानंच आम्हांस बोलतं केलं, त्यानंच तुम्हांस पहिल्यांदा जन्माला आणलं होतं, त्याच्याकडंच तुम्ही परतणार.

२२) तुमच्याविरूद्ध तुमचं कान, तुमचं डोळं आणि तुमचं शरीर साक्ष देतील. (हे तुम्हांस माहीत नसल्यानं) तुम्ही काही लपवलं नव्हतं. अल्लाहस तुमच्या कर्मांविषयी फार अशी माहिति नसणार अशी तुम्ही कल्पना करून घेतली होती.

२३) आपल्या विधात्याच्या बाबतीत तुमच्या याच कल्पना तुमच्या विनाशास कारणीभूत ठरल्या आणि आपलं सर्वस्व गमावून बसलात.

२४) आता त्यांनी जरी धीर धरला तरी नरकच त्यांचं ठिकाण आहे. त्यांनी क्षमा मागितली तरी त्यांना क्षमा मिळणार नाही.

२५) आम्ही त्यांना असे सहवासी दिले ज्यांनी त्यांचं वर्तमान आणि गतकाळ मोहक करून दाखवले. आणि त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या जिन्न (अदृश्य) आणि मानवांना दिली होती तीच शिक्षा त्यांच्याविरूद्ध सिद्ध झाली. निश्चितच ते अपयशी ठरले.

२६) नाकारणारे म्हणतात, हे कुरआन ऐकू नका, तर (ते ऐकवलं जात असता) मध्येच आरडाओरड करा म्हणजे तुम्ही भारी पडाल.

२७) आम्ही नाकारणाऱ्यांना कठोर शिक्षा उपभोगावयास लावू. त्यांच्या वाईट कर्मांची परतफेड अवश्य करू.

२८) अल्लाहच्या शत्रूंचा बदला नरकाग्नीच, त्यामध्ये त्यांचं कायम निवास,

त्यांनी आमच्या आयतींना नाकारलं त्याची ही परतफेड.

२९) नाकारणारे म्हणतील, आमच्या विधात्या, आम्हांस जिन्न आणि मानवांमधील ज्यांनी मार्गभ्रष्ट केलं त्यांना दाखव, आम्ही त्यांना पायाखाली चिरडून त्यांचा अपमान करू.

३०) जे लोक म्हणतात, अल्लाह आमचा विधाता आहे आणि त्यावर ठाम राहतात त्यांच्याकडं देवदूत येतात (नि म्हणतात), तुम्ही भिऊ नका की दुःखी होऊ नका. ज्या स्वर्गाविषयी तुम्हांस वचन दिलं गेलंय त्याचा आनंद साजरा करा.

३१) आम्ही या जगातील जीवनात तुमच्या मदतीस होतो आणि परलोकातसुद्धा. आणि तुम्हांस हवं ते तिथं लाभेल आणि तुम्ही मागाल ते आहे

३२) नितांत दयावंत आणि क्षमाशीलतर्फे मेजवानी म्हणून.

३३) जो अल्लाहकडं (लोकांना) बोलवतो, नेक कर्म करतो आणि म्हणतो, मी आज्ञा पाळणाऱ्यांपैकी (मुस्लिम) आहे त्याच्यापेक्षा चांगलं कुणाचं बोलणं?

३४) भलं आणि दुष्ट समान नसतात. चांगलं असंल त्यानं वाईटावर उपाय करा. त्यामुळं तुमचं ज्याच्याशी आपसात शत्रुत्व होतं तोच तुमचा जीवलग मित्र होईल.

३५) पण जे संयमी असतात त्यांनाच हे लाभते आणि ज्यांचं नशीब मोठं त्यांच्याच भाग्यात.

३६) सैतानाकडून तुम्हांस आभास होत असेल तर अल्लाहस शरण जा. तो ऐकतो आणि जाणतो.

३७) रात्र आणि दिवस, सूर्य आणि चंद्र त्याच्या संकेतांपैकी आहेत. सूर्य आणि चंद्रास नतमस्तक होऊ नका. अल्लाहस नतमस्तक व्हा, ज्यांनं त्यांना निर्माण केलंय, जर तुम्हांस त्याची भक्ती करायची असल्यास.

३८) ते अहंकारानं वागत असतील (तर) तुझ्या विधात्याच्या हजेरीत

असलेले दूत रात्रंदिवस अखंड त्याचं पावित्र्यगान करतात, त्यांना कंटाळा येत नाही.

३९) कोरड्या आणि ओसाड पडलेल्या जमिनीवर आम्ही जेव्हा पाऊस वर्षवतो तोच ती सचेत होऊन फुलून जाते, हेही त्याच्या संकेतांमधीलच. ज्यानं तिला सजीव केलं निश्चितपणे तोच मृतांनाही जीवित करणार, प्रत्येक बाबीवर तो सामर्थ्य बाळगतो.

४०) जे लोक आमच्या आयतींमध्ये ढवळाढवळ करतात ते आम्हांपासून लपलेले नाहीत. ज्यास नरकाग्नीत फेकून दिलं जाईल तो चांगला की जो निर्णयाच्या दिवशी सहीसलामत येईल तो. तुम्हांस वाटेल ते करा, पण तुम्ही काय करता ते तो पाहत असतो.

४१) हेच ते लोक ज्यांनी त्यांच्याकडं उपदेश (कुरआन) आलं असता त्यास नकार देतात, हा तर भारदस्त असा ग्रंथ आहे.

४२) असत्य त्याच्या जवळपास पोचू शकत नाही, समोरून किंवा मागूनसुद्धा. प्रतिभासंपन्न आणि प्रशंसेस पात्र (असणाऱ्या) कडून तो पाठवला गेलाय.

४३) तुमच्या आधीच्या प्रेषितांस जे सांगण्यात आलं होतं तेच तुम्हांस सांगितलं जातं. तुमचा विधाता क्षमाही करतो आणि दु:खद शिक्षाही करतो.

४४) आम्ही कुरआनची मांडणी अरबी सोडून इतर भाषेत केली असती तर ते म्हणाले असते, त्याच्या आयती स्पष्ट करून का सांगितल्या नाहीत. ग्रंथ परकीय भाषेत आणि प्रेषित अरब, सांगा तो तर श्रद्धावंतासाठी मार्गदर्शन आणि उपायकारक आहे, पण जे अश्रद्ध असतात त्यांचं कान बधीर असून त्यांच्या डोळ्यांना अंधत्व जडलंय, जणू दूरवरच्या ठिकाणावरून त्यांना बोलवलं जातंय.

४५) आम्ही मूसा यांना ग्रंथ दिला, त्याबाबतसुद्धा मतभेद केले. तुमच्या विधात्याकडून आधीच एक गोष्ट ठरवलेली नसती तर त्यांचा निकाल लावून झाला असता. आणि ते त्याच्याविषयी शंका घेत संभ्रमावस्थेत

आहेत.

४६) जो सत्कर्मं करतो ते त्याच्या स्वत:च्याच (भल्या) साठी आणि जो दुष्ट कामं करतो त्यासाठी तोच जबाबदार. तुमचा विधाता आपल्या भक्तांशी अन्याय करत नसतो.

**पारा - २५**

४७) कयामतच्या बाबतीत माहिती त्यासच सोपवलीय. त्याच्या माहितीशिवाय कोणतेही फळ आपल्या पोयीतून बाहेर पडत नाही आणि कोणतीही मादी गर्भ धारत नसते किंवा मुलं जन्मास घालते. ज्या दिवशी त्यांना हाक देऊन विचारलं जाईल, 'कुठं आहेत माझे भागीदार?' ते म्हणतील, आम्ही तुला सांगून टाकलंय, आमच्यापैकी कुणी त्यांचा साक्षीदार नाही.

४८) ते पूर्वी ज्यांचा धावा करत असत ते त्यांना वाऱ्यावर सोडून गेले. त्यांचा सुटकेचा आता कोणता मार्ग नसल्याचा त्यांनी अंदाज लावला.

४९) माणूस भलं ते मागण्यास कधी कंटाळा करत नसतो, पण कधी त्यास काही वाईट स्पर्शून गेल्यास आशा सोडून निराश होऊन जातो.

५०) ते संकट बाजूस सारून त्यास आम्ही आमच्या कृपेचा उपभोग दिल्यावर तो म्हणतो, हे माझ्यासाठीच आहे. आणि प्रलय येऊन उभं राहील असा माझा विचार नाही, मला माझ्या विधात्याकडं परत जरी जावं लागलं तरी त्याच्यापाशी मला भलंच लाभेल. पण आम्ही नाकारणाऱ्यांस ते काय करत राहिले ते दाखवून देऊ आणि त्यांना कठोर शिक्षा उपभोगावयास लावू.

५१) आम्ही माणसाला वरदानित करतो, तेव्हा तो तोंड वळवून ऐटित येतो आणि त्यास काही वाईट घडलं तर लांब-लांब धावा करतो.

५२) त्यांना सांगा, पाहा हे (कुरआन) अल्लाहकडून आलेलं असताना जर तुम्ही त्यास नाकारत असाल तर मग तुमच्यापेक्षा मार्गभ्रष्टतेत लांब गेलेला (दुसरा) कोण?

५३) आम्ही आमच्या आयती लवकरच त्यांना या विश्वामध्ये सर्वत्र आणि त्यांच्या स्वत:च्या आत्म्यांतही दाखवून देऊ हे (कुरआन) सत्य असल्याचं त्यांच्यावर (पुरेपूर) स्पष्ट होईपर्यंत. तुमचा विधाता सर्व गोष्टींचा साक्ष आहे हे पुरेसं नाही?

५४) ऐकून घ्या, ते आपल्या विधात्याशी भेट घडणार याबाबत साशंक आहेत. पण लक्षात असू द्या, तो प्रत्येक बाबीस वेढून आहे.

-------

# ४२. सूरह अश्शूरा

**मक्काकालीन, आयती ५३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हामीम!

२) ऐन सीन क़ाफ.

३) आम्ही तुम्हांस आणि तुमच्या पूर्वी होऊन गेलेल्यांना दिव्य-अनुभूती दिल्या. अल्लाह सर्वोच्च आणि प्रतिभासंपन्न आहे.

४) आकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही त्याच्याच मालकीचं. तो सर्वश्रेष्ट आणि महान आहे.

५) त्यांच्यावरील आकाश जवळजवळ फाटूनच जातं जेव्हा त्याचे दूत आपल्या विधात्याचं गौरवगान करत धरतीवरील सर्व चराचरासाठी क्षमा मागत असतात. लक्षात असू द्या, अल्लाहच तेवढा क्षमाशील आणि दया दाखवणारा आहे.

६) जे लोक अल्लाहस सोडून इतरांशी संधान साधतात त्यांच्यावर अल्लाहचं लक्ष असते. तुम्ही त्यांचे हितरक्षक नाहीत.

७) आम्ही दिव्य-अनुभूतीद्वारे तुम्हांस अरबी भाषेतील कुरआन दिलं. प्रमुख शहर (मक्का) आणि त्याच्या परिसरातील (लोकांस) सावध करण्यास. आणि ज्या दिवशी सर्व एकत्र होतील त्यापासून सावध करण्यास. (त्या दिवशी) काही लोक स्वर्गात जातील तर काही नरकात. यात शंकेस वाव नाही.

८) अल्लाहच्या मर्जीस आलं असतं तर त्यानं त्यांना एकच समूह बनवलं असतं. पण अल्लाह ज्यांना इच्छितो त्यांस आपल्या दयेत सामावून घेतो. मात्र अत्याचारींच्या रक्षणासाठी आणि मदतीस कुणी सरसावणार नाही.

९) त्यांनी अल्लाह सोडून इतरांशी सलगी केली? अल्लाहच फक्त रक्षक

आहे. तोच मृतांस जीवित करतो. प्रत्येक बाबीवर त्याचं सामर्थ्य आहे.

१०) ज्या गोष्टींबाबत तुम्ही मतभेद करता त्याचा निर्णय अल्लाहकडंच आहे. असा तो अल्लाह- माझा विधाता, त्याच्याशी मी एकनिष्ठ असून त्याच्याकडंच मी वळतो.

११) आकाश आणि पृथ्वी घडवणारा. तुमच्या स्वत:मधूनच त्यानं तुमची जोडी निर्माण केली आणि जनावरांनाही जोडीनं निर्माण केलं. (याद्वारे) तो तुमच्या संख्येत वाढ करतो. त्याची तुलना कशाशीच नाही. तोच ऐकत असतो आणि पाहत असतो.

१२) आकाश आणि पृथ्वीच्या किल्ल्या त्याच्यापाशीच आहेत. (तो) इच्छितो त्यांना उदार आणि काटकसरीनं साधनं देतो. त्यास प्रत्येक बाबी अवगत आहेत.

१३) तुमच्यासाठी त्यानं धर्माची तीच पद्धत आखून दिली जी त्यानं नूह यांना पाळावयास लावली, जे आम्ही तुम्हांस अनुभूतीनं दिलं आणि इब्राहीम, मूसा आणि ईसा यांनाही त्याच धर्मास प्रस्थापित करण्यास सांगितलं. आणि त्यामध्ये फूट पाडू नका, असे आदेश दिले. तुम्ही त्यांना ज्याचा धावा करावयास सांगता अनेकेश्वरींना ते जड जातं. अल्लाह इच्छितो त्यास जवळ घेतो आणि जो त्याच्याकडं वळतो त्यास मार्गदर्शन घडवतो.

१४) त्यांना ज्ञान पोचल्यानंतर, आपसातील कलहामुळं त्यांनी फूट पाडली. जर तुमच्या विधात्यानं निर्णयासाठी कालावधी निश्चित केले नसते तर त्यांच्या बाबतीत निकाल लागला असता. ज्यांना त्यांच्यानंतर ग्रंथाचा वारसा देण्यात आला त्याबद्दल ते संशयात आहेत.

१५) तेव्हा (मुहम्मद स.) त्यांना त्याच्याकडंच बोलवा, मी दिलेल्या आदेशांशी ठाम राहा. त्यांच्या इच्छेचं पालन करू नका. आणि सांगा, अल्लाहनं पाठवलेल्या प्रत्येक ग्रंथास मी मान्य करतो (श्रद्धा ठेवतो). तुम्हामध्ये न्याय्य निर्णय देण्याचा मला आदेश आहे. आमचा आणि तुमचा विधाता अल्लाहच आहे, आमची कर्मं आमच्यापुरती आणि

तुमची कर्मं तुम्हाला. आम्हां उभयतांत वादविवाद नको. अल्लाह आम्हांस एकत्र करील. त्याच्याकडंच आपण परतणार आहोत.

१६) त्यांच्या विधात्याकडं त्यांचा वाद बिनबुडाचा असल्याचं मान्य करूनही जे लोक अल्लाहच्या बाबतीत वाद घालतात. अशांवर कोप कोसळंल. आणि कठोर शिक्षा असेल.

१७) अल्लाहच ज्यानं सत्य आणि संतुलित असा ग्रंथ अवतरला. कयामत जवळच असेल हे तुम्हांस काय माहीत?

१८) ज्यांचा त्यावर विश्वास नाही ते तिच्यासाठी घाई करतात. ज्या लोकांचा विश्वास आहे त्यांना तिची भीती लागून असते आणि ती सत्य आहे याची त्यांना जाणीव आहे. लक्षात ठेवा! जे लोक कयामतच्या बाबतीत वाद घालतात, ते मार्गभ्रष्टतेत लांब निघून गेलेत.

१९) अल्लाह आपल्या भक्तांशी औदार्यानं वागतो. इच्छितो त्यास निर्वाहाची साधनं देतो, तो सशक्त आणि प्रभुत्वसंपन्न आहे.

२०) ज्या कुणास परलोकातील फलश्रुती हवी असते, आम्ही त्यामध्ये भर घालतो आणि ज्यांना याच आयुष्यात शेती पिकवायची असते त्यांना त्याप्रमाणं देतो. पण परलोकात त्यांचा वाटा नसेल.

२१) त्याचे असे कोण भागीदार आहेत ज्यांनी एखादा असा धर्म घालून दिला ज्यास अल्लाहची अनुमती नाही? जर आम्ही शब्द दिला नसता तर त्यांचा निकाल लागून झाला असता, अत्याचारींना निश्चितच दु:खद शिक्षा आहे.

२२) अत्याचारी पाहा कसे भितात. त्यांनी जे मिळवलंय (त्याच्या परिणामांशी) त्यांच्यावर ते ओढवणारच. आणि जे श्रद्धा धारण करतात आणि नेक कर्म करतात त्यांच्यासाठी स्वर्गाच्या बागा असतील. त्यांना हवं ते तिथं त्यांच्या विधात्यापाशी असेल, उदंड असं वरदान ते.

२३) हीच ती अल्लाह आपल्या श्रद्ध आणि सत्कर्मी भक्तांना खूशखबर देतो. त्यांना सांगा, मी तुमच्याशी फक्त प्रेम आणि जवळीक यापलीकडं

कोणता मोबदला मागत नाही. कुणी भलं काही करत असेल तर आम्ही त्यात भल्याची भर घालू. अल्लाह क्षमाशील आणि मोल करणारा आहे.

२४) ते असं म्हणतात, त्यानं अल्लाहविरूद्ध खोटं रचलंय? अल्लाहनं इच्छिलं असतं तर तुमच्या हृदयास मोहर लावली असती. अल्लाह खोट्यास नष्ट करून टाकतो आणि आपल्या शब्दांनी सत्य सिद्ध करतो. त्यांच्या मनांमधील गुपितं त्याला ठाऊक आहेत.

२५) तोच आपल्या भक्तांचा पश्चात्ताप स्वीकारतो. आणि पापांना क्षमा करतो आणि तुम्ही जे काही करता त्यांस जाणतो.

२६) जे श्रद्ध असतात आणि सत्कर्म करतात त्यांच्या (प्रार्थना) स्वीकारतो आणि आपल्या संपन्नतेतून त्यात भर घालतो. नाकारणाऱ्यास मात्र कठोर शिक्षा असेल.

२७) अल्लाहनं जर आपल्या भक्तांस विपुल साधनं बहाल केली असती तर त्यांनी धरतीवर बंड माजविले असते. पण तो इच्छितो त्याप्रमाणं पाठवतो. तो निश्चितच आपल्या भक्तांबाबत चांगला परिचित असून त्यांना पाहत असतो.

२८) ते निराश होऊन गेल्यानंतर तोच पाऊस पाठवतो आणि आपली दया विखरून देतो. तोच संरक्षक आणि तोच प्रशंसेस पात्र.

२९) आकाश आणि पृथ्वीची निर्मिती आणि त्याच्यामध्ये विखरून टाकलेली जनावरं, त्याच्याच संकेतांमध्ये मोडतात. त्यांना हवं तेव्हा एकत्र करण्यास तो समर्थ आहे.

३०) तुम्हाला संकटास तोंड द्यावं लागतं, ते तुमच्या हातांनी जे कमवलं त्यामुळंच. (तरीदेखील) तो पुष्कळसं (पाप) क्षमा करत असतो.

३१) तुम्ही (अल्लाहस) धरतीवर विफल करू शकत नाही. अल्लाहशिवाय कोणी तुमचं संरक्षण करणार नाही की कोणी मदत पुरविणार नाही.

३२) समुद्रातील पर्वतांसमान जहाजं त्याची संकेतं आहेत.

३३) त्यानं जर वाऱ्यांना स्थिर केलं तर ते त्याच्या पृष्ठभागावर तसंच उभं राहतील. यामध्ये सातत्यानं आभार मानणाऱ्यास संकेतं आहेत.

३४) तो त्यांना त्यांच्या कर्माचं फलित म्हणून नष्टही करू शकतो. पण तो पुष्कळदा माफही करतो.

३५) जे लोक आमच्या संकेतांबाबत वाद घालतात, त्यांना कुठं गत्यंतर नाही हे त्यांना कळू दे.

३६) तुम्हांस दिलेल्या वस्तू फक्त जगातल्या आयुष्यापुरत्या लाभाच्या आहेत. पण अल्लाहपाशी आहे ते समृद्ध आणि शाश्वत आहे, अशा लोकांसाठी जे श्रद्धा धारण करतात आणि आपल्या विधात्यावर विश्वास ठेवतात.

३७) तसंच जे लोक मोठे अपराध आणि अश्लील कृत्यांपासून अलिप्त राहतात आणि रागावतात तेव्हा क्षमा करतात.

३८) जे आपल्या विधात्यास प्रतिसाद देतात, नमाज कायम करतात आणि आपसांतील व्यवहार सल्लामसलतीनं हाताळतात आणि आम्ही दिलेल्या संपत्तीतून खर्च करतात,

३९) त्यांच्यावर अत्याचार झाल्यास त्याचा प्रतिकार करतात.

४०) वाईटाचा मोबदला तशाच प्रकारचं वाईट होय. जर कुणी क्षमा केली आणि तडजोड केली तर त्याचा मोबदला अल्लाहकडून लाभेल. तो अत्याचारींना मुळीच पसंत करत नाही.

४१) कुणावर अत्याचार झाल्यास त्यानं त्यास प्रत्युत्तर दिलं तर अशा लोकांचा दोष नाही.

४२) जे लोकांवर अत्याचार करतात आणि धरतीवर नाहक बंड माजवतात ते दोषी असतात. त्यांना दुःखद शिक्षा असेल.

४३) पण जर कुणी धीर धरला आणि क्षमा केली तर ते मोठं धाडसाचं काम आहे.

४४) ज्यास अल्लाहनं मार्गभ्रष्ट केलं त्याच्यानंतर मग कुणी त्यास संरक्षण देणार नाही. आणि अत्याचारींना पाहा, शिक्षेस पाहून ते म्हणतील, परत जाण्याचा एखादा मार्ग आहे का?

४५) तुम्ही त्यांना (नरका) पुढं आणतेवेळी पाहा, ते कसं वाकलेले असतील अपमानामुळं आणि चोरट्या नजरांनी पाहत असतील. श्रद्धावंत लोक म्हणतील, कयामतच्या दिवशी ज्यांनी स्वत:स आणि आपल्या संबंधितांना विनाशात टाकले, तेच अपयश ओढवणारे आहेत. अत्याचारी कायम शिक्षा भोगत असतील.

४६) अल्लाहस वगळून त्यांच्या मदतीसाठी कुणी संरक्षक नसतील. अल्लाह ज्यास मार्गभ्रष्ट करेल मग त्याच्यासाठी कसला उपाय नाही.

४७) आपल्या विधात्याचं ऐका. अल्लाहनं तो दिवस पाठवण्यापूर्वी ज्यास टाळता येणार नाही, तुम्हांस कोणता आश्रय लाभणार नाही की कुणी तुम्हाला रोखणार नाही.

४८) तरीदेखील त्यांनी पाठ फिरवली तर आम्ही काही तुम्हांस त्यांच्यावर देखरेख करणारा केलं नाही. फक्त पोचवणंच तुमचं काम. आम्ही माणसास आपल्या दयेची चव देतो तेव्हा तो फुलून जातो. आणि त्यांच्या हातांनी पूर्वी केलेल्या कर्मांमुळं काही वाईट घडतं तेव्हा तोच माणूस कृतघ्न बनतो.

४९) आकाश आणि पृथ्वीचं अधिराज्य अल्लाहचंच. त्यास हवं ते निर्माण करतो. ज्यांना इच्छितो त्यांना मुली देतो आणि ज्यांना इच्छितो त्यांस मुलं देतो.

५०) आणि इच्छतो त्यांना मुली व मुलं जोडीनं देतो. आणि मर्जीप्रमाणं कुणास वांझ ठेवतो. तो सर्वज्ञ व सर्वसमर्थ आहे.

५१) अल्लाह त्याच्याशी बोलेल ही माणसाची ऐपत नाही. दिव्य-अनुभूतीद्वारे अथवा पडद्याआडून किंवा एखादा दूत पाठवून त्याच्या अनुमतीनं प्रेरणेद्वारे जशी त्याची इच्छा असेल (त्याप्रमाणं). तो सर्वोच्च प्रतिभासंपन्न आहे.

५२) आम्ही अशाच रितीनं आमच्या आज्ञेनं तुम्हांस दिव्य-अनुभूती (कुरआन) पाठवली. तुम्हांस ग्रंथ काय आणि श्रद्धा काय हे माहीत नव्हतं. आम्ही त्यास (कुरआनास) प्रकाश बनवला आणि आपल्या भक्तांपैकी ज्यांस इच्छितो त्यांना त्याद्वारे मार्गदर्शन देतो. आणि तुम्ही (मुहम्मद स.) त्यांना रास्त मार्ग दाखवत आहात.

५३) अल्लाहचा मार्ग ज्याच्या मालकीत आकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही आहे. लक्षात ठेवा, सर्व व्यवहार अल्लाहकडंच पोचतात.

-------

# ४३. सूरह अज़-जुखरुफ

**मक्काकालीन. आयती ८९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हामीम.

२) स्पष्ट ग्रंथाची शपथ.

३) आम्ही कुरआनची मांडणी अरबी भाषेत केली तुम्हांस समजता यावं यासाठी.

४) मूळ ग्रंथ (लौहे-महफ़ूज़) आम्हांपाशी आहे उदात्त नि ज्ञानसंपन्न.

५) तुम्ही मर्यादांबाहेर गेलेले लोक आहात म्हणून तुमच्याशी संबंध तोडून उपदेश करणं सोडून देऊ.

६) आम्ही तुमच्या पूर्वीच्यांकडं अनेक प्रेषित पाठवलेत.

७) पण एकही प्रेषित असा होऊन गेला नाही ज्याची त्यांनी चेष्टा केली नसेल.

८) आम्ही त्यांच्यापेक्षा अधिक पराक्रमींना नष्ट केलंय आणि जुन्या लोकांचं उदाहरण तर येऊनच गेलेलं आहे.

९) तुम्ही जर त्यांना विचाराल, कुणी निर्माण केलं हे आकाश आणि पृथ्वी? तर ते म्हणतील, जो सर्वज्ञ आणि सत्तेत समर्थ आहे त्यानं.

१०) ज्यानं तुम्हांसाठी पृथ्वी पसरवली त्यामध्ये तुमच्यासाठी रस्ते काढले. तुम्हांस मार्गदर्शन घडावं म्हणून.

११) ज्यानं आकाशातून उचित प्रमाणात पाऊस पाठवला त्यापासून ओसाड शहरांना नवचैतन्य दिलं. अशाच प्रकारे तुम्हीही उठवलं जाणार आहात.

१२) त्यानं सर्व प्रकारच्या जोड्या बनवल्या आणि तुमच्या स्वारीसाठी जहाजं आणि जनावरं बनविली.

१३) तुम्ही त्यांच्या पाठीवर स्वार होऊन मग तुमच्या विधात्याच्या संपन्नतेची आठवण करावी. आणि म्हणावं, तो पवित्र आहे ज्यानं यास आमच्या अधीन केलं, नसता आम्ही त्यावर ताबा मिळवू शकलो नसतो.

१४) आपण आपल्या विधात्यापाशी परतणार आहोतच.

१५) त्यांनी, त्याच्या भक्तांमधूनच त्याचा भागीदार बनवून टाकला, माणूस तर उघड (उघड) कृतघ्न आहे.

१६) त्यानं आपल्या निर्मितीतून मुली घेतल्या आणि तुम्हांस मुलं (पुत्र) निवडून दिले?

१७) त्यांच्यापैकी कुणास जर तिची (मुलीची) खूशखबर दिली ज्याचे संबंध ते कृपावंताशी (अल्लाहशी) जोडतात तेव्हा त्यांचा चेहरा काळवंडून जातो आणि तो दु:खानं दाटून जातो.

१८) जी शृंगारात पोसली जाते आणि ज्यास वादविवादात स्पष्ट खुलासा देता येत नाही (ती अल्लाहसाठी!)

१९) त्यांनी दूतांस जे रहमान (अल्लाहचे) भक्त आहेत स्त्री बनवून टाकलं. निर्मितीच्या वेळी ते तिथं उपस्थित होते? त्यांच्या साक्षीची नोंद घेतली जाईल आणि (कयामतच्या दिवशी) विचारण्यात येईल.

२०) ते म्हणतात, त्या कृपावंताची (रहमान) इच्छा असती तर आम्ही त्यांची पूजा केली नसती. त्यांच्याविषयी त्यांना मुळीच ज्ञान नाही, ते तर फक्त तर्क-वितर्क लावत असतात.

२१) आम्ही त्यांना पूर्वी एखादा ग्रंथ दिलाय ज्यास ते धरून बसलेत.

२२) ते म्हणतात, आम्ही आमच्या पूर्वजांना एका धर्माचं पालन करताना पाहिलं आणि त्यांच्या पाऊलखुणांची वाट आम्ही धरलीय.

२३) अशा प्रकारे आम्ही तुमच्या आधी कोणत्या वस्तीत एखादा ताकीद देणारा पाठवला तेव्हा त्यांच्यामधील सुखवस्तू लोक म्हणाले, आम्ही आमच्या पूर्वजांना एका धर्माचं पालन करताना पाहिलं. आम्ही त्याच पाऊलखुणांवर चालत आहोत.

२४) ते (प्रेषित) म्हणाले, जर मी तुमच्या पूर्वजांपेक्षा चांगला मार्ग दाखवला (तरीदेखील तुम्ही तेच करणार)? ते म्हणाले, तुम्हांस जे देऊन पाठवण्यात आलं त्यास आम्ही नाकारतो.

२५) आम्ही मग त्यांना प्रत्युत्तर दिलं. आणि पाहा, नाकारणाऱ्यांची शेवटी कशी गत झाली.

२६) आठवा, जेव्हा इब्राहीम यांनी आपल्या बापास आणि लोकांस सांगितलं, तुम्ही ज्यांना पुजता त्यांच्याशी माझा काहीएक संबंध नाही.

२७) ज्यानं मला निर्माण केलं तोच मला मार्ग दाखवील.

२८) आणि इब्राहीम यांनी हाच संदेश आपल्या नंतरच्या पिढ्यांना दिला. त्यांनी रुजू व्हावे यासाठी.

२९) मी त्यांना आणि त्यांच्या पूर्वजांना सुखोपभोग घेऊ दिला, त्यांच्याकडं सत्य धर्म आणि आयती स्पष्ट करून देण्यास प्रेषित आला.

३०) आणि त्यांना सत्यता पोचली असता ते म्हणू लागले, ही तर उघड जादू आहे. आम्ही खचितच नाकारत आहोत.

३१) तसेच ते म्हणू लागले, का बरं हा कुरआन या दोन वस्त्यांपैकी एखाद्या प्रतिष्ठित माणसाकडं का पाठवण्यात आला नाही.

३२) ते तुमच्या विधात्याची कृपा वाटून देतात? आम्ही त्यांना पुरवतो या जगातील जगण्यासाठी रोजीरोटी आणि त्यांच्यापैकी काहींना काही इतर लोकांपेक्षा उच्च श्रेणी देतो, त्यांनी एकमेकांचं सहाय्य करण्यासाठी. पण ते जे साठवतात त्यापेक्षा तुझ्या विधात्याची कृपा उत्तम आहे.

३३) आणि सर्व लोक एकच समूह होण्याची गोष्ट नसती तर आम्ही कृपावंताचा इन्कार करतात त्यांच्यासुद्धा घरांची छतं चांदीची आणि चढण्यासाठी चांदीचेच जिने करून दिले असते.

३४) तसंच त्यांच्या घरांचे दरवाजे आणि आराम करण्यास आसनं,

३५) तेही सोन्याची, पण ह्या सर्व सुख-सोयी जगातल्या जीवनापुरत्याच.

मात्र तुझ्या विधात्यापाशी सदाचारींसाठी परलोकातील जीवन आहे.

३६) जो कृपावंताच्या स्मरणाकडं दुर्लक्ष करतो त्याच्या सोबतीसाठी आम्ही सैतान नियुक्त करतो.

३७) ते त्यांच्या मार्गात अडथळं उभी करतात, मात्र त्यांना वाटतं ते मार्गदर्शित आहेत.

३८) शेवटी ते आमच्याकडं येतील तेव्हा (आपल्या सोबत्यास) म्हणतील, तुझ्या व माझ्यामध्ये पूर्व-पश्चिमचं अंतर असता, तू वाईट सोबती आहे.

३९) तुमच्याकडून अनर्थ घडून गेला त्याचा आज काही लाभ होणार नाही. आता तुम्ही शिक्षेत भागीदार आहात.

४०) तेव्हा तुम्ही बहिऱ्यांना ऐकवू शकता अथवा अंधांना मार्ग दाखवू शकता. आणि जे धडधडीत भरकटलेले आहेत त्यांना?

४१) आम्ही तुम्हांस (या जगातून) उठवलं तरी, आम्ही त्यांचा प्रतिकार करणारच आहोत.

४२) किंवा आम्ही त्यांना जे वचन दिलंय ते तुम्हांस (प्रत्यक्ष) दाखवून देऊ, आम्ही त्यासही समर्थ आहोत.

४३) तेव्हा तुम्ही पाठवलेल्या अनुभूतीस धरून राहा, आपण रास्त मार्गावर आहात.

४४) हे (कुरआन) तुमच्यासाठी आणि तुमच्या लोकांना उपदेश आहे, (त्या बाबतीत) तुम्हांस लवकरच विचारलं जाईल.

४५) तुमच्या आधी आम्ही ज्या प्रेषितांना पाठवलं त्यांना विचारून घ्या, आम्ही कृपावंतास सोडून इतर ईश्वर बनवलं होतं त्यांना पूजा करण्यासाठी.

४६) आम्ही मूसा यांना आपल्या आयतींसहित फिरऔन आणि त्याच्या सरदारांकडं पाठवलं होतं ते म्हणाले, मी सकल विश्वांच्या

विधात्याकडून प्रेषित आहे.

४७) पण (जेव्हा) ते आमचं संकेत घेऊन त्यांच्याकडं आले तोच त्यांनी हशां मांडला.

४८) आम्ही त्यांना एकावर एक मोठे संकेत दाखवत राहिलो, आम्ही त्यांना शिक्षेत घेरलं, त्यांनी परावृत्त होण्यासाठी.

४९) ते म्हणाले, जादूगार! तुम्हांस आश्वासन दिलंय त्यानुसार आमच्यासाठी आपल्या विधात्याचा धावा करा, आम्हांस खरंच मार्गदर्शन घडेल.

५०) आम्ही त्यांच्यापासून शिक्षा दूर केली आणि त्यांनी आपला शब्द मोडला.

५१) फिरऔन आपल्या लोकांमध्ये दवंडी देऊन म्हणाला, माझ्या लोकहो! मिस्र (इजिप्त) माझं अधिराज्य नाही? आणि या नद्या माझ्या खालून वाहतात, तुम्हांस ते दिसत नाहीत?

५२) तेव्हा मी चांगला की हा हीन मनुष्य, ज्यास धड बोलताही येत नाही.

५३) (तो श्रेष्ठ असेल तर) त्यास सोन्याचं कंकण का घातलेलं नाही की पंख लावून त्याच्या सोबत दूत का आले नाहीत?

५४) अशा प्रकारे त्यानं आपल्या लोकांस त्याचं ऐकावं म्हणून मूर्ख बनवून ठेवलं. आणि म्हणूनच ते बंडखोर लोक होते.

५५) या लोकांनी आम्हांस प्रक्षोभित केलं तेव्हा आम्ही त्यांचा प्रतिकार करत त्या सर्वांना बुडवून टाकलं.

५६) आणि त्यांना भावी पिढ्यासाठी गतकाळातील कथा बनवल्या.

५७) जेव्हा मरयमपुत्र (ईसा) यांचं उदाहरण दिलं गेलं तोच तुमच्या लोकांनी त्यावर हास्यकल्लोळ माजवला.

५८) ते म्हणाले, आमचे देव (उपास्य) चांगले की तो? तुमच्याशी वाद घालण्यासाठी त्यांचे हे उदाहरण. वास्तविक तेच भांडखोर आहेत.

५९) ते (ईसा) आमचं भक्त आहेत. आम्ही त्यांना वरदान देऊन इस्राईलच्या

लोकांसाठी उदाहरणादाखल बनवलं.

६०) आमची तशी इच्छा असती तर आम्ही तुमच्यामधून दूत निर्माण करून त्यांना पृथ्वीचा वारस दिला असता.

६१) ते (ईसा) कयामतच्या संकेतांपैकी एक आहेत, तुम्ही शंका घेऊ नका. माझं पालन करा, हाच रास्त मार्ग आहे.

६२) सैतानानं तुम्हांस अडथळा करू नये, तो तुमचा उघड शत्रू आहे.

६३) ईसा स्पष्ट संकेत घेऊन आले आणि म्हणाले, मी तुम्हांस समज घडवण्यासाठी आलोय. काही अशा गोष्टींचा उलगडा करण्यास ज्या बाबतीत तुम्ही मतभेद करता, तेव्हा अल्लाहची भीती बाळगा आणि माझं ऐका.

६४) अल्लाहच माझा विधाता आहे आणि तुमचासुद्धा. त्याची आराधना करा, हाच तो सरळमार्ग.

६५) तरीपण त्यांच्यापैकी काही पंथांनी आपसात मतभेद केले, अशा अत्याचारी लोकांचा धिक्कार असो, एका दु:खद दिवशी त्यांना शिक्षा घडणार.

६६) ते कयामतची वाट पाहतात, ती अकस्मात यावी, त्यांना कळून येण्याआधी?

६७) त्या दिवशी नेक लोकांस सोडून सारे मित्र एकमेकांचे शत्रू होऊन जातील.

६८) माझ्या भक्तहो, त्या दिवशी तुम्हांस कसली भीती नसेल, तसंच तुम्ही दु:खीही होणार नाहीत.

६९) ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि आज्ञाधारक राहिले.

७०) तुम्ही आणि तुमच्या मंडळी स्वर्गात जा, तुम्हांस आनंद लाभेल.

७१) त्यांच्यासमोर सोन्याची ताटं आणि प्याले फिरवले जातील आणि त्यांना हवं ते सारं काही डोळे तृप्त होतील असं सर्व तिथं असेल. त्यामध्ये

तुम्ही सदाकाळ राहाल.

७२) असे ते स्वर्ग, ज्याचा तुम्हांस तुमच्या पुण्यकर्मांबद्दल वारसा मिळाला.

७३) तिथं तुमच्या खाण्यासाठी भरपूर फळफळावळ असतील.

७४) पापी लोकांसाठी नरकाची शिक्षा असेल, कायम राहण्यासाठी.

७५) ती (शिक्षा) सौम्य केली जाणार नाही, ते निराशेत खितपत पडून राहतील.

७६) आम्ही नाही त्यांच्यावर अत्याचार केले, त्यांनीच अनर्थ ओढवून घेतला.

७७) ते आक्रोश करून (नरकाच्या) प्रमुखास म्हणतील, तुझ्या विधात्यानं आमच्या मृत्युचा निकाल लावला तर बरं होईल. तो म्हणेल, तुम्ही (अशाच अवस्थेत) सदैव राहाल.

७८) आम्ही तुमच्याप्रत सत्य आणलं होतं पण तुमच्यापैकी अनेकांना सत्याचं वावडं होतं.

७९) त्यांनी काही निश्चित केलं असेल तर आम्हीही निश्चित करून ठेवलंय.

८०) आम्ही त्यांची गुपितं आणि आपसातली कुजबुज ऐकली नाही अशी त्यांची कल्पना आहे का? नव्हे आम्ही पाठवलेली दूतं त्यांची नोंद करत असतात.

८१) त्यांना सांगा, जर कृपावंतास पुत्र असता तर त्याची आराधना करणारा मी सर्वप्रथम असतो.

८२) आकाश आणि पृथ्वी व सिंहासनाचा स्वामी, ते ज्या गोष्टी त्याच्यासंबंधी उच्चारतात त्यापासून अलिप्त आहे.

८३) त्यांना सोडा, वायफळ गोष्टीत आणि खेळत बसू द्या, त्यांना वचन दिलेल्या भेटीच्या दिवसापर्यंत.

८४) आकाशातही तोच ईश्वर आणि पृथ्वीवरही तोच ईश्वर. आणि तोच

प्रतिभावंत व सर्वज्ञ.

८५) धन्य तोच. आकाश आणि पृथ्वी व दोहोंमधील साऱ्या ठिकाणी त्याचंच अधिराज्य. प्रलयाच्या घटकेची माहिती त्याच्यापाशीच. तुम्ही त्याच्याकडंच परतणार आहात.

८६) जे लोक अल्लाहस सोडून ज्यांचा धावा करतात त्यांना मध्यस्थी करण्याचा अधिकार नाही, अशांना वगळता जे सत्य तीच साक्ष देतात कारण त्यांना भान असते.

८७) तुम्ही जर त्यांना विचारलं, त्यांना कुणी निर्माण केलं? ते म्हणतील, अल्लाहनं. मग ते कुठं फसले जातात?

८८) प्रेषित म्हणतात त्याची शपथ! माझ्या विधात्या, हे लोक श्रद्धा धारण करणार नाहीत.

८९) त्यांची उपेक्षा करा आणि म्हणा, (माझा) सलाम (तुम्हांस)! त्यांना लवकरच कळून येईल.

-------

# ४४. सूरह अद-दुखान

**मक्काकालीन, आयती ५९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हामीम.

२) शपथ, स्पष्ट ग्रंथाची.

३) आम्ही त्यास एका समृद्ध रात्री अवतलं निश्चितच आम्ही सावध करत आहोत.

४) ज्या रात्रीत प्रत्येक बाबींचा, विद्वत्तापूर्ण निर्णय दिला जातो.

५) आमच्या आज्ञेनं आम्ही प्रेषित पाठवणार होतो.

६) तुमच्या विधात्याकडंची कृपा म्हणून, तोच ऐकतो आणि जाणतो.

७) आकाश आणि पृथ्वी आणि त्यामधील सर्वांचा विधाता तोच, जर तुमचा विश्वास असेल तर.

८) त्याच्याशिवाय कुणी ईश्वर नाही. तोच जीवन देतो आणि मरणही. तोच तुमचा आणि तुमच्या प्राचीन पूर्वजांचा विधाता.

९) तरीपण ते शंकेत पडून खेळ मांडतात.

१०) तेव्हा त्या दिवसाची वाट पाहा जेव्हा आकाश स्पष्ट धुराळ्याने व्यापून जाईल.

११) तो लोकांना वेढून टाकेल, ही यातनादायक शिक्षा असेल.

१२) आमच्या विधात्या! आम्हांपासून हे प्रकोप दूर कर, आम्ही श्रद्धा बाळगतो.

१३) आता त्यांना कुठून उपदेश मिळेल. त्यांच्याकडं स्पष्ट करून देण्यास एक प्रेषित आला होता.

१४) तरीही त्यांनी त्याच्यापासून तोंड फिरवलं आणि म्हणाले, हा तर

शिकवलेला वेडसर (माणूस) आहे.

१५) आम्ही काही काळ शिक्षा बाजूस सारली तरी तुम्ही पुन्हा तेच करणार.

१६) ज्या दिवशी आम्ही त्यांना घेरणार आहोत प्रचंड त्वेषानं. आम्ही खरंच प्रतिकार करणार आहोत.

१७) आम्ही त्यांच्या आधी फिरऔनच्या लोकांची परीक्षा घेतलीय. त्यांच्याकडं एक सन्मानित प्रेषित आले होते.

१८) हे म्हणत, अल्लाहच्या भक्तांना माझ्या ताब्यात द्या, मी तुमच्यासाठी एक विश्वासार्ह प्रेषित आहे.

१९) अल्लाहशी उद्दामपणानं वागू नका. मी तुम्हांपाशी प्रत्यक्ष स्पष्ट अधिकार घेऊन आलो.

२०) तुम्ही मला दगडांनी ठेचू नये यासाठी मी माझ्या आणि तुमच्या विधात्याचा आश्रय घेतो.

२१) जर तुमचा माझ्यावर विश्वास नाही तर माझ्यापासून लांब राहा.

२२) मग तो आपल्या विधात्याचा धावा करत म्हणाला, हे अत्याचारी लोक आहेत.

२३) (म्हटलं गेलं) माझ्या भक्तांना घेऊन रात्रीच्या वेळी निघून जा. तुमचा पाठलाग केला जाईल.

२४) समुद्र शांत असताना तो पार करून निघून जा, ते सैन्य बुडणार आहे.

२५) अशा प्रकारे त्यांनी कितीतरी बागा, झरे (मागं) सोडून दिले.

२६) शेतजमिनी आणि वैभवशाली वास्तू

२७) आणि संपन्नता ज्याचा ते आनंद लुटत असत.

२८) अशा रितीनं आम्ही नंतरच्या लोकांना त्यांचा वारसा दिला.

२९) ना आकाश, ना पृथ्वी त्याच्यासाठी रडले की त्यांना तशी सवडही मिळाली नाही.

३०) आम्ही इस्राईलच्या लोकांची अपमानजनक शिक्षेतून सुटका केली,

३१) फिरऔनपासून, तो अतिरेकी आणि उद्धट होता.

३२) आम्ही त्यांना (इस्राईलच्या लोकांना) जाणूनबुजून सकल जगांवर प्राधान्य दिलं.

३३) आम्ही त्यांना स्पष्ट संकेत दिले ज्यांमध्ये त्यांची उघड परीक्षा होती.

३४) लोकांचं म्हणणं असं,

३५) आम्ही एकदा मेल्यानंतर उठवले जाणार नाहीत.

३६) तुम्ही म्हणता ते खरं असेल तर मग आमच्या पूर्वजांना (परत) आणा.

३७) कोण चांगले, तुब्बाचे लोक की त्यांच्या पूर्वी होऊन गेलेले? ते नक्कीच अपराधी असल्यानं आम्ही त्यांना ठार मारलं.

३८) आम्ही आकाश, पृथ्वी आणि त्या दोहोंमधील सारंकाही खेळ मांडण्यासाठी निर्माण केलेलं नाही.

३९) तसंच आम्ही त्यांना नाहक निर्माण केलं नाही (विनाउद्दिष्ट), पण अनेकांना हे कळत नाही.

४०) निश्चितच निर्णयाचा दिवस, त्या सर्वांना निर्धारित करून दिलेली मुदत आहे.

४१) ज्या दिवशी कुणी मित्र आपल्या मित्रास काहीही उपयोगी पडणार नाही की कोण त्याला मदत करणार नाही,

४२) ज्यास अल्लाहची कृपा लाभेल तो वगळता. तो सर्वोच्च दयावंत आहे.

४३) हेच ते जक्कूमचा झाड,

४४) पापी लोकांचं खाद्य.

४५) वितळलेल्या पितळाप्रमाणं पोटात उकळत राहील,

४६) उकळत्या पाण्यासारखं.

४७) त्याला धरून नरकाच्या मधोमध आणा.

४८) मग त्याच्या डोक्यावर उकळते पाणी टाका शिक्षा म्हणून.

४९) आता घे चव. तू तर समर्थ आणि सन्मानित होता.

५०) ज्याबाबत तुम्ही साशंक होता तेच हे.

५१) सदाचारींना सुरक्षित ठिकाण असेल.

५२) बागांमध्ये, झऱ्यांकाठी.

५३) भरजरी रेशमी वस्त्र परिधान करून समोरासमोर बसलेले.

५४) त्यांच्या जोडीस तेजस्वी डोळे असलेले सोबती देऊ.

५५) तिथं ते समाधाननं प्रत्येक प्रकारची फळं मागवून घेतील.

५६) तिथं त्यांना पहिल्या मृत्यूनंतर आता मृत्यूची चव घ्यावी लागणार नाही. (अल्लाहनं) त्यांना नरकाच्या शिक्षेपासून अलिप्त ठेवलं.

५७) तुमच्या विधात्याची ही समृद्धी आणि महान असं यश.

५८) आम्ही ते (कुरआन) तुमच्याच भाषेत सोपं केलंय. तुम्हांस उपदेश मिळावा म्हणून.

५९) आता तुम्ही (मुहम्मद स.) वाट पाहा, तेही प्रतिक्षेत आहेत.

-------

# ४५. सूरह अल-जासिया

**मक्काकालीन, आयती ३७**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हामीमऽ.

२) प्रभुत्वशाली नि विद्वत्ताप्रचुर अल्लाहनं पाठवलेला हा ग्रंथ होय.

३) श्रद्धा बाळगणाऱ्यास, आकाश व पृथ्वीमध्ये संकेतं आहेत,

४) आणि तुमच्या निर्मितीत. आणि जी जनावरं त्यानं विखरुन दिलीत त्यांमध्ये विश्वास ठेवणाऱ्यांस संकेतं आहेत.

५) तसंच रात्र आणि दिवसामधील बदलामध्ये आणि आकाशातून त्यानं पाठवलेल्या निर्वाहाच्या साधनांमध्ये, जमिनीस तिच्या मृत्यूनंतर जीवित करण्यामध्ये आणि वाऱ्यांच्या बदलात समंजस लोकांसाठी संकेतं आहेत.

६) या अल्लाहच्या आयती होत. ज्या आम्ही प्रामाणिकपणे तुम्हांस वाचून दाखवतो. मग अल्लाह आणि त्याच्या आयतींनंतर ते कशावर श्रद्धा ठेवणार?

७) प्रत्येक खोटे रचणाऱ्यांचा पापींचा धिक्कार असो.

८) अल्लाहच्या आयती ऐकवल्या जात असता तो त्या ऐकतो, तरीही अहंकार करत तो हट्ट धरतो, जणू त्यानं ते ऐकलंच नाही. त्यास एका दु:खद शिक्षेची खूशखबर द्या.

९) आणि आमच्या आयतींबाबत त्यास काही समजलं तर तो ते चेष्टेत धरतो. अशाच लोकांना अपमानजनक शिक्षा होईल.

१०) ते नरकास सामोरं जातील. त्यांनी मिळवलं ते त्यांच्या काहीएक उपयोगी पडणार नाही, त्यांनी अल्लाहस सोडून ज्यांना संरक्षक केलं तेही. त्यांना भयंकर शिक्षा असेल.

११) हे (कुरआन) मार्गदर्शन आहे. आणि जे लोक आपल्या विधात्याच्या आयती नाकारतात त्यांच्यासाठी प्रचंड दु:खदायक शिक्षा असेल.

१२) अल्लाहनं समुद्रांस तुमच्या अंकित केलं. त्याच्या आज्ञेनं त्यामध्ये जहाजं तरंगत राहतात. आणि त्याच्या संपन्नतेतून काही मिळवाल आणि त्याचं आभार व्यक्त कराल म्हणून.

१३) आणि त्यानं आपल्या आज्ञेनं आकाश आणि पृथ्वीमध्ये जे जे आहे ते सर्व तुमच्या अधीन केलं. यामध्ये विचार करणाऱ्या लोकांस संकेत आहेत.

१४) श्रद्धावंत लोकांना सांगा, त्यांनी अशा लोकांना क्षमा करावी जे अल्लाहचे दिवस कसे येणार आहेत याबाबत आशावादी नसतात. अल्लाहनं त्यांच्या कमाईचा मोबदला द्यावा यासाठी.

१५) जो नेक कर्म करतो तो स्वत:साठीच आणि दुष्कर्म केली तर त्यासाठी तोच जबाबदार. नंतर तुम्ही आपल्या विधात्याकडं परतले जाणार आहातच.

१६) आम्ही इस्राईलच्या लोकांना ग्रंथ दिला, सत्ता दिली आणि प्रेषितपद बहाल केलं. आणि निर्वाहासाठी पाक वस्तू दिल्या आणि जगभरातील लोकांवर त्यांना प्राधान्य दिलं.

१७) आम्ही त्यांना धर्माच्या बाबतीत स्पष्ट संकेतं दिलीत. पण त्यांना ज्ञान लाभल्यावर परस्परातील हट्टामुळं त्यांनी मतभेद केले. तुमचा विधाता ज्या बाबतीत ते मतभेद करत असत कयामतच्या दिवशी त्याचा निर्णय देईल.

१८) आम्ही मग तुम्हांस धर्माची एक पद्धत घालून दिलीय. तिचं पालन करा आणि ज्यांना काही कळत नाही अशांच्या अपेक्षांमागं जाऊ नका.

१९) ते अल्लाहविरूद्ध तुमच्या काहीएक उपयोगी पडणार नाहीत. अत्याचारी एकमेकांचे समर्थक असतात, तर अल्लाह सदाचारींचा रक्षक असतो.

२०) मानवांसाठी या विवेकाच्या गोष्टी होय. तसंच विश्वास ठेवणाऱ्या

लोकांस मार्गदर्शन आणि कृपा.

२१) लोकांना असं वाटतं जे कुकर्म करतात, आम्ही त्यांना श्रद्धावंत आणि पुण्य कर्मं करणाऱ्या लोकांसमान वागणूक देऊ. त्यांचं जगणं आणि मरणं सारखंच? त्यांचा निर्णय वाईट आहे.

२२) अल्लाहनं आकाश आणि पृथ्वीची निर्मिती हक्कानं केलीय प्रत्येकास त्याच्या कमाईचा मोबदला देण्यासाठी. त्यांच्याशी अन्याय केला जाणार नाही.

२३) तुम्ही त्यास पाहिलं? जो आपल्या आकांक्षांना ईश्वर बनवतो, त्यास ज्ञान असूनदेखील अल्लाहनं मार्गभ्रष्ट केलं. त्याच्या कानांवर आणि मनांवर मोहर लावून टाकली आणि त्याच्या डोळ्यांस झाकून टाकलं. अल्लाहनंतर त्यास कोण मार्ग दाखवल? तुम्ही त्याकडं लक्ष पुरवत नाही?

२४) ते म्हणतात, जगातल्या आयुष्यापलीकडं काहीच नाही. आम्ही जगतो आणि आम्ही मरतो, काळच आम्हांस नष्ट करतो. त्यांना त्याविषयी काहीही माहीत नाही. ते फक्त तर्क लावत असतात.

२५) जेव्हा त्यांना आमच्या आयती स्पष्ट करून ऐकवल्या जातात. त्यांचा युक्तिवाद असतो, तुम्ही खरं असाल तर आमच्या पूर्वजांना परत आणा.

२६) त्यांना सांगा, अल्लाहच तुम्हांस जगवतो आणि तोच मग मरण देतो. आणि मग तोच तुम्हांस कयामतच्या दिवशी एकत्र गोळा करील, यात काहीही शंका नाही, पण बहुतेक लोकांना हे कळत नाही.

२७) आकाश आणि पृथ्वीत त्याचंच अधिराज्य. ज्या दिवशी कयामत घडेल, त्या दिवशी असत्य अवलंबणारे नष्ट होतील.

२८) आणि प्रत्येक समूहाला तुम्ही गुडघे टेकताना पाहाल. प्रत्येक समूहास आपल्या कृत्यांची नोंद पाहावयास बोलवलं जाईल. आज तुम्हांस तुमच्या कर्मांचा मोबदला दिला जाईल.

२९) हे आमचं दफ्तर तुमच्या बाबतीत सत्य तेच सांगेल. तुम्ही जे करत होता त्याचीच आम्ही नोंद करवून घेत असत.

३०) ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि सत्कर्मं केलीत त्यांचा विधाता त्यांना आपल्या कृपेत सामावून घेईल, हे उघड यश आहे.

३१) ज्या लोकांनी नाकारलं (त्यांना विचारलं जाईल), तुम्हांस आमच्या आयती वाचून दाखवल्या नाहीत? तुम्ही उद्धटपणानं वागलात, तुम्ही पापी लोक होता.

३२) तुम्हांस सांगितलं गेलं, अल्लाहचं वचन सत्य आहे. कयामतच्या बाबतीत काही शंका नाही, तेव्हा तुम्ही म्हणत होता, कयामत काय (आहे) आम्हांस कळत नाही. आम्हांस वाटतं ती काल्पनिक असावी. आम्हांस विश्वास नव्हता.

३३) त्यांच्या कृत्यांची दुष्टता उघडकीस येईल आणि ज्याची ते चेष्टा करत असत त्यानं (शिक्षेनं) त्यांना वेढून टाकलं.

३४) त्यांना सांगितलं जाईल, तुम्ही जसं आमच्या भेटीस विसरले होते आज आम्ही तुम्हांस विसरून गेलो. तुमचं ठिकाण नरकाग्नी आहे. कोणी तुमच्या मदतीस धजावणार नाही.

३५) कारण तुम्ही अल्लाहच्या आयतींना चेष्टेनं घेतलं. या जगातील जीवनानं तुम्हांस भुरळ घातली. आज त्यांना बाहेर काढलं जाणार नाही की त्यांना अल्लाहस प्रसन्न करण्याची संधी दिली जाणार नाही.

३६) प्रशंसा अल्लाहचीच, अकाशांचा व पृथ्वीचा विधाता आणि सकल जगांचाही.

३७) त्याचाच गौरव. आकाशांमध्ये, धरतीवर, सर्वत्र तोच प्रभुत्वशाली आणि प्रतिभासंपन्न.

-------

# ४६. सूरह अल-अहकाफ

**मक्काकालीन, आयती ३५**

**पारा - २६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हामीमऽ.

२) सर्वोच्च आणि सर्वज्ञ अल्लाहकडून अवतरलेला हा ग्रंथ होय.

३) ‘आम्ही ही आकाशं आणि पृथ्वी आणि त्यामधील सर्वकाही प्रमाणबद्ध आणि एका निश्‍चित कालखंडासाठी निर्माण केली. ज्यापासून त्यांना सावध केलंय त्यास ते नाकारतात आणि त्याकडं पाठ फिरवतात.

४) त्यांना सांगा, पाहा तुम्ही अल्लाहस सोडून ज्यांचा धावा करता, मला दाखवा त्यांनी जमिनीत काय निर्माण केलं किंवा आकाशात (निर्माण करण्यात) त्यांची काही भागीदारी आहे. तुम्ही खरं असाल तर पूर्वीचा एखादा ग्रंथ माझ्याकडं आणा किंवा ज्ञानाचा काही भाग उरला असेल तर तो आणा.

५) त्यापेक्षा अधिक पथभ्रष्ट कोण जे अल्लाहस सोडून अशांचा धावा करतात जे त्यांना कयामतच्या दिवसापर्यंत प्रतिसाद देणार नाहीत आणि त्यांच्या याचनेकडं ज्यांचं लक्षही नाही.

६) जेव्हा त्यांना एकवटलं जाईल ते (उलट) त्यांचे शत्रू होतील आणि त्यांच्या उपासनेस नाकारतील.

७) त्यांना आमच्या आयती स्पष्ट करून वाचून दखवल्या जात तेव्हा नाकारणारे त्यांना सत्य (दिसून) आल्यावरसुद्धा म्हणतात, ही तर उघड जादूच.

८) त्यांचं म्हणणं काय? त्यानं स्वत: ते घडवलंय? त्यांना सांगा, जर मीच हे घडवलं असेल तर मला अल्लाहपासून वाचवण्याचं काही सामर्थ्य तुमच्यात आहे काय? तुम्ही काय बोलता ते त्यास माहीत

आहे. माझी आणि तुमची साक्ष देण्यास तो पुरेसा आहे. तो क्षमा करतो आणि कृपावंत आहे.

९) त्यांना सांगा, प्रेषितांमध्ये मी नवखा नाही. माझ्या आणि तुमच्या बाबतीत काय केलं जाईल मला ठाऊक नाही. मी तर त्याचं पालन करतो जे दिव्य-अनुभूतीद्वारे मला कळवलं गेलंय. आणि मी उघडपणे सावध करणारा आहे दुसरं काही नाही.

१०) त्यांना सांगा, जरा पाहा. जर हा (ग्रंथ) अल्लाहकडंचा असेल आणि त्यास तुम्ही नाकारलं (पण) इस्राईलच्या लोकांपैकी एकानं असाच एक ग्रंथ पाहिल्याची साक्ष देऊन त्यानं विश्वास टाकला. आणि तुम्ही उद्दाम बनून राहिला. निश्चितच अल्लाह अपराधींना मार्ग दाखवत नसतो.

११) नाकारणारे श्रद्धावंतांना म्हणतात, जर हे (धर्म) चांगले असते तर त्यांनी (ते स्वीकारण्यात) आम्हांवर मात केली नसती. त्यांनी स्वतः मार्गदर्शन घेतलं नाही म्हणून आता ते म्हणतात, हे तर जुनाट खोटं आहे.

१२) त्याच्या आधी मूसा यांचा ग्रंथ नेतृत्व आणि कृपा (म्हणून होता) आणि आता हा ग्रंथ आहे अरबी भाषेत, (त्याची) पुष्टी करतो. अत्याचारींना सावध करण्यासाठी आणि नेक आहेत त्यांना सुवृत्त देण्यासाठी.

१३) जे लोक म्हणतात, अल्लाहच आमचा विधाता आणि त्याच्याशी ठाम राहतात त्यांना काही भीती नाही की ते दुःखी होणार नाहीत.

१४) हे लोक स्वर्गाचे धनी आहेत, सदैव तिथंच राहतील. त्यांच्या (नेक) कर्मांचा मोबदला तो.

१५) आम्ही मानवास ताकीद दिली आपल्या आई-बापाशी चांगुलपणानं वागण्याची. त्याच्या आईनं त्यास धारण करण्याच्या यातना सोसल्या आणि कष्ट सोसून त्यास जन्म दिला. त्यास धारण करणं आणि दूध पाजणं हे तीस महिन्यांपर्यंत चाललं. त्याची वाढ होऊन चाळीस वर्षांनी तो पूर्ण वयात येतो तेव्हा म्हणतो, माझ्या विधात्या, मला सुबुद्धी दे तुझे आभार मानण्याची, मला आणि माझ्या आई-बापांना

तू जसं अनुग्रहीत केलं त्याबद्दल. तुझ्या प्रसन्नतेखातर मी नेक कर्म करत राहीन. माझ्या संततीससुद्धा नेक बनव. मी निश्चितच तुझ्याकडं वळतो. आणि मी आज्ञाधारकांपैकी (मुस्लिम) आहे.

१६) आम्ही अशा लोकांची भली कर्म स्वीकारतो आणि त्यांच्या दोषांकडं दुर्लक्ष करतो, हे स्वर्गाचे धनी आहेत. त्यांना दिलेलं हे वचन सत्य आहे.

१७) आणि ज्यानं आपल्या माता-पित्यास सांगितलं, तुच्छ आहात तुम्ही. माझ्या निदर्शनास हे आणून देता की मला काढलं जाईल (मेल्यानंतर). माझ्या आधी कितीतरी पिढ्या होऊन गेल्या. ते दोघे (माता-पिता) अल्लाहकडे मदत मागत (मुलास) म्हणतात, तुझा विनाश होईल. श्रद्धा धारण कर, अल्लाहचं वचन सत्य असते. त्यावर तो म्हणतो, हे काही नाही. पूर्वापार कथा आहेत.

१८) अशाच लोकांच्या बाबतीत शिक्षा सिद्ध झाली. जिन्न आणि मानवांपैकी पूर्वी होऊन गेलेल्या समूहांमध्येच ते मोडतात. निश्चितच ते अपयश ओढवून घेणारे आहेत.

१९) सर्वांना त्यांच्या कर्मांनुसार श्रेणी घालून दिल्या आहेत, त्यांच्या कर्मांचा पुरेपूर बदला देता यावा आणि कुणाशीही अन्याय होऊ नये यासाठी.

२०) ज्या दिवशी नाकारणाऱ्यांस नरकाग्नीसमोर आणलं जाईल, म्हटलं जाईल, जगातील तुमच्या आयुष्यातच आपल्या वाट्यातलं ऐश्वर्य तुम्हांस लाभलंय. तुम्ही त्याचा आनंदही लुटला. पण आज तुम्हांस अपमानजनक शिक्षेचा मोबदला मिळेल. तुम्ही धरतीवर नाहक अहंकार माजवत होता आणि तुम्ही उल्लंघन केलं म्हणून.

२१) आणि (मुहम्मद स.) आद लोकांच्या भावाचा (हूदचा) उल्लेख करा. त्यानं जेव्हा अहकाफ (वाळवंटातील टेकड्यांमधला भूप्रदेश) मध्ये लोकांना सावध केलं होतं. पण त्यांच्या आधी आणि नंतरसुद्धा ताकीद देणारे होऊन गेलेत की 'अल्लाहव्यतिरिक्त तुम्ही कुणाचीही आराधना करू नका. मला भीती वाटते, एका भयंकर दिवशीच्या शिक्षेबाबत.'

२२) ते म्हणाले, तू इथं आम्हाला आमच्या ईश्वरापासून मागं फिरवून देण्यासाठी आला काय? तू ज्याची धमकी आम्हांस देतो, ते प्रत्यक्षात आण जर तू खरा असशील तर.

२३) ते म्हणाले, त्याची माहिती तर अल्लाहपाशीच. मी तर ते पोचवतो जे मला पाठवलं गेलंय. मला तर तुम्ही अडाणी लोकं दिसता.

२४) नंतर त्यांनी पाहिलं. एक ढग त्यांच्या दऱ्या-खोऱ्यांकडं चालत येताना ते म्हणाले, हा आम्हांस पाऊस देईल. नव्हे हे तर ज्याची तुम्हांस घाई होती ते आहे- एक वादळ. ज्यामुळं दु:खद शिक्षा घडेल.

२५) तो आपल्या विधात्याच्या आज्ञेनं सर्वत्र नासधूस करून टाकील. शेवटी त्यांच्या राहत्या घरांशिवाय काहीही दिसत नव्हतं. आम्ही अपराधींना अशाच रितीनं मोबदला देत असतो.

२६) आम्ही त्यांचा जसा उद्धार केला तसा तुमचा केला नाही. आम्ही त्यांना कान, डोळं आणि हृदय (भावना) दिलं, पण त्यांना त्यांचे श्रवण, त्यांची दृष्टी आणि हृदय काही कामी आले नाही. कारण त्यांनी अल्लाहच्या आयती नाकारल्या. आणि ज्याची ते चेष्टा करीत त्यानेच त्यांना वेढून टाकलं.

२७) आम्ही तुमच्या सभोवतालच्या वस्त्या नष्ट केल्या. विविध तऱ्हेनं आम्ही त्यांना आमची संकेतं दाखवली, त्यांनी परतावं म्हणून.

२८) त्यांनी का बरं त्यांची मदत केली नाही ज्यांना त्यांनी अल्लाहशी जवळीक साधण्यासाठी अल्लाहशिवाय इतर ईश्वर घेतले होते. नव्हे त्यांनी त्यांना वाऱ्यावर सोडून दिलं. त्यांनी रचलेले ते खोटे ग्रह होते.

२९) आम्ही जिन्नांमधील एक तुकडी तुमच्याकडं वळवून आणली. ते कुरआन ऐकवू लागले तेव्हा तुमच्या पुढं उभं असताना त्यांनी एकमेकांस शांत राहण्यास सांगितलं. ते संपल्यानंतर आपल्या लोकांस सावध करण्यास निघाले

३०) नि म्हणाले, आमच्या लोकांनो, आम्ही एक ग्रंथ ऐकला मूसानंतर

अवतरलेला, जो पूर्वी जे आलं त्याची पुष्टी करतो आणि तो सत्याकडं आणि रास्त मार्गाकडं मार्गदर्शन करतो.

३१) आमच्या लोकहो! अल्लाहकडं बोलवतात त्याचं ऐका, त्यावर श्रद्धा धरा. तो तुमचं दोष क्षमा करील आणि यातनादायक शिक्षेतून तुमची सुटका करील.

३२) पण अल्लाहकडं बोलवतात त्याचं कुणी ऐकलं नाही तरी तो (अल्लाहस) पृथ्वीवर विफल करू शकणार नाही. आणि अल्लाहस सोडून कुणी त्याचा वाली नसेल. हेच लोक उघड मार्गभ्रष्टतेत असतात.

३३) तुम्ही पाहत नाही अल्लाहच ज्यांन आकाशं आणि पृथ्वी निर्माण केली त्याच्या निर्मितीमुळं तो थकला नाही. आणि तो मृतांना जीवंत उठवण्याचं सामर्थ्य बाळगतो. होय, तो प्रत्येक बाबीस समर्थ आहे.

३४) ज्या दिवशी नास्तिकांना नरकाग्नीसमक्ष उभं करण्यात येईल (विचारलं जाईल), हे सत्य नाही का? ते म्हणतील, होय, आमच्या विधात्याची शपथ! अल्लाह सांगेल, तुम्ही जे नाकारत होता त्या शिक्षेची चव घ्या.

३५) तेव्हा तुम्ही (प्रेषित) धैर्य दाखवा, जसं धैर्य दृढनिश्चियी प्रेषितांनी दाखवला होता आणि (शिक्षे)साठी घाई करू नका ज्या शिक्षेचं त्यांना वचनं दिलं गेलंय. त्यास पाहिल्यावर त्यांना वाटेल, जणू दिवसभरातून एखादा तासच ते थांबले असतील. पोचवणं तेवढं (तुमच्यापुरतं). उल्लंघन करतात त्यांच्याशिवाय इतरांना नष्ट करण्यात येणार नाही.

-------

# ४७. सूरह मुहम्मद

**मदीनाकालीन, आयती ३८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) जे लोक नाकारतात आणि अल्लाहच्या मार्गात अडथळं आणतात, त्यांचे कर्म (अल्लाहनं) निष्फळ केलं.

२) जे लोक श्रद्धा धारण करतात, नेक कर्म करतात आणि मुहम्मद (स.) यांना पाठवलंय त्यास मान्य करतात- जे त्यांच्या विधात्याकडंच सत्य आहे - त्यांच्यामधील दोष दूर केले जातील आणि त्यांच्या स्थितीत सुधारणा केली जाईल.

३) याचं कारण नाकारणारे लोक असत्याचं पालन करतात आणि श्रद्ध लोक त्यांच्या विधात्याकडच्या सत्याचं पालन करतात. अशाच प्रकारे अल्लाह लोकांस उदाहरणं देतो.

४) तुमचा युद्धात बंडखोरांशी सामना झाल्यास त्यांच्या मानेवर वार करा, त्यांना चांगल्याप्रकारे ठेचून काढल्यावर त्यांना कैदी करा. त्यानंतर औदार्य दाखवून सोडून द्या किंवा मोबदला घ्या, ते शरण येतील तोपर्यंत हा आदेश आहे. अल्लाहची इच्छा असती तर त्यानं स्वत: त्यांचा प्रतिकार केला असता. पण तो तुमची एकमेकांद्वारे परीक्षा घेतो. जे अल्लाहच्या मार्गी मारले जातात तो त्यांची कामगिरी निष्फळ होऊ देत नसतो.

५) तो त्यांना मार्गदर्शन देईल आणि त्यांच्या अवस्थेत सुधारणा करील.

६) त्यांना तो त्यांच्या परिचयाच्या स्वर्गामध्ये प्रवेश देईल.

७) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अल्लाहला मदत केली तर तो तुम्हाला मदत करील आणि तुम्हांस भक्कमपणे उभं करील.

८) ज्या लोकांनी बंड केलं ते विनाश पावतील आणि त्यानं (अल्लाहनं) त्यांची कामं फोल ठरवली.

९) याचं कारण अल्लाहनं जे पाठवलं ते त्यांनी नापसंत केलं म्हणून त्यांची कर्मं वाया गेली.

१०) त्यांनी धरतीवर संचार केला नाही? त्यांच्या पूर्वीच्या लोकांचा शेवट कसा घडला ते पाहिलं असतं. अल्लाहनंच त्यांना उद्ध्वस्त केलं. नाकारणाऱ्यांची गत त्यांच्यासारखीच होईल.

११) कारण श्रद्धावंतांचा संरक्षक तर अल्लाह आहे, पण नाकारणाऱ्यांस कुणी वाली नसतो.

१२) जे लोक श्रद्धा धारण करतात आणि नेक कर्मं करतात त्यांना अल्लाह निश्चित अशा स्वर्गांमध्ये दाखल करील ज्यांच्या खालून नद्या वाहतात. पण जे नास्तिक आहेत ते जनावरांप्रमाणं खातात आणि (जगातला) उपभोग घेतात, म्हणून त्यांचं ठिकाणही नरकाग्नीच असेल.

१३) कितीतरी वस्त्या तुमच्या वस्तीपेक्षा बलवत्तर होत्या जिथून तुम्हाला तेथील लोकांनी घालवून दिलं, जेव्हा आम्ही त्यांना नष्ट करून टाकलं. त्यांच्या मदतीस कुणी आला नाही.

१४) जो आपल्या विधात्याच्या स्पष्ट मार्गावर असतो, त्याच्यासारखा नसतो ज्यास त्याची कुकृत्यं आकर्षक करून दिलीत आणि जे आपल्या वासनांच्या आहारी जातात.

१५) सदाचारी लोकांना ज्या स्वर्गाचं अभिवचन दिलंय त्यात निर्मळ पाण्याच्या नद्या आहेत, दुधाच्या नद्या ज्यांच्या चवीत बदल होत नाही आणि मद्याच्या नद्या सेवन करणाऱ्यास आनंददायी आणि विशुद्ध मधाच्या नद्या. सर्व प्रकारची फळं आणि त्याचबरोबर त्यांच्या विधात्याकडून क्षमादान. मग अशांची तुलना त्याच्याशी करता येईल जो कायम नरकात असेल. ज्यास पिण्यासाठी उकळतं पाणी मिळेल. ज्यामुळं त्यांचे आतडे फाटून जातील.

१६) त्यांच्यामध्ये असे काही आहेत जे तुमचं (सांगणं) ऐकतात आणि तुमच्या इथून निघाल्यावर ज्ञान लाभलेल्या लोकांना विचारतात, 'काय म्हणत होते ते?' हे ते लोक ज्यांच्या हृदयांना अल्लाहनं मोहरबंद

केलं, ते आपल्या वासनांमागं जातात.

१७) ज्यांना मार्गदर्शन लाभतं ते (तो) वृद्धिंगत करतो आणि त्यांना पावित्र्य बहाल करतो.

१८) ते कयामतची वाट पाहत आहेत. अचानक ती कोसळावी, तिच्या खुणा उघड होत आहेत. आता ती येऊन ठेपल्यावर त्यांना मग कसा उपदेश घडणार!

१९) तेव्हा लक्षात ठेवा अल्लाहव्यतिरिक्त कुणी ईश्वर नाही. आपल्या चुकांची माफी मागा. तसंच श्रद्ध पुरुष आणि श्रद्ध स्त्रियांसाठीसुद्धा. तुम्ही कसं वावरत असता आणि तुमची राहती घरं कशी आहेत ते अल्लाहस ठाऊक आहे.

२०) श्रद्ध लोक म्हणतात, (युद्धाच्या बाबतीत) एखादा अध्याय (सूरह) का अवतरला नाही आणि मग जेव्हा एखादा निर्णायक असा अध्याय पाठवला जातो ज्यात युद्धाचा उल्लेख असतो तर मग तुम्ही पाहाल, ज्यांच्या मनांस विकृती जडलेली असते ते तुमच्याकडं असं पाहू लागतात जशी मृत्यूसमयी मरगळ येते, दुर्दैव हे त्यांचं.

२१) जर त्यांनी आज्ञा पाळल्या असत्या आणि न्याय्य ते म्हटलं असतं. आता प्रकरण मार्गी लागल्यानंतर असताना त्यांनी अल्लाहशी सत्यता बाळगली तर हे त्यांच्या भल्यासाठी असते.

२२) मग जर तुम्हांस सत्ता बहाल केली तर धरतीवर अनाचार माजवणार आणि आपसातील नातीगोती तोडून टाकणार?

२३) हेच लोक आहेत ज्यांचा अल्लाह धिक्कार करतो. त्यांना बहिरं केलं आणि त्यांचे डोळे आंधळे करून टाकले.

२४) नाही का मग ते कुरआनवर चिंतन करणार? त्यांच्या मनांवर कुलूपं घातलेली आहेत काय?

२५) त्यांना मार्गदर्शन स्पष्ट करून दिल्यानंतर त्यांनी पाठ फिरवली ती सैतानानं त्यांच्या कल्पना सुंदर करून दाखवल्यामुळे. तो त्यांना

दीर्घकाळ खेळवत असतो.

२६) याचं कारण असं की अल्लाहनं पाठवलेलं (मार्गदर्शन) ज्यांना पसंत नाही त्या लोकांस ते म्हणाले, काही बाबतीत आम्ही तुमंच पालन करू, पण अल्लाहस त्यांची गुपितं ठाऊक आहेत.

२७) जेव्हा दूत त्यांचे आत्मे काढून घेताना त्यांच्या चेहऱ्यांवर आणि पाठींवर मारतील तेव्हा कसं होईल!

२८) हे या कारणास्तव की त्यांनी ज्याचा अनुकरण केलं त्यामुळं त्यांनी अल्लांहस नाराज केलं आणि त्याच्या प्रसन्नतेचा मत्सर केला. म्हणून त्यांनी केलेलं कर्म वाया गेले.

२९) त्यांना काय वाटतं ज्या लोकांच्या मनांना विकृती जडलीय, (त्या मनांमधील) द्वेष तो उघडकीस आणणार नाही?

३०) आमच्या मर्जीस आलं तर आम्ही तुम्हांस त्या लोकांना दाखवून देऊ आणि तुम्ही त्यांचे चेहरे पाहून ओळखू शकता. तसंच त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीनंही तुम्ही ओळखून घ्याल. तुम्ही काय करत असता ते अल्लाहस ठाऊक असते.

३१) आम्ही तुमची परीक्षा घेणारच. तुमच्यामध्ये कोण संघर्ष करणारा आहे आणि कोण संयम दाखवणारा हे माहीत करून घेण्यासाठी. आम्ही तुमच्या हालचाली तपासून घेणारच.

३२) जे लोक नाकारतात, अल्लाहच्या मार्गी अडथळं आणतात आणि प्रेषितांचा विरोध करतात - त्यांना मार्गदर्शन स्पष्ट करून दिल्यानंतरसुद्धा - ते अल्लाहचं काहीही वाईट घडवू शकत नसतात तर अल्लाहच त्यांची कृत्यं फोल ठरवतो.

३३) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहच्या आज्ञा पाळा आणि प्रेषितांच्या आज्ञा पाळा. आपली कर्मं वाया जाऊ देऊ नका.

३४) जे लोक नाकारतात, अल्लाहच्या मार्गात अडथळं आणतात आणि नकारावस्थेत मृत्यू पावतात, त्यांना अल्लाह नक्कीच क्षमा करणार

नाही.

३५) भयभीत होऊन शांततेसाठी बोलवू नका. तुम्हीच वरचढ ठरणार आहात. अल्लाह तुमच्या सोबत आहे. तो तुमचे प्रयत्न निकामी जाऊ देणार नाही.

३६) जगातलं हे जीवन खेळ आणि करमणूक आहे. तुम्ही श्रद्धा धारण केली आणि सदाचार अंगीकारला तर तो तुम्हांस मोबदला देईल आणि तुमची मालमत्ताही मागणार नाही.

३७) पण जर त्यानं ते मागितलं आणि मागतच राहिला तर तुम्ही कंजूशी दाखवणार आणि तो तुमच्या मनातील मत्सर बाहेर काढील.

३८) तुम्हीच ते लोक, जेव्हा तुम्हांस अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यासाठी बोलविलं जातं, तुमच्यातले काही लोक ते साठवून ठेवतात. पण जे साठवून ठेवत असतात ते स्वत:शीच कंजुषपणा करतात. अल्लाह गरजमुक्त आहे, तुम्ही वंचित आहात. जर तुम्ही मागं फिरलात तर तो तुमच्या जागी दुसऱ्या समूहास उभं करील आणि ते लोक तुमच्यासारखे नसतील.

-------

# ४८. सूरह अल-फतह

**मदीनाकालीन, आयती २९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) निश्चितच आम्ही तुम्हांस विजय बहाल केला. उघड उघड विजय.

२) तुमच्यापूर्वी घडून गेलेल्या उणिवांची माफी देण्यासाठी आणि नंतर ज्या घडल्या त्याही. आणि तुमच्यावर आपला अनुग्रह परिपूर्ण करण्यासाठी, तसंच तुम्हांस रास्त मार्गाचं दर्शन घडवण्यासाठी.

३) अल्लाह तुझं सहाय्य करील भारदस्त मदतीनं.

४) तोच श्रद्धावंतांच्या मनांना समाधान देतो श्रद्धेत अधिक श्रद्धेची भर घालण्यासाठी. आकाश आणि सर्व पृथ्वीवरील लष्कर (सर्व शक्ती) अल्लाहचीच. अल्लाहच सर्वज्ञ आणि प्रतिभासंपन्न आहे.

५) श्रद्धावंत पुरुष आणि श्रद्ध स्त्रियांना अशा स्वर्गांत प्रवेश देण्यासाठी ज्यांच्या खालून नद्या वाहत असतात. ते तिथं कायम राहतील. त्यांच्यातील दोष नाहीसे करील आणि अल्लाहपाशी हे एक प्रचंड साफल्य होय.

६) आणि तो दांभिक पुरुष आणि दांभिक स्त्रिया तसंच अनेकेश्वरी पुरुष आणि अनेकेश्वरी स्त्रियांना शिक्षा देईल. जे अल्लाहच्या बाबतीत दुष्ट धारणा आणि कल्पना बाळगतात. ते वाईट अशा चक्रव्यूहात अडकले आहेत त्यांच्यावर अल्लाहचा कोप आहे. अल्लाहकडून धिक्कार आहे त्यांचा आणि त्यांच्यासाठी नरक तयार ठेवलंय, दुष्ट असं ठिकाण.

७) आकाश आणि पृथ्वीतील सर्व शक्ती अल्लाहचीच आहे. अल्लाह सर्वोच्च आणि सर्वज्ञ आहे.

८) आम्ही तुम्हांस साक्षीदार, सुवृत्त देणारा आणि सावध करणारा बनवून पाठवलं.

९) या कारणास्तव की तुम्ही अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांशी एकनिष्ठ

राहा. त्यास मदत करा. त्याचा आदर करा आणि सकाळ-संध्याकाळ त्याचं पवित्र्यगान करा.

१०) जे लोक तुम्हांस प्रतिज्ञा व्यक्त करतात ते (वास्तवात) अल्लाहशी प्रतिज्ञा व्यक्त करतात. त्यांच्या हातांवर अल्लाहचा हात आहे. ज्यानं वचनभंग केला त्यानं स्वत:शीच वचन मोंडलं आणि ज्यानं अल्लाहशी केलेल्या करारास पूर्ण केलं त्यास अल्लाह लवकरच महान असा मोबदला देईल.

११) मागं राहिलेली खेडुत अरब लोकं तुम्हांस म्हणतील, ‘आम्ही आमच्या मालमत्तेत आणि कुटुंबीयांमध्ये गुंतलेलो होतो. तुम्ही आमच्यासाठी क्षमायाचना करा.’ त्यांच्या मनांमध्ये नसतं ते आपल्या तोंडांनी म्हणत असतात. त्यांना विचारा, अल्लाहपुढं तुमच्यापैकी कुणास तरी काही अधिकार आहे? तुम्हांस काही नुकसान किंवा लाभ घडवण्याची त्यांची इच्छा असेल तर? उलट तुम्ही जे काही करत असता ते अल्लाहस ठाऊक असते.

१२) नव्हे, तुम्हांस असं वाटलं की प्रेषित आणि श्रद्ध लोक आपल्या कुटुंबीयांमध्ये कधी परतणार नाहीत. तुमच्या मनांना ही गोष्ट चांगली वाटली, पण तुमची ही कल्पना चुकीची होती म्हणून तुम्ही नष्ट होणारे लोक होता.

१३) जे अल्लाह आणि प्रेषितांशी एकनिष्ठ होत नाहीत अशा नाकारणाऱ्यांसाठी आम्ही नरकाग्नी तयार ठेवलाय.

१४) आकाशं आणि पृथ्वीचं अधिराज्य अल्लाहचंच. आपल्या इच्छेनुसार कुणास क्षमा करतो तर इच्छेनुसार कुणास शिक्षा देतो. पण अल्लाह अतिशय क्षमाशाली आणि दयावंत आहे.

१५) तुम्ही युद्धलाभ मिळवण्यासाठी (खैबरच्या युद्धाप्रसंगी) जेव्हा कूच करता तेव्हा जे मागं राहणारे लोक होते तुम्हांस म्हणतील, आम्हाला परवानगी द्या, आम्हीही तुमच्या मागं येतो. त्यांना अल्लाहचा आदेश बदलायचाय. त्यांना सांगा, ‘तुम्ही आमच्या मागं येता कामा नये. हे

अल्लाहनं आगाऊच सांगून ठेवलंय.' ते म्हणतील, तुम्हांस आमचा हेवा वाटतो. त्यांना काहीही समजत नाही.

१६) मागं राहणाऱ्या खेडुत अरबांना सांगा, तुम्हांस लवकरच एक युद्धज्वर समूहाविरूद्ध बोलवला जाईल. तुम्ही त्याच्याशी युद्ध करत राहा किंवा ते शरण येतील. तुम्ही जर आज्ञांचं पालन केलं तर तुम्हांस अल्लाह उत्तम रितीनं मोबदला देईल. पण जर तुम्ही पाठ फिरवली जसे तुम्ही पूर्वी माघार घेतली होती, तेव्हा अल्लाह तुम्हांस दु:खदायक शिक्षा देईल.

१७) पण जे अंध आहेत, त्यांचा काही दोष नाही, तसंच लुळेपांगळे आहेत त्यांचाही काही दोष नाही अथवा जे आजारी आहेत त्यांचादेखील काही दोष नाही. जे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञा पाळतात त्यांना असे स्वर्ग आहेत ज्यांच्या खालून नद्या वाहतात. आणि पाठ फिरवतो त्यास तो दु:खदायक शिक्षा देईल.

१८) ज्या श्रद्धावंतांनी झाडाखाली तुमच्याशी (एकनिष्ठतेची) शपथ घेतली, अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न झाला. त्यांच्या मनांमध्ये काय आहे ते त्यास ठाऊक होतं. म्हणून त्यानं त्यांना मन:शांती दिली आणि त्यांना जवळच विजय मिळवून दिला.

१९) आणि त्यांना खूप मोठा युद्धलाभही मिळवून दिला. अल्लाह प्रभुत्वशाली आणि प्रतिभासंपन्न आहे.

२०) अल्लाहनं आणखीही खूप अशा लाभांचं तुम्हांस वचन दिलंय. जे तुम्ही मिळवाल. अल्लाहनं तात्काळ तुम्हांस हे देऊन टाकलंय. आणि आता तुमच्याविरूद्ध लोक हात उगारणार नाहीत. श्रद्धावंतांसाठी एक संकेत म्हणून आणि रास्त मार्गाचं तुम्हांस दर्शन घडवलं.

२१) आणखीनही एक (विजय) त्यावर तुम्ही समर्थ नाही. पण अल्लाहनं त्यास घेरून ठेवलंय. अल्लाह प्रत्येक बाबतीस समर्थ आहे.

२२) जर ते नाकारणारे लोक तुमच्याशी लढले असते तर खात्रीनं त्यांनी पाठ दाखवली असती. त्यांचं मग कुणी रक्षण केलं नसतं की कुणी मदतीस

लाभला असता.

२३) हीच अल्लाहची रीत पूर्वीपासून चालत आलेली. अल्लाहच्या पद्धतीत तुम्हांस तफावत आढळणार नाही.

२४) तोच ज्यानं त्याचे हात तुम्हांपासून रोखून ठेवलेत आणि त्याच्यानंतर मक्केच्या दरीत तुमचे हात त्यांच्यापासून रोखून धरले, तुम्हांस त्यांच्यावर विजय मिळवून दिल्यानंतर, तुम्ही जे करता ते अल्लाहस दिसत आहे.

२५) हेच ते लोक ज्यांनी बंड केलं आणि मस्जिदे हराम (काबागृह) कडं जाण्यास अडथळा आणला, तसंच तिथं थांबलेल्या कुरबानीच्या जनावरांनाही बळीच्या ठिकाणी पोचू दिलं नाही. आणि (मक्केतील) श्रद्ध पुरुष आणि स्त्रियांविषयी माहिती नसल्यामुळं तुम्ही त्यांना चिरडून टाकण्याची भीती होती. नसता अजाणतेपणी तुम्ही स्वत:वर आरोप ओढवून घेतला असता आणि अल्लाह आपल्या इच्छेनुसार कुणाला आपल्या दयेत सामावून घेतलं असतं तर. पण जर ते (श्रद्धावंत पुरुष व स्त्रिया) वेगळे झाले असते तर आम्ही नाकारणाऱ्यांना यातनामय शिक्षा दिली असती.

२६) जेव्हा नाकारणारे अज्ञान- काळातील दुराभिमानानुसार आपल्या दुराभिमानावर अडून बसले, तेव्हा अल्लाहनं आपल्या प्रेषितांना आणि श्रद्धावंतांना मन:शांती दिली आणि त्यांना सदाचारास स्वत:ला वाहून घेण्यास लावलं. कारण तेच त्यासाठी योग्य आणि पात्र होते. अल्लाहला प्रत्येक बाबी अवगत असतात.

२७) अल्लाहनं आपल्या प्रेषितांचं स्वप्न साकारलं. तुम्ही मस्जिदे हराम (काबागृह) मध्ये प्रवेश घेणार. अल्लाहनं इच्छिलं तर - शांततापूर्ण रितीनं, डोकी मुंडन केलेली, केस कमी केलेले, कोणतंही भय नसताना, तुम्हांस ठाऊक नाही ते त्यास ठाऊक असतं. त्यानं तुम्हांस त्याआधी (मक्काविजयाआधी) एक विजय मिळवून दिला.

२८) तोच ज्यानं आपले प्रेषित पाठवले मार्गदर्शन आणि सत्यधर्म देऊन. सर्व

धर्मावर त्याचे प्रभुत्व बहाल करण्यासाठी आणि अल्लाह साक्षीसाठी पुरेसा आहे.

२९) अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) आणि जे लोक त्यांच्यासोबत आहेत ते नाकारणाऱ्यांविरूद्ध (शिस्त पाळण्यात) खंबीर असतात तर एकमेकांशी दयेनं वागतात, तुम्ही त्यांना नम्रतेनं नतमस्तक होता. अल्लाहची संपन्नता आणि त्याच्या प्रसन्नतेच्या शोधात असतात त्यांच्या चेहऱ्यावर (कपाळांवर) त्यांच्या नतमस्तकतेचा ठसा आहे. 'तौरह'मध्येही यासारखाच उल्लेख आहे आणि 'इंजील'मध्येही याच्या सारखाच. त्यांची उपमा म्हणजे शेतीसारखी, जसा अंकुर निघतो नंतर त्यास बळकट केलं. नंतर जाड झालं आणि अखेरीस आपल्या देठावर उभा राहतो. तेव्हा शेतकरी आनंदित होतो. आणि नाकारणारे त्यामुळं रागावून जातात. (पण) अल्लाहनं श्रद्धावंत आणि सत्कर्मी लोकांना क्षमा आणि एका महान मोबदल्याचं आश्वासन दिलंय.

-------

# ४९. सूरह अल-हुजुरात

**मदीनाकालीन, आयती १८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) श्रद्धावंत लोकहो! अल्लाह आणि त्याच्या प्रेषितापुढं जाऊ नका, अल्लाहची भीती बाळगा, अल्लाह ऐकतो आणि जाणतो.

२) श्रद्धावंत लोकहो! आपला आवाज प्रेषिताच्या आवाजापेक्षा उंच करू नका. अथवा त्यांच्याशी मोठ्यानं बोलू नका जसं तुम्ही एकमेकांत मोठ्यानं बोलत असता. तुम्हांस नकळत तुमची कर्मं वाया जाऊ नयेत.

३) जे लोक प्रेषितांच्या हुजुरात आपला आवाज कमी ठेवतात त्यांच्या मनांना अल्लाहनं पावित्र्याबाबत पडताळून घेतलंय त्यांना क्षमा आहे आणि महान मोबदलाही.

४) जे लोक आपणांस माजघराबाहेरून हाक मारतात, त्यांच्यातील अनेकांना समजत नाही.

५) तुम्ही स्वत:हून बाहेर पडेपर्यंत त्यांनी संयम राखला असता तर त्यांच्यासाठी उचित झालं असतं. पण अल्लाह क्षमा करत असतो आणि दया दाखवतो.

६) श्रद्धावंत लोकहो! एखाद्या दुष्ट प्रवृत्तीच्या माणसानं तुमच्याकडं एखादी बातमी आणली असता तिची चौकशी करून घ्या, नाहीतर नकळत तुम्ही लोकांना अडचणीत टाकाल आणि नंतर आपल्याकडून जे घडून गेलं त्यावर पश्चात्ताप करणं भाग पडेल.

७) आणि तुम्हांमध्ये अल्लाहचे प्रेषित आहेत ते लक्षात ठेवा. जर प्रत्येक बाबतीत ते तुमचं ऐकत राहिले तर तुम्ही अडचणीत याल. अल्लाहनं श्रद्धेविषयी तुमच्यात आपुलकी निर्माण केली आणि तुमच्या मनांना त्याचं आकर्षण दिलं. आणि नास्तिकपणा बाळगणे, पाप करणे व अवज्ञा करणे तुम्हांस पसंत नाही, हेच लोक सन्मार्गी आहेत.

८) ही अल्लाहची कृपा आणि अनुग्रह आहे. अल्लाह सर्वज्ञ आणि प्रतिभासंपन्न आहे.

९) जर श्रद्धावंतांचे दोन गट तंट्यात पडले तर परस्परांमध्ये समेट घडवून आणा. पैकी एका गटानं दुसऱ्या गटाशी अतिरेक केला तर अतिरेक करणाऱ्याशी लढा. त्यानं अल्लाहची आज्ञा पाळेपर्यंत. नंतर तो अल्लाहच्या आज्ञांकडं वळला तर तुम्ही त्याच्यामध्ये न्यायानं समेट घडवा. अल्लाहस न्यायानं वागणारे पसंत असतात.

१०) सर्व श्रद्धावंत एकमेकांचे बांधव आहेत. तेव्हा आपल्या बांधवांमध्ये समेट घडवा आणि अल्लाहचं भय राखा, तुम्हांस कृपा लाभेल.

११) श्रद्धावंत लोकहो! आपसात एकमेकांची टिंगल-टवाळी करू नका, हे त्यांच्यापेक्षा अधिक चांगले असतील तर त्यात नवल नाही. तसंच स्त्रियांनीही इतर स्त्रियांचं हसं करू नये, त्या त्यांच्यापेक्षा अधिक भल्या असतील. तसंच एकमेकांना बदनाम करू नका की एकमेकांना वाईट नावानं हाक मारू नका. श्रद्धा धारण केल्यानंतर अशी कामं करणं वाईट आहे. जे लोक अशी कृत्यं टाळत नाहीत ते अत्याचारी आहेत.

१२) श्रद्धावंत लोकहो! फार शंका घेणं टाळा, काही शंका पाप ठरतात. तसंच एकमेकांविषयी हेरगिरी नका. आणि एकमेकांच्या पाठीमागं बोलत जाऊ नका, तुमच्यापैकी कुणास आपल्या मृत भावाचं मांस खाणं आवडंल? तुम्हांस ते मुळीच आवडणार नाही. अल्लाहशी भीत राहा. अल्लाह पश्चात्तापाचा स्वीकार करतो आणि दया दाखवतो.

१३) लोकहो! अल्लाहनं तुम्हांस एक पुरुष आणि एका स्त्रीपासून जन्माला घातलं आणि तुमच्यात जमाती आणि टोळ्या बनवल्या, तुम्हांस ओळखता यावं म्हणून. पण अल्लाहपाशी तर तुमच्यापैकी प्रतिष्ठित तोच, जो सदाचारी असेल. अल्लाह सर्वज्ञ आणि सर्वपरिचित आहे.

१४) खेडूत अरब लोक म्हणतात, ''आम्ही श्रद्धा धारण करतो.'' त्यांना सांगा, 'श्रद्धा धारण केली' असं म्हणू नका तर 'शरण आलो' (इस्लाम स्वीकारला) असं म्हणा. कारण तुमच्या मनांमध्ये अजूनही श्रद्धा पोचली

नाही. तुम्ही जर अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचं पालन केलं तर तो तुमच्या कर्तृत्वांना कमी लेखणार नाही. अल्लाह क्षमा करणारा आणि दया दाखवणारा आहे.

१५) श्रद्धावंत लोक तर अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताशी एकनिष्ठ असतात आणि त्याबाबतीत साशंक नसतात. आणि आपल्या वित्त आणि जिवांनिशी अल्लाहच्या मार्गात संघर्ष करतात, हेच लोक प्रामाणिक असतात.

१६) त्यांना विचारा, तुम्ही अल्लाहसमोर आपल्या धर्माचा देखावा मांडता? अल्लाहस तर आकाश आणि पृथ्वीमधील सर्व प्रकारच्या गोष्टींची जाण आहे. आणि त्यास प्रत्येक बाबी अवगत असतात.

१७) ते इस्लाम धारण करून तुमच्यावर उपकार करतात? त्यांना सांगा, तुम्ही इस्लामचा स्वीकार करून माझ्यावर उपकार करू नका. नव्हं अल्लाहनं तुम्हांवर उपकार केलं, तुम्हाला श्रद्धेचा मार्ग दाखवून, जर तुम्ही सत्य असाल तर.

१८) अल्लाहस तर आकाश आणि पृथ्वीची सारी गुपितं माहीत आहेत आणि तुम्ही काय करत असता तेही अल्लाह पाहतो आहे.

-------

# ५०. सूरह क़ाफ

**मक्काकालीन, आयती ४५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) क़ाफ, शपथ वैभवसंपन्न कुरआनची.

२) त्यांच्याकडं त्यांना ताकीद देण्यास त्यांच्यामधूनच एक व्यक्ती आल्याचं त्यांना नवल वाटते. नाकारणारे म्हणतात, अजबच ही गोष्ट.

३) आम्ही मरून माती होऊन गेल्यावर (आम्हांस उठवलं जाणार) हे पुनरागमन (समजण्या) पलीकडची गोष्ट होय.

४) ही जमीन त्यांना (कशा प्रकारे) नष्ट करते ते आम्हांस ठाऊक आहे ते आमच्याकडील मूळ ग्रंथात नोंदवलंय.

५) नव्हं, ते त्यांच्याकडं आले असता त्यांनी सत्याशी लबाडी केली म्हणून ते गोंधळून गेलेत.

६) ते पाहत नाहीत त्यांच्यावरील आकाशाकडं, कसं आम्ही ते बनवलं आणि कसं त्यास सजवलं आणि त्यामध्ये काही त्रुटी नाही.

७) आम्ही धरती विस्तारली आणि तीमध्ये पर्वतं उभी केली आणि तिच्यात सर्व प्रकारच्या सुंदर वनस्पती उगवल्या.

८) प्रत्येक कळणाऱ्या भक्तास डोळं उघडण्यासाठी आणि त्यापासून बोध घेण्यासाठी.

९) आम्ही आकाशातून पाऊस पाठवतो समृद्ध असा. त्याच्या माध्यमानं बागा आणि धान्य पिकवतो.

१०) आणि उंच उंच खजुरीची झाडं थरावर थर असलेले फळांचे घड

११) आमच्या भक्तांसाठी उपजीविका म्हणून. आम्ही त्यापासून मृतावस्थेतील जमिनीस सजीव करतो. अशाच प्रकारे (कबरीतून) बाहेर काढले जाणार.

१२) त्यांच्याआधी नूहच्या समूहांनी आणि अर्र-रासच्या लोकांनी आणि समुदांनी नाकारलं होतं.

१३) तसंच आद, फिरऔन आणि लूत यांच्या लोकांनीसुद्धा.

१४) आणि ऐकाच्या लोकांनी आणि तुब्बा समूहानंही. सर्वांनी प्रेषितांस नाकारल्यानं माझ्या शिक्षेस भाग पाडले.

१५) आम्ही पहिल्यांदा निर्मिती करून थकून गेलो? नव्हं. तेच संशयात पडलेत. नव्यानं निर्माण करण्याबाबत.

१६) आम्ही मानवास निर्माण केलं आणि त्याच्या मनामध्ये काय काय विचार येत असतात ते आम्हांस ठाऊक आहे. कारण आम्ही त्याच्या कंठाच्या शिरेपेक्षाही जवळ आहोत.

१७) तो जे काही करतो त्याची नोंद घेण्यास उजव्या आणि डाव्या बाजूस बसलेत.

१८) त्याच्या तोंडातून काही निघत नाही ज्याची नोंद दूतांकडून घेतली जात नसावी.

१९) आणि मृत्यूच्या खऱ्याखुऱ्या वेदना जाणवू लागल्या. हेच ते ज्यापासून तू पळत होता.

२०) जेव्हा शंख फुंकलं गेलं, हाच तो दिवस ज्याची भीती दाखवली होती.

२१) आणि प्रत्येकजण हजर होईल. त्यास हाकून आणणारा आणि त्याची (त्याच्या कर्मांची) साक्ष देणाऱ्यासहित.

२२) याकडं लक्ष दिलं नव्हतं, आता आम्ही तो पडदा काढून टाकला, आज तुझी दृष्टी लख्ख असेल.

२३) त्याच्यासोबत असलेला (दूत) म्हणेल, माझ्याकडं (त्याच्या कर्मांची नोंद) होती ती हजर आहे.

२४) (आदेश दिला जाईल,) सर्व नाकारणाऱ्या बंडखोरांस नरकात टाकून द्या.

२५) भल्यास मनाई करत असत, मर्यादेबाहेर गेलेले संदेह निर्माण करत होता.

२६) ज्यानं अल्लाहबरोबर इतर ईश्वर करून ठेवले होते त्यास कठोर शिक्षेत टाकून द्या.

२७) त्याचा सोबती (सैतान) म्हणेल, माझ्या विधात्या! त्यास उल्लंघन करण्यास मी प्रवृत्त केलं नव्हतं. तोच भरकटून लांब निघून गेलेला होता.

२८) सांगितलं जाईल, माझ्यासमोर भांडू नका. मी तर तुम्हांस आगाऊ सावध केलं होतं.

२९) मी बोललेलं (निर्णय) बदलत नसतो. मी भक्तांशी अन्याय करत नसतो.

३०) ज्या दिवशी आम्ही नरकास विचारू, ''तू भरून गेलीस का?'' ती म्हणेल, ''आणखीन आहेत का?''

३१) आणि स्वर्गास सदाचारी लोकांजवळ आणलं जाईल. आता ती लांब नसेल.

३२) आम्ही प्रत्येक (अल्लाहकडं) वळणाऱ्यास आणि काळजी वाहणाऱ्यास याचंच वचन दिलं होतं.

३३) जो परम कृपावंतास न पाहता भित असे आणि आपल्या अंत:करणापासून वळला असेल.

३४) यामध्ये सुखरूप दाखल व्हा, निरंतर जीवनाचा हा दिवस.

३५) तिथं त्यांना जे काही हवं ते असेल. आणि आमच्यापासून लाभेल ते वेगळंच.

३६) आम्ही त्यांच्यापूर्वी कितीतरी समूहांना नष्ट केलं ज्यांचा आवाका त्यांच्यापेक्षा मोठा होता आणि ते आपल्या संरक्षणार्थ धरतीवर सैरावैरा पळू लागले. पळून जाण्यास कुठं जागा आहे.

३७) यामध्ये (बरंच काही) बोध घेण्यासारखं आहे, ज्यास हृदय आहे आणि लक्षपूर्वक ऐकत असतो.

३८) आम्ही ही आकाशं, पृथ्वी आणि दोहोंमधील सर्वकाही सहा दिवसांत निर्माण केलं. आणि आम्हांस थकवा स्पर्शूनही गेला नाही.

३९) तेव्हा ते जे म्हणतात, ते सहन करा, आपल्या विधात्याचं पावित्र्यगान करा, सूर्योदयापूर्वी आणि तो मावळण्यापूर्वी.

४०) आणि रात्रीच्या वेळी आणि नतमस्तक झाल्यानंतरही त्याचं पावित्र्यगाण करा.

४१) आणि ऐकून घ्या, ज्या दिवशी हाक घालणारा (तुमच्या) जवळूनच हाक देईल.

४२) ज्या दिवशी ते आरोळीस वास्तवात ऐकून घेतील, तोच दिवस असेल (कबरीतून) बाहेर पडण्याचा.

४३) आम्हीच जीवन देतो आणि मरणही आणि आमच्यापाशीच परतणं आहे.

४४) ज्या दिवशी ही जमीन त्याच्यावरून (मेलेल्यावरून) फाटून जाईल आणि ते पळत सुटतील, त्यांना एकवटणं आम्हांस सोपं आहे.

४५) ते बोलतात ते आम्हांस (चांगलं) ठाऊक आहे. तुम्ही त्यांच्यावर दबाव आणू शकत नाही. त्यांना कुरआनद्वारे उपदेश द्या, जे मी दिलेल्या ताकीदीस भितात अशांना.

-------

# ५१. सूरह अज़-ज़ारियात

**मक्काकालीन, आयती ६०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) (धूळ) वाहून नेणाऱ्याची (वाऱ्यांची) शपथ!

२) मग (ढगांचं) ओझं उचलून धरतात (त्यांची)

३) आणि मग हळूवार वाहत राहतात (त्या नौकांची).

४) मग आज्ञेनुसार वाटून देणाऱ्या (दूतांची).

५) तुम्हांस दिलं जातं ते वचन खरं आहे.

६) न्यायनिवाडा घडणारच.

७) आकाशामधील अनेक मार्गांची शपथ!

८) तुम्ही एका विवादित गोष्टीत अडकून पडलात.

९) जो स्वत:ची फसवणूक करून घेतो तोच यापासून (कुरआन) विमुख होतो.

१०) तर्क लावणारे विनाश पावले,

११) काळजी नसल्यानं जे विसरून गेलेत.

१२) (म्हणून) ते विचारतात, न्यायनिवाड्याचा दिवस कधी (उगवेल)?

१३) ज्या दिवशी त्यांना अग्नीवर भाजलं जाईल,

१४) आता आपल्या उपद्रवाची गोडी घ्या. यासाठीच तुम्ही घाई करत होता.

१५) (पण) सदाचारी लोक बागा आणि झऱ्यांकाठी असतील.

१६) त्यांच्या विधात्यानं त्यांना देऊ केलं ते घेत असतील, कारण पूर्वी ते भलेपणानं वागले म्हणून.

१७) ते रात्री थोडीशीच झोप घेत असत

१८) आणि पहाटे क्षमायाचना करत.

१९) आणि आपल्या संपत्ती आणि मालमत्तेत त्यांनी मागणाऱ्यांचे व वंचितांचे हक्क राखून ठेवले होते.

२०) विश्वासूंसाठी धरतीमध्ये संकेतं आहेत.

२१) तसंच तुमच्या स्वत:मध्येसुद्धा, दिसत नाहीत तुम्हांस?

२२) आकाशात तुमचा निर्वाह आहे ज्याचं आश्वासन दिलं जातं.

२३) आकाश आणि पृथ्वीच्या विधात्याची शपथ! हे (कुरआन) सत्य आहे, अगदी तुम्हांस बोलता येतं (ते जसं सत्य आहे) त्याचप्रमाणं.

२४) तुम्हांस इब्राहीम यांच्या सन्माननीय पाहुण्याची गोष्ट पोचली?

२५) त्यांनी त्यांच्याकडं येताना त्यांना 'सलाम' म्हटलं, त्यांनीही सलाम म्हटलं. अनोळखी लोक होते ते.

२६) ते तत्परतेनं घरात गेले आणि (भाजलेलं) लठ्ठ वासरू आणून

२७) त्यांच्यासमोर ठेवलं आणि विचारलं, आपण खाणार नाही का?

२८) ते त्यांना घाबरले, (त्यांनी खाल्लं नाही म्हणून) ते म्हणाले, घाबरू नका. त्यांनी त्यांना एक समंजस अशा पुत्रलाभाची खूशखबर दिली.

२९) त्यांची पत्नी समोर आली, आश्चर्यानं आपल्या कपाळावर हात ठेवीत म्हणाली, (मी) म्हातारी आणि (त्यावर) 'वांझ'.

३०) ते म्हणाले, असेच, तुमच्या विधात्याचं हे म्हणणं आहे. तो प्रतिभासंपन्न आणि सर्वज्ञ आहे.

**पारा - २७**

३१) अहो देवदूत! तुमचं म्हणणं तरी काय?

३२) ते म्हणाले, आम्हांस अपराधी लोकांकडं पाठवण्यात आलंय

३३) त्यांच्यावर माती-दगडांचा मारा करण्यास.

३४) ज्यांची तुमच्या विधात्यापाशी उल्लंघनकारी असल्याची शहानिशा केलीय.

३५) श्रद्धावंतांपैकी जे इथं होते त्यांना (इतरत्र) हलवलं.

३६) पण आम्हांस फक्त एका घराशिवाय (लूत यांच्या) इतर कोणा आज्ञाधारकाचं (मुस्लिम) घर आढळलं नाही.

३७) आम्ही तेथील लोकांसाठी जे दु:खद शिक्षेस घाबरून जातात एक संकेत सोडलाय.

३८) तसेच मूसामध्ये, आम्ही त्यांना उघड अधिकार देऊन फिरऔनकडं पाठवलं

३९) तेव्हा त्यानं (फिरऔननं) आपल्या बळाच्या जोरावर पाठ वळवली आणि म्हणाला, हा तर जादूगार आहे झपाटलेला.

४०) मग आम्ही त्यास त्याच्या लवाजम्यासहित धरलं आणि समुद्रात टाकून दिलं धिक्कारून.

४१) आणि आदचेही (संकेत) आम्ही त्यांच्यावर संहारकारक वादळ पाठवलं.

४२) ज्या काही वस्तू त्याच्या वाटेत आल्या त्या सर्वांना त्यानं कुजलेल्या हाडांप्रमाणं जर्जर करून सोडलं.

४३) आणि समूदांना सांगण्यात आलं, काही काळ सुखोपभोग घ्या,

४४) पण त्यांनी आपल्या विधात्याची अवज्ञा केली आणि पाहता पाहता त्यांना एका भयंकर गर्जनेनं गाठलं.

४५) नंतर त्यांना उभं राहताही येईना की स्वत:स सावरताही येत नव्हतं.

४६) आणि त्यांच्या आधी नूहच्या लोकांनाही (नष्ट केलं) कारण तेही अवज्ञाकारी होते.

४७) आम्ही आमच्या शक्तीच्या जोरावर हे अवकाश उभारलं आणि आम्हीच विस्तारत आहोत.

४८) आम्ही पृथ्वीस पसरवून दिलं, किती सरस ती पसरवणारे.

४९) आम्ही प्रत्येक वस्तू जोडीने निर्माण केल्या, तुम्ही त्याकडं लक्ष पुरवाल म्हणून.

५०) तेव्हा अल्लाहकडं धाव घ्या, मी त्याच्याकडून तुम्हांस उघड ताकीद देतो.

५१) अल्लाहबरोबर इतर कोणास उपास्य बनवू नका. मी स्पष्टपणे तुम्हांस सावध करतो.

५२) तसंच त्यांच्यापूर्वीच्या लोकांकडं असा कुणी प्रेषित आलेला नाही ज्यास त्यांनी जादूगर, झपाटलेला म्हटलं नसेल.

५३) त्यांनी एकमेकांस वारसाच तर दिलेला नाही? नव्हं ते बंडखोर लोक आहेत.

५४) तुम्ही त्यांच्याकडं पाठ फिरवाल तर यात तुमचा काही दोष नाही.

५५) त्यांना शिकवण द्या. श्रद्धावंतांना शिकवणीचा लाभच होतो.

५६) मी जिन्न आणि मानवांना माझ्या भक्तीसाठीच निर्माण केलं.

५७) मी (यासाठी) त्यांच्याकडून काही उपजीविका मागत नाही की त्यांनी मला जेवू घालावं अशीही माझी इच्छा नाही.

५८) कारण अल्लाहच फक्त निर्वाह पुरवतो, तोच शक्तिशाली आणि प्रचंड सामर्थ्यवान आहे.

५९) ज्या लोकांनी अत्याचार केला त्यांनाही तीच शिक्षा भोगावी लागेल जी त्यांच्या साथीदारांनी भोगली. त्यांनी घाई करू नये.

६०) तेव्हा ज्या दिवसाचं त्यांना वचन देण्यात आलंय त्यास ज्यांनी नाकारलं त्यांचा धिक्कार आहे.

-------

# ५२. सूरह अत-तूर

**मक्काकालीन, आयती ४९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) तूर (पर्वताची) शपथ!

२) आणि लिखित ग्रंथाची

३) पानांवर विस्तृतपणे,

४) सदैव गजबज असणाऱ्या गृहाची (काबागृहाची),

५) उत्तुंग उभारलेल्या छताची आणि

६) उसळत्या समुद्राची!

७) तुझ्या विधात्याचा प्रकोप घडणारच.

८) कुणीही त्यास टाळू शकणार नाही.

९) ज्या दिवशी अवघं अवकाश डगमगू लागेल भयंकर उलथापालथीनं,

१०) आणि ज्या दिवशी पर्वतं इकडं तिकडं हलू लागतील.

११) जे (सत्यास) नाकारतात ते त्या दिवशी विनाश पावतील,

१२) जे वायफळ गोष्टींचा खेळ मांडून राहिलेत.

१३) त्या दिवशी त्यांना नरकाग्नीकडं फरफटत नेलं जाईल.

१४) हीच ती नरकाग्नी ज्यास तुम्ही खोटं ठरवत होता.

१५) हीदेखील जादू आहे का? तुम्हांस दिसत नाही?

१६) आता तिलाच तोंड द्या, सहन करा अथवा करू नका, तुमच्यासाठी सारखंच आहे. तुम्ही केलं-सवरलेलं त्याचंच हे फळ भोगायचंय.

१७) नेक कर्मी मात्र बागांमध्ये सुखासमाधानानं असतील.

१८) त्यांच्या विधात्यानं त्यांना जे बहाल केलं आणि त्यांना नरकाच्या

शिक्षेतून वाचवलं त्याचा आनंद उपभोगतील.

१९) खा आणि प्या सुखासमाधानानं. तुमच्या कामगिरीचा मोबदला म्हणून.

२०) ते आसनांवर समोरासमोर आराम करतील आणि आम्ही त्यांना सुंदर डोळ्यांचे जोडीदार देऊ.

२१) जे लोक श्रद्धा धारण करतात आणि ज्यांचे कुटुंबीय त्यांचं अनुसरण करून श्रद्धा धारण करतात, आम्ही अशांना संततीसह एकत्र केलं. आम्ही त्यांच्या (उत्तम) कर्मांमधून काही कपात केली नाही, प्रत्येक मनुष्य त्यानं मिळवलंय त्यास तारण आहे.

२२) आम्ही त्यांना हवी असतील ती फळं आणि मांसानं त्यांना मेजवानी देऊ.

२३) तिथं ते एकमेकांचे प्याले घेत राहतील, ज्यात काही गैर नसेल की कोणता दोष नसेल.

२४) त्यांच्या सेवेत तरुण मुलं असतील, मोत्यांप्रमाणं जतन केलेले.

२५) ते एकमेकांजवळ वळत असतील विचारपूस करण्यासाठी.

२६) म्हणतील, पूर्वी आम्हांस आमच्या कुटुंबीयांच्या सान्निध्यात असताना चिंता लागून असायची,

२७) पण अल्लाहनं आम्हावर उपकार केला आणि आम्हांस होरपळून टाकणाऱ्या शिक्षेतून वाचवलं.

२८) आम्ही पूर्वीपासूनच त्याचा धावा करत होतो, तोच उदार आणि दयावंत आहे.

२९) तेव्हा तुम्ही त्यांना शिकवण देत राहा, तुम्ही तुमच्या विधात्याच्या औदार्यानं मांत्रिक नाही की झपाटलेलेही नाहीत.

३०) किंवा ते म्हणतात, कवी आहे? ज्याच्यासंबंधी आम्ही वाईट काळ येण्याची वाट पाहतो.

३१) त्यांना सांगा, तुम्ही वाट पाहत राहा, तुमच्याबरोबर मीदेखील वाट

पाहतोय.

३२) त्यांची बुद्धी त्यांना अशाच गोष्टी करावयास भाग पाडते किंवा ही मर्यादेबाहेर गेलेले लोक आहेत.

३३) ते काय म्हणतात? त्यांनी (मुहम्मद स. यांनी) हे (कुरआन) घडलंय? नव्हे ते मान्य करत नाहीत.

३४) जर ते खरे असतील तर त्यांनी अशासारखं कथन निर्मू देत.

३५) ते स्वत:च जन्माला आलेत निर्मात्याविना किंवा ते स्वत:च निर्माण करणारे आहेत.

३६) का त्यांनी अवकाश आणि पृथ्वीच निर्माण केलीय? नव्हं त्यांना विश्वास नाही.

३७) तुझ्या विधात्याचे खजिने त्यांच्यापाशी आहेत की ते कारभारी आहेत.

३८) त्याच्याकडं (आकाशाकडं जाण्यास) एखादी शिडी आहे? जिच्यावर चढून ते ऐकत असतात तेव्हा त्यांच्यातील ऐकणाऱ्यांना एखादा स्पष्ट पुरावा आणून दाखववावा.

३९) त्याच्यासाठी फक्त मुली आणि तुमच्यासाठी मुलं?

४०) की तुम्ही त्यांना काही वेतन मागता ज्याच्या ओझ्यानं ते दबून जातात.

४१) त्यांच्याजवळ काही अदृश्य आहे आणि ते लिहून ठेवताहेत.

४२) ते तुमच्याविरूद्ध कट योजत आहेत? तेव्हा जे त्यास नकार देताहेत ते स्वत:च त्या कटात गुंतले जातील.

४३) त्यांना अल्लाहव्यतिरिक्त कुणी ईश्वर आहे? अल्लाह पवित्र आहे ते ज्यास भागीदार ठरवतात त्यापासून.

४४) त्यांना आकाशाचा एखादा तुकडा कोसळताना जरी दिसला तरी ते म्हणतील, हा तर ढग आहे.

४५) त्यांना सोडून द्या त्या दिवसास तोंड देण्यासाठी जेव्हा ते अवाक् होऊन

जातील.

४६) ज्या दिवशी त्यांचे कट त्यांना काहीएक उपयोगी पडणार नाहीत आणि त्यांना मदतही मिळणार नाही.

४७) जे लोक अत्याचार करतात त्यांना याव्यतिरिक्त आणखीही शिक्षा घडेल, पण अनेकांना ते कळत नाही.

४८) तुम्ही आपल्या विधात्याच्या हुकुमाशी ठाम राहा, तुम्ही आमच्या नजरेत आहात. उठल्यावर (जागे झाल्यावर) आपल्या विधात्याचे पावित्र्यगान करा.

४९) तसंच रात्रीचा काही भाग, त्याची प्रशंसा करा. आणि (पहाटे) ज्या वेळी तारे मावळतात.

-------

# ५३. सूरह अन-नज्म

**मक्काकालीन, आयती ६२**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) मावळत्या ताऱ्याची शपथ!

२) तुमचा सोबती भरकटलेला नाही की बहकलेलाही नाही.

३) अथवा तो आपल्या आकांक्षाही सांगून दाखवत नाही.

४) ती तर फक्त पाठवलेली दिव्य अनुभूती आहे.

५) त्यांना ते महान शक्तीपैकी बाळगणाऱ्यानं (दूत) शिकवलंय.

६) जबर शक्तीनिशी समोरासमोर येऊन.

७) क्षितिजाच्या उत्तुंग स्थानी असलेला

८) तो जवळ आला, आणखीन जवळ.

९) दोन बाणांच्या अंतरावर किंवा त्यापेक्षाही कमीच.

१०) त्यानं त्याच्या भक्तास (अल्लाहचे भक्त- मुहम्मद स.) पाठवलेली दिव्य अनुभूती कळवली.

११) प्रेषितांनी जे डोळ्यांनी पाहिलं, त्यांच्या मनास, त्यात काही खोटं वाटलं नाही.

१२) (मात्र) तुम्ही त्यांनी जे पाहिलं त्याबद्दल वाद घालता?

१३) त्यांनी त्यास पुन्हा पाहिलं

१४) सीमेलगत बोरीच्या झाडाजवळ

१५) जिथं स्वर्गाचं निवास आहे.

१६) ज्या वेळी त्या झाडास झाकून टाकलं होतं, जे आच्छादित असते.

१७) डोळे विचलित झाले नाहीत की मर्यादेपलीकडे गेले.

१८) त्यांनी खरोखरच आपल्या विधात्याची महान संकेतं पाहून घेतली.

१९) तुम्ही पाहिलंय 'लात' आणि 'उज्जास'?

२०) आणि तिसरी, शेवटी मनात?

२१) तुमच्यासाठी पुत्रं आणि त्याच्यासाठी मुली?

२२) तेव्हा मग ही विभागणी तर ओबडधोबड झाली.

२३) हे काही नसून तुम्ही आणि तुमच्या पूर्वजांनी दिलेली नावं आहेत, अल्लाहनं त्यास काही पुरावा दिलेला नाहीय. ते फक्त कल्पनांच्या मागं आहेत, आणि त्यांच्या मनांच्या अभिलाषा आहेत. त्यांना त्यांच्या विधात्याकडून मार्गदर्शन लाभलेलं असताना.

२४) मानवास (त्याच्या) अभिलाषा साकारता येतात?

२५) खरं पाहता अंत (परलोक) आणि आदि (हे जग) अल्लाहच्याच हाती आहे.

२६) अवकाशात कितीतरी दूत आहेत ज्यांची मध्यस्थी कामी येणार नाही. अल्लाह ज्यास पसंत करून अनुमती देईल त्यास वगळता.

२७) ज्यांचा परलोकावर विश्वास नसतो ते देवदूतांना स्त्रीलिंगी नावं देतात.

२८) त्यांना त्याबाबत ज्ञान नाही, ते कल्पनेपलीकडं काहीच बाळगत नाहीत आणि सत्यतेच्या तुलनेत कल्पना काहीच उपयोगी ठरत नसतात.

२९) तेव्हा आमच्याकडं पाठ फिरवणाऱ्यांना तुम्ही टाळा. त्यास या जगातल्या आयुष्यापलीकडं कशाची इच्छा नाही.

३०) थोडक्यात ही त्यांच्या ज्ञानाची परिसीमा, कोण भरकटलेत हे तुमच्या विधात्यास ठाऊक आहे आणि कोणास मार्गदर्शन लाभलंय हेही त्यास माहीत आहे.

३१) अवकाश आणि पृथ्वीतील सर्वकाही अल्लाहचंच. ज्या लोकांनी दुष्ट कर्मं केलीत त्यांना त्याची परतफेड करण्यास आणि जे भली कर्मं करतात त्यांना उत्तम असा मोबदला देण्यासाठी.

३२) जे मोठी पापं करत नसतात, अश्लील गोष्टींपासून स्वत:स वाचवतात लहानसहान काही घडलं तर त्यास सोडून. तुमचा विधाता माफ करण्याचं औदार्य राखतो. तो तुम्हांस चांगलं जाणतो. जेव्हा त्यानं तुम्हांस जमिनीतून उत्पन्न केलं, जेव्हा तुम्ही आपल्या मातांच्या उदरांत गर्भावस्थेत होता, स्वत:स काही पवित्र समजून घेऊ नका. कोण सदाचारी आहे ते त्यास ठाऊक आहे.

३३) जो वळून जातो त्यास तुम्ही पाहताय?

३४) थोडंसं काही दिलं आणि थांबला.

३५) त्यास अदृष्याचं ज्ञान आहे की काय? म्हणून तो पाहतो.

३६) त्यास मूसाच्या ग्रंथामध्ये आहे त्याची खबर नाही

३७) आणि इब्राहीमची ज्यांनी करार पूर्णत्वास नेले.

३८) कुणी ओझं वाहणारा इतरांचं ओझं वाहत नसतो.

३९) मानवास तितकंच लाभते जितका तो प्रयत्न करतो.

४०) त्याचे प्रयत्न त्यास जवळच दाखवले जातील.

४१) आणि मग त्यास पुरेपूर मोबदला दिला जाईल.

४२) सर्वांना तुमच्या विधात्याकडंच (जायचंय).

४३) अंतिमत: तोच तुम्हांस हसवतो आणि रडावयास लावतो.

४४) तोच जगवतो आणि मरण देतो.

४५) त्यानंच पुरुष आणि स्त्री जोडीनं निर्माण केले.

४६) एका थेंबानं, (गर्भाशयात) टाकलेल्या.

४७) आणि दुसऱ्यांदा उठवणं त्याच्यावरच (अवलंबून) आहे.

४८) तोच श्रीमंती देतो आणि समृद्धी देतो.

४९) तोच 'शिअरा' (बलाढ्य ताऱ्याचा) स्वामी आहे.

५०) त्यानंच प्राचीन काळी आद लोकांना नष्ट केलं.

५१) समूदांनाही त्यानं शिल्लक ठेवलं नाही.

५२) आणि त्याआधी नूहच्या लोकांना. कारण ते अत्यंत अत्याचारी आणि अत्यंत उल्लंघनकारी होते.

५३) आणि पालथ्या पडलेल्या वस्तीचाही संहार केला.

५४) त्यास झाकून टाकलं पडझडीनं.

५५) तर मग आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या देणग्यांविषयी शंका घेणार?

५६) आधी ज्यांनी सावध केलं त्यांपैकीच एक सावध करणारे हे ते आहेत.

५७) जवळ येत असलेली (कयामत) जवळच येऊन ठेपली.

५८) अल्लाहव्यतिरिक्त कुणीही ते उघडकीस आणणार नाही.

५९) तर मग तुम्हांस ह्या गोष्टीचं नवल वाटतं?

६०) तुम्ही रडण्याऐवजी हसू लागता?

६१) तुम्ही दुर्लक्ष करत राहता?

६२) अल्लाहस नतमस्तक व्हा आणि त्याची आराधना करा.

-------

# ५४. सूरह अल-कमर

**मक्काकालीन, आयती ५५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) पुनरुत्थानाची घटिका येऊन ठेपली, आणि चंद्र दुभंगला,

२) पण तरी ती संकेतं पाहूनसुद्धा पाठ फिरवतात. म्हणतात, ही तर जादू आहे, पूर्वापार चालत आलेली.

३) ते खोटं ठरवतात, आपल्या वासनांमागं लागतात, पण प्रत्येक बाबीची मुदत ठरलेली आहे.

४) त्यांच्याकडं अहवाल आलाय, ज्यामध्ये त्यांना ताकीद आहे.

५) परिपक्व बुद्धिमत्ता, पण या ताकीदींचा त्यांना काही फायदा झाला नाही.

६) तुम्ही त्यांच्यापासून दूर वळा, ज्या दिवशी हाक देणारा एका अतिशय दुःखद गोष्टीकडं बोलवल.

७) त्यांचे डोळे नमलेले असतील, ते आपल्या कबरीतून अशा रितीनं निघून येतील जसं पसरलेले टोळधाड,

८) बोलवणाऱ्याकडं लगबगीनं धावत सुटतील, नाकारणारे म्हणतील, फार कठीण दिवस हा.

९) त्याच्यापूर्वी नूहच्या लोकांनी नाकारलं. आमच्या भक्तास खोटं ठरवत म्हणाले, झपाटलेला (हा माणूस) आणि त्यांना धमकी दिली.

१०) त्यांनी आपल्या विधात्याचा धावा केला, मी मात खाल्ली. तूच प्रतिकार कर.

११) मग आम्ही आकाशाची दारं उघडली आणि मुसळधार पाऊस पाडला.

१२) जमिनीतून झरे वाहविले आणि पूर्वनियोजित उद्दिष्टानुसार दोन्ही पाणी एकमेकांस मिळाले.

१३) आम्ही त्यांना (नूह यांना) फळ्या आणि खिळ्यांनी बनवलेल्या (नौकेत) स्वार केलं.

१४) आमच्या डोळ्यांसमोर ती तरंगत होती, त्यांना खोटं ठरवलं गेलं त्याचा बदला म्हणून.

१५) आम्ही त्यास एक बोधप्रद संकेत बनवून सोडलं. तर मग कुणी बोध घेणारा आहे?

१६) कशी होती माझी शिक्षा आणि कशी मी ताकीद दिली होती!

१७) आम्ही शिकवण घेण्यास कुरआनला सोपं केलंय. मग आहे कुणी बोध घेणारा?

१८) आणि आद लोकांनी खोटं ठरवलं (तेव्हा) कशी माझी शिक्षा घडली होती आणि कशी मी (त्यांना) ताकीद दिली होती?

१९) आम्ही एका विनाशकालीन दिवशी त्यांच्यावर एक वादळ पाठवलं सतत चालणाऱ्या वाऱ्यांचं.

२०) तो लोकांना खजुरीच्या उपटलेल्या झाडांप्रमाणं उपटत होता.

२१) कशी घडली माझी शिक्षा आणि कसं मी सावध केलं होतं!

२२) आम्ही कुरआनास सोपं केलं शिकवण घेण्यास, तेव्हा कुणी उपदेश घेणारा आहे का?

२३) समूदांनीही सावध करणाऱ्यास खोटं म्हटलं.

२४) ते म्हणाले, तो आमच्यापैकीच एक माणूस. आम्ही त्याचं पालन करावं? असं असेल तर आम्ही भरकटले जाऊ आणि वेडे होऊन जाऊ.

२५) आम्हांपैकी त्याकडंच त्यांची अनुभूती दिली जाते, नव्हे तो खोटा असून दुराभिमानी आहे.

२६) त्यांना उद्याच्याउद्याच कळून येईल कोण लबाड आणि दुराभिमानी आहे ते.

२७) आम्ही त्यांची परीक्षा घेण्यास उंटीण पाठवणार आहोत. तुम्ही वाट पाहा आणि संयम बाळगा.

२८) त्यांना कळवा, त्यांच्यामध्ये पिण्याचं पाणी वाटून दिलंय आणि सर्वांना आळीपाळीनं पाणी पिण्यास यावयाचंय.

२९) त्यांनी आपल्या साथीदारास हाक दिली. त्यानं हात उचलून उंटीण कापून टाकली.

३०) कशी माझी शिक्षा घडली आणि कशी मी ताकीद दिली.

३१) आम्ही त्यांच्याकडं एक प्रचंड धडाका उडवून दिला आणि ते गवताप्रमाणे वाळून गेले.

३२) आम्ही सोपं केलं ह्या कुरआनास उपदेशासाठी. मग कोण आहे बोध घेणारा?

३३) लूतच्या लोकांनी सावध करणाऱ्यांस नाकारलं.

३४) आम्ही त्यांच्याविरूद्ध दगडांचं वादळ पाठवलं, लूत यांच्या कुटुंबीयांना वगळलं. त्यांना पहाटेच आम्ही वाचवलं होतं.

३५) आमची ती कृपा. आभार मानतात त्यांना आम्ही अशा रितीनं मोबदला देत असतो.

३६) खरं तर लूतनी त्यांना आमच्या शिक्षेबाबत सावध केलं होतं, पण त्यांनी (लोकांनी) वाद घातला.

३७) ते लूत यांच्या पाहुण्यांना नेऊ इच्छित होते (वाईट हेतूनं), पण आम्ही त्यांचे डोळे अंध करून टाकले. आता उपभोग घ्या माझ्या शिक्षेचा आणि माझ्या ताकीदीचा.

३८) खरं तर आम्ही ठरवलेल्या शिक्षेनं त्यांना पहाटेच घेरून टाकलं.

३९) चाखा माझ्या शिक्षेची चव आणि माझ्या ताकीदीची.

४०) आम्ही तर खऱ्या अर्थानं कुरआनास सोपं केलंय समजण्यासाठी. मग कोण बोध घेणारा आहे?

४१) आणि फिरऔनकडंही सावध करणारे (प्रेषित) आले होते,

४२) पण त्यांनी आमची सर्व संकेतं नाकारून दिली. मग आम्ही त्यांना धरलं एका शक्तिशाली आणि सामर्थ्यशाली पकडीत.

४३) तुमच्यामधील जे नाकारणारे आहेत ते त्यांच्या मानानं बरे आहेत अथवा पूर्वीच्या ग्रंथांमध्ये तुम्हांस क्षमा दिलीय.

४४) किंवा त्यांचं म्हणणं असं की 'आम्ही एकत्रितपणे त्यांचा प्रतिकार करू.'

४५) लवकरच त्या सर्वांना मात दिली जाईल आणि ते सर्व पाठ फिरवून पळून जातील.

४६) नव्हे, त्यांना कयामतच्या घटिकेचं वचन आहे आणि ती घटिका अत्यंत दुःखदायक व कटू (सत्य) आहे.

४७) अपराधी लोक चुकलेले असून ते नरकाग्नीत जाणार आहेत.

४८) त्या दिवशी त्यांना तोंडघशी नरकाग्नीकडं खेचून आणलं जाईल (आणि सांगितलं जाईल), 'चाखा नरकाचा स्पर्श!'

४९) आम्ही सारंकाही प्रमाणबद्ध (मोजमाप करून) निर्माण केल्या आहेत.

५०) आमची आज्ञा एकच एक. डोळ्याचं पातं लवणं (तेवढंच)

५१) आम्ही तुमच्यासारख्यांना नष्ट करून टाकलंय. मग आहे कोण बोध घेणार?

५२) आणि त्यांनी केलं-सवरलेलं सर्व दप्तरांत नोंदवलंय.

५३) लहान-मोठ्या सर्व बाबी लिहिल्यात.

५४) सदाचारी लोक निश्चितच बागा आणि नद्यांकाठी राहतील.

५५) अगदी योग्य जागी, सर्वथा सामर्थ्यवान बादशाहच्या सान्निध्यात.

-------

# ५५. सूरह अर-रहमान

**मदीनाकालीन, आयती ७८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) परम कृपावंत (तो)

२) (ज्यानं) कुरआन शिकवलं,

३) मानवास निर्माण केलं,

४) त्यास बोलणं शिकवलं.

५) सूर्य आणि चंद्र एका हिशेबानं (भ्रमण करतात),

६) तारे आणि झाडं (देखील) नतमस्तक होतात.

७) उत्तुंग अवकाश उभारलं आणि समतोल राखलं.

८) (तेव्हा) संतुलनाचं उल्लंघन करू नका.

९) तेव्हा संतुलन कायम ठेवा आणि मोजमापात कसर होऊ देऊ नका.

१०) चराचरासाठी पृथ्वी बनवली.

११) यामध्ये फळफळावळ आहे आणि खजुरीची झाडं, वलयांकित

१२) धान्ये पाल्यासहित आणि सुगंधी फुलं.

१३) तेव्हा तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या देणग्या नाकाराल?

१४) मानवास त्यानं खणखण वाजणाऱ्या मातीतून निर्माण केलं

१५) आणि जिन्नांना धूररहित अग्नीपासून निर्माण केलं,

१६) तेव्हा तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कलाकौशल्यास नाकारणार?

१७) दोन्ही पूर्व आणि दोन्ही पश्चिमेचा स्वामी तोच.

१८) तसं असता आपल्या विधात्याचं कोणकोणतं सामर्थ्य तुम्ही खोटं

ठरवणार?

१९) त्यानं एकमेकांशी संलग्न दोन समुद्र वाहविले,

२०) त्यांच्यामध्ये अवरोध (असल्यानं ते) एकमेकांत मिसळत नाहीत.

२१) मग तुम्ही आपल्या विधात्याच्या कशा कशा किमया नाकाराल?

२२) त्यांच्यामधून मोती आणि प्रवाळ निघतात.

२३) आपल्या विधात्याच्या देणग्यांना तुम्ही कसे नाकाराल?

२४) सागरांमध्ये पर्वतांसमान जहाजं त्याचीच,

२५) मग तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणत्या मोठ्या देणगीस नाकारणार?

२६) हिच्यावरील (धरतीवरील) सर्वकाही नाश पावणार.

२७) तुझ्या विधात्याचं रूप तेवढं कायम राहील, तो वैभवशाली आणि महानतम आहे.

२८) मग तुम्ही आपल्या विधात्याची कोणकोणती वैभवं नाकाराल?

२९) पृथ्वी आणि आकाशांमधील सर्वजण त्याच्याशीच मागत असतात, आणि हरेक दिवशी त्याचं वैभव नवनवीनच.

३०) तेव्हा तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या गुणांना अव्हेरणार?

३१) तुम्ही दोघं (जिन्न आणि मानव), आम्ही लवकरच तुमच्याकडं लक्ष देऊ.

३२) आपल्या विधात्याचं काय काय बरं तुम्ही नाकाराल?

३३) हे जिन्न आणि मानवी समूह जर तुम्ही तशी क्षमता बाळगत असाल तर अवघ्या अवकाश आणि धरतीपलीकडं निघून जा, तुम्ही (आमच्या) अल्लाहच्या अधिकाराशिवाय तुम्ही निघून जाऊ शकणार नाही.

३४) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणत्या म्हणून अधिकारास नाकारणार?

३५) तुम्हावर अग्नीचा झोत आणि धूर पाठवला गेल्यास तुम्ही त्याचा प्रतिकार करू शकणार नाही.

३६) मग तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या देणग्या नाकाराल?

३७) जेव्हा आकाश दुभंगून लाल कातड्याप्रमाणं गुलाबी होऊन जाईल,

३८) तेव्हा तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या सामर्थ्यास नकार द्याल?

३९) त्या दिवशी कुणासही मानव आणि जिन्नांना त्यांच्या पापांबाबत विचारलं जाणार नाही.

४०) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कृपा नाकारणार?

४१) अपराधी त्यांच्या चेहऱ्यांवरून ओळखले जातील आणि मग त्यांना त्यांच्या बटा आणि पायांनी धरलं जाईल.

४२) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कृपांना नाकाराल?

४३) हेच ते नरक ज्यास अपराधी नाकारत होते.

४४) ते त्याच्या आणि उकळत्या पाण्याच्या मधोमध फिरत राहतील.

४५) मग तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कृपा नाकारत राहणार?

४६) जे विधात्यासमोर उभं राहण्यास भीत होते, त्यांना दोन बागा आहेत.

४७) मग तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या देणग्या नाकारणार?

४८) भरपूर फांद्यायुक्त (अशा बागा)

४९) आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कृपा तुम्ही नाकाराल?

५०) त्यामध्ये दोन झरे वाहताहेत.

५१) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कृपा नाकाराल?

५२) यामध्ये विविध प्रकारच्या फळांच्या जोड्या आहेत.

५३) आपल्या विधात्याच्या किती किती उपकारांना नाकारणार?

५४) तकिये लवून गालिचांवर बसलेले असतील, ज्यांची अस्तरं रेशमी असतील आणि दोन्ही बागांमधील फळं हातपोच असतील.

५५) आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कृपांना नाकाराल तुम्ही?

५६) तिथं निर्मळ आणि लाजाळू युवती असतील ज्यांना पूर्वी कुणीही पुरुषानं अथवा जिन्नांनी स्पर्श केलेला नसेल.

५७) आपल्या विधात्याच्या कशा कशा इनामांना तुम्ही नाकारणार?

५८) जणू त्या हिरे आणि मोतीच आहेत.

५९) आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या देणग्या तुम्ही नाकाराल?

६०) भल्याचा बदला भलाच नव्हे काय?

६१) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणत्या बरं उपकारांना नकारणार?

६२) या दोन बागांव्यतिरिक्त आणखीनही दोन बागा आहेत.

६३) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या कृपा नाकाराल?

६४) गडद हिव्या रंगाच्या

६५) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या इनामांना नाकारणार?

६६) तिथं त्यामध्ये दोन झरे खळखळत असतील.

६७) आपल्या विधात्याच्या कोणत्या इनामांना नाकारणार?

६८) या दोन्ही बागांमध्ये फळफळावळ, खजुरीची झाडं आणि डाळींब असतील.

६९) तुम्ही आपल्या विधात्याचं काय काय म्हणून नाकाराल?

७०) त्यामध्ये सभ्य आणि सुंदर (सहचारणी) असतील

७१) आपल्या विधात्याचे कोणकोणते उपकार नाकाराल?

७२) तंबूंमध्ये पडदाधारी मर्यादाशील अप्सरा.

७३) तुम्ही आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या उपकारांना नाकारणार?

७४) त्यांना पूर्वी कुणी पुरुषानं अथवा जिन्ननं स्पर्श केलेला नाही.

७५) आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या इनामांस नाकाराल?

७६) लोडांवर रेलून आणि हिरव्यागार गालिचांवर (बसलेले)

७७) आपल्या विधात्याच्या कोणकोणत्या देणग्या तुम्ही नाकाराल?

७८) तुमच्या विधात्याचं नाव समृद्धशाली असून तो औदार्यपूर्ण आणि सन्मानपूर्ण आहे.

-------

# ५६. सूरह अल-वाकिआ

**मक्काकालीन, आयती ९६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) जेव्हा अपरिहार्य घटना (कयामत) घडणारच,

२) तिचं घडणं कुणी नाकारू शकत नाही.

३) कुणास मानहानीकारक तर कुणास प्रतिष्ठा आणणारी.

४) जेव्हा धरती भूकंपानं हादरून जाईल.

५) आणि पर्वतं कणकण होऊन जातील.

६) धूळ बनून विखुरले जातील.

७) तुम्ही तीन प्रकारे विभागले जाल.

८) एक उजव्या बाजूचे. उजव्या बाजूचे (सौभाग्य) कसे ते!

९) डाव्या बाजूचे. डाव्या बाजूचे (दुर्दैवी लोक) ते.

१०) आणि अग्रणी तर अग्रणीच असतात.

११) याच लोकांची (अल्लाहशी) जवळीक असेल

१२) संपन्न अशा स्वर्गामध्ये.

१३) पूर्वीच्या काळातील पुष्कळसे लोक

१४) आणि नंतरच्या काळातील थोडेसे.

१५) रत्नजडित आसनांवर

१६) रेलून बसलेले असतील समोरासमोर.

१७) त्यांच्या भोवती चिरयुवक (सेवेसाठी) फिरत असतील

१८) कप, प्याले आणि सुरई घेऊन स्वच्छ पेयांची.

१९) त्यामुळं त्यांच्या डोक्यांवर परिणाम होणार नाही की ते बेभान होतील.

२०) आणि त्यांना आवडतील अशी फळं.

२१) त्यांना हवं त्या पक्ष्याचं मांस

२२) आणि सुंदर डोळ्यांच्या सहचारणी (हूर)

२३) जपून ठेवलेल्या मोत्यांसारखे सुंदर.

२४) त्यांनी जी (पुण्य) कर्मं केली त्याचा मोबदला.

२५) तिथं ते तुच्छ गोष्टी ऐकणार नाही अथवा पापाच्या गोष्टी नसतील.

२६) सर्व (एकमेकांस) 'सलामन, सलामन' (शांतता, शांतता) म्हणतील.

२७) आणि उजव्या बाजूचे, कसे ते (सौभाग्य) उजव्या बाजूचे सोबती

२८) काटे नसलेले बोरीच्या (झाडां)मध्ये असतील,

२९) थरावर थर केळीचे,

३०) लांबच लांब पसरलेल्या सावल्यांमध्ये

३१) उसळतं पाणी,

३२) भरपूर फळं,

३३) ते संपणार नाहीत, कोणती रोकटोक नसेल.

३४) उंचावरील आसनं,

३५) आम्ही नव्यानं निर्माण केलेल्या

३६) विशुद्ध कौमार्य आम्ही त्यांना दिलेलं.

३७) प्रेमळ आणि समवयस्क

३८) उजव्या बाजूच्यांसाठी.

३९) पुरातन काळातले पुष्कळसे

४०) आणि नंतरचे अनेकजण

४१) आणि डाव्या बाजूचे सोबती, (पहा) कसे ते डाव्या बाजूचे सोबती.

४२) धगधगत्या वाऱ्यामध्ये आणि उकळत्या पाण्यात

४३) आणि धुराच्या सावलीत,

४४) थंड नसेल की सुखदायी नसेल.

४५) ते याआधी सुखवस्तू लोक होते.

४६) आणि ते भयंकर पापाचा आग्रह करत असत.

४७) म्हणत असत, आम्ही मेलो, माती आणि हाडं होऊन गेलो तरीही आम्हांस दुसऱ्यांदा उठवलं जाईल?

४८) आणि आमचे वाडवडील, पूर्वज सुद्धा?

४९) त्यांना सांगा, होय, जुन्या काळातले आणि नंतरचेसुद्धा.

५०) एका निश्चित दिवशी आणि ठराविक वेळेवर सर्वांना गोळा केले जाईल.

५१) आणि तुम्ही, त्यास नाकारणारे मार्गभ्रष्ट लोकांनो,

५२) खात्रीनं तुम्हांस झक्कूमचा वृक्ष खावा लागेल.

५३) त्यापासूनच पोटाची खळगी भरावी लागेल,

५४) त्यावर उकळतं पाणी प्यावं लागेल.

५५) तहानलेल्या उंटासारखं प्यावं लागेल.

५६) निर्णयाच्या दिवशी त्यांची ही मेजवानी

५७) आम्ही तुम्हांस जन्माला आणलं, या सत्याची कबुली का बरं देत नाही?

५८) बरं, पाहा तरी तुम्ही जे वीर्य (गर्भाशयात) टाकता

५९) त्यास तुम्ही निर्माण करता की आम्ही ते निर्माण करतो?

६०) आम्ही तुमच्यामध्ये मृत्यूची योजना आखलीय आणि आम्ही त्यास

असमर्थ नाही....

६१) की तुमचा आकार बदलून टाकू, आणि अशा रूपात तुम्हाला उभं करू जे तुम्हांस माहीतही नाही?

६२) तुम्ही पहिल्या निर्मितीच्या स्वरूपाशी परिचित असताना का बरं चिंतन करत नाही?

६३) आणि पाहा, तुम्ही जे बीज पेरता...

६४) त्यापासून तुम्ही उगवता की आम्ही ते उगवतो?

६५) आम्हाला वाटल्यास आम्ही ती भूसा करून टाकू, मग तुम्ही बडबडत राहाल,

६६) आम्हांस भुर्दंड बसला,

६७) किंबहुना आम्ही गमावून बसलो.

६८) तुम्ही पिता ते पाणी पाहता?

६९) तुम्ही ते ढगांतून खाली आणता की आम्ही खाली पाठवतो?

७०) आम्हांस वाटलं तर... आम्ही त्यास खारट करून टाकू, पण तुम्ही आभार मानणार नाही?

७१) पाहा, तुम्ही जी आग पेटवता

७२) तुम्ही तिची झाडं उत्पन्न करता की ते उत्पन्न करणारे आम्ही आहोत?

७३) आम्ही ते प्रवाशांना आठवण करून देण्यास आणि त्यांच्या सुविधेसाठी बनवले.

७४) तेव्हा तुम्ही आपल्या महानतम विधात्याची प्रशंसा करा.

७५) मी शपथ वाहतो नक्षत्रांच्या विविध टप्प्यांची!

७६) आणि जर तुम्ही समजून घेतलं तर ही एक मोठी शपथ आहे.

७७) हे निश्चितच सन्मानपूर्ण कुरआन आहे

७८) जतन करून ठेवलेल्या ग्रंथामध्ये.

७९) पवित्र लोकांशिवाय कुणी त्यास स्पर्श करत नसतात,

८०) सकल विश्वांच्या विधात्यानं पाठवलेलं.

८१) मग तुम्ही या गोष्टीस नाकारता?

८२) तुम्ही खोटं ठरवणं हेच आपल्या निर्वाहाचं साधन बनवलंय

८३) आणि (मृत्यू) तुमच्या गळ्यापर्यंत पोचत असतो...

८४) त्या वेळी तुम्ही टक लावून बघत राहता.

८५) आम्ही (मृत्यूसमयी) तुमच्यापेक्षा त्यास अधिक जवळ असतो, पण तुम्हांस दिसत नाही.

८६) आणि तुम्ही कुणाशी बांधलेले नसाल तर.

८७) आणि खरं असाल तर त्यास (आत्म्यास) परत का बोलवत नाही.

८८) जर तो (मयत) अल्लाहचा निकटवर्ती असला तर

८९) (त्यास) सुख-समाधान आणि संपन्न बागा असतील.

९०) आणि जर तो उजव्या बाजूवाल्यांपैकी असला तर

९१) (म्हटलं जाईल) शांतता लाभो तुला, उजव्या बाजूच्या सोबती.

९२) आणि जर तो लबाड आणि मार्गभ्रष्ट लोकांपैकी असेल तर

९३) त्यास उकळतं पाण्याचं इनाम

९४) आणि त्यास नरकात घातलं जाणार!

९५) हीच प्रत्यक्ष वास्तवता आहे.

९६) तेव्हा आपल्या महिमाशाली विधात्याचं पावित्र्यगान करा.

-------

# ५७. सूरह अल-हदीद

## मदीनाकालीन, आयती २९

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आकाशं आणि पृथ्वीत जे काही आहे, अल्लाहचं पावित्र्यगान करतात, तो सर्वोच्च प्रतिभावंत आहे.

२) आकाशं आणि पृथ्वीवर त्याचंच अधिराज्य, तोच जन्म देतो आणि मृत्यू, सर्व बाबींवर तो समर्थ आहे.

३) तोच आदि, तोच अंत, तोच प्रकट आणि तोच अव्यक्त. त्यास प्रत्येक बाबीची माहिती आहे.

४) तोच ज्यानं अवकाश आणि पृथ्वी सहा दिवसांत निर्माण केले आणि मग आसनावर विराजमान झाला. जमिनीत काय जाते आणि तिच्यामधून काय बाहेर पडते, आकाशांतून खाली काय येते आणि वर त्यामध्ये काय जाते सर्व त्यास ठाऊक असते. तुम्ही कुठेही असा तो तुमच्यापाशी असतो. तुम्ही जे करत असता ते अल्लाह पाहत असतो.

५) आकाशं आणि पृथ्वीचं अधिराज्य त्याचंच. सारी प्रकरणं त्याच्याकडं फिरत असतात.

६) तो रात्रीतून दिवस उजाडतो आणि दिवसास रात्रीत विलीन करतो. तुमच्या मनांमधील गोष्टीसुद्धा त्यास ठाऊक असतात.

७) अल्लाह आणि प्रेषिताशी एकनिष्ठ व्हा आणि (ज्या संपत्तीचं) तुम्हांस त्यानं वारस केलं त्यातून खर्च करा. तुमच्यामधील जे लोक श्रद्धा धारण करतात आणि खर्च करतात त्यांना एक मोठं बक्षीस आहे.

८) आणि का बरं तुम्ही अल्लाह आणि प्रेषिताचं मानत नाही, जेव्हा ते तुम्हांस आपल्या विधात्याशी एकनिष्ठ होण्यास बोलवत असतात. तुम्ही जर श्रद्धावंत असाल, त्यानं तुमच्याकडून करार करवून घेतलाय.

९) तोच जो आपल्या भक्तावर स्पष्ट आयती अवतरतो, तुम्हांस अंधकारातून

प्रकाशाकडं आणण्यासाठी खात्रीनं अल्लाह स्नेहांकित आणि दयावंत आहे.

१०) तुम्ही अल्लाहच्या कारणास्तव खर्च करत नाही, याचं कारण काय? आकाशं आणि पृथ्वीचा वारसा तर अल्लाहसाठीच आहे. तुमच्यापैकी ज्यांनी पूर्वी (मक्काविजयापूर्वी) खर्च केले आणि लढले, ते दर्जात त्या लोकांपेक्षा वरचे आहेत जे नंतर (मक्काविजयानंतर) खर्च करतात आणि युद्ध करतात. अल्लाहनं सर्वांना चांगलं वचन दिलंय. तुमच्या कामगिरीशी अल्लाह परिचित असतो.

११) अल्लाहस कर्ज पुरवणारा कोण आहे? चांगल्या (प्रकारचं) कर्ज. अल्लाह त्यास पटीपटीनं वाढून परत करील. आणि सन्मानाचा मोबदलासुद्धा.

१२) एके दिवशी तुम्ही पाहाल श्रद्ध पुरुष आणि श्रद्ध स्त्रियांचा प्रकाश त्यांच्या पुढं आणि त्यांच्या उजवीकडं धावत असेल. आज तुम्हांस खूशखबर आहे अशा बागांची ज्यांच्या खालून नद्या वाहतात आणि सर्वदा ते तिथंच राहतील. हीच सर्वोच्च सफलता आहे.

१३) त्या दिवशी दांभिक पुरुष आणि स्त्रिया श्रद्ध लोकांस म्हणतील, आमच्याकडं पाहा. आम्हाला तुमच्या प्रकाशाचा लाभ घेऊ द्या. त्यांना सांगण्यात येईल, मागं जा आणि प्रकाश शोधा. त्यांच्यामध्ये एक भिंत उभारली जाईल. तिच्यात एक दरवाजा असेल. तिच्या आत सर्वत्र कृपा असेल आणि तिच्या बाहेरील बाजूस शिक्षा असेल.

१४) ते (दांभिक) श्रद्धावंतांना हाक देऊन सांगतील, आम्ही तुमच्याबरोबर नव्हतो? ते (श्रद्धावंत) म्हणतील, होय. पण तुम्ही स्वत:च स्वत:स फसवलं आणि (श्रद्धावंतांच्या बाबतीत काही वाईट घडण्याची) वाट पाहत होता. तुम्ही संशयात पडून राहिला. खोट्या आकांक्षांनी तुम्हांस फसवलं, अल्लाहचा आदेश येईपर्यंत. आणि अल्लाहबाबत फसवणाऱ्यांनं (सैतान) तुम्हांस फसवून टाकलं.

१५) आज तुमच्याकडून कसलं प्रतिदान (फिदिया) घेतलं जाणार नाही.

आणि ज्यांनी बंड केलं त्यांचंही नाही. तुमचं स्थान नरक आहे, तीच तुमची काळजी वाहणार आणि फार वाईट असे ते ठिकाण आहे.

१६) श्रद्धावंतांसाठी अद्याप अशी वेळ आली नाही? जेव्हा त्यांचं अंत:करण अल्लाहचं स्मरण आणि जे सत्य त्यानं पाठवलंय त्यापुढं विनम्र भावानं नमतील. आणि पूर्वी ज्या लोकांना ग्रंथ दिला होता त्यांच्यासारखं होऊ नये. दीर्घकाळ लोटल्यानं त्यांचं अंत:करण कठोर होऊन गेलं आणि त्यांच्यापैकी पुष्कळसे मर्यादांबाहेर गेलेत.

१७) जाणून घ्या, अल्लाह धरतीला तिच्या मृत्यूनंतर जीवित करतो. आम्ही तुमच्यासाठी आयती स्पष्ट करून दिल्या आहेत तुम्हांस समजण्यासाठी.

१८) जे पुरुष आणि स्त्रिया दान करतात आणि जे अल्लाहस चांगलं कर्ज देतात, तो त्यांच्यासाठी अनेक पटीनं वाढवण्यात येईल आणि त्यांना सन्मानपूर्वक मोबदलासुद्धा मिळेल.

१९) जे लोक अल्लाह आणि प्रेषितांवर श्रद्धा बाळगतात तेच आपल्या विधात्यापाशी प्रामाणिक आणि साक्षीदार असतात. त्यांना त्याचा मोबदला आणि त्यांचा प्रकाश असेल. आणि जे लोक नाकारतात व आमच्या आयतींना खोटं ठरवतात ते नरकाचे लोक आहेत.

२०) लक्षात ठेवा. जगातील जीवन खेळ, करमणूक, देखावा, एकमेकांशी दुराभिमानी वृत्ती आणि संपत्ती व संततीविषयी ऐश्वर्याच्या चुरशीपलीकडं काही नाही. एक उदाहरण घ्या, पावसाळ्यात उगवलेल्या वनस्पतीस पाहून शेतकऱ्यास आनंद होतो. ती आणखीन वाढत जाते आणि मग ती पिवळी पडताना तुला दिसते. नंतर तिचा भुसा होऊन जातो. परलोकात कठोर शिक्षाही आहे त्याचबरोबर अल्लाहकडून क्षमा करणं आणि प्रसन्नता. जगातलं हे जीवन फसवण्याच्या साधनांशिवाय आणखी काय?

२१) तुम्ही आपल्या विधात्याच्या क्षमेकडं ज्या स्वर्गाचा विस्तार धरती व आकाशांच्या विस्ताराएवढा आहे त्याच्याकडं धावून जा. अल्लाह आणि प्रेषितांवर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी तयार केलं गेलंय. हे अल्लाहचं

वरदान आहे, मर्जीस येईल त्याला बहाल करतो. अल्लाह औदार्यपूर्ण व महिमाशाली आहे.

२२) धरतीवर आणि तुम्हांस जी काही आपत्ती कोसळते ती एका दफ्तरात नोंदवून ठेवलीय ती प्रत्यक्षात येण्याआधीच. हे करणं अल्लाहस सोपं आहे.

२३) म्हणजे जे तुमच्या हातून निसटून जाते त्यासाठी तुम्ही निराश होऊन नये आणि जे तुम्हांस दिलं गेलं त्यामुळं फुलून जाऊ नये. घमेंडी करणारे आणि ऐट मिरवणारे अल्लाहस आवडत नाहीत.

२४) आणि जे स्वत: लोभी असतात आणि लोकांना लोभी होण्यास उत्तेजन देतात. जर कुणी तोंड फिरवत असेल तर अल्लाह गरजमुक्त असून पशशंसेस पात्र आहे.

२५) आम्ही प्रेषितांना स्पष्ट प्रमाणांनी पाठवलं आणि त्यांच्याबरोबर ग्रंथ आणि संतुलन पाठवलं, लोकांनी न्याय प्रस्थापित करावा म्हणून. तसंच आम्ही लोखंड पाठवलं, यामध्ये प्रचंड युद्धक्षमता आणि मानवजातीला अनेक फायदे आहेत. अल्लाहस न पाहता आणि त्याच्या प्रेषितांना कोण मदत करतो हे माहीत करून घेण्यासाठी. अल्लाह शक्तिशाली आणि प्रभुत्वसंपन्न आहे.

२६) आम्ही नूह आणि इब्राहीम यांना पाठवलं. त्यांच्या वंशात प्रेषित व ग्रंथ ठेवले. त्यांच्यापैकी काही मार्गदर्शनावर आहेत तर कितीतरी उल्लंघन करणारे निघाले.

२७) त्यांच्या मागे त्यांच्या पदोपदी आम्ही आमचे दुसरे प्रेषित पाठवले. तद्‌नंतर आम्ही मरयमपुत्र ईसा यांना पाठवलं व त्यांना इंजील (बायबल) दिलं. ज्या लोकांनी त्यांचं पालन केलं त्यांच्या हृदयांत अनुकंपा आणि करुणा उत्पन्न केली आणि त्यांनी स्वत:च वैराग्यवादाची कल्पना शोधून काढली. आम्ही ते अनिवार्य ठरवलं नसून अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी त्यांनी ती अवलंबिली, पण त्यांनी जसे ते पाळायला हवे होते तसे पाळले नाही. पैकी ज्यांनी श्रद्धा धारली त्यांना आम्ही मोबदला दिला.

पण अनेकजण मर्यादेबाहेर गेले.

२८) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहचं भय राखा, प्रेषितांचं माना, तो तुमच्यासाठी आपली कृपा दुप्पट करील आणि तुम्हांस प्रकाशाची तरतूद करून देईल ज्यामध्ये तुम्ही चालाल. तो तुम्हांस क्षमा करील कारण अल्लाह क्षमाशाली आणि दयावंत आहे.

२९) ग्रंथधारकांना कळू दे. अल्लाहच्या औदार्यावर त्यांचा अधिकार नाही, तर औदार्य अल्लाहच्या हाती आहे. ज्यास इच्छितो त्यास देतो. आणि अल्लाह विपुल औदार्याचा स्वामी आहे.

-------

# ५८. सूरह अल-मुजादिला

**मदीनाकालीन, आयती २२**

**पारा - २८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अल्लाहनं त्या स्त्रीचं म्हणणं ऐकून घेतलं जी आपल्या पतीविषयी तुम्हांपाशी वाद घालत होती आणि आपल्या दु:खाविषयी अल्लाहकडं तक्रार करत होती. अल्लाह तुम्हां दोघांचं संभाषण ऐकत होता. निश्चितच अल्लाह ऐकतो आणि पाहत असतो.

२) तुमच्यापैकी जे लोक आपल्या पत्नींना (आई बनवून) टाकून देतात त्या त्यांच्या आई होत नसतात, तर ज्यांनी त्यांना जन्म दिला त्याच त्यांच्या आई होत. ते जे म्हणत असतात ते निरर्थक व खोटं आहे. अल्लाह क्षमा करतो आणि दयावंत आहे.

३) जे लोक आपल्या पत्नींस (आई बनवून) टाकून देतात आणि पुन्हा आपल्या शब्दापासून मागे फिरतात त्यांनी आधी एक गुलाम मुक्त करावा आणि मगच स्पर्श करावा याची तुम्हांस ताकीद दिली जाते. अल्लाहस तर तुम्ही जे काही करत असता ते माहीत असते.

४) पण जर कुणास हे जमत नसेल तर त्यानं एकमेकांस स्पर्श करण्यापूर्वी दोन महिने अखंड उपवास पाळावा. तशीही जर ऐपत नसेल तर मग साठ गोरगरिबांना जेवण घालावं. हे अशासाठी की तुम्ही अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचं (म्हणणं) मान्य करावं. या अल्लाहच्या मर्यादा होत आणि त्या भंग करणाऱ्यांना कडक शिक्षा असेल.

५) जे लोक अल्लाह आणि त्याच्या प्रेषितास विरोध दर्शवतात त्यांना अपमानित केलं जाईल जसं त्यांच्या पूर्वीच्यांना अपमानित केलं होतं. आम्ही आयती स्पष्ट करून पाठवल्या आहेत. त्यांस नाकारणाऱ्यांना तिरस्काराची शिक्षा आहे.

६) ज्या दिवशी अल्लाह त्या सर्वांना पुन्हा उभं करील आणि त्यांनी केलं-सवरलेलं जे अल्लाहनं साठवून ठेवलंय पण त्यांनी ते विसरून टाकलं होतं त्यांना ते ठासून सांगेल. अल्लाह सर्व बाबींचा साक्षी आहे.

७) त्यांना दिसत नाही, अवघं अवकाश आणि पृथ्वीमध्ये जे काही आहे ते अल्लाहस माहीत आहे. तीन लोकांमध्ये जे गुप्तपणे बोलणं होत असतं त्यांमध्ये तो चौथा असतो. ते पाच असतील तर तो सहावा असतो किंवा त्यापेक्षा कमी जास्त काहीही जिथं कुठं ते असतात अल्लाह त्यांच्याबरोबर असतो. नंतर त्यांनी जे काही केलं असेल कयामतच्या दिवशी त्यांना दाखवून देईल. अल्लाहस सर्व गोष्टी ठाऊक असतात.

८) तुम्हांस ते लोक दिसत नाहीत ज्यांना गुप्तपणे बोलण्याची मनाई केलेली होती. तरीही परत तेच करतात ज्याची त्यांना मनाई केलेली होती. ते गुप्तपणे आपसात पापाच्या गोष्टी करतात, अतिरेकी गोष्टी करतात आणि प्रेषिताच्या अवज्ञा करण्याविषयी. ते तुमच्याकडं येऊन तुमचं अभिवादन अशा शब्दांनी करतात, जशा शब्दांनी अल्लाह अभिवादन करत नाही. आणि ते स्वत:शीच म्हणतात, अल्लाह आम्हांस आमच्या बोलण्याबाबत शिक्षा का देत नाही? नरकच त्यांना पुरेसं आहे. तिथं त्यांना घालवलं जाईल वाईट अशा ठिकाणी.

९) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही आपसात गुप्त गोष्टी बोलताना, पापाविषयी अन्यायकारक आणि प्रेषितांच्या अवज्ञेविषयी बोलत जाऊ नका. तर नेकी आणि सदाचाराच्या गोष्टी बोलत जा. अल्लाहचं भय राखा, ज्याच्याकडं तुम्हांस परतावयाचंय.

१०) गुप्तपणे बोलणं सैतानाचं असतं, जे श्रद्धावंत आहेत त्यांना त्रास देण्यासाठी. पण अल्लाहच्या आज्ञेशिवाय ते त्यांना काही वाईट घडवू शकत नाहीत. श्रद्धावंतांनी अल्लाहवरच भिस्त ठेवायला हवी.

११) श्रद्धावंत लोकहो, तुम्हांस आपल्या बैठकीमध्ये मोकळेपणानं बसण्यास सांगितलं गेल्यास खुलून बसा. अल्लाह तुम्हांस मोकळीक देईल आणि उठून उभं राहण्यास सांगितल्यावर उभं राहा. तुमच्यापैकी ज्या लोकांनी श्रद्धा धारली आणि ज्या लोकांना ज्ञान बहाल केलं गेलं, अल्लाह

त्यांचे दर्जे उंच करील कारण अल्लाहला तुमच्या कर्तृत्वाची जाणीव आहे.

१२) श्रद्धावंत लोकहो, तुम्हांस प्रेषितांशी खाजगीत काही बोलायचं झाल्यास तसा खाजगी सल्ला घेण्यापूर्वी काही दान करा, हे तुमच्या भल्याचं आणि पावित्र्यास (पोषक) आहे. पण जर तुम्हांस तसं जमत नसेल, तर अल्लाह क्षमा करून दया करील.

१३) पण जर तुम्हांस तसं खाजगी बोलण्याआधी दान करण्यासाठी (खर्चाचं) भय वाटत असेल म्हणून तुम्ही तसं केलं नाही आणि अल्लाहनं तुम्हांस माफ केलं तर मग नमाज कायम करा (नियमितपणे नमाजचे पठण करत जा) आणि जकात अदा करत जा. अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांच्या आज्ञा पाळा. तुम्ही करत असलेलं कार्य अल्लाहस माहीत आहे.

१४) तुम्ही अशा लोकांना पाहिलं नाही जे अशा लोकांशी संधान साधतात ज्याच्यावर अल्लाहचा कोप गुदरला आहे. ते तुमच्यापैकी नाहीत आणि त्यांच्यापैकीही नाहीत. आणि जाणूनबुजून ते खोट्या गोष्टीवर शपथ वाहतात.

१५) अल्लाहनं त्यांच्यासाठी कडक शिक्षा योजिली आहे. ते फार वाईट कर्मं करत आहेत.

१६) त्यांनी आपल्या शपथांना बचावाचं साधन केलंय आणि अल्लाहच्या मार्गात अडथळे आणतात म्हणून त्यांना अपमानजनक शिक्षा असेल.

१७) त्यांची संतती आणि संपत्ती त्यांना अल्लाहपासून काहीएक वाचवू शकणार नाही. हे नरकात जाणारे लोक आहेत. कायम तिथंच राहतील.

१८) ज्या दिवशी त्या सर्वांना अल्लाह परत उठवेल, तेव्हा ते त्याच्यापाशी शपथ वाहतील जसे तुमच्यासमोर शपथ वाहत असत. आणि त्यांना काहीतरी लाभेल असं वाटतं. पण लक्षात ठेवा, ते खोटारडे आहेत.

१९) सैतानानं त्यांच्यावर ताबा मिळवला असून त्यानं त्यांना अल्लाहचं

स्मरण विसरावयास भाग पाडलं. ही सैतानाची मंडळी आहे आणि सैतानाची मंडळी नाश पावणार.

२०) जे लोक अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या विरूद्ध जातात ते अतिशय हीन लोक असतात.

२१) अल्लाहनं अनिवार्य ठरवलं, 'मी आणि माझा प्रेषितच फक्त वर्चस्व गाजवणार.' अल्लाह प्रभुत्वशाली आणि सामर्थ्यवान आहे.

२२) जे लोक अल्लाह आणि परलोकावर विश्वास ठेवतात ते अशा लोकांवर प्रेम करतील जे अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताच्या विरूद्ध जातात, असे तुम्हाला आढळणार नाही. जरी ते त्यांचे वाडवडील असोत अथवा त्यांची मुलं, त्यांचे भाऊबंध अथवा त्यांचे नातेवाईक असले तरी. अशा लोकांच्या अंत:करणात अल्लाहनं श्रद्धा बिंबवलेली आणि स्वत:कडून त्यांच्या चैतन्यास बळकट केलंय. त्यांना तो अशा स्वर्गामध्ये दाखल करील ज्याच्या खालून नद्या वाहत असतात. तिथं ते सर्वदा राहतील. अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न आणि ते अल्लाहशी प्रसन्न. हे अल्लाहच्या पक्षाचे लोक आहेत. अल्लाहचा पक्षच सफल ठरणार.

-------

# ५९. सूरह अल-हश्र

**मदीनाकालीन, आयती २४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अवघ्या अवकाश आणि पृथ्वीमधील सारंकाही अल्लाहचा गौरव साजरा करत असतात. तो प्रतिभाशाली सर्वोच्च आहे.

२) तोच ज्यानं ग्रंथधारकांमधील अश्रद्धांना, पहिल्या जमावाद्वारेच त्यांच्या घरांतून घालवून दिलं. ते निघून जातील अशी तुम्ही कल्पनासुद्धा केली नव्हती आणि त्यांची तटबंदी अल्लाहविरूद्ध त्यांचा बचाव करील असे त्यांना वाटले होते. पण त्यांच्यावर अल्लाहचा (कोप) अशा प्रकारे आला ज्याचा त्यांनी विचारही केला नव्हता आणि त्यामुळं त्यांच्या हृदयांवर धाक बसली. ते आपली घरंदारं आपल्या हातांनी आणि श्रद्धावंतांच्या मदतीनं उद्ध्वस्त करू लागले. तेव्हा जे डोळस आहेत त्यांना (या घटनेपासून) धडा घेऊ द्या.

३) अल्लाहनं त्यांना हद्दपार करणं विहीत केलं नसतं तर त्यांना या जगातच शिक्षा दिली असती. परलोकात मात्र त्यांना नरकाग्नीची शिक्षा असेल.

४) याचं कारण असं की ते अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताचा विरोध केला. आणि जो अल्लाहला विरोध करतो त्यास अल्लाह कठोर शिक्षा देतो.

५) तुम्ही झाडं कापून टाकली अथवा त्यांना मुळांवर उभं राहू दिलं ते अल्लाहच्या अनुमतीला अनुसरूनच. जे उल्लंघन करतात अशांना अपमानित करण्यासाठी.

६) अल्लाहनं आपल्या प्रेषितास जे काही (धन) मिळवून दिलं त्यासाठी तुम्ही घोडे आणि उंटांनी त्यांच्यावर स्वारी केली नव्हती तर अल्लाह आपल्या प्रेषितास आपल्या इच्छेनुसार कुणावरही वर्चस्व बहाल करतो. अल्लाह प्रत्येक बाबीस समर्थ आहे.

७) अल्लाहनं वस्तीतील लोकांकडून जे (माल) आपल्या प्रेषितास बहाल केलं ते अल्लाहसाठी आणि प्रेषितासाठी तसेच त्यांच्या नातलगांसाठी, अनाथ, निराधार आणि वाटसरूंसाठी आहे. कारण धनसंपत्ती तुमच्यामधील श्रीमंतांमध्येच फिरत राहू नये. प्रेषित तुम्हांस जे देतील तेवढं घ्या. ज्याची मनाई करतील, त्यास वर्ज्य करा. अल्लाहचं भय राखा, अल्लाहची शिक्षा खरंच कठोर असते.

८) आणि (त्यामधील काही भाग) अशा निर्वासितांसाठी आहे ज्यांना त्यांच्या घरादारांतून आणि मालमत्तेवरून घालवून दिलं गेलंय. आणि ते अल्लाहची कृपा आणि प्रसन्नतेच्या शोधात असतात, अल्लाह आणि त्याच्या प्रेषितास ते मदत करतात. हेच लोक प्रामाणिक आहेत.

९) आणि जे लोक पूर्वीपासून मदीनेत राहत आहेत आणि श्रद्धा धारण केली आणि जे देशत्याग करून (हिजरत) त्यांच्याकडं येतात त्यांच्याशी स्नेहानं वागतात आणि त्यांना (निराश्रितांना) जे दिलं गेलं त्यासाठी आपल्या मनांमध्ये काही अपेक्षा बाळगत नाहीत आणि स्वत: टंचाईत असतानासुद्धा त्यांना प्राधान्य देतात. ज्याने स्वत:स हांव आणि लोभापासून वाचवलं तेच सफल होणार आहेत.

१०) त्यांच्यानंतर जे आले ते म्हणतात, आमच्या विधात्या! क्षमा कर आम्हांस आणि आमच्या भावांस ज्यांनी आमच्या आधी श्रद्धा धारण केली. आणि आमच्या विधात्या! आमच्या अंत:करणामध्ये त्यांच्याविषयी द्वेषभावना ठेवू नकोस ज्यांनी श्रद्धा धारण केली. तू निश्चितच कनवाळू आणि दयावंत आहेस.

११) तुम्ही दांभिकांना ग्रंथधारकांपैकी आपल्या भाऊबंधांना, ज्यांनी नकार दिला असं सांगताना ऐकलं नाही, जर तुम्हांस काढलं गेलं तर आम्हीही तुमच्याबरोबर निघू आणि तुमच्या बाबतीत आम्ही कुणाचं काही ऐकून घेणार नाही. तुमच्याशी जर कुणी युद्ध केलं तर आम्ही तुम्हाला मदत करू, पण अल्लाह साक्ष देतो, ते लबाड आहेत.

१२) जर त्यांना काढलं गेलं तर हे त्यांच्याबरोबर बाहेर पडणार नाहीत. त्यांच्यावर हल्ला झाला तर हे त्यांच्या मदतीस जाणार नाहीत. त्यांनी

जरी त्यांना साथ दिली तरीही ते निश्चितच पाठ वळवतील. आणि मग त्यांच्या मदतीस कुणी नसणार.

१३) त्यांच्या मनांमध्ये अल्लाहपेक्षा तुमचीच भीती जास्त आहे. याचं कारण त्यांना समज नाही.

१४) ते एकत्रिपणे तुमच्याशी युद्ध करणार नाहीत, तर सुरक्षित (तटबंदी) असलेल्या गावांत किंवा भिंतींच्या आडून. ते आपसांत एकमेकांचे कट्टर विरोधक आहेत. तुम्ही त्यांना एकसंघ समजता, पण त्यांची मनं दुभंगलेली आहेत. याचे कारण असे की त्या लोकांना समजत नाही.

१५) अशा लोकांप्रमाणं जे अलीकडच्या (काळात) त्यांच्या आधी होऊन गेले, ज्यांनी आपल्या कृतीची फळं चाखली आहेत त्यांना दु:खद शिक्षा आहे.

१६) सैतानासारखं ज्यानं मानवास बंड करण्यास सांगितलं. जेव्हा त्यानं बंड केलं, तो म्हणू लागला, माझं तुमच्याशी काही देणंघेणं नाही. मी तर सकल विश्वांचा विधाता- अल्लाहस भित आहे.

१७) पण शेवटी दोन्हींना कायमस्वरूपी नरकाग्नीत जायचंय. अपराधींना हीच शिक्षा असेल.

१८) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहशी भित राहा. त्यानं उद्यासाठी आगाऊ काय पाठवलंय ते प्रत्येकानं पाहून घ्यावा. अल्लाहस भिऊन राहा, कारण अल्लाहस तुम्ही जे काय करता ते माहीत असते.

१९) आणि जे लोक अल्लाहस विसरून जातात त्याप्रमाणं होऊ नका. ज्यावर (अल्लाहनं) त्यांना स्वत:लाच विसरावयास लावलं. असे लोक उल्लंघनकारी असतात.

२०) नरकवाले आणि स्वर्गाचे सोबती एकसमान नसतात, तर स्वर्गाचे धनीच उत्कर्ष पावतात.

२१) आम्ही जर हे कुरआन कुणा पर्वतावर अवतरलं असते तर तुम्ही त्यास पाहिलं असता अल्लाहच्या भीतीनं नमून तो चिरडला गेला असता.

आम्ही लोकांच्या चिंतनासाठी अशी उदाहरणं देत असतो.

२२) तोच अल्लाह आहे त्याच्याशिवाय इतर ईश्वर नाही. गुप्त आणि प्रकट सारं त्यास ठाऊक आहे. तो नितांत कृपाळू आणि दयावंत आहे.

२३) तोच अल्लाह त्याच्याशिवाय कुणी ईश्वर नाही. तोच सार्वभौम, परम पवित्र, परिपूर्ण शांती, संरक्षणकर्ता, सर्वोच्च, सर्वसामर्थ्यवान आणि महिमाशाली, आणि ते भागीदार ठरवतात त्यापासून पवित्र.

२४) अल्लाहच तो निर्माता, नव्यानं साकारणारा आणि आकार देणारा. जितकी म्हणून सुंदर नावं सारी त्याचीच. अवघ्या अवकाश आणि पृथ्वीमधील सारे त्याचीच प्रशंसा साजरी करतात. तोच सर्वोच्च प्रतिभासंपन्न आहे.

-------

# ६०. सूरह अल-मुमतहिना

### मदीनाकालीन, आयती १३

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हे श्रद्धावंत लोकहो, जे माझे आणि तुमचे शत्रू आहेत त्यांच्याशी सलगी करू नका. तुम्ही अशा लोकांशी प्रेमानं वागता, ज्यांनी तुमच्याकडं जे सत्य आलंय त्यास नाकारलं. प्रेषितास आणि तुम्हांस बाहेर लावून देतात, कारण तुम्ही अल्लाहवर विश्वास ठेवता, तुमचा तो विधाता आहे. तुम्ही माझ्या कारणास्तव माझ्या प्रसन्नतेखातर संघर्ष करत निघाले असता त्यांच्याशी गुप्तपणे मैत्री साधता. पण मला ठाऊक आहे तुम्ही काय लपवून ठेवता आणि काय जाहीर करता. तुमच्यामधील जे लोक अशी कामं करतात ते रास्त मार्ग चुकलेले आहेत.

२) जर त्यांनी तुमच्यावर ताबा मिळवला तर ते तुमचे शत्रू होतील आणि तुमच्यावर वाईट हेतूनं आपल्या हातांनी आणि जिभांनी तुटून पडतील आणि तुम्हीही नाकारणारे होऊन जावं हीच त्यांची इच्छा असते.

३) कयामतच्या दिवशी तुमचे सगेसोयरे आणि तुमची मुलं काही कामी येणार नाहीत. तो तुम्हांस विभक्त करून टाकील. तुम्ही जे करत आहात ते अल्लाहच्या पाहणीत आहे.

४) तुमच्या समोर तर इब्राहीम आणि जे त्यांच्याबरोबर होते त्या लोकांचा उत्तम आदर्श आहे. जेव्हा त्यांनी आपल्या लोकांस सांगून टाकलं, आम्हांस तुमच्याशी आणि अल्लाहव्यतिरिक्त तुम्ही ज्यांची पूजा करता त्यांच्याशी काही संबंध नाही. आम्ही तुम्हांस धुडकावून लावतो. आता आमच्यामधील तसंच तुमच्यामधील कायमचे द्वेष आणि शत्रुत्व उघडकीस आले आहेत. तुम्ही एकमेव अल्लाहची श्रद्धा धारण करेपर्यंत. पण इब्राहीम आपल्या पित्यास म्हणाले, मी तुमच्याकरिता क्षमा मागेन, पण अल्लाहकडून तुमच्या बाबतीत मला काही अधिकार नाही. (त्यांनी दुआ केली-) आमच्या विधात्या! तुझ्यावरच आम्ही विश्वास टाकला. तुझ्याशीच पश्चात्ताप व्यक्त करतो. तुझ्याकडंच अंतिमत: आम्हांस

परतावयाचंय.

५) आमच्या विधात्या! ज्यांनी नाकारलं त्यांच्यासाठी आमचा बळी घेऊ नकोस. आमच्या विधात्या! आम्हांस क्षमा कर. तूच शर्वज्ञ आणि सर्वोच्च आहेस.

६) आणि जे लोक अल्लाहची भेट आणि शेवटच्या दिनाची आशा बाळगतात त्यांच्यामध्ये तुम्हांस उत्कृष्ट आदर्श आहे. जर कुणी तोंड फिरवत असेल तर अल्लाह गरजमुक्त आणि प्रशंसेस पात्र आहे.

७) असेही होऊ शकते की अल्लाह तुमच्यामध्ये आणि ज्यांना तुम्ही शत्रू लेखता त्यांच्यामध्ये स्नेह उत्पन्न करील, अल्लाह (त्यास) समर्थ आहे आणि क्षमा करणारा नितांत दयावंत आहे.

८) जे लोक धर्माचे कारण (पुढं) करून तुमच्याशी लढत नाहीत आणि तुम्हांस तुमच्या घरादारांतून काढलं नाही त्यांच्याशी तुम्ही सलोख्यानं आणि न्यायानं वागण्यास अल्लाह मनाई करत नाही. न्यायी लोक अल्लाहच्या आवडीचे असतात.

९) पण अल्लाह तुम्हांस अशा लोकांशी मैत्री करण्यास मनाई करतो जे धर्माचे कारण करून तुमच्याशी लढतात, तुम्हांस तुमच्या घरादारांतून हाकलून देतात आणि तुम्हांस घालवून देण्यासाठी मदत पुरवितात. जे त्यांना आपले मित्र बनवतील ते लोक अपराधी असतात.

१०) श्रद्धावंत लोकहो, तुमच्याकडं निराश्रित (महाजिर) श्रद्ध स्त्रिया येतील तेव्हा त्यांना पडताळून पाहा. त्यांच्या श्रद्धेच्या बाबतीत अल्लाहस ठाऊक असते. तुम्हांस त्या श्रद्धावंत असल्याचं कळून आल्यास त्यांना नाकारणाऱ्यांकडं परतवू नका. त्या त्यांच्या (अश्रद्ध पुरुषांसाठी) वैध नाहीत आणि ते त्यांच्यासाठी (श्रद्ध स्त्रियांसाठी) वैध नाहीत. तुम्ही त्यांना त्यांनी केलेला खर्च देऊन टाका. तुम्ही त्यांच्याशी रीतसर स्त्रीधन (महेर) देऊन विवाह केले तर त्यात काही दोष नाही. तसंच तुम्ही अश्रद्ध स्त्रियांना विवाहसंबंधात अडकवून ठेवू नका. आणि तुम्ही केलेला खर्च त्यांच्याकडून मागून घ्या आणि त्यांनीही तुमच्याकडून

खर्च केलं ते मागून घ्यावे. हे अल्लाहचे आदेश आहेत. तो तुम्हांमध्ये न्याय करतो. अल्लाह प्रतिभासंपन्न असून त्यास सर्व माहीत आहे.

११) तुमच्या पत्नींमधून कुणी जर नाकारणाऱ्यांकडं निघून गेली, तर मग जेव्हा तुम्हांस संधी मिळेल तेव्हा ज्यांच्या पत्नीं गेल्या असतील त्यांना त्यांनी जो खर्च केला असेल तो देऊन टाका. अल्लाहची भीती बाळगा, ज्यावर तुमची श्रद्धा आहे.

१२) हे प्रेषित तुमच्याकडं श्रद्ध स्त्रिया ही प्रतिज्ञा वाहण्यासाठी येतील की त्या अल्लाहस कुणी भागीदार जोडणार नाहीत, चोरी करणार नाहीत, व्यभिचार करणार नाहीत, आपल्या बालकांचा वध करणार नाहीत आणि आपल्या हातां-पायांपुढं बनावट काही रचून उभं करणार नाहीत (दुसऱ्या व्यक्तीच्या मुलाचा आपल्या पतीशी संबंध जोडणे) तसेच भल्या कामात तुमची अवज्ञा करणार नाहीत, तर तुम्ही त्यांची प्रतिज्ञा स्वीकारा. अल्लाह निश्चितच कृपाळू आणि दयावंत आहे.

१३) श्रद्ध लोकहो, तुम्ही अशांना आपलं संरक्षक बनवू नका ज्यांच्यावर अल्लाहचा कोप आहे. ते परलोकाबाबत निराश झालेले आहेत जसे कबरीत गेलेल्यांशी नाकारणारे निराश आहेत.

-------

# ६१. सूरह अस्सफ

**मदीनाकालीन, आयती १४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अवघ्या अवकाश आणि पृथ्वीमध्ये जे काही आहे ते अल्लाहचं पावित्र्यगान करतात. तो सर्वोच्च आणि प्रज्ञासंपन्न आहे.

२) श्रद्धावंत लोकहो, ज्या गोष्टी तुम्ही करत नसता त्या बोलून का दाखवता?

३) तुम्ही जे करून दाखवत नाही ते बोलणं अल्लाहस मुळीच पसंत नाही.

४) पण अल्लाहस ते लोक आवडतात जे अल्लाहच्या कारणास्तव फळी बांधून लढतात, जणूकाही ते शिस्यानं बांधलेली भिंतच आहेत.

५) आठवा, जेव्हा मूसा (अ.) आपल्या लोकांस म्हणत होते, माझ्या लोकहो, तुम्ही का बरं मला त्रास देता. मी तुमच्याकडं अल्लाहनं पाठवलेला प्रेषित आहे हे तुम्हांस कळून आलं असतादेखील. मग जेव्हा ते वाकडं चालू लागले तेव्हा अल्लाहनं त्यांची हृदयं वाकडी करून टाकली. अल्लाह उल्लंघन करणाऱ्यांना मार्ग दाखवत नसतो.

६) आणि आठवा, जेव्हा मरयमपुत्र ईसाने इस्राईलच्या लोकांस सांगितलं, मला तुमच्याकडं अल्लाहनं पाठवले आहे. माझ्या आधी आलेल्या तौरातची पुष्टी करतो आणि माझ्यानंतर येणाऱ्या प्रेषिताची खूशखबर देतो ज्याचं नाव अहमद (प्रशंसनीय) असेल. त्यांना जेव्हा त्यांनी उघड प्रमाण दाखवून दिले. ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे.

७) त्याच्यापेक्षा अन्यायी दुसरा कोण जो अल्लाहबाबत खोटंनाटं रचतो, त्यास इस्लामकडं बोलवत असता? अल्लाह अत्याचारींना मार्ग दाखवत नसतो.

८) ते अल्लाहच्या प्रकाशास फुंकर घालून विझवू पाहताहेत. पण अल्लाह आपला प्रकाश परिपूर्ण करूनच सोडील, मग नाकारणाऱ्यांस कितीही

वाईट वाटलं तरीही.

९) अल्लाहनं आपले प्रेषित मार्गदर्शनासाठी सत्य धर्म देऊन पाठवलं. सर्व धर्मावर वर्चस्व गाजवण्यासाठी, अनेकेश्वरींना ते कितीही वाईट वाटले तरी.

१०) श्रद्धावंत लोकहो, मी तुम्हांस असा व्यवहार दाखवू जो तुम्हांस दु:खद शिक्षेपासून वाचवील?

११) अल्लाह आणि प्रेषिताशी एकनिष्ठ व्हा. आणि अल्लाहच्या कारणास्तव आपली संपत्ती आणि आपले जीव पणास लावा हे तुमच्या हिताचं आहे, तुम्हांस ते कळलं तर.

१२) तो तुमची पापं क्षमा करून टाकील आणि तुम्हांस अशा स्वर्गात प्रवेश देईल ज्याच्या खालून नद्या वाहतात. आणि कायमस्वरूपी बागांमध्ये पावन अशी निवासं. ही महान फलश्रुती होय.

१३) आणि तुमच्या आवडीचे दुसरे... अल्लाहकरवी तुम्हाला मदत आणि त्वरित विजय. श्रद्धावंतांना खूशखबर देऊन टाका.

१४) श्रद्धावंत लोकहो, तुम्ही अल्लाहचे मदतनीस व्हा. मरयमपुत्र ईसा (अ.) यांनी आपल्या शिष्यांना म्हटल्याप्रमाणं, ''कोण मला मदत करतील, अल्लाहच्या (मार्गात),'' शिष्य म्हणाले, ''आम्ही अल्लाहचे मदतनीस आहोत.'' तेव्हा इस्राईलच्या लोकांपैकी एका गटानं श्रद्धा ठेवली आणि दुसऱ्या समूहानं नकार दिला. मग आम्ही त्यांच्या शत्रूंविरूद्ध त्यांची साथ दिली म्हणून त्यांनी वर्चस्व मिळवलं.

-------

# ६२. सूरह अल-जुमुआ

**मदीनाकालीन, आयती ११**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अवघ्या अवकाश आणि पृथ्वीमधील सर्वकाही अल्लाहची प्रशंसा साजरी करतात. सार्वभौम, परिपूर्ण पावित्र्य आणि प्रभुत्वशाली व प्रतिभासंपन्न.

२) तोच ज्यानं निरक्षर (ग्रंथहीन) लोकांत त्यांच्यापैकीच एक प्रेषित पाठवला, तो त्यांना आयती वाचून दाखवतो, पावन करतो आणि ग्रंथ व ज्ञानाची शिकवण देतो. तत्पूर्वी हे लोक उघड मार्गभ्रष्ट होते.

३) आणि त्यांच्यामधील नंतरच्या लोकांसाठीसुद्धा जे अद्याप त्यांना मिळाले नाहीत. तो सर्वोच्च प्रतिभाशाली आहे.

४) हे अल्लाहचं औदार्य आहे, मर्जीस येईल त्यास बहाल करतो आणि अल्लाह भरमसाट विपुलतेचा स्वामी आहे.

५) ज्या लोकांवर तौरात (ग्रंथाचा) भार टाकला गेला. त्यांनी ती जबाबदारी खऱ्या अर्थानं उचलली नाही, त्यांचं उदाहरण प्रचंड ओझं उचललेल्या गाढवाप्रमाणं आहे. जे अल्लाहच्या आयतींशी (वचनांशी) लबाडी करतात त्यांची अवस्था वाईट लोकांसारखी आहे. अल्लाह अत्याचारींना मार्ग दाखवत नसतो.

६) यहुदी लोकांना सांगा, इतर लोकांना वगळून अल्लाहनं फक्त तुम्हांसच मित्र केल्याचा हक्क सांगत असाल आणि तुम्ही खरं असाल तर मग मरणाची इच्छा करा.

७) पण त्यांनी आपल्या हातांनी जे पुढं पाठवलंय त्यामुळं ते कधीही तशी इच्छा बाळगणार नाहीत.अल्लाह अत्याचारींना ओळखून असतो.

८) त्यांना सांगा, ज्या मृत्यूपासून तुम्ही पळ काढता तो तुम्हांस गाठणारच आहे. तुम्हांस मग जो गुप्त आणि उघड गोष्टी जाणतो त्याच्याकडं

परतवले जाईल. आणि तुम्हांस तुम्ही केकेली कामं दाखवून देईल.

९) श्रद्ध लोकहो, जुमुआच्या नमाजासाठी हाक देताच अल्लाहच्या स्मरणासाठी तत्परतेने जा आणि सर्व व्यवहार सोडून द्या, तुम्हांस कळत असेल तर हे तुमच्या भल्याचे आहे.

१०) आणि मग नमाज संपेल तेव्हा भूतलावर विखरून जा आणि अल्लाहची विपुलता शोधा आणि सतत अल्लाहस आठवत राहा म्हणजे तुमचा अभ्युदय घडेल.

११) जेव्हा काही सौदा किंवा खेळ-तमाशा दिसतो ते त्याकडं आकर्षित होऊन निघून जातात तुम्हांस उभं सोडून. त्यांना सांगा, अल्लाहपाशी आहे ते खेळ-तमाशा व्यापारापेक्षाही उत्तम आहे. अल्लाहच उत्तम तरतूद करून देणारा आहे.

-------

# ६३. सूरह अल-मुनाफिकुन

**मदीनाकालीन, आयती ११**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) दांभिक लोक तुमच्याकडं येऊन म्हणतात, तुम्ही खरोखर अल्लाहचे प्रेषित आहात याची आम्ही साक्ष देतो. अल्लाहस ठाऊक आहे तुम्ही खरोखर त्याचे प्रेषित आहात ते. पण अल्लाह साक्ष देतो हे दांभिक खरोखर खोटारडे आहेत.

२) ते आपल्या शपथांचे निमित्त करून, अल्लाहच्या मार्गापासून अडवणूक करतात ते जे करतात ते वाईट आहे.

३) याचं कारण, त्यांनी श्रद्धा धारण केली आणि मग नाकारलं, म्हणून त्यांच्या हृदयांवर मोहर लावली, आता त्यांना समजत नाही.

४) तुम्ही त्यांना पाहिल्यास त्यांच्या शरीरयष्टीचं तुम्हांस अपरुप वाटतं. ते बोलत असतात तुम्ही त्यांना (कान लावून) ऐकता, जणू भिंतीस लावून उभे केलेले लाकडाचे ठोकळे. प्रत्येक आरोळीस ते स्वत:च्या विरूद्ध समजतात, ते तुमचे शत्रू आहेत, त्यांच्यापासून सावध राहा. अल्लाहचा मार त्यांच्यावर, ते कुठं फिरवले जातात.

५) जेव्हा त्यांना सांगितलं जातं, या, अल्लाहचे प्रेषित तुमच्या क्षमेची याचना करतील. ते आपली डोकी बाजूस सारतात. तुम्ही त्यांना पाहिल्यास ते ऐटीनं आपली तोंडं वळवतात.

६) तुम्ही त्यांच्यासाठी क्षमायाचना करा अथवा करू नका त्यांना ते सारखंच आहे. अल्लाह त्यांना क्षमा करणार नाही. निश्चितच अवज्ञाकारींना अल्लाह क्षमा करत नसतो.

७) ते असे लोक आहेत जे म्हणतात, ''अल्लाहच्या प्रेषिताकडं जे लोक आहेत त्यांचा खर्च भागवू नका, अगदी शेवटपर्यंत म्हणजे ते पळून जातील.'' पण आकाशं आणि पृथ्वीतील सर्व खजिने अल्लाहचे

आहेत, हे दांभिकांना समजत नाही.

८) ते म्हणतात, आम्ही मदीनेस परतलो तर जे प्रतिष्ठित आहेत ते खालच्या थरांतील लोकांना घालवून देतील, पण प्रतिष्ठा तर अल्लाह त्याच्या प्रेषितासाठी आणि श्रद्धावंतासाठी असते, पण हेसुद्धा दांभिकांना माहीत नाही.

९) श्रद्धावंत लोकहो, तुमची संपत्ती आणि तुमच्या संततीमुळं अल्लाहच्या स्मरणाकडं दुर्लक्ष होता कामा नये. कुणी असं करत असेल तर ते लोक अपयशी ठरतील.

१०) तुम्हांस बहाल केलेल्या साधनांमधून तुम्ही खर्च करा, तुमच्यापैकी कुणास मृत्यू येण्यापूर्वी आणि त्यानं म्हणावं, 'माझ्या विधात्या, मला थोडीशी मुदत सवडीसाठी का दिली नाही, मी दान केले असते आणि नेक लोकांपैकी झालो असतो.

११) मुदत संपल्यास अल्लाह कोणासही सवड देत नसतो. तुम्ही जे करत राहता ते अल्लाहस ठाऊक असतं.

-------

# ६४. सूरह अत-तगाबुन

**मदीनाकालीन, आयती १८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आकाशं आणि पृथ्वीवर आहेत ते अल्लाहची प्रशंसा साजरी करतात. अधिराज्य त्याचंच. गौरव त्याचाच. तोच सर्व बाबींवर प्रभुत्व राखतो.

२) तोच ज्यानं तुम्हांस निर्माण केलं. तुमच्यामधील काहींनी नाकारलं तर काहींनी मान्य केलं. तुमच्या कृती अल्लाहस माहीत असतात.

३) आकाश आणि पृथ्वीस हक्कानं निर्माण केलं. त्यानंच तुम्हांस साकारलं आणि सुंदर आकार दिला. त्याच्याकडं तुम्हांस शेवटी परतावयाचंय.

४) अवघ्या अवकाश आणि पृथ्वीमधील जे काही आहे त्यास तो जाणतो. आणि तुम्ही जे गुप्त ठेवता आणि जे जाहीर करता तेही तो जाणतो. अल्लाहस अंत:करणातील माहिती असते.

५) पूर्वी ज्यांनी नाकारलं त्यांचं कथानक तुम्हांपर्यंत पोचलं नाही? त्यांनी आपल्या आचरणाचा दुष्ट परिणाम भोगला आणि त्यांना दु:खद शिक्षा घडली.

६) कारण असं की त्यांचे प्रेषित त्यांच्याकडं स्पष्ट प्रमाणं आणली असता ते म्हणाले, 'आम्हांस मनुष्य मार्गदर्शन करणार?' आणि म्हणून त्यांनी नाकारलं आणि मागं वळले. मग अल्लाहसुद्धा त्यांच्यापासून मुक्त झाला. अल्लाह गरजमुक्त आणि प्रशंसेस पात्र आहे.

७) नाकारणारे लोक ठासून सांगत असतात, त्यांना काही केल्या परत उठवलं जाणार नाही. त्यांना सांगा, होय. का नाही? माझ्या विधात्याची शपथ! तुम्ही खात्रीनं उठवले जाणार. आणि मग तुम्हाला दाखवून दिल्या जातील तुमच्या कृती. अल्लाहसाठी तर हे सोपं आहे.

८) तेव्हा अल्लाह आणि त्याच्या प्रेषितावर श्रद्धा ठेवा आणि त्याच्या प्रकाशावर (कुरआनवर) आम्ही अवतरलेलं. तुम्ही काय ते करत असता, अल्लाहच त्याच्याशी परिचित आहे.

९) एकत्र येण्याच्या दिवशी (कयामत) जेव्हा तो तुम्हांस गोळा करील, तो दिवस आपसातील जय-पराजयाचा असेल. ज्यानं अल्लाहवर विश्वास ठेवला आणि भली कर्मं केलीत त्याच्यापासून दुष्ट गोष्टी बाजूस सारल्या जातील आणि त्यास स्वर्गामध्ये प्रवेश दिला जाईल ज्याच्याखालून नद्या वाहतात. तिथं ते सदासर्वदा राहतील. हा महान असा उत्कर्ष घडेल.

१०) ज्यांनी बंड केलं, आमच्या आयतींना नाकारलं असे लोक नरकाग्नीत जातील. तिथंच कायमस्वरूपी राहतील आणि हे वाईट ठिकाण आहे.

११) अल्लाहच्या अनुमतीशिवाय कोणतेही अरिष्ट येत नसते. जो अल्लाहशी एकनिष्ठ असतो अल्लाह त्याच्या मनास मार्ग दाखवतो. अल्लाहस प्रत्येक बाबी ठाऊक असतात.

१२) अल्लाहची आज्ञा पाळा आणि प्रेषिताच्या आज्ञा पाळा, पण जर तुम्ही पाठ फिरवली तर आमच्या प्रेषितांवर तुम्हांस उघडउघड पोचतं करण्यापलीकडं काही नाही.

१३) अल्लाहच आहे, त्याच्याव्यतिरिक्त इतर कुणी ईश्वर नाही आणि श्रद्ध लोक अल्लाहवर विश्वास टाकतात.

१४) श्रद्ध लोकहो! तुमच्या पत्नीपैकी कुणी आणि मुलांमध्ये कुणी तुमचे शत्रू आहेत, त्यांच्याशी जपून राहा. तुम्ही जर क्षमा केली अथवा दुर्लक्ष केलं आणि त्यांना माफ केलं तर अल्लाह क्षमा करणारा आणि दया दाखवणारा आहे.

१५) तुमची संपत्ती आणि तुमची संतती तुमच्या परीक्षेसाठी आहेत. आणि अल्लाहपाशी महान मोबदला आहे.

१६) तेव्हा जमेल तेवढं अल्लाहचं भय राखा, त्याचं ऐका आणि माना व खर्च करा, हे तुमच्या भल्यासाठी आहे. जे स्वत:स लालसेपासून वाचवतात त्यांचाच उत्कर्ष होईल.

१७) तुम्ही अल्लाहस चांगलं कर्ज दिलं तर तो तुम्हांस दुपटीनं देईल आणि तुम्हांस क्षमा करील. अल्लाह प्रतिसाद देणारा आणि सहनशील आहे.

१८) गुप्त आणि प्रकट जाणून आहे, प्रभुत्वशाली आणि विद्वत्ताप्रचूर आहे.

-------

# ६५. सूरह अत-तलाक

**मदीनाकालीन, आयती १२**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हे प्रेषित! तुम्हाला स्त्रियांना घटस्फोट (तलाक) द्यायचे झाल्यास इद्दतच्या अवधीत तलाक द्या आणि इद्दतच्या अवधीची गणना करा. अल्लाहची भीती बाळगा. अल्लाह तुमचा विधाता आहे. त्यांना त्यांच्या घरांतून बाहेर काढू नका, त्यांनीही घराबाहेर पडू नये, त्या उघडपणे व्यभिचार करत असल्या तर तो अपवाद वगळून.ह्या अल्लाहनं घालून दिलेल्या मर्यादा होय. जो अल्लाहच्या मर्यादा ओलांडतो, तो स्वत:वरच अत्याचार ओढवून घेतो. तुम्हांस माहीत नाही, यानंतरदेखील अल्लाह एखादा नवीन मार्ग काढू शकतो.

२) जेव्हा त्या त्यांची नियुक्त इद्दतचा अवधी पूर्ण करतील, तेव्हा त्यांना प्रचलित रितीनं (विवाहबंधनात) रोखून ठेवा किंवा प्रचलित रितीनं त्यांना निरोप द्या. आणि तुम्हांपैकी दोन साक्षीदार घ्या, जे न्यायी असतील. आणि अल्लाहसाठीच साक्ष द्या. आणि अल्लाह आणि शेवटच्या दिनावर ज्यांचा विश्वास आहे त्यांना ही ताकीद दिली जाते. जो अल्लाहस भित असतो त्याच्यासाठी मार्ग काढतो.

३) आणि त्यास कल्पनाही नसेल. अशा प्रकारे निर्वाहाची तरतूद करतो. जो अल्लाहवर विश्वास ठेवतो, त्यास तो पुरेसा आहे. अल्लाह आपलं कार्य पूर्णत्वास नेत असतो. अल्लाहनं सर्व गोष्टींची योजना केली आहे.

४) तुमच्या स्त्रियांपैकी ज्यांना मासिक ऋतु येण्याची आशा नसेल आणि तुम्हांस संशय असेल तर त्यांच्या इद्दतची अवधी तीन महिने आहे. तसंच त्या स्त्रियांचीही ज्या (अज्ञान) असल्यानं मासिक ऋतु आला नाही आणि ज्या गर्भवती आहेत त्यांचा इद्दतचा अवधी त्यांनी गर्भास जन्म देईपर्यंत आहे. जो अल्लाहची भीती बाळगतो, अल्लाह त्याचं काम सोपं करून देतो.

५) ह्या अल्लाहच्या आज्ञा आहेत, त्यानं तुमच्यासाठी पाठवलेल्या. आणि जो अल्लाहच्या भीतीनं वागतो तो त्यांचे दोष दूर करतो आणि त्यास मोठा मोबदला देतो.

६) त्यांना तुम्ही त्याच पद्धतीनं राहू द्या जसं तुम्ही राहता आणि त्यांना अडचणीत टाकण्यासाठी त्रास देऊ नका. त्या गर्भवती असतील तर त्यांनी मुलास जन्म देईपर्यंत खर्च करा. तुमच्या बालकास दूध पाजत असतील तर त्यांना त्याचा मोबदला द्या आणि परस्पर रीतसर सल्लामसलत करत जा. पण जर आपसात ओढाताण कराल तर त्या बालकास दुसरी स्त्री दूध पाजील.

७) ज्यास मोकळीस लाभली असेल त्यानं आपल्या ऐपतीनुसार खर्च करावा. आणि ज्यास त्याची साधनं काटकसरीनं दिली असतील तर अल्लाहनं त्यास दिल्याप्रमाणंच खर्च करावा. अल्लाह कोणासही जे दिलंय त्याबाहेर त्यावर ओझं टाकत नसतो. अल्लाह टंचाईनंतर लवकरच उदारता बहाल करील.

८) कित्येक समूह होऊन गेले ज्यांनी आपल्या विधात्या आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञांकडं तोंड फिरवलं तेव्हा आम्ही त्यांचा कसून हिशेब घेतला आणि त्यांना वाईट पद्धतीची शिक्षा दिली.

९) त्यांनी आपल्या कृतीचा वाईट परिणाम भोगला आणि त्यांच्या कृतीची सांगता विनाशात झाली.

१०) आम्ही त्यांच्यासाठी कडक शिक्षा तयार ठेवलीय. तेव्हा अल्लाहस भित राहा. समजुतदार श्रद्ध लोकहो, अल्लाहनं तुमच्यासाठी शिकवण पाठवलीय.

११) प्रेषित तुम्हांस अल्लाहच्या आयती स्पष्ट करून वाचून दाखवतो, ज्या लोकांनी श्रद्धा बाळगून सुधारले त्यांना अंधकारातून प्रकाशाकडं आणण्याकरिता. जे कुणी अल्लाहवर विश्वास ठेवतात, नेक कार्य करतात त्यांना अशा स्वर्गांत दाखल करील ज्यांच्या खालून नद्या वाहतात, सदासर्वदा. अल्लाहनं त्यास उत्कृष्ट उपजीविका दिली.

१२) तो अल्लाहच ज्यानं सात आकाश निर्माण केली आणि त्यासारखीच पृथ्वीसुद्धा. त्यांच्यामधून अल्लाहचे आदेश येत असतात, अल्लाह प्रत्येक बाबीवर सामर्थ्य बाळगतो, हे त्यांना कळवून देण्यासाठी. आणि अल्लाहनं आपल्या माहितीने सर्वकाही वेढून टाकलंय.

-------

# ६६. सूरह अत-तहरीम

## मदीनाकालीन, आयती १२

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) हे प्रेषित! अल्लाहनं जे कायदेशीर ठरवलं त्यास तुम्ही का अवैध ठरवता आपल्या पत्नींची मर्जी राखण्यासाठी. पण अल्लाह क्षमा करणारा दयावंत आहे.

२) तुमच्या शपथांच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी अल्लाहनं नियम ठरवून दिलेत. अल्लाहच तुमचा वाली आणि तो सर्वज्ञ बुद्धिमान आहे.

३) प्रेषितानं आपल्या पत्नींपैकी कुणास काही खाजगीत बोललं असता त्यांनी (पत्नींनी) ती गोष्ट उघड करून टाकली. अल्लाहनं प्रेषितांस त्याची खबर दिली. प्रेषितांनी त्याचा काही भाग पत्नीस सांगितला तर काही भाग टाळला. नंतर प्रेषितांनी ते त्यांना (पत्नींना) कळवलं, तेव्हा त्यांनी विचारलं, तुम्हांस कुणी हे कळवलं? (प्रेषित) म्हणाले, मला त्यानं कळवलं जो सर्वज्ञ आणि सर्वपरिचित आहे.

४) जर तुम्ही दोघी त्याच्याकडं पश्चात्ताप व्यक्त कराल (तर उचित ठरेल), कारण तुमची मनं (सरळमार्गावरून) ढळून गेलीयत. आणि जर तुम्ही त्यांच्याविरूद्ध परस्परांची मदत केली तर लक्षात ठेवा, अल्लाह त्यांचा वाली आहे तसंच जिबरईल आणि पुण्यशील श्रद्ध लोकांपैकी पुण्यशील. त्यांच्यानंतर सर्व दूत त्यांना मदत करतील.

५) त्यांनी तुम्हांस घटस्फोट दिला तर अल्लाह लवकर तुमच्या जागी तुमच्यापेक्षा चांगल्या इतर पत्नी देईल ज्या आज्ञाधारक असतील, श्रद्धावंत, सदाचारी, पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्या, आराधना करणाऱ्या, उपवास पाळणाऱ्या असतील. पूर्वी विवाह झालेल्या किंवा कुमारिका असतील.

६) श्रद्धावंत लोकहो, स्वत:स आणि आपल्या कुटुंबीयांना त्या नरकाग्नीपासून वाचवा ज्याचं इंधन माणसं आणि दगडं होतील. ज्यावर कठोर आणि कडक दूत पहारेकरी असतील. अल्लाह जे आदेश देतो त्यांची अवज्ञा

करत नाही. आणि तेच करतात ज्याचे त्यांना आदेश दिले जातात.

७) नाकारणारे लोकांनो, आज काही निमित्त शोधू नका. तुम्ही केलेल्या कृत्यांचा तुम्हांस मोबदला दिला जाईल.

८) श्रद्धावंत लोकहो, अल्लाहकडं वळा. प्रामाणिकपणे पश्चात्ताप व्यक्त करा. ही अपेक्ष करू या तुमचा विधाता तुम्हांपासून तुमचं दोष दूर करून तुम्हांस अशा स्वर्गात दाखल करील ज्यांच्या खालून नद्या वाहतात. त्या दिवशी अल्लाह प्रेषितास आणि त्याच्याबरोबर ज्यांनी श्रद्धा ठेवली त्यांना अवमानित करणार नाही. त्यांच्या पुढं आणि उजव्या बाजूस सर्वत्र प्रकाश पसरलेला असेल आणि ते म्हणत असतील, 'आमच्या विधात्या! आम्हांसाठी प्रकाशास परिपूर्ण कर. आम्हांस क्षमा कर. कारण तू सर्वस्व सामर्थ्य बाळगतो.'

९) हे प्रेषित! नाकारणाऱ्या आणि दांभिकांविरूद्ध संघर्ष करा, त्यांच्याशी कडक व्यवहार करा त्यांचं ठिकाण नरक आहे, वाईट असं ठिकाण!

१०) अल्लाह नाकारणाऱ्यासमोर नूह यांच्या पत्नी आणि लूत यांच्या पत्नीचं उदाहरण ठेवतो. त्या दोघी आमच्या पुण्यशील भक्तांच्या विवाहात होत्या. त्या दोघींनी त्या दोघांशी (पतींशी) विश्वासघात केला, पण ते (त्यांचे पती) अल्लाहविरूद्ध त्यांच्या काही कामी आले नाहीत. त्यांना सांगण्यात आलं, नरकात जाणाऱ्यांबरोबर तुम्हीही नरकात जा.

११) आणि श्रद्धावंतांपुढं अल्लाह फिरऔनच्या पत्नीचं उदाहरण ठेवतो. ती म्हणाली, माझ्या विधात्या! माझ्यासाठी स्वर्गात एक घर करून दे. मला फिरऔन आणि त्याच्या कृत्यांपासून वाचव. तसेच अत्याचारी लोकांपासून माझी सुटका कर.

१२) आणि इम्रानच्या कन्या मरयम (यांचे उदाहरण) ज्यांनी आपल्या शीलाचं रक्षण केलं. आम्ही तिच्यात आमच्या चैतन्यातून फुंकलो, त्यांनी आपल्या विधात्याच्या गोष्टी आणि त्याच्या ग्रंथाची पुष्टी केली आणि त्या सदाचारींपैकी होत्या.

-------

# ६७. सूरह अल-मुल्क

**मक्काकालीन, आयती ३०**

**पारा - २९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) धन्य तो ज्याच्या हाती हे अधिराज्य आहे आणि सर्वांवर त्याचंच प्रभुत्व आहे.

२) त्यानं मृत्यू आणि जीवन निर्माण केलं. तुम्हांस पडताळून पाहण्यासाठी कोण कर्मानं सर्वोत्तम आहे ते. तो प्रभुत्वसंपन्न असून क्षमा करणारा आहे.

३) तोच ज्यानं एकावर एक सात आकाशं उभी केलीत. तुम्हांस 'रहमान'च्या निर्मितीमध्ये कोणती तफावत आढळणार नाही. दुसऱ्यांदा पाहून घ्या, काही दोष आढळतो तुम्हांस?

४) पुनश्च, पुनश्च दृष्टी टाकत राहा. ती तुझ्याकडं थकून गळून परत येईल.

५) आम्ही या जगाच्या आकाशाला दिव्यांनी (ताऱ्यांनी) सुशोभित केलं आणि त्यापासूनच सैतानाला हाकलून देण्यासाठी त्यांना साधन बनवलं. आम्ही त्यांच्यासाठी भडकत्या अग्नीची शिक्षा तयार ठेवलीय.

६) आणि जे लोक आपल्या विधात्याशी बंड करतात त्यांना नरकाची शिक्षा आहे, वाईट स्थान.

७) जेव्हा त्यांना त्यामध्ये घातलं जाईल, त्याचा जोरदार आवाज ऐकू येईल आणि ते (नरक) उसळी घेत असेल

८) जणू भयंकर आवेशानं फाटून जाते की काय? प्रत्येक खेपेस एक गट फेकला जाताना तिथले पहारेकरी त्यांना विचारतील, तुम्हांस ताकीद देण्यास कुणी आला नव्हता?

९) ते म्हणतील, होय. नक्कीच आमच्यापाशी ताकीद देणारा आला होता, पण आम्ही त्यास खोटं ठरवलं आणि म्हणालो, अल्लाहनं काहीही

अवतरलेलं नाही. तुम्हीच मोठ्या मार्गभ्रष्टतेत आहात.

१०) आम्ही त्यांचं ऐकून घेतलं. समजून घेतलं असतं तर आम्ही नरकाचे सोबती झालो नसतो.

११) त्यांनी आपल्या पापांची कबुली दिली. नरकातील लोकांचा धिक्कार आहे.

१२) जे लोक आपल्या विधात्यास भीत असतात, पाहत नसतानासुद्धा, त्यांना क्षमा आणि भव्य मोबदला असेल.

१३) तुम्ही ते बोलू नका अथवा मोठ्यानं बोलून दाखवा, तो तुमच्या अंत:करणात काय ते जाणतो.

१४) ज्यानं निर्माण केलं त्यास माहिती नको? त्यास तर सूक्ष्म गोष्टीचीही माहिती असते.

१५) तोच ज्यानं ही धरती तुमच्या अधीन केली. तिच्यातून वाटा काढा आणि त्याच्या साधनांचा उपयोग करा. तुम्हांस जीवंत होऊन त्याच्या समोरच उभं राहायचंय.

१६) तुम्ही सुरक्षित आहात त्याच्यापासून आकाशात जे आहे. त्यानं जमिनीस हादरून टाकलं आणि तुम्हांस तिच्यात पुरून टाकलं तर!

१७) तुम्हांस त्याची भीती नाही जो आकाशात आहे आणि त्यानं तुमच्यावर दगडांचा मारा करावा. मी अशा प्रकारे सावध करतो ते तुम्हांस लवकरच कळून चुकेल.

१८) पूर्वीच्या लोकांनीही खोटं ठरवलं होतं, तेव्हा मी त्यांचे काय हाल केले होते?

१९) पंख पसरून आत मिटून वरून पक्षी उडत असताना ते पाहत नाहीत, कृपावंताव्यतिरिक्त त्यांना कुणीही उचलून थांबू शकत नाही. तो सर्व गोष्टींची पाहणी करत असतो.

२०) मग त्या कृपावंताव्यतिरिक्त कोणती शक्ती तुम्हांस मदत पुरवू शकते? नाकारणारे फसले आहेत, बाकी काही नाही.

२१) कोण असा जो त्यांच्या निर्वाहाची तरतूद करू शकतो. त्यानंच त्यांचा

निर्वाह रोखून धरला तर? तरीदेखील ते हट्टानं चालते होतात.

२२) तोंड खाली घालून जो हातांनी चाचपडत जात असतो तो अधिक मार्गदर्शित की सरळ मार्गावर ताठ मानेनं जात असतो तो?

२३) तोच ज्यानं तुम्हांस निर्माण करून उभं केलं. तुम्हांस कान दिले, दृष्टी दिली आणि हृदय दिलं. तुम्ही काही अंशीच आभार व्यक्त करता.

२४) त्यांना सांगा, तुम्हांस धरतीवर त्यानंच पसरवले आहे आणि त्याच्याकडंच तुम्हांस परतावयाचंय.

२५) ते विचारतात, कुठं आहे तुमचं वचन (कयामत दाखवा) तुम्ही खरे असाल तर!

२६) त्यांना सांगा, त्याची माहिती अल्लाहलाच. मी तर फक्त तुम्हांस स्पष्ट ताकीद देतोय.

२७) जेव्हा त्यास जवळ येताना पाहतील, तेव्हा नाकारणाऱ्यांची तोंडं काळवंडून जातील आणि त्यांना सांगण्यात येईल, हेच ते तुम्ही जे बोलवत होता!

२८) पाहा, जरी अल्लाहनं मला आणि जे माझ्यासोबत आहेत त्यांना नष्ट केलं अथवा आमच्यावर त्यांनी कृपा केली तर नाकारणाऱ्यांना दु:खद शिक्षेपासून कोण सोडवील?

२९) त्यांना सांगा, आम्ही त्याच कृपावंतावर श्रद्धा ठेवली आणि त्याच्यावरच आम्ही विश्वास टाकला. तुम्हांस लवकरच कळून येईल कोण तो उघड मार्गभ्रष्टतेत आहे.

३०) त्यांना सांगा, बरं पाहा, कधी तुमचं पाणी (जमिनीत खोलपर्यंत) जिरून गेले तेव्हा तुम्हांस कोण स्वच्छ पाण्याचे झरे वाहवून देईल?

-------

# ६८. सूरह अल-कलम

**मक्काकालीन, आयती ५२**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) नूनऽ लेखणीची शपथ! आणि जे लिहित आहेत, त्यांची

२) तुमच्या विधात्याच्या कृपेनं तुम्ही झपाटलेले नाहीत.

३) आणि नक्कीच तुमच्यासाठी अखंड बक्षीस आहे.

४) तुम्ही विलक्षण उच्च स्वभावाचे आहात.

५) लवकरच तुम्ही पाहाल आणि तेही पाहून घेतील.

६) तुमच्यापैकी कोण झटापून गेलंय ते.

७) तुमच्या विधात्यास चांगलं माहीत आहे, कोण मार्गावरून ढळला आणि कोण मार्गदर्शित आहे हेही त्यास चांगलं ठाऊक आहे.

८) तुम्ही नाकारणाऱ्याचं ऐकू नका.

९) ते तुम्हांस नमवू पाहतात, म्हणजे तेही नरम पडतील.

१०) तुम्ही मोठमोठ्या शपथा वाहणाऱ्या क्षुल्लक माणसाचं ऐकू नका.

११) लोकांना हिणवत, चहाड्या करत फिरतो, त्याचा

१२) भल्या कामांची मनाई करतो पापांची मर्यादा ओलांडलेला.

१३) जालीम, त्यावर मुळातच हीन.

१४) कारण त्याच्याकडं संपत्ती आणि मुलं आहेत.

१५) आमच्या आयती वाचून दाखविल्या असता म्हणतो, ह्या तर पूर्वापार कथा आहेत.

१६) आम्ही लवकरच त्याच्या नाकावर डाग लावून टाकू.

१७) जशी आम्ही बागवाल्यांची कसोटी घेतली, त्याचप्रमाणं यांचीही कसोटी

घेतली जेव्हा त्यांनी शपथा वाहून म्हटलं होतं, आम्ही सकाळ होताच त्याचं फळ तोडून घेऊ.

१८) त्यांनी अपवाद ठेवला नव्हता (म्हणजे अल्लाहनं इच्छिलं तर म्हटलं नव्हतं.)

१९) ते झोपतच राहिले आणि तुमच्या विधात्याकडून त्यांच्यावर अरिष्ट कोसळलं.

२०) पहाटे त्या कापून टाकलेल्या शेतीसारखं होऊन गेलं.

२१) पहाट होताच ते एकमेकांना हाक देऊ लागले.

२२) तुम्हांस फळं तोडायची असल्यास सकाळ होताच शेताकडं चला.

२३) ते निघाले, आपसांत हळूहळू बोलत,

२४) 'आज कुणी गोरगरीब तुम्हांकडं फिरता कामा नये.'

२५) मोठ्या हिरीरीनं सकाळीच निघाले जणू ते सामर्थ्य बाळगतात.

२६) पण त्यांनी तिथं पाहिलं तेव्हा म्हणाले, 'खात्रीनं आपण वाट चुकलो आहोत,

२७) नव्हे आपण गमावून बसलो.'

२८) त्यांच्यापैकी एक भला माणूस म्हणाला, 'म्हटलं नव्हतं मी, तुम्ही का स्तुती करत नाही?'

२९) ते म्हणाले, 'धन्य असो आमच्या विधात्याची! आपणच अत्याचारी होऊन गेलो.'

३०) एकमेकांना उद्देशून परस्पर दोष काढू लागले.

३१) म्हणाले, 'दुर्दैव आमचं. आम्हीच नियमांबाहेर गेलो.

३२) आपण आपल्या विधात्याकडं वळू या आणि आशा बाळगू की आम्हांस यापेक्षा चांगलं असं काही देईल.'

३३) अशी असते शिक्षा आणि परलोकात तर भयंकर शिक्षा असेल, जर

त्यांना कळलं असतं.

३४) पण सदाचारींसाठी त्यांच्या विधात्याकडं संपन्न स्वर्ग असतील.

३५) आम्ही आज्ञाधारकांना अन्यायी लोकांसारखं वागायचं?

३६) तुम्हांस काय झालंय, कसे निर्णय घेता?

३७) तुम्हांपाशी एखादा ग्रंथ आहे, त्याचा अभ्यास करता?

३८) तुम्हांस आवडतं तेच त्यामध्ये असणार.

३९) पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत कायम राहतील अशा शपथा तुम्ही आम्हांकडून घेतलेल्या आहेत. तुम्ही जे ठरवलं असेल ते तुमच्यासाठी.

४०) त्यांना विचारा, तुमच्यापैकी कोण हमी देणार?

४१) त्यांनी (अल्लाहचे) भागीदार केलेले आहेत? मग आणू द्या आपल्या भागीदारांना ते खरं असतील तर!

४२) ज्या दिवशी (कयामतच्या भयानक विनाशावरून) पडदा उचलला जाईल आणि त्यांना नतमस्तक होण्यास बोलवलं जाईल, पण त्यांना जमणार नाही.

४३) त्यांचं डोळं खालावले असतील, मानखंडणेनं त्यांना वेढून टाकलं असेल. जेव्हा ते धडधाकट होते त्यांना नतमस्तक होण्यास बोलवलं जायचं.

४४) ह्या गोष्टीस खोटं ठरवतो त्यास माझ्याकडं सोपवून द्या, त्यांना समजूनही येणार नाही अशा रितीनं आम्ही त्यांना (विनाशाकडं) ओढीत नेऊ.

४५) त्यांना उसंत देईन, माझी योजना भक्कम आहे.

४६) तुम्ही त्यांना काही मोबदला मागता ज्याच्या बोज्याखाली दबून जाता?

४७) किंवा त्यांच्यापाशी अदृश्य (ज्ञान) आहे जे ते लिहून घेतात.

४८) तेव्हा धीरानं अल्लाहच्या आदेशांची वाट पाहा. मासेवाले (यूनुस अ.) सारखं होऊ नकोस. दुःखानं पछाडलं जाऊन जशी त्यांनी हाक मारली.

४९) त्यांच्या विधात्याची त्यांना कृपा लाभली नसती तर त्यांना उघड्या मैदानात वाईट स्थितीत टाकून दिलं गेलं असतं.

५०) त्यांच्या विधात्यानं त्यांना निवडलं आणि त्यांना नेक लोकांमधील केलं.

५१) नाकारणारे कुरआन ऐकताना जसं तुम्हांस टक लावून पाहत असतात त्यावरून असं दिसतं जणू हे तुमचं उच्चाटन करतील. ते म्हणतात, हे तर झपाटलेले आहेत.

५२) हा तर सकल विश्वासाठी उपदेशापलीकडं आहे.

-------

# ६९. सूरह अल-हाक्का

**मक्काकालीन, आयती ५२**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) एक वास्तविकता ती! (कयामतीची घटिका!)

२) काय ती वास्तविकता?

३) तुम्हांस कसं समजेल ती वास्तविकता?

४) समूद आणि आद लोकांनी खोटं ठरवली ती आपत्ती!

५) समूदांचा संहार झाला एका धडाक्यानं.

६) आणि आद लोकांचा विनाश झाला एका प्रचंड वादळानं.

७) त्यानं (अल्लाहनं) त्यास वादळाला लागोपाठ सात रात्री आणि आठ दिवस वेढून टाकलं होतं ज्यामुळं त्यांची अवस्था खजुरीच्या कुजलेल्या झाडांप्रमाणं झाली.

८) त्यांच्यापैकी कुणी शिल्लक राहिलेले आढळतात?

९) फिरऔन आणि त्याच्यापूर्वी जे झाले, उद्ध्वस्त झालेल्या वस्त्या आणि त्या लोकांच्या पापांमुळं.

१०) त्यांनी आपल्या विधात्याच्या प्रेषिताची अवज्ञा केली म्हणून त्यानं त्यांना कठोरतेनं धरलं.

११) जेव्हा पाणी पुरानं उसळू लागलं तेव्हा आम्ही तुम्हांस नौकेत स्वार केलं,

१२) त्यास (महापुरास) तुमच्यासाठी एक स्मारक बनवण्यासाठी आणि ऐकणाऱ्यांनीही ते आठवत राहावं.

१३) अचानक शंख फुंकला जाईल,

१४) आणि धरती व पर्वतांना उचलून एकाच धडाक्यानं चिरडून टाकलं

जाईल.

१५) त्या दिवशी ती घडणारी घटना घडणारच.

१६) आकाश फाटून जाईल त्या दिवशी तो खिळखिळा झालेला असेल.

१७) त्याच्या कडेला देवदूत असतील आणि त्या दिवशी आठ दूत तुमच्या विधात्याचं सिंहासन आपल्यावर उचलून धरतील.

१८) ज्या दिवशी तुम्हांस हजर केलं जाईल, तुमचं काहीही लपलेलं नसणार!

१९) ज्या कुणास त्याच्या (कर्माचं) दप्तर त्याच्या उजव्या हातात दिलं जाईल, तो (इतरांना) म्हणेल, घ्या! माझं दप्तर वाचा.

२०) मला खात्री होती माझ्या हिशेबाशी गाठ पडणारच.

२१) मग तो परमानंदाचं जीवन जगेल.

२२) उदात्त अशा स्वर्गांमध्ये,

२३) जिथली फळं जवळच असतील (हातपोच).

२४) मागच्या दिवसांत (आयुष्यात) तुम्ही जे पाठवलं त्याबदल्यात आरामशीर खा आणि प्या.

२५) आणि ज्यास त्याच्या (कर्मांचं) दप्तर त्याच्या डाव्या हातात दिलं जाईल. तो म्हणेल, माझे दुर्दैव, माझं दफ्तर मला दिलं गेलं नसतं तर,

२६) मला माझा हिशेबच कळला नसता.

२७) माझं दुर्दैवं! मृत्युनंच प्रकरण संपवलं असतं तर.

२८) माझी संपत्ती माझ्या कामी आली नाही.

२९) माझी सत्ता हरवून गेली.

३०) (आज्ञा होईल) धरा त्यास, बेड्या घाला

३१) आणि मग नरकात टाकून द्या,

३२) सत्तर हात लांबीच्या साखळ्यांनी बांधून टाका

३३) कारण तो महिमाशाली अल्लाहवर विश्वास ठेवत नव्हता

३४) आणि गरजूंना अन्न-पाण्याची सोय करण्यास इतरांना प्रोत्साहन देत नव्हता.

३५) आज इथं त्यास कुणी मित्र नसेल.

३६) घाण वस्तूंव्यतिरिक्त (पू) दुसरं अन्न नाही खावयास.

३७) पापी लोकांशिवाय ते कुणी खात नसतात.

३८) तुम्ही जे पाहता त्या (गोष्टींची) मी शपथ वाहतो

३९) आणि जे तुम्हांस दिसत नाही, त्याची.

४०) हे एका सन्माननीय प्रेषिताचं म्हणणं आहे,

४१) कुणा एखाद्या कवीची कविता नव्हे, पण तुम्ही कमीच विश्वास ठेवता!

४२) तसंच ते कुण्या मांत्रिकाचंही बोल नाहीत. तुम्ही कमीच विचार करता.

४३) सकल विश्वांच्या विधात्यानं हे अवतरलंय.

४४) त्यांनी आमच्या नावानं काही गोष्ट रचून आणली असती.

४५) तर आम्ही खात्रीनं त्यास त्याच्या उजव्या हातानं धरलं असतं,

४६) मग त्याच्या मानेची शीर कापून टाकली असती.

४७) तुमच्यापैकी कुणी त्यापासून रोखलं नसतं.

४८) हा उपदेश भीती बाळगणाऱ्यांसाठी आहे.

४९) तुम्हांपैकी कोण खोटे आहेत हे आम्ही खात्रीनं जाणतो.

५०) नाकारणाऱ्यांसाठी ही अतिशय निराशेची गोष्ट होय.

५१) पण हे सत्य आणि खात्रीपूर्वक वास्तव आहे.

५२) आपल्या महिमाशाली विधात्याच्या नावाचं पावित्रगान करा!

-------

# ७०. सूरह अल-मआरिज

**मक्काकालीन, आयती ४४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) एका प्रश्नकर्त्यानं शिक्षा मागितली जी घडणार आहे

२) नाकारणाऱ्यांसाठी, कुणी ती टाळू शकणार नाही.

३) उंच स्थानांचा स्वामी, अल्लाहकडून.

४) दूत आणि आत्मा (जिबरईल) एका दिवसात त्याच्याकडं चढून वर जातात. ज्याच्या मापाचं प्रमाण पन्नास हजार वर्षांचं आहे.

५) सहन करा, सहनशीलतेनं.

६) त्यास ते दूरवरच पाहत आहेत (समजतात),

७) पण आम्हांस ते जवळच दिसते.

८) त्या दिवशी आकाश वितळलेल्या तांब्याप्रमाणं होईल.

९) आणि पर्वतं रंगीत लोकरीसारखी होतील.

१०) कुणी मित्र, कुण्या मित्राची विचारपूस करणार नाही.

११) (जरी) ते त्यांना पाहत असतील, पापी लोकांची इच्छा असेल आपल्या मुलाबाळांच्या मोबदल्यात त्या दिवसाच्या शिक्षेपासून सुटका करून घेण्याची.

१२) आपल्या पत्नींना आणि आपल्या भावास

१३) आणि आपल्या नातलगांना जे त्यास आधार देत असतात.

१४) आणि जे धरतीवर आहे ते सर्व, त्याच्या सुटकेसाठी.

१५) मुळीच नाही, हा धगधगता अग्नी होय.

१६) ती त्याची त्वचा सोलून टाकील.

१७) ज्यांनी पाठ फिरवली आणि तोंड वळवलं त्यांना बोलविते.

१८) आणि ज्यानं संपत्ती साठवून ठेवली आणि ती जपत राहिला.

१९) निश्चितच मनुष्य अधीर निर्मिला गेलाय.

२०) त्यास आपत्ती स्पर्श करताच घाबरून जातो.

२१) चांगलं घडतं तेव्हा लोभ करतो,

२२) पण जे नमाज पढतात (त्यांना सोडून)

२३) आणि आपली नमाज नित्यनेमानं अदा करतात.

२४) आणि ज्यांच्या संपत्तीत ठराविक हक्क आहे.

२५) जे प्रश्न करतात त्यांचा आणि वंचितांचा

२६) आणि जे निर्णयाच्या दिवसाची पुष्टी करतात

२७) आणि जे आपल्या विधात्याच्या शिक्षेस भिऊन असतात

२८) त्यांच्या विधात्याची शिक्षा निर्भय राहण्यासारखी गोष्ट नव्हे.

२९) जे लोक आपल्या लज्जास्थानांचं रक्षण करतात,

३०) त्यांच्या पत्नी आणि मालकीतील स्त्रिया वगळून, कारण त्यांच्या बाबतीत त्यांना दोष नाही.

३१) जे लोक यापलीकडं काही मिळवू पाहतात, ते उल्लंघन करणार आहेत.

३२) जे लोक आपल्याकडील ठेवी (अमानती) आणि आपले करार पाळतात

३३) आणि जे आपल्या साक्षीवर ठाम असतात

३४) आणि जे आपल्या नमाजांची रक्षा करतात,

३५) असेच लोक स्वर्गांमध्ये सन्मानानं राहतील.

३६) नाकारणाऱ्यांस काय झालं तुझ्याकडं धावत सुटलेत

३७) उजवी आणि डावीकडून घोळक्या घोळक्यानं?

३८) त्यांच्यापैकी प्रत्येक संपन्न स्वर्गामध्ये प्रवेश घेण्याची आशा बाळगतो.

३९) कदापि नाही, कारण त्यांना माहीत आहे आम्ही त्यांना कशापासून घडवलंय.

४०) मी शपथ घेतो आहे पूर्वेच्या आणि पश्चिमेच्या स्वामीची! आम्ही समर्थ आहोत,

४१) त्यांच्या जागी त्यांच्यापेक्षा चांगले बदलून आणू शकतो, कुणी आमच्यावर मात करू शकत नाही.

४२) त्यांना सोडून द्या, निरर्थक गोष्टींमध्ये, खेळू द्या, ज्या दिवसाबद्दल त्यांना वचन दिलंय तो त्यांना गाठू द्या.

४३) ज्या दिवशी घाईघाईनं आपल्या कबरीतून बाहेर पडतील जणू एखाद्या लक्ष्याकडं धावत जात आहेत.

४४) त्यांचे डोळे खाली नमलेले असतील मानहानीनं गुंग होऊन. हाच तो दिवस ज्याचं त्यांना वचन दिलं जातं.

-------

# ७१. सूरह नूह

**मक्काकालीन, आयती २८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आम्ही नूह यांना त्यांच्या लोकांकडं पाठवलं. त्यांना एक दु:खद शिक्षेनं गाठण्यापूर्वी, आपल्या लोकांस ताकीद देण्यासाठी.

२) ते आपल्या लोकांस म्हणाले, मी तुम्हांस स्पष्ट ताकीद देतो,

३) अल्लाहची आराधना करा, त्यास भिऊन राहा. आणि माझं पालन करा.

४) तो तुमची पापं क्षमा करील आणि ठराविक काळापुरती सवड देईल. जेव्हा अल्लाहनं निश्‍चित केलेली वेळ येऊन ठेपली की मग ती टळणार नाही, जर तुम्हांस कळत असेल तर.

५) ते (नूह) म्हणाले, माझ्या विधात्या! मी माझ्या लोकांना रात्रंदिवस बोलवत राहिलो,

६) पण माझ्या बोलवण्यामुळं त्यांच्या पळून जाण्यातच भर पडली.

७) मी जेव्हा कधी त्यांना बोलवलं, तू त्यांना क्षमा करावी म्हणून, त्यांनी आपल्या कानांमध्ये बोटं घातली आणि त्यांनी कपड्यांनी स्वत:स झाकून घेतलं. ते अडून राहिले. अहंकार माजवित राहिले.

८) मी त्यांना मोठ्यानं बोलवलं,

९) मी त्यांना जाहीरपणे समजवलं आणि खाजगीतही बोललो.

१०) त्यांना म्हटलं, तुमच्या विधात्याची क्षमा मागा. तो अत्यंत क्षमाशील आहे.

११) तो तुम्हांस आकाशातून सतत पाऊस पाठवील,

१२) संपत्ती व संततीनं तुमची मदत करील आणि तुम्हांस बागा बहाल करील तसंच नद्या वाहवील.

१३) तुम्हांस काय झालंय, तुम्ही अल्लाहस आदरणीय लेखत नाही.

१४) त्यानं तुम्हांस विविध टप्प्याटप्प्यांनी निर्माण केलं.

१५) तुम्ही पाहत नाही अल्लाहनं एकावर एक सात अवकाशं कशी उभी केलीत (कसं निर्माण केलं)!

१६) चंद्रास त्यामध्ये प्रकाश आणि सूर्यास दिवा बनवला.

१७) अल्लाहनं तुम्हांस जमिनीतून वनस्पतीप्रमाणं उत्पन्न केलं

१८) आणि तिच्यामध्येच तो तुम्हांस पुरील आणि दुसऱ्यांदा बाहेर काढील.

१९) अल्लाहनं धरतीस तुमच्यासाठी विस्तृत केलं.

२०) तुम्ही तिच्या प्रशस्त मार्गांनी वाटचाल करावी यासाठी.

२१) नूह म्हणाले, माझ्या विधात्या! त्यांनी माझी अवज्ञा केली आणि त्यांचं पालन केलं, जे त्यांच्या संपत्ती व संततीमध्ये भर घालत नसून त्यांचा नाश करतात.

२२) त्यांनी एक कट रचला, भयंकर कट!

२३) ते म्हणाले, तुम्ही आपल्या देवांना मुळीच सोडायचं नाही. वद्दास, सुवाहास, यगूस, यऊक आणि नसरा कुणालाही सोडू नका.

२४) त्यांनी कित्येकांना मार्गभ्रष्ट करून टाकलं (म्हणून) तूही पापी लोकांच्या मार्गभ्रष्टतेतच भर घाल. दुसऱ्या कशात नको.

२५) मग त्यांना त्यांच्या पापांमुळं बुडवून टाकण्यात आलं आणि नंतर नरकाग्नीत टाकलं जाईल. अल्लाहशिवाय त्यांना कुणी मदत पुरवणारा आढळला नाही.

२६) नूह (अ.) म्हणाले, माझ्या विधात्या! नाकारणाऱ्यांपैकी कुणासही धरतीवर घर करून राहू देऊ नकोस.

२७) जर तू त्यांना मागं सोडून दिलं तर ते तुझ्या भक्तांना मार्गभ्रष्ट करतील आणि दुष्ट व कृतघ्न अशांचीच उपज करतील.

२८) माझ्या विधात्या! क्षमा कर मला. माझ्या मातापित्यांना आणि जे विश्वास ठेवून माझ्या घरी येतील, श्रद्ध पुरुष व श्रद्ध स्त्रियांना. आणि अत्याचारींना, त्यांच्या विनाशातच भर टाक.

-------

# ७२. सूरह अल-जिन्न

**मक्काकालीन, आयती २८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) यांना सांगा, मला कळवण्यात आलं जिन्नांच्या एका गटानं हे (कुरआन) ऐकलं आणि म्हणाले, आम्ही एक विलक्षण असं कुरआन ऐकलंय.

२) तो रास्त मार्ग दाखवतो म्हणून आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला आणि आम्ही आमच्या विधात्याशी कुणासही भागीदार जोडणार नाही.

३) आणि आमच्या विधात्याचं वैभव उदात्त आहे. त्यानं कुणास एखादी पत्नी अथवा मुलगा करून घेतलेलं नाही.

४) आणि आम्हांमधील मूर्ख (लोकं) अल्लाहविरूद्ध भलतंच काही सांगत असत.

५) आमचा असा विचार होता की मानव आणि जिन्न अल्लाहच्या बाबतीत खोटं बोलत नसतील

६) आणि मानवांमधील काही लोकं जिन्नांपैकी काहींचा आश्रय घेत असत म्हणून त्यांनी जिन्नांच्या अहंकारात आणखीनच भर टाकली.

७) त्यांनी तर्क लावला जसं तुम्ही तर्क लावता. अल्लाह कुणास प्रेषित बनवून मुळीच उठवणार नाही.

८) आम्ही आकाशाकडं जाण्याचा बेत केला असता तर तो पहारेकऱ्यांनी आणि उल्कांनी भरलेला आढळला.

९) आम्ही तिथं ऐकण्यासाठी दबा धरून बसत असू, पण आता कुणी काही ऐकण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्यास उल्का दबा धरून बसलेली आढळली.

१०) आम्हांस कळेना, जे पृथ्वीवर आहे त्यांच्या बाबतीत काही वाईट घडू पाहत आहे की त्यांचा विधाता त्यांना रास्त मार्गदर्शन घडवू इच्छितो!

११) आम्हांमध्ये काही नेक लोक आहेत, तर आम्हांपैकी काही त्याउलट विविध मार्गी जात होते.

१२) आम्हांस समजून आलं, आम्ही धरतीवर अल्लाहस निष्फळ करू शकणार नाही किंवा आम्ही पळून गेलो तरी त्याच्यावर मात करू शकणार नाही.

१३) आम्ही जे मार्गदर्शन ऐकलं ते मान्य केलं आणि जो त्याच्या विधात्यावर श्रद्धा ठेवतो त्यास कुणाच्या फसवण्याचं अथवा अत्याचाराचं भय नसेल.

१४) आम्हांपैकी काही आज्ञाधारक (मुस्लिम) आहेत तर काही अन्यायी (अवज्ञाकारी) आहेत. जे अल्लाहस शरण गेले (इस्लाम स्वीकारला) त्यांनी रास्त ध्येय अंगीकारलं.

१५) जे अन्यायी झाले ते नरकाचं इंधन होऊन गेले.

१६) आणि जर ते (रास्त) मार्गावर ठाम राहिले असते तर आम्ही भरपूर पाऊस पाडला असता

१७) त्याद्वारे त्यांची परीक्षा घेण्यासाठी. आणि जो आपल्या विधात्याच्या स्मरणास टाळतो, त्यास तो कठोर शिक्षा घडवील.

१८) आणि मशिदी अल्लाहच्या असतात. तेव्हा त्याच्याबरोबर इतरांचा धावा करू नका.

१९) जेव्हा अल्लाहचा भक्त (प्रेषित) त्याच्या आराधनेसाठी उभा राहतो, तेव्हा ते (जिन्न) त्याच्याभोवती (गर्दी करून) जवळजवळ त्यास दाबूनच टाकतात.

२०) (प्रेषित) त्यांना सांगा, मी तर केवळ माझ्या विधात्याचा धावा करतो आणि कुणासही त्याचा भागीदार करत नाही.

२१) त्यांना सांगा, तुम्हांस इजा पोचवणं अथवा रास्त मार्गावर आणणं माझ्या हाती नाही.

२२) त्यांना सांगा, अल्लाहपासून मला कुणी वाचवू शकत नाही अथवा त्याच्याशिवाय मला कुठे निवारा आढळणार नाही.

२३) फक्त अल्लाहकडंचा संदेश पोचवणं आणि त्याचे संदेश (वाहनं तेवढं माझ्या हाती) आणि जो कुणी अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताची अवज्ञा करील त्यास नरकाग्नी असेल. (ते) कायमचं तिथं राहतील.

२४) त्यांना दिसेपर्यंत, त्यांना दिलेला शब्द (पूर्ण ठरताना) आणि त्यांना कळेल, मदत पुरवण्यात कोण कमी पडतो आणि संख्येच्या बाबतीत कोण क्षुल्लक आहे.

२५) त्यांना सांगा, मला माहीत नाही, तुम्हांस दिलेला शब्द लगेच (पूर्ण होईल) किंवा माझ्या विधात्यानं दीर्घकाळ मुदत ठरवलीय.

२६) गुप्त गोष्टी त्यासच माहीत असतात आणि तो त्या कुणाकडंही जाहीर करत नाही.

२७) जो त्यास प्रेषित म्हणून आवडला असेल तो सोडून. आणि मग तो त्याच्या मागं आणि पुढं संरक्षक नेमून देतो

२८) त्यांनी (प्रेषितांनी) आपल्या विधात्याचा संदेश वास्तवात पोचवला याची खात्री करून घेण्यासाठी. त्यांच्याकडं जे काही आहे त्यास त्यानं वेढलेलं आहे आणि एक एक गोष्ट मोजून साठवून ठेवलेली आहे.

-------

# ७३. सूरह अल-मुज्जम्मिल

**मक्काकालीन, आयती २०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) पांघरून घेतलेले तुम्ही (प्रेषित)

२) रात्री थोडं उभं राहत जा (आराधनेत)

३) अर्धी (रात्र) किंवा थोडं कमी

४) किंवा त्यापेक्षा काही जास्त आणि थांबून थांबून कुरआनचे पठण करीत जा.

५) लवकरच आम्ही तुम्हांवर एका भारदस्त वाणी (कुरआन) अवतरणार आहोत.

६) रात्रीचं उठणं कठीण आहे पण आत्म्यास आवरण्यासाठी आणि पठणासाठी योग्य असतं.

७) दिवसा तुम्ही कामांत खोलवर गुंतलेले असता.

८) आपल्या विधात्याचं स्मरण करा आणि सर्वकाही सोडून स्वत:स त्यासच वाहून घ्या.

९) तोच पूर्व आणि पश्चिमेचा स्वामी, त्याच्याशिवाय कुणी ईश्वर नाही. तेव्हा त्यासच आपला कर्ताधर्ता करून घ्या.

१०) ते जे बोलतात ते सहन करा आणि सभ्य रीतीनं त्यांच्यापासून वेगळं व्हा.

११) आणि या खोटं ठरवणाऱ्या धनदांडग्यांना माझ्यावर सोडा (मी त्यांना बघून घेईन). त्यांना थोडीशी सवलत द्या.

१२) आपल्यापाशी त्यांना घालण्यास बेड्या आहेत आणि धगधगता नरकाग्नी,

१३) घशात अडकणारा खाऊ आणि दु:खद शिक्षा.

१४) ज्या दिवशी धरती आणि पर्वतं हादरून जातील. पर्वतं चुरडामुरडा होऊन वाळूचे ढीग होऊन जातील.

१५) आम्ही साक्षीदार म्हणून तुमच्याकडं प्रेषितास पाठवलं, जसा फिरऔनकडं प्रेषित पाठवला होता.

१६) फिरऔननं प्रेषितांची अवज्ञा केली, त्यासाठी आम्ही त्यास वाईट परिणामांनी धरलं.

१७) तुम्ही नकार देत असाल तर त्या दिवसापासून कसा वाचंल जो मुलांस वृद्ध करून टाकील

१८) नि आकाश फाटून जाईल. त्याचं वचन प्रत्यक्षात येणारच.

१९) हे (कुरआन) आठवण करून देण्यास आहे, मग ज्याची इच्छा असेल त्यानं (त्याद्वारे) आपल्या विधात्याची वाट धरावी.

२०) तुमच्या विधात्यास ठाऊक आहे की तुम्ही जवळजवळ रात्रीच्या दोन तृतियांश भाग (आराधनेत) उभं राहता, तर कधी त्याचा अर्धा किंवा एक तृतियांश (भाग). तुमच्या सोबतींपैकी काहीजणसुद्धा. अल्लाहच रात्र आणि दिवसाचं (प्रमाण) ठरवतो, त्यास ठाऊक आहे तुम्ही ती (वेळ) मोजू शकत नाही. म्हणून त्यानं तुमच्यावर कृपा केली. तेव्हा सोयीस्कर होईल तेवढं कुरआन पठण करत जा. त्यास हेही माहीत आहे, तुमच्यापैकी कुणी आजारी असतील, इतर काही धरतीवर अल्लाहच्या विपुलतेच्या शोधात प्रवासात असतील आणि इतर काही अल्लाहच्या कारणास्तव लढा देत असतील. म्हणून तुम्हांस जमेल तेवढं पठण करत जा, नमाज कायम करा, जकात अदा करा. अल्लाहस उत्तम असं कर्ज देत राहा. आणि स्वत:साठी तुम्ही भल्या (कर्मा)पैकी जे आगाऊ पाठवाल ते तुम्हांस उत्तम आणि महान बक्षीसाच्या रूपात अल्लाहकडून मिळेल. अल्लाहकडं क्षमा मागत जा, अल्लाह क्षमा करून दया करतो.

-------

# ७४. सूरह अल-मुद्दस्सिर

**मक्काकालीन, आयती ५६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) तुम्ही वस्त्रांनी गुंडाळून घेतलेले (प्रेषित)!

२) उठा आणि भीती दाखवा (सावध करा)

३) आपल्या विधात्याचा गौरव करा.

४) आपली वस्त्रं स्वच्छ ठेवा.

५) गलिच्छतेस ते बाजूस सारा.

६) काही अधिक मिळवण्याच्या आशेनं उपकार करू नका.

७) आपल्या विधात्याशी ठाम राहा.

८) जेव्हा शंख फुंकला जाईल.

९) तो दिवस अपरिमित दु:खाचा असेल.

१०) नाकारणाऱ्यांसाठी सोपं नसेल.

११) मला व ज्यास मी निर्माण केलं त्यास एकटं सोडा.

१२) मी ज्यास विपुल संपत्ती दिली

१३) त्याच्या हजेरीत पुत्रं दिली,

१४) आणि तऱ्हेतऱ्हेची साधनं उपलब्ध करून दिलीत,

१५) तरीही ते काही अधिक मिळंल अशी लालसा बाळगतात.

१६) मुळीच नाही. आमच्या आयतींबाबत आहे तो.

१७) मी त्यांना कठीण घाट चढावयास लावीन. (भयानक शिक्षा देईन.)

१८) त्यानं विचार करून अंदाज लावला.

१९) त्याचं वाईट घडो! कसला अंदाज लावला.

२०) होय, आणखीन वाईट घडो! कसा अंदाज लावतो.

२१) नंतर त्यानं सभोवार पाहिलं.

२२) कपाळावर आठ्या घातल्या आणि तोंड वाकडं केलं,

२३) पाठ फिरवून निघाला, घमेंडीत आला,

२४) म्हणाला, ही तर जादू आहे दुसरं काही नाही. पूर्वापार चालत आलेली.

२५) हे तर माणसानं रचलेलं दुसरं काही नाही.

२६) लवकरच मी त्यास नरकाग्नीशी भिडवून देईन.

२७) नरक काय ते तुम्हांस काय समजणार!

२८) ती शिल्लक ठेवणार नाही की सोडणारही नाही.

२९) माणसास भाजून टाकणारी,

३०) तिच्यावर एकोणीस (पहारेकरी नियुक्त) आहेत.

३१) आम्ही दूतांपैकीच फक्त पहारेकरी नेमलेत आणि त्यांची संख्या नाकारणाऱ्यांसाठी कसोटी केलीय. तसेच ग्रंथधारककांना विश्वास टाकता यावा आणि श्रद्ध लोकांच्या श्रद्धेत भर पडावी आणि ग्रंथधारक व श्रद्ध लोकांनी संशयात पडू नये म्हणून. ज्या लोकांच्या मनात विकृती आहे. तसंच नाकारणारे म्हणतात, या उदाहरणामागं अल्लाहचा उद्देश काय? अशाच प्रकारे अल्लाह इच्छेनुसार कुणास मार्गभ्रष्ट करतो तर इच्छेनुसार कुणास मार्ग दाखवतो. तुझ्या विधात्याची शक्ती कुणासच माहीत नाही. आणि हे काही नसून मानवांसाठी बोधप्रद आहे.

३२) निश्चितच नाही. चंद्रमाची शपथ!

३३) आणि रात्रीची जेव्हा ती पाठ फिरवते

३४) पहाटेची जेव्हा ती उजळते,

३५) भयंकर गोष्टींपैकी हे एक वास्तव आहे, नरक.

३६) मानवास भीती घालणारी.

३७) तुमच्यापैकी कुणीही वाटल्यास पुढं जावं अथवा मागं पडून राहावं.

३८) प्रत्येकानं जे कमवलं असेल त्यास तो गहाण आहे.

३९) अपवाद उजव्या बाजूकडील (नेक) लोकांचा.

४०) ते स्वर्गांमध्ये विचारतील

४१) पापी लोकांना,

४२) तुम्ही नरकात कशापायी?

४३) ते म्हणतील, आम्ही नमाज अदा करत नव्हतो

४४) आणि गरजूंना अन्न देत नव्हतो,

४५) निरर्थक गोष्टींत दंग असतात त्यांच्याबरोबर आम्हीही बोलत बसायचो,

४६) निर्णयाचा दिवस नाकारत होतो,

४७) जोवर अटळ होतं (मृत्यु) येऊन ठेपेल.

४८) कुणा मध्यस्थाची मध्यस्थी उपयोगी पडली नाही.

४९) त्यांना काय झालं उपदेशापासून तोंड वळवतात

५०) जणू घाबरून गेलेले गाढवच.

५१) सिंहास पाहून पळत सुटले.

५२) त्यांच्यापैकी प्रत्येकास वाटतं, त्यास उघडलेले ग्रंथ दिले जावेत.

५३) कदापि नाही, त्यांना परलोकाची भीती नाही.

५४) नव्हेच, हा तर उपदेश होय.

५५) कुणाची इच्छा झाल्यास त्यानं ते आठवणीत ठेवावं.

५६) पण अल्लाहची इच्छा नसेल तर कुणीही आठवणीत ठेवणार नाही. तोच भिण्याजोगा आणि क्षमेचा स्वामी.

-------

# ७५. सूरह अल-क़यामा

**मक्काकालीन, आयती ४०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) नव्हे, मी शपथ वाहतो पुनरुत्थानाच्या दिनाची!

२) नव्हे, मी शपथ वाहतो दोष देत असतो त्या मनाची!

३) मानवास काय वाटतं? आम्ही त्याची हाडं (जुळवून) एकत्र करणार नाही.

४) होय, आम्ही त्यांच्या बोटांची टोकंसुद्धा रचून पूर्ववत करून देण्यास समर्थ आहोत.

५) होय, माणूस तर पुढंसुद्धा पाप करू इच्छितो.

६) तो विचारतो, पुनरुत्थानाचा दिवस केव्हा येईल

७) जेव्हा डोळं दीपून जातील,

८) चंद्रास ग्रहण लागेल

९) आणि सूर्य व चंद्र एकत्र आणले जातील.

१०) त्या दिवशी माणूस म्हणू लागेल, आज कुठं पळून जाण्यास ठिकाण आहे?

११) नव्हे, बचावास जागा नाही.

१२) आज तुझ्या विधात्याकडंच मुक्काम आहे.

१३) मानवास आज बजावून सांगितलं जाईल, त्यानं पुढं काय पाठवलंय आणि मागं काय ठेवलंय.

१४) माणूस स्वत:विषयी चांगले जाणतो

१५) त्यानं कितीही निमित्त पुढं केलं तरी.

१६) तुम्ही कुरआनचं पठण करण्यास घाई करून आपल्या जिभा चालवू नका.

१७) त्यास पाठ करावयास लावणं आणि पठण करवणं आमची जबाबदारी आहे.

१८) आम्ही जेव्हा (दूतांकरवी) वाचून दाखवू तेव्हा तुम्ही त्या वाचनाचं अनुकरण करत जा.

१९) ते स्पष्ट करून देणं हीदेखील आमचीच जबाबदारी.

२०) मुळीच नाही, तुम्हांस तर जे तुर्तास प्राप्त होते (ऐहिक जीवनात) तेच पसंत करता

२१) आणि परलोकास सोडून देता.

२२) त्या दिवशी पुष्कळसे चेहरे टवटवीत असतील,

२३) आपल्या विधात्याकडं पाहत असतील.

२४) आणि पुष्कळसे चेहरे त्या दिवशी निराश असतील

२५) या विचारात की त्यांच्याशी जे घडणार ते पाठ मोडणारं असेल.

२६) होय, प्राण गळ्याशी येऊन पोचंल.

२७) म्हटलं जाईल, कुणी मंत्र-तंत्र करणारा आहे?

२८) आणि तो अनुमान करील, आता निरोप घेण्याची वेळ झाली,

२९) पायांत पाय अडकतील.

३०) त्या दिवशी तुला तुझ्या विधात्याकडं चालायचंय.

३१) त्यानं पुष्टी केली नाही की नमाज अदा केली नाही.

३२) मात्र खोटं ठरवलं आणि तोंड वळवलं

३३) नंतर मग आपल्या कुटुंबीयांकडं दिमाखात निघून गेला.

३४) तुझं हे वर्तन तुलाच शोभतं.

३५) दु:ख वाटतं तुझ्यावर.

३६) मानवास काय वाटतं, त्यास असंच सोडून दिलं जाईल.

३७) तो एक गळलेला वीर्याचा थेंब नव्हता.

३८) नंतर रक्ताची एक गुठळी झाली. तद्नंतर त्यास घडवलं आणि प्रमाणबद्ध केलं.

३९) मग त्याच्यापासून दोन लिंग बनवले, पुरुष आणि स्त्री.

४०) तेव्हा, तो मृतांस सजीव करण्याचं सामर्थ्य बाळगत नाही?

-------

# ७६. सूरह अद-दहर

## मक्काकालीन, आयती ३१

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) मानवावर असाही काळ बेतलाय जेव्हा तो उल्लेखनीय असं काहीच नव्हता.

२) आम्ही मानवास एका गोठलेल्या शुक्रबिंदूतून निर्माण केलं त्याची परीक्षा घेण्यास. आम्ही त्यास ऐकणं आणि पाहणं दिलं (कान आणि डोळं).

३) आम्ही त्यास मार्ग दाखवला. आता त्यानं आभार मानावे किंवा कृतघ्न होऊन जावं.

४) पण आम्ही नाकारणाऱ्यांसाठी साखळ्या, बेड्या, जोखड आणि भडकता अग्नी तयार ठेवलाय.

५) पुण्यशील लोक (पेयाचे) असे प्याले पितील ज्यामध्ये कापूरचे मिश्रण असेल.

६) हा एक झरा आहे ज्यातून अल्लाहचे भक्त पितील आणि त्यास (हवं तिथं) वाहून नेतील.

७) ते नवस फेडतील आणि अशा दिवसाचं भय बाळगतील ज्याची आपत्ती सर्वदूर पसरलेली असेल.

८) आणि त्याच्या (अल्लाहच्या) प्रेमापोटी, निराधार, अनाथ आणि बंदी (कैदी) यांना अन्न-पाण्याची तरतूद करतील.

९) (म्हणतील) आम्ही तुम्हांस अल्लाहच्या प्रसन्नतेखातर जेवू घालतो, आम्हांस तुम्हांकडून काही मोबदला नको की (तुमचं) आभार नको.

१०) आम्हांस आमच्या विधात्यापासून भीती वाटते भयंकर दिवसाची, ज्याचं संकट दीर्घकाळ असेल.

११) अल्लाहनं त्या दिवसाच्या वाईटातून त्यांची सुटका केली आणि त्यांना हर्षोल्हासित केलं.

१२) त्यांच्या संयमाचा मोबदला म्हणून त्यांना स्वर्ग आणि रेशीम (वस्त्रं) बहाल केलं.

१३) उच्च स्थानांवर रेलून बसतील. तिथं त्यांना उष्णतेची झळ आणि थंडीची पोचणार नाही.

१४) त्या बागेतील वृक्षांच्या सावल्या त्यांच्यावर झुकून जवळ आलेल्या असतील आणि फळांचे घड हातपोच लोंबकळत असतील.

१५) चांदीची भांडी आणि काचेचे प्याले फिरवले जातील.

१६) चांदीचे प्याले जे (सेवकांनी) ठीकठाक भरून ठेवलेले असतील.

१७) तिथं त्यांना आल्याचं मिश्रण पिण्यास दिलं जाईल.

१८) तिथं 'सलसबील' नावाचा एक झरा आहे.

१९) आणि त्यांच्या भोवती कायम तरुण असणारी मुलं असतील. ते तुम्हांस विखुरलेले मोत्यांसारखे वाटतील.

२०) तुम्ही तिथं पाहिलं तर तुम्हांस परमानंदाचं वैभवाचं अधिराज्यच दिसेल.

२१) त्यांची वस्त्रं, तलम रेशीम आणि सॅटीनची असतील. त्यांना चांदीच्या कंकणांनी सजवलं जाईल. त्यांचा विधाता त्यांना विशुद्ध आणि पावन पेय पाजील.

२२) हा तुमचा मोबदला. तुम्ही केलेले प्रयत्न स्वीकारण्यात आले.

२३) आम्ही तुम्हांस हे कुरआन टप्प्याटप्प्यांनी पाठवलं.

२४) तुम्ही (प्रेषित) आपल्या विधात्याच्या आदेशाची संयमानं वाट पाहा आणि पापी कृतघ्न लोकांचं ऐकू नका.

२५) सांज-सकाळ आपल्या विधात्याचं नामस्मरण करत जा.

२६) रात्रीचा काही भाग त्यास नतमस्तक होत राहा आणि रात्रीचं मोठ्या

भागात त्याचं पावित्र्यगान करत जा.

२७) तुर्तास जे मिळते तेच या लोकांना आवडते (म्हणजे ऐहिक जीवन) आणि खडतर असा एक दिवस मागं सोडत आहेत.

२८) आम्ही त्यांना निर्माण केलं आणि त्यांचे अवयव मजबूत केले. आम्हांस वाटेल तेव्हा (त्यांच्या जागी) त्यांना बदलून त्यांच्यासारखे लोक आणू.

२९) हा एक उपदेश होय. आता ज्यास इच्छा असेल त्यानं आपल्या विधात्याची वाट धरावी.

३०) आणि अल्लाहच्या इच्छेपलीकडं तुमची काही इच्छा नसते. अल्लाह निश्चितच सर्वज्ञ बुद्धिमान आहे.

३१) इच्छितो त्यास आपल्या दयेत सामावून घेतो. अत्याचारींना मात्र दु:खद शिक्षा तयार ठेवलीय.

-------

# ७७. सूरह अल-मुरसलात

**मक्काकालीन, आयती ५०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सतत वाहणाऱ्या लाभदायी वाऱ्याची शपथ!

२) नंतर वेगानं तुफानी वाऱ्याची शपथ!

३) ढगांना उचलून सर्वत्र पसरवून देणाऱ्या वाऱ्यांची शपथ!

४) नंतर त्यांना विलग करून देतात एकमेकांपासून, त्यांची शपथ!

५) आणि जे उपदेश वाहून आणतात त्यांची शपथ!

६) सबब म्हणून अथवा ताकीद देण्यास

७) तुम्हाला दिलेलं वचनं प्रत्यक्षात येणारच.

८) जेव्हा तारे विझून जातील,

९) आकाश दुभंगून जाईल,

१०) पर्वतं विखरून जातील,

११) ठरल्या वेळी प्रेषितांना एकत्र केलं जाईल.

१२) कोणत्या दिवसासाठी या गोष्टी पुढं ढकलण्यात आल्या होत्या?

१३) निर्णयाच्या दिनासाठी?

१४) आणि निवाड्याचा दिवस काय तो तुम्हांस समजणार?

१५) खोटं ठरवणाऱ्यांसाठी दुर्दैवाचा (दिवस).

१६) आम्ही पूर्वीच्यांना नष्ट केलं नाही?

१७) आणि त्यांच्या पाठोपाठ नंतरच्या लोकांना चालवू.

१८) अपराधींशी आम्ही असंच (व्यवहार) करत असतो.

१९) धिक्कार असो खोटं ठरवणाऱ्यांचा!

२०) आम्ही तुम्हांस एक क्षुल्लक अशा पाण्यानं नाही का निर्माण केलं?

२१) मग आम्ही एका सुरक्षित ठिकाणी ठेवलं

२२) एका ठरलेल्या अवधीपर्यंत.

२३) मग आम्ही त्याची व्यवस्था करून दिली. किती श्रेष्ठ आम्ही व्यवस्था करतो.

२४) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा.

२५) आम्ही धरतीस समाविष्ट करून घेणारी नाही का बनवली?

२६) सजीवांना आणि मृतांना

२७) आणि तिच्यामध्ये उत्तुंग पर्वतं रोवली आणि पिण्यास गोड पाणी पुरवलं.

२८) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा!

२९) (आदेश दिला जाईल,) चला तिकडं, जे तुम्ही खोटं ठरवत होता तिकडं.

३०) चला तिथं तीन स्तंभांच्या सावलीकडं,

३१) जे थंड सावली देत नाही की उष्णतेपासून बचाव करते.

३२) अग्नीच्या महालासमान ठिणग्या फेकतात.

३३) जणू पिवळ्या रंगाची उंटं.

३४) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा!

३५) त्या दिवशी त्यांना बोलता येणार नाही.

३६) त्यांना कोणती सबब पुढं करण्याची अनुमतीही नसेल.

३७) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा!

३८) हाच तो निर्णयाचा दिवस आम्ही तुम्हाला गोळा केलं आणि पूर्वीच्यांनाही.

३९) आता माझ्याविरूद्ध तुमची काही चाल असेल तर ती करून पाहा.

४०) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा!

४१) जे सदाचारी आहेत ते सावली आणि झऱ्यांमध्ये असतील

४२) आणि त्यांना हवी ती फळं असतील.

४३) खा आणि प्या तृप्त होऊन. हा मोबदला तुमच्या पुण्यकर्मांचा.

४४) आम्ही नेक लोकांना असाच मोबदला देत असतो.

४५) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा!

४६) खा आणि काही काळ लाभ मिळवून घ्या. तुम्ही नक्कीच अपराधी आहात.

४७) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा!

४८) त्यांना (अल्लाहपुढं) नमण्यास म्हटलं असता ते नमत नाहीत.

४९) धिक्कार असो त्या दिवशी, खोटं ठरवणाऱ्यांचा!

५०) मग यानंतर कोणत्या गोष्टीवर हे लोक विश्वास ठेवतील?

-------

# ७८. सूरह अन्नबा

## मक्काकालीन, आयती ४०

**पारा - ३०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) ते आपसात काय चर्चा करतायत

२) त्या प्रचंड वृत्ताविषयी?

३) ज्या बाबतीत ते वाद घालत आहेत

४) लवकरच त्यांना कळून चुकेल.

५) होय निश्चितच त्यांना कळून चुकेल.

६) आम्ही पृथ्वीला भलामोठा विस्तार दिला नाही?

७) आणि पर्वतांची मेख ठोकली?

८) आणि तुमची निर्मिती जोडप्याजोडप्यांत केली

९) आणि तुमच्या विश्रांतीसाठी झोप बनविली

१०) आणि रात्रीला पांघरूण बनविलं

११) व उदरनिर्वाहासाठी दिवस उजाडला

१२) तुमच्यावर सात भक्कम आकाशं उभारली

१३) एक प्रचंड तेजस्वी दीप प्रज्वलित केला

१४) आणि ढगांतून संततधार पाऊस पाठवला

१५) जेणेकरून त्याद्वारे धान्य आणि भाजीपाला उगविता यावा.

१६) तसेच भरगच्च बागा.

१७) निश्चितच निर्णयाचा दिवस ठराविक कालावधी आहे

१८) ज्या दिवशी शंख फुंकला जाईल आणि तुम्ही झुंडीझुंडीनं धावत सुटाल.

१९) आकाश उघडलं जाईल, जणू ते दारच बनून जाईल.

२०) आणि पर्वत चालू लागतील (आणि त्यांची अवस्था) मृगजळासारखी होऊन जाईल.

२१) निश्चितच नरक दबा धरून बसलेलं स्थान आहे.

२२) मर्यादांचं उल्लंघन करणाऱ्यांचं ठिकाण

२३) युगानुयुग ते तिथं राहतील.

२४) तिथं त्यांना चवीस गार काही नसेल की पिण्यासाठी काही असेल

२५) उकळते द्रव आणि गढूळ पाणी

२६) जशास तसा पुरेपूर मोबदला

२७) त्यांना हिशेब देण्याची अपेक्षा नव्हतीच.

२८) आमच्या संकेतांना खोटं ठरवलं.

२९) आम्ही सर्वकाही नोंदून जतन करून ठेवलंय.

३०) आता (आपल्या कर्मांच्या फळांची) चव घ्या. आम्ही दुसरं काही देणार नाही शिक्षेशिवाय.

३१) (पण) निश्चितच सदाचारींसाठी (मात्र) यश आहे.

३२) (त्यांच्याकरिता) बागा आणि द्राक्षं आहेत.

३३) आणि समवयस्क सोबती

३४) भरलेले पेले

३५) ते तिथं कोणत्याही फाजील गोष्टी ऐकणार नाही की अनर्थ बाता ऐकतील.

३६) तुमच्या विधात्याकडून हा मोबदला आणि पुरेपूर भेट.

३७) आकाश, धरती आणि जे काही दोहोंमधील आहे ते सर्वकाही त्या विधाता आणि नितांत कृपाळूशी बोलण्याची क्षमता कुणात नाही.

३८) ज्या दिवशी आत्मा आणि सारे दूत रांगेत हजर राहतील त्या अत्यंत दयावान अल्लाहनं परवानगी दिल्याशिवाय कुणी तोंड उघडू शकणार नाही, जे बोलतील ते प्रामाणिकच (रास्त) असेल.

३९) तो दिवस प्रत्यक्षात येणारच तेव्हा इच्छा असेल त्यानं आपल्या विधात्याचा आश्रय घ्यावा.

४०) निश्चितच आम्ही तुम्हास जवळ येत असलेल्या प्रकोपापासून सावध केलंय. माणसानं जे काही पुढं पाठवलंय तो त्याला पाहून घेईल. नाकारणारे म्हणतील आमची माती झाली असती. (तर बरं झालं असतं.)

-------

# ७९. सूरह अन-नाजिआत

**मक्काकालीन, आयती ४६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) (वाईटांचे आत्मे) खोलवर ओरबडून घेणाऱ्या (दूतांची) शपथ

२) आणि हळूवारपणे काढून घेणाऱ्या (दूतांची) शपथ

३) वेगाने तरंगत असणाऱ्यांची

४) चुरशीने पुढं धाव घेणाऱ्यांची शपथ

५) (आपल्या पालनकर्त्याच्या) आज्ञा अंमलात आणणाऱ्यांची शपथ

६) ज्या दिवशी हादरा गोंधळ उडवून देईल

७) पाठोपाठ दुसरा हादरा.

८) कित्येक हृदये त्या दिवशी घाबरून जातील.

९) त्यांच्या नजरा भयभीत झालेल्या असतील.

१०) ते म्हणतात आम्ही खरेच पूर्व स्थितीत परतवले जाणार?

११) आमची हाडे जर्जर झालेली असतानादेखील

१२) म्हणतील तसा परतणं तर तोट्याचं ठरेल

१३) पण निश्चितच केवळ एक दर्डावणी दिली जाईल

१४) आणि ते सारेच्या सारे उघड्या मैदानात (जमा होतील)

१५) तुम्हाला मूसाचा किस्सा कळला नाही?

१६) त्यांच्या विधात्यानं तुवाच्या पवित्र खोऱ्यात त्यास हाक दिली

१७) आणि म्हणाला, फिरऔनकडे जा त्यानं अनाचार माजविलाय.

१८) सांगा सावरायची तुझी इच्छा आहे?

१९) तुला तुझ्या पालनकर्त्याचा मार्ग दाखवू? त्याचे भय तुझ्या ठायी निर्माण व्हावं

२०) मूसानं त्याला मोठे संकेत दाखवून दिले.

२१) (तरीही) त्यानं धुडकावून लावीत अवज्ञा केली.

२२) पाठ फिरवून परतला

२३) लोकांना गोळा केलं आणि

२४) घोषणा केली मी तुमचा श्रेष्ठतम पालनकर्ता आहे.

२५) अल्लाहनं त्याला धरलं, त्याला शिक्षा दिली इहलोकात आणि परलोकातदेखील.

२६) यात सावधगिरी बाळगणाऱ्यांकरिता धडा आहे.

२७) तुम्हाला निर्माण करणं अवघड आहे की आकाश बनवणं जिकिरीचं काम आहे

२८) त्याला उंचावर नेऊन छताचा आकार दिला असं परिपूर्ण काम केलं.

२९) त्यावर रात्रीचे अंधार पसरवले, मग दिवस उजाडले.

३०) नंतर मग पृथ्वीचा विस्तार केला

३१) त्यातून पाणी काढलं व गवत उगवलं.

३२) पर्वतांना स्थापित केलं.

३३) तुम्हाला आणि तुमच्या पशु-प्राण्यांसाठी उपयोगी (अशा)

३४) जेव्हा ती प्रचंड घटना घडेल

३५) त्या दिवशी मनुष्याने काय प्रयास केले कमवले त्याला आठवेल.

३६) आणि सर्वांना पाहता यावी अशी नरकाग्नी उजेडात आणली जाईल.

३७) ज्यांनी सर्व मर्यादा भंग केल्या

३८) आणि जगातील जीवनाला प्राधान्य दिलं.

३९) निश्चितच अशा (लोकांचं) ठिकाण नरक आहे.

४०) आणि जो आपल्या विधात्यासमोर उभं राहताना भीत असतो आणि आपल्या मनातील इच्छांना आवरतो.

४१) त्याचं निवासस्थान स्वर्ग आहे.

४२) ते विचारतायत प्रलयाबाबत केव्हा घडणार (म्हणून)

४३) वर्णनाशी तुमचं काय देणंघेणं?

४४) ती सर्व मर्यादा तुमच्या पालनकर्त्यानं ठरवलेली

४५) तुम्ही भय बाळगणाऱ्यांनाच फक्त उपदेश करू शकता.

४६) ते ज्या दिवशी तिला पाहतील त्यांना असे वाटेल, ती संध्याकाळपर्यंत फार तर पहाटेपर्यंतच थांबेल.

-------

# ८०. सूरह अबस

**मक्काकालीन, आयती ४२**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) प्रेषित, तुम्ही रागानं मागं वळला?
२) एक आंधळी व्यक्ती (तुमच्याकडं मध्येच) आली म्हणून
३) कदाचित ती शिकली सवरली असती, तुम्हाला काय कल्पना
४) किंवा शिकवण दिली असती तर ती त्याला लाभदायी ठरली असती.
५) जे स्वत:ला (त्याच्या) तुलनेत स्वयंपूर्ण समजतात
६) त्यांच्याकडं तर तुम्ही लक्ष देता
७) कुणी सुधारला नाही तर तुमच्यावर (काहीच दोष) नाही.
८) पण जो तुमच्याकडं चालून आला
९) आणि त्यानं भीती बाळगली
१०) त्याकडं तुम्ही दुर्लक्ष करता
११) असं कधीच (होता कामा नये) हा तर संदेश आहे.
१२) हवं त्यांनी ती शिकवण स्वीकारावी.
१३) प्रतिष्ठित ग्रंथांमधलं
१४) पवित्र आणि उदात्त.
१५) (अशा) हातांनी लिहिलेलं
१६) जे आदरणीय आणि नेक न्यायी (आहेत.)
१७) माणसाचा नाश होवो हे का बरं तो नाकारतो.
१८) अल्लाहनं कसल्या पदार्थानं त्याला निर्मिलं?
१९) एका शुक्रबिंदूपासून आणि मग त्याला साकारलं, क्षमता दिली
२०) मग त्याचं जगणं सोयीस्कर केलं.
२१) त्यानंतर त्याला मृत करून कबरीत पोहोचवलं

२२) मग वाटेल तेव्हा तो त्यास पुन्हा (कबरीतून काढून) उभं करील

२३) अल्लाहनं दिलेल्या आज्ञा त्यानं कशाप्रकारेदेखील पाळल्या नाहीत.

२४) माणसानं कधी आपल्या अन्नाकडं नजर टाकावी (आपण काय खातो हे त्यानं पाहावं)

२५) त्यासाठी आम्ही पुरेपूर पाणी ओतलं

२६) नंतर जमिनीत भेगा पाडल्या

२७) मग त्यातून धान्य उगवलं

२८) तसेच द्राक्षं आणि इतर वनस्पती

२९) जैतून (आलिव्ह) व खजूर

३०) आणि (निरनिराळ्या झाडांच्या) दाट बागा

३१) फळे आणि गवत

३२) तुमच्या उपयोगासाठी तसेच तुमच्या पशुंसाठी, उपजीविका (म्हणून)

३३) सरतेशेवटी जेव्हा कानठळ्या बसवणारा आवाज ऐकू येईल

३४) (तेव्हा) माणूस आपल्या भावापासून पळ काढेल

३५) आईवडिलांपासून सुद्धा

३६) तसेच आपल्या पत्नी आाणि मुलांपासून (पळून जाईल)

३७) त्यांच्यातले सर्वजण त्या दिवशी फक्त स्वत:च्या काळजीत मग्न होऊन इतरांना परके करतील.

३८) त्या दिवशी काही तेजस्वी असतील

३९) आनंदित आणि हसतमुख

४०) तर काहींच्या तोंडावर त्या दिवशी धूळ माखलेली असेल.

४१) काळं फासलेलं

४२) हेच ते (अल्लाहशी) द्रोह करणारे अपराधी लोक (होत).

-------

# ८१. सूरह तकवीर

**मक्काकालीन, आयती २९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) जेव्हा सूर्य गुंडाळून टाकला जाईल

२) आणि तारे विझून जातील

३) पर्वतं इकडे तिकडे होतील

४) जेव्हा दहा महिन्यांची गर्भधारक उंटिण सोडून दिली जातील.

५) जंगली जनावरे गोळा केली जातील (राहत्या वस्त्यांत)

६) जेव्हा महासागरे उकळू लागतील

७) आणि जेव्हा (सर्वांचे) आत्मे (शरीराशी) जोडले जातील

८) आणि जेव्हा जमिनीत गाडलेल्या जिवंत मुलीला विचारलं जाईल

९) कोणत्या अपराधापायी तुला ठार केलं?

१०) आणि जेव्हा कर्माची दप्तरं उघडली जातील

११) जेव्हा आकाशावरून पडदा काढला जाईल

१२) जेव्हा नरकाग्नि पेटवला जाईल

१३) आणि स्वर्ग जवळ आणला जाईल

१४) (तेव्हा) आपण काय आणलं आहे ते प्रत्येकाला कळेल.

१५) तेव्हा मी शपथ वाहतो मावळणाऱ्या ताऱ्यांची.

१६) व उगवणाऱ्या ग्रहांची, आणि लोप पावणाऱ्या ग्रहांची.

१७) आणि पसरणाऱ्या रात्रीची

१८) नव्या दमाच्या पाहटेची.

१९) निश्चितच एका प्रतिष्ठित प्रेषिताचे हे शब्द (कुरआन) आहेत.

२०) सिंहासनाच्या स्वामीपाशी ज्याचा दरारा आहे.

२१) प्रतिष्ठित आणि विश्वसनीय

२२) तुमचे ते सोबती (प्रेषित) (काही) वेड लागलेले नाहीत.

२३) त्याने निश्चितच त्या (दूताला) क्षितिजावर उघड पाहिलं आहे.

२४) ते (प्रेषित) अदृश्याविषयीचं कोणतं ज्ञान रोखून ठेवत नाही.

२५) हे धिक्कारलेल्या सैतानाचे शब्द नाहीत.

२६) तेव्हा तुम्ही कुठं पळ काढताय?

२७) हा तर सकल विश्वांसाठी उपदेश आहे.

२८) जो कुणी सरळमार्ग अवलंबण्याची तयारी ठेवल त्याच्यासाठी.

२९) आणि तुम्ही कोण तशी इच्छा बाळगणारे? तुमच्या पालनकर्त्याचीच तशी मर्जी असेल तरच?

-------

# ८२. सूरह अल-इन्फितार

**मक्काकालीन, आयती १९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) जेव्हा आभाळ फाटून जाईल,

२) जेव्हा तारे कोलमडून पडतील

३) जेव्हा महासागर उफाळून येतील

४) आणि जेव्हा कबरी उकरून टाकल्या जातील.

५) तेव्हा प्रत्येकास त्यानं जे काही पुढं पाठवलंय आणि मागं सोडलंय ते कळंल.

६) हे मानवा आपल्या उपकारकर्ता विधात्याविषयी कशानं तुझ्यावर भुरळ घातली

७) ज्यानं तुला निर्माण केलं, सावरलं, प्रमाणबद्ध केलं

८) हवं त्या रूपात तुला साकारलं,

९) नव्हे, तुम्ही निर्णयाच्या दिवसाला खोटं ठरवता

१०) पण निश्चितच तुमच्यावर देखरेख करणारे आहेत.

११) सज्जन आणि आदरणीय नोंद ठेवणारे.

१२) तुम्ही जे काही करता त्याची (त्यांना) कल्पना आहे.

१३) सदाचारी लोक निश्चितच संपन्न (बागांमध्ये) असतील

१४) आणि दुष्ट लोक नरकात जातील.

१५) निर्णयाच्या दिवशी या लोकांना त्याच्यामध्ये टाकण्यात येईल.

१६) आणि तेथून ते कुठं पळू शकणार नाहीत.

१७) तुम्ही जाणता निर्णयाचा दिवस कसला तो

१८) तुम्हाला काय कल्पना त्या निर्णयाच्या दिवसाची

१९) असा दिवस जेव्हा कोणीही कुणासाठी काहीही करण्याचं मालक नसेल त्या दिवशी फक्त अल्लाहचाच हुकूम चालेल.

-----

# ८३. सूरह मुतफ्फिफीन

**मक्काकालीन, आयती ३६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) देण्या-घेण्यात तफावत करणाऱ्यांचा धिक्कार असो

२) लोक इतरांकडून (काही) घेतात तेव्हा मापानं भरभरून घेतात

३) पण जेव्हा दुसऱ्यांना मापून वजन करून देतात तेव्हा प्रमाणापेक्षा कमी देतात.

४) त्यांना कल्पना नाही? एक दिवस त्यांना परत उठवलं जाईल

५) त्या मोठ्या दिवशी

६) ज्या दिवशी सारेच्या सारे विश्वाच्या विधात्यासमोर उभं राहतील

७) नव्हे; दुराचाऱ्यांची नोंद तर सिज्जीनमध्ये असेल.

८) हे सिज्जीन म्हणजे काय?

९) नोंदणीचं दप्तर (ते)

१०) (हे) खोटं ठरवणाऱ्यांचा त्या दिवशी धिक्कार (असेल)

११) निर्णयाच्या दिवसास खोटं म्हणणाऱ्या लोकांचा

१२) आणि कोण खोटं ठरवतात? मर्यादांचं उल्लंघन करणारे गुन्हेगारच.

१३) जेव्हा त्यांना आमच्या आयतींची उजळणी केली जाते ते म्हणतात, या जुनाट कथा आहेत.

१४) मुळीच नाही, ते त्यांच्या हृदयावरील डाग आहेत त्यांनी कमवलेले.

१५) निश्चितच ही माणसं त्या दिवशी आपल्या विधात्यापासून रोखून ठेवले जातील.

१६) आणि मग त्यांना नरकात टाकलं जाईल.

१७) त्यांना म्हटलं जाईल, हेच ते ज्याला तुम्ही खोटं ठरवत राहिलं.

१८) पण नाही, पुण्यवानांची नोंद इल्लियीनमध्ये (सुरक्षित) आहे

१९) आणि काय ते इल्लियीन?

२०) नोंद करून ठेवलेलं दप्तर.

२१) (अल्लाहचे) निकटवर्ती ज्याचे साक्षी आहेत.

२२) निश्चितच सदाचारी लोक आनंद लुटत असतील.

२३) उच्च स्थानांवरून पाहण्यात मग्न असतील.

२४) तुम्ही त्यांच्या प्रसन्न चेहऱ्यांवरील टवटवीत तेजानं त्यांचा आनंद ओळखू शकाल.

२५) त्यांना सीलबंद पेय प्यायला दिलं जाईल.

२६) कस्तुरीची (ती) मोहोर असेल. महत्त्वाकांक्षींनी त्याची अशा बाळगायला हवी.

२७) त्यात 'तसनीम'चे मिश्रण आहे.

२८) जो स्वर्गातला झरा आहे ज्यातून (अल्लाहचे) निकटवर्ती पितात.

२९) अपराधी लोक श्रद्धावांनाची टिंगल उडवित असत

३०) आणि त्यांच्या जवळून जात असता आपसात डोळ्यांनी खुणवित असत

३१) आपल्या मंडळीत परतल्यावर त्यांची आठवण काढून थट्टा करीत

३२) आणि जेव्हा कधी त्यांना पाहत म्हणत असतील खरे तर हेच मार्गभ्रष्ट लोक.

३३) त्यांच्यावर लक्ष ठेवण्याकरिता म्हणून ते नव्हते पाठविले गेले

३४) मात्र आजचा हा तो दिवस श्रद्धावान अश्रद्धांवर हसतील

३५) उच्चासनांवर सन्मानानं बसून पाहत असतील

३६) नको का (मग) या विद्रोहींनी केलेल्या कर्माची परतफेड.

-------

# ८४. सूरह अल-इन्शिकाक

**मक्काकालीन, आयती २५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) जेव्हा आकाश फाटून जाईल

२) आपल्या विधात्याची आज्ञा पाळेल, तीच त्याची वास्तविकता

३) आणि पृथ्वी सपाट होईल

४) जे काही तिच्या (उदरात) असेल ते बाहेर काढून टाकील.

५) आपल्या विधात्याची मर्जी राखील. ती त्याची अगतिकता.

६) हे मानवा! खरंच तू आपल्या पालनकर्त्याकडे जाण्यास पराकाष्ठा करतोयस यातूनच तू त्याला भेटशील

७) जेव्हा त्याच्या कर्मांची नोंद उजव्या हातात दिली जाईल

८) लगेच त्याचा हिशोब सहजगत्या घेतला जाईल.

९) आणि आपल्या स्वकीयांकडं प्रसन्नतेनं परतेल

१०) आणि ज्याला त्याच्या कर्मांची नोंद पाठीमागून दिली जाईल

११) तोच, तो विनाशाकडं धाव घेईल.

१२) पेटलेल्या आगीत मिसळून जाईल

१३) नक्कीच, तो आपल्या स्वकियांच्या सान्निध्यात आनंदानं राहत असे.

१४) आणि म्हणूनच आपणास कधी परतावयाचं आहे असा विचार तरी त्यानं केला होता?

१५) पण त्याचा विधाता त्यावर नजर ठेवून होता

१६) तर, मी शपथ घेतो सायंकालीन तांबड्याची

१७) आणि रात्रीची आणि ज्यांना ती एकत्रित करते.

१८) आणि पूर्णत्वास गेलेल्या चंद्राची

१९) खरंच टप्प्याटप्प्यानं तुम्हाला (देखील) चढत जायचंय.

२०) मग त्यांना झालंय तरी काय ते श्रद्धा बाळगणारे नाहीत

२१) त्यांच्यासमोर जेव्हा कुरआन वाचण्यात येई ते नतमस्तक होत (शरण जात) नाहीत.

२२) नव्हे, ते तर नाकारणारे व खोटं ठरवणारे आहेत.

२३) त्यांनी (आपल्या मनात) जे काही दडवलंय ते सर्व अल्लाहच्या माहितीत आहे.

२४) मग, द्या त्यांना खूशखबर यातनादायक प्रकोपाची

२५) उरले ते लोक ज्यांनी श्रद्धा बाळगली, त्यानुसार आचरण केलं, त्यांच्यासाठी अमर्याद मोबदला आहे.

-------

# ८५. सूरह अल-बुरुज

## मक्काकालीन, आयती २२

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ बुरुजधारी (राशीमंडळ) अवकशाची

२) वचन दिलेल्या दिवसाची

३) साक्षीची आणि ज्याची साक्ष दिली जाईल.

४) मारले गेले ते खंदकवाले

५) इंधनानं पेटवलेल्या अग्निवाले

६) तेथे (काठावर) बसलेले असताना

७) आणि श्रद्धावानांचे जे हाल करीत होते त्याचे साक्षी म्हणून (पाहत) होते.

८) फक्त सर्वशक्तिमान आणि सर्व प्रशंसेस पात्र अल्लाहवर त्यांनी क्षद्धा ठेवली होती त्याच (एकमेव) कारणामुळे.

९) जो सर्व आकाश आणि पृथ्वी ज्याचे अधिराज्य आहे. अल्लाह सर्व बाबींवर नजर ठेवून आहे.

१०) ज्या लोकांनी श्रद्धावंत पुरुष आणि महिलांचा छळ केला आणि पश्चात्ताप केला नाही त्यांना निश्चितच नरकयातना आहेत, आगीत जळण्याचा प्रकोपदेखील.

११) ज्या लोकांनी श्रद्धा बाळगून सदाचार केला त्यांच्यासाठी स्वर्गाच्या बागा आहेत ज्यांच्याखालून नद्या वाहत असतील हे त्यांचं मोठं यश आहे.

१२) तुमच्या विधात्याची पकड खरंच भयानक आहे.

१३) (निर्मितीचा) प्रारंभ करणाराही तोच आणि तोच त्याची पुनरावृत्ती करणारा.

१४) तोच क्षमा करणारा आणि प्रेमळदेखील.

१५) वैभवशाली सिंहासनाचा स्वामी

१६) इच्छेनुसार हवं ते करणारा.

१७) तुम्हापर्यंत त्या लष्कराची वार्ता पोचवली?

१८) फिरऔन आणि समूदच्या,

१९) तरीदेखील द्रोह करणारे नकारतच आहेत.

२०) पण अल्लाहने त्यांना चहूबाजूंनी वेढा घातलाय.

२१) हा तर वैभवशाली कुरआन आहे.

२२) सुरक्षित ठिकाणी जतन करून ठेवलेला.

-------

# ८६. सूरह अत्तारिक

**मक्काकालीन, आयती १७**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ त्या रात्रीच्या वेळी येणाऱ्याची

२) आणि महिताय कोण तो रात्री येणारा

३) अतिशय तेजस्वी तारा (आहे तो)

४) एकही जीव असा नाही ज्यावर निगा ठेवलेली नाही

५) मानवाची निर्मिती कशापासून झाली त्यास त्यानं पाहावं

६) एका उसळणाऱ्या पाण्यापासून बनलाय तो.

७) पाठ आणि छातीच्या (हाडां) च्या मधून निघालेला.

८) खचितच तो (अल्लाह) त्याचं पुनरुत्थान करण्यास सक्षम आहे

९) ज्या दिवशी साऱ्या रहस्यांची चाचणी होईल

१०) ज्या दिवशी माणसाकडे स्वत:चे सामर्थ्य नसेल की कोणी मदत करणारा नसेल.

११) शपथ (पाऊस) परतवणाऱ्या आकाशाची.

१२) शपथ फाटून जाणाऱ्या धरतीची

१३) हे निर्णायक शब्द आहेत

१४) विनोदासाठी नव्हे

१५) त्या काही चाल योजत आहेत.

१६) मीसुद्धा एक चाल करतोय

१७) तेव्हा नाकारणाऱ्यांना सवड द्या, थोडासा अवसर.

-------

# ८७. सूरह अल-आला

## मक्काकालीन, आयती १९

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आपल्या सर्वोच्च विधात्याची स्तुती करा

२) ज्यानं निर्माण केलं आणि सावरलं.

३) ज्यानं पूर्वनियोजन केलं आणि मार्गदर्शन केलं.

४) जो पिकं काढतो.

५) मग काळा कचरा करतो.

६) आम्ही तुम्हाला शिकवू आणि तुम्ही विसरणार नाही

७) पण अल्लाहची जी इच्छा असेल ती वगळता, तो तर व्यक्त आणि अव्यक्त सर्वकाही जाणतो.

८) आम्ही सरळ आणि सोपं करून देऊ.

९) त्यांना मग उपदेश द्या ते त्यांच्या हिताचं असेल तर

१०) जे (अल्लाहला) भीत असतील ते स्मरणात ठेवतील

११) अभागी असतील ते टाळाटाळ करतील

१२) तेच लोक मोठ्या आगीत (जाऊन) मिळतील.

१३) (तेथे) त्यांना मरणही येणार नाही, ते की जगत राहतील.

१४) ज्यानं स्वत:ला सावरलं तो सार्थ ठरला.

१५) आणि आपल्या विधात्याचं गुणगान केलं आणि नमाज अदा केली

१६) तुम्ही तर या जगातल्या जगण्याला महत्त्व देता

१७) पण परलोक समृद्ध आणि शाश्वत आहे

१८) हेच पूर्वीच्या (पूर्वकालीन) ग्रंथांमध्ये (नमूद) केलंय.

१९) इब्राहीम आणि मूसा यांच्या ग्रंथांमध्ये.

-------

# ८८. सूरह अलगाशिया

**मक्काकालीन, आयती २६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) तुम्हाला त्या वेढून टाकणाऱ्या घटनेची माहिती मिळाली?

२) ज्या दिवशी काही चेहरे अपमानित झालेले असतील

३) कष्ट (सहन) करून थकलेले

४) ते भडकत्या आगीत दाखल होतील.

५) पिण्यासाठी जेव्हा उकळत्या झऱ्यातील पाणी दिलं जाईल

६) आहारासाठी त्यांना काटेरी गवताशिवाय काहीच नसेल.

७) ज्यानं त्यांचं पोषणही होणार नाही की भूकही शमणार नाही.

८) काही चेहरे त्या दिवशी प्रसन्न असतील

९) जे काही प्रयत्न त्यांनी केले असतील त्यामुळं समाधानी असतील.

१०) उंचावरील स्वर्गांमध्ये

११) तिथं कोणत्याही फाजील गोष्टी ऐकाव्या लागणार नाहीत.

१२) अखंड वाहत असलेले झरे तिथं असतील.

१३) त्यामध्ये उंचावर आसनं असतील.

१४) आणि भरून ठेवलेले पेले

१५) आणि रांगेत (सजवलेले) गालिचे

१६) किमती लोड लावलेले

१७) ते पाहत नाहीत उंटांना कसं निर्माण केलं गेलं त्यांना.

१८) आणि आकाशाला कसं त्यास उदात्त

१९) आणि पर्वतांना कसं रोवलं

२०) आणि धरतीला कसं विस्तारलं

२१) तेव्हा तुम्ही (या गोष्टीचा) उपदेश द्या, तुम्ही उपदेश करणारे आहात

२२) त्यांच्यावर (नेमलेला) मुकादम नाही.

२३) पण जर कुणी अल्लाहपासून तोंड फिरवलं आणि नकार दिला

२४) तेव्हा अल्लाह त्याला शिक्षा करेल, भयंकर अशी शिक्षा

२५) आमच्याकडंच त्यांना परतावयाचं आहे.

२६) मग आम्हीच त्यांचा हिशेब घेऊ.

-------

# ८९. सूरह अल-फज्र

**मक्काकालीन, आयती ३०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ पहाटेची

२) दहा रात्रींची

३) सम आणि विषम दोहोंची

४) सरत्या रात्रीची

५) समंजस लोकांसाठी शपथ घेण्याजोगे यात काही नाही काय?

६) आद लोकांचं तुमच्या विधात्यानं काय (हाल) केलं ते पाहिलं नाही.

७) (तेच) इरम (शहरा) चे लोक उंचउंच स्तंभवाले

८) ज्या समान धरतीच्या पाठीवर दुसरं कोणतं शहर निर्माण केलं गेलं नाही.

९) आणि समूदचे लोक ज्यांनी दऱ्यांत डोंगर कोरले ते.

१०) आणि वधस्तंभ उभारलेला फिरऔन

११) हे ते लोक होत ज्यांनी मुलुखात (सर्व) मर्यादा मोडल्या होत्या

१२) कित्येक ठिकाणी अनाचार माजवला होता.

१३) म्हणून तुमच्या विधात्यानं शिक्षांचा वर्षाव केला.

१४) नि:संशय तुमचा पालनकर्ता दबा धरून बसलाय.

१५) मानवास आजमावण्यासाठी त्याचा विधाता त्यास सन्मान आणि संपन्नता दिल्यास तो म्हणतो, माझ्या विधात्यानं मला सन्मानित केलं.

१६) आणि जेव्हा परीक्षेसाठी मानवाला त्यंचा विधाता त्याचं अन्नपाणी कमी करतो तेव्हा तो म्हणतो माझ्या विधात्यानं माझा तिरस्कार केला.

१७) तसे नव्हे, तुम्ही राखला नाही मान अनाथांचा.

१८) तसेच तुम्ही गोरगरिबांना जेवू घालण्यास एकमेकांना प्रोत्साहित करत नव्हता.

१९) आणि वारसाची सर्व संपत्ती खाऊन टाकता

२०) आणि संपत्तीवर भरभरून प्रेम करता.

२१) नव्हे, जेव्हा ही धरती दाणादाण केली जाईल.

२२) आणि तुमचा विधाता येईल, (त्याच्या) दूतांसह रांगेत उभारलेले

२३) आणि ज्या दिवशी नरकासमोर आणलं जाईल त्या दिवशी माणसाला आठवेल. पण आता त्या आठवणीचं काय?

२४) तो म्हणेल, माझ्या आयुष्यातच मी आगाऊ काही धाडलं असतं.

२५) आणि त्या दिवशी अल्लाह जशी शिक्षा देईल तशी कुणी केली नसेल.

२६) आणि जसा तो जखडून टाकील तसं कुणी जखडलं नसेल.

२७) हे समाधानी आत्म्या

२८) तू आपल्या विधात्याकडं अशा प्रकारे परत फिर जेणेकरून तू त्याच्याशी प्रसन्न होशील आणि तो तुझ्याशी प्रसन्न होईल.

२९) तू माझ्या भक्तांमध्ये दाखल हो

३०) नि माझ्या स्वर्गात प्रवेश कर.

-------

# ९०. सूरह अल-बलद

**मक्काकालीन, आयती २०**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) नव्हे, मी या शहराची शपथ घेतो.

२) आणि तुम्ही या शहराचे रहिवासी आहात.

३) बापाची आणि संतानाची शपथ

४) खरंच आम्ही मनुष्याला कष्टाच्या (परिस्थितीत) निर्माण केलं.

५) त्याच्यावर कुणास सामर्थ्य नाही असा त्यानं अंदाज लावलाय का?

६) तो म्हणतो मी वारेमाप संपत्ती उधळली

७) त्याला कुणी पाहिलं नाही असा तो विचार करतो?

८) आम्ही दोन डोळे दिले नाहीत

९) (की) एक जीभ आणि दोन कान

१०) आणि त्याच्या निदर्शनास दोन मार्ग आणले आहेत,

११) पण त्यानं (उकबा) खोऱ्यातून वर जाण्याची वाट धरली नाही.

१२) पण तुम्हांस काय माहीत काय ती (उकबा) खोरी?

१३) म्हणजे गुलामाची सुटका करणं

१४) उपासमारीच्या काळात भुकेलेल्यांना जेवू घालणं

१५) जवळच्या अनाथांना

१६) हलाखीच्या परिस्थितीतील गरजूंना

१७) तेव्हा, त्याची गणना श्रद्धावंतांमध्ये होईल, जे एकमेकांस संयम आणि सहानुभूतीचा उपदेश देतात.

१८) हेच लोक उजव्या बाजूचे आहेत. (नशीबवान)

१९) आणि असे लोक ज्यांनी आमच्या वचनांना नाकारलं ते डाव्या बाजूचे आहेत. (दुर्दैवी)

२०) त्यांना नरकाग्निनं वेढलेलं असेल.

-------

# ९१. सूरह अश्शम्स

**मक्काकालीन, आयती १५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ तेजपुंज सूर्याची

२) त्याच्या मागोमाग उगवणाऱ्या चंद्राची

३) सारंकाही उजेडात आणणाऱ्या दिवसाची

४) आणि त्याला झाकून घेणाऱ्या रात्रीची शपथ

५) आणि शपथ अवकाश आणि ज्यानं त्यास साकारलं.

६) धरतीची आणि ज्यानं ती पसरवली.

७) आत्म्याची आणि ज्यानं त्यास घडवलं.

८) आणि मग त्याच्या मनाला पाप आणि पुण्य काय त्याची जाण दिली.

९) ज्यानं त्याला पावन केलं तो समृद्ध झाला

१०) आणि ज्यानं त्याला भ्रष्ट केलं तो निराश झाला.

११) समूद लोकांना मर्यादाभंग करून खोटं ठरवलं

१२) आणि त्यांच्यातले सर्वांत दुर्दैवी उभे राहिले.

१३) तेव्हा अल्लाहच्या प्रेषितांनी त्यांना सांगितलं, ही अल्लाहची उंटिण आहे. तिच्या पाणी पिण्याच्या बाबतीत सावध राहा.

१४) त्यांनी लबाडी केली तिच्यावर आघात करून तिला ठार केलं. म्हणून त्यांच्या विधात्यानं त्यांच्या या गुन्ह्यामुळं त्यांचा सर्वनाश घडवून भुईसपाट केलं.

१५) त्याला त्यांच्या परिणामाशी कसली भीती?

-------

# ९२. सूरह अल-लैल

**मक्काकालीन, आयती २१**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ रात्रीची जी सर्वकाही झाकून घेते

२) आणि दिवसाची जेव्हा तो उजाडतो.

३) आणि नर व मादी निर्माण करणाऱ्याची शपथ

४) तुमचे प्रयत्न वेगवेगळ्या तऱ्हेचे असतात.

५) तेव्हा ज्यानं दिलं आणि भीती बाळगली

६) चांगल्या गोष्टींचा समर्थन केलं

७) आम्ही त्याला सर्वकाही सोपं सुरळीत करून देऊ

८) आणि जो लालसेपोटी कुणाची पर्वा करत नाही

९) आणि भल्या गोष्टी नाकारत असतो

१०) आम्ही कष्टासाठी त्याचा मार्ग सोपा करू.

११) तो खड्ड्यात गेला तरी त्याची संपत्ती उपयोगी पडणार नाही.

१२) निश्चितच मार्गदर्शन करणे आमचं कार्य आहे.

१३) सुरुवात आणि शेवट आमच्याच हाती आहे.

१४) म्हणून तुम्हाला सावध करतो पेटलेल्या अग्नीपासून

१५) तिच्याशी दुर्दैवी लोकांव्यतिरिक्त कुणी भिडणार नाही.

१६) ज्यांनी सत्य नाकारत पाठ फिरवली

१७) पण जो (अल्लाहशी) एकनिष्ठ (भित) राहिला त्याला यातून वाचविलं जाईल.

१८) जे आपली संपत्ती शुद्ध करण्याच्या (उद्दिष्टानं) खर्च करतात

१९) तो कुणावरही कुणाचा उपकार नाही, ज्याची परतफेड करावी लागेल.

२०) आपल्या महान विधात्याची मर्जी राखण्यासाठी तो देत असतो.

२१) आणि लवकरच त्यास प्रसन्नता लाभेल.

-------

# ९३. सूरह अज-जुहा

**मक्काकालीन, आयती ११**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ पहाटेच्या तेजाची (दिवसाची)

२) निश्चल रात्रीची

३) तुझ्या पालनकर्त्यानं तुला अधांतरी सोडून दिलं नाही की तुझ्याशी वैतागला.

४) खरंच, तुमच्यासाठी आदल्या परिस्थितीपेक्षा नंतरची स्थिती बरीच असणार

५) लवकरच तुमचा पालनकर्ता तुम्ही समाधानी व्हाल असं काही देईल.

६) त्याला तुम्ही अनाथ आढळला, मग आश्रय दिला नाही?

७) तुम्हाला मार्ग शोधताना पाहिलं आणि त्यानं तो दाखवला

८) तुम्ही त्याला परावलंबी आढळला नि त्यानं तुम्हाला स्वावलंबी केलं.

९) म्हणून अनाथांशी दुर्व्यवहार नका करू.

१०) हात पसरणाऱ्यांना नका परतवून लावू.

११) आपल्या विधात्यानं दिलेली देणगी जाहीर करा.

-------

# ९४. सूरह अल-इन्शिराह

**मक्काकालीन, आयती ८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आम्ही तुमच्यासाठी तुमचं मन उदार केलं नाही?

२) आणि तुमच्या ओझ्यापासून तुम्हाला मुक्त केलं.

३) ज्यामुळं तुमची पाठ वाकली

४) आणि तुमची स्तुती उदात्त केली.

५) खचितच कठीणावस्थेसोबत सहजताही येते.

६) निश्चितच. अडचणींमागोमाग (त्यातून) मुक्तताही येते.

७) म्हणून आपल्या जबाबदारीतून सवड मिळाल्यावर (आराधनेत) उभं राहा.

८) आपल्या विधात्याकडेच ओढ ठेवा.

-------

# ९५. सूरह अत-तीन

**मक्काकालीन, आयती ८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अंजीरची आणि जैतून (ऑलिव्ह) ची शपथ

२) आणि शपथ सिनाई पर्वताची

३) व या विश्वसनीय शहराची

४) आम्ही मानवाला उत्तम प्रमाणबद्धतेत साकारलं

५) मग त्याला खालच्यातल्या खालील स्थितीत परतवलं

६) श्रद्धा बाळगून सत्कर्म करणाऱ्यांना वगळता त्यांच्यासाठी अमर्याद असा मोबदला आहे.

७) मग यानंतर तुम्ही कसे काय निर्णयाच्या दिवसाला खोटं म्हणता.

८) अल्लाह सर्व न्यायाधीशांतील सर्वोत्तम न्याय करणारा नाही का?

-------

# ९६. सूरह अल-अलक

## मक्काकालीन, आयती १९

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) वाचा तुमच्या विधात्याच्या नावानं ज्यानं निर्माण केलं.

२) गोठलेल्या रक्तापासून मानवाला निर्मिले.

३) वाचा तुमचा विधाता वैभवशाली आहे.

४) ज्यानं लेखणीद्वारे शिकवलं.

५) मानवाला तो जाणत नसलेलं ज्ञान दिलं.

६) मुळीच नाही मनुष्य मर्यादांचं उल्लंघन करतो.

७) स्वत:ला स्वावलंबी समजून

८) पण वास्तवात तो आपल्या विधात्याकडंच परतणार आहे.

९) तुम्ही अशा (माणसाला) पाहिलं जो रोखतो.

१०) एका भक्ताला प्रार्थनेपासून (नमाज अदा करण्यापासून)

११) तुम्ही त्याला सरळमार्गी असलेला पाहता

१२) अथवा सदाचाराचा उपदेश करताना

१३) तुम्ही पाहिलं त्याला सत्य नाकारत पाठ फिरवताना

१४) अल्लाह (सर्वकाही) पाहतोय हे त्याला माहीत नाही?

१५) कधीच नव्हे तो परावृत्त झाला नाहीस तर आम्ही कपाळाचे केस धरून त्याला खेचून (आणू)

१६) खोटं, अपराधी, कपाळ.

१७) तेव्हा बोलवू द्या त्याला आपल्या मंडळींना.

१८) आम्ही शिक्षा करणाऱ्या दूतांना बोलवू.

१९) नको! त्याचे काही ऐकू नका, नतमस्तक व्हा (अल्लाहशी) जवळीक साधा.

# ९७. सूरह अल-कद्र

**मक्काकालीन, आयती ५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आम्ही एका शक्तिशाली कद्र रात्रीत हे अवतरलं

२) आणि तुम्ही जाणता (कशी) ती शक्तिशाली रात्र.

३) कद्रची ती रात्र हजार महिन्यांपेक्षा अधिक उत्तम.

४) यात अल्लाहच्या आज्ञेनं देवदूत आणि आत्मा खाली उतरतात, सर्व आदेश घेऊन.

५) पहाटेपर्यंत सर्वत्र शांतता आणि सुरक्षितता लाभते.

-------

# ९८. सूरह अल-बय्यनह

**मक्काकालीन, आयती ८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) ग्रंथधारक आणि अनेकेश्वरींपैकी ज्या लोकांनी द्रोह केला ते त्यांच्याकडे उघड पुरावे पोचत नाहीत तोवर ते परावृत्त होणार नव्हते.

२) पावन ग्रंथांचं पठण करीत अल्लाहचे प्रेषित

३) ज्यामध्ये सकस लिखाण आहे.

४) ज्यांना ग्रंथ दिले गेले ते, त्यांच्यापर्यंत उघड पुरावे पोचले नव्हते, तोवर ते आपसात (पंथांमध्ये) विभागले गेले नव्हते.

५) आणि त्यांना काय सांगण्यात आलं होतं? त्यांनी अल्लाहची भक्ती करावी. सत्य धर्माशी एकनिष्ठ राहावे सातत्यानं नमाज अदा करावी, जकात द्यावी, हाच तो सकस धर्म होय.

६) ग्रंथधारक आणि अनेकेश्वरींमधील ज्या लोकांनी (हे) नाकारलं ते नरकात जातील, सदैव तेथेच राहतील हे लोक प्राणीमात्रांपैकी सर्वांत दुष्ट आहेत.

७) ज्या लोकांनी श्रद्धा बाळगत सत्कर्मे केलीत ते प्राणीमात्रांमधील उत्तम होत.

८) त्यांच्या विधात्यापाशी त्यांना स्वर्ग आहे, ज्याच्याखालून नद्या वाहतील तिथं ते सदासर्वदा राहत असतील. अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न आणि ते अल्लाहशी प्रसन्न होतील. कारण ते आपल्या विधात्याशी भित असत.

-------

# ९९. सूरह अज़्ज़िलजाल

**मदीनाकालीन, आयती ८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) जेव्हा भूकंपाच्या हादऱ्यानं धरती हादरून जाईल.

२) धरती सारे ओझे बाहेर काढून टाकील

३) आणि माणूस म्हणेल हिला काय झालंय?

४) त्या दिवशी ती आपल्या कैफियतीचं वर्णन करील.

५) हे सगळं तिला तुझ्या विधात्याच्या आदेशानुसारच असेल.

६) त्या दिवशी लोक घोळक्या-घोळक्यानं बाहेर पडतील. त्यांची कृत्ये त्यांना दाखवावीत म्हणून.

७) ज्यानं तिळमात्रही भलं केलं असेल तो त्याला पाहील.

८) आणि ज्यानं यत्किंचितही दुष्कर्म केलं असेल तो ते पाहील.

-------

# १००. सूरह अल-आदियात

**मक्काकालीन, आयती ११**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) शपथ धापा टाकत धावणाऱ्या (घोड्यांची).

२) आगीच्या ठिणग्या उडविणाऱ्यांची

३) पहाटे धाडी टाकणाऱ्यांची

४) त्यातून धूळ उडविणारे

५) आणि जमावाच्या मधोमध शिरतात.

६) खरे पाहता माणूस आपल्या विधात्याशी कृतघ्न आहे.

७) तो स्वत:च त्याचा साक्षी आहे.

८) आणि तो संपत्तीवर प्रेम करण्यात अतिरेक करतो.

९) त्याला माहीत नाही जेव्हा कबरी विखुरल्या जातील.

१०) आणि माणसानं जे काही मनात दडवलंय ते बाहेर काढण्यात येईल.

११) निश्चितच त्यांचा विधाता त्या दिवशी ह्या सर्वांची चांगलीच खबर ठेवेल.

--------

# १०१. सूरह अल-कारिआ

**मक्काकालीन, आयती ११**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) भयंकर संकट

२) कसलं ते भयंकर संकट

३) तुम्ही काय जाणता त्या भयंकर संकटाविषयी?

४) असा दिवस जेव्हा माणसं पतंगासारखी विखुरली जातील

५) आणि पर्वत पिंजलेल्या लोकरीप्रमाणे होऊन जातील.

६) मग ज्यांचं पारडे जड असतील

७) ते अल्हाददायक आनंदात असतील.

८) आणि ज्यांचे पारडे हलके असतील

९) त्यांचं ठिकाण नरकातील सर्वांत खालचं स्थान असेल.

१०) आणि खालचं स्थान कसं असेल?

११) धगधगता अग्नी तो.

-------

# १०२. सूरह अत-तकासुर

**मक्काकालीन, आयती ८**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अधिकाधिक समृद्धतेची चुरस तुम्हाला भुरळ घालतेय.

२) तुम्ही कबरीत पोहोचेपर्यंत

३) पण, लवकरच तुम्हाला कळून चुकेल

४) होय, लवकरच तुम्ही जाणून घ्याल.

५) नव्हे, तुम्ही खात्रीपूर्वक जाणून घेतलं असतं

६) तुम्ही नरकाला जरूर पाहाल

७) होय, तुम्ही तिला समक्ष डोळ्यांनी पाहाल.

८) आणि मग त्या दिवशी तुम्हाला दिल्या सुख-सुविधांबाबत विचारणा होणारच.

-------

# १०३. सूरह अल अस्र

**मक्काकालीन, आयती ३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) काळाची शपथ,

२) मनुष्य, नक्कीच विनाश पावणार आहे.

३) अपवाद अशा लोकांचा जे श्रद्धा धरतात, (त्यानुसार) सत्कर्म करतात आणि परस्परांना सत्य व संयमाची ताकीद देतात.

-------

# १०४. सूरह अल-हुमजा

**मक्काकालीन, आयती ९**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) टोमणे मारणाऱ्यांचा आणि चहाडखोरी करणाऱ्या सर्वांचा धिक्कार असो.

२) जे संपत्ती साठवतात आणि मोजदाद करतात

३) त्यांची ही संपत्ती कयम टिकून राहील, असा अंदाज लावीत.

४) मुळीच नाही, त्याला अशा नरकात (हुतमा) फेकून दिलं जाईल.

५) तुम्हाला माहीताय ते ठिकाण कसलं?

६) अल्लाहनं पेटवलेली आग

७) जी सरळ हृदयांपर्यंत पोहोचेल.

८) ती त्यांना झाकून घेईल.

९) उंच स्तंभांसारखी.

-------

# १०५. सूरह अल-फील

**मक्काकालीन, आयती ५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) तुम्ही पाहिलं नाही, कशी दशा केली तुमच्या विधात्यानं त्या हत्तीवाल्यांची.

२) त्यांचा डाव कसा उधळून लावला.

३) त्यांच्यावर पक्ष्यांचे थवेच्या थवे पाठवले

४) त्यांच्यावर ते भाजलेल्या मातीच्या कंकरांचा मारा करत होते.

५) त्यांची अवस्था (अन्न) खाऊ टाकलेल्या भुशासारखी करून टाकली.

-------

# १०६. सूरह अल-कुरैश

**मक्काकालीन, आयती ४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) कुरैशांना परिचित करण्यासाठी

२) त्यांना हिवाळा आणि उन्हाळ्याच्या प्रवासाशी परिचित करण्यास

३) त्यांनी त्या घराच्या विधात्याची भक्ती करायला हवी.

४) ज्यानं ते उपाशी असता त्यांना जेवू घातलं आणि भयभीत असता त्यांची सुरक्षा केली.

-------

# १०७. सूरह अल-माऊन

**मक्काकालीन, आयती ७**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) तुम्ही अशा माणसाला पाहिलंय जो निर्णयाच्या दिवसाला नाकारतो.

२) हाच तो जो अनाथाला हाकलून लावतो.

३) आणि गोरगरिबांची अन्नाची सोय करण्यास प्रेरित करत नाही.

४) अशा नमाज पढणाऱ्यांचा धिक्कार असो

५) जे आपल्या नमाजकडे (प्रार्थनेकडे) निष्काळजी करतात.

६) आणि अशी माणसं जे देखावा करतात

७) आणि दैनंदिन गरजांच्या वस्तू (देण्यास) नाकारतात.

-------

# १०८. सूरह अल-कौसर

**मक्काकालीन, आयती ३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) आम्ही तुम्हाला विपूल प्रमाणात दिलं (कौसर).

२) तेव्हा आपल्या विधात्यासमोर नमाज अदा करा आणि बळी द्या.

३) तुमची अवहेलना करतो तोच लुप्त होईल.

-------

# १०९. सूरह अल-काफिरून

**मक्काकालीन, आयती ६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सांगून टाका, हे नाकारणारे लोकहो!

२) मी त्याची आराधना करत नाही ज्याची तुम्ही आराधना करता.

३) ना तुम्ही त्याची भक्ती कराल ज्याची मी भक्ती करतो.

४) मी त्याची आराधना करणार नाही ज्याची आराधना तुम्ही करीत आहात.

५) (तसेच) तुम्ही त्याची आराधना करणार नाही ज्याची मी आराधना करतो.

६) तुमच्यासाठी तुमचा धर्म, माझा धर्म माझ्याकरिता.

-------

# ११०. सूरह अन-नस्र

**मदीनाकालीन, आयती ३**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) जेव्हा अल्लाहच्या मदती (ने) विजय मिळाले

२) तुम्ही (प्रेषित)पाहताय लोकांना जथ्याजथ्यानं अल्लाहच्या धर्मात दाखल होताना

३) तेव्हा आपल्या विधात्याच्या पावित्र्याचे गुणगान करा आणि त्याच्याकडे क्षमायाचना करा तो पश्चात्ताप स्वीकारणारा आहे.

-------

# १११. सूरह अल-लहब

**मक्काकालीन, आयती ५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) अबू लहबचे हात तुटून पडले त्याचा नाश झाला.

२) त्याची संपत्ती त्याच्या कामी आली नाही की जे काही त्यानं कमावलं ते

३) लवकरच तो भडकत्या आगीत जाऊन भिडेल.

४) त्याची पत्नी लाकडाचं इंधन नेईल.

५) तिच्या (स्वत:च्या) गळ्याभोवती खजुरीची रस्सी असेल.

-------

# ११२. सूरह अल-इखलास

**मक्काकालीन, आयती ४**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) म्हणा, तो अल्लाह एकमेव आहे.

२) अल्लाह, स्वयंपूर्ण आहे

३) त्यानं कुणाला जन्मलं नाही की कुणी त्याला जन्म दिलेला नाही.

४) त्याच्या तोडीचा कुणी नाही.

-------

# ११३. सूरह अल-फलक

**मक्काकालीन, आयती ५**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सांगा, मी शरण जातो सकाळच्या स्वामीकडे

२) जे काही त्यानं निर्माण केलं त्यांच्या अरिष्टांशी

३) रात्री पसरणाऱ्या काळोखाच्या विघ्नाशी

४) गंड्यात फुंकणाऱ्याच्या अपायापासून

५) आणि मत्सर करणाऱ्यांच्या मत्सरापासून.

-------

# ११४. सूरह अन-नास

**मक्काकालीन, आयती ६**

असीम मेहरबान व कृपावंत अल्लाहच्या नावानं.

१) सांगा, मी साऱ्या मानवजातीच्या विधात्याकडे शरण जातो.

२) जो सर्व मानवजातीचा अधिपती आहे.

३) मानवाचा ईश्वर (आहे).

४) दुष्ट लोकांच्या कानगोष्टींपासून

५) जे मानवांच्या मनांमध्ये भुरळ घालतात

६) ते मानवजातीतील आणि (न दिसणाऱ्या) जिन्न जातीतील.

-------

# विषय सूची

*(डावीकडील क्रमांक सूरह (अध्याय) आणि उजवीकडील क्रमांक आयतीचा. उदा० २:२८ म्हणजे सूरह क्र. २ मधील २८ व्या क्रमांकाची आयत.)*

## अल्लाह :

### अल्लाहवर श्रद्धा

२:२८, २:१३६-१३७, २:१७७, २:१८६, २:२५६, २:२८५, ३:१८, ३:५२, ३:८४, ३:११०, ३:११३-११४, ३:१७९, ३:१९३, ३:१९९, ४:५९, ४:१३६, ४:१५२, ४:१६२, ४:१७५, ५:६९, ६:१९, ६:७१, ९:१८-२०, १०:३, १०:६२-६३, १८:१३-१४, २४:२, २४:६२,२६:४६-४८, २९:४६, ३६:२५, ४६:१३, ४८:९, ४९:१५, ५७:७, ५७:१९, ५७:२१, ५८:२२, ६४:८-९, ६४:११, ६५:११, ६७:२९, ७२:१३.

### त्याचे एकत्व

२:१६३, २:२५५, ३:२, ३:१८, ३:६२, ४:८७, ४:१७१, ५:७३, ६:१०२, ६:१०६, ९:३१, ९:१२९, ११:१४, १४:५२, १६:२, १६:२२, १६:५१, १७:२२, १७:३९, १७:४२, १८:११०, १९:३५, २०:८, २०:१४, २०:९८, २१:२२, २१:२४-२५, २१:२९, २१:१०८, २२:३४, २३:९१, २३:११६-११७, २७:२६, २७:६०-६५, २८:८८, ३५:३, ३७:४, ३८:६५, ३९:६, ४०:३, ४०:६२, ४०:६५, ४१:६, ४२:११, ४४:८, ४७:१९, ५१:५१, ५९:२२-२३, ६४:१३, ७३:९, ११२:१-४.

### त्याचे सार्वभौमत्व

१:४, २:१०७, ३:२६, ३:१८०, ३:१८९, ५:१७-१८, ५:१२०, ६:७३, ७:१५८, ९:११६, १७:१११, २०:११४, २२:५६, २३:११६, २४:४२, २५:२, २५:२६, ३५:१३, ३६:८३, ३९:६, ३९:४४, ४०:१६, ४२:४९, ४३:८५, ४५:२७, ४८:१४, ५७:२,

५७:५, ५७:१०, ६२:१, ६४:१, ६७:१, ८५:९, ११४:२.

### त्याचे सामर्थ्य

२:१६५, २:२०९, ३:४, ४:१३९, ५:९५, ६:१८, ६:६१, ८:४९, ८:५२, ११:६६, १३:१६, १४:४७, २२:४०, २२:७४, ३०:५, ३३:२५, ३५:१०, ४०:१६, ४१:१५, ४५:३७, ४८:७, ५१:५८, ५४:४२, ५९:२३.

### निर्माणकर्ता आणि जगवणारा

२:२९, २:११७, ३:६, ३:४७, ३:५९, ४:१, ५:१७, ६:३६, ७:११, १०:३-६, १०:३४, १४:१९, १५:२३, १५:२६-२७, १५:८६, १६:३-५, १६:४०, १६:६५, १७:९९, १८:५१, १९:६७, २०:५५, २१:३३, २१:१०४, २२:५-७, २२:६६, २३:१४, २४:४५, २५:२, २५:५४, २५:५९, २७:६४, २८:६८, २९:१९-२०, ३०:११, ३०:१९-२२, ३०:२७, ३०:४०, ३०:५०, ३०:५४, ३१:१०-११, ३१:२८, ३२:७, ३५:१, ३५:१६, ३६:७७-८२, ३७:९६, ३९:५-६, ३९:६२, ४०:५७, ४०:६२, ४०:६४, ४०:६७-६८, ४१:३९, ४२:९, ४६:३, ४६:३३, ५०:११, ५०:४३, ५१:४९, ५५:१४-१५, ५६:५७-६२, ५७:२, ५७:४, ५८:६, ५८:१८, ५९:२४, ६४:२-३, ६४:७, ६५:१२, ६७:२-३, ७५:३-४, ७५:३७-४०, ७९:२७-३३, ८२:७-८, ८५:१३, ८६:८.

### अनंतकालीन

२:२५५, ३:२, ३:१८०, १५:२३, १९:४०, १९:८०, २०:१११, २५:५८, २८:५८, २८:८८, ४०:६५, ५५:२७, ५७:१०.

### त्याचे ज्ञान

२:२९-३०, २:३३, २:७७, २:१९७, २:२१५-२१६, २:२२०, २:२३२, २:२३५, २:२५५, २:२७०, ३:७, ३:२९, ३:६३, ३:६६, ३:९२, ३:११५, ३:११९, ३:१५४, ३:१६७, ४:३२, ४:४५, ४:६३,

४:१२७, ५:७, ५:६१, ५:९७, ५:९९, ५:१०९, ५:११६, ६:३,६:१३, ६:५९-६०, ६:८०, ६:११७, ६:११९, ६:१२४, ७:७, ७:५२, ७:८९, ७:१८७, ८:५३,८:६०, ९:४४, ९:४७, ९:७८, ९:१०१, ९:११५, १०:३६, १०:४०, १०:६१, ११:५-६, ११:१४,११:३१, १३:८-९, १३:४२, १४:३८, १५:२४, १६:१९, १६:२३, १६:२८, १६:७४, १६:९१,१६:१२५, १७:२५, १७:५४-५५, १७:८४-८५, १९:७०, २०:७, २०:५२, २०:९८, २०:१०४,२०:११०, २१:४, २१:२८, २१:५१, २१:८१, २१:११०, २२:७०, २२:७६, २३:९६, २४:१९, २४:२८-२९, २४:४१, २४:६४, २५:६, २६:१८८, २७:२५, २७:६५, २७:७४, २७:८८, २८:५६,२८:६९, २८:८५, २९:१०, २९:४२, २९:४५, २९:५२, २९:६२, ३१:२३, ३१:३४, ३२:६,३३:४०, ३३:५४, ३३:६३, ३४:२, ३५:८, ३५:११, ३५:३८, ३६:७६, ३६:७९, ३९:७०, ४०:७,४०:१९, ४१:४७, ४२:१२, ४२:२४-२५, ४३:८४-८५, ४६:८, ४६:२३, ४७:१९, ४७:२६, ४७:३०, ४८:१८, ४८:२७, ४९:१६, ४९:१८, ५०:४, ५०:१६, ५०:४५, ५३:३०, ५३:३२,५७:३-४, ५७:६, ५८:७, ६०:१, ६०:१०, ६२:७-८, ६४:४, ६४:११, ६५:१२, ६७:१३, ६७:२६, ६८:७, ७४:३१, ८४:२३, ८७:७.

## त्याची दृष्टी

२:९६, २:१३७, २:१४४, ३:२०, ३:३८, ३:१५६, ३:१६३,३:१८१, ४:५८, ४:१४८, ६:१०३, ८:६१, ९:१०५, ११:११२, १७:९६, १८:२६, २०:४६,२२:७५, २५:२०, २६:२१७-२२०, ३५:३१, ४१:४०, ४२:११, ४३:८०, ४९:१८, ५८:१,६७:१९, ८४:१४-१५, ९६:१४

## तरतूद करणारा

२:२२, २:२१२, ३:२७, ६:१५१, १०:३१, ११:६, १३:२६, १४:३२,१६:७१, १७:३०-३१, २०:१३१-१३२, २२:५८, २४:३८, २७:६४, २८:५७, २९:१७, २९:६०,२९:६२, ३४:२४,

३४:३६, ३४:३९, ३५:३, ३८:५४, ३९:५२, ४०:४०, ४२:१२, ४२:२७,५१:५७-५८, ६५:३, ६७:२१, ७९:३३

**मानवजातीवरील त्याचे उपकार**

२:१०५, २:१२२, २:२४३,२:२५१, ३:८, ३:७३-७४, ३:१०३, ३:१६४, ३:१७४, ४:३२, ४:१७३, ५:३, ५:६, ५:५४,८:५३, १०:५८, १०:६०, १०:१०७, १२:३८, १४:३४, १६:१८, १६:५३, १६:८१, १६:८३,१६:११४, १७:१२, १७:२०, १७:६६, १७:७०, २४:२१, २७:७३, ३१:२०, ३१:३१, ३३:९,३३:४७, ३५:३, ३८:९, ४०:६१, ४२:२६, ४२:४९, ४९:७-८, ५७:२१, ५७:२९, ६२:४, ९३:११

**त्याचे स्मरण**

२:१५२, २:१९८, २:२००, २:२०३, २:२३९, ३:१३५, ३:१९१,४:१०३, ५:९१, ७:२०१, ७:२०५, ८:४५, १३:२८, १८:२४, १८:२८, १८:१०१, २०:१४,२०:१२४, २६:२२७, २९:४५, ३३:२१, ३३:४१, ३९:२२-२३, ४३:३६, ५३:२९, ५७:१६,५८:१९, ६२:९-१०, ६३:९

**त्याचे कायदे आणि मर्यादा**

२:१७३, २:१८७, २:२२९-२३०, २:२७५, ४:१३-१४,४:२२-२४, ५:१-५, ५:४४-५०, ६:१५१-१५३, ७:३३, १२:४०, १३:३७, १६:११५-११६,१७:२२-३८, २४:२-९, २४:१३, ४२:१३, ४५:१८, ६०:८-९, ६०:१०, ६५:१-७, ९८:५

**क्षमाशील**

२:३७, २:५२, २:५४, २:१६०, २:१७३, २:२२५,२:२३५, २:२८४, ३:३१, ३:१२९, ३:१३५, ३:१५५, ४:१७, ४:२६-२७, ४:४८, ४:९६, ४:९९,४:११०, ४:११६, ४:१२९, ५:९, ५:१८, ५:३४, ५:३९-४०, ५:७४, ५:९५, ५:९८, ५:१०१,६:५४,

६:१४५, ६:१६५, ७:१५३, ७:१५५-१५६, ७:१६७, ८:२९, ८:३८, ८:७०, ९:२७,९:९९, ९:१०२, ९:१०४, ९:११७-११८, १३:६, १४:१०, १५:४९, १६:१८, १६:११०,१६:११५, १६:११९, १७:२५, १८:५८, २०:८२, २४:२२, २४:३३, २५:७०, २८:४६, ३३:७१,३३:७३, ३९:५३, ४०:३, ४२:५, ४२:२५, ४२:३०, ४२:३४, ४६:३१, ४८:१४, ५३:३२,५७:२०, ५७:२८, ६१:१२, ६४:१७, ७१:४, ७१:१०, ७३:२०, ७४:५६, ११०:३

### त्याची कृपा

१:१, २:६४, २:१०५, २:१६३, ३:७४, ३:१५७, ४:२९,४:८३, ४:९६, ४:११३, ४:१७५, ६:१२, ६:५४, ६:१३३, ६:१४७, ७:५६, ७:१५६, ९:६१,९:९९, १०:५८, ११:९, १२:५६, १५:५६, १८:१६, १८:५८, १९:५०, १९:५३, २४:१०,२४:१४, २४:२०-२१, २८:७३, ३३:४३, ३५:२, ३९:३८, ३९:५३, ४०:७, ४२:८, ४२:२८,४३:३२, ४४:६, ४५:३०, ४८:२५, ५७:२८, ५९:२२, ७६:३१

---------------

### ईश्वराचे दूत (फरिश्ते)

२:३०-३४, २:९७-९८, २:१०२, ३:८०, ३:१२४-१२५, ४:९७, ६:९३, ८:९, ८:१२, ८:५०-५१,११:६९, १३:११, १३:१३, १३:२३-२४, १५:७-८, १५:२८-३०, १५:५१-६४, १६:२, १६:२८,१६:३२-३३, १६:४९-५०, १७:६१, १८:५०, २५:२१-२२, २५:२५, ३२:११, ३३:४३, ३३:५६,३५:१, ३९:७५, ४१:३०-३१, ४१:३८, ४२:५, ४३:७७, ४३:८०, ५०:१७-१८, ५०:२१-२३,५३:२६-२८, ६६:६, ६९:१७, ७०:४, ७२:२७, ७४:३१, ७८:३८, ७९:१-५, ८२:१०-१२,८९:२२, ९६:१८, ९७:४

**आयतुल कुर्सी**

२:२५५

**इब्राहीम (अ.)**

१:१२४-१३२, २:२५८, २:२६०, ३:६५-६८, ४:१६३, ६:७४-८३, ६:१६१, ९:११४, ११:६९-७६, १४:३५-४१, १५:५१-५६, १६:१२०-१२२, १९:४१-५०, २१:५१-७३, २२:२६-२७, २२:७८, २६:६९-८९, २९:१६-१८, २९:२४-२७, २९:३१-३२, ३७:८३-११३, ३८:४५-४७, ४३:२६-२८, ५१:२४-३४, ५३:३७, ५७:२६, ६०:४-६, ८७:१९.

**इब्राहीम (अ.) यांचा धर्म**

२:१३०, २:१३५-१३६, ३:६७, ३:८४-८५, ४:१२५, ६:१६१, १२:३८, १६:१२३, २२:७८, ४२:१३, ६०:४-६.

**आदम (अ.)**

२:३०-३८, ७:१९-२५, २०:१२०-१२१, ५:२७-३१.

---------------

## युद्धे :

**अहजाबचे युद्ध**

३३:९-२७.

**बद्रचे युद्ध**

३:१३, ५:१९, ८:४२-४८, ५४:४५.

**उहुदचे युद्ध**

३:१२१-१८०.

**तबूकचे युद्ध**

९:४०-५९, ९:८१-९९, ९:११७-११८, ९:१२०-१२२

**उहुदचे युद्ध**

३:१२१-१८०

---------------

**संतुलन**

६:१५२, ७:८५, ११:८४-८५, १५:१९, १७:३५, २६:१८२, ४२:१७, ५५:७-९, ५७:२५

**निर्णयाचा दिवस**

२:१३४, २:१४१, २:२८४, ३:१९९, ६:६२, १३:२१, १३:४१, १६:५६, १६:९३, १७:१३-१४, १७:३४, १७:३६, २१:४७, २३:२५, २४:३९, २९:१०, २९:१३, ३४:२५, ३७:२२-२४, ४०:१७, ४३:१९, ४३:४४, ६९:१९-२०, ६९:२५-२६, ८१:८-९, ८४:७-८, ८८:२६, १०२:८.

**श्रद्धावान कोण?**

२:१६५, २:२८५, ३:११४, ३:१७३, ४:१६२, ७:१५७, ८:२-४, ८:७४,९:४४, ९:७१, ९:१११-११२, ९:१२४, २३:१-११, २३:५७-६१, २४:५१-५२, २४:६२,२५:६३-६८, २७:२-३, २८:५२-५५, ३२:१५-१६, ३३:२२-२३, ३३:३६, ४८:२९, ४९:१५,५८:२२, ५९:९-१०, ६६:११-१२, ९८:७

**श्रद्धावानांची परीक्षा**

२:१५५-१५६, २:२१४, २:२४९, ३:१५२, ३:१७९, ३:१८६, ६:१६५,८:१७, ११:७, २९:२-३, ३३:११, ४७:३१, ६४:१५, ६७:२

### श्रद्धावानांशी अल्लाहची जवळीक

२:१६५, २:२५७, ३:६८, ३:१७१, ५:५४, ९:१११,१०:९, ३०:४७, ३३:२३, ३९:९, ४७:११, ४८:४, ४८:२९, ६३:८

### श्रद्धावानास अल्लाहचे वचन

२:८२, ३:५७, ४:१४६, ४:१५२, ४:१६२, ४:१७३, ५:९, ६:८२,९:७२, १०:१०३, १९:६०, २०:७५, २४:५५, २५:७०, ३३:३५, ३३:४७, ३४:४, ३४:३७, ३५:७, ३९:७३-७५, ४०:४०, ४१:८, ४७:५, ४८:५, ४८:२९, ५२:२१, ५७:७, ५८:११, ९८:८

### दानधर्म (सदकात)

२:२१५, २:२५४, २:२६१-२६५, २:२६७, २:२७०-२७४, २:२७६, २:२८०, ३:९२,४:९२, ४:११४, ९:७५-७७, ९:१०३-१०४, १३:२२, १४:३१, २२:२८, २२:३६, ३०:३९, ३४:३९, ३५:२९-३०, ५७:७, ५७:१८, ५८:१२-१३, ६३:१०, ७६:८-९, ९०:१३-१४

### व्यवहारातील शिष्टाचार

२:१८८, २:२७५, २:२८२-२८३, ३:७७, ३:१३०, ४:२९, ४:५८, ५:१, ६:१५२, ७:८५, १२:२०,१७:३४-३५, २३:८, २४:३६-३७, २६:१८२, ३०:३९, ३८:२३-२४, ५५:९, ६२:९, ७०:३२

### निर्माणकार्य

२:१६४, ३:१९०-१९१, १०:४, १०:३४, १५:२६-३३, १८:५१, २१:१०४, २२:५, २३:१२-१७,२३:११५, ३०:२७, ३१:११, ३१:२८, ३२:७, ३९:६, ४०:५७, ४२:२९, ४५:३-४, ५०:१५,५२:३५, ६७:२-३, ७९:२७-३३, ८६:५-६, ८८:१७.

### ख्रिस्ती धर्मीय

२:६२, २:१११-११३, २:१२०, २:१३५, ५:१४, ५:१७-१८, ५:४७, ५:५१, ५:६९, ५:७२-७३,५:८२-८५, ९:३०-३१, २२:१७, ५७:२७

### जिन्न

२:१०२, ६:७१, ६:११२, ६:१२१, ७:२७, ७:३०, १७:२७, १९:६८, १९:८३, २१:८२, २२:३-४,२३:९७-९८, २६:२१०, २६:२२१-२२३, ३७:७-१०, ३८:३७-३८, ६७:५

---

## कर्म-प्रयत्न

२:७४, २:११०, २:१३९, २:१९७, २:२१५, २:२३४, ३:३०, ३:१९५, ४:११०-११२, ४:१२३-१२४,४:१२७, ५:१०५, ६:५४, ६:६०, ६:८८, ६:१०८, ६:१६४, ७:१५३, ९:९४, ९:१०५, ९:१२०,१०:४१, १०:६१, १४:१८, १४:४२, १५:९२-९३, १६:९१, १६:९३, १६:१११, १७:९, १८:७,१८:२३, १८:३०, १८:४६, १८:१०३-१०४, १८:११०, २०:११२, २१:२३, २४:३९, २४:६४,२७:४, २९:६-७, ३०:४४, ३४:२५, ३४:३७, ३५:१०, ३५:१८, ४१:३३-३४, ४१:४०, ४१:४६,४५:१५, ४५:२१, ४५:२८-२९, ४६:१९, ४७:१-२, ५३:३९-४०, ६१:२-३, ६४:७, ६७:२,९२:४, ९९:७-८

### त्यांचे परिणाम

२:२५, २:१३४, २:१४१, २:१६७, ४:१२३-१२४, ५:९, ५:३३,६:१३२, ६:१६०, ७:४३, ११:१५-१६, ११:१११, १६:९३, १६:९७, १७:१९, १८:३०-३१,१८:४९, १८:१०३-१०८, २०:१५, २०:७४-७५, २१:९४, २२:५१, २४:५५, २५:२२-२३,२८:८४, २९:६-७, ३०:४१-४२, ३४:५, ३४:३८, ३५:३७, ३९:७०,

४०:४०, ४५:३३, ४६:१६,४६:१९, ५३:३१

**पुनरुत्थानाचा दिवस**

२:४८, २:११३, २:१२३, २:२८१, ३:९, ३:३०, ३:१८५, ४:८७, ४:१४१, १०:२८-३०, १०:९३, १४:४४, १४:४७-५१, १६:१११, १७:१३-१४, १९:३७-४०, १९:८५-८७, १९:९४-९५, २०:१०२-१०९, २०:१११-११२, २१:४७, २१:१०४, २२:१-२, २२:१७, २२:५५-५६, २२:६९, २३:१६, २४:२४-२५, २५:२२-३०, २७:८७-९०, ३०:१२-१६, ३०:५६, ३१:३३, ३२:५, ३२:२९, ३६:५१-५४, ३९:३१, ३९:६०-६१, ३९:६७-७५, ४०:१५-१८, ४२:४७, ४४:४०-४२, ४५:२६, ५०:२०-२३, ५०:३०-३५, ५०:४१-४४, ५७:१२-१३, ६८:४२-४३, ६९:१३-१८,७०:८-१०, ७५:७-१५, ७८:१७-२०, ७८:३८-४०, ७९:३४-४१, ७९:४२-४६, ८०:३३-४२, ८२:१७-१९, ८९:२१-३०, ९९:१-८, १००:९-११, १०१:१-११

---------------

## श्रद्धाहीन

२:६-९, २:१७१, २:२१२,२:२५७, ३:९०, ३:९८, ४:३७-३८, ४:१५०-१५१, ५:१०, ५:१७, ५:७२-७३, ६:१२२, ७:१०१, ८:३६, ८:७३, ९:३७, ९:७४, १०:९६-९७, १३:३३, १४:१८, १४:२८-३०, १६:२२, १८:५६, १९:८३, २२:५५, २२:७२, २३:११७, २७:४, २७:६७-६८, २९:२३, ३५:३९, ३८:२, ३९:४५, ४०:४, ४०:१२, ४१:४४, ४७:८-९, ४७:११-१२, ६६:१०

**त्यांना अल्लाहचे वचन**

२:३९, २:१२६, २:१६१-१६२, ३:४, ३:१२, ३:५६, ३:९१, ३:१७८, ४:१४०, ४:१६८-१६९, ५:३६-३७, ६:७०, ८:३६, ९:६८, १०:४, १०:६९-७०, १३:३४, १६:१०४, १६:१०६, १७:८,

१७:१०, १८:१०२, २१:३९-४०, २२:१९-२२, २२:७२, २४:५७, २९:२३, ३५:३६, ३५:३९, ३९:७१-७२, ४०:१०, ४१:२७-२८, ४२:२६, ४७:३४, ५८:५, ६७:६

---------------

### मृत्यु

२:१५४, २:२३४, २:२४०, ३:१०७-१०८, ३:१४५, ३:१५७-१५८, ३:१६९, ३:१८५, ४:१००, ५:१०६, ६:९३, ८:५०, १६:२८, १६:३२, २२:५, २३:९९, ३१:३४, ३२:११, ३९:३०, ३९:४२, ४०:६७-६८, ४४:५६, ४७:२७, ५०:१९, ५६:६०, ५६:८३-८७, ६७:२

### पृथ्वी

२:१६४, ६:९९, ७:२४-२५, १३:३-४, १५:१९, १६:११, १६:१३-१५, १६:६५, १७:४४, १८:७-८, १९:९०, २०:५३-५५, २१:३०-३१, २२:५, २२:६३, २३:१८-१९, २६:७-८, २७:६०, २९:५६, ३०:४८-५०, ३१:१०, ३२:२७, ३३:७२, ३५:९, ३५:२७-२८, ३५:४१, ३६:३३-३६, ३९:२१, ४०:६४, ४१:३९, ४२:२९, ४३:१०-११, ४५:४-५, ५०:७, ५१:२०, ५५:१०-१२, ५७:१७, ५७:२२, ६७:१५, ७१:१९-२०, ७७:२५-२७, ७८:६-७, ८०:२६-३२, ८८:२०, ७:५४, ११:७, २९:४४, ३९:५, ४०:५७, ४१:९-११, ६५:१२, ७९:२९-३३

### पुनरुत्थानाच्या दिवशी पृथ्वीची अवस्था

१४:४८, १८:४७, १९:४०, २०:१०५-१०७, २२:६५, २७:८८, ३९:६७-६९, ५०:४४, ५६:४-६, ६९:१४, ७३:१४, ७८:२०, ८४:३-५, ८९:२१, ९९:१-५

### दुष्ट

२:१६९, ३:३०, ४:२२, ४:७९, ४:८४, ४:१४८, ६:३१, ९:९,

९:९८, १०:११, ११:११४, १२:५३, १४:२६, १६:२५, १७:१०, १७:३२, १७:३८, १७:८३, २१:३५, २३:९६, ३०:३६, ३५:४३, ४१:३४, ९९:८, ११३:१-५, ११४:१-६

## उदाहरणे - तुलना

२:१७-१८, २:१९-२०, २:२६, २:१७१, २:२५९, २:२६१, २:२६४, २:२६५-२६६, ३:११७, ७:१७६-१७७, ९:१०९-११०, १०:२४, ११:२४, १४:१८, १४:२४-२७, १६:७५-७६, १६:९२, १६:११२-११३, १८:४५, २२:३१, २२:७३, २४:३५-३६, २४:३९-४०, २९:४१-४३, ३०:२८, ३९:२९, ४८:२९, ५७:२०, ५९:२१, ६२:५

## प्रतिदान

४:९२, ५:४५, ५:८९, ५:९५, ५८:३-४

## श्रद्धा

३:१७३, ३:१९३, ४:२५, ६:१५८, ८:२, ९:१२४, १०:९, १०:९८, १६:१०६, ३३:२२, ४२:५२,४९:७, ४९:१४-१७, ५२:२१, ५८:२२, ५९:९-१०

## खोट्या गोष्टी

२:४२, २:९२-९३, ४:५०, ४:११७-११८, ५:१०३, ६:२१, ६:७४, ६:९३-९४, ६:१०८, ७:१३८-१३९, ७:१४८-१४९, ७:१५२, ७:१९४, ७:१९७-१९८, १०:१८, १०:६९-७०, ११:१०१, १३:१७, १६:१०५, १६:११६, १७:५६-५७, १७:६७, १७:८१, १९:४२, १९:८१-८२, २०:६१, २०:८८-८९, २१:१८, २१:२१-२२, २१:२४-२५, २१:२६, २१:२९, २१:४३, २१:५२-५४, २१:६५-६६, २१:९८-९९, २२:१२-१३, २२:६२, २५:३, २५:४३, २८:३८, २८:६२-६४, २९:१७, २९:२५, २९:५२, ३१:३०, ३४:२२, ३४:४९, ३५:१४, ३५:४०, ३६:२२-२४, ३६:७४-७५,

३७:२२-२३, ३७:१२५, ४०:५, ४०:२०, ४०:४३, ४२:२४, ४५:२३, ४६:४-६, ४६:२८, ५३:१९-२३, ६१:७, ७९:२४

**रोजा**

२:१८३-१८५, २:१८७, २:१९६, ४:९२, ५:८९, ३३:३५, ५८:४

**अल्लाहचे भय**

२:४०-४१, २:७४, २:१५०, २:१९४, २:१९७, ३:७६, ३:१०२, ३:१३०, ३:१७५, ३:२००,४:१, ४:१३१, ५:३, ५:२८, ५:३५, ५:४४, ५:९४, ६:५१, ८:२९, ८:४८, ९:१३, ९:११९, १३:१३, १३:२१, १६:२, १६:४९-५१, २१:२८, २१:४९, २२:१, २३:५२, २३:५७, २४:५२, ३१:३३, ३३:१, ३३:३९, ३३:७०, ३५:१८, ३५:२८, ३६:११, ३९:१०, ५०:३१-३३, ५७:२८, ५८:९, ५९:१६, ५९:१८, ५९:२१, ६४:१६, ६५:१-५, ६५:१०, ६७:१२, ९८:८

**अन्न**

२:१६८, २:१७२-१७३, ३:९३, ५:३-५, ५:८८, ६:१४५, १६:११४, २२:२८, २२:३६, ३३:५३, ७६:८, ८०:२४-३२

**प्रेषित आणि श्रद्धावानांची क्षमाशीलता**

२:१०९, २:१७८, २:२३७, ३:१३४, ३:१५९, ४:१४९, ५:१३, १२:९२, १५:८५, २४:२२, ४२:३७, ४२:४०, ४२:४३, ४३:८९, ४५:१४, ६४:१४

**जिब्राईल (अ.) (पाहा ईश्वराचे दूत)**

२:८७, २:९७-९८, २:२५३, ५:११०, १६:१०२, २६:१९३, ६६:४, ६६:१२, ७०:४, ७८:३८, ८१:१९-२१, ९७:४

**याजूज आणि माजूज**

१८:९४, १८:९७-९८, २१:९५-९६

**जालूत**

२:२४९-२५१

**चांगली कर्मे**

२:११०, २:१८४, २:१९५, २:२१५, २:२६९, २:२७२-२७३, ३:१०४, ३:११४-११५, ४:३६, ११:११४, १४:२४-२५, १६:९०, १६:१२५, २२:७७, २४:२६, ३५:१०, ४१:३३, ७३:२०, ९९:७

**इंजील**

३:३-४, ३:४८, ३:६५, ५:४७, ५:६६, ५:६८, ५:११०, ७:१५७, ९:१११, ४८:२९, ५७:२७

**अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करणे**

२:१५२, २:१७२, ३:१४४-१४५, ६:५३, १२:३८, १४:७, १६:११४, १६:१२१, २७:१९, २७:४०, २७:७३, २९:१७, ३१:१२, ३१:१४, ३२:९, ३९:७, ३९:६६, ४०:६१, ४६:१५

**मार्गदर्शन**

१:६-७, २:२-५, २:३८, २:१२०, २:१३६-१३८, २:१८६, २:२१३, २:२७२, ३:२०, ३:७३, ४:१७४-१७५, ५:१५-१६, ६:७१, ६:८८-९०, ६:१२५, ६:१४९, ७:५२, ९:११५, १०:२५, १०:३५-३६, १०:१०८, १३:२७, १४:४, १६:९, १६:८९, १६:९३, १६:१२५, १७:९, १७:१५, १९:७६, २०:१२३, २२:५४, २४:३५, २४:४६, २८:५६, २९:६९, ३१:२-५, ३९:१७-१८, ३९:२३, ३९:३६-३७, ३९:४१, ४२:१३, ४७:१७, ४९:७, ६४:११, ७२:१४, ७६:३, ९२:१२-१३

**हज्ज आणि उमरा**

२:१५८, २:१९६-२०३, ३:९६-९७, ५:१-२, ५:९४-९७, २२:२७-२९, २२:३३, २२:३६-३७

## स्वर्ग आणि आकाश

२:२२, २:२९, २:२५५, ६:७५-७९, ६:९६-९७, ७:५४, १०:५, १३:२, १४:३२, १५:१६-१८, १५:२२, १६:१२, १७:४४, १९:९०, २१:३०, २१:३२-३३, २४:४३, २५:६१, ३०:४८, ३१:१०, ३१:२९, ३३:७२, ३५:१३, ३५:४१, ३६:३७-४०, ३७:६-१०,३९:५, ४०:५७, ४१:३७, ४२:५, ५०:६, ५१:२२, ५१:४७, ५३:२६, ५५:५, ५५:७, ५६:७५-७६, ६७:५, ७१:१५-१६, ७२:८-९, ७९:२७-२९

## नरक आणि नरकाग्नी

२:२४, ४:५६, ७:४१, १०:२७, ११:१०६-१०७, १४:१६-१७, १४:४९-५०,१५:४३-४४, १७:९७, १८:२९, २२:१९-२२, २३:१०४, २५:१२-१३, ३३:६६, ३८:५६-५८, ३९:१६, ३९:७२, ४०:७०-७२, ५०:३०, ५६:४२-४४, ५६:५१-५६, ६६:६, ६७:६-८, ६९:३१-३२, ७०:१५-१८, ७४:२६-२९, ७६:४, ७७:३०-३३, ७८:२१-२२, १०४:५-९

## परलोक

२:२००-२०२, ३:१४, ३:७७, ३:८५, ३:१४५, ३:१७६, ३:१९८, ४:७७, ४:१३४, ६:३२, ७:१४७, ७:१६९, ९:३८, १०:६२-६४, ११:१५-१६, १२:५७, १२:१०९, १३:२६, १३:३४, १४:२७, १६:२२, १६:४१, १६:९६-९७, १६:१०७-१०९, १७:१८-१९, १७:२१, १७:७२, २०:१२७, २२:११, २७:४-५, २८:६०, २८:७०, २८:८३-८४, २९:६४, ३४:१, ३९:२६, ४०:३९-४०, ४१:१६, ४१:३१, ४२:२०, ४२:२२, ४३:३५, ५७:२०, ६८:३३, ७३:२०, ८७:१७, ९३:४

## अल्लाहच्या कारणास्तव स्थलांतर

२:२१८, ३:१९५, ४:९७-१००, ८:७२-७५, ९:२०, १६:४१,

१६:११०, २२:५८, २९:२६, २९:५६, ३३:५०, ३९:१०, ५९:८-१०, ६०:१०

**अंतिम घटिका (पाहा पुनरुत्थानाचा दिवस)**

६:३१, ६:४०, ७:१८७, १२:१०७, १६:७७, २०:१५, २२:१, ३०:१२, ३०:१४, ३३:६३, ३४:३, ४०:५९, ४१:४७, ४३:६६, ४५:३२, ५१:५-६, ५४:१-५, ६७:२५-२७

**प्रेषित हूद (अ.)**

७:६५-७२, ११:५०-६०, २६:१२३-१४०, ४६:२१-२६

**दांभिक**

२:८-१६, २:२०४-२०६, ३:१६७-१६८, ४:६०-६३, ४:७२-७३, ४:८८-९१, ४:१३८-१४३, ४:१४५, ९:६४-६९, ९:७३-८७, ९:१०१, ३३:७३, ४८:६, ५७:१३-१५, ५८:१४-१९, ५९:११-१२, ६१:३, ६३:१-७, ६६:९

---------------

## इद्दत

**मृत्युनंतर**

२:२३४-२३५

**तलाकनंतकर**

२:२२८, २:२३१-२३२, २:२३५, ३३:४९, ६५:१-७

**वारसाहक्क**

२:१८०, २:२४०, ४:७-९, ४:११-१२, ४:१९, ४:३३, ४:१७६, ५:१०६-१०८

**अन्याय - अत्याचार**

२:११४, २:१४०, २:१८८, ३:२१, ३:१०८, ४:९-१०, ४:२९-३०, ४:१६१, ६:२१, ६:९३, ६:१४४, ६:१५७, ९:३४, १०:४४, २०:१११-११२, २७:१४, २९:६८, ३१:१३, ३२:२२, ४०:१७, ४२:४२,६१:७

**मध्यस्थी करणे**

२:२५५, ४:८५, ६:५१, ६:७०, १०:३, २१:२८, ३२:४, ३६:२३, ३९:४३-४४, ४३:८६, ५३:२६, ७४:४८

**मद्यपान**

२:२१९, ५:९०-९१

**इसहाक**

६:८४, ११:७१, १४:३९, १९:४९, २१:७२, ३७:११२-११३, ३८:४५

**इस्माईल (अ.)**

२:१२५-१२९, २:१३३, ४:१६३, ६:८६, १९:५४-५५, २१:८५, ३८:४८

**इस्लाम (पाहा मुस्लिम)**

२:१३६, ३:१९, ३:६४, ३:६७, ३:८३-८५, ५:३, ६:१२५, २२:७८, ३९:२२, ४१:३३, ४९:१७

**इस्माईल (अ.) यांची संतती**

२:४०-१०३, २:१२२-१२३, २:२४६-२५१, ३:९३-९४, ५:१२-१३, ५:२०-२६, ५:३२, ५:७०-७१, ५:७८-८१, ७:१३७-१४१, ७:१४८-१५३, ७:१५९-१७१, १०:८३-९३, १४:५-८, १७:२-८, १७:१०४, २०:८०-९८, २६:५२-६७, २६:१९७, २७:७६, ४०:५३,

४४:२३-३३, ४५:१६-१७, ४६:१०, ६१:५-६

**याकूब (अ.)**

२:१३२-१३३, ३:९३, ४:१६३, ६:८४, १९:४९, २१:७२, २९:२७

**ईसा (अ.) (येशू ख्रिस्त) (पाहा मरयम)**

२:८७, ३:४५-५५, ३:५९, ४:१५६-१५९, ४:१६३, ४:१७१-१७२, ५:१७, ५:४६, ५:७२, ५:७५, ५:७८, ५:११०-११८, १९:१९-३७, २३:५०, ४३:५७-६४, ५७:२७, ६१:६, ६१:१४

**ज्यू लोक**

२:६२, २:१११-११३, २:१२०, २:१३५, ४:४६, ४:१६०-१६२, ५:१८, ५:४१-४५, ५:५१,५:६४, ५:६९-७१, ५:८२, ६:१४६, ९:३०, १६:११८, २२:१७, ६२:६-८

**जिहाद (अल्लाहच्या मार्गातील लढा)**

२:१५४, २:१९०-१९१, २:१९३, २:२१६, २:२१८, २:२४४, ३:१४२, ३:१५७-१५८, ३:१६९, ३:१७१, ३:१९५, ४:७१-७७, ४:८४, ४:९५, ४:१०४, ५:३५, ५:५४, ८:१५-१६, ८:३९-४१, ८:४५-४६, ८:५५-५७, ८:६०-६२, ८:७४-७५, ९:५-६, ९:१२-१६, ९:२०, ९:२४, ९:२९,९:३६, ९:३८-४१, ९:४४, ९:७३, ९:८८-८९, ९:१११, ९:१२०-१२३, २२:३९-४०, २२:५८-५९, २२:७८, २९:६, २९:६९, ३३:२३, ४७:४-७, ४७:३५, ४८:१६, ४९:१५, ५७:१०, ५७:२५, ५९:२-७, ६०:१-२, ६१:४, ६१:१०-१४, ६६:९, १००:१-५

**जिन्न**

२:३४, ६:१००, ६:११२, ६:१२८-१३०, ७:३८, ७:१७९, ११:११९, १५:१७-१८, १५:२७, १७:८८, १८:५०, २१:८२, २७:१७, २७:३८-४०, ३४:१२-१४, ३४:४१, ३७:६-१०, ४१:२५, ४१:२९,

४६:१८, ४६:२९-३२, ५१:५६, ५५:१५, ६७:५, ७२:१-१७

**अय्यूब (अ.)**

४:१६३, ६:८४, २१:८३-८४, ३८:४१-४४

**यहया (अ.)**

३:३९, ६:८५, १९:७, १९:१२-१५, २१:८९-९०

**यूनुस (अ.)**

४:१६३, ६:८६, १०:९८, २१:८७-८८, ३७:१३९-१४८, ६८:४८-५०

**यूसुफ (अ.)**

६:८४, १२:४-१०१

**न्याय**

२:२८१, २:२८२, ३:१८, ३:२५, ३:६४, ४:३, ४:५८, ४:६५, ४:१०५, ४:१२९, ४:१३५, ५:८,५:४२, ५:४५, ६:१५२, ६:१६१, ७:२९, १०:४७, १०:५४, १६:९०, १६:१११, १७:७१,२३:६२, ३३:५, ३९:६९-७०, ४०:२०, ४२:१५, ४५:२२, ४६:१९, ४९:९, ५७:२५, ६०:८

**काबागृह**

२:१२५-१२९, २:१४४-१४५, २:१४९-१५०, २:१५८, ३:९६-९७, ५:२, ५:९७, ८:३४-३५, १४:३७, २२:२६, २२:२९, २२:३३, १०६:३

**हत्या**

२:६१, २:१७८, २:१९१, २:२१७, ३:२१, ४:२९, ४:९२, ५:२७-३४, ६:१५१, १७:३१, १७:३३,४०:२८, ६०:१२

---------------

## ज्ञान :


**मानवाला दिलेले**

२:३१, २:१५१, ३:४८, ४:११३, ४:१६६, ५:८३, १०:५, १२:६८, १२:७६, १७:८५, १८:६५, २१:७४, २१:७९, २८:१४, २८:८०, २९:४९, ३०:२२, ३४:६, ३५:८, ३९:९, ४७:६, ५८:११, ९६:३-५

**संपादन करणे आणि इतरांना शिकविणे**

२:४२, २:१४०, २:१५९, २:१७४, ३:१३७, ३:१८७, ६:११, ६:९९, ७:८६, ७:१८५, ९:१२२, १०:१०१, १२:१०९, १६:३६, १६:४३-४४, २०:११४, २५:५९, २८:६९, २९:२०, ३०:९, ३०:४२, ३५:४४, ३९:९, ४०:२१, ४०:८२, ४७:१०, ५०:६, ५८:११, ८०:२४-३२, ८६:५-८, ८८:१७-२०, ९६:१

**कायद्यात्मक दंड आकारणी**

२:१७८-१७९, २:१९०-१९२, २:१९४, ४:१५-१६, ४:२५, ५:३३-३४, ५:३८, ५:४५, १२:८५,१६:१२६, १७:३३, २२:६०, २४:२, २४:४-९, ४२:४०-४१

**जीवन**

२:२८, २:१५४, २:१७९, ३:२७, ३:१५६, ३:१६९, ४:२९, ५:३२, ६:१२१, ६:१५१, १०:५६, १५:२३, १७:३१, १७:३३, २१:३०, २२:६६, २३:८०, ३०:१९, ५०:४३, ५७:२, ६७:२

---------------

**लूत (अ.)**

६:८६, ७:८०-८४, ११:७४-८३, १५:५९-७७, २१:७४-७५, २६:१६०-१७५, २७:५४-५८ ,२९:२६, २९:३१-३४, ३७:१३३-१३८, ५४:३३-३९

## अल्लाह, प्रेषित आणि धर्मावरील प्रेम

२:१६५, २:२०७, ३:३१, ३:८३, ५:५४, ६:१६४, ३९:९, ४८:२९, ४९:७, ५८:२२, ५९:८-९

## अल्लाहवर प्रेम करणारे

२:१९५, २:२२२, ३:३१, ३:७६, ३:१३४, ३:१४६, ३:१४८, ३:१५९, ५:१३, ५:४२, ५:५४, ५:९३, ९:४, ९:७, ९:१०८, ४८:१८, ४९:९, ५८:२२, ६०:८, ६१:४

## जगावर प्रेम करणारे

२:९६, २:१६५, २:२००, २:२१२, २:२१६, ३:१४, ३:८५, ३:१५२, ३:१८८, ४:९४, ७:१६९, ९:२४, ९:३८, १०:७-८, १३:२६, १४:२-३, १६:१०७, १७:१८, २४:३३, २८:७९-८०, ३८:३२, ५३:२९-३०, ६२:११, ६३:९, ७५:२०, ७६:२७, ७९:३७-३९, ८९:२०, १००:८, १०२:१-२

## मदीनेतील लोक

९:१०१, ९:१२०, ३३:१३, ३३:६०, ६३:८

## मदयन

७:८५-९३, ९:७०, ११:८४-९५, १५:७८-७९, २०:४०, २२:४४, २६:१७६-१९०, २८:२२-२३, २९:३६-३७, ३८:१३, ५०:१४

## मक्का शहर

३:९६, १४:३५-३७, ९०:१-२, ९५:३

---------------

## मानव :

### त्याची निर्मिती

२:३०, ४:१, ६:२, ६:९८, ७:११-१२, ७:१८९, १५:२६, १५:२८-२९, १५:३३, १६:४, १८:३७, १९:९, २२:५, २३:१२-१४, २५:५४, ३०:२०, ३२:७-९, ३५:११, ३६:७७, ३८:७१, ३८:७६, ३९:६, ४०:६७, ४९:१३, ५३:३२, ५५:१४, ५६:५७-५९, ७१:१७, ७५:३७-३९, ७६:१-२, ७७:२०-२३, ८०:१८-१९, ८६:५-७, ९६:२

### त्याचा स्वभाव

३:१४, ४:२८, १०:१२, १०:४४, ११:९-११, १२:३८, १३:१, १७:११, १७:६७, १७:१००, १८:५४, २१:३७, ३३:७२, ३९:४९, ४०:६१, ४१:४९-५१, ४२:४८, ७०:१९-२२, ८९:१५-१६, ८९:२०, ९५:४, ९६:६-७, १००:६-७

### त्याची जबाबदारी

२:२१, ५:१०५, ६:१६४, ७:२७, ७:१५८, ८:५३, १०:१०८, १३:११,१६:९०, १७:२३, १७:३४-३६, २२:१, ३१:३३, ३५:१८, ३९:७, ५१:५६, ५३:३८-४१

### जगात त्याची परीक्षा

२:१५५, ६:१६४-१६५, ८:२५, ८:२८, ११:७,१६:९२, १८:७, २१:३५, २२:११, २५:२०, २९:२-३, २९:१०, ३९:४९, ५१:५६, ५७:२५,६७:२, ७६:२, ८९:१५-१६

### अल्लाहकडे त्याचे परतणे

२:२८, २:१५६, २:२४५, २:२८१, ५:१०५, ६:३६, ६:६०-६२, ६:१०८, ९:९४, ९:१०५, १०:४, १०:२३, १०:३०, १०:४५-४६, १०:५६, ११:४, १८:८७,२१:९३, २८:७०, २८:८८, २९:८,

२९:१७, २९:५८, ३०:११, ३१:१५, ३२:११, ३६:८३, ३९:७, ३९:४४, ४१:२१, ४३:८५, ४५:१५, ६२:८, ७५:१०-१५, ९६:८

---------------

**विवाह**

२:२२१, २:२३०, २:२३२, २:२३५, ४:३-४, ४:१९-२५, ४:३४-३५, ४:१२७-१३०, २३:५-७, २४:३, २४:३२-३३, ३०:२१, ३३:३७, ३३:४९, ३३:५२, ६०:१०, ७०:२९-३१

**हुतात्मे**

२:१५४, ३:१४०, ३:१५७-१५८, ३:१६९-१७१, ३:१९५, ४:६९, ४:७४, २२:५८-५९, ४७:४, ५७:१९

**मरयम (येशू ख्रिस्तांच्या माता)**

३:३५-३७, ३:४२-५१, ४:१५६, ४:१७१, ५:११६, १९:१६-३४, २१:९१, २३:५०, ६६:१२

**मस्जिद (मशीद)**

२:११४-११५, २:१८७, ७:२९, ७:३१, ९:१७-१९, ९:१०७-१०९, १७:१, १७:७, २२:४०, ७२:१८

**काबागृहातील महान मस्जिद**

२:१४४-१४५, २:१४९-१५०, २:१९१, २:१९६, २:२१७, ५:२, ८:३४-३५, ९:७, ९:१९, ९:२८,२२:२५, ४८:२५, ४८:२७

---------------

## अल्लाहचे प्रेषित :

**त्यांची वैशिष्ट्ये**

२:२५३, ४:६४, ४:१६३-१६५, ५:७५, ६:३४, ६:४८, १०:४७,

१२:१०९-११०, १४:४, १४:११, १८:५६, २१:२५, २२:७५, २३:४४, २५:२०, २७:१०, ३६:१३-१७, ३६:२०-२१, ४०:७८, ५९:६

**ईश्वराचे दूत**

६:६१, ७:३५, ११:६९, ११:७७, १६:२, १६:१०२, २२:७५, २६:१९३, २९:३१, २९:३३, ३५:१, ४३:८०, ५१:२४-३४, ९७:४

**मूसा (अ.)**

२:५१-७१, २:८७, २:९२, ४:१५३, ४:१६४, ५:२०-२६, ६:१५४, ७:१०३-१५६, ७:१५९-१६०, १०:७५-८९, ११:९६-९७, ११:११०, १४:५-८, १७:२, १७:१०१-१०३, १८:६०-८२, १९:५१-५३, २०:९-९८, २१:४८, २३:४५-४९, २५:३५, २६:१०-६७, २७:७-१४, २८:३-४३, २९:३९, ३२:२३, ३३:६९, ३७:११४-१२२, ४०:२३-३७, ४०:५३-५४, ४१:४५, ४३:४६-५४, ५१:३८-४०, ६१:५, ७९:१५-२६

---------------

## प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याविषयी

२:१४३, २:१५१, २:२५२, ३:१४४, ३:१५९, ३:१६४, ५:१९, ७:१५७-१५८, ७:१८४, ७:१८८, ९:३, ९:३३, ९:६१, ९:८८, ९:१२८, १०:१५-१६, ११:२, ११:४९, १५:८९, १७:९३, १७:१०५, १८:११०, २१:१०७, २५:२०, २५:५६, २८:४६, ३३:६, ३३:२१, ३३:४०, ३३:४५-४६, ३४:२८, ३४:४६, ३६:३-४, ४१:६, ४५:१८, ४६:९, ४८:८, ४८:२८-२९, ५३:५६, ५७:८, ६१:६, ६१:९, ६२:२, ६३:८, ६५:११, ६८:४, ६९:४१-४२, ७२:१९-२३, ७३:१५, ७३:२०, ९८:२

**त्यांच्यावरील श्रद्धा**

३:८१-८२, ४:१००, ४:१३६, ४:१७०-१७१, ७:१५७-१५८,

९:७१, ९:८०, २४:६२, ३३:२२, ४६:३१, ४७:२, ४८:१३, ४९:१५, ५७:७, ५७:२८, ५८:२२, ६१:११, ६४:८, ६९:४०

**त्यांचा आदर**

२:१०४, ३:३१-३२, ३:१३२, ४:१३-१४, ४:५९, ४:६४-६५, ४:६९, ४:८०, ४:११५, ५:९२, ७:१५७, ८:१, ८:१३, ८:२०, ८:२४, ८:४६, ९:२४, ९:६२-६३, ९:७१, ९:१०५, ९:१२०, २४:५२, २४:५४, २४:५६, २४:६३, ३३:३६, ३३:५३,३३:५६-५७, ३३:६६, ३३:७१, ४७:३३, ४८:८-१०, ४८:१७, ४९:१-५, ४९:१४, ५८:९, ५८:१२-१३, ५८:२०, ५९:७-८, ६४:१२, ७२:२३

**त्यांच्यावरील जबाबदारी**

२:१४३, ३:२०, ३:१६४, ५:६७, ५:९२, ५:९९, ६:१४, ६:५१-५२, ६:१०६-१०७, ७:१५७, ७:१८४, ८:६५, ९:७३, ९:१०३, ९:११३, १०:१०४-१०६, १०:१०९, ११:२, ११:११२-११५, १३:४०, १५:८९, १६:८२, १६:१२५, १८:२७-२८, २०:१३०, २२:७८, २४:५४, २५:५७, २६:२१३-२१७, २७:९१-९३, २९:१८, ३०:३०, ३३:१-२, ३३:३८, ३३:४७-४८, ३५:२३, ३८:८६, ४०:५५, ४२:१५, ४२:२३, ४२:४८, ४५:१८, ४६:३५, ५०:३९, ५०:४५, ५१:५५, ५२:४८-४९, ६०:१२, ६४:१२, ६६:९, ७२:२३, ७३:१-४, ७३:७-८, ७३:१०, ७४:१-७, ७५:१६-१९, ७६:२४-२६, ८७:९, ८८:२१, ९४:७-८

**त्यांचे घराणे**

२४:११, ३३:६, ३३:२८-३४, ३३:३७, ३३:५०-५३, ३३:५९, ६६:१, ६६:३-५

---------------

## मुस्लिम

३:६४, ३:६७, ३:८४, ३:१०२, ६:१६३, ११:१४, १५:२, १६:८९, २१:१०८, २२:७८, २७:८१, २७:९१, २८:५२-५३, ३०:५३, ३३:३५, ३९:११-१२, ४१:३३, ४३:६८-६९, ४६:१५, ६८:३५, ७२:१४

### प्रेषितांच्या पूर्वकालीन मुस्लिम

२:१२८, २:१३२-१३३, ३:५२-५३, ३:६७, ५:१११, ७:१२६, १०:७२, १०:८४-८६, १२:१०१, २२:७८, २७:३१, २७:४२, ५१:३६

---------------

### नूह (अ.)

३:३३, ४:१६३, ६:८४, ७:५९-६४, १०:७१-७३, ११:२५-४९, १७:३, १९:५८, २१:७६-७७, २३:२३-३०, २५:३७, २६:१०५-१२२, २९:१४-१५, ३३:७, ३७:७५-८२, ४२:१३, ५४:९-१५, ५७:२६, ७१:१-२८

### अल्लाहसमोर कर्तव्यनिष्ठा

३:३२, ३:१३२, ४:१३, ४:५९, ४:६९, ४:८०, ५:९२, ८:१, ८:२०, ८:४६, ९:७१, २४:५१-५२, २४:५४, ३३:३३, ३३:७१, ४७:३३, ४८:१७, ४९:१४, ५८:१३, ६४:१२, ६४:१६

### प्रेषितांसमोर कर्तव्यनिष्ठा

३:१००, ३:१४९, ६:११६, ६:१२१, १८:२८, २५:५२, २९:८, ३१:१५, ३३:६६-६७, ४३:५४, ६८:८, ६८:१०, ७६:२४, ९६:१९

### स्वर्ग

२:२५, ३:१५-१७, ३:१३३, ४:५७, ९:७२, १३:३५, १५:४५-४८,

१८:३१, १९:६१-६३, २२:२३-२४, ३५:३३-३५, ३६:५५-५८, ३७:४१-४९, ४३:७१-७३, ४४:५१-५५, ४७:१५, ५५:४६-७७, ५६:१५-२६, ५६:२८-३८, ५७:२१, ६९:२२-२३, ७६:१२-२२, ७८:३१-३६, ८३:२५-२८, ८८:१०-१६

२:८२, ३:१९८, ४:१३, ४:५७, ४:१२४, ५:८५, ५:११९, ९:२०-२२, ९:७२, ९:८८-८९, ९:१००, १३:२२-२३, १४:२३, १५:४५-४७, १८:१०७-१०८, १९:६०, २२:१४, २२:२३-२४, ४४:५१, ४८:१७, ५२:१७, ५४:५४-५५, ५५:४६, ५६:१०-१२, ६८:३४, ७०:२३-३५, ७७:४१-४४, ७९:४०-४१, ८३:२२-२४, ८५:११, ८९:२७-३०, ९९:७-८, १०१:६-७

### संयम

२:४५, २:१५३, २:१५५-१५७, २:१७७, २:२५०, ३:१२०, ३:१४६, ३:१८६, ३:२००, ४:२५,६:३४, ७:१२६, ८:४६,१०:१०९, ११:४९, ११:११५, १२:९०, १३:२२, १३:२४, १६:४२,१६:९६, १६:१२६-१२७, १८:२८, २०:१३०, २१:८५, २३:१११, २५:२०, २८:५४, २९:५८-५९, ३१:१७, ४०:७७, ४२:४३, ४६:३५, ४९:५, ५२:१६, ७०:५, ७३:१०, ७४:७, ७६:१२, १०३:३

### लोकांचे प्रकार

२:८-१०, २:४४, २:९६, २:११८, २:१६५, २:२००-२०१, २:२०४-२०६, २:२०७, २:२७३, ३:१७३, ४:३७-३८, ४:१०८, ५:८२-८४, ७:१६४, ९:६, २१:१-३, २२:३, २२:८-९, २२:११-१३, २९:१०, ३१:६, ३१:२०-२१, ३५:२८, ४३:५४, ४७:३८, ४९:११, ५८:१४, ५८:२२, ८३:१-३

### सर्व मानवांसाठी अल्लाहचे निर्देश

२:२१, २:१६८, २:२८१, ४:१, ४:५८, ४:१७०, १४:५२,१७:८९, २२:१, ३१:३३, ३५:३, ३५:५-६

## लोकांचा धर्म

२:२१३, ३:१९, ३:१०५, ३:१३८, ३:१६५, ३:१७४-१७५, ५:९७, ७:१५८, १०:१९, १०:५७, १०:१०८, १२:३८, १४:१, १६:४४, १७:८९, २२:४९, ३०:३०, ३४:२८, ३९:४१, ४२:१३, ४५:२०, ५७:२५

## फिरऔन आणि त्याचे लोक

२:४९-५०, ७:१०३-१३७, ८:५४, १०:७५-९२, ११:९७-९९, १७:१०१-१०३, २०:४३-७९, २३:४५-४८, २६:१०-६८, २८:३-२१, २८:३६-४२, २९:३९, ४०:२३-४६, ४३:४६-५६, ४४:१७-३१, ५१:३८-४०, ५४:४१-४२, ६६:११, ७३:१५-१६, ७९:१७-२६, ८९:१०-१३

## उपासना - प्रार्थना

२:३, २:४३, २:४५, २:११०, २:१५३, २:२३८, ४:१०१-१०३, ५:६, ६:७२, ६:९२, ७:१७०, ८:३, ८:३५, ९:५, ९:११, ९:१८, ९:७१, १०:८७, ११:११४, १३:२२, १४:३१, १४:३७, १४:४०, १७:७८, १७:११०, १९:३१, १९:५५, १९:५९, २०:१४, २०:१३२, २१:७३, २२:३५, २२:४१, २२:७८, २३:२, २३:९, २४:४१, २४:५६, २९:४५, ३१:१७, ३३:३३, ३५:२९, ६२:९-१०, ७०:२२-२३, ७०:३४, ७३:२०, ९८:५

## प्रेषितत्व

३:७९, ६:८९, २९:२७, ४५:१६, ५७:२६

## प्रेषितांचा उल्लेख

२:२१३, २:२४६-२४८, ३:७९-८०, ३:८१, ३:१४६-१४७, ३:१६१, ४:६९, ४:१६३, ६:११२, ७:९४, १७:५५, १९:५८, २५:३१, ३३:७, ३३:४०, ४३:६-७

**जबूर**

४:१६३, १७:५५

**पावित्र्य**

२:१२५, २:२२२, ५:६, ८:११, ९:१०८, २०:७५-७६, २२:२६, ७४:४

**आत्म्याचे**

२:१२९, २:१५१, ३:४२, ३:१६४, ४:४९, ९:१०३, २०:७५-७६, २४:२१, २४:२८, २४:३०, ३३:३३, ३५:१८, ६२:२, ८०:३, ८७:१४, ९१:९, ९२:१७-१८

**किबला (प्रार्थनेची दिशा)**

२:१४२-१५०, ७:२९, १०:८७

---------------

## कुरआन :

**अल्लाहकडून अवतरण**

२:१७६, २:२५२, ३:३, ३:७, ३:१०८, ४:१०५, ४:११३, ४:१३६, ४:१६६, ६:११४, ६:१५५, ७:२, ७:१९६, १०:१६, १०:३७, १०:९४, ११:१, १२:२-३, १३:१, १४:१, १५:९, १५:८७, १६:४४, १६:१०१-१०२, १७:१०५-१०६, १८:१-२, २१:१०, २१:५०, २२:१६, २४:३४, २४:४६, २५:६, २६:१९२-१९५, २८:८६, २९:५१, ३२:२, ३५:३१, ३६:५, ३८:२९, ३९:१-२, ३९:२३, ३९:४१, ४०:२, ४१:२-४, ४१:४१-४२, ४२:१७, ४२:५२, ४३:१-४, ४४:२-३, ४५:२, ४५:६, ४६:२, ५६:७७-८०, ५७:९, ६९:४३, ७६:२३

## अनुकरणीय वैशिष्ट्य

२:२३-२४, ४:८२, १०:३७-३८, ११:१, ११:१३-१४, १५:९, १७:८८, २९:४८-४९, ४१:४१-४२, ५९:२१

## पूर्वीच्या ग्रंथांतील प्रमाण व पूर्णत्व

२:४१, २:९१, २:९७,३:३, ४:४७, ५:१५, ५:४८, ६:९२, १०:३७, १२:१११, ४६:१२, ४६:३०

## मार्गदर्शन

२:२, २:९७, २:१८५, ३:१३८, ५:१५-१६, ६:१५५, ७:१७०, ७:२०३, १२:२, १२:१११, १४:१, १६:६४, १६:८९, १६:१०२, १७:९, २२:१६, २७:१-२, २७:७६-७७, ३१:२-३, ३४:६, ३८:२९, ४१:४४, ४५:११, ४५:२०, ५७:९, ७२:१-२, ७२:१३

## त्याच्याप्रती श्रद्धावंतांची भूमिका

२:१२१, ३:७-८, ३:१९९, ५:८३-८४, ६:३०,६:११४, ८:२, ९:१२४, ११:१७, १३:३६, १७:१०७, १९:५८, २२:५४, २५:७३, २८:५२-५३, २९:४७, ३०:५३, ३२:१५, ३४:६

## अश्रद्धांची भूमिका

२:८९-९१, २:१७०, ३:७, ४:१४०, ५:१०४, ६:७, ८:३१, ९:१२४-१२५, ९:१२७, १०:१५, १६:२४, १६:१०१, १७:४६, १९:७३, २२:७२, २५:४-५, २५:३२, ३१:७, ३१:२१, ३४:३१, ३४:४३, ४१:२६, ४३:३१, ४५:८-९, ४५:२५, ४६:७-८, ६८:१५, ८३:१३, ८४:२१

## पठण आणि अभ्यास

२:१२१, ३:११३, ४:८२, ७:२०४, १६:९८, १८:२७, २५:३०, २७:९२, २९:४५, ३३:३४, ३५:२९, ३८:२९, ४७:२४, ७३:४, ७३:२०, ९६:१, ९६:३

**रमजान**

२:१८५

## प्रतिदान :

**उपासनेच्या बाबतीत**

२:१८४, २:१९६, ३७:१०७

**युद्ध-कैद्यांच्या बाबतीत**

२:८५, ४७:४

**तलाकच्या बाबतीत**

२:२२९-२३२

**निवाड्याच्या दिवशी**

३:९१, ५:३६, १०:५४, १३:१८, ३९:४७, ५७:१५, ७०:११

---------------

**न्याय**

१:४, ३:१८५, २६:८२, ३७:२०-२१, ५१:१२-१४, ८२:१४-१९

**कर्मांचा अभिलेख**

३:१८१, ४:८१, १०:२१, १७:१३-१४, १७:७१, १८:४९, १९:७९, २३:६२, ३६:१२, ४३:१९,४३:८०, ४५:२८-२९, ६९:१९, ६९:२५, ७८:२९, ८१:१०, ८३:७-९, ८३:१८-२१, ८४:७-१२

**सुरक्षित नोंद**

६:३८, ६:५९, ९:३६, १०:६१, ११:६, १३:३९, १७:५८, २१:१०५, २२:७०, २७:७५, ३३:६, ३४:३, ३५:११, ४३:४, ५०:४, ५२:२, ५६:७८, ५७:२२, ८५:२२

**नातेसंबंध - त्यांचे हक्काधिकार आणि कर्तव्य**

२:८३, २:१७७, २:१८०-१८२, २:२१५, २:२३३, ४:७-१२, ४:३३, ४:३६, ४:१२७, ४:१३५, ४:१७६, ५:१०६, ६:१५१-१५२, ९:११३-११४, १६:९०, १७:२३-२४, १७:२६, १७:३१, २४:२२, २९:८, ३०:३८, ३१:१४, ४६:१५-१८, ६४:१४

---------------

## धर्म :

**अल्लाहच्या बरहुकूम**

२:२१, २:११२, २:१३२, २:१३८, २:२०८, ३:१९, ३:८३, ४:१३६, ४:१६६, ५:३, ६:१५१-१५३, ६:१६१, १०:१०४-१०६, १२:४०, २१:९२, २२:७८, २३:५२, ३०:३०-३१, ३९:११-१२, ४२:१३-१५, ४५:१८, ९८:५

**धर्माचा स्वीकार आणि आचार**

२:२५६, ४:१२५, ७:२९, ९:१२१, ३९:२, ४०:१४, ४०:६५, ६०:८, १०९:६

**धर्माचे उल्लंघन**

२:७९, २:११६, २:२०९, २:२१३, ३:२४, ३:८५-८६, ४:६०, ४:१७१, ५:५४, ५:६३, ५:६५-६६, ५:७२-७३, ५:७७, ६:११६, ६:१५३, ६:१५९, ७:१७५-१७६, ११:११८, १२:१०६, १९:५९, २१:९३, २२:११, २३:५३, २४:६३, २५:४३, ३०:३१-३२, ४२:१४, ४३:६५, ४५:१७, ४५:२३

---------------

## प्रायश्चित्त :

### अल्लाहकडून पुरस्कार

२:१६०, २:२२२, ३:१३३, ४:१०६, ५:७४, ७:१५३, २४:३१, ३०:३१, ३९:५३-५४, ४१:६, ४९:११, ६६:८, ११०:३

### अल्लाहचा स्वीकार

२:३७, २:१६०, ३:८९, ३:१३६, ४:१७-१८, ४:४८, ४:६४, ४:११०, ४:११६, ४:१४६, ५:३४, ५:३९, ६:५४, ७:१५३, ९:१०२, ९:१०४, ९:११७-११८, १५:४९, १६:११०, १६:११९, २०:८२, २४:५, २५:७०-७१, २८:१६, २८:६७, ३३:७३, ४२:२५

---------------

### पुनरुत्थान

६:३६, १६:३८-३९, १७:४९-५२, १७:९८-९९, २२:५-७, २२:६६, २३:१६, २७:६५, ३१:२८,३५:९, ३६:५१-५३, ३७:१६-२१, ३६:७८-७९, ४६:३३, ५६:४९-५०, ६४:७, ६७:१५

### मोबदला

२:११२, २:२६१-२६२, २:२७४, २:२७७, ३:५७, ३:१३६, ३:१४५, ३:१४८, ३:१७१-१७२, ३:१९५, ३:१९९, ४:४०, ४:७४, ४:१००, ४:१३४, ७:१७०, ९:२१-२२, ११:११५, १२:५६-५७, १६:४१, १६:९६-९७, १८:३०, २०:७५-७६, २४:३८, २५:१५-१६, २८:५४, २८:८०, २९:७, २९:५८, ३२:१७, ३३:२९, ३३:३५, ३४:३७, ३५:३०, ३९:१०, ३९:३४-३५, ३९:७३-७४, ४१:८, ४६:१३-१४, ४८:१८, ५३:३१, ५५:६०, ६४:१५, ६५:५, ६७:१२, ६८:३, ७३:२०, ७६:२०-२२, ८४:२५, ८९:२७-३०, ९५:६, ९८:७-८

**चांगुलपणा**

२:१७७, २:२२४, २:२७७, ३:५७, ३:९२, ३:१३३-१३५, ३:१९९, ४:१२४, ५:२, ७:४२, ८:१,१६:९७, १७:२२-३७, १८:३०, १८:११०, २८:८३, ३०:४४, ३१:१३-१९, ३४:३७, ३९:३३, ४०:४०, ४१:३३, ४१:४६, ४६:१५-१६, ४७:१७, ४९:१३, ५९:७, ६४:१६

**अल्लाहचे रास्त भक्त**

३:१५-१७, ३:१३३-१३६, ४:६९, ७:१२८, ९:११२, १६:१२८, १७:२५, २१:१०५, २३:१०९, २४:५२, २५:६३-७६, २८:८३, २९:५८-५९, ३१:१२-१९, ३९:९-१०, ३९:७३-७४, ४३:६७-७०, ४६:१३-१६, ५१:१५-१९, ५२:१७-१८, ५४:५४-५५, ७६:५-१२, ८२:१३, ८९:२७-३०

**सब्र**

२:६५, ४:१५४, ७:१६३-१६६, १६:१२४

**जुमा**

६२:९-१०

**नतमस्तक होणे**

७:२०६, १३:१५, १६:४९-५०, १७:१०७-१०९, १९:५८, २२:१८, २२:७७, २५:६०, २७:२५-२६, ३२:१५, ३८:२४, ४१:३७-३८, ५३:६२, ८४:२१, ९६:१९

**सालेह (अ.)**

७:७३-७९, ११:६१-६८, २६:१४१-१५९, २७:४५-५३, ९१:१३

**सैतान**

२:३४, २:३६, २:१६८-१६९, २:२०८, २:२६८, ३:१५५,

३:१७५, ४:३८, ४:६०, ४:७६, ४:११७-१२०, ५:९०-९१, ६:४३, ६:६८, ६:१४२, ७:११-२२, ७:२७, ७:२००-२०२, ८:४८, १४:२२, १५:३१-४४, १६:६३, १६:९८-१००, १७:२७, १७:५३, १७:६१-६५, १८:५०, १९:४४-४५, २०:११६-१२०, २२:५२-५३, २४:२१, २७:२४, ३१:२१, ३४:२०-२१, ३५:५-६, ३६:६०,३८:७१-८५, ४३:६२, ४७:२५, ५८:१०, ५८:१९, ५९:१६

**तालूत**

२:२४७-२४९

**धर्मग्रंथ**

२:७८-७९, २:८७, २:२१३, ३:३-४, ३:२३-२४, ३:१८४, ४:१६३, ५:४४, ५:४६, ५:४८, ५:६८, ६:९१-९२, ६:१५४-१५७, ७:१६९-१७०, ११:११०, १३:३६-३७, १७:२-४, १७:५५, २१:१०५, २३:४९, २५:३५, २८:४८-५०, ३२:२३, ४०:५३-५४, ४१:४५, ५३:३६-५४, ५७:२५-२६

**ग्रंथधारक**

२:१०९, २:१११, २:११३, २:१२०, २:१४६, ३:१९-२०, ३:६४-६६, ३:६९-७५, ३:७८, ३:९८-१००, ३:११३-११५, ३:१८७, ३:१९९, ४:१५३, ४:१५९, ४:१७१, ५:५, ५:४७, ५:६५-६६, ५:६८-६९, ६:२०, ७:१६९, १३:३६, २८:५२-५४, २९:४६, ५७:१६, ५७:२९, ७४:३१, ९८:१-५

**सबा**

२७:२२-४४, ३४:१५-२१

**अनेकेश्वरत्व (अल्लाहला भागीदार जोडणे)**

२:२२, २:११६, २:१६५, ३:६४, ३:७९-८०, ३:१५१, ४:३६, ४:४८, ४:११६, ५:७२-७३, ६:१९, ६:२२, ६:५६, ६:८८,

६:१२१, ६:१५१, ७:३३, ७:१९०-१९१, ९:३, ९:२९-३१, ९:११३-११४, १०:६६, १२:३८, १२:१०६, १३:३३, १३:३६, १६:१, १६:३, १६:५१, १६:५६, १६:८६, १७:२२, १७:३९, १८:१०२, १८:११०, २१:२१-२९, २२:२६, २२:३१, २३:९२, २३:११७, २५:४३, २८:६२-६४, २९:८, ३०:३१, ३१:१३, ३१:१५, ३४:४०-४१, ३५:४०, ३६:२३-२४, ३६:७४-७५, ३९:३, ३९:८, ३९:६५, ४०:६६, ४०:७३-७४, ४१:३७, ४२:२१, ४५:२३, ४६:४-६, ५०:२६, ५१:५१, ५२:४३

**शुऐब (अ.)**

७:८५-९३, ११:८४-९५, २८:२५-२८, २९:३६-३७

**अल्लाहचे संकेत (निशाण्या)**

२:२५९-२६०, ३:१३, ३:४१, ३:४९, ३:१९०-१९१, ६:३७, ६:९७-९९, ६:१५८, ७:२६, ७:५७-५८, ७:७३, ७:१३३, १०:५-६, १०:२४, १०:६७, ११:१०२-१०३, १३:२-४, १४:५, १६:१०-१३, १६:६५-६९, १६:७९, १७:१२, १७:१०१-१०२, १८:१७, १९:१०, १९:२०-२१, २०:५३-५४, २०:१२८, २१:९१, २३:२७-३०, २३:५०, २६:४, २६:७-८, २६:६३-६७, २६:११९-१२१, २६:१३९, २६:१५४-१५८, २६:१७०-१७४, २६:१८९-१९०, २७:५०-५२, २७:८६, २७:९३, २९:१५, २९:३४-३५, २९:४४, ३०:१९-२५, ३०:३७, ३०:४६, ३१:३१, ३४:९, ३६:३८-४४, ३९:४२, ३९:५२, ४१:३७, ४१:३९, ४१:५३, ४२:२९-३२, ४५:४-५, ४५:१२-१३, ४८:२०, ५१:२०-२१, ५१:३७-३८, ५१:४१, ५१:४३, ५४:१३-१५

**गुन्हा**

२:८१, २:८५, २:१८१-१८२, २:१८८, २:२०५-२०६, २:२१९, २:२८३, ३:११, ३:३१, ३:१३५, ३:१७८, ४:१८, ४:४८, ४:५०, ४:८५, ४:१०८, ४:११०-११२, ५:१८, ५:२८-३०, ५:४९,

५:१०७, ६:६, ६:१२०, ७:३३, ७:१००, ८:५२, ८:५४, ९:१०२, १७:१७, १७:३१, १७:३८, २८:७८, २८:८४, २९:१२-१३, २९:४०, ३३:५८, ३९:५३, ४०:२१, ४२:४०, ४९:१२, ५८:८-९, ६१:१२, ६९:९-१०, ८१:९

**सुलैमान (अ.)**

२:१०२, ४:१६३, ६:८४, २१:७८-८२, २७:१५-४४, ३४:१२-१४, ३८:३०-४०

---------------

## आत्मा आणि स्वत्व :

**या जगात**

२:२८४, २:२८६, ३:१४५, ३:१८५, ४:१, ४:२९, ४:१२८, ५:३२, ५:४५, ५:१०५, ६:९३, ६:९८, ६:१०४, ६:१५२, ६:१५८, ६:१६४, ७:१८९, ९:५५, ९:८५, १०:१००, १०:१०८, १२:५३, १७:१३, १७:२५, १७:३३, २१:३५, २३:६२, २५:६८, २९:६, २९:५७, ३१:६, ३१:३४, ३२:१३, ३५:१८, ३९:४१, ३९:४२, ४१:४६, ४५:१५, ४७:३८, ४८:१०, ५०:१६, ५१:२०-२१, ५३:३२, ५९:१८-१९, ६३:१०-११, ६४:१६, ६५:७, ७३:२०, ७५:२, ८६:४, ९१:७

**परलोकात**

२:४८, २:१२३, २:२८१, २:२८४, २:२८६, ३:२५, ३:३०, ३:१८५, १०:३०, १०:५४, ११:१०५, १६:१११, १७:१३-१५, २०:१५, २१:३५, २१:४७, २१:१०१-१०२, २३:६२, २३:१०१-१०३, ३५:१८, ३६:५४, ३९:७०, ४०:१७, ४१:३०-३१, ४३:७१, ४५:२२, ५०:२१-२२, ५२:२१, ७४:३८, ८१:१४, ८२:५, ८९:२७

१५:२९, १७:८५, ३२:९, ३८:७२

## बोधकथा

२:२४३, २:२४६-२५१, २:२५९, ३:३५-३६, ५:२७-३२, ७:१७५-१७७, १६:११२-११३, १८:३२-४४, २८:७६-८२, ३६:१३-३२, ४०:२८-४६, ६८:१७-३३

## अल्लाहप्रती भक्तीभाव

२:१८६, ६:४१, ६:६३, ७:२९, ७:५५-५६, ७:१८०, ७:१८९, १०:१२, १०:२२, १०:१०६, १३:१४, १७:११, १७:११०, १८:१४, १९:४, १९:४८, २१:९०, २२:६७, २३:११८, २५:६५-६६, २५:७४, २५:७७, २६:२१३, २७:६२, २८:८७-८८, २९:६५, ३०:३३, ३१:३२, ३२:१६, ३९:८, ३९:४९, ४०:१४, ४०:४९-५०, ४०:६०, ४०:६५, ४१:४९, ४१:५१, ४६:१५,५२:२८, ७२:१८, ७२:२०

## अनेकेश्वरांशी

७:१९४, १०:१०६, १३:१४, १७:५६-५७,१८:५२, २२:१२-१३, २६:२१३, २८:६४, २८:८८, ३४:२२, ४०:४३, ४६:५

## समूदचे लोक

७:७३-७९, ९:७०, ११:६१-६८, ११:९५, १५:८०-८४, १७:५९, २२:४२, २५:३८, २६:१४१-१५९, २७:४५-५३, २९:३८, ३८:१३, ४०:३१, ४१:१३, ४१:१७, ५०:१२, ५१:४३-४५, ५३:५१, ५४:२३-३१, ६९:४-८, ८९:९, ९१:११-१५

## तौरेत

२:५३, ३:३, ३:४८, ३:५०, ३:६५, ३:९३, ५:४३-४६, ५:६६, ५:६८, ५:११०, ६:१५४, ७:१५७, ९:१११, ११:११०, १७:२-३, २८:४८, ३२:२३, ४८:२९, ६१:६, ६२:५

**खंदकवाले**

८५:४-१०

**जीवनातील परीक्षा**

२:४९, २:१०२, २:१५५-१५६, २:२१४, ३:१७९, ३:१८६, ५:४८, ६:१६५, ७:१४१, ७:१५५, ८:२८, ९:४९, ११:७, १४:६, १६:९२-९३, १७:६०, १८:७, २१:३५, २१:१११, २२:११, २२:५३, २५:२०, २९:२-३, २९:१०, ४३:३३, ४७:४, ६४:१५, ६७:२, ७४:३१, ७६:२, ८९:१५-१६

**सत्य**

२:१४७, २:२१३, ३:३, ३:७१, ३:१०८, ४:१०५, ४:१२२, ४:१७०, ५:४८, ५:८३-८४, ६:७३, ७:१८१, ९:३२-३३, १०:४-५, १०:२३, १०:३५-३६, १०:५३, १०:५५, १०:९४, १०:१०८,११:१२०, १३:१, १३:१७, १५:८, १५:८५, १६:३, १६:३८, १७:८१, १७:१०५, १८:२९, २१:१८, २१:२४, २२:६२, २३:६२, २८:७५, ३०:६०, ३१:३०, ३१:३३, ३३:४, ३४:६, ३४:२३, ३४:४८-४९, ३५:५, ३५:३१, ४०:१९-२०, ४१:५३, ४२:१७-१८, ४२:२४, ४३:७८, ४३:८६, ४४:३९, ४५:२९, ४७:२-३, ४८:२८, ५०:१९, ५३:२८, ५६:९५, ६१:८-९, ६९:५१, १०३:३

**व्याज**

२:२७५-२८०, ३:१३०, ४:१६१, ३०:३९

**विजय**

२:२५०-२५१, ३:१२३-१२७, ८:१०, ९:२५-२६, १२:११०, २२:३९, २७:३४, ३०:२-५, ३२:२८-२९,४८:१, ४८:३, ४८:१८-२१, ४८:२७, ५८:२१, ६१:१३, ११०:१

### धनसंपत्ती आणि दारिद्र्य

२:१५५, २:१८८, २:२६१-२७१, २:२७४-२८०, ३:१०, ३:११६-११७, ४:२, ४:५-१२, ४:२९, ४:३२-३३, ४:३७-३९, ६:१५२, ८:२८, ८:३६, ९:११, ९:२४, ९:३४, ९:५५, ९:८५, ९:१०३, १०:८८, १७:३४, १८:४६, २४:३३, २४:३७, २६:८८, ३०:३९, ४०:८२, ५१:१९, ५८:१७, ६३:९, ६४:१५, ६९:२८, ७०:२४, ८९:२०, ९०:६-७, ९२:८-११, ९२:१८, १०४:२-३, १११:२

## उपासना :

### फक्त अल्लाहचीच

१:५, २:२१, ३:४३, ३:५१, ३:६४, ३:११३, ४:३६, ५:७२, ५:११७, ६:१०२, ७:५९, ७:६५, ७:७३, ७:८५, ७:२०६, ९:३१, १०:३, १०:१०४, ११:५०, ११:६१, ११:८४, ११:१२३, १२:४०, १३:३६, १५:९८-९९, १६:३६, १६:११४, १७:२३, १९:३६, १९:६५, २०:१४, २१:२५, २१:९२, २२:७७, २३:२३, २३:३२, २४:५५, २७:४५, २७:९१, २९:१६-१७, २९:३६, २९:५६, ३२:१५,३६:६१, ३९:२, ३९:९, ३९:११, ३९:१४, ३९:६४-६६, ४०:६६, ४१:३७, ४३:६४, ५०:३९-४०, ५१:५६, ५३:६२, ७६:२५-२६, ९८:५, १०६:३-४, १०९:१-६

### इतर देवांची

५:७६,६:५६, १०:१८, १९:४२-४४, २१:९८, २२:७१, २५:१७-१९, २५:५५, २७:२४-२५, २७:४३, २९:१७, ३४:४०-४२, ३९:३

### जकात

२:४३, २:८३, २:११०, ५:१२, ७:१५६, ९:११, ९:६०, ९:१०३, २२:७८, २३:४, २४:५६, ३०:३९, ७३:२०, ९८:५

---------------